M2132

BF 1651 .P4

Faljyotishadarsh aani kundalivagnan

Rs.2.00

GIFT FROM SH
GIFT
Date 21-5-59
Initial
M. 2132. [2

MAHARAJA SAYAJIRAO MEHTA LIBRARY
The Maharaja Sayajirao University
of Baroda
Cat. No. 7BF
1651
P4-2
M. 2132

...ANSA MEHTA LIBRARY
...Maharaja Sayajirao University
...of Baroda
Call No. 7BF
1651
P4-2
M.2132

...तिमः शशांकतनयः
...टोच्चगो यन्मृगं ।
...त्राणि रवींदु
...मने कुर्यात्स वो
...यका नीचगो ।
... दैत्यैश्च यजुर्भि
...ग्रहः कुर्या-
...तामागतं ।
... समु-
... मंगलं
...ये

राशींचे वर्ण. पु.१लें अं.१ला पृ.९ श्लो. १७ व ग्रहांचे वर्ण पृ.१९ श्लो. ३९ पहा.

१ ब्राह्मण वर्णाच्या राशी— वृषभ, वृश्चिक व मीन.
२ क्षत्रिय वर्णाच्या राशी—मेष, धनु व सिंव्ह.
३ वैश्य वर्णाच्या राशी—मिथुन, तुला व कुंभ.
४ शूद्र वर्णाच्या राशी—कर्क, कन्या व मकर.

१ ब्राह्मण वर्णाचे ग्रह—शुक्र व गुरु
१ क्षत्रिय वर्णाचे ग्रह—सूर्य व मंगळ.
३ वैश्य वर्णाचा ग्रह—चंद्र.
४ शूद्र वर्णाचा ग्रह—बुध.

राहु व शनि हे दोन ग्रह हीन वर्णाचे असून, केतु जात्यंतर दर्शविणारा आहे.

वाचकहो! आपण कोणतीहि कुंडली पुढें घेवून चंद्रराशी, प्राणपद, व गुलिक यांवरून जन्मलग्न खरें कीं खोटें अर्थात् जन्मकालीन इष्ट घटी-पळांचा सूक्ष्म निर्णय आणि स्त्री, पुरुष जननसमय यांचा विचार ज्याप्रमाणें केलाजातो [पु. १ अं. ४ पहा] त्याप्रमाणें चातुर्वर्ण्यजातीचा विचार होतो.

मागें आह्मीं अंक ४ पृ.९२ मध्यें चातुर्वर्ण्यजातीबद्दल जें सांगितलें; त्या पैकीं कलीमध्यें दोनवर्णाचीच कायती परिस्थिति राहणार आहे. त्यांत ब्राह्मण वर्ण केवल नामधारी राहील. कारण राजा, कालपरिस्थित्य-नुरूप अथवा कलिमहिमानुसार वर्णव्यवस्था सुव्यवस्थित नसल्यामुळें जन्मकुंडलीवरून चातुर्वर्ण्याचा निश्चयात्मक बोध होणें शक्य नव्हे. तथापि, या बाबतींत आह्मांस जेवढा विचार करणें शक्य होता तितका विचार करून सोदाहरण जाति चिकित्सा आज येथें देत आहों. जातीचा निर्णय करतांना पृष्ठ ९२ मध्यें जे विचार सुचविले आहेत. त्यांवरून बराच कार्यभाग झाल्यावांचून राहणार नाहीं.

पुस्तक १ लें अंक ४ था पृष्ठ ८१ कुंडली नंबर २ ही उदाहरणार्थ पुढें घेऊन कोणत्या वर्णाची आहे याचा विचार करूं.

या कुंडलींत जन्मलग्न तुला या वैश्यवर्णद्योतक राशींचें असून जन्मलग्नीं मंगळ [क्षत्रियवर्ण द्योतक ग्रह] व गुरु [ब्राह्मणवर्णद्योतकग्रह] आहे; व जन्मलग्नावर चंद्र [वैश्यवर्णाचा ग्रह] पाहत आहे [लग्नावर शनीची दृष्टी आहे खरी परंतु शनी अस्तंगत असल्यानें दृष्टी शून्य] या ३ योगांवरून सदर कुंडलींत ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे ३ वर्ण दृग्गोचर होतात. इतका सकृद्दर्शनी विचार केल्यानंतर वरील ३ वर्णांमध्यें बलवान् कोणता वर्ण आहे हें पाहून नंतर पृष्ठ ९२ यांतील नियमाप्रमाणें जातीचा निर्णय केला तो. १ जन्मलग्न वैश्यवर्णाचें, २ जन्मलग्नावर पाहणारा चंद्र वैश्य वर्णाचा, ३ जन्मलग्नांत मंगळ क्षत्रियवर्णाचा असून, गुरू [ब्राह्मणवर्ण] शीं संबंध करून असल्यानें पृ. ९२ नि. २ प्रमाणें ह्मणजे वैश्यवर्णाच्या राशी व ग्रह यांच्याशीं क्षत्रियवर्णग्रहाचा संबंध झाला असतां क्षत्रियवर्णाची संभूति होते, या नियमानुसार वर दर्शविलेल्या कुंडलींत क्षत्रियवर्ण बलवान् झाला. आतां त्या क्षत्रियवर्णाच्या ग्रहाशीं [मंगळाशीं] संबंध करून असलेला गुरु [ब्राह्मणग्रह] तो जन्मलग्नीं असल्यामुळें कुं. नं. २ चा इसम मध्यमाधम ब्राह्मण वर्णाचा असावा असें सिद्ध होतें.

खुलासा—सदर कुंडलीचा इसम ब्राह्मण असून नौकरीकरून आपला प्रपंच भागवीत आहे. यावर मनुस्मृतींत असें सांगितलें आहे कीं " लौकिके कर्मणि रतः पशूनां परिपालकः। वाणिज्यकृषिकर्माणि सविप्रो वैश्य उच्यते" तेव्हां ज्योतिःशास्त्र व धर्म शास्त्र या उभय पद्धतीनें जातीचा निर्णय केला पाहिजे. एरव्ही कोणत्याहि कुंडलीवरून जातीचा निर्णय होणें तर खास दुर्घट आहे. हें आज वाचकवर्गास पुन्हां सांगितल्यावांचून राहवत नाहीं.

कारण प्रतिवर्णाचे भेद ९ असे ३६ भेद आहेत ते येणें प्रमाणें. १ ब्राह्मण २ मध्यम ब्राह्मण ३ अधम ब्राह्मण ४ मध्यम ब्राह्मण ५ मध्यम

मध्यम ब्राह्मण ६ मध्यमाधम ब्राह्मण ७ अधम ब्राह्मण ८ अधम मध्यम ब्राह्मण ९ अधमाधम ब्राह्मण असे ९ याचप्रमाणें इतरांचे भेद जाणावे. याचा सविस्तर खुलासा येथें देण्यापेक्षां यांचें विवरण स्वतंत्र होणें चांगलें असल्यामुळें आज इतकेंच लिहून व आणखी दोन उदाहरणें याच बदल देऊन हा विषय पुरा करण्यात येत आहे.

कुं. नं. २ चा इसम ब्राह्मण असून हा शाळाखात्यांत नौकरी करून आहे [हेडमास्तर आहे.] वाचकहो, या गृहस्थाच्या कुंडलींत जन्मलग्नीं गुरु मंगळ आहे [शिक्षा करणें हा धर्म मंगळाचा [क्षत्रियग्रहाचा] असून, विद्यादानकरणें गुरूचा [ब्राह्मण ग्रहाचा] धर्म आहे. तेव्हां या ग्रहयोगावरून हे गृहस्थ शिक्षक [मास्तर] झाले. आणि जन्मलग्नावर दशमेश चंद्राची दृष्टी असल्यानें मुख्य शिक्षक [हेडमास्तर] झाले. [सं. फ.] नूतन योगरत्नावली. पृ. ७ श्लोक. १८ अध्यापक योग पहाः—

उदाहरण २ रें—अंक ४ पृष्ठ ८३ कुंडली नंबर ४ पहा. या कुंडलींत जन्मलग्न, तुला या वैश्यवर्ण राशींचें असून लग्नीं शुक्र [ब्राह्मणग्रह] व बुध [शूद्र वर्णाचाग्रह] आणि मंगळ [क्षत्रियवर्णाचा ग्रह] असून जन्मलग्नावर गुरूची [ब्राह्मणवर्ण ग्रहाची] दृष्टी आहे, तेव्हां पृष्ठ ९२ नि. २ प्रमाणें पाहतां याकुंडलीचा इसम मध्यमोत्तम ब्राह्मण वर्णाचा असावा असें सिद्ध होतें.

शाळामास्तर व खाजगीनौकर अर्थात् जमाखर्चलिहिण्याचें काम करणारे आणि वकीलाचे कारकून यांच्या परस्पर कुंडलींत ग्रहस्थिती फारकरून साम्यतेची आढळून येते असा अनुभव आहे. [सं. फ.] वाचकवर्ग आपला अनुभव कळवीतील.

नंबर ४ चे कुंडलींत राजग्रह सूर्य व्यय (१२) स्थानीं असून दशमेश चंद्र रिपुभावी असल्यानें राजवर्गाची अर्थात् सरकारी नौकरीचा योग नसल्यामुळें खाजगी नौकरी करण्याचा योग होतो. [सं. फ.]

उदारण ३ रें– अंक ४ पृष्ठ ८२ कुं. नं. ३ पहा. या कुंडलींत ही तुलाच लग्न असून जन्मलग्नांत कोणी ग्रह नाहीं. जन्मलग्नावर शनि मंगळाची [हीन वर्ण व क्षत्रियवर्ण ग्रहाची] दृष्टि आहे. त्यामुळें पृष्ठ ९२ यातील नि. ३ व ४ प्रमाणें सदर कुंडलीचा इसम शूद्रवर्णाचा असावा असे सिद्ध झालें. व तें बरोबर आहे.

इति फलज्योतिषादर्शे पंचमकृत्यं ॥

द्वादशभाव आणि कारकें.

जन्मकुंडली म्हणजे बारा घरांचें एक चक्र बनवून, ज्यामध्यें सूर्यादि ग्रह स्वस्थानक्रमानें मांडिले जातात ती. आतां आमच्या वाचकवर्गांना कशी मांडावी हें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. राशि १२ मेषादि क्रमानें असून ग्रह ९ सूर्यादिक होत. आपणास इष्ट वेळीं लग्न अथवा राशि कोणता उदय पावला आहे हें समजण्याकरितां घटीयंत्र अथवा घड्याळ जवळ ठेविलें पाहिजे. [पंचांगांत प्रतिदिवसाचा सूर्योदय कलाक मिनिटानिशीं दिला असतो त्यावरून सूर्योदय किंवा सूर्यास्तसमयीं घड्याळ लावून ठेविलें असतां इष्टवेळा बरोबर निघते] दिवसा जन्म असतां जितके कलाख मिनिटें इष्टकालीन असतील, त्यांत सूर्योदयाचीं कलाख मिनिटें वजा द्यावीं. व रात्रीं जन्म असतां सूर्यास्ताच्या कलाख मिनिटां इष्टवेळेमध्यें वजा देऊन जीं कलाख मिनिटें शिल्लक राहतील ती आपली इष्टवेळा जाणावी. जसें सूर्योदय ६ वाजून ३९ मिनिटांनीं असून जन्म दोनप्रहरीं १ वाजतां आहे, तेव्हां कलाख इष्टवेळीं १३ यांत ६–३९ वजा देतां ६ कलाख १९ मिनिटा इष्टकालीन झाल्या. याच्या घटिका प्रत्येक कलाखामागें २॥ घटिका म्हणजे २४ मिनिटांची एक घटिका या हिशोबानें १९ घटिका २॥ पळें इष्ट वेळेची झाली. याप्रमाणें इष्ट घटी पळें आणून नंतर पुस्तक १ अंक २ पृ. ४४ यांत दिलेल्या उदाहरणाप्रमाणें इष्ट घटीपळांवरून इष्टसमयीं जन्मलग्न अथवा इष्ट राशि कोणता उदित होतो हा पाहून जो राशि अथवा लग्न आलें असेल, तें बारा घरांच्या कोष्टकांत डोक्यावर मांडून बाकीच्या राशी अथवा

राशिदर्शक अंक अनुक्रमें डाव्या बाजूनें मांडावे. [कुंडलींत राशि मांडण्याची पद्धत नसून त्या त्या राशीचे दर्शक अंक १–२–३–अशा क्रमानें मांडितात. जसें १ म्ह. मेष २ म्ह. वृषभ इत्यादि होत] म्ह. जन्मकुंडली तयार होईल.पुढें आपणांस इष्टवेळीं पौर्णिमा अगर अमावास्या जी जवळ दिसेल त्या तिथीच्या पंचांगस्थ कुंडलीवरून [इतर ग्रहांचे राशि चार पाहून, ज्या ज्या राशीस जे जे ग्रह असतील त्या त्या राशीस ते ते ग्रह क्रमवार मांडिले असतां सग्रह जन्मकुंडली तयार होईल. व याच कुंडलीवरून भूत, भविष्य, वर्त्तमान स्थितीचा विचार केला जातो.

अनुदित भाग— जन्मकुंडली —उदित भाग—



याप्रमाणें कुंडलीचें सामान्य स्वरूप असून, विशेष स्वरुप पुढें दिलें तें पहा ! **तनुभाव**—जन्मणाराचें [स्त्री असो वा पुरुष असो] स्वरुप, काळा गोरा आदिकरून वर्ण, ब्राह्मणादि जातीचा विचार, शारिरसुख अथवा दुःख, वयोमान, शत्रूचानाश पितृमाता, (आजी) मातुलेय (मामाचा मुलगा) संततीचेंभाग्य, जननीपिता, (आईचा बाप) शालकी (मेव्हण्याचा मुलगा) श्वश्रुमाता (सासूची आई) मातुलमृत्यु (मामाचें निधन) जन्मणाराचें डोकें यांचा दर्शक आहे. ॥ १ ॥

धनभाव—स्वगृहांतील पोष्यवर्ग, वाणी, (भाषा) उजवानेत्र, मुख, सुवर्ण, रत्न, क्रयविक्रय, धान्यसंग्रह, गाईम्हशी, यांचा संग्रह, शस्त्र, शत्रूचें भाग्य, मुलाची सासू, शत्रूचा प्रवास, चांगला वाईट स्वर, बंधूच्या द्रव्याचा खर्च, शत्रूच्याबंधूचे स्त्रीभवन, श्यालक (मेव्हणा) पित्याची विद्या, नौकर चाकर, यांचा दर्शक आहे ॥ २ ॥

तृतीयभाव—बंधुभगिनी, पराक्रम, सौजन्य, उद्दामपणा, स्वस्त्रीचें भाग्य, नाटकीकर्म, आईचा चुलता, मामाचें पितृस्थान, नौकरलोक, मद्तगार, औषधकर्म, बाहू, गळा, उजवाकान, साहसकर्म, कंठस्वर, धैर्य, यांचा दर्शक आहे. ॥ ३ ॥

चतुर्थभाव—माता, इष्टमित्रबांधव, गाडी, घोडे, बैल वगैरे, स्वगृह, गुप्तचिंता, उदर, चांगलीं वाईट स्वप्नें,ग्राम, शेती, बाग वगैरे, भूमिगतद्रव्य, क्षुधाशांति, पाणी, गुप्तबंधन, शय्या (गादी) बंधूचें द्रव्य, मातामहमाता, (आईच्या बापाची आई) श्वशुर, (सासरा) मामाच्या मुलाची बायको, चुलत्याचीं मुलें, मेव्हण्याचा मृत्यु व मेव्हणाची स्त्री, हृदयांतील गुणदोष, भोज्यवस्तु, उजवाखांदा, सुगंधिद्रव्य, यांचादर्शक आहे ॥ ४ ॥

पंचमभाव— विद्या, इष्टदेवतासिद्धि, बरिवाईट बुद्धि, अन्नदान, अन्नभक्षण, स्वभाव, शिष्यवर्ग, मंत्रोपदेश, मातृधन पितृनिधन, मामाच्या द्रव्याचाखर्च, मुलाचें डोकें, चुलत्याचा शत्रु, बंधूचा पराक्रम, मातेचें मुख, ग्रंथरचना, नम्रता, गर्भस्थिती, कन्यापुत्रसंतति, नीति व अनीति, विचारशक्ति, यांचा दर्शक आहे. ॥ ५ ॥

रिपुभाव— शत्रु, मामा, रोग, मावशी, पुत्रधन, चुलत्याची स्त्री वडिलांचा (बापाचा) प्रवास, वडिलांचें पुण्य, शांति, चोर, क्षत (व्रण अथवा छिद्र) विघ्न, शरीरावरील केंश, कंबर, मधुरादि षड्स, उपदंश, व्यसन, यांचा दर्शक आहे. ॥ ६ ॥

सप्तमभाव— स्त्री, रण, तंटेबखेडे, प्रयाण, आगमन, शत्रुधन, बंधूचीं मुलें, आईची आई, बापाचा बाप, मेव्हण्याच्या मुलाची बायको, शेती, स्त्रीसंभोग, परस्त्रीसहवास, चौर्यविद्या, सासूचाबाप, नष्टधनविचार, नाभीचा खालचाभाग (ओटी) यांचा दर्शक आहे. ॥ ७ ॥

अष्टमभाव– मृत्यु, आयुष्य, वडिलार्जितद्रव्य, जलप्रवास, पाण्यांत बुडणें, स्त्रीधन, किल्ला, शंकेखोर स्वभाव, मोठमोठीं संकटें, शस्त्रपीडा, चुलत्याचीं नातवंडें, सुनेचाबाप, मरणहेतुस्थान, अन्नपचनस्थिती, ग्रहयोगवशेंकरून नरकादिगती, गुद, लिंग आणि योनि यांतीलरोग यांचा दर्शक आहे. ॥ ८ ॥

नवमभाव–धर्म, अंतःकरण, स्वतःचें भाग्य, अनुष्ठान तप आचरणादि, स्वभाव, तीर्थयात्रा, पुराणश्रवणादि आणि पठन, स्वाध्याय, ब्रह्मज्ञान, विहिरी तलाव वगैरे बांधणें, मठवास, मठबांधणें, भावाचीपत्नी, स्वतहाचीं नातवंडें, नौकराचे शत्रू, वडिलार्जितद्रव्याचा खर्च, मंत्रोपदेष्टा गुरु, विद्यादेणारा गुरु, साक्षीभोजन, दानक्रिया, सन्यास, सामर्थ्य, मांड्या यांचा दर्शक आहे. ॥ ९ ॥

दशमभाव– पिता, व्यापार, सन्मान, राजमान, स्त्रानलाभ, राजयोग, घांट तलाव वगैरे बांधणें, वडिलांचेंसुख, स्वस्त्रीमाता, बंधूचें निधन, मुलाचेंशत्रू, मामाचीं मुलें, पूर्वजन्मस्थिती, स्त्रनावाचा शिक्का चालणें, नौकरीचाविचार, आज्ञा (हुकूम) कीर्ति, प्रवास, अलंकार, वस्त्रप्रावर्ण, निद्रा, ब्रह्मचिंतन, सन्यास, जानु, यांचादर्शक आहे. ॥ १० ॥

एकादशभाव–सोनें, चांदी, रत्नें यांचा साठवा, पितृधन, मुलाची पत्नी, बंधूचें भाग्य, नष्टवस्तुलाभ, विद्याप्राप्ति, डावाकान, द्रव्यलाभाचामार्ग, पोठऱ्या, बुद्धिप्रकाश यांचा दर्शक आहे.

द्वादशभाव-द्रव्यखर्च, शत्रुचिंता, मामाची बायको, राजदंड, राजकीयजनपीडा; कुटुंबवैर (गृहकलह) चांगला वाईट द्रव्य खर्च, डावाडोळा, चुलता, मेव्हण्याचे मित्रवर्ग, स्वस्त्री रोग, शत्रुस्त्री, आईचें भाग्य, आईची तीर्थयात्रा, स्वपुत्रारिष्ट, बायकोच्या मामाचें निधन, दीनता, कारागृहवास, निद्रास्थान, दोन्हीपाय, ग्रहवशेंकरून मृत्यूनंतर चांगली वाईट गती, दूरदेशप्रवास, यांचा दर्शक आहे.

या प्रमाणें बाराभावाचें स्वरूप समजल्यानंतर सूर्यादि ग्रहांचें स्वरूप कळणें आवश्यक असल्यानें तें येथें देतों.

भावांची स्थिर कारकें.

॥ द्युमणिरमरमंत्री भूसुतः सोमसौम्यौ
गुरुरिनतनयारौ भार्गवो भानुपुत्रः ॥
दिनकरदिविजेज्यौ जीवभानुज्ञमंदाः
सुरगुरुरिनसूनुः कारकाः स्युर्बलघ्नात् ॥ १ ॥ ज्यो.नि. ॥

अर्थ. शरीर सुखाचा कारक सूर्य; धनभावाचा कारक गुरु, सहजभावाचा कारक मंगळ; मातृभावाचे कारक चंद्र व बुध; संतती आणि विद्या भावाचा कारक गुरु; रिपुभावाचे कारक शनि व मंगळ; जायाभावाचा कारक शुक्र; मृत्युभावाचा कारक शनि; नवमभावाचे कारक सूर्य आणि गुरु; दशमभावाचे कारक गुरु, सूर्य, बुध आणि शनि; एकादश भावाचा कारक गुरु; व्ययभावाचा कारक शनि. येणें प्रमाणें सूर्यादिग्रह बारा भावांचे कारक होत.

सूर्यादि ग्रहांची स्थिर कारकें. ॥ ज्यो. ति. ॥

॥ सूर्यादात्मपितृस्वभावनिरुजा शक्तिः श्रियश्चिंतये-
च्चेतो बुद्धिनृपप्रसादजननीसंपत्करश्चंद्रमाः ॥
सत्वं रोगगुणानुजावनिसुतान् ज्ञातिं धरासूनुना
विद्याबंधुविवेकमातुलसुहृत्वाक्कर्मकृत् बोधनः ॥ २ ॥

प्रज्ञाचित्तशरीरपुष्टितनयज्ञानानि वागीश्वरात्
पत्नी वाहनभूषणानि मदनव्यापार सौख्यं भृगोः
आयुर्जीवनमृत्युकारणविपत्संपत्प्रदाता शनिः
सर्पेणैव पितामहं तु शिखिनामातामहं चिंतयेत् ॥ ३ ॥

अर्थ-सूर्य हा ग्रह-आत्मा, पिता, स्वभाव, आरोग्यता, शरीरशक्ति, आणि संपत्ती यांचा कारक आहे. सौभाग्य -

चंद्र-अंतःकरण, बुद्धि, (सद्सद्विचार) राजकृपा, माता, आणि संपत्ती यांचा कारक आहे.

मंगळ-पराक्रम, रोग, गुण, बंधु, पृथ्वी, (जमीन) संतति, जाती. यांचा कारक आहे.

बुध-विद्या, भाउबंद, विचारशक्ति, मातुल [मामा] मित्र आणि वाणी यांचा कारक आहे.

गुरु-बुद्धि, धन, शरीरसंपत्ती, विद्या आणि संतती यांचा कारक आहे.

शुक्र-स्त्री, वाहन, भूषण, स्त्रीविलास, व्यापार आणि सुख यांचा कारक आहे.

शनि-आयुष्य, जीवित, मृत्युचें कारण, विपत्ति आणि संपत्ति यांचा कारक आहे.

राहु-पितामहाच्या (आजाच्या) सुखदुःखाचा कारक असून केतु मातामह (आईचाबाप) याचा कारक होय. ॥ ३ ॥

खुलासा-जन्मकालीं सूर्य, उच्च, स्वक्षेत्रीं, मित्रगृहीं आणि मूलत्रिकोणीं १-३-५-६-९-१०-११ या भावात असतां विशेषतः उपचयस्थानीं (३-६-१०-११) असून जन्मलग्न बलवान् असतां अनुक्रमें शारीरसौख्य, बापाचें सुख, सुस्वभाव, आरोग्यता आणि धनसंपन्न करण्यास समर्थ असतो. इतरत्र असतां हानि करतो. जर त्या सूर्यावर अगर जन्मलग्नावर पापग्रहाची आणि शत्रुग्रहाची दृष्टी असेल तर दृष्टि देणाऱ्या ग्रहाच्या दशाप्रवेश समयीं भावजन्य व ग्रहजन्य फलाचीं हानी होवून विपत्ति भोग-

ण्याची वेळ येते. त्यांत जर शुभग्रहाचि दृष्टी असेल तर साधारण पीडा जाणावी. चंद्र–अंतःकरण, बुद्धि, राजकृपा, माता, संपत्ती यांच्या सुखाचा कारक आहे. जसें–जन्मकालीं १।२।४।५।९।१२ या राशींचा चंद्र (पूर्णमंडलाचा) १।२।३।४।५।७।९।१०।११ या भावांत असतां अंतःकरण निर्मल असून गंभीर असतें तोच चंद्र पापग्रहानीं युक्त किंवा दृष्ट असतां अंतःकरणांत नेहेमी फेर बदल होत असतो. तोच चंद्र मातृस्थानीं, पंचमांत, नवमांत, धन व लाभस्थानीं आणि दशमस्थानी असतां अनुक्रमें मातृसुख, राजकृपा, सुबुद्धि, संपत्ती यांचें सुख प्राप्त होतें आणि वरील राशि सोडून इतर राशीस जर तो चंद्र पापग्रह दृष्ट व युक्त असतां अंतःकरण प्रभृतीची दुर्बलता जाणावी. याप्रमाणें इतर ग्रहांच्या कारकाचा व राशीचा विचार करून भावजन्य व ग्रहजन्य फलांची वृद्धि हानी समजावी

॥ द्वादशभावांचें शुभाशुभ निरूपण ॥

॥ तन्वादिभावेषु शुभोदयेषु तद्भावनाथोपगतेक्षितेषु ॥
॥ तदुक्तभावस्य समृद्धिरुक्ता न पापखेटेक्षितसंयुतेषु ॥ ४ ॥
॥ नीचस्थो रिपुराशिस्थः खेटो भावविनाशकः ॥
॥ मूलस्वतुंगमित्रस्थो भाववृद्धिकरोभवेत् ॥ ५ ॥
॥ यद्भावनाथो रिपुरंध्ररिःफे दुःस्थानपो यद्भवने स्थितस्तु ॥
॥ तद्भावनाशं कथयंति तज्ज्ञाःशुभेक्षितश्चेत्फल मन्यथास्यात् ॥६॥
॥ यद्भावपे केन्द्रगते विलग्नात् त्रिकोणगे वा यदि सौम्यदृष्टे ॥
॥ तुंगादिवर्गोपगते बलाढ्ये तद्भावपुष्टिं फलमाहुरार्याः ॥७॥

॥ नाशस्थानगतो दिवाकरकरच्छन्नस्तु यद्राशिपो नीचारातिगतोथवा यदि शुभैःखेटैरयुक्तस्थितः ॥ तद्भावस्य विनाशनं मुनिगणाः शंसंति खेटैर्युतो यद्यत्रापि फलप्रदो नहि तदा मूर्त्यादि भानां क्रमात् ॥ ८ ॥

॥ भावेशाक्रांतराशीशे दुःस्थे भावस्य दुर्बलं ॥
॥ स्वोच्चमित्रस्वराशिस्थे भावपुष्टिं वदेद्बुधः ॥ ९ ॥
॥ यद्भावलाभधनविक्रमराशियाता यद्भावनाथसुहृदश्च तदुच्चनाथाः ॥ तद्भावपुष्टिबलमंबरचारिणस्ते कुर्वंति ॥ मूढरिपुनीचविवर्जिताश्च ॥ १० ॥ ॥
॥ भावांशतुल्यः खलुवर्तमानो भावोऽखिलं पूर्णफलं विधत्ते ॥
॥ भावोनकेनाप्यधिकेन चखेटे त्रैराशिकेनात्रफलं विचार्यम् ॥११॥

अर्थ–१तनु आदिकरून कोणताहि भाव (राशि) शुभ (२।३।४।६।७।९।१२ राशींचा असून आपल्या स्वामीनें युक्त अगर दृष्ट असतां, पापग्रहानीं युक्त किंवा दृष्ट नसेल तर त्या भावाची पुष्टता (शुभत्व) जाणावी ॥ ४ ॥ २कोणत्याहि भावाचा स्वामी नीच राशीस अगर शत्रुक्षेत्री असेल तर त्या भावाची हानी समजावी.

३कोणत्याही भावाचा स्वामी मूलत्रिकोणीं स्वगृहीं, उच्चराशीस मित्रक्षेत्री असतां त्या भावाची वृद्धि (सौख्य) जाणावी ॥ ५ ॥

४- ज्या भावाचा स्वामी ६।८।१२ या स्थानीं स्थित असेल अगर ६।८।१२ या स्थानाचे स्वामी ज्या स्थानी स्थित असतील त्या भावाची हानि जाणावी. जर यावर शुभग्रहाची दृष्टी असेल तर हानि होत नाहीं.॥६ ॥

६।८।१२ या भावाचे मालक ६।८।१२ या स्थानीं असतील तर ते आपआपल्या भावाची वृद्धि (सुख) करतात. (सं.फ.)

ज्या भावाचा स्वामी जन्मलग्नापासून केन्द्रात(१।४।७।१०) अथवा कोणांत (५।९) असून शुभग्रहानीं युक्त किंवा दृष्ट असेल, आणि उच्च, स्वराशीस मित्रगृही बलवान् असेल तर ज्योतिःशास्त्राज्ञ त्या भावाची वृद्धि (सौख्य) सांगतात. ॥ ७ ॥

६- ज्या भावाचा स्वामी जन्मलग्नापासून अष्टमस्थानी सूर्य युक्त असेल-अथवा नीचराशीस, शत्रुगृहीं शुभग्रह युक्त किंवा दृष्ट नसेल तर त्या भावाची हानी समजावी. असें मुनिजन सांगतात. ॥८॥

७ ज्या भावाचा स्वामी ज्या स्थानीं असेल त्या स्थानाचा स्वामी जर ६।८।१२ या स्थानात स्थित असेल तर त्या भावाची निर्बलता समजावी. जर उच्च, स्वगृहीं, मित्र राशीस, मूलत्रिकोणी असेल तर सौख्य (पुष्टता) जाणावें ॥९॥ ८ ज्या भावात, द्वितीय, तृतीय व एकादश या स्थानाच्या स्वामीची राशी असेल; ९ ज्या भावाचा स्वामी मित्रक्षेत्रीं, उच्चराशीस स्थित असून त्या भावाचा स्वामी ज्या राशीस शत्रुक्षेत्री, नीचराशीस आणि अस्तंगत असा नसेल तर त्या भावाची पुष्टता (सौख्य) समजावी. ॥ १० ॥

१०जो ग्रह ज्या भावांत भावाच्या राश्यंश तुल्य असेल तो ग्रह त्या भावाचें पूर्ण फल देतो.

११जो ग्रह ज्या भावात भावांपेक्षां कमी अथवा अधिक असेल तर तो ग्रह त्रैराशिक रीतिनें कमि फल देणारा जाणावा. ॥ ११ ॥

खुलासा—वाचकहो. अपणास बारा भावापैकीं ज्या भावाचा विचार कर्तव्य असेल तो भाव, कोण कोणत्या गोष्टीचा दर्शक आहे हें प्रथम पाहून नंतर त्या भावाचा कारक कोण आहे हें पाहावें; त्या पुढें सूर्यादि ग्रहांपैकीं इष्ट कारकग्रह कोण आहे हें पाहून नंतर त्या भावाचा व भावस्वामीचा पृ. १०३ यांतील द्वादश भाव शुभाशुभ निरूपण" यारीतिनें विचार करून त्या भावाची वृद्धि अगर हानि समजावी या बद्दल सविस्तर खुलासा भावविचारा मध्यें करूं.

द्वादश लग्नें.

मेषलग्न—मेष हा वनचर (अरण्यात फिरणारा) या राशीचा स्वामी मंगळ—आकृती ह्रस्व, वर्ण लाल, डोळे लाल असून वाटोळे. भोजनास ऊष्णपदार्थप्रिय, अल्पाहारकरणारा, लवकर प्रसन्न होणारा, फिरण्यात बाका, अल्पमैथुनात संतुष्ट, जांघेत पातळ, अल्पधनी, पराक्रमी, स्त्रीप्रिय, नोकरी करणारा, आर्जवी, नखें वाईट असा; ही राशी पापग्रहानी युक्त असतां डोईवर चिन्ह; मग्रूर, श्रेष्ट, चंचल पाण्यास भित्रा, हें लग्न पृष्ठोदय असून रात्रीस बलवान् असतें. हें चर लग्न असून तेजस्वी आणि पुरुषराशीचें होय. याची दिशा पूर्व असून

याचें तोंड दक्षिण दिशेकडे असतें. हेंच मेषलग्न अथवा याचा स्वामी मंगळ जर जन्मलग्नापासून दशमस्थानांत असेल तर महा बलिष्ट व राजयोग कारक असतो. फारकरून हें लग्न दशमस्थानांत १९ अंशपर्यंत असावें. या राशींत सूर्यही बलवान् असतो.

वृषभलग्न—वृषभ हा वनचर (अरण्यात राहणारा) असून या राशीचा स्वामी शुक्र आहे. याचा वर्ण शुभ्र, दिसण्यात सुंदर, विलासी, मांड्या व तोंड मोठें, पाठीचा भाग व छाती विस्तीर्ण, दयाळु, क्लेश सहन करणारा, खादे पुष्ठ, अधिकारी, कन्यापत्यवान्, कफप्रकृती, लोकप्रिय, शांति धरून वागणारा, अहार बहुत, स्त्रीप्रिय, बहुमित्रवान्, बालपणी दुःखी, तरुण व वृद्धपणी सुखी, बंधु, धन, कुटुंब यापासून सुख पावणारा परंतु अंतसमयी एकही उपयोगी पडत नाहीं. हें लग्न पृष्ठोदय असून रात्रीस बलवान् असतें. याचा स्वभाव सौम्य असून दक्षिण दिशेस बलिष्ट असतें. या लग्नाचा स्वामी शुक्र हा आग्नेयी दिशेस असतो. हें स्थिरलग्न असून स्त्रीलग्न आहे.

मिथुनलग्न—याचें स्वरुप वर्ण हिरवा, स्त्री पुरुषाची जोडी, त्यांत पुरुषाचें हातीं गदा व स्त्रीचे हातीं वीणा, ही राशी गावात राहणारी असून इचा स्वामी बुध आहे. ही राशी ह्रस्व आणि रात्री बली, या राशीवर (लग्नावर जन्मलेला स्त्रियांचा अभिलाषी, कामशास्त्र जाणणारा, लालनेत्र ज्याचे. कुरळ केस, चतुर, शास्त्रज्ञ, बुद्धिमान्, चाकरीकरणारा, इंगितज्ञ, जुवा खेळणारा, गायन व नृत्य प्रिय, शरीरानें सुंदर, नाक उंच, मिठास भाषण करणारा, हें लग्न शीर्षोदय असून रात्री बली आहे स्वभावानें क्रूर असून पुरुष वाचक आहे. हें पश्चीम दिशी बलवान् असतें. याचा स्वामी बुध उत्तरेस मुख करून असतो.

कर्कलग्न—कर्कराशीचें स्वरुप—वर्ण शुभ्र, जलचर (पाण्यात फिरणारा. याचा स्वामी चंद्र आहे. कुटिल, शीघ्रचालणारा. स्त्रीच्या आज्ञेंत राहणारा, सन्मित्रसहवास करणारा, ज्योतिष शिकण्याची आवड ज्यास

नेहमीं बहुजनांच्या घरीं हेलपाटे घेणारा, उधळया, द्रव्यवान्, वारंवार नीचास्थिती व चांगली स्थिती यातें भोगणारा, ठेंगु, गळा मोठा, गोडबोलून वश करून घेणारा, मित्रास प्रिय, पाण्यात डुबणारा (पोहोणारा) बाग बगीचे फिरणारा, हें लग्न रात्री बलवान् असून याचा स्वामी चंद्र वायव्य दिशि तोंडकरून असतो. ही स्त्री राशी असून चपल आहे.

सिंव्हलग्न–सिंव्हराशीचें स्वरुप–वर्ण किंचित्सफेद आणि पिंगट झाक, अरण्यात फिरणारा, याचा स्वामी सूर्य आहे. आकार लांबट, अधर्मी, तापट, हनु, गाल, तोंड ज्याचें मोठें, पिवळसरडोळे, संतती अल्प, स्त्रीचा द्वेषी, मांसाहारी, अधिकारी, चाकर लोकावर राग करणारा, पाहिजे त्यावेळीं खाद्य, पेय, सेवन करणारा उदर, दांत मान या मध्यें व्यंग असणें, दयालु पराक्रमी, स्थिरबुद्धीचा, मग्रूर, मातृभक्त; हें लग्न शीर्षोदय असून दिवसा बलवान् असतें, हें स्थिर व पुरुषराशीचें शूर आणि पूर्वदिशि बलवान् असून याचा स्वामी पूर्व दिशि तोंड करून असतो.

कन्यालग्न–कन्या राशीचें स्वरूप–वर्ण साधारण, नावेवर बसलेली असून एका हातांत अग्नी व एका हातांत धान्यमंजरी अशी स्त्री, देशांत राहणारी; या राशीचा स्वामी बुध आहे. आकार लांबट, लज्जायुक्त, सुरूप, शरीरानें उत्तम, गंभीर, शांतदृष्टी, सुखी, मधुर भाषण करणें, शरीरानें पातळ, सत्य प्रिय, धार्मीक, बुद्धिमान्, कार्य करण्यात कुशल, द्रव्य मिळविण्यांत पटाईत, देशांतरी फिरणें, कन्या संततिवान् अल्प पुत्र. ही राशी शीर्षोदय दिवसाबली असते, ही राशी द्विस्वभाव व स्त्रीरूप मृदु व दक्षिण दिशि बलवान् असून स्वामी बुध उत्तरदिशि तोंड करून असतो.

तुलालग्न—तुला राशीचें स्वरूप–वर्ण काळसर, पुरुषराशी, हातात तराजू व बाजारात राहणें, स्वामी शुक्र आहे. लांबट, देवब्राह्मण व साधुसंत यांचा सन्मान राखणें, स्मरणशील, बुद्धिमान्, विचारवान्, न्यायानें व सज्जनापासून द्रव्य मिळविणें, अग्निहोत्रसेवा करणें, स्त्रीचे आधीन, उच्च, नाक उंच ज्याचें, रोडका, चंचलस्वभाव, फिरणें धन-

२ ज्योतिर्विभूषण
आणि
सायननिरयन.

फलज्योतिषादर्शाच्या २ ऱ्या अंकांत आपली कांहीं गोष्टी ज्या प्रतिपादन केल्या आहेत, त्यांचा आजच्या अंकांत विचार करणें जरूर आहे. त्यांतील एका गोष्टीचा सायन निरयन वादाशीं विशेष संबंध आहे. ह्मणून तिची उपेक्षा करणें हितकारक नाहीं. ती गोष्ट अशी : —

पृ० ३१ मध्यें 'मेष व तूळ यांस विषुव संक्रांती' असें ह्मणतात, असें ह्मटलेलें आहे. पण या संक्राती सायन कीं निरयन यांचा उल्लेख केलेला नाहीं, त्यामुळें वाचकांचा गैर समज होणारा आहे, ह्मणून याबद्दल खुलासा करणें आमचें कर्त्तव्य आहे.

समरात्रिं दिवेकाले
विषुवद्विषुवं च तत् ॥
मात्रेन स्यादहोरात्रः
पैत्रो वर्षेण दैवतः ॥

(अमर.)

ज्या दिवशीं दिवस आणि रात्र समान होतात तो विषुव दिन होय. शके १८२८ चें पंचांग काढा. यांत ता. २४ सपटंबर या दिवशीं दिनमान ३० घ० व रात्रीमान ३० घ० आहे. आतां याच सालचें (१९०६ चें) आमचें स्प. ग्र. चें पुस्तक उघडा. यांत सपटंबरच्या २४ व्या तारखेस रवि तूळ राशींत गेला आहे. ह्मणून हा विषुव दिन असून या दिवशीं तूळ संक्रांत आहे. हीच सायन तूळ संक्रांत होय. याच दिवशीं पंचांगांतील रवि कन्येंत आहे. तो पुढें ता. १७ अक्टंबर या दिवशीं तूळ राशीचा तूलार्क झाला आहे. ही निरयन तूळ संक्रांत होय. या दोन संक्रांतींत २३ दिवसांचें अंतर आहे.

वाचकहो, निःपक्षपातानें व सदसद्विवेकबुद्धीला जागृत ठेवून या गोष्टीचा विचार करा आणि उत्तर द्या, कीं विषुव संक्रांती सायन आहेत कीं निरयन आहेत ?

याबद्दल आणखी एक विष्णु पुराणांतील वचन देतों तें पहा—

मेषादौच तुलादौच
मैत्रेय विषुवस्थितः ॥
तदा तुल्यमहोरात्रं
करोति तिमिरापहः ॥

सूर्य हा मेष राशीच्या आरंभीं व तूळ राशीच्या आरंभीं असा वर्षांतून दोन वेळां दिवस आणि रात्र समसमान करितो.

वरील दोन्ही वचनांवरून राशींचीं जीं नांवें आहेत, तीं सायनच आहेत. निरयन राशींना नांवेंच नाहींत. सायन राशींचीं नांवें निरयन राशींना लावणें म्हणजे 'वडाची साल पिंपळास लावणें' होय. निरयन वादी या ठिकाणीं निरुत्तर झालेच पाहिजेत. गोमाजीपंतांचें घर तें माझेंच घर असें म्हणणारा एखादा भामटा बनावट साक्षीपुराव्यानें कोर्टांत निवाडा मिळवूं शकेल, पण या सहस्र रमीच्या कोर्टांत प्रत्यक्ष साक्षीपुराव्यानें 'सायन राशींचीं नांवें तींच निरयन राशींचीं आहेत' असें म्हणणाऱ्या निरयन वाद्यास निवाडा मिळणें अशक्य आहे!

ज्याप्रमाणें मेष व तूळ हे राशि सायन आहेत, त्याचप्रमाणें इतर सर्व राशि सायनच आहेत. कारणः—

अयनस्योत्तरस्यादौ मकरं
याति भास्करः ॥
ततःकुंभंच मीनंच राशे
राश्यंतरं द्विज ॥
त्रिष्वेतेष्वथ भुक्तेषु ततो
वैषुवतीं गतिम् ॥
प्रयाति सविता कुर्वन्नहोरात्रं
ततः समम् ॥
ततो रात्रिः क्षयं याति
वर्धतेऽनुदिनं दिनम् ॥
ततश्च मिथुनस्यांते परां
काष्ठामुपागतः ॥

विष्णुपुराण.

घर्मवृद्धिरपांप्रस्थः क्षपा-
ह्रास उदग्गतौ ॥
दक्षिणे तौ विपर्यस्तौ
षण्मुहूर्त्ययनेनतु ॥

वेदांगज्योतिष.

उत्तरायणाच्या आरंभीं रवि हा मकर राशींत प्रवेश करितो. नंतर अनुक्रमें कुंभ व मीन राशि भोगून मेष राशींत येतो. उत्तरायण सुरू झालें म्हणजे दिवस वाढूं लागतो व रात्र कमी होऊं लागते. असें ज्या दिवशीं होईल तेंच मकर संक्रमण होय. व त्याच दिवशीं तिळगूळ वाटला पाहिजे. शके १८२८ चें पंचांग काढा. त्यांत पौष शुद्ध ८ ला दिनमान २७ घ० १० प० होतें. परंतु दुसऱ्या दिवसापासून तें वाढूं लागलें. म्हणून स्थूल मानानें त्या दिवसापासून उदगयन सुरू झालें. १९०६ चें स्व० ग्र० चें पुस्तक उघडून पहा त्यांत ता० २३ डिसेंबर या दिवशीं मकर संक्रमणाचा आरंभ झाला आहे. असें असतां पंचांगांत ता० १३ जानेवारीला 'मकरार्कः' 'उदगयनं' 'शिशिरर्तुः' असें लिहिलें आहे! तेव्हां या हटवादीपणास काय म्हणावें, समजत नाहीं. ही गोष्ट इतकी सरळ आहे कीं ती एखादा पोरगा सुद्धां कबूल करील.

तात्पर्य, मेष, वृषभ इ० नांवें सायन राशींचीं आहेत, निरयन राशींस तीं जबरदस्तीनें दिलीं आहेत. विषुव व अयनें ही सायन आहेत व तीं धर्मशास्त्रविहित आहेत. या गोष्टी प्रत्यक्ष सावलीवरून ही दिसणाऱ्या आहेत. म्हणून त्या बाबतींत कोणाचाही हटवादीपणा प्रत्यक्ष उघड होईल. धर्मग्रंथांचा आधार दाखविण्याचें कारणच नाहीं.

शरद्वसंतयोरादौ विषुवं
तद्विभाव्यते ॥

[अमर.]

शरत् आणि वसंत या दोन ऋतूंचे आरंभ विषुव दिनींच होतात. तूळ संक्रमणाच्या वेळीं शरदृतूस आरंभ होतो व मेष संक्रमाणाच्या आरंभीं वसंत ऋतूस आरंभ होतो. या गोष्टी सर्वमान्य असतांना ज्योतिर्विभूषणांनीं संक्रांति परत्वें ऋतु सांगतांना मीन मेष वसंत असें ठोकून दिलें आहे! पण त्याच्याचवरच्या महावाक्यांत "चैत्र वैशाख वसंत ऋतु" असें म्हटलें आहे. तेव्हां हें खरें कीं वरचें खरें? असल्या लपंडावांनीं अज्ञानी फसतील, पण ज्याला

यत्किंचित् तरी सदसद्विवेकबुद्धि आहे तो फसला जाईल काय ? "मीन मेष वसंत ऋतु" ह्या सूत्राचा कर्ता तरी कोण? का सर्वच हा 'मारून मुटकून वैद्य बोवाचा' फार्स आहे?

मासैर्द्विसंख्यैर्माघाद्यै :
क्रमात्षड्ऋतवःस्मृताः ॥
शिशिरोथवसंतश्च
ग्रीष्मवर्षाशरद्धिमाः ॥

(वाग्भट.)

सर्वमान्य वैद्यक ग्रंथ जो वाग्भट त्यांतील हें वरील वचन आहे. त्यांत माघापासून दोन दोन महिन्यांचा एकेक असे एका वर्षांत अनुक्रमें शिशिर, वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरत् आणि हिम हे ६ ऋतु होतात. माघांत कुंभ संक्रमण व्हावयाचें ह्मणून कुंभ मीन शिशिर ऋतु, मेष वृषभ वसंत ऋतु अशी परिभाषा उपपत्तिसिद्ध आहे. मीन मेष वसंत ऋतु हें ह्मणणें उघड उघड खोटें आहे.

वरील विवेचनावरून आणखी एक गोष्ट सिद्ध होते. ती अशी कीं, जर मेष, वृषभ इ० नांवें सायन आहेत तर त्याचप्रमाणें अश्विनी भरणी इ० नक्षत्रांचीं नांवें व चैत्र वैशाख इ० महिन्यांचीं नांवेंही सायनच आहेत! आणि असें जर आहे तर पत्रिकेचें गणित सायनच असलें पाहिजे, हें सहज सिद्ध होतें.

ज्योतिर्विभूषण ह्मणतात, नवाथे यांनीं सायनच खरें अशा बद्दलचे पुरावे प्रसिद्ध करावे, पण वरील पुरावे त्यांस शुद्धां साहित असतील. त्यांचा त्यांनीं कधीं विचार केला आहे? फाल्गुनांत मीन संक्रमण होत असून त्या महिन्यांत वसंत ऋतूला आरंभ होतो ह्मणून मीन मेष वसंत ऋतु अशी कारिका ठोकून दिली. कांहीं काळानें कुंभ मीन वसंत ऋतु अशी शुद्धां कारिका बनवावी लागेल. कारण संपात मागें मागें जात आहे. मेष वृषभ वसंत ऋतु ही कारिका शास्त्रोक्त असून ती सायन गण. नेंत मात्र अभंग आहे. या गोष्टी उघड आहेत. पण निरयन गण. नेचा भ्रमोत्पादक चष्मा जोंपर्यंत डोळ्यांस लाविला जात आहे, तोंपर्यंत खऱ्याचें खोटेंच दिसणार!

कुंडलीविज्ञान

बे नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

'भवभूतिः'

पुस्तक ७ वें.] मार्गशीर्ष कृ. २, शनिवार [अंक २८ वा

मकरसंक्रमण

" तीळगूळ घ्या आणि गोड बोला. "

१ **" अयगस्योत्तरस्यादौ मकरं याति भास्करः "**
२ **" घर्मवृद्धिरपांप्रस्थ क्षपा-ऱ्हास उदग्गतौ "**
३ **" मृगादिराशिद्वयभानुभोगात् षडर्तवः स्युः शिशिरोवसंतः '**
४ **" शिशिरपूर्वमृतुत्रयमुत्तरं"**

अर्थ.—१ उत्तरायणाच्या आरंभीं सूर्य मकर राशींत प्रवेश करितो. २ सूर्य उत्तरेस गेला ह्मणजे दिवस वाढतो व रात्र कमी होते. ३ मकर, कुंभ इ० दोन दोन राशि रवीनें भोगिल्यामुळें शिशिरवसंतादि ऋतु होतात. ४ शिशिर, वसंत व ग्रीष्म या तीन ऋतूंनीं उत्तरायण होतें.

वरील वचनांवरून मकर संक्रमण कशास ह्मणावयाचें तें कळेल. ज्या दिवशीं दिवस वाढूं लागेल, तेंच उदगयन होय. त्या दिवशींच मकर संक्रमण झालें असें झटलें पाहिजे. शके १८२९ चें पंचांग पहा. त्यांत मार्गशीर्ष कृष्ण चतुर्थीपर्यंत दिनमान उतरत आलें आहे. या दिवशीं तें

२७ घ. ४ प. आहे. दुसऱ्या दिवशी २७ घ. ५ प. असून पुढें सारखें वाढत गेलें आहे.

आतां, १९०७ चें दैनिक रूप. ग्रहांचें पुस्तक घ्या. त्यांत डिसेंबरच्या २३ व्या तारखेस सायन मकर संक्रमण झालें आहे. यावरून मार्गशीर्ष कृ. सोमवार या दिवशीं आपणांस मकर संक्रांत आहे, असें झटलें पाहिजे. पंचांगांत पौष शु.११ मंगळवार ता. १४ जानेवारी या दिवशीं "मकरार्कः उदगयनं शिशिरर्तुः" असें झटलें आहे, तें चुकीचे आहे. तथापि सर्व समाज आजच मकर संक्रांत असें झणणार आहे!

उदयगन कधीं झालें हें भगवान् सूर्यनारायण सर्वांस प्रत्यक्ष डोळ्यांनीं दाखवितो. त्यास यंत्रसामुग्रीचीही जरूर नाहीं. झणून ज्यांस या संक्रमणाची खात्री करून घेणें असेल त्यांनीं आपल्या अंगणांत एक लंब रेषेंत खुंटी मारावी. आणि सायंकाळीं त्या खुंटीची सावली जशी पडली असेल, तशीच एक रेषा मारावी. याप्रमाणें सुमारें १५ डिसेंबर पासून १ जानेवारी पर्यंत करीत जावें. झगजें ता० २३ डिसेंबरच्या पुढें त्या काठीची छाया थोडी थोडी दक्षिणेकडे येत आहे, असें दृष्टीस पडल. पाहण्याची वेळा मात्र एकच ठेवावी. ज्या दिवशीं सावलींत क्रम बदललेला दिसेल त्या दिवशीच उत्तरायण झालें असें समजावे. खुंटी बारीक व उंच असावी, झणजे फरक लवकर ध्यानांत येईल. रेषा मारणें ती सावलीची उत्तरेकडची जी कड असेल, तींवरच मारावी, झणजे बहुधा २३ वीला किंवा २४ वीलाच क्रम फिरलेला दिसेल. पंचागांतील उदयगनाच्या दिवशीं सूर्य उत्तरेकडे वळल्यास सुमारें २३।२४ दिवस झाल्यामुळें सावलींत झालेला मोठा फरक सर्वांस कळणारा आहे. सारांश, कोणती संक्रांत खरी हें ज्याचें त्यास कळेल.

आपणांस खर धर्मशास्त्राप्रमाणें वागावयाचें असेल, श्रुतिस्मृतिपुराणोक्त फल संपादन करावयाचें असेल तर खरी संक्रांतच घेतली पाहिजे. २३ व्या तारखेस सायन मकर सक्रमण आहे. झणून त्याच दिवशीं शास्त्रोक्त कर्मे आपणांस केलीं पाहिजेत. वास्तविक मकर संक्रमणाला सायन असें झणण्याचें कारण नाहीं.

पण जोपर्यंत समाजांत एक निराळीच पद्धति चालू आहे, तोंपर्यंत संक्रमणांस सायन हें नांव निरुपायानें द्यावें लागणार आहे. वराह मिहिराच्या वेळीं [शके ४४४ च्या पूर्वी] सायन गणनांच सुरू होती. कारण, "आश्लेषार्धा दक्षिण मुत्तरमयनं रवेर्धनिष्ठाद्यम्" असें वेदांग ज्योतिष्यांत सांगितलें आहे. त्यावर शंका घेऊन तो झणतो "नूनं कदाचिदासीद्येनोक्तं पूर्वशास्त्रेषु" त्या वेळीं तसें असेल कदाचित् पण 'सांप्रतमयनं सवितुः कर्कटकाद्यं मृगादितश्चान्यत्॥ उक्ताभावे विकृतिः प्रत्यक्षपरीक्षणे व्यक्तिः॥' आतां जें उदगयन होत आहे, तें सूर्य मकर राशीच्या आरंभी गेल्यावरच संशय असेल तर प्रत्यक्ष पहा. त्याचप्रमाणें आज असे सागण्याचा प्रसंग येत आहे कीं तुझांस संशय असेल तर प्रत्यक्ष पहा. 'हातच्या कांकणास आरसा नको.'

या गोष्टी आझीं नव्यानें सांगतों, अशांतला काहीं भाग नाहीं. पण 'समजतें पण उमजत नाहीं' अशा स्थितींत समाज असल्यामुळें वारंवार तेंच ते तेंच तें आझांस सांगितलें पाहिजे. आमचें विधान चुकीचें असेल तर ते शास्त्रीय पद्धतीनें खोडून टाकावें. नाहीं तर सायन मार्गाचा स्वीकार करावा, या शिवाय अन्य मार्ग नाहीं. प्रत्यक्ष दिसणाऱ्या गोष्टी बहुमतानें खोट्या ठरत नसतात. संपातालाही पूर्ण भ्रमण नसेल. नाहीं असें जरी झटलें तरी त्याची प्रत्यक्ष परीक्षा करण्यास आपणांस निदान ३०० वर्षे तरी जगलें पाहिजे. झणून आज आझी सुद्धां असेंच झणतों कीं, संपाताला भ्रमण नाहीं. पण या वादाशीं वास्तविक काय कर्तव्य आहे कळत नाहीं. ३०० वर्षांनीं संपात मागें वळणार आहे, झणून आज संक्रमणें जीं २३ दिवस मागें आलीं आहेत व त्यामुळें आमचीं धर्मकर्मे श्रुतिस्मृतिपुराणविहित होत नाहींत, त्याची वाट काय? वास्तविक मकर संक्रमण डिसेंबरच्या २३वीला असून आझीं झणणार जानेवारीच्या १४ला! संक्रांतीच्या पुण्यकालीं दानें करावयाचीं असतात, तीं खऱ्या पुण्यकालीं केल्यानें पुण्य लागेल कीं खोट्या पुण्यकालीं केल्यानें लागेल हें आझीं सांगितलें पाहिजे, असें

नाहीं. यासाठीं ज्यांस खऱ्या पुण्यकालाची अपेक्षा असेल त्यांच्यासाठीं आज हा विषय हातीं घेणें जरूर वाटला. खऱ्या खोट्याचा निर्णय जुन्या मताच्या ज्योतिष्यांवर अवलंबून ठेवण्यापेक्षां प्रत्येकानेंच निर्णय करण्याचा समय प्राप्त झाला आहे. प्रत्येकानें ज्योतिष्यांस असा प्रश्न केला पाहिजे कीं आज दिनमान वाढूं लागलें असून सावलीही फिरली आहे. असें असतां आज मकर संक्रांत नाहीं असें कां म्हणतां? जानेवारीच्या १४ वीला 'मकरेकः उदगयनं शिशिरर्तुः, असें जें पंचांगांत छापलें आहे आहे त्याला आधार काय? आणि आम्हीं याच तारखेस संक्रांतीचा सण केला पाहिजे असें कशावरून?

आतां सोंपर्यंत सर्व समाज आपल्या मतास अनुकूल नाहीं, तोंपर्यंत आपणांस सण साजारा करितां येणें शक्य नाहीं. तरी सण म्हणजे आनंदाचा दिवस. गोड गोड पदार्थ करून खातां येतील, पण जर सर्व समाज त्या दिवशीं कार्यव्यापृत व निरुत्साही असेल तर आपण एकट्यानेंच सण करणे बरें नाहीं. तथापि, या दिवशीं स्नान करून दानधर्म करण्यास हरकत नाहीं. पाहिजे तर दोन्ही वेळीं दानधर्म करावा. पण, पहिल्या वेळीं तो अवश्य केला पाहिजे. तरच संक्रांतीचें पुण्य लागेल. १४ जानेवारीला जर संक्रांतच नाहीं तर पुण्य कसें लागेल? या गोष्टीचा वाचकांनीं जरूर विचार करावा.

सायन मकर संक्रमण रविवार ता० २२ डिसेंबर १९०७ शके १८२९ मिती मार्गशीर्ष कृ० ३ या दिवशीं मध्यरात्रीनंतर ५ वाजून ७ मि० स्टँडर्ड टाईम या वेळीं होत आहे. हें संक्रमण रात्रीचें झालें आहे. म्हणून पुण्यकाल दुसऱ्या दिवशीं म्हणजे सोमवारीं सूर्योदयानंतर ५ घ. पर्यंत आहे. या कालीं अंगाला तीळ लावून तिलोदकानें स्नान करावें व तीळ भक्षण करावे. सूर्यसंक्रांतीचे वेळीं जो मनुष्य स्नान करीत नाहीं तो सात जन्मपर्यंत रोगी व निर्धन होतो, असें आपलें धर्मशास्त्र सांगतें. या दिवशीं वस्त्रदान केलें असतां महाफल मिळतें. रोगी मनुष्यानें या वेळीं तीळ व बैल यांचें दान करावें म्हणजे तो रोगमुक्त होतो.

ता. २३ व ता. २४ हे दिवस शुभ कार्याला वर्ज्य आहेत.

'इत्यलं,

---

२ अधिकमास.

काळपत्राचे मागील अंकीं रा० कटककर यांचा अधिक मास संबंधें आलेला पत्रव्यवहार पाहून सखेदाश्चर्य वाटतें. कारण रा० कटककरांनीं पंचांग सभेच्या नांवाखालीं म्हणून जो निर्णय काळामध्यें प्रसिद्ध केला आहे तो लेख निरनिराळ्या पत्रांतून बरेच वेळां त्यांनीं पाठविला आहे व त्या निर्णयाचें खंडन ज्योतिःशिरोमणि केतकर व इतर मंडळींनीं केलें आहे. असें असूनही चर्वितचर्वणाप्रमाणें पुनः पुनः तोच तोच लेख प्रसिद्ध करण्यांत काय अर्थ वाटत असेल तो तेच जाणोत.

ता० ७।८ रोजीं पुणें येथें अधिक मास निर्णयाकारितां सभा झाली त्यांत कटककरांनीं प्रसिद्ध केलेलीं विधानें चुकीचीं आहेत असा निकाल जाहला. तेव्हां आतां त्या संबंधें जास्तलिहिण्यांत अर्थ नाहीं. केतकी पंचांगा विरुद्ध जे जे मुद्दे प्रतिपक्षांकडून प्रसिद्ध करण्यांत आले होते त्यांचें खंडन वेळोवेळीं आलेलेंच आहे.. ज्योतिःशिरोमणि केतकर यांस सभेस येण्यास न झाल्यामुळें विशेष मुद्यांचें स्पष्टीकरण त्यांनीं पत्रद्वारा पाठविलें होतें तें विचारार्ह असल्यामुळें पुढें तें पत्र दिलें आहे.

रा. कटककर यांनीं आपल्या पत्रांत सूर्यसिद्धांताचे गणितानें अधिकमास चैत्रच येतो असें लिहिलें आहे. परंतु श्रीवेंकटेश्वर समाचारांतील तटस्थ या सहीनें प्रसिद्ध झालेल्या

पत्रव्यवहारांत वराहमिहिरोक्त पंचसिद्धांतिकेंतील सूर्यसिद्धांतावरून (पंचांग शोधन सभेच्या ठरावाप्रमाणें) बीजादि संस्कार देऊन अधिकमास फाल्गुन येतो असें सोदाहरण सिद्ध केलें आहे. तेव्हां बीजादिसंस्काररहित असें गणित कटककरांनीं केलें आहे, त्याचा उपयोग अधिकमासनिर्णयाकडे करणें पंचांगशोधन सभेच्या नियमांविरुद्ध आहे. जर पंचांगशोधन सभेस जुनेंच कायम ठेवणें असतें तर हजारों रुपये खर्च करून सभा भरविण्याची जरूरीच नव्हती. जुने सूर्यसिद्धांतादि प्रचलित ग्रंथ चुकतात, तेव्हां नूतन पद्धति कोणत्या प्रकारें असावी याचा निर्णय ठरविण्या करितां सभा भरली होती. ही गोष्ट रा. कटककर यांचे ध्यानांत आली असती तर सूर्य सिद्धांतावरून बीजसंस्कार रहित गणित मांडून चैत्र अधिक मास आणण्याच्या भानगडींत खात्रीनें ते पडले नसते.

आतां जर सूर्यसिद्धांत सर्वांत जुना ह्मणून घ्यावयाचा (सांप्रत दृक्प्रतीतिहीन असला तरीही) तर आमच्यांतील सर्वांत अति प्राचीन व अपौरुषेय ग्रंथ जो वेदांगज्योतिष तो घेणें अत्यंत योग्य होईल, हा ग्रंथ अपौरुषेय असल्यामुळें इतर वेदांगांप्रमाणें याचें अध्ययन करित असतात. तेव्हां कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी जुना ग्रंथ घेणें असेल तर वेदांग ज्योतिष घेऊन पंचांगनिर्णय करणेंच योग्य होईल. यांतील सौर वर्षमान ३६६ दिवसांचें आहे. याचा उपयोग गणिताकडे कां करूं नये. ? रा. कटककरांनीं आपल्या व्याख्यानांत सूर्यसिद्धांतावरून अहर्गण करून वार जुळतो. तेव्हां सूर्यसिद्धांतोक्त सौर वर्षमान खरें ह्मणजे तद्व्यतिरिक्त अर्थात् खोटें असें ध्वनित केलें आहे. आतां जर वार जुळण्यावर वर्षमानाचा खरेखोटेपणा ताडण्याचा असेल तर या पद्धतीनेंही वार जुळतो, असें पंच संवत्सरात्मक युग घेऊन गणित काढिलें असतां दिसून येईल. सारांश, सभेनें जुनें ह्मणजे सांप्रत दृक्प्रतीतिशून्य गणित न घेतां नूतन दृक्प्रतीतिप्रद व वेधसिद्ध असें गणित स्वीकारलेलें आहे. तेव्हां कटककरांनीं बीजरहित सूर्यसिद्धांतांचें गणित ह्मणून जें पुढें केलें आहे त्याचा उपयोग काय ? त्यांचा हा लेख (पंचांग सभेच्या नांवाखालीं दिलेला) पंचांग शोधन सभेनें केलेल्या नियमांचे अगदींच विरुद्ध आहे असें वाचकांस दिसून येईल.

श्रीवेंकटेश्वर समाचार पत्रांतील तटस्थ या सहीच्या पत्रव्यवहारामध्यें देखील सभेनें आपल्या पूर्वीच्या नियमास अनुसरून आग्रह व पक्षपात सोडून पुनः विचार करण्याबद्दल सूचना केलेली होती. परंतु त्याप्रमाणें पुनः तसा विचार झाल्याचें कोठेंही प्रसिद्ध नाहीं. व तटस्थाचे पत्रव्यवहाराविरुद्ध कटककरांनीं कोणतेंही उत्तर दिलेलें नाहीं, तेव्हां सांप्रत शिल्लक असलेल्या पंचांगशोधन सभेच्या मंडळींत पूर्वीच्या नियमांचा वास्तविक अर्थ जाणणारा कोणी राहिलेला नाहीं असें दिसतें. तसें नसतें तर सभेनें ठरविलेलें पूर्वीचे नियम वरील निर्णयामध्यें खात्रीनें मोडले गेले नसते. या व इतर गोष्टींवरून पंचांग शोधन सभेची सांप्रतची स्थिति किती नाजूक झाली आहे, यासंबंधानें व तिनें होऊं घातलेल्या ग्रंथासंबंधानें पुढील एखाद्या खेपेस लिहूं.

तूर्त लोकांस एवढेंच सांगणें आहे कीं कटककर हे सांप्रत ग्रहलाघव वगैरे ज्योतिष ग्रंथांचें अध्ययन करीत आहेत, तेव्हां

अनभिज्ञतेनें त्यांजकडून सभेचे नियम (त्यांचा वास्तविक अर्थ न समजल्यामुळें) मोडले गेले यांत विशेष असें आश्चर्य नाहीं. ब या संबंधानें त्यांना दोष देण्यांत अर्थ नाहीं. आतां त्यांजकडे इतकाच दोष येऊं शकतो कीं, ज्योतिषसंबंधें वाटाघाट करण्याचे घाईस पडून वाचकांचा गैर समज करण्यास कारणीभूत झाले परंतु त्यांचें अध्ययन कांहींसें पुढें गेल्यानंतर त्यांची त्यांनाच चुकी समजून येईल. करितां तेथपर्यंत ते वाटाघाटीस न पडतील तर वर्तमानपत्राची जागा व वाचकांचा वेळ वांचविल्याचें श्रेय त्यांना येईल.

ज्योतिःशिरोमणि केतकर यांनीं पुण्याच्या सभेच्या वेळीं पाठविलेल्या पत्रांचा सारांश.

" अधिकमास निर्णयाचा सूर्योदयाशीं मुळींच संबंध नाहीं म्हणजे स्थानभेदानें अधिकमास भिन्न होणें शक्य नाहीं.

समजा कीं कोणत्याही सूक्ष्म गणीत ग्रंथाधारें उज्जयिनीच्या रेखेसंबंधानें गणित केलें तर पुढील प्रमाणें येतें.

कुंभेर्क : ता. १२।२।०७ सूर्योदयानंतर घ. २१।४९ आहे.
माघक्ष.अमांत ता. १२।२।०७ ,, ,, ४१।२८ ,,
फाल्गुन अमांत ता. १४ मार्च ,, ,, १२।३७ ,,
मर्नेर्क: ता. १४ मार्च ,, ,, १४।७ ,,

हे काल उज्जयिनी सूर्योदयाचे संबंधानें मध्यम आहेत. यांस इतर कोणत्याही गांवाच्या संबंधानें रूपांतर करावयाचें असेल तर चर, रेखांतर, उदयांतर, व मध्यरात्रीपासून कालगणना असेल तर १९ घटिका जास्त यांचा संस्कार केला पाहिजे.

व या चारही गोष्टी सूर्योदयावर अवलंबून नाहींत. या चार गोष्टींचे ऐक्यास आपण क्ष म्हणूं

तर समजा पारीस शहरासंबंधानें पाहिजे तर:—

कुंभेर्क: १२।२।०७ घ. क्ष + २१।४९ होईल.
माघ ३० ता १२।२ घ. क्ष + ४१।२८ ,,
फाल्गुन ३० ता १४।३ घ. क्ष + १२।३७ ,,
मर्नेर्क: ता १४ मार्च घ. क्ष + १४। ७ होईल.

म्हणजें कोणच्याही गांवच्या स्पष्ट किंवा मध्यम कालाच्या संबंधानें किंवा मध्यरात्र सूर्योदय किंवा मध्याह्न संबंधानें गणित केलें तरी (गणित ग्रंथ दृक्प्रतीतितुल्य असेल तर) या चार गोष्टींच्या पूर्वापर क्रमांत व अंतरांत तफावत पडूं शकत नाहीं. अधिकमासनिर्णय या चार गोष्टींच्या पूर्वापर क्रमावरच अवलंबून आहे. मग त्या घटिका पाहिजे त्या स्थलाच्या, पाहिजे त्या आरंभपद्धतीच्या असोत. त्यामुळें निर्णयांत फरक पडत नाहीं. म्हणून नाटिकल मधील सायन सूर्यास (= संक्रमण स्थान + अयनांश) कोणताही संस्कार न करितां संक्रमण काल साधावा. व त्यांत दिलेला अमांत काल घेऊन अधिकमास निर्णय करण्यास हरकत नाहीं असें वरील विवेचनावरून दिसून येईल.

३ अमांतमासपद्धति गणित व ज्योतिषशास्त्रास व सर्व देशांतील पद्धतीस अनुसरून आहे. तशी इनमंडलांत पद्धति नाहीं बरें धर्मशास्त्रासाठीं ती कबूल केली तरी तिच्या तत्वामध्यें व व्यवहारामध्यें मेळ नाहीं. इनमंडलांत पद्धतीच्या तर्फेनें असें सांगण्यांत येतें कीं, अमांतानंतर चंद्रमध्यबिंदु सूर्यमध्यबिंदूस

ओलांडून जातो. तरी पुढें कांहीं वेळ पर्यंत चंद्राच्या बिंबाखालीं सूर्यबिंब झांकलेलें असतें. तें पूर्ण बाहेर पडल्याबर म्हणचें शुद्ध (इनमंडलांत) मासास आरंभ होतो. बरें ही गोष्ट कबूल केली तर अमांतानंतर सूर्यचंद्रांमध्यें त्याच्या त्रिजेच्या बेरजे इतकें म्हणजे सुमारें ३० कला अंतर पडल्यावर शुद्ध मासास आरंभ होतो असें म्हटलें पाहिजे. सूर्यचंद्रामध्यें मध्यम गतीनें दर घटिकेस सुमारें १२ कला अंतर पडतें म्हणून ३० – १२ = २½ अडीच किंवा फार झालें तर तीन घटिका पर्यंत मिश्रमास असतो, असें होतें. पण " अमांतादुभयत्रापिरसनाड्योर्क मंडलं " या चुकीच्या वाक्यावरून किंवा याचा चुकीचा अर्थ करून अमांता नंतर व पूर्वी ६।६ घटिकांपर्यंत उभयमासाचें (पूर्वापर) मिश्रण असें मानितात.

॥ अत्रयद्यपि सूर्यग्रहणे मध्यग्रहणकालानंतरं मोक्षस्थिति कालः षट्घाटिकाभ्यो न्यूनो दृश्यते तथापि सूक्ष्मदर्शिभिः पूर्वाचार्यै रसनाड्योर्क मंडलं इत्युक्तं तत्रागम एव प्रमाणं ॥

(पहा नेटिव ओपिनियन पान ३९८ कालम ५ ता० १९।१२।०६) म्हणजे जेथें गणितानें मेळ घालितां येत नाहीं तेथें आगमच प्रमाण मानून वेळ मारून नेली आहे. म्हणून इनमंडलांत मासपद्धति गौण आहे.

३ इन मंडलांत पद्धति गौण असली तरी तिचा स्वीकार करणें योग्य वाटेल तर तिचा व्याप्ति तरी सर्व प्रसंगीं केली पाहिजे. म्हणजे चांद्रमास इन मंडलांत मानावयाचा तर संक्रमण ही इनमंडलांत मानिलें पाहिजे असें ओघानेंच ठरतें.

म्हणजे मीनारंभबिंदु सूर्यमध्यानें ओलांडिला तर पुढें सुमारें १९ घटिकांपर्यंत सूर्यबिंब त्या बिंदूवर पसरलेलें असतें म्हणून पंचांगांतील बिंदुसंक्रमणानंतर १९ घटिकांनीं इनमंडलांत पद्धतीनें अधिकमास निर्णय करणें सयुक्तिक ठरतें. असें करण्यास " त्रिंशत् कर्काटके पूर्वे मकरे विंशतिः परे " या वाक्याचा आधार आहेच. मकर संक्रमण लागल्या नंतर २० घटिकांपर्यंत (वास्तविक गणितानें १९ घटिका.) सूर्यबिंब उदगयन बिंदूवर असतें म्हणून धर्मशास्त्राप्रमाणें खरें उदगयन किंवा मकर संक्रमणकाल पंचांगोक्त मकर संक्रमणकालानंतर १० घटिकांपर्यंत मानणें प्रशस्त मानिलें आहे. हें तत्व यंदाच्या मीन संक्रमणास लागू केलें तर अधिकमास फाल्गुनच येतो जसें:— (केतकी पंचांग सूचना पहा)

	घ.	प.
ग्रहलाघव मीनार्क...गुरुवारीं	५	२६
धर्मशास्त्र संमत इनमंडलांत संक्रमणार्थ संस्कार.....+	१५	०
	२०	२६

	घ.	प.
ग्रहलाघवीय फा० अमांत गुरुवारीं	१२	१
धर्मशास्त्रसंमत इनमंडलांत मासार्थ संस्कार +	६	०
	१८	०

ह्मणजे या सशास्त्र इनमंडलांत अमांतानंतर दोन घटिकांनीं मीन संक्रमण लागतें अतएव फाल्गुनच अधिक येतो ही गोष्ट सिद्ध.

४ रा. नेने, ब पं० बापू देवजी यांचीं पंचांगें नाटिकल् वरून केलेलीं असूनही त्यांच्या पंचांगांत फाल्गुन अधिक नाहीं असें रा. कटककर व तत्पक्षीय यांजकडून सांगण्यांत येतें ह्मणून या त्यांच्या आधारांतील गोम बाहेर काढून दाखवितों. बापु देवी व नेने यांचीं अयनांश किंवा आरंभस्थान ठरविण्याची रीति अशी आहे कीं सूर्यसिद्धांत गणिताप्रमाणें निरयन स्पष्ट सूर्य ज्यावेळीं रा० अं० क० वि० येतो त्यावेळीं नाटिकल् आल्म्यनाक मधील सायन स्पष्ट सूर्याचा भोग जितका येईल ते अयनांश. ही रीति बरोबर बिनचूक होण्यास या दोनही ग्रंथांतील सूर्य मंदफलें एकच असलीं पाहिजेत. नसलीं तर मंद फलांच्या अंतराइतकी मध्यम सूर्यांत किंवा अयनांशांत चूक आली पाहिजे जसें—

समजा कीं—

अ = सायन मध्यम सूर्य नाटिकल मधील

ब = मेष संक्रमणकालीं नाटिकल मधील रवि मंदफल=११३ क

क = निरयन मध्यमरवि सूर्यसिद्धांतांतील.

ड = मेषसंक्रमणकालीं सूर्यसिद्धांतोक्त रवि मंदफल=१२८ क.

तर

अ + ब = क + ड + अयनांश

अ + ११३ क. = क + १२८ क. + अयनांश

अ = क+ १५ क + अयनांश

असें सिद्ध होतें

वास्तविकपणें अ=क + अयनांश असें मानिलें पाहिजे

ह्मणून रा० नेने व बापुदेव व रघुनाथाचार्य यांच्या नाटिकलाधारें रचिलेला मध्यम सूर्य १५ कलांनीं जास्त आहे. अर्थात् त्यांचीं सर्व संक्रमणें सुमारें १५ घटिकांनीं पूर्वीच लिहिलेलीं असतात. रा० नेने यांचे यंदांच्या पंचांगांत मीनार्क चालू फाल्गुन कृ० ३० गुरुवारीं २ घ. ११ प. आहे. यावद्दल १७ घ. ११ प. असलीं पाहिजेत. (सूर्यसिद्धांताप्रमाणें) त्यांचा अमांत त्याच दिवशीं ११ घ. ५७ प. आहे. ह्मणून त्यांच्या पंचांगावरूनही फाल्गुनच अधिक येतो.

सारांश इनमंडलांत संक्रमणपद्धति व नेने व बापुदेवजींची पद्धति व संचालित ग्रहलाघवी पद्धति व बीजयुक्त सूर्यसिद्धांत पद्धति व आमचा चित्रापक्ष या चारही रीतींनें फाल्गुनच अधिक येतो. शक १७६३ मध्यें इनमंडलांत पद्धतीला अवकाश असूनही तिला अनुसरून अधिक मास ठरविला गेला नाहीं. ही गोष्ट वे० कमळाकर शास्त्री जोशी खेडकर यांनीं साधार दाखवून दिलीच आहे.

श १३७८ या वर्षी होणारा क्षयमास ब्रह्मपक्षानें आणून दाखविण्याची खटपट व्यर्थ आहे. कारण आर्यपक्षानें तो येतोच असें ह्मटलें आहे. (आर्यपक्षेतु संदेहो नास्तितो ब्रह्मपक्षातिथितः आर्यपक्षतिथिश्चतुर्घटिकाधिका। ब्रह्मपक्ष संक्रांतितः आर्यपक्ष संक्रांतिः त्रिघटिकोना तस्मादार्यपक्षेसंदेहाभावः)

वरील सर्व गोष्टींचा विचार केला तर यंदा फाल्गुनच अधिक आहे, असें निर्विवाद ठरतें. चैत्र अधिक मानणें असेल तर त्याला "बाबा वाक्यं प्रमाणं" हाच एक अधार होय ह्मणून सर्व समंजस पुरुष यंदा फाल्गुन अधिक मानतील तर सत्य पक्षास अनुसरल्याचें श्रेय त्यांस येईल.

रामकृष्ण गंगाधरशास्त्री माईणकर.

* दहावीस गाड्यांचा तांडा रस्त्यानें जाऊं लागला असतां एखादा गाडीवान आपली गाडी पुढें घेण्यासाठीं किती प्रयत्न करित असतो, हें ज्यांनीं पाहिलें असेल त्यांस वरील गोष्टींचें आश्चर्य वाटणार नाहीं.

जनावरांना सुद्धां परंपरा सोडावीशी वाटत नाहीं, मग माणसांचीहो काय कथा ? ता० १२ जानेवारीच्या केसरींत पुण्याच्या सभेंत झालेल्या वादावा मथितार्थ रा० टिळकांनीं सांगितला आहे. पण नेने व बापूदेव यांची तरफदारी करितांना मंदफलांच्या फरकामुळें येणारी चूक स्पष्ट केली नाहीं, ती कां ? याचें उत्तर कोणी सभासद देतील काय ? अयनांशांच्या थोड्क्यासुद्धां फरकानें कधीं कधीं अधिक मास भिन्न येऊं शकेल, हें जरी खरें आहे, तरी मंदफलाच्या फरकानेंही संक्रांत मागें पुढें येते हेंही कोणी विसरतां कामा नये. जर केतकरांचे अयनांश पंचांगकमेटीनें ठरविल्याप्रमाणें २२ व २३ यांच्या दरम्यान आहेत, जर केतकरांचें गणित नेने वगैरे ज्योतिर्विदांप्रमाणेंच नाटिकलला अनुसरून आहे व जर नेने वगैरेंच्या गणितांत मंदफलांच्या फरकानें संक्रमणांत चूक येते असें केतकरांनीं स्पष्ट दाखविलें आहे, तर चैत्र अधिकमास धरावा असें ठरविणारे ज्योतिषी पक्षांध नव्हेत काय ?

पण या गोष्टीला नाइलाज आहे. निरयनवाद्यांचा हा आपसांतिल वाद कधींच मिटणार नाहीं अशी मूळांतच गोम आहे. निरयन पंचांग हें केवळ मतावरच अवलंबून आहे, व भिन्न भिन्न मतांची एकवाक्यता पक्षाभिमानानें कधींच होणें शक्य नाहीं. अर्थात् निरयन मार्ग हा श्रुतिस्मृतिपुराणविहित तर नाहींच तर तो एखाद्या लहरी माणसाच्या मनासारखा आहे ह्मणून तो त्याज्य आहे. सायन पंचांगांत भिन्न मतें असूं शकत नाहींत. भिन्न भिन्न मतांचीं निरयन पंचांगें (गणिताची सूक्ष्मता सर्वांत सारखी असेल तर) त्याच मतांचे अयनांश घेऊन सायन केल्यास सर्वांचीं एक सारखींच होतील ह्मणून आह्मांस त्याच मार्गाचें अवलंबन केलें पाहिजे, यांत तिलप्राय शंका नाहीं.

'ए. कुं. वि.'

---

३ पत्रव्यवहार.

रा. दामोदर विनायक कोटीभास्कर

'आपला फेब्रुवारीचा अंक पावला. त्यांत विवाहासंबंधी माहिती बरीच जुळते. माझ्या सप्तमांत जो वृषभ राशि आहे त्यांत स्त्रीचा चंद्र आहे व त्या चंद्राशीं माझ्या कुंटुब स्थानाचा अधिपति गुरु युत आहे! हा आपला नियम खरा आहे, अशी माझी खात्री झाली. त्याचप्रमाणें विवाहकालीं माझ्या सप्तमांत जो राशि आहे त्याच मुहूर्तावर विवाह झाला! याच प्रमाणें आपणाकडून देशसेवा झाल्यास या शास्त्राचा उपयोग जगास खास होईल, अशी खात्री वाटते.'

रा. जीवन त्रिंबक चिटणीस

पंचांग कमेटीचें पंचांग

[लेखाचा सारांश]

मुंबई येथील पंचांग संशोधन कमेटीनें रा० रा० विनायक नारायण नेने आब्झरव्हेटरींतील एक अधिकारी व हल्लीं पेनशनर झालेल्या विद्वानाकडून सूक्ष्म गणिताचें पंचांग नॉटिकलचे आधारें प्रसिद्ध केलें आहे. हें पंचांग बरेच दिवस छापलें गेलें असून त्यासोबत एक माहितीचें पुस्तक निघावयाचें आहे. रा० ब० नारायण त्रिंबक वैद्य यांचे मुलाचे आकस्मिक मृत्यूनें हें पुस्तक पंचांगाबरोबर प्रसिद्ध झालें नाहीं, ह्मणून पंचांगलोकसमुदायास मिळालें नाहीं. थोड्क्याच दिवसांत पुस्तक तयार होईल व पंचांगासोबत तें लोकांस मिळेल.

रा० ब० चे बंधूंनी त्या पंचांगाची एक प्रत मजला दिली, त्याव-

द्दल मी आभारी आहें. रा० ब०चा मुलगा हुषार होता त्याचे मृत्यूमुळें पुस्तकास उशीर झाला. त्यामुळें रा० ब०चे दुःखांत आपणही वाटेकरी आहोंत असें मानणें जरूरीचें आहे! पुत्रविरह विसरून रा० ब० हे सार्वजनिक कामास लागले याबद्दलही त्यांचें अभिनंदन करणें योग्य आहे.

पंचांग कमेटीनें प्रसिद्ध केलेले पंचांगांतील प्रस्तावनेंत 'परिषदेची बैठक बरेच दिवस चालून पुष्कळ भवति न भवति झाली.' असा उल्लेख केला आहे. हें वाक्य वाचून सल्याच्या खुनाबद्दल पुष्कळांस वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं. पंचांगकमेटींत पंचांगास अनुसरून असलेल्या विषयांपैकीं एकाही विषयाचा खल झाला नाहीं. पं० क० चे चिटणीस रा० ब० वैद्य हे गणितशास्त्रास अपरीचित आहेत. त्यांस पं० क० त बोलाविलेले बहुतेक लोक फक्त पंचांगें करणारे किंवा फलिती असतात व त्यांचे नांवावर लोकमान्य ग्रंथ अस्ट्रानमीवर झालेला नसल्यामुळें ते लोक अपात्र असा समज झालेला होता. त्यांचे समजुतीप्रमाणें लोकमान्य टिळक हे विद्वान् व त्यांचे नांवानें दोन ग्रंथ छापले गेलेले व त्या ग्रंथाची वाहवा परदेशांत झाल्यामुळें फक्त रा० टिळक हेंच कायतें पं० क० चें प्रधान पात्र असा समज झालेला होता. यामुळें पंचांग विषयासंबंधानें कोणी जरी बोलण्यास आरंभ केला तरी 'तुह्मी खालीं बसा' असें रा० ब० ह्मणत! रा० ब० चे जोडीस शंकराचार्यांचे रुपेरी दंडधारकानें काम करून २।३ गृहस्थांस खालीं बसा असें फर्माविलें व कित्येक वेळां तर तुह्मी आमंत्रित आहां काय असें श्री आपल्या पीठावरूनही ह्मणत असत! या सर्व गोष्टी आतां नाकबूल करितां यावयाच्या नाहींत.

सभेचें काम सुरळीत व पद्धतवार व्हावें, शंकराचार्यांच्या आज्ञेस अनुसरून काम चालावें, सायन पक्षास श्रींनीं पूर्वी आश्रय दिला होता त्याचा लोकांनीं विचार करून श्रींची संमति घ्यावी, ती देण्यास श्री तयार आहेत किंवा नाहींत अशा अर्थाच्या सूचना मीं आणीत असतां रा० ब० नीं माझें भाषणाचे आरंभींच आपला 'ॐनामा' सुरू केला. तरी त्यास न जुमानितां मीं आपली सूचना शेवटास नेली! ता० २६ डिसेंबर रोजीं कांग्रेसचें काम आटोपून दे० टिळक आले. ते निघाचे वहिवाटीस अनुसरून थोडें बोलले. परंतु त्यांचें भाषण एका बंगदेशीय पंडितांस व ज्योतिर्विदांस रुचलें नाहीं. त्यांनीं टिळकांची सेवा संस्कृत भाषेंत सुमारें पाऊणतास केली. ही सेवा चालली असतां प्रेक्षकांचीं वदनें दीन झालेलीं होतीं. गणितासारखे विषयांत एकाच विषयावर निर्णय करण्यास २।३ महिने लागतात, तो निकाल ५।१० मि०त टिळकांचे समजुतीप्रमाणें होणें अशक्य आहे, इ० प्रकारचें त्या पंडितांनीं जोरदार भाषण केलें.

या नंतर रा. केतकरांचा उपहास करण्याचा शास्त्रोक्त विधि झाला. रा० ब० गणेश कृष्ण आपटे एंजिनियर हे रा० केतकर आपला ग्रंथ कसा तयार केला हें सांगण्यास कबूल आहेत, असें ह्मणाले. परंतु रा० ब० वैद्यांनीं 'तुह्मीं खालीं बसा' असा ध्वनि करून त्यांचा अपमान केला! कोल्हापूरचे रा० रघुनाथराव आपटे ह्या वेळीं कोल्हापुरास प्रयाण करण्याचे तयारीस लागले! हा मजकूर रा० केशव त्रिंबक पेंडसे यांनीं सन १९०५ चे जानेवारी—फेब्रूवारीचे निरनिरानिराळे वर्तमानपत्रांत छापला आहे. त्यांचें मूळ पत्र ता. २२ जानेवारी १९०४ चें आहे.

पंचांगकमेटींत सायनवादी, केरोपंती, केतकरी व ग्रहलाघवी पक्षांची मंडळी होती. त्यांतील कित्येकांनीं आपले लेख वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध केले होते. कांहींनीं स्वतंत्र पुस्तकें छापलीं होतीं. मीही एक निबंध पाठविला होता, त्याचा विचार न होतां तो परत केला व कमेटीचे चिटणिसांनीं त्याची पावतीही मजजवळून घेतली! सारांश, पंचांग कमेटींत कोणत्याही पक्षाचे मतांचा ऊहापोह झाला नाहीं. सभेचे कामांत ता० २६ पासून घोटाळा उत्पन्न झाला. सभा एके ठिकाणीं भरली नाहीं. रा० टिळकांनी प्रत्येकाचे खोलींत जाऊन सल्ला घेतल्या

शंकराचार्यांचे पुढें ठराव वाचीत असतां 'आमची संमति नाहीं.' असेंही कांहीं बोलले. त्यावर रा० टिळकांनीं सांगितलें कीं, आह्मीं कोणाच्या जुलमानें सह्या घेत नाहीं. व कोणास फसवीतहीं नाहीं. नतर ठरावाचे कागद फिरूं लागले. त्यावर छत्रे पंचांगाचे अभिमानी व दोन सायनवादी यांच्या विरुद्ध सह्या आहेत. रा० कटकर यावेळीं एका कागदावर सह्या घेत होते. मग तो कागद रा० पेंडसे ह्मणतात तोच किंवा अन्य हें कळलें नाहीं.

पंचांग कमेटीचा निकाल कांहीं तरी झाला रा० टिळकांस निरनिराळे पंथ एके ठिकाणीं आणणें अशक्य होतें. कृष्णानें आपलें स्वरूप अर्जुनास एक वेळ दाखविलें आहे, त्याचे चित्र भिंतीवर चित्रकार काढित असतात. त्यांत एक पाय हत्तीचा असतो, दुसरा कोंबड्याचा. शेंपूट सापानें दर्शित केलेलें असतें! असलाच प्रकार रा० टिळकांनीं केला. सायनवादी यांस खुष ठेवण्यासाठीं संक्रांति सायन घेतल्या. केतकरांचा पक्ष जास्त ह्मणून चित्राताऱ्याचे जवळील अयनांश घेतले. छत्रेपक्षाकडे थोडें दुर्लक्ष केलें. कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं प्रतिपादिलेलें मत मुख्य समजून त्या धोरणानें रा० टिळकांनीं न्याय दिला. स्वमत मात्र बाहेर दिसून आलें नाहीं. त्यावरून त्यांस ज्योतिषाची मार्मिक माहिती कमी व सर्व सभेची फजिती करण्यापेक्षां रा० टिळक कांहीं तरी करित आहेत तर तें त्यांस करूं द्या. ह्या समझुतीवर कांहीं कांहीं लोक स्तब्ध होते. असल्या प्रकारास पं० क० नें छापलेल्या पंचांगांत 'भवति न भवति' झाली असें ह्मटलें आहे!

पंचाग कमेटींचे बैठकींत कार्य झालें त्याची खरी हकीगत अशी आहे. आतां पंचांगाचा विचार करूं.

पंचांगास 'श्रुति-स्मृति-पुराणविहित कालदर्शक निरयन पंचांग हें नांव योजिलें आहे. हें नांव मूलचें सायन पंचांगाचें आहे! सायनवादी २।४ च लोक होते, परंतु पंचांग कमेटी ह्मणजे बऱ्याच लोकांची सभा होय. ही सभा कोठें भरली याची माहिती नाहीं, सभेंत पुस्तक तयार होऊन आलें नाहीं. त्या अन्वयें पंचांग करण्याचें ठरलें नाहीं, अशी स्थिति असतांना पंचांग बाहेर पडलें! त्यावरून रा० कटकर, रा० ब० वैद्य आणि सर भालचंद्र या त्रयीचीच सभा दिसते, व तेथेंच हा नामकरणविधि होऊन त्याचें जनकत्व रा० नेनें यांजकडे आलें. सभा भरो अगर न भरो. पंचांग बाहेर पडलें ह्मणून पंचांगाचे नांवावरून आपण त्यास ओळखिलें पाहिजे. पंचांग निरयन गणनेचें आहे. ज्या गणनेंत अयनाचा अभाव ती निरयन गणना होय. अयनगतीचा उल्लेख सूर्यसिद्धांत खेरीज करून इतर सिद्धांत ग्रंथांत नाहीं. भास्कराचार्यांचे करणकुतूहल ग्रंथांत अयनगतीचा उल्लेख आहे, परंतु 'शिरोमणींत' नाहीं. ह्मणून निरयन गणनेचा आरंभ होऊन आजमितीस ८०० वर्षांचा काल होतो. तेव्हां पंचांगांतील 'श्रुतिस्मृतिविहित' याचा अर्थ काय? सूर्यसिद्धांत ग्रंथांत अयनगतीचा उल्लेख आहे. परंतु ती कल्पना नंतरची आहे असें सिद्ध करून दाखविण्यास पुष्कळ पुरावे आहेत.

प्राचीन काळचा गणित शास्त्र जाणणारा ऋषि ह्मणजे गर्ग होय. गर्ग व पाराशर समकालीन आहेत. गर्गाचे संहितेंत जे ग्रह आग्रहायन वर्षारंभीचे दिले आहेत, ते सर्व रविमध्यस्थ आहेत, ते बेंटलीचें पुस्तक पृ. ५४ मध्यें दिले आहेत. ते येणेंप्रमाणें:—

रवि — अनुराधा नक्षत्रीं. बुध–शतभिषक् नक्षत्रीं. शुक्र — कृत्तिका नक्षत्रीं. मंगळ — मूळ नक्षत्रीं चंद्र — रोहिणीवर आणि गुरु — पुष्यावर.

वरील ग्रहांत बुध आणि शुक्र हे रवीपासून ९० व १८० अंशांजवळ दिले आहेत. नाटिकलमध्यें सन १९०५ ता. २५ नवंबर रोजीं स्प. र. ८ रा. २ अं. ४३ क. ६ वि. आहे. रविमध्यबुध ११ रा. ३ अं. ४३ क. ५३ वि. आहे. ह्मणजे रविबुधांत ३ रा. १ अं. ० क.

४७ वि. अंतर आहे. वरील उदाहरणांत रवि मूळ नक्षत्रीं आणि बुध उत्तराभाद्रपदांत ह्मा० ९१ अं.-शावर आहे. यावरून नक्षत्रक्रम रविमध्यस्थ स्थितीस अनुसरून जो दिसतो त्याचा तें नक्षत्र डोळ्यानें दिसलेलें नाहीं, ह्मणून जीं नक्षत्रें प्रत्यक्ष दिसतात तींच घ्यावींत, असें प्रतिपादन करणारे मंडळीनें विचार करावा.

गर्गानें वर्णन केलेले नाभसादिक योग वराहानें [शा. श. ५१८] ग्रंथांत दिले आहेत. त्यांत वराह ह्मणतो — "पूर्वशास्त्रानुसारेण मया वक्राद्यः कृताः ॥ चतुर्थे भवने सूर्याज्ज्ञसितौ भवतः कथम् ॥ (नाभसयोगाध्याय) वराह मिहिर शालिवाहन शके ५१८ मध्यें मेला. त्याचे पूर्वी गर्ग होता, त्याचे ग्रंथांत रविमध्यस्थ पद्धति होती ही गोष्ट नाकबूल करितां येत नाहीं. बृहज्जातक, जातकालंकार, जातकपारिजात व जातकाभरण ह्या सर्व ग्रंथांत रविमध्यस्थ ग्रहाच्या दृष्टियोगाचीं फलें वर्णन केलेलीं आहेत. भूमध्यस्थ पद्धतीनें रवि व बुध यांत परम अंतर २६ अंशांपेक्षां जास्त नसतें. तसेंच शुक्र व रवि यांत अंतर ४६ अंशांपेक्षां जास्त येत नाहीं. ह्मणून या पद्धतीनें रवीवर बुध आणि शुक्र यांच्या दृष्टि यावयाच्या नाहींत. रविमध्यस्थ ग्रहांचीं फलें कुंडलीविज्ञान कर्त्यांनीं सन १९०६ चे ८ वे अंकांत वरींच दिलीं आहेत, तीं पहावीं.

जातकालंकार ग्रंथ शके १५३६ तयार झालेला आहे. यावरून रवि मध्यस्थ पद्धति सुमारें साडेतीनशें वर्षांचे सुमारास होती, ह्मणजे श्रीशिवाजी महाराजांचे जन्मापूर्वी १९ वर्षें होती * हिंदुग्रंथांत

(पुढें चालू)

* असें ह्मणतां येत नाहीं. कारण 'वराहाचेवेळीं नव्हती व शिवाजीच्या जन्मकालाचे सुमारास होती या दोन विधानांत विरोध उत्पन्न होतो. फलज्योतिषावर जे वराहापासूनचे ग्रंथकार झाले त्यांनीं पूर्वशास्त्रकारांचाच केवळ अनुवाद केलेला आहे. जातकालंकाराचा कर्त्ताही त्यांतलाच होता. अर्थात् त्याच्यावेळीं रविमध्यस्थ पद्धति होती असें ह्मणवत नाहीं. वराहाच्या पूर्वी मात्र खास होती

[मागील अंकावरून]

ज्याप्रमाणें बुधशुक्रांचे रवीवर दृष्टियोग सांगितले आहेत तसेंच टालमीचे ग्रंथांतही वर्णन आहे. याची माहिती डिक्शनरी ऑफ अस्ट्रॉलजी पुस्तकांत पृष्ट ८९ मध्यें आहे.

टालमीचा काल सनापूर्वी १५० चा आहे. टालमीपासून फलसंस्कार हिंदूंनी घेतला. (भा. ज्यो. पृ. ९१६) व तो टालमीचे ग्रंथावरून आला (भा. ज्यो. पृ. ५१४) शीघ्रकेंद्राचा संस्कार करून नंतर भूमध्यस्थ ग्रह तयार होतात भूमध्यस्थ ग्रह तयार झाल्यावर सायन व निरयन वाद उत्पन्न होतो. (?) त्यापूर्वी रविमध्यस्थ ग्रहांत सायन निरयन वादच नाहीं. टालमीपूर्वी १५० वर्षें हिपार्कस होता, ह्मणजे सनापूर्वी ३ रे शतकांत अयनगतीचा शोध यानेंच प्रथम लावला.

टालमीपासून ग्रीस देशांत दोन पद्धति सुरू झाल्या. एक रविम. व दुसरी भूमध्यस्थ अथवा सायन होय. हिंदुस्थानांत शके १६०० चे सुमारास रविमध्यस्थ पद्धति होती, तशीच सायन पद्धति होती. जातकोत्तम ग्रंथांत ग्रह सायन घ्यावे असा स्पष्ट उल्लेख आहे. तो 'उच्चतः सप्तमं नीचं प्रोक्तांशे परिनीचता ॥ इहकार्यः सायनांशखचरैः फलनिर्णयः ॥' या दोन्ही

वराहाचे नंतर जे फलज्योतिषी स्वतंत्र ग्रंथकार झाले आहेत त्यांच्या पद्धति भिन्न भिन्न आहेत. अष्टकवर्गपद्धति, रश्मिपद्धति, केशवीची पद्धति इ० पद्धति वराहा नंतरच्या आहेत. या पद्धति व प्राचीन पद्धति याच्या मिश्रणानें तयार केलेलेच बहुतेक ग्रंथ आहेत. 'ए. कुं. वि.'

[?] विषुव, अयन, राशि व नक्षत्र यांच्या वास्तविक लक्षणांशीं रविमध्यस्थ पद्धतीचा संबंध काय त्याचा उलगडा करावयास पाहिजे होता. त्याशिवाय ह्या विधानाची सत्यासत्यता सामान्य वाचकांस व्यक्त होत नाहीं.

'ए. कुं. वि.'

पुराव्यांवरून निरयन गणना प्राचीन होती, असें दिसत नाहीं. पांचही सिद्धांत ग्रंथांत अयनगतीचा उल्लेख नाहीं. त्यांचेवेळीं अयनांश शून्य होते ह्मणून अयनगतीचा बोध होतच नाहीं. भास्कराचार्यांचे करणकुतूहल ग्रंथांत अयनगतीचा उल्लेख आहे. परंतु गणेशदैवज्ञानें [शके १४२०] निरयन ग्रह घेतले आहेत. ह्यावरून निरयन गणना वेधास सोपी ह्मणून घेतलेली दिसते.

सायनमतावर अभिप्राय देतांना कै० छत्रे यांनीं निरयन गणना वेधास सोपी असें उत्तर दिलें आहे ! * ग्रहलाघवावर किंवा भास्कराचार्य यांचे पासून निरयण गणना प्रथम सुरू झाली असें मानावें लागतें. त्यापूर्वी भूमध्यस्थ नंतर सायन व अखेर निरयन गणना उत्पन्न झालेल्या दिसतात. निरयन गणनेपासून धर्मशास्त्रांतील कृत्यें करावीं व फलज्योतिषही निरयन मानानें पहावें हीं दोन्हीं मतें अर्वाचीन काळांतील आहेत.

पंचांगांचीं ५ अंगें. १ वार २ तिथि. ३ नक्षत्र. ४ करण आणि ५ वें अंग ह्मणजे योग होय. वार शुद्ध वेदांत नाहीं. भारतांत नाहीं. त्याचा माहिती क्यालडी लोकांपासून मिळाली. वेदांत रवि आणि चंद्र यांत १२ अंश अंतर पडलें ह्मणजे त्यास तिथि ह्मणावें असें वर्णन नाहीं, व येणें शक्य नाहीं तें पुढें दाखविलें जाईल. तिथि मध्यम मानानें पाहत असत. रवि-मध्यस्थ चंद्राची तिथि कशी काढीत असतील त्यांचा विचार गणिती लोकांनीं करावा. वेदांत २७ नक्षत्रें आहेत, तशींच २८ आहेत. २८ नक्षत्रें कोणत्याही पंचांगांत नसतात. वेदांत २७ उपनक्षत्रें आहेत, जैन लोकांचीं ५४ आहेत ! पंचांगांत उपनक्षत्रें नाहींत, वेदांत अमुक ग्रह अमुक नक्षत्रीं आला तर अमुक कर्म करावें असें वर्णन नाहीं. करण आणि योग यांत आडळगारीं नांवें वेदांत नाहींत. करण आणि योगांचें गणित ब्रह्मगुप्तकाळीं ह्मणजे शालिवाहन शके ४२० चे सुमारास नव्हतें. वराहाचे ग्रंथांत योग नाहींत गिझनीचे महमूदाबरोबर अलब्यूरीणी आला होता. त्याचे ग्रंथांत योगाचें गणित करण्याची रीत नाहीं. लल्लाचे ग्रंथांत योग आहेत ते प्रक्षिप्त असावत असें वे० शा० सं० शंकर बाळकृष्ण दीक्षित ह्मणतात. योगाचे गणित शके ६०० चे सुमारास पंचांगांत नव्हतें (भा. ज्यो. पृ० ३९८ — ९९) पंचांगांचीं ५ अंगें इसवीसनारंभापासून वाढत जाऊन तीं इसवी सनाचे ७ वे शतकांत तयार झालीं. श्रुति — स्मृति ग्रंथ इ० स० पूर्वी निदान एक हजार वर्षांचे मागें तयार झालेले आहेत. व पंचांगाचीं पांच अंगें इ० सनारंभापासून वाढत जाऊन तीं त्याच्या ७ वे शतकांत तयार झालीं. ह्मणून पंचांग संशोधक कमेटीचें पंचांग श्रुति—स्मृति—विहित नसून रहित आहे, ह्मणून रहित शब्द योजिला असतां अन्वर्थक होईल. चैत्र हा प्रथम मास ही प्रवृत्ति पंचांगांत प्रथम संवत् १५६—२०९ पर्यंतचे काळांत सुरू झाली असें गुप्तलेखावरून दिसतें.

संपातगतीचा शोध ग्रीस देशांत हिपार्कस ह्यानें सनापूर्वी ३ रे शतकांत लावला. हिपार्कस वेळीं राशिचक्राचे फक्त ११ च भाग होते. (ब्लेक अस्ट्रॉनामिकल मिथ पेज १०३ एडिशन १८७७ ची एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका न्यूथ एडिशन व्हाल्यूम २४ पेज ७९१)

इसवीसनापूर्वी ५५० चे सुमारास ग्रीस देशांत ११ राशींचे राशिचक्र होतें. त्यापूर्वी राशि १० होत्या. (सायन्स ऑफ धी स्टार्स.)

दहा राशींचे पूर्वी क्रांतिवृत्ताचे ७ भाग होते; पुढें १० व नंतर ११ झाले. व त्यानंतर १२ झाले ! आपटेकृत संस्कृत कोशांत अदितीचें वर्णन आहे तें वाचावें ह्मणजे साम्य कळेल.

वरील पुराव्यावरून जेव्हां रवि ७ मानिले होते तेव्हां ५२ दिवसांचा एक महिना होतो, रवि १० झाले तेव्हां ३६ दिवसांचा एक

---

* इतकेंच नव्हे तर 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं' असेंही ह्मटलें आहे. 'ए. कु. वि.'

महिना होतो, रवि ११ झाले तेव्हां ३२½ दिवसांचा महिना होतो; व रवि १२ झाले तेव्हां ३० दिवसांचा महिना होतो. द्वादशराशीचक्राची पूर्णता सनापूर्वी १५० चे सुमारास झणजे टालमीचे काळीं झाली. अर्थात् एके वेळचें ज्योतिषशास्त्र व त्यास अनुसरून असलेलीं धर्मकृत्यें यांत फेरफार झालाच पाहिजे. व तो तसा झाला असें मानिलें तर धर्मांत अधर्म करण्याची परंपरा दिसते. झणून पंचांगकमेटीचे पंचांगास श्रुति-स्मृति-विहितकालदर्शक पंचांग हें नांव जर योजावें असें उत्पादकांस वाटेल तर गणिताचे घोटाळ्यास अनुसरून एका आष्टमीस दशमी झणावी किंवा अष्टमीसह दशमी हें नांव द्यावें. रविचंद्रांत १२ अंशांचें अंतर पडलें झणजे तिथि पूर्ण होते हें मत वेदकाळीं कां नव्हतें याचा खुलासा येथें केला. येणेप्रमाणें पंचांगाचे पांच अंगांचा विचार झाला. आतां आरंभस्थानाचा विचार करूं.

हिंदुज्योतिष्यांनी आरंभस्थान रेवतीयोगतारा धरिला आहे. हा तारा संपातीं सन ४९६ चे सुमारास होता. ग्रहलाघवकाराचे मतें हा तारा शके ४४४ चे वेळीं संपातांत होता. पांच सिद्धांत ग्रंथ व ग्रहलाघवादी गणिती हेंच आरंभ स्थान धरितात. प्रत्येकाची अयनगति भिन्न आहे, तरी सर्व सायन रवि बरोबर येतात. छत्रे पंचांगांत झिटापिशिझम हा तारा मुख्य धरिला आहे. या पंचांगांत अयनगति ५० धरिली आहे. नाटिकलवरून. हीच अयनगति खरी आहे. त्या अन्वयें शके १८२८ चे अयनांश १९ येतात. निरयन मानानें पंचांग करावयाचेंच हा आग्रह असेल तर छत्रे यांचें पंचांग चालू करणें न्यायाचें व सरळ असून त्यास वेधाची प्रत्यक्ष साक्ष होती. पंचांग कमेटीनें निरनिराळे पक्षकारांस आपली बाजू निदान एकेक तोंसांत लोकांपुढें ठेवण्यास त्यांस बोलूं द्यावयाचें होतें.

सायनवादी लोकांस न बोलूं देण्याची तजवीज सेक्रेटरीनें केली होती. त्याचा पाया कसा रचला होता हें रा० कटककरांनी पंचांग कमेटीचें काम आटोपल्यावर मला

सांगितलें आहे.

आरंभ स्थानासंबंधानें परकी लोकांच्या मतांबरून हल्लींचे अयनांश १६ पासून ३० पर्यंत येतात. त्यांतच छत्रे यांचे अयनांश आहेत. हीं मतें गणितानें मान्य झालीं असतां रा० टिळक 'संपात हें कांहीं स्थान नाहीं व ग्रहही नाहीं, झणून अयनांश थोडे स्थूल घ्यावेत' असें प्रतिपादन करित होते. रा० टिळकांनीं पांचही सिद्धांतांस अर्धचंद्र दाखवून आरंभ स्थान सूर्यसिद्धांताचें धरिलें आहे हें ज्योतिषी लोकांस सांगून सह्या घेतल्या! रेवतीयोगतारा आरंभस्थान व अयनांश २२ किंवा २३ कसे येतात, हें ज्यास कळत नव्हतें अशा ज्योतिष्यांनीं आपल्या सह्या रा० टिळकांस दिल्या!!

पंचांगकमेटीचें पंचांग ज्योतिषशास्त्रास अनुसरून नाहींच व रा. टिळकांस पांच सिद्धांतकारांचीं व अन्य गणिती लोकांचीं मतें खोडतां येतील असें दिसत नाहीं. तेव्हां पंचांगांतिल 'श्रुति — स्मृति विहित काल दर्शक निरयन पंचांग' हे शब्द गाळून टाकिले पाहिजेत. कारण त्यास वैदिक मताचा आधार नाहीं. त्याचप्रमाणें पौराणिक मताप्रमाणेंही तें नाहीं. पंचांगांत रामजन्म नवमीस देतात. परंतु वाल्मीकि रामायण ह्यास जर आधार असेल तर रामाचा जन्म चैत्र महिन्यांत नवमीला गणितानें कालत्रयीं मिळावयाचा नाहीं! बाबिलोनियन मेष (धनिष्ठादि गणना) जेव्हां कुंभ राशींत झालें, तेव्हां रामाचा जन्म झाला असेंही मानण्यास आधार आहे. तें मत खरें मानिल्यास रामाचा जन्म माघांत झ० कुंभ संक्रांतींत येतो. तिथीचा व चंद्राचा मेळ बसला, तर रवि फाल्गुनांत जातो. झणजे रामजन्ममास फाल्गुन ठरतो! झणून रामजन्मवर्णनाशीं युक्त पंचांग नाहीं.

रामाप्रमाणें कृष्णाचा जन्म आमावास्येस झाला असून तो अष्टमीस देतात. मत्स्यपुराण अं. ४६ श्लोक १४ पृ. ३०० गोंधळेकर छापखान्यांतील प्रतींत कृष्णजन्म येणेप्रमाणें वर्णन केला आहे.

प्रथमायां समावास्यां
वार्षिकीतु भविष्यति ॥

तस्यांजज्ञे महाबाहुः
पूर्वं कृष्णः प्रजापतिः ॥

मत्स्यपुराणानंतर जीं पुराणें रचलीं गेलीं त्यांपैकीं नऊ ग्रंथांत कृष्णजन्म आष्टमीस रोहिणी नक्षत्रीं दिला आहे हीं प्रमाणें एका विद्वान् शास्त्रीबुवांनीं ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांतील एका प्रमाणांत कृष्णजन्मतिथि सप्तमी दिली आहे बाकी सर्व मतें रोहिणीबद्दलचीं आहेत. पंचांगांत कृष्णजन्म कृत्तिका — भरणीवरही सांपडतो !

कृष्ण हा गर्गसमकालीं होता. गर्गाची पद्धति रविमध्यस्थ होती. यानें कृष्णजन्म वर्णन केलेलें आहे. कृष्णाचे पत्रिकेंत ग्रह भूमध्यस्थ आहेत. त्यांत रोहिणी नक्षत्र दिलें आहे. हें मत अर्वाचीन आहे. कृष्णाचा जन्म जर आष्टमीस असता तर मत्स्यपुराणकर्त्यानें दिला असता. रा० कटकर कृष्णाचा जन्म अमावास्येस झाला तो योगमायेचा जन्म समजतात. कृष्ण आष्टमीस जन्मास आला नाहीं. तो जन्मतांच परब्रह्मस्वरूप घेऊन आला नव्हता त्याचीं कथानकें ज्यांनीं तयार केलीं त्यांनींच कृष्णास अष्टमीस जन्मास आणिला. त्याची कुंडली इ. स. ५६० या वर्षांतील ग्रहांची आहे ! तरी कृष्णजन्म आष्टमीस आहे असें मानूनही रोहिणी नक्षत्राशीं मेळ यावा म्हणून सप्तमीस रात्रीं जन्म करितात ! असा विरोध आहे म्हणून पंचांगकमेटीचें पंचांग पुराणरहित आहे.

रा. नेने यांनीं नाटिकलचे ग्रहांत चित्रा ताऱ्याचे अयनांश ऋण करून पंचांग प्रसिद्ध केलें आहे. हें सायन व छत्रे पंचांगाप्रमाणें सूक्ष्म आहे. यांत माहिती जास्त आहे. व रा. नेने हे पंचांगाचे कामांत कसलेले आहेत. हल्लींचे हिंदुसमाजास कोणत्याही पंचांगाची जरुरी नाहीं. सर्व धर्मकर्मे यथासांग करण्यास समाजास वेळ नाहीं पोटास पुरेसें जेथें मिळत नाहीं, तेथें धर्मास विचारतो कोण ? पोटोबाची व्यवस्था नाहीं, विठोबा पंढरींत गुप्त झाला ! हल्लींचे पोटार्थी जनांस धर्मकृत्यें रविवारीं पाहिजेत. रविवार, गुडफ्रायडे, इस्टर हॉलिडे,

नाताळची सुटी, बादशहाचा दरबार दिवस ह्या महापर्वण्या होत ! पितृतिथी भाद्रपदांत जर कामाचे अडचणीमुळें मिळाली नाहीं, तर वृश्चिक संक्रांतीपर्यंत धर्मशास्त्रकारांनीं उदार बुद्धीनें ठेविली आहे. त्याप्रमाणें पंचांगकमेटींतील लोकमान्य लोकांनीं व पंचागकारांनीं धर्मकृत्यें रविवारीं व सुट्यांत आणण्यास एखाद्या तिथीची क्षयवृद्धि केल्यास कांहीं हरकत नाहीं. मागील ग्रंथांत अमुक तिथीवर अमुक करावें, पंचांगांतील संकल्प अमुक प्रकारानें म्हणावा, असें सांगण्यास जर प्राचीन व विश्वसनीय ग्रंथ नाहींत तर श्रुति–स्मृति–पुराण–विहित शब्दाचा व्यर्थ बागुलबुवा समाजास दाखविण्यापेक्षां समाजाची नड पाहून त्यास अनुसरून पंचांग तयार केलें तर कमेटीचे व्यर्थ झालेल्या खर्चांत कांहीं तरी भर झाली असें मानण्यास आधार होईल.

रा० नेने ह्यांस पंचांग कमेटीनें पंचांग प्रसिद्ध करावयास सांगितलेलें दिसतें. परंतु रा० कटकर हे त्यास नेने–पंचांग म्हणतात ! ह्यावरून रा० कटकरांस नाटिकल नको होतें, म्हणून त्या आधारें केलेलें पंचांग पंचांगकमेटीचें पंचांग असें त्यांस कबूल करावयाचें नाहीं असें दिसतें ; पं०कमेटी नाटिकलचे विरुद्ध आणि पंचांग नाटिकलचे आधारें झालें म्हणजे पं०कमेटीस जें नको होतें तेंच तिनें केलें. रा० नेने यांनीं पंचांग करितांना सारण्यांचा उपयोग केला नाहीं. गणितानें स्पष्ट तिथि आणिली आहे. गणित करितांना फार परिश्रम घेतले आहेत. तें तयार करण्यास निदान सहा महिने लागले असावे. अशा प्रकारचें पंचांग लोकांस स्वस्त मिळावयाचें नाहीं. लोकांला दिड कौंला पंचांग पाहिजे ! अयनांश २२–२१ घेतले आहेत. ता. १ नवंबर म्हणजे कार्तिक शु० १५ चे स्प. ग्र. खालीं दिले आहेत, त्यावरून फरक दिसेल.

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	अयनांश
६	०	५	७	२	७	१०	३	०
१५	१३	८	६	१८	२०	१६	१४	२२
२१	४०	४९	३९	४२	५९	४	४९	२१
४१	५५	३४	३२	३३	३८	२२	५०	२

पौर्णिमा — गु. ९ — ३, भ. ६० — ०, सि. १९ — २८ ब. ९- ३ दिनमान २८ — ४० सूर्योदय ६ — ३९

पंचांगांत यहुदी-पारशी-मुसलमानी व इंग्रजी ह्या चतुर्वर्णात्मक तारखा दिल्या आहेत. ग्रहांचे शर दिले आहेत. पंचांगांत नवीन कोष्टकें व जादा माहिती फार आहे. पंचांग उत्तम झालें आहे. एप्रिल हा चवथा महिना दाखविण्यास १ ले तारखेसमोर ४ अंक दिला आहे! हा क्रम इतर पंचांगांत नसतो ह्मणून ही एक ४० गांवाप्रमाणें सुधारणा आहे! रा० नेने यांचे सूचनेस अनुसरून स्पष्ट लिहिलें आहे.

मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला ॥
जो जे मतीं सांपडला । तयासि तेंचि थोर ॥
असत्याचा साभिमान । तेणें पाविजे पतन ॥
ह्मणोनियां ज्ञातेजन । सत्य शोधिती ॥

[दासबोध]

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥
'भवभूतिः'

पुस्तक ८ वें.] मार्गशीर्ष कृ. १२, बुधवार [अंक १ला

सायननिरयनतुलना

हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. कुंडलीविज्ञानांत गेल्या सात वर्षांत हा विषय स्वतंत्रतेनें जरी प्रतिपादन केला गेला नाहीं, तरी यथाप्रसंग त्याचें विवेचन झालेलें आहे. या वर्षापासून हा विषय उदाहरणानें स्पष्ट करण्याचा विचार आहे, ह्मणून प्रत्येक अकांत निदान २ पृष्ठ तरी या विषयावर देण्याचें ठरविलें आहे व तीं सर्व पृष्ठें साल अखेर एकत्र बांधितां येतील अशी व्यवस्था करण्याचे योजिलें आहे. यांतील सर्व कुंडल्या वाचकवर्गाकडून मिळविलेल्या आहेत. बिनचूक व सशास्त्र अनुभव सायन कुंडलीवरून मिळेल कीं निरयन कुंडलीवरून मिळेल हें दोन्ही प्रकारच्या कुंडल्या पुढें मांडिल्यानें तुलना करून सहज ठरवितां येईल. व निरयन कुंडलीवरून अनुभव बरोबर मिळतो. हा भ्रम आपोआप नाहींसा होईल.

यांत येणाऱ्या कुंडल्या खऱ्या आहेत कीं खोट्या आहेत, यांची चौकशी ज्यांस करावयाची असेल, त्यांनीं प्रत्येकवेळीं तावडतोब कळवावें ह्मणजे त्यांची खात्री करून देऊं.

मालकांच्या परवानगी वांचून नांव प्रसिद्ध करितां येत नाहीं, या गोष्टीस आमचा इलाज नाहीं.

तुलना १ ली

सायन.



निरयन



जन्म-शके १७८८ अ. ज्येष्ठ कृ. १० शुक्रवार या दिवशीं सूर्योदयापूर्वी १ घ. ४५ प. ता ८ जून सन १८६६ सू पूर्वी ४ वाजून ५२ मि. हा जन्मकाल पत्रांत जसा लिहिला, आहे तसाच घेतला आहे.

सायन स्प. ग्र.

र.	चं	मं	बु	गु	शु
मि.	मे	मे	मि	कुं	क
१६	८	१६	७	१	१३
श	रा	ह	ल		
वृ	तू	क	मि		
६	८	५	८		

सायन ग्रहांत अयनांश वजा दिले ह्मणजे निरयन होतात. या कुंडल्यांत दोन गोष्टी महत्वाच्या पहावयाच्या आहेत.

१ ली— लग्नें ३ झालीं व चवथें करणें आहे. १ लें लग्न ११ वे वर्षीं झालें. प्रत्येक स्त्री सुमारें ६।७ वर्षें संगतीस होती.

२ री— संततीची प्राप्ति एकाही स्त्रीपासून झाली नाहीं. या दोन गोष्टींचा बोध ज्योतिष्यांस कोणत्या कुंडलीवरून होईल, हें येथें विचारणीय आहे.

प्रथमतः बहुभार्यायोग कोणकोणत्या कारणांनीं घडतो, याची शास्त्रीय माहिती पाहिजे. ही माहिती स्वतंत्रपणें कोणत्याही ग्रंथकारांनीं दिलेली नाहीं. यासाठीं आमच्या

मतें बहुभार्यायोगाचीं जीं कारणें आहेत, तीं येथें देतों. त्यांचा अनुभव प्रथम वांचकांनीं घ्यावा. व नंतर तीं कारणें खरीं आहेत कीं खोटीं आहेत, हें ठरवावें. हीं कारणें प्राचीन फलग्रंथांत नाहींत, ह्मणून तीं खोटीं आहेत हें ह्मणणें अंधत्वाचें दर्शक आहे.

बहुभार्यायोगाचीं कारणें.

बहुभार्यायोग दोन प्रकारचा आहे. एक स्त्री जिवंत असून आणखी २।३ अगर जास्त विवाहित स्त्रिया असणें हा पहिला प्रकार. व एक बायको मेल्यामुळें अगर तिच्या पासून इष्ट सुख न मिळाल्यामुळें ती मृतवत् समजून दुसरे विवाह करणें हा दुसरा प्रकार. पहिल्या प्रकारांत शुभ ग्रह प्रधान असतात व दुसऱ्या प्रकारांत पाप ग्रह प्रधान असतात.

कलत्रेशे बहुगुणे तुंगवक्रादि हेतुभिः
बहुभार्यांतरं विद्याच्छत्रुनीचास्त गेषुच॥

बहुभार्यायोगांत हा श्लोक प्रधान आहे. सप्तम स्थानाचा स्वामी उच्च, वक्र, शत्रुस्थानीं, नीच, अस्तंगत अशा प्रकारचा अत्यंत बलहीन असेल तर त्या मनुष्याचे दोहोंपेक्षां अधिक विवाह होतात, असें या श्लोकांत सांगितलें आहे. हा अनुभव पुष्कळ ठिकाणीं येतो, ह्मणून या श्लोकास आह्मीं अमस्थान देतों.

२ हेच गुण द्वितीय स्थानच्या स्वामीतही आहेत. मात्र यांस ग्रंथांत आधार नाहीं.

३ द्वितीयस्थानीं अगर सप्तमस्थानीं सिंह अगर धनु राशींत शनि, मंगळ रवि अथवा राहु.

४ द्वितीयस्थानीं, लग्नीं अगर सप्तमस्थानीं अनेक पापग्रह.

५ द्वितीय अगर सप्तमस्थानच्या स्वामीच्या द्वितीयस्थानीं अगर सप्तमस्थानीं पापग्रह.

६ द्वितीयेश व सप्तमेश पापग्रहांनीं युक्त.

७ स्त्रीमारक मंगळ.

वरील नियमांनीं बहुभार्यायोग कुशलतेनें जाणिला पाहिजे. कारण, यांतील केवळ एकाच नियमानें बहुभार्यायोग होईल असें समजूं नये. योग अधिक पाहिजेत.

आतां सायन कुंडली पहा नि. १ प्रमाणें जायास्वामी गुरु हा कुंभ

राशीत वक्री आहे. द्वितीयस्थानचा स्वामी चंद्र हा मंगळ आणि नेपच्यून या दोन पापग्रहानें युक्त असून चंद्राच्या अगदीं समोर [दोघांचे अंश पहा.] सप्तमस्थानीं राहू हा पापग्रह आहे. नि.४व५प्रमाणें.

लग्नीं रवि हा पापग्रह असून कुटुंबस्थानीं हर्शल शुक्रासह आहे. (नि. प्रमाणें) कुटुंबस्थानावर मंगळ पाहतो व जायास्वामी जो गुरु त्यावर वक्रगतीनें शनि पाहतो या सर्व कारणांनीं या कुंडलींत बहुभार्यायोग घडला आहे.

दोन किंवा अनेक स्त्रिया भोगण्यास कर्क राशींतला शुक्र अगर चंद्र कारणीभूत होत असतो. हा धर्म मिथुन राशींतल्या शुक्रांत नाहीं. उलट तो मिथुन राशींत असतां एकाच स्त्रीचें सुख देतो, निरयन कुंडलीवरून बहुभार्यायोगाचा अस्पष्ट बोध होतो.

१६ व्या वर्षीं लग्न झालें असून आज ४१ वर्षे वयाला झालीं तरी संतति झाली नाहीं याचें कारण सायन कुंडली चोख देते. सप्तमस्थानीं तूळ राशि आहे, हा राशि फारच थोडी ह्म० १।२ पर्यंत संतति देतो. तो राहूनें युक्त झाला. ह्मणून तितक्याही संततीला प्रतिबंध झाला, शिवाय समोर एकादश स्थानीं तूळ राशीच्या योग्यतेचाच जो मेष राशि तो मंगळ आणि नेपच्यून या दोन ग्रहांनीं घरलेला आहे. संततिकारक ग्रह गुरु आहे, तो कुंभ या वंध्या ह्म० मुलींच संतति न देणाऱ्या राशींत आहे, आणि वक्री आहे. असा गुरु संततिला प्रतिकूल जाणावा. निरयन कुंडलींत तो नीच आहे. गुरु नीच असला तर संतति होत नाहीं, हें ह्मणणें चुकीचें आहे मकर हा बहुप्रसव राशि असल्यामुळें पुष्कळशा मुली झाल्या पाहिजेत. एकादश स्थानीं मीन या बहुप्रसव राशींत चंद्र आहे, तोही पुष्कळ मुलीच देईल. पंचमांतील कन्येचा राहू संततीला प्रतिबंधक नाहीं. तो जुळी संतति देईल. सारांश संततीसंबंधानें निरयन कुंडलींत अनुभव मिळणार नाहीं. पंचमांत जो कन्या राशि आहे, तो थोडकी संतति देणारा अगर मुलींच न देणारा असा नाहीं. हा राशि पुष्कळ संतति देतो. या प्रमाणें सायन व निरयन कुंडल्यांत या ठिकाणीं स्पष्ट फरक आहे.

पत्रव्यवहार.

१ रविबुधभेदयुति

ता. १ दिसंबरचे अंकांत बुधकृत सूर्यग्रहण ग्वाल्हेर येथें दिसलें नाहीं असें एकानें कळविल्याचें लिहिलें आहे, परंतु तें खरें नाहीं. भिंगास काजळ लावून सूर्य स्वच्छ असतांना दृष्टि स्थिर करून मी सूर्यावरील बुधाचा डाग सुमारें ४॥ला सांगला पाहिला व नजजवळ जे कालेजांतील विद्यार्थी उभे होते. त्यांस दाखविला तो कांहींना दिसला व कांहींना दृष्टिदोषामुळें अथवा दृष्टि स्थिर करून पाहतां न आल्या मुळें दिसला नाहीं. स्पर्शकाली पाहण्याचें स्मरण राहिलें नाहीं. व केवळ काळ्या केलेल्या भिंगाच्या साह्यानें सूर्यतेज प्रखर असल्यामुळें तो दिसलाही नसता असा वाटला. सूर्य व्यासाचा १७८ वा अंश बुधव्यास होता यामुळें सहज पाहणारास डाग दिसला नसल्यास आश्चर्य नाहीं. पुसक पुसक अभ्र आड येत होतें त्यावेळीं डाग दिसत नव्हता. येथें किल्लावरच्या मारुतीजवळही २।३ गृहस्थांनीं काजळ लावलेल्या भिंगांतून ग्रहण पाहिलें ग्वाल्हेर येथें तें दिसलें यांत शंका नाहींच. दुर्बिणींतून पाहणाऱ्यांची पाहण्यांत काय चूक जाहली असेल याबद्दल त्यांचा त्यांनींच आपल्या मनाशीं शोध करावा.

२ सायन व निरयन पक्ष

सदर पत्रांमध्यें सायन पद्धतीनें येथील महाराज साहेबांच्या स्पेशल ट्रेनच्या अपघाताचें विवेचन केलें आहे व निरयन पद्धतीनें ही गोष्ट कशी अनुभवास येते ते कोणी दाखवावें असें आपण अव्हान केलें आहे, तरी या विषयीं निरयन पद्धतीनें चालणाऱ्या एका ज्योतिष्याचें काय ह्मणणें आहे तें या पत्राचे शेवटीं दिलें आहे, तें पहावें.

पक्षाभिमान बाजूला ठेवून जर विचार केला तर सायन व निरयन यांपैकीं खरें कोणतें हें पूर्णपणें ठरविणेंच अशक्य व चुकीचें आहे असें मला वाटतें. कारण खरी पद्धत ह्मणजे काय या विषयीं सर्वांची व्याख्या एकच असूं शकणार

नाहीं. आपणा सर्वांस ज्योतिषशास्त्र विशेषतः फलिताकरितां व धर्मकृत्यें करण्याकरितां लागत असतें. तेव्हां फळें कोणत्या पद्धतीनें ठीक जुळतात व कोणत्या पद्धतीच्या मुहूर्तावर धर्मकृत्यें केलीं असतां इष्टफलप्रद होतात याचा अनुभव घेणें हाच कायतो योग्य मार्ग आहे. दक्षिणहिंदुस्थानांत जसें गणितभागामध्यें विद्वान ज्योतिष्यांनीं प्राविण्य मिळविलें तसें उत्तरहिंदुस्थानांत फलज्योतिषामध्यें सरशी केली असें दिसतें. बादशाही राजधानी दिल्ली तीर्थक्षेत्रें व बऱ्याच राजधान्या व त्यांतील भाविक लोक हे या प्रांतांत असल्याचा हा परिणाम असावा असें वाटतें हे ज्योतिषी निरयन चालणारे असतात. अनेक प्रसंगीं अशा ज्योतिष्यांनीं आश्चर्यकारक फळें वर्तविलीं आहेत व तीं अनुभवास आलीं आहेत. श्रीमंत जयाजी महाराजांजवळ नाना जोशी नगरकर व सितारम दीक्षित असे दोन ज्योतिषी होते त्यांनीं केलेलीं भविष्यें खरीं होत असत हें प्रत्यक्ष पाहिलेले लोक येथें अद्याप आहेत. दक्षिण प्रांतीं ही अशा तऱ्हेचीं उदाहरणें ऐकिवांत आहेत तेव्हां निरयन पद्धति अनुभवाविरुद्ध आहे असें ह्मणतां येत नाहीं. आपले मासिकांतहीं कित्येकदां आपण निरयन कुंडल्यांवरून फलें वर्तविलीं आहेत. तसेंच सायन पद्धतीनेंही फलें जुळतात यविषयीं कुंडलीविज्ञान साक्ष देतच आहे. यारून फलांसंबंधीं पाहतां दोन्ही पद्धति आपआपल्यापरी चांगल्या आहेत असें माझ्या बुद्धीला वाटतें. धर्मकृत्यांसंबंधीं पहावें तर यासंबंधीं सायन मुहूर्तावर बुध्या करवून अनुभव घेतला तरी फलितांच्या अनुभवापेक्षां त्यापासून कांहीं विशेष निष्पन्न होईल असें वाटत नाहीं. शंभरांपैकीं शंभर फलें जुळणे हें कोणत्याच पद्धतीनें शक्य नाहीं. कदाचित् याच व इतर व्यवहारिक कारणांमुळें दिल्लीच्या आजूबाजूच्या पुष्कळ नामांकित ज्योतिष्यांमध्यें प्रीतिविवाह करण्याचा रिवाज आहे.

या शहरांत माधवराव थत्ते ह्मणून एक गृहस्थ फलज्योतिषाचे मोठे नादी व अभिमानी आहेत. आज कित्येक वर्षें त्यांनीं पद्धतशीर रीतीनें या विषयाचा अभ्यास व विचार केला आहे. त्यांचेजवळ निरनिराळ्या

लग्नाच्या कुंडल्यांचीं सुमारें एक एक फूट उंचीचीं दप्तरें आहेत. त्यांना पाहिजे तसें गणित करण्याकरितां त्यांचेजवळ पगार देऊन ठेवलेलीं १।२ माणसें असतात. रात्रंदिवस बेळ सांपडेल तेव्हां या विषयावर त्यांचें डोकें विचार करीत असतें. रात्रीमध्येंच झोपेतून जागे जाहले ह्मणजे एखादा आठवलेला नियम पटदिशीं उठून कार्डी ओढून दिवा लावून लिहून ठेवावा व पुनः अंथरुणावर पडल्यानंतर त्याजवर विचार करीत रहावें असाही त्यांचा क्रम कधीं कधीं असतो. ते जज्ज कचेरींत कारकून आहेत व ज्योतिष हा त्यांचा उपजीविकेचा धंदा नाहीं तेव्हां त्यांचेकडून पक्षाभिमानानें या विषयाचें परिशीलन होत असेल असें ह्मणतां येत नाहीं. कित्येक वेळां त्यांचीं फळें अचूक जमतात व जीं चुकतात, त्यावरून ते आपले नियम दुरुस्त करितात. तथापि त्यांची पद्धति थेट सायन नाहीं व थेट निरयनही नाहीं. कधीं कधीं मध्यमग्रहावरून ते कुंडली काढतात व तिच्यावरून फळें सांगतात व कधीं कधीं मंदस्पष्टग्रहाच्या कुंडलीवरून फळें सांगतात. स्पष्टग्रह कुंडलीवरून फळें पहणें मला 'संमत नाहीं असें ते मला १।२ वेळ बोलले होते. त्यांची दृष्टि पाहण्याची रीति निराळीच. सर्व ग्रहांची समसप्तक व नवपंचम दृष्टि पूर्ण व तेवढीच विचारांत घ्यावयाची अशी त्यांची पद्धत. ग्रहांत शनिपक्षाचे कांहीं ग्रह व बाकीचे रविपक्षाचे यावरून त्यांची मैत्री ते ठरवितात. दशाविचार त्यांना संमत नाहीं. ग्रहांचीं भ्रमणें ह्मणून त्यांची एक निराळीच कल्पना आहे. चंद्राचें भ्रमण १.२२ वर्षांचें. बाकीच्या ग्रहांच्या भ्रमणाचे काळ असेच कांहीं त्यांनीं मानिले आहेत. अशा भ्रमण विचारानें ते दिनचर्येपर्यंत फळें ठरवितात व त्यांतील पुष्कळ जुळतात. हा जरी एक तृतीय पंथ आहे. तरी फलानुभवावरून खरें किंवा खोटें ठरावयाचे तर यांतही खरेपणा आहे असें ह्मणावें लागतें.

ज्या अर्थी भूमितींतील सिद्धांताप्रमाणें किंवा तर्कशास्त्राप्रमाणें अमूकच पद्धति निःसंशय खरी व इतर चुकीच्या असें अनुमान काढतां येत नाहीं त्या अर्थी दोन्ही पद्धतींत कांहीं सार आहे ह्मणूनच प्रत्येकीचे अभिमानी कांहीं कांहीं लोक आहेत असें मानणें सयुक्तिक आहे.

वैद्यशास्त्राचें व ज्योतिःशास्त्राचें फलदृष्ट्या साम्य आहे हें जर खरें असेल तर ज्याप्रमाणें आर्यवैद्यक हकीमी इलाज (युनानी पद्धति) पाश्चिमात्य ॲलोपथी, होमिओपथी, इलिक्ट्रो होमिओपथी, क्रोमॉपथी व इतर पंथ प्रचारांत आले आहेत व प्रत्येक पंथाचे अभिमान्याजवळ गुण आल्याबद्दल सर्टिफिकिटें आहेत, त्याप्रमाणेंच ही गोष्ट आहे असें ह्मणण्यास काय हरकत आहे? कोणाला डॉक्टरचीं औषधें गुणकारी वाटतात, तर कोणाला आर्यवैद्यक खरें वाटतें. कोणाचा विश्वास हकीमी उपचारावर तर कोणाला इलिक्टो होमिओपथीचा अनुभव येतो. तेव्हां यांतील अमुकच पद्धति ग्राह्य व बाकीच्या त्याज्य हें ठरविणें ह्मणजे साहस आहे. ज्याला ह्या पद्धतीचा अनुभव आला त्याला तीच खरी वाटते व ज्या पद्धतीचा त्यानें चांगलासा अनुभव घेतला नसतो. एवढ्याच कारणाकरितां ती खोटी असें तो केवळ पक्षाभिमानानें ह्मणतो. त्याजवळ सबळ असा पुरावा कांहीं नसतो शेंकडा फळें किती जमतात हें पाहणें व ठरविणें वैद्यशास्त्राप्रमाणेंच ज्योतिशास्त्रासंबंधीं ही अशक्य आहे. कारण फळ पूर्ण जमलें किंवा अर्धें कीं चौथाहिस्सा जमलें हें ठरविणें ज्याच्या त्याच्या मनाच्या पूर्वसंस्कारावर व अभिमानावर अवलंबून आहे.

"तस्य तदेव हि मधुरं यस्य मनो यत्र संलग्नं"

हाच नियम येथेंही लागतो. ज्याचे मनांत जी पद्धति बिंबली तिचीच सत्यता त्याला भासूं लागते हा मानवी धर्म आहे. मनुष्य स्वभावाचें हें लघुत्व आहे. ही गोष्ट खरें खोटें ठरवितांना विसरणें ठीक नाहीं. हा फलानुभवाच्या दृष्टीनें विचार जाहला.

शास्त्राधारानें सायन किंवा निरयन पद्धतीच ग्राह्य आहे हें ठरविणें सोपें नाहीं. दोन्ही पद्धतींच्या अभिमान्यांना त्यांच्या मताला अनुकूल अशीं वचनें सांपडतात, व त्यांचें महत्व ते उलट पक्षाच्या वचनांच्या महत्वापेक्षां अधिक मानतात.

विचारांतीं असें दिसून येईल कीं विभागात्मक नक्षत्रप्रदेशांची कल्पना प्रथम मनांत येणें असंभवनीय आहे. कारण नक्षत्र हें नांवच असें दाखविते

[अपूर्ण]

कीं ही कांहीं तरी एक स्थिर वस्तु आहे. सायन विभागात्मक नक्षत्रें स्थिर नाहींत. तारा डोळ्यासमोर असल्यानें व त्यांना समजण्याजोगी गति नसल्यानें नक्षत्राची कल्पना प्रथम पासूनच आली असली पाहिजे व तशी ती आली याबद्दल सर्वांत प्राचीन लेख जो वेद तो साक्ष देत आहे (तैत्तिरीय ब्राह्मण अष्टक १ प्रपाठक ५ अथवा भारतीय ज्योतिःशास्त्र पान ५६ पहा) मुहूर्तचिंतामणींत व इतर ग्रंथांतही असाच दाखला मिळतो. ज्योतिष पद्धतीला नक्षत्रें हा मूलाधार आहे. सर्व गणिताचा व फलिताचा हाच पाया असला पाहिजे. अश्विनीभरणीकृत्तिकापादं मेषः इत्यादिवरूनही हेंच निष्पन्न होतें. राशी मागून आल्या याविषयीं वादच नाहीं. भारतांत व वेदांत त्या नाहींत. त्यांची सांगड नक्षत्रांशीं घातली आहे ती अश्विन्यादि गणनेनंतरची आहे. त्या पूर्वी कृत्तिकादि गणना होती हें सर्वसंमत आहेच. सायननक्षत्रें काल्पनिक आहेत व चल आहेत करितां तीं नक्षत्रें या नांवाला योग्य नाहींत. ज्या नक्षत्रांवरून ग्रंथांत फळें सांगितली आहेत तीं हीं नव्हेत हें उघड आहे. त्यांना शास्त्राचा आधार आहे असें ह्मणणें ठीक नाहीं. पण एवढ्याच कारणाकरितां त्यांवरून सांगितलेलीं फळें जर अनुभवास उतरत आहेत तर त्यांचा त्याग करणें गैरवाजवी आहे अनुभवाचें महत्व शास्त्राधारापेक्षां जास्त आहे. याच कारणानें जैमिनीसूत्र पद्धति, पाराशर पद्धति पुष्कळ बाबतींत फार भिन्न असूनहीं थोड्या फार प्रमाणानें प्रचारांत आहेत. वराहमिहिरानें याच कारणाकरितां मयमतादिकांची आयुष्य वर्तविण्याची रीति नापास केली आहे. पूर्वीचा सूर्यसिद्धांत असूनही इतर सिद्धांत याच कारणानें अस्तित्वांत आले. कोयनेलचा उपयोग चरकादिकांनीं सांगितला नसला तरी त्याज्य आहे, असें कोणीच समजदार मनुष्य ह्मणणार नाहीं; कारण तो अनुभव सिद्ध आहे. आपण सायन पद्धतीच्या दिशेनें कांहीं अनुभव-सिद्ध नियम ठरविण्याचे प्रयत्न करीत आहां तेही याच कारणाकरितां रतुत्य आहेत.

४ महाराज साहेबांच्या स्पेशल गाडीच्या टक्करीसंबंधीं निरयन पद्धतीनें विचार.

महाराजांची ज० ल० कुं०



वर्षलग्नकुंडली.

ता० २५।२६ आक्टोबर १९०७
दिनप्रवेशकुंडली.



जन्मकुंडलींत नवमाधिप शनि स्वगृहीं व मूलक्षेत्रीं आहे यामुळें वरचेवर प्रवास घडावा असा जन्मतःच योग आहे. गाडीची टक्कर होण्याचे दिवशीं दिनप्रवेश कर्कलग्नीं आहे. नवमस्थान (प्रवास विचारस्थान) चा अधिपति चरलग्नीं व चरनवांशीं आहे. शिवाय आरा-किंज्ञगुरु यांपैकीं गुरु हा चरोदयीं आहे. या कारणांनीं महाराज त्या दिवशीं प्रवासांत होते. अशावेळीं ज. कुंडलींत षष्ठस्थानीं असलेला चंद्र महाराजांस अष्टम आल्या कारणानें मृत्युप्रदचिंता उत्पन्न जाहली.

महाराजसाहेबांचा वर्षप्रवेश ता.२३ अक्टोबर रोजीं जाहला त्यावेळचे कुंडलींत लग्नापासून अष्टमस्थानीं मंगळ मुंथा आहेत यामुळें अग्नि व शस्त्र यांपासून भीति उत्पन्न जाहली. शिवाय प्रवासारंभीं महाराजांस ७ वा चंद्र होता तो वृश्चिक राशिवाल्यांचा घातचंद्र होय. तो प्रवासास फार निषिद्ध इतकेंही असून तो पृष्ठभागीं होता. यामुळें इतकें मोठें भय प्राप्त जाहलें हें उघड आहे.

पण यावेळीं अरिष्ट निवारण

योगही तसेच जबर आहेत. वर्षलग्नीं द्विजन्मायोग आहे त्यानें अरिष्टें टळतात. गुरु उचीचा धनस्थानावरून मृत्युस्थानास पूर्ण पहात आहे. म्हणून अरिष्टांचा नाश व्हावयाचा. शिवाय दिनप्रवेश कुंडलींत उचीचा गुरु केंद्रीं आहे. तसेंच बुध व स्वगृहीचा शुक्र हेही केंद्रीं आहेत म्हणून महाराजसाहेबांच्या केंसासही धक्का लागला नाहीं यांत आश्चर्य कोणतें ?

वरील विवेचनांत ठिकठिकाणीं वचनें लिहिल्यानें मजकूर फार वाढेल करितां तसें केलें नाहीं.

आपण केलेल्या विवेचनांत संकटाचे महत्त्वाप्रमाणें संकट उत्पन्न करणारे व संकट निवारण करणारे योग जबर नाहींत असें आह्मांस वाटतें.

सदर दिवशीं महाराज प्रवासांत आहेत असें येथें कळतांच महाराणी साहेबांचे ज्योतिषी बन्सीधरजी पांड्ये यांस असें वाटलें कीं सरकारचें आगमन सुरक्षित होणार नाहीं व याबद्दल ते एका गृहस्थाजवळ बोललेही. सदर ज्योतिषी रात्रीं बहुधा बाहेर जात नसतात, पण त्या दिवशीं स्पेशल रात्रीं ११ वाजतां येणार अशी खबर आल्या कारणानें सरकार सुरक्षित आल्यास त्यांना आशीर्वाद करण्याकरितां ते १० वाजतां स्टेशनवर गेले. महाराजांच्या गाडीच्या टकरीची तार आली तेव्हां त्यांना आपली शंका खरी जाहली याबद्दल वाईट वाटलें. परंतु सरकार सुखरूप आहेत अशी तार आली तेव्हां संतोष वाटला व संकटकारक व संकट निवारक अशा दोन्ही योगांचा दाखला आला याबद्दल आश्चर्य वाटलें.

पुढें जी महाराजांच्या स्पेशलसंबंधीं हकीगत ऐकिली तिजवरून 'कंठे बद्ध्वा दृढं सूत्रं यत्रस्थ तत्रनीयते' हेंच ग्रहयोगाचें फळ असें म्हणावें लागतें.

ऐकिवांत असें आहे कीं सरकार डाकगाडीनें येत असतां रात्रीं त्यांचा डबा कोणा एका जंक्शनवर कंपनीनें काढून ठेविला व तो एका पॅसेंजर गाडीस जोडून दिला. परंतु सरकारांनीं स्वतः करितां स्पेशल काढली व तिच्यामधून ते प्रवास करूं लागले. पुढील प्रकार प्रसिद्ध झालाच आहे.

हें पत्र आपल्यास पूर्वीच लिहावयाचें परंतु खासगी अडचणींमुळें तसें करितां आलें नाहीं.

पत्रविस्ताराची माफी असावी. कळावें, ही विनंति.

गोविंद सदाशिव आपटे.
प्रोफेसर व्हिक्टोरिया कालेज ग्वाल्हेर.

* प्रो. आपटे ह्मणतात, 'आपण केलेल्या विवेचनांत संकटाचे महत्वाप्रमाणें संकट उत्पन्न करणारे व संकट निवारण करणारे योग जबर नाहींत.' या आक्षेपास उत्तर जितकें लांबवावें, तितकें लांबेल. त्याचप्रमाणें निरयन पद्धतीच्या विवेचनावरही पुष्कळ लिहिण्यासारखें आहे. हा विषय सवडीप्रमाणें हातीं घ्यावयाचा आहे. आज आमचे प्रोफेसरांस पुढील प्रश्न आहेत.—

१ जातक आणि ताजक या पद्धति एकच आहेत काय ?

२ दोहींत जास्त महत्व कोणाचें ?

३ जातक वर्तविणाऱ्यांना अमुक गोष्टी घडतील असें जें पत्रिकेंत वर्णन असतें, तें जातकानुसार असतें कीं ताजकानुसार असतें ?

४ जातक व ताजक या दोहोंवरून एकाच काळीं एकाच गोष्टीचा विचार केल्यास उत्तरें एकच येतील कीं भिन्न येतील ?

५ जन्मलग्न द्विस्वभाव राशींचें त्याचा स्वामी द्विस्वभाव राशींत चंद्र द्विस्वभाव राशींत आणि नवमेश स्थिर राशींत, सर्व ग्रहांत एक ग्रह मात्र चर राशींत आणि तोही फक्त तृतीयेश असा जर कुंडलींत योग असेल, तर तो मनुष्य वरचेवर प्रवास कां करील ?

६ नवमाधिप मूल क्षेत्रीं असतां वरचेवर प्रवास घडावा हें ह्मणणें आबाधित आहे काय ? किंवा याला कांहीं अपवाद आहेत ?

७ वाहनापासून होणाऱ्या अपघाताचा विचार चतुर्थ स्थानावर होतो, हें जर मान्य असेल, तर चतुर्थेश कोणत्या स्थितींत पाहिजे ? व जर आगगाडीपासून भय होतें, तर तो मंगळाच्या क्षेत्रीं पाहिजे कीं वाटेल त्या राशीस असला तरी चालेल ?

वरील पत्रांत 'अशावेळीं ज० कुंडलींत षष्ठस्थानीं असलेला चंद्र महाराजांस अष्टम आल्याकारणानें मृत्युप्रद चिंता उत्पन्न झाली" असें आहे. त्याला महत्व किती द्यावयाचें आणि ताजकानें विचार करीत असतां त्यांत जातक कां घुसडावें ?

९ प्रवासाचा विचार नवमस्थानावर होतो कीं सप्तमावर होतो ? नवमावर होत असेल तर त्याला कोणत्या ग्रंथकारांचीं कोणता वचनें आहेत.

१० सप्तम स्थान हें प्रवासाचें स्थान आहे, या बद्दल वचनें.—

१ जातकाभरण

रणांगणश्चापि वणिक्क्रियाश्च
जायाविचारो गमनं प्रयाणम् ॥

२ सर्वार्थचिंतामणि

आगमगमनमदाप्तिं ब्रूयान् मूत्राशयं च नष्टधनम् ॥

३ जातकपारिजात

उक्तं पुत्रसुखागमागमफलं सर्वंच यत्तद्वदेत् ॥

४ षट्पंचाशिका

च्युतिर्विलग्नाद्विबुकाच्च वृद्धि-
र्मध्यात्प्रवासोऽस्त मयान्निवृत्तिः ॥
वाच्यं ग्रहैः प्रश्नविलग्नकाला
दग्रहं प्रविष्टो हिबुके प्रवासी ॥

५ ताजक नीलकंठी

हृद्धक्कलिमार्गादि चिंत्यं द्युने ग्रहोऽशुभः ॥

या वचनांवरून प्रवासांतून निवृत्त होणें अगर प्रवासास जाणें या गोष्टी सप्तम स्थानावरच पहावयाच्या, असें दिसतें. नवम स्थानावरून पहाव्या असें हे ग्रंथ सांगत नाहींत. असें असतां नवम स्थानचा स्वामी मूलत्रिकोणीं आहे हें एकच वचन महाराजांस वरचेवर प्रवास घडावा या अनुमानास कसें कारण होतें ?

११ अपघात केव्हां होतात अगर केव्हां होण्याचा संभव असतो ? त्यांत वाहनांत अपघात होण्याचा संभव केव्हां ?

१२ आकस्मिक भयंकर गोष्टी ज्या ग्रहाच्या हालचालीनें सूचित होतात असा ग्रह जो हर्शल तो सप्तम स्थानीं [प्रवास स्थानीं] असतां जन्मलग्नाचा स्वामी चंद्र त्याच्या समोर आला आहे, चतुर्थ स्थानीं उदित असलेला मंगळ लग्नाच्या व त्या दिवशींच्या चंद्राच्याही अष्टम स्थानीं शनीच्या गृहीं असतां, राहू हा तनुस्थानीं जन्मस्थ चंद्राला ८ वा असतां व त्या दिवशींचा चंद्र राहूच्या राशीला असतां, शनि हा जन्मस्थ चंद्राला ४ था असतां इतकी अनिष्ट स्थिति असतां संकटाच्या महत्वाप्रमाणें संकट उत्पन्न करणारे योग जबर नाहींत' या ह्मणण्यास आधार काय ? अगर संकटें उत्पन्न होण्याचें सामान्य नियम कोणते ? मृत्युकालीं पाप ग्रह जसे यावे तसे आले नाहींत काय ?

वगैरे आणखीही बरेच प्रश्न करितां येण्यासारखे आहेत. त्यांचा विचार यांचीं उत्तरें मिळाल्यावर करूं.

संपादक-कुंडलीविज्ञान.

*

कुंडलीविज्ञान.

The 'Deshasevak' Paper.
NAGPUR.
Reference Office.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूतिः'

पुस्तक ८ वें.] पौष कृ. ३, मंगळवार [अंक ३ रा

सायननिरयन पक्ष.

* प्रो. आपटे यांच्या प्रश्नास उत्तर.

विधान. १ले.— 'पक्षाभिमान बाजूला ठेवून विचार केला तर सायन व निरयन यांपैकीं खरें कोणतें हें पूर्णपणें ठरविणेंच अशक्य व चुकीचें आहे. कारण, खरी पद्धति ह्मणजे काय, या विषयीं सर्वांची व्याख्या एकच असूं शकणार नाहीं.'

उत्तर.— खऱ्याखोट्याचा निर्णय करण्यास पक्षाभिमान बाजूला ठेवणें योग्य आहे. पण, कुंडलीविज्ञानकर्त्यास खऱ्याखोट्याचा निर्णय करावयाचा नसून त्याला आपली बाजू न्यायाधीशापुढें मांडावयाची आहे. न्यायाधीशाचें काम समाजानें करावें, अशी त्याची इच्छा आहे. कुंडलीविज्ञानकर्त्ता जरी सायन पक्षाचा अभिमानी असला, तरी तो निरयन पक्षास स्थल देतो, अर्थात् न्यायाधीशाच्या पुढें दोन्ही बाजू तो पुढें मांडितो, व मांडील. यांत त्याचा पक्षाभिमान कधींही दृष्टीस पडणार नाहीं. समाजांत शेंकडा ९५ लोक निरयनवादी आहेत. ते सायनवाद्यांची आजपर्यंत

* हें पत्र स्थलाभावास्तव पुढील अंकीं प्रसिद्ध करूं.

योग्य समजूत करूं शकले नाहींत. व पुढेंही करितील असें वाटत नाहीं! कुंडलीविज्ञानकर्त्ता सायनपक्षाचा जरी अभिमानी असला, तरी त्याला सदसद्विवेकबुद्धि दिलेली आहे, तिच्या योगानें जो कोणी विद्वान् त्याचें समाधान करूं शकेल त्याला तो अत्यंत पूज्य मानील व आपला पक्ष सोडून देईल. प्रो. आपटे यांस खरी पद्धति ह्मणजे काय या विषयीं सर्वांची एकच व्याख्या असूं शकणार नाहीं, असें कां वाटतें कळत नाहीं. सायन व निरयन हे दोन पक्ष कां झाले हें तर कळण्यासारखें आहे?; संपात चल आहे व तो राशिचक्रांत उलट भ्रमण करितो, हें तत्व उभयपक्षास मान्य आहे. जर संपात चल नसता तर हा वादच उत्पन्न झाला नसता ही गोष्ट प्रो. आपटे यांस कबूल अशलीच पाहिजे. आतां यापुढें 'संपात चल असल्यामुळें ऋतु चुकतील कीं नाहींत हा प्रश्न सोडविला पाहिजे. हाही प्रश्न इतका सोपा आहे कीं, त्याचें विवेचन करण्याची जरूर नाहीं. संपात जर मागें जातो तर ऋतु चुकलेच पाहिजेत. कारण तेही मागें गेले पाहिजेत. याच्या पुढील प्रश्न असा येतो कीं, आज ऋतु चुकले कीं नाहींत? याचें उत्तर 'होय' असेंच द्यावें लागेल. ग्रहलाघवी मतानें ते २३ दिवस अगोदर होऊं लागले आहेत! आतां सायनवाद्यांचा असा प्रश्न आहे कीं, अमुक ऋतूंत अमुक कार्यें व्हावीं अशी धर्मशास्त्राची आज्ञा आहे, ती आपल्या हातून पाळली जाते किंवा नाहीं? अर्थात् पाळली जात नाहीं असेंच उत्तर द्यावें लागेल!

आतां याची दुसरी बाजू सांगतों. विषुव, अयन, राशि, नक्षत्रें यांचीं ज्योतिःशास्त्रांत लक्षणें काय सांगितलीं आहेत? हीं लक्षणें सायन पक्षाला अनुकूल आहेत कीं निरयन पक्षाला अनुकूल आहेत? विषुव आणि अयनें यांचीं लक्षणें सायन पक्षालाच अनुकूल आहेत, तीं निरयन पक्षाला अनुकूल असणें शक्यच नाहीं. या गोष्टींस ग्रंथांच्या पुराव्याची जरूरच नाहीं, कारण त्या सर्वांस दृष्टिगोचर होणाऱ्या आहेत. विषुव व अयनें यांचीं लक्षणें व त्यांचा प्रत्यक्ष पुरावा या दोन गोष्टी निरयन पक्षास अद्याप पर्यंत खोडून टाकितां आल्या नाहींत व पुढेंही येणार नाहींत, असें आह्मीं खात्रीनें सांगूं शकतों.

राशि ह्मणजे काय? संपातापासून ३० अंशांचें जें अंतर त्यास राशि ह्मणतात. या संबंधानें ज्यो० केशव व्यंबक पेंडसे यांस प्रश्न विचारिला होता. त्याचें उत्तर त्यांनीं पुढील प्रमाणें दिलें.—

"सूर्यसिद्धांतांत आरंभस्थान मेषादि किंवा मीनांत, रेवत्यंत अशा शब्दांनीं सांगितलें आहे. तें ओळखण्याची दुसरी खुणा दिलेली नाहीं. परंतु गोलबंधाधिकारांत राशींचे भाग पाडावयाचे ते—

विषुवस्थानतो भागैः स्पष्टैर्भगणसंचरात् ॥

विषुव प्रदेशापासून ३० अंशांत एक असे राशिभाग करावे, असें स्पष्ट सांगितलें आहे. विषुवती किंवा विषुवदिन ह्म० अहोरात्रमान सारखें असतें तो दिवस. त्या दिवशीं वेध घेतला असतां विषुवप्रदेश समजतो. ह्मणजे गोल बांधितांना राशींचा आरंभ विषुवतीपासून सांगितला आहे. या राशि अर्थात् सायन येणार!"

वरील उताऱ्यावरून आणि विष्णु पुराणादि प्राचीन पुराणांवरून राशि आणि त्यांचीं नावें सायन आहेत, असें सिद्ध होतें. राशीचे भाग रेवती नक्षत्राचा जो तारा आहे त्याच्या अंतापासून हे भाग करावयाचे, असें कोणत्याही श्रुतींत, स्मृतींत, पुराणांत अगर ज्योतिष ग्रंथांत सांगितलेलें नाहीं. अर्थात् निरयन गणनेंत राशींना नांवेंच नाहींत असें आमचें ह्मणणें आहे. मेष, वृषभ नांवें सायन आहेत. निरयन नाहींत ही गोष्ट सहज समजणारी आहे.

नक्षत्रें दोन प्रकारचीं आहेत व त्यांनींच सायनपक्षाला अज्ञपणामुळें अडथळा आणिलेला आहे. क्रांतिवृत्ताच्या पट्ट्यांत [क्रांतिवृत्तांत नव्हे.] कांहीं तारकापुंज आहेत त्यांस नक्षत्रें ह्मणतात. या बहुतेक पुंजांत एकापेक्षां अधिक तारे आहेत. (ज्योतिर्विलास पहा.) प्रत्येक तारकापुंजांत सारखें अंतर नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यांतील कित्येक पुंज निरयन राशींच्या विभागांत नमून आगे मागें आहेत. (भा० ज्योतिःशास्त्राचा इतिहास पृ. ४२६ पहा.) २०

शंकर बाळकृष्ण दीक्षित यांच्या ज्योतिर्विलासांत तीन नक्षत्रपट दिले आहेत, ते पहा. त्यांत विषुववृत्त, क्रांतिवृत्त व हे तारकापुंज यांचे प्रतिबिंब आहे. त्यावरून ध्यानांत येईल कीं, हे नक्षत्रपुंज क्रांतिवृत्तांत नसून त्याच्या दक्षिणेस व उत्तरेस पसरले आहेत. हीं नक्षत्रें ग्रहादिकांची स्थिति सांगण्यास निरुपयोगी आहेत. सांप्रतच्या पंचांगांत ग्रह अमुक नक्षत्रांत आहे, असें जें सांगितलें असतें, त्याचा अर्थ वरील प्रकारच्या नक्षत्रांत आहे, असा नाहीं. गणितांत नक्षत्र हा पारिभाषिक शब्द असून त्याचें लक्षण संपातापासून १३ अं० २० क०चा जो क्रांतिवृत्ताचा भाग त्यास नक्षत्र ह्मणतात. संज्ञेसाठीं यांस पाहिजे तर विभागात्मक नक्षत्रें ह्मणावें. तारात्मक व विभागात्मक नक्षत्रें भिन्न आहेत, हें अद्यापि पुष्कळांस समजलेलें नाहीं त्यामुळें ते सायनपक्षाला अडथळा करितात. ही चूक अज्ञान मनुष्यच करितो असें नाहीं तर शंकर बाळकृष्णासारखे ज्योतिर्विद सुद्धां 'इष्टकालप्रसिद्ध्यर्थं' करितात, ही अत्यंत दुःखाची व लाजीरवाणी गोष्ट आहे. वेदांगज्योतिषाचा काल काढितांना दीक्षितांनीं ही लटपट केली आहे! इतक्यावरून ते आह्मांस पूज्य नाहींत असें मात्र कोणीं समजूं नये. शंकर बाळकृष्ण हे सायन पक्षाचेच पूर्ण अभिमानी नव्हते. त्यामुळें त्यांस आपल्या मताच्या समर्थनार्थ असल्या चुका जाणून बुजून कराव्या लागल्या. असो, विभागात्मक नक्षत्रें व तारकात्मक नक्षत्रें यांतील फरक ध्यानांत आला ह्मणजे सायन पक्षाला तेव्हांच बळकटी येते. गणितांत जर विभागात्मक नक्षत्रें वापरावीं लागतात, तर तीं निरयन असणें शक्यच नाहीं. राशि सायन आहेत असें वर सिद्ध झालेंच आहे. नक्षत्र ह्मणजे राशीचे $\frac{1}{27}$ किंवा २। नक्षत्रांचा एक राशि असें कोष्टक असल्यामुळें तींही सायनच संभवतात. नक्षत्राला चार चरण असतात. या चरणांवरून हिंदुलोकांत चू, चे, चो, लादि आद्याक्षरपूर्वक जन्मनामें ठेवण्याची चाल आहे. जर नक्षत्र शब्दाचा अर्थ तारा असा केला तर त्याचे चरण ह्मणजे काय? सूर्यसिद्धांतांत जें आरंभ स्थानाला रेवत्यंत ह्मटलें आहे, त्याचा अर्थ काय करावयाचा? रेवतीचे ३२ तारे आहेत. त्यांतील शेवटची ताराच निरयन पक्षानें आरंभस्थानीं मानिली आहे काय? ती तारा क्रांतिवृत्तांत असून तिच्यापासूनच अश्विन्यादि नक्षत्रविभाग कल्पिलेले आहेत काय? या प्रश्नास निरयन पक्षानें समर्पक उत्तर दिलें पाहिजे.

रेवतीची योगतारा कोणती या बद्दल सूर्यसिद्धांतांत काय सांगितलें आहे? असा प्रश्न ज्यो. केशव त्रिंबक यांस विचारिला होता. त्याचें उत्तर त्यांनीं पुढील प्रमाणें दिलें आहे.—

ज्येष्ठाश्रवणमैत्रा ां बार्हस्पत्यस्य मध्यमा ॥ भरण्याग्नेय पित्र्याणां रेवत्याश्चैव दक्षिणा १८

"ज्येष्ठा, श्रवण, अनुराधा आणि पुष्य यांची मधली तारा व भरणी, कृत्तिका, मघा व रेवती यांची दक्षिणेकडील तारा योग तारा होय. यावरून योग तारेचा बोध चांगला होत नाहीं.'

ज्योतिर्विलासांतील दुसरा नक्षत्रपट उघडा. त्यांत रेवतीच्या ३२ तारा दिलेल्या आहेत. त्यांवरून सूर्यसिद्धांतोक्त योग तारा कोणती हें कोणी सांगेल काय? योगतारांत निश्चय नाहीं त्यामुळें प्रत्येक निरयन पक्षाचें एकमत नाहीं. प्रत्येक पक्ष आपल्या आरंभस्थानापासून नक्षत्र व राशि यांचे विभाग करणार. ह्मणून प्रत्येक निरयन पंथाचे नक्षत्रारंभ निरनिराळे येणार. यांतील खरा पंथ कोणता?

याप्रमाणें संपात, राशि, अयनें व नक्षत्रें यांच्या वास्तविक लक्षणांनीं कोणतेंही मत खरें किंवा खोटें हें समजल. यानंतर ऐतिहासिक पुरावा, संपाताचें आंदोलन की पूर्ण भ्रमण इ० गोष्टींवरून प्रो० आपटे ह्मणतात त्याप्रमाणें निःपक्षपातानें खऱ्याखोट्याचा निर्णय करितां येणार नाहीं काय?

विधान २ रें.—आपणा सर्वांस ज्योतिषशास्त्र विशेषतः फलिताकरितां व धर्मकृत्यें करण्याकरितां लागत असतें. तेव्हां फळें कोणत्या पद्धतीनें ठीक जुळतात व कोणत्या पद्धतीच्या मुहूर्तावर धर्मकृत्यें केलीं असतां इष्टफलप्रद होतात याचा अनुभव घेणें हाच कायतो योग्य मार्ग आहे.

उत्तर.—कोणत्या पद्धतीच्या मुहूर्तावर धर्मकृत्यें केलीं असतां इष्टफलप्रद होतात याचा अनुभव कसा घ्यावयाचा? हा अनुभव जन्मांतरीं मिळावयाचा आहे! हें प्रो० आपटे

यांच्या ध्यानांत कसें आलें नाहीं कळत नाहीं. सोमल सेवन केला असतां प्राण जातो हा अनुभव तत्काल मिळतो तसा अनुभव एखाद्या पद्धतीचा येणें शक्य आहे काय? अयनें, ऋतु, संक्रांती व नक्षत्रें यांस अनुसरून जीं धर्मकृत्यें करावयाचीं त्यांचीं सदसत्फलें तीं ज्या पद्धतीच्या मुहूर्तावर केलीं असतील त्या पद्धतीच्या खरेखोटेपणावरच अवलंबून असलीं पाहिजेत. जर अयनें, ऋतु, संक्रांती व नक्षत्रें यांचीं लक्षणेंच चुकीचीं असलीं तर त्यांच्या मुहूर्तावर केलेलीं धर्मकृत्यहीं चुकीचींच फलें देतील असें नव्हे काय? ह्मणून प्रथम त्यांच्या लक्षणांची सत्यासत्यता सिद्ध करा आणि मग धर्मकृत्याच्या फलाची अपेक्षा करा असें आमचें ह्मणणें आहे. कै० शंकर बालकृष्ण दीक्षित हे भारतीय ज्यो. इ. पृ. ४२५ मध्यें लिहितात-'निरयन मान घेतलें तर ऋतु चुकतील. चैत्रांत वसंत, ग्रीष्म इ० ऋतु उत्तरोत्तर येत जातील. आणि ज्यांत वर्षाकाल आहे अशा चैत्रास मधु ह्मणावें लागेल. एवढेंच नाहा तर ज्यांचा व्यवहाराशीं निकट संबंध अशीं मौंजी, विवाह हीं कृत्यें माघ, फाल्गुन, चैत्र, वैशाख ज्येष्ठ यांत करावयाचीं तीं करण्यास त्या महिन्यांत पर्जन्यकाल येऊन अडचण येईल, आणि आषाढादि मास त्या कृत्यांस ऋतूंच्या संबंधें अनुकूल होतील. परंतु धर्मशास्त्रानें ते वर्ज्य असल्यामुळें त्या कृत्यांस फार अडचण येईल. यावरून निरयन पद्धतीनें इष्ट फलें मिळतील किंवा नाहींत, याचा विचार करावा.

आतां फलें कोणत्या पद्धतीनें ठीक जुळतात, हा एक प्रो. आपटे यांचा मार्ग आहे. या मार्गाचा विचार करणें जरूर आहे. प्रथमतः विद्वद्वर्य ज्यो० कै० शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचें काय मत आहे तें पाहूं. भा० ज्यो० इ० पृ० ४३७—"सायन मान ग्राह्य होय असा विचार येथपर्यंत मुख्यतः गणित आणि मुहूर्त या स्कंधांच्या दृष्टीनें झाला. या दोहोंस जें मान्य तें जातकस्कंधास मान्य असलें पाहिजे. कोणत्या मानानें पत्रिका केली तर अनुभवास येते. यावर कांहीं अंशीं या गोष्टीचा निर्णय अवलंबून राहील हें खरें. सायन मानानें पत्रिका जुळते असें सायनवादी ज्योतिषी माधव ब्रह्माजी आणि जीवनराव त्र्यंबक चिटणीस ह्मणतात. यूरोपांतले हल्लींचे प्रसिद्ध फलज्योतिषी झडकील आणि रफील हे सायनमानानेंच पत्रिका करितात. तथापि ज्योतिर्निबंधांत जातकोत्तम ग्रंथांतलें असें वचन आहे.—

उच्चतः सप्तमं नीचं प्रोक्तांशे परिवीचता ॥ इहकार्यः सायनांश खचरैः फलनिर्णयः ॥

यावरून जातक प्रकरणांत सायनमान ग्राह्य होय असें आमच्या ग्रंथकारांचेंही मत आहे. सायननिरयनांच्या आरंभस्थानांत फारसें अंतर नव्हतें त्या वेळींच जातकाचे बहुतेक ग्रंथ झाले आहेत. यामुळें ते सायनानुसार असावे असें दिसतें. या विषयी जास्त विवेचन पुढें जातकस्कंधांत केलें आहे. सायनमानानें पत्रिका जुळवून या, ह्मणजे आह्मीं सायनमान स्वीकारितों असें ह्मणणारे पुष्कळ लोक मला भेटले आहेत. परंतु कोणत्याच मानानें ती गोष्ट सर्वांशीं साध्य नाहीं असें मला वाटतें. आआणखी ज्योतिःशास्त्र केवळ पत्रिकेसाठींच झालें आहे असें नाहीं.'

पृ० ४८१-"जातकाच्या संबंधें सायनमान निसर्गसिद्ध आहे कीं निरयन तसें आहे याचा निर्णय पटवर्धनांच्या [बाबाजीरावांच्या ऊर्फ

महाडकरज्योतिषांच्या] विद्येवरून होईल तर पहावा, ह्मणून मी शके १८१५ पासून प्रयत्न व विचार केला. परंतु तो निर्णय साध्य होईलसें दिसत नाहीं. शारीरलक्षणांवरून पटवर्धनांस समजणारे कांहीं ग्रह सापेक्ष असतात. उदाहरण अमुक मनुष्याच्या जन्मकालीं रवि आणि बुध यांमध्यें २ अंश अंतर होतें, लग्नापासून अमुक स्थानीं अमुक ग्रह होता असें त्यांस चेहरा पाहून समजतें यावरून कांहीं निर्णय होत नाहीं. दुसरें मुख्य असें कीं, पटवर्धनांनीं हल्लीं लक्षणें बसविलीं आहेत, तीं प्रथम पटवर्धनी पंचांगावरून बसविलीं आहेत. उदाहरण अमुक लक्षण असतां पटवर्धनी पंचांगावरून अमुक लग्नाचे किंवा अमुक ग्रहाचे अमुक अंश येतात असा अनुभव अनेक उदाहरणांत पाहून तसें लक्षण जेथें आढळेल तेथें तितकें लग्न किंवा ग्रह सांगावयाचा असे नियम त्यांनीं बसविले आहेत. हे नियम प्रथम सायन पंचांगावरून बांधितां आले असते. सायननिरयन भेद आणि पटवर्धनांचीं विद्या हीं दोन्ही ज्यांना

चांगली अवगत आहेत अशा मनुष्यांनीं पांच सहाशें वर्षें अनुभवाचें काम चालविलें तर तितक्या काळांत सायननिरयन ग्रहांच्या अंतरांत सात आठ अंश वाढतील, आणि त्यावरून निर्णय होईल. पटवर्धन हे मुखचर्यादिकांवरून ग्रहाचे जे राश्यंश हल्लीं मांडितात, त्यापेक्षां सायन राश्यंश सुमारें १८ अंश जास्त असतात. पटवर्धनांचे नियम कायम राखून ६०० वर्षांनीं मुखचर्येवरून येणारा ग्रह आणि गणितागत ग्रह यांत १८ अंशच अंतर येईल तर जातकसंबंधें सायनमान निसर्गसिद्ध ठरेल. आणि तें अंतर सुमारें २६ अंश येईल तर शुद्ध नाक्षत्र (निरयन) मान निसर्गसिद्ध ठरेल. फलें सांगण्यास ग्रहांचीं उचें स्वगृहें आणि ग्रहांचे तात्कालीन राशी आणि लग्न हीं सर्व पटवर्धन हे निरयन घेतात तथापि तेवढ्यावरून सध्या कांहीं निर्णय ठरवितां येत नाहीं.'

वरील मतावरून शंकररावांचा कल कोणत्या बाजूला होता, हें कळेल. ज्योतिर्निबंधांत निदान ग्रहांचीं उचें व नीचें सायन घ्यावीं हें स्पष्ट आहे. तेव्हां सायनाचा उपक्रम कांहीं नवीन नाहीं. हें उघड आहे. दुसरें फलज्योतिषांत निरयन राशि व ग्रह घेतले पाहिजेत. असें कोठेंही वचन नाहीं अर्थात् सायनाचीच परंपरा सिद्ध होते. सायननिरयनांच्या आरंभस्थानांत फारसें अंतर नव्हतें त्या वेळींच जातकाचे बहुतेक ग्रंथ झाले आहेत.' असें जे शंकरराव ह्मणतात तेंही विचारार्ह आहे. वास्तविक हे त्यांचें मत लटपटीत आहे. जातकाचे कांहीं ग्रंथ अशा वेळीं झाले असतील पण जीं तत्वें या शास्त्रांत प्रतिपादन केलेलीं आहेत. तीं तत्वें फारच प्राचीन आहेत असें त्यांच्याच मतांवरून सिद्ध होतें, तें असें.—

शंकररावांनीं वराहमिहराला शालिवाहन शक ४२७ मध्यें आणून ठेविलें आहे. वास्तविक तो याच्याही पूर्वीचा असला पाहिजे. तथापि आपण तोच खरा मानूं. या विद्वानाचा **बृहज्जातक** हा ग्रंथ प्रसिद्ध असून आमचे ज्योतिषी त्याचें अध्ययन करितात. हा ग्रंथ त्यानें स्वतः निर्माण केला नसून पूर्वाचार्यांनीं जे नियम व जीं तत्वें कायम केलेलीं होतीं तींच तत्वें त्यानें आपल्या ग्रंथांत सुंदर

पद्यांत ग्रथित केलेलीं आहेत. याबद्दल शंकरराव काय ह्मणतात पहा.—

'जातक स्कंधावर सांप्रत उपलब्ध असलेले दैवी ग्रंथ गौरीजातक आणि कालचक्रजातक अथवा कालजातक आणि अपौरुष किंवा आर्ष असे ग्रंथ पाराशरी, जैमिनीय सूत्र, भृगुसंहिता इतके मला माहीत आहेत. जातकस्कंधावर उपलब्ध **पौरुष** ग्रंथांत **प्राचीनतम** ग्रंथ ह्मटला ह्मणजे वराहमिहिराचा **बृहज्जातक** होय. याच्या शेवटीं त्यानें

मुनिमतान्यवलोक्य सम्यक्।
होरां वराहमिहिरो रुचिरां चकार॥

उपसंहाराध्याय.

असें ह्मटलें आहे. मध्येंही एकदां (अ० ६ श्लो० १०) त्यानें मुनिगदितं' (मुनींनीं सांगितलेलें आहे.) असें ह्मटलें आहे. **पराशराचा** त्यानें दोनदां उल्लेख केला आहे. बृहत्संहितेंत ग्रहगोचराध्यायांत **मांडव्याचा** उल्लेख केला आहे. तसेंच बृहज्जातक टीकाकार भट्टोत्पल यानें **गार्गी, बादरायण, याज्ञवल्क्य, मांडव्य** यांचीं वाक्यें जातकसंबंधाचीं दिलीं आहेत. त्यांत गार्गीचीं तर पुष्कळ च आहेत. यांचे ग्रंथ वराहाच्या पूर्वीचे असले पाहिजेत. यावरून वराहमिहिरापूर्वी जातकावर निदान पांच आर्षग्रंथ होते असें दिसतें. [टीप—यांशिवाय गर्ग, वसिष्ठ, भारद्वाज, शौनक, अत्रि या ऋषींचीं वचनें दुसऱ्या ग्रंथांत आढळतात. वसुसंहिता नांवाचा आणखी एक ग्रंथ ऐकण्यांत आहे.] या शिवाय वराहानें **सत्य, मय, यवन, मणित्थ, जीवशर्मा, विष्णुगुप्त,** इतक्या आचार्यांचा उल्लेख केला आहे. शिवाय 'एके, केचित्, अन्ये, पूर्वशास्त्र, आद्याः' असे सोयम उल्लेख तर पुष्कळ आले आहेत. यावरून वराहाच्या पूर्वी पौरुष ग्रंथकारही पुष्कळ झाले असें दिसतें. सहा आचार्य तर त्याने सांगितलेच आहेत. तर वराहाच्या पूर्वी १०।१२ ग्रंथ होऊन लोकमान्य होणें आणि त्यांतून पांच तर ऋषिप्रणीत मानले जाणें ही गोष्ट शेपन्नास वर्षांत होणें अशक्य आहे. त्या गोष्टीस चारपांचशें वर्षे सहज पाहिजेत. आणखी वराहानें सांगितलेला **विष्णुगुप्त** ह्म० **चाणक्य** असें उत्पल ह्मणतो. यावरून हा चंद्रगुप्ताचा प्रधान जो चाणक्य तोच विष्णुगुप्त असण्याचा संभव आहे. नसेल असें

*

मानण्यास कांहीं कारण नाहीं. तर वराहाच्या पूर्वी ८०० वर्षे जातकस्कंधावरील ग्रंथ प्रचारांत होते. अर्थात् ह्या ग्रंथांच्या पद्धतीचें जातकज्ञान शकापूर्वी चारपांचशें वर्षे आमच्या लोकांस झालें होतें. हें आरंभापासून वराहाच्या वेळेच्या प्रमाणें नसलें तरी हळू हळू तें तसें बनत आलें असलें पाहिजे. शकापूर्वी ५०० च्या सुमारास मेषादि संज्ञा प्रचारांत आल्या तेव्हांच सांप्रतची जातकपद्धति प्रचारांत आली असावी. त्या पूर्वी अथर्वज्योतिषांतली जातकपद्धति होतीच."

यावरून जातकाचीं तत्वें सायननिरयनांत फारसें अंतर नव्हतें तेव्हांची नसून त्याच्याही शेकडों वर्षे पूर्वीची आहे, असें सिद्ध होतें. वराहाचा शक ४२७ धरून त्यापूर्वी ८०० वर्षे जर ग्रंथ प्रचारांत होते असें शंकर रावांचें ह्मणणें आहे तर ग्रहलाघवाच्या च मताचे स्थूल अयनांश त्या वेळीं किती होतात बरें? १३॥ अयनांश हें अंतर फारसें नाहीं असें ह्मणणें धाष्टर्याचें नव्हे काय? त्या वेळा खऱ्या खऱ्या संक्रांति निरयन संक्रांतीनंतर सुमारें १४ दिवसांनी होत असत! हा फरक लहान होता काय? हा फरक त्या वेळच्या ज्योतिष्यांस कळला नसेल? आणि कळून ते निरयन पद्धतीनेंच चालत असतील? ते ज्योतिषी आतांच्या सारखेच भ्रमांत असतील काय? त्यांची विद्वत्ता आणि आतांच्या ज्योतिष्यांची विद्वत्ता यांत जमीनअस्मानाचा फरक आहे, हें कोणीही विचारी मनुष्य कबूल करील. ते स्वतंत्र विचाराचे असले पाहिजेत व जर त्यांस निरयन पद्धति मान्य असली तर तिचाच स्वीकार त्यांनीं केलेला असला पाहिजे. ह्मणून त्यांस कोणतें मत मान्य होतें, याचा प्रथम विचार केला पाहिजे.

शंकर बाळकृष्णांनीं वराहाचा काल ४२७ दिला आहे, तोच आह्मांस मान्य नाहीं. "यानें स्पष्टपणें आपला काल कोठें सांगितला नाहीं.' असें शंकरराव पृ० २१० मध्यें लिहितात. त्यांनीं जो काल काढिला आहे तो पंचसिद्धांतिका ग्रंथांत गणितांत जें आरंभवर्ष घेतलें आहे, त्यावरून. या ग्रंथाचा कर्ता तोच बृहज्जातकाचा कर्ता आहे कीं काय हा एक प्रश्नच आहे. तथापि तोच आहे अशी कल्पना केली तर कोणत्या अडचणी येतात पहा—

भा० ज्यो० पृ० १५६ मध्यें जो श्लो० आहे, तो असा—

सप्ताब्धिवेद (४२०) संख्यं शककालमपास्य चैत्रशुक्लादौ ॥ अर्कास्तमिते भानौ यवनपुरे भौमदिवसाद्यः ॥ ८ ॥

या आर्येत शककालाचीं ४२७ वर्षे असें ह्मटलें आहे. 'शककाल' याचा अर्थ शंकररावांनीं शालीवाहन शक असा केला आहे. आणि त्यावरून वराहमिहिर हा शालीवाहन शके ४२७ तला असें ठरविलें आहे. शककाल ह्मणजे शालिवाहन शक असा अर्थ होत नाहीं, हें उघड आहे. याचे दोन अर्थ संभवतात. एक शक या नांवाच्या राजाचा व दुसरा शक जातींच्या राजांचा. यापैकीं कोणताही अर्थ घेतला तरी मुख्य गोष्टीला बाध येत नाहीं.

वराहमिहिर बृहत्संहितेंत ह्मणतो—

आसन्मघासु मुनयः शासति पृथ्वीं युधिष्ठिरे नृपतौ ॥ षट्त्रिकपंचद्वि (२५२६) युतः शककालस्तस्य राज्ञश्च ॥

अर्थ.—युधिष्ठिर राजा पृथ्वीचें राज्य करीत० असतां सप्तर्षि मघा नक्षत्रीं होते. व त्यावेळीं शककाल २५२६ होता.

इक्ष्वाकूच्या शिलालेखांत हाच काल २५२४ आहे. उभय कालांत २ वर्षांची चूक आहे. परंतु या दोहोंच्या सांगडीनें इतकें सिद्ध आहे कीं, शककाल ह्मणजे तो शालीवाहन शक नव्हे. कलीचीं ३४९ वर्षे गत झाल्यावर शक राजांचा काल सुरू झाला व

नंदाद्रींदुगुणास्तथा नृपशकस्यांते कलेर्वत्सराः ॥

सि० शि०

ह्मणजे ३१७९ कलीचीं वर्षे झालीं तेव्हां जुन्या शक जातीच्या राजांचा काल संपून शालिवाहनाचा काल सुरू झाला. यावरून उघड आहे कीं वराहमिहिर हा शालिवाहन शकांतला नाहीं. ४२७ हा शककाल आहे. ह्मणजे तो शालिवाहनाच्या पूर्वी सुमारें २४०० वर्षांच्या सुमाराचा आहे.

कै० वा० विसाजी रघुनाथ लेले यांनीं इक्ष्वाकूच्या शिलालेखाच्या आधारें पांडवकाल शकापूर्वी ५३०६ येतो असें गणितानें सिद्ध करून कै० केरूनाना छत्रे यांस दाखविलें होतें व तें बरोबर आहे, असा त्यांचा शेराही घेतला होता. भारतांतली गृहस्थिति याच शकाला अनुसरून दिलेली आहे व ती सायननिरयन अशी दुहेरी आहे असें त्यांनीं सिद्ध केलें आहे.

तें शंकररावांस मान्य नाहीं व त्यांनीं त्यावर आक्षेप घेतले आहेत. या आक्षेपांस रा० भिकाजी महादेव पेंडसे बी. ए. यांनीं सणसणीत उत्तर दिलें आहे, तें वाचावें.

वा विराहमिहिरानें बृहज्जातकांत जे नाभसयोग दिले आहेत, ते त्याचे स्वतःचे नसून पूर्वीच्या आचार्यांचे आहेत. त्यांतील वज्र नामक योग पहा. वा योगांत बुध आणि शुक्र हे रवीपासून चतुर्थ राशीवर असावे या बद्दल वराहमिहिरास आश्चर्य वाटून तो ह्मणतो.— पूर्वशास्त्रानुसारेण मया वज्रादयः कृताः चतुर्थे भवने सूर्याज्ज्ञसितौ भवतः कथम् ॥—बुध आणि शुक्र हे ग्रह सूर्यापासून चतुर्थ स्थानीं कसे जातील! सांप्रतच्या भूमध्यस्थ पद्धतींत असें होणें अशक्य आहे. ह्मणून वराहाच्यावेळीं हल्लींचीच भूमध्यस्थ पद्धति असली पाहिजे असें सिद्ध होतें. त्यापूर्वी फार प्राचीनकाळीं रविमध्यस्थ पद्धति असली पाहिजे. रविमध्यस्थ पद्धतीचे पुरावे अलीकडील अत्यंत प्रचारांत असलेले ग्रंथ जे जातकाभरण व जातकालंकार यांत आहेत व ते कुंडलीविज्ञानाच्या वर्गणीदारांस अवगत आहेत, ही पद्धति सायनच असली पाहिजे. निरयन संभवत नाहीं. ह्मणून असें सिद्ध होऊ पाहते कीं वराहाच्या वेळीं असो किंवा नसो, पण त्याच्यापूर्वी तरी सायनपद्धति असलीच पाहिजे. अर्थात् जातकतत्वें हीं मूळचीं सायन मानाचीं च असलीं पाहिजेत.

वराहमिहिरसुद्धां सायनच होता, असें एका बळकट पुराव्यावरून दाखवितां येतें. बृहत्संहितेत तो ह्मणतो.—

आश्लेषार्धादक्षिणमुत्तरमयनं रवेर्धनिष्ठाद्यं ॥ नूनं कदाचिदासीद्येनोक्तं पूर्वशास्त्रेषु ॥ १ ॥ सांप्रतमयनं सवितुःकर्कटकाद्यं मृगादितश्चान्यत् ॥ उक्ताभावो विकृतिः प्रत्यक्षपरीक्षणैर्व्यक्तिः

पूर्वी आश्लेषांच्या अर्धावर दक्षिणायनाचा व धनिष्ठांच्या आरंभीं उत्तरायणाचा आरंभ होत असे असें जें वेदांगज्योतिषांत सांगितलें आहे तें कदाचित् त्यावेळीं खरें असेल. पण सांप्रत कर्क राशीच्या आरंभीं दक्षिणायन व मकर राशीच्या आरंभीं उत्तरायण होत आहे. प्रत्यक्ष पाहून खात्री करून घ्या असें बजावून सांगतों.' या त्याच्या ह्मणण्याचा विचार केला तर त्याच्या वेळीं सायन पद्धतीच असली पाहिजे,

असें स्पष्ट होतें. सायन कर्क राशीच्या आरंभींच दृष्टीनें दिसणारें दक्षिणायन सुरू होतें. सायन मकर राशीच्या आरंभींच उत्तरायण सुरू होतें. वरील श्लोकांतील कर्क व मकर हे निरयन राशि आहेत असें जर कोणाचें ह्मणणें असेल तर चुकीचें आहे. शके ४४४त अयनांश शून्य होते, ह्मणजे संपात रेवतींत होता. वराह शके ४२७ तला आहे. ह्मणजे त्यावेळीं अयनांश १७ कला धन असले पाहिजेत ह्मणजे त्याच्यावेळीं संपात निरयन विभागात्मक अश्विनींत १७ कला होता. ह्मणून उत्तरायण उत्तराषाढांच्या दुसऱ्या चरणाच्या आरंभीं न होतां तें दुसऱ्या चरणाच्या १७ कलांवर पूर्वीच झालें पाहिजे. व तसें असतें तर त्यानें 'मृगादितः' असें ह्मणावयास नको होतें. त्याचप्रमाणें दक्षिणायन 'कर्कटकाद्यं' असें ह्मणावयास नको होतें. कारण निरयन कर्क राशीचा आरंभ पूनर्वसूंच्या चवथ्या चरणाच्या आरंभींच आहे. पण दक्षिणायन होणार चवथ्या चरणाच्या १७ कलांवर! अर्थात् वराहमिहिराचे राशि निरयन नसून सायन आहेत हें सिद्ध.

वेदांगज्योतिषांतील अयन व वराहाचें तेंच अयन यांत २३ अं. २० कलांचें अंतर आहे. ५० विकला अयनगति धरून इतकें अंतर आहे. ५० विकला अयनगति धरून इतकें अंतर पडण्यास १६८० वर्षे पाहिजेत. ह्मणून वराहाचा काल व वेदांगज्योतिष्याचा काल यांत इतकेंच अंतर पाहिजे. पण वराह इ० स० ४२७+७८=५०५ तला व त्यापूर्वी १४८८ वर्षे वेदांगज्योतिष. ह्मणजे उभयतांत १९९३ अंतर झालें! तीनशें वर्षांची चूक ही क्षम्य आहे काय!

तात्पर्य वराह शालिवाहन शकांतला नाहीं, व तो निरयन पक्षही मानीत नाहीं, हें सिद्ध आहे. अशा ग्रंथकाराचें बृहज्जातक सायनच असलें पाहिजे. व त्यानें इतर ग्रंथकारांचा अनुवाद केला असल्यामुळें त्यांचेही ग्रंथ सायनच असले पाहिजेत. वराहानंतरचा ग्रंथकार ब्रह्मगुप्त सायनच होता, असें दीक्षितांनींच सिद्ध केलें आहे. गर्ग सायन होता, असें चिटणीसांनीं सिद्ध केलें आहे. पांडवकालीं

*

सायनमान होतें असें लेल्यांनीं सिद्ध केलें आहे. सारांश शके ४४४च्या मागें सायनवांचून कोणी आढळणार नाहीं. निरयन विभागात्मक नक्षत्रांची कल्पना मागाहूनची आहे. तिला कोणताही आधार मिळणें शक्य नाहीं. असें जर आहे तर कोणत्या पद्धतीच्या मुहूर्तावर धर्मकृत्यें केलीं असतां इष्टफलप्रद होतील, हें सांगितलें पाहिजे काय? याचप्रमाणें जातकांचीं तत्वें फार प्राचीन असून तीं सायन पद्धतीनेंच फलांचा अनुभव देणारीं आहेत. अनुभवावरून कोणती पद्धति खरी हें सिद्ध होणार नाहीं. अनुभव दोन्ही पद्धतीचा मिळेल. अनुभव येणें ही गोष्ट निराळी आणि फलें वर्तविणें हें जातकतत्वांस अनुसरून अथवा ही गोष्ट वेगळी. एकाद्याच्या लग्नीं ग्रह असतां तो अमुक फल देतो, हें दोन्ही पक्ष एकच सांगेल. पण तो अमुक राशींत आहे, म्हणून त्या राशीचे जे नैसर्गिक गुण आहेत त्या गुणांस अनुरूप असें तो फल देईल. या फलांचीं तुलना करण्यास सूक्ष्म निरीक्षण शक्ति पाहिजे. फलें सांगण्याच्या पद्धति अनेक आहेत. त्यांतील कित्येकांचा सायननिरयनांशीं संबंध देखील नाहीं अशा पद्धतीचीं सुद्धां फलें अनुभवास येतात. यासाठीं फलांवरून कोणती पद्धति खरी हें ठरविणें फार कठीण आहे. आम्हीं म्हणतों कीं, प्रथम शास्त्रीय व ऐतिहासिक अशा पुराव्यांनीं निरयन पक्ष खरा आहे असें सिद्ध करा आणि नंतर फलानुभव पहा. सायनपद्धतीनें जशीं कांहीं फलें चुकतात तशींच निरयन पद्धतीनेंही चुकतात. व ज्याप्रमाणें निरयनपद्धतीनें एखादी अचूक गोष्ट सांगतां येते, तशीच सायनानेंही येते. एकाद्या प्रसंगीं सायनानें सर्व फलें चुकतील तर दुसऱ्या एखाद्या प्रसंगीं निरयनानेंही चुकतील. त्यामुळें जो कोणी या मार्गानें खऱ्याखोट्याचा निर्णय करूं पाहील त्यास कशाचाच थांग लागणार नाहीं. फलें सांगण्यास ग्रंथ पुरेसे नाहींत. लक्षणें अनुभवानें बांधावीं लागतात. त्यामुळें ज्याचा अनुभव अधिक तो ज्योतिषी श्रेष्ठ गणला जाईल. यांत पद्धतीचा संबंध नाहीं. पद्धतीचा बारकावा अनुभवांशीं ताडून पाहतां येतो, पण तो सर्वांस साधणारा नाहीं. वडाची साल पिंपळास लावून अनुभव जुळविणारेच पुष्कळ आहेत व त्या सर्वांस सांभाळून घेणारे ज्योतिषग्रंथही आहेत. त्या ग्रंथांत अनेकांचीं अनेक मतें असल्यामुळें प्रसंगानुसार त्यांतील एखादें मत अनुभवाशीं पटतें! पण हा कांहीं खरा मार्ग नव्हे.

विधान ३ रें.—सायन नक्षत्रें काल्पनिक आहेत व चल आहेत, करितां तीं नक्षत्रें या नांवाला योग्य नाहींत. ज्या नक्षत्रांवरून ग्रंथांत फलें सांगितलीं आहेत तीं हीं नव्हत हें उघड आहे. त्यांना शास्त्राचा आधार आहे, हें म्हणणें ठीक नाहीं.

उत्तर.— मागें जें विवेचन केलें आहे, त्यांत नक्षत्र हा शब्द व्यर्थ आहे असें सांगितलें आहे. सायन नक्षत्रें जर काल्पनिक तर निरयन सुद्धां काल्पनिकच आहेत. आतां हीं चल आहेत इतक्यावरून जर प्रो० आपटे नाक मुरडीत असतील तर त्यांस भा. ज्यो. पृ. १३० उघडण्याची विनंति करितों. त्यांत 'तस्मान्न नक्षत्र आदधीत' असें सांगितलें आहे. म्हणजे नक्षत्रावर आधान करूं नये. असें सांगितलें आहे. आणि त्याच शतपथाच्या पूर्वभागांत नक्षत्रावरच आधान सांगितलें आहे. या दोन परस्पर विरोधी मतांचीं काय व्यवस्था निरयन पक्ष करील बरें? शतपथब्राह्मणांत नक्षत्रें व उपनक्षत्रें २७ असेंही सांगितलें आहे. (भा. ज्यो. इ. पृ. ५४) त्यांचा अर्थ काय?

पुण्यदां राशिसंक्रांतिं केचिदाहुर्मनीषिणः ॥
नैतन्मम मतं यस्मान्न स्पृशेत्क्रांतिकक्षया ॥
वसिष्ठः

चलसंस्कृत तिग्यांशोः संक्रमो यः स संक्रमः ॥
नान्योऽन्यत्र च तत्क्षेत्रं नैति तत्क्रांतिकक्षया ॥
शाकल्यसंहिता अ. ३

यांत राशिसंक्रांति म्हणजे निरयन संक्रांति असा [पृ. ४२३ मध्यें] अर्थ केला आहे. परंतु तो धडधडीत चुकीचा आहे. कारण राशिसंक्रांति या क्रांतिवृत्ताला स्पर्श करीत नाहींत अशा आहेत. निरयनसंक्रांती क्रांतिवृत्ताला स्पर्श करतात. हा विरोध ज्यांच्या ध्यानांत येत नसेल, त्यांचें

डोकें खरोखरीच पक्षाभिमानानें वेडें झालेलें असलें पाहिजे ! या दोन संहिताग्रंथांत चल [सायन] राशींचेंच प्राधान्य सांगितलें आहे. राशि संक्रांति ह्मणजे संपातापासून विषुवाचे जे १२ भाग त्यांपैकीं प्रत्येक भागास राशिसंक्रांति ह्मणतात. कोणत्याही महावृत्ताचे १२ भाग ह्मणजे राशि व २७ भाग ह्मणजे नक्षत्र ही परिभाषा आहे. निरयन पक्ष सुद्धां हीच परिभाषा वापरतो. १३ अं० २० क० ह्मणजे नक्षत्र ही परिभाषा उभय पक्षाची आहे. याच परिभाषेला अनुसरून सायन नक्षत्रें आहेत, मग तीं चल आहेत सबब नापास असें कसें ह्मणतां येईल ? हीं जरी काल्पनिक असलीं तरीं तीं आजचीं नाहींत. त्यास हजारों वर्षे लोटून गेलेलीं आहेत. जातकाचीं किंवहुना कोणत्याही फलितस्कंधाचीं तत्वें याच नक्षत्रांस अनुसरून आहेत यांत तिलप्राय शंका नाहीं. हल्लींचा निरयन विभागात्मक नक्षत्रांचा हा तिसराच पंथ आहे. व तो निरयनगणनेनंतरचा आहे. पूर्वी दोनच पंथ होते. एक तारकात्मक नक्षत्रें व दुसरा सायन नक्षत्रें. भारतकालीं दुहेरी पध्दति होती. ह्मणजे प्रत्येक ग्रहाची स्थिति तारकात्मक व सायनविभागात्मक नक्षत्रांवरच सांगितलेली आहे. फार लांब कशाला ? वेदांगज्योतिषाचा काल काढितांना दीक्षितांनीं "धनिष्ठांच्या आरंभीं उदगयन दोन असे ह्मणजे काय ? धनिष्ठांचें कांहीं तरी कल्पित जें स्थान त्या स्थानाजवळ चंद्र येई तेव्हां उदगयन होत असे असें कसें ह्मणतां येईल ? आणि अश्विन्यादि धनिष्ठांचा आरंभ हें कल्पितच स्थान होय." या प्रमाणें निरयन नक्षत्रांला स्पष्टपणें कल्पित ह्मटलें आहे. प्रो० आपटे हे सायन नक्षत्रांस कल्पित ह्मणतात, पण निरयन नक्षत्रें सुद्धां कल्पितच आहेत. ह्मणून दीक्षितांनीं धनिष्ठा ताऱ्यापासून उदगयन होत असे असा अर्थ धरून काल काढिला. पण आश्लेषांच्या अर्धापासून दक्षिणायनाची प्रवृत्ति होत असे असें जें वेदांगज्योतिषांत आहे, त्याचा अर्थ काय करावयाचा याचा विचार दीक्षितांनीं केला नाहीं. आश्लेषा जर तारकात्मक असतील तर त्यांचें अर्ध ह्मणजे काय ? अर्थात् या ठिकाणीं आश्लेषा विभागात्मकच असल्या पाहिजेत. आश्लेषांच्या अर्धापासून धनिष्ठांच्या आरंभापर्यंत बरोबर १८० अंश अंतर आहे. ह्मणून वेदांगज्योतिषांतील नक्षत्रें विभागात्मकच आहेत. परंतु या नक्षत्रांचा संबंध क्रांतिवृत्ताशीं नाहीं. ह्मणून तीं विभागात्मक स्थिर नक्षत्रें आहेत. व ते

विषुवाचे भाग आहेत. सारांश हल्लीं ज्याला निरयन विभागात्मक नक्षत्रें ह्मणतात, त्यांचा शके ४४४ च्या पूर्वी मागमूसही लागणें शक्य नाहीं.

पारिभाषिक शब्दांचे अर्थ मूळ अर्थाहून निराळे असतात. व्याकरणांत क्रियापद ज्याला ह्मणतात, त्या शब्दाचाच अर्थ पाहिला तर मेल्यानंतर जी क्रिया करितात, त्या क्रियेचें स्थान तें क्रियापद असें एखाद्या मुलानें उत्तर दिल्यास चालेल काय ? आतां इतकी गोष्टमात्र आह्मांस कबूल आहे कीं क्रांतिवृत्ताचे अगर विषुवाचे २७ भाग करून त्यास नक्षत्र ह्मणण्याची ती कल्पना निघाली असेल. पण तितक्यावरून सायन नक्षत्रें चल आहेत ह्मणून तीं नक्षत्रें या नांवाला योग्य नाहींत हा कांहीं निरयन पक्षाचा पुरावा नव्हे, हें खास.

विधान ४ थें.—यांतील अमुकच पद्धति ग्राह्य व बाकीच्या त्याज्य हें ठरविणें ह्मणजे साहस आहे. ज्याला ज्या पद्धतीचा अनुभव आला त्याला तीच खरी वाटते, व दुसऱ्या पद्धतीचा त्यानें चांगलासा अनुभव घेतला नसतो एवढ्याच कारणाकरितां ती खोटी असें तो केवळ पक्षाभिमानानें ह्मणतो. त्याजवळ सबळ असा पुरावा कांहीं नसतो.

उत्तर.—केवळ जातकासंबंधानेंच विचार केला तर पुढीलप्रमाणें फलिताच्या पद्धति आह्मांस माहीत आहेत. त्या अशा.—

१ मध्यमग्रहपद्धति
२ भूमध्यग्रहपद्धति
३ सूर्यमध्यस्थग्रहपद्धति
४ जैभिनीयपद्धति
५ केरलपद्धति
६ अष्टकवर्गपद्धति
७ रश्मिफलपद्धति
८ रमलपद्धति
९ ताजकपद्धति

या सर्वांत सूर्यमध्यस्थ ग्रहपद्धति फार प्राचीन आहे, असें मागें सिद्ध केलें आहे. त्यानंतर कांहीं कालपर्यंत मध्यम मानाचे ग्रह घेऊन फलें सांगत असत, असा दाखला मिळतो. सांप्रत भूमध्यस्थ पद्धति आहे. या सर्व पद्धतींचीं तत्वें एकच आहेत. फक्त ग्रह घेण्यांत फरक आहे. या तिन्ही पद्धतींच्या मिश्रणाचेच बहुतेक ग्रंथ आहेत. हें मिश्रण इतकें बेमालूम झालें आहे कीं, त्यांतले अमुक

योग अमुक पद्धतीचे आहेत, हें सांगतां येत नाहीं. या पद्धतींतही आणखी कांहीं गोष्टी मिश्र झाल्या आहेत. जसें— तात्कालिकग्रहपद्धति गुलिक, प्राणपद, धूमादि अप्रकाश ग्रह, जागृतादि अवस्था, दीप्तादि अवस्था, बालादि अवस्था, प्रवासादि अवस्था, लज्जितादि अवस्था, शयनादि अवस्था, बेचाळीस प्रकारच्या दशा, केशवीचीं बलें काढण्याची पद्धति इतक्या गोष्टी मिश्र झाल्या आहेत. ज्योतिषी लोक ह्या सर्व एकच मानितात. ते सर्व गोष्टींचा संग्रह पत्रिकेंत करितात. जैमिनीय पद्धतींतीलही कांहीं गोष्टी मिश्र झाल्या आहेत. अष्टकवर्ग पत्रिकेंत असतातच. या सर्व पद्धति खोट्या आहेत, असें कुंडलीविज्ञानकर्ता ह्मणत नाहीं. प्रत्येक पद्धति आपआपल्या दृष्टीनें खरीच असेल. पण ज्योतिष्यानें या सर्व पद्धतींचा स्वीकार करून फलें सांगावीं कीं काय हा मुख्य महत्वाचा प्रश्न आहे. अमुक ठिकाणीं किंवा अमक्या प्रसंगीं अमकी पद्धति विचारांत घ्यावयाची असें कोठें ठरलेलें आहे, असें वाटत नाहीं. त्याचप्रमाणें सर्वांत एकवाक्यता आहे, असें दिसत नाहीं. या पद्धति एखादा अनुभव जुळवून देण्याच्या कामीं मात्र उपयोगीं पडतात. विंशोत्तरींत अनुभव न जमला तर अष्टोत्तरींत तरी जुळतोच. एखाद्या ग्रहाचें फल जुळलें नाहीं कीं 'अहो तो वृद्ध आहेना?' असें ह्मणण्यास सधि मिळते या गोष्टी विचारणीय आहेत, वैद्यकांत आर्यवैद्यक, हाकिमी इलाज, पाश्चिमात्य ॲलोपथी, होमिओपथी, इलिक्ट्रो होमिओपथी, क्रोमॉपथी व आणखी इतर पंथ प्रचारांत आहेत. व प्रत्येक पंथाचे अनुयायांजवळ गुणाच्या सर्टिफिकिटाही आहेत या गोष्टी खऱ्या आहेत. पण कोणता रोगी व कोणता रोग कोणत्या उपायानें निखालस बरा होईल हें ठरवून त्यावर त्याच पंथाचे उपाय करावे लागतील असें वाटतें. एखाद्याच्या छातींत गोळी लागली आहे, किंवा एखाद्याचा पाय मोडला आहे, किंवा एखाद्याला भयंकर अवाळू झालें आहे, तर त्या रोग्यानें कोणत्या पंथाचे इलाज करावे बरें? काळपुळीसारख्या रोगांवर व विषारी जनावरांच्या विषांवर जंगली वनस्पतीच गुणावह होतात हें

सर्वत्र प्रसिद्ध आहे. आमच्या प्रांतांत विंचू, कांडर, मणेर, फुरसें सर्प इ० प्राणघातक जनावरें पुष्कळ आहेत. त्या जनावरांनीं कोणास दंश केला तर प्रथम मंत्र्याला बोलावतात इकडे असे मंत्री आहेत कीं, ते चावलेलें जनावर रोग्याच्या अंगांत खेळवितात व त्याजकडून शपथ घेऊन विषार उतरवितात. हा अनुभव कुंडलीविज्ञानकर्त्यांनीं स्वतः घेतला आहे. व ज्या कोणास घेणें असेल तो जर एक वर्ष इकडे राहील तर त्यालाही केव्हांतरी घेण्याचा प्रसंग येईल. महाड येथें सरकारी दवाखाना आहे. गांवांत १।२ चांगले डॉक्टर ही आहेत, वैद्यही बरेच आहेत. तथापि त्यांनीं आजपर्यंत एकही रोगी उतरल्याचें ऐकिवांत नाहीं. त्यांस या बाबतींत कोणीसुद्धां विचारीत नाहींत. सारांश अनेक पद्धति जरी आहेत, तरी त्यांचा सार्वत्रिक उपयोग होत नाहीं व कोणीही करीत नाहीं. ज्योतिःशास्त्रांतल्या पद्धतीचेही असेंच आहे. कांहीं गोष्टी तात्कालिक ग्रहपद्धतीनें पहावयाच्या आहेत, कांहीं गुलिकानें तर कांहीं प्राणपदानें याप्रमाणें निरनिराळ्या पद्धति निरनिराळ्या कारणासाठीं आहेत. त्यांचा सबगोलकार करणें शहाणपणाचें नाहीं, इतकेंच आमचें ह्मणणें.

सायन निरयन या दोन पद्धति मानणें आह्मांस प्रशस्त वाटत नाहीं जातक किंवा गणित, संहिता, मुहूर्त आणि धर्मशास्त्र यांत राशि, नक्षत्रें व ग्रह सायन आहेत कीं निरयन आहेत हा या उभय पक्षांत वाद आहे. फलें पाहण्याची उभयतांची पद्धति एकच आहे. ह्मणून हा वाद प्राचीन ग्रंथांच्या पुराव्यानेंच मिटावयाचा आहे. जातकतंत्रें सायनानुसार आहेत, असें आह्मीं ह्मणतों, ह्मणून निरयन पक्ष ग्राह्य नाहीं असें ह्मणण्यांत साहस नाहीं. सायन पक्षाचा आह्मांस अनुभव आला आहे, ह्मणून तो पक्ष खरा असें आह्मीं कोठेंही प्रतिपादन केलें नाहीं. फलानुभवावरून पक्ष सिद्ध करण्याचा आमचा प्रयत्न नाहीं तर सायनपक्ष खरा आहे, असें प्राचीन ग्रंथांच्या ऐतिहासिक पुराव्यानें प्रथम सिद्ध करून घेऊन नंतर जर हा पक्ष खरा आहे, तर या बाजूलाही अनुभव मिळाला पाहिजे व तो निरयनपेक्षां जास्त मिळाला पा-

हिजे असें आमचें ह्मणणें आहे. ज्याप्रमाणें जैमिनीय पद्धति किंवा केरल वगैरे पद्धति आहेत, तशीच जर निरयन ह्मणून एक पद्धति असती तर तिला खोटी असें ह्मह्मणण्याचें साहस सायनपक्षानें केलें नसतें. आह्मी जिला खोटी ह्मणतों तिला आमच्या प्राचीन ग्रंथांचा आधार नाहीं. असेल तर कोणी दाखवावा.

विधान ६ वें.—राशि मागून आल्या. भारतांत व वेदांत त्या नाहींत. त्यांची सांगड नक्षत्रांशीं घातली आहे ती अश्विन्यादि गणनेनंतरची आहे. त्यापूर्वी कृत्तिकादि गणना होती हें सर्वसंमत आहेच.

उत्तर.—भारतांत व वेदांत राशि नाहींत, ह्मणून त्या मागून आल्या, हें दीक्षितांनीं आपल्या ग्रंथांत विधान केलें असून त्यास भिकाजी महादेव पेंडसे यांनीं उत्तर दिलें आहे. हें उत्तर स्वतंत्रपणें छापलेलें असून आमच्याकडे विक्रीस तयार आहे. तें वाचावें अशी विनंति करितों. हें पुस्तक वाचल्यानंतर जर वरील विधानाचें मिथ्यत्व सिद्ध होणार नाहीं तर मग त्याचा विचार करितां येईल.

प्रो० आपटे यांच्या निरयनमताची इमारत मुख्य तीन गोष्टींच्या पायावर उभारलेली आहे. १ वैदिक कालचीं नक्षत्रें तारकारूप आहेत. २ भारतांत व वेदांत राशि नाहींत, त्या मागाहून आल्या. ३ पूर्वी कृत्तिकादि गणना होती. वैदिक कालचीं नक्षत्रें तारकारूप असतील. पण तितक्यावरून जातकांतलीं नक्षत्रें तारकात्मकच असलीं पाहिजेत असें कसें सिद्ध होईल? निरयन विभागात्मक आहेत असें तरी कसें ह्मणावें? आमचें ह्मणणें एक तर तीं तारकात्मक तरी असतील किंवा विभागात्मक असतील तर तीं सायनच असतील. या संबंधानें शतपथ ब्राह्मणांतला जो पुरावा दिला आहे तो विचार करण्यासारखा आहे. तेव्हां निरयन पक्षावर तो पुरावा खोटा आहे असें सिद्ध करण्याची जबाबदारी सहजच येते. जातकग्रंथांत नक्षत्रांवर गृहस्थिति क्वचित्च सांगितलेली असेल. अमुक ग्रह अमुक स्थानांत व अमुक राशींत असतां अमुक फल देतो असेंच सर्वत्र आढळतें. अमुक स्थानांत अमुक नक्षत्रांत असतां अमुक फल देतो, असें जातक ग्रंथांत सांगितलेलें आढळत नाहीं. ह्मणून जात-

काचा विचार करणारांनीं किंवा कुंडली मांडून तीवरून कोणतेंही फल सांगणारांनीं नक्षत्रांचा विचार करावयासच नको. व कोणी करीतही नाहीं, असें वाटतें. जातक पद्धति राश्यनुसार आहे. व राशि सायन आहेत, निरयन नाहींत ही गोष्ट कोणाही विचारी पुरुषास कबूल केलीच पाहिजे. राशि मागाहून प्रचारांत आल्या आहेत, हें ह्मणणें काय उपयोगाचें? आजची पद्धति राश्यनुसार आहेनां? ती सोडून द्यावयाची काय? ती सोडून देण्यास ज्योतिषी तयार होईल पण धर्मशास्त्र कोण फिरवणार? त्या आतां धर्मशास्त्रांत गुरफटून गेल्या आहेत. ह्मणून राशींवर सांगितलेलीं धर्मकृत्यें सायन राशींवरच केलीं पाहिजेत. तरच तीं फलदायक होताल. निरयन राशींवरचीं कृत्यें धर्मबाह्य आहेत. भा. ज्यो. इ. पृ. १३८ पहा. 'अश्विन्यादि गणना आली कोठून' असें ह्मणणारे शंकरराव या पृष्ठांत ह्मणतात— 'मेषादि संज्ञा प्रथम तारकापुंजांच्या आकृतिविशेषांवरून पडल्या कीं काय या विषयीं वाद आहे. त्या परदेशांतून आल्या असल्या किंवा मूलच्या आमच्या असल्या तरी आकृतींशीं त्यांचा संबंध दिसत नाहीं. अश्विनी भरणी आणि कृत्तिकांच्या कांहीं तारा मिळून मेषाची (मेंढ्याची) आकृति होते असें कांहीं नाहीं. राशीक्रमांत मेष प्रथम आहे, आणि अश्विनी नक्षत्रापासून त्याचा आरंभ आहे. नक्षत्रगणना अश्विनीपासून प्रचारांत येण्यापूर्वी कृत्तिकादि गणना होती तशी मेषाखेरीज इतर राशीपासून राशिगणना करण्याचा व मेषारंभ अश्विनीखेरीज इतर नक्षत्रीं असल्याचा उल्लेख कोठेंच नाहीं. मेषादि संज्ञा वेदांगज्योतिषापूर्वी नव्हत्या हें निःसंशय आहे. तेव्हां मेषारंभीं आणि अश्विनीच्या आरंभीं वसंतसंपात होता, त्यानंतर केव्हां तरी त्या संज्ञा प्रचारांत आल्या असें सहज सिद्ध होतें.'

निरयन पक्षाचें समर्थन करणारे जे जे कोणी असतील ते ते सर्व शंकररावांप्रमाणेंच ह्मणणार यांत शंका नाहीं. मेषादि संज्ञा आकृतींवरून पडलेल्या नाहींत, हें शंकररावांस कबूलच आहे. ह्मणून त्या विभागात्मकच आहेत हें उघड आहे.

*

आतां, ह्या सायन आहेत कीं निरयन आहेत, तें पाहूं. कुंडलीविज्ञानच्या गेल्या ३ ऱ्या अंकांत सूर्यसिद्धांतांतील वचन दिलें आहे, त्यावरून राशि सायनच आहेत असें ठरविलें आहे. आतां, त्याच ग्रंथांतील आणखी वचनें पहा.—

भचक्रनाभौ विषुवद्द्वितीयं समसूत्रगं ॥ अयनद्वितयं चैव चतस्रः प्रथितास्तु ताः ॥ ७ ॥ तदंतरेषु संक्रांतिर्द्वितयं द्वितयं पुनः ॥ नैरंतर्यात् तु संक्रांतेर्ज्ञेयं विष्णुपदीद्वयं ॥ ८ ॥ भानोर्मकरसंक्रांतेः षण्मासा उत्तरायणं ॥ कर्कादेस्तु तथैवस्यात् षण्मासा दक्षिणायनं ॥ ९ ॥

मानाध्याय.

यांतील कर्क, मकर इ० संक्रांति सायनच घेतल्या पाहिजेत.

द्विराशिनाथा ऋतवस्ततोपि शिशिरादयः ॥ मेषादयो द्वादशैते मासास्तैरेव वत्सरः ॥१०॥

अर्थ—ह्या मकरापासून दोन दोन राशींचे शिशिरादि ऋतु होत. हे मेषादि बारा मास होत. त्यांनी वर्ष होतें.

शंकरराव भा० इ० पृ० ४१९ मध्यें याच वचनांवरून लिहितात, "यांत १२ मासांचा एक ऋतुपर्वय आणि तेंच एक वर्ष असा अर्थ आहे. यावरून सायनमान सूर्यसिद्धांतास तत्वतः ग्राह्य आहे." सूर्यसिद्धांतास जें मान्य तेंच विष्णुपुराणादिकांस मान्य आहे. राशि निरयन घ्याव्या असें शके ४४४ च्या पूर्वीचा एकही ग्रंथ प्रतिपादन करीत नाहीं. मग आमचें जातक सायन आहे कीं निरयन आहे?

राशि सायन आहेत हें सिद्ध झालेंच आहे. व जर त्यांची गणना मेष राशीपासूनच व अश्विनीपासूनच नक्षत्र गणना आहे, असें ग्रंथ सांगतात तर विभागात्मक नक्षत्रेंही सायनच आहेत असें सिद्ध होतें. सायन राशि व विभागात्मक निरयन नक्षत्रें यांची सांगड कशी बसणार? वेदांत नक्षत्रें कृत्तिकादि आहेत व भारतांत श्रवणादि आणि धनिष्ठादि नक्षत्रें सांगितलीं आहेत. त्यावरून वैदिक कालीं कृत्तिकांत संपात असला पाहिजे असें शंकररावांनीं व लोकमान्य टिळकांनीं गृहीत घेऊन त्यावर आपल्या ग्रंथांची इमारत रचली आहे. पण गृहीत घेण्यास कशा अडचणी आहेत पहा.—

कृत्तिकांत संपात होता ह्मणून जर कृत्तिकादि गणना होती, असें ह्मणावयाचें तर भरणींत संपात असतां भरण्यादि गणना, अश्विनींत संपात असतां अश्विन्यादि गणना, रेवतींत संपात असतां रेवत्यादि गणना अशा कांहीं गणना पूर्वपक्षानें असल्याचें दाखवावयास नको होतें काय? प्रो० आपटे यांस आमची अशी विनंति आहे कीं, जर अशा कांहीं गणना आपणांस माहीत असतील तर मेहेरबानीनें प्रसिद्ध कराव्या. गुप्त ठेवूं नयेत. हीच पद्धति खरी मानिली तर सांप्रत उत्तराभाद्रपदादि गणना कां नाहीं? जर संपातानुसार नक्षत्रांची गणना असती तर कृत्तिकांपासून पुढील परंपरा खात्रीनें दृष्टीस पडती. तशी जर आढळत नाहीं, तर वैदिक कालीं तेवढी होती हें ह्मणणें कसें शोभेल? वे० शा० सं० काशीनाथ वामन लेले वाईकर धर्मकर्ते यांनीं धर्माच्या ५ व्या वर्षाच्या ५ ते ७ अंकांत पृ० १११ व ११२ मध्यें काय लिहिलें आहे तेंही विचार करण्यासारखें आहे. त्यांनीं रोहिणीसंबंधानें तैत्तिरीय ब्राह्मणांतील वाक्यें देऊन असें दाखविलें आहे कीं रोहिणीवर संपात असतां तैत्तिरीय ब्राह्मण ग्रंथ झाला! परंतु हें ह्मणणें निरयन पक्ष कबूल करणार नाहीं. कारण अयनांश ४० येतात! दुसरी गोष्ट त्याच ब्राह्मणांत गुरूनें पुष्य आच्छादन केल्याचा काळ केतकरांनीं इ० स० पूर्वी ४६५० दिला आहे. त्याच्याशीं रोहिणीच्या संपाताचा काळ कसा जुळेल? सारांश, या साऱ्या कल्पना आहेत. या कल्पनांनीं वैदिक काल जो अनादि आहे तो अगदीं अलीकडे मात्र येईल, आणि सर्वत्र घोटाळा उडेल.

दीक्षित ह्मणतात 'भारतांत अश्विन्यादि नक्षत्रें कोठेंच आलीं नाहींत. कृत्तिकादि नक्षत्रें आहेत. धनिष्ठादि आणि श्रवणादि नक्षत्रांचाही उल्लेख आला. आहे.' यांतील कृत्तिकादि गणना भारतकालीं दीक्षितमतानेंच नाहीं असें सिद्ध होतें. धनिष्ठादि गणना इ० स० पूर्वी १४००त होती व श्रवणादि इ० स० पूर्वी ४५०च्या सुमारास होती. दीक्षितांचा ग्रंथ वर वर वाचणारांस हें त्यांचें ह्मणणें खरें असें वाटतें. पण ज्योतिषग्रंथ ह्मणजे कांहीं कादंबऱ्या नव्हत. ते वर वर वाचून कदाचित् कोणास करमणूक होईल पण ज्ञान होणार नाहीं. ज्ञानासाठीं ते ग्रंथ समजून वाचले पाहिजेत. अशा रीतीनें जो कोणी भा. ज्यो. चा इतिहास वाचील त्यास दीक्षितांचें गौडबंगाल तेव्हांच कळेल. वेदांचा काल ठरवितांना ह्मणावयाचें कीं कृत्तिकांत संपात होता, ह्मणून कृत्तिका हें पहिलें नक्षत्र

वेदांत आहे. आणि धनिष्ठादि आणि श्रवणादि नक्षत्राच्यावेळीं ह्मणावयाचें कीं त्या नक्षत्राच्या आरंभीं उदगयन होऊं लागलें, ह्मणून तीं नक्षत्रें प्रथम झालीं! एकंदरींत पहिलें नक्षत्र अमुक ह्मणावयाचें हें दीक्षितांच्या **मर्जीवर** दिसतें असले लपंडाव करून त्यांनींच आपणांस **भ्रमिष्ट** ह्मणवून घेतलें आहे! भारतीययुद्धाचा काल शकापूर्वी १५०० पासून ३०००पर्यंत कोणता तरी आहे असें दीक्षित पृ. १२५ मध्यें ह्मणतात. वेद आणि वेदांगज्योतिष हे ग्रंथ महाभारताच्या पूर्वीचे असें तेच ह्मणतात. आणि धनिष्ठादि गणनेचा काल सांगतात इ. स. पूर्वी १४००! त्याचप्रमाणें श्रवणादि गणनेचा काल सांगतात इ० स० पूर्वी ४५०! अर्थात् काय सिद्ध होतें? भारतकालानंतर गणली जाणारी गोष्ट भारतांत कशी आली? आणि वेदांगज्योतिष भारतानंतरचें होतें त्याची वाट काय?

सारांश ही सारी लटपट आहे. या लटपटींनें अज्ञान लोक फसतात. पण तो काल आतां नाहीं. भारतांत व वेदांत जरी राशि नाहींत तरी क्रांतिवृत्ताचे १२ भाग होतेच हे भाग नामविरहित असतील काय? बरें असले तरी अश्विनी हेंच पहिलें नक्षत्र नव्हतें असें कोठें सिद्ध होत आहे? भारतांत राशि नाहींत हें खरें आहे. पण रामायणांत व इतर पुराणांत आहेत, त्यांची वाट काय? रामायण भारतानंतरचें कीं काय? शंकरराव तर ह्मणतात, मीं पुराणाविषयीं विचार करीत नाहीं. रामायणाचा विचार मीं करीत नाहीं, कारण त्यांत मेषादि संज्ञा आहेत! ठीक. आपल्या मताला जुळेल तें घ्यावें आणि न जुळेल तें सोडावें!

असो, येथपर्यंत केलेल्या वर्णनावरून राशि कधींही प्रचारांत येवोत, त्या सायन आहेत हें सिद्ध आहे. ह्मणून राशींवरून फलांचा विचार करणें तो सायनमानानेंच केला पाहिजे. निरयनमानानें करणें चुकीचें आहे. वैदिककालीं व भारतांत नक्षत्रें आहेत, तीं तारकात्मक व सायन विभागात्मक आहेत. निरयन विभागात्मक नक्षत्रांची कल्पना शके ४४४ नंतरची आहे, व ती सायन विभागात्मक नक्षत्रांवरून भ्रमाने कल्पिलेली आहे. अश्विनी, भरणी व कृत्तिकांचा पाद मिळून मेष राशि होतो. ही परिभाषा सायनाची आहे, निरयनाची नाहीं.

॥ इत्यलं ॥

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति

पुस्तक ८ वें.] मार्गशीर्ष कृ० १३ सोमवार [अंक ३३ वा

मकरसंक्रमण.

"घर्मवृद्धिरपांप्रस्थ क्षपाऱ्हास उदग्गतौ"

या वचनावरून ज्या दिवशीं दिनमान वाढूं लागतें व रात्र कमी होऊं लागते त्या दिवशीं सूर्याचें उदगयन सुरू झालें असें समजावयाचें. पंचांगांत रोजचें दिनमान दिलेलें असतें त्यावरून हा दिवस सुमाराचा कळेल. सांगलीवरून त्यापेक्षां बराच सूक्ष्म कळेल. आमच्या स्पष्ट ग्रहाच्या पुस्तकावरून तो दिवस नक्की कळेल, या पुस्तकांत ता. २२ डिसेंबर मंगळवार या दिवशीं सूर्य मकर राशीचा ०अंश ४कला ११ विकला इतका दिला आहे. हा मुंबई १२ वाजतांचा आहे. या दिवशीं रवीची गति—

ता. २३ चा रवि १-९-२०
ता. २२ " ०-४-११

१०-०

एक अंश १ कला ९ विकला आहे. ही २४ तासांची गति आहे. यावरून त्रैराशिकानें रवीला ४ कला ११ विकला जाण्यास १ तास ३८ मि. लागतील. इतका काल १२ वाजण्यापूर्वी मकरसंक्रमण झालें आहे, म्हणजे तें १० वाजून २२मि. नीं झालें आहे असें कळून येईल. केतकीपंचांगांत याच दिवशीं "उदगयनं शिशिरर्तुः ११।१२" असें लिहिलेलें आहे. म्हणजे मुं. टा. १० वाजून ४१ मि. नीं उदगयनप्रवृत्ति झाली आहे. हा फरक कां पडला तें कळत नाहीं. असो, तात्पर्य इतकेंच यीं ता. २२ डिसेंबर मंगळवार या दिवशीं उदगयन सुरू झालें आहे, या विषयीं शंका नाहीं. केतकी पंचांगांत मात्र हें खरें खरें उदगयन दिलेलें असतें. इतर सर्व पंचांगांत त्या नंतर सुमारें २३ दिवसांनीं दिलेलें असतें. निर्णयसागरमध्यें छापलेल्या व वे० चिंतामणि पुरुषोत्तमशास्त्री पुरंदरे वसईकर यांनीं तयार केलेल्या पंचांगांत ता० १३ जानेवारी १९०९ बुधवार या दिवशीं "**मकरेर्कः उत्तरायणं शिशिरर्तुः**" असें लिहिलेलें आहे. सर्व हिंदुस्थानांत हिंदुलोक हेंच मकरसंक्रमण असें समजून त्या कालचीं पुण्यकर्में करीत असतात! परंतु उदगयन समजण्यास पंचांगाचीच जरूर आहे असें नाहीं, तें प्रत्यक्ष डोळ्यांनीं दिसणारें आहे. म्हणून खरें मकरसंक्रमण कोणतें याचा निवाडा प्रत्येक मनुष्यास करितां येईल. याच पंचांगांत या दिवशीं दिनमान २७ घ० ३०पळें दिलेलें आहे. व ता० २२ डिसेंबरला २७ घ० ११ पळें आहे. म्हणजे २३ दिवसांत सुमारें १९ पळें दिनमान वाढून गेलें आहे! अर्थात् खरें उदगयन ता. २२ डिसेंबरलाच झालेलें आहे.

उत्तरायणाच्या आरंभीं सूर्य मकर राशीस जातो असें या वचनांत झटलेलें आहे. म्हणून मकर हें नांव सायन आहे. अर्थात खरें मकरसंक्रमण ता०२२ डिसेंबरलाच झालेलें आहे. ता०१३ जानेवारीचें संक्रमण खोटें व भ्रामक आहे. केतकीपंचांगकारांनीं जनसमूहास खुष ठेवण्यासाठीं ता०२२ डिसेंबरला फक्त 'उदगयनं' असेंच लिहिलेलें असून ता०१३जानेवारीला 'मकरेर्कः' असें लिहिलेलें आहे! ही अज्ञानी लोकांच्या डोळ्यांत धडधडीत धूळ फेंकली आहे असें कां म्हणूं नये? उदगयन हें मकरसंक्रमणकालींच होतें हें त्यांस माहीत नाहीं असें नाहीं, पण तसें केल्यास लोकविरुद्ध होऊन पंचांगाचा खप होणार नाहीं ही त्यांस भीति पडलेली आहे! असो- लोकांचे डोळे कधीं उघडतील ते खरे. तथापि आह्मांस अशी सूचना करणें अगत्याचें वाटतें कीं ज्यांस मकरसंक्रमणकालचें पुण्य संपादावयाचें असेल त्यांनीं खोट्या संक्रमणाची वाट न पाहतां खऱ्या संक्रमणाच्या वेळींच स्नानादि असावें. खरी वेळ निघून गेली म्हणजे 'घरातीं मागून घोडें, अशीच स्थिति होईल हें उघड आहे.

आमचे जोशी या वेळेवरून शुभाशुभ फलें सांगत असतात, पण खोटें खरें फल देईल काय, याचा वाचकांनीं विचार केला पाहिजे. जर दत असेल तर मृगजळांत सुद्धां बोटी चालूं लागल्या असें म्हणावें लागेल! जोशीबुवा संक्रातिफल ज्या वेळीं सांगावयास येतील त्या वेळीं त्याचा उलगडा करून घेऊन नंतर त्यांचें फल ऐकिलें पाहिजे. दिवसेंदिवस जग सुधारत आहे अशा स्थितींत आह्मीं इतके अज्ञानी असावें किंवा समजून उमजून डोळेझांक करावी या सारखी शरमेची गोष्ट कोणती आहे कळत नाहीं! असो .असो सायन (खऱ्या) मकरसंक्रमण कालची कुंडली मांडून तीवरून काय अनुमानें होतात तीं पाहूं.



लग्नेश गुरु हा सप्तम स्थानीं कन्येंत असून तो लग्नावर पूर्ण दृष्टीनें पाहत आहे यावरून सोनें व कांसें, हरभऱ्यांची डाळ, साखर व पिंवळे पदार्थ किंचित् सवंग होतील. तांबें, पोवळीं, मसुरा, गूळ व तांबड्या रंगाचे पदार्थ बरेच सवंग होतील. रुपें, मोतीं, तांदूळ, यांस तेजी येईल. गहूं मध्यम स्थितींत राहतील. उडीद, तेल, ज्वशी यांचा नाश होईल व त्यांस तेजी येईल. मुगांचा भाव मध्यम राहील. राष्ट्रीय पक्ष कमजोर होणार नाहीं, मवाळ आनंदांत निमग्न होतील. एकंदर सामान्य जनसमूह या अयनांत विशेष सुखी होणार नाहीं. राजकीय खळबळ जोरांतच राहील. गर्भपात विशेष होतील व गर्भही पुष्कळ राहतील. हर्शल पंचमावर पाहतो, ह्मणून बुद्धिचातुर्य विलक्षणप्रकारचें दिसून येईल. सर्वत्र शांतता राखण्याचे आटोकाट प्रयत्न होतील, पण त्यांत यश बेतायेंच मिळेल. अशा प्रकारें या कुंडलीवरून अनुमान होत आहे.

पत्रव्यवहार

[१]

मकरसंक्रमण.

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांसः—

वि. वि.—पुस्तक ८ वें अंक ३३ वा यांत पूर्वोक्त शीर्षकाखालीं आपण दिलेल्या लेखांत मकरसंक्रमणासंबंधानें केतकीपंचांगकारांनीं जनसमूहास खुष ठेवण्यासाठीं व आपल्या पंचांगाचा खप होणार नाहीं या भीतीनें मकरसंक्रमण ता० १३ जानेवारीस लिहून अज्ञानी लोकांच्या डोळ्यांत धडधडीत धूळ फेकली अशा आशयाचें आपण विधान केलें आहे. हा आपण आह्मांवर लादलेला दोष अगदीं निराधार आहे. इतकेंच नव्हे तर धूळ फेंकण्याचें काम आपणच करीत आहां या विषयीं आपल्या वाचकांची खात्री होईल या हेतूनें पुढील ओळी लिहिल्या आहेत, त्यांस स्थल मिळावें.

आकाशांत नक्षत्रें स्थिर आहेत. विषुवक्रांतिवृत्तसंपात चल आहे. या गोष्टीबद्दल मतभेद नाहीं. नक्षत्रें हीं आकृतिदर्शक स्थिर चिन्हें आहेत, ह्मणून कोणत्या तरी नक्षत्राच्या संबंधानें मोजलेल्या नियमित अंतरावर (निरयन गणनेंत नियमित आकृतिदर्शक नक्षत्रें सर्वदा असतात ह्मणून) नाक्षत्रवर्षाचे व नाक्षत्रगगनेचे पोटविभाग चैत्रादि व अश्विन्यादि आकृतिवाचक शब्दांनीं कल्पिणें अगदीं न्याय्य आहे हें कोणीही कबूल करील.

उदाहरणार्थ — कृत्तिका हें नक्षत्र घेऊं. या नक्षत्र पुंजाची आकृति वस्तऱ्या सारखी आहे. ह्मणून निरयन पंचांगांत जेथें जेथें या आकृतीचा उल्लेख येईल त्या त्या वेळीं त्या त्या चमत्काराच्या सन्निध ही आकृति आकाशांत पाहण्यास मिळते.

पण सायनगणना चलबिंदूच्या संबंधाची असल्यामुळें तत्संबंद्ध नियमित अंतरावर नियमित नक्षत्रपुंज मिळणार नाहींत हें उघड आहे. अशी वस्तुस्थिति असल्यावर उदगयनचलस्थानास मकर या स्थिर आकृतीचें नांव देणें व चल व स्थिर बिंदूंची बळेंच गांठ मारणें कितपत समंजस आहे याचा वाचकांनींच विचार करावा.

सुमारें २००० वर्षांपूर्वी विषुवसंपाताच्या मंदगतीच्या स्वरूपाचें खरें ज्ञान नसल्यामुळें वर्षाचे पोटविभाग आमच्या भरत खंडांत कृत्तिकादि स्थिराकृतिवाचक शब्दांनीं व पाश्चात्यांनीं मेषादि स्थिराकृतिवाचक शब्दांनीं निर्दिष्ट केले. पण पुढें कालगतीनें आर्तव व नाक्षत्र पोटविभागाचा मेळ सतत टिकत नाहीं ही गोष्ट प्रत्ययास आल्यामुळें त्या वेळच्या विचारी भारतीयांनीं आर्तव वर्षाचा व मनुष्याच्या उपजीविकेचा निकट संबंध पाहून नाक्षत्र पोटविभाग कायम ठेवून आरंभस्थान कृत्तिकेवर होतें तें अश्विनीवर आणून ठेवलें. यांत त्यांचा पूर्ण शहाणपणा दिसून येतो. पण हाच क्रम पुढें मात्र चालू ठेवला पाहिजे, व ठेवणें ही चूक आहे.

याच प्रमाणें पाश्चात्य विद्वानांनीं हिपार्कसच्या काळीं विषुवसंपात आकाशांत ज्या स्थानीं होता तेथून सुमारें १ राशि मागें हटलेला पाहून मेषादि नाक्षत्र राशींचा विषुवसंपाताशीं बळेंच मेळ घालण्याच्या भानगडींत न पडतां मेषादि राशीस त्यांनीं पूर्ण फांटा दिला. ह्मणजे ग्रहादिकांचा भोग राश्यादि न सांगतां अंशादि सांगण्याचा प्रघात घातला. या सुधारणेमुळें सायन भोग सांगतांना मध्यें निरयन राशींचा उच्चार करण्याचा बडेपणा त्यांनीं मोठ्या खुबीनें टाळला. उदाहरणार्थ, शनि हा मकर राशीच्या १० अंशांवर आहे असें सांगण्याची पूर्वी वहिवाट होती ती बदलून केवळ शनीचा भोग २८० अंश आहे असें सांगण्याची पद्धति त्यांनीं पाडली.

चिनी लोकांची सुधारणा यांच्याही पेक्षां श्रेष्ठ आहे. त्यांचें वर्ष सायन आहे. सायन व नाक्षत्र वर्षांचा मेळ बसत नाहीं असें पाहून त्यांनीं नाक्षत्रमासनामांस फांटा दिला व महिन्याचा निर्देश केवळ क्रमवाचक शब्दांनीं ह्मणजे १ ला महिना, २ रा महिना असें ह्मणण्याचा प्रघात त्यांनीं पाडला आहे. एखादे वेळीं अधिक मास येईल तर अधिक दुसरा, अधिक तिसरा मास असें लिहिण्याचा त्यांची चाल आहे. यावरून पाहतां सायन गणना ज्यांस पाहिजे आहे त्यांनीं आपल्या सायन पंचांगांत चैत्रादि मासनामें व अश्विन्यादि नक्षत्रनामें कायम ठेवणें केवळ हस्यास्पद आहे. बाटे लोकांनीं आपलीं पूर्वीचीं हिंदु देवादिकांचीं नांवें कायम ठेवणें जितकें समंजस होईल तितकेंच सायनवाद्यांनीं खऱ्या उदगयनसमयीं मकरेऽर्कः असें न लिहिल्याबद्दल इतरास दोष देणें समंजस होईल. सायन गणनेंत आकृतीचा मागमूस राहत नाहीं. चलबिंदूपासून केलेली गणना सायन. या दृष्टीनें पाहतां आमच्या तिथि या सायन आहेत. ह्मणून पूर्वजांनीं तिथींना आकृतिवाचक नावें न देतां प्रतिपदा, द्वितीया, तृतीया अशीं क्रमसंख्यावाचक नावें दिलीं आहेत, यांत त्यांची मार्मिकता दिसून येते. ते त्याच प्रमाणें पूर्वी पाश्चात्यांचीं सर्व मासनामें संख्यावाचक होतीं असें ह्मणतात. सप्टंबर, अक्टोबर इत्यादि नामें या प्राचीन पद्धतीचीं द्योतक आहेत. सायन मासनामें संख्येतर दुसरीं कांहीं तरी असावीं अशी सायनवादी जनांची इच्छा असेल तर मधुमाधवादि प्राचीन नावें देण्यास हरकत नाहीं. फ्रान्स देशांतील राज्यक्रांतिप्रसंगीं जानेवारी, फेब्रूवारी इ० मासनामें रद्द करून त्या त्या ऋतूमध्यें होणाऱ्या फलपुष्पादिकांचीं नावें त्यांस देण्यांत आलीं होतीं.

सांप्रत निरयन मकरसंक्रमणकालीं खरें उदगयन घडत नाहीं व खऱ्या उदगयनसमयीं निरयनसंक्रमण घडत नाहीं. पूर्वी कोण्या

एक्या काळीं हा योग घडत असे. आतां तसें घडविणें ब्रह्मदेवाच्याही हातांत नाहीं. तेव्हां जानेवारीच्या १३ व्या तारखेस उदगयन पंचंगांत लिहिणें जसा वेडेपणा आहे तसा डिसेंबरच्या २२ व्या तारखेस मकर क्रमण लिहिणें हाही निवळ वेडेपणा आहे. कारण सायन पद्धतीनें वंध्यापुत्राप्रमाणें मकर राशीची उत्पत्तिच होत नाहीं, तर मग मकर असें नांव देण्यांत तरी काय पुरुषार्थ आहे? निरयन पद्धतीच्या कृत्तिका आकाशांत दाखवितां येतात तशी सायन मकर रास आंकाशांत दाखवितां येते काय? दाखवितां येत नाहीं तर मग ते वंध्या पुत्री राशीचें नांव तरी कशास हवें? व तें नांव देण्यानें सामान्यजनाच्या डोळ्यांत धूळ फेकल्याचें पाप लागतें किंवा देण्याचें सोडल्यानें पाप लागेल याचा सुज्ञ वाचकांनींच विचार करावा.

विज्ञानकर्त्यांनीं आह्मांस दिलेला दोष किती हास्यास्पद आहे हें पुढील लौकिक दृष्टांतावरून कळून येईल. असें समजा कीं सुमारें २० वर्षांपूर्वीं सदर्नमराठा रेलगाडी महाराष्ट्र देशांत जेव्हां प्रथमच चालू झाली त्या वेळीं प्रथमच छापलेल्या रेलवे टाईमटेबलाच्या प्रती सर्वांपाशीं होत्या. त्याप्रमाणें सकाळच्या उपहाराचे वेळीं गाडी बेळगांव स्टेशनावर येत असे. त्यामुळें सर्व प्यासेंजर आपआपले उपहार बेळगांव स्टेशनावरच आटपून घेत. पुढें बरींच वर्षें लोटल्यावर नवीन टाईमटेबल (वेळापत्रक) अमलांत आलें. त्याप्रमाणें उपहाराचे वेळीं गाडी मिरज स्टेशनावर थांबूं लागली. हें पाहून सर्व उतारू मोठ्या विचारांत पडले. शेवटीं त्यांपैकीं बऱ्याच (निरयनमतवादी) उतारूंनीं असा ठराव केला कीं ज्या अर्थीं आमचे वाडवडील जुन्या वेळापत्रकाप्रमाणें बेळगांव स्टेशनावर उपहार करीत आले त्याप्रमाणें आह्मीही बेळगांव स्टेशनांत गाडी आली कीं फराळ केला पाहिजे मग त्या वेळीं उजाडलें असो किंवा दोन तास रात्र उरली असो! त्याची

पंचाईत आह्मांस करणें नाहीं. जुन्या वेळापत्रका प्रमाणें [पंचांगाप्रमाणें] आमचे वडील वागत आले व त्याप्रमाणें आह्मींही वागणार बाकीच्या थोड्याशा [सायन] उतारूंनीं असा विचार केला कीं आपले वडील जुन्या वेळापत्रकाप्रमाणें ९ वाजतां बेळगांव स्टेशनावर उपहार करीत असत. पण आतां नवीन वेळापत्रकाप्रमाणें ९ वाजतां गाडी मिरज स्टेशनावर येते. तेव्हां आह्मी मिरज स्टेशनावर उपहार केला तर ती गोष्ट वडिलांच्या वहिवाटीच्या विरुद्ध होते. सबब मिरज न ह्मणतां **सायनबेळगांव** असें नांव दिलें ह्मणजे झालें. वडीलांचा मान राखून पुन्हा योग्य वेळीं उपहार करण्यास अडचण पडत नाहीं. हा उभयतांचा वेडेपणापाहून एक गृहस्थ नवीन वेळापत्रक [केतकीपंचांग] हातीं घेऊन त्यांस ह्मणाला निरयन उतारू हो, बेळगांवास प्राधान्य देऊन भलत्याच वेळीं उपहार करितां हें चुकीचें आहे. मग सायन उतारूंकडे तोंड फिरवून तो ह्मणाला बाबांनों तुह्मी उपहार योग्य वेळीं करितां हें ठीक आहे. पण मिरजेला सायन बेळगांव ह्मणतां व इतरांनीं तसेंच ह्मणावें असा उपदेश करितां व जे मिरजेला सायन बेळगांव ह्मणणार नाहींत त्याच्यावर लोकांच्या डोळ्यांत जाणून सवरून धूळ फेकल्याचा आरोप करितां ही गोष्टही तुमच्या प्रतिस्पर्ध्याच्या कृतीइतकीच गर्हणीय आहे!

जे मार्मिक वाचक असतील त्यांस वरील लेखावरून धूळ फेंकणारे कोण व जास्ती खप व्हावा ही इच्छा कोणाची आहे याचा निर्णय करितां येईल. आमचें मत काय आहे हें लोकांस स्पष्ट कळावें या उद्देशानेंच हें चऱ्हाट वळलें आहे व ही संधि आणून दिल्याबद्दल आह्मी विज्ञानकर्त्यांचे फार फार आभारी आहों. या विषयावर पुनः पुनः वादविवाद करण्यास आह्मांस सवड नाहीं. कळावें हे विनंति.

कुमठा
३१।१२।०८

आपला
वेंकटेश बापूजी केतकर

२

वि. वि.—खालील चार ओळी आपल्या दाशाहिकांत प्रसिद्धीस पाठविल्या आहेत.

"दशम लंकोदयावरून कां?"

आपण लग्न साधनाचे वेळीं स्वोदय घेतों व दशमास लंकोदय घेतों. वास्तविक पाहतां लग्न याचा अर्थ पूर्वक्षितिजस्थ क्रांतीवृत्ताचा उदित राशिभाग. व दशम ह्मणजे क्रांतिवृत्तावरील राशीचा ऊर्ध्व याम्योत्तरवृत्तास लागलेला भाग. किंवा क्रांतिवृत्ताचा आकाशांतील डोक्यासमोरील उदित बिंदु. हा बिंदु कोणत्याही वेळीं क्षितिजापासून ९० अंशांवर असला पाहिजे. जोशी लोक ग्रहणें वर्तवितांना त्रिभोन (९० तून उणें करून) लग्न धरितात. मग कुंडलींत भाव वर्तवितांना त्रिभोन न घेतां लंकोदय घेण्याचें कारण काय? या लंकोदयामुळें मूळ दशमाची स्थिति विषुवाची होते. तेव्हां उदय व अस्तलग्नें क्रांतिवृत्तावर व दशम विषुववृत्तावर पाहणें शुद्ध आहे काय? आपण किंवा जिज्ञासू वाचकांकडून शंका निरसन होईल ही आशा आहे.

कळावें लोभ असावा हे विनंति.

दत्तात्रय नीलकंठ कुळकर्णी

मकरसंक्रमण आणि उदगयन

आजच्या अंकांत केतकी पंचांगकर्ते ज्योतिर्विद वेंकटेश बापूजी केतकर यांचें पत्र पत्रव्यवहाराच्या सदरांत छापलें आहे. त्यांत उदगयनप्रवृत्ति व मकरसंक्रमण यांचा वेगळाला उल्लेख केतकी पंचांगांत कां केला आहे यांचें कारण त्यांनीं दिलें आहे. त्यांचेमतें "१ मेषादिराशि हे तारकापुंज आहेत. २ पूर्वी एकदां मकरसंक्रमणकालीं उदगयन होत असे, आतां नाहीं. ३ सायन पद्धतीनें वंध्यापुत्राप्रमाणें मकर राशीची उत्पत्तीच होत नाहीं." हें त्यांचें मत कितपत खरें आहे याचा विचार केला पाहिजे.

१ मेषादि राशि हे तारकापुंज आहेत.

ज्यो. केतकर ह्मणतात—निरयन पद्धतीच्या कृत्तिका आकाशांत दाखवितां येतात, तशी सायन मकर रास दाखवितां येते काय?—या प्रश्नाला उत्तर देण्यापूर्वी ज्योतिर्विद दीक्षित आपल्या भारतीय ज्योतिःशास्त्राच्या इतिहासांत काय ह्मणतात हें पाहिलें पाहिजे. पृ० ४२४ मध्यें ते ह्मणतात–मेषादि संज्ञा मूळच्या विभागात्मकच आहेत. नसल्या तरी आमच्या ग्रंथांत सा २००० वर्षें तरी विभागात्मक ह्मणून आहेत.—पृष्ठ १३८ मध्यें लिहितात—मेषादि संज्ञा प्रथम तारापुंजांच्या आकृतिविशेषांवरून पडल्या कीं काय या विषयीं वाद आहे. आमच्या देशांत त्या परदेशांतून आल्या असल्या किंवा मूळच्या आमच्या असल्या तरी आकृतीशीं त्यांचा संबंध दिसत नाहीं. अश्विनी, भरणी आणि कृत्तिकांच्या कांहीं तारा मिळून मेषाची (मेंढ्याची) आकृति होते असें कांहीं नाहीं. राशिक्रमांत मेष प्रथम आहे आणि अश्विनी नक्षत्रापासून त्याचा आरंभ आहे.–दीक्षित हे कांहीं सामान्य

पुरुष नव्हते. त्यांनीं या शास्त्रांत जितके परिश्रम केले होते तितके क्वचितच कोणीं केले असतील. त्यांचें अवलोकन भयंकर असून शोध करण्याची शक्तिही अचाट होती हें सर्वश्रुत आहेच. अशा मनुष्याचें मत विचारार्ह असलेंच पाहिजे. त्यांच्या मताप्रमाणेंच आम्हींही म्हणतों कीं मेष वि नांवें आकाशांतील तारकापुंजांचीं नाहींत. अश्विन्यादि नक्षत्रपुंज जसे आकाशांत दाखवितां येतात तसे मेषादि राशि त्यांच्या नांवाप्रमाणें दिसत नाहींत. मग केतकरांस च त्यांची माहिती असल्यास नकळे! जर खरोखर मेषादि नांवें तारकापुंजांचीं असतील तर त्यांच्या आकृतीचें वर्णन ज्योतिषग्रंथांत कोठें तरी असेलच. नक्षत्रांचीं वर्णनें जशीं ग्रंथांतून आहेत तशींच हे जर तारकासमूह आहेत तर अमुक अमुक तारे म्हणजे मेंढा, अमुक अमुक तारे म्हणजे बैल असेंही वर्णन असलेंच पाहिजे. यासाठीं शिष्यवृत्तीनें त्यांस विनंति करितों कीं ता वर्णनें ग्रंथांच्या नांवासह प्रसिद्ध करावीं. म्हणजे मग यावद्दल जास्त विचार करण्यास ठीक पडेल. जर हीं वर्णनें आमच्या कोणत्याच ग्रंथांत नसतील तर कां याचेंही कारण प्रसिद्ध करावें. वादविवाद करण्यास सवड नसेल तर नका करूं. कारण आमच्या मतें वादविवाद करण्यासारखें आतां कांहीं नवीन असेलसें वाटत नाहीं. पण ज्या अर्थी आपणास राशी आकाशांत दाखवितां येतात त्या अर्थी तीं वर्णनें कोणत्या ग्रंथांत आहेत हेंही आपणास माहित असेलच. दीक्षितांचा ग्रंथ वाचून याकामीं निराशा होते. यासाठीं आमच्यासाठीं व आमच्या वाचकांसाठीं एवढी माहिती कशी तरी सवड करून द्यावी म्हणजे आपले अनंत उपकार होतील व वादाच्या एका बाजूचा निकाल लागेल. येत्या १८३१ च्या पंचांगांतच ही माहिती प्रसिद्ध करावी म्हणजे सर्वांसच तिचा लाभ होईल?

२ मकरसंक्रमणीं आतां उदगयन होत नाहीं

केतकरसाहेब म्हणतात— सांप्रत निरयन मकरसंक्रमण कालीं खरें उदगयन घडत नाहीं—जर राशींचीं नांवें स्थिर तारकापुंजांचीं आहेत तर निरयन हा शब्द लावण्यास नको. खरें उदगयन व खोटें उदगयन म्हणजे काय?' म्हणून 'मकरसंक्रमण कालीं आतां उदगयन होत नाहीं' असें म्हटलें तरी चालेल. असो. निरयन मकरसंक्रमणकालीं उदगयन फक्त शून्य अयनांशाच्या वेळेलाच संभवतें. हा काल कमींत कमीं १४०० वर्षांच्या मागला आहे. उदगयन एकेक दिवस मागें हटत हटत आज २३ दिवस पूर्वी होत आहे असें असून सुद्धां आज "मकरेर्कः उदगयनं, शिशिरर्तुः" असें आमचे जोशी पंचांगांत लिहितात तें कां? ते चुकीनें लिहीत असतील, पण चुकीनें तरी कां लिहितात? वे० चिंतामणि रुपोत्तमशास्त्री पुरंदरे–वसईकर यांनीं केलेल्या पंचांगांत संक्रांतिफल सांगतांना "मकरराशौ रवेः संक्रमणं स्यात् ॥ तदा दक्षिणायन हेमंतर्तु धनुःसंक्रांतयो निवृत्ताः ॥ उत्तरायण शिशिरर्तु मकर संक्रांतयः प्रवृत्ताः ॥ तदा देवांनां दिनोदयो दैत्यानां रात्र्युद्गमः ॥" असें जें म्हटलें आहे तें कां? अर्थात् ग्रंथांची परिभाषाच अशी असली पाहिजे कीं मकर संक्रांत, उदगयन व शिशिरऋतु या तिहींची सांगड सोडतां येणार नाहीं! केतकरी पंचांगांत ही सुधारणा झाली आहे, पण उपयोग काय? बारा संक्रमणांत याच संक्रमणाचा इतका उत्सव कां असावा? या संक्रांतीच्या वेळीं तिळांचें माहात्म्य विशेष आहे. वैद्यशास्त्राच्या दृष्टीनें विचार केल्यास या वेळच्या ऋतुमानाला तीळ हे शरीराला सुखकर आहेत असें वाटतें. हें ऋतुमान सायन मकराचे वेळींच सार्वकाळ संभवतें. निरयन मकरसंक्रमण आज पाऊण महिन्यांनीं होत आहे, म्हणून आमच्या पूर्व-

जांनीं योजिलेल्या औषधी उपायाचा काय उपयोग होणार? आमचे जोशी या संक्रांतीचीं फलें सांगत असतात. तशीं इतर कोणत्याही संक्रांतीचीं सांगत नाहींत. या संक्रांतीवरून कोणते पदार्थ चांगले पिकावयाचे, कोणते नाश पावावयाचे, देशाची स्थिति कशी रहावयाची वगैरे अनुमानें बांधण्याचें कारण केवळ उदगयनप्रवृत्ति हेंच असलें पाहिजे. मकरारंभीं जर उदगयन होत नाहीं तर त्या वेळचा उत्सव सर्व उदगयनकालींच केला पाहिजे होता. परंतु परंपरा तशी दिसत नाहीं. यावरून मकरसंक्रमण कालींच उदगयनाची प्रवृत्ति नियत दिसते हें उघड आहे. असो हें सर्व तर्कशास्त्र आहे. ह्मणून क्षणभर बाजूस टेवून प्राचीन प्रसिद्ध ग्रथ काय ह्मणतात, तें पाहूं.—

विष्णुपुराण.

अयनस्योत्तरस्यादौ मकरं याति भास्करः ॥
ततः कुंभंच मीनं च राशेराश्यंतरं द्विज ॥
त्रिष्वेतेष्वथ भुक्तेषु ततो वैषुवतीं गतिम् ॥
प्रयाति सविता कुर्वन्नहोरात्रं ततः समम् ॥
ततो रात्रिः क्षयं याति वर्धतेऽन्वहं दिनम् ॥
ततश्च मिथुनस्यांते परां काष्ठा मुपागतः ॥
मेषादौ च तुलादौ च मैत्रेय विषुवस्थितः ॥
तदा तुल्यमहोरात्रं करोति तिमिरापहः ॥
कर्कटावस्थिते भानौ दक्षिणायनमुच्यते ॥
उत्तरायणमप्युक्तं मकरस्थे दिवाकरे ॥

या आधारावर आमचीं सर्व भिस्त आहे. प्रत्येकवेळीं हे आधार दाखवावे लागतात तरी त्याबद्दल निरयनवादी एक अवाक्षरही काढीत नाहींत ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. यांत तर उत्तरायणाच्या आरंभीं सूर्य मकरराशीस जातो हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट

आहे. इतकेंच नव्हेतर मकर, कुंभ व मीन हे राशि भोगून तो विषुवावर येतो व तेव्हां दिनमान व रात्रिमान सारखें करितो नंतर रात्रीमान कमी होत जाऊन मिथुन राशीच्या शेवटीं त्याची सीमा होते. मेषारंभीं व तूळारंभीं सूर्य विषुवांत असतो. कर्क राशीवर सूर्य गेल्यावर दक्षिणायन सुरू होतें व मकरावर गेल्यावर उत्तरायण सुरू होतें असा सार्वत्रिक नियम या पुराणग्रंथांत सांगितला आहे व तीच समजूत अद्यापही प्रचलित आहे हें वसईकरांच्या व इतरांच्या पंचांगावरून दिसून येतें. यावरून मकरसंक्रमणकालींच उदगयनप्रवृत्ति आहे याविषयीं शंका राहत नाहीं. विष्णुपुराण कांहीं शून्य अयनांशाच्या वेळचें नाहीं. त्यांतील वर्णन इतकें प्राचीन आहे कीं त्याची उपपत्ति लावण्यास आतांच्या काळींही फार कठीण जाईल.

सूर्यसिद्धांत.

विषुवस्थानतो भागैः स्पष्टैर्भगणसंचरात् ॥

या प्रमाणें गोलबंधाधिकारांत राशींचे भाग पाडावयाचे असें सांगितलें आहे. यांत विषुवतीपासून राशींचा आरंभ सांगितला असल्यामुळें राशि सायनच आहेत असें यावरून स्पष्ट होत आहे.

भचक्रनाभौ विषुवद्वितीयं समसूत्रगं ॥
अयनद्वितयं चैव चतस्रः प्रथितास्तु ताः ॥७
तदंतरेषु संक्रांति द्वितयं द्वितयं पुनः ॥
नैरंतर्यात् तु संक्रांतेर्ज्ञेयं विष्णुपदीद्वयं ॥८
भानोर्मकरसंक्रांतेः षण्मासा उत्तरायणं ॥
कर्कादेस्तु तथैवस्यात् षण्मासा दक्षिणायनं ॥९

मानाध्याय

यांत रवीच्या मकरसंक्रमणापासून ६ महिने उत्तरायणाचे व कर्क-संक्रमणापासून ६ महिने दक्षिणायनाचे असें स्पष्ट सांगितलें आहे. ज्योतिर्विद केतकर यांस हा ग्रंथ मान्य नाहीं काय? सूर्यसिद्धांत हा शून्य अयनांशाच्या वेळचा ग्रंथ आहे काय? या दोन प्रश्नांचें ते समर्मक उत्तर देतील तर आमचें अज्ञानी लोकांचें समाधान होईल. नाहींपेक्षां त्यांचें पंचांग ह्मणजे चुकीच्या पंचांगाची सुधारलेली चुकींची आवृत्ति असेंच मोठ्या कष्टानें ह्मणावें लागणार!

ज्यो. केतकरांनीं उदगयन मात्र खरें देण्याची पद्धति स्वीकारीली. पण या बरोबरच सायनसंक्रांतीही त्यांस देणें जरूर होतें. चंद्र पंचांगांत व मद्रासी सिद्धांती पंचांगांतील 'मेषे भानु' किंवा 'मेषायनं' अशा शब्दांनीं जरी त्यांनीं त्या दिल्या असत्या तरी चालले असतें. सन १८८४ च्या सायनवादाच्या वेळीं प्रख्यात धर्मशास्त्रज्ञ वे० शा० संपन्न गंगाधरशास्त्री दातार यांनीं सायन संक्रांति पंचांगांत असाव्या असें कबूल केल्याचें दीक्षित आपल्या ग्रंथांत लिहितात मुंबईच्या पंचांग परिषदेनेंही सायन संक्रांति पंचांगांत देण्याचें ठरविलें आहे. मग केतकरांसच यांत काय कमीपणा वाटला? वास्तविक सायन संक्रांतीच मुख्य आहेत, इतर अजागलस्तना प्रमाणें व्यर्थ आहेत. स्नानदानादि पुण्यकर्में सायन संक्रांतींवरच केलीं तर फलदायक होतात असें आमचे ग्रंथकार स्पष्ट लिहीत आहेत हें पुढील वचनांवरून दिसून येईल? निरयनाच्या अभिमानास पेटून संचालनाचा डौल मिरविणाऱ्या पंचांगकर्त्यांनीं हा पुण्याचा लाभ लोकांस होऊं देऊं नये यासारखी आश्चर्यकारक गोष्ट ती कोणती? मग पंचांगें पाहिजेत कशास? क्यालेंडरांवरच व्यवहार भागवून घेतां येईल! किंवा निदान केतकरांच्या पंचांगाची तरी विशेष जरूर दिसत नाहीं. ग्रहणांचे स्पर्शमोक्षादि किंचूक काळ नाटीकलवरून किंवा पटवर्धनी

पंचांगावरून समजतात. त्या करितां केतकरांना कांहीं तसदी घेण्याचें कारण नव्हतें. केतकरांच्या पंचांगाच्या साह्यानें सुद्धां आह्मांस जर पुण्य संपादन करितां येत नाहीं तर आह्मांस पंचांगें तरी कशास हवींत? पंचांगांत जें नक्षत्र लिहिलेलें असेल त्या नक्षत्रांत रात्रीं चंद्र दिसला ह्मणजे काम झालें असें आह्मी समजत नाहीं. त्या करितां संचालित पंचांगाची मुळींच जरूर नाहीं. तें काम **एक पैशाच्या** पंचांगावरूनही होतें. जर त्यांत ताराचंद्रयुति, चंद्र व इतर ग्रह युति असत्या तर त्याचें महत्व होतें. हे चमत्कार पाहण्यासाठे असल्यामुळें व फलितांतही त्यांची आवश्यकता असल्यामुळें निदान सुधारलेल्या पंचांगांत तरी ते अवश्य लिहिलेले पाहिजे होते. सायनपंचांगांत या युत्या देत असत! पंचांगांतल्या नक्षत्रांत चंद्र दिसून काय उपयोग! आणि तो तरी सर्वदा कोठें दिसतो? विभागात्मक नक्षत्रें असतात पंचांगांत व तारात्मक नक्षत्रें असतात आकाशांत! त्यांतील कांहीं विभागाच्या पुढें आहेत तर कांहीं मागें आहेत. शंकरराव पृ० ४२९ मध्यें लिहितात— "तारात्मक नक्षत्रें आपण स्पष्टतही सोडीत आहों. तीं सर्व सारख्या अंतरानें नाहींत. यामुळें निरयन पंचांगांतही क्रांतिवृत्ताचे सारखे २७ विभाग करून त्या प्रत्येकास नक्षत्र ह्मणणें भाग पडलें आहे. त्या २७ विभागापैकीं कोठें एकाच नक्षत्रविभागांत दोन नक्षत्रांच्या योगतारा येतात, कोठें एखाद्यांत मुळींच तारा येत नाहीं." तेव्हां असल्या नक्षत्रांवरून ह्मणे आकाशांतील तारकापुंज पाहतां येतात! तारकापुंज पाहण्यासाठींच जर ही पंचांगांतील योजना असेल तर ती पंगू आहे हें केतकरांनी विचारांत घ्यावें. त्यासाठीं सायनपंचांगासारखीच योजना करणें जरूर आहे. सारांश केतकी पंचांग याही दृष्टीनें महत्वाचें नाहीं. असो—

संक्रांतीसंबंधानें वर सांगितलेलीं वचनें येणेंप्रमाणें आहेत.—

चलसंस्कृततिग्मांशोः संक्रमो यः स संक्रमः ॥
अजागलस्तनइव राशिसंक्रांतिरुच्यते ॥
पुण्यदां राशिसंक्रांतिं केचिदाहुर्मनीषिणः ॥
नैतन्मम मतं यस्मान्नस्पृशेत्क्रांतिकक्षया ॥

वसिष्ठ

अयनांशसंस्कृतार्कस्य मुख्या संक्रांतिरुच्यते ॥
अमुख्या राशिसंक्रांतिस्तुल्यःकालविधिस्तयोः ॥

रोमशसिद्धांत

अयनांशसंस्कृतो भानुर्गोले चरति सर्वदा ॥
अमुख्या राशिसंक्रांतिस्तुल्यः कालविधिस्तयोः ॥
स्नानदानजपश्राद्धव्रतहोमादिकर्मभिः ॥
सुकृतं चलसंक्रांतावक्षयं पुरुषोऽश्नते ॥

पुलस्त्य

चलसंस्कृततिग्मांशोः संक्रमो यः स संक्रमः ॥
नान्योन्यत्र च तत्क्षेत्र नैति तत्क्रांतिकक्षया ॥

शाकल्यसंहिता

संस्कृतायनभागार्क संक्रांतिस्त्वयनं किल ॥
स्नानदानादिषु श्रेष्ठा मध्यमः स्थानसंक्रमः ॥

सोमसिद्धांत

वरील वचनावरून सायन संक्रांति ह्याच मुख्य आहेत. स्नानदानजपादि पुण्यकर्में त्यांच्या कालींच केल्यानें मनुष्य अक्षय सुख पावतो. इतर संक्रांति (यांत राशिसंक्रांति हा शब्द आला आहे, पण त्या निरयन संक्रांती नव्हत. कारण श्लोकांत "न स्पृशेत्क्रांति कक्षया" ह्मणजे त्या क्रांतिवृत्ताला स्पर्श करीत नाहींत असें स्पष्ट आहे. यांचा

संबंध विषुवाशीं असावा.) अजागलस्तना प्रमाणें निष्फल आहेत. अर्थात् कृतकरांची मकर संक्रांत अजागलस्तनाप्रमाणें आहे! तिचें कितीही दोहन केलें तरी पाणीसुद्धां निघणार नाहीं, मग दुधाचें नांव कशाला? संक्रमण याचा अर्थसुद्धां सम्यक् जें क्रमण तें असा आहे. सायन रवीचें जें विशिष्ट विदूंत क्रमण तेंच संक्रमण असें वरील ग्रंथकार बजावतात. वंध्यापुत्री संक्रांत केतकरांचीच आहे. उदगयन एकीकडे व मकरसंक्रमण एकीकडे लिहून नजरबंदीचा खेळ केतकरांनींच केला आहे. पंचांगें श्रुतिस्मृतिपुराणविहितकाळचीं फलें प्राप्त करून घेण्याचीं वास्तविक साधनें आहेत. पण आतां त्यांची क्यालेंडरांपेक्षां जास्त किंमत नाहीं हें खास! मग केतकरांचें पंचांग असो कीं वसईकरांची असो.

३ सायन पद्धतीनें वंध्यापुत्राप्रमाणें मकर राशीची उत्पत्तीच होत नाहीं.

ब्रह्मगुप्त आणि लल्ल यांच्या ग्रंथांत अयनगतिसंस्कार कोठेंच सांगितलेला नाहीं. सांप्रतच्या सूर्यसिद्धांतांत (खऱ्या सूर्यसिद्धांतांत नव्हे.) अयनचलना संबंधानें जे श्लोक आहेत ते प्रक्षिप्त आहेत. हे श्लोक त्रिप्रश्नाधिकारांत आहेत; वास्तविक मध्यमाधिकारांत पाहिजे होते. मानाधिकारांत मकरकर्कसंक्रमणासच अयन ह्मटलें आहे. सायनरवीचें संक्रमण तेंच संक्रमण, अर्थात् सायन मिथुनान्त तो दक्षिणायनारंभ असें ब्रह्मगुप्ताचें मत होतें. त्यानें अयनगति मुळींच हिशेबांत घेतली नाहीं. सांप्रतचें उदगयन मार्गशीर्षांतही कधीं कधीं होतें. त्यामुळें पौर्णिमांत मानानें तें पौषांत होतें असें ह्मटलें पाहिजे. पण, वास्तविक तें मघांत (पूर्णिमांत मानानें) झालें पाहिजे. वाग्भटांत याविषयीं वचन आहे—

मासैर्द्विसंख्यैर्माघाद्यैः क्रमात् षडृतवः स्मृताः ॥
शिशिरोथवसन्तश्च ग्रीष्मवर्षाशरद्धिमाः ॥
शिशिराद्यास्त्रिभिस्तैस्तु विंद्यादयनमुत्तरम् ॥
आदानं च तदा दत्ते नृणां प्रतिदिनं बलम् ॥

यावरून माघांतच उत्तरायण झालें पाहिजे असें सिद्ध होतें. पौषांत होत असेल तर ती पद्धति चुकीची आहे. हा माघ अर्थात् सायन असणार. मग केतकर "सायन पंचांगांत चैत्रादि मासनामें ठेवणें बाटे लोकांनीं आपलीं पूर्वीचीं नांवें ठेवण्यासारखें हस्यास्पद आहे" असें ह्मणतात त्याचा अर्थ काय? सायनवादी बाटे कीं निरयनवादी बाटे? सायनवादी कांहीं प्रतिसृष्टि निर्माण करूं इच्छित नाहींत. त्यांचीं मतें श्रुतिस्मृतिपुराणविहित आहेत असें मागें दाखविलेंच आहे. भारतावरूनही मासनामें सायनच आहेत असें दाखवितां येतें. चित्रापूर्णमास हें संवत्सराचें मुख व वसंत हा पहिला ऋतु असें वेदांतही अनेक स्थळीं आहे. अर्थात् चित्रापूर्णमासांत विषुव झालें पाहिजे. या सर्व गोष्टी काय दर्शवितात, याचा ज्यो. केतकरांनीं विचार करावयास पाहिजे होता. व महिन्यास नांवें जीं सायनवादी देतात तीं बाटे लोकांप्रमाणें आहेत कीं काय याचा विचार करावयास पाहिजे होता. मासनामांचा व आकृतीचा कांहीं संबंध नाहीं. असो सायन पद्धतीनें वंध्यापुत्राप्रमाणें मकर राशीची उत्पत्तीच होत नाहीं हें मत किती पोकळ आहे याचा वरील विवेचनावरून उलगडा होईल.

नक्षत्रें.

नक्षत्रें दोन प्रकारचीं आहेत. तारात्मक आणि विभागात्मक. पंचांगांतील नक्षत्रें विभागात्मक आहेत. १३ अंश २० कलांचा जो प्रदेश त्यास गणितांत नक्षत्र ह्मणतात. येथें नक्षत्र हा शद्ब पारिभाषिक आहे, यौमिक नाहीं. नक्षत्र ह्मणजे तारा असा त्याचा अर्थ नाहीं. हे विभाग विषुव व क्रांति या वृत्तांच्या संपातापासून आहेत. फलें पाहण्याच्या कामीं याच नक्षत्रांचा उपयोग करितात. ह्मणून हे नक्षत्रविभाग कोणत्या प्रकारचे आहेत याचा विचार करूं.

शतपथ ब्राह्मणांत नक्षत्रें २७ व उपनक्षत्रें २७ असें सांगितलें आहे. हीं उपनक्षत्रें ह्मणजे काय याचाही विचार केला पाहिजे. अगदीं सरळ दृष्टीनें नक्षत्रें २७ ह्मणजे तारकापुंज २७ व उपनक्षत्रें २७ ह्मणजे विभागात्मक प्रदेश २७ असाच त्याचा अर्थ होईल. वेदांत वर्ष सायन आहे या विषयीं वाद नाहीं. ह्मणून उपनक्षत्रेंही चल संपातापासूनचींच असलीं पाहिजेत हें सिद्ध आहे. अर्थात् हीं उपनक्षत्रें सायनच असलीं पाहिजेत हें निर्विवाद आहे. याच ब्राह्मणाच्या उत्तर कांडांत

तस्मान्न नक्षत्र आदधीत ॥

नक्षत्रावर आधान करूं नये असें सांगितलेलें असून पूर्व भागांत 'नक्षत्रावरच आधान सांगितलें आहे.' अर्थात् तारात्मक नक्षत्रावर आधान न करितां विभागात्मक नक्षत्रावरच आधान करावें असें स्पष्ट होतें अर्थात् सायन विभागात्मक नक्षत्रेंच मुख्य आहेत हें उघड आहे.

नक्षत्रांस जीं नांवें पडलीं त्यांतील कित्येकांचीं आकृतीवरूनच असतील हें वेदांतील नक्षत्रांच्या कथांवरून स्पष्ट दिसतें. परंतु आज

आह्मी जो वाद करीत आहों तो या नक्षत्रांबद्दल नव्हे हें प्रथम ध्यानांत घेतलें पाहिजे. फलभाग या नक्षत्रांवर अवलंबून नाहीं फलभागाचा विभागात्मक प्रदेशाशीं संबंध आहे. कृत्तिका हें अग्निनक्षत्र आहे, व तें वेदकालापासून प्रसिद्ध आहे. "अग्नेःकृत्तिकाः" असें तैत्तिरीय ब्राह्मणांत वर्णन आहे. अर्थात् हें विधान फलभागालाच धरून असलें पाहिजे. अनुभवही तसाच येतो हें. कुंडलीविज्ञानच्या वाचकांस अवगत आहेच. कृत्तिका नांव आकृतिवाचक असेल पण तसेंच तें पारिभाषिकही आहे हें विसरतां कामा नये. मंगळासारखा ग्रह सायन कृत्तिकांत असतां मनुष्याची प्रकृति अत्यंत उष्ण असते हा अनुभव सर्वत्र येतो. जर तारकात्मक कृत्तिकांत अगर निरयन कृत्तिकांत हा अनुभव येत असेल तर तो कोणीं दाखवावा. तसें जर दाखवितां येत नसेल कृत्तिका हें अग्नितत्व आहे असें तारकात्मक अगर निरयन विभागात्मक कृत्तिकांच्या संबंधानें तरी बोलतां कामा नये. कृत्तिकांची आकृति वस्तऱ्या सारखी आहे ही केवळ कल्पना आहे. वस्तरा सर्वांनीं पाहिलला आहे व कृत्तिकाही सर्वांस दिसण्या. सारख्या आहेत. त्यांत काय साम्य असेल तें एक ज्यो. केतकरच जाणोत! आह्मांस तर त्यांत कांहींच सादृश्य दिसत नाहीं! या नक्षत्राची आकृति ∴ अशी आहे. वस्तरा असाच असतो काय? कदाचित् हें एक कापण्याचें हत्यार असावें असा बोध होईल. व तो कृत्तिका या शब्दाच्या अर्थालाही जुळेसा आहे. आतां फलभागाकडे दृष्टि दिल्यासही हा अर्थ अनुभवास येतो. सायन कृत्तिका लग्न उदित असतां मनुष्याच्या एखाद्या अवयवांतून [बहुधा दांतांतून] रक्त जाण्याचा विकार दृष्टीस पडतो. या नक्षत्रांत चंद्र असला तरी सुद्धां हाच प्रकार दृष्टीस पडतो! यावरून कृत्तिका हें घातक नक्षत्र

आहे व तें शास्त्रप्रमाणें मनुष्याच्या अवयवांस कापतें म्हणूनच तें कृत्तिका या नांवाला पात्र आहे असें स्पष्ट होतें. तात्पर्य हें नांव आकृतीवरूनच पडलेलें असेल असें म्हणवत नाहीं. कदाचित् असेल इतकेंच. पण फलावरून पडलेलें नाहीं असें मात्र सिद्ध करितां येईल कीं नाहीं याबद्दल शंका आहे!

आर्द्रादौ दशर्क्षाणां विशाखा स्त्री नपुंसका ॥
शेषाश्चतुर्दशपुरुषा एवमृषिभिः प्रयुज्यते ॥

यांत आर्द्रापासून दहा नक्षत्रें स्त्रीसंज्ञक, विशाखांपासून तीन नपुंसक संज्ञक व बाकीचीं चवदा पुरुषसंज्ञक असें ऋषि म्हणतात. त्यांतील आरंभींचीं दहा पावसाचीं नक्षत्रें आहेत.पावसाचा आरंभ सायन आर्द्रावर होतो. पंचांगांत आर्द्राप्रवेशफल हें याचकरितां देत असतात. यावरून व आर्द्रा या नांवावरून हें नांव आकृतिवाचक आहे असें ज्यो. केतकर सांगतील काय! त्याच प्रमाणें आर्द्रापासून दहा नक्षत्रें स्त्रीबोधक इत्यादि संज्ञांचा सोपपत्तिक उलगडा करितील काय! आमच्या मतें यांतील सर्व नक्षत्रें तरी सायनच आहेत खास.

कै० शंकर बाळकृष्ण दीक्षित हे भारतीय ज्योतिःशास्त्राच्या इतिहासांत पृ० ९७ मध्यें लिहितात—"यावरून पुनर्वसु, मघा, चित्रा, रेवती हे शब्द भाषेंत अगोदरच प्रचारांत असलेले मागाहून नक्षत्रांस लागले असावे असें दिसून येतें. आणि ते त्या त्या नक्षत्रांचें दर्शनीयत्व, **धनदातृत्व** इत्यादि प्रत्यक्ष, कल्पित किंवा अनुभूत गुणांवरून त्या त्या नक्षत्रांस लाविले असावे असें अनुमान होतें. दुसऱ्या कांहीं नक्षत्रांसंबंधानेंहीं असेंच म्हणतां येईल."—यावरून सर्वच नांवें कांहीं आकृतीवरून पडलेलीं नाहींत असें सिद्ध होतें. एकंदर २७ नक्षत्रांत आकृतीवरून नांवें पडलेलीं नक्षत्रें चतुर्थांशच

निघतील. पंचांगांत जीं नक्षत्रें द्यावयाचीं तीं काय हीं मूठभर नक्षत्रें पाहतां यावीं ह्मणून? वास्तविक तिथि, वार, नक्षत्रें, योग व करण हीं जीं पंचांगाचीं पांच अंगें आहेत त्यांचा आकाशांतील कोणत्याही आकृतीशीं संबंध नाहीं. यांचा उपयोग फक्त फलांसाठींच आहे. पंचांगाची जरूर ही याच कारणासाठीं आहे. आकाशांतील आकृति पाहण्याची आवश्यकता असेल तर पंचांगांत तशीच कांहीं तरी निराळी व्यवस्था केलेली असली पाहिजे ती केतकी पचांगांत कोठें आहे?

ज्यो. केतकर हे आपल्या पंचांगांत आर्द्रा प्रवेशफल देतात तें काय ह्मणून? पाऊस तर मृगाला किंवा त्या पूर्वीच लागतो! मग हें वरातीपाठीमागून घोडें कशाला!

सायननिरयनवाद.

ज्यो० केशव त्रिंबक पेंडसे यांनीं या संबंधानें एक लेख लिहून पाठविला आहे, तो खालीं आमच्या उत्तरासह दिला आहे. या पुढें या संबंधाचे सर्व पत्रव्यवहार एकत्र वाचतां यावे ह्मणून ते "सायन-निरयनवाद" या सदराखालीं देण्याचें ठरविलें आहे.

"वेदकालीं संपात पुनर्वसूंत सुमारें ८००० वर्षांपूर्वी होता. तो मृगांत ६००० वर्षांपूर्वी आला. पांडवकालीं ३५०० वर्षांपूर्वी कृत्तिकांचे प्रथम चरणीं, वेदांगज्योतिषकालीं भरणींच्या चवथ्या चरणांत ३३०० वर्षांपूर्वी, नंतर आश्विनी प्रथम चरणीं १५०० वर्षांपूर्वी आणि हल्लीं उत्तराभाद्रपदांत दुसऱ्या चरणांत आहे. हीं सर्व नक्षत्रें निरयन विभात्मक होत हें पुढें दिसून येईल."

उत्तर.—या वरून वेदांगज्योतिष हें पांडवानंतरचें ठरतें! तेव्हां हें सिद्ध करण्याची जबाबदारी रा. पेंडसे यांजवर नसून ज्यो. केशव त्रिंबक यांजवर येते. सबब त्यांनीं प्रथम हें सिद्ध करावें ह्मणजे बाकीच्या गोष्टींचा विचार करूं.

"ज्या महिन्यांत विषुवसंपात येईल तो मेष किंवा माधवमास होय. हा चल अर्थात् सायन असतो. ऋतुही सायनच आहेत व ते मधुमाधव वसंतऋतु असे गणले जातात."

उत्तर.—होय. सायनवादी हेंच ह्मणतात. वैदिक वर्ष व वैदिक महिने सायनच आहेत. 'मेष' हें नांव सुद्धां सायनच आहे असें आपल्याच ह्मणण्यावरून सिद्ध झालें!

"पौर्णिमेच्या दिवशीं चंद्र ज्या निरयन नक्षत्रभागांत असेल त्या महिन्याचें नांव त्या नक्षत्राप्रमाणें चैत्रादि द्यावयाचें अशी एक पद्धति एका कालीं सुरू झाली ती अद्यापि चालू आहे ह्मणून चैत्रादि मासही निरयन होत"

उत्तर.—प्रथमतः या विषयीं कै. शंकर बाळकृष्ण काय लिहितात तें पहा.—(भा. इ. पृ० ३९०) चैत्रादि माससंज्ञा चित्रादि नक्षत्रांवरून प्रथम उत्पन्न झाल्या. परंतु नेहमीं चैत्रांत चित्रांवरच चंद्र पूर्ण होतो असें नाहीं. कधीं चित्रांवर, कधीं स्वातींवर आणि कधीं हस्तांवर होतो. या मुळें पुढें या संबंधें नियम करावा लागला. तो असा कीं, कृत्तिकांपासून दोन दोन नक्षत्रांवर चंद्र पूर्ण झाला म्हणजे त्या महिन्यास कार्तिक इत्यादि नांवें द्यावीं. त्यांत फाल्गुन, भाद्रपद, आश्विन हे महिने तीन तीन नक्षत्रांचे होते. या नियमानें देखील कधीं कधीं महिन्याला नांव भलतें येतें. उदाहरण शके १८१९ आषाढी पूर्णिमेच्या अंतीं ग्रहलाघवी पंचांगांत श्रवण नक्षत्र होतें. त्या वरून त्यास श्रावण नांव आलें असतें. [पृ. ४२७] सायन महिने घेतले तर ज्या महिन्यांत तारात्मक चित्रांवर चंद्र पूर्ण होईल तो चैत्र ही परिभाषा व्यर्थ होईल हें खरें परंतु सांप्रत काय अवस्था आहे? ज्या नक्षत्रीं चंद्र पूर्ण होईल त्यावरून महिन्यास नांव द्यावयाचें हा नियम प्रत्यक्ष व्यवहारांतून सोडून दिल्यास निदान वेदांगज्योतिषा. इतकीं म्हणजे सुमारें ३३०० वर्षें झालीं त्या पूर्वी किती वर्षें तो नियम सुटला नकळे! चैत्रादि संज्ञा उत्पन्न झाल्या त्या मात्र त्या नियमानें. परंतु चैत्रांत चित्रांजवळच चंद्र नेहमीं पूर्ण होतो असें नाहीं, असें दिसून आल्यावर कांहीं महिन्यांस दोन दोन आणि कांहींस तीन तीन नक्षत्रें वांटून दिलीं. परंतु योगतारा सारख्या अंतरावर नसल्यामुळें पुढें विभागात्मक नक्षत्रें मानावीं लागलीं. वेदांगज्योतिषांत विभागात्मक नक्षत्रें आहेत. सांप्रतचे ज्योतिषसिद्धांत उत्पन्न झाले तेव्हां पासून विभागात्मक सूक्ष्म नक्षत्रें पूर्ण प्रचारांत आलीं आणि 'मेषसंक्रमण ज्या महिन्यांत होईल तो चैत्र' अशी परिभाषा होऊन त्याप्रमाणें सांप्रत चालत आहे.

वरील वर्णनावरून ज्यो०केशव त्रिंबक यांचें म्हणणें किती पोकळ आहे याचा वाचकांनीं विचार करावा. शके १३०० च्या सुमाराचा ग्रंथ जो विद्यारण्यकृत कालमाधव त्यांत पुढील वचन आहे—

मेषादिस्थे सवितरि यो यो मासः प्रपूर्यते चांद्रः ॥
चैत्राद्याः स ज्ञेयः पूर्तिद्वित्वेऽधिमासोऽन्यः ॥

"मेषस्थ रवि असतां जो चांद्रमास पूर्ण होईल तो चैत्र...."

शके १५४२ च्या कालतत्वविवेचन नांवाच्या धर्मशास्त्र ग्रंथांत असें आहे—

मीनादिस्थो रविर्यत्रामारंभप्रथमे क्षणे ॥
भवेत् ते ऽब्दे चांद्रमासाश्चैत्राद्या द्वादशस्मृताः ॥

'ज्या चांद्रमासाच्या आरंभक्षणीं मीनस्थ रवि असेल तो चैत्र'

यावरून सांप्रतच्या चैत्रादि संज्ञा रूढ असून त्या सायन व निरयन या दोहोंसही सारख्याच लागू पडतात असें सिद्ध होत नाहीं काय?

"भीष्माचार्यांचें देहावसान माघ व० ८ स उदगयन झाल्यावर झालें. उदगयनारंभ म्हणजे मकरारंभ. तेथून मेषारंभ किंवा विषुव दिन ९० अंशावर असावयाचा. म्हणून मेषारंभ वैशाख वद्यांत येतो. आक्षेपांच्या उत्तरांत (पृ० ५) पेंडसे म्हणतात 'पूर्वी सायन मान चालू असो कीं निरयन असो. चित्रापूर्णमास हें संवत्सराचें मुख व वसंत हा पहिला ऋतु. चित्रांवर चंद्र पूर्ण झाला म्हणजे त्या वेळीं सूर्य रेवतींत किंवा अश्विनींत असणार त्या वेळीं ऋतु वसंत पाहिजे. म्हणजे चित्रापूर्णमासांत विषुव झाले पाहिजे.'

मेषादौ च तुलादौ च मैत्रेय विषुवस्थितः
तदा तुल्यमहोरात्रं करोति तिमिरापहः ॥ ७४
प्रथमे कृत्तिकाभागे यदा भास्वांस्तदा शशी
विशाखानां चतुर्थांशे मुने तिष्ठत्यसंशयम् ॥ ७६
विशाखानां यदा सूर्यः चरत्यंशं तृतीयकम्
तदा चंद्रं विजानीयात् कृत्तिकाशिरसास्थितम् ॥७७

तदेव विषुवाख्यो वै कालः पुण्योभिधीयते
तदा दानानि देयानि देवेभ्यः प्रयतात्मभिः ॥ ७८
तपस्तपस्यो मधुमाधवौ च शुक्रःशुचिश्चोत्तरमुत्तरस्यात् ॥
नभो नभस्योथ इषश्चसोर्जःसहःसहस्यावथ दक्षिण स्यात् ॥८१

विष्णुपुराण अंश २ अध्याय ८

यांत विषुवें मेषादि व तुलादि सांगून पुढील श्लोकांत त्यांचे स्पष्टीकरण केलें आहे. सूर्य कृत्तिका प्रथम चरणीं असून चंद्र विशाखा चतुर्थ चरणांत पूर्ण होईल, तसेंच सूर्य विशाखा चतुर्थ चरणीं असून चंद्र कृत्तिका प्रथम चरणीं पूर्ण होईल तेव्हां विषुवकाल होतो. पेंडसे (पृ० ६) मध्यें ह्मणतात 'सबंध चित्रापूर्ण मासांत सूर्य कृत्तिकांवर येऊं शकत नाहीं. अर्थात् कृत्तिकादि गणना वर्षारंभसंबंधान वेदकालीं देखील संभवत नाहीं (ह्मणजे पांडवकालीं कोठून असणार?) परंतु उदगयन माघांत झालें ह्मणजे संपात वैशाखांत झालाच पाहिजे. व वरील उतऱ्यांत तसेंच आहे. येथें कृत्तिका विशाखा व माघ हीं सायन घेतलीं तरी संपात सायन वैशाखांत जातो. मग पेंडसे यांचा चैत्र कोठें घ्यावयाचा."

उत्तर.—भीष्माचें देहावसान पौर्णिमान्त मानानें माघ वद्य ८ म उदगयन झाल्यावर झालें. ह्मणजे अमांतमानानें ते सायन पौष येईल. पौषांतच सायन मकरसंक्रमण व उदगयन व्हावयाचें. आणि असें झालें ह्मणजे विषुव पौर्णिमांतमानाच्या वैशाख वद्यांत ह्मणजे अमांत चैत्र वद्यांतच येतें! यांत ज्यो. केशव त्रिंबक यांस विपरीत तें काय दिसलें? [कु. वि. पु. ९ अं ३ रा पहा.]

ज्यो केशव त्रिंबक यांस राशि सायन आहेत हें कबूलच आहे. कारण, विषुवकालीं दिनमान व रात्रीमान समान होतें व तें मेष आणि तुला संक्रमणाच्या वेळीं होतें हें विष्णु पुराणांतील वचन त्यांस मान्य आहे. कोणताही ग्रंथ हेंच सांगत आहे. सूर्यसिद्धांतांतील वचनें केतकरांच्या वादाच्या वेळीं आह्मीं दिलींच आहेत. आतां ज्यो. के. त्रिं. हे या सायन राशींची सांगड निरयन नक्षत्रविभागांशीं घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही प्रयत्नाची दिशा नवीन आहे!

निरयनवादी राशि निरयन आहेत व नक्षत्रेंही निरयनच आहेत असें ह्मणतात. पण ज्यो. के. त्रिं. यांची क्लृप्ति कांहीं निराळीच आहे! ते ह्मणतात राशि मात्र सायन आहेत आणि नक्षत्रें निरयनच आहेत. हें घेडगुजरी लग्न लावण्याला जोशी कोठून आणावा बुवा?

ज्यो. के. त्रिं. यांनीं असें सिद्ध करण्याचा घाट घातला आहे कीं, पांडवकालीं जशी कृत्तिकादि गणना होती, तशीच विष्णुपुराणकालींही होती. आणि हें सिद्ध करण्यासाठीं 'प्रथमे कृत्तिकाभागे' इत्यादि ३ श्लोक आधारास घेतले आहेत. तेव्हां त्या श्लोकांवरून ज्यो. के. त्रिं. ह्मणतात तसेंच निष्पन्न होतें कीं अन्य होतें याचा सरळ दृष्टीनें विचार करूं.

या श्लोकांत दिलेलीं नक्षत्रें विभागात्मक आहेत हें ज्यो. के. त्रिं. यांस कबूल केलेंच पाहिजे. ह्मणून सूर्य जर कृत्तिका प्रथम चरणीं असेल तर चंद्र विशाखांच्या चतुर्थ चरणीं कसा पूर्ण होईल? चंद्र पूर्ण होण्यास उभयतांत बरोबर १८० अंश अंतर असावें लागतें. येथें तर १८० अंशां पेक्षां अधिक अंतर येतें! ह्मणजे ही वद्य १ येते. अर्थात् 'चंद्र पूर्ण होतो' हा ज्यो. केशव त्रिंबक यांचा अर्थ सपशेल चुकला!

त्याचप्रमाणें ७७ व्या श्लोकांत सूर्य विशाखांच्या तिसऱ्या चरणांत असें सांगितलें असून ज्यो. के. त्रिं. हे त्याचा अर्थ चवथ्या चरणांत करितात हेंही बरोबर नाहीं. बरें घटकाभर तेंही बरोबर धरून जरी चाललों तरी सूर्य विशाखांच्या चवथ्या चरणांत असतां चंद्र कृत्तिकाप्रथमचरणीं कसा पूर्ण होतो? या वेळीं तर १८० अंशां पेक्षां कमीच अंतर येतें! अर्थात् हेंही ह्मणणें चुकीचेंच ठरतें. श्लोकांत सूर्य विशाखांच्या तिसऱ्या चरणांत दिला आहे तोच बरोबर आहे.

तेथें असला ह्मणजे मात्र चंद्र कृत्तिका प्रथमचरणीं पूर्ण होऊं शकतो.

तात्पर्य, ज्यो. के. त्रिं. यांचें ह्मणणें चुकीचें आहे इतकेंच नव्हे तर तें खोडसाळही आहे. या श्लोकांतील वर्णनावरून सूर्य विषुवांत असतां जी पौर्णिमा होते तो पर्वकाल असून पुण्यकारक आहे ह्मणून त्या वेळीं दानें देण्यास सांगितलीं आहेत. ७६ व्या श्लोकांत 'विशाखांनां चतुर्थांशे' असें ह्मटलें आहे तेथें 'विशाखानां तृतीयांशे' असें पाहिजे

यावरून ज्यो. के. त्रिं. यांचा कृत्तिकांतला संपात तर सिद्ध होत नाहींच. उलट नक्षत्रें मात्र सायनविभागात्मक आहेत असेंच सिद्ध होतें.

"मधुमाधव ह्मणजे चैत्रवैशाख असें हल्ली ह्मणतात व तें बरोबर उताऱ्यांतही आहे. तप, तपस्य, मधु, माधव, शुक्र, शुचि हे उदगयनांतील मास आणि नभ, नभस्य, इष, ऊर्ज, सह, सहस्य हे दक्षिणायनांतील मास होत.

तप तपस्य—शिशिर ऋतु. नभ नभस्य—वर्षा ऋतु.
मधु माधव—वसंत ऋतु. इष ऊर्ज —शरत् ऋतु.
शुक्र शुचि—ग्रीष्म ऋतु. सह सहस्य—हेमंत ऋतु.

हा ऋतूंचा क्रम आहे. कारण उदगयनारंभीं शिशिरारंभ पाहिजे व केतकरांनींही याच प्रमाणें तपारंभः उदगयनं शिशिरर्तुः वगैरे मास दिले आहेत. परंतु दादाशास्त्री दामले व इतर पंचांगकारांनीं ता. २२ डिसेंबर रोजीं सायन मकरेर्कः ह्मणून ता. १३ जानेवारी रोजीं उदगयनं शिशिरर्तुः असें ह्मटलें आहे."

उत्तर—इतर पंचांगकार जसे उदगयन देण्यास चुकले तसेंच केतकर मकरसंक्रमण देण्यास चुकले आहेत!

"वरील स्थिति विष्णुपुराणांतील झाली, भारतांतील नव्हे असें पेंडसे ह्मणतील. कारण, कृत्तिकादि गणना वेदकालीं देखील संभवत नाहीं, अश्विन्यादि गणना मात्र संभवते, व ती पांडवकालीं होती असेंच ह्मणणें अधिक प्रशस्त आहे असें पेंडसे ह्मणतात."

उत्तर—पेंडसे केवळ **संभवते** असें ह्मणतात, पण आपल्याच लिहिण्यावरून ती **आहे** असें वर सिद्ध केलेंच आहे.

"विष्णुपुराण अं. ४ अ. २० मध्यें पांडवांचा वंश परिक्षितापर्यंत देऊन नंतर अध्याय २१ मध्यें 'अतः परं भविष्यानहं भूपालान्कीर्तयिष्ये' असें ह्मणून भविष्यकालचे ह्मणजे जन्मेजयापासून पुढील राजे सांगितले आहेत. यावरून विष्णु पुराण आणि पांडव समकालीन होतात. विष्णुपुराणकालीं कृत्तिकांत संपात होता अर्थात् तो पांडवकालीं असलाच पाहिजे. कृत्तिका प्रथमचरणीं संपात सुमारें ३५०० वर्षांपूर्वी येतो."

उत्तर—विष्णुपुराण पांडवसमकालीन जरी मानिलें तरी त्यांत ज्या अर्थी कृत्तिका प्रथमचरणीं संपात होता असें सांगितलेलें नाहीं (असें मागें सिद्ध केलें आहे.) त्या अर्थी पांडवकालींही नव्हता असेंच सिद्ध होतें. ह्मणून पांडवकाल ३५०० वर्षांपूर्वीचा हें ह्मणणें चुकीचें आहे.

"विष्णुपुराण अं. ४ अध्याय २४ मध्यें परीक्षितापासून शेवटच्या नंदापर्यंत राज ११९५ वर्षें राज्य करितील. पुढें चाणाक्य चंद्रगुप्तास गादीवर बसवील असें सांगितलें आहे. चंद्रगुप्त पाटणा येथें इ. स. पूर्वी ३१६ या वर्षी गादीवर बसला ह्मणजे ११९५+३१६+१९०८=३३१९ वर्षें पांडव होऊन झालीं तरी पेंडसे भारतीयुद्धकाल इ. स. पूर्वी ५२२८ देतात."

उत्तर.—पांडवकाल इतक्यावरून सिद्ध होत नाहीं. लेले यांनीं जो पांडवकाल ठरविला आहे, तो इवल्लीचा शिलालेख, भारतांतली दुहेरी नक्षत्रपद्धति आणि इतर ज्योतिषविषयक गोष्टी यांवरून. गणित बरोबर असल्याबद्दल कै० केरुनाना यांनीं सर्टिफिकीट दिलेलें आहे. अर्थात् त्यांचा पांडवकाल अगदीं बरोबर आहे. आपल्या ह्मणण्यांत मात्र विसंगतता आहे. एकदां ३९०० वर्षांपूर्वी ह्मणतां व एकदां ३३०० वर्षांपूर्वी ह्मणतां! खरें कोणतें? आपण ह्मणतां त्यांपैकीं कोणताही एक काल घेऊन भारतांतली ग्रहस्थिति जुळवून

दाखवूं शकाल काय? तसें होईल तरच आपला पांडवकाल विचारार्ह होईल. यूरोपियन विद्वान् जो काल मानितात तोच आपण मानीत आहां यापेक्षां त्यांत जास्त महत्व नाहीं.

"कदाचित् आपण विष्णुपुराण भरंसे लायक नाहीं असें ह्मणाल तरी कुं. वि. पु. अंक २ मध्यें विष्णुपुराणांतील श्लोकाचें आधारावरच आपली सर्व भिस्त आहे. प्रत्येक वेळीं हे आधार दाखवावे लागतात तरी निरयनवादी एक अवाक्षरही काढीत नाहींत असें ह्मटलें आहे. ह्मणून वरील पुराणांतील आधार आपणास मान्य असलेच पाहिजेत. व त्यांवरून पांडवकालीन नक्षत्रस्थिति निरयन आहे सायन नाहीं हे सिद्ध झालें."

उत्तर—पांडवांचा काल जरी आपण ह्मणतां तो मानिला तरी तत्कालीन नक्षत्रस्थिति निरयन होऊं शकत नाहीं. आपला अर्थ चुकीचा आहे असें मागें दाखविलेंच आहे.

'आतां वेदांगज्योतिषांत पाहूं.'

यदा माघस्य शुक्लस्य प्रतिपद्युत्तरायणं
सहोदयं श्रविष्ठाभिः सोमार्कौ प्रतिपद्यतः ॥
तदाऽऽनभसः शुक्लसप्तम्यां दक्षिणायनं
सार्पार्धे करुते युक्तिं चित्रायांच निशाकरे ॥

गर्ग

प्रपद्येते श्रविष्ठादौ सूर्याचांद्रमसावुदक्
सार्पार्द्धे दक्षिणार्कस्तु माघश्रावणयोः सदा ॥

ऋग्वेदज्योतिष

जेव्हां सूर्यचंद्र धनिष्ठांवर असतां माघशुक्ल प्रतिपदेस उत्तरायण होतें तेव्हां नभ मासाच्या शुक्ल सप्तमीस दक्षिणायन होतें व तेव्हां आश्लेषार्धी सूर्य व चित्रार्धघें चंद्र असतात.

धनिष्ठांचे आरंभीं चंद्रसूर्य उत्तरेस वळतात व आश्लेषार्धावर दक्षिणेस वळतात. सूर्य सर्वदा माघ व श्रावण या मासांत उत्तरेस व दक्षिणेस वळतो.

यांत धनिष्ठारंभीं उदगयन (मकरारंभ) आणि आश्लेषार्धावर दक्षिणायन सांगितलें आहे.

मकरसंक्रमण व उदगयन

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

पुस्तक ९ वें अंक २ यांत आपण माझें पत्र छापलें असून त्यांत व पुढील अंकांत आपलें उत्तर आलें आहे. त्यांतील विसंगतता आपल्या वाचकांच्या ध्यानांत येण्यासाठीं पुढील चार ओळी पाठविल्या आहेत, त्यांस स्थळ मिळावें.

पुस्तक ८ अंक ३३ वा यांत "केतकी पंचांगांत याच दिवशीं उदगयनं शिशिरर्तुः ११।१२" असें लिहिलें आहे. ह्मणजे मुंबई टाईम १० वाजून ४१ मि. नीं उदगयनप्रवृत्ति झाली आहे.— हा फरक कां पडला हें कळत नाहीं—याचें उत्तर असें कीं, घ० ११।१२ ह्मणजे घंटे १० मि. २९ ही उज्जयिनीची वेळ झाली. यांत मुंबईचें ऋण रेखांतर १२ मि. मिळविलीं असतां १० घं. १७ मि. ही मुंबईची उदगयनाची वेळ झाली. तेव्हां फरक काय तो ९ मि. झाला. आपलें धनऋणाकडे नीट लक्ष्य न गेल्यामुळें आपण १९ मि. चा फरक काढला आहे.

याच अंकांत 'धर्मवृद्धिरपांप्रस्थ क्षपान्हास उदग्गतौ' याचा अर्थ "उत्तरायणाच्या आरंभीं सूर्य मकर राशीस जातो असें या वचनांत ह्मटलेलें आहे" असा आपण करितां. तर वरील वचनांत मकररास हा कोणत्या शब्दाचा अर्थ होतो हें कृपाकरून दाखवावें. *

* वरील वचन आरंभींच दिलें असून त्या खालीं—या वचनावरून ज्या दिवशीं दिनमान वाढूं लागतें व रात्र कमी होऊं लागते त्या दिवशीं सूर्याचें उदगयन सुरू झालें असें समजावयाचें—असें लिहिलें आहे. पुढें तिसऱ्या पेजाच्या आरंभीं "उत्तरायणाच्या आरंभीं सूर्य मकर राशिस जातो असें या वचनांत ह्मटलेलें आहे" असें जें वाक्य आहे त्याच्या

१ मेषादि राशि हे तारकापुंज आहेत

मेषादि संज्ञा प्रथम तारापुंजांच्या आकृति विशेषावरून पडल्या कीं काय या विषयीं वाद आहे असें दीक्षित ह्मणतात. यावरून ही गोष्ट संशयग्रस्त आहे इतकेंच त्यांचें ह्मणणें. अश्विनी, भरणी आणि कृत्तिकांच्या कांहीं तारा मिळवून मेषाची आकृति होते असें नाहीं. इत्यादि माहितीपासून आपण कोणती गोष्ट प्रतिपादितां हें समजत नाहीं. त्यांचें अवलोकन भयंकर असलें ह्मणून त्यांचीं मतें सर्वांनीं मुकाट्यानें कबूल केलींच पाहिजेत असा नियम सिद्ध होत नाहीं. मेषादिराशि यांचीं स्वरूपवर्णनें ज्योतिषग्रंथांत आहेत.—

॥ मत्स्यौ घटी नृमिथुनं सगदं सवीणं ॥ चापी नरोश्वजघनो मकरो मृगास्यः ॥
॥ तौली ससस्यदहना कुवगाच कन्या ॥ शेषा स्वनामसदृशाः स्वचराश्च सर्वे ॥

बृहज्जातक संज्ञाध्याय.

एखाद्या हायस्कुलांत खगोल असेल तर त्यावर क्रांतिवृत्तांत बारा राशींचीं चित्रें काढलेलीं पाहण्यास मिळतील. त्यांत मेषाकृति कोणकोणत्या ताऱ्यांची बनली आहे हें स्पष्ट समजेल, वृषभाकृति कोणत्या ताऱ्यांची बनली आहे हें स्पष्ट समजेल. संपातावरोबर या आकृतीही मागें सरकतात असें विज्ञानकार सिद्ध करूं शकतात काय? या मेषादि आकृति हिपार्कसच्या काळीं ज्या ज्या ताऱ्यांनीं बनल्या होत्या त्याच ताऱ्यांनीं आतांही बनल्या आहेत. तेव्हांपासून संपात एक राशी मागें सरकला आहे. तथापि राशींनीं आपली जागा सोडली नाहीं. विषुवसंपात सदर खगोलावर हल्लीं मीन राशींत व उदगयन बिंदु धनु राशींत असल्याचें दिसून येईल. भूपृष्ठावरील देशसंस्था जशी स्थिर

आरंभीं ॥ अयनस्योत्तरस्यादौ मकरं याति भास्करः ॥ हें वाक्य होतें. तें कंपाझिटरांच्या चुकीनें राहून फ्रूफ तपासणारास उमगलें नाहीं अर्थात् "धर्मवृद्धि" या वचनाचा तो अर्थ नसून या श्लोकाचा आहे असें समजावयाचें

—संपादक कुंडलीविज्ञान—

आहे तशी आकाशांतील नक्षत्रांची कांहीं आकृति कल्पून त्याच्या साहाय्यानें स्थाननिर्देश करण्याची पूर्वी वहिवाट असे. इंग्रजींत राशींना साइन असें ह्मणतात. साइन ह्मणजे खूण. तेव्हां खुणेसाठीं नक्षत्रें उपयोगांत घेतलीं होतीं असें ठरतें. सायन गणनेंत खुणांचा मागमूस राहत नाहीं. ह्मणून सायन मेष, सायन वृषभ असें ह्मणणें वेडेपण ठरतें. पाहिजे तर सायन पहिली रास, सायन दुसरी रास असें ह्मणतां येईल. किंवा मधुरास, माधवरास इत्यादि ह्मणणेंही निर्दोष होईल. व ही सुधारणा आह्मी केतकी पंचांगांत आज दहा वर्षांपूर्वीच केलेली आहे. केतकी पंचांगांत ज्या चांद्रमासांत मधुमासारंभः लिहिलें आहे त्या चांद्रमासास सायन पद्धतीनें मधुमास ह्मणतां येईल मकरसंक्रमण न ह्मणतां सायन पद्धतीनें दशमसंक्रमण किंवा तपःसंक्रमणं उदगयनं शिशिरर्तुः असें ह्मणणें निर्दोष होईल. या सर्व सुधारणा आह्मीं पूर्वीच केल्या असून त्या विज्ञानकर्त्यांस दिसत नाहींत किंवा आवडत नाहींत. त्यांस कै. लेल्यांचें घेडगुजरी सायन पंचांग पाहिजे आहे. पंचांग सायन ह्मणावयाचें व राश्यादि चल विभागांस मेषादि अचल विभागांचीं नावें देण्याचें. हें कृत्य बाटे लोकांनीं धर्मांतर करून पुनः हिंदुसमाजांत मिसळतां यावें ह्मणून अज्ञानी लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठीं हिंदु लोकांचीं नावें ठेवून घेण्याइतकेंच निंद्य आहे.

आमच्या धर्मशास्त्रांतील पंचांगपद्धति निरयन आहे. किंवा सायन निरयन हा भेद उत्पन्न होण्यापूर्वीची ती आहे. ह्मणूनच चलसंस्कृत तिग्मांशोः संक्रमो यः स संक्रमः ॥ अशी सायनवाद्याकडून तिजवर दूषणें येऊं लागलीं. तर अशा प्रसंगीं नुसतीं निंदाप्रचुर वाक्यें दाखल करण्यापासून कांहीं उपयोग होत नाहीं. सायनवाद्यांनीं एक नवीन संचालित सायन धर्मशास्त्र निर्माण करावें. हा सरळ मार्ग सोडून निरयन स्थिर पद्धतीचीं नावें सायन चलपद्धतीस देणें ह्मणजे शिंगें

मोडून वासरांत शिरणें किंवा धर्मांतर करून समाजांत बेमालूम मिसळून जाणें अशासारखा हा प्रयत्न आहे. अशा प्रयत्नास आमची संमति किंवा साहाय्य कधींही मिळणार नाहीं. सायन व निरयन हा भेद कायम राखून होण्यासारख्या सर्व सुधारणा केतकी पंचांगांत आहेतच. पाहिजे तर मध्यादि सायनमासनामें पंधरवड्याच्या खालच्या बाजूस देतां येतील. ज्यांस निरयन संक्रमणें पुण्यद वाटतील त्यांनीं निरयन संक्रमणकालीं स्नानदानादि कर्में आचरावीं. ज्यांस सायन संक्रमणें पुण्यद वाटतील त्यांनीं सायन संक्रमणकालीं तीं तीं कर्में आचरावीं. पंचांगकार कांहीं धर्मशास्त्री नव्हत. त्या त्या शुद्ध पद्धतीस अनुसरून ते ते काल पंचांगांत देणें एवढेंच पंचांगकाराचे कर्त्तव्य. सायननिरयन पद्धतीपैकीं कोणती ग्राह्य व कोणती अग्राह्य हें ठरविणें समाजाचें काम आहे. पंचांगकाराचें नव्हे. या तत्वावरच आम्ही केतकी पंचांग निर्माण केलें आहे. ज्यांस भेसळीचें पंचांग पाहिजे असेल त्यांनीं ज्यो. लेले यांचें सायन पंचांग पुन्हा चालू करावें. नुसतें केतकरांवर बोटें मोडण्यांत अर्थ नाहीं.

२ मकर संक्रमणकालीं आतां उदगयन होत नाहीं.

खरें, खोटें, सायन, निरयन हे सापेक्ष शब्द आहेत. ह्मणून पंचांगांत उदगयनें निरनिराळीं असतील तर एकास खरें तर दुसऱ्यास खोटें असें ह्मणण्याची जरुरी पडते. त्याच दृष्टीनें आम्हीं खरें उदगयन ह्मटलें आहे. पण ही गोष्ट विज्ञानकारास खपली नाहीं. पण चमत्कार असा कीं विज्ञानकार स्वतः सूर्यसिद्धांताच्या व्याख्यानामध्यें 'ज्यो. केतकरांनीं उदगयन मात्र खरें देण्याची पद्धती स्वीकारिली.' असें ह्मणतांना त्यांस शंका आली नाहीं. या प्रकरणांत विष्णुपुराण व सूर्यसिद्धांत यांतील उताऱ्यावर विज्ञानकारांची सर्व भिस्त आहे असें ते ह्मणतात. व या उताऱ्याबद्दल निरयनवादी एक अवाक्षरही

काढीत नाहींत हें पाहून त्यांस अत्यंत खेद वाटतो. पण या उताऱ्यामध्यें कांहींच महत्व नाहीं. ॥ अयनस्योत्तरस्यादौ मकरं याति भास्करः ॥ इत्यादि श्लोकांत शून्य अयनांशकालीं असलेली पंचांगस्थिति वर्णिली आहे. या पलीकडे कांहीं नाहीं. अशी स्थिति सर्वदा असते असें निर्देश त्यांत मुळींच नाहीं. ॥ अयनस्योत्तरस्यादौ ॥ इत्यादि स्थिति शून्य अयनांशकालीं होती हें आह्मी कबूल करितों. व केतकी पंचांग पद्धतीनें त्या कालचें पंचांग बर्तविलें तर मकरेकः उदगयनं हा शेरा डिसेंबरच्या २२ व्या तारखेसच पडेल.

विज्ञानकारांची विष्णुपुराण व सूर्यसिद्धांत यांतील उताऱ्यावर सर्व भिस्त असण्याचें कारण इतकेंच कीं पूर्वोक्त ग्रंथ त्यांच्या समजुतीप्रमाणें लक्षावधि वर्षांपूर्वीचे आहेत. तेव्हां इतक्या जुन्या ग्रंथांत १४०० वर्षांपूर्वीच्या स्थितीचें वर्णन येणें कसें संभवतें? याचें समाधान इतकेंच कीं हे दोन्ही ग्रंथ शून्य अयनांशाच्या अलीकडचे आहेत या विषयीं तिलमात्र शंका नाहीं. वैष्णवमताची उत्पत्ति झाल्यावर इ० स० १०४५ च्या सुमारास विष्णुपुराण रचलें गेल्याबद्दल हंटरस्कृत इतिहासांत स्पष्ट उल्लेख आहे. सूर्यसिद्धांतांत रोमकपट्टणाचा निर्देश आहे. रोम शहराच्या उत्पत्तिविषयक राम्यूलस् व रीमस् या भावांची आख्यायिका इतिहासप्रसिद्ध आहे. त्यांत रोम शहर इ. स. पूर्वी ७०० वर्षांच्या सुमारास बसलें गेल्याबद्दल वर्णन आहे. रोम हें बरींच वर्षें अप्रसिद्ध होतें. रोम व कार्थेज या दोन राष्ट्रांत वर्चस्वाविषयीं शेंकडों वर्षें युद्धें चाललीं होतीं. शेवटीं कार्थेजचा महावीर हानीबाल याचा नायनाट केल्यावर इ. स. पूर्वी २९० वर्षांच्या सुमारास किंवा त्याच्याही नंतर ज्यूलिअस सीझरच्या विजयाच्या समयीं इ. स. आरंभीं रोम शहराची प्रख्याति झाली. ह्मणून रोम शहराचा उल्लेख करणारा सूर्यसिद्धांत शून्यायनांशाच्या सुमारास

झाला असावा हें स्पष्ट आहे. या ग्रंथाच्या कालनिर्णयासंबंधी विशेष माहिती जिज्ञासूंनीं निरनिराळे ग्रंथ वाचून संपादन करावी.

३ सायन पद्धतीनें वंध्यापुत्राप्रमाणें मकर राशीची उत्पत्तीच होत नाहीं.

या सदराखालीं विज्ञानकारांनीं लिहिलेल्या मजकुरांत कांहीं हांसल नाहीं. शुद्ध निरयनवादी हिंदु बाटे नव्हत किंवा शुद्ध सायनवादी युरोपियन ही बाटे नव्हत. दोनही पद्धतींतील नांवाची खिचडी करून न हिंदुर्न यवनः अशा प्रकारच्या ज्यो. लेले यांच्या पंचांगाची प्रवृत्ति करूं इच्छिणारे मात्र बाटे या लक्षणानें युक्त होतात.

शतपथ ब्राह्मणांत सांगितलेलीं २७ मुख्य नक्षत्रें व २७ उपनक्षत्रें यांचा पाहिजे तर पुंजात्मक व विभागात्मक अर्थ करितां येईल. पण विभागात्मक ह्मणजे सायन विभागात्मक असें मात्र ह्मणण्यास कांहीं आधार नाहीं. जर वेदांतील वर्ष सायन व नक्षत्रेंही सायन होतीं तर मृगापासून अश्विनीपर्यंत मागें मागें संपात हटत गेल्याप्रमाणें निरनिराळीं नक्षत्रें आद्यस्थानीं कां गणलीं गेलीं? रा. टिळक यांचा ओरायन ग्रंथ वाचून पहाल तर आह्मीं काय ह्मणतों त्याची खात्री होईल. वराहमिहिरकृत बृहत्संहितेंत पुढील आर्या आहेत असें वाटतें. त्या जरी आह्मांस नीटशा स्मरत नाहींत तरी पुढें लिहिल्यासारख्या आहेत. आह्मांजवळ पुस्तक नाहीं. विज्ञानकारांनीं त्यांचा खरा पाठ दिल्यास उपकार होतील.

॥ आश्लेषार्धाद् दक्षिणमुत्तरमयनं रवेर्धनिष्ठाद्यं ॥
॥ नूनं कदाचिदासीत् येनोक्तं पूर्वं शास्त्रेषु ॥ १
॥ संप्रति दक्षिणमयनं कर्कादेः स्यान्मृगादितश्चान्यत् ॥
॥ उक्ताभावो विकृतिः प्रत्यक्षपरीक्षणैर्व्यक्तेः २

वरहमिहिर

॥ प्रपद्येते श्रविष्ठादौ सूर्याचंद्रमसावुदक् ॥
॥ सार्पार्धे दक्षिणार्कस्तु माघः श्रावणयोः सदा ॥ ३

लगध

वेदांगज्योतिषाचा कर्त्ता जो लगध त्याचे काळीं आश्लेषार्धावर ह्मणजे रेवत्यंतापासून ११३$\frac{1}{3}$ अंशावर दक्षिणायन होत असे. तें संप्रति ह्मणजे वराहमिहिराचे काळीं कर्क राशीच्या आरंभीं ह्मणजे ९० अंशांवर होत आहे. पाहिजे त्यांनीं प्रत्यक्ष पाहून घ्यावें असें वराहमिहिर कंठरवानें सांगत आहे. जर विभागात्मक नक्षत्रें व राशि सायन असत्या तर उदगयन नेहमीं ९० अंशांवरच झालें पाहिजे. पण पूर्वी ११३$\frac{1}{3}$ अंशांवर खरोखर (नूनं) होतें व हल्लीं ९० अंशांवर आहे असें वराहमिहिर सांगतो ह्मणजे त्याचे वेळीं संपात २३$\frac{1}{3}$ अंश मागें सरकला होता. ही गोष्ट जर खरी आहे तर हा प्रकार नक्षत्रें व राशि निरयन असल्याशिवाय घडून येणें अशक्य आहे. या वरून प्राचीन काळीं नक्षत्रें व राशि सायन असत हें विज्ञानकर्त्यांचें ह्मणणें सबशेल खोटें ठरतें. व लोकांच्या मनांत भलताच ग्रह उत्पन्न करणें ह्मणजे त्यांच्या डोळ्यांत जाणून बुजून धूळ टाकणें होय. हें काम केतकर करीत आहेत कीं विज्ञानकार करीत आहेत याचा निर्णय करणें आह्मीं सूज्ञ वाचकांवरच सोपवितों.

होनावर
१० जानें. १९०९

आपला
वेंकटेश बापूजी केतकर

चुकीची दुरुस्ती—अंक २ यांतील सुमारें २००० वर्षांपूर्वी इत्यादि पारिप्राफाच्या शेवटीं "व ठेवणेंही चूक आहे" याबद्दल न ठेवणें ही चूक आहे असें पाहिजे.

वराहमिहिर-केतकर आणि के. त्रिं. पेंडसे.

धन्वंतरिक्षपणकामरसिंह शंकु-
वैतालभट्ट घट खर्परकालिदासाः ॥
ख्यातो वराहमिहिरो नृपतेःसभायां
रत्नानि वै वररुचिर्नव विक्रमस्य ॥

ज्योतिर्विदाभरण

वरील श्लोक प्रसिद्ध आहे व तो ज्योतिर्विदाभरण ग्रंथांतला आहे. यांत विक्रमाच्या पदरीं जीं नऊ रत्नें होतीं त्यांतच वराहमिहिर हा एक होता असें सांगितलें आहे. बृहज्जातक व बृहत्संहिता यांचा कर्त्ता जो वराहमिहि तोच हा असें मानिल्यास त्याचा काल विक्रमशकाच्या आरंभाच्या सुमारास असला पाहिजे असें ठरतें. ह्मणजे शालिवाहनशकापूर्वी १३५ वर्षें हा त्याचा काल येतो. अर्थात् या वेळीं कोणत्याही पद्धतीनें शून्य अयनांश येऊं शकत नाहींत.

पंचसिद्धांतिका ग्रंथाचा कर्त्ताही वराहमिहिरच आहे. त्याचा काल कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं शा. श. ४२१ हा ठरविला आहे. अर्थात् विक्रमाचा वराहमिहिर व हा वराहमिहिर हे एक नव्हत हें उघड आहे. या विषयीं कै० दीक्षित हे भा. ज्यो. चा इतिहास पृष्ठ २१२ मध्यें लिहितात—

"ज्योतिर्विदाभरण ग्रंथ रघु, कुमार इ० काव्यें करणाऱ्या प्रसिद्ध कालिदासानें केला असें सांगितलें आहे आणि

वर्षैःसिंधुरदर्शनांबरगुणै ३०६८ र्यांते कलौ संमिते
मासे माधवसंज्ञिते च विहितो ग्रंथक्रियोपक्रमः ॥

या श्लोकांत गतकलिः ३०६८ ह्मणजे विक्रम संवत् २४ या वर्षी या ग्रंथास आरंभ झाला असें त्यांत झटलें आहे. परंतु

शकाःशरांभोधियुगो ४५ नितो ह्रतो
मानं खतर्कै६०स्यनांशकाःस्युः ॥

ही अयनांश काढण्याची रीति या ग्रंथांत दिली आहे. आणि 'मत्वा वराहमिहिरादिमतैः' असें पहिल्या अध्यायांत आहे. या मुळें त्यां ग्रंथावर भरंसा ठेवितां येत नाहीं. या ग्रंथाप्रमाणें विक्रमसंवताच्या आरंभाच्या सुमारास कोणी वराहमिहिर असल्यास तो पंचसिद्धांतादिकांच्या कर्त्याहून निराळा असला पाहिजे"

कै. दीक्षित हे पं. सि. चा कर्त्ता व बृ. सं., बृ ज्ञा. यांचा कर्त्ता एकच मानितात व त्याचा काल शके ४२७ ठरवितात. हें ह्मणणें कितपत सयुक्तिक आहे याचा विचार केला पाहिजे.

आश्लेषार्धादक्षिण मुत्तरमयनं रवे र्धनिष्टाद्यं ।
नूनं कदाचिदासीद्येनोक्तं पूर्वशास्त्रेषु ॥
सांप्रतमयनं सवितुःकर्कटकाद्यं मृगादिकाद्यान्यत् ।
उक्ताभावो विकृतिःप्रत्यक्षपरीक्षणे व्यक्तिः ॥

बृ. सं. अ. ३

बृहत्संहिताकार वराहमिहिर ह्मणतो, आश्लेषांच्या अर्धावर दक्षिणायन व धनिष्ठांच्या आरंभीं उत्तरायण होतें असें पूर्वीच्या शास्त्रकारांनीं सांगितलेलें कदाचित् खरें असेल. पण सांप्रत सूर्याचें दक्षिणायन कर्क राशीच्या आरंभीं व उत्तरायण मकर राशीच्या आरंभीं होत आहे याबद्दल प्रत्यक्ष पाहून खात्री होईल.

आतां, पंचसिद्धांतिकार वराहमिहिर काय ह्मणतो, तें पहा. —

आश्लेषार्धादासीद्यदा निवृत्तिःकिलोष्णकिरणस्य ।
युक्तमयनं तदासीत् सांप्रतमयनं पुनर्वसुतः ॥

आश्लेषांच्या अर्धावर सूर्य जव्हां परतत होता तव्हां (दक्षिण) अयन बरोबर होत होतें. पण सांप्रत पुनर्वसूपासून (दक्षिण) अयन

अपणास या दोन प्रकारच्या वचनांची सांगड कशी बसते हें पहावयाचें आहे. बृ. सं. कार ह्मणतो कर्क राशीच्या आरंभीं दक्षिणायन होत आहे व पं. सि. कार ह्मणतो, पुनर्वसूपासून दक्षिणायन

होत आहे! जर हे दोन ग्रंथकर्ते एकच मानले तर त्यांच्या ह्मणण्यांत विरोध दिसतो तो कां? कर्क राशीचा आरंभ पुनर्वसूंच्या चवथ्या चरणाच्या आरंभीं होतो हें सायन व निरयन या दोन्ही पक्षांस कबूलच असलें पाहिजे. पण वरील वचनांत पहावें तों पुनर्वसूंच्या आरंभींच कर्क राशीची प्रवृत्ति होत आहे! हा काय चमत्कार? अर्थात् वराहमिहिर हा एक सायनवादी तरी असला पाहिजे किंवा ते दोन निरनिराळे कोणी असले पाहिजेत. काय कबूल करितां बोला–ते दोन एकच आहेत काय? 'होय' ह्मणत असाल तर वराहमिहिर सायनवादीच असला पाहिजे व त्याची कर्क आणि मकर रास सायनच असली पाहिजे, असें कबूल करा. एरवीं पुनर्वसूंच्या आरंभीं व कर्क राशीच्या आरंभीं दक्षिणायन होणें शक्य नाहीं. आणि मग वराहमिहिर हा शून्य अयनांशकालचा असेंही ह्मणतां येणार नाहीं. कारण, पुनर्वसूंच्या आरंभीं दक्षिणायन ह्मणजे अयनांश १० येतात!

कै० शंकर बाळकृष्ण यांनीं तर त्याचा काल शके ४२७ हा दिला आहे. व तो पंचसिद्धांतिकेवरून दिला आहे. निरयनवादी हे दोन वराहमिहिर एक नव्हत असेंच ह्मणतील. पंचसिद्धांतिकाकार जर शके ४२७ तला तर बृ. सं. कार त्याच्या आधींचाच असला पाहिजे असें निरयनवाद्यांस कबूल केलेंच पाहिजे. मग ४२७ च्याही पूर्वी कोणत्या पद्धतीनें शून्य अयनांश येतात, असा आमचा निरयनवाद्यांस प्रश्न आहे. या प्रश्नाचें उत्तर जर त्यांना देतां येणार नाहीं, तर वराहमिहिर शून्य अयनांश कालचा असें आह्मीं कधींही कबूल करणार नाहीं.

वराहमिहिर जर शून्य अयनांशकालचा ठरेल तरच "सांप्रतमयनं सवितुः कर्कटकाद्यं मृगादितश्चान्यत्" या त्याच्या ह्मणण्यांतील

कर्क व मकर हे राशी निरयन आहेत असें ह्मणतां येईल. नाहींपेक्षां ते सायनच असले पाहिजेत असें सिद्ध होतें. रा० केशव बळवंत पेंडसे हे वराहमिहिर शून्य अयनांश कालचा नाहीं असें कबूल करितात, पण त्याचे कर्क व मकर राशि निरयनें आहेत असें ह्मणतात. व आपल्या ह्मणण्याच्या समर्थनार्थ ते खालील श्लोक देतात—

अप्राप्य मकरमर्कों निवृत्तो हन्ति सा परां याम्यां ॥
कर्कटकसंप्राप्तो विनिवृत्तश्चोत्तरां सेन्द्रीम् ॥

बृ. सं.

यांत सूर्य मकर राशीस पोंचण्यापूर्वी जर परत फिरेल ह्मणजे अयनानिवृत्ति होईल तर पश्चिम आणि दक्षिण दिशांस राहणाऱ्यांचा आणि कर्क राशीपर्यंत जाण्यापूर्वी परत फिरेल तर पूर्व आणि उत्तर दिशांस राहणाऱ्यांचा नाश होईल असें सांगितलें आहे. जर वराहाचें गणित सायन असेल तर मकराला पोचण्यापूर्वी सूर्य परत फिरणारच नाहीं. परंतु गणितागत सूर्य व वेधसिद्ध सूर्य यांत फरक आल्या कारणानें त्यानें वरील श्लोक लिहिला असावा. या प्रमाणें के. त्रि. यांचें ह्मणणें आहे.

जो वराहमिहिर 'कर्कटकाद्यं' 'मृगादितः' असें ह्मणून 'प्रत्यक्ष परीक्षणैर्व्यक्तिः' असें बजावतो तोच वराहमिहिर वरील मूर्खासारखें विधान करील काय? शिवाय 'अप्राप्यमकरमर्कों' हें ह्मणणें शून्य अयनांशानंतरचें संभवतें. परंतु वराहमिहिर कोणताही घेतला तरी तो शून्य अयनांशानंतरचा ठरत नाहीं, पूर्वीचा ठरतो असें मागें दाखविलेंच आहे. अर्थात् वरील वचन जरी बृ. सं. लें असलें तरी तें 'कर्कटकाद्यं' ह्मणणाऱ्या वराहमिहिराचें खास नव्हे. तें मागाहून त्याच्या नांवाखालीं कोणी तरी दडपून दिलेलें असावें. कदाचित्

त्याचा अर्थही निराळाच कांहीं असेल. कारण तें वचन फलितासंबंधाचें आहे. फलिताचे सिद्धांत शेंकडों वेळां अनुभव घेऊन बांधलेले असतात. एकच वेळां अनुभव आला असेल तर तो सिद्धांत नव्हे. जर वरील वचनाचा अर्थ के. त्रिं. ह्मणतात तसा मानिला तर त्या वचनकारास अनेक वेळां अनुभव आला असला पाहिजे. व प्रत्येक वर्षी पूर्व, उत्तर व पश्चिम दक्षिण दिशांश राहणाऱ्यांचा नाश होत असला पाहिजे. आज १४०० वर्षें हीच स्थिति आहे! सूर्य मकर राशीस पोंचण्या पूर्वीच अयनप्रवृत्ति होत आहे! तेव्हां याचा तलगडा के. त्रिं. करितील काय? शिवाय तसाच जर त्याचा अर्थ असेल तर दोन्ही अयनांच्या वेळीं एकच स्थिति कशी असूं शकेल? अर्थात त्याचा अर्थ कांहीं निराळा असला पाहिजे. सूर्य मकरराशीस पोंचण्यापूर्वी परतणारा दुसरा कोणी ग्रह असेल व त्या संबंधानें तें वाक्य असेल असें वाटतें. बृहत्संहिताकार वराहमिहिर इतका बेडगळ नव्हता.

तात्पर्य, वराहमिहिर हा शून्य अयनांशकालाच्या पूर्वीचा असून त्याच्या राशी सायन होत्या हें सिद्ध आहे. ह्मणूनच आह्मीं ह्मणतों केतकर मकरसंक्रमण देण्यास चुकले आहेत.

वराहमिहीर शून्य अयनांश कालचा आहे असें प्रथम केतकरांनीं सिद्ध करावें व मग डोळ्यांत धूळ फेंकण्याचा प्रयत्न विज्ञानकार करीत आहेत असें ह्मणावें इतकेंच आम्हीं त्यांस नम्रपणानें विनवितों.

दीक्षितांनीं वराहाचा काल शके ४२७ हा ठरविला तो पंचसिद्धांतिकेंतल्या रोमकसिद्धांताच्या पहिल्या अध्यायाच्या खालील आर्येवरून, ती अशी—

सप्ताश्विवेद ४२७ संख्यं शककालमपास्य चैत्रशुक्लादौ ॥
अर्धास्तमिते भानौ यवनपुरे भौमदिवसाद्यः ॥

यांतील ४२७ हा शालिवाहनाचा शक धरून चैत्र शु० १ ला मंगळवार होता असें दाखविण्यासाठीं त्यांना बऱ्याच लटपटी कराव्या लागल्या आहेत. त्या अशा.—

(१) [पृ.१९६ पहा] पंचसिद्धांतिकेतले क्षेपक हे मध्यम मेषसंक्रमण ज्या दिवशीं झालें त्या दिवशींचें ह्मणजे शके ४२७ अमांत चैत्र कृ० १४ रविवार या दिवशींच आहेत.

(२) त्यांत कांहीं त्या दिवशीं मध्याह्नीचे व कांहीं मध्यरात्रीचे आहेत.

(३) या चैत्र कृष्ण १४ च्या पुढील शुद्ध प्रतिपदा ह्मणजे वैशाख शु. १ मंगळवारीं येते. हिलाच वराहानें चैत्र शुक्ल १ ह्मटलें आहे.

अशा लटपटींनें वराह शके ४२७ तला असें मानलें आहे. पण हें त्यांचें ह्मणणें समाधानकारक नाहीं हें उघड आहे. श्लोकांत नुसतें 'शककाल' आहे व त्यावरून ४२७ हा शालिवाहनशक धरिला आहे. शककाल याचे अर्थ दोन होतात. एक शक जातीच्या राजांचा काल किंवा शक नांवाच्या एका राजाचा काल. शालिवाहन असा त्याचा अर्थ होत नाहीं. असें असून "मारून मुटकून वैद्यबोवा" प्रमाणें त्या आर्येचा अर्थ करून वराहाचा काल ठरविला आहे हें बरोबर नाहीं. अर्थात् तो त्या शकांतला नसून फार प्राचीन आहे.

दुसरी आणखी एक मजा अशी आहे कीं वराह शक ४२७ तला एकेठिकाणीं ह्मणून त्यांनीं दुसऱ्या ठिकाणीं "सांप्रतमयनं पुनर्वसुतः" असें त्याचेंच वचन ह्मणून दिलें आहे! पुनर्वसूवर अयन शक १०४४ च्या सुमारास अगर पुढें होतें. तें ४२७ त कसें आलें? तेव्हां हें ह्मणणें तर वराहाचें खास नव्हे मग तो कोणत्याही शकांतला असो.

तात्पर्य कितीही धडपड केली तरी वराह शालिवाहन शकांत

आणणें अशक्य आहे. व त्यामुळें तो शून्य अयनांशकालचा हेंही ठरणें सर्वथा अशक्य आहे.

भा. ज्यो. इ. पृ. २१२ मध्यें दीक्षित लिहितात—'पुण्यास राहणारे कै. वा. रघुनाथशास्त्री टेंभूकर नामक एक ज्योतिषी यांनीं वराहमिहिराच्या कालाविषयीं मला एक श्लोक सांगितला. तो बेदर येथें राजाराम व्यंकटेश शास्त्री यांपासून कुतूहलमंजरी नामक ग्रंथांतून घेतला असें त्यांनीं सांगितलें. तो श्लोक असा—

स्वस्तिश्रीनृपसूर्यसूनुजशके याते द्विवेदांबर
त्रै ३०४२ मीनाब्दमिते त्वनेहसिजये वर्षे वसंतादिके
चैत्रे श्वेतदले शुभे वसुतिथावादित्यदासादभू
द्वेदांगे निपुणो वराहमिहिरो विप्रो रवेराशिभिः ॥

यांत युधिष्ठिर शक ३०४२ या वर्षीं सूर्याच्या अशीर्वादानें आदित्यदासपुत्र वराहमिहिर जन्मला असें ह्मटलें आहे. पंचसिद्धांतिकाकार वराहमिहिरही "आदित्यदासतनय" आणि "सवितृलब्धप्रसाद" होता. परंतु या श्लोकांतील संवत्सर कोणत्याही पद्धतीनें गणिताशीं मिळत नाहीं. यावरून हा श्लोक विश्वसनीय नाहीं.

या प्रमाणें दीक्षितांनीं संवत्सरं मिळत नाहीं ह्मणून तो काल विश्वसनीय नाहीं असें ह्मटलें आहे. पण यु. श. ३०४२ ह्मणजे शालिवाहनापूर्वी १३७वर्षे येतात. यावरून वरील वर्णन विक्रमकालीन वहाराचें आहे असें दिसतें.

सारांश वराहमिहिर शालिवाहनशकांतला नव्हे व ह्मणून तो शून्य अयनांशकालीन नव्हे असेंच ह्मणावें लागतें. अर्थात् त्याचे कर्क मकर हे राशी सायनच असले पाहिजेत असें सिद्ध होतें.

अगस्त्युदयाच्या संबंधानें कन्येच्या ७ अंशावर हें चुकून छापलें गेलें आहे. तें सिंहाच्या ७ अंशांवर असें पाहिजे असें भि. म. पेंडसे

यांचें ह्मणणें आहे व त्यावरून वराहाचा काल २३०० वर्षांहून मागचा ठरतो. या सबंधानें जास्त विचार आह्मी सवडीनें करणार आहों. कारण, बृहत्संहितेची पोथी आमच्या जवळ नाहीं ती मिळाल्यावर या गोष्टींचा विचार करूं.

वराहमिहिराच्या ह्मणण्याचा तरी चमत्कार वाटतो. प्रथम आश्लेषार्धात् लिहून नंतर कर्कटकाद्यं असें कां लिहितो? त्याला नक्षत्रावर उदगयन सांगतां येत नव्हतें काय? तो जर पुनर्वसूंच्या चवथ्या चरणाच्या आरंभीं उदगयन होत आहे असें लिहिता तर सायनवाद्यांचीं तोंडें निखालस बंद झालीं असतीं. संपातांचें चलन त्याला कळलें नव्हतें काय? वराहमिहिर हा कांहीं फाटका ज्योतिषी नव्हता. बरें कळलें नव्हतें, असें जरी धरून चाललें तरी त्यानें वास्तविक नक्षत्रावर उदगयन सांगवयास पाहिजे होतें. पहिल्या चरणांत नूनं व कदाचित् असे दोन शब्द आहेत. केतकरांनीं त्यांतला नूनं तेवढा उचलला. पण आमच्या मतें नूनं पेक्षां कदाचित् हा त्याचा शब्द फार महत्त्वाचा आहे. त्यावरून त्याच्या मतें आश्लेषार्धावर उदगयन होणें अशक्य आहे असें दिसतें. कारण त्याच्या वेळीं फक्त विभागात्मक अशी सायन पद्धतीच होती. व ह्मणूनच त्यानें नक्षत्रावर उदगयन न सांगतां राशीवर सांगितलें. त्याच्या मतें उदगयनप्रवृत्ति सदासार्वकाल कर्क राशीच्या आरंभींच झाली पाहिजे असें उघड होत आहे. व ह्मणूनच त्यानें कदाचित् असा शब्द घातला. वराहमिहिराला अयनचलन कळलें नाहीं हें सिद्ध करण्याला केतकरादि प्रतिपक्षाला अन्य पुरावा दिला पाहिजे. तो जोंपर्यंत तो पक्ष देणार नाहीं तोपर्यंत वराहमिहिर शून्य अयनांश कालीन होता हें आह्मी त्यांचें ह्मणणें कदापि कबूल करणार नाहीं. व तोंपर्यंत तरी केतकरांचें

मकर संक्रमण चुकलें आहे असेंच ह्मणत राहणार. सायनवादी बाटे कीं निरयनवादी बाटे याचा निकाल पुढें आस्ते आस्ते होणारच आहे.

आजच्या लेखांत आपणास तीन वराहमिहिर आढळले आहेत. १ विक्रमाच्या नऊ रत्नांतला, २रा बृहत्संहिताकार व ३रा पंचासिद्धांतिकाकार. यांतील पहिले दोन एकच आहेत कीं काय हें समजत नाहीं. कदाचित् असले तरी ते शून्य अयनांश कालचे नाहींत हें उघड आहे. बृहत्संहिताकार वराहमिहिर फार प्राचीन आहे अशी आमची समजूत आहे. कारण त्याच्या ग्रंथांत शनि व मंगळ यांच्या रोहिणीशकटभेदाच्या फलांचें वर्णन आलें आहे. हे ग्रह शकापूर्वी कित्येक शतकें मात्र रोहिणीशकटभद करीत होते तेव्हांपासून ते आतां करीत नाहींत. जर वराहाच्या वेळीं ते भेद करीत नसते तर त्यानें त्याच्यावर खचित शंका घेतली असती. नाभसयोगांत बुध व शुक्र हे रवीपासून चवथ्या स्थानीं कसे जातील अशी यानेंच शंका घेतली आहे. इतका विद्वान् वराहमिहिर शनिमंगळांच्या रोहिणीशकटभेदाविषयीं कांहींच शंका घेत नाहीं हें कसें? तात्पर्य वराहमिहिराचा काल फार प्राचीन आहे यांत संशय नाहीं. पंचसिद्धांतिकेचा वराहमिहिर कदाचित् शालिवाहनांतला असेल पण तोही शून्य अयनांश कालचा ठरत नाहीं. तात्पर्य कोणताही वराहमिहिर घ्या तो शून्य अयनाशकालीन नाहीं असेंच सिद्ध होत आहे.

सायननिरयनवाद

[मागील अंकावरून पुढें चालू]

धनिष्ठा हें अश्विनीपासून तेविसावें व आश्लेषा नववें नक्षत्र आहे. त्यांचे आरंभीं सूर्य अनुक्रमें २७० आणि ९० अंश असेल तरच उदगयन आणि मग तें सायन असो वा निरयन असो. पेंडसे वेदकालापासून आश्विन्यादि गणना घेतात. तेव्हां धनिष्ठारंभीं २९३ अंश २० कला आणि आश्लेषार्धी ११३ अंश २० कला होतात. ह्मणजे अश्विनीच्या आरंभापासून २३ अंश २० कला किंवा भरणीच्या चवथ्या चरणीं संपात येतो. तरी ही नक्षत्रपद्धति सायनच काय? यावरून वेदांगज्योतिषाचा काल इ० स० पूर्वी १४०० किंवा सांप्रतकालापूर्वी ३३०० वर्षे येतो. ह्मणजे पांडवसमकालीन येतो.

उत्तर.—यांतील "तरी ही नक्षत्रपद्धति सायनच काय?" ह्या प्रश्नाचा काय अर्थ करावयाचा हें समजणें कठीण आहे. कारण वरील वेदांगवचनांतील धनिष्ठा व आश्लेषा ह्या सायन होत असें आजपर्यंत कोणाही सायनवाद्यानें ह्मटल्याचें आह्मांला तरी माहीत नाहीं. सायनवाद्यांचे मतें आमच्या पूर्वजांच्या ग्रंथांतून नक्षत्रें दोन प्रकारचीं आहेत, स्थिर ऊर्फ तारकात्मक व चल ऊर्फ सायन. तारकात्मक नक्षत्रांतील तारे जवळ जवळ स्थिर असल्याकारणानें त्यांचा उपयोग संपाताचें किंवा अयनारंभाचें क्रांतिवृत्तावरील स्थान सांगतेवेळीं करण्याची जशी निरयनवाद्यांची तशीच सायनवाद्यांचीही वहिवाट आहे हें आजपर्यंतच्या सायनवाद्यांच्या लेखांवरून केशव त्रिंबक यांस सहज समजण्यासारखें होतें.

मात्र वरील वचनांतील धनिष्ठा व आश्लेषा ह्या जरी तारकात्मक असल्या तरी तेवढ्यावरून वरील वचनांत सायनपद्धति नाहीं असें मात्र नाहीं. कारण केशव त्रिंबक यांनीं या वचनाचा जो अर्थ वर

दिला आहे तोच बरोबर आहे असें मानलें तरी त्या वचनांतील माघ व श्रावण हे निरयन मानाचे असणें संभवत नाहीं. कारण सूर्य 'सदा निरयन माघांत व श्रावणांत उत्तरेस व दक्षिणेस वळतो हें जर खरें असतें तर आजला सूर्याचे उदगयनाचा आरंभ निरयन माघ महिन्यांत व दक्षिणायनाचा आरंभ निरयन श्रावण महिन्यांत व्हावयास पाहिजे होता. परंतु तो तसा कधींच होत असलेला सध्यां कोणाच्याच अनुभवास येत नाहीं. अर्थात् एक तर वेदांगांतील वचन तरी चुकीचें असलें पाहिजे किंवा के. त्रिं. यांचा त्या वचनाचा अर्थ तरी चुकला असला पाहिजे.

तारकात्मक धनिष्ठारंभीं उदगयन सुरू होण्याचा अगदीं जवळचा काळ गणितानें ३३०० वर्षांपूर्वीचा येतो इतकें खरें आहे. परंतु तारकात्मक धनिष्ठारंभीं उदगयन जर्मे ३३०० वर्षांपूर्वी होत असे तसें तें सुमारें २९००० वर्षांपूर्वीही होत असे. मग ह्यांपैकीं वेदांगरचनेचा काल ३३०० वर्षे हाच कां खरा धरावयाचा? उलटपक्षीं हा काल न धरण्यासच बलवत्तर करणें आहेत. वेदांगज्योतिष पांडवकालापूर्वी पुष्कळ वर्षांचें असल्याबद्दल त्याची महाभारतांतील ज्योतिर्विषयक ज्ञानाशीं तुलना करितां ह्मणणें भाग आहे. हा पांडवकाल के. त्रिं. यांचें मतच क्षणभर खरें धरिलें तरी ३५०० वर्षांमागचा आहे. अर्थात् वेदांगकाल ३५०० वर्षांपेक्षां पुष्कळ प्राचीन असला पाहिजे.

वेदांगांत पुढील वचन आहे.—

धर्मवृद्धिरपांप्रस्थः क्षपाऱ्हास उदग्गतौ ।
दक्षिणे तौ विपर्यस्तौ षण्मुहूर्त्ययनेनतु ॥

ह्या वचनाचा अर्थ 'भारतीयज्योतिःशास्त्र' ह्या ग्रंथांत दिला आहे त्यावरून वेदांगज्योतिषाप्रमाणें दिवस व रात्र यांमधील परम

अंतर सहा मुहूर्त ह्मणजे १२ घटका येतें. अर्थात् वेदांगज्योतिषाची रचना अक्षांश ३५ ज्या प्रदेशांत असतील अशा ठिकाणीं झाली असली पाहिजे. असें स्थल हिंदुस्थानांत नाहींच ह्मटलें तरी चालेल. ही रेषा हिंदुकूश व काराकोरान ह्यांच्या दक्षिण टोकांना लागून काश्मीरांतून व तिबेटच्या वरच्या प्रदेशांतून जाते. अर्थात् उत्तरध्रुवापासून खालीं उतरत उतरत आमचे पूर्वज तिबेटाच्या उत्तरसीमेच्या आसपास येऊन राहिले होते त्या काळीं वरील वचन लिहिलें गेलें असावें. हा काल रामावताराहूनही प्राचीन असला पाहिजे. कारण रामावतारीं आमचे पूर्वजांची वस्ती हिमालय व विंध्य ह्यांचे दरम्यान सर्वत्र झालेली होती. तसेंच रामावतार पांडव कालापेक्षां फार प्राचीन असलाच पाहिजे. कारण दंडकारण्यदेश रामावतारीं खरोखरच अरण्यमय होता व पांडवकालीं त्यांत अनेक राज्यें स्थापित झालेलीं आढळतात. राम ह्मणून कोणी होता किंवा नाहीं अशी शंका आतांपर्यंत कोणाला असली तरी रा. ब. चिंतामण विनायक वैद्य यांच्या "रामायणाचें कोडें" ह्या इंग्रजी ग्रंथाच्या प्रसिद्धी नंतर तरी राहण्याचें कारण नाहीं.

श्रीरामजन्मकालीं पूर्वाभाद्रपदानक्षत्राच्या योगतारेजवळ संपात होता हें रामायणांतील तत्कालीन ग्रहस्थितीवरून स्पष्टच आहे. मघं पूषणि संप्राप्ते ह्या वचनांत 'मेष' ह्मणजे 'अज' ही ज्याची देवता आहे अशा पूर्वाभाद्रपदानक्षत्रावर त्यावेळीं सूर्य असल्याचें स्पष्ट वर्णन आहे. हा काल सुमारें २९००० वर्षांपूर्वीचा येतो. त्याचेपूर्वी वेदांगज्योतिष अर्थात् त्याचा रचनाकाल कमींतकमी २९००० वर्षांचा ठरतो; ह्मणजे पांडवसमकालीन खचीत नव्हे.

वराहमिहिराचे कालाविषयीं लिहितांना पेंडसे यांनीं खालील श्लोक दिला आहे. (पृ० १५)

संख्याविधानात्प्रातेदेशमस्य विज्ञायसंदर्शनमादिशेत्तः
तच्चोज्जयिन्यांमगतस्य कन्यां भागैःस्वराख्यैःस्फुटभास्करस्य ॥
बृ. सं. अ. १३ श्लो. ३।४

व त्याचा अर्थ करतांना उज्जनीमध्यें त्यावेळीं अगस्तीचा उदय सूर्य कन्या राशीचे ७ अंशांवर असतां होत असे असें स्पष्ट दिसत आहे. गणितानें हा काल वर्तमानकालापासून २३०० वर्षांहून मागचा ठरतो असें झटलें पाहिजे. हल्लीं उज्जनी येथें अगस्ति उदय सायन सिंह राशीचे २१ अंश सूर्य असतां होतो. व २३०० वर्षांपूर्वी तो सायन कर्कीच्या १९ अंशांत झाला पाहिजे. त्यावेळा अयनांश ११ ऋण होते. परंतु वरील श्लोकांत कन्येचे ७ अंश असें पेंडसें झणतात त्यावरून पाहतां वराहाचा काल २५००० वर्षांपूर्वीचा येतो. परंतु वरील श्लोकाचा अर्थ "उज्जयिन्यां अग. तस्य (अगस्त्यस्य नव्हे) कन्यां भागैः स्वराख्यै" झणजे कन्येचा सूर्य होण्यास ७ अंश बाकी असतां उज्जनीस अगस्त्योदय होतो असा पाहिजे. झणजे सिंहाचे २३ अंशांत अगस्तीचा उदय होतो. ग्रहलाघव, सिद्धांत-शिरोमणी, करणकुतुहल वगैरे प्रमाणें सिंहाचे १९ अंश सूर्य असतां होतो. यावरून ती स्थिति निरयन होती हें सिद्ध आहे. गणिताच्या स्थूलत्वानें अगस्ति उदयांत चूक पुष्कळ आहे. ज्योतिर्गणिताप्रमाणें सिंहाचे शून्य अंशांत (निरयन) आणि सायनमानानें सिंहाचे २१ अंशांत उदय होतो. अगस्ति नक्षत्र असल्यामुळें निरयन मानानें त्याचा उदय सदोदित सारखा येतो. सायन मानानें दरसाल ५० विकला पुढें जातो. यावरून अगस्त्यु-दयावरून वराहाचा काल काढतां येणेंच शक्य नाहीं हें समजून येईल.

उत्तर.—भि. म. पेंडसे यांनीं पांडवकालावरील आक्षेपांत दिलेल्या उत्तरामध्यें वरील श्लोकाचा जो अर्थ दिला आहे त्यामध्यें कोणाच्या तरी नजर चुकीनें 'सूर्यकन्याराशीचे सात अंशांवर असतां' असें छापलें गेलें आहे. त्यांत 'कन्यां शब्दाचे ऐवजीं सिंह' शब्द पाहिजे होता. 'कन्येला न गेलेला' झणजे 'सिंहामध्यें असलेला;' त्याच ७ अंशांवर झणजे सिंहाचे ७ अंशावर असा वरील वचनां-तील "अगतस्य कन्यां भागैः स्वराख्यैः" ह्या शब्दांचा अर्थ आहे.

हा अर्थ पुष्कळ वर्षांमागें कै० वि. र. लेले यांनींच वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केलेला आहे. सिंह झणजे सायन सिंहच होय व उज्जनीमध्यें सुमारें २३०० वर्षांपूर्वी सायन सिंहाचे ७ अंशांतर रवि असतां अगस्तीचा उदय होत असे हें गणितास अनुसरून आहे.

अप्राप्यमकरमर्को निवृत्तो हन्ति सापरां याम्यां ॥
ककटकमसंप्राप्तो विनिवृत्तश्चोत्तरां सेन्द्रीम् ॥
बृ. सं.

सूर्य मकर राशीस पोंचण्यापूर्वी जर परत फिरेल झणजे अयननिवृत्ति होईल तर पश्चिम आणि दक्षिण दिशांस राहणाऱ्यांचा आणि कर्क राशी-पर्यंत जाण्यापूर्वी परत फिरेल तर पूर्व आणि उत्तर दिशांस राहणा-ऱ्यांचा नाश होईल

जर वराहाचें गणित सायन असेल तर मकराला पोंचण्यापूर्वी सूर्य परत फिरणारच नाहीं. परंतु गणितागत सूर्य आणि वेधसिद्ध सूर्य यांत फरक आल्या कारणानें त्यानें वरील श्लोक लिहिला असावा व या वरून वराहाच्या वेळीं शून्यायनांश नव्हते व त्याचे वेळीं अयनांशाची माहिती नव्हती हे सिद्ध होतें. यावरून त्याचा काल १४०० वर्षांपूर्वीचा येतो.

उत्तर.—वज्रादियोग, न्यूनाधिकग्रहणफल अशांसारख्या गोष्टी पूर्वशास्त्रानुसार वराहाने लिहिल्या आहेत. त्यांतलीच एक गोष्ट उद-गयन दक्षिणायनें मकरकर्कीच्या अगोदर होणें ही असावी हेंच विशेष संभवनीय दिसतें. (आमचा वराहमिहिरावरील लेख पहा) असल्या गोष्टीविषयीं वराहाला स्वतःलाही संशय होता व मधूनमधून त्यानें आपला संशय व्यक्तही केला आहे. फलज्योतिषाच्या ग्रंथातून त्याचे वेळीं असल्या गोष्टी दिल्या जात असल्यानें आपण आपल्या ग्रंथांतल्या न दिल्या तर लोकाचें समाधान होणार नाहीं इतक्याच कारितां त्यानें त्या दिल्या आहेत. "स्फुटगणितविदः कालः कथंचि-दपिनान्यथा भवति" ही गोष्ट के. त्रिं. यांचेप्रमाणें वराहासही संमत होती. यावरून 'गणितागत सूर्य व वेधसिद्ध सूर्य यांत फरक-

आल्याकारणानें त्यानें वरील श्लोक लिहिला असावा ही के. त्रिं. यांची कल्पना ह्या स्थळीं लागू पडणारी नाहीं हें उघड दिसणारें आहे. अयनगतीच्या अज्ञानामुळें होणारी चूक ही कांहीं अवचित एखादे वर्षी होणारी नव्हे. ही चूक एकसाल होईल तिच्यापेक्षां पुढल्या वर्षी सुमारें ९० पळांनीं कमी किंवा अधिक होईल. परंतु अशा रीतीनें नियमितपणें होणाऱ्या चुकीबद्दल असलें फळ पूर्वग्रंथांतून दिलेलें नसतां वराहमिहिर आपण होऊन देईल हें संभवत नाहीं.

यावरून आमची नक्षत्रपद्धति निरयन आहे सायन नाहीं हें सिद्ध झालेच आहे.

उत्तर.—अतांपर्यंत केलेल्या चर्चेवरून वस्तुतः काय निष्पन्न होतें हें निराळें न सांगतां समजण्याजोगें आहे.

ग्रह कोणत्या नक्षत्रांत आहे तें पाहून फल सांगणें तें निरयण ग्रह करून सांगितलें तर सांगण्यास सोपें पडतें. कारण, निरयण विभागात्मक नक्षत्रें बहुतेक स्थिर तारांच्या आसपास असतात. आपणही ग्रहांचीं फलें नक्षत्रांवरून सांगतां परंतु ती सायन घेतां तें अशुद्ध आहे. कुं. वि. पु. ८ अंक ३२ मध्यें फलें सांगतांना सायन मंगळ वृषभाच्या ३ अंशांत आहे. तो कृत्तिकांत आहे असें सांगून कृत्तिकांची दैवता अग्नि घेऊन त्याचें फल सांगितलें आहे. अग्निदेवता कृत्तिका स्थिर ताऱ्याची आहे व त्याचे सायन भोग वृषभाचे २८ अंश आहेत. वरील मंगळ अश्विनी ताऱ्यांच्या आसपास असल्यामुळें अश्विनीच्या देवता घेऊन फल सांगितलें असतां शुद्ध होईल. याबद्दल इंग्लिशांचीही प्रवृत्ति निरयण नक्षत्रांवरून (स्थिर ताऱ्यांवरून) फल पाहण्याकडे आहे हें दिसून येईल.

उत्तर.—फलिताची बहुतेक सर्व रचना मेषादि राशी व त्यांचे अंश यांवरच करण्यांत आलेली आहे' हे राशी सायन होत ही गोष्ट के. त्रिं. यांना मान्यच आहे इंग्लिश फलज्योतिषीही सदोदित ह्या सायन राशींचाच उपयोग करीत असतात. तो उपयोग करून शिवाय क्वचित् कोणी त्या त्या सायनराशींत किंवा सायन राशींच्या

अशांत त्या त्या कालीं असलेल्या ताऱ्यांचाही आपल्या फळामध्यें संबंध आणीत असेल तर तेवढ्यानें 'निरयन नक्षत्रां वरून फल पाहण्याकडे त्यांची प्रवृत्ति आहे' हें म्हणणें कसें बरोबर होईल हें समजणें कठीण आहे. 'नक्षत्र' शब्द 'तारा' ह्या अर्थानें कधीं कधीं वापरण्यांत येतो, परतु तारे निरयन किंवा सायन असत नाहींत. 'निरयननक्षत्र' ह्याचा अर्थ क्रांतिवृत्ताचे रेवतीयोगतारेपासून अथवा मतांतरानें एखाद्या इतर ठराविक बिंदूपासून जे सारखे २७ भाग मानण्यांत येतात त्यांपैकीं एक इतकाच आहे. अशा अर्थानें निरयन नक्षत्रांचा कोणीही इंग्लिश फलज्योतिषी फल पाहतांना उपयोग करीत असतात असें के. त्रिं. यांनीं पुढें दोन इंग्रजी उतारे दिले आहेत त्यांपैकीं एकांतही आढळून न आल्यानें ते उतारे आह्मीं छापले नाहींत ह्याबद्दल ते रागावणार नाहींत अशी आशा आहे.

पुस्तक १ अंक १२ यांत कौमुदे मासि रेवत्यां या श्लोकांच्या विचारांत आपण ह्मणतां ३५०० वर्षांचा पांडवकाल मानिला तरी निरयन कार्त्तिकांत ऋतुदर्शक आश्विन ह्मणजे शरदृतूचा आला. परंतु वैशाखांत ह्माल्यामुळें निरयन कार्त्तिकांत शरदंत बरोबर येतो हें लक्षांत येईल.

उत्तर.—पांडवकालीं वैशाखांत विषुव होत नव्हतें हें वर दाखविलेंच आहे.

पेंडसे पृ० ४ मध्यें "वस्तुतः सूर्यसिद्धांत सायनवादी आहे. कारण त्यांत गणितास ग्रह सायन घ्यावे असा उल्लेख नाहीं" असें ह्मणतात.

त्रिंशत्कृत्यो युगे.....अयनाभिधः
तत्संस्कृतात् ग्रहात् क्रांतिच्छाया चरदलादिकम् ॥

या श्लोकांत अयनांश काढण्याची रीति देऊन त्या अयनांशांचा संस्कार ग्रहास करून त्यापासून क्रांति, चर इत्यादि आणावे असें ह्मटलें आहे. तरी जर सूर्यसिद्धांताचे ग्रह सायन येत असतील तर त्यांस अयनांश संस्कार करून जें फल येईल त्याचें नांव काय?

उत्तर.—या श्लोकांतील त्रिंशत्कृत्यो हा पाठ व अयनांश काढण्याची पद्धति चुकीची असून हा सर्व फेरफार भास्कराचार्यानंतर कोणा आंदोलन वाद्यानें केलेला आहे हें सिद्धांतशिरोमणीच्या साक्षीनें किर्तीकवेळां सिद्ध करून प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. असें असतां के. त्रिं. यांना फिरून याच बनावट वचनांचा आधार घ्यावा लागत आहे ह्यावरूनच ह्याबाबतींत आणखी कांहीं लिहिण्याचें प्रयोजन नाहीं हें सहज ध्यानांत येणार आहे.

सायनवाद लेले, मोडक, दीक्षित वगैरेनीं सुरू केला व साहेबांच्या देशांत ह्यावरून फलें पाहतात ह्मणून महाजन ज्या मार्गानें जातात तोच मार्ग खरा अशी मनाची समजूत करून आपणही तोच मार्ग स्वीकारला येथपर्यंत नीट आहे. परंतु आपलें तेंच खरें असा दुराग्रह धरून ह्या त्या मनुष्यावर तोंडसुख देण विद्वानास योग्य नाहीं. आपण आपल्या लेखांत दीक्षितांची स्तुति करून केतकरांवर हवेतसें तोंडसुख घेतलें हें आपणास बरें वाटतें काय? विद्वत्तेनें कदाचित् आपण केतकरांपेक्षां जास्त असाल. परंतु जेवढा जास्त विद्वान् तेवढा जास्त नम्र असेल तर त्या विद्वत्तेची चहा होते. तसेंच ज्या दीक्षितांची अपग स्तुति केली त्यांसच पेंडसे यांनीं "दीक्षितांच्या बुजट मेंदूल" (पृ. १०) वगैरे विशेषणें दिलीं आहेत व तेंच पुस्तक आपण निरयनग्रंथांस ह्मणजणीत अंजन ह्मणून प्रसिद्ध करावें हेंही एक आश्चर्यच आहे.

कळावे हे विनंति.

आपला

मोरवी २३-१-०९ केशव त्रिंबक पेंडसे.

उत्तर.— दुराग्रह कोणाचा याचा विचार जग करील. तूर्त सायनवादी व निरयनवादी हे दोघेही दुराग्रहीच आहेत! दुराग्रहाचा आरोप आपण आमच्यावर कोणत्या आधारानें करितां? आमची दृष्टि

सरळ व निःपक्षपाती आहे. केतकर आमचे कोणी नाहींत किंवा दीक्षितही कोणी नाहींत! मग एकाची स्तुति व एकाची निंदा आह्मीं कां ह्मणून करूं! ते दोघेही सारखेच पूज्य आहेत. आमचा वाद तत्त्वासाठीं आहे, व्यक्तीसाठीं नाहीं. ज्याचें जें चांगलें असेल त्याची तितक्या पुरती स्तुति करणें हा मनुष्यस्वभावच आहे. वादांत विद्वत्तेचा प्रश्न नाहीं. केतकरांच्या व दीक्षितांच्या आह्मी पासंगासही लागणार नाहीं हें जाणून आहों! ह्मणून अमक्याचें अमुक चुकलें व अमुक बरोबर आहे असें ह्मणण्याचा अधिकार आह्मांस नाहीं असें आह्मी समजत नाहीं. खरा पारधी रानांत शिकारीस गेला ह्मणजे झाडावरून गोळी झाडीत नसतो, सिंह असला तरी त्याला डवचून सामन्यास उभा करितो व मग त्याची शिकार करीत असतो. केतकर [ह्मणजे त्यांची मतें] खरे सिंह आहेत व त्यांनीं आपलें पंचांग प्रसिद्ध करूं लागल्यापासून उदगयन व मकर संक्रमण यांची ताडातोड केली आहे. या त्यांच्या मताचें खंडण करण्यासाठीं त्यांस प्रसंग विशेषीं अधिकउणें लिहिणें जरूर आहे. आमची इच्छा प्रतिपक्षानें सामन्याला यावें अशीच आहे. तो जर वाद करण्यास आनंदानें कबूल होईल, अर्थाचा अनर्थ करणार नाहीं व चुकी झाली असेल तर ती प्रांजलपणें कबूल करील तर त्यास डंवचण्याचें कारणच राहणार नाहीं. कारण, कोणीही व्यक्ति एकमेकांचे कांहीं शत्रु नाहींत. केतकरांनीं खऱ्याचा प्रसार होण्यासाठीं जसें आपलें पंचांग छापलें आहे तसेंच व त्याच उद्देशानें विज्ञानकार दशाहिक पुस्तक प्रसिद्ध करीत आहे. उभयतांच्या प्रयत्नांत विशेष फरक आहे असें वाटत नाहीं.

असो. ज्यो. के. त्रिं. पेंडसे हेही चांगले विद्वान् आहेत व त्यांनीं या संस्थेस आपल्या विद्वत्तेचा लाभही करून दिलेला आहे. अशा विद्वानांचीं मतें खोडून काढितांना त्यांस कमी अधीक शब्द न वापरण्याची खबरदारी घेतली आहे. इतकेंही असून क्वचित् कमजास्त शब्द वापरला गेला असल्यास ते क्षमा करतील अशी आशा आहे.

—संपादक कुंडलीविज्ञान—

सायननिरयनवाद

२

गेल्या अंकांत ज्यो. के. त्रिं. पेंडसे यांच्या लेखास उत्तर दिलें आहे. त्याच अंकांत ज्यो. केतकर यांचें "मकरसंक्रमण व उदगयन" या मथळ्याखालीं पत्र छापलें आहे, त्यास आज उत्तर देण्याचें योजिलें आहे.

१ ज्यो. केतकरांनीं उदगयन प्रवृत्तिकालासंबंधानें लिहितांना ९ मिनिटांचा फरक कबूल केला आहे! वास्तविक मुंबईच्या ऋगं रेखांतरा इतकाच फरक पडला पाहिजे होता ह्मणजे १२ मिनिटांचाच फरक असणें जरूर होतें. असो. बादशीं या गोष्टीचा संबंध नाहीं.

२ मकर रास हा कोणत्या शद्वाचा अर्थ होतो या संबंधानें खालीं टीप देऊन खुलासा केला आहे. ॥ अयनस्योत्तरस्यादौ मकरं याति भास्करः ॥ या वचनावरून मकरसंक्रमणकालींच उदगयन होतें हें सिद्ध आहे.

३ मेषादि राशी हे तारकापुंज आहेत असें सिद्ध करण्यासाठीं बृहज्जातकांतील ॥ मत्स्यो घटी ··· ॥ हा श्लोक घेतला आहे. पण त्यावरून ही गोष्ट सिद्ध होऊं शकत नाहीं, हें आह्मीं ज्यो. केतकर यांस नम्रपणें सुचवितों. मत्स्यो घटी ···· ॥ हें वर्णन: फलज्योतिष-ग्रंथांतील आहे. फलज्योतिषांत ज्याप्रमाणें राशींच्या स्वरूपांचे वर्णन आहे त्याचप्रमाणें त्यांच्या अंशात्मक विभागांचेंही वर्णन आहे. उदाहरणार्थ.—

कन्यां सितवस्त्रवेष्टितः कृष्णः शक्तिवाभिरक्षितुं ॥
रौद्रः परशुं समुद्यतं धत्तेरक्तविलोचनः पुमान् ॥१

यांत मेष राशीच्या प्रथम द्रेष्काण भागाचें स्वरूप सांगितलें आहे.

रक्तांबराभूषणभक्ष्यचिंता कुंभाकृतिर्वाजिमुखीतृषार्ता ॥
एकेनपादेनचमेषमध्ये द्रेष्काणरूपं यवनोपदिष्ट ॥ २

यांत मेष राशीच्या द्वितीय द्रेष्काण भागाचें स्वरूप सांगितलें आहे.

क्रुरः कलाज्ञः कपिलः क्रियार्थी भग्नव्रतोभ्युद्यत दंडहस्तः ॥
रक्तानि वस्त्राणि बिभर्ति चंडो मेषे तृतियः कथितस्त्रिभागः ॥३

यांत मेष राशीच्या तृतिय द्रेष्काण भागाचें स्वरूप सांगितलें आहे.

या प्रमाण प्रत्येक राशीच्या प्रत्येक द्रेष्काणभागाचें वर्णन सांगितलेलें आहे. व तेहीं ज्यो. केतकरांनीं जो ग्रंथ पुराव्यास पुढें केला आहे त्याच बृहज्जातकांतलें आहे! द्रेष्काण ह्मणजे राशीचा $\frac{1}{3}$ भाग अर्थात् हें वर्णन विभागाचें आहे, तारकापुंजांचें नाहीं हें ज्यो. केतकर यांस कबूल केलेंच पाहिजे. व ह्मणूनच ॥ मत्स्यौ घटी····॥ हें वर्णनही विभागात्मक प्रदेशाचेंच संभवतें हें उघड आहे. जातकांत तरी तारकापुंजांचा संबंध कांहीं नाहीं. राशि व नक्षत्रें यांची फल विभागात्मक प्रदेशासच अनुसरून आहेत. ज्यो. केतकरांनीं गणित ज्योतिष ग्रंथांतून जर वचन दिलें असतें तर त्यांच्या ह्मणण्यास कांहीं तरी किंमत होती. आमचें मागणें तरी हेंच होतें कीं त्यांनीं गणित ज्यो. ग्रंथांत जर कोठें मेष ह्मणजे अमुक अमुक ताऱ्यांनीं आकृति होते, असें सांगितलेलें असेल तर दाखवावें. पण तसें त्यांस त्या ग्रंथांत कांहींच आढळलें नसलें पाहिजे. बरें, त्यांनीं जें फलज्यो. तत्रें वचन दिलें आहे, त्यांत तरी अमुक अमुक ताऱ्यांनीं राशि बनतात हें कोठें सांगितलेलें आहे? भग तें वर्णन तारकापुंजांचेंच आहे असें कशावरून समजावयाचें? तात्पर्य, कोणत्याही ज्योतिष ग्रंथांत अमुक अमुक ताऱ्यांची अमुक अमुक रास होते हें सांगितलेलें नाहीं ह्मणून 'मेषादि राशि हे तारकापुंज नाहींत हें सिद्ध आहे. खगोलाकडे बोट दाखवून काय फायदा? खगोलावर ज्या आकृति

काढल्या आहेत त्या वरील फलज्योतिषांतील राशींच्या वर्णनाला अनुसरून आहेत इतकेंच. जर राशि हे तारकापुंज असते, तर अमुक ताऱ्यांनीं अमुक राशि होतो हें वर्णन आमच्या गणित अगर फलित यां पैकीं कोणत्या तरी ग्रंथांत निश्चयानें असतें! तसें जोंपर्यंत ज्यो. केतकर यांस दाखवितां येत नाहीं तोंपर्यंततरी आह्मी "मेषादि राशि हे तारकापुंज नाहींत" असेंच ह्मणणार.

४ "संपाताबरोबर या (राशींच्या) आकृतिही मागें सरकतात असें विज्ञानकार सिद्ध करूं शकतात काय!" हा प्रश्न केतकरांनीं कशा करितां केला आहे! विज्ञानकार असे कधीं चुकूनसुद्धां ह्मणालेले नाहींत.

५ 'आकाशांतील नक्षत्रांची कांहीं आकृति कल्पून त्याच्या साह्यानें स्थाननिर्देश करण्याची पूर्वी वाहिवाट होती' यांतील नक्षत्र शब्द केतकरांनीं तारे या अर्थानेंच वापरला आहे. असेंच आह्मी धरून चालतों. तारे हे जवळ जवळ स्थिर आहेत व त्यामुळें त्यांचा आकाशांतील स्थानानिर्देश करितांना अद्यापही सर्वत्र उपयोग करण्यांत येत असतो. मग मागें तसें करीत असत हें सांगण्यांत केतकरांचा हेतु काय? कदाचित् ताऱ्यांच्या आकृति कल्पित असत ही गोष्ट सांगण्याकरितां त्यांनीं हें वाक्य घातलें असेल. परंतु स्थाननिर्देशाला तारे असले ह्मणजे पुरे होतात, त्यांच्या आकृति कल्पिणें विशेष आवश्यक नाहीं.

६ 'इंग्रजींत राशींना साइन असें ह्मणतात. साइन ह्मणजे खूण. तेव्हां खुणेसाठीं नक्षत्रें उपयोगांत घेतलीं होतीं असें ठरतें' असें केतकर लिहितात. इंग्रजींत राशींना साईन असें ह्मणतात. परंतु इंग्रज लोक ग्रहस्थिति सांगणें ती तारकात्मक राशींवरून सांगत असतील असा केतकरांचे लिहिण्यावरून भास होण्यासारखा आहे

तो मात्र बरोबर नाहीं. इंग्रजी भाषेचा वेब्स्टरकृत कोश घेउन त्यांत साईन व एरिस [मेष] हे शब्द काढून तेथें काय आढळतें ते पहा. तेथें कोशकार ह्मणतो कीं, "साईन ह्मणजे क्रांतिवृत्ताचा एक द्वादशांश भाग होय. ह्या साइनाची गणना वसंतसंपातापासून करितात व पूर्वी एका काळीं मेषादि नांवाचे तारकापुंज संपातापासून पाडलेल्या क्रांतिवृत्ताच्या बारा भागांतून होते ह्यामुळें त्या तारकापुंजांचीं नांवें ह्या बारा विभागांना देण्यांत आलीं. परंतु संपातचलनामुळें अलीकडे हे तारकापुंज ह्या विभागांच्या मागें पडले आहेत." सध्या संपातापासूनच्या ज्या राशिविभागाला मेष राशि ह्मणतात त्यांत मेष नांवाचा तारकापुंज नसून मीन हा तारकापुंज आहे. अशीच स्थिति बाकीच्या अकाराशींची आहे. परंतु केतकर ह्मणतात सायन मेष सायन वृषभ असें ह्मणणें वेडेपण ठरतें! तेव्हां या बाबतींत गेल्या दोन हजार वर्षांत होऊन गेलेले व सध्या हयात असलेले बहुतेक सर्व यूरोपियन ज्योतिषी केतकरांचे दृष्टीनें वेडे होत व इतकीं वर्षें ते सर्व लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचें निंद्य काम करीत आहेत असें ठरतें!

७ 'सायन बेळगांव' वगैरे सायन वाद्यांच्या मताचा अप्रयोजकपणा दाखविण्याकरितां केतकरांनीं केलेली सर्व शब्दरचना अशा रीतीनें सर्व यूरोपियनांनाही लागू पडते. यूरोपियन लोक राशींना साईन ह्मणजे खुणा हा शब्द लावतात ना? मग सध्या मेष राशी करणारे तारे क्रांतिवृत्ताच्या ज्या भागाच्या आसपास आहेत त्याला यूरोपियन लोकांनीं वृषभ साईन असें ह्मणण्याचा नको होतें. पण दुर्दैवाची गोष्ट कीं ते लोक आजला धडधडीत हीच गोष्ट रोजच्या रोज करीत आहेत.

८ 'आमच्या धर्मशास्त्रांतील पंचांगपद्धति निरयन आहे किंवा सायननिरयन हा भेद उत्पन्न होण्यापूर्वीची आहे.' असें केतकर

लिहितात. ह्या ठिकाणीं केतकरांना वास्तविक —सायननिरयन हा भेद आमच्या पूर्वजांना समजूं लागण्यापूर्वीची आमच्या धर्मशास्त्रांतील पंचांगपद्धती आहे—असें ह्मणावयास पाहिजे होतें. सायन निरयन हा भेद मुळींच नव्हता किंवा अत्यंत सूक्ष्म होता असा काल कांहीं लक्ष वर्षांपूर्वी असेल, नसेल असें नाहीं आजला अयनगतीमध्यें फार थोड्या अंशानें तरी पण बहुतेक नेमानें वाढ होत आहे. अर्थात् फार पुरातनकाळीं ह्मणजे कांहीं लक्ष वर्षांपूर्वी हा भेद उत्पन्न झाला नाहीं अशी स्थिति असेल. परंतु केतकरांच्या ह्मणण्याचा अर्थ मात्र तसा नाहीं. यांचे ह्मणण्याचा अर्थ आमचीं धर्मशास्त्रें तयार झालीं त्या वेळीं आमच्या पूर्वजांना सायननिरयन हा भेद समजतच नव्हता असा आहे!

९ "सायनवाद्यांनीं एक नवीन संचालित सायन धर्मशास्त्र निर्माण करावें हा सरळ मार्ग." या प्रमाणें केतकरांना हा सरळ मार्ग वाटतो हें ठीकच आहे. कारण, सध्याचीं धर्मशास्त्रें करणारांना सायननिरयनांतला भेद समजत नसल्यानें त्यांनीं कांहीं गोष्टी लिहून ठेविल्या त्या आतां प्रत्ययास येत नाहींत असें केतकरांच्या बुद्धीला वाटत आहे. आमच्या बुद्धीला असेंच वाटत असतें तर आह्मीही केतकरांप्रमाणें नवीन सायन धर्मशास्त्र निर्माण करणें हाच उजू मार्ग होय असें ह्मटलें असतें. परंतु सुदैवानें ह्मणा अगर दुर्दैवानें ह्मणा, आमचे डोळे पाश्चात्य ज्ञानानें इतके दिपून गेलेले नाहींत. आमच्या मतें ही भानगड कधीं काळीं उपस्थित झाली असली तरी तिचा त्याच वेळीं योग्य बंदोबस्त झाला असल्यामुळें आतां आपल्याला त्या बाबतींत कांहीं फेरफार करण्याची आवश्यकता राहिलेली नाहीं.

१०—पंचांगकार कांहीं धर्मशास्त्री नव्हत. त्या त्या शुद्ध पद्धतीस अनुसरून ते ते काल पंचांगांत देणें एवढेंच पंचांगकाराचें

कर्तव्य. सायननिरयन पद्धती पैकीं कोणती ग्राह्य व कोणतीं अग्राह्य हें ठरविणें समाजाचें काम आहे—यांतील केतकरांचीं विधानें अगोदर परस्पर विरोधी असून त्यांच्या प्रत्यक्ष वर्तनाशींही मिळतीं आहे तसें दिसत नाहीं. कोणती पद्धति ग्राह्य व कोणती अग्राह्य हें ठरविणें जर समाजाचें काम आहे तर मग त्या पद्धतींची सोय पंचांगांतून करणें हें पंचांगकाराचें कर्तव्य ठरतें. परंतु पंचांगकाराचें कर्तव्य सांगतांना 'शुद्ध' पद्धतीस अनुसरून ते ते काल पंचांगांत देणें हें पंचांगकाराचें कर्तव्य होय असें केतकरच ह्मणतात. ह्मणजे शुद्ध पद्धति कोणती हें ठरविण्याचें काम पंचांगकाराचें ठरतें! गुप्त रूपानें सायन संक्रांति देण्याचा जो क्रम केतकरांच्या पंचांगांतून दिसतो तोही एका आक्षेपाला पात्र आहे. सायन संक्रांत देण्याचे ऐवजीं केतकर सायन संक्रांत निघण्याची वेळ देऊन त्या वेळीं मधुमासारंभ किंवा माधवमासारंभ झाला असें दर्शवीत असतात. अशा रीतीनं मधुमाधव हीं नांवें तें सायनसौरमासांना देत असतात. परंतु वेदांत हीं नावें चांद्रमासांचींच असून त्या नंतर सुद्धां सौरमासांना मधुमाधव या संज्ञा कधीं कोणी लाविलेल्या नाहींत. तारकात्मक राशींचीं नांवें सांपातिक विभागात्मक राशींना देण्यानें पंचांग भेसळीचें होतें असें जर केतकरांना वाटतें तर चांद्रमासांचीं नांवें सौरमासांना देण्यानेंही तें भेसळीचेंच होतें असें कां ह्मणूं नये?

मध्वादि संज्ञा केतकर सध्या सायन सौर मासांना देत असतात. परंतु प्रस्तुत लेखांत त्यांनीं ह्या संज्ञा सायन चैत्रादि चांद्रमासांच्या खालच्या बाजूला पंचांगांतून लिहिण्याविषयीं आपली पसंती दर्शविली आहे. ही सुधारणा त्यानीं आपल्या पंचांगांतून लवकरच घडवून आणावी ह्मणजे कोणती पद्धति ग्राह्य हें ठरविणें समाजाचें कर्तव्य होय हें त्यांचें ह्मणणें बरेंच सार्थ होईल. मध्वादि संज्ञा ते

अशा रीतीनें सायन चैत्रादि मासांना लावूं लागते ह्मणजे आपोआपच सायन सौर मासांना त्या संज्ञा लावण्याचें त्यांना बंद करावें लागेलच . तसें झालें ह्मणजे सायन संक्रांति उघड उघड मेषादि नांवांनीं देण्याची सुरवात करणें त्यांना बरें वाटलें तर बरेंच होईल, परंतु तसें करणें त्यांना नच आवडलें तर निदान सायन प्रथम संक्रांति, सायन द्वितीय संक्रांति अशा स्वरूपानें सायन संक्रांति देण्याची त्यांनीं सुरवात केली तरी या बाबतींतील त्यांचे वरील आक्षेप बराच कमी होईल.

११ अयनस्योत्तरस्यादौ.....इत्यादि श्लोकांत अशी स्थिति सर्वदा असते असा निर्देश मुळींच नाहीं—असें केतकर ह्मणतात. पण अशी स्थिति सर्वदा असते असा निराळा निर्देश करण्याची आवश्यकता असती तर ग्रंथकार तसें करिता. परंतु मागल्या पुढल्या संदर्भावरून लिहिणाराचा हेतु समजत असतो व त्या दृष्टीनें वरील श्लोक एका विशेष प्रसंगाला लागू करण्याचाच ग्रंथकाराचा हेतु होता हें केतकर दाखवितील तर बरें होईल. वरील श्लोक कोणत्याही एका विशेष प्रसंगा पुरते लागू पडावे अशा बुद्धीनें लिहिले असल्याचा आमचा तरी तर्क होत नाहीं.

१२—विज्ञानकारांची विष्णुपुराण व सूर्यसिद्धांत यांतील उताऱ्यांवर सर्व भिस्त असण्याचें कारण इतकेंच कीं पूर्वोक्त ग्रंथ त्यांच्या समजुतीप्रमाणें लक्षावधि वर्षांपूर्वीचे आहेत.—असें केतकर ह्मणतात. आमची या दोन ग्रंथांवर जी भिस्त आहे तिचें एक कारण ते ग्रंथ फार जुन्या काळचे आहेत हें होय, हें आह्मांलाही मान्य आहे. परंतु विष्णुपुराण हें लक्षाब्धि वर्षांपूर्वीचें आहे असें त्याच्या कर्त्यांचेही मत नाहीं झटलें तरी चालेल. फार झालें तर तें द्वापारांतील पांडवकालचें ह्मणजे सुमारें ७१०० वर्षपूर्वीचें असेल. त्याचे सर्व भाग इतके

जुने असतीलच असेंही कुं. वि. कारांना वाटणें शक्य नाहीं. कारण भविष्यरूपानें अमुक वर्षीनीं चंद्रगुप्ताला चाणक्य नांवाचा ब्राह्मण गादीवर बसवील असें सांगणारे जे त्या पुराणाचे भाग आहेत ते मागाहून घातलेले नाहींत असें मानण्याइतके विज्ञानकार भोळे नाहींत हें भविष्य श्रीमद्भागवतांतही आहे व त्या संबंधानें लिहितांना कै. वि. र. लेले ह्यांनीं असल्या गोष्टी ह्मणजे भोळ्या लोकांकडून मोठेपणा मिळविण्याकरितां पसरलेलीं जाळीं होत असें उघड उघड दूषण दिलें आहे. उलटपक्षीं चमत्कार हा कीं, पाश्चात्यांनीं सोईस पडतो ह्मणून असल्या बनावट भविष्यांत सांगितलेलाच पांडवकाल खरा धरला आहे!

विष्णुपुराणावर आमची पुष्कळ श्रद्धा आहे, हें जरी खरें असलें तरी त्याचा उपयोग काय? जे दस्तायवज प्रतिपक्ष्यांनाही मान्य असतील त्यांतला पुरावा दाखवितां आल्यास न्यायाधीशाची आपल्या पक्षाच्या यथार्थतेबद्दल खात्री होण्याचा संभव विशेष असतो व विष्णुपुराण व सूर्यसिद्धांत यांतील आधारांवर आह्मी भिस्त ठेवतों त्यामध्यें ह्या मुद्याकडे बरीच नजर दिलेली असते.

१३— विष्णुपुराण व सूर्यसिद्धांत हे दोन्ही ग्रंथ शून्य अयनांशाच्या अलीकडील आहेत—असें केतकर ह्मणतात. पण विष्णुपुराण अंश २ अध्याय ८ मध्यें विषुवें मेषादि व तुलादि सांगून तीं रवितारात्मक कृत्तिकारंभीं व विशाखा तृतीय चरणीं असतां होतात असेंही सांगितलें आहे. विष्णुपुराण शून्यायनांशानंतरचें मानून या गोष्टी कशा संभवतील हें केतकरांनीं दाखवावें.

सांप्रतचा सूर्यसिद्धांत अयनांश शून्य होते त्या काळचे आसपास झालेला आहे असें मानलें तरी तेवढ्यानें अडचण दूर होत नाहीं. त्या कालाचे पूर्वी अनेक वर्षे आमच्या पूर्वजांना ज्योतिषाचें कांहींच ज्ञान नव्हतें असें नाहीं. सायन किंवा निरयन ह्यांपैकीं कोणती तरी पद्धती

त्यावेळीं रूढ झालेली असलीच पाहिजे. शून्यायनांशाच्या कालाचे आसपास रेवतीयोगतारा व वसंतसंपातबिंदु ह्यांमधील अंतर वेधानें समजणें कठीण झालें असेल इतकेंच. परंतु पूर्वपरंपरा जर रेवतीयोगतारेपासून क्रांतिवृत्ताचे बारा भाग पाडावे अशी असती तर सूर्यसिद्धांतकारानें ती तशीच दिली असती. परंतु तसें न करितां त्यानें विषुवस्थानापासूनच विभाग करण्याविषयीं सांगितलें आहे! रेवतीयोगतारा सोडून विषुवस्थान पतकरण्याला त्याला विशेष कारण काय झालें? रेवतीयोगतारेपासून त्यानें विभाग करण्यास सांगितलें नाहीं इतकेंच नव्हे तर रेवतीयोगतारा भोगही त्यानें शून्य दिलेला नाहीं. अशा स्थितींत सूर्यसिद्धांत शून्यायनांशकालचा असला काय आणि दुसऱ्या कोणत्याही कालचा असला काय सारखाच.

वराहाच्या ग्रंथांत **मय** हें नांव आलें आहे. यावरूनही तो वराहाच्या पूर्वीचा असला पाहिजे असे सिद्ध होतें. वराह जर शून्य अयनांश कालचा ठरत नाहीं, तर त्याच्या पूर्वीचा सूर्यसिद्धांत तरी शून्यायनांशकालीन कसा ठरणार?

१४—वेदांतील वर्ष सायन व नक्षत्रें सायन होतीं तर मृगापासून अश्विनीपर्यंत मागें मागें संपात हटत गेल्या प्रमाणें निरनिराळीं नक्षत्रें आद्यस्थानीं कां गणली गेलीं? रा० टिळक ह्यांचा ओरायन ग्रंथ वाचून पहाल तर आह्मी काय ह्मणतों त्याची खात्री होईल—याप्रमाणें केतकरांनीं लिहिलें आहे. पण त्यांस आमचें असें आहे कीं—आपण ह्मणतां तशा रीतीनें नक्षत्रारंभ संपातानुसार मागें मागें आणीत जावा असा नियम आमच्या कोणत्याही ग्रंथात सापडावयाचा नाहीं. अशा प्रकारें नक्षत्रारंभ मागें मागें आणीत असावे ही आधुनिकांची केवळ कल्पना आहे. वेदांत कृत्तिकादि गणना स्पष्टपणें आढळते व सध्या अश्विन्यादि प्रचारांत आहे, इतक्यावरून अशा रीतीनें नक्षत्रचक्राचा आरंभ मागें मागें आणीत असावे असा तर्क बांधण्यांत आलेला आहे. तो खरा मानावयाचा तर वेदांत कृत्तिकादि गणना व सांप्रतच्या ज्योतिष ग्रंथांतून अश्विन्यादि गणना जशा सापडतात तशी भरण्यादि गणना कोणी कोणत्याही ग्रंथांत अद्याप दाखविलेली नाहीं. वेदांतील

कृत्तिकादि गणनेनंतर जर भरण्यादि गणना प्रचारांत आली नाहीं तर अश्विन्यादि गणना संपातानुसार सुरू करण्याला परंपरेचा आधार नसतां कोण प्रवृत्त होईल? वेदात कृत्तिकादि गणना स्पष्टपणें सांपडते तशी दुसरी कोणतीही सापडत नाहीं. वेदकालीं वर्षारंभ दोन तीन स्थळीं असल्याबद्दलचे उल्लेख आहेत परंतु ते निरनिराळ्या कारणांमुळें आहेत व ह्या कारणांचा संबंध मुख्यतः यज्ञक्रियेशीं आहे. ओरायनकारांनीं ह्या निरनिराळ्या वर्षारंभांच्या उल्लेखांवरून पूर्वी वर्षारंभ मागें मागें आणण्यांत येत असे, असें अनुमान काढण्याचा प्रयत्न केला आहे. हा त्यांचा प्रयत्न ऋग्वेदापुरताच आहे झटलें तरी चालेल. आमच्या धर्मसमजुतीप्रमाणें सर्व वेदांची एकवाक्यता पाहिजे व तशी एकवाक्यता ओरायनकारांच्या विचारसरणीनें साध्य नाहीं.

वर्षारंभ एकेक महिना मागें मागें आणण्याची पद्धत पूर्वी होती ही गोष्ट कै. शं. बा. दीक्षित यांनाही संमत नसून प्रो. थीबो या यूरोपियन पंडीताचे मतही विरुद्धच आहे. सायनाचार्यांनीं अनेक वेदवचनांचा एकत्र विचार करून वर्षारंभसंबंधानें निर्णय केला आहे, त्यांतही मधु किंवा चैत्र ह्या मासाबरोबर व वसंत ह्या ऋतूबरोबरच वर्षारंभ करणें वेदसंमत असल्याचें ठरविलें आहे. ओरायनकारांच्या विचारसरणीच्या नादीं लागल्यास आपल्याला त्यांच्या मताप्रमाणें श्रीरामकथा ही वेदांतील एका लहानशा कथेवर रचलेली कल्पित कादंबरी होय असें मानावें लागेल. परंतु निदान रा. ब. चिं. वि. वैद्य यांचा "रामायणाचें कोडें" हा इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर तरी आपल्याला असें मानण्याचें कारण उरलें नाहीं.

शिवाय ओरायनाचा उपयोग केतकरपक्षाला कांहींच होण्यासारखा नाहीं. आधुनिक पद्धतीनें बोलावयाचें झणजे ऋग्वेद हा सगळ्यांत जुना वेद. त्या काळीं दोन तीन स्थळीं वर्षारंभ आढळले तरी ते जर पुढें दिसत नाहींत तर ऋग्वेदकालाच्या कांहीं भागांत आमची पद्धति कायम झाली नव्हती. ती पुढें कायम होऊन मधु किंवा चैत्र हा वर्षाचा पहिला महिना व वसंत हा पहिला ऋतु ह्या प्रमाणें सर्व संमत झाली इतकेंच फार तर झगावें लागेल. तसेंच अगदीं आरंभीं

तारकात्मक नक्षत्रें व सांपातिक नक्षत्रविभाग यांचीं स्थानें एकच असतील या मुळें नक्षत्रें २७ च मानण्यांत आलीं. परंतु पुढें पुढें तारकात्मक नक्षत्रांचा संपात अयनें व ऋतु यांशीं मेळ बसत नाहीं असा कालेंकरून अनुभव येऊं लागल्यामुळें त्यावर निरानराळे उपाय सुचविण्यांत येऊं लागले व अखेरीस स्थिर अथवा तारात्मक व सांपातिक अथवा चल अशीं दुहेरी नक्षत्रें मानल्यासिवाय गति नाहीं असें ठरून शतपथांतील नक्षत्रें २७ व उपनक्षत्रें २७ ही योजना कायम झाली असावी.

वेदांत कृत्तिकादि गणना सांपडते याचें कारण कृत्तिकांच्या देवता अग्नि आहे हेंच होय. यास प्रत्यंतर वेदांगज्योतिषांत आहे. वेदांगांत एके ठिकाणीं नक्षत्रें धनिष्ठांपासून दिलीं असून दुसरे एका ठिकाणीं त्याच वेदांगांत अश्विनीपासून दिलीं आहेत. परंतु नक्षत्रांच्या देवता सांगतेवेळीं हींच नक्षत्रें कृत्तिकांपासून आरंभ करून सांगितलेलीं आहेत.

प्रो. थीबो यांचेंही झणणें असेंचें आहे कीं, वेदांत कृत्तिकादि गणना आहे तिचें कारण त्या कालीं कृत्तिकांत संपात होता हें नव्हे. अर्थात् संपात ज्या नक्षत्रीं असेल तें नक्षत्र आद्यस्थानीं धरून नक्षत्रें सांगण्याची पद्धति पूर्वकालीं असावी असें झणणारांच्या कल्पनेचा पायाच निराधार ठरतो.

दीक्षितांनींही तारात्मक राशि कधींच कोणीच मानल्या नव्हत्या, असें स्पष्टपणें झटलेलें नाहीं. केतकरांचे मतें तर त्या तशा होत्याच ह्यावरून नवीन विचारसरणीला अनुसरूनच दीक्षितांनीं ठरविलेल्या मेषादि संज्ञांच्या प्रचाराच्या कालाविषयीं थोडें लिहावेंसें वाटतें. दीक्षितांचे मतें या संज्ञा नेहमीं मेषादीच सांपडतात व मेष झणजे अश्विनी, भरणी व कृत्तिकांचा एक पाद असेंच कोष्टक सर्वत्र आढळतें. त्यावरून त्यांनीं तर्क केला कीं ह्या संज्ञा प्रचारांत येण्याचा काल अश्विनी नक्षत्रीं संपात आला तेव्हांचाच असला पाहिजे. ह्या तर्काला त्यांचे जवळ इतिहासाचा स्पष्ट आधार कांहीं एक नाहीं.

इतकेंच नव्हे तर ह्या निवळ तर्काच्या आधारें दीक्षितांनीं ह्या गोष्टीच्या ठरविलेल्या कालाला ज्योतिःशास्त्रानभिज्ञ विद्वान् ज्योतिषाच्या आधारानें काढलेला काल असें मानून त्याचे जोरावर बेळेस ऐतिहासिक पुराव्यालाही बाजूला सारण्यास सिद्ध झाल्याचीं उदाहरणें आहेत. त्यांच्याच विचारसरणीनें विचार केला तरी मेष राशींत संपात होता त्या वेळीं ह्या संज्ञा कोणी तरी काढल्या इतकें फार तर ह्मणावें लागेल. कारण मेष ही पहिली रास आहे. परंतु समजा कीं, संपात कृत्तिकांच्या आरंभीं आहे तरीही तो तारात्मक मेष राशींतच आहे. अशा वेळीं जर कोणी ही कल्पना काढली असली तर तो काय अश्विनींत संपात जाईपर्यंत आपली कल्पना गुप्तच ठेवील? अश्विनी, भरणी व कृत्तिकांचा पाद इतक्या प्रदेशांतील तारांमिळून मेषाकृति होत असेल तर ही कल्पना मेषाच्या शेवटल्या अंशापासून पहिल्या अंशापर्यंत कोणत्याही स्थळीं संपात असतां उद्भवणें संभवतें. यापैकीं अमुकच बिंदूवर संपात असतां ही कल्पना निघाली असें ह्मणणें असेल तर तसें ह्मणण्याला विशेष प्रमाण कांहीं तरी दाखविणें जरूर आहे. दीक्षितांनीं अश्विनीच्या योगतारेच्या सुमारास ही कल्पना निघाली असेल असें गृहीत घेऊन या गोष्टींचा काळ शा. श. पूर्वी ५०० वर्षे हा काढिला आहे. परंतु वर दाखविल्या प्रमाणें ह्या गोष्टीचा काळ निरयन मेषाच्या अंतापासून आरंभापर्यंतचा कोणताही असूं शकेल. ह्मणजे हा काल शा श. ४९६ व शा श. पूर्वी १६६४ वर्षे ह्या दोहोंच्या मधला कोणचा तरी असेल. हा काल मानला ह्मणजे आधुनिकांना बऱ्याचशा महत्वाच्या गोष्टी शा० शकाचा आरंभ व शा० श. पू. ५०० वर्षे ह्यांचे दरम्यान कोंबण्याचा प्रसंग येतो तो टळेल. हा विचार आह्मी पश्चिमाभिमुख विचारसरणीला धरून केला आहे. आमचें स्वतःचें मत चलराशिविभाग पूर्वीचे असून राशींच्या आकृतींच्या मागूनच्या होत असें आहे.

वेदांगज्योतिषांतील वचनास उत्तर आह्मी ज्यो. केशव त्रिंबक पेंडसे यांस गेल्या अंकांत दिलें आहे, ह्मणून तेंच आतां पुनः देण्यांत तात्पर्य नाहीं.

सायननिरयनवाद

३

मकरसंक्रमण व उदगयन

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस

वि. वि.—पुस्तक ९ अंक ६ यांत 'वराहमिहिर–केतकर आणि के. त्रिं. पेंडसे' या मथळ्या खालीं आपण लिहिलेला लेख पाहिला. तो लेख लिहितांना आपण एक मुख्य मुद्दा अगदींच विसरलांत ह्मणून त्याविषयीं आपणास स्मरण देतों. मेहेरबानीनें त्याचें उत्तर मिळावें.

पुस्तक ९ वें अंक २ रा यांत आपण ह्मणतां 'मेषादि नांवें आकाशांतील तारकापुंजांचीं नाहींत. अश्विन्यादिनक्षत्रपुंज जसे आकाशांत दाखवितां येतात तसे मेषादि राशि त्यांच्या नांवाप्रमाणें दिसत नाहींत..... या साठीं शिष्यवृत्तीनें त्यांस विनंति करितों कीं ती वर्णनें ग्रंथाच्या नांवासह प्रसिद्ध करावीं ह्मणजे मग याबद्दल जास्त विचार करण्यास ठीक पडेल इ. इ.' आपण अत्यंत नम्रपणें मागितलेली वरील माहिती आह्मी दिली असून ती अंक ६ मध्यें आपण छापली आहे. पण तिचा विचार आपण बिलकूल केला नाहीं. विचार करण्याचें आपलें वरील वचन पूर्ण करणें आपणास भाग आहे.

१ 'मत्स्यौ घटी इ.' हा श्लोक बृहज्जातकांतील आहे किंवा नाहीं? २ असेल तर तो प्रक्षिप्त आहे किंवा मूल ग्रंथकाराचा आहे? ३ सदर श्लोकांत मेषादि राशींच्या आकृतींचीं वर्णनें आहेत किंवा नाहींत? यांत वर्णिल्या प्रमाणें युरोपिअनांनीं केलेल्या खगोलावर किंवा खगोलाच्या नकाशावर आकृति असतात किंवा नाहींत? ५ या आकृती वरून पाहिलें तर सध्या विषुवसंपात कोणत्या राशींत सापडतो, व उदगयनस्थान या आकृति निर्दिष्ट कोणत्या राशींत दिसून येतें? ६ उदगयनस्थान ह्मणजे विषुव संपातापासून २७० अंश हा बिंदु मकर राशींत न पडतां धनु राशींत पडत असेल तर तें कां?

वरील ६ प्रश्नांचीं उत्तरें आपली दृष्टि सरळ व निःपक्षपाती असल्यामुळें सरळपणाचीं मिळतील अशी आशा आहे.

ता० १७ मार्च्य १९०९ } आपला
वेंकटेश बापूजी केतकर

उत्तर

पुस्तक ९ वें अंक २ रा यांत आह्मी 'जर खरोखर मेषादि नांवें तारकापुंजांची असतील तर त्यांच्या आकृतींचें वर्णन ज्योतिषग्रंथांत कोठें तरी असेलच. नक्षत्रांचीं वर्णनें जशीं ग्रंथांतून आहेत तशींच हे जर तारकासमूह आहेत तर **अमुक तारे ह्मणजे मेंढा' अमुक तारे ह्मणजे बैल** असेंही वर्णन असलेंच पाहिजे. या साठीं शिष्यवृत्तीनें त्यांस विनंति करितों कीं, तीं वर्णनें ग्रंथांच्या नांवांसह प्रसिद्ध करावीं.'.....इ०' असा प्रश्न केला होता. त्या प्रश्नास समर्पक उत्तर मिळालें नाहीं. यूरोपियनांनीं स्वकपोलकल्पित तयार केलेल्या खगोलाच्या नकाशाकडे बोट दाखवून काय फळ?—अश्विनीभरणी कृत्तिकाःपादं मेषः—ही आमच्या सर्व ज्योतिष्यांची कारिका आहे. कृत्तिकातारकापुंज ∴ असा असून यांत सात तारा आहेत. यांपैकीं मेषराशीच्या वांट्यास सात पाव पावणे दोन तारा येतात! या पावणे दोन तारा कोणत्या ध्यावयाच्या याचा उलगडा केल्याशिवाय वरील प्रश्नाचें समाधान कसें व्हावें? विचार केला असतां २। नक्षत्राचा एक राशि ही परिभाषा विभागात्मक राशींची आहे. तारकात्मक नाहीं. मकरसंक्रमण हेंही विभागात्मकच आहे. असें असतां नक्षत्रांच्या तारकापुंजांनीं **विभागात्मक** राशि तयार होतात असें ह्मणणें ह्मणजे आंब्याची कोय लावून सडकेवरील मैल होतात असें ह्मणण्यासारखेंच हस्यास्पद आहे! आमचा मुख्य प्रश्न जर मेषादि राशि तारकापुंज आहेत तर ते कोणकोणत्या तारांनीं बनले आहेत असा आहे. हा प्रश्न केतकरांनीं सोडवला पाहिजे. त्याचप्रमाणें २। नक्षत्रांचा राशि ही परिभाषाही तारकापुंजांशीं जुळवून दिली पाहिजे. अशी जुळणी जर करितां येत नसेल तर आपले पंचांग तारकात्मक नक्षत्रपुंजांस अनुसरून करावें ह्मणजे सायन-वाद्यांस त्यांत तोंड घालण्याचें बिलकूल कारण पडणार नाहीं!

बृहज्जातक हा फलितावा ग्रंथ आहे. त्यांत राशींचीं वर्णनें आहेत तीं फलिताला धरून आहेत. आकृतिविशिष्ट नाहींत. या ग्रंथांत अमुक तारांनीं अमुक राशि होतो असें सांगितलेलें नाहीं. 'मत्स्यौ घटी इ०' वर्णन विभागांचें आहे, ताऱ्यांच्या आकृतींचें नाहीं ह्मणून हा श्लोक राशि हे आकृतिविशिष्ट आहेत असें सिद्ध करण्यास असमर्थ आहे. केतकर ह्मणतात, वराहमिहिरासंबंधाचा लेख लिहितांना वरील महत्वाचा मुद्दा आह्मीं विसरलों! पण, वराहमिहिर शून्यायनांशकालीन नाहीं असें सिद्ध करण्याच्या कामीं त्या मुद्याची काय आवश्यकता आहे, कळत नाहीं.

तथापि आह्मीं त्यांस त्याबद्दल उत्तर दिलें नाहीं असें नाहीं. गेल्या ७ व्या अंकांत त्यांच्या समग्र पत्रास उत्तर दिलें आहे. हें उत्तर हातीं पडण्याच्या पूर्वीच केतकरांनीं आजचें पत्र लिहिलें असल्यामुळें त्यांस वरील मुद्याचें आह्माला विस्मरण झालें असावें असें वाटलें यांत आश्चर्य नाहीं. बृहज्जातकांत 'मत्स्यौ घटी.....इ०' वर्णन जसें राशींच्या स्वरूपाचें आहे तसेंच प्रत्येक राशींच्या प्रत्येक देष्काणाचें ह्मणजे दहाव्या भागाचें वर्णन आहे असें मागील अंकांत दाखविलें आहे. अर्थात् जसें द्रेकाण वर्णन : विभागात्मक प्रदेशाचें फलिताला धरून आहे तसेंच राशींचें वर्णनही विभागात्मक प्रदेशाचें असून फलिताला अनुसरून आहे.

संपातापासून अमुक विभागांत लग्न, चंद्र व इतर ग्रह अमुक प्रकारचें फल उत्पन्न करितात असा अनुभव घेतल्या नंतर राशींच्या नांवांची उत्पत्ति झालेली असली पाहिजे. तुला हें नांव असें आहे कीं ताजव्या प्रमाणें दिनमान व रात्रीमान सारखें ज्या विभागांत सूर्य आला असतां होतें तो राशि तुला. या राशींचें लग्न उदित असतां किंवा या राशींत चंद्र असतां उपजणारा मनुष्यही जगांत काटेतोल अर्थात् खऱ्या मार्गानें चालणारा होतो, हा अनुभव प्रत्येक ज्योतिष्यास आहे. 'सत्यं चैव तुले' असें एक ग्रंथकार या राशीच्या मनुष्याचें वर्णन देतो! यावरून हें नांव गुणधर्मानुरूपच आहे असें सिद्ध होत नाहीं काय? सिंह हा सिंहासन दर्शक (राजदर्शक) राशि आहे. या राशींचें लग्न उदित असतां किंवा या राशींत चंद्र असतां मनुष्य मोठ्या योग्यतेचा, वजनदार, अधिकारी किंवा राजा होतो. त्याच प्रमाणें त्याचें शरीरही सिंहासारखें मजबूत असून पराक्रमानेंही सिंहासारखाच असतो असा अनुभव येतो. 'धनिश्च

वनपे' असें ग्रंथकार या राशींच्या मनुष्याचें वर्णन करितात. या वरून सिंह हें नांव गुणविशिष्टच आहे, आकृतिविशिष्ट नाहीं. राशि हे जर ताऱ्यांनीं झालेले असते तर त्याबद्दल एखाद्या तरी ग्रंथांत उल्लेख असता. परंतु तसा प्रकार कोठेंच आढळून नाहीं. येत असेल तर तो केतकरांनीं दाखवावा अशी आमची विनंति आहे. फलज्योतिषांत जातक, मुहूर्त, प्रश्न या तिघांचा समावेश होत असल्यामुळें राशींच्या स्वरूपांची वर्णनें या तिघांस उपयोगी पडतील अशीं आहेत. मनुष्याचें शरीर, वर्ण, स्वभाव यांच्याशीं तर त्यांचा स्पष्ट संबंध दिसून येतो हें फलज्योतिषाचा विचार करणारास चांगलें कळणारें आहे. असो. आतां केतकरांच्या ध्यानांत येईल कीं, राशि हे तारकापुंज नसून विभागात्मक प्रदेश आहेत. आणि असें झालें म्हणजे मग त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याचीही जरूर नाहीं.

संपादक—कुंडलीविज्ञान—

सायननिरयनवाद

४

मकरसंक्रमण व उदगयन.

रा० रा० कुंडलीविज्ञानकर्ते यांसः—

वि० वि०—पुढील चार ओळींस स्थळ मिळेल अशी आशा आहे.

(१) ८ व्या अंकांत विज्ञानकारांनीं दिलेलें उत्तर वाचून कोणासही हसूं आल्यावांचून राहणार नाहीं. कृत्तिका नक्षत्र म्हणजे कृत्तिकापुंजच केवळ नव्हे तर कृत्तिकाविभागांत असणाऱ्या लहानमोठ्या सर्व तारा मिळून होणारा प्रदेश. ही निरयन नक्षत्राची व्याख्या आबालवृद्धांसही माहीत असून विज्ञानकारांस कशी माहीत नाहीं हें आश्चर्य. पुणें जिल्ह्याचा चतुर्थांश म्हणजे ज्या प्रदेशाला पुणें हें नांव आहे त्या सर्व प्रदेशाचा चतुर्थांश असा अर्थ स्पष्ट असतां विज्ञानकार खुद्द पुणें शहराचाच चतुर्थांश करूं पाहतात यास काय म्हणावें तें समजत नाहीं. हें एक वितंडवादाचेंच लक्षण होय.

(२) दुसरी गोष्ट अशी कीं, जर मेषादि राशि तारकापुंज आहेत तर ते कोणकोणत्या तारांनीं बनले आहेत हा विज्ञानकारांचा प्रश्न असमंजस आहे. पुणें जिल्हा कोणकोणत्या टेकड्यांचा, झाडांचा व बांधांचा इ० बनला आहे असा कोणी प्रश्न केल्यास पुणें जिल्ह्याचा नकाशा पहा, म्हणजे समजेल हेंच त्याचें उत्तर. एवढ्यानें त्यांचें समाधान न होतां प्रत्येक झाडाचें, शेताच्या बांधाचें नांव सांगा नाहींतर आमचा प्रश्न तुम्हांस सोडवतां आला नाहीं असा हट्ट धरून बसल्यास त्याचें समाधान कोण करूं शकेल? जिल्ह्यांतील झाडांस जशीं नांवें असत नाहींत तशीं आकाशांतील कांहीं ठळक तारे सोडून इतर ताऱ्यांसही नांवें नसतात. तेव्हां अमुक अमुक ताऱ्यांनीं मेष राशि बनला आहे हें सांगणें कोणासही अशक्य आहे. याचें उत्तर एकच. तें हें कीं, नकाशा पहा म्हणजे समजेल.

(३) आज तीन महिने चालू असलेल्या वादविषयक लेखावरून विज्ञानकारांचें बोलण्यांत बोलणें असत नाहीं अशी वाचकांची खात्री

झाली असेलच. तथापि ही गोष्ट उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखविणें जरूर आहे.

१ लें–अंक २ यांत ज्यो० दिक्षित यांची अत्यंत प्रशंसा केली आहे व त्यांचें मत ह्मणजे वेदवाक्यच. पण पुढें अंक ६ यांत—यांतील ४२७ शालिवाहनाचा शक धरून चैत्र शु० १ ला मंगळवार होता असें दाखविण्यासाठीं त्यांना [दीक्षितांना] बऱ्याच लटपटी कराव्या लागल्या असें ह्मटलें आहे. दीक्षितांना एके ठिकाणीं असामान्य ह्मणून दुसरे ठिकाणीं लटपटे ह्मणण्यासही तयारच.

२ रें.—अंक ७ यांत–आह्मीं "मेषादि राशि हे तारकापुंज नाहींत" असेंच ह्मणणार या आपल्या विधानाच्या समर्थनार्थ पुढें वेब्स्टरकृत कोशांतील वाक्याचे भाषांतरांत पूर्वी एका काळीं मेषादि नांवाचे तारकापुंज संपातापासून पाडलेल्या क्रांतिवृत्ताच्या बारा भागांतून होते–असा विज्ञानकारांनीं पुरावा दिला आहे. पुराव्यांतील वाक्यांत 'मेषादि नावाचे तारकापुंज' हे शब्द 'मेषादि राशि हे तारकापुंज नाहींत' या त्यांच्याच पूर्वपक्षाचे खंडण करितात का मंडन करितात हें देखील विज्ञानकारांचे लक्ष्यांत आलें नाहीं.

३ रें.—अंक ७, परिग्राफ ७–निरयन मेष राशीला सायन वृषभ ह्मणण्यास विज्ञानकारांस मुख्य आधार इतकाच की, ही चाल आज दोन हजार वर्षांपासून यूरोपियनांमध्यें चालू आहे ह्मणुन केतकर जरी त्यांस वेडे ह्मणतात तथापि आह्मीं ह्मणणार नाहीं. कारण, यूरोपियनच ते. ते कसे चुकतील? असा यूरोपियनांचा गौरव केला आहे. पण अंक ८ यांत 'यूरोपियनांनीं स्वकपोलकल्पित तयार केलेल्या खगोलाच्या नकाशाकडे बोट दाखवून काय फळ? यांत यूरोपियनांस प्रथम मान देऊन पुढें त्यांचा अपमान करण्यास देखील तयारच.

(५) विज्ञानकारांस वाटतें कीं, एका प्रश्नासारखा दुसरा प्रश्न उपस्थित केला कीं, मूळ प्रश्न फिका पडलाच. आह्मीं त्यांच्या विनंती–प्रमाणें राशीच्या आकृतीसंबंधी ज्योतिषग्रंथांतील वर्णनें दिलीं. हीं ना शाबीत करण्यासाठीं विज्ञानकारांनीं द्रेष्काणाचीं वर्णनें दिलीं आहेत. पण यापासून आमचीं वर्णनें चुकीचीं ठरतात काय? त्याचप्रमाणें आह्मीं एका वराहमिहिराचें वचन दिलेलें पाहून त्यांनीं त्याच्या जोडीस आणखी

दोन वराहमिहिर उभे केले. वराहमिहिर आणखी पन्नास असले तरी त्यांच्या एकत्वाचा किंवा अनेकत्वाचा प्रश्न नाहीं. आह्मीं ज्या वराहमिहिराचें वचन दिलें आहे त्याच्या वचनाचाच विचार केला पाहिजे. मत्स्यौ या श्लोकाचा अर्थ करण्यांत विज्ञानकारांनीं बरीच विद्वत्ता दर्शविली आहे. त्यांत कदाचित् या शब्दाचा अर्थ कोण्या एक्या वेळीं असा न करितां मराठी भाषेंतील प्रयोगाप्रमाणें संशयद्योतक केला आहे. आसीत् या क्रियापदाचा अर्थ होता या शब्दानें न करितां असेल या शब्दानें केला आहे. 'आसीद्राजा नलो नाम' या वाक्याचा अर्थ 'नल या नांवाचा राजा होता' असा होतो किंवा 'नल या नांवाचा राजा असेल' असा होतो. याचा विज्ञानकारांनीं विचार करावा. वैद्यांच्या कोशांत 'कदाचित् व नूनं' यांचा अर्थ त्यांनीं पहावा.

(६) वराहमिहिराच्या ह्मणण्याचा विज्ञानकारांस चमत्कार वाटतो. पण त्यांत चमत्कार मुळींच नाहीं. वेदांगज्योतिषांत अयनें नक्षत्रात्मक दिलीं आहेत ह्मणून त्यानें ही त्याच पद्धतीनें सांगितलीं आहेत. वराहमिहिराचे वेळीं राशीवरून अयनें सांगण्याची पद्धति होती ह्मणून राशीसंबंधानें दिलीं आहेत.

पंचसिद्धांतिकाकार वराहमिहिर ह्मणतो कीं, 'सांप्रतमयनं पुनर्वसुतः' यांत पुनर्वसुतः या शब्दाचा अर्थ पुनर्वसु नक्षत्राच्या आरंभापासून असा करण्यास विज्ञानकारांस काय आधार आहे? पुण्यापासून मुंबई यांत पुण्याचा आरंभ घोरपडीपासून समजावा किंवा पुण्याच्या मध्यभागापासून समजावा? आह्मांस वाटतें पुण्याच्या मध्यापासून किंवा विशेष बारकाईनें विचार केल्यास मुंबईकडील पुण्याच्या बाजूपासून असा अर्थ करणेंच सयुक्तिक होईल. अयनगति विलोम असल्यामुळें अयनबिंदूचा प्रवेश नक्षत्राच्या शेवटील भागांत प्रथम होऊन नंतर तो हळूहळू आरंभस्थानीं येतो. यामुळें पुनर्वसुतः ह्मणजे पुनर्वसूच्या शेवटील भागापासून असाच केला पाहिजे. आतां विज्ञानकार असें ह्मणतील कीं, चौथ्या चरणाच्या आरंभीं असें कां ह्मटलें नाहीं? तर त्यास उत्तर इतकेंच कीं, इतक्या लांबट रीतीनें सांगण्यास आर्यावृत्त कामीं पडतें.

(७) यावरून बृ० सं० कार व पं० सि० कार हे वराहमिहिर एकच होत. व त्यामुळें अंक ६ च्या लेखांतील अंत्य भागांत विज्ञाकारांनीं कबुली दिल्या प्रमाणें सायनवाद्यांचीं तोंडें बंद झालीं पाहिजेत. व केतकरांचें मकर संक्रमण चुकलें असें ह्मणत राहण्यास जागा उरुं नये. पण अशी आशा करणें आजपर्यंतच्या विज्ञानकारांच्या लेखनशैलीवरून पाहातां असंभवनीय आहे. सारांश इतकाच कीं, वाचकांचा केतकी पंचाङ्गाविषयीं गैरसमज होऊं नये या हेतूनें आह्मीं चर्चा चालू ठेविली. झालेल्या वादावरून खरा पक्ष कोणता याची मर्मज्ञ वाचकांस खात्री होईलच. बाद पुढें चालविण्यांत अर्थ नाहीं. शेवटीं विज्ञानकारांस अशी विनंति आहे कीं, त्यांनीं आपलें सायन पंचाङ्ग चालू करावें. वितंडवादापासून खरा नफा कोणासही होत नसतो.

कारवार,
१८।४।०९. } आपला,
वेंकटेश बापूजी केतकर.

*या पत्रास शेवटचें उत्तर पुढील अंकीं देण्यांत येईल.

सं० कुं० वि०

सायननिरयनवाद

९

मकरसंक्रमण व उदगयन.

दहाव्या अंकांत ज्यो. केतकर यांचें पत्र छापलें आहे. केतकरांच्या सर्व मुद्यांस आमचीं चोख उत्तरें मिळालीं असून तीं त्यांस खोडून काढतां आलीं नाहींत हें वाचकांच्या ध्यानांत असेलच. हाच वाद उभयतांच्या प्रश्नोत्तर रूपानें पुढें सवडीनें देण्याचा विचार आहे. आज त्यांच्या फक्त नव्या मुद्यांस मात्र उत्तरें देण्याचीं आहेत. किरकोळ गोष्टींस उत्तरें देत बसण्यांत हांसल नाहीं. तीं उत्तरें येणेंप्रमाणें:—

१ नक्षत्राची व्याख्या.—संपातापासून क्रांतिवृत्ताचे जे २७ विभाग त्यांस नक्षत्र असें ह्मणावयाचें अशी आमची समजूत आहे. स्थिरसंपातापासून [कोणत्याही आरंभ स्थानापासून] जे विभाग तीं निरयन नक्षत्रें होत व चल संपातापासून जे विभाग तीं सायन नक्षत्रें होत. पंचांगांत जीं नक्षत्रें असतात तीं हींच नक्षत्रें. आज आर्द्रा नक्षत्र आहे याचा अर्थ, रेवतीयोगतारेपासून १३ अं. २० क. चा प्रत्येक भाग याप्रमाणें जो ६ वा भाग त्या भागांत चंद्र आहे. "आर्द्रार्कः" याचा सुद्धां अर्थ, वरील ६ व्या भागांत सूर्यानें प्रवेश केला असा आहे. असें असतां ज्यो. केतकर ह्मणतात— "कृत्तिका नक्षत्र ह्मणजे कृत्तिका नक्षत्रपुंजच केवळ नव्हे तर कृत्तिकाविभागांत असणाऱ्या लहानमोठ्या सर्व तारा मिळून होणारा प्रदेश"—या त्यांच्या व्याख्येवरून नक्षत्रविभगांत तें तें नक्षत्र असतें असें दिसून येतें. पण हें त्यांचें ह्मणणें भा. ज्यो. इ. पृ. ४२६ वरून बरोबर नाहीं असें ह्मणावें लागतें. कित्येक नक्षत्रांच्या

तारा विभागाच्या मागें आहेत तर कित्येक पुढें आहेत! नक्षत्रतारकापुंज सारख्या अंतरावर नसल्यामुळें आरंभस्थान कोणतेंही मानिलें तरी त्या त्या विभागांत ते ते नक्षत्रपुंज सर्व सांपडणें अशक्य आहे, ह्मणूनच विभागात्मक नक्षत्रें आमच्या ग्रंथकारांस मानावीं लागलीं. या विभात्मक नक्षत्रांनींच बारा राशि बनलेले आहेत ह्मणून तेही विभागात्मकच आहेत. फलज्योतिषांत राशींचें महत्व विशेष आहे. राशींचीं फलें तारांस अनुसरून नाहींत, तीं विभागांस अनुसरून आहेत. नक्षत्रांचीही तीच स्थिति आहे. नक्षत्रविभांत तारा असोत किंवा नसोत. एखाद्या विभागांत तारा नसल्या तरी त्याला अश्विन्यादि अनुक्रमानें जें नांव येईल तें द्यावयाचें हें उघड आहे पुणें जिल्ह्यांत पुणें शहर तरी आहे, पण आमच्या नक्षत्राच्या विभागांत तें नक्षत्रच असत नाहीं, इतकेंच नव्हे तर केव्हां केव्हां त्यांत दोन नक्षत्रेंही असतात! असलें केतकरांच्या नक्षत्राच्या व्याख्येचें स्वरूप आहे. कृत्तिका ह्मणजे तारकापुंज नसून विभागात्मक प्रदेश आहे, त्यांत तो नक्षत्रपुंज असो वा नसो, इतकी गोष्ट केतकरांस मान्य असली ह्मणजे आह्मांस कृत्तिकानक्षत्रपुंजाचे भाग करण्याचें कारण नाहीं.

२ मेषादि विभाग.—नक्षत्रविभाग तसेच राशिविभाग हे क्रांतिवृत्ताचे भाग आहेत. क्रांतिवृत्त हा पृथ्वीचा गमनमार्ग असून तो रेषामय आहे. त्या रेषेंत अश्विन्यादि तारकापुंज नाहींत इतकेंच नव्हे तर एखादी भव्य आकृति बनेल इतके तारेही असणें शक्य नाहीं, असें असतां ज्यो. केतकर हे आह्मांस 'नकाशा पहा ह्मणून ह्मणतात हें आमचें दुर्दैव होय! केतकरांचे जे तारात्मक राशि आहेत, त्यांचा गणिताशीं किंवा फलिताशीं कांहीं संबध नाहीं व असणें शक्यही नाहीं. मेष याचा अर्थ मेंढा होतो, ह्मणून यूरोपियन

लोकांनीं कोठले तरी तारे घेऊन त्यांची कल्पित आकृति बनविली आहे. जर राशि हे मूळचे तारकापुंज असते तर आमच्या ग्रंथकारांनीं प्रत्येक नक्षत्राच्या अमुक अमुक तारा आहेत असें जसें स्पष्ट वर्णन केलें आहे तसेंच राशींचेंही केलें असतें, तें तसें नाहीं ह्मणून राशि हे तारकापुंज नाहींत असें आह्मी ह्मणतो. राशि हे मूळचे विभागात्मकच आहेत, ग्रहांचीं संक्रमणें विभागांसच अनुसरून आहेत व त्यांचीं फलेंही विभागांसच अनुसरून आहेत. ह्मणून केतकरांच्या नकाशाकडे पाहण्याची आह्मांस मुळींच जरूर नाहीं. कृत्तिकांच्या सात तारा आहेत, किंवा शततारकांच्या शंभर तारा आहेत किंवा रेवतीच्या ३२ तारा आहेत असें जसें नक्षत्रपुंजांचें वर्णन स्पष्ट आहे तसें राशि हे जर नक्षत्रपुंज आहेत तर त्या प्रत्येकाचे तारे अमुक आहेत असें वर्णन कां नसावें? प्रत्येक ताऱ्याचें नांव सांगतां येत नसेल तर नका सांगूं व आह्मींही तें विचारीत नाहीं पण सामान्य वर्णन हें सांगतां आलेंच पाहिजे. पुणेंजिल्हा कोणत्या टेंकड्यांचा किंवा झाडांचा झालेला आहे हें कोण विचारतो? पण तो जिल्हा अमुक शहरें, अमुक खेडीं, अमुक नद्या व अमुक पर्वत मिळून झालेला आहे हें जसें सांगतां येतें तसें तरी राशींविषयीं सांगाल कीं नाहीं? ह्मणे नकाशा पहा! तैत्तिरीय ब्राह्मणांत **नक्षत्रीय प्रजापति** ह्मणून एक विशाल आकृति सांगितली आहे, ती अशी— "हस्तनक्षत्र हा त्याचा हात, चित्रा हें शिर, स्वाती हें हृदय, विशाखांच्या दोन तारा ह्या मांड्या आणि अनुराधा ही उभें राहण्याची जागा" (ज्योतिर्विलास पृ० ३७ पहा) हें जसें एका आकृतीचें वर्णन आहे तसें मेषादि राशींचें असावयास नको काय? असें वर्णन दाखवा असा आमचा केतकरांस प्रश्न होता, त्याचें उत्तर ते 'नकाशा पहा' असें देतात व आमचा प्रश्न असमंजस आहे असें म्हणतात याला काय म्हणावें?

वास्तविक आज पंचांगांत काय किंवा फलितांत काय, नक्षत्र व राशि हे शब्द क्रांतिवृत्ताच्या विभागांचे आहेत. त्या विभागांत तीं तीं नक्षत्रें नाहींत व केतकरांचे राशिही नाहींत. राशी जरी तारकापुंज असले तरी त्यांच्याशीं आह्मांस कांहीं कर्त्तव्य नाहीं. केतकरांचें मकर-संक्रमण कांहीं तारकापुंजांचें नाहीं, तें एका क्रांतिवृत्ताच्या विवक्षित बिंदूचें आहे. हा बिंदु सायन असावा असें आह्मीं ह्मणतों व निरयन असावा असें केतकर ह्मणतात. निरयन बाजूचे मुद्दे खोडून टाकलेले असून सायनाचे प्रस्थापित केलेले आहेत. विज्ञानकारांच्या बोलण्यांत बोलणें असत नाहीं या केतकरांच्या विधानांत कांहीं अर्थ नाहीं. दीक्षित हे पूर्णपणें सायनवादी नव्हेत. त्यांच्या मतें पूर्वी आमच्या देशांत सायनपद्धति नव्हती. ही पद्धति सयुक्तिक असून त्यांस मान्य आहे व ती आपल्या देशांत चालू ह्मावी पाहिजे. या प्रमाणें दीक्षितांचें मत असल्यामुळें जेव्हां जेव्हां त्यांनीं पूर्वी सायन नव्हतें असें दाखवितांना लटपटी केल्या आहेत तेव्हां तेव्हां त्यांस आह्मीं दूषणें दिलीं आहेत, त्यांत बोलण्यांत बोलणें तें काय असावयाचें! निरयन मेष राशीला सायन वृषभ ह्मणण्यास मुख्य आधार ही चाल दोन हजार वर्षांपासून यूरोपियनांत आहे असें आह्मीं ह्मणतों हा केतकरांचा आरोप वृथा आहे. आमच्या ग्रंथांतीलच आधार त्यांस दिले होते. वरील आधार गौण आहे हें त्यांच्या लक्षांत न आल्यामुळें "आमचें बोलण्यांत बोलणें नाहीं" असें त्यांस वाटलें हें दुर्दैव होय. असो या संबंधानें जास्त लिहिण्यांत अर्थ नाहीं. कोळसा जितका उगाळावा तितका काळाच!

३ एका प्रश्नासारखा दुसरा प्रश्न.—ज्यो. केतकर ह्मणतात, "आह्मीं विज्ञानकारांच्या विनंतीप्रमाणें राशींच्या आकृतींची वर्णनें ज्योतिष ग्रंथांतील दिलीं" पण तीं वर्णनें फलिताला धरून

आहेत हें दाखविण्यासाठीं त्याच ग्रंथांतील आह्मीं द्रेष्काणांचीं वर्णनें दिलीं, तेव्हां ते ह्मणतात 'तेवढ्यानें आमचीं वर्णनें चुकीचीं ठरतात काय?' तेव्हां याचा विचार वाचकांनीच करावा. अमुक (ठळक ठळक) ताऱ्यांनीं अमुक राशि होतो असें वर्णन कोठें असेल तर तें दाखवा हा आमचा प्रश्न असून त्याला केतकरांनीं बृहज्जातक या फलिताच्या ग्रंथांतील—मत्स्यौ घटी—इ० श्लोकाचा आधार दिला आहे. हा आधार कुचकामाचा आहे असें दाखविण्यासाठीं आम्हीं द्रेष्काणवर्णनें त्यांच्या पुढें मांडलीं. यांत विपरीत तें काय झालें? वराहमिहिरासंबंधानें सुद्धां हीच गोष्ट आहे. त्याच्या ग्रंथांतील वचनें जेव्हां शून्य अयनांशकालीन आहेत असें केतकरांनीं विधान केलें तेव्हां "कोणताही वराहमिहिर घेतला तरी तो शून्यायनांशकालीन नाहीं" असें आम्हीं सिद्ध केलें.

४ पुनर्वसुतः.—याचा सरळ अर्थ पुनर्वसूच्या आरंभापासून असा आहे. पण अयनगति विलोम असल्यामुळें केतकरांच्या तर्काप्रमाणें पुनर्वसूच्या शेवटल्या बिंदूपासून असा केला तरी पुनर्वसूच्या शेवटीं कर्क राशीचा आरंभ निरयनपद्धतींत नाहीं हें उघड आहे. केतकरांनीं पुण्यापासून मुंबई हें जें उदाहरण घेतलें आहेत तें साफ चुकीचें आहे. नक्षत्रें बिंदुमय आहेत, त्याचा आद्यंत निश्चयात्मक आहे तसा पुण्याचा नाहीं हें केतकरांस समजूं नये याच्या सारखी दुःखाची गोष्ट नाहीं. पुनर्वसुतः ह्मणजे पुनर्वसूंच्या चवथ्या चरणाच्या आरंभापासून हा केतकरांचा अर्थ ते कितीही विद्वान् असले तरी विद्वत्तादर्शक नाहीं इतकेंच नव्हें तर तो एखाद्या पोरालाही शोभण्यासारखा नाहीं. वराहाला आर्यावृत्त कमी पडतें असें वाटलें असतें तर त्यानें शार्दूलविक्रिडित घेतलें असतें. तो कांहीं माणकूबाईच्या

जांवयासारखा कवि नव्हता! शिवाय एका आर्यावृत्तांत तें वर्णन गोंवतां आलें नसतें तर त्यानें त्या करितां दहा आर्या केल्या असत्या. पुनर्वसुतः म्हणजे पुनर्वसूंच्या चवथ्या चरण्याच्या आरंभापासून हा वराहाच्या मनांतला अर्थ त्यानें केतकरांस स्वप्नांत दृष्टांत देऊन सांगितला असल्यास नकळे!

५ वराहमिहिर.—बृ. सं. कार व सि. कार हे वराहमिहिर एक नव्हत. म्हणून केतकरांस सायनवाद्यांचीं तोंडें बंद करितां आलीं नाहींत. त्यांचें मकरसंक्रमण साफ चुकलें आहे. उदगयन तेंच मकरसंक्रमण होय. केतकरांस आतां वाद पुढें चालविण्यांत अर्थ वाटत नाहीं त्यास आमचा इलाज नाहीं.

मेषादि संज्ञा सायन कीं निरयन?

आज आह्मी ज्या पत्रिका वर्तवितों, त्या केवळ राशींच्या साह्यानें यावद्दल वाद नाहीं. नक्षत्रांचा विचार जातकांत कोणीही करीत नाहींत. जातकावर जे फलग्रंथ आज प्रचलित आहेत त्यांतही नक्षत्रांवरून फलादेश सांगितलेला नांहीं. अमुक लग्नाचें (लग्नांतील राशीचें) फल अमुक, अमुक ग्रह अमुक राशींत आहे त्याचें फल अमुक व अमुक भावाचा (भावांतील राशीचा) स्वामी अमुक स्थानांत व अमुक राशींत आहे, त्याचें फल अमुक याप्रमाणें जातकग्रंथांत वर्णन आहे व ज्योतिषी लोकही पत्रिकेंत तसेंच वर्णन देतात. अमुक लग्नांत अमुक नक्षत्र आहे, त्याचें फल अमुक किंवा अमुक ग्रह अमुक नक्षत्रांत आहे त्याचें फल अमुक अथवा अमुक भावाचा स्वामी अमुक नक्षत्रांत आहे त्याचें फल अमुक असें कोणताही जातकग्रंथ किंवा कोणताहि ज्योतिषी सांगत नाहीं. ह्मणून जातकांत नक्षत्रांचा संबंध नाहीं हें सिद्ध आहे.

चंद्र अमुक नक्षत्रांत असतां अमुक फल देतो, असें मात्र जातक ग्रंथांत वर्णन आहे. परंतु अमुक तान्याजवळ (नक्षत्राजवळ) असतां वरील प्रकारचें फल देतो असा स्पष्ट खुलासा एकाही ग्रंथांत नाहीं. चंद्राव्यतिरिक्त ग्रहांचें नक्षत्रांवरून फलवर्णन मुळींच नाहीं.

राशि काय किंवा नक्षत्र काय जर त्यांचा तारा किंवा तारकासमूह असा अर्थ करावयाचा असेल तर हल्लींची कुंडली वर्तवि-

प्याची पद्धति सपशेल चुकीची आहे असें ह्मणावें लागतें. कारण, हल्लींच्या पद्धतींत क्रांतिवृत्ताचे जे बारा भाग त्यांस राशि व २७ भाग त्यांस नक्षत्र अशी परिभाषा आहे. अमुक ग्रह अमक्या राशींत आहे ह्मणजे तो क्रांतिवृत्ताच्या अमक्या विभागांत आहे व चंद्र अमुक नक्षत्रांत आहे ह्मणजे तो क्रांतिवृत्ताच्या २७ विभागांपैकीं एका विवक्षित विभागांत आहे असा हल्लींचा अर्थ आहे. तो अमक्या ताऱ्याजवळ किंवा तारका समूहाजवळ आहे असा एकाचाही समज नाहीं किंवा त्याला शास्त्राचा पुरावाही नाहीं.

यावरून असें सिद्ध होतें कीं, जातकांत सात, नऊ किंवा [हर्शल, नेप्च्यून धरून] अकरा ग्रहांव्यतिरिक्त आकाशस्थ कोणत्याहि एक किंवा अनेक गोलांचा संबंध नाहीं. असें असतां कित्येकांचें ह्मणणें असें आहे कीं, ग्रह हे राशींमध्यें किंवा राशिमध्यें जें फळ देतात तें त्या राशींतील तारकांमुळें असतें. कारण, राशि हे तारकांनीं बनलेले आहेत. आतां हें ह्मणणें कितपत सत्य आहे याचा विचार करूं.

राशि हे तारकांनीं बनलेले आहेत कीं काय यावद्दल वाद आहे. प्रसिद्ध ज्योतिर्विद कै० शंकर बाळकृष्ण दीक्षित हे भारतीयज्योतिः शास्त्राचा इतिहास पृष्ठ १३८ मध्यें लिहितात— "मेषादि संज्ञा प्रथम तारापुंजांच्या आकृतिविशेषांवरून पडल्या कीं काय या विषयीं वाद आहे. आमच्या देशांत त्या परदेशांतून आल्या असल्या किंवा मूळच्या असल्या तरी **आकृतींशीं त्यांचा संबंध दिसत नाहीं.** आश्विनी, भरणी आणि कृत्तिकांच्या कांहीं तारा मिळून मेषाची (मेंढ्याची) आकृति होते असें कांहीं नाहीं." याप्रमाणें या ज्योतिर्विदाचें मत आहे. आह्मांसही हेंच

मत मान्य आहे. यांचीं कारणें पुढें देऊं.

ज्योतिर्विद व्यंकटेश बापूजी केतकर [केतकी पंचांगाचे उत्पादक] हे पूर्ण निरयन वादी आहेत. पूर्ण ह्मणण्याचें कारण त्यांस सायनपद्धतीची आज जरूरी वाटत नाहीं व पूर्वी ती प्रचलित होती असेंही वाटत नाहीं. दीक्षित हे अर्धवट सायनवादी होते. त्यांस आज सायनपद्धति पाहिजे असें वाटत होतें, पण, प्राचीन काळीं ती होती हें मत मान्य नाहीं. कै० विसाजी रघुनाथ लेले हे पूर्ण सायनवादी होते. त्यांच्या मतें पूर्वी सायनपद्धतिच प्रचारांत होती व आजही तीच पाहिजे. पूर्ण सायनवादी राशि हे तारकापुंज नाहींत असें ह्मणतात. व पूर्ण निरयनवादी ते तारकापुंज आहेत असें ह्मणतात. या दोघांत खरा कोण याचा निःपक्षपातानें आपणास निर्णय केला पाहिजे. केतकरांनीं कुंडलीविज्ञानांत 'मकर संक्रमण आणि उदगयन' या वादाच्या लेखांत राशि हे तारकापुंजच आहेत असें विधान केलें असून त्याला तीन प्रकारचे पुरावे दिले आहेत.

१ ला.—राशि हा शब्द समूहदर्शक आहे. २ रा.—बृहज्जातकांत प्रत्येक राशीची आकृति कशी असते यांचें वर्णन आहे. ३ रा.—यूरोपीय ज्योतिष्यानीं गोलावर तारात्मक राशि काढिलेले आहेत. या तीन पुराव्यांत राशि हा शब्द समूहदर्शक आहे हा पुरावा सबळ आहे. हा समूहदर्शक शब्द दिसतो खरा. पण, यावरून तो तारकांचाच समूह असेल असें कशावरून ? विभागांचा समूह नसेल असें तरी कशावरून ? ६० विकला ह्मणजे कला. ६० कला ह्मणजे अंश व ३० अंशाचा एक राशि आणि १२ राशींचें एक चक्र असें कोष्टक आहे. जर राशि

ह्मणजे तारकांचा समूह असें ह्मणावें तर तो ३० अंशाचा होतो असें जें ज्योतिःशास्त्र सांगतें त्याची वाट काय ? अमुक तारे ह्मणजे त्रिकला किंवा अमुक तारे ह्मणजे राशि असें वर्णन कोणत्या ग्रंथांत आहे ? राशि हे जर तारकासमूह असते तर एखाद्या तरी ग्रंथांत ते अमुक अमुक ताऱ्यांनीं झाले आहेत असें वर्णन खास असतें. निरयनवाद्यांनीं हा आमचा मुद्दा प्रथम खोडून काढिला पाहिजे. ज्योतिःशास्त्रावर हजारों ग्रंथ आहेत, असें असतां एकाही ग्रंथांत मेष रास ह्मणजे 'अमुक ताऱ्यांनीं बनलेली आकृति' असें वर्णन नसावें ही मोठ्या आश्चर्याची व खेदाची गोष्ट आह. 'अश्विनी, भरणी, कृत्तिकाः पादं मेषः' ही परिभाषा मात्र सर्वत्र आहे. यांत कृत्तिकाचा पाद याचा अर्थ काय करावयाचा बरें या २७ प्रकारच्या तारकापुंजांनींच हें राशि बनले आहेत असें ह्मणावें तर तसेंही दिसत नाहीं. कांहीं तारा विभागाच्या पुढें आहेत तर कांहीं मागें आहेत, यूरोपिय लोकांनीं गोलावर ज्या आकृति काढल्या आहेत, त्या अश्विनी, भरणी इ० नक्षत्रांनाच धरून आहेत काय ? फलग्रंथांत राशींच्या आकृतिचें वर्णन आहे, पण तें आकृति विशिष्ट आहे असें ह्मणतां येत नाहीं. कारण, जसें राशींचें वर्णन आहे तसेंच द्रेष्काणांचेंही आहे. द्रेष्काण ह्मणजे राशीचा तिसरा भाग अर्थात् तो विभागात्मक आहे. सारांश, हें वर्णन आकृतिविशिष्ट नाहीं हें उघड आहे. तें फलें सांगण्यासाठीं आहे, त्याची आकाशांत कांहीं खुण नाहीं.

वरील विवेचनावरून ध्यानांत येईल कीं, राशींचा ताऱ्यांशीं कांहीं संबंध नाहीं. राशींना जीं नांवें दिलीं आहेत तीं गुणविशिष्ट आहेत. मेष ह्मणजे मेंढा अथवा बकरा. मेष याला अज असाही

पर्याय आहे. अज ह्मणजे मेंढा नव्हे, बकरा असा त्याचा अर्थ आहे. ह्मणून मेष ह्मणजे मेंढा अथवा बकरा असा अर्थ होतो. हा प्राणी तोल संभाळण्याच्या कामीं मोठा पटाईत आहे. सूर्य जेव्हां या राशीच्या आरंभीं येतो, तेव्हां सर्वत्र दिनमान व रात्रीमान समतोल असतें, त्याचप्रमाणें हें जनावर अतिशय चपळ असून लढाऊ आहे. बकऱ्याची टक्कर ही वज्रपातासारखी भयंकर असते. हें जनावर सदा तरुणासारखें व उत्साही दिसतें. इत्यादि गुण ध्यानांत घेऊन या राशिविभागाला **मेष** अशी संज्ञा दिलेली आहे. तुला (तूळ) हें नांव ताजव्याचें आहे. बृहज्जातकांत ताजवा हातांत घेतलेला पुरुष असें या राशिविभागाचें वर्णन आहे. सूर्य जेव्हां या राशीच्या आरंभीं येतो, तेव्हां दिनमान व रात्रीमान ताजव्यांत ठेवल्याप्रमाणें समतोल असतें. अर्थात् ही संज्ञा सुद्धां गुणानुरूप आहे, आकृत्यनुरूप नाहीं. "समरात्रिदिवेकाले विषुव द्विषुवंच तत् ॥" असें विषुवदिनाचें लक्षण सांगितलें आहे व "मेषादौच तुलादौ च मैत्रेय विषवस्थितः ॥ तदा तुल्यमहोरात्रं करोति तिमिरापहः ॥" असें मेष व तूळ राशींचें लक्षण सांगितलें आहे. यावरून सदासर्वकाल मेष आणि तूळ राशीच्या आरंभीं दिनमान व रात्रीमान समतोल असतें व या गुणानुरूपच मेष आणि तुला (तूळ) हीं नांवें आहेत. याप्रमाणेंच सर्व राशींची उपपत्ति लागते. तात्पर्य, **मेषादि नांवें आकृतिविशिष्टच आहेत असें ह्मणण्यास आधार नाहीं.**

आतां विभागांत जर ताऱ्यांचा संबंध नाहीं तर ते फळदाते कां व्हावे अशी कोणास शंका येईल. परंतु ही शंका निरर्थक

आहे. दिनमान सारखें होणें हें जें मेष व तूळ राशींचें फळ तें एखाद्या तान्यावर अवलंबून आहे ? राहू आणि केतु हे तारेच असतील नाहीं बरें ? जगांतल्या कोणत्याही अतिसूक्ष्मदर्शक दुर्बिणीनें तरी तें दिसणें शक्य आहेत काय ? राहू व केतु हे पृथ्वी आणि चंद्र यांच्या गमनमार्गाचे छेदनबिंदु (पात) आहेत, इतकेंही न समजण्या इतके अज्ञान अद्यापि ज्योतिषी लोकांत आहे काय ? गुलिक, मुंथा हें काय तारे आहेत ? तिथि ह्मणजे सूर्य. व चंद्र यांतील अंतर. असें असून त्या जर फळ देतात तर राशि विभागात्मक असले ह्मणून काय बिघडतें ? मेषादि राशींतले कांहीं राशि पाठीकडून उदय पावतात, कांहीं डोक्याकडून व कांहीं दोन्हीं भागांनीं उदय पावतात असें बृहज्जातकांत वर्णन आहे, तें तारकापुंजांस जुळतें काय ? मेष राशींचा वर्ण तांबडा असतो हें कोणी पाहिलें आहे ? सारांश अशा हजारों गोष्टी आहेत कीं त्यांचा तारकापुंजांशीं कांहीं संबंध नाहीं. राशि हे तारकापुंज आहेत ही निवळ कल्पना व निवळ भ्रम आहे ! तात्पर्य मेषादि नांवें मूळचीं आकृतींचीं नाहींत विभागांचीं आहेत, हें सिद्ध आहे. कालांतरानें कोणी या नांवांवरून तारकापुंजांनीं आकृति बनविल्या असाव्या व त्याचाच परिणाम मनावर दृढतर झाल्यामुळें निरयनवादी हटवादी बनला असावा.

एकदां मेषादि राशि विभागात्मक आहेत इतकें मनाला पटल्यावर मग ते सायन असतील कीं निरयन असतील हा वाद कोणीच करणार नाहीं. कारण, दिनमान सारखें होणें किंवा कमजास्त होणें या गोष्टी प्रत्यक्ष असून त्या सायनविभागांवरच अवलंबून आहेत हें शिकवण्यास गुरु नको ! कित्येक असें ह्मणतात, कीं सायन हें कांहीं मूळचें आमच्या देशांतलें नव्हे, हें सायनवाद्यांचें यूरोपीय अनुकरण आहे. पण, ही त्यांची चूक आहे. हें कोणाचेंही अनुकरण नाहीं. प्राचीन ग्रंथांत याला पुष्कळ प्रमाणें आहेत. "मकरसंक्रमण आणि उदगयन" या वाद्याच्या वेळीं आह्मीं तीं दिलीं आहेत, ह्मणून येथें त्यांची पुनरावृत्ति करीत नाहीं.

मेषादि संज्ञा कधीं प्रचारांत आल्या हें निश्चयात्मक कोणीं प्रसिद्ध केलें नाहीं. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांच्या मतें शकापूर्वी ५०० वर्षांच्या सुमारास त्या आमच्या देशांत प्रचारांत आल्या, महाभारतांत या संज्ञा नाहींत, यावरून दीक्षित म्हणतात, जर त्या काळीं त्या असत्या तर खात्रीनें महाभारतांत त्यांचा उल्लेख असता. वास्तविक पाहिलें असतां महाभारत हा कांहीं ज्योतिषग्रंथ नव्हे, तेव्हां या संज्ञा त्यांत आल्याच पाहिजे होत्या या ह्मणण्यांत काय जीव आहे ? बरें, नव्हत्या ह्मणाव्या तर क्रांतिवृत्ताचे १२ भाग ही पद्धति सूर्याच्या संबंधानें तरी होती असें तेंच ह्मणतात. आतां, जर बारा भाग होते तर त्यांस कांहीं तरी नांवें असलींच पाहिजेत, तीं कोणतीं असतील बरें ! वनपर्वाच्या अध्याय २०० मध्यें पुढील श्लोक आहे--

पर्वसु द्विगुणं दानमृतौ दशगुणं भवेत् ॥ २४
अयने विषुवे चैव षडशीतिमुखेषुच ॥
चंद्रसूर्योपरागेच दत्तमक्षयमुच्यते ॥ २५

यांत पर्व, ऋतु, अयन, विषुव षडशीति आणि चंद्रसूर्यांचीं ग्रहणें यांच्या काळीं दान केल्यानें किती फळ मिळतें हें सांगितलें आहे. षडशीति याचा अर्थ सूर्यसिद्धांतादि ग्रंथावरून मिथुन,

कन्या, धनु व मीन या चार राशि असा होतो. अर्थात् जरी भारतांत मेषादि नांवें स्पष्ट नाहींत तरी वरील श्लोकावरून तींच असलीं पाहिजेत असें अनुमान निघतें. परंतु दीक्षितांस ही गोष्ट मान्य नाहीं. असो, कसेंही असलें तरी मेषादि संज्ञा या फार प्राचीन आहेत. त्या शून्य अयनांशकाळीन आहेत असें कोणासही ह्मणतां येणार नाहीं. मेषखेरीज इतर राशीपासून राशिगणना करण्याचा व मेषारंभ अश्विनी खेरीज इतर नक्षत्रीं असल्याचा उल्लेख जर कोठेंच नाहीं, मेष हा सौरवर्षाचा व वसंताचा आरंभ आहे असाच उल्लेख जर सर्वत्र आहे तर मेषादि राशि सायन नाहींत असें ह्मणण्यांत काय जीव आहे ?

मेषादि राशि पत्रिकेंत सायनानें सूक्ष्म अनुभव देतात हें निर्विवाद आहे. आह्मी आजपर्यंत सायनानेंच फलें सांगत आलों आहो व तीं निरयन पेक्षां चांगलीं जमतात असें नित्य पाहत आहों. संपात जसा जसा मागें हटत जाईल तसा तसा निरयनवाद्यांनाही निरयनाचा लंगडेपणा दिसून येईल, याबद्दल तिलप्राय शंका नाहीं. सुमारें चारशें वर्षांच्या पूर्वी ज्योतिषग्रंथकार होऊन गेले, त्यांच्या काळीं सायननिरयनांत फारसा फरक नव्हता, त्यामुळें त्यांना निरयनानें चांगलें अनुभव आले व त्यामुळे सायनाची आवश्यकता वाटली नाहीं. परंतु तो काळ आतां राहिला नाहीं. सायन व निरयन राशींत आज सुमारें २३ अंश अंतर पडलें आहे. त्यामुळें निरयन कुंडलीवरून फलांचें अनुमान चुकूं लागलें आहे. परंतु ही गोष्ट अद्यापि समाजाच्या ध्यानांत येत नाहीं, हें देशाचें दुर्दैव होय!

कल्याणी स्मृति.

[या खालील सर्व विषयांचें स्वतंत्र पुनः प्रथन प्रकाशनादि अधिकार प्रो. आठवले यांजकडे आहेत.]

ज्योतिष संचालक मंडलाच्या उद्देशाप्रमाणें कांहीं पत्रिका प्रसिद्ध करीत आहों. तरी ज्योतिषी वर्गणीदार त्यावरून आपआपल्या मताप्रमाणें फलें वर्तवून परस्पर अध्यक्षांकडे रवाना करतील अशी उमेद आहे.

सन १९०७ सालीं जमविलेल्या पत्रिकांचें फलित रवाना करण्याची मुदत जून १९०८ अखेरची ठेविली आहे.

बक्षीसाचा निकाल बहुधा सप्टंबर १९०८ पावतों लावतां येईल असें वाटतें.

फलिताची भाषा सरळ संस्कृत, मराठी, गुजराथी, हिंदी अथवा इंग्रजी यांपैकीं एक असावी.

कोणत्या एकाद्या पत्रिकेचें फलित ज्या ज्योतिष्याचें श्रेष्ठ ठरेल त्याजकडून त्या पत्रिकेच्या सर्व फलिताची पुढें मागें मागणी होण्याचा संभव आहे. त्याबद्दल कांहीं पारितोषिक निराळें दिलें जाईल.

सध्यां पाठविलेल्या प्रत्येक पत्रिकेबद्दल खालीं दिलेल्या केवळ आठ प्रश्नांचाच विचार ज्योतिषी लोकांनीं करावयाचा आहे.

१ स्त्रीपुरुषनिर्णय.

२ जातीच्या शरीराच्या बांध्याचें, स्वरूपाचें, वर्णाचें व शारीरिक व्यंगादिकांचें वर्णन

३ त्याच्या स्वभावाचें वर्णन.

४ [त्याच्या] जन्मकालीन असणाऱ्या मातृपितृ स्थितीचें वर्णन.

५ बालारिष्ट वर्षें.

६ सामान्यत्वें आयुष्य मर्यादा

७ भावंडें [वडील व धाकटीं]

८ सन १९०७ अखेर गेलेल्या आयुष्यांतील त्याच्या व त्याच्या मातापित्याच्या चरित्रांतिल महत्वाच्या गोष्टी [कालनिर्देशासह] निरयन मतानुयायी ज्योतिष्यांनीं आपणांस जितके अयनांश अभिमत असतील तितके दिलेल्या मानांतून वजा करून लग्नादि निरयन करून घ्यावे.

७१/२१	सायन
ग्रीनिच रेखांतर	५क. ३मि. २०से.
अक्षांश	उ. ३२अं. ४३क.
लग्न	५-१३-३७-३०
दशम	२-१३-३५-३०
राहु	३-२५-४७-३६
रवि	२-९-३८-२३
चंद्र	१-१४-४८-५७
मंगळ	९-१९
बुध	२-१९
गुरु	३-१३
शुक्र	१-११
शनि	११-२६
प्रजापति	९-१२
वरुण	३-११

७२/२६	सायन
ग्रीनि. रेखां.	५-१-१२
अक्षांश	उ.१७-३९
लग्न	१-८-३३-४५
दशम	९-२९-२१-१५
राहु	३-२४-५१-५०
रवि	२-२६-२८-६
चंद्र	५-२३-४६-६
मंगळ	९-१८
बुध	३-२०
गुरु	३-१६
शुक्र	२-३
शनि	११-२७
प्रजापति	९-११
वरुण	३-१२

७३/२९	सायन
ग्री. रेखां.	५-३-२०
अक्षांश	२२-४३
लग्न	२-११-२८-४५
दशम	१०-२७-५५-४५
राहु	४-२-३३-५८
रवि	१०-३-१३-५७
चंद्र	२-६-१६-४६
मंगळ	७-२३
बुध	९-२७
गुरु	३-३
शुक्र	८-१७
शनि	११-१२
प्रजापति	९-१०
वरुण	३-१०

८४५/४०	सायन
ग्रीनि. रेखां.	पू४-५३-०
अक्षांश	उ२२-१६
लग्न	३-२६-१२-१५
दशम	०-२०-३-३२
राहु	६-१७-१७-१८
रवि	४-१०-१०-५८
चंद्र	८-१३-३०-३५
मंगळ	६-३
बुध	४-२९
गुरु	४-१४
शुक्र	३-१२
शनि	२-२०
प्रजापति	५-२५
वरुण	१-२३

कल्याणीस्मृति.

द्वादशभाव

[लेखक प्रो. रामकृष्ण सखाराम आठवले.]

पूर्वक्षितिज, आणि खस्वस्तिकांतून जाणारें (ऊर्ध्व) याम्योत्तर हीं वृत्तें क्रांतिवृत्तास कोणत्याही क्षणीं जेथें छेदितात त्या बिंदूंस अनुक्रमें लग्न व दशम ह्मणण्याचा प्रघात आहे. अर्थात् पूर्वक्षितिजाच्या क्रांतिवृत्ताच्या संपातास 'लग्न' व ऊर्ध्व याम्योत्तर व क्रांतिवृत्त यांच्या संपातास दशम, अशा संज्ञा प्रचारांत आहेत. या दोहोंच्या जरी निर्दोष आणि स्पष्ट अशा व्याख्या देण्यांत येत नाहींत तरी आर्य व युरोपीय ज्योतिषी यांची या दोन बाबतींत बरीच एकवाक्यता दिसते. या दोन बिंदूंच्या समोरील ह्मणजे क्रांतिवृत्तावर १८० अंशावरील दोन बिंदूंस सप्तम, अथवा अस्तलग्न व 'चतुर्थ' अथवा पाताल अशीं नावें आहेत. या चार बिंदूंनीं क्रांतिवृत्ताचे चार खंड होतात. अथवा मुख्य याम्योत्तर व क्षितिज या दोन वृत्तांच्या योगानें क्रांतिवृत्ताचे चार खंड होतात. त्या प्रत्येक खंडाचे तीन तीन भाग कोणत्यातरी धोरणानें करून एकंदर क्रांतिवृत्ताचे १२ भाग पाडतात व त्यांस 'भाव' अशी संज्ञा देतात.

भावांत फलज्योतिष्यांच्या मतें कांहीं विशिष्ट गुण असतात. या बारा प्रदेशांत ग्रह जसे असतील तसे ते भिन्न भिन्न फलें उत्पन्न करितात असा समज आहे. ग्रहांची स्थितिपरत्वें, योगपरत्वें, दृष्टिपरत्वें, स्थानपरत्वें व राशिपरत्वें भिन्न भिन्न फलें होतात. त्यांपैकीं स्थानपरत्वें जो भेद होतो तो वर सांगितलेल्या क्रांतिवृत्ताचे जे तात्कालिक १२ भाग पडतात त्यांच्या योगानें होतो.

वर जे क्रांतिवृत्ताचे चार खंड सांगितले त्यांचे प्रत्येकीं तीन तीन भाग कोणत्या धोरणानें पाडावे या विषयीं पुष्कळ मतभेद आढळतो. हल्लीं विशेष प्रचारांत असलेल्या दोन पद्धति सर्व ज्योतिष्यांस माहीत आहेतच. पैकीं आर्यज्योतिष्यांनीं पतकरलेली एक व युरोपीय ज्योतिष्यांनीं पतकरलेली दुसरी. या दोन पद्धतीं खेरीज आणखीही पद्धति प्रचारांत होत्या. कल्पनेनें आणखी कांहीं नवीनही बसवितां येतील. तेव्हां या अनेक पद्धतीपैकीं खरी कोणती ह्मणजे कोणत्या पद्धतीनें केलेले भाग शास्त्रोक्त फलें अनुभवास आणून देतात याविषयीं मन साहजिक साशंक होतें. या साठीं याचा ऊहापोह करणें अवश्य वाटतें.

प्रथम हल्लीं प्रचारांत असलेल्या पद्धतीचें परीक्षण करून त्यांत कांहीं व्यंग दिसलें तर मग: एकंदर काल्पनिक प्रकार किती होऊ शकतील याचा विचार करावा: लागेल व नंतर या सर्व प्रकारां पैकीं कोणता प्रकार विशेष बुद्धिग्राह्य हें ठरवावें लागेल. कोणी ह्मणेल कीं प्रचलित पद्धतींत उपपत्तिदृष्ट्या जरी व्यंग निघालें तरी जर त्या अनुभवाशीं जुळत असल्या तर मग हा व्यर्थ खटाटोप कशाला ? यास्तव प्रथम प्रचलित पद्धति अनुभवाशीं जुळविते वेळीं कांहीं ओढाताण करावी लागते इतकें दाखविलें ह्मणजे वास्तविक नियम कांहीं निराळाच असला पाहिजे असें सहज वाटूं लागेल. जेव्हां जेव्हां एखाद्या पद्धतींत अपवाद निघूं लागतात अथवा अनुभवांशीं जुळवितांना थोडीबहुत ओढाताण करावी लागते तेव्हां त्या पद्धतींत कांहीं तरी दोष अथवा व्यंग असलें पाहिजे असें सहज अनुमान होतें. तेव्हां प्रचलित पद्धति कोणत्या आहेत व त्या अनुभवाशीं किती अंशानें पटतात तें पाहिलें पाहिजे.

आर्यपद्धति अशी आहे कीं, क्रांतिवृत्तावरील लग्न व दशम यांच्या अंतराचे तीन समान भाग करून त्यांस क्रमानें द्वादश, एकादश व दशम भाव ह्मणावयाचें. त्याचप्रमाणें दशम व सप्तम यांतील अंतराचे तीन समान भाग करून त्या प्रत्येकास अनुक्रमें नवम, अष्टम व सप्तम भाव ह्मणावयाचें. अर्थात् यांचे समोरील भागांस अनुक्रमें षष्ठ, पंचम, चतुर्थ, तृतीय, द्वितीय व प्रथम भाव असें ह्मणावयाचें. या पद्धतींत फल पाहते वेळीं एका भावाच्या मध्यापासून मागील मध्यापावेतों पहिल्याच भावाचें फल घ्यावयाचें असा एक नियम आहे. अर्थात् या मतानें क्षितिजावर सुमारें १५ अंश व खालीं सुमारें १५ अंश मिळून प्रथम भावच समजावयाचा. यांत गणिताशीं सांगड रहावी ह्मणून प्रथम एक लक्षण दिलें जातें व फलिताचे वेळीं दुसरें लक्षण केलें जातें असा प्रकार होतो. आरंभींच निराळें लक्षण केलें असतें तर त्यांत फारसें वावगें झालें नसतें. गणितदृष्ट्या आपली पद्धति स्थूल व अयुक्त आहे त्यावर लग्न व दशम यांचीं लक्षणें एका तत्वावर देणें कठीण जातें. मग इतर भावांचीं समान लक्षणें देण्याची तर गोष्टच नको. यूरोपीय पद्धतीप्रमाणें भावसाधनाचें काम बहुधा त्रिकोणमितीवांचून साध्य नाहीं. त्यांतही दोन प्रकार आहेत. एक स्थूल व दुसरा सूक्ष्म. या पद्धतीनेंही सर्व भावांचें एका तत्वावर लक्षण बांधणें कठीण जातें. लग्न, दशम व इतर भाव यां विषयीं माहिती कुंडलीविज्ञानमध्यें ज्योतिर्विद केशव त्रिंबक पेंडसे यांनीं दिली आहे. तेथें प्रथम एक प्रकारें लेख लिहिल्यावर पुनः त्यांत दुरुस्ती लगेच केली आहे. प्रथम पद्धतशीर लक्षण देण्याचा प्रयत्न केला परंतु तो फसला. मग सर्व भावांचें सारखें लक्षण देण्याचा प्रयत्नच केला नाहीं. यावरून भावसाधनाचा विषय फार बिकट आहे हें सहज लक्षांत येईल. यूरोपीय पद्धतींचें

तत्व असें आहे कीं, विषुववृत्ताचें मुख्ययाम्योत्तर व क्षितिज यांनीं जे चार खंड पडतात त्या प्रत्येकाचे समसमान ३० अंशांचे भाग करून त्यांतून जाणारीं याम्योत्तरें क्रांतिवृत्ताचे जे भाग करितात तेच क्रांतिवृत्तावरील भाव. गणितदृष्ट्या ही पद्धति सदोष आहे असें दाखविण्याचा प्रसंग पुढें येणार आहे तेव्हां आतां विशेष चर्चा करीत नाहीं. फल पाहतांना लग्न अथवा प्रथम भावाचा प्रभाव क्षितिजावर १० अंशांपावेतों पोहोंचतो व इतर भावांचा प्रभाव ९ अंश मागेंच सुरू होतो. असें यूरोपीय ज्योतिषी मानतात. आर्यपद्धतीचे भाव फलें बरोबर देतात असें अनुभवास येत नाहीं व असा अनुभव घेण्याचा कोणी फारसा प्रयत्न करीत नाहीं. किंबहुना भावकुंडलीचा ग्रंथांत मात्र महिमा सांगतात परंतु पत्रिका पाहते वेळीं तिचा पूर्ण विसर पडतो ! भावचलित कुंडलीचा मात्र कधीं कधीं उपयोग करितात. या विवेचनावरून दिसून आलें असावें कीं दोन्ही पद्धतींत फलाचे वेळीं अनुभवाशीं मेळ बसविण्यास धरसोड करावी लागते. भावाचीं फलें इतकीं भिन्न असतात कीं, त्यांत कांहीं भागांत दोन भावांचें मिश्रण मानणें म्हणजे भावफलावर श्रद्धा नाहीं असें व्यक्त करण्यासारखें होय. तेव्हां फलितदृष्ट्या या पद्धति शुद्ध नसाव्या असा तर्क होतो. निदान त्यांत गणितदृष्ट्या व्यंग आहे हें वर दर्शित आहेच. व तें पुढें व्यवस्थितपणें आणि विस्तारानें दाखविण्यांत येईल.

हा विषय नीट समजण्यासाठीं प्रथम गोलाचे भाग कसे करितां येतील व गोलावरील विवक्षित बिंदूचें स्थान निश्चित करण्यासाठीं काय केलें पाहिजे या गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. गोलपृष्ठाचे भाग दोन प्रकारें करतां येतात.

१ एका व्यासाच्या टोंकांतून जाणाऱ्या महद्वृत्तांनीं, २ एका महद्वृत्तास समांतर अशा लघुवृत्तांनीं. पहिल्या प्रकारांतील महद्वृत्तें

जर त्या सर्वांशीं काटकोन करणारें (अर्थात् सर्वांस दुभागणारें) असें जें महद्वृत्त त्याचे समान भाग करितील तर ते भाग व्यवस्थित झाले असें मानतां येईल. दुसऱ्या प्रकारांतील लघुवृत्तें जर त्यांशीं काटकोन करणाऱ्या महद्वृत्ताचे समान भाग करितील अथवा त्यास लंबरूप जो व्यास त्याचे समान भाग करितील तर गोलाचे भाग व्यवस्थित झाले असें म्हणतां येईल. या दोन्ही प्रकारांनीं गोलाचे प्रदेश (कोरी) पडतात.

गोलपृष्ठावरील विवक्षित बिंदूचें स्थान निर्दिष्ट करण्याच्या तीन पद्धति आहेत. त्यांचें सामान्य लक्षण हें कीं गोलपृष्ठाचे दोन समान भाग करणारें एक महद्वृत्त काढावें व त्याला लंबरूप जो गोलव्यास त्याच्या टोंकांतून [त्यांस त्या महद्वृत्ताचे ध्रुव म्हणतात.] निघून इष्ट बिंदूंतूनही जाईल असें महद्वृत्त काढावें. पहिल्या महद्वृत्तास आधारवृत्त व दुसऱ्यास ध्रुवप्रोत निजवृत्त (उपवृत्त) असें म्हणतां येईल. तात्पर्य, प्रथम आधारवृत्तावर एक कायमचा आरंभबिंदु निश्चित करून देवावा लागतो. नंतर आरंभबिंदूपासून निज उपवृत्ता पावेतोंचा आधारवृत्ताचा कंस हें एक मान व इष्ट बिंदूपासून आधारवृत्तापावेतोंचा उपवृत्ताचा कंस हें दुसरें मान; हीं दोन्ही मानें निश्चित केलीं किंवा कळलीं म्हणजे इष्ट बिंदूचें गोलपृष्ठावरील स्थान निश्चित करितां येतें. (या मानांस अनुक्रमें आधारमान व लंबमान अशीं नांवें देतां येतील.)

पहिल्या पद्धतींत स्थानीय क्षितिज हें आधारवृत्त व पूर्वबिंदु हा आरंभबिंदु घेतले जातात. या पद्धतींतील आधारमानास 'दिगंश' व लंबमानास उन्नतांश अशा संज्ञा आहेत. दिगंश व उन्नतांश या युग्मकाचें ज्ञान झालें कीं, इष्ट बिंदूचें स्थान निश्चित झालें. या पद्धतीस स्थानीय, क्षणिक किंवा क्षितिजपद्धति हीं नांवें देतां येतील.

❀

दुसऱ्या पद्धतींत विषुववृत्त हें आधारवृत्त, क्रांतिविषुवांचा संपात [वसंतसंपात] हा आरंभबिंदु घेतले जातात. या पद्धतींतील आधार-मानास विषुवांश व लंबमानास क्रांति अशीं नांवें आहेत. विषुवांश व क्रांति कळल्यास गोलपृष्ठावरील इष्ट बिंदूचें स्थान निश्चित होतें. या पद्धतीस 'भू' अथवा 'विषुव' पद्धति म्हणतां येईल.

तिसऱ्या पद्धतींत क्रांतिवृत्त हें आधारवृत्त व वसंतसंपात हा आरंभबिंदु घेतले जातात. आधारमानास 'भोग' व लंबमानास 'शर' अशा संज्ञा आहेत. भोग व शर यांचें ज्ञान झालें कीं इष्ट बिंदूचें स्थान निश्चित होतें. या पद्धतीस सौर किंवा क्रांतिवृत्तपद्धति म्हणतां येईल.

या विवेचनावरून इतकें स्पष्ट झालें कीं, इष्ट बिंदूच्या स्थानाचा निर्देश कोणत्याही पद्धतीनें करा, तींत आधारवृत्त म्हणून एक महद्-वृत्ताचा अवलंब करावा लागतो; त्याच वृत्तावर एक आरंभबिंदु निश्चित करावा लागतो व त्याच वृत्तावर लंबरूप [उप] वृत्तें काढण्यासाठीं त्याच वृत्ताच्या ध्रुवांचा अवलंब करावा लागतो. आधारवृत्त ठरलें कीं, त्याचा ध्रुव आपोआपच ठरतो व उपवृत्तेंही ठरतात. तेव्हां वास्तविक पाहतां आधारवृत्त व आरंभबिंदु या दोहोंचा निश्चय केला कीं पद्धति ठरली.

आतां भाव हीं स्थानें किंवा बिंदु आहेत अथवा ते प्रदेश आहेत हें आजपावेतों कोणी निश्चयात्मक सांगितलें नाहीं. कोणी बिंदु मानतात, कोणी प्रदेश मानीत असतील व एकच व्यक्ति कधीं बिंदु तर कधीं प्रदेश मानणारीही निघते. तात्पर्य, खरा प्रकार काय आहे या विषयीं सर्वांची एकवाक्यता तर दूरच राहिली परंतु ज्याचा त्यालाही उलगडा होत नाहीं!

भाव हे बिंदु आहेत असें मानलें तर राश्यादि भाव त्यांचीं मानें असलीं पाहिजेत. व्यवस्थित रीतीनें झालेलीं मानें असलीं तर तीं वर

निर्दिष्ट केल्याप्रमाणें कोणत्या तरी एकाच पद्धतीप्रमाणें झालीं पाहिजेत. अर्थात् तीं एका आधारवृत्तावर व त्याच्याच ध्रुवावर अवलंबून असलीं पाहिजेत. सर्व मानें एकाच पद्धतीचीं असतील तर त्यांचें आधारवृत्त एकच असलें पाहिजे व त्याच्याच ध्रुवाचा अवलंब केला पाहिजे. व त्या आधारवृत्ताचेच समान भाग करून सर्व भाव आले पाहिजेत.

भाव हे प्रदेश आहेत असें मानलें तरी कोणत्याही एका वृत्ताचे समान १२ भाग होऊन ते उत्पन्न झाले पाहिजेत. व भाग करितांना त्याच वृत्ताच्या ध्रुवाचा अवलंब केला पाहिजे.

एका वृत्ताचे समान भाग व उपवृत्तें (निजवृत्तें) काढावयाचीं तीं त्या वृत्ताच्या ध्रुवातून न काढतां दुसऱ्याच एका ध्रुवांतून काढणें हें व्यवस्थितपणास सोडून आहे. एका वृत्ताच्या ध्रुवांतून उपवृत्तें काढून भलत्याच वृत्ताचे समान भाग साधणें म्हणजे 'मराठी बायको व कानडी भ्रतार' अशांतलाच प्रकार होतो. यामुळें व्यवस्थित पद्धतीचा स्वीकार केला तर एक महद्वृत्त व त्याचाच ध्रुव यांचा अवलंब करणें योग्य आहे.

या शिवाय आणखी कांहीं सामान्य तत्वें स्वीकारलीं पाहिजेत तीं अशीं.—

१ लग्न व दशम या दोहोंसही प्रथम भाव व दशमभाव अशा संज्ञा सर्वमान्य असल्यानें त्यांत व इतर भावांत कोठें तरी साम्य असलें पाहिजे.

२ लग्न व दशम काढण्याच्या रीति भिन्न केल्यानें सोप्या होतील ही गोष्ट निराळी. परंतु ज्या रीतीनें इतर भाव काढावयाचे त्याच रीतीनें लग्न व दशम काढतां आलें पाहिजे.

३ भाव ही संज्ञा लग्न, दशम व इतर दहा भावांस सारखी लागू आहे, तर सर्व भावांचा समावेश एका लक्षणाखालीं करितां आला पाहिजे. जें लक्षण लग्नाचें किंवा दशमाचें भाव या नात्यानें द्यावें

तेंच लक्षण इतर भावांस लागू करितां आलें पाहिजे. किंवा इतर भावांचें जें लक्षण बांधाल तेंच लक्षण लग्न व दशम यांस लागू करितां आलें पाहिजे. तात्पर्य, सर्व बाराही भावांस एक धोरण, एक पद्धति, एक रीती व एक लक्षण लागू झालें पाहिजे. याप्रमाणें करतां न आलें तर पद्धतींत किंवा लक्षणांत व्यंग आहे असें म्हणणें प्राप्त होईल.

या दृष्टीनें विचार केला म्हणजे प्रचलित आर्यपद्धतींत सुगमता इतकाच गुण उतरतो. लग्न, दशम व इतर दहा भाव यांस एक लक्षण लावतां येत नाहीं. भावाचें फल स्थूल रीत्याच अनुभवास येतें असें ठरलें तर सुगमता या एका गुणावर आर्य पद्धतीचा स्वीकार करणें समंजसपणाचें होईल. सूक्ष्म गणिताचें अवडंबर माजवून अखेरीस फलासंबधें जर स्थूलताच पतकरावी लागते तर सूक्ष्म गणिताचा खटाटोप तरी कशाला ? ज्वराचे ७२ प्रकार वर्णन करून त्याचीं भिन्न भिन्न लक्षणें देण्याचा प्रयास करून औषधयोजना जर सर्व प्रसंगीं एकच असली तर असले ७२ प्रकार व त्यांचीं लक्षणें हा निवळ पांडित्यदर्शनाचा प्रकार आहे!

यूरोपीय पद्धतींत भावाची व्याख्या स्पष्ट अशी कोठें केलेली नसल्यानें त्यांतील मूलतत्व गणिताच्या रीतीवरून शोधून काढावें लागतें. ज्या प्रमाणें ज्यो. पेंडसे यांनीं भाव हीं स्थानें आहेत व तीं कोणत्या तरी वृत्तावर आहेत असें समान्य वर्णन केलें आहे तोच प्रकार यूरोपीय ग्रंथकर्त्यांचा दिसून येतो. "भावारंभाचे भोग" ( ) बिंदूचे,भावाचे किंवा ग्रहाचे ध्रुव ( ) 'बिंदु किंवा ग्रहांचे ध्रुवोन्नतांश' ( ) या शब्दयोजनेवरून भावांचीं स्थानें कोणत्या वृत्तावर आहेत हें स्पष्ट होत नाहीं. ज्यो. पेंडसे यांनीं म्हटलें आहे कीं, दशम स्थान ऊर्ध्वयाम्योत्तर

व विषुव यांचा संपात होय व लग्न स्थान हें स्थानीय अहोवृत्ताचा व क्षितिजाचा पूर्वेकडील संपात हें होय. यांतून जाणाऱ्या महद्वृत्तावर भावांचीं स्थानें आहेत. पण तीं कशीं व कोठें असतात हें स्पष्ट केलेलें नाहीं. भावाचीं मानें आणण्याच्या ज्या सूक्ष्म रीति आहेत त्या तपासून त्यावरून प्रचलित यू. प. चे भाव कसे बनतात हें अनुमान आम्हीं काढलें आहे व त्यावरूनच प्रारंभीं या पद्धतीचें वर्णन केलें आहे. फलितदृष्ट्या भाव हीं स्थानें आहेत किंवा प्रदेश आहेत, ते कोणत्या वृत्तावर आहेत किंवा कोणत्या वृत्ताचे समान कंस आहेत व ते कोणत्या वृत्तांनीं बनतात याचें महत्व अगदीं नाहीं. क्रांतिवृत्ताचा कोणत्या कंसाचा अमुक एका भावांत समावेश होतो यांचेंच फक्त फलदृष्ट्या महत्व आहे. त्यामुळें क्रांतिवृत्ताचा प्रत्येक भावांतील कंस काढण्याची रीति अवगत असली म्हणजे वरील प्रश्नांचा विचार करण्याचा प्रसंगच येत नाहीं. व त्या कारणानेंच भावांचें स्वतंत्र व सर्वसाधारण लक्षण देण्याचे कामी चालढकल करितां आली. परंतु या प्रश्नाकडे जो गणितदृष्टीनें पाहतो त्यास प्रथम भावपद्धतींत सामान्य तत्व काय आहे हें हुडकून काढल्याखेरीज चैन पडत नाहीं.

गणिताच्या ज्या रीति स्वीकारल्या आहेत त्यांवरून क्षेत्रज्ञान करून घेऊन असें तत्व काढतां येतें कीं पूर्वक्षितिजाशीं प्रारंभ करून विषुववृत्ताचे समान १२ भाग करणारीं सहा याम्योत्तर वृत्तें काढून त्यांमध्यें क्रांतिवृत्ताचा जो प्रदेश समाविष्ट होईल तो प्रदेश प्रथम, द्वितीय इ० भावांचें मान समजावें. म्हणजे पूर्वापर हें आधारवृत्त ध्यावयाचें परंतु त्याच्या ध्रुवाचा अवलंब करून पूर्वापराचे समान भाग करावयाचे ते न करतां तिसऱ्याच एका वृत्ताचे (म्हणजे विषुववृत्ताचे) समान भाग करावयाचे. एका वृत्ताचे समान भाग व दुसऱ्या वृत्ताचा ध्रुव असा प्रकार प्रचलित युरोपीय पद्धतींत होत आहे हें उघड आहे. यावरून गणितदृष्ट्या ही पद्धति शुद्ध व सुव्यवस्थित आहे असें कसें म्हणतां येईल ?

प्रचलित भावपद्धति अनुभवाशीं चांगली जुळत नाहीं व तिचा वृत्ताचे समान भाग त्याच्याच ध्रुवांतून उपवृत्तें काढलीं तरच ती पद्धति गणितदृष्ट्या शुद्ध, एरवीं नव्हे. हीं दोन विधानें पटलीं ह्मणजे प्रचलित पद्धति अनुभवदृष्ट्या अपूर्ण व गणितदृष्ट्या अशुद्ध व अव्यवस्थित आहेत असें अर्थात् ठरलें.

प्रचलित यूरोपीय पद्धतीच्या तत्वावरून केलेलीं कांहीं अनुमानें व कांहीं सामान्य तत्वें प्रसंगवशात् खालीं दिलीं आहेत तीं अशीं.—

१ भाव हे क्रांतिवृत्तावरील बिंदु नाहींत.

२ लग्न व दशम जे सर्वसंमत आहेत त्यांचीं मानें इतर ग्रह अथवा स्वस्थ बिंदूंच्या भोगाप्रमाणें भोग नाहींत हें खात. ह्मणून भाव हे भोग नाहींत. तसे असते तर त्याच ठिकाणीं आलेल्या ग्रहांचे भोग व बिंदूंचे भोग एक आले पाहिजेत तसा प्रकार नाहीं.

३ भाव हे तात्कालिक असल्यानें त्यांचा संबंध विषुव व क्रांति या वृत्तांशीं असण्यापेक्षां क्षितिज व पूर्वापर यांशीं असणें विशेष सयुक्तिक आहे.

४ भाव कोणत्या तरी वृत्तांनीं झाले पाहिजेत. लग्न हे क्षितिज व क्षितिजउपवृत्त [खप्रोतलंबवृत्त] यांनीं झालें असें मानतां येईल. दशम हें ऊर्ध्वयाम्योत्तर अथवा याम्यसंबवृत्त (क्षितिजाचें उपवृत्त) यांनीं झालें आहे असें मानतां येईल. अर्थात् दशम व लग्न दोन्ही याम्योत्तरानें (ह्मणजे पूर्वापराच्या उपवृत्तानें) होतात असें ह्मणतां येईल. ह्मणून पूर्वापराचीं जीं याम्योत्तर उपवृत्तें त्यांच्या योगानें क्रांतिवृत्ताचे पडणारे कंस हे भावांचीं क्रांतिवृत्तावरील मानें होत.

प्रचलित पद्धति निर्दोष अथवा अव्यंग नाहींत याचें विवेचन झालें. आतां एकंदर काल्पनिक पद्धति कोणत्या होऊं शकतील याचें विवेचन पुढील प्रसंगीं करूं.

कल्याणीस्मृति.

द्वादशभाव (२)

[लेखक—प्रो. रामकृष्ण सखाराम आठवले]

मागील वेळीं प्रचलित भावसाधनपद्धति गणित दृष्ट्या अशुद्ध व अव्यवस्थित व फलितदृष्ट्या अपूर्ण अहेत असें दाखविलें. आतां, द्वादश भावांसंबंधानें निरनिराळ्या किती कल्पना होऊं शकतात याचा विचार करणें आहे.

भाव हे प्रदेश मानतां येतील अथवा बिंदु (स्थानें) मानतां येतील. प्रदेश मानून किती प्रकार होतील व बिंदु मानून किती होतील हें पहूं. गोलावर व्यवस्थित प्रदेश दोन प्रकारें होऊं शकतात. ते असे— **१ कटिबंध व २ त्रिकोण** (चंद्रकोरी) —

कटिबंधप्रदेश हे भाव मानून खालील प्रकार येतात.—

१ ला:— क्षितिजापासून प्रारंभ करून पूर्वापराचे ३० अंशाचे १२ समान भाग करावे. त्या भागांतून क्षितिजास समांतर अशीं लघुबृहत् वृत्तें काढून त्यामध्यें समाविष्ट झालेले अर्द्धकटिबंध प्रदेश हेच भाव. या प्रकारास "उन्नतांश" पद्धति ह्मणतां येईल.

२ रा:— स्थानीय व्यासाचे ६ समान भाग करावे. त्यांतून क्षितिजास समांतर अशीं लघुबृहत् वृत्तें काढावीं. तदंतर्गत अर्द्धकटिबंध हे भाव.

३ रा:— पहिल्या प्रकारांतील भागांतून मुख्य याम्योत्तरास समांतर अशीं लघुबृहत् वृत्तें काढावीं. तदंतर्गत अर्द्धकाटिबंध हे भाव.

४ था:— पूर्वबिंदुगत व्यासाचे ६ समान भाग करून त्यांतून मुख्य याम्योत्तरास समांतर अशीं लघुबृहत् वृत्तें काढावीं. तदंतर्गत अर्द्धकटिबंध हे भाव.

द्विकोण प्रदेश हे भाव मानून खालील प्रकार येतात.—

१ला:—पूर्वक्षितिजापासून प्रारंभ करून पूर्वापराचे ३० अंशाचे १२ समान भाग करावे. त्यांतून जाणारी याम्योत्तर अर्द्धवृत्तें काढावी. तदंतर्गत प्रत्येक द्विकोणास भाव ह्मणावें पूर्वक्षितिजाखालील द्विकोण हा प्रथम, त्या खालील द्विकोण हा द्वितीय भाव हा या भावांचा क्रम.

२रा: पूर्वबिंदूस प्रारंभ करून क्षितिजाचे याम्यदिङ्मार्गानें १२ समान भाग करून त्यांतून खप्रोत उपवृत्तें काढावयाचीं व त्यांनीं मर्यादित झालेले द्विकोणास भाव ह्मणावें. या प्रकारास "दिगंश" पद्धति हें नांव देतां येईल.

आतां भाव हे बिंदु (अथवा ग्रहांचीं जशीं गोलावर स्थानें असतात तशीं स्थानें) आहेत असें मानून खालील प्रकार होतात.—

१ला:—पूर्वक्षितिजास प्रारंभ करून पूर्वापराचे ३० अंशाचे समान १२ भाग करून जे बिंदु येतात तेच भाव. व ह्या बिंदूचे (ताऱ्याप्रमाण) घेतलेले भोग हे त्या भावांचीं क्रांतिवृत्तावरील मानें होत.

(१ अ):—वरील प्रकारांतील बिंदु हेच भाव. परंतु त्यांचीं क्रांतिवृत्तावरील मानें काढणें तीं कदंबप्रोतवृत्तांनीं न काढतां ध्रुवप्रोत वृत्तांनीं काढावीं. [हा प्रकार सदोष ह्मणजे अव्यवस्थित आहे. परंतु जुने ज्योतिषी दोन प्रकारचे भोग मानतात ह्मणून फक्त याचें दिग्दर्शन केलें आहे]

२रा:—नाडीवृत्ताचे [विषुवद्वृत्ताचे] पूर्वबिंदूपासून समान १२ भाग करून जे बिंदु येतील तेच भाव. व त्यांचे कदंबप्रोतवृत्तांनीं झालेले भोग ते त्या भावांचीं क्रांतिवृत्तावरील मानें होत.

(२ अ):—वरील प्रकारांत कदंबप्रोतवृत्तांनीं झालेले भोग न घेतां ध्रुवप्रोतवृत्तांनीं झालेले भोग घेणें [१ अवरील टीका पहावी.]

३रा:—क्रांतिवृत्ताचा क्षितिजाशीं संपात होतो तेथून प्रारंभ करून क्रांतिवृत्ताचे समान १२ भाग करून जे बिंदु येतील ते भाव [ह्या प्रकाराचा समावेश द्विकोणपद्धतींत करितां येईल.]

(३अ):—क्रांतिवृत्ताचे क्षितिज व मुख्य याम्योत्तर यांनीं जे चार खंड होतात त्याचे समान तीन भाग. (हा प्रकारही अव्यवस्थित आहे. १ अवरील टीका पहावी.)

याप्रमाणें वर दाखविलेल्या १२ पद्धतीं पैकीं सुव्यवस्थित अशा फक्त ९ पद्धति होऊं शकतात. यांपैकीं प्रत्येक जातीचा पहिला प्रकार इतरांहून विशेष ग्राह्य आहे असें दिसून येईल. त्यांतही द्विकोणपद्धतींतील पहिला प्रकार सर्वांत श्रेष्ठ आहे असेंही दिसून येईल. ज्या पद्धतीचा पूर्वापराशीं संबंध जोडतां येईल व प्रचलित पद्धतीस जवळ जवळ असेल ती विशेष ग्राह्य. या दोन तत्वांचा स्वीकार केला ह्मणजे वरील विधानाची योग्यता लक्षांत येईल. प्रचलित पद्धतींत भावफलें तंतोतंत अनुभवास येत नाहींत, बरींच धरसोड करावी लागते ही गोष्ट खरी. तथापि आज पावेतोंचा अनुभव असा आहे कीं, त्यांत बऱ्याच अंशीं तथ्य असावें. ह्मणून प्रचलित पद्धतीपासून अगदीं भिन्न पद्धतीस अनुभवाचें मुळींच पाठबळ नाहीं. कारण यापुढें अनुभव घेऊन निर्णय करावा लागेल. यास्तव आमच्या मतें सर्व प्रकारें विचार करितां द्विकोणपद्धती पैकीं पहिला प्रकार स्वीकारून अनुभव पाहिला पाहिजे.

आतां या प्रमाणें पद्धती स्वीकारिल्यास गणित कसें करावें लागेल व त्यापासून भावकुंडलींत कोणते चमत्कार होतील त्याचें पुढील एखादे प्रसंगीं विवेचन करूं.

———

कल्याणीस्मृति.

द्वादशभाव (३)

[लेखक—प्रो. रामकृष्ण सखाराम आठवले]

मागील खेपेस लिहिल्याप्रमाणें नूतन "भावसाधन" पद्धति स्वीकारली, तर त्या संबंधीं गणित कसें करावें, ग्रह अमुक भावांत आहे हें कसें ठरवावें, व या पद्धतीमुळें कुंडलींत काय चमत्कार होतो हें ह्याबेळीं सांगणें आहे.

१ प्रथम कांहीं संकेत, संज्ञा व परिभाषेचें स्पष्टीकरण केलें पाहिजे. या पद्धतींत पूर्वक्षितिजापासून आरंभ करून राशिक्रमानें ३०।३० अंशांच्या अंतरावरील याम्योत्तरें [अर्द्ध—] हींच भाववृत्तें [वृत्तार्द्ध] होत.

संकेत		संज्ञा	स्पष्टीकरण
भा १	:	प्रथम भावारंभ वृत्त	पूर्वक्षितिज
,, २	:	द्वितीय भावारंभ वृत्त	
,, ३	:	तृतीय ,,	
,, ४	:	चतुर्थ ,,	अधर याम्योत्तर
,, ५	:	पंचम ,,	
,, ६	:	षष्ठ ,,	
,, ७	:	सप्तम ,,	पश्चिमक्षितिज
,, ८	:	अष्टम ,,	
,, ९	:	नवम ,,	
,, १०	:	दशम ,,	उर्द्ध याम्योत्तर
,, ११	:	एकादश ,,	
,, १२	:	द्वादश ,,	

खवि : ख विषुवांश : ख स्वस्तिकाचे विषुवांश
भावि : भाववृत्तविषुवांश : भाववृत्त व विषुव यांच्या संपाताचे विषुवांश
भाभो : भाववृत्त भोग : भाववृत्त व क्रांतिवृत्त यांच्या संपाताचे भोग
याक्षि : भावकोण : क्षितिज व कोणतेंही याम्योत्तर यांतील कोण
आ, का, गा : योजक प्रश्नच उपकोण } गणित सौकर्यार्थ घेतलेला कोन.

भु	भुजज्या	
कोभु	कोटिज्या	
छे	छेदज्या	
कोछे	कोटिछेदज्या	
स्प	स्पर्शज्या	
कोस्प	कोटिस्पर्शज्या	
क्रांति (पक्रा)	परमक्रांति अथवा क्रांतितिर्यक्त्व	विषुववृत्त व क्रांतिवृत्त यांमधील कोण

२ भावारंभ भोग काढण्यासाठीं सारणी.—

स्प (३०× पूर्वक्षितिजापासून भावांतर) × छे [अक्षांश] =स्प[आ]
(राशिक्रमानें) भा २ व भा ३ यासाठीं आ धन [+] ध्यावा.
(व्युत्क्रमानें) भा ११ व भा १२ साठीं आ ऋण (−) ध्यावा.
(आ) + (खवि) × ९० अंश = [भावि]
छे (भावि) × स्प [अक्षांश] × कोभु [आ] = स्प [का]
[का] × कोभु (भावि) .... पूर्वेकडे सतत धन.
[का] + (क्रांति) = (गा)
स्प (भावि) × कोभु [का] × छे [गा] = स्प [भाभो]
(भावि) × [भाभो] सतत धन ध्यावे

कोभु [भावि] × कोभू [भाभो] सतत धन ध्यावे

---

३ ग्रह किंवा तारा कोणत्या भावांत आहे हें काढण्यास खालील रीतीची योजना करावी. ग्रहांचे शर फार अल्प असतात म्हणून व्यावहारिक दृष्ट्या या रीतीचें फारसें महत्व नाहीं.

छे [दिगश] × स्प (उन्नतांश) = स्प (याक्षि)
(उन्नतांश) × (याक्षि) सतत धन + असावें
कोभु (दिगंश) × कोभु (याक्षि) सतत धन + असावें.

---

४ कोणत्याही भाववृत्ताचा भोग काढण्यासाठीं वर सामान्य रीती दिली आहे. परंतु दशम व लग्न काढण्याच्या सारण्या सोप्या होतात. दशम व लग्न दोन्ही पद्धतींत एकच असल्यानें सारण्याही भिन्न नाहींत.

१ दशमासाठीं सारणी:—
स्प (खवि) × छे (पक्रां) = स्प [भा १० भो]

---

२ लग्नासाठीं सारणी:—
(खवि) + ९० अं. = (भा १ वि)
स्प (अक्षांश) × छे [भा १ वि] = स्प [का]
(का) + (पक्रां) = (गा)
स्प (भा १ वि) × कोभु (का) × छे (गा) = स्प (भा९ भो)

(भावी) × [भाभो] सतत धन ध्यावे
कोभु (भावि) × कोभु (भाभो) सतत धन ध्यावे. किंवा,

कोस्प (अक्षांश) × भु (खवि) = स्प (का)
(का) + [पक्रां] = [गा]
स्प [खवि] × कोछे (का) × भु (गा) = स्प [त्रिभोनलग्न]

त्रिभोनलग्न + ९० अं. = लग्न = [भा १ भो]

---

५ इष्टकालीन स्वस्थानीय नाक्षत्रकाल तेच खस्वस्तिक विषुवांश होत. नाक्षत्रकाल जाणण्याचें साधन जवळ नसल्यास जुन्या पद्धतीनें लग्न व दशम साधावें. नंतर खालील सारणीनें खविषुवांश आणावे.

स्प (भा१० भो) × कोभु [पक्रां] = स्प (खवि)

---

६ दशम व लग्न व इष्टकालीन खविषुवांश तयार झाल्यावर एकादश (भा ११ भो), द्वादश (भा १२ भो) द्वितीय [भा २ भो], व तृतीय [भा ३ भो] हे भाव वर दिलेल्या सामान्य सारण्यांनीं आणावे.

७ याप्रमाणें दशम, एकादश, द्वादश, लग्न, द्वितीय, व तृतीय आणल्यावर चतुर्थ, पंचम, षष्ठ, सप्तम, अष्टम, व नवम हे भाव क्रमानें ६ राशि मिळवून आणावे.

८ वर दिलेल्या सारण्यांत स्वाभाविक ज्याचापादि दिले आहेत, परंतु लाग्रतमिक ज्या चापानें गणित सुलभ होतें, ह्मणून त्यांचाच उपयोग करावा. ह्मणजे सारण्यांत जेथें गुणक चिन्ह आहे तेथें केवळ बेरीज केल्यानें काम भागतें.

९ कोणताही कोन ० अं. पासून १८० अं. पावेतों असल्यास ह्मणजे षड्भाल्प असल्यास तो धन समजावा. व १८० अं व ३६० अं. मध्यें (षड्भाधिक) असल्यास तो चक्रांतून (३६० अं. तून) वजा करून ऋण करून घ्यावा.

१० लाग्रतमिक कोष्टकांत ज्याच्यापादि ० अं. पासून ४५ अं. पावेतों सरळ क्रमानें व ४५ अं. पासून ९० अं. पावेतों व्युत्क्रमानें

दिलेले असतात. यासाठीं ९० अं. पासून १८० अं. पावेतों कोन असल्यास तो १८० अं. मधून वजा करून घेऊन कोष्टकांत पाहून ज्याचापादि घ्यावे

११ पहिल्या वर्त्तुलपादांत (० अं. पासून ९० अं.) भु, कोभु, स्पर्श इ० सर्व धन असतात. दुसऱ्या पादांत [९० अं. पासून १८० अं.] भु व कोछे धन इतर ऋण असतात तिसऱ्या पादांत (१८० अं. पासून २७० अं. पावेतों ह्मणजे –९० अं. पासून –१८० अं. पावेतों) स्प व कोस्प धन व इतर ऋण असतात. व चवथ्या पादांत (२७० अं. पासून ३६० अं पावेतों ह्मणजे –० अं. पासून –९० अं. पावेतों) कोभु व छे धन व इतर ऋण असतात.

१२ लाग्रतमिक कोष्टकातून कोन निघेल तो ० अ. पासून ९० अं पावेतोंच असल्यानें, त्याचें धनर्णत्व, व त्याचें मान (वर्तुलपादाहून कमी आहे किंवा अधिक आहे) हें समजण्यासाठीं सारणीखालीं नियम दिले आहेत ते लक्ष्यपूर्वक योजावे.

१३ वर दिलेल्या नियमापेकीं ७, ८, ९, १०, ११, व १२ हे नियम सार्वत्रिक आहेत. ते त्रिकोण मितीचें ज्ञान असल्यास परिचितापैकीं आहेत. ते कांहीं याच पद्धतीला विशेष लागू असे नाहींत परंतु ते सर्व एके ठिकाणीं यावे व ज्यांस त्रिकोणमितीचें ज्ञान नाहीं त्यांस इतर ग्रथांकडे पाहण्याची अपेक्षा राहूं नये ह्मणून दिले आहेत.

१४ आतां या नूतन पद्धती प्रमाणें भावसाधनाचें उदाहरण देऊन स्पष्ट केलें ह्मणजे गणित कसें करावें व मांडावें हें सुगम होईल. या साठीं पुढें एक उदाहरण दिलें आहे.

१५ वर दिलेल्या रीतीवरून भावसाधनास तीन उपकरणांची आवश्यकता असते असें सहज दिसून येईल. तीं उपकरणें [१] क्रांति व विषुवाचें तिर्यक्त्व अथवा रवि परमक्रांति; [२] इष्ट स्थलाचे अक्षांश; व [३] इष्टकालीन खविषुवांश अथवा इष्टकालीन नाक्षत्र काल.

१६ परमक्रांति, २३ अंश. २७ कला; इष्टस्थलाचे अक्षांश २२ अं. ४३ कला; व इष्टकालीन खविषुवांश ७२ अंश १२ कला १५ वि. या उपकरणांनीं एकादश, द्वादश, द्वितीय व तृतीय भावभोग आणण्यास गणित न्यास खालीं दिला आहे.

भावसाधन गणिन्यास.

परमक्रांति २३अं. २७ क. अक्षांश अं.२१–४३क खवि ७२अं.१२क.१५वि'

भाववृत्त	११	१२	२	३
भावांतर	−६०°	−३०°	+३०°	+६०°
ला स्प.(भा.)	१०°२३८५६१	९°७६१४३९	९°७६१४३९	१०°२३८५६१
छे (अक्षां)	१०°०३५०६९	१०°०३५०६९	१०°०३५०६९	१०°०३५०६९
स्प (आ)	१०°२७३६३०	९°७९६५०८	९°७९६५०८	१०°२७३६३०
	−६१°−५७−४५	−३२°−२−३०	+३२°−२−३०	+६१°−५७−४५
+९०अंश	९०°	९०°	९०°	९०°
	+२८−२−१५	५७−५७−३०	१२२−२−३०	१५१−५७−४५
(खवि)	७२°१२°१५	७२−१२−१५	७२−१२−१५	७२−१२−१५
(भावि)	१००°१४°३०	१३०−९−४५	१९४°१४°४५	२२४−१०—०
				१३५−५०—०
स्प [अक्षांश]	९°६२१८५२	९°६२१८५२	९°६२१८५२	९°६२१८५१
कोभु [आ]	९°६७२१४३	९°९२८२२३	९°९२८२२३	९°६७२१४३
छे [भावि]	१०°१५००६७	१०°१९०४६९	१०°०१३५६५	१०°१८४२८९
स्प [क्रां]	१०°०४४°६२	९°७४०५४४	९°५६३६४०	९°४३८२८४
	−४७−५४—०	−२८−४८−१५	−२०−६−३०	−१५−२०−३०
पक्का	२३−२७—०	२३−२७—०	२३−२७−०	२३−२७—०
[गा]	−२४−२७—०	−५−२२−१५	+३−२०−३०	+८−६−३०
स्प [भावि]	१०°७४३०९२	१०°०७३६८६	९°४०४६४६	९°९८७३६५
कोभु [क्रां]	९°८२६३५१	९°९४२५६९	९°९७२६८६	९°९८४२४२
छे [गा]	१०°०४०८०५	१०°००१९११	१०°०००७३९	१०°००४३६३
स्प [भा भो]	१०°६१०२४८	१०°०१८१६६	९°३७८०४१	९°९७५९७०
	−७६−१३−०	४६−११−४५	१३−२६−०	४३−२५−०
	+१०३°४७°०	+१३३°४८°१५	−१६६°३४−०	−१३६°३५−०
			१९३°२६−०	२२३°२५−०
	रा ° ′ ″	रा ° ′ ″	रा ° ′ ″	रा ° ′ ″
[भा भो]	३°१३°४७−०	४°१३°४८°१५	६°१३°२६−०	७°१३°२५−०

सातव्या भावाच्या प्रारंभा पासून १२ व्याच्या अंतापावेतोंचा आकाशाचा भाग क्षितिजावरील असल्यानें तो सर्व दृश्य आहे व बाकी चा म्हणजे लग्नापासून ६ व्या भावाच्या अंता पावेतों अदृश्य आहे ही गोष्ट सर्व कबूल करतील. यामुळें दृश्य ग्रह अथवा *तारा सर्व ७ व्या पासून बाराव्या भावांत मांडल्या पाहिजेत. परंतु कुंडलींत भोगाच्या अनुरोधानें ग्रह व तारांचीं स्थानें दर्शविलीं जातात त्यामुळें कधीं कधीं असा चमत्कार होतो कीं ग्रह दृश्य असून अदृश्य भागांत मांडला जातो व अदृश्य असून दृश्य भागांत मांडला जातो. चंद्राचा शर मोठा असला म्हणजे हा प्रकार कित्येकदां घडून येतो. यासाठीं पाश्चिमात्य ज्योतिषी अशा प्रसंगीं शराचा विचार करून ग्रह दृश्य असल्यास दृश्य भागांत व अदृश्य असल्यास अदृश्य भागांत मांडण्याची शिफारस करतात. हा प्रकार लग्न व द्वादश, आणि षष्ठ व सप्तम यांच्या संबंधानें होत असतो. इतर भावासंबंधानें हा गोंधळ सहज लक्ष्यांत येण्यासारखा नसल्यानें त्याविषयीं वरील प्रकारची शिफारस होत नाहीं; म्हणजे गोंधळ लक्ष्यांत येण्यासारखा असेल तेव्हां दुरुस्ती करावयाची व एरव्हीं चालढकल करावयाची. अलीकडील कांहीं जुन्या पद्धतीचे पंचांगकार ग्रहणाचे गणितांत चूक झाल्यास सर्वांच्या प्रत्यक्ष लक्ष्यांत येण्याचा संभव जाणून तितक्या पुरतें नवीन गणित स्वीकारतात, व इतर बाबतींत सामान्य लोकांस घोंटाळा उमगण्या सारखा नसल्यानें तेथें जुन्या रीतींचाच अवलंब करतात. ह्या सांवळ्या गोंधळांत व वरील प्रकारच्या युरोपीय ज्योतिष्यांच्या शिफारशींत कांहींच भेद नाहीं. असो. तात्पर्य हें कीं ग्रहाच्या वास्तविक स्थानाकडे (शर व भोग यांनीं निश्चित होणारे स्थानाकडे) खरें महत्व आहे हें पाश्चात्य पंडित स्वीकारतात यांत शंका नाहीं.

* पाश्चात्य ज्योतिषी ठळक तारा कुंडलांत मांडण्याचीही शिफारस करतात.

पूर्णयुति [प्रत्यक्ष विधान इ०] जेव्हां भोग व शर दोन्ही सम असतात तेव्हां होते; एरव्हीं अपूर्ण ह्मणजे भोग मात्र सम व शर भिन्न असतील तर ती युति पूर्ण नाहीं. युतीच्या फला संबंधानेंही पाश्चात्य ज्योतिष्यांचें असें स्पष्ट मत आहे कीं पूर्ण युतीचें पूर्ण फल व अपूर्ण युतीचें फल जसा शर भेद जास्त तसें कमी. ह्यावरूनही हेंच निष्पन्न होतें कीं ग्रहाच्या वास्तविक स्थानाचेंच महत्व विशेष आहे.

प्रचलित शास्त्रीय पद्धतीमध्यें केवळ भोगाकडे लक्ष्य दिल्यानें दृश्य ग्रह अदृश्य भागांत व अदृश्य ग्रह दृश्य भागांत मांडला जाण्याचा संभव आहे; त्याचप्रमाणें दोन भाववृत्तांमधील ग्रह, त्या मधील क्रांतिवृत्ताच्या कंसांत मांडला न जातां त्याच्या पुढील किंवा मागील भावांत मांडला जाण्याचा संभव आहे; तसेंच अपूर्ण युतीच्या वेळीं युतीचे मानांतही फरक पडण्याचा संभव आहे.

भावाच्या आरंभींचा ग्रह मागील भावाचें व अंतींचा ग्रह पुढील भावाचें फल कधीं कधीं देतो असें ह्मणण्याचा प्रसंग येतो तोही याच कारणानें येत असला पाहिजे.

प्रचलित शास्त्रीय पद्धतींतील भाव हे केवळ कंस न मानतां प्रदेश (द्विकोणात्मक) मानले तरी सर्व भाव द्विकोणाचें क्षेत्र समान येत नाहीं हें तज्ज्ञांच्या लक्षांत येणार आहे.

वरील प्रकारचे गोंधळ नूतन पद्धतींत शास्त्रीय दृष्टीनें तरी नाहींसे होतील. व्यावहारिक दृष्ट्या या बाबतींचें कोणी महत्व मानणार नाहींत ही गोष्ट खरी. परंतु त्यांस आमचें इतकेंच ह्मणणें आहे कीं भावाच्या अर्था संबंधी व त्यांच्या आरंभासंबंधीं जर आपणास स्थूलताच पतकरणें व्यावहारिक दृष्ट्या इष्ट व सुगम वाटतें, तर मग

दशम व लग्न शुद्ध साधून पुढें प्रमाण गणितानें (ह्मणजे त्रैराशिकानें) भाव आणण्याची जी जुनी पद्धत चालू आहे ती तरी कां सोडावी? शास्त्रीय तंतोतंत सत्य व्यवहारांत स्थूल करून घ्यावें हा न्यायच आहे. दशम साधतांना नाक्षत्र घटि व सावन घटि यांतील भेदही कोण लक्ष्यांत घेत असतो?

तात्पर्य, शास्त्रीय पद्धतिच पाहिजे असल्यास सर्व गोष्टींचा विचार करून ती ठरविली पाहिजे. तेथें गतानुगतिक कामाचें नाहीं

———————

सटीक व सार्थ

जातकी

हें पुस्तक

कुंडलीविज्ञानच्या वाचकांसाठीं मूळ श्लोक, अर्थ व टीका

यांसह प्रसिद्ध केलें आहे.

भाषांतरकार

विष्णु गोपाळ नवाथे

संपादक—कुंडलीविज्ञान.

सर्व हक्क भाषांतरकारानें आपल्याकडे राखून ठेविले आहेत.

शके १८३० सन १९०८

हें पुस्तक स्वतंत्र छापून विक्रीसाठीं सवडीनें ठेवण्यांत येईल.

प्रस्तावना

जातकी या ग्रंथाची हस्तलिखित एक प्रत रोहें-अष्टमी या गांवीं एका शास्त्रीबुवांनीं दिली. या ग्रथाचा कर्त्ता कोण त्याचा त्यांत मागमूसही नाहीं. ग्रंथाची रचनाही पद्धतशीर नसून भाषा अशुद्ध आहे. ही पोथी शके १७३७ युवा नामसंवत्सरे भाद्रपद शु० १५ सोमवारीं 'नारायण' या नांवाच्या मनुष्यानें लिहिलेली आहे. या वरून याच गृहस्थानें अन्य ग्रंथांतले योग त्याच्या मतानें जे उपयुक्त वाटले ते जसेच्या तसे उतरून घेऊन त्याला जातकी हें नांव दिलें आहे असें वाटतें.

जातकांतले बरेच ग्रंथ अशा प्रकारचे आहेत. कोठल्या तरी ग्रंथांतले आपणास वाटतील ते योग घेऊन ग्रंथरचना करणारेच ज्योतिषी फार होऊन गेले. त्यामुळें निरनिराळ्या मतांची खिचडी मात्र झालेली आहे. या ग्रंथकारांपैकीं जे विद्वान् होते त्यांनीं आपल्या शब्दांत श्लोक रचले व इतरांनीं निवळ उतारे घेतले! उतारे घेणारांना संस्कृताचें तादृश ज्ञान नसल्यामुळें व परंपरा बरीच झाल्यामुळें श्लोक अशुद्ध झाले आहेत. कित्येक ठिकाणीं तर एकाचा एक व दुसऱ्याचा एक असे चरण घेऊन श्लोक दिलेले आढळतात त्यामुळें त्यांचा अर्थ करणें अशक्य होतें.

जातकी हा ग्रंथही अशाच प्रकारचा असतां त्याचें भाषांतर कां दिलें असा वाचक प्रश्न करतील. त्यास उत्तर असें आहे कीं, मूळचे ग्रंथ नामशेष झाले आहेत, म्हणून त्यांची आशा करणें व्यर्थ आहे. तेव्हां खिचडींतच एखादें रत्न सांपडण्याचा संभव असल्यामुळें त्याचें भाषांतर देणें जरूर वाटलें. शिवाय अल्पज्ञ ज्योतिषी असल्या एखाद्या ग्रंथांतील वचन ठोकून देऊन नसतें मत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करितो हें घातुक आहे. तेव्हां समाजाला असल्या मतांचें मर्म कळल्यास पुष्कळ फायदा होईल हें उघड आहे. तात्पर्य सध्याच्या प्रसंगीं आपणास खिचडीवरच निर्वाह करणें भाग आहे. त्याज्यात्याज्य विचार ज्याचा त्यानें करावा हें उत्तम.

सूचना

प्रत्यक वर्षी एक लहानसा पूर्ण ग्रंथ देण्याच्या योजनेप्रमाणें या आठव्या वर्षी 'जातकी' व 'ताजिक' हे दोन ग्रंथ वाचकांस दिले जात आहेत.

जैमिनीय सूत्राचें भाषांतर पुढील वर्षी पूर्ण होईल. व 'केतकी' किंवा 'ज्योतिर्गणितवार्तिके' यापैकीं कोणतें तरी एक पूर्ण करण्याचा हेतु आहे.

ज्यो. केदारनाथशर्मा यांजकडून 'प्रश्नमार्गी' ची पोथी आली आहे. हा विषय नवीन सालासाठीं यथास्थल सुरू राहील.

संपादक 'कुंडलीविज्ञान'

जातकी

सूर्यो भौम स्तथा राहुः शनि र्मूतौ यदा स्थितः ॥
संतापं रक्तपित्तञ्च सौम्यैः सर्वै र्निरोगता ॥

अर्थ.—लग्नीं सूर्य, मंगळ, राहु किंवा शनि यां पैकीं कोणी पाप ग्रह असल्यास संताप व रक्तपित्त हे विकार होतात. आणि शुभ ग्रहांपैकीं कोणी असल्यास आरोग्य प्राप्त होतें.

टीका.—हे ग्रह सामान्यत्वें अनिष्ट आहेत. तरी सर्व प्रसंगीं रोग उत्पन्न करितात, असें समजूं नये. सिंह राशीचा सूर्य जर लग्नीं असेल तर मनुष्य निरोगीच होईल. परंतु तोच जर शनीनें युक्त असेल अथवा त्याच्यावर शनीची दृष्टि असेल तर मात्र मनुष्य व्याधिग्रस्त होईल. धनु राशीचा मंगळ जर लग्नांत असेल तर मनुष्य मजबूत व निरोगीच होईल. पण तो शनीनें युक्त अथवा दृष्ट असेल तर मात्र रोगी होईल. याच प्रमाणें इतर ग्रहांविषयीं जाणावें. रवि व मंगळ हे उष्णतेचे व रक्ताचे विकार उत्पन्न करितात. त्यामुळें जर ते लग्नीं अग्निराशींत असतील तर शरीर उष्ण करितील व स्फोटकादि रक्तविकार उत्पन्न करितील. ह्मणून ज्योतिष्यानें केवळ वरील श्लोकावर अवलंबून राहतां कामा नये.

क्रूराःसर्वे धनस्थाने धनहानिः प्रजायते ॥
धने सौम्ये सुखं सर्वं ऋद्धिबुद्धिसमागमाः॥५

अर्थ.—धन स्थानीं कोणताही क्रूर ग्रह असतां धनहानि होते. व शुभ ग्रह असतां ऋद्धिबुद्धि यांची प्राप्ति होते.

टीका.—हें स्थान असें आहे कीं, या स्थानीं कोणताही पाप ग्रह असतां कामा नये. असेल तर धनाचा संग्रह होत नाहीं. वडिलांनीं सांठविलेलें धन नाश पावतें, त्यासंबंधानें तंटे होतात किंवा कोणत्याही कारणानें त्याचा उपभोग घडत नाहीं. हा सामान्यें नियम आहे. जेव्हां ते ग्रह शुभ ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असतात, तेव्हां हानि पुष्कळ कमी प्रमाणानें होते व किंचित् संग्रहही होतो. क्रूर ग्रह शत्रूच्या राशीस असून शत्रूनें युक्त अथवा दृष्ट असतील तर ते फारच हानिकारक होतात. सर्वस्वापहार होऊन कर्जही होतें. व जन्मभर तें कर्ज जाच देतें.

क्रूरा स्तृतीयगाःसर्वे बांधवै रहितो भवेत् ॥
सौम्या भ्रातृभिः संपूर्णैः कीर्त्तिवांश्च जितेंद्रियः॥३

अर्थ.—पाप ग्रह तृतीय स्थानीं असतां बांधवरहित होतो व शुभ ग्रह असतां बांधवसुख मिळतें. आणि कीर्त्तिमान व जितेंद्रिय होतो.

टीका.—तृतीय स्थनावर बंधु व भगिनी यांचा आणि पराक्रमाचा विचार होतो. या स्थानांत पाप ग्रह असावे, ह्मणजे तेणें करून मनुष्य शूर, धाडसी त कर्तृत्ववान् असा मनुष्य होतो. पण त्याला भावंडांचें सुख मिळत नाहीं. पाप ग्रह आपल्या शत्रुग्रहानें युक्त अथवा दृष्ट असतील तर एकाही भावंडाचें सुख मिळत नाहीं.

तुर्यस्थाने स्थिताः क्रूरा बालके मातृकष्टदाः ॥
सौख्यं सौम्याः प्रकुर्वंति राजसन्मानदायकाः ॥४

अर्थ.—चतुर्थ स्थानीं पाप ग्रह असतां मातेला क्लेश होतो. व शुभ ग्रह असतां राजसन्मान प्राप्त होतो.

टीका.—चतुर्थ स्थानावर गृह, क्षेत्र, वाहनें, मित्र आणि माता यांचा विचार होतो. ह्मणून या स्थानांत पाप ग्रह असेल तर वरील गोष्टीं संबंधी सुख मिळत नाहीं. कुंडलींत या स्थानीं पाप ग्रह असेल तर तिला पुष्कळच कमीपणा येतो. हें सुख स्थान आहे. गृहक्षेत्रादिकांचें सुख शुभ ग्रह असतां उत्तम प्रकारें मिळतें व तेणेंकरून राजापासून मान मिळतो. गाड्या, घोडे, हत्ती, पालख्या इत्यादि वाहनें प्राप्त होणें या स्थानांतील शुभ ग्रहावर अवलंबून आहे. पाप ग्रह जर चांगल्या स्थितींत असतील तर वाहनादि सुखें त्या मनुष्यास मिळणार नाहींत असें नाहीं, पण त्यांचें सुख सर्वदा मिळणार नाहीं व केव्हां केव्हां तर त्या संबंधानें अत्यंत दुःखें भोगावीं लागतील. श्री रामचंद्राच्या कुंडलींत चतुर्थ स्थानीं उच्च असा शनि होता. या शनीमुळें त्यास घरदार सोडून कांहीं दिवस वनवास करावा लागला! त्याला मातृसुख कोणत्या प्रकारचें होतें हेंही पुराणप्रसिद्धच आहे! या स्थानांत शुभ ग्रह बलवान् असतां मनुष्य दयाळू व निष्कपट होतो. पाप ग्रहानें याच्या उलट स्थिति असते. पाप ग्रह जर कल्याणकारक अशा शुभ स्थितींत असेल तर या स्थानसंबंधी सुख बरें मिळेल.

सुतस्थाने शुभाः सर्वे पुत्रसंतानकारकाः
क्रूराः संततिमृत्युं च कुपुत्रं वा धरासुतः॥५

अर्थ.—पंचम स्थानीं सर्व शुभ ग्रह पुत्रसुख देणारे आहेत. पाप ग्रह असतां संतति मृत्यु पावते. मंगळ असतां पुत्र वाईट निपजतात.

टीका.—या भावावर बुद्धि, विद्या, मंत्र, गर्भ व मुलें यांचा विचार होतो. १।३।५।७।९।११ हीं सहा गर्भस्थानें आहेत. या सर्वांत पंचम हें गर्भस्थान मुख्य आहे. संतति व गर्भ यांचा सामान्य विचार या स्थानावर होतो. या स्थानांत शुभ ग्रह असतील तर पुत्रप्राप्ति होते व संतानसुख मिळतें. पाप ग्रह गर्भ व संतति यांचा नाश करितात किंवा मुलें रोगट अथवा दुर्गुणी निपजवितात. संततिसंबंधाचा हा विचार सामान्य आहे. ग्रंथकार १२ श्लोकांत १२ भावांचें वर्णन पुरें करणार असल्यामुळें तो सामान्यत्वेंच सांगणार हें उघड आहे. संततिसंबंधाचा विचार पंचमांतील ग्रह, राशि व त्यावरील अन्य ग्रहांची दृष्टि, लग्न, चंद्र आणि गुरु इतक्यांवर अवलंबून आहे. मंगळ व राहू हे ग्रह विशेषेंकरून गर्भपात करितात किंवा मूल उपजतांत मारितात. शनि विलंबानें संतति देतो. रवि हा सामान्य मारक आहे. गुरु हा मंगळाशीं किंवा शनीशीं युक्त अथवा दृष्ट असतां संततीवर अनिष्ट परिणाम होत असतो. गुरुशनियोग हा वंशच्छेदयोग आहे. या योगावर पुत्र बहुधा होतच नाहीं. परंतु पंचम स्थानीं शुभ योग झाल्यास एखाद्या प्रसंगीं पुत्र होतो. पण अखेरीस तो मरण पावतो आणि वंश खुंटतो. इत्यादि अनेक गोष्टी ज्योतिष्यास विचारांत घ्याव्या लागतात,

षष्ठे पापा नरं कुर्युः शत्रुपक्षविदारितः ॥
सौम्याः कष्टं महारोगं षष्ठे चंद्रेच मृत्युदः ॥६

अर्थ.—सहाव्या स्थानांत पाप ग्रह असतां शत्रुपक्षाचा नाश होतो. शुभ ग्रह असतां कष्ट व मोठाले रोग होतात. षष्ठ स्थानाचा चंद्र मृत्युदायक जाणावा.

षष्ठे पापा नरं कुर्युः शत्रुपक्षाविदारितः ॥
सौम्याः कष्टं महारोगं षष्ठे चंद्रेच मृत्युदः ॥ ६

अर्थ.—सहाव्या स्थनांत पाप ग्रह असतां शत्रुपक्षाचा नाश होतो. व शुभ ग्रह असतां कष्ट व मोठाले रोग होतात. षष्ठस्थानचा चंद्र मृत्युदायक जाणावा.

टीका.—सहाव्या भावावर मातुलपक्षांचें सुख, रोग, शत्रु, चतुष्पाद जनावरें, सेवा, भय, व्रण, विघ्न, क्लेश व उपदंशाचे विकार इतक्या गोष्टींचा मुख्यत्वें विचार होतो. षष्ठ स्थानांत जर पाप ग्रह असेल, तर मातुलपक्षाचें सुख मिळणार नाहीं. शत्रु नाश पावतील चतुष्पाद जनावरांचें सुख मिळणार नाहीं. सेवासुख चांगलें मिळणार नाहीं. निर्भयता प्राप्त होईल. विघ्नें दूर होतील. पण व्रण,क्लेश, उपदंशाचे विकार व आणखी कित्येक रोग दूर होतील असें समजूं नये. तसेंच षष्ठ स्थानीं शुभ ग्रह असल्यास कष्ट व रोग होतात हें जें ग्रंथकाराचें मत आहे, तेंही बरोबर नाहीं. षष्ठ स्थानांतील चंद्र मृत्युप्रद होय ह्या ह्मणण्याचा भावार्थ, कुंडलींत जर षष्ठ स्थानीं चंद्र असेल तर शरीर रोगी होतें, शत्रुपीडा होते, सर्वत्र अपयश प्राप्त होतें असा केला पाहिजे. केवळ चंद्रानेंच मृत्यु प्राप्त होईल असें समजतां कामा नये.

कुभार्या सप्तमे क्रूरा सौख्यं सौम्या मनःप्रिया ॥
गुरुशुक्रयुतायां च रूपलावण्यशालिनी ॥७

अर्थ.—सप्तम स्थानीं पाप ग्रह असतां स्त्री चांगली मिळत नाहीं. शुभ ग्रह असतां स्त्री आवडती मिळते व तिचें सुखही चांगलें मिळतें. गुरु व शुक्र हे सप्तमांत असतील तर स्त्री स्वरूपानें अत्यत देखणी असते.

टीका—' कुभार्या ' ह्मणजे जी अल्पायु, भांडखोर, दुष्ट, दुराचारी, लबाड, नवऱ्याला त्रास देणारी व कजाग अशी असते ती. सप्तम स्थानावर प्रवास, नाहींशी झालेली वस्तु, दुकानदारी, चोरीस गेलेलें द्रव्य, व्यभिचार, न्यायमंदीर, युद्ध, विवाह, स्त्रीसुख आणि मूत्राशयाचे विकार इत्यादिकांचा विचार होतो. ग्रंथकारानें फक्त स्त्रीबद्दलच सांगितलें आहे व तें बरोबर आहे.

खेटाः सर्वे महादुष्टा अष्टमस्थानंसंस्थताः ॥
शशांकश्च विशेषेण जन्मकाले च मृत्युदः ॥८

अर्थ—सर्व ग्रह अष्टम स्थानीं अत्यंत दुष्ट फलें उत्पन्न करितात. चंद्र अष्टम स्थानीं असतां जन्मकालींच मृत्यु देणारा होतो.

टीका—अष्टम स्थानावर प्राचीन द्रव्य, मृत्युपत्रान्वयें मिळणारें धन, मरणाचें कारण, गुह्यपीडा इ० चा मुख्यत्वें विचार होतो. द्वितीय स्थान हें धन स्थान आहे. व अष्टम स्थान हें त्याच्या समोरचें स्थान असल्यामुळें यावरही धनाचा विचार होतो. पण धन स्थानावर उघड द्रव्याचा व अष्टमावर गुप्त द्रव्याचा विचार होतो असा या दोन स्थानांत फरक आहे. त्याच प्रमाणें षष्ठ स्थानावर उघड शत्रूंचा जसा विचार होतो, तसाच व्यय स्थान हें त्याच्या समोरचें असल्यामुळें त्यावर गुप्त शत्रूचा विचार होतो. या ग्रंथकाराच्या मतें अष्टमांत सर्वच ग्रह वाईट असतात. पण आमच्या मतें अष्टमांतील ग्रह वाईट नसून ते गुप्त धनाला चांगले असतात. विवाहांत किंवा सासऱ्या कडून मिळणारें किंवा लांचलुचपतीनें मिळणारें, बिनवारशी, सोरटींत मिळणारें, जमिनींत पुरून ठेविलेलें व इतर कोणत्याही प्रकारचें अचानक प्राप्त होणारें धन अष्टमांतील ग्रहांवरच अवलंबून असतें. ह्मणून या स्थानांत ग्रह असावे.

धर्मस्थाने स्थिता पापा नदं कुर्वंति पापिनां ॥
धर्मस्थां शीलवंतश्च पुण्यधीः शुभकर्मदाः ॥९

अर्थ.—नवम भावांत पाप ग्रह असतां पुष्कळ पाप घडतें. व शुभ ग्रह असतां मनुष्य चांगल्या स्वभावाचा, पुण्यवासनेचा व चांगलीं कृत्यें करणारा होतो.

टीका.—या भावावर यात्रा, धर्म, गुरु, भाग्य, नातवंडें, दान,तप,कीर्ति वें लोकशिक्षण यांचा विचार होतो. ह्मणून या स्थानांत पाप ग्रह नसावा. पाप ग्रह बलवान् असेल तर मनुष्य भाग्यशाली होईल, पण इतर गोष्टी त्याच्या हातून घडणार नाहींत.

कर्मे क्रूराश्च दारिद्र्यं पितृभ्रातृविवर्जितं ॥
सौख्यं सौम्याः प्रकुर्वंति राजसन्मानदायकाः ॥१०

अर्थ.—दशमांत पाप ग्रह असतां दारिद्र्य व पितृभ्रातृविरहित होतो. शुभ ग्रह सुख व राजसन्मान देतात.

टीका.—दशमाला राज्यभुवन ह्मणतात. या भावावर राजकीय गोष्टी, नोकरी, धंदा, इभ्रत, वैभव, पिता व पुण्यकर्में (यज्ञादि) यांचा विचार होतो. या स्थानांत कोणताही ग्रह असला तरी हरकत नाहीं. शनि व मंगळ हे तर दशमांत प्रमुख आहेत. तथापि ते व इतर पाप ग्रह पितृसुखाला चांगले नाहींत. शुभ ग्रहाविषयीं सांगावयासच नको. ते पितृसुखाला व राजकीय गोष्टींसही शुभच आहेत. यज्ञादि पुण्यकर्मे पाप ग्रहांनीं घडावयाचीं नाहींत.

लाभस्थाने ग्रहाः सर्वे बहुलाभफलप्रदाः ॥
गजाश्वपतिसौम्यादिक्रूराः कुर्वंति कुंजरान् ॥११

अर्थ.—लाभ स्थानीं सर्व ग्रह अत्यंत लाभदायक असतात. व हत्ती, घोडा इत्यादिकांची प्राप्ति ह्या ग्रहांपासून होते.

टीका.—या भावावर हत्ती, घोडे, पालख्या यांचें ऐश्वर्य, सर्व प्रकारच्या द्रव्यांची प्राप्ति यांचा विचार होतो. ह्मणून या स्थानांत कोणताही ग्रह असावा. तो व कुंडलींतील ग्रह ज्या मानानें बलवान् असतील त्या मानानें ऐश्वर्य प्राप्त होईल. हें स्थान पंचमासमोरचें आहे. ह्मणून या स्थानांतील पाप ग्रह गर्भाला मारक होतात.

कुचैलिनं तथा काणं पापिनं अनधीतिनं ॥
महाकृष्टं प्रकुर्वंति व्ययस्थाने गता ग्रहाः ॥१२

अर्थ.—व्ययस्थानीं ग्रह असतां वाईट वस्त्रें वापरणारा, काणा, पापी, दुर्बुद्धीचा, कुष्ठी असा मनुष्य होतो.

टीका.—या भावावर सर्व प्रकारचा व्यय, गुप्त शत्रु, कैद, दारिद्र्य, शय्यादि सुखें, मेल्यानंतरची गति या गोष्टींचा विचार होतो. या स्थानांत ग्रह नसावे. त्यांत पाप ग्रह तर मुळींच नसावे. या स्थानांतील मंगळ नेत्रपीडा, खर्च व स्त्रीपीडा करणारा आहे. शनि अनेक प्रकारचीं संकटें, कैद मारहाण, हाल अपेष्टा व दारिद्र्य उत्पन्न करितो. पाप ग्रह असतां मेल्या: नंतर चांगला लोक मिळत नाहीं. शुभ ग्रह असतां सत्कर्मीं व्यय होतो.

॥ इतिद्वादशभावाः ॥

आदौ जीवे पंचमे वा दशमे चंद्रमा भवेत् ॥
राजयोगं विजानीयात् स्वकुले नायको भवेत् ॥ १३॥

अर्थ.—लग्नीं गुरु असून पंचमांत किंवा दशमांत चंद्र असेल तर तो राजयोग जाणावा. असा मनुष्य आपल्या कुलांत श्रेष्ठ होतो.

टीका.—सिंह लग्नीं गुरु असून दशमांत वृषभ राशीचा चंद्र असेल, किंवा मेष लग्नीं गुरु असून पंचमांत सिंह राशीचा चंद्र असेल, किंवा मीन लग्नीं गुरु असून पंचमांत कर्क राशीचा चंद्र असेल किंवा कर्क लग्नीं गुरु असून दशमांत मेष राशीचा चंद्र असेल तर तो मनुष्य मोठ्या योग्यतेचा होतो. इतर राशींतले योग साधारण समजावे. अशा योगावर जन्मलेलें मूल कुलदीपक जाणावें.

भ्रातृ स्थाने यदा जीवो लाभस्थाने यदा शशी ॥
संजातो ग्रहमध्यस्थो विख्यातः कुलदीपकः ॥ १४

अर्थ.—तृतीय स्थानीं गुरु व एकादश स्थानीं चंद्र अशा योगावर झालेला मनुष्य प्रख्यात व कुलदीपक होतो.

टीका.—तिसऱ्या स्थानापासून ११ वें स्थान नववें आहे व ११ व्या स्थानापासून तिसरें स्थान पांचवें आहे. त्या मुळें वरील योगांत गुरु व चंद्र यांत नवपंचम योग होतो. कुंडलींत या दोन ग्रहांत नवपंचम योग असल्यास तो मनुष्य यशस्वी, कीर्तिमान व धनवान् होतो. या श्लोकांतील योग अशाच प्रकारचा आहे. या योगाचा राजयोगांत समावेश होत नाहीं.

एकोऽपि यदि केंद्रस्थो भार्गवो वांगिरापतिः ॥
नवमे वा सुतस्थाने दारिद्र्यंच न जायते ॥ १५

अर्थ.—गुरु किंवा शुक्र यांपैकीं एक ग्रह जर केंद्रीं (१।४।७।१० स्थानीं) किंवा त्रिकोणांत (५।९ स्थानीं) असेल तर दारिद्र्य प्राप्त होणार नाहीं.

टीका.—गरीब कुळांत जन्मलेल्या किंवा कर्जानें पीडलेल्या मनुष्याच्या कुंडलींत हा योग असल्यास तो धनिक होईल किंवा कर्जमुक्त होईल. हा योग मोठीशी श्रीमंती दर्शवितो असें नाहीं. पण त्या मनुष्यास आवश्यक वस्तु प्राप्त होऊन अन्नवस्त्राला कमीपणा येत नाहीं.

धने व्यये तथा लग्ने जामित्रभवने ग्रहाः ॥
राजयोगं विजानीयात् छत्रधारी भवेन्नरः ॥१६

अर्थ.—द्वितीय, द्वादश, लग्न व सप्तम या स्थानांत सर्व ग्रह असल्यास राजयोग जाणावा. या योगावर मनुष्य छत्रधारी (राजा) होतो.

टीका.—कोणत्याही राजयोगांत लग्न बलवान् असावें लागतें. त्याच प्रमाणें याही योगांत लग्न बलवान् असलें पाहिजे. राशिपरत्वें हा योग कसा होतो तें खालील कुंडल्यांवरून कळून येईल.







याच प्रमाणें ग्रहांत अदलाबदल करून हे योग कल्पनेनें तयार करावे. श्लोकांत अमुक ग्रह अमुक राशींत व अमुक स्थानांत पाहिजे असें जरी सांगितलें नाहीं तरी तो विचार सोडतां कामा नये. कर्क व सिंह राशींतच मनुष्य छत्रधारी बनेल. इतर राशीचें लग्न असतां घडेल किंवा नाहीं तें सांगवत नाहीं. मात्र इतकें खास आहे कीं वरील स्थानांत ग्रह असून त्यांचा विशेष भरणा लग्नाच्या बाजूस असेल तर तो मनुष्य मोठ्या योग्यतेचा होणार असें मानण्यास हरकत नाहीं.

लग्ने चैव यदा जीव श्चतुर्थे चंद्रमाबुधः ॥
दशमेच यदा भौमो राजयोग स्तदा भवेत् ॥ १७

अर्थ.—लग्नीं गुरु असून चतुर्थ स्थानीं चंद्र किंवा बुध असेल आणि दशमांत मंगळ असेल तर राजयोग होतो.

टीका.—हा योग मेष लग्नीं बलवान् होतो. कारण, लग्नीं मेष राशीचा गुरु असून चतुर्थ स्थानीं कर्क राशीचा चंद्र व दशमांत मकर राशीचा रुचक मंगळ असे ग्रह बसतात. मीन लग्नींही चांगलाच होतो. कारण, लग्नीं स्वराशीचा गुरु असून चतुर्थ स्थानीं स्वराशीचा बुध व दशमांत धनु राशीचा मंगळ असे ग्रह बसतात. या सर्वांत जर अंशसाम्य असेल तर तो योग विशेष चांगला. इतर राशींत साधारण राजयोग होतो.

मकरे वाऽथ कुंभे वा तुलायां वा शनैश्चरः ॥
मूर्तौ केंद्रत्रिकोणेषु तदारिष्टं न जायते ॥ १८

अर्थ.—मकर, कुंभ किंवा तूळ राशीचा शनि लग्नीं केंद्रीं किंवा त्रिकोणांत असेल तर मनुष्य विपत्ति भोगणार नाहीं.

टीका.—मकर किंवा कुंभ राशींतला शनि स्वगृहीं असतो व तूळ राशीचा उच्च असतो म्हणून असा शनि विशेष बलवान् जाणावा.

मेषे वा वृश्चिके वाऽपि मकरे वा धरासुतः ॥
मूर्तौ केंद्रत्रिकोणेषु तदारिष्टं न जायते ॥ १९

अर्थ.—मेष, वृश्चिक किंवा मकर राशींचा मंगळ लग्नीं, केंद्रीं किंवा त्रिकोणांत असतां मनुष्य विपत्ति भोगणार नाहीं.

टीका.— मेष किंवा वृश्चिक राशींतला मंगळ स्वगृहीं असतो व मकर राशींचा उच्च असतो, म्हणून या राशींतील मंगळ विशेष बलवान् जाणावा.

मृगराशिं परित्यज्य स्थिते लग्ने बृहस्पतिः ॥
करोति समहीपालं धनपो वा भवेन्नरः ॥ २०

अर्थ.—मकर राशीशिवाय इतर कोणत्याही राशींत लग्नीं गुरु असतां तो मनुष्याला राजा किंवा धनवान् करितो.

टीका.—मकर हा गुरूचा नीच राशि आहे म्हणून या राशींत तो बलहीन नसतो. यांत एकट्या गुरूवर राजयोग किंवा धनयोग सांगितला आहे हें बरोबर नाहीं.

लग्नं विहाय केंद्रे सकलकलायुतः कलानाथः ॥
करोति वश्यं नृपतिं धने वार्ध्यंन संदेहः ॥ २१

अर्थ.—पूर्ण चंद्र लग्नाशिवाय कोणत्याही केंद्रीं (४।७।१० स्थानीं) असतां मनुष्य राजाला वश करणारा होतो.

टीका.—हा वशीकरण योग दिसतो. अनुभव घ्यावा.

सूर्यो भौमस्था राहु श्चतुर्थे भवने यदा ॥
अकर्माहि तदा जातो मातायुष्क्षयं करः ॥२२

अर्थ.—चतुर्थ स्थानीं रवि, मंगळ व राहु हे ग्रह असल्यास मनुष्य दुराचरणी होतो व त्याची माता फार दिवस जगत नाहीं.

टीका.—चतुर्थ स्थानीं मातेचा विचार होतो, व रवि, मंगळ आणि राहू हे पाप ग्रह आहेत त्यामुळें अशा योगावर मातृसुख मिळत नाहीं. याचा अंमल हृदयावर असल्यामुळें तो दुष्ट हृदयाचा अर्थात् कपटी, निर्दय व दुराचरणी होतो.

लग्ने शुक्रो धने चंद्रो सहजस्थो यदा गुरुः ॥
तदा वीर्यवतां नाथो धननाथो भवेन्नरः ॥ २३

अर्थ.—लग्नीं शुक्र, धनस्थानीं चंद्र व तृतीय स्थानीं गुरु असतां मनुष्य अत्यंत पराक्रमी व धनवान् होतो.

टीका.—हा योग मिथुन, मेष, तूळ या राशींत लग्न असतां बलवान् होतो.

लग्ने करुरो व्यये करुरो धने करुरस्तथैवच ॥
सप्तमे भवने करुरः परिवारक्षयंकरः ॥ २४

अर्थ.—लग्नीं, व्ययस्थानीं व धनस्थानीं आणि सप्तम स्थानीं पाप ग्रह असल्यास सर्व कुटुंबाचा नाश होतो.

टीका.—लग्नावर शारीरिक व मानसिक गोष्टींचा विचार होतो, द्वितीय स्थानावर कौटुंबिक व धनसंग्रहाचा विचार होतो, व्यय स्थानावर सर्व प्रकारचे व्ययांचा व संकटांचा विचार होतो आणि सप्तमावर स्त्रीसुखाचा विचार होतो. यावरून या चार स्थानांत क्रूर ग्रह असल्यास परिवारक्षय होतो असें जे श्लोकांत म्हटलें आहे, त्याचा उलगडा होईल.

चतुर्थे दशमे राहु लग्ने क्रूरस्तथैवच ॥
निःस्वयोगं विजानीया त्स्वपक्षस्य भवेन्नरः ॥२५

अर्थ.—लग्नीं क्रूर ग्रह असून चतुर्थ स्थानीं किंवा दशमांत राहु असेल तर निर्धनयोग होतो.

टीका.—आमच्या मतें दशमांतील राहु मनुष्यास धनवान् व अब्रूदार करितो. चतुर्थ स्थानीं मात्र निर्धनत्वाला कारण आहे.

द्वादशे च यदा चंद्रो भौमो राहुर्धने तथा ॥
दारिद्र्यं तं विजानीया त्पुत्रस्त्रीसहबांधवैः ॥२६

अर्थ.—व्यय स्थानीं चंद्र असून धन स्थानीं मंगळ किंवा राहु असेल तर पुत्र, स्त्री, बंधु व स्वतः दारिद्र्य भोगतील.

टीका.—धनस्थानीं सांपत्तिक सुखाला राहु अनिष्ट नाहीं असा अनुभव आहे. ज्यांच्या धन स्थानीं राहु असतो तीं माणसें द्रव्याचा बेताबातानें खर्च करितात व होईल तितका संग्रहच करितात. मंगळ मात्र या ठिकाणीं चांगला नाहीं हें खरें आहे.

सप्तमे च यदा राहु र्दशमे रविनंदनः ॥
अकर्माहि तदा जातो दासकर्म करिष्यति ॥ २७

अर्थ.—सप्तमांत राहु असून दशमांत शनि असेल तर तो मनुष्य वाईट चालीचा होऊन दुसऱ्याची चाकरी करितो.

टीका.—दशमांत मेष, कर्क, सिंह व वृश्चिक या राशीचा शनि वरील प्रकारचीं फलें निश्चयानें उत्पन्न करितो. सप्तम स्थानीं राहु असतां मनुष्य व्यभिचारी होतो. दशमाला कर्मस्थान हें नांव आहे. ह्मणून सप्तमांत राहु व दशमांत शनि असतां मनुष्य अनान्वित कर्में करील यांत शंका नाहीं.

द्वादशे नवमे चंद्रो क्रूने तिष्ठति च भृगुः ॥
हिबुकस्था यदा पापा वंशच्छेदो भविष्यति ॥ २८

अर्थ.—व्यय स्थानीं किंवा नवम स्थानीं चंद्र असून सप्तम स्थानीं शुक्र असेल व चतुर्थ स्थानीं पाप ग्रह असतील तर वंशच्छेद होतो.

टीका.—या योगाची उपपत्ति नीटशी लागत नाहीं. ग्रंथकाराला एखाद्या कुंडलींत असा योग दृष्टीस पडल्यामुळें त्याची अशी समजूत झालेली असावी.

अष्टमे च यदा क्रूरो रिपुसौम्यास्तथैवच ॥
भ्रंशकुष्ठं विजानीयात् महापापी भवेन्नरः ॥ २९

अर्थ.—अष्टम स्थानीं पाप ग्रह असून षष्ठ स्थानीं शुभ ग्रह असतील तर तो मनुष्य मोठा पापी होतो व त्यास पांढरें कोड होतें.

टीका.—या योगाचीं उपपत्ति लागत नाहीं. ह्मणून हा विशेष प्रकारचा योग मानिला पाहिजे.

अष्टमे भवने भौमे सप्तमे राहुसंभवे ॥
षष्ठेचैव यदा सौरि र्भार्या तस्य न जीवति ॥ ३०

अर्थ.—अष्टमांत मंगळ, जाया स्थानीं राहु व षष्ठ स्थानीं शनि असा योग असेल तर स्त्री जगत नाहीं.

टीका.—६।७।८ स्थानीं क्रमानें पाप ग्रह असणें चांगलें नाहीं. असा योग असतां मनुष्याचा विवाह होणें अगर स्त्रिया जगणें कठीण असतें.

लग्ने व्ययेच पाताले जामित्रे चाष्टमे कुजे ॥
कन्याभर्त्री विनाशाय पूर्वस्त्रीच विनश्यति ॥ ३१

अर्थ.—लग्न, व्यय, चतुर्थ, जाया व अष्टम या स्थानीं मंगळ असल्यास तो पतीला व स्त्रीला मारक होतो.

टीका.—जोशी लोक विवाह जुळवितांना या योगाचा विचार करितात. मुलाच्या अगर मुलीच्या कुंडलींत इतक्या स्थानांतून एखाद्या स्थानीं मंगळ असल्यास त्या मुलाला किंवा मुलीला मंगळ आहे असें ह्मणतात. हें स्पष्ट होण्यासाठीं खालीं कुंडली दिली आहे. तींत फुल्या असलेल्या स्थलीं मंगळ असतां वरील योग होतो असें ह्मणतात.



तृतीये नवमे क्रूरा जन्मकाले यदा ग्रहाः ॥
भ्रातरस्तस्य बालस्य न जीवंति कदाचन ॥ ३२

अर्थ.—तृतीय व नवम स्थानीं पाप ग्रह असतील तर त्या मुलाचे भाऊ जगत नाहींत.

टीका.—नवम स्थान हें तिसऱ्या स्थानाच्या समोरचें स्थान आहे त्यामुळें तेथील पाप ग्रहाची तिसऱ्या स्थानावर पूर्ण दृष्टि असते, तिसऱ्या भावावर भावंडांचा विचार होतो ह्मणून या व त्याच्या समोरच्या स्थानीं पाप ग्रह असूं नये.

नवमे च यदा भानुःस्वक्षेत्रीयो बृहस्पतिः ॥
तस्य जीवति भ्रातापि एको जीवति पुत्रकः ॥ ३३

अर्थ.—नवम स्थानीं रवि असून गुरु स्वगृहीं असतां भाऊ जगतो व एक पुत्रही जगतो.

टीका.—यांत गुरु कोणत्या स्थानांत पाहिजे याचा स्पष्ट उल्लेख नाहीं. आमच्या मतें तो नवम स्थानींच पाहिजे.

लग्ने चैव यदा जीवे धने सौरिर्यदा भवेत् ॥
राहौ च सहज स्थाने माता तस्य न जीवति ॥ ३४

अर्थ.—लग्नीं गुरु, द्वितीय स्थानीं शनि व तृतीय स्थानीं राहु असा योग असतां त्याची माता जगणार नाहीं.

टीका.—द्वितीय स्थान हें कुटुंब स्थान आहे. ह्मणून या स्थानांतील शनि कुटुंबांत नाश करणारा असून त्याची चतुर्थ स्थानावर पूर्ण दृष्टि असल्यामुळें तो मातेचा नाश करणारा होतो. तृतीय भावावर भावंडांचा विचार होतो. या भावांतील राहू भावंडांचें सुख देत नाहीं. असा सामान्य नियम आहे. अर्थात् मातृनिधनाला या ग्रहानें बळकटी येते. लग्नीं गुरूची कां कल्पना केली आहे तें मात्र कळत नाहीं. मातृनिधनाचा हा योग सामान्य नसून विशेष आहे.

अष्टमे च यदा राहु र्भौमे राहुश्च सूर्यगः ॥
सप्तमे दिवसे मृत्युः सप्तमास्यां न जीवति ॥३५॥

अर्थ—अष्टम स्थानीं राहु व मंगळ असून ते सिंह राशींत असतील तर तें मूल सातव्या दिवशीं मृत्यु पावेल.

टीका—'सूर्यग' ह्मणजे सूर्य ज्या राशींत असेल त्या राशींत असाही अर्थ होईल. येथें 'भौमे' हें सप्तम्यंत पद आहे. त्यावरून त्याचा अर्थ मंगळाच्या ठिकाणीं असा होतो. यावरून या श्लोकांत दोन योग असावे असें वाटतें. १ला—अष्टमांत राहु. २ अष्टमांत राहु हा मंगळ व रवि यांनीं युक्त. या प्रमाणें या श्लोकाचे निरनिराळे अर्थ

होतात. तात्विक दृष्टीनें विचार केल्यास अष्टम स्थानीं सिंह राशींत राहु व मंगळ असतील किंवा राहु, मंगळ व रवि हे तेथेंच कोणत्याही राशींत असतील तर मूल जगणार नाहीं असें वाटतें.

सप्तमे च यदा राहुः केंद्रे क्रूराश्च संस्थिताः॥
सद्यो मृत्युकरो योग श्चंद्रे वा क्रूरमाश्रिते॥ ३६॥

अर्थ—सप्तमांत राहू असून केंद्रीं पाप ग्रह असतील किंवा सप्तमांत राहु असून चंद्र पाप ग्रहाच्या राशीस असेल तर तें मूल ताबडतोब मृत्यु पावेल

टीका—येथें 'क्रूरमाश्रिते' याचा अर्थ पाप ग्रहानें युक्त असाही होऊं शकेल.

दशमे च यदा राहुः शशी षष्ठाष्टमो यदि ॥
सद्यो मृत्युकरो योगः षष्ठ मासा न जीवति ॥३६

अर्थ.—दशमांत असून चंद्र सहाव्या किंवा आठव्या स्थानीं असतां तत्काल मृत्यु होतो. तें मूल सहा महिनेपर्यंत जगत नाहीं.

टीका.—जातक ग्रंथांत अशा तऱ्हेचे एकेरी योग बरेच आहेत. केवळ दशमांत राहु असून चंद्र ६ किंवा ८ या भावांत असतां तें मूल अल्पायु व्हावें हें ह्मणणें विश्वसनीय नाहीं. असल्या एकेरी योगानें अनभिज्ञ वाचक एखाद्या प्रसंगीं घाबरून जातो. यासाठीं ज्योतिःशास्त्राचा वर वर अभ्यास नाशास कारण होण्याचा संभव आहे.

लग्ने चैव यदा राहु र्बुधः षष्ठाष्टमो यदा॥
षड्वर्षतो भवेन्मृत्युः शंकरो यदि राक्षिता ॥ ३८

अर्थ.—लग्नीं राहु असून बुध सहाव्या किंवा आठव्या स्थानांत असेल तर सहा वर्षांत तें मूल मृत्यु पावतें. शंकर जरी रक्षणकर्त्ता असला तरी तें जगत नाहीं !

टीका.—हाही योग एकेरी आहे, ह्मणून विश्वसनीय नाहीं.

व्यये लग्ने तथा राहुः शशी षष्ठाष्टमो यदा॥
सूतिकाले भवेन्मृत्युः शंकरो यदि रक्षिता ॥३९

अर्थ.—लग्नीं किंवा व्यय स्थानीं राहू असून चंद्र सहाव्या अगर आठव्या स्थानीं असतां प्रत्यक्ष शंकर जरी रक्षणकर्त्ता असला तरी प्रसवकालींच तें बालक मृत्यु पावतें.

टीका.—हाही योग एकेरीच आहे, ह्मणून खरा नाहीं,

चतुर्थे शनिराहूच द्वादशे शशिसंयुते॥
सद्यो मृत्यु र्भवेद्बालस्यांतकस्य न संशयः॥४०

अर्थ.—चतुर्थ स्थानीं शनि व राहू हे दोन पाप ग्रह असून व्यय स्थानीं चंद्र असेल तर तें बालक तात्काल मृत्यु पावतें.

टीका.—हा योग मात्र चांगला नाहीं. चतुर्थ हें सुख स्थान असल्यामुळें त्यांत दोन पाप ग्रह असल्यास तें मूल कष्टानें दिवस कंठील. हा योग त्याच्या मातेलाही चांगला नाहीं. बहुधा त्याच्या पेक्षां त्याचे मातेलाच हा योग वाईट आहे. अशा मुलास मातेचें दूधही बहुधा मिळणार नाहीं व तेणेंकरून त्यास आजारीपणांत दिवस काढावे लागतील. शिवाय अशा मुलास पोटांतला डबा वगैरे विकार ही होण्यासारखा असतो.

व्यये लग्ने यदा चंद्र अष्टमौ गुरुभार्गवौ ॥
तुर्ये वर्षे भवेन्मृत्युः शंकरो यदि रक्षिता ॥ ४१

अर्थ.—चंद्र हा व्यय किंवा लग्न या स्थानांत असून अष्टम स्थानीं गुरु व शुक्र असतील तर चवथ्या वर्षी तें मूल निश्चयानें जगणार नाहीं.

टीका.—हा योग अगदीं विश्वसनीय नाहीं. व्यय स्थानीं चंद्र असल्यानें व अष्टमांत गुरु शुक्र असल्यानें कांहीं सुद्धां बिघडत नाहीं. असें तात्विक दृष्टीनें सिद्ध आहे. लग्नीं चंद्र असल्यानें तर हा योग चांगलाच झाला पाहिजे.

चंद्रो मंगलसंयुक्तो अष्टमे भवने यदा ॥
सवत्सरं न जीवेत्तु शंकरो यदि रक्षिता ॥ ४२

अर्थ—चंद्र हा मंगलानें युक्त असा अष्टमांत असतां शंकर जरी संरक्षणकर्ता असला तरी एक वर्षापेक्षां जास्त दिवस जगत नाहीं.

टीका.—हा एकेरी योग आहे. चंद्र हा मंगळानें युक्त अष्टमांत असल्यानें इतका अल्पायु होण्याचें कांहीं कारण नाहीं. आतां त्यांच्या युतिकालींच जन्म झाला असला तर सांगवणार नाहीं. तरी सुद्धां मृत्यूच झाला पाहिजे असें ज्योतिषी निदान करणार नाहीं फार तर तें मूल अशक्त रोगी होईल व त्यावर मंगळाचा परिणाम मात्र वारंवार घडेल, यापेक्षां जास्त कांहीं एक होण्याचा संभव नाहीं.

लग्ने चैव यदा जीव अष्टमौ गुरुभार्गवौ ॥
द्वादशे च यदा चंद्रो बालमृत्यु र्भवेत्तदा ॥ ४३ ॥

अर्थ.—लग्नीं गुरु किंवा अष्टमांत गुरुशुक्र असून चंद्र द्वादश स्थानीं असतां तें मूल जगत नाहीं.

टीका.—लग्नांत गुरू सारखा शुभ ग्रह असतां तें मूल अल्पायु होईल अशी कल्पना सुद्धां करणें चुकीचें होईल. अर्थात् हा योग विश्वसनीय नाहीं.

पातालांबरपंचमं द्विनवमं लग्नेपिसौम्यग्रहाः
क्रूराः षष्ठगताः शशांकसहिताः सर्वत्र एकादशे ॥
यात्राजन्मविवाहकालसमये राज्याभिषेके नृणां
जामेत्रे ग्रहवर्जितं निगदितं लग्नाच्च ते शोभनाः ॥४४

अर्थ.—चतुर्थ, दशम, पंचम, द्वितीय, नवम व लग्न या स्थानीं शुभ ग्रह, पाप ग्रह षष्ठ स्थानीं, चंद्रासह सर्व ग्रह एकादश स्थानीं व सप्तमांत ग्रह नाहीं अशा प्रकारची ग्रहस्थिति असतां यात्रा, जन्म, विवाह, राज्याभिषेक यांत सुख प्राप्त होतें.

टीका.—या श्लोकांत सामान्य ग्रहस्थिति सांगितली आहे.

लाभस्थाने यदा चंद्रो पंचमे गुरुभार्गवौ ॥
बहुशास्त्रसमभ्यासी सर्वज्ञानी भवेन्नरः ॥ ४५

अर्थ.—एकादश स्थानीं चंद्र असून पंचमांत गुरु व शुक्र असतां मनुष्य अनेक शास्त्रांचा अभ्यासी होऊन ज्ञानी होतो.

टीका.—पंचम हें विद्यास्थान असून गुरु व शुक्र हे ज्ञानवान् ग्रह आहेत. ह्मणून ते या स्थानांत असल्यानें मनुष्य ज्ञानी, बुद्धिमान व विद्वान् असा होतो.

काम्ये कलत्रे रिपुलग्नछिद्रे केंद्रत्रिकोणे व्ययगेच राहुः ॥
मंत्री च शूरो बलवान् प्रतापी गजाश्वनाथो बहुपुत्र-
युक्तः ॥४६

अर्थ.—७।६।१।८।१२ व केंद्रीं आणि त्रिकोणांत इतक्या ठिकाणीं राहु असतां मनुष्य प्रधान, शूर, बलवान, पराक्रमी, हत्ती घोडे बाळगणारा व अनेक पुत्रांनीं युक्त असा होतो.

टीका.—बारा स्थानांपैकीं द्वितीय व तृतीय हीं दोनच स्थानें वाईट असें ग्रंथकाराच्या मतानें दिसतें. यांत 'काम्ये' या पदाचा अर्थ लागत नाहीं. आमच्या मतें २।४।७।८ हीं स्थानें राहूला चांगलीं

नाहींत. सर्वांत ३।६।१० हींच स्थानें राहूला उत्तम आहेत. श्लोकांत जें राहूचें वर्णन दिलें आहे तें तात्विक आहे असें समजावें. इतर ग्रहयोग चांगला असेल तरच श्लोकांतील फळ मिळेल, एकट्या राहू-वर मिळणें अशक्य आहे.

एकः पुत्रो रविर्दद्यात् चंद्रे तत्र सुताद्वयं ॥
भौमे तत्र त्रयः पुत्रा बुधे पुत्रिचतुष्टयं ॥४७
पंचपुत्रा गुरोर्वापि षट्कन्या भार्गवेशनौ ॥
बलवद्भिर्ग्रहै र्वाच्या संख्यायुक्तेक्षणादिभिः ॥४८
गुरौ सुता पंचभृगुः षट्केकन्याश्चापि भार्गवे ॥
सप्तकन्या शनौ वाच्या ग्रहदृष्टिं विचारयेत् ॥४९

अर्थ.—या श्लोकांत कोणकोणते ग्रह किती अपत्यें देण्यास समर्थ असतात तें सांगितलें आहे. रवि–१ पुत्र. चंद्र–२ मुली. मंगळ–३ पुत्र. बुध–४ मुली. गुरु–पांच पुत्र. शुक्र व शनि–६ कन्या. गुरु–५ पुत्र. शुक्र–६ कन्या. शनि–७ कन्या.

टीका.— हा श्लोक पंचम स्थानाला अनुलक्षून आहे; ते ते ग्रह जेव्हां पंचमांत असतील किंवा पंचमावर पाहतील तेव्हां तितकीं तितकीं अपत्यें देण्यास समर्थ असतात असें समजावें. ४९ व्या श्लोकांत गुरु व शुक्र यांचीं अपत्यें मागील श्लोकांतल्या प्रमाणेंच आहेत. फक्त शनीचीं ७ कन्या हें विशेष आहे. यांत शनीचीं फलें आक्षेपार्ह आहे कारण तो पुरुष ग्रह आहे. अपत्यांचा विचार पंचम स्थानांतील राशि व त्यांतील ग्रह, पंचमेश, एकादशस्थ ग्रह व गुरु, लग्न व चंद्र इतक्यांच्या साह्यानें व्हावयाचा असल्यामुळें तो नेमका कधींच होऊं शकत नाहीं. अपत्यांचें व त्यांच्या सुखाचें नेहमीं सामान्य अनुमान होत असतें त्यामुळें वरील श्लोकाचा तादृश्य उप-योग होणार नाहीं.

मूर्तौ चतुर्थे शशिनाथसंस्थे मूर्तौच सूर्ये दशमेच भौमे ॥
कूलीर मेषे नच नक्रलग्ने रोगी प्रविष्टो यममंदिरेच ॥५०

अर्थ.—लग्नीं किंवा चतुर्थ स्थानांत, चंद्र लग्नीं रवि व दशमांत मंगळ हे जर कर्क, मेष व मकर राशीचे अनुक्रमें नसतील तर रोगी जगणार नाहीं असें समजावें.

टीका.—हा श्लोक प्रश्नकालास अनुसरून आहे. जर अशा कालीं एखाद्यानें 'रोगी बरा होईल कीं नाहीं' असा प्रश्न केला तर "होणार नाहीं" असें उत्तर द्यावें. चंद्र कर्क राशीचा स्वगृहीं, रवि मेष राशीचा उच्च व मंगळही मकर राशीचा उच्च असेल तर रोगी "बरा होईल" असें उत्तर द्यावें.

स्मरे व्यये धने करूरे लग्ने मृत्यौ रिपौ शशी ॥
एतेषां रोगिणां मृत्युः सद्यः स्यादपकारकः ॥५१

अर्थ.—७।१२।२ या स्थानीं पाप ग्रह असून १।६।८ या ठिकाणीं चंद्र असेल तर रोगी मृत्यु पावेल व अशा कालीं मनुष्यास अपकार होईल.

टीका.—प्रश्नकालीं कुंडली मांडून तींत लग्नीं चंद्र व सप्तमांत पाप ग्रह किंवा षष्ठस्थानीं चंद्र व १२ व्यांत पाप ग्रह किंवा अष्ट-मांत चंद्र व द्वितीय स्थानीं पाप ग्रह असा योग असेल तर रोगी जगणार नाहीं असें समजावें, कोणाच्याही जन्मकुंडलींत असा योग जेव्हां येईल तेव्हां त्याला शारीरकष्ट होतील असें जाणावें.

षष्ठाष्टमे चतुर्थे च द्वादशे यदि चंद्रमः ॥
अष्टमोंगारको चैव स याति यममंदिरं ॥ ५२

अर्थ.—प्रश्नकालीं ६।८।४।१२ या स्थानीं चंद्र असून मंगळ त्याच्या अष्टमांत असेल तर रोगी जगणार नाहीं.

टीका.—एखाद्याच्या कुंडलींत ज्या कालीं असे ग्रह येतील त्या कालीं त्यास शारीरिक्लेश होतील असें समजावें.

एकोपि केंद्रे बुधजीवशुक्रो क्रूराः समस्ता निधने कदाचित्॥
तथापि सर्वे विबला भवंति यथा गजेंद्रो हरिदर्शनेन ॥५३

अर्थ.—बुध, गुरु किंवा शुक्र यांपैकीं एखादा ग्रह जर केंद्रीं असेल आणि सर्व पाप ग्रह जरी अष्टमांत असतील तरी ज्या प्रमाणें सिंहाला पाहून हत्ती हतवीर्य होतो त्या प्रमाणें ते पाप ग्रह निर्बल होतात.

टीका.—अष्टमांत पाप ग्रह असतां ते मनुष्यास मारक होतात. पण जर बुध, गुरु किंवा शुक्र यांपैकीं एखादा ग्रह केंद्रीं असेल तर त्यांचा मारकत्व दोष दूर होतो असें जाणावें.

शुक्रो यस्य बुधो यस्य यस्य केंद्रे बृहस्पतिः ॥
दशमोंगारको यस्य सभवेत्कुलदीपकः ॥५४

अर्थ.—ज्याच्या कुंडलींत केंद्रीं शुक्र, बुध अथवा गुरु असून दशमांत मंगळ असेल तो मनुष्य कुलदीपक होतो.

लग्ने बुधो धने शुक्रो द्वितीये च बृहस्पतिः ॥
षष्ठाष्टमे भवेद्राहु र्दीर्घायुर्जायते नरः ॥५५

अर्थ.—लग्नीं बुध, धनस्थानीं शुक्र व गुरु आणि ६ किंवा ८ या स्थानीं राहु असतां तो मनुष्य दीर्घायु होतो.

टीका.—हा योग कन्यालग्नीं बलवान् होतो. अष्टमस्थ राहूपेक्षां षष्ठस्थ राहू आयुष्याला चांगला आहे.

शुक्रो नास्ति बुधो नास्ति नास्ति केंद्रे बृहस्पतिः ॥
दशमोंगारको नास्ति स जातः किंकरिष्यति ॥५६

अर्थ.—ज्याच्या कुंडलींत शुक्र, बुध किंवा गुरु केंद्रीं नाहीं व दशमांत मंगळ नाहीं तो मनुष्य काय दिग्विजय लावणार?

टीका.—इतकें या योगाचें महत्त्व आहे असें जाणावें. इतर योगावर मनुष्य कुलदीपक होणार नाहीं असें मात्र समजूं नये.

मेषे रवौ यदा जन्म वृषे चंद्रो यदा भवेत् ॥
मिथुने च यदा राहुः छत्रधारी भवेन्नरः ॥५७

अर्थ.—मेष राशींत रवि, वृषभ राशींत चंद्र व मिथुन राशींत राहू असतां जन्म झाल्यास मनुष्य छत्रधारी (राजा, लोकमान्य अगर मोठा अधिकारी) होतो.

टीका.—हा योग कोणत्या लग्नावर होतो तें सांगितलेलें नाहीं. आमच्या मतें सिंह लग्नावरच होऊं शकतो. मेष लग्नीं मध्यम योग होईल. छत्रधारी याचा अर्थ राजा, लोकमान्य अगर बडा अधिकारी असा केला पाहिजे. राजयोग हे देशकालवर्तमानाप्रमाणें कमजास्त योग्यतेचे व्हावयाचे.

लग्ने चैव यदा जीव अष्टमे च रविर्बुधः ॥
ब्रह्मपुत्रो यदा जातः स गच्छेन्म्लेंछमंदिरं ॥५८

अर्थ.—लग्नीं गुरु व अष्टमांत रविबुध असतां जो ब्रह्मपुत्र जन्म पावेल तो म्लेंच्छ होईल.

टीका.—हा योग जातकतत्त्वानुरूप नाहीं. लग्नीं गुरु असता मनुष्य अधर्मी कांचित्च होईल. नवम व दशम हीं स्थानें पाप ग्रहांनीं भरलेलीं असतील व लग्नीं शुभ ग्रह नसेल तर मात्र धर्मांतर होण्याचा विशेष संभव आहे.

द्वादशे शनिराहू च पंचमे रवि भूमिजौ ॥
गर्भं न धरते कन्या यदा काले कदाचन ॥५९

अर्थ.—द्वादश स्थानीं शनि व राहू असून पंचमांत रवि व मंगळ हे ग्रह असतां ती कन्या कधींही गर्भधारणा करूं शकत नाहीं.

टीका.—पंचम हें गर्भस्थान आहे. या स्थानांत रवि व मंगळ हे पाप ग्रह संततिसुखाला चांगले नाहींत हा जातक शास्त्राचा सामान्य नियम आहे. व्ययस्थानीं असलेल्या पापग्रहांचा गर्भावर परिणाम होणें शक्य नाहीं. मात्र तो योग भर्तृसुखाला योग्य नाहीं. ह्मणूनच ग्रंथकारानें व्यय स्थानीं व पंचमांत वरील पाप ग्रहांचे योग असतां कन्या गर्भधारणा करीत नाहीं असें सांगितलें आहे. निरनिराळ्या राशींत या योगाचे निरनिराळे परिणाम घडले पाहिजेत. कित्येक राशींत मुलें मुळींच होणार नाहींत, कित्येकांत गर्भपात होतील कित्येकांत मुलें उपजतांच मरतील किंवा काढून काढावीं लागतील, कित्येकांत मुलें रोगट व अल्पायु होतील असे निरनिराळे परिणाम होतील. निश्चयानें अमुकच परिणाम होईल हें समजण्यास अनुभव घेतलेले पाहिजेत. ग्रह हे राशि, स्थानें, युति व दृष्टि इतक्यांच्या अनुरोधानें फलें देत असतात. केवळ स्थानांच्याच अनुरोधानें फलें देते तर वरील श्लोकांत सांगितलेला नियम सर्वत्र अनुभवास आला असता. जातकशास्त्र फलें पाहण्याच्या निरनिराळ्या पद्धति, विशेष प्रकारचे योग व वरील चार कारणें यांमुळें घोटाळ्याचें झालेलें आहे. या सर्व कारणांचें ज्ञान ज्याला झालें आहे तोच विद्वान् ज्योतिषी होय.

द्वादशे शनिराहू च धने सोरेर्भृगुस्तथा ॥
चक्षुहीनस्ततो बालो लंपटो लुलपस्तथा ॥६०

अर्थ.—द्वादश स्थानीं शनि व राहू असून धनस्थानीं शनि व शुक्र असतां मूल आंधळें व लुलें होतें.

टीका.—द्वितीय (धन) व द्वादश [व्यय] हीं नेत्रस्थानें आहेत. ह्मणून या स्थानांत पाप ग्रह असतां नेत्रसंबंधी रोग होतात. श्लोकांत शनि हा दोन वेळां आला आहे. यावरून दोहोंपैकीं एका ठिकाणीं दुसरा कोणतातरी पाप ग्रह मूळांत असला पाहिजे. आमच्या मतें तो रवि असून द्वादशस्थानीं असावा किंवा वरील प्रत्येक योग पृथक् तरी असला पाहिजे अनुभवानें याचा निर्णय होऊं शकेल.

सप्तमे च यदा राहु र्दशमे रविनंदनः ॥
एकादशे रवौ ज्ञेयं स्वप्ने कन्या न पश्यति ॥६१

अर्थ.—सप्तमांत राहू, दशमांत शनि व एकादश स्थानीं रवि असतां त्या कन्येला भर्तृसुख व संततिसुख स्वप्नांतही दृष्टीस पडणार नाहीं.

टीका.—या श्लोकांत 'कन्या' हें पद मोठ्या घोटाळ्यांत टाकणारें आहे. तें प्रथमांत घेतल्यास वरील अर्थ केल्याशिवाय गत्यंतर नाहीं कारण त्यांत कर्मपद अध्याहृत आहे. 'कन्यां' असें द्वितीयांत पद मानिल्यास—अशा मनुष्यास स्वप्नांतही कन्या दृष्टीस पडणार नाहीं—असा अर्थ होऊं शकेल. याचाही अनुभवानेंच निर्णय होणारा आहे.

षष्ठाष्टमगे चंद्रे राहुर्लग्ने चतुर्थके ॥
दशमे निधने सूर्ये तदा जन्म न लिख्यते ॥६२

अर्थ.—चंद्र सहाव्या किंवा आठव्या स्थानीं असून राहु लग्नीं किंवा चतुर्थ स्थानीं असेल व रवि हा दशमांत अगर अष्टमांत असेल तर त्या मुलाचा जन्म टिपून ठेवण्यांत अर्थ नाहीं.

टीका.—हा एकेरी योग आहे. केवळ या तीन ग्रहांवर आयुष्य अवलंबून राहील असें नाहीं. इतर गुरुशुक्रादि ग्रहांचा विचार केलाच

पाहिजे. असें जरी आहे तरी हा योग कांहीं सुखदायक नाहीं. मनुष्य अल्पायु झाला नाहीं तरी त्याला सुखप्राप्ति होणार नाहीं हें मात्र खरें आहे. ह्मणूनच ग्रंथकारानें त्याचा जन्म टिपून ठेवण्यांत अर्थ नाहीं असें सांगितलें आहे.

लग्ने चैव यदा जीवो लाभस्थाने यदा भृगुः ॥
सप्तमे भवने चंद्रो बहुभार्यो भवेन्नरः ॥६३

अर्थ.—लग्नीं गुरु असून एकादश स्थानीं शुक्र असेल व सप्तम स्थानीं चंद्र असेल तर अनेक भार्यायोग होतो.

टीका - श्लोकांत भार्या शब्द आहे. ह्मणून अशा मनुष्यास विवाहित स्त्रिया अनेक होतात, असें समजावें यांत एक स्त्री मयत झाल्यानें दुसरी होते कीं एक असतांच आणखी दुसऱ्या होतात हें स्पष्ट नाहीं. तरी बहुभार्याः या पदावरून एक असतांच अनेक स्त्रिया होतात असा अर्थ केला पाहिजे. पाटाच्या किंवा पुनर्विवाहाच्या स्त्रियांचाही या योगांत समावेश होतो, पण राखेलेल्या स्त्रियांचा होणार नाहीं.

सिंहे भौमस्तुले सौम्यः कन्यायां च यदा गुरुः
अस्तंन्योगे च यो जातो बालभावे च निर्धनं ॥६४

अर्थ.—सिंह राशीचा मंगळ, तूळ राशींत बुध व कन्येंत चंद्र अशा योगावर जो जन्म पावतो तो लहानपणीं दारिद्र्य भोगतो.

टीका.—हा योग कोणत्या लग्नावर होतो हें यांत सांगितलें नसल्यामुळें निरर्थक आहे. शिवाय त्यांत शास्त्रीय तत्वही नाहीं.

मेषेऽर्को मिथुने राहुः वृषेब्जः कर्कटे गुरुः ॥
छत्रधारी भवेद्बालो महीपालो भविष्यति ॥६५

अर्थ.—मेष राशींत रवि, मिथुनेंत राहु, वृषभ राशींत चंद्र, व कर्क राशींत गुरु अशा योगावर जन्मलेलें मूल राज्यपद भोगील.

टीका.—हे चारही ग्रह उच्च आहेत. पण त्यांस कुंडलींत योग्य स्थानें मिळालीं तरच राज्यपद मिळेल. एरवीं मिळणार नाहीं.

मकरे च यदा जीवः कर्के च धरणीसुतः ॥
अकर्मा च तदा जातो दासकर्म करिष्यति ॥६६

अर्थ.—मकर राशींत गुरु व कर्क राशींत मंगळ असतां मनुष्य नीच कृत्यें करणारा व सेवावृत्तीचा होतो.

टीका.—मकर राशींत गुरु नीच असतो व मंगळ उच्च असतो. आणि कर्क राशींत मंगळ नीच असतो व गुरु उच्च असतो. वरील योगांत गुरु व मंगळ हे नीच असून समोरासमोर आहेत ह्मणून मनुष्य सेवावृत्तीचा होतो असें ग्रंथकाराचें ह्मणणें आहे. हेच ग्रह आपापल्या उच्चांत असतील तर राजयोग होतो. गुरु व मंगळ हे एकत्र किंवा समोरासमोर असणें हें भाग्याचें लक्षण आहे. पण ते स्थानबली व राशिबली नसतील तर तोच योग सेवावृत्तीला कारण होतो. एकत्र किंवा समोरासमोर असतां त्यांच्या अंशादिकांत ज्या मानानें साम्य असेल त्या मानानें फल मिळेल. केवळ राशीपरत्वें एकत्र किंवा समोरासमोर असल्यानें फलप्राप्ति होणार नाहीं असें समजावें.

लग्नधर्मसुतायबंधुषु देवपूज्य भृगुसोमसंभवाः ॥
लक्षदोषमुपयाति विनाशं अंधकारमिव भास्करोदये ॥६७

अर्थ.—१।९।५।११।४ या स्थानीं गुरु, शुक्र व बुध असतील

तर पाप ग्रहांनीं उत्पन्न केलेले लक्षावधि दोष ज्या प्रमाणें सूर्योदय होतांच अंधकाराचा नाश होतो त्याप्रमाणें नाश पावतात.

दशमे यदि सूर्यनंदनः क्षितिपुत्रेण युतश्च राहुणा ॥
मरणं च तदा भवेत् पितु र्नियतं तस्य शिशोरसंशयं ॥६८

अर्थ.—दशमांत शनि हा मंगळानें व राहूनें युक्त होईल तर त्या मुलाचा बाप [फारच थोडक्या कालांत] मरण पावणार ह्मणून समजावें.

टीका.—दशम स्थानावर पितृसुखाचा विचार होतो ह्मणून या स्थानांत पाप ग्रह असल्यास पितृसुख चांगलें मिळत नाहीं असा सामान्य नियम आहे. त्या नियमास अनुसरून वरील योग दिलेला आहे.

चंद्रश्च सप्तमस्थाने भौमो राहुस्तथा रविः ॥
सप्तमे दिवसे मृत्युः सप्त मासा न जीवति ॥६९

अर्थ.—सप्तम स्थानीं चंद्र, मंगळ, राहु व रवि हे एकत्र असतां माता सातव्या दिवशीं मृत्यु पावते. किंवा फार तर सात महिनेपर्यंत जगते.

टीका.—सप्तम स्थानाचा मातृसुखाशीं संबंध नाहीं. ह्मणून वरील योग जातकतत्वानुरूप नाहीं. तथापि चंद्रावरही तें सुख अवलंबून असल्यामुळें तो पाप ग्रहांनीं युक्त झाल्यास सुख चांगलें मिळत नाहीं.

यदि द्वादशगे चंद्रे धनस्थानेषु भानुमान् ॥
तदा नेत्रे भवेत्पुष्पं बालकस्य न संशयः ॥७०

अर्थ.—बाराव्या भावांत चंद्र व दुसऱ्या भावांत रवि असा योग असतां त्या मुलाच्या नेत्रांत फूल पडतें.

टीका.—वरील दोनही स्थानें नेत्रसुखाचीं आहेत. त्यास अनुसरून वरील योग आहे. हा विशेष प्रकारचा योग होय.

यदा बुधः सूयसुतश्च सप्तमे
तदा स बालो भवतीह कुष्टी ॥
तत्रैव राहु र्गुरुणासमेतं
नपुंसकत्वं विदधाति निश्चितं ॥७१

अर्थ.—जेव्हां बुध व शनि हे सप्तम स्थानीं एकत्र असतील तेव्हां कुष्टी होतो. व राहु हा गुरूसह असेल तेव्हां नपुंसक होतो.

टीका.—हे योग विशेष प्रकारचे जाणावे.

मूर्तौ भूमिसुतश्चैव यस्य बालस्य दृश्यते ॥
स यौवने भवेत्कुष्टी बालकः स्फोटकान्वितः ॥७२

अर्थ.—ज्या मुलाच्या तनुस्थानीं मंगळ असेल तो मुलगा तारुण्यांत कुष्ट रोगी होतो व अंगावर अतिशय खरूज होते.

टीका.—मंगळ तनुस्थानीं असतां रक्तदोष उत्पन्न करितो. या नियमास अनुसरून वरील योग दिलेला आहे. परंतु कुष्ठरोग केवळ मंगळावरच अवलंबून नाहीं, ह्मणून तें फल भरंशाचें नाहीं. दुसरें फल मात्र लहानपणीं सुद्धां अनुभवास येतें.

क्रूरग्रहा कुजदिवाकरसूर्यसूनु-
क्षीणेंदवः शशिसुतः सहितस्तु तैःस्यात् ॥
पूर्णेंदुजीवभृगुजाः शुभसंज्ञिताः स्युः
तैः संयुतस्तु हिमरश्मिसुतोतिसौम्यः ॥७३

अर्थ.—मंगळ, रवि, शनि व क्षीण चंद्र व यांपैकीं एखाद्या ग्रहानें युक्त असा बुध हे पाप ग्रह आहेत. व पूर्ण चंद्र, गुरु, शुक्र व यांपैकीं एखाद्या ग्रहानें युक्त बुध हे शुभ ग्रह आहेत.

टीप.—राहु व केतु हेही पाप ग्रहच आहेत. वराहमिहिराच्या कालीं व तत्पूर्वी या ग्रहांचा जातकांत उपयोग करीत नसत. बृहज्जातक हा वराहाचा प्रसिद्ध जातक ग्रंथ आहे, त्यांत या ग्रहांचा मागमूसही नाहीं! शिवाय वरच्या सारख्या संज्ञारूप श्लोकांतही त्यांचा उल्लेख नाहीं. हे ग्रह नाहींत ह्मणूनच त्यांची गणना पूर्वीच्या आचार्यांनीं जातकांत केली नसावी. वराहानंतर हे ग्रह जातकांत घुसले आहेत व त्यांसह सर्वीस नवग्रह ही संज्ञा प्राप्त झाली आहे. हर्शल व नेपच्यून हे दोन ग्रह अलीकडे नवीन उपलब्ध झाले असून पाश्चात्य ज्योतिषी त्यांचा जातकांत उपयोग करूं लागले आहेत. हे पाप ग्रहच आहेत

पत्नीस्थाने यदा राहुः पापयुग्मेन वीक्षितः ॥
पत्नी योगस्तदा न स्यात् भूतापि म्रियते चिरात् ॥७४

अर्थ.—सप्तम स्थानीं राहू असून त्यावर दोन पाप ग्रह पाहत असतील तर विवाहच होणार नाहीं व यदा कदाचित् झालाच तर पत्नी फार काल जगणार नाहीं.

शुक्रस्य वर्गेण युते कलत्रे बव्हंगनाप्ति र्भृगुधीक्षणेन ॥
शुक्रेक्षिते सौम्यगणेंगनानां बाहुल्यमेवाशुभवीक्षणाच्च ॥७५

अर्थ—सप्तम स्थानीं शुक्राचा नवमांश उदित असून त्यावर शुक्राची दृष्टि असेल किंवा सप्तमावर अनेक पाप ग्रह पाहत असतील तर अनेक विवाह होतात

टीका.—या प्रमाणें या श्लोकाचा अर्थ होतो. हा योग अनुभवानें बराखोटा ठरवावा.

महीसुते सप्तमभावयाते कांताविमुक्तःपुरुषस्तदा स्यात् ॥
मंदेन दृष्टे म्रियतेपिलब्ध्वा शुभग्रहालोकनवर्जिते स्मिन् ॥७६

अर्थ.—मंगळ सप्तम स्थानीं असेल तर स्त्रीचा वियोग होतो. त्या मंगळावर जर शनीची दृष्टि असेल तर स्त्री प्राप्त झाली तरी जगणार नाहीं.

टीका.—सप्तम स्थानच्या मंगळाचा मुख्य धर्म स्त्रीवियोग हाच आहे. श्रीरामचंद्राच्या सप्तमांत उच्च मंगळ होता! अशा पुरुषाची स्त्री नांदत नाहीं, तिच्याशीं तंटे होतात किंवा कोणत्याही कारणानें तिची सहा सहा महिन्यांतही गांठ पडत नाहीं. स्त्रीनिमित्त मोठालीं भांडणें व लढाया लागतात. या मंगळावर शनीची दृष्टि असेल तर स्त्री जगतच नाहीं. शनिमंगळ एकमेकांच्या दृष्टींत असणें चांगलें नाहीं. ते ज्या स्थानीं असे असतील त्या भावसंबंधी व्यक्ति नाश पावतील.

मूर्तेश्चापि निशापतेश्च नवमं भाग्यालयं कीर्त्तितं
तत्तत्स्वामियुतेक्षितं प्रकुरुते भाग्यं स्वदेशोद्भवं ॥
चेदन्ये विषयांतरेत्रशुभदाःस्वोच्चादिगाः सर्वदा
कुर्युर्भाग्यमसाधवोऽतिविपदं दुःखोपलाब्धं परां ॥७७

अर्थ.—लग्नापासून व चंद्रापासून जें नववें स्थान त्यास भाग्य असें ह्मणतात. त्याचा स्वामी ज्या ज्या भावाच्या स्वामीशीं युत होईल किंवा दृष्ट होईल त्या त्या भावसंबंधी फलानें भाग्योदय होतो. ते ग्रह उच्च असतां विशेष फलदायक होतात. व नीच, अस्तंगत, शत्रुयुक्त वगैरे असतां अतिशय दुःखदायक होतात.

* श्लोक अशुद्ध असल्यामुळें त्याच्या दुसऱ्या दोन चरणांचा अर्थ संदर्भानें दिला आहे.

सुरासुरेज्यौ भवतश्चतुर्थे त्यर्थं समर्थः पृथिवीपतिःस्यात् ॥
कर्कस्थितो देवगुरुः सचंद्रःकाश्मीरदेशाधिपतिं करोति ॥७८

अर्थ.—गुरु व शुक्र हे चतुर्थ स्थानीं एकत्र असतां राजयोग

जाणावा. तो गुरु कर्क राशींत चंद्रानें युक्त असतां काश्मीर देशाचा अधिपति होतो.

टीका.—ग्रह हे एकमेकांशीं पूर्णपणें युति करितील तरच ते उक्त फलें देणारे होतात. केवळ एका राशीवर असल्यानें महत्व मिळावयाचें नाहीं. काश्मीर हा हिंदुस्थानांतील अगदीं उत्तरेकडचा देश असून कर्क राशि हाही उत्तरेकडचाच आहे. त्यावरून वरील कल्पना केलेली असावी.

आदित्यान्नवमे ताता माता चंद्राच्चतुर्थतः ॥
भौमात्तृतीयतो भ्राता बुधे तूर्ये तु मातुलः ॥७९

अर्थ.—रवी पासून नवव्या स्थानावर बाप, चंद्रापासून चवथ्या स्थानावर माता, मंगळापासून तिसऱ्या स्थानावर भाऊ व बुधापासून चवथ्या स्थानावर मामा यांचा विचार होतो.

टीका.—फलें पाहण्याचे दुहेरी प्रकार आहेत. कुंडलींतल्या दहाव्या स्थानावर व रवीच्या नवमावर पितृसुखाचा विचार होतो. कुंडलींतल्या चतुर्थ भावावर व चंद्राच्या चतुर्थावर मातृसुखाचा विचार होतो. कुंडलींतल्या तिसऱ्या भावावर व मंगळाच्या तिसऱ्या भावावर भ्रातृसुखाचा विचार होतो. व कुंडलींतल्या सहाव्या भावावर व बुधाच्या चतुर्थ भावावर मातुलसुखाचा विचार होतो. या प्रमाणें फलाचा दुहेरी विचार करण्याची पद्धति आहे. बाप, आई, भाऊ व मामा यांचा विचार कसा करावा याचें विवेचन कुंडलीविज्ञानांत मागें केलेलें आहे.

गुरोः पंचमतःपुत्रा शुक्राज्जायांगतः स्त्रियः ॥
शनेरष्टमतोमृत्यु रेवं भवांश्च चिंतयेत् ॥८०

अर्थ.—गुरूपासून पंचमावर पुत्र, शुक्रापासून सप्तमावर स्त्रिया व शनीपासून अष्टमावर मृत्यु याप्रमाणें भावांचा विचार होतो.

टीका—कुंडलींतलें पांचवें व गुरूपासून पांचवें स्थान यांवर संततीचा विचार करावा. कुंडलींतल्या सप्तमावर व शुक्राच्या सप्तमावर स्त्रियांचा विचार करावा. कुंडलींतल्या अष्टमावर व शनीच्या अष्टमावर मृत्यूचा विचार करावा.

अजवृषभमृगांगना कुलीरा-
झषवणिजौच दिवाकरादितुंगाः ॥
दशशिखि मनुयुक् तिथींद्रियांशैः
त्रिनवकविंशतेभिश्चतेस्तनीचाः ॥८१

अर्थ—रवीचें मेष चंद्राचें वृषभ, मंगळाचें मकर, बुधाचें कन्या, गुरूचें कर्क, शुक्राचें मीन व शनीचें तूळ उच्च जाणावें. त्यांचें अनुक्रमें १०,३,२८,१५,५,२७,२० अंश परम उच्चाचे आहेत. उच्च राशी पासून जो सातवा राशि तो नीच होय. परम नीचांश उच्चांशा इतकेच आहेत.

त्रिभिरुच्चैर्भवे द्राजा त्रिभिःस्वस्थैः स्वमंत्रिणः ॥
त्रिभिर्नीचैर्भवेत् दास स्त्रिभिरस्तं गतै र्जडः ॥८२

अर्थ—तीन ग्रह उच्च असतां राजा, तीन ग्रह स्वगृहीं असतां प्रधान, तीन ग्रह नीच असतां दास व तीन ग्रह अस्तंगत असतां मूर्ख होतो.

टीका.—वरील योग लग्न बलानुसार फलदायक होतील. लग्न बलवान् नाहीं व ते उच्च किंवा स्वगृहींचे ग्रह केंद्रीं अगर त्रिकोणांत नाहींत तर राजयोग होत नाहीं असें समजावें.

करूरक्षेत्रे यदा जन्म अस्तं याते च लग्नपः ॥
अकर्मा च सदा जातो नरः क्षणं न जीवति ॥८३

अर्थ.—पाप ग्रहाच्या राशींचें लग्न असून लग्नस्वामी अस्तंगत असेल तर तो मनुष्य दुराचरणी व अल्पायु होतो.

टीका.—इतर ग्रह बलवान् असतील तर वरील योग अनुभवास येणार नाहीं असें समजावें.

पापाष्टमे मुहूर्तेपि बुधभौमौ यदा भवेत् ॥
तस्करो घोरकर्माणि करपादौ विनश्यति ॥८४

अर्थ.—अष्टम स्थानीं पाप ग्रह असून बुध व मंगळ लग्नीं एकत्र असतील तर तो चोर व भयंकर कृत्यें करणारा होईल व त्याचे हातपाय नाश पावतील.

टीका.—हा विशेष प्रकारचा योग असल्यामुळें अनुभव घेतल्यावांचून विश्वासास पात्र नाहीं.

सुखभोगी धनी भोगी जायते मंडलाधिपः ॥
नृपतिश्चक्रवर्तीच सूर्यादिग्रहउच्चकैः ॥८५

अर्थ.—सूर्यादि ग्रह उच्च असतां मनुष्य सुख भोगणारा, धनवान् जहागीरदार, राजा व चक्रवर्ती (सार्वभौम राजा) होतो.

टीका.—तीन किंवा अधिक ग्रह उच्च असून ते योग्य स्थानीं पडतील तर राज्यपद मिळेल. एरवीं साधारण ऐश्वर्य भोगील.

आर्द्रादौदशस्त्रीणां विशाखा स्त्री नपुंसका ॥
शेषाश्चतुर्दशपुरुषा एवमृषिभिः प्रयुज्यते ॥८६

अर्थ.—आर्द्रा पासून स्वातीपर्यंतचीं १० नक्षत्रें स्त्रीसंज्ञक आहेत. विशाखा, अनुराधा ज्येष्ठा हीं तीन नपुंसक नक्षत्रें आहेत. व बाकीचीं १४ पुरुष संज्ञक आहेत. या प्रमाणें ऋषींनीं नक्षत्रांची योजना केलेली आहे.

टीका.—सायन आर्द्रानक्षत्रांत सूर्य गेला म्हणजे पावसाळ्यास आरंभ होतो. व तो सायन स्वातींपर्यंत असतो. पंचांगांत जें आर्द्रा प्रवेशफल दिलेलें असतें तेंही सायन नक्षत्राला धरून आहे. हीं १० नक्षत्रें पाऊस प्रसवतात म्हणून तीं स्त्रीसंज्ञक आहेत अशी ऋषींनीं कल्पना केली. मूळांपासून पुढील १४ नक्षत्रांत गर्भधारणा होते, वृष्टि बंद असते यावरून तीं पुरुष जातीचीं आहेत असें त्यांनीं ठरविलें. विशाखा, अनुराधा ज्येष्ठा या नक्षत्रांत गर्भही राहत नाहीं व वृष्टिही होत नाहीं म्हणून त्यांची गणना नपुंसकांत केली गेली हेंही उघडच आहे. जगाच्या अंतापर्यंत सायन आर्द्रीवरच पर्जन्यारंभ व सायन मूळावर गर्भधारणा व्हावयाची. निरयन गणनेंत अलीकडे रोहिणी—मृग यांमध्येंच पर्जन्यारंभ होत आहे. कालेंकरून तो कृत्तिका—भरणी इत्यादि नक्षत्रांत पडूं लागेल. ऋषींनीं याच कारणा साठीं निरयन नक्षत्रांस अनुसरून स्त्रीपुरुषादि विभाग केलेले नाहींत. यावरून सायन पद्धतीच ऋषींना मान्य असून त्यांनाच अनुसरून त्यांनीं फलें दिलेलीं आहेत हें उघड आहे. ही गोष्ट समजण्यास अगदीं सोपी असतांही आमचे लोक निरयनाच्या भ्रमाच्या मार्गाचे गोडवे गात आहेत ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे बरें? या एकाच गोष्टीवरून नक्षत्रें सायन असून त्यांचाच फलज्योतिषांत स्वीकार केलेला आहे असें सिद्ध होत नाहीं काय? पण पाहतो कोण आणि विचार तरी करितो कोण? नक्षत्रांचीं मूळचीं नावें तारकापुंजांचीं असतील व तींच सायन विभागात्मक नक्षत्रांस दिलीं असतील हें कांहीं अंशीं खरें आहे. मनुष्याला आरंभीं तारकांचेंच ज्ञान होणें शक्य आहे. नंतर सूक्ष्म निरीक्षणानें विभागात्मक नक्षत्रांचीं उपयुक्तता ध्यानांत आली असेल. पण तेव्हांवरून जातकांतली नक्षत्रें तारकात्मकच असलीं पाहिजेत असें

कसें सिद्ध होईल? निरयनपक्षानें मुद्दां आपल्या विभागांस तारकापुंजांचींच नांवें दिलीं आहेत! आर्द्रा हें नांव तारकात्मक नक्षत्राचेंच असेल काय? याचाही निरयनपक्षानें जरूर विचार करावा.

यस्मिन्ऋक्षे वसेच्चंद्रस्ततो धिष्ण्यं चतुर्दशं
तद्योगे प्रतिपद्यत्र चंद्रस्य ग्रहणं भवेत् ॥८७

संक्रांतिभुक्तघस्राश्च यावंत्येव भवंतिहि ॥
तत्प्रमाणांगुलेनात्र ग्रहणं चंद्रसूर्ययोः ॥८८

* या दोन श्लोकांचा जातकाशीं संबंध नाहीं, ह्मणून अर्थ दिला नाहीं.

कन्या राहुगृहं प्रोक्तं राहूच्चं मिथुनं स्मृतं ॥
राहुनीचं धनुर्वर्णादिकं सिनिविदिश्य च ॥८९

अर्थ.—राहूचें कन्या हें स्वगृह असून मिथुन हें उच्च आहे. व धनु हें त्याचें नीच आहे.

टीका.—बृहत्पाराशरींत राहूचें कन्या व केतूचें मीन हें स्वगृह सांगितलें आहे. त्याच प्रमाणें त्यांचें अनुक्रमें वृषभ व वृश्चिक हें उच्च सांगितलेलें असून मूलत्रिकोण राशि राहूचे कर्क व मिथुन आणि केतूचे कर्क व धनु हे सांगितलेले आहेत.

रवींदुभौमगुरवो ज्ञशुक्रशनिराहवः ॥
स्वस्मिन्मित्राणि चत्वारि परस्मिन् शत्रवः स्मृताः॥९०

अर्थ.—रवि, चंद्र, मंगळ व गुरु आणि बुध, शुक्र, शनि व राहु हे एकमेकांचे मित्र आहेत व इतर शत्रु आहेत.

यस्मिन्ऋक्षे वसेत्सूर्य स्तस्मिन् ऋक्षे तमावसि ॥
स्तयैव प्रतिपद्योगे सूर्यस्य ग्रहणं भवेत् ॥९१

* याचा जातकाशीं संबंध नाहीं ह्मणून अर्थ दिला नाहीं.

राहुरव्योः परं वैरं गुरुभार्गवयोरपि ॥
हिमांशुबुधयोर्वैरं विवस्वान्मंदयोरपि ॥९२

अर्थ.—राहु व रवि, गुरु व शुक्र, चंद्र व बुध आणि शनि व रवि यांचें परस्पर वैर आहे.

ज्ञशनांसुहृदौभौज्ञं कुजेंदुरवयः सदा ॥
पूज्यवर्गौ गुरुसितौ सैंहिकेयस्य कथ्यते ॥९३

अर्थ.—बुध व शनि, मंगळ, चंद्र व रवि यांचें मित्रत्व आहे. व गुरु आणि शुक्र हे राहूचे मित्र आहेत.

यो बुधर्क्षगृहो वाच्यं राहुस्तगृहमुच्यते ॥
यदा बुधस्य गृहं राहु स्तदुच्चं बुध्यते बुधः ॥९४

अर्थ.—या श्लोकाचा अर्थ असा दिसतो कीं, बुधाचा जो उच्च राशी (कन्या) तो राहूचें गृह होय. व बुधाचें गृह जो राशि [मिथुन] तें राहूचें उच्च होय.

अजवृषकर्किणीलग्ने रक्षति राहुःसमस्त पीडाभ्यः ॥
पृथ्वीपतिः प्रसन्नो शतापराधं यथा पुरुषं ॥९५

अर्थ.—राहू हा मेष, वृषभ व कर्क राशीचा लग्नीं असतां ज्या प्रमाणें राजा प्रसन्न झाला असतां मनुष्याचे शेंकडों अपराध क्षमा करितो त्या प्रमाणें तो सर्व पीडा दूर करितो.

सुतमदननवांत्य रंध्रेलग्ने-
ष्वशुभयुतो मरणाय शीतरश्मिः ॥
भृगुसुत शशिपुत्रदेवपूज्यै-
र्यदिबलिभिर्न युतो वलोकितो वा ॥९६

अर्थ.—चंद्र हा ५।७।९।१२।८।१ या स्थानीं पाप ग्रहानें युक्त असेल तर तो मरणप्रद जाणावा. पण तो शुक्र, बुध किंवा गुरु हे बलवान् असून पाहत असतील तर सुखदायकच होतो.

त्र्यंशं त्रिकोणं चतुरस्र अस्तं पश्यंति खेटाश्चरणाभिवृद्ध्या ॥
मंदो गुरुर्भूमिसुतःपरेच क्रमेण संपूर्णदृशो भवंति ॥९७

अर्थ.—ग्रह आपल्या स्थानापासून ३ ऱ्या व १० व्या स्थानावर चरणदृष्टीनें पाहतात. ५ व्या व ९ व्या स्थानांवर अर्धदृष्टीनें पाहतात. ४ थ्या व ८ व्या स्थानांवर त्रिपाददृष्टीनें पाहतात व ७ व्या स्थानावर पूर्ण दृष्टीनें पाहतात. शनि हा ३।१०।७, गुरु ५।९।७ व मंगळ १।८।७ या स्थानांवर पूर्ण दृष्टीनें पाहतो.

तत्रादौ चंद्रारिष्टं

षष्ठाष्टमे च चंद्रे सद्यो मरणाय पापसंदृष्टः ॥
अष्टाभी शुभदृष्टो वर्षैर्मिश्रैस्तदर्धैर्न ॥९८

अर्थ.—चंद्र ६ व्या अथवा ८ व्या स्थानीं असून त्यावर पाप ग्रहाची दृष्टि असतां मृत्युप्रद जाणावा. त्यावर शुभ ग्रहाची दृष्टि असतां ८ वर्षांनीं व शुभ आणि पाप अशा मिश्र ग्रहांची दृष्टि असतां ४ वर्षांनीं मृत्यु होतो.

टीका.—हा एकेरी योग आहे. केवळ चंद्रावर मृत्यु अवलंबून असणें अशक्य आहे तथापि एकंदरींत इतकें खरें कीं असा चंद्र मनुष्यास यश व शारीरसुख देत नाहीं. अष्टम स्थानापेक्षां षष्ठ स्थान फार वाईट आहे.

षष्ठं द्वितीयभवनं द्वादशमेकादशं न पश्यंति ॥
स्वस्थानाद्विक्षंते ग्रहास्थानान्यानि भवनानि ॥९९

अर्थ—या श्लोकाचा अर्थ नीट जुळत नाहीं. ६।२।१२।११ या स्थानावर ग्रह आपल्या स्थानापासून पाहत नसून अन्य स्थानांवर पाहत असतील तर मृत्युप्रद जाणावे.

अथारिष्टभंगः

कृष्णपक्षे दिवा जातः शुक्लपक्षे यदा निशि ॥
न करोति तदारिष्टं यदि षष्ठाष्टमः शशी ॥१००

अर्थ—सहाव्या व आठव्या स्थानीं असलेला चंद्र कृष्णपक्षांत दिवसास व शुक्लपक्षांत रात्रीं जन्म असतां मृत्युप्रद होत नाहीं.

टीका—शुक्लपक्षांत चंद्र वृद्धिंगत होत असतो ह्मणून तो रात्रीं विशेष बलवान् असतो. कृष्ण पक्षांत तो ऱ्हास पावत असल्यामुळें रात्रीं त्याचें महत्व नसतें ह्मणून तो रात्रीचा बलवान् नसतो. दिवसास सूर्यासह असल्यामुळें त्याचें महत्व अधिक आहे.

भौमे विलग्ने शुभदेवदृष्टःषष्ठाष्टमे वार्कसुतःस्थितश्चेत् ॥
सद्यःशिशुं हंति वदेन्मुनींद्रःस्मरेकुजार्कित्वशुभे क्षितश्च ॥१०२

अर्थ—लग्नीं मंगळ पाप ग्रहाच्या दृष्टींत असेल, शनि हा ६ व्या किंवा ८ व्या स्थानीं असेल किंवा सप्तम स्थानीं मंगळ व शनि हे पाप ग्रहांच्या दृष्टींत असतील तर मृत्युप्रद स्थिति जाणावी.

टीका—षष्ठ किंवा अष्टम स्थानाचा शनि मुद्दां पाप ग्रहानें दृष्ट असला पाहिजे. पाप ग्रह पाप ग्रहांच्या दृष्टींत असतां विशेष नाश करीतात.

कंटक धामनि सौम्यःषष्ठाष्टम राशिगो विलग्नर्क्षात् ॥
चंद्रेणादृष्टमूर्तिर्वर्षचतुष्केण मारयति ॥१०३

अर्थ—बुध ६ किंवा ८ या स्थानांत असून चंद्राची त्याच्यावर दृष्टि नसेल तर तो चार वर्षांनीं मारक होतो.

टीका—अनुभव घेऊन नंतर खरेखोटेपणा ठरवावा. शिवाय श्लोकाचा अर्थही आणखी एका प्रकारानें होऊं शकेल.

गुरुर्भौमगृहेऽष्टमस्थः सूर्येंदुभौमार्कजदृष्टमूर्तिः ॥
वर्षैस्त्रिभिर्भार्गवदृष्टिहीनो लोकांतरं प्रापयति प्रसूतं॥ १०४

अर्थ—गुरु हा मंगळाच्या गृहीं [मेष अगर वृश्चिक राशीस] अष्टम स्थानीं असेल व त्यावर रवि-चंद्र-मंगळ शनि यांची दृष्टि असून शुक्राची दृष्टि नसेल तर तीन वर्षांनीं मनुष्याचा मृत्यु होतो.

टीका—अनुभवानें परीक्षा करावी. कारण असल्या योगांत जातकाचें तत्व नसतें.

रविशनिभवने शुक्रो द्वादशरिपुरंध्रगैः शुभैः सर्वैः
दुष्टः करोति मरणं षड्भिर्वर्षैः किमत्रित्रं ॥१०५

अर्थ—शुक्र हा रवीच्या (सिंह) किंवा शनीच्या [मकर-कुंभ] राशीस असून १२।६।८ या स्थानांत सर्व शुभ ग्रह असतील तर ६ वर्षांनीं मरण प्राप्त होतें.

टीका—अनुभवानें परीक्षा करावी.

मारयति षोडशहा शनैश्चरो यातु वीक्षितो लग्ने ॥
अशुभयुतो मासेन वर्षी शुद्धस्तु मारयति ॥१०६

अर्थ—शनि हा लग्नावर पाहत असेल तर १६ दिवसांनीं मृत्यु देतो. तो पापयुक्त असल्यास महिन्यानें व शुभयुक्त असल्यास वर्षानें मारक होतो.

टीका—हा योग अगदीं असत्य आहे. यांत जातकाचें तत्व तर नाहींच पण तत्वभंग आहे.

लग्नाद्यूनगतो राहुः शशांतीक्ष्णांशु वीक्षितः ॥
चंद्रदृष्टः शुभैर्हंति द्वाविंशत्यब्दकैः शुभं ॥१०७

अर्थ—याचा अर्थ असा दिसतो कीं, सप्तम स्थानीं राहू हा चंद्र व रवि यांच्या दृष्टींत असेल तर २२ वर्षें आयुष्य प्राप्त होतें.

टीका—दुसरा चरण अशुद्ध असल्यामुळें अर्थ चांगला जुळत नाहीं.

क्षीणं यदि शशांकं पश्येद्राहुः समागतैः क्रूरैः ॥
मारयति नरं दिवसै रव्याद्यैःकतिपयै रेव ॥१०८

अर्थ जुळत नाहीं.

राहूर्यस्मिन्नृक्षेभ्युदितस्तस्मिन्प्रसूयते योहि ॥
म्रियते वश्यं स नरो यमकृतरक्षोपि मासेन ॥१०९

अर्थ—ज्या राशींत राहु असेल त्या राशीवर जन्म झाला तर तो मनुष्य यमानें रक्षण केलें तरी एक महिन्यानें मृत्यु पावेल.

टीका—लग्नीं राहु असतां असा अनुभव येत नाहीं. आतां राहुच्या उदयकालींच एखाद्याचा जन्म होईल तर वरील अनुभव घेण्याचा संभव आहे.

एकोपि यदि केंद्रस्थो भार्गवो वांगिरापतिः ॥
नवमे वा सुतस्थाने सर्वारिष्टं निवारयेत् ॥११०

अर्थ—शुक्र अथवा गुरु यांपैकीं एखादा जरी केंद्रीं किंवा नव-पंचम स्थानीं असेल तर अपमृत्यु दूर होतात.

टीका—मागें जे एकेरी श्लोक दिले आहेत त्यांचे दोष गुरु व शुक्र वरील स्थानीं असतां दूर होतात. ह्मणून गुरुशुक्र बलवान् असतां त्या योगाचें कांहीं महत्व राहत नाहीं.

सूर्याद्वितीयमृक्षंवेशी द्वादशमुदाहृतं वोसि ॥
उभयात्मक उभयफलैस्तेषु फलं ग्रहवशाद्वदेत् ॥१११

अर्थ—सूर्याच्या द्वितीय स्थानीं ग्रह असल्यास वेशी नामक योग होतो. व द्वादश स्थानीं असतां वोशि नामक योग होतो. उभय स्थानीं असतां उभयचरी योग होतो. या योगांचीं फलें राशिपरत्वें जाणावीं.

टीका—वेशी (वेसि) या योगाचें फल बृहत्पाराशरींत "तिर्यग्दृष्टिः सत्वसत्यानुकंपी मर्त्योत्यर्थं दीर्घकायोऽलसश्च ॥ सूतौ यस्यस्यादवेसियोगस्त्वल्पद्रव्योवाग्विलासाधिशाली ॥" असें दिलें आहे. वोशि (सि) योगाचें फल "किंचिद्वचनेषु नैवनियमो वश्यं नरश्चानृतो त्यंत कष्टकरो नरश्चमृदुदृक्स्याद्वोसियोगोद्भवः ॥" असें आहे उभयचरीचें फल "यस्यस्याज्जनने किलोभयचरी योगस्य चेत्संभवः सोत्यंतं समवायवानपितदा मर्त्यो भवेत्सद्यशः ॥ ना त्युच्चः प्रबलामलाब्धितनयायुक्तः समृद्धः सदा अत्यर्थं स्थिरमानसः सरलदृक् सर्वं सहः सन्मतिः ॥ असें दिलेलें आहे.

समाप्त.

ताजिक.

ताजिक हा शब्द यवनी आहे. याचें दुसरें रूप **ताजक** असें आहे. संस्कृत ग्रंथकारांनीं **तार्तीयक** असें त्याचें रूप बनविलें आहे. ही पद्धति मूळची यवनांची असून शके १२०० नंतर मुसलमानी राज्य या देशांत झाल्यावर तिचा आमच्यांत प्रवेश झाला. हिंदुस्थानांतील सर्व जुन्या पद्धतीचे जोशी याच पद्धतीनें वर्षफलें करितात. जन्मकाळीं जितका स्पष्ट रवि असेल तितका रवि ज्या दिवशीं ज्यावेळीं होईल त्या वेळची कुंडली तयार करून तीवरून वर्षांत घडणाऱ्या सुखदुःखाचा विचार करितात. या पद्धतीनें वर्षफलें बरोबर जमतात. असा सर्वांचा समज असल्यामुळें या पद्धतीचें स्वरूप कसें आहे, तें वाचकांस सांगतों.

भारतीय ज्योतिःशास्त्राच्या इतिहासांत या विषयावर पुढील ग्रंथ सांगितले आहेत.

१ **हायररत्न** [बलिभद्रकृत इ० स० १६५६]
२ **ताजिकभूषणपद्धति** [गणेशकृत शके १४८०]
३ **दैवज्ञालंकृति** [तेजसिंहकृत इ० स० १३००]
४ **ताजिकतंत्रसार** [समरसिंहकृत श. १३५६]
५ **ताजिक पद्धति** [केशवकृत]
६ **ताजकसार** [हरीभट्टकृत शके १४४५]
७ **ताजकालंकार** [सूर्यकृत शके १४२९-३०]
८ **ताजिक नीलकंठी** [शके १५०९]
९ **ताजिक कौस्तुभ** [बालकृष्णकृत शके १५७१]
१० **ताजक सुधानिधि** [नारायणकृत शके १६६०]

यांपैकीं **ताजिक नीलकंठी** हा ग्रंथ छापलेला असून सर्वत्र प्रचारांत आहे, ह्मणून त्यांतील माहितीचा एथें गोषवारा द्यावयाचा आहे.

वर्षप्रवेशकाल.

जन्म.—शके १७९९ मार्गशीर्ष शु. १२ सोमवार सूर्योदयानंतर ४६ घ०

७ प. नीं जन्म आहे, अशी कल्पना करा. या वेळचा स्पष्ट रवि रा ८।३।५१ आहे.

जन्मलग्नकुंडली.



सूर्यसिद्धांतोक्त सौर वर्षाचें मान ३६५ दि. १५ घ. ३१ प. आहे. आपणास शके १८२९ मध्यें वर्षफल करावयाचें आहे. ह्मणून १८२९ त ३० वर्षें पूर्ण झालीं असून ३१ व्या वर्षाचें वर्षफल करावयाचें आहे. ह्मणून ३६५ दि० १५ घ० ३१ प० यांस ३० नीं गुणून गुणाकार १०९५७ दि० ४५ घ० ३० प० आला.

यांत जन्मवार सोमवार व जन्मघ० ४६ प० ७ आहे. ह्मणून २ दि० ४६ घ० ७ प० मिळवा. ह्मणजे १०९६० दि० ३१ घ० ३७ प० बेरीज येईल. वार ७ आहेत, ह्मणून दिवसांच्या संख्येस ७ नीं भागून बाकी ५ राहिली. रविवार १ धरून मोजल्यानें वर्षप्रवेशाचा वार ५ ह्मणजे गुरुवार आला. व वर्षप्रवेशाची वेळ ३१ घ० ३७ पळें आली. या रीतीनें आपणास वार आणि वर्षप्रवेशाची वेळ समजेल.

आतां, महिना व तिथि यांचा विचार करावयाचा. शके १८२९ सालचें पंचांग काढा. जन्म धनु संक्रांतीच्या ३ अशावर झाला आहे, ह्मणून या पंचांगांत तो दिवस कोणता असेल, हें सहज ठरवितां येईल. मार्गशीर्ष शु० ११ रविवार या दिवशीं या पंचांगांत "**मूले धनुष्यर्कः ४४ ३५**" असें लिहिलें आहे. याचा अर्थ रवीनें या दिवशीं सूर्योदयानंतर ४४ घ० २५ प० नीं मूळ नक्षत्रांत व धनु राशींत प्रवेश केला. जन्मकालचे रवीचे अंश ३ आहेत, ह्मणून या संक्रांतीच्या पुढें ३।४ दिवसांनीं वर्षप्रवेश व्हावयाचा. आपण वर वर्षप्रवेशाचा वार गुरुवार हा सिद्ध केलाच आहे. पंचांगांत हा वार धनु

संक्रांतीनंतर ३ दिवसांनींच आहे. यावरून या मनुष्यास ३१ वें वर्ष शके १८२९ मार्गशीर्ष शु० १५ गुरुवार या दिवशीं सूर्योदयानंतर ३१ घ० ३७ प० नीं सुरू झालें. या वेळची कुंडली मांडिली ह्मणजे तीच वर्षप्रवेशाची कुंडली झाली. या कुंडलीवरूनच जोशी लोक वर्षफल तयार करितात.

या दिवशीं पंचांगांत सूर्योदयाचे ग्रह असे आहेत.

र.	चं.	मं	बु.	गु.	शु.	श.	रा.	के.
८	१	१०	७	३	८	१०	२	८
३	२५	२३	१७	२२	२७	२६	२२	२२
१९	५३	१०	२४	२७	२३	१९	३९	३९
४	३८	५५	३	५२	११	८	२०	२०

ग्रहांच्या गति.

६१	७४५	४२	९५	२	७६	३	३	३
१४	३७	३८	८	४४ब	३२	१५	११	११

या गतीवरून त्रैराशिकानें ३१ घ. ३७ प. च्या गति आणून त्या त्या ग्रहांत मिळवाव्या. गुरु, राहू व केतु हे वक्री आहेत, ह्मणून यांच्या गति वजा कराव्या, मिळवूं नयेत. ह्मणजे वर्षप्रवेशकालाचे सर्व स्पष्ट ग्रह येतील. ते असे.—

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	के.
८	२	१०	७	३	८	१०	२	८
३	२	२३	१८	२२	२८	२६	२२	२२
५१	२६	३२	१४	२६	३	२१	३७	३७

यांत विकला सोडून दिल्या आहेत. या वेळचें स्पष्ट लग्न २ रा० २७ अं० ४३ क० इतकें आलें. तेव्हां वर्षप्रवेशाची लग्नकुंडली अशी झाली—

वर्षलग्नकुंडली.



सूचना.—जन्मकालचा रवि ज्या पद्धतीनें केलेला असेल, त्याच पद्धतीनें वर्षप्रवेशकालचा रवि केला पाहिजे.

वरील सर्व गणित निरयन पद्धतीचें केलें आहे. रोजचें स्पष्ट ग्रहाचें पुस्तक उघडा, आणि इतका रवि कोणत्या तारखेस सुमारानें आहे, तो पहा. डिसेंबर ता० १९ गुरुवार या दिवशीं १२ वाजतां रवि ८।२६।१४।१९ इतका आहे. ह्मणून हाच दिवस वर्षप्रवेशाचा आहे. आतां वेळ काढावयाची.

जन्मकालाचा रवि ८।२६।३
ता.१९।१२।०७चा रवि ८।२६।१४

अंतर...११ कला आहे.

ह्मणून ११ क० चालण्यास रवीला किती वेळ लागतो, हें प्रथम काढावयाचें—

ता. २० चा रवि २७।१५।२४
ता. १९ चा रवि २६।१४।१९

अंतर १।१।५

ही २४ तासांतली रवीची गति झाली. ह्मणून—

६१ क० : ११ क० :: २४ ता० किती?

तेव्हां ४ ता० १९ मि० आलीं. हा काल १२ तून वजा दिला पाहिजे. कारण, जन्मकालचा रवि कमी आहे, ह्मणून बारा वाजण्यापूर्वी वर्षप्रवेश झाला असला पाहिजे. ह्मणून तो १२-४।१९=७ ता. ४१ मि. इतकें वाजतां आल्या. या कालची स्पष्ट ग्रहांची जी कुंडली

आतां, सायन पद्धतीनें कुंडली कशी करावी, तें सांगतों.

जर जन्मकालचा रवि पंचांगावरून केलेला असेल, तर त्यांत अयनांश मिळवून जो रवि येईल, तितका रवि कोणत्या दिवशीं कोणत्या वेळेला होईल तें कृत्य मागील रीतीनेंच करावें आणि जर तो रवि इंग्रजी पंचांगावरून केलेला असेल तर इंग्रजी वर्षाचें मान घेऊन तयार केला पाहिजे. अलीकडील सूक्ष्म यंत्रांच्या साह्यानें सायन सौर वर्षाचें मान ३६५दि. १४घ. ३२प. आहे असें ठरलें आहे ह्मणून वर्षप्रवेशाचा काल हें वर्ष धरूनच केला पाहिजे.

जन्मकालाचा साम्रन अथवा निरयन रवि जर केतकी पद्धतीनें केला असेल तर वर्षप्रवेशाचा काल ३६५दि. १५घ. २३प. हें वर्षमान धरून काढिला पाहिजे. सूर्यसिद्धांताच्या मानापेक्षां हें मान ८ पळांनीं कमी आहे. वरील मान केतकरांनीं जें घेतलें आहे. तें अलीकडील सूक्ष्म यंत्रांच्या साह्यानें ठरलेलें घेतलें आहे. ह्यामुळें यांची पद्धति जुन्या पद्धतीच्या जोशांस मान्य होत नाहीं. असो. एकंदर तात्पर्य इतकेंच कीं जन्मकालचा रवि करितांना ज्या पद्धतीचा स्वीकार केला असेल तिचाच वर्षप्रवेशाचा रवि करितांना स्वीकार केला पाहिजे. जन्मकालच्या रवीला चरदेशांतरादि व जितके संस्कार दिलेले असतील तितके तसेच वर्षप्रवेशाच्या रवीलाही दिले पाहिजे

उदाहरणार्थ घेतलेल्या कुंडलींत इंग्रजी पंचांगावरून केलेला रवि ८ रा० २६ अं० ३ क.आहे. आतां, सन १९०७ चें रोजचें स्पष्ट ग्रहाचें पुस्तक उघडा, आणि इतका रवि कोणत्या तारखेस सुमारानें आहे, तो पहा. डिसेंबर ता० १९ गुरुवार या दिवशीं १२ वाजतां रवि ८।२६।१४।१९ इतका आहे. ह्मणून हाच दिवस वर्षप्रवेशाचा आहे. आतां वेळ काढावयाची.

जन्मकालाचा रवि ८।२६।३
ता.१९।१२।०७चा रवि ८।२६।१४

अंतर...११ कला आहे.

ह्मणून ११ क० चालण्यास रवीला किती वेळ लागतो, हें प्रथम काढावयाचें—

ता. २० चा रवि २७।१५।२४
ता. १९ चा रवि २६।१४।१९

अंतर १।१।५

ही २४ तासांतली रवीची गति झाली. ह्मणून—

६१ क० : ११ क० :: २४ ता० किती?

तेव्हां ४ ता० १९ मि० आलीं. हा काल १२ तून वजा दिला पाहिजे. कारण, जन्मकालचा रवि कमी आहे, ह्मणून बारा वाजण्यापूर्वी वर्षप्रवेश झाला असला पाहिजे. ह्मणून तो १२-४।१९=७ ता. ४१ मि. इतकें वाजतां आला. या कालची स्पष्ट ग्रहांची जी कुंडली तीच वर्षप्रवेशाची कुंडली येईल ती अशी.—

सायन वर्षलग्नकुंडली.



या ठिकाणीं वाचक मोठ्या बुचकळ्यांत पडतील. निरयन पद्धतीनें वर्षलग्न मिथुन येतें तर सायन पद्धतीनें मकर येतें! उभयतांत जमीनअस्मानाचें अंतर! असें कां व्हावें? फार झालें तर सायन पद्धतीनें कर्क लग्न यावें, मकर कसें आलें? याचें उत्तर असें आहे कीं, निरयन रवि हा पंचांगवारून केलेला एक तर तो स्थूल आहे. दुसरें कारण ग्रहलाघवाचे अयनांश फार स्थूल आहेत. ग्रहलाघवाचे अयनांश मिळवून जन्मकालचा सायन रवि ८।२६।२६ इतका येतो. व इंग्रजी पंचांगावरून तो ८।२६।३ येतो. ह्मणजे उभयतांत जन्मकालींच २३ कलांचा फरक आहे. त्यामुळें वर्षलग्नांत सुमारें तितक्या घटिकांचा फरक पडला! हा दोष गणिताचा आहे. इंग्रजी पंचांगांतील रवि वेधतुल्य असतो, तसा आप या पंचांगांतील नाहीं. रवि जर वेधतुल्य नाहीं, वर्षमान शुद्ध नाहीं आणि अयनांशांत एकवाक्यता नाहीं तर वर्षप्रवेश चुकीचा झाला, ह्मणून वर्षफलही चुकीचेंच होणार. मग ताजिकच्या पद्धतीनें

वर्षफलें बरोबर उतरतात, हा निवळ भ्रम नव्हे काय? जे ज्योतिषी असल्या चुकीच्या गणितानें वर्षफलें बरोबर सांगतात, ते आपल्या कामांत मोठे पटाईत असले पाहिजेत! मुसळ जाईल इतकें भोंक पडलेल्या नावेंतून ज्याला महासागर तरून जातां येतो, त्याला आपण मनुष्य न ह्मणतां ईश्वरच घ्यटलें पाहिजे! याहून अधिक चर्चा करण्याची आमची इच्छा नाहीं. वाचकांस यांतील इंगित कळावें, इतकाच वरील लिहिण्याचा हेतु आहे.

निरयन पद्धतीनें काय किंवा सायन पद्धतीनें काय भविष्यें अगदीं बरोबर उतरवून देतां येतील अशी आमची मनोदेवता आह्मांस सांगत नाहीं. निरयन पद्धतीनें सर्व गोष्टी चुकण्याचा काल अद्यापि पुढें आहे. तोंपर्यंत कांहीं जुळणार व कांहीं जुळणार नाहीं. पण, जुळलें ह्मणून पद्धति बरोबर. व न जुळलें ह्मणून ती चुकीची हें अज्ञान आहे. फलें सांगण्याची दोघांची पद्धति एकच आहे. पण ज्या पायावर इमारत रचावयाची, तो पायाच जर चुकींचा आहे, असें धडधडीत दिसत आहे तर 'निरयनानें जुळतें' हें ह्मणणें कोणता ज्ञाता कबूल करील? जर चुकीच्या गणितानें फल बरोबर सांगतां येत असेल, तर फलें सांगण्यास कुंडली कशीही असली तरी चालते, असें सिद्ध होऊं पाहतें! याला कोणी समर्पक उत्तर देईल काय?

असो. कोणत्याही पद्धतीनें वर्षप्रवेशाची कुंडली तयार झाल्यावर मग ज्योतिषी लोक द्वादशभाव व त्यांचे संधि तयार करून भावचलित कुंडली मांडितात. ही कुंडली वाचकांस मांडितां येते असें समजून चालण्यास हरकत नाहीं.

पंचवर्गी बल

ग्रह स्वगृहीं असतां त्याचें बल ३०
उच्च असतां बल २०
स्वद्रेष्काणीं बल १०
स्वहद्दांशीं बल १५
स्वनवमांशीं बल ५

जेव्हां ग्रह मित्रगृहीं असेल, तेव्हां त्याचें बल पाऊणपट होतें. समगृहीं असतां अर्धें व शत्रुगृहीं असतां चतुर्थांश होतें. याप्रमाणें बलें काढून त्याचा चतुर्थांश करावा, ह्मणजे ग्रहांचें विंशोपकात्मक बल येईल. त्यावरून

कोणता ग्रह किती बलवान् आहे हें कळेल.

आतां, आपण वर्षप्रवेशाचे जे स्पष्ट ग्रह केले आहेत त्यांचीं बलें काढूं. प्रथमतः रवीचें बल काढूं.

रवि रा० ८।३।५१ आहे. हा ग्रह धनु राशींत आहे. धनुराशीचा स्वामी गुरु. हा रवीचा सम आहे ह्मणून त्याचें बल ३० च्या अर्धे ह्म० १५ इतकें झालें.

रवि रा० ८।३।५१ आहे. याचें नींच रा० ६।१० आहे. तें वजा केलें तेव्हां रा० १।२३।५१ इतका रवि उच्चाकडे गेला आहे. नीचापासून उच्चापर्यंत एकंदर ६ राशि ह्मणजे १८० अं० अंतर असतें. इतक्या अंतराचें बल २० आहे, ह्मणजे ९ अंशास १ या प्रमाणानें आहे. ह्मणून रा० १।२३।५१ यांस ९ नीं भागून ५।५९ हें बल आलें. हें रवीचें उच्चबल होय.

द्रेष्काणचक्र.

मे	वृ	मि	क	सिं	क	तू	वृ	ध	म	कुं	मी
मं	बु	गु	शु	श	र	चं	मं	बु	गु	शु	श
र	चं	मं	बु	गु	शु	श	र	चं	मं	बु	गु
शु	श	र	चं	मं	बु	गु	श	श	र	चं	मं

हें द्रेष्काणचक्र निराळ्या पद्धतीचें आहे, असें समजावें.

हद्दाचक्र

मे	वृ	मि	क	सिं	क	तू	वृ	ध	म	कुं	मी
गु६	शु८	बु६	मं७	गु६	बु७	श६	मं७	गु१२	बु७	बु७	शु१२
शु६	बु६	शु६	शु६	शु५	शु१०	बु८	शु४	शु५	गु७	शु६	गु४
बु८	गु८	गु६	बु६	श७	गु४	गु७	बु८	बु४	शु८	गु७	बु३
मं५	श५	मं७	गु७	बु६	मं७	शु७	गु५	म५	श४	मं५	मं९
श५	मं३	श६	श४	मं६	श२	मं२	श६	श४	मं४	श५	श२

नवमांश चक्र

	१	२	३	४	५	६	७	८	९
मेष–सिंह धनु	मं १	शु२	बु३	चं४	र५	बु६	शु७	मं८	गु९
वृषभ–कन्या मकर	श१०	श११	गु१२	मं१	शु२	बु३	चं४	र५	बु६
मिथुन–तूळ कुंभ	शु७	मं८	गु९	श१०	श११	गु१२	मं१	शु२	बु३
कर्क–वृश्चिक मीन	चं४	र५	बु६	शु७	मं८	गु९	श१०	श११	गु१२
अंश भाग.	३-२०	६-४०	१०	१३-२०	१६-४०	२०	२३-२०	२६-४०	३०

उच्चनीच चक्र

		र	चं	मं	बु	गु	शु	श
उच्च	रा.	०	१	९	५	३	११	६
	अं.	१०	३	२८	१५	५	२७	२०
नीच	रा.	६	७	३	११	९	५	०
	अं.	१०	३	२८	१५	५	२७	२०

स्वगृह चक्र

रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
सिंह	कर्क	मेष वृश्चिक	मिथुन कन्या	धनु मीन	वृषभ तुला	मकर कुंभ

तात्कालिक ताजिक मैत्री.

जो ग्रह नवपंचम व तृतीयैकादश दृष्टीनें एखाद्या ग्रहास पाहतो तो त्या ग्रहाचा मित्र होय. अर्थात् जो ग्रह एखाद्या ग्रहापासून तृतीय,

*

पंचम, नवम व एकादशस्थानीं असतो, तो त्या ग्रहाचा मित्र आहे.

जो ग्रह चतुर्थ दशम व एकसप्तम दृष्टीनें एखाद्या ग्रहला पाहतो, तो त्याचा शत्रु होय. अर्थात् जो ग्रह एखाद्या ग्रहापासून, १।४।७।१० स्थानीं असतो. तो त्या ग्रहाचा शत्रु होय

जो ग्रह एखाद्या ग्रहाच्या २।६।८।१२ स्थानीं असेल तो त्याचा सम होय.

ही मैत्री खालील कुंडलीवरून चांगली कळेल.



वर्षप्रवेशकालाचा रवि ८।३।५१ आहे. ह्मणजे धनु राशींत ३ अंश ५१ कला आहे. धनु राशीचा स्वामी गुरु आहे. हा गुरु वर्षलग्न कुंडलींत रवी-पासून आठवा आहे, ह्मणून तो सम आहे, असें समजावयाचें. चंद्र २।२६ आहे. ह्मणजे मिथुन राशींत २ अंश २६ कला आहे. मिथुन राशीचा स्वामी बुध हा वर्षलग्न कुंडलींत चंद्रापासून ६ वा आहे, ह्मणून तो चंद्राचा सम आहे. व तो रवीपासून १२ वा आहे, म्हणून तो रवीचाही ससच आहे. याप्रमाणें वर्षलग्न कुंडलीवरून मैत्री आणिली ती अशी.—

वर्षलग्नकुंडली.



तात्कालिक ताजिक मैत्री.

	र	चं	मं	बु	गु	शु	श
मित्र	श मं	श मं	चं र गु	गु	बु	श मं	चं र शु
सम	बु गु	बु गु	गु	र शु चं	चं र शु श मं	बु गु	गु
शत्रु	चं शु	र शु	श बु	श मं	०	र चं	मं बु

या पद्धतींत याच मैत्रीचा सर्वत्र उपयोग करितात. असो. मागें रवीचें गृहबल १५ व उच्चबल ५।५९ हें तयार केलें आहे. आतां त्याचें हद्दाबल तयार करूं.—

रवि धनु राशींत ३ अंश ५१ कला आहे. हद्दाचक्रांत धनु राशीच्या १२ अंशापर्यंतच्या भागाचा स्वामी गुरु आहे. ह्मणून तो या चक्रांत गुरूच्या अंशीं आहे, असें ह्मणतात. गुरु हा रवीच्या मैत्रीचक्रांत सम आहे, ह्मणून रवीचें हद्दाबल १५ निम्मे ७।३० झालें.

यानंतर रवीचें द्रेष्काणबल काढावयाचें. रवि हा धनु राशींत ३ अं. ५१ कला आहे, ह्मणजे या राशीच्या पहिल्याच भागांत आहे. ह्मणून कोष्टकावरून तो बुधाच्या द्रेष्काणीं आहे, असें समजलें. बुध हा रवीचा सम आहे, ह्मणून द्रेष्काणबल १० निम्मे ५ झालें.

आतां, रवीचें नवमांशबल काढूं. रवि हा धनु राशींत ३अं. ५१क. आहे. धनु राशीचा पहिला भाग ३ अं० २० क. पर्यंतच आहे. ह्मणून रवि दुसऱ्या भागांत धरावयाचा. दुसऱ्या भागाचा स्वामी शुक्र आहे. ह्मणून शुक्र नवमांशीं आहे, असें ह्मणावयाचें. शुक्र हा रवीचा शत्रु

आहे, ह्मणून रवीचें नवमांश बल ५ पाव १।१५ आलें.

या रीतीनें सर्व ग्रहांचीं बलें काढलीं तीं अशीं.—

ग्रहांचें पंचवर्गी बल.

	र	चं	मं	बु	गु	शु	श
गृह	१५	१५	७	७	१५	१५	३०
	०	०	३०	३०	०	०	०
उच्च	५	१६	१७	९	१८	१०	५
	५९	४४	७	४०	४	३	५८
हद्दा	७	७	१५	१५	१५	११	१५
	३०	३०	०	०	०	१५	०
द्रेष्काण	५	५	७	५	५	७	७
	०	०	३०	०	०	३०	३०
नवमांश	१	१	३	३	२	२	३
	१५	१५	४५	४५	३०	३०	४५
योग	३४	४५	५०	४०	५५	४६	६२
	४४	२९	५२	५५	३४	१८	१३
वि. बल	८	११	१२	११	१३	११	१५
	४१	२२	४३	१३	५३	३४	३३

गृह, उच्च, हद्दा, द्रेष्काण व नवमांश यांच्या बलांची बेरीज करून ती योग या सदराच्या समोर मांडिली आहे. व प्रत्येकाच्या बेरजेस ४ नीं भागून तो भागाकार विंशोपकात्मक बलाच्या सदरांत मांडिला.

बल ह्म० मार्क. ज्याप्रमाणें परीक्षेच्या वेळीं प्रत्येक विषयास मार्क ठेवितात, त्याप्रमाणें गृह, उच्च इ० स० ३०, ३० अं., २० अं. इ० मार्क ठेविलेले आहेत. नंतर मार्कांचें शेंकडा प्रमाण जसें काढितात, तसेंच येथें २० शीं प्रमाण काढिलें आहे. ह्मणून त्याला विंशोपकात्मक बल असें ह्मटलें. या बलांवरून कोणता ग्रह किती बलवान आहे हें कळतें. वरील ग्रहांत शनि अधिक बलवान आहे व रवि सर्वांत कमी बलवान् आहे, असें आपणांस दिसून येईल.

मुंथा (मुथहा)

जन्मकाळीं जें लग्न रश्यादि असेल, तोच पहिल्या वर्षाचा मुंथा झाला हा मुथ जन्मलग्नापासून प्रतिवर्षी एकेक राशीनें वृद्धि पावतो. जसें — जन्मलग्न कन्या आहे, तर पहिल्या वर्षी तोच मुंथा होतो. दुसऱ्या वर्षी तूळ, तिसऱ्या वर्षी वृश्चिक याप्रमाणें पुढें प्रत्येक वर्षी एकेक राशि मुथा होतो. मुंथा काढण्याची रीति अशी आहे—

जन्मलग्नांत गतवर्षसंख्या मिळवून बेरजेस १२ नीं भागावें, शेष राहील तो मुथा जाणावा.

उदाहरण.—जन्मलग्न ५ रा १७ अं. ३१ क. ३४ वि. इतकें आहे. यांत गत वर्षें ३० मिळवून बेरीज ३५ रा. १७ अं. ३१ क. ३४ वि. आली. तिला १२नी भागून बाकी ०रा. अं. क. वि. इतकी राहिली. हाच ३१ व्या वर्षाचा स्पष्ट मुथा झाला.

त्रैराशिक स्वामी

वर्षप्रवेश दिवसाचा असेल तर मेषादि चार राशींचे स्वामी अनुक्रमें सूर्य, शुक्र, शनि व शुक्र हे होतात. आणि रात्रीचा असेल तर गुरु, चंद्र, बुध व मंगळ हे होतात.

सिंहादि चार राशींचे दिवसाचे जे मेषादीचे तेच रात्रीचे होतात व रात्री मेषादीचे जे दिवसाचे ते होतात.

शेष चार राशीचे स्वामी दिवसास व रात्रीं अनुक्रमें शनि, मंगळ गुरु, व चंद्र हे होतात.

त्रैराशिक स्वामींचें कोष्टक.

	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
दि-	र	शु	श	शु	गु	चं	बु	मं	श	मं	गु	चं
रा-	गु	चं	बु	मं	र	शु	श	शु	श	मं	गु	चं

दिवा रात्री स्वामी.

वर्ष प्रवेश दिवसास असतां रवि ज्या राशींत असेल त्या राशीचा स्वामी तो दिवास्वामी होतो. आणि रात्रीं वर्षप्रवेश असतां चंद्र ज्या राशींत असेल त्या राशीचा जो स्वामी तो रात्रीस्वामी होतो.

वर्षेश निर्णय.

१ जन्मलग्नेश २ वर्षलग्नेश ३ मुंथास्वामी व ४ त्रैराशिक स्वामी ५ दिवारात्रीस्वामी. या पांच ग्रहांत जो ग्रह पंचवर्गी बलानें अधिक असून लग्नास पाहतो, तोच त्या वर्षाचा **अधिप** होतो.

(१) जर ग्रह बलवान् असून लग्नास पाहत नाहीं, तर तो वर्षेश होत नाहीं.

(२) जर अनेक ग्रहांचें बल सारखें असेल तर जो ग्रह अधिक दृष्टीनें लग्नास पाहतो, तोच वर्षेश होतो.

(३) बलांचें व दृष्टींचें साम्य असतां मुंथास्वामी वर्षेश होतो.

(४) बलवान् ग्रहांत कोणीच लग्नास पाहत नसेल तर ज्याचें बल अधिक तोच वर्षेश होतो.

कित्येकांच्या मतें बलसाम्य व दृष्टिसाम्य असतां दिवसास वर्षप्रवेश असतां रवि ज्या राशीस असेल त्या राशीचा स्वामी तो वर्षेश होतो. व रात्रीं वर्षप्रवेश असतां चंद्र ज्या राशीस असेल त्या राशीचा स्वामी तोच वर्षेश होतो.

कित्येक असें ह्मणतात कीं, जेव्हां चंद्र हा वर्षेश होतो तेव्हां त्या चंद्राशीं जो पंचवर्गी बली ग्रह इत्थशाल करितो तोच वर्षस्वामी होतो. अन्यथा चंद्र ज्या राशीस असेल त्या राशीचा जो स्वामी तो वर्षेश होतो.

उदाहरण.—लग्नेश बुध. वर्षलग्नेश बुध. मुंथास्वामी मंगळ. त्रैराशिक-स्वामी शनि. दिवारात्रीस्वामी गुरु. यांत पंचवर्गी बल शनीचें अधिक आहे व तो नवम स्थानीं असल्यामुळें त्याची लग्नावरही दृष्टि आहे, ह्मणून शनि हा वर्षेश आहे.

द्वादशवर्गी.

१ गृह २ होरा ३ द्रेष्काण ४ चतुर्थांश ५ पंचमांश ६ षडंश ७ सप्त-

मांश ८ अष्टमांश ९ नवमांश १० दशांश ११ एकादशांश आणि १२ द्वादशांश यांस द्वादशवर्गी ह्मणतात.

१ गृह.—राशीचे स्वामी ते गृहस्वामी जसें मेष राशीचा स्वामी मंगळ इ० [मासिल स्वगृहचक्र पहा.]

२ होरा.—राशीचें अर्ध त्यास होरा ह्मणतात. एक राशि ३० अंशांचा असतो, ह्मणून १५ अंशाचा प्रत्येक होरा होतो. कोणताही ग्रह विषम राशीच्या पहिल्या होऱ्यांत (१५ अंशाच्या आंत) असतां होरास्वामी रवि व दुसऱ्या होऱ्यांत (१५ अंशापेक्षां अधिक) असतां होरास्वामी चंद्र असतो. समराशींचे होरास्वामी याच्या उलट असतात.

३ द्रेष्काण.—राशीचा तिसरा भाग. ह्मणून प्रत्येक भाग १० अंशांचा होतो. राशीचे जे स्वामी तेच त्याच्या पहिल्या भागाचे स्वामी होतात. त्या राशीपासून जो ५ वा राशि त्याचा स्वामी तो दुसऱ्या भागाचा स्वामी होतो व त्या राशीपासून जो नववा राशि त्याचा स्वामी तो तिसऱ्या भागाचा स्वामी होतो.

४ चतुर्थांश.—राशीचा चवथा भाग. ह्मणून प्रत्येक भाग ७ अं० ३० क०चा होतो. राशीचा स्वामी तोच पहिल्या भागाचा स्वामी होतो. राशीपासून चवथा जो राशि त्याचा स्वामी तो दुसऱ्या भागाचा स्वामी होतो. राशीपासून सातवा जो राशि त्या राशीचा स्वामी तो तिसऱ्या भागाचा स्वामी होतो. राशीपासून दहावा राशि त्याचा स्वामी तो चवथ्या भागाचा स्वामी होतो.

५ पंचमांश.– राशीचा पांचवा भाग. ह्मणून प्रत्येक भाग ६ अंशांचा होतो. विषम राशींच्या पंचमांशाच्या प्रत्येक भागाचे स्वामी अनुक्रमें मंगळ, शनि, गुरु, बुध व शुक्र. सम राशींच्या पंचमांश भागाचे स्वामी यांच्या उलट ह्मणजे अनुक्रमें शुक्र, बुध, गुरु, शनि व मंगळ.

६ षडंश.– राशीचा ६ वा भाग. ह्मणून प्रत्येक भाग ५ अंशांचा होतो. स्वामी काढण्याची रीति.– लग्न किंवा ग्रह यांस अंशात्मक करून ६नीं गुणावें व ३० तीं भागावें. भागाकारांत १ मिळवून १२नीं भागावें. बाकी उरतील तितकी संख्या मेष राशीपासून मोजून जो राशि येईल त्या राशीचा स्वामी तोच त्या लग्नाचा किंवा त्या ग्रहाचा षडंशस्वामी जाणावा. उदाहरण.– रवि रा. ८।३।५१ आहे. याचे अंश २४।३।५१ यांस

६नीं गुणून गुणाकार १४६३।६ आला. यांस ३०नीं भागून भागाकार ४८ आला. यांत १ मिळवून ४९ संख्या आली. तिला १२ नीं भागून बाकी १ राहिली. मेष राशीपासून ही संख्या मोजल्यास मेष राशच येत. याचा स्वामी मंगळ. ह्मणून रवीचा षडंशस्वामी मंगळ झाला याप्रमाणें इतर ग्रहांचे स्वामी काढावे.

७ सप्तमांश.– राशीचा ७ वा भाग. ह्मणून प्रत्येक भाग ४३ अं. चा होतो. स्वामी काढण्याची रीति षडंशाप्रमाणे.

८ अष्टमांश.– राशीचा ८ वा भाग. ह्मणून प्रत्येक भाग ३ अं. ४५ क. चा होतो. स्वामी काढण्याची रीति षडंशाप्रमाणें.

९ नवमांश.— राशीचा ९ वा भाग. ह्मणून प्रत्येक भाग ३अं. २०क. चा होतो. स्वामी काढण्याची रीति षडंशाप्रमाणें.

१० दशांश.— राशीचा १० वा भाग. ह्मणून प्रत्येक भाग ३अं.चा होतो. स्वामी काढण्याची रीति षडंशाप्रमाणें

११ एकादशांश—राशीचा ११ वा भाग. ह्मणून प्रत्येक भाग २अं० अं०चा होतो. स्वामी काढण्याची रीति षडंशाप्रमाणें.

१२ द्वादशांश—राशीचा १२ वा भाग. ह्मणून प्रत्येक भाग २ अं० ३० क०च होतो स्वामी काढण्याची रीति—प्रथम ग्रह किंव्या भागांत आहे तें पाहून तो ग्रह ज्या राशींत असेल त्या राशीपासून त्या भागसंख्ये-इतका जो राशि येईल तो त्या भागाचा स्वामी होतो. जसें—नाम— २।३०, ५।०, ७।३०, १०।०, १२।३०, १५, १७।३०, २०।०, २२।३०, २५।०, २७।३०, ३०।० रवि रा० ८।३।५१ आहे. ह्मणजे धनु राशीच्या दुसऱ्या द्वादशांत आहे ह्मणून धनूपासून दुसरा राशि मकर त्याचा स्वामी शनि हाच त्या भागाचा स्वामी झाला. याच नियमाने इतर ग्रहांचे स्वामी काढावे.

उदाहरण.—वर्षफलासाठीं आपण जी कुंडली घेतली आहे तिच्या वर्षप्रवेशकालीन ग्रहांस द्वादशवर्गी वरील नियमाने केल्यास पुढीलप्रमाणें स्वामी होतात.

वर्षप्रवेशकालचे स्पष्ट ग्रह.

र.	च.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.
८	२	१०	७	३	८	१०	२
३	२	२३	१८	२२	२८	२६	२२
५१	२६	३२	१४	२६	३	२१	३७

द्वादशवर्गी.

ग्रह–	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
गृह–	गु	बु	श	मं	चं	गु	श
होरा–	र	र	चं	र	र	चं	चं
द्रेक्काण–	गु	बु	शु	गु	गु	र	शु
चतुर्थांश–	गु	बु	मं	शु	श	बु	मं
पंचमांश–	मं	मं	बु	श	श	शु	शु
षष्ठांश–	मं	मं	र	श	श	बु	बु
सप्तमांश–	गु	बु	चं	र	बु	गु	चं
अष्टमांश–	बु	र	बु	मं	बु	गु	चं
नवमांश–	शु	शु	शु	गु	श	गु	शु
दशांश–	श	गु	गु	र	शु	बु	मं
एकादशांश–	बु	श	श	गु	बु	बु	गु
द्वादशांश–	श	गु	मं	बु	गु	मं	गु

जेव्हां एखादा ग्रह उच्च, स्वगृहीं, मित्रगृहीं किंवा शुभग्रहाच्या वर्गीं असेल तेव्हां तो उत्तम फल देतो हा या शास्त्रांतला सामान्य नियम आहे. वरील प्रत्येक ग्रहास शुभवर्ग किती व पापवर्ग किती मिळाले आहेत तें पाहून शुभवर्ग अधिक मिळाले असतील तर तो ग्रह दशाफल व भावफल श्रेष्ठ देतो व पापवर्ग अधिक मिळाले असतील तर तो ग्रह दशाफल व भावफल कनिष्ठ देतो असें जाणावें. दोन्ही वर्ग सारखे मिळतील तर तो मध्यम फल देतो असें समजावें. रवि, मंगळ व शनि हे पापग्रह असून बाकीचे शुभग्रह आहेत. वरील उदाहरणांत रवीला ७ शुभवर्ग व ५ पापवर्ग मिळाले आहेत, ह्मणून तो उत्तम फल देईल असें समजावें. याप्रमाणें या द्वादशवर्गी बलाचा उपयोग करावयाचा आहे.

दृष्टि.

ग्रहांच्या दृष्टि चार प्रकारच्या आहेत. १ प्रत्यक्षस्नेहा २ गुप्तस्नेहा

*

३ गुप्तवैरा ४ प्रत्यक्षवैरा.

१ प्रत्यक्षस्नेहा.—जेव्हां एखादा ग्रह दुसऱ्या एखाद्या ग्रहापासून पांचव्या किंवा नवव्या स्थानीं असतो, तेव्हां त्या दुसऱ्या ग्रहाची पहिल्या ग्रहावर प्रत्यक्षस्नेहा नामक दृष्टि आहे असें ह्मणतात. ही दृष्टि पाऊण किंवा ४५ कलात्मक होय. सर्व कार्यांत संपत्तिदायक व प्रीतिदायक अशी ही दृष्टि असते.

२ गुप्तस्नेहा.—जेव्हां एखादा ग्रह दुसऱ्या एखाद्या ग्रहापासून तिसऱ्या स्थानीं असतो, तेव्हां त्या दुसऱ्या ग्रहाची पहिल्यावर गुप्तस्नेहा नामक दृष्टि असते. ही दृष्टि कार्यसिद्धि करणारी आहे. ही ४० कलात्मक आहे. आणि एकादश स्थानावर १० कलात्मक असते.

३ गुप्तवैरा.—जेव्हां एखादा ग्रह दुसऱ्या एखाद्या ग्रहापासून चतुर्थ अगर दशम स्थानीं असतो तेव्हां त्या दुसऱ्या ग्रहाची पहिल्यावर गुप्तवैरा नामक दृष्टि असते. ही १५ कलात्मक आहे.

४ प्रत्यक्षवैरा.—जेव्हां दोन ग्रह एकत्र असतात अगर एकमेकांच्या सप्तम स्थानीं असतात तेव्हां त्यांची एकमेकांवर प्रत्यक्षवैरा नामक दृष्टि असते. हिलाच पूर्ण दृष्टि (६० कलात्मक) ह्मणतात. हिचीं फलें दुष्ट असतात,

चतुर्थदशम, समसप्तक व एकराशिगत या तीन प्रकारच्या वर सांगितलेल्या दृष्टि कोणत्याही कार्याचा नाश दर्शवितात. या दृष्टि भांडणें, युद्धें व क्लेश उत्पन्न करितात.

गणितागत दृष्टिसाधन.

खालील कोष्टकांत मेषादि राशींचे ध्रुवांक व त्यांतलील अंतर दिलें आहे.

सांतर दृष्टिध्रुवांक.

राशि	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
ध्रुवांक	०	४०	१५	४५	०	६०	०	४५	१५	१०	०	६०
अंतर	४०	२५	३०	४५	६०	६०	४५	२५	५	१०	६०	६०
धनर्ण	ध.	ऋ.	ध.	ऋ.	ध.	ऋ.	ध.	ऋ.	ऋ.	ऋ.	ध.	ऋ.

रीति.– वरील कोष्टकांत पहिल्या ओळींत १।२।३ इ० राशींचे अंक

आहेत. दुसऱ्या ओळींत ०।४०।१५ इ० ध्रुवांक आहेत. तिसऱ्या ओळींत पहिल्या राशींचा ध्रुवांक व त्याच्या पुढील राशीचा ध्रुवांक यांचें अंतर आहे. चवथ्या ओळींत जर पुढील ध्रुवांकापेक्षां मागील ध्रुवांक कमी असेल तर धन व अधिक असेल तर ऋण असें लिहिलें आहे. ताजक नीलकंठींत ९ व्या राशीचा ध्रुवांक १५ व १० व्या राशीचा १० असा दिला आहे. पण तो ध्रुवांक ११ व्या राशीच्या पेक्षां अधिक असतां धन लिहिला आहे, ही चूक दिसते. अशीच चूक प्रारब्धयोग या पुस्तकांतही आहे. ताजिक नीलकंठीच्या टीकेंत 'यदा अग्रिमो ध्रुवः प्राग् ध्रुवादधिको भवेत् तदा धनं यदोनोऽग्रिमध्रुवस्तदा ऋणं' असें स्पष्ट ह्मटलें आहे ह्मणून वरील चक्रांत आह्मी ९ व्या राशीचें चिन्ह ऋण धरिलें आहे.

द्रष्टा ह्म० पाहणारा व दृश्य ज्याला पाहतो तो. ह्मणून दृश्य ग्रहांतून द्रष्टा ग्रह वजा करावा. बाकी राहील तींत जो राशीचा अंक असेल त्या अंकाखालीं वरील दृष्टिचक्रांत जो अंतराचा अंक असेल त्या अंकांनें बाकीच्या अंशकलादिकांस गुणावें व गुणाकारास ३० नीं भागावें. भागाकार कलादि येईल तो धन असल्यास ध्रुवकांत मिळवावा. व ऋण असल्यास वजा करावा.

उदाहरण.— द्रष्टा रवि ८ रा. ३ अं. ५१ क. आहे. दृश्य चंद्र २ रा. २ अं. २६ क. आहे. ह्मणून

दृश्य— २ रा० २ अ० २६ क०
उणें द्रष्टा— ८ रा० ३ अं० ५१ क०

बाकी...५ रा० २८ अं० ३५ क०

यांत राशीचा अंक ५ आहे. या अंकाखालीं ध्रुवांक ० असून अंतरांक ६० आहे. ह्मणून २८ अं० ३५ क० यांस ६० नीं गुणून ३० नीं भागिलें. तेव्हां भागाकार ५७ क० १० वि० इतका आला. हा धन आहे ह्मणून तो ध्रुवांक जो ० त्यांत मिळविला. तेव्हां रवीची चंद्रावर ५७ क० १० वि० इतकी गणितागत दृष्टि झाली.

आतां द्रष्टा चंद्र व दृश्य रवि असें समजून चंद्राची रवीवर दृष्टि काढूं.

दृश्य— ८ रा० ३ अं० ५१ क०
उणें द्रष्टा— २ रा० १ अं० २६ क०

बाकी...६ रा० १ अं० २५ क०

यांत राशीचा अंक ६ आहे. या अंकाखालीं ध्रुवांक ६० असून अंतरांकही ६० आहे. ह्मणून १ अं० २५ क० यांस ६० नीं गुणून ३० नीं भागिले तेव्हां भागाकार २ क० ५० वि० आला. हा ऋण आहे ह्मणून ध्रुवांक जो ६० त्यांत वजा केला. तेव्हां चंद्राची रवीवर ५७ क० १० वि० इतकी गणितागत दृष्टि झाली.

याच रीतीनें इतर ग्रहांच्या एकमेकांवरील दृष्टि काढिल्या त्या अशा.—

दृश्य.

	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.
द्रष्टा	०	५७	२३	२८	२७	११	२२
र.	०	१०	३६	४६	५२	३६	१५
चं.	५७	०	२७	३१	२६	८	२५
	१०	०	२५	३६	४०	५६	५
मं.	१३	२३	०	२४	१	८	२५
	२२	५४	०	२५	३९	१६	७
बु.	२८	३२	२०	०	४१	३७	२३
	४६	३६	१८	०	३०	१६	७
गु.	२७	६	१	४०	०	११	५
	५३	४०	३९	४८	०	१४	२२
शु.	११	८	३३	३	११	०	३७
	३६	४६	५९	१७	१४	०	४४
श.	१३	२१	५४	२६	५	९	०
	४५	५	२२	४६	५३	२६	०

उपपत्ति.– ध्रुवकांचीं उपपत्ति अशी असावी– मागें प्रत्यक्ष स्नेहादि दृष्टींच्या कला सांगितल्या आहेत. त्या पहा. नवपंचम दृष्टि ४६ कलात्मक मानिली, आहे. ह्मणजे जर एखादा ग्रह मेष राशींत कांहीं भाग असेल व दुसरा ग्रह सिंह राशींत तितकाच भाग असेल तर मेष राशींतल्या ग्रहाची सिंह राशींतल्या ग्रहावर बरोबर ४५ कला दृष्टि असेल, हें

उघड आहे. मेष आणि सिंह या दोन राशींत ४ राशि अंतर आहे. तेव्हां या अंतराला ४५ कला दृष्टि आली पाहिजे, ह्मणून कोष्टकांत ४ च्या राशीखालीं ध्रुवांक ४५ लिहिला. गुरुश्रेष्ठा दृष्टीच्या कला ६० सांगितल्या आहेत. हींत एका ग्रहापासून दुसरा ग्रह तिसऱ्या राशीवर असावा लागतो. अर्थात् अंतराचा राशि २ येतो. ह्मणून कोष्टकांत २ च्या राश्यंकाखालीं ४० हा ध्रुवांक दिला आहे. गुरुवैरा दृष्टीच्या कला १५ सांगितल्या आहेत. हींत एका ग्रहापासून दुसरा ग्रह चतुर्थ अगर दशम स्थानीं असावा लागतो. चतुर्थ स्थानीं असल्यास अंतर ३ राशींचें येतें, ह्मणून ३ ह्या राश्यंकाखालीं १५ हा ध्रुवकांक दिला आहे. दशम स्थानीं असल्यास अंतर ९ राशींचें येतें. ह्मणून ९ ह्या राश्यंकाखालीं १५ हा ध्रुवकांक दिला आहे. प्रत्यक्षवैरा दृष्टीच्या कला ६० सांगितल्या आहेत. हींत दोन्ही ग्रह एकत्र किंवा परस्पर सप्तम असे असावे लागतात. एकत्र ह्मणजे उभयतांत १२ राशींचें अंतर. ह्मणून १२ ह्या राश्यंकाखालीं ६० हा ध्रुवकांक दिला आहे. व परस्पर सप्तम ह्मणजे ६ राशींचें अंतर. ह्मणून ६ ह्या राश्यंकाखालीं तितकाच ध्रुवकांक आहे. १, ५, ७, ११ इतक अंतर राशींचें असतां दृष्टि मानिलेली नाहीं, ह्मणून या राश्यंकाखाली ध्रुवकांक शून्य दिला आहे.

जेव्हां दोन ग्रहांत राशिकालादिकांत फरक नसेल तेव्हां वरील ध्रुवकांकाइतकीच दृष्टि येईल. पण फरक असेल तेव्हां त्या अंशादिकांची दृष्टि त्रैराशिकानें काढण्याकरितां खाली अंकें दिली आहेत. एक राशि ह्मणजे ३० अंश. ह्मणून ३० अंशास जर तें अंतर तर वजाबाकीनें राहिलेल्या अंशास किती? येईल ती संख्या वरील

*

ध्रुवकांकांत धन किंवा ऋण करावयाची. ह्मणून दृष्टि काढितांना अंतरानें गुणून ३० नीं भागावयास सांगितलें आहे. याप्रमाणें ध्रुवकांकांची उपपत्ति आहे.

दृष्टिविशेष

लग्नापासून षष्ठभावापर्यंतचा जो कुंडलीचा भाग तो दक्षिण भाग होय. व सप्तमापासून व्ययभावापर्यंतचा जो भाग तो वामभाग होय. दक्षिणभावस्थ ग्रहावर वामभावस्थ ग्रहाची दृष्टि ही वामभावस्थ ग्रहावर दक्षिणभावस्थ ग्रहाच्या दृष्टीपेक्षां बलवान् जाणावी. उदाहरण—दशमांतील ग्रहाचा चतुर्थस्थानांतील ग्रहावरची दृष्टि, चतुर्थस्थानांतील ग्रहाच्या दशमांतील ग्रहावरच्या दृष्टीपेक्षां बलवान् आहे.

दीप्तांश

रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
१५	१२	८	७	९	७	९

षोडशयोग

१ **इक्कवाल.**—सर्व ग्रह केंद्र आणि पणफर या स्थानीं असतां इक्कवाल नामक योग होतो. हा योग अत्यंत शुभ असून राज्य, धन व सुख देणारा आहे.

२ **इंदुवार.**—सर्व ग्रह आपोक्लीम स्थानीं असतां इंदुवार नामक योग होतो. हाही योग उत्तमच आहे. पण तो वर्षमासादि प्रवेशकाळीं अशुभ आहे.

३ **इत्थशाल.**—यालाच मुथशील असें ह्मणतात. शीघ्रगति [ज्याची गति अधिक असा] ग्रह मंदगति [ज्याची गति कमी

असा] ग्रहास पाहत असून मंदगति ग्रह पुढें असेल व त्याचे अंश शीघ्रगति ग्रहापेक्षां अधिक असतील तर इत्थशाल नामक योग होतो.

जेव्हां शीघ्रगति ग्रह मंदगति ग्रहापेक्षां एक विकला किंवा अर्धी कला मात्र कमी असतो तेव्हां पूर्ण इत्थशाल जाणावा.

जेव्हां शी. ग. ग्रह राशीच्या अंतीं असून मं. ग. ग्रह पुढील राशींत असेल तेव्हां अदृष्ट [भूत] इत्थशाल योग होतो.

शी. ग. ग्रह खदीप्तांशांत असा मं. ग. ग्रहाच्या मागें असता भविष्य इत्थशाल योग होतो.

या प्रमाणें तीन प्रकारचा हा योग आहे. प्रश्नकालची कुंडली मांडून झाल्यावर लग्नस्वामी आणि प्रश्न ज्या भावसंबंधी विचारिला असेल त्याचा स्वामी यांत इत्थशाल योग जशा प्रकारचा होत असेल तशा प्रकारचें प्रश्नाचें फल मिळतें. जसें—मला पुत्र, स्त्री, राज्य, लाभ इ० सुखें मिळतील किंवा नाहींत! असा कोणी प्रश्न केला तर त्याचें उत्तर असें द्यावयाचें—

पुत्राचा विचार पंचमावर, स्त्रीचा सप्तमावर, राज्याचा दशमावर व लाभाचा एकादश स्थानावर विचार होतो. ह्मणून लग्नेश व वरील स्थानांचे स्वामी यांत वर्तमान इत्थशाल योग असेल तर तीं सुखें वर्तमानकाळीं मिळत आहेत असें जाणावें. भविष्य इ० योग असेल तर तीं सुखें पुढें मिळतील असें समजावें. हा योग पूर्ण असेल तर फलही पूर्णच मिळेल.

लग्नस्वामी आणि प्रश्नस्वामी [कार्यस्वामी], लग्नस्वामीचा मित्र आणि कार्यस्वामीचा मित्र हे चार ग्रह ज्या राशींत असतील त्यांचे स्वामी शुभ ग्रह असून ते त्या ग्रहांनीं दृष्ट असतील तर वर सांगितलेला इ. शा. योग बलाढ्य जाणावा. ते स्नेहदृष्टींत असतील तर

अत्यंत बलवान् योग जाणावा.

लग्नेश आणि कार्येश हे जर स्वगृहीं, उच्च, स्वहद्दा, स्वत्रैराशिप, स्वमुसल्लह किंवा शुभ ग्रहाच्या अंशीं असून शुभ ग्रहानें युक्त व दृष्ट असतील तर इ. शा. योगाचें संपूर्ण फल मिळतें.

लग्नेश किंवा कार्येश शत्रुक्षेत्रीं, नीच, शत्रूच्या अंशीं, पाप ग्रहाच्या राशीस, पाप ग्रहांनीं युक्त व दृष्ट असतां अशुभ फल प्राप्त होतें. त्याच प्रमाणें लग्नेश किंवा कार्येश अनिष्ट स्थानीं पाप ग्रहांनीं युक्त व दृष्ट असतां अनिष्ट फल मिळतें.

लग्नेश किंवा कार्येश मित्रगृहीं असून पुढें शत्रूचें गृह असेल तर अशुभ फल पुढें मिळणार असें समजावें.

४ ईसराफ.—यास मूसरीफ असें दुसरें नांव आहे. मंदगति ग्रहापेक्षां शीघ्रगति ग्रह एका अंशानें जास्त असून दृष्टि असेल तेव्हां ईसराफ नामक योग होतो. हा योग पाप ग्रहांचा असल्यास कार्यनाश जाणावा.

५ नक्त योग.—लग्नेश व कार्येश यांची एकमेकांवर दृष्टि नसून जेव्हां या दोघांच्या मध्यें एखादा शीघ्रगति ग्रह येतो व तो त्या दोन ग्रहांशीं इ. शा. योग करितो तेव्हां नक्त नामक योग होतो. या योगावर मध्यस्थाच्या हातून कार्य होतें असें जाणावें.

जसें.—मला स्त्रीची प्राप्ति होईल किंवा नाहीं असा प्रश्न केला

त्या वेळीं कन्या लग्न असून त्याचा स्वामी बुध हा सिंह राशींत १० अंश आहे. जायास्वामी गुरु हा मीन राशींत १२ अंश आहे बुध व गुरु हे षष्ठाष्टम स्थानीं असल्यामुळें त्यांची एकमेकांवर दृष्टि नाहीं. या दोन ग्रहांच्या मध्य चंद्र हा शीघ्रगति ग्रह धनु राशींत ८ किंवा ११ अंश असून त्याची गुरूवर व बुधावरही दृष्टि आहे, ह्मणून इ. शा. योग होतो. यावरून मध्यस्थाच्या मदतीनें स्त्रीलाभ होईल असें जाणावें.

६ यमया.—लग्नेश व कार्येश हे एकमेकांस पाहत नसून या दोघांच्या मध्यें आपल्या दीप्तांशांत असलेला मंदगति ग्रह त्या उभतांस स्थानदृष्ट्या पाहतो, तेव्हां हा यमयानामक योग होतो. हा इष्ट कार्याची सिद्धि करणारा आहे.

उदाहरण—मला राज्यप्राप्ति होईल किंवा नाहीं ? प्रश्नलग्न तूळ असून

लग्नस्वामी शुक्र मेष राशींत सप्तम स्थानीं आहे. व दशमाचा स्वामी चंद्र हा अष्टम स्थानीं वृषभ राशींत उच्च आहे. या दोन ग्रहांमध्यें द्विर्द्वादश योग असल्यामुळें ते एकमेकांस पाहत नाहींत. या दोन ग्रहांच्या मध्यें गुरु हा मंदगति ग्रह कर्क राशींत १० अंश असून शुक्र व चंद्र या उभयतांसही पाहतो. ह्मणून प्रधानाच्या साह्यानें राज्यप्राप्ति होईल असें जाणावें.

७ मणऊ.—लग्नेश व कार्येश हे एकमेकांस पाहत असून त्यांच्यापैकीं जो शीघ्रगति ग्रह असेल त्याच्या मागें किंवा पुढें मंगळ किंवा शनि असून तो चतुर्थ, सप्तम अगर एकराशिगत दृष्टीनें पाहत असेल तर हा मणऊ नामक योग होतो. हा कार्यनाश करणारा आहे.

*

उदाहरण.—मला स्त्री प्राप्ति होईल किंवा नाहीं? प्रश्न लग्न कन्या

असून लग्नीं बुध कन्येंत १० अंश आहे. जायास्वामी गुरु हा मीनेंत १९ अंश असा सप्तमांत आहे. हे दोन्ही ग्रह एकमेकांस पाहतात. मंगळ दशमांत ११ अंश मिथुन राशीचा आहे. हा मंगळ बुधाला चतुर्थ दृष्टीनें पाहतो. ह्मणून स्त्रीप्राप्ति होणार नाहीं असें समजावें.

८ कंबूल.—लग्नेश आणि कार्येश हे इत्थशाल योग करीत असून या दोघांपैकीं एकाशीं चंद्रही इत्थशाल करीत असेल तर कंबूल नामा योग होतो.

लग्नेश, कार्येश व चंद्र यांच्या उत्तम, मध्यम, समान व अधम या चार स्थितींवरून १६ प्रकार होतात. ग्रह स्वगृहीं व उच्च, असतां उत्तम हद्दा, द्रेष्काण व नवमांश यांत स्वाशीं असतां मध्यम, नीच व शत्रुक्षेत्रीं असतां अधम, व यांशिवाय इतरत्र असतां समान जाणावा. १ जर चंद्र लग्नेश व कार्येश हे स्वगृहीं किंवा उच्च असतील तर होणारा कंबूल योग उत्तमोत्तम होय. २ लग्नेश कार्येश हे वर सांगितलेल्या मध्यम स्थितींत असून चंद्र उत्तम स्थितींत असेल तर तो योग उत्तममध्यम होय. ३ लग्नेश कार्येश हे अधम स्थितींत व चंद्र उत्तम स्थितींत असतां होणारा योग उत्तमाधम होय. ४ लग्नेश कार्येश समस्थितींत व चंद्र उत्तम स्थितींत असतां होणारा कंबूल योग उत्तम जाणावा.

५ चंद्र मध्यम व लग्नेशकार्येश उत्तम तो मध्यमोत्तम योग जाणावा.
६ चंद्र मध्यम व लग्नेशकार्येश मध्यम तो मध्यमध्यम योग होतो.

७ चंद्र मध्यम व लग्नेशकार्येश सम तो मध्यम योग होतो.
८ चंद्र मध्यम व लग्नेशकार्येश अधम तो मध्यमाधम योग होतो.
९ चंद्र समान व " उत्तम तो उत्तम योग होतो.
१० " " व " मध्यम तो मध्यम योग होतो.
११ " " व " समान तो सममध्यम योग होतो.
१२ " " व " अधम तो अधम योग होतो.
१३ चंद्र अधम व " उत्तम तो अधमोत्तम योग होतो.
१४ " " व " मध्यम तो अधममध्यम योग होतो.
१५ " " व " समान तो अधम योग होतो.
१६ " " व " अधम तो अधमाधम योग होतो.

९ गैरीकंबूल.—ज्या ग्रहाला स्वगृह, स्वोच्च, स्वहद्दा, स्वद्रेष्काण व स्वनवमांश यांपैकीं एकही अधिकार नाहीं किंवा नीच, शत्रुगृहीं असाही नाहीं व ज्याला कोणताही ग्रह पाहत नाहीं त्याला शून्यमार्गी ग्रह ह्मणतात. लग्नेश व कार्येश हे इ. शा. योग करीत असून चंद्र शून्यमार्गी असेल व त्याच्याशीं वरील दोन्ही ग्रहांपैकीं एकही ग्रह इ. शा. योग करीत नसेल असा चंद्र राशीच्या अंतीं असून पुढील राशींत स्वगृहीं अथवा उच्च ग्रह असेल व त्याच्यासह तो चंद्र लग्नेश व कार्येश यांच्याशीं इ. शा. योग करणारा असेल तर गैरीकंबूल नामक योग होतो. हा योग कंबूल योगासारखेंच फल देणारा आहे.

उदाहरण.—मला सुखप्राप्ति होईल कीं नाहीं? येथें प्रश्नलग्न सिंह

असून त्याचा अधिपति रवि हा नवम स्थानीं मेष राशींत ८ अंश आहे. सुख (चतुर्थ) भावाचा अधिपति मंगळ हा अष्टम स्थानीं कुंभ राशींत १२ अंश असून रवि व मंगळ हे परस्पर इ. शा. योग करीत आहेत. चंद्र कन्येंत २९ अंशांत आहे व तो शून्यमार्गी असून

रवि अथवा मंगळ यांपैकीं कोणीही त्याच्याशीं इत्थशाल योग करीत नाहीं. चंद्राच्या पुढील राशि तूळ या राशींत शनि उच्च आहे. या शर्नाजवळ चंद्र गेला ह्मणजे तो लग्नेश व कार्येश यांच्याशीं इ. शा. योग करील ह्मणून हा गैरीकंबूल योग झाला आहे. यावरून तिसऱ्याच्या मदतीनें सौख्य मिळेल असें समजावें.

१० खल्लासर.—लग्नेश व कार्येश हे इ. शा. योग करीत असून शून्यमार्गी चंद्राशीं त्या दोहोंपैकीं एकही इ. शा. करीत नसेल किंवा त्यांपैकीं कोणाशींही चंद्र युक्त नसेल तर खल्लासर नामक योग होतो. हा योग अशुभ असून कंबूल योगाचा भंग करणारा आहे.

११ रद्द.—जो ग्रह अस्तंगत, नीच, शत्रुगृहीं, वक्री किंवा तेजरहित असा असेल तर तो ग्रह दुर्बल होय. असा ग्रह जर एखाद्या भावाच्या स्वामीशीं इ० शा० योग करीत असेल तर तो रद्द नामक योग होतो. हा ग्रह कार्यनाश करणारा आहे जेव्हां कार्याधिपति दुर्बल ग्रह केंद्रीं असून लग्नेश आपोक्लीम स्थानीं असेल व त्याच्याशीं कार्येश मुथशील योग करील तेव्हां आरंभीं कार्य घडून अंतीं त्याचा नाश होईल. व जेव्हां आपोक्लीमस्थ कार्येश केंद्रस्थ लग्नेशाशीं मुथशील योग करील तेव्हां प्रथमतः कार्य बिघडेल पण शेवटीं तें सिद्धीस जाईल.

१२ दुष्फाली कुथ.—मंदगति ग्रह स्वगृह, उच्च, स्वहद्दा, स्वद्रेष्काण, स्वनवमांश इ. अशीं असून शीघ्रगति ग्रहाला कोणताच अधिकार नसेल तर हा योग होतो. या योगावर अभीष्ट कार्य होतें. तो शीघ्रगति ग्रह मागें सांगितल्याप्रमाणें दुर्बल मात्र नसावा.

१३ दुत्थोत्थदिबीर.—जेव्हां लग्नेश व कार्येश निर्बली असून त्या दोहोंच्या मध्यें तिसरा एक स्वगृहादिकांनीं बली ग्रह इ. शा. योग करितो तेव्हां हा योग होतो. यावर दुसऱ्याच्या साहाय्यानें कार्यसिद्धि होते.

१४ तंबीर.—लग्नेश व कार्येश हे मुथशील योग करीत नाहींत व त्यांच्या मध्यें असलेला बलवान् ग्रह राशीच्या अंत्य भागीं असून त्या राशीच्या पुढील राशीस असलेल्या बलवान् ग्रहांशीं युक्त होऊन लग्नेशकार्येशांशीं मुथशील योग करणारा असतां तंबीर नामक योग होतो.

१५ कुत्थ.—कुत्थ ह्मणजे बली ग्रह. बली ग्रहाचें लक्षण—१ लग्नीं ग्रह बली जाणावा. २ चतुर्थ, सप्तम व दशम या केंद्रांत लग्नापेक्षां कमी बली. ३ पणफर स्थानीं त्यापेक्षां कमी. ४ आपोक्लीम स्थानीं साधारण बलवान्. ५ पणफर किंवा आपोक्लीमस्थ ग्रह लग्नाला पाहत असेल तर बलवान् जाणावा. ६ षष्ठ, अष्टम, द्वादश स्थानीं असलेला ग्रह लग्नास पाहत असेल तर बलवान्. ७ स्वगृहीं, स्वोच्चीं, स्वद्रेष्काणीं, स्वनवमांशीं व स्वहद्दांशीं बलवान्. ८ मध्यगति व त्यापेक्षां कमी गतीचा ग्रह बली. ९ उदित, मार्गी, शुभ ग्रहानें युक्त किंवा दृष्ट असा ग्रह बलवान्. पाप ग्रहाची चतुर्थ, दशम, सप्तम व एकराशिगत दृष्टि नसेल तर बली. १० शुक्र, चंद्र, मंगळ यांचा सायंकाळीं उदय असतां बली. गुरु, शनि हे अर्धरात्रीनंतर बलवान् ११ पुरुष ग्रह दिवसास व इतर ग्रह रात्रीं बलवान्. १२ सूर्य ज्या राशीस ज्या नवमांशीं असेल त्या राशीस त्याच नवमांशीं ग्रह नसेल तर तो बलवान्. १३ पुरुष ग्रह स्थिर राशीस बलिष्ठ. १४ स्त्रीग्रह चतुर्थ स्थानापासून नवमापर्यंत बली. व पुरुष ग्रह दशमापासून तृतीय भावापर्यंत बली. १५ विषम राशीस पुरुष ग्रह व सम राशीस स्त्रीग्रह बली.

*

१६ दुरफ.—दुरफ ह्मणजे निर्बली. त्याचें लक्षण — [१] ६।८।१२ स्थानांत असलेला ग्रह दुर्बल होय. २ वक्री, शत्रुक्षेत्रीं नीच, वक्री होणारा, पापग्रहानें युक्त, अस्तंगत ग्रह दुर्बल होय. ३ नीच, शत्रुक्षेत्रीं असलेला व पाप ग्रह जर मुथशील योग करील तर दुर्बल जाणावा. ४ पाप ग्रहाची चतुर्थ, दशम, सप्तम व एकराशिगत दृष्टि असेल तर निर्बली. [५] ६।८।१२ स्थानीं असलेला ग्रह मुथशील योग करितो किंवा करणारा आहे तर दुर्बल होतो. ६ स्वगृहस्थ ग्रहाच्या सप्तम स्थानीं असलेला ग्रह दुर्बल होय. ७ स्वगृहाच्या सप्तम स्थानीं ग्रह बलहीन जाणावा. ८ राहूच्या भुक्त अथवा भोग्य अंशांत असलेला ग्रह दुर्बल. ९ जो ग्रह लग्नास पाहत नाहीं, सूर्य ज्या नवमांशांत असेल त्या नवमांशाच्या सप्तम नवमांशीं असलेला, ज्याला स्वगृहादि कोणताहीं अधिकार नाहीं, जो पाप ग्रहाशीं ईसराफ योग करितो तो दुर्बल योग जाणावा.

सूर्याच्या द्वादशस्थानीं असलेला, वृश्चिक राशीच्या पूर्वार्धी, तूळ राशीच्या उत्तरार्धी, ज्या राशीस असेल त्या राशीच्या स्वामीची दृष्टि नसेल, कोणत्याही ग्रहाची दृष्टि नसेल, शून्यमार्गी क्षीण, राशीच्या अंत्य नवमांशीं असलेला शुक्ल पक्षीं मंगळाच्या व कृष्ण पक्षीं शनीच्या दृष्टींत असलेला, अशा प्रकारचा चंद्र दुर्बल होय. शुक्ल पक्षीं दिवसास पुरुष राशीस असलेला शनि आणि कृष्ण पक्षांत रात्रीं स्त्री राशीस असलेला मंगळ हे जर चंद्र पाहतील तर तो चंद्र किंचित् बलवान् जाणावा.

हर्षस्थानें

१ लग्नापासून नवम स्थानीं सूर्य, तृतीय स्थानीं चंद्र, षष्ठस्थानीं मंगळ, लग्नीं बुध, एकादशस्थानीं गुरु, पंचम स्थानीं शुक्र आणि व्ययस्थानीं शनि हर्षित जाणावे.

२ ग्रह स्वगृहीं किंवा उच्च असतां हर्षित असतात. त्यांचें बल ५ कला असतें.

३ लग्न, द्वितीय, तृतीय स्थानीं स्त्रीग्रह; चतुर्थ, पंचम, षष्ठ स्थानीं पुरुष ग्रह, सप्तम, अष्टम, नवम स्थानीं स्त्रीग्रह, आणि दशम एकादश, द्वादशस्थानीं पुरुषग्रह हर्षित जाणावे.

४ वर्ष प्रवेश रात्रीं असतां स्त्रीग्रह आणि दिवसास असतां पुरुषग्रह हर्षित असतात.

हर्षित ग्रह बलवान् समजावे. चंद्र, शनि, शुक्र, बुध हे स्त्रीग्रह व रवि, मंगळ, गुरु हे पुरुष ग्रह आहेत. ताजिकांत नपुंसक ग्रह नाहींत. एकंदर हर्षित ग्रहाचें बल २० कला. हर्षप्रकार चार आहेत, ह्मणून प्रत्येक प्रकाराचें बल ५ कला जाणावें.

उदाहरण— वर्षलग्नकुंडली

हर्षबल

	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.
स्थान—	०	०	०	०	०	०	०
स्व०उ.—	०	०	०	०	५	०	५
स्त्री.पु.—	०	५	०	०	०	५	०
" .—	५	०	५	०	५	०	५
एकूण.—	५	५	५	०	१०	५	१०

सहमसाधन

१ **पुण्यसहम.**—वर्षप्रवेश दिवसास असल्यास स्प० चंद्रांतून स्प० रवि वजा करावा. व रात्रीं असल्यास स्प० रवींतून स्प० चंद्र वजा करावा. बाकी उरेल ती स्पष्ट लग्नांत मिळवावी, ह्मणजे येईल तें पुण्यसहम जाणावें. जो ग्रह वजा करावयाचा त्याला शोध्य व ज्यांतून वजा करावयाचा त्याला शुद्धयाश्रय ह्मणावें. शोध्य आणि शुद्धयाश्रय यां मध्यें लग्नाचा राशि येत नसेल तेव्हां येणाऱ्या सहमाच्या राशींत एक मिळवावा.

उदाहरण.—
स्प. चं.—२-२-२६
स्प. र.—८-३-११
९-२८-३९
स्प. ल. २-२७-४३
८-२६-१८ हें पुण्यसहम झालें.

२ **गुरुविद्यासहमें.**— हीं सहमें पुण्यसहमाच्या उलट रीतीनें काढावीं.

उदाहरण.—
स्प. र.—८-३-११
स्प. चं.—२-२-२६
६-१-२९
स्प. ल. २-२७-४३
८ २९-८ हीं गुरु व

विद्या सहमें झालीं.

४ **यशसहम.**— दिवसास स्प० गुरूंतून पुण्यसहम वजा करावें व रात्रीं पुण्यसहमांतून गुरु वजा करावा. बाकींत लग्न मिळवावें ह्मणजे यशसहम येतें.

उदाहरण.— स्प. गु.— ३-२२-२१
पु. स. — ८-२६-१८
६-२६- ८
स्प. ल.— २-२७-४३
९-२३-११ हें यशसहम झालें

५ **मित्रसहम.**—दिवसास गुरुसहमांतून पुण्यसहम वजा करावें व रात्रीं पुण्यसहमांतून गुरु वजा करावा. बाकींत पूर्ववत् लग्न मिळवावें, येईल तें मित्रसहम होय.

उदाहरण.— गुरुसहम— ८-२९- ८
पु. स.— ८-२६-१८
०. २-१०
ल०— २-२७-४३
२-२९- ७
+१- ०- ०
३-२९- ७ हें मित्रसहम झालें.

*

६ **माहात्म्य स०**—दिवसास पुण्यसहमांतून मंगळ वजा करावा व रात्रीं मंगळांतून पु० स० वजा करावें. बाकींत लग्न मिळवावें.

उदाहरण.— पु. स.—८—१६-१८
मंगळ.—१०-२३-३१

१०—२—४६
ल.— २—२७-४३

१-०—२९ हें माहात्म्य सहम झालें.

७ **आशासहम**—दिवसास शनिमध्यें शुक्र वजा करावा व रात्रीं शुक्रामध्यें शनि वजा करावा, आणि बाकींत लग्न मिळवावें.

उदाहरण.— शनि—१०-२६-२१
शुक्र—८—२८—३

१—२८-१८
लग्न—२—२७-४३

४—२६—१
+ १—०—०

हें अशा सहम झालें. ५—२६—१

८ **सामर्थ्यसहम**.—दिवसास मंगळामध्यें लग्नस्वामी वजा करावा व रात्रीं लग्नस्वामींत मंगळ वजा करावा. व बाकींत लग्न मिळवावें. लग्नस्वामी मंगळ असेल तेव्हां त्याच्या जागीं गुरु घ्यावा.

उदाहरण— मंगळ—१०-२३-३१
बुध — ७-१८-१४

१- ५-१८
ल०— २-२७-४३

६- ३- १
+१- ०- ०

७- ३- १ हें सामर्थ्य सहम झालें

९ **भ्रातृसहम**.—दिवसास व रात्रीं गुरूमध्यें शनि वजा करून लग्न मिळवावें.

उदाहरण— गुरु- ३-२२-२६
शनि—१०-२६-२१

४-२६- ५
ल०— २-२७-४३

७-२३-४८ हें भ्रातृसहम झालें.

१० **गौरवसहम**—दिवसास गुरूमध्यें चंद्र वजा करून रवि मिळवावा व रात्रीं गुरूमध्यें रवि वजा करून चंद्र मिळवावा.

उदाहरण— गुरु- ३-२२-५६
चंद्र— २- २-२६

१-२०- ०
रवि— ८- ३-५१

९-२३-५१
+१- ०- ०

१०-२३-५१ हें गौरवसहम झालें.

११ राजतातसहमें.—दिवसास शनीमध्यें रवि वजा करावा व रात्रीं सूर्यामध्यें शनि वजा करावा व लग्न मिळवावें.

उदाहरण.—

शनि—१०-२६-२१
रवि—८—३—५१
२—२२-३०
ल०—२—२७-४३
५—२०-१३
+ .१—०—०
५—२०-१३ हें राज्यसहम व तातसहम झालें.

१२ मातृसहम.—दिवसास चंद्रामध्यें शुक्र वजा करावा व रात्रीं शुक्रामध्यें चंद्र वजा करावा व लग्न मिळवावें.

उदाहरण.—

चंद्र—२—२-२६
शुक्र—८-२८—३
५—४-२३
लग्न—२-२७-४३
८—२—६ हें मातृसहम झालें.

१३ पुत्रसहम.—दिवसास गुरूमध्यें चंद्र वजा करावा व लग्न मिळवावें. रात्रीं याच प्रमाणें करावें.

उदाहरण.—

गुरु—३-२२-२६
चंद्र—२—२-२६
१-२०—०
लग्न—१-२७-४३
४-१७-४३ हें पुत्रसहम झालें.

१४ जीवितसहम.—दिवसास शनीमध्यें गुरु वजा करावा व रात्रीं गुरूमध्यें शनि वजा करावा. व लग्न मिळवावें.

उदाहरण.—

शनि—१०-२६-२१
गुरु—३—२२-२६
७—३—५५
लग्न—२-२७—४३
१०—१-३८ हें जीवितसहम झालें.

१५ अंबुसहम.—हें सहम मातृसहमाप्रमाणेंच तयार करावें. उदाहरणांत मातृसहम ८-२-६ इतकें आहे. अंबुसहमही इतकेंच होय.

१६ कर्मसहम.—दिवसास मंगळांत बुध वजा करावा व रात्रीं बुधांत मंगळ वजा करावा व लग्न मिळवावें.

उदाहरण.—

मंगळ—१०-२३-३२
बुध—७—१८-१४
३—५—१८
लग्न—२—२७-४३
६—३—१ हें कर्मसहम झालें

१७ रोगसहम.—दिवसास व रात्रीं लग्नांत चंद्र वजा करावा व लग्न मिळवावें.

उदाहरण.—

लग्न—२-२७-४३
चंद्र—२—२-२६
०-२५-१७
लग्न—२-२७-४३
३-२३—०
+ १—०—०
४-२३—० हें रोग सहम झालें.

१८ मन्मथसहम.—दिवसास चंद्रांत लग्नस्वामी वजा करावा आणि रात्रीं लग्नस्वामीमध्यें चंद्र वजा करावा व लग्न मिळवावें.

उदाहरण.— चंद्र—२—२–२६
बुध—७–१८–१४
६–१४–१२
लग्न—२–२७–४३
९–११–५५ हें मन्मथसहम झालें.

सूचना.—जर लग्नस्वामी चंद्र असेल तर दिवसास व रात्रीं रवींत चंद्र वजा करावा व लग्न मिळवावें.

१९–२० **कलि व क्षमा सहमें.**–दिवसास गुरूमध्यें मंगळ वजा करावा व रात्रीं मंगळांत गुरु वजा करावा आणि लग्न मिळवावें म्हणजे कलि व क्षमा हीं सहमें होतात.

उदाहरण.— गुरु—३—२२–२६
मंगळ–१०–२३–३२
४—२८–५४
लग्न—२—२७–४३
७—२६–३७
+ १
८—२६–३७
हीं कलि व क्षमा नामक सहमें झालीं.

२१ **शास्त्रसहम.**—दिवसास गुरूमध्यें शनि वजा करावा व रात्रीं शनीमध्यें गुरु वजा करावा. बाकींत बुध मिळवावा. आणि जर शोध्य व शुद्धाश्रय यांत बुध येत नसेल तर एक मिळवावा.

उदाहरण.— गुरु—३–२२–२६
शनि–१०–२६–२१
४–२६—५
बुध—७–१८–१४
०–१४–१९
+ १
१–१४–१९ हें शास्त्रसहम झालें

२२ **बंधुसहम.**—दिवसास व रात्रीं बुधामध्यें चंद्र वजा करून लग्न मिळवावें.

उदाहरण.— बुध—७–१८–१४
चंद्र—२—२–२६
५–१५–४८
लग्न—२–२७–४३
८–१३–३१ हें बंधुसहम झालें.

२३ **बंदकसहम.**—दिवसास बुधामध्यें चंद्र वजा करावा व रात्रीं चंद्रांतून बुध वजा करावा आणि लग्न मिळवावें.

उदाहरण.— बुध—७–१८–१४
चंद्र—२—२–२६
५–१५–४८
लग्न—२–२७–४३
८–१३–३१ हें बदकसहम झालें.

२४ **मृतिसहम.**—दिवसास व रात्रीं अष्टम भावामध्यें चंद्र वजा करून शनि मिळवावा.

उदाहरण.— अष्टमभाव—९–२२–४९
चंद्र—२—२–२६
७–२०–२३
शनि–१०–२६–२१
६–१६–४४ हें मृतिसहम झालें.

२५ **देशांतरसहम.**—दिवसास व रात्रीं नवम भावामध्यें नवमस्वामी वजा करून पूर्वीप्रमाणें लग्नयोग करावा.

उदाहरण.— नवमभाव—१०–१७–५७
स्वामी—१०–२६–२१
११–२१–३६
लग्न—२—२७–४३
२—१९–१९ हे देशांतर सहम झालें

२६ अर्थ सहम.—दिवसास व रात्रीं द्वितीय भावांतून त्याचा स्वामी वजा करून लग्न मिळवावें.

उदाहरण.— द्वितीयभाव—३–२२–४९
लग्न—२—२–२६
१–२०–२३
लग्न—२–२७–४३
४–२८—६ हें अर्थसहम झालें.

२७ परदारासहम.—दिवसास व रात्रीं शुक्रांतून सूर्य वजा लग्न मिळवावें.

उदाहरण.— शुक्र—८–२८—३
रवि—८—३–५१
०–२४–१२
लग्न—२–२७–४३
३–२१–५५ हें परदारासहम झालें.

२८ अन्यकर्मसहम.—दिवसास चंद्रांत शनि वजा करावा व रात्रीं शनींत चंद्र वजा करावा नंतर लग्न मिळवावें.

उदाहरण.— चंद्र—२—२—२६
शनि—१०–२६–२१
३—६—५
लग्न—२–२७–४३
६—३–४८ हें अन्यकर्मसहम झालें.

२९ वणिक्सहम.—दिवसास व रात्रीं चंद्रांत बुध वजा करून लग्न मिळवावें.

उदाहरण.— चंद्र—२—२–२६
बुध—७–१८–१४
६–१४–१२
लग्न—२–२७–४३
९–११–५५ हें वणिक्सहम झालें.

३० कार्यसिद्धिसहम.—दिवसास शनीमध्यें रवि वजा करून सूर्यराशिस्वामी मिळवावा. रात्रीं शनीमध्यें चंद्र वजा करून चंद्रराशिस्वामी मिळवावा.

उदाहरण.— शनि—१०–२६–२१
रवि— ८—३–५१
२–२२–३०
गुरु— ३–२२–२६
६–१४–५६
+ १
७–१४–५६ हें कार्यसिद्धिसहम झालें.

३१ विवाहसहम.—दिवसास व रात्रीं शुक्रांत शनि वजा करावा व लग्न मिळवावें.

उदाहरण.— शुक्र—८–२८—३
शनि–१०–२६–२१
१०—१–४२
लग्न— २–२७–४३
०–२९–२५ हें विवाहसहम झालें.

३२ प्रसूतिसहम.—दिवसास गुरूमध्यें बुध वजा करावा व रात्रीं बुधामध्यें गुरु वजा करावा. नंतर लग्न मिळवावें.

उदाहरण.— गुरु—३–२२–२६
बुध—७–१८–१४
८—४–१२
लग्न—२–२७–४३
११—१–५५ हें प्रसूतिसहम झालें.

३३ संतापसहम.—दिवसास व रात्रीं शनीमध्यें चंद्र वजा करून षष्ठ भाव मिळवावा.

उदाहरण शनि—१०–२६–२१
चंद्र—२—२–२६
८—२३–५५
ष. भा.—७—२६–५३
४—२०–४८ हें संतापसहम झालें.

३४ **श्रद्धासहम.**—दिवसास व रात्रीं शुक्रांत मंगळ वजा करावा व लग्न मिळवावें.

उदाहरण.— शुक्र—८—२८—३
मंगळ–१०–२३–३२
१०—४–३१
लग्न—२—२७–४३
१—२—१४ हें श्रद्धासहम झालें.

३५ **प्रीतिसहम.**—दिवसास व रात्रीं विद्यासहमांत पुण्यसहम वजा करून लग्न मिळवावें.

उदाहरण.— विद्या स०–८–२९—८
पुण्य स०–८–२६–१८
०–२—५०
लग्न—२–२७–४३
३—०–३३
+ १
४—०–३३ हें प्रीतिसहम झालें

३६ **बलसहम.**—यशसहमाप्रमाणेंच करावें.

उदाहरण—९-२३-५१ हें यशसहम आहे, ह्मणून इतकेंच बलसहम होतें.

३७ **देहसहम.**—हेंही यशसहमाप्रमाणेंच करावें.

उदाहरण—९-२३-५१ हें यशसहम आहे, ह्मणून इतकेंच बलसहम होतें.

३८ **जाड्यसहम.**—दिवसास मंगळांत शनि वजा करावा व रात्रीं शनीमध्यें मंगळ वजा करून बुध मिळवावा.

उदाहरण— मंगळ–१०–२३–३२
शनि–१०–२६–२१
११–२७–११
बुध– ७–१८–१४
७–१५–२५
+ १
८–१५–२५ हें जाड्यसहम झालें.

३९ **व्यापारसहम.**—दिवसास आणि रात्रीं मंगळांत बुध वजा करून लग्न मिळवावें.

उदाहरण.— मंगळ–१०–२३–३२
बुध– ७–१८–१४
३– ५–१८
लग्न–२–२७–४३
६– ३– १
+ १
७– ३–१ हें व्यापारसहम झालें.

४० **पानीयपातसहम.**—दिवसास शनींत चंद्र वजा करावा व रात्रीं चंद्रांत शनि वजा करावा. नंतर लग्न मिळवावें.

उदाहरण.— शनि–१०–२६–२१
चंद्र– २– २–२६
८–२३–५५
लग्न– २–२७–४३
११–२१–३८
+ १
०–२१–३८ हें पानीयपातसहम झालें

४१ **शत्रुसहम.**—दिवसास मंगळांत शनि वजा करावा व रात्रीं शनीमध्यें मंगळ वजा करावा. नंतर लग्न मिळवावें.

उदाहरण.— मंगळ–१०–२३–३२
शनि–१०–२६–२१
११–२७–११
लग्न– २–२७–४३
२–२४–५४ हें शत्रुसहम झालें.

४२ **शौर्यसहम.**— दिवसास पुण्यसहमामध्यें मंगळ वजा करावा व रात्रीं मंगळांत पुण्यसहम वजा करावें. नंतर लग्न मिळवावें.

उदाहरण.— पुण्यसहम– ८–२६–१८
मंगळ–१०–२३–३२
१०– २–४६
लग्न– २–२७–४३
१– ०–२९ हें शौर्यसहम झालें.

४३ **उपायसहम.**—दिवसास शनीमध्यें गुरु वजा करावा व रात्रीं गुरूमध्यें शनि वजा करावा. नंतर लग्न मिळवावें.

उदाहरण.— शनि–१०–२६–२१
गुरु– ३–२२–२६
७– ३–५५
लग्न– २–२७–४३
१०– १–३८
+ १
११– १–३८ हें उपायसहम झालें.

४४ **दरिद्रसहम.**—दिवसास पुण्यसहमामध्यें बुध वजा करावा व रात्रीं बुधामध्यें पुण्यसहम वजा करावें. दोनही वेळीं बुध मिळवावा.

उदाहरण.— पु० स०– ८–२६–१८
बुध– ७–१८–१४
१– ८– ४
बुध– ७–१८–१४
८–२६–१८ हें दारिद्र्य स० झालें.

४५ **गुरुतासहम.**—सूर्याच्या उच्चांत सूर्य वजा करून लग्न मिळवावें.

उदाहरण.— सूर्योच्च– ०–१०– ०
सूर्य– ८– ३–५१
४– ६– ९
लग्न– २–२७–४३
६–३३–५२
+ १– ०– ०
७–३३–५२ हें गुरुतासहम झालें.

४६ **जलपथसहम.**—दिवसास कर्क राशीच्या अर्धांत शनि वजा करावा व रात्रीं शनीमध्यें कर्कार्ध वजा करावें व नंतर लग्न मिळवावें.

उदाहरण.— कर्कार्ध– ३–१५– ०
शनि–१०–२६–२१
४–४८–३९
लग्न– २–२७–४३
७–१६–२२ जलपथसहम झालें.

४७ **बंधनसहम.**—दिवसास व रात्रीं पुण्यसहमामध्यें शनि वजा करून लग्न मिळवावें.

उदाहरण.— पु. स.– ८–२६–१८
शनि–१०–२६–२१
९–५९–५७
लग्न– २–२७–४३
०–२७–४० हें बंधनसहम झालें.

४८ **कन्यासहम.**—दिवसास व रात्रीं शुक्रामध्यें चंद्र वजा करून लग्न मिळवावें.

उदाहरण -- शुक्र- ८-२८- ३
चंद्र- २- २-२६
६-२५-२७
लग्न- २-२७-४३
८-५३-२० हें कन्यासहम झालें.

४९ **अश्वसहम.**—दिवसास पुण्यसहमांत सूर्य वजा करावा व रात्रीं सूर्यामध्यें पुण्यसहम वजा करावें व त्यांत एकादश भाव मिळवावा.

उदाहरण -- पु. स.-८-२६-१८
सूर्य-८- ३-५१
०-२२-२७
ए. भा.-०-१७-५५
०-४०-२२ हें अश्वसहम झालें.

— वास्तविक हीं सहमें ९० आहेत. येथें ४९ संख्या भरण्याचें कारण गुरु व विद्या हीं दोन्ही सहमें एकत्र गणलीं गेलीं आहेत.

कन्या आणि अश्व या दोन सहमांस समरसिंहाची संमति नाहीं. हीं सहमें तयार करितांना शोध्य [ज्यांतून वजा करावयाचें तें] व शोधक (जें वजा करावयाचें तें) यांत जर लग्न येत नसेल तर शेवटी जो एक मिळवावयाचा असें पूर्वी सांगितलें आहे त्याला कोठेंहीं संमति नाहीं असें टीकाकार म्हणतो. हें शास्त्र मूळचें यवनांचें आहे त्यांनींही एक मिळवावा असें सांगितलेलें नाहीं. समरसिंहाचीं सहमें तयार करण्याची रीति निराळी आहे.

सहमांचीं फलें.

कोणत्याही सहमाचा स्वामी आपल्या उच्चांत, स्वगृहीं, स्वद्रेष्काणीं, हृदाचक्रांत स्वगृहीं किंवा स्वनवमांशीं अशा प्रकारचा असतां किंवा कुंडलींत केंद्रीं अथवा त्रिकोणांत असेल व लग्नास पाहत असेल तर तो बलवान् आहे असें समजावें. जर लग्नास पाहत नसेल तर निर्बली जाणावा.

पंचवर्गी बलानें कमी, पूर्वीचीं ग्रहांचीं हर्षस्थानें चार प्रकारचीं सांगितलीं आहेत त्यांपैकीं एकही स्थान मिळालें नसेल व लग्नासही पाहत नसेल तर तो ग्रह निर्बली जाणावा.

बल कमी असतांही जो ग्रह लग्नास पाहतो तो बलवान् जाणावा.

जेव्हां कोणतेंही सहम आपल्या स्वामीनें युक्त अथवा दृष्ट असेल अथवा त्यावर शुभ ग्रहाची दृष्टि असेल अगर शुभ ग्रहानें युक्त असेल तर तें सहम उत्तम फलदायक होतें. अन्यथा निष्फल होतें. सहमाचें फल त्याच्या स्वामीच्या दशाकालीं प्राप्त होतें.

जर कोणतेंहीं सहम अष्टमेशानें युक्त अथवा दृष्ट असेल किंवा अष्टमेश व तें सहम हीं मुखशील योग करीत असतील तर तें सहम बलवान् असलें तरी निष्फल होतें असें समजावें. कोणतेंही सहम आपल्या नांवाप्रमाणेंच फल देणारें असतें.

प्रथमतः जन्मकालच्या ग्रहांवरून सर्व सहमें तयार करावीं. त्यां पैकीं जें सहम या वर्षी फलदायक असेल त्याच सहमाचा वर्षफलांत विशेष खुलासा करावा. इतर सहमांचा तादृश उपयोग नाहीं.

पुण्यसहम.—पुण्यसहम बलवान् असेल तर धर्मसिद्धि, व धनप्राप्ति होते. निर्बली असेल तर याच्या उलट फल मिळतें. जर तें वर्षकुंडलींत ६।८।१२ या स्थानीं असेल तर वर्षभर धर्म व भाग्य यांस विनाशक होतें. जर तेंच शुभ ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असेल तर त्या वर्षाच्या उत्तरार्धांत चांगलें फल देतें. जर पुण्यसहम पाप ग्रहानें युक्त व शुभ ग्रहानें दृष्ट असें असेल तर तें वर्षाच्या उत्तरार्धांत चांगलें फल देईल. जर शुभ ग्रहानें युक्त व पाप ग्रहानें दृष्ट असेल तर वर्षाच्या पूर्वार्धीं चांगलें फल देतें. जर पाप ग्रहानें युक्त व दृष्ट असेल

तर सर्व वर्षभर अशुभ फल देतें. व जर शुभ ग्रहानें युक्त व शुभ ग्रहानें दृष्ट असेल तर सर्व वर्षभर सुखदायक होतें.

ज्या वर्षी पुण्यसहम बलवान् असतें तें वर्ष उत्तम स्थितींत जातें व ज्या वर्षी तें बलहीन असतें तें वर्ष दुःखमय होतें.

जन्मकालीं जर पुण्यसहम ६।८।१२ या स्थानीं असेल व वर्षकालीं जर पापयुक्त व पापदृष्ट असेल तर त्या वर्षी धर्म, संपत्ति वगैरे सुखें नाश पावतात. पुण्यसहमाचा स्वामी अस्तंगत झाला असेल तरीही धर्मादि सुखें नाश पावतात.

सर्व प्रकारचीं सहमें जन्मकालीं व वर्षकालीं वरील प्रमाणेंच सुख-दुःख देणारीं होतात.

रोग, कलि, शत्रु, मृत्यु व दारिद्र्य हीं सहमें शुभ असतां वाईट फल देतात व अशुभ असतां चांगलें फल देतात. शुभाशुभ पाहण्याचा प्रकार पुण्यसहमा प्रमाणेंच आहे.

कार्यसिद्धिसहम जर शुभ ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असेल किंवा शुभ ग्रहाशीं मुथशीलयोग करील किंवा मुथशील योग करणाऱ्या ग्रहाच्या दृष्टींत असेल तर युद्धांत जय मिळून शत्रूचा नाश होतो. जर तें शुभ व पाप अशा ग्रहानें युक्त किंवा दृष्ट असेल तर कष्टानें जय मिळेल.

कलिसहम शुभपाप अशा मिश्र ग्रहांनीं युक्त अथवा दृष्ट नसेल व पाप ग्रहाशीं मुथशील योग करीत असेल तर कलहप्रसंगांत मृत्यु प्राप्त होईल. तें कलिसहम शुभ ग्रहानें युक्त व दृष्ट असेल तर कलहांत जय मिळून उत्कर्ष होईल. मिश्र ग्रहांनीं दृष्ट असेल तर कलह व पीडा होईल.

या प्रमाणें इतर सर्व सहमांची फलें जाणावीं. विस्तारभयास्तव येथें २।३ सहमांचीं फलें सांगितलीं आहेत.

दशा.

वर्षप्रवेशकालीन लग्न व स्पष्ट ग्रहांत राशि सोडून जो ग्रह अंशादिकांनीं सर्वांत कमी असेल तो प्रथम घेऊन नंतर त्यापेक्षां जो अधिक असेल तो घ्यावा. याप्रमाणें एकापुढें एक सर्व ग्रह घ्यावे. सर्वांत अंशादिकांनीं जो अधिक असेल तो शेवटीं घ्यावा. नंतर त्या त्या ग्रहांची दशा किती आहे हें पुढील रीतीनें काढावें. वर्षमान ज्या पद्धतीनें वर्षफल करावयाचें त्याचेंच घ्यावें. ग्रहलाघव, सूर्यसिद्धांत यांचें वर्षमान ३६५ दिवस १५ घटिका ३१ पळें आहे. केतकीपद्धतीनें वर्षफल करितांना ३६५ दिवस १५ घटिका २३ पळें हें वर्षमान घ्यावें. व सायनपद्धतीनें करितांना ३६५ दिवस १४ घ० ३२ प. घ्यावें.

प्रत्येक ग्रह पुढील ग्रहांत वजा देऊन जी बाकी राहील तिला पुढील ग्रहाचे पात्यंश असें म्हणावें. पहिल्या ग्रहाचे जे अंशादि तेच त्याचे पात्यंश होतात. या रीतीनें प्रत्येक ग्रहाचे पात्यंश त्याच्या खालीं मांडावे.

नंतर सर्व पात्यंशांची बेरीज घ्यावी. ही बेरीज शेवटल्या ग्रहाच्या अंशादि इतकीच होईल. तितक्या बेरजेस जर वर्षमान तर प्रत्येक ग्रहाच्या पात्यंशांस किती अशा त्रैराशिकानें प्रत्येक ग्रहाच्या दशा काढाव्या.

उदाहरण

वर्षप्रवेशकालीन लग्नादि ग्रह येणें प्रमाणें.—

ल.	र.	च.	मं.	बु.	गु.	शु.	श.
२	८	२	१०	७	३	८	१०
२७	३	२	२३	१८	२२	२८	२६
४३	५१	२६	३२	१४	२६	३	२१

आतां हे ग्रह दशानुक्रमानें मांडावयाचे. सर्वांत चंद्राचे अंश कमी आहेत ह्मणून तो प्रथम मांडून नंतर त्यापेक्षां अधिक जो रवि तो मांडिला, व पुढील सर्व ग्रह याच प्रमाणें मांडिले तेव्हां दशानुक्रम खालीं लिहिल्या प्रमाणें झाला.

	चं.	र.	बु.	गु.	मं.	श.	ल.	शु.
होनांशग्रह	२	३	१८	२२	२३	२६	२७	२८
	२६	५१	१४	२६	३२	२१	४३	३
	०	०	०	०	०	०	०	०
पात्यांश	२	१	१४	४	१	२	१	०
	२६	२५	२३	१२	६	४९	२२	२०
	०	०	०	०	०	०	०	०

या सर्व पात्यंशांची बेरीज २८ अंश ३ कला ह्मणजे दशानुक्रमांतील शेवटल्या ग्रहाच्या अंश कलां इतकीच झाली. आतां त्रैराशिकाने दशांचे दिवस काढावयाचे ते असे.—

प्रथम चंद्राचे दिवस काढूं. त्याचे पात्यांश २ अंश २६ कला आहेत. ह्मणून

२८ अं. ३ कॅ. : २ अं. २६ क. : : ३६५ दि. १५ घ. ३१ प.

=३१ दिवस ४१ घटिका ८ पळें ही चंद्राची महादशा झाली.

याच रीतीनें सर्व ग्रहांच्या महादशा केल्या त्या अशा.—

चं.	र.	बु.	गु.	मं.	श.	ल.	शु.
दि. ३१	१८	१८७	९४	१४	३६	१७	४
घ. ४१	२७	१८	४२	१९	४०	४८	२०

याच दशा पाहिजे असल्यास पळें व विपळेंपर्यंतही कराव्या. ग्रह जर विकलांपर्यंत असतील तर पळांपर्यंतच दशा कराव्या, आपण उदाहरणार्थ ग्रह कलांपर्यंतच घेतले आहेत ह्मणून दशाही घटकांपर्यंतच केल्या. या प्रमाणें प्रत्येक ग्रहाच्या दशा केल्यानंतर त्यांच्या अंतर्दशाही कराव्या. अंतर्दशा करण्याची रीति येणें प्रमाणें.—

$$\text{सारणी} \quad \frac{\text{दशा} \times \text{ग्रहाचे पात्यंश}}{\text{एकूण पात्यंश}} = \text{अंतर्दशा.}$$

ज्या ग्रहाच्या दशेच्या अंतर्दशा करावयाच्या असतील त्याच्या वरील वर्षसंख्येस प्रत्येक ग्रहाच्या पात्यंशानें गुणून एकूण पात्यंशानें भागावें.— जसें, चंद्राच्या अंतर्दशा करावयाच्या अशी कल्पना करा. चंद्राचे दिवस ३१ घ० ४१ यांस त्याचे पात्यंशानें गुणून एकूण पात्यंश जे २८ अंश ३ कला यांनीं भागावें ह्मणजे चंद्रदशेंत चंद्राची अंतर्दशा येईल. नंतर रवीची अंतर्दशा करितांना चंद्रदशा ३१ दि. ४१ घ० यांस रवीच्या पात्यंशानें गुणून एकूण पात्यंश जे २८ अंश ३ कला यांनीं भागावें ह्मणजे चंद्रदशेंत रवीची अंतर्दशा येईल. याच प्रमाणें बाकीच्या सर्व ग्रहांच्या अंतर्दशा तयार कराव्या. नंतर प्रत्येक दशा कोणत्या दिवशीं सुरू झाली हें लिहावें. पहिली दशा वर्षप्रवेश ज्या तारखेस झाला असेल तीच तारीख त्या दशेचा आरंभ होईल. नंतर तारखांच्या गणनेनें पुढील प्रत्येक दशांचे आरंभ तयार करावे.

वर्षप्रवेशकालच्या कुंडलीवरून एकंदर वर्षांत घडणारें सुखदुःख कळतें. पण कोणता महिना कसा आहे, हें समजण्यासाठीं मासकुंडल्या तयार करितात. वर्षप्रवेशकालीन जी कुंडली तीच पहिल्या महिन्याची होते. दुसऱ्या महिन्याची करितांना जन्मकालीन रवीच्या राशींत १ मिळवून जितका रवि येईल तितका रवि ज्या वेळीं पूर्ण होईल त्या वेळची जी कुंडली तीच दुसऱ्या महिन्याची होईल. तिसऱ्या महिन्याची करितांना जन्मरवींत २ राशि मिळवून मागील प्रमाणेच

कुंडली करावी. याचप्रमाणें प्रत्येक महिन्यास एकेक अधिक राशी मिळवून कुंडली तयार करावी. हें सर्व काम पंचांगावरून करावें. किंवा करणग्रंथाच्या आधारानें करावें.

सूक्ष्म फल पाहण्यासाठीं प्रत्येक दिवसाचीही कुंडली होऊ शकते. जन्मकालीन सूर्याच्या अंशांत एकेक अंश मिळवीत गेल्यानें प्रत्येक दिवसाच्या आरंभाचीही कुंडली होते. दिनकुंडल्या करणें भयंकर खटाटोप आहे. ज्योतिषी मासकुंडल्या मात्र देतात.

मासकुंडल्यांत भरण्यासाठीं मुंथा तयार करण्याची रीति.—मुंथा एका वर्षांत एक राशि [३० अंश] भोगितो. ह्मणून प्रत्येक महिन्यास २ अंश ३० कला भोगील. यासाठीं वर्षप्रवेशकालीन मुंथ्यांत २अंश ३० कला मिळवीत गेल्यानें प्रत्येक मासाचा मुंथा येईल.

प्रत्येक दिवसाचा मुंथा करावयाचा असेल तर ३६५ दि. १९घ. ३१ प. इतक्या कालास एक राशि तर एक दिवसास किती या त्रैराशिकानें जी गति येईल ती प्रत्येक दिवशीं मिळवीत जावी, ह्मणजे प्रत्येक दिवसाचा मुंथा येईल.

येथपर्यंत दिलेल्या माहितीवरून वाचकांस ज्योतिष्याप्रमाणें ताजिकच्या पद्धतीचें वर्षफल बनवितां येईल. फलाविषयीं विशेष माहिती सांगावची ती पुढील वर्षी ताजिकचा दुसरा भाग देतांना सांगितली जाईल.

———————

जैमिनीयपद्धति.

[जैमिनीय सूत्रांचें स्पष्टीकरणासह मराठी भाषांतर]

उपदेशं व्याख्यास्यामः ॥ १ ॥

अर्थ.—'उ' नामक जें पद तद्वाचक ईश जो शंकर त्याला नमस्कार करितों. अथवा एक प्रकारचें जातकशास्त्र सांगतों.

स्पष्टीकरण.—एकाक्षर कोशामध्यें 'उ' या अक्षराचा अर्थ 'शंकर' असा आहे. ('उकारः शंकरः प्रोक्तः') सूत्रकारांनीं ग्रंथारंभीं एकाच सूत्रांत नमन आणि कार्यनिर्देश असा श्लेष साधिला आहे.

अभिपश्यन्त्यृक्षाणि ॥ २ पार्श्वभेच ॥ ३ ॥

अर्थ.—राशि आपल्या समोर आणि पाठीमागें जे राशि असतात, त्यांस पाहतात.

स्पष्टीकरण.—

चरा नागवाणेशराशीन्स्वतोवै
स्थिरा षट्तृतीयांकराशीन् क्रमेण ॥
स्वतः शैलभं वेदभं पंक्तिभं च
क्रमाद्धिः स्वभावः प्रपश्यंति पूर्णम् ॥

चर राशि आपल्या स्थानापासून ५।८।११ या स्थानांतील राशींस पाहतात. स्थिर राशि आपल्या स्थानापासून ३।६।९ या स्थानांतील राशींस पाहतात. व द्विस्वभाव राशि आपल्या स्थानापासून ४।७।१० या स्थानीं पाहतात. ही गोष्ट स्पष्ट होण्यासाठीं पुढील कुंडली पहा.—



*या खुणेचे राशि चर आहेत. +या खुणेचे राशि स्थिर आहेत व बाकीचे खुणा नसलेले राशि द्विस्वभाव (चरस्थित्मक) असे आहेत. वरील कुंडलींत राशि अंकांनीं दर्शविले आहेत. जसें.— १ह्म० मेष २ह्म० वृषभ इ०

चर राशि आपल्या स्थानापासून ९।८।११ स्थानीं पाहतात. ह्मणून मेष राशि हा सिंह वृश्चिक व कुंभ या राशींस पाहतो. दुसरा चर राशि कर्क हा वृश्चिक, कुंभ व वृषभ यांस पाहतो. तिसरा चर राशि तूळ हा कुंभ, वृषभ व सिंह यांस पाहतो. व चवथा चर राशि मकर हा वृषभ, सिंह व वृश्चिक या राशींस पाहतो. वृषभ, सिंह वृश्चिक आणि कुंभ हे सर्व स्थिर राशि आहेत. यावरून सामान्य नियम असा निघाला कीं, प्रत्येक चर राशि हा त्याच्या पुढील स्थिर राशीशिवाय इतर सर्व राशीस पाहतो.

स्थिर राशि आपल्या स्थानापासून २।५।९ या स्थानांतील राशींस पाहतात. ह्मणून वृषभ राशि हा कर्क तूळ व मकर या राशींस पाहतो. दुसरा स्थिर राशि सिंह हा तूळ, मकर व मेष या राशींस पाहतो. तिसरा स्थिर राशि वृश्चिक हा मकर, मेष व कर्क या राशींस पाहतो. आणि चवथा स्थिर राशि जो कुंभ तो मेष, कर्क व तूळ यांस पाहतो. मेष, कर्क, तूळ व मकर हे सर्व चर राशि आहेत. ह्मणून सामान्य नियम असा निघतो कीं, प्रत्येक स्थिर राशि हा आपल्या पाठीमागील चर राशीशिवाय प्रत्येक चर राशीस पाहतो.

द्विस्वभाव राशी आपल्या स्थानापासून ३।७।१० या स्थानांतील राशींस पाहतात. ह्मणून मिथून हा राशि कन्या, धनु व मीन या राशींस पाहतो. दुसरा द्विस्वभाव राशि जो कन्या तो धनु, मीन व मिथुन या राशींस पहातो, तिसरा द्विस्वभाव राशि जो धनु तो मीन, मिथुन व कन्या या राशींस पाहतो. मिथुन, कन्या, धन व मीन हे सर्व द्विस्वभाव राशि आहेत. ह्मणून प्रत्येक द्विस्वभाव राशि हा इतर सर्व द्विस्वभाव राशींस पाहतो, असा सामान्य नियम निघतो.

चरं धनं विना स्थास्नु स्थिरमंत्यं विना चरं ॥
युग्मं स्वेनविना युग्मं पश्यतीत्ययमागमः ॥

अर्थ.—चर राशि आपल्या धन स्थानीं असलेल्या स्थिर राशीशिवाय सर्व स्थिर राशींस पाहतात. स्थिर राशि आपल्या व्यय स्थानीं चर राशीशिवाय इतर चर राशींस पहातात. व द्विस्वभाव राशि आपणाशिवाय इतर सर्व द्विस्वभाव राशींस पाहतात.

हाच अर्थ वरील स्पष्टीकरणांत स्पष्ट केला आहे.

तन्निष्ठाश्च तद्वत् ॥ ४ ॥

अर्थ.—या राशींत असलेले ग्रहही त्याचप्रमाणें पाहतात.

स्पष्टीकरण.— पुढील कुंडली पहा.

मंगळ व राहु हे कर्क या राशींत असल्यामुळें ते शनी व चंद्र आणि बुध, शुक्र व रवि यांस पाहतात.

शनि व चंद्र हे स्थिर राशींत असल्यामुळें ते मंगळ व राहू यांस पाहतात. त्याचप्रमाणें बुध, शुक्र रवि हे स्थिर राशींस असल्यामुळें ते मंगळ व राहू यांस पाहतात. गुरु हा द्विस्वभाव राशीस असल्यामुळें तो कोणत्याही ग्रहास पाहत नाहीं. कारण इतर द्विस्वभाव राशींत ग्रहच नाहींत.

या ग्रंथांतील हा दृष्टींचा प्रकार इतर पद्धतींतील प्रकाराहून भिन्न आहे. जैमिनीय पद्धतीनें कुंडलीचें वर्णन करणारांनीं इतर पद्धतींतील दृष्टि विचारांत घेतां नये. परंतु शुभ ग्रहांच्या दृष्टि शुभ व पापग्रहांच्या दृष्टि अशुभ फलें देतात. हा जो सामान्य नियम आहे, तो मात्र येथेंही लागू आहे असें समजावें.

दारभाग्यशूलस्थार्गला निध्यातुः ॥ ५

अर्थ.— एखाद्या ग्रहापासून २।४।११ या स्थानीं असलेले ग्रह 'अर्गला' संज्ञक होत.

स्पष्टीकरण.— या ग्रंथांतील संख्या सांगण्याचा प्रकार असा आहे.—

कटपयवर्गभवैरिरहार्पिडांत्यैरक्षरैरंकाः ॥
नञिच शून्यं ज्ञेयं तथा स्वरे केवले कथितं ॥

वर्णमालेचे कवर्ग, टवर्ग, पवर्ग, व यवर्ग असे चार मुख्य भाग चवर्ग हा कवर्गांत व तवर्ग हा टवर्गांत मोडतो. असे वर्ग करून त्यांवरून पुढील प्रमाणें संख्या जाणावी.

क-१	च-६	ट-१	त-६	प-१	य-१	ष-६
ख-२	छ-७	ठ-२	थ-७	फ-२	र-२	स-७
ग-३	ज-८	ड-३	द-८	ब-३	ल-३	क्ष-११
घ-४	झ-९	ढ-४	ध-९	भ-४	व-४	त्र-१२
ङ-५	ञ-०	ण-५	न-०	म-५	श-५	

स्वरांना किंमत नाहीं. जसें— काम यांत क ह्म० १ व म ह्म० ५ हे अंक डावीकडून उजवीकडे मांडिले ह्म० ५१ होतात स्थानें १२ आहेत. ह्मणून यांस १२ नीं भागून बाकी ३ राहिली. ह्मणून काम ह्मणजे तिसरें स्थान असा अर्थ झाला. वरील सूत्रांत दार, भाग्य, शूल हीं पदें आहेत. त्यांचा अर्थ याच नियमानें अनुक्रमें ४।१०।१ हीं स्थानें असा जाणावा.

कामस्था तु भूयसा पापानां ॥ ६ ॥

अर्थ.— पाहणाऱ्या ग्रहाच्या तृतीयस्थानीं जर दोहोंपेक्षां अधिक पापग्रह असतील, तर ते अर्गला उत्पन्न करितात.

स्पष्टीकरण.— काम ह्म० ३ ही संख्या मागील स्प. त कशी होते, तें सांगितलेंच आहे. या सूत्रापासून दोन प्रकारच्या अर्गला होतात. ५ व्या सूत्रांतील अर्गला शुभ व पाप अशा दोहोंप्रकारच्या ग्रहांनीं होते. परंतु ही अर्गला फक्त पाप ग्रहांनींच होते. 'भूयसा' या पदावरून एक किंवा दोन पाप ग्रहांनीं ही होत नाहीं. तीन किंवा अधिक पाप ग्रह असतील तरच होते. रवि, क्षीण चंद्र, मंगळ, शनि, राहू व केतु हे पाप ग्रह आहेत.

रिष्फनीचकामस्था विरोधिनः ॥ ७

अर्थ.— १२।१०।२ या स्थानांतील ग्रह अर्गलाप्रतिबंधक आहेत.

स्पष्टीकरण.— रिष्फ ह्म० १२ नीच ह्म० १० व काम ह्म० ३ या प्रमाणें यांचे अर्थ आहेत. ५ व्या सूत्रांत जो अर्गलायोग दिला आहे, त्याला हा योग प्रतिबंधक आहे. जर १२।१०।३ या स्थानीं ग्रह नसतील तर ५ व्यासूत्रांतील अर्गलायोग होतो. एखाद्या ग्रहाच्या चतुर्थ स्थानीं ग्रह असेल व त्याच ग्रहाच्या जर

द्वादशस्थानीं ग्रह असेल, तर अर्गलायोग होत नाहीं. तसेंच एखाद्या ग्रहाच्या द्वितीयस्थानीं ग्रह असून त्याच्या दशमांत ग्रह असेल तर तोही अर्गलायोग होत नाहीं. त्याचप्रमाणें एखाद्या ग्रहाच्या एकादश स्थानीं ग्रह असून जर त्याच्याच तृतीय स्थानीं ग्रह असेल तर अर्गला योग होत नाहीं. याप्रमाणें ९ व्या व ७ व्या सूत्रांचा एकमेकांशीं संबंध आहे. उदाहरण.—

१ २





३ ४





नं. १ च्या कुंडलींत बुधाच्या चतुर्थस्थानीं शुक्र आहे म्हणून ही अर्गला झाली. पण त्याच्या व्ययस्थानीं चंद्र आहे, ह्मणून हा ग्रह अर्गलाप्रतिबंधक झाला.

नं. २ च्या कुंडलींत चंद्राच्या द्वितीय स्थानीं मंगळ आहे, ह्मणून अर्गला झाली. पण त्याच्या दशमांत गुरु आहे तो अर्गलाप्रतिबंधक झाला.

नं. ३ च्या कुंडलींत रवीच्या एकादश स्थानीं चंद्र अहे, ह्मणून अर्गला झाली. पण त्याच्या तृतीय स्थानीं बुध आहे, ह्मणून तो अर्गलाप्रतिबंधक झाला.

नं. ४ च्या कुंडलींत चंद्राच्या तृतीय स्थानीं चार पाप ग्रह आहेत, ह्मणून हा ६ व्या सूत्राप्रमाणें अर्गला योग झाला.

न न्यूनाधिबलाश्च ॥ ८

अर्थ.— जर अर्गलाप्रतिबंधक ग्रह अर्गलाकर्त्या ग्रहापेक्षां संख्येनें कमी असतील आणि ते जर बलहीन असतील तर प्रतिबंध होत नाहीं.

स्पष्टीकरण.— जर दोन ग्रह अर्गला करितात व एक ग्रह प्रतिबंध करितो अशा प्रकारची स्थिति असेल व अर्गलाप्रतिबंधक ग्रह दुर्बल असतील तर प्रतिबंध होऊं शकत नाहीं असें समजावें. यांत बलें पाहण्याचा प्रकार पुढें वर्णिलेला आहे, तो पहावा.

प्राग्वत्त्रिकोणे ॥ ९

अर्थ.— एखाद्या ग्रहापासून त्रिकोणांतले ग्रह पूर्वी प्रमाणेंच अर्गला व अर्गलाप्रतिबंधक आहेत.

स्पष्टीकरण.— एखाद्या ग्रहाच्या पंचमांत ग्रह असतां अर्गला होते. व नवमांत ग्रह असतां तो त्या अर्गलेला प्रतिबंधक होतो. येथें ८ वें सूत्रही लागू आहे. ह्मणजे अर्गलाकारक ग्रहापेक्षां अ-

र्गलाप्रतिबंधक ग्रह जर संख्येनें कमी असतील व ते दुर्बल असतील तर ते प्रतिबंधक होत नाहींत, असें समजावें ही तिसऱ्या प्रकारची अर्गला झाली.

विपरीतं केतोः ॥ १०

अर्थ.— केतूनें होणारी अर्गला अगर प्रतिबंधकता उलट जाणावी.

स्पष्टीकरण.— एखाद्या ग्रहाच्या नवमांत केतु असतां अर्गला होते. व पंचमांत असतां प्रतिबंध होतो. हा नियम ९ व्या आणि ७ व्या सूत्रालाही लागू आहे, असें कित्येकांचें मत आहे. कित्येक ९ व्या सूत्रालाच हें सूत्र लागू आहे, असें ह्मणतात. नीलकंठाच्या मतें हें ९ व्या सूत्रालाच लागू आहे. जर हा नियम सर्वांस लागू असता तर 'प्राग्वत्' या पदानें त्याचा ९ व्या सूत्रांत अंतर्भाव झाला असता परंतु तो पुढें आहे ह्मणून सर्व प्रकारच्या अर्गलास तो लागू नाहीं, हें उघड आहे.

आत्माधिकः कलादिभिर्नभोगः ससनामष्टानां वा॥११

अर्थ — सात किंवा आठ ग्रहांमध्यें जो ग्रह कलादिकांनीं अधिक असेल तो आत्मा (आत्मकारक) जाणावा.

स्पष्टीकरण.— सात किंवा आठ ग्रह असें या सूत्रांत ह्मटलें आहे. त्याचे दोन अर्थ होतात. रवि, चंद्र, मंगळ, बुध गुरु. शुक्र, व शनि मिळून सात ग्रह होतात. व राहु धरून आठ होतात. तेव्हां जर राहुसुद्धां ग्रहाची जरूर असती तर 'अष्टानां' असा एकच पद ग्रथकरानें घातलें असतें. ह्मणन पहिला अर्थ असा होतो कीं, राहु हा राशिचक्रांत उलट असल्यामुळें तो कांहीं अंशांत असतां आत्मकारक होतो, असें ग्रथकारास सुचवावयाचें

होतें. त्यामुळें त्यानें '**ससानां**' व '**अष्टानां**' अशीं दोन पदें निराळीं घातलीं. दुसरा अर्थ असा होतो कीं, जर सातांपैकीं दोन अथवा अधिक ग्रह अंशकलांनीं समान असले तर **आत्मकारक** ग्रह कोणता हें समजणार नाहीं. अशा वेळीं राहु विचारांत घेऊन तो जर तसा असेल तर तोच **आत्मकारक** असें जाणावें. यावर अशी शंका येते कीं, केतुसुद्धां नऊ ग्रह असतां '**नवानां**' असें कां ह्मटलें नाहीं? तर याचें उत्तर असें आहे कीं, राहु आणि केतु यांचे नेहमींच अंशादिक यांत सारखेपणा असतो. ह्मणून '**नवानां**' असें ह्मणण्याचें कारणच नाहीं. याप्रमाणें या सूत्राचे दोन्ही अर्थ संभवतात.

या ठिकाणीं राशि विचारांत घ्यावयाचे नाहींत. फक्त अंशकला मात्र विचारांत घेणें आहेत. परंतु असें कां? याला उत्तर नाहीं. असा सांप्रदाय आहे, असें समजावयाचें.

जेव्हां दोन किंवा अधिक ग्रह कलांपर्यंत समान असतील तेव्हां विकला पहावयाच्या कीं नाहींत अशी एक शंका येईल. कारण ग्रह विकलांपर्यंत सूक्ष्म करण्याची चाल आहे. या शंकेचें समाधान असें आहे कीं, जेव्हां या पद्धतीनें फलादेश पहावयाचा असेल तेव्हां एक तर ग्रह कलांपर्यंतच घ्यावयाचे. किंवा विकलांपर्यंत केले असतील तर '**कलादिभिः**' याचा अर्थ अंश, कला, विकला असा केला पाहिजे.

स ईष्टे बंध मोक्षयोः ॥१२॥

अर्थ.— तो आत्मकारक ग्रह बंधमोक्षाचा स्वामी आहे.

स्पष्टीकरण.— जेव्हां तो आत्मकारक ग्रह नीच, पापयुक्त,

पापदृष्ट असेल तेव्हां तो आपल्या दशेंत किंवा अंतर्दशेंत बंधनादि दुःखें देतो; व जेव्हां तो उच्च, स्वक्षेत्रीं, शुभ ग्रहानें युक्त किंवा इष्ट असा असेल तेव्हां दुःखांतून मुक्त करितो. अथवा अनिष्ट असतो तेव्हां संसाररूप बंधन करितो व इष्ट असतां संसाररूप बंधनापासून मुक्त करितो. [मोक्ष देतो.]

तस्यानुसरणा दमात्यः ॥१३॥

अर्थ.— आत्मकारक ग्रहापेक्षां जो कमी असेल तो अमात्य [अमात्यकारक] होय.

स्पष्टीकरण.— सर्व ग्रह अंशकलादिकांनीं एकापेक्षां एक अधिक असे अनुक्रमें मांडावे. सर्वांत अधिक असेल तो पहिला तोच आत्मकारक ग्रह होय. त्याच्यापेक्षां जो कमी तो दुसरा. हा **अमात्यकारक** होय.

तस्य भ्राता ॥१४॥

अर्थ.—अमात्यकारक ग्रहापेक्षां जो कमी [नं. ३चा] तो **भ्राता** [भ्रातृकारक] ग्रह जाणावा.

तस्य माता ॥१५॥

अर्थ.— भ्रातृकारक ग्रहापेक्षां जो कमी [नं.४ चा] तो **माता** [मातृकारक] ग्रह जाणावा.

तस्य पुत्रः ॥१६॥

अर्थ.— मातृकारक ग्रहापेक्षां जो कमी [नं. ५ चा] तो **पुत्र** [पुत्रकारक] ग्रह जाणावा.

तस्य ज्ञातिः ॥१७॥

अर्थ.— पुत्रकारक ग्रहापेक्षां जो कमी [नं. ६ चा] तो **ज्ञातिकारक** ग्रह जाणावा.

तस्य दाराश्च ॥१८॥

अर्थ.— ज्ञातिकारक ग्रहापेक्षां जो कमी [नं. ७चा] तो **स्त्रीकारक** ग्रह जाणावा.

मात्रासह पुत्रमेके समामनन्ति॥१९॥

अर्थ.— मातृकारक जो ग्रह तोच पुत्रकारक ग्रह मानितात.

स्पष्टीकरण.—मातृकारक ग्रहावरूनच पुत्रकारक विचार होतो. असें कित्येक आचार्य ह्मणतात.

भगिन्याऽऽरतः श्यालः कनीयाञ्जननीचेति ॥२०॥

अर्थ.—मंगळावरून भगिनी, मेहुणा, धाकटा भाऊ आणि माता इतक्यांचा विचार करावा.

स्पष्टीकरण.—प्रत्येक ग्रहावरून जो सामान्यत्वें विचार होतो, तो ग्रंथकार सांगतात. याला स्थिर कारकें ह्मणतात. कुंडलींत मंगळ जशा स्थितींत असेल तसें भगिनी, मेहुणा, धाकटा भाऊ व माता यांचें सुख मिळतें. हें सुख वरील चल कारकांशीं ताडून सुखदुःखाचा कायमचा विचार ठरवावा.

मातुलादयो बंधवो मातृसजातीया इत्युत्तरः ॥२१॥

अर्थ.—मंगळाच्या पुढील ग्रह जो बुध त्यावरून मामा व मावशा, आणि सावत्र माता यांचा विचार करावा.

स्पष्टीकरण.—मातुलादि बंधु ह्मणजे मामा जितके असतील तितके, मावशा आणि मामेभाऊ, मामेबहिणी इ०. असा अर्थ दिसतो.

पितामहः पतिपुत्राविति गुरुमुखादेव जानीयात्॥२२

अर्थ.—गुरूवरून पितामह, शुक्रावरून पति व शनीवरून पुत्र यांचा विचार होतो.

पत्नीपितरौ श्वशुरौ मातामहा इत्यंतेवासिनः॥२३

अर्थ.—गुरूच्या पुढील जो शुक्र त्यावरून भार्या, माता, पिता, सासरा, सासू, व मातामह यांचा विचार होतो.

मंदो ज्यायान् ग्रहेषु ॥२४॥

अर्थ.— सर्व ग्रहांत शनि दुर्बल आहे.

स्पष्टीकरण.—या सूत्रांत ग्रहांचें नैसर्गिक बल सांगितलें आहे. शनि, मंगळ, बुध, गुरु, शुक्र चंद्र व रवि हे ग्रह एकापेक्षां एक अधिक बलवान् आहेत. शनि सर्वांत कमी व रवी सर्वांत अधिक बलवान् आहे असें जाणावें. ग्रहांचा असा क्रम घेण्यास बृहज्जातकाचा आधार आहे तो असा—

शकुजबुगुशुचरार्का बृद्धितो वीर्यवंतः

प्राचीवृत्तिर्विषमभेषु ॥२५॥

अर्थ.—मेषमिथुनादि विषम राशींची क्रमगणना होते.

स्पष्टीकरण.—या सूत्रापासून **चर** दशा तयार करण्याची रीति सांगितली आहे. या दशेचा आरंभ लग्नराशीपासून होतो. ह्मणून लग्नांत जर विषम राशि असेल तर दशेची क्रमानें गणना होते. जसें—मेष, लग्न असेल तर मेष, वृषभ, मिथुन अशी दशागणना करावी.

परावृत्त्योत्तरेषु ॥२६॥

अर्थ—वृषभकर्कादि सम राशींची व्युत्क्रमगणना होते.

स्पष्टीकरण.—लग्नांत जर समराशि उदित असेल तर दशाक्रम उलट जाणावा. जसें—वृषभ लग्न असतां वृषभ, मेष मीन अशी गणना करावी.

नक्वचित् ॥२७॥

अर्थ.—समविषम राशींची कोठें वर सांगितल्याप्रमाणें गणना होत नाहीं.

स्पष्टीकरण.—'क्रमा दृष्टे वृश्चिकेच व्युत्क्रमा कुंभसिंहयोः॥' अशी परंपरा आहे. यावरून या सूत्राचा अर्थ असा होतो कीं, वृषभ व वृश्चिक हे सम राशि आहेत, तरी त्यांची गणना क्रमानें होते, व्युत्क्रमानें होत नाहीं. त्याचप्रमाणें सिंह व कुंभ हे जरी विषम राशि आहेत तरी त्यांची गणना व्युत्क्रमानें होते क्रमानें होत नाहीं असें जाणावें. ह्मणजे हीं लग्नें ज्या वेळीं असतील त्या वेळीं याप्रमाणें दशाक्रम होतो. यावरून सामान्य नियम

निराळी कीं, मेषादि तीन तीन राशींची गणना करा व्युत्क्रम होते. जसें.—

क्रम	व्युत्क्रम
मेष, वृषभ, मिथुन	कर्क, सिंह, कन्या
तूळ, वृश्चिक, धनु	मकर, कुंभ, मीन

नाथांताः समाः प्रायेण॥२८॥

अर्थ.—राशीस्वामी पर्यंतच्या संख्येइतकीं वर्षें बहुतकरून त्या त्या राशीचीं जाणावीं.

स्पष्टीकरण.—ज्या राशीच्या दशेचीं वर्षें काढावयाचीं त्याचा स्वामी जर त्या राशीपासून दुसऱ्या स्थानीं असेल तर एक वर्ष तिसऱ्या स्थानीं असेल तर दोन वर्षें याप्रमाणें वर्षें काढावीं. स्वामी त्याच राशींत असतां १२ वर्षें धरावीं. पण हा नियम सर्वत्र नाहीं. कारण, वृश्चिक राशीचे मंगळ आणि केतु व कुंभ राशीचे शनि आणि राहू असे यांचे दोन दोन स्वामी आहेत. ते दोन्ही जर त्या त्या राशींत असतील तर मात्र १२वर्षें ध्यावीं. या दोन राशींच्या वर्षांचा निर्णय खालीं लिहिल्याप्रमाणें करावा.

द्विनाथक्षेत्रयोरत्र निर्णयः कथ्यतेऽधुना।
एकः स्वक्षेत्रगोन्यस्तु परत्रयदि संस्थितः॥
तदान्यत्रस्थितं नाथं परिगृह्यदशां नयेत्।
स्वक्षेत्रे मिलितावेवस्वामिनस्त्वेकशस्तथा॥
एकस्य स्वगृहस्थत्वं नहि कार्यौपयेगिकम्।
द्वावप्यन्यर्क्षगौ तौ चे त्सग्रहो बलवान्भवेत्॥
ग्रहयोगसमानत्वे चिंत्यं राशिबलाद्बलम्।

चरस्थिरद्विस्वभावाः क्रमात्स्युर्बलशालिनः
राशितत्वसमानत्वे बहुवर्षो बली भवेत्।
एकः स्वोच्चगस्त्वन्यः परत्र यदि संस्थितः
ग्राह्येदुच्च खेटस्थं राशिमन्यं विहाय वै।
नाथांता इति रात्या या बहुवर्षवती दशाम्॥
करोति बहुवर्षोऽसौ स्वराशेर्दूरगः खगः
एवं सर्वं समालोच्य जातस्य निधनं वदेत्॥

[१] एक ग्रह स्वगृहीं असून दुसरा अन्यत्र असेल तर दुसऱ्याचीं वर्षें मागील रीतीनें ध्यावीं.

[२] दोन्ही ग्रह स्वगृहीं असतां १२ वर्षें ध्यावीं.

[३] दोन्ही ग्रह अन्यत्र असतां जो ग्रह बळवान् असेल त्याचीं वर्षें ध्यावीं.

[४] दोन्हीं ग्रह समान बळी असतील तर राशिबलानें जो अधिक त्याचीं व० ध्यावीं. चर, स्थिर व द्विस्वभाव हे एकापेक्षां एक अधिक बलवान् राशि आहेत.

[५] राशिबलानेंही समान असतील तर ज्याचीं वर्षें अधिक त्याचीं व० ध्यावीं.

[६] एक उच्च असून दुसरा अन्यत्र असतां उच्च ग्रहाचीं व० ध्यावीं. दुसऱ्याचीं व० अधिक असलीं तरी घेऊं नयेत.

[७] उच्च ग्रहाचें एक वर्ष अधिक धरावें व नीच ग्रहाचें एक कमी धरावें.

न्यासयो ग्रहहीनत्वे चैकस्त्वन्येन संयुतौ
ग्राह्या राशि ग्रहाभावस्तत्स्वाम्युच्चं गतो यदि॥
एकत्रस्वर्क्षगः खेटश्चान्यत्र द्वौ ग्रहौ यदि
ग्रहद्वययुतिं हित्वा ग्राह्ये त्पूर्वंमं सुधीः॥

[८] लग्न आणि सप्तम यांत कोणीच ग्रह नसेल अगर एका स्थानांत एक ग्रह [स्वामी व्यतिरिक्त] असेल तर ज्या स्थानांत ग्रह नसेल त्या राशीचा स्वामी जर उच्च असेल तर तो राशि बलवान् जाणावा.

[९] लग्नसप्तमांपैकीं एकांत ग्रह स्वगृहीं असेल व दुसऱ्यांत दोन ग्रह असतील तर पहिलाच राशि बलवान् जाणावा.

या प्रमाणें लग्नादि स्थानांतील राशींचीं वर्षें धरून चरदशा मांडाव्या. प्रथम लग्नराशि नंतर क्रमव्युत्क्रम प्रकारानें राशि मांडून त्यांचीं वर सांगितल्याप्रमाणें वर्षें मांडावीं. एकंदर वर्षांवरून आयुर्मर्यादा जाणावी.

उदाहरण.



लग्नांत सिंह राशी आहे. हा राशि विषम आहे, तरी त्याची व्युत्क्रमानें गणना होते, ह्मणून दशाक्रम, सिंह, कर्क, मिथुन, वृषभ असा झाला.

सिंह या राशीचा स्वामी रवि हा स्वगृहीं आहे ह्मणून या राशीचीं वर्षें १२ जाणावीं.

कर्क याचा स्वामी चंद्र मीनेंत आहे. ह्मणजे ९ व्या स्थानांत आहे ह्मणून त्याचीं ४ वर्षें झालीं.

मिथुन याचा अधिपति बुध दुसऱ्या स्थानीं आहे ह्मणून त्याचें एक वर्ष झालें.

वृषभ याचा अधिपति शुक्र दशमस्थ असल्यामुळें याचीं ९ वर्षें झालीं.

मेष याचा अधिपति मंगळ सप्तमस्थ असल्यामुळें याचीं वर्षें ६ झालीं.

मीन याचा स्वामी गुरु द्वितीयस्थ असल्यामुळें एक वर्ष झालें.

कुंभ याचे अधिपति शनि व राहू असून शनि अष्टमांत ह्मणून ११ वर्षें घेतलीं. व राहू व्ययांत आहे. यांत राहूचें राशिबल अधिक आहे.

मकर याचा अधिपति शनि सप्तमांत असल्यामुळें ६ व. झालीं.

धनु याचा अ० प० गुरु पंचमांत आहे ह्मणून ४ वर्षें झालीं.

वृश्चिक याचे अ० प० मंगळ व केतू असून केतु एकादशांत व मंगळ व्ययांत आहे. यांत केतूचें राशिबल अधिक ह्मणून १० व. घेतलीं.

तूळ याचा अधिपति शुक्र एकादशांत आहे ह्मणून १० व. झालीं.

कन्या याचा अ० प० बुध तृतीयस्थ आहे ह्मणून २ व. झालीं.

याप्रमाणें वर्षें करून दशांचें कोष्टक मांडिलें तें असें.—

चरदशाक्रम

सिं.	क.	मि.	वृ.	मे.	मी.	कु.	म.	ध.	वृ.	तू.	क.
१२	४	१	९	६	१	११	६	४	१०	१०	२

एकूण ७६ वर्षें आयुर्दाय झाला असें समजावें.

यावदाशाश्रयं पद मृक्षाणाम् ॥२९

अर्थ.— राशीचा स्वामी त्या राशीपासून जितका असेल तितकी संख्या पुढें मोजून जो राशि येईल त्याला ' पद ' ह्मणतात.

स्पष्टीकरण.— पद आणि आरूढ हे एकाच अर्थाचे शब्द आहेत. जेव्हां लग्नस्वामी लग्नीं किंवा सप्तमांत असेल तेव्हां आरूढ लग्न लग्नाचाच राशि जाणावा.

स्वस्थेदाराः ॥ ३० ॥

अर्थ.— लग्नापासून चवथ्या स्थानीं त्याचा स्वामी असतां सप्तमांत जो राशि असेल तोच आरूढसंज्ञक होतो.

सुतस्थे जन्म ॥ ३१ ॥

अर्थ.— लग्नापासून सप्तमांत त्याचा स्वामी असतां लग्नांतील जो राशि तोच आरूढसंज्ञक होतो.

स्पष्टीकरण.— वरील दोन्ही सूत्रें उदाहरणार्थ दिलीं आहेत. जसें, पहिल्या सूत्रांत लग्नस्वामी चतुर्थ स्थानीं आहे असें कल्पिलें आहे, तेव्हां त्या स्वामीच्या चतुर्थस्थानीं सप्तमांतील राशि येतो, त्याच प्रमाणें दुसऱ्या सूत्रांत लग्नस्वामी सप्तमांत कल्पिला असल्यामुळें त्याच्या सप्तमांत लग्नांतीलच राशि येतो.

या प्रमाणें आरूढ कुंडली तयार केली ती अशी—

लग्नकुंडली.



६ सुखारूढ	लग्नारूढ र.५शु. सुतारूढ लाभारूढ	४ श. बु.	३ पराक्रमारूढ
७ मं			२ धनारूढ अष्टमारूढ
राज्यारूढ ८ व्ययारूढ			१ गु. भाग्यारूढ
९ जयारूढ	१० मातुलारूढ	११	१२ रा. चं.

सर्वत्र सवर्णा भावा राशयश्च ॥ ३२ ॥

अर्थ.— भाव आणि राशि वर्णयुक्त होतात.

स्पष्टीकरण.— ' सवर्णाः ' याचा अर्थ ' वर्णयुक्त ' असा झाला. पण त्यापासून कांहींच बोध होणार नाहीं. या ग्रंथांत संख्या दाखविण्यासाठीं वर्णांची योजना केली आहे, असें मागें सांगितलें आहे. जसें—क ह्म० १ ३०; यावरून वर्णयुक्त ह्मणजे संख्यायुक्त असें ह्मणतां येईल. ही संख्या अगर वर्ण तयार करण्याचा प्रकार असा आहे.—

ओजलग्नप्रसूतानां मेषादेर्गणयेत्क्रमात् ।
युग्मलग्नप्रसूतानां मीनादेरपसव्यतः ॥
मेषमीनादितो जन्मलग्नांतं गणये त्सुधीः ।
तथैव होरालग्नांतं गणयित्वा ततः परं ॥
पुंस्त्वेन स्त्रीतया वै ते सजातीये उभे यदि ।
तर्हिसंख्ये योजयेत वैजात्ये तु विजोजयेत् ॥
मेषमीनादितः पाश्चाद्यो राशिः सतुवर्णदः ।

विषम राशीचें लग्न असतां मेषादि क्रमानें व सम राशीचें असतां

मीनादि अपसव्य क्रमानें जन्मलग्नांतापर्यंत व होरालग्नांतापर्यंत संख्या मोजून त्या निराळ्या मांडाव्या. त्या दोन्ही सजातीय [दोन्ही सम अगर विषम असल्यास त्यांची बेरीज घ्यावी. बेरीज १२ पेक्षां अधिक असल्यास तिला १२ नीं भागून बाकी उरेल तितकी संख्या विषमगणना असतां सव्य मार्गानें व समगणना असतां अपसव्य मार्गानें मोजून जो राशि येईल तेंच **वर्णदलग्न** होईल. दोन्ही संख्या विजातीय [एक सम आणि एक विषम] असल्यास त्यांची वजाबाकी घेऊन मेषादि सव्यमर्गानें मोजून लग्न तयार करावें.

भावलग्न

सूर्योदयं समारभ्य घटिकांनां तु पंचकं ।
प्रयाति जन्मपर्यंनं भावलग्नं तथैव च ॥

सूर्योदयापासून ५ घ. नीं एकेक राशि भावलग्न असतें. ह्मणून इष्ट घटींपर्यंत मोजून जी संख्या येईल ती लग्नापासून मोजावी. येईल तें भावलग्न होय. जसें.— सूर्योदयानंतर ६घ. १७प. नीं जन्म आहे, व लग्न कर्क आहे. तेव्हां ५घ. पर्यंत एक राशि भावलग्न असतें. ह्मणून इष्ट घटीपर्यंत संख्या २री येते. ह्मणून लग्नापासून दुसरा राशि जो सिंह तेंच भावलग्न आलें. लग्न विषम असल्यास सर्य राशीपासून गणना करावी.

होरालग्न.

तथा सार्धं द्विघटिका मितात्काला द्विलग्नभात् ॥
प्रयाति लग्नं तन्नाम होरालग्नं प्रचक्षते ॥

अडीच घाटिकांस एक राशि [३० अंश] या प्रमाणें इष्ट घटीचे राशि येतील तितकी संख्या जन्मलग्न विषम असेल तर सूर्यराशींत मिळवावी व सम असेल तर जन्मलग्नांत मिळवावी ह्मणजे बेरीज राश्यादि येईल तें होरालग्न जाणावें.

ज्याप्रमाणें लग्नाचा वर्णद राशि काढावयाचा त्याच प्रमाणें प्रत्येक भावाचा काढावा. नंतर वर्णददशा तयार करण्यासाठीं या वर्णद राशींचा "नाथांता' या सूत्राप्रमाणें उपयोग करावा. राशीच्या स्वामीच्या ठिकाणीं त्या त्या राशींच्या वर्णद राशींची कल्पना करून वर्षे तयार करावीं. ह्मणजे वर्णददशाक्रम सिद्ध होईल.

पापदृष्टिः पापयोगो वर्णदस्य त्रिकोणके ॥
यद्दिस्यात्तर्हि तद्राशिपर्यंतं तस्य जीवनं ॥
रुद्रशूले तथैवायुर्मरणादि निरूप्यते ॥
तथैववर्णदस्यापि त्रिकोणे पापसंगमे ॥
वर्णदात्सप्तमाद्राशेः कलत्रादि विचिंतयेत् ॥
एकादशाद्व्रजंतु तृतीयात्तु यवीयसम् ॥
पंचमे तनुजं विद्यान्मातरं चैपंचमात् ॥
पितुस्तुनवमान्मातुः पंचमाद्वर्णदस्यतु ॥
शूलराशिदशायां वै प्रबलायामरिष्टकं ॥

वर्णद राशीच्या त्रिकोणांत पाप ग्रह असेल किंवा त्यावर पाप ग्रहाची दृष्टि असेल तर त्या राशीच्या दशेपर्यंत आयुर्दाय जाणावा. वर्णद राशीच्या सप्तमस्थ राशीवरून स्त्रीचें, एकादशस्थ राशीपासून वडील भावंडाचें, तृतीयस्थ राशीपासून धाकट्या भावंडाचें, पंचमस्थ राशीपासून मुलाचें, चतुर्थस्थ व पंचमस्थ राशीपासून मातेचें व नवमस्थ राशीपासून बापाचें मरण कल्पावें.

न ग्रहाः ॥३३॥

अर्थ.—भाव व राशि हे वर्णद असतात त्या प्रमाणें ग्रह नसतात.

*** यावद्दिवेकमावृत्तिर्भानाम् ॥३४॥**
होरादयः सिद्धाः ॥३५॥

अर्थ.—होरा, द्रेष्काण, नवमांश इत्यादि कुंडल्या करण्याची माहिती अन्यत्र आहे, त्याप्रमाणें त्या कुंडल्या कराव्या.

इति प्रथमाध्याये प्रथमपादः

अथ स्वांशो ग्रहाणाम् ॥१॥

अर्थ.—रव्यादि ग्रहांमध्यें जो आत्मकारक ग्रह असेल तो ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशाचें फल पुढील सूत्रांतून सांगितल्या प्रमाणें पहावें.

पंचमूषिकमार्जाराः ॥२॥

अर्थ.— आत्मकारक ग्रह मेष नवांशीं असतां उंदीर आणि मांजरें यांपासून दुःख होतें.

तत्र चतुष्पादः ॥ ३ ॥

अर्थ.— तो ग्रह वृषभ नवांशीं असतां चतुष्पादांपासून सुख होतें.

मृत्यौ कंडूः स्थौल्यं च ॥४॥

अर्थ.— तो ग्रह मिथुन नवांशीं असतां कंडूरोग होतो व शरीर स्थूल होतें.

---

* या सूत्राचा अर्थ पुढें दिला आहे.

दूरे जलकुष्ठादिः ॥५॥

अर्थ.— तो ग्रह कर्क नवांशीं असतां पाण्यापासून भय होतें व कुष्ठरोग होतो.

शेषाःश्वापदानि ॥६॥

अर्थ.— तो ग्रह सिंह नवांशीं असतां श्वापदांपासून भय होतें.

मृत्युवज्जायाग्निकृतश्च ॥७॥

अर्थ.— तो ग्रह कन्या नवांशीं असतां मिथुन राशीच्या फलाप्रमाणें फल मिळतें व अग्नीपासून दुःख होतें.

लाभे वाणिज्यं ॥८॥

अर्थ.— तो ग्रह तूळ नवांशीं असतां व्यापारी होतो.

अत्र जलसरीसृपाः स्तन्यहानिश्च ॥९॥

अर्थ.—तो ग्रह वृश्चिक नवांशीं असतां पाण्यापासून व सर्पादि विषारी जनावरांपासून भय होतें व मातेचें दूध आटून जातें.

समे वाहनादुच्चाच्चक्रमात्पतनम् ॥१०॥

अर्थ.—तो ग्रह धनु नवांशीं असतां वाहनांवरून व उंच ठिकाणावरून पतन होतें,

जलचरखेचरखेटकंडूदुष्टग्रंथयश्च रिष्फे ॥११॥

अर्थ.—तो ग्रह मकर नवांशीं असतां जलचर, पक्षी आणि देवता [ग्रह] यांपासून लाभ होतो. व कंडू आणि भयंकर असा ग्रंथीरोग हे उपद्रव होतात.

तडागादयो धर्मे ॥१२॥

अर्थ.—तो ग्रह कुंभ नवांशीं असतां तलाव, विहिरी वगैरे जलाशयांचीं कामें करणारा होतो.

उचे धर्मनित्यता कैवल्यंच ॥१३॥

अर्थ.—तो ग्रह मीन नवमांशीं असतां धर्मशील होतो व त्याला मुक्ति प्राप्त होते.

तत्रस्थौ राजकार्यपरः ॥१४

अर्थ.—[आत्मकारक ग्रह ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशीं जो ग्रह असेल त्यावरून पुढील सूत्रांत फलादेश सांगितला आहे.] रवि असतां राजकार्यतत्पर होतो.

अर्थ.—पूर्ण चंद्र व शुक्र असतील तर ऐषआराम भोगणारा व विद्येवर उपजीविका करणारा होतो.

धातुवादीकौंतायुधोवन्हिजीवीच भौमे ॥१६॥

अर्थ.—मंगळ असतां धातुवादी [रसायनशास्त्रज्ञ] शस्त्रें करणारा व अग्निसंबंधी कृत्यांपासून उपजीवन चालविणारा होतो.

वणिजस्तंतुवायाःशिल्पिनोव्यवहारविदश्चसौम्ये॥१७

अर्थ.—बुध असतां व्यापारी, व कारागीर व व्यवहारज्ञ होतो.

कर्मज्ञाननिष्ठावेदविदश्च जीवे ॥ १८॥

अर्थ.—गुरु असतां कर्म, ज्ञान, निष्ठा, वेद इ. जाणारा होतो.

राजकीयाः कामिनः शतेंद्रियाश्च शुक्रे ॥१९॥

अर्थ.—शुक्र असतां अधिकारी, स्त्रीलंपट व शतायुषी होतो.

प्रसिद्धकर्माजीवः शनौ ॥२०॥

अर्थ.—शनि असतां प्रसिद्ध कर्मानें उपजीवन करितो.

धानुष्काश्चोराश्च जांगलिका लोहयंत्रिणश्च राहौ॥२१

अर्थ.—राहु असतां धनुर्धारी, चोर, विषवैद्य, किंवा लोहयंत्रें करणारा होतो.

गजव्यवहारिणश्चोराश्च केतौ ॥२२

अर्थ.—केतु असतां हत्तीचा व्यवहार करणारा व चोर होतो.

रविराहुभ्यां सर्पनिधनं ॥२३

अर्थ.—रवि व राहु एकत्र असतां सर्प चावून मृत्यु होतो.

शुभदृष्टेसन्निवृत्तिः ॥२४॥

अर्थ.—त्यांच्यावर शुभ ग्रहाची दृष्टि असेल तर सर्पापासून निधन होणार नाहीं.

शुभमात्रसंबंधाज्जांगलिकः ॥२५

अर्थ.—जर ते रविराहू शुभ ग्रहानेंच केवळ युक्त असतील तर विषवैद्य होतो.

कुजमात्रदृष्टेगृहदाहकः अग्निदो वा ॥२६

अर्थ.—जर त्यांवर केवळ मंगळाचीच दृष्टि असेल तर आपल्या किंवा दुसऱ्याच्या घराला अग्नि लावणारा होतो.

शुक्रदृष्टेर्नदाहः ॥२७॥

अर्थ.—परंतु जर त्यांवर शुक्राची दृष्टि असेल तर वर सांगितल्याप्रमाणें अग्नि लावणारा होतो पण घर जळत नाहीं.

गुरुदृष्टेस्त्वासमीपगृहात् ॥२८॥

अर्थ.—गुरूची दृष्टि असेल तर शेजारचें घरही जळतें.

सगुलिकें विषदो विषहतो वा ॥२९॥

अर्थ.—आत्मकारक ग्रह ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशीं गुलिक असेल तर स्वतः विष खाऊन मरतो किंवा दुसऱ्यास देतो.

चंद्रदृष्टौ चौराऽपहृतधनश्चौरोवा ॥३०॥

अर्थ.—गुलिकसहित आत्मकारक ग्रहावर चंद्राची दृष्टि असेल तर चोरी होऊन धन जातें किंवा स्वतः चोरी करितो.

बुधमात्रदृष्टेबृहद्दीजः ॥३१॥

अर्थ—त्यांच्यावर केवळ बुधाचीच दृष्टि असेल तर अड-बुद्धि होते.

तत्रकेतौ पापदृष्टे कर्णच्छेदःकर्णरोगो वा ॥३२॥

अर्थ—आत्मकारक ग्रह ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशीं केतु असून त्याला पाप ग्रह पाहत असेल तर कर्णच्छेद किंवा कर्णरोग होतो.

शुक्रदृष्टे दीक्षितः ॥३३॥

अर्थ.—केतुसहित आत्मकारक ग्रहावर शुक्राची दृष्टि असेल तर दीक्षित [यज्ञकर्त्ता] होतो.

बुधशनिदृष्टे निर्वीर्यः ॥३४॥

अर्थ.—केतुसहित आत्मकारक ग्रहावर बुध व शनि पाहतील तर नपुंसक होतो.

बुधशुक्रदृष्टे पौनःपुनिको दासीपुत्रो वा ॥३५॥

अर्थ.—त्यावर बुध व शुक्र पाहतील तर एकच बोलणें पुनः पुनः बोलणारा किंवा दासीपुत्र होतो.

शनिदृष्टे तपस्वी प्रेष्यो वा ॥३६॥

अर्थ.—त्यावर शनीची दृष्टि असेल तर तपस्वी किंवा जासूद होतो.

शनिमात्रदृष्टे संन्यासाभासः ॥३७॥

अर्थ.—केवळ शनीचीच दृष्टि असेल तर अपूर्ण असा संन्यासी होतो.

तत्ररविशुक्र दृष्टे राजप्रेष्यः ॥३८॥

अर्थ.—आत्मकारक ग्रह ज्या नवमांशीं असेल त्यावर रवि व शुक्र यांची दृष्टि असेल तर तो राजाचा चाकर होतो.

रिःफे बुधे बुधदृष्टे वा मन्दवत् ॥३९॥

अर्थ.— आत्मकारक ग्रह ज्या नवमांशीं असेल त्याच्या दशमांत बुध असेल किंवा बुधाची दृष्टि असेल तर प्रसिद्ध कर्मानें उपजीवन करणारा होतो.

शुभदृष्टे स्थेयः ॥४०॥

अर्थ.— त्या दशमावर बुधाव्यतिरिक्त शुभ ग्रहाची दृष्टि असतां मनुष्य स्थिर स्वभावाचा होतो.

रवौ गुरुमात्र दृष्टे गोपालः ॥४१॥

अर्थ—त्या दशमांत रवि असून त्यावर फक्त गुरूची दृष्टि असेल तर गोपाल [गाई राखणारा] होतो.

दारे चंद्रशुक्र दृग्योगात्प्रासादः ॥४२

अर्थ.—आत्मकारक ग्रह ज्या नवमांशीं असेल त्याच्या चतुर्थ स्थानीं चंद्र व शुक्र यांची दृष्टि असेल तर मोठाले वाडे ज्याचा असा होतो.

उच्चग्रहेपि ॥४३॥

अर्थ.—त्या स्थानीं एखादा उच्चराशिगत ग्रह असतांही वर सांगितल्या प्रमाणें होतो.

राहुशनिभ्यां शिलागृहम् ॥४४॥

अर्थ-त्या स्थानीं राहु व शनि असतां दगडी घर बांधणारा होतो.

कुजकेतुभ्यामैकष्टम् ॥४५॥

अर्थ— त्या स्थानीं मंगळ व केतु असतां विटांचें घर असतें.

गुरुणादारवम् ॥४६॥

अर्थ— त्या स्थानीं गुरु असतां लांकडांचें घर असतें.

तार्णं रविणा ॥४७॥

अर्थ— त्या स्थानीं रवि असतां गवताचें घर असतें.

समे शुभदृग्यो गार्द्धमनित्यः सत्यवादी गुरुभक्तश्च॥४८

अर्थ— आत्मकारक ग्रह ज्या नवमांशीं असेल त्याच्या नवमावर शुभ ग्रहाची दृष्टि असेल तर धर्मनिरत, सत्यवादी व गुरुभक्त होतो.

अन्यथा पापैः ॥४९

अर्थ— पाप ग्रहांची दृष्टि असतां वरील फल मिळणार नाहीं.

शनिराहुभ्यां गुरुद्रोहः ॥९०

अर्थ— कारकांश कुंडलींत नवमस्थानीं शनि व राहु असतील तर गुरुद्रोही होतो.

गुरुरविभ्यांगुरावविश्वासः ॥५१

अर्थ– गुरु व रवि असतां गुरूच्या ठिकाणीं अविश्वासी होतो.

तत्रभृग्वंगारकवर्गे पारदारिकः ॥५२

अर्थ– त्या स्थानीं शुक्र व मंगळ षड्वर्ग बलयुक्त असतील तर परस्त्रीगमन करणारा होतो.

दृग्योगाभ्यामधिकाभ्यामामरणम् ॥५३

अर्थ– त्या स्थानावर षड्वर्गबलानें अधिक अशा शुक्रमंगळांची दृष्टि असेल तर आमरण स्त्रीगमन करणारा होतो.

केतुना प्रतिबन्धः ॥५४

अर्थ– केतु असेल तर आमरण परस्त्रीगमन करीत नाहीं.

गुरुणा स्त्रैणः ॥५५

अर्थ– नवमांत गुरु असेल किंवा त्याची दृष्टि असेल तर स्त्रीलंपट होतो.

राहुणार्थनिवृत्तिः ॥५६

अर्थ– नवमांत राहू असेल अगर त्याची दृष्टि असेल तर द्रव्यनाश होतो.

लाभे चंद्रगुरुभ्यांसुंदरी ॥५७

अर्थ– कारकांश कुंडलींत सप्तम स्थानीं गुरु व चंद्र असतील अगर त्यांची दृष्टि असेल तर स्त्री सुंदर मिळते.

राहुणा विधवा ॥५८॥

अर्थ.– करकांश कुंडलींत सप्तमांत राहु असतां स्त्री विधवा होते.

शनिना वयोधिका रोगिणी तपस्विनी वा ॥५९॥

अर्थ.– शनि असतां वयानें अधिक, किंवा रोगी किंवा तपस्वी होते.

कुजेन विकलांगी ॥६०॥

अर्थ.–मंगळ असतां विकलांगी [दुर्बल, अशक्त] होते

रविणा स्वकुले गुप्ताच ॥६१॥

अर्थ– रवि असतां भर्तृकुलांत रक्षण केलेली अशी होते. [अर्थात् ती दुसऱ्यावर आसक्त असते.]

बुधेन कलावती ॥६२॥

अर्थ.–बुध असतां कलावती (कलाकुशल) होते.

चापे चंद्रेणानावृत्ते देशे ॥६३॥

अर्थ.–त्या स्थानांत धनु राशीचा चंद्र असतां नग्न स्त्रीचा प्रथम संग होतो.

कर्मणि पापे शूरः ॥६४॥

अर्थ.– आत्मकारक ग्रह ज्या नवमांशीं असेल त्या नवमांशाच्या तृतीय स्थानीं [नवमांश कुंडलींत तृतीय स्थानीं] पाप ग्रह असतां शूर होतो.

शुभे कातरः ॥६५॥

अर्थ.--त्या स्थानीं शुभ ग्रह असतां भित्रा होतो.

मृत्युचिंतयोः पापे कर्षकः ॥६६॥

अर्थ.--तृतीय व षष्ठ स्थानीं पाप ग्रह असतां शेतकरी होतो.

समे गुरौ विशेषेण ॥६७॥

अर्थ.---नवमांत गुरु असतां खात्रीनें शेतकरी होतो.

उचे शुभे शुभलोकः ॥६८

अर्थ-- आत्मकारकनवांश कुंडलींत द्वादश स्थानीं शुभ ग्रह असतां शुभ लोक प्राप्त होतो.

केतू कैवल्यं ॥६९

अर्थ.—केतु असतां मुक्ति मिळते.

क्रियाचापयोर्विशेषेण ॥७०

अर्थ.-- आत्मकारक नवमांशीं मेष व धनु राशी असतां त्या राशींत शुभ ग्रह असेल तर मुक्ति मिळते. अथवा द्वादश स्थानीं मेष व धनु राशींत केतु असतां सायुज्य मुक्ति मिळते.

पापैरन्यथा ॥७१॥

अर्थ--आत्मकारक नवमांशीं किंवा द्वादशस्थानीं पाप ग्रह असतां शुभ लोक किंवा मुक्ति प्राप्त होत नाहीं.

रविकेतुभ्यां शिवे भक्तः ॥ ७२

अर्थ.—आत्मकारक नवमांशीं रवि व केतु एकत्र असतील तर शंकराची उपासना होते.

चंद्रेण गौर्य्याम् ॥ ७३

अर्थ—चंद्र असतां गौरीची भक्ति होते.

शुक्रेण लक्ष्म्याम् ॥७४

अर्थ.—शुक्र असतां लक्ष्मीभक्त होतो.

कुजेन स्कंदे ॥७५

अर्थ.—मंगळ असतां कार्त्तिकस्वामीची उपासना होते.

बुधशनिभ्यां विष्णौ ॥७६

अर्थ.— बुध व शनि एकत्र असतां विष्णुभक्त होतो.

गुरुणासांबशिवे ॥७७

अर्थ.—गुरु असतां पार्वतीसह शंकराची भक्ति घडते.

राहुणा तामस्यां दुर्गायां च ॥७८

अर्थ.—राहु असतां भूतादिकांची व दुर्गेची भक्ति होते.

केतुना गणेशे स्कंदेच ॥७९

अर्थ.—केतु असतां गणपतीची व कार्त्तिकस्वामीची भक्ति घडते.

पापर्क्षे मंदे क्षुद्रदेवतासु ॥८०

अर्थ.—आत्मकारक नवमांशीं पाप राशीस शनि असेल तर कर्णपिशाचादिकांची भक्ति होते.

शुक्रे च ॥८१

अर्थ.—आत्मकारक नवमांशीं पाप राशीस शुक्र असेल तर

वरील प्रमाणेंच कर्णपिशाचादिकांची भाक्ति घडते.

अमात्यदासे चैवम् ॥ ८२

अर्थ.—आत्मकारक ग्रहापेक्षां जो अंशादिकांनीं कमी ग्रह तो अमात्यकारक होय. त्या ग्रहापासून जो रव्यादिगणनेनें ६ वा ग्रह येईल तो जर आत्मकारक नवमांशीं पाप राशीस असेल तर वरील प्रमाणेंच कर्णपिशाचादिकांची भाक्ति घडते.

त्रिकोणे पापद्वये मांत्रिकः ॥८३

अर्थ.—कारकांश कुंडलींत पंचम व नवम स्थानीं पाप ग्रह असतां मंत्रवेत्ता होतो.

पापदृष्टे निग्राहकः ॥८४

अर्थ.—वरील पाप ग्रहांवर पाप ग्रहांची दृष्टि असेल तर भूतादिकांचा निग्रहकर्त्ता होतो.

शुभदृष्टेनुग्राहकः ॥८५

अर्थ.—वरील पाप ग्रहांवर शुभ ग्रहांची दृष्टि असतां लोकांवर कृपा करणारा होतो.

शुक्रेंदौ शुभदृष्टे रसवादी ॥८६

अर्थ.—आत्मकारक नवमांशीं चंद्र व शुक्र हे शुभदृष्ट असतील तर रसवादी होतो.

बुधदृष्टे भिषक् ॥८७

अर्थ.—वरील शुक्र चंद्रांवर बुधाची दृष्टि असतां वैद्य होतो.

चापे चंद्रे शुक्रदृष्टे पांडुश्वित्री ॥८८

अर्थ.—कारकांश कुंडलींत चतुर्थ स्थानीं चंद्र हा शुक्रदृष्ट असेल तर अंगावर पांढरें कोड असेल.

अथवा आत्मकारक नवमांशीं चंद्र हा धनु राशीचा असून त्याला शुक्र पाहत असेल तर पांढऱ्या कोडाचा होतो.

कुजदृष्टे महारोगः ॥ ८९

अर्थ.—वरील दोहोंप्रकारच्या चंद्रावर मंगळ पाहत असेल तर महारोगी होतो.

केतुदृष्टे नीलकुष्ठं ॥ ९०

अर्थ.—वरील दोहोंप्रकारच्या चंद्रावर केतु पाहत असेल तर निळ्या रंगाचें कोड उठतें.

तत्रमृतौवा कुजराहुभ्यां क्षयः ॥९१

अर्थ—आत्मकारक नवमांशकुंडलींत चतुर्थ अथवा पंचम स्थानीं मंगळ व राहु असतील तर क्षयरोग होतो.

चंद्रदृष्टौ निश्चयेन ॥९२

अर्थ.—वरील मंगळ व राहु यांवर चंद्र पाहत असेल तर क्षयरोग निश्चयानें होतो.

कुजेन पीटिकादिः ॥९३

अर्थ.—आत्मकारक नवमांशकुंडलींत चतुर्थ अथवा पंचम स्थानीं एकटा मंगळ असेल तर पीटिकादि रोग होतात.

केतुना ग्रहणी जलरोगोवा ॥९४

अर्थ.—वरील स्थानीं केतु असतां संग्रहणी किंवा जलरोग होतो.

राहुगुलिकाभ्यां क्षुद्रविषाणि ॥९५

अर्थ.—वरील स्थानीं राहु व गुलिक एकत्र असतील तर साधारण प्राण्यांचे विषापासून उपद्रव होतो.

तत्रशनौ धानुष्कः ॥९६

अर्थ.—कारकांश कुंडलींत चतुर्थ स्थानीं शनि असतां धनुर्विद्येंत निपुण होतो.

केतुना घटिकायंत्री ॥ ९७

अर्थ.—वरील स्थानीं केतु असतां घटिकायंत्री होतो

बुधेन परमहंसो लगुडी वा ॥ ९८

अर्थ.—बुध असतां परमहस किंवा संन्याशी होतो

राहुणा लोहयंत्री ॥९९

अर्थ.—राहु असतां लोखंडाचीं यंत्रें करणारा होतो.

रविणा खड्गी ॥१००

अर्थ.—रवि असतां तरवार धारण करितो.

कुजेन कुंती ॥१०१

अर्थ.—मंगळ असतां कुंत नामक हत्यार धारण करितो.

मातापित्रोश्चंद्रगुरुभ्यां ग्रंथकृत् ॥१०२

अर्थ.—आत्मकारक नवमांशीं किंवा त्याच्या पंचमांत गुरुचंद्रयोग असतां ग्रंथकार होतो.

शुक्रेण किंचिदूनम् ॥१०३

अर्थ.—वरील प्रमाणें शुक्र असतां साधारण ग्रंथकार होतो.

बुधेन ततोपि ॥१०४

अर्थ.—वरील प्रमाणें बुध असतांही सामान्य ग्रंथकार होतो.

शुक्रेण कविर्वाग्मीकाव्यज्ञश्च ॥१०५

अर्थ.—वरील प्रमाणें शुक्र असतां कवि, वक्ता व काव्य जाणणारा होतो.

गुरुणा सर्वविद् ग्रंथिकश्च ॥१०६

अर्थ.—गुरु असतां सर्व शास्त्रें जाणणारा व ग्रंथकार होतो.

न वाग्मी ॥१०७

अर्थ गुरु असतां वक्ता होत नाहीं.

विशिष्यवैय्याकरणो वेदवेदांगविच्च ॥ १०८

अर्थ—गुरु असतां व्याकरण, वेद, तर्कशास्त्र वगैरे जाणणारा होतो.

सभाजडः शनिना ॥१०९

अर्थ.—आत्मकारक नवमांशीं किंवा त्याच्या पंचमांत शनि असतां सभाजड होतो.

बुधेन मीमांसकः ॥११०

अर्थ.—वरील प्रमाणें बुध असतां मीमांसक होतो.

कुजेन नैय्यायिकः ॥१११

अर्थ—.वरील प्रमाणें मंगळ असतां न्यायशास्त्र जाणणारा होतो

चंद्रेण सांख्ययोगज्ञः साहित्यज्ञो गायकश्च ॥११२

अर्थ.—वरील प्रमाणें मंगळ असतां सांख्य, साहित्य व गायन जाणणारा होतो.

रविणा वेदांतज्ञो गीतज्ञश्च ॥११३

अर्थ.—वरील प्रमाणें रवि असतां वेदांत व गायन जाणणारा होतो.

केतुना गणितज्ञः ॥११४

अर्थ.—वरील प्रमाणें केतु असतां गणिती होतो.

गुरुसंबंधेन संप्रदायासिद्धिः ॥११५

अर्थ.—वर जे योग सांगितले त्यांत गुरूची दृष्टि अगर ते ते ग्रह गुरूच्या वर्गी असतां त्या त्या शास्त्रांप्रमाणें वागणारा होतो.

भाग्ये चैवम् ॥११६

अर्थ.—आत्मकारक नवमांशाच्या द्वितीय स्थानीं वर सांगितलेले योग झाले असतां सुद्धां तीं तीं फलें प्राप्त होतात.

सदाचैवमित्येके ॥११७

अर्थ—तृतीय स्थानीं सुद्धां वरील योग फलदायक होतात.

भाग्ये केतौ पापदृष्टे स्तब्धवाक् ॥११८

अर्थ.—आत्मकारक नवमांशकुंडलींत द्वितीय स्थानीं केतु पापदृष्ट असतां बोलतांना अडणारा होतो.

स्वपितृपदाद्भाग्ये रोगयोः पापे साम्ये केमद्रुमः॥११९

अर्थ.—लग्नापासून किंवा लग्नारूढापासून द्वितीय व अष्टम स्थानीं पाप ग्रह असतां किंवा उभय स्थानीं शुभ व पाप ग्रहसंख्या समान असतां केमद्रुम नामक योग होतो.

चंद्रदृष्टौ विशेषेण ॥ १२०

अर्थ.—वरील पाप ग्रहांवर चंद्राची दृष्टि असतां खात्रीनें केमद्रुम [दारिद्र्य] योग होतो.

सर्वेषां चैवं पाके ॥ १२१

अर्थ.—सर्व राशींच्या दशाकालीं पूर्वोक्त फलें प्राप्त होतात. (त्या त्या राशींतील ग्रहांचें फल, अथवा त्या त्या राशीच्या स्वामीचें फल त्या राशीच्या दशाकालीं प्राप्त होतें, असें जाणावें)

इति प्रथमाध्यायस्य द्वितीयः पादः

अथ पदम् ॥१

अर्थ.—मागें पृष्ठ १८ मध्यें आरूढ आणि पद हे एकाच अर्थाचे शब्द असून प्रत्येक भावाचें पद कसें जाणावें तें कुंडली देऊन सांगितलें आहे. त्या पदास अनुसरून हीं पुढील फलें सांगितलेलीं आहेत.

व्यये सग्रहे ग्रहदृष्टे श्रीमंतः ॥ २

अर्थ.—लग्नपदाच्या एकादश स्थानीं ग्रह असेल किंवा त्याची दृष्टि असेल तर लक्ष्मीवंत [धनाढ्य] होतो.

शुभैर्न्याय्योलाभः ॥३

अर्थ.—तो ग्रह जर शुभ असेल तर न्यायमार्गानें द्रव्यलाभ होतो.

पापैरमार्गेण ॥४

अर्थ.—पाप ग्रह असेल तर शास्त्रविरुद्ध मार्गानें द्रव्य मिळतें.

उच्चादिभिर्विशेषात् ॥ ५

अर्थ.—वर सांगितलेले ग्रह जर उच्च अगर स्वगृहीं असतील तर विशेष धन प्राप्त होतें असें जाणावें.

आरूढाल्लाभभवनं ग्रहः पश्येत्तु न व्ययम् ॥
यस्य जन्मनि सोपिस्यात्प्रबलो धनवानपि ॥
द्रष्टृग्रहाणां बाहुल्ये तदाद्रष्टरि तुंगगे ॥
सार्गलेचापि तत्रापि बव्हर्गलसमागमे ॥
शुभग्रहार्गले तत्र तत्राप्युच्चग्रहार्गले ॥
सुखानि स्वामिनादृष्टे लग्नभाग्याधिपेनवा ॥
जातस्य पुंसः प्राबल्यं निर्दिशेदुत्तरोत्तरम् ॥

हें वृद्ध नामक ग्रंथकाराचें मत आहे. जर लग्नपदापासून एकादश स्थानीं ग्रहाची दृष्टि असेल तर त्याचें धन नाश (खर्च) पावत

नाहीं. ज्याच्या जन्मकालीं हा योग प्रबल असेल तो धनवान् होतो. जर पाहणारे ग्रह अनेक असतील तर त्यांत तो उच्च असेल तो प्रबल होय. त्या पेक्षां जो अर्गला करीत असेल तो अधिक प्रबल. यापेक्षां जो अनेक अर्गलायुक्त ग्रहाशीं युत असतो तो अधिक प्रबल. यापेक्षां जो शुभ असून अर्गला करीत असेल तो अधिक बलवान्. त्यापेक्षां जो उच्च असून अर्गला करीत असेल तो अधिक बली. त्याहीपेक्षां जो चतुर्थ स्थानाच्या स्वामीनें दृष्ट असेल तो अधिक बलवान् व त्याहीपेक्षां जो लग्नेशानें किंवा नवमेशानें दृष्ट असेल तो अधिक बलवान् होय. या पेक्षां त्या पाहणाऱ्या ग्रहाचें एकापेक्षां एक अधिक असें प्राबल्य असतें. (या श्लोकांतील सुबानि या पदाचा अर्थ नीट जुळत नाहीं.)

नीचग्रहदृग्योगाद्व्ययाधिक्यम् ॥ ६

अर्थ.—लग्नपदापासून व्ययस्थानीं ग्रहाची दृष्टि असतां व्यय अधिक होतो. तो शुभ ग्रह असेल तर सन्मार्गानें व पाप ग्रह असेल तर कुमार्गानें धनव्यय जाणावा.

रविराहुशुक्रैर्नृपात् ॥ ७

अर्थ.—लग्नपदाच्या द्वादश स्थानीं रवि, राहु व शुक्र यांपैकीं कोणी अगर सर्व असतील तर राजापासून धनाचा व्यय होतो. [राजकीय संबंधांत धन खर्च होतें.]

चंद्रदृष्टौ निश्चयेन ॥ ८

अर्थ.—वरील ग्रहांवर जर चंद्र पाहत असेल तर राजकीय संबंधांत निश्चयानें धनव्यय होतो.

बुधेन ज्ञातिभ्यो विवादाद्वा ॥ ९

अर्थ.—लग्नपदाच्या द्वादश स्थानीं बुध असतां जातीनिमित्तानें किंवा वादांत धनाचा व्यय होतो.

गुरुणा करमूलात् ॥ १०

अर्थ.—लग्नपदाच्या द्वादश स्थानीं गुरु असतां करामुळें धन खर्च होतें.

कुजशनिभ्यां भ्रातृसुखात् ॥ ११

अर्थ.—ल.पदाच्या द्वा. स्थानीं मंगळ व शनि असतील तर भावंडापासून द्रव्य खर्च होतें.

एतैर्व्ययः एवं लाभः ॥ १२

अर्थ.—ज्याप्रमाणें बर बाराव्या स्थानांतील ग्रहामुळें खर्च होतो असें सांगितलें त्याचप्रमाणें ते ते ग्रह लग्नपदाच्या एकादश स्थानीं असतां त्या त्या बाबींपासून लाभ होतो असें जाणावें.

लाभे राहुकेतुभ्यां मुदररोगः ॥ १३

अर्थः—ल.पदाच्या सप्तम स्थानीं राहु किंवा केतु असले तर उदरसंबंधी रोग होतो.

तत्रकेतुना झटिति ज्यानि लिंगानि ॥ १४

अर्थ.—ल.पदाच्या द्वितीय स्थानीं केतु असतां वार्द्धक्याचीं चिन्हें लवकर दृगोचर होत नाहींत.

चंद्रगुरुशुक्रेषु श्रीमंतः ॥ १५

अर्थ.—ल.पदाच्या द्वितीय स्थानीं चंद्र, गुरु, शुक्र यां पैकीं कोणताही ग्रह असेल किंवा सर्व असतील तर मनुष्य श्रीमंत होतो.

उच्चेन वा ॥ १६

अर्थ.—वरील ठिकाणीं शुभ किंवा पाप ग्रह असून तो उच्च असेल तर श्रीमंत होतो.

स्वांशवदन्यत्प्रायेण ॥ १७

अर्थ.—सर्व फलें कारकांश कुंडलीच्या फलाप्रमाणें ध्यावीं.

लाभपदे केंद्रे त्रिकोणे वा श्रीमंतः ॥ १८

अर्थ.—लग्नारूढपदाच्या केंद्रीं, त्रिकोणांत किंवा सप्तमांत ग्रह असतां श्रीमंत होतो.

अन्यथा दुःस्थे ॥१९

अर्थ.—ल.पदाच्या ६।८।१२ स्थानीं ग्रह असतां श्रीमंत होत नाहीं.

केंद्रे त्रिकोणोपचयेषु त्रयोमैत्री ॥ २०

अर्थ.—लग्नपदाच्या केंद्रीं, त्रिकोणांत किंवा उपचय स्थानीं ग्रह असतां नवराबायको या उभयतांत मैत्री जाणावी.

रिपुरोगचिंतासु वैरम् ॥ २१

अर्थ.—ल.पदाच्या व कोणत्याही भावपदाच्या ६।८।१२ स्थानीं ग्रह असतां त्या त्या भावसंबंधी व्यक्तीशीं वैर जाणावें

पत्नीलाभयोर्दिष्ट्या निराभासार्गलया ॥ २२

अर्थ.—लग्नपद व त्याचें सप्तम यांतील ग्रह निष्प्रतिबंध अर्गलायोग करीत असतील तर भाग्यवान् जाणावा.

शुभार्गले धनसमृद्धिः ॥ २२

अर्थ.—वरील स्थानांतील ग्रह जर शुभ अर्गला करीत असतील तर त्या मनुष्याजवळ धनसमृद्धि होते.

जन्मकालघटिकास्वेकदृष्टासुराजानः ॥ २४

अर्थ.—जन्मलग्न, होरालग्न व घटिलग्न यांवर एखाद्या [illegible] दृष्टि असतां राजा होतो.

पत्नीलाभयोश्च राश्यंशकदृक्काणैर्वा ॥ २५

अर्थ.—लग्नकुंडली, नवमांश कुंडली व द्रेष्काण कुंडली

लग्न व सप्तम या स्थानावर एक ग्रह पाहत असेल तर राजा होतो

तेष्वेकस्मिन्न्यूने न्यूनम् ॥ २६

अर्थ.—लग्न, नवमांश व द्रेष्काण यांच्या पहिल्या व सातव्या स्थानांपैकीं एकाच स्थानावर ग्रह दृष्टि करील तर तो राजयोग कमी योग्यतेचा जाणावा.

एवमंशतो दृक्काणतश्च ॥२७

अर्थ.—लग्न, नवमांश द्रेष्काण, होरा, घटिका यांच्या पहिल्या स्थानावर ग्रहाची दृष्टि असतां राजा होतो.

शुक्रचंद्रयोर्मिथो दृष्टयोः सिंहस्थयोर्वा यानवंतः ॥२८

अर्थ—शुक्र आणि चंद्र यांची परस्परांवर दृष्टि असेल किंवा शुक्राच्या तृतीय स्थानीं चंद्र अथवा चंद्राच्या तृतीय स्थानीं शुक्र असेल तर वाहनें प्राप्त होतात,

शुक्रकुजकेतुषु वैतानिकाः ॥ २९

अर्थ.—शुक्र, मंगळ व केतु हे परस्परांस पाहत असतील किंवा ते एकमेकांच्या तृतीय स्थानीं असतील तर राजचिन्हें प्राप्त होतात.

स्वभाग्यदारमातृभावसमेषु शुभेषु राजानः ॥ ३०

अर्थ.—आत्मकारक ग्रहाच्या द्वितीय, चतुर्थ, पंचम या राश्यादि भावतुल्य शुभ ग्रह असल्यास राजा होतो. [याच प्रमाणें पुत्रादि कारक ग्रहांच्या वरील भावतुल्य ग्रह असतां त्या त्या व्यक्तींस राज योग प्राप्त होतो असें जाणावें.]

कर्मदासयोः पापयोश्च ॥ ३१

अर्थ.—आत्मकारक ग्रहाच्या तृतीय व षष्ठ या राश्यादि भावतुल्य पाप ग्रह असतील तर राजा होतो.

पितृलाभाधिपा चैवम् ॥ ३२

अर्थ.—याच प्रमाणें लग्नाधिपाच्या व सप्तमाधिपाच्या तृतीय व षष्ठ या राश्यादि भावतुल्य पाप ग्रह असतील तर राजयोग होतो.

मिश्रेसमाः ॥ ३३

अर्थ.—वरील स्थानीं एक शुभ व एक पाप ग्रह अशी मिश्र स्थिति असल्यास मनुष्य राजा न होतां त्या सारखा भोग व ऐश्वर्य भोगणारा होतो

दरिद्राविपरीते ॥ ३४

अर्थ.—वरील प्रकारच्या उलट [शुभ स्थानीं पाप ग्रह व पाप स्थानीं शुभ ग्रह अशी] स्थिति असल्यास दरिद्री होतो.

मातरि गुरौ शुक्रे चंद्रे वा राजकीयाः ॥ ३५

अर्थ.—लग्नाधिपाच्या किंवा सप्तमाधिपाच्या पंचमांत गुरु, शुक्र किंवा चंद्र असल्यास मोठा अधिकारी होतो.

कर्मणि दासे वा पापे सेनान्यः ॥ ३६

अर्थ.—लग्नाधिपापासून किंवा सप्तमाधिपापासून पंचम स्थानीं पाप ग्रह असतां सेनापति होतो.

स्वपितृभ्यां कर्मदासस्थदृष्टया तदीशदृष्टया मातृनाथदृष्टया च धीमंतः ॥ ३७

अर्थ.—आत्मकारक ग्रहापासून व लग्नापासून तृतीय स्थानीं असलेले ग्रह त्यांस पाहतील किंवा तृतीयेश व षष्ठेश पाहतील किंवा त्यांस पंचमेश पाहील तर उत्तम बुद्धिमान् होतो

दारेशदृष्टया सुखिनः ॥ ३८

अर्थ—लग्न व आत्मकारक ग्रह हे आपापल्या चतुर्थेशानें दृष्ट असतील तर मनुष्य सुखी होतो.

रोगेदृष्टया दरिद्राः ॥ ३९

अर्थ लग्न व आत्मकारक ग्रह हे आपापल्या व्ययेशाच्या दृष्टींत असल्यास मनुष्य दरिद्री होईल.

रिपुनाथदृष्टया व्ययशीलाः ॥ ४०

अर्थ.—लग्न व आत्मकारक ग्रह हे आपापल्या व्ययेशाच्या दृष्टींत असतील तर मनुष्य खर्चीक होईल.

स्वामिदृष्टया प्रबलाः ॥ ४१

अर्थ—लग्नावर त्याच्या स्वामीची व आत्मकारक ग्रहावर तो ज्या राशींत असेल त्या राशीच्या स्वामीची दृष्टि असेल तर तें लग्न व तो आत्मकारक ग्रह बलवान् होय

पश्चाद्रिपुभाग्ययोर्ग्रहसाम्यं बंधः कोणयो रिपुजाययोःकीटयुग्मयोर्दाररिष्फयोश्च ॥४२

अर्थ.—लग्नाच्या दुसऱ्या व बाराव्या, अथवा पांचव्या व नवव्या, अथवा सहाव्या व बाराव्या स्थानीं जितके ग्रह असतील तितके वेळां बंधनयोग [कारागृहवास] जाणावा. शुभग्रह असतां साधी कैद व पाप ग्रह असतां सक्तमजुरी सारखी कैद होईल असें समजावें.

शुक्राद्द्रौणपदस्थो राहुःसूर्यदृष्टो नेत्रहा ॥४३

अर्थ.—शुक्राच्या पंचमारूढ राशींत राहू असून त्यावर सूर्य पाहत असेल तर नेत्ररोगी होतो.

स्वदारगयोः शुक्रचंद्रयोरातोद्यं राजचिन्हानिच ॥ ४४

अर्थ.—आत्मकारक ग्रहाच्या चतुर्थ स्थानीं शुक्र व चंद्र असतां वाद्यविशेष व राजचिन्हें प्राप्त होतात.

इति प्रथमाध्यायस्य तृतीय,पादः

उपपदं पदं पित्रनुचरात् ॥ १

अर्थ.—लग्नापासून व्ययस्थानच्या राशींचें जें पद त्यास उपपद असें ह्मणतात.

तत्र पापस्य पापयोगे प्रव्रज्या दारनाशो वा ॥ २

अर्थ.—उपपदाचा स्वामी पाप ग्रह असतां किंवा उपपदस्थानीं पाप ग्रह असतां संन्यास योग होतो किंवा स्त्रीनाश होतो.

उपपदस्याव्यारूढत्वादेव नात्ररविः पापः ॥ ३

अर्थ.—उपपदस्थानीं मेष, सिंह इत्यादि पाप राशीस रवि असतां वरील फल मिळणार नाहीं.

शुभदृग्योगान्न ॥ ४

अर्थ.—त्याच प्रमाणें उ. प. वर शुभ ग्रह पाहत असतील तर वर सांगितलेलें फल मिळणार नाहीं.

नीचे दारनाशः ॥ ५

अर्थ.—उ. प. च्या ठिकाणीं असलेला ग्रह नीच असेल किंवा नीच नवमांशीं असेल तर स्त्रीनाश जाणावा.

उच्चे बहुदारः ॥ ६

अर्थ.—उ.प. च्या ठिकाणीं असलेला ग्रह उच्च असेल किंवा उच्च नवमांशीं असेल तर अनेक स्त्रिया होतात.

युग्मेच ॥ ७

अर्थ.—उपपदाच्या ठिकाणीं मिथुन राशि असेल तर अनेक स्त्रिया होतात.

तत्रस्वामियुक्ते स्वर्क्षेवातद्धेतावुत्तरायुषिनिर्दारः ॥ ८

अर्थ.—उपपद स्थानीं असलेला राशि आपल्या स्वामीनें युक्त असेल किंवा त्याचा स्वामी स्वगृहीं असेल तर आयुष्याच्या उत्तर भागांत स्त्रीविरहित होतो.

उच्चे तस्मिन्नुत्तमकुलादारलाभः ॥९

अर्थ.—उपपदाचा स्वामी उच्च असेल तर उत्तम कुलांतली स्त्री प्राप्त होईल.

नीचे विपर्ययः ॥१०

अर्थ.—उ.प.चा स्वामी नीच असेल तर नीच कुलांतली स्त्री मिळते.

शुभसंबंधात्सुंदरी ॥११

अर्थ.—उ. प. चा स्वामी शुभ ग्रहाच्या नवमांशीं अगर शुभ ग्रहानें दृष्ट असेल तर स्त्री सुंदर मिळते.

राहुशनिभ्यामपवादात्त्यागो नाशो वा ॥१२

अर्थ.—उ. प. स्थानीं राहु व शनि असतां लोकापवादामुळें स्त्रीचा त्याग होतो किंवा तिचा नाश होतो.

शुक्रकेतुभ्यां रक्तप्रदरः ॥१३

अर्थ.—उ.प. स्थानीं शुक्र व केतु असल्यास स्त्रीला रक्तप्रदर (धुपणी नामक रोग) होतो.

अस्थिस्रावो बुधकेतुभ्याम् ॥१४

अर्थ.—उ.प. स्थानीं बुध व केतु असल्यास स्त्रीला अस्थिस्राव नामक रोग होतो.

शनिरविराहुभिरस्थिज्वरः ॥१५

अर्थ.—उपपदस्थानीं शनि, रवि व राहु असल्यास स्त्रीला हाडीज्वर होतो.

बुधकेतुभ्यां स्थौल्यम् ॥१६

अर्थ.—उ.प. स्थानीं बुध व केतु असल्यास स्त्री स्थूल होते.

बुधक्षेत्रे मंदाराभ्यां नासिकारोगः ॥१७

अर्थ.—उपपदस्थानीं बुधाच्या घरीं (मिथुन अगर कन्या राशीस) शनि व मंगळ असतील तर नासिकारोग [पिनस वगैरे] होतात.

कुजक्षेत्रेच ॥१८

गुरुशनिभ्यां कर्णरोगो नरहकाच ॥१९

अर्थ.—मंगळाच्या क्षेत्रीं (मेष अगर वृश्चिक राशीस) गुरु व शनि असतील तर कर्णरोग व नाडीरोग होतात.

गुरुराहुभ्यां दंतरोगः ॥२०

अर्थ.—उपपदस्थानीं बुध किंवा मंगळाच्याक्षेत्रीं गुरु व राहु असतील तर दंतरोग होतात.

शनिराहुभ्यां कन्यातुलयोःपंगुर्वातरोगोवा ॥२१

अर्थ.—उ.प. स्थानीं कन्या अगर तूळ राशीस शनि व राहु असतां मनुष्य पंगु किंवा वातरोगी होतो.

शुभदृग्योगान्न ॥२२

अर्थ.—जर शुभ ग्रहाची दृष्टि असेल अगर ते ग्रह शुभ ग्रहानें युक्त असतील तर वरील दोष उत्पन्न होत नाहींत.

सप्तमांशग्रहेभ्यश्चैवम् ॥२३

अर्थ.—उपपदाच्या सप्तमांत जो राशि असेल त्याचा स्वामी व सप्तमांत जो नवमांश राशी असेल त्याचा स्वामी हे दोन ग्रह उपपद स्थानीं असतां वरील प्रमाणेंच दोष उत्पन्न होत नाहींत.

बुधशनिशुक्रेचानपत्यः ॥२४

अर्थ.—उपपदाच्या सप्तमांत जो नवमांत राशि असेल त्या राशींत बुध, शनि व शुक्र असल्यांस अनपत्ययोग होतो.

पुत्रेषु रविराहुगुरुभिर्बहुपुत्रः ॥२५

अर्थ.—उपपदाच्या सप्तमांत जो नवमांश राशि असेल त्याच्या स्वामीच्या पंचमांत रवि, राहु व गुरु असतील तर पुष्कळ मुलगे होतात.

चंद्रेणैकपुत्रः ॥२६

अर्थ.—उपपदाच्या सप्तमांत जो नवमांश राशि असेल त्याच्या पंचमांत चंद्र असतां एक मुलगा होतो.

मित्रे विलंबात्पुत्रः ॥२७

अर्थ.—उपपदाच्या सप्तमांत जो नवमांश राशि असेल त्याच्या स्वामीच्या पंचमांत अनपत्यत्व व बहुपुत्रत्व असा मिश्र योग असल्यास विलंबानें पुत्रलाभ होतो

कुजशनिभ्यां दत्तपुत्रः २८

अर्थ.—उपपदाच्या सप्तमांत जो नवमांश राशि असेल त्याच्या स्वामीच्या पंचमांत शनि व मंगळ असतां दत्तक पुत्र होतो.

ओजे बहुपुत्रः ॥२९

अर्थ.—उपपदाच्या सप्तमाच्या नवमांशस्वामी पासून पंचमांत विषम राशि असतां अनेक पुत्र होतात.

युग्मेल्प प्रजः ॥३०

अर्थ.—उपपदाच्या सप्तमाच्या नवमांश स्वामीपासून पंचमांत सम राशि असतां अल्प संतति होते.

गृहक्रमात्कुक्षितदीशपंचमांशग्रहेभ्यश्चैवम् ॥३१

अर्थ.—ज्याप्रमाणें जन्मलग्नापासून संततीचा विचार होतो, त्याच प्रमाणें उपपद व उपपदाचा स्वामी यांच्या पंचमाच्या नवमांश राशीच्या व त्याच्या स्वामीच्या वरूनही विचार होतो.

भ्रातृभ्यां शनिराहुभ्यां भ्रातृनाशः ॥३२

अर्थ.—उपपद व उपपदाचा स्वामी यांच्या तृतीय व एकादश स्थानीं शनि व राहु असतील तर भावंडाचा नाश होतो. [एकादश स्थानीं ज्येष्ठ व तृतीय स्थानीं कनिष्ठ भावाचा नाश होतो.]

शुक्रेण व्यवहिते गर्भनाशः ॥३३

अर्थ.—उपपद व त्याचा स्वामी यांच्या एकादशांत शुक्र असतां ज्येष्ठ भावंडाच्या गर्भाचा व तृतीय स्थानीं शुक्र असतां कनिष्ठ भावंडाच्या गर्भाचा नाश होतो. [म्हणजे तें भावंड होण्यापूर्वीच त्याचा गर्भांत नाश होतो.

पितृभावे शुक्रदृष्टेपि ॥३४

अर्थ. - लग्नावर किंवा अष्टमावर शुक्र पाहत असेल तर भावंडांचा गर्भ नाश पावतो.

कुजगुरुचंद्रबुधै र्बहुभ्रातरः ॥३५

अर्थ —उपपद व त्याचा स्वामी यांच्या एकादशांत व तृतीय स्थानीं मंगळ, गुरु, चंद्र व बुध असतां अनेक भावंडें होतात.

शन्याराभ्यां दृष्टे यथा स्वंभ्रातृनाशः ॥३६

अर्थ.—उपपद व त्याचा स्वामी यांच्या एकादशावर व तृतीयावर शनि व मंगळ पाहत असतील तर भावंडाचा नाश होतो. एकादशावर पाहत असतील तर ज्येष्ठ गर्भाचा व तृतीय स्थानावर पाहत असतील तर कनिष्ठ गर्भाचा नाश होतो. आणि उभय स्थानावर पाहत असतील तर उभय गर्भाचा नाश होतो.

शनिना स्वमात्रशेषश्च ॥३७

अर्थ.—उपपद व त्याचा स्वामी यांच्या एकादशावर व तृतीयावर शनि पहात असेल तर स्वतः मात्र जगतो व इतर भावंडें नाश पावतात.

केतौ भगिनीबाहुल्यम् ॥३८

अर्थ.—उपपद व त्याचा स्वामी यांच्या तृतीयांत व एकादशांत केतु असल्यास अनेक बहिणी होतात.

लाभेशाङ्गाग्यभे राहौ दंष्ट्रावान् ॥३९

अर्थ.—उपपद व त्याचा स्वामी याच्या द्वितीय स्थानीं राहू असल्यास मोठाल्या दाढा असतात.

केतौ स्तब्धवाक् ॥४०

अर्थ.—उपपद व त्याचा स्वामी याच्या द्वितीय स्थानीं केतु असल्यास अडखळत बोलणारा होतो.

मंदे कुरूपः ॥४१

अर्थ.—उपपद व त्याचा स्वामी याच्या द्वितीय स्थानीं शनि असल्यास कुरूप होतो.

स्वांशवशाद्गौरनीलपीतादिवर्णाः ॥४२

अर्थ.—आत्मकारक ग्रह ज्या ग्रहाच्या नवमांशीं असेल त्या ग्रहाच्या गुणानुरूप वर्ण असतो. (ग्रहांचे वर्ण अन्य जातक ग्रंथांत पहावे.)

अमात्यानुचरादेवताभक्तिः ॥४३

अर्थ.—अमात्यकारक ग्रहापेक्षां कमी अंशाचा जो ग्रह असेल त्या ग्रहानुरूप देवता भक्ति जाणावी. [पाप ग्रह असतां क्रूर देव-

तेची व शुभ असल्यास सौम्य देवतेची भक्ति होते. तो ग्रह उच्च किंवा स्वराशीचा असल्यास भक्ति कायमची असते व नीच असल्यास अस्थिर असते.]

स्वांशे केवलं पापसंबंधे परजातः ॥४४

अर्थ.—आत्मकारक ग्रहाच्या नवमांशीं केवळ पाप ग्रहाची दृष्टि असेल तर त्याचा जन्म जारज जाणावा.

नात्र पापात् ॥४५

अर्थ.—जर आत्मकारक ग्रहाचा नवमांशस्वामी पाप ग्रह असेल तर वरील योग होत नाहीं.

शनिराहुभ्यां प्रसिद्धिः ॥४६

अर्थ.—जर आत्मकारक ग्रहाच्या नवमांशावर शनि व राहु यांची दृष्टि असेल तर तो परजात आहे असें सर्वत्र प्रसिद्ध असेल.

गोपनमन्येभ्यः ॥४७

अर्थ.—जर अन्य ग्रहाची दृष्टि वरील ग्रहावर असेल तर परजात आहे ही गोष्ट गुप्त असेल.

शुभवर्गेपवादमात्रम् ॥४८

अर्थ.—जर आत्मकारक ग्रहाच्या नवमांशावर शुभ ग्रहाची दृष्टि असेल तर परजातयोग होत नाहीं.

द्विग्रहे कुलमुख्यः ॥४९

अर्थ.—आत्मकारक ग्रहाच्या नवमांशीं दोन ग्रह असतील तर आपल्या कुलांत मुख्य होतो.

इति मध्यमाध्यायस्य चतुर्थःपादः

द्वितीयोध्यायः

आयुःपितृदिनेशाभ्यां ॥१

अर्थ.—लग्नस्वामी व अष्टमस्वामी यांवरून आयुर्दायाचें मान जाणावें.

प्रथमयोरुत्तरयो वा दीर्घं ॥२

अर्थ.—लग्नेश व अष्टमेश हे दोन्ही चर राशीस असतील अथवा लग्नेश स्थिर राशीस व अष्टमेश द्विस्वभाव राशीस अथवा लग्नेश द्विस्वभाव व अष्टमेश स्थिर राशीस असेल तर दीर्घायु योग होतो.

प्रथम द्वितीययोरंत्ययोर्वा मध्यं ॥३

अर्थ.—लग्नेश चर व अष्टमेश स्थिर किंवा अष्टमेश चर व लग्नेश स्थिर किंवा लग्नेश व अष्टमेश दोन्ही द्विस्वभाव राशीस असतील तर मध्यमायु योग होतो.

मध्ययोराद्यंतयो वा हीनं ॥४

अर्थ.—लग्नेश व अष्टमेश दोन्ही स्थिर राशीस असतील व लग्नेश चर व अष्टमेश द्विस्वभाव किंवा लग्नेश द्विस्वभाव व अष्टमेश चर राशीस असेल तर अल्पायु योग होतो.

एवं मंदचंद्राभ्यां ॥५

अर्थ.— याच प्रमाणें शनि व चंद्र यांवरून दीर्घ, मध्यम व अल्प आयुर्दायाची कल्पना करावी.

पितृकालतश्च ॥६

अर्थ.—जन्मलग्न व होरालग्न यांवरूनही पूर्वोक्त रीतीनें आयुर्दाय तयार करावा.

खुलासा.— सुगमतेस्तव खालील कोष्टक पहा.

दीर्घायुयोग

लग्नेश—चर	लग्नेश—स्थिर	लग्नेश—द्विस्वभाव
अष्टमेश-चर	अष्टमेश--द्विस्वभाव	अष्टमेश-स्थिर

मध्यायुयोग

ल०—चर	ल०—स्थिर	ल०—द्विस्वभाव
अ०--स्थिर	अ०—चर	अ०— ,,

अल्पायुयोग

ल०—चर	ल०—स्थिर	ल०—द्विस्वभाव
अ०—द्विस्वभाव	अ०— ,,	अ०—चर

संवादात्प्रामाण्यम् ॥७

अर्थ.—लग्नेश व अष्टमेश, लग्न व चंद्र आणि जन्मलग्न व होरालग्न या तीन प्रकारांनीं प्रथम निरनिराळा आयुर्दाय तयार करावा. जर तीनही प्रकारांनीं एकच मान येईल तर तो आयुर्दाय निर्विवाद जाणावा. पण तीनही प्रकारांवरून एकच मान न येईल तर निदान दोन प्रकारांनीं तरी जुळणारें मान घ्यावें. एकाच प्रकारावरून निर्णय करूं नये.

विसंवादे पितृकालतः ॥८

अर्थ.—जर तीन प्रकारांवरून भिन्न मान येत असेल तर जन्मलग्न व होरालग्न यांवरून येणारें मान घ्यावें.

पितृलाभगे चंद्रे चंद्रमंदाभ्यां ॥९

अर्थ.—लग्नांत किंवा सप्तमांत चंद्र असेल तर चंद्र व शनि यांवरूनच आयुर्मान जाणावें.

खुलासा.—३२ वर्षेपर्यंत अल्पायु, ६४ वर्षेपर्यंत मध्यायु व ९६ वर्षे पर्यंत दीर्घायु या प्रमाणें आयुर्दाचा एक प्रकार आहे. दुसरा ३६, ७२ व १०८ आणि तिसरा ४०, ८० व १२० या प्रमाणें आयुर्मानाचे तीन प्रकार आहेत. जर दुसऱ्या सूत्रावरून दीर्घायु

योग स्पष्ट असेल तर ६४, ७२ अथवा ८० वर्षे पर्यंत आयुष्य निश्चित आहे. आतां या पुढील तिसऱ्या खंडाचें मान कसें काढावें याचा प्रकार असा.—जर लग्नेश व अष्टमेश हे राशीच्या आरंभींच असतील तर ३२।३६ अथवा ४० वर्षे पूर्ण तिसरें खंड घ्यावें. ह्मणजे पूर्ण दीर्घायु योग होतो. पण ते राशीच्या अंतीं असल्यास तिसऱ्या खंडाबद्दल शून्य वर्षे घ्यावीं. ह्मणजे ६४,७२ अथवा ८० वर्षेच आयुष्य जाणावें. जर ते राशीच्या मध्यें कोठें तरी असतील तर त्रैराशिकानें वर्षे घ्यावीं. राशीचे अंश ३० असतात. ह्मणून ३० अंशांस जर ३२।३६ अथवा ४०वर्षे तर भोग्य अंशांस किती? असें त्रैराशिक मांडून येणारीं वर्षे दुसऱ्या खंडांत मिळवावीं. येईल तें आयुर्मान झालें. हें करितांना अष्टमेश व लग्नेश यांचीं वर्षे पृथक् पृथक् मांडून त्यांची बेरीज घ्यावी व त्या बेरजेचें जें अर्ध येईल तें घ्यावें. याप्रमाणें जेव्हां दीर्घायुत्व बोध होत असेल तेव्हां ६४।७२ अथवा ८० मध्यें वरील मान मिळवावयाचें, जेव्हां मध्यायुत्व बोध होत असेल तेव्हां ३२,३६ अथवा ४० मध्यें मिळवावें, व जेव्हां अल्पायुत्व बोध होत असेल तेव्हां जन्मापासून तितकेंच आयुष्य घ्यावें.

उदाहरणः—



या कुंडलींत लग्न मिथुन राशीचें असून त्याचा स्वामी बुध हा कन्येंत ह्मणजे द्विस्वभाव राशीस आहे. आणि अष्टम स्थानीं मकर

रास असल्यामुळें तिचा स्वामी शनि हा मेष या चर राशींत आहे. या प्रमाणें लग्नेश द्विस्वभाव व अष्टमेश चर राशीस आहे ह्मणून हा अल्पायु योग झाला. अर्थात् ३२ वर्षे पर्यंत आयुष्याचें शिकस्त मान झालें. पण त्याची नक्की इयत्ता किती हें जाणण्यासाठीं बुध हा कन्येंत किती अंश भोग्य आहे व शनि हा मेष राशींत किती भोग्य आहे हें पाहिलें पाहिजे. जन्मकाळीं बुध ५ रा. २३ अं. ३३ क. इतका असून शनि ११ रा २६ अंश ६ क. इतका आहे राशि सोडून प्रत्येकाचे अंशादि ३० तून वजा केल्यानें बुधाचे भोग्यांश ६ क. २७ इतके व शनीचे भोग्यांश ३ क. ५४ इतके आले. ह्मणून त्रैराशिकानें बुधाचीं —

३०अं. : ६अं. २७क. : : ३२व =६।१०।१५ वर्षे आलीं. आणि शनीचीं—

३०अं. : ३ अं. ५४क. : : ३२व. =४।१।२७ वर्षे आलीं.

या दोहोंची बेरीज ११।०।१२ वर्षे इतकी आली व तिचें अर्ध ५।६।६ वर्षे इतकें आलें. कुंडलींत अल्पायु योग झालेला आहे, ह्मणून जन्मापासून ५व. ६म. ६दि. इतकें आयुष्याचें मान आलें.

आयुष्याच्या मर्यादा मानण्याचे तीन प्रकार आहेत, त्यांतून कोणत्या तरी आपल्या अनुभवास जो विशेष येत असेल तोच प्रकार घ्यावा. अल्पमध्यमदीर्घायुत्व मात्र वरील तीन प्रकारांनीं ठरविलें पाहिजे. या उदाहरणांत फक्त एकाच प्रकारानें अल्पायुत्व ठरविलें आहे, तें केवळ दिग्दर्शनार्थ समजावें.

शनौ योगहेतौ कक्ष्याऱ्हासः ॥१०

अर्थ.—जर दीर्घमध्यमाल्पायुत्व ठरवितांना शनीचा संबंध असेल तर दीर्घायु ठरल्यास मध्यायु व मध्यायु ठरल्यास अल्पायु व अल्पायु ठरल्यास अल्पामध्यें अल्पायु समजावा.

विपरीतमित्यन्ये ॥ ११

अर्थ.—शनीचा संबंध नसतां वरील प्रकारच्या उलट समजावें, असें कित्येक आचार्य ह्मणतात.

सूत्राभ्यां न स्वर्क्षतुंगगे सौरे ॥१२
केवल पापदृग्योगिनि च ॥१३

अर्थ. – जर शनि हा स्वराशीस अगर उच्च असेल किंवा त्यावर शुभ ग्रह पहात नसून केवळ पाप ग्रहाचीच दृष्टि असेल तर आयुर्दायांत कमीपणा करूं नये.

पितृलाभगे गुरौ केवलशुभदृग्योगिनि च
कक्ष्यावृद्धिः ॥१४

अर्थ.—जर गुरु, लग्नीं अगर सप्तमांत असेल व तो फक्त शुभ ग्रहानें युक्त व दृष्ट असेल तर आयुर्दाय वाढविला पाहिजे. अल्पाल्पयुत्व असेल तर तो अल्पायु समजावा. अल्पायुत्व असेल तर मध्यायु समजावा, मध्यायुत्व असेल तर दीर्घायु व दीर्घायुत्व असेल तर दीर्घामध्यें दीर्घायु समजावा. (शनिसंबंधाच्या मतास हे अपवाद आहेत.)

मलिने द्वारब.ह्ये नवांशे निधनं द्वारद्वारेशयोश्च
मलिने ॥१५

अर्थ.—या ठिकाणीं नवांशदशेचा उपयोग करावयाचा. बृहत्पाराशरींत या दशेची माहिती दिली आहे. यांत चर व स्थिर असे दोन पक्ष आहेत. लग्नापासून प्रत्येक भावराशीचीं ९ वर्षे घ्यावयाचीं हा चर पक्ष होय. स्थिरपक्षांत लग्न विषम राशीचें असतां लग्नराशीपासून क्रमानें राशि घ्यावयाचे. व सम लग्न असतां उलट क्रमानें राशि घ्यावयाचे. ज्या राशीची दशा असेल त्या राशींत पाप ग्रह असेल व त्या राशीचा स्वामी त्या राशीपासून जितक्या अंतरावर

असेल तितक्याच अंतरावर पुढें पाप ग्रह असेल तर त्या दशेंत मरण प्राप्त होतें. त्याच प्रमाणें ज्या राशीची दशा असेल त्या राशींत पाप ग्रह असेल व त्या राशीचा स्वामी पाप ग्रह असेल तर त्या दशेंत मरण प्राप्त होतें.

शुभदृग्योगान्न ॥१६

अर्थ.—वर जे योग सांगितले आहेत ते शुभ ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असतां होत नाहींत. (ह्मणजे मरण येत नाहीं.)

रोगेशे तुंगे नवांशवृद्धिः ॥१७

अर्थ.—अष्टम स्थानाचा स्वामी उच्च असला तर मागें सांगितलेल्या आयुर्दायांत आणखी ९ वर्षें मिळवावीं.

तत्रापि पदेशदशांते पदनवांशदशायां पितृदिनेशत्रिकोणे वा ॥१८

अर्थ.—सतराव्या श्लोकांत जो वृद्धिपक्ष सांगितला त्याला अनुलक्षून हें सूत्र आहे. लग्नारूढ राशीचा स्वामी ज्या राशींत असेल त्या राशीच्या दशेंत अथवा लग्नारूढ राशीच्या नवांश दशेंत अथवा लग्नेश व अष्टमेश यांच्या त्रिकोण राशींच्या दशेंत मरण येतें.

पितृलाभरोगेशे प्राणिनि कंटकादिस्थे स्वतश्चैवं त्रिधा ॥१९

अर्थ.— आतां दुसऱ्या प्रकारानें आयुर्दाययोग सांगतात. लग्न व सप्तम यांपासून अष्टमाचे स्वामी केंद्रीं, पणफरस्थ किंवा आपोक्लीमस्थ असतां दीर्घादि आयुर्दाय जाणावा. केंद्रीं असतां दीर्घायु, पणफरस्थ असतां मध्यायु व आपोक्लीमस्थ असतां अल्पायु होतो. त्याचप्रमाणें (आत्म) कारक ग्रहापासूनही आयुर्दाय सिद्ध करावा.

योगात्समे स्वस्मिन्विपरीतम् ॥२०

अर्थ.—जर लग्न, सप्तम यांपासून नवम स्थानीं कारक ग्रह

असतां आयुर्दाय उलट समजावा. ह्मणजे दीर्घ असेल तर मध्यम, मध्यम असेल तर अल्प व अल्प असेल तर अल्पाल्प.

आयुर्दायासंबंधानें वृद्धोक्त विशेष प्रकार.

एकोष्टमेशः स्वोच्चस्थः पर्यायार्द्धं प्रयच्छति ॥
नीचस्थो नाशयेत्पर्यायार्द्धमायुषि निश्चिते ॥
नीचरंध्रेशसंयुक्ताःपर्यायार्द्धं पृथक् पृथक् ॥
गृहाविनाशयंत्येवं निर्णीते परमायुषि ॥
उच्चरंध्रेशसंयुक्तग्रहैः प्रत्येक मुन्नयेत् ॥
एकैकमर्द्धपर्यायं परमायुषि निश्चिते ॥

जर अष्टमेश उच्च असला तर तो आपल्या दशेचीं अर्धी वर्षें अधिक आयुष्य देतो. तो नीच असला तर आपल्या दशेचीं अर्धी वर्षें कमी करितो. नीच असून अष्टमेशानें युक्त असलेले ग्रह आपल्या दशेचीं अर्धी वर्षें कमी करितात व उच्च असून अष्टमेशानें युक्त असलेले ग्रह आपल्या दशेचीं अर्धी वर्षें अधिक आयुर्दाय करितात.

राशितः प्राणः ॥ २१

अर्थ.—आयुर्दाय प्रकरणीं राशीचीं बलें ध्यावीं

रोगेशयोःस्वत ऐक्ये योगे वा मध्यम् ॥२२

अर्थ.— आतां दुसऱ्या प्रकारानें मध्यायु योग सांगतात. लग्न व सप्तम यांचे अष्टमेश कारक ग्रह असतील अगर कारक ग्रहानें युक्त असतील तर मध्यायु योग होतो.

पितृलाभयोः पापमध्यत्वे कोणपयोगे वा कक्ष्याऱ्हासः ॥२३

अर्थ.— लग्न व सप्तम हे राशि पाप ग्रहांच्या मध्यवर्ती असतील तर कक्ष्याऱ्हास [दीर्घ असऱ्यास मध्य इ०] होतो. त्याच प्रमाणें लग्न व सप्तम यांच्या त्रिकोणांत पाप ग्रह असतील तर कक्ष्याऱ्हास (दीर्घ

असल्यास मध्य इ०) होतो.

स्वस्मिन्नप्येवम् ॥२४

अर्थ.—याच प्रमाणें कारक ग्रह व त्याचें सप्तम पाप ग्रहांच्या मध्यवर्ती असेल किंवा त्यांच्या त्रिकोणांत पाप ग्रह असतील तर कक्ष्यान्हास [दीर्घ असल्यास मध्य इ०] होतो.

तस्मिन्पापे नीचेऽतुंगेऽशुभसंयुक्ते च ॥२५

अर्थ.—कारक ग्रह पाप असून नीच असेल किंवा नीच असून पापयुक्त असेल तर कक्ष्यान्हास [दीर्घ असल्यास मध्य इ.] होतो.

अन्यदन्यथा ॥२६

अर्थ.—लग्न, सप्तम व कारक, सप्तम यांस वरील तीन सूत्रांत सांगितल्या प्रमाणें शुभ ग्रहांचा संबंध झाला असेल तर कक्ष्यावृद्धि होते.

गुरौ च ॥२७

अर्थ.—ज्याप्रमाणें लग्न, सप्तम व कारक सप्तम यांवरून कक्ष्यान्हास अगर कक्ष्यावृद्धि होते त्याच प्रमाणें गुरूवरूनही होते.

पूर्णेन्दुशुक्रयोरेकराशिवृद्धिः ॥२८

अर्थ.—२६व्या सूत्रांत जो कक्ष्यावृद्धीचा प्रकार सांगितला आहे तो जर शुक्र व पूर्ण चंद्र हे एकाच राशीवर असतील तर होत नाहीं. (२६व्या सूत्राचा हा अपवाद आहे.)

शनौ विपरीतम् ॥२९

अर्थ.—पाप ग्रहांनीं जो कक्ष्यान्हासाचा प्रकार सांगितला आहे तो जर शनि उक्त स्थानीं असेल तर होत नाहीं.

स्थिरदशायां यथा खंडं निधनम् ॥३०

अर्थ.—पूर्ण, मध्य व अल्प आयुर्दायाप्रमाणें ज्या खंडांत आयुष्य पूर्ण होतें त्या खंडांत जी नवमांश दशा असेल त्या दशेंत मरण येतें.

तत्रर्क्षे विशेषः ॥३१

अर्थ.—मरणखंडांत जो मरणप्रद राशि असेल त्याच्या दशेंत मृत्यु येतो.

पापमध्ये पापकोणे रिपुरोगयोःपापे वा ॥३२

अर्थ.—लग्नापासून किंवा कारक ग्रहापासून द्वादश व अष्टम राशींच्या किंवा त्यांच्या त्रिकोण राशींच्या दशेंत मृत्यु येतो. पण लग्न व लग्नसप्तम किंवा कारक आणि कारकसप्तम हे राशी पाप ग्रहांच्या मध्यवर्ती असतील किंवा त्यांच्या त्रिकोणांत पाप ग्रह असतील तर वरील राशींच्या दशेंत मृत्यु येतो असें समजावें. शुभ ग्रहांचा संबंध असतां मृत्यु येत नाहीं.

तदीशयोः केवलक्षीणेन्दुशुक्रदृष्टौ वा ॥३३

अर्थ.—जर वरील द्वादशाधिपति व अष्टमेश यांवर क्षीण चंद्र व शुक्र यांची दृष्टि असेल तर द्वादश व अष्टम या राशींच्या दशेंत मृत्यु येतोच.

तत्राप्याद्यक्षौ रिनाथदृश्यनवभागाद्वा ॥३४

अर्थ,—निधनप्रद राशीच्या षष्ठेशानें नवमांशकुंडलींत जो राशी दृष्ट असेल त्या राशीच्या अंतर्दशेंत मृत्यु येतो.

पितृलाभभावेशप्राणी रुद्रः ॥३५

अर्थ.—लग्न व सप्तम यांच्या अष्टमेशांत जो ग्रह बलवान् असेल तो रुद्रसंज्ञक ग्रह जाणावा.

अप्राप्यपि पापदृष्टः ॥३६

अर्थ.—लग्न व सप्तम यांचे अष्टमेश दुर्बल असतां जो ग्रह पापदृष्ट असेल तोच रुद्रसंज्ञक होतो.

या प्रकारानें रुद्रग्रहाचे दोन भेद होतात.

प्राणिनि शुभदृष्टे रुद्रशूलांतमायुः ॥३७

अर्थ.—जो बलवान् रुद्रग्रह शुभ ग्रहाच्या दृष्टींत असेल त्याच्या त्रिकोण राशीच्या अंतापर्यंत आयुष्य जाणावें.

तत्रापि शुभयोगे ॥३८

अर्थ.—जर दुसरा रुद्रग्रह शुभ ग्रहानें युक्त असेल तर त्याच्या त्रिकोण राशींच्या अंतापर्यंत आयुर्दाय असतो.

व्यर्कपापयोगेन ॥३९

अर्थ.—३८व्या सूत्रांतील पाप ग्रह रवीशिवाय इतर ग्रह असेल तर तो आयुर्दाय होत नाहीं.

मंदारेंदुदृष्टे शुभयोगाभावे पापयोगेपि वा शुभदृष्टौ वा परतः ॥४०

अर्थ.—बलवान् किंवा दुर्बल रुद्र ग्रह फक्त शनि मंगळ व चंद्र यांनीं दृष्ट असेल, किंवा रुद्र ग्रह पाप ग्रहानें युक्त असून त्यावर शनि, मंगळ व चंद्र यांची दृष्टि असेल किंवा रुद्र ग्रहावर शुभ ग्रहाची दृष्टि असून शनि, मंगळ व चंद्र यांची दृष्टि असेल तर रुद्र ग्रहाच्या त्रिकोण राशीच्या दशेच्या शेवटीं आयुष्य समाप्त होतें.

वृद्धोक्त शुभपाप ग्रहांच्या संज्ञाः—

अर्कारमंदफणिनः क्रमात्क्रूरा यथाश्रयम् ॥
चंद्रोपि क्रूर एवात्र क्वचिदंगारकाश्रये ॥
गुरुध्वज कविज्ञाः स्युर्यथापूर्वंशुभग्रहः ॥

रवि, मंगळ, शनि व राहू हे ग्रह क्रूर राशींत असतां एकापेक्षां एक अधिक असे क्रूर ग्रह आहेत. शुभ राशीस असतां ते क्रूर ग्रह होत नाहींत. चंद्र हा क्रूर राशीस असतां किंवा मंगळानें युक्त असतां क्रूर ग्रह होतो. गुरु, केतु, शुक्र व बुध हे शुभ राशीस

असतां एकापेक्षां एक अधिक असे शुभ ग्रह आहेत. ते पाप राशीस असतां शुभ ग्रह नसतात.

दोन्ही रुद्र ग्रह पाप असतां प्रथम त्रिकोण राशीच्या दशेंत व एक शुभ व दुसरा पाप असतां मधील त्रिकोण राशीच्या दशेंत व दोन्ही शुभ असल्यास तिसऱ्या त्रिकोण राशीच्या दशेंत मृत्यु येतो.

रुद्राश्रयेपि प्रायेण ॥४१

अर्थ.—रुद्र ग्रह ज्या राशीस असेल त्या राशीच्या दशेंत बहुशः मृत्यु येतो. प्राणेय या पदावरून त्या राशीच्या दशेंतही मरण येतें.

क्रिये पितरि विशेषेण ॥४२

अर्थ.—जर मेष लग्न असेल तर रुद्रग्रहाश्रित राशीच्या दशाकालींच मृत्यु येतो.

प्रथममध्यमोत्तमेषु वा तत्तदायुषाम् ॥४३

अर्थ.—अल्प, मध्य व दीर्घ या प्रमाणें जो आयुर्दाय असेल त्याला अनुसरून रुद्र ग्रहाच्या राशीस अथवा त्याच्या पंचम राशीस अथवा नवम राशीस यथाक्रम आयुर्दायसमाप्ती होते.

स्वभावेशो महेश्वरः ॥४४

अर्थ.— आत्मकारक ग्रहापासून आठव्या राशीचा अधिपति जो ग्रह त्याला 'महेश्वर' ही संज्ञा आहे.

स्वोच्चे स्वगृहे रिपुभावेशः प्राणी ॥४५

अर्थ.—जर आत्मकारक ग्रहापासून अष्टमेश उच्च अगर स्वगृहीं असेल तर त्या ग्रहापासून द्वादशाधिपति किंवा अष्टमाधिपति यांत बली असेल तो महेश्वर ग्रह मानावा.

पाताभ्यां योगे स्वस्य तयोर्वा रोगे ततः ॥४६

अर्थ.—जर आत्मकारक ग्रह किंवा त्याचें अष्टमस्थान राहु किंवा केतु यांनीं युक्त असेल तर त्या आत्मकारक ग्रहापासून रव्यादि क्रमानें

येणारा जो सहावा ग्रह तोच 'महेश्वर' संज्ञक होतो.

वर जे २।३ प्रकारचे महेश्वर नामक ग्रह सांगितले त्या सर्वांत जो बलवान् असेल तो महेश्वर संज्ञक होतो.

प्रभुभाववैरीशप्राणी पितृलाभप्राण्यनुचरो विषमस्थो ब्रह्मा ॥४७

अर्थ.—लग्न व सप्तम या दोन राशींत जो राशी बलवान् असेल त्या राशीपासून ६।८।१२ स्थानच्या राशींच्या स्वामीं मध्यें जो ग्रह बलवान असेल तो लग्न व सप्तम या राशींत जो राशि बलवान् असेल त्याच्या पृष्ठभागीं विषम राशीला असल्यास 'ब्रह्मा' संज्ञक ग्रह होतो. (सातव्या स्थानापासून चवाव्या स्थानांतापर्यंतचा जो कुंडलीचा भाग तें लग्नाचें पृष्ठ होय व लग्नापासून सहाव्या स्थानांतापर्यंतचा जो कुंडलीचा भाग तें सप्तमाचें पृष्ठ होय.)

ब्रह्माणि शनौ पातयो वा ततः ॥४८

अर्थ.—शनि, राहू किंवा केतु यांत जो ब्रह्मा ग्रह असेल त्या पासून रव्यादि क्रमानें जो सहावा ग्रह असेल तोच ब्रह्मा ग्रह मानावयाचा.

बहूनां योगे स्वजातीयः॥४९

अर्थ.—अनेक ग्रह ब्रह्मा असतील तर आत्मकारक ग्रहाच्या जातीचा जो अधिक अंशाचा ग्रह असेल तोच ब्रह्मा ग्रह होतो.

राहुयोगे विपरीतम् ॥५०

अर्थ.—जर ब्रह्मा ग्रह राहूनें युक्त असेल तर वरील सूत्रांतील जो कमी अंशाचा ग्रह असेल तोच ब्रह्मा ग्रह होतो.

ब्रह्मा स्वभावेशो भावस्थः ॥५१

अर्थ.—आत्मकारक ग्रहाच्या अष्टमस्थ राशीचा स्वामी व अष्टमस्थ ग्रहही ब्रह्मा संज्ञक जाणावा. अष्टमेशच अष्टम स्थानीं असेल तर तोच ब्रह्मा ग्रह निर्विवाद जाणावा.

विवादे बली ॥५२

अर्थ.—जेव्हां दोन ग्रह ब्रह्मा असतील तेव्हां त्यांत जो बलवान् असेल तोच ब्रह्मा जाणावा.

ब्रह्मणो यावन्महेश्वरर्क्षदशांतमायुः ॥५३

अर्थ.—ब्रह्माग्रहाश्रित राशीपासून महेश्वराश्रित राशीपर्यंत आयुष्य जाणावें.

तत्रापि महेश्वराभावेशत्रिकोणाब्दे ॥५४

अर्थ.—महेश्वराश्रित राशीच्या महादशेंत महेश्वराश्रित राशीच्या अष्टमस्थ राशीच्या त्रिकोणस्थ राशीच्या अंतर्दशेंत मृत्यु येतो. [या ठिकाणीं द्वादशवर्षात्मक दशा घ्यावयाच्या.]

स्वकर्मचित्तरिपुरोगनाथप्राणी मारकः ॥५५

अर्थ.—आत्मकारक ग्रहापासून ३।६।८।१२ या स्थानांचे अधिपति जे ग्रह त्यांत जो बलवान् असेल तो मारक ग्रह जाणावा.

तद्दक्षदशायां निधनम् ॥५६

अर्थ.—मारकग्रहाश्रित राशीच्या किंवा त्या राशीच्या स्वामीच्या दशेंत मरण येतें.

तत्रापि कालाद्रिपुरोगचित्तनाथापहारे ॥५७

अर्थ.—मारक ग्रहाच्या महदशेंत कारक ग्रहाच्या सप्तमस्थ राशीच्या ६।८।१२ स्थानांच्या अधिपतींमध्यें जो बलवान् असेल त्याच्या अंतर्दशेंत मरण प्राप्त होतें.

इति द्वितीयाध्यायस्य प्रथमपादः

आतां आईबापादिकांच्या निधनाविषयीं त्यांचे कारक ग्रह सांगतात.

रविशुक्रयोः प्राणी जनकः ॥१

अर्थ.—रवि व शुक्र यांत जो बलवान् असेल तो मातृकारक ग्रह जाणावा.

चंद्रारयो र्जननी ॥२

अर्थ.—चंद्र व मंगळ यांत जो बलवान् असेल तो मातृकारक ग्रह जाणावा.

अप्राण्यपि पापदृष्टः ॥३

अर्थ.—रवि-शुक्र अथवा चंद्र-मंगळ हे दुर्बल असतील व त्यांच्यावर पाप ग्रहाची दृष्टि असतां ते पितृकारक किंवा मातृकारक होतात.

प्राणिनि शुभदृष्टे तच्छूले निधनं मातापित्रोः ॥४

अर्थ.—पितृमातृकारक बलवान् ग्रह शुभ ग्रहाच्या दृष्टींत असेल तर तो ग्रह ज्या राशीस असेल त्या राशीच्या त्रिकोणस्थ राशींच्या दशेंत पिता अगर माता यांस मरण येतें.

तद्भावेशे स्पष्टबले ॥५

तच्छूलइत्यन्ये ॥६

अर्थ.—बलवान् अगर दुर्बल अशा कारक ग्रहांच्या अष्टमेशांत जो अधिक बलवान् असेल त्याच्या त्रिकोण राशींच्या दशेंत मरण येतें, असें कित्येकांचें मत आहे.

आयुषि चान्यत् ॥७

अर्थ.—आईबापांच्या आयुष्याचा विचार करितांना त्यांच्या कारक ग्रहांवरून जे अन्य प्रकार आहेत तेही विचारांत घ्यावे.

अर्कज्ञयोगे तदाश्रये लग्नमेषदशायां पितुरित्येके ॥८

अर्थ.—कित्येकांचें असें मत आहे कीं, जर लग्नाच्या द्वादश

स्थानीं सिंह, मिथुन अगर कन्या यांपैकीं एखाद्या राशीस रवि व बुध एकत्र असतील तर लग्नाच्या पंचमस्थ राशीच्या दशेंत बापाला मरण येतें. दुसरा पाठ असा आहे कीं, जर मेषलग्नीं रविबुध एकत्र असतील तर मेष राशीच्या दशाकालीं बापास मरण येतें.

व्यर्कपापमात्रदृष्टयोःपित्रोः प्राग्द्वादशाब्दात् ॥९

अर्थ.—जर बलवान् अगर दुर्बल असे मातृपितृनिधनकारक ग्रह रवीशिवाय पाप ग्रहांनीं दृष्ट असतील तर माता अगर पिता यापैकीं ज्यास वरील योग होईल त्याला १२ वर्षे पूर्ण होण्या पूर्वीच मृत्यु होईल.

गुरुशूले कलत्रस्य ॥१०

अर्थ.—गुरु ज्या राशीस असेल त्याच्या त्रिकोणस्थ राशीच्या दशेंत पत्नीचें निधन जाणावें.

तत्तच्छूले तेषाम् ॥११

अर्थ.—पुत्र, मामा इत्यादिकांचे जे कारक ग्रह त्यांच्या त्रिकोण दशेंत त्यांचें मृत्यु होतात.

कर्मणि पापयुतदृष्टे दुष्टं मरणम् ॥१२

अर्थ.—लग्नापासून अगर कारक ग्रहापसून तृतीय स्थानीं पाप ग्रह अगर दृष्टि असल्यास वाईट मरण येतें.

शुभं शुभदृष्टियुते ॥१३

अर्थ.—लग्नापासून अगर कारक ग्रहापासून तृतीय स्थानीं शुभ ग्रह अगर दृष्टि असल्यास चांगलें मरण येतें.

अग्नि, पाण्यांत बुडणें, बंधन इत्यादि कारणांनीं येणारें मरण तें दुष्ट व ज्वरादि रोगांनीं येणारे तें शुभ मरण होय.

मिश्रे मिश्रम् ॥१४

अर्थ.—शुभ आणि पाप अशा दोन्ही प्रकारचे ग्रह अगर

त्यांची दृष्टि असेल तर शुभ व दुष्ट असें मिश्र प्रकाराचें मरण येतें.

आदित्येन राजमूलात् ॥१५

अर्थ.—जर तृतीय स्थानीं रवि अगर त्याची दृष्टि असेल तर राजकारणानें मरण येतें.

चंद्रेण यक्ष्मणः ॥१६

अर्थ.—जर तृतीय स्थानीं चंद्र असेल अगर त्याची दृष्टि तर क्षयरोगानें मरण येतें.

कुजेन व्रण.इ.स्त्राग्निदाहाद्यैः ॥१७

अर्थ.—जर तृतीय स्थानीं मंगळ असेल अगर त्याची दृष्टि असेल तर व्रण, शस्त्र व अग्नि यांपासून मृत्यु होतो.

शनिना वातरोगात् ॥१८

अर्थ—जर वरील स्थानीं शनि अगर त्याची दृष्टि असेल तर वातरोगानें मरण येतें.

मंदमांदिभ्यां विषसर्पजलोद्बंधनादिभिः ॥१९

अर्थ—जर शनि व गुलिक अगर त्यांची दृष्टि असेल तर विष, सर्प इ०पासून मृत्यु येतो.

केतुना विषूचीजलरोगाद्यैः ॥२०

अर्थ.—केतु अगर त्याची दृष्टि असेल तर महामारी वगैरे रोगांनीं मरण येतें.

चंद्रमांदिभ्यां पूगमदान्नकवलादिभिः क्षणिकम् ॥२

अर्थ.—चंद्र व गुलिक अगर त्यांची दृष्टि असतां सुपारी खाऊन, उन्मादानें अगर जेवणाचा घांस घेत असतां ठसका लागून मरण येतें.

गुरुणा शोफाऽरुचिवमनाद्यैः ॥२२

अर्थ.—गुरु अगर त्याची दृष्टि असेल तर सूज, अरुचि व ओकारी इ० विकारांनीं मरण येतें.

शुक्रेण मेहात् ॥२३

अर्थ.—तृतीय स्थानीं शुक्र अगर त्याची दृष्टि असतां प्रमेहानें [परम्यानें] मृत्यु होतो.

मिश्रे मिश्रात् ॥२४

अर्थ.—जर तृतीय स्थानीं अनेक ग्रह अगर त्यांची दृष्टि असेल तर अनेक प्रकारच्या व्याधींनीं मरण येतें.

चंद्रदृग्योगान्निश्चयेन ॥२५

अर्थ.— वरील कोणत्याही प्रकारचा योग असून चंद्र जर तृतीय स्थानीं असेल अगर त्याची दृष्टि असेल तर तो योग निश्चयानें घडून येईल.

शुभैः शुभे देशे ॥२६

अर्थ.—तृतीय स्थानीं शुभ ग्रह असेल अगर त्याची दृष्टि असेल तर पुण्यक्षेत्रीं [चांगल्या ठिकाणीं] मरण येतें.

पापैः कीकटे ॥२७

अर्थ.—तृतीय स्थानीं पाप ग्रह अगर त्याची दृष्टि असतां ज्या देशांत म्लेंच्छ राहतात तेथें मृत्यु येतो.

गुरुशुक्राभ्यां ज्ञानपूर्वम् ॥२८

अर्थ.—गुरु व शुक्र तृतीय स्थानीं असतील अगर त्यांची दृष्टि असेल तर मरणापूर्वी ज्ञान होतें. [मरेपर्यंत सावध असतो.]

अन्यैरन्यथा ॥२९

अर्थ.—लग्नापासून अगर कारक ग्रहापासून तृतीय स्थानीं गुरु व शुक्र यां व्यतिरिक्त ग्रह अगर दृष्टि असेल तर मरणापूर्वी ज्ञान होणार नाहीं.

लेपनजनकयो र्मध्ये शनिराहुकेतुभिः पित्रो र्नसंस्कर्ता ॥३०

अर्थ.—लग्न व द्वादश या स्थानांत शनिराहु किंवा शनिकेतु असा योग असतां मातापितरांचा संस्कार त्याच्या हातून होणार नाहीं.

लेपादिपूर्वार्द्धे जनकाद्यपरार्द्धे ॥३१

अर्थ.—जर लग्नाच्या पूर्वार्धांत (पूर्व षट्कांत—लग्नापासून सप्तमापर्यंत) शनिराहु, किंवा शनिकेतु असतां मातेचा व द्वादशांच्या उत्तरार्धांत [सप्तमा पासून लग्नापर्यंत] शनिराहु किंवा शनिकेतु योग असतां पित्याचा संस्कार त्याच्या हातून होत नाहीं.

शुभदृग्योगान्न ॥३२

अर्थ.—जर लग्नाच्या पूर्व षट्कांत शुभ ग्रह अगर त्याची दृष्टि असेल तर मातेचा व उत्तर षट्कांत शुभ ग्रह अगर त्यांची दृष्टि असेल तर पित्याचा संस्कार त्याच्या हातून झाल्याशिवाय राहत नाहीं.

इति द्वितीयाध्यायस्य द्वितीयःपादः ॥२

विषमे तदादि र्नवांशः ॥१

अन्यथाऽऽदर्शादिः ॥२

अर्थ—या दोन सूत्रांत नवमांश दशेचा प्रकार सांगितला आहे. लग्न विषमराशीचें असेल तर त्या लग्नाच्या नवमांश राशीपासून दशाक्रम घ्यावा. व सम राशीचें लग्न असेल तर लग्नाच्या सप्तमस्थ नवमांश राशीपासून दशाक्रम घ्यावा. प्रत्येक राशीचीं नऊ नऊ वर्षें घ्यावीं.

शशिनंदपावकाः क्रमाद्वदाः स्थिरदशायाम् ॥३

अर्थ.—चर (मेष, कर्क, तूळ व मकर) राशींचीं वर्षें सात, स्थिर [वृषभ, सिंह, वृश्चिक व कुंभ] राशींचीं वर्षें आठ आणि द्विस्वभाव [मिथुन, कन्या, धनु व मीन] राशींचीं वर्षें नऊ घ्यावीं.

या प्रकाराला स्थिरदशा असें नांव आहे. पहिल्या दोन सूत्रांतील प्रकाराला नवमांशदशा हें नांव आहे.

ब्रह्मादिरेषा ॥४

अर्थ.—तिसऱ्या सूत्रांतील दशाक्रम ब्रह्मग्रहाश्रित राशीपासून आहे. (नवमांश दशा व ब्रह्मग्रहाश्रित राशिदशा यांची माहिती बृहत्पाराशरींत आहे.)

अथप्राणः ॥५

अर्थ.—या नंतर बलाविषयीं सांगतात.

कारकयोगः प्रथमो भानाम् ॥६

अर्थ.—राशींचें बल प्रथमतः कारकयोगावरून जाणावें.

साम्ये भूयसा ॥७

अर्थ.—जर राशींत समसमान (दोन दोन, तीन तीन वगैरे) ग्रह असतील तर अनेक ग्रहांचा योग ज्या राशींत तो राशि बलवान् जाणावा.

\+ या सूत्राचा बरोबर बोध होत नाहीं.

ततस्तुंगादिः ८॥

अर्थ.—ज्या राशींत ग्रह उच्च, स्वगृहीं किंवा मित्रगृहीं असेल तो राशि विशेष बलवान् समजावा.

निसर्गस्ततः ॥९

अर्थ.—चर राशीपेक्षां स्थिर राशि व स्थिर राशीपेक्षां द्विस्वभाव राशि अधिक बलवान् आहे.

अग्रहात्सग्रहो ज्यायान्सग्रहेष्वधिक ग्रहः ॥
साम्ये चरस्थिरद्वंद्वाः क्रमात्स्युर्बलशालिनः ॥

ग्रहरहित राशीपेक्षां सग्रह राशि बलवान्, व सग्रह राशींत चर राशि सर्वांत बलवान् त्यापेक्षां कमी स्थिर व त्यापेक्षां कमी बलवान् द्विस्वभाव राशि असतो.

तदभावे स्वामिन इत्थं भावः ॥१०

अर्थ.— वरील कोणत्याही प्रकारचा योग नसतां ज्या राशीचा अधिपति बलवान् तो राशि बलवान् समजावा.

आग्रायतोत्रविशेषात् ॥११

अर्थ.—एका राशीवर अनेक ग्रह असतां ज्या ग्रहाचे अंश अधिक तो ग्रह अधिक बलवान् जाणावा.

प्रातिवेशिकःपुरुषे ॥१२

अर्थ.—विषम राशीच्या द्वितीय अगर द्वादश स्थानीं असलेला ग्रह बलवान् जाणावा.

इति प्रथमः ॥१३

अर्थ.—या प्रमाणें प्रथमतः राशि व ग्रह यांचें बल जाणावें.

स्वामी गुरुज्ञदृग्योगो द्वितीयः ॥१४

अर्थ.—राशीचा स्वामी किंवा गुरु किंवा बुध यांनीं युक्त अथवा दृष्ट जो राशि तो बलवान् होय. ज्या भावांतील राशि असा बलवान् असेल तो भाव बलवान् जाणावा.

स्वामिन स्तृतीयः ॥१५

अर्थ.—ज्या भावाचा अधिपति बलवान् असेल तो भाव बलवान् जाणावा.

स्वात्स्वामिनः कंटकादिष्वपारदौर्बल्यम् ॥१६

अर्थ.—एखाद्या भावाचा स्वामी आत्मकारक ग्रहाच्या केंद्रीं असतां त्याचें दौर्बल्य शून्य (पूर्ण बलवान्), पणफर स्थानीं एक व आपोक्लीम स्थानीं द्विगुणित दौर्बल्य जाणावें. म्हणजे आपोक्लीमा पेक्षां पणफरांत दुप्पट बलवान् व पणफरापेक्षां केंद्रांत दुप्पट बलवान् असा अर्थ समजावा.

चतुर्थतः पुरुषे ॥१७

अर्थ.— सोळाव्या सूत्रांत सांगितलेल्या योगापेक्षां विषम राशींस असलेला ग्रह ज्या भावाचा अधिपति असेल तो भाव बलवान् होय.

पितृलाभप्रथम प्राण्यादिशूलदशा निर्याणे ॥१८

अर्थ.—लग्न व सप्तम यांपैकीं जो राशि बलवान् असेल त्याच्या पासून गणल्या गेलेल्या नवमांश दशेच्या त्रिकोणस्थ राशींच्या दशेंत मरण येतें.

पितृलाभपुत्रः प्राण्यादिःपितुः ॥१९

अर्थ.—लग्न व सप्तम यांच्या नवम राशींत जो राशि बलवान् त्या पासून आरंभिलेल्या दशक्रमांत जी त्रिकोण दशा बलवान् त्या दशेंत बापाचा मृत्यु होतो.

आदर्शादि मातुः ॥२०

अर्थ.—लग्न किंवा सप्तम यांपासून चवथ्या राशींत जो राशि बलवान् असेल त्याच्या त्रिकोण राशींत बलवान् राशीच्या दशेंत मातेचा मृत्यु होतो.

कर्मादिर्भ्रातुः ॥२१

अर्थ.—लग्न किंवा सप्तम यांपासून तिसऱ्या राशींत जो राशि बलवान् असेल त्याच्या त्रिकोण राशींतील बलवान् राशीच्या दशेंत बंधूचा मृत्यु जाणावा.

मात्रादिर्भगिनी पुत्रयोः ॥२२

अर्थ—लग्न किंवा सप्तम यांपासून पांचव्या राशींत जो राशि बलवान् असेल त्याच्या त्रिकोण राशींतील बलवान् राशीच्या दशेंत बहिण व पुत्र यांचा मृत्यु जाणावा.

व्ययादि र्ज्येष्ठस्य ॥२३

अर्थ.लग्न किंवा सप्तम यांपासून अकराव्या राशींत जो राशि

बलवान असेल त्याच्या त्रिकोण राशींतील बलवान् राशीच्या दशेंत ज्येष्ठ भावाचा मृत्यु होतो.

पितृवत्पितृवर्गः ॥२४

अर्थ.—लग्न किंवा सप्तम यापासून नवव्या राशींत जो राशि बलवान् असेल त्याच्या त्रिकोण राशींतील बलवान् राशीच्या दशेंत बाप, आजा, बापाची आई इ० चाहि मृत्यु जाणावा.

ब्रह्मादिपुरुषे समादासांताः ॥२५

अर्थ.—विषम लग्न असतां ब्रह्मग्रहाश्रित राशीपासून दशाक्रम ध्यावा. व दशांचीं वर्षें त्या राशीपासून जो सहावा राशि त्याच्या स्वामीपर्यंत येणारीं वर्षें ध्यावीं.

स्थानव्यतिकरः ॥२६

अर्थ.—सम लग्न असतां ब्रह्मग्रहाश्रित राशींच्या सप्तम राशीपासून व्युत्क्रमानें दशा गणना करावी.

पापदृग्योगस्तुंगादिग्रहयोगः ॥२७

अर्थ.—शुभ ग्रह उच्च, मूलत्रिकोणीं, स्वराशीस, मित्रगृहीं असतां त्यावर पाप ग्रहाची दृष्टि असतां तो ग्रह विशेष बलवान् जाणावा.

पंचमे पदक्रमात्प्राक् प्रत्यक् त्वम् ॥२८

अर्थ.—लग्नापासून नवम स्थानीं विषम राशि असतां क्रमानें व विषम राशि असतां व्युत्क्रमानें दशाक्रम ध्यावा. [पूर्वी ज्या चरदशा सांगितल्या आहेत, त्या विषयीं हें सूत्र आहे.]

चरदशायामलशुभः केतुः ॥२९

अर्थ.—चर दशेमध्यें केतु हा शुभ ग्रह समजावा.

—इति द्वितीयाध्यायस्य तृतीयःपादः —

द्वितीयं भावबलं चरनवांशे ॥१

अर्थ.—चरनवांश दशेच्या वेळीं मागील अध्यायांतील १४ व्या सूत्रांतील भावबलाचा स्वीकार करावा.

दशाश्रयो द्वारम् ॥२

ततस्तावतिथं बाह्यम् ॥३

अर्थ.—ज्या वेळीं ज्या राशीची दशा त्या राशीला 'द्वार' ह्मणावें. याच राशीला 'पाकराशि असें ह्मणतात. लग्नापासून द्वारराशीपर्यंत जितकी संख्या भरेल, तितकीच द्वारराशीपासून मोजल्यानें जो राशि येईल त्याला 'बाह्य' अशी संज्ञा आहे. या बाह्यराशीला 'भोगराशि' असें ह्मणतात.

या ठिकाणीं लग्न या शब्दाचा अर्थ जन्मकालीं प्रथमतः ज्या राशीची दशा येते तो राशि लग्नसंज्ञक जाणावा.

तयोः पापे बंधयोगादिः ॥४

अर्थ.—द्वारराशि व बाह्यराशि यांमध्यें जर पाप ग्रह असेल तर त्या राशींच्या दशेंत बंधन, देहपीडा व मनोव्यथा वगैरे गोष्टी घडतील.

स्वर्क्षेऽस्य तस्मिन्नोपजीवस्य ॥५

अर्थ.—जर तो पाप ग्रहानें युक्त राशि स्वगृहींच्या गुरूनें युक्त असेल तर चवथ्या सूत्रांतील अनिष्ट गोष्टी घडणार नाहींत.

भग्रहयोगोक्तं सर्वमस्मिन् ॥६

अर्थ.—द्वारबाह्य राशी व ग्रह यांचें शुभाशुभ फल सांगितलें आहे.

पितृलाभप्राणितोयम् ॥७

अर्थ.—लग्न व सप्तम यांत जो बलवान् राशि असेल त्या राशी पासून जो दशाक्रम त्याला केंद्रदशा ह्मणावें.

या दशा केहां घ्यावयाच्या याबद्दल 'वृद्ध' म्हणतात.

बालनः शुक्रशशिनोः केंद्राख्यां तु दशां नयेत् ॥
पुरुषेजतो नेया स्त्रीचेद्दर्पणतो नयेत् ॥

जर कुंडलींत शुक्र व चंद्र हे बलवान् असतील तर केंद्रदशांचा उपयोग करावा. पुरुषजन्म असेल तर लग्न व सप्तम यांत जो बलवान् राशि असेल त्यापासून दशाक्रम घ्यावा. आणि स्त्रीजन्म असेल तर सप्तमापासून दशाक्रम घ्यावा.

प्रथमे प्राक्प्रत्यक्त्वम् ॥८

अर्थ—केंद्रदशाक्रम—लग्न व सप्तम यांत जो बलवान् राशि असेल त्या राशीपासून चर लग्न असेल तेव्हां विषम राशींचें लग्न असेल तर क्रमानें व सम राशींचें लग्न असेल तर व्युत्क्रमानें दशाक्रम जाणावा.

बृहत्पाराशरींत याचें उदाहरण दिलें आहे. त्यांत लग्न व सप्तम यांत जो राशि बलवान असेल त्याची दशा आरंभीं घेतली आहे. त्याच्या पुढें त्याच्यापासून चवथ्या (केंद्रस्थ) राशीची. याप्रमाणें चार केंद्रांचें राशि घेतल्यावर आरंभी ज्या राशीची दशा घेतली असेल त्याच्या पुढील (पणफरस्थ) राशीची दशा घेऊन पुढें त्यापासून प्रत्येक चवथ्या (केंद्र) राशींच्या दशा घेतल्या आहेत, त्यानंतर आपोक्लिमस्थ राशि घेऊन त्यापासून केंद्र राशींच्या दशा घेतल्या आहेत.

उदाहरण.—

यांत लग्न मेष असून सप्तम तूळ आहे. यांत सप्तम राशि बलवान् आहे अशी कल्पना करा. तेव्हां दशाक्रम येणें प्रमाणें होतो.

रा. ७ १० १ ४ ८ ११ २ ५ ९ १२ ३ ६
व. ९ ९ ९ ९ ९ ९ ९ ९ ९ ९ ९ ९

यांत प्रत्येक राशींचीं वर्षें नऊ नऊ घ्यावयाचीं. लग्न विषम राशींचें आहे म्हणून क्रमानें गणना झाली. सम राशींचें लग्न असतें तर उलट गणना केली असती.

द्वितीये रवितः ॥९

अर्थ. – स्थिर राशींचें लग्न असेल तेव्हां लग्न व सप्तम यांत जो राशि बलवान् असेल त्या राशीची दशा आरंभीं घेऊन नंतर त्या राशीपासून सहाव्या राशीची दशा घ्यावी व पुढें याच रीतीनें बारा राशींच्या दशा घ्याव्या. विषम लग्न असतां क्रमानें व सम लग्न असतां व्युत्क्रमानें गणना करावी.

पृथक् क्रमेण तृतीये चतुष्टयादि ॥१०

अर्थ.— द्विस्वभाव राशींचें लग्न असेल तेव्हां लग्न व सप्तम यांत जो राशि बलवान् असेल त्या राशीपासून दशारंभ होतो. या राशीची आरंभीं दशा घेऊन त्या पुढें प्रत्येक चवथ्या राशीच्या दशा घ्याव्या. याप्रमाणें प्रथम चार केंद्रराशि झाल्यावर पुढें पंचम घ्यावा व त्यापुढें प्रत्येक चवथ्या राशींच्या दशा घ्याव्या. याप्रमाणें आठ राशि झाल्यानंतर नवमस्थ राशीपासून प्रत्येक चवथ्या राशींच्या दशा घ्याव्या. याप्रमाणें १२ राशींच्या दशा होतात. विषम राशींचें लग्न असेल तेव्हां क्रमानें व सम राशींचें लग्न असेल तेव्हां व्युत्क्रमानें गणना करावी. राशींचीं वर्षें नऊ नऊ घ्यावीं.

स्वकेंद्रस्थाचाःस्वामिनो नवांशानां ॥११

अर्थ.— कारकेंद्रदशा —आत्मकारक ग्रह ज्या राशीस असेल

त्या राशीपासून प्रथम चार केंद्र राशि घ्यावे. नंतर त्याच्या पणफरस्थ राशि पासून चार केंद्रराशि घ्यावे व शेवटीं त्याच्या आपोक्लीमस्थ राशीपासून चार केंद्रराशि घ्यावे. या प्रमाणें १२ राशि घ्यावे. त्यांत नियम असा ठेवावा कि जो बलवान् राशि असेल तो प्रथम घेऊन त्यापुढें त्याच्या पेक्षां जो कमी बलवान् असेल तो घ्यावा. शेवटीं [प्रत्येक चवथा) हीनबली असेल तो असावा. प्रत्येक राशीचीं वर्ष नऊ नऊ घ्यावीं.

याच सूत्राचा दुसरा अर्थ होतो, तो १३ व्या सूत्रांत पहावा.

पितृचतुष्टयवैषम्यबलाश्रयः स्थितः ॥१२

अर्थ.— केंद्रदशेचा दुसरा प्रकार.— लग्न, चतुर्थ, सप्तम व दशम या चार केंद्रांत जो राशि अधिक बलवान् असेल तो प्रथम घेऊन त्यापुढें त्यापेक्षां कमी असेल तो राशि घ्यावा, अशा रीतीनें हे चार राशि झाल्यावर नंतर पणफरस्थ (२।५।८।११)राशि घेऊन त्यांत जो अधिक बलवान् तो प्रथम नंतर त्या पेक्षां कमी अशा क्रमानें ते राशि घ्यावे. शेवटीं आपोक्लीमस्थ [३।६।९।१२] राशि बलाच्या क्रमानें घ्यावे. ह्मणजे केंद्रदशा तयार होतात. प्रत्येक राशीचीं नऊ नऊ वर्षे घ्यावीं.

सतल्लाभयोरावर्तते ॥१३

अर्थ.— कारकादि ग्रहदशा व त्यांचीं वर्षे.—लग्नापासून व सप्तमापासून क्रमव्युत्क्रम प्रकारानें आत्मकारक ग्रहापर्यंत जी संख्या होईल तींत जी अधिक संख्या असेल तितकीं वर्षे आत्मकारक ग्रहांचीं घ्यावीं नंतर त्यापेक्षां कमी अंशाचा ग्रह जो आमात्यकारक त्यापासून आत्मकारक ग्रहापर्यंत जी संख्या येईल तितकीं वर्षे त्या आमात्यकारकाचीं घ्यावीं. याच रीतीनें इतर सर्व ग्रहांचीं वर्षे घ्यावीं. ही गणना लग्न विषम राशीचें असतां क्रमानें व सम राशीचें असतां व्युत्क्रमानें करावी. आत्मकारक ग्रहाशीं जे ग्रह युक्त असतील यांचीं तितकींच वर्षे घ्यावीं.

स्वामिबलफलानि च प्राग्वत् ॥१४

अर्थ.—दशांच्या राशींचीं व ग्रहांचीं बलें व फलें पूर्वी सांगितल्या प्रमाणेंच घ्यावीं.

स्थूलादर्शवैषम्याश्रयो मंडूकाख्यिकूटः ॥१५

अर्थ.—मंडूकदशा.—पुरुष जन्म असतां लग्न व सप्तम यांत जो राशि बलवान् असेल त्या राशीपासून दशाक्रम जाणावा. व स्त्री जन्म असतां सप्तमापासून दशाक्रम जाणावा. प्रत्येक राशीचीं वर्षे नऊ नऊ घ्यावयाचीं. प्रथमतः केंद्रराशि, नंतर पणफरस्थ व नंतर आपोक्लीमस्थ राशि घ्यावयाचे.

बृहत्पाराशरींत या दशांचीं वर्षे ७।८।९ अशीं अनुक्रमानें घ्यावयाचीं असें सांगितलें आहे. व दशाक्रम पुढील प्रमाणें दिला आहे.—

लग्न व सप्तम यांत लग्न बलवान् असून तें मेष राशीचें आहे अशी कल्पना करा. तर आरंभीं मेष राशीची दशा व तिचीं वर्षे ७ घ्यावयाचीं. त्यानंतर या राशीपासून पांचवी रास जी सिंह ती घेऊन तिचीं वर्षे ८ घ्यावयाचीं. पुढें या राशीपासून पांचवी रास धनु ती घेऊन तिचीं वर्षे ९ घ्यावयाचीं. यानंतर पणफरस्थ रास जी वृषभ ती घेऊन तिचीं वर्षे ८ घ्यावयाचीं. तिच्यापासून पांचवी रास कन्या ती घेऊन तिचीं वर्षे ९ घ्यावयाचीं. व नंतर या राशीपासून पांचवी रास जी मकर ती घेऊन तिचीं वर्षे ७ घ्यावयाचीं. यापुढें मिथुन राशीपासून दशाक्रम घेऊन शेवटीं कर्क राशीपासून दशाक्रम घ्यावा. ह्मणजे बारा राशि तयार होतात. वर्षे घेण्याचा प्रकार असा कीं चर राशीचीं वर्षे ७, स्थिर राशीचीं वर्षे ८ व द्विस्वभाव राशीचीं वर्षे ९ अशी रीति बृहत्पाराशरींत आहे. जैमिनीय सूत्राचा टीकाकार

ह्मणतो कीं, प्रत्येक राशीचीं नऊ नऊच वर्षें घ्यावीं व त्रिकोण राशि न घेतां केंद्रराशि घ्यावे व त्यातही बलाचा अनुक्रम असावा.

निर्याणलाभादिशूलदशाफले ॥१६

अर्थ.—शूलदशा—रुद्रशूल, रुद्राश्रयराशि, महेश्वरराशि व मारक राशि हीं निर्याण स्थानें आहेत. ह्मणून इतक्या प्रकारच्या शूलदशा होतात. ज्या निर्याण स्थानापासून या दशा तयार करावयाच्या असतील त्याच्या सप्तम राशीपासून या दशांचा आरंभ जाणावा. प्रत्येक राशीचीं वर्षें नऊ नऊ घ्यावयाचीं.

बृहत्पाराशरींत मंडूकदशांच्या राशींच्या वर्षांप्रमाणें वर्षें घेतलीं आहेत.

पुरुषे समाः सान्यतः ॥१७

अर्थ.—या सूत्रांत दशांचा आरंभ व त्यांचीं वर्षें यांचा सामान्य नियम सांगितला आहे. ह्या नियमाच्या दशांत विशेष नियम सांगितले असतील त्या दशाव्यतिरिक्त इतर दशांस लावावयाचा. तो नियम असा—(१) प्रत्येक राशीचीं वर्षें नऊ नऊ प्रमाणें घ्यावयाचीं. (२) विषम राशीचें लग्न असतां दशाक्रम लग्नापासून घ्यावा व सम राशीचें लग्न असतां दशाक्रम सप्तमापासून व्युत्क्रमानें घ्यावा.

सिद्धा उडुदाये ॥१८

अर्थ.—नक्षत्रदशा दोन प्रकारच्या आहेत. एक अष्टोत्तरी व दुसरी विंशोत्तरी यांचा आरंभ व वर्षें अन्य ग्रंथात सांगितलीं आहेत तीं पहावीं.

जगत्स्थुषोरर्द्धं योगार्द्धं ॥१९

अर्थ.—योगार्द्धदशा—चर दशांचीं वर्षें व स्थिर दशांचीं वर्षें एकत्र करून त्यांच्या अर्धा इतकीं वर्षें प्रत्येक राशीचीं घ्यावयाचीं. या प्रकाराला योगार्द्धदशा अशी संज्ञा आहे.

कुजादिस्त्रिकूटपदक्रमेण दृग्दशा ॥२१

मातृधर्मयोःसामान्यं विपरीतमोजकूटयोः ॥२२

यथासामान्यं युग्मे ॥२३

अर्थ.—दृग्ददशा.—चर, स्थिर, द्विस्वभाव, अशा क्रमानें या दशेची गणना आहे. चर राशि पंचम व एकादश क्रमानें घ्यावयाचे स्थिर राशि पंचम व एकादश व्युत्क्रमानें घ्यावयाचे. द्विस्वभाव राशि चतुर्थ व दशम घ्यावयाचे, ते असे कीं द्विस्वभाव राशि विषम असल्यास क्रमानें चतुर्थ दशम राशि घ्यावे व सम असल्यास व्युत्क्रमानें चतुर्थ दशम राशि घ्यावे. प्रत्येक राशीचीं वर्षें नऊ नऊ घ्यावयाचीं.

पितृमातृधर्म प्राण्यादि स्त्रिकोणे ॥२४

अर्थ.—त्रिकोणदशा.—लग्न, पंचम व नवम यांपैकीं जो राशि बलवान् असेल त्या राशीपासून दशारंभ जाणावा. प्रत्येक राशीचीं वर्षें चरपर्या दशेसारखीं घ्यावयाचीं. दशांचे राशि त्रिकोणमानानें घ्यावयाचे.

तत्र बाह्याभ्यां तद्वत् ॥२५

अर्थ.—त्रिकोण दशेमध्यें द्वारबाह्य (यांचीं लक्षणें पूर्वी दिलीं आहेत तीं पहावीं.) राशींचीं फलें पूर्वी सांगितलीं आहेत त्याप्रमाणें घ्यावीं.

घासगैरिकात्पत्नीकरात्कारकैःफलादेशः ॥२६

अर्थ.—सप्तमापासून स्त्रीचा, तृतीयापासून कनिष्ठ भावाचा, आत्मकारका पासून स्वतःचा व नवमापासून बापाचा विचार करावा.

तारार्कांशे मंदाद्यो दशेशः ॥२७

अर्थ.—नक्षत्रदशा—जन्मकालीं ज्या नक्षत्रांत चंद्र असेल त्या नक्षत्राच्या एकंदर घटकांस १२ नीं भागावें. शेष जितका घटकेचा अंक असेल तितकी संख्या लग्नराशीपासून मोजून जो राशि येईल त्याची आरंभीं दशा ध्यावी. लग्न सम राशीचें असेल तर व्युत्क्रमानें व विषम राशीचें असेल तर क्रमानें गणना करावी. प्रत्येक राशीचीं वर्षें नऊ नऊ प्रमाणें ध्यावीं.

तस्मिन्नुच्चे नीचे वा श्रीमंतः ॥२८

स्वमित्रभे किंचित् ॥२९

दुर्गतोऽपरथा ॥३०

स्ववैषम्ये यथासंक्रमव्युत्क्रमौ ॥३१

साम्ये विपरीतम् ॥३२

शनौ चेत्यके ॥३३

अर्थ—तारादशाधिप उच्च किंवा नीच असेल तर मनुष्य श्रीमंत होतो, स्वक्षेत्रीं असेल तर सामान्य धनवान् होतो व शत्रुगृहीं असेल तर दरिद्री होतो.

आत्मकारक ग्रह व तारादशाधिप यांत वैषम्य असेल (म्हणजे एक सम राशीस तर दुसरा विषम राशीस असेल) तर आत्मकारक ग्रह विषम राशीस असतां क्रमानें व सम राशीस असतां दशागणना व्युत्क्रमानें होते आणि उभयतांत साम्य असेल तेव्हां आत्मकारक ग्रह

विषम राशीस असतां व्युत्क्रमानें व सम राशीस असतां क्रमानें अशी दशागणना होते.

कित्येक आचार्य शनि तसा असतांही वरील रीतीनें क्रमव्युत्क्रम भेदात्मक दशागणना करावी असें म्हणतात.

अंतर्भुक्त्यंशयोरेतत् ॥३४

अर्थ.—कारक ग्रहाची अंतर्दशा व उपदशा असतां वरील प्रमाणें दशागणना करावयाची. (महादशांच्या वेळीं २७व्या सूत्राप्रमाणें गणना करावयाची असें या सूत्रावरून दिसतें.)

शुभादशा शुभयुते धाम्न्युच्चे वा ॥३५

अर्थ.—ज्या राशींत शुभ ग्रह असेल किंवा उच्च ग्रह असेल किंवा त्या राशीचा स्वामी उच्च असेल त्या राशीची दशा शुभ फल देणारी मानावयाची.

अन्यथान्यथा ॥३६

अर्थ.—ज्या राशींत पाप ग्रह असेल किंवा नीच ग्रह असेल किंवा त्या राशीचा स्वामी नीच असेल त्या राशीची दशा अशुभ फल देणारी मानावयाची.

सिद्धमन्यत् ॥३७

अर्थ.—दशांतर्दशासंबंधानें आणखी गोष्टींचा विचार अन्य ग्रंथांत सांगितला आहे, त्याप्रमाणें करावा.

—इति द्वितीयाध्यायस्य चतुर्थःपादः —

मयूरचित्रक.

रौद्रनक्षत्रगावेतौ यदि सूर्यमहीसुतौ ॥
मासं समर्घता याति धान्यानि स्वस्थतां पुनः ॥१
भानुकेतू च भरणीं मृगं वा यदि संस्थितौ ॥
तृणं महर्घता याति सिंधुद्भवं विडं ॥२
बुधशुक्रमहीपुत्रा भुजंगर्क्षं समाश्रिताः ॥
नंदंति लोकाःसुखिनःसुभिक्षं जनयंति च ॥३
स्वातीं याति यदा भौमो रेवतीं यदि भास्करः ॥
बलवित्रा महीपालाः प्रजानाशं प्रयाति च ॥४
मूले मंदो बुधःस्वाख्यां मघायां चंद्रमास्थितं ॥
संग्रहः सर्वधान्यानां लाभो भवति नान्यथा ॥५
विश्वभे च गतो मंदःसप्तमर्क्षे यदा रविः ॥
तदा जलविनाशःस्यात्प्रजानां कंदनं भवेत् ६
अनुराधां गतःसौरिर्ज्येष्ठायां च बृहस्पतिः ॥
पश्चिमायां यदा युद्धं प्रजानाशं प्रयाति च ॥७
श्रवणर्क्षे यदा क्रूरो ग्रहःकश्चित्समाश्रितः ॥
अन्नं महर्घतां याति गोधूमाश्च विशेषतः ॥८
वासवर्क्षे यदा सौरि र्भूमिपुत्रेण संयुतः ॥
न वर्षति जलं मेघाः सस्यहानिश्च जायते ॥ ९
वारुणे च यदा जीवश्चित्रायां धरणीसुतः ॥
नाशं यांति च गोधुमाः सर्व सस्यमहर्घता ॥१०
भानुर्भौमो भृगुश्चैव शनिक्षेत्रं समाश्रिताः ॥
यदा निशापति स्तत्र तदा दुर्भिक्षतो भयं ॥११

वृषे राहु र्यदा भौमो षष्ठ मासि महद्भयं ॥
भवत्यत्र न संदेहो तदा दुर्भिक्षपीडनं ॥१२
मिथुनर्क्षे सूर्यपुत्रो राहुर्वा यदि संस्थितः ॥
दुर्भिक्षं जायते तत्र पश्चिमायां नृपक्षयः ॥१३
रविराहुमहीपुत्रशशिशुक्रशनैश्चराः ॥
एकराशिगता ह्येते तदा पृथ्वी भयाकुला ॥१४
पूर्वे देशे महीपीडा नृपाणां संशयो महान् ॥
प्रजानाशो व्याधिभयं तस्मिन्काले न संशयः ॥१५
सूर्यचंद्रारमंदाश्च राहुश्चंद्रसुतो यदा ॥
एकराशिगता ह्येते दक्षिणस्यां भयप्रदाः ॥१६
एकराशिगता ह्येते कुजार्कशनिराहवः ॥
शुक्रो गुरुश्च तत्रैव तदा भयविवर्धकः ॥१७
उत्तरे छत्रभंगःस्यान्नात्र कार्या विचारणा ॥
रविचंद्रकुजा जीवमंदचंद्रसुतादयः ॥१८
समाश्रिता ह्येकराशौ तदा पृथ्वी भयाकुला ॥
राज्ञां नाशो व्याधिभयं प्रजानां संक्षयो भयात् ॥१९
कुजार्कजीवशुक्राश्च यदैकत्र समाश्रिताः ॥
भयं व्याधिः प्रकुर्वंति सर्वधान्यमहर्घता ॥२०
कुजार्कैदुज्ञजीवाश्च सिंहराशौ समाश्रिताः ॥
छत्रभंगः प्रजानाशो भयभीताच मेदिनी ॥२१
एकराशिस्थिता ह्येते सौम्यशुक्रदिनाधिपाः ॥
सर्वधान्यमहर्घंच मेघाःस्वल्पजलप्रदाः ॥२२
एकनक्षत्रगा ह्येते तदा क्षयविवर्धका ॥
यदा जीवयुता मंदा जीवाद्वा सप्तमस्थिताः ॥२३

तदा प्रजां विनश्यंति भूपाश्चान्नपरिक्षयः ॥
कर्कमीनमृगस्त्रीषु शनिभौमो यदिस्थितौ ॥२४
तदा युद्धाकुला पृथ्वी धनधान्यविवर्जिता ॥
मिथुनस्त्रीधनुर्मीनराशौ मंदः समाश्रितः ॥ २५
तदा भूपा विनश्यंति पृथ्वी शोणितपूरिता ॥
रविशुक्रसुराचार्या यदैकत्र समाश्रिताः ॥२६
राज्यभ्रंशः प्रजानाशः सर्वसस्यमहर्घता ॥
रविभार्गवभौमाश्च राशिमेकं समाश्रिताः ॥
तदा तैलमसूरान्नं महर्घेति महद्भयं ॥ २७
सूर्येज्यकविमंदाश्च राहुरेकत्रसंस्थितः ॥
मेघा जलं प्रमुंचंति सर्व धान्यमहर्घता ॥२८
रविज्ञगुरुमंदाश्च राहुयुक्ता यदाश्रिताः ॥
सुभिक्षं क्षेममारोग्यं तस्मिन्काले न संशयः ॥२९
एकराशिगता त्येते भौमभार्गवसूर्यजाः ॥
तदा भूपा विनश्यंति प्रजानां संक्षयो भवेत ॥३०
शुक्रमंदारजीवाश्च यदैकत्रसमाश्रिताः ॥
मेघा जलं न मुंचंति दुर्भिक्षं जायते तदा ॥३१
गुरुमंदाहिशुक्राश्च युक्ताः सौम्यसमन्विताः ॥
देशभ्रशः प्रजानाशो वस्त्रधातुमहर्घता ॥३२
दिननाथेंदुगुरवो यदैकत्रसमाश्रिताः ॥
उत्तरस्यां दिशि भयं प्रजाः क्रंदंति नित्यशः ॥३३
यदा मुद्गवस्त्राणि संग्रहे च कृते सति ॥
मासे सप्तमके चैव लाभो भवति पुष्कलः ॥३४
रवींदुशुक्रेज्यशशांकपुत्रा यदैकराशोसहिताभवंति ॥
मेघाःप्रवर्षंति महर्घतास्यां प्रजाविनाशो दिशिनैर्ऋतीच॥३५

जीवार्कशुक्रार्कसुता यदैकराशौं गता भूमिसुतेन युक्ता ॥
भूपालपीडान्नमहर्घतास्यात्क्रंदंति लोकाश्च मयाभिताप्ताः॥३६
शनिराहुर्यदैकत्रभवता सहितो यदा ॥
सर्वधान्यमहर्घत्वं राजानो भयविव्हलाः ॥३७

एकराशिगतावेतौ धरापुत्रांगिरासुतौ ॥
तदा मेघा न वर्षंति वर्षाकाले न संशयः ॥३८
महीसुतो दैत्यपुरोहितो गुरु र्यदैकनक्षत्रसमाश्रितोग्रहं ॥
तदा सुभिक्षंच यवान्नसंग्रहे मासे चतुर्थे विपुलंच लाभं ॥३९

सप्तग्रहा यदैकस्था गोलयोगस्तदा भवेत् ॥
दुर्भिक्षं राज्यपीडाच तस्मिन्योगे नृपक्षयः ॥४०
अग्रे याति दिवानाथःपृष्ठे च गुरुनंदनः ॥
मध्ये सोमसुतो याति भवेत्तत्र महर्घता ॥४१

गच्छत्यग्रे शुक्रशनिःबुधःपृष्ठं समाश्रितः ॥
धनधान्याकुला पृथ्वी प्रजा नंदंति सर्वशः ॥४२
भौमस्य पृष्ठतो भानु जातश्च जलशोषकः ॥
भवत्यत्र न संदेहो विपरीतो जलप्रदः ॥४३

मेषे समाश्रितो भानु वृषेच धरणीसुतः ॥
भयव्याधियुतालोका नृपाणां विग्रहो महान् ॥४४
वृषराशियदैकस्था शनिभार्गवभूमिजाः ॥
दुर्भिक्षं राज्यभंगं च लोकानां भयमादिशेत् ॥४५

मेषे शनैश्चरो भानु र्भार्गवो भूमिजस्तथा ॥
दुर्भिक्षं च प्रजापीडा तदा पृथ्वी भयाकुला ॥४६

वृषे भानुःकुजःसौरिस्तदा युद्धं समादिशेत् ॥
न वर्षंति जलं मेघा दुर्भिक्षं लोकपीडनं ॥४७

मीनराशीगते मंदे कर्कटस्थे बृहस्पतौ ॥
तुलराशिगते भौमे तदा दुर्भिक्षमादिशेत् ॥४८
भूमिपुत्रो राहु भृगु स्तुलाराशिसमाश्रितः ॥
तदा युद्धं महाघोरं राज्ञां चैव परस्परं ॥४९
चंद्रभार्गवधरासुता यदा मीनराशिमुपयांति ते तदा ॥
दुर्लभं भवति सर्वधान्यकं वारिपश्च न जलं प्रमुंचति ॥५०

गुरुयुक्तः शनिर्वक्रं करोतिच यदा तदा ॥
नवमे मासि गोधूमा स्तिलतैलमहर्घता ॥
गुरुशुक्रावेकराशौ गतो दुर्भिक्षदुःखदौ ॥
युद्धदौ भूनिमाहेयौ तदा दुर्भिक्षकारकौ ॥५२

यदा शुभग्रहः कश्चिदतिचारं करोतिच ॥
तदा नृपक्षयं याति दुर्भिक्षं तत्र दारुणं ॥५३

अतिचारं ग्रहः पापो यदा कश्चित्समाश्रितः ॥
तदा नंदंति राजानो धनधान्ययुताः प्रजाः ॥५४
यद्यतिचारगो मंदो वक्रीभूतांगिरासुतः ॥
राजानस्तत्र नंदंति धनधान्यकुला धरा ॥५५
यदा क्रूरग्रहो वक्री शुभोतिचारमार्गतः ॥
तदा भवति दुर्भिक्षं राज्ञां वैरं परस्परं ॥५६

यस्मिन्मासे पौर्णिमायां तदा वर्षंति वारिदः ॥
गोधूमघृतधान्यानां तस्मिन्मासे महर्घता ॥५७
यदा मूलिम्मुचे मासि भौमो राश्यंतरं व्रजेत् ॥
गुरुर्वा महती वृष्टी रथवा लोकसंक्षयं ॥५८
कार्त्तिके मार्गशीर्षे वा संक्रांतौ वारिवर्षणं ॥
तदा समर्घता पौषे सस्यवृद्धिश्च मध्यमा ॥५९

गुरुशुक्रारशशिजा यदैकलसमाश्रिताः ॥
घातयोगो विजानीयात् पांसुवृष्टिस्तदा भवेत् ॥६०
सूर्याद्विधुःपंचमसप्तमस्थो क्षोणीसुतो यदि तथारिगेहे ॥
दिग्दाहयोगो मुनिनां प्रदिष्टो योगोत्कमोल्कापतनादियोगः ॥
उपप्लवात्सप्तमगो महीजो महीसुतात्पंचमगो यदाज्ञः ॥
बुधाद्विधुस्याच्च चतुष्टयेच भूकंपयोगःकथितो विधिज्ञैः ॥६२

मेषे वृषे कुलीरेऽर्के यदोत्पाता भवंति च ॥
दक्षिणस्थां तदा युद्धं प्रजा क्षुद्भयपीडितः ॥६३
मिथुनेर्केऽननाशस्याद्विध्येसिंहेलिके भयं ॥
भद्रदेशस्य नाशस्यात्कुंभर्के सस्यपीडनं ॥६४

कान्यकुब्जे महापीडा कन्यकायां झषे रवौ ॥
वृश्चिके च मृगे सूर्ये दुर्भिक्षं नर्मदा तटे ॥६५
तौलिकर्केच दुर्भिक्षं देशभगोच पिंगले ॥
धनुष्यर्के विनश्यंति देशकालिंजरादयः ॥६६

शुक्रस्यास्तमयं देवपूज्येरुद्रयमागते ॥
संचारस्यवनीसूनौ वृष्टिर्मेदैस्त्रिधा मता ॥६७
यदा कर्कस्य संक्रांतीरथवा मकरस्य च ॥
भवत्यर्काकि भौमानां वारेदुःखप्रमादता ॥६८
दिवोदेतियदागस्त्यस्तदा भयकृतः स्मृतः ॥
दुर्भिक्षं व्याधिजनको लोकानां नात्रसंशयः ॥६९

यदा याति वृद्धिं सिताख्यंच पक्ष-
स्तदायांति वृद्धिं नृपालोकसंघाः ॥
समः साम्यदो हीनगो हानिकारि-
कृष्णे फलं व्यत्यये चिंत्यमेतत् ॥७०

यदा च जायते पक्षत्रयोदशादिनात्मकः ॥
तदा लोकातिघोरस्यान्मुंडं युक्ता च मेदिनी ॥७१

इति मयूरचित्रे प्रथमः

अंतर्वेदिमुखांश्च मागधमुखान्कालिंगमात्यंतिका-
न्हन्याकोकणपौंड्रकान्रविसुतःसौराष्ट्रसिंधू क्रमात् ॥
पौलिंदादिककांचिकांश्चकुरयुक्काश्मीरमत्स्यान्खलो-
लाटांगादिक बाह्लकांश्च कमठं तत्पूर्वतोम्लेच्छिभैः ॥१
यावन्मार्तंडपुत्रो वृषतुलागतो वृश्चिके मीनसिंहे
राशावेकाधिपत्यं सुरगुरुसहितो भूमिपुत्रो युतो वा ॥
तावद्दुर्भिक्षकालं जनपदमरणं क्षुत्पिपासार्ति लोको
ग्रामारण्ये स्मशाने नरपतिभवने नृत्ययंतो पिशाचाः ॥

इति द्वितीयो मयूरचित्रकं

अथातः संप्रवक्ष्यामि फलं योगसमुद्भवं ॥
मासवासरतिथीनां सम्यक्ज्ञानप्रकाशकं ॥१
स्वयं राजा स्वयं मंत्री स्वयंमेघाधिपो यदि ॥
सस्यमंतर्जगत्सर्वं रौरवं घोरदुःखितं ॥२
प्रतिपादिरविवार श्चैत्रमासो यदिस्या-
न्नभवतिबहुवृष्टि र्दुःखिता लोकसंघाः ॥
अमृतकिरणवारो ज्ञास्फुजिद्वाक्पतीनां
भवति ननु धरत्री सस्यतोयाभिपूर्णा ॥३
वारस्यां मंदकुजयो स्तदावृष्टिर्नजायते ॥
सस्यानि न प्ररोहंति विग्रहं यांति भूमिपाः ॥४

चैत्रस्य कृष्णपक्षे वा पंचम्यां बुधवासरे ॥
भौमे वक्रगतिं याति घृततैलमहर्घता ॥५
शाल्यं नचापि गोधूमा स्तदा यांति महर्घता
चैत्रमासस्य शुक्लायां पंचम्यां यदि वर्षणं ॥ ६

वर्षाकाले तदा मेघा न वर्षंति जले बहु ॥
गुरुशुक्रौ यदैकस्मिन्मासे चैत्रे व्यवस्थितौ ॥७
तैलाज्यतिलसूत्राणां संग्रहे च कृते सति ॥
मासद्वये व्यतीते तु विक्रये लाभमादिशेत् ॥८

मधुमासे कृष्णपक्षे तिथिवृद्धिर्यदा भवेत् ॥
शुक्लपक्षे च हानिःस्यादन्नहीना तदा मही ॥९
चैत्रे च रविसंक्रांतौ यदि वर्षति वासवः ॥
वैशाखे मासि वा ज्येष्ठे तदा सस्यमहर्घता ॥१०
चैत्रमासस्य शुक्लायां सप्तम्यां दृश्यते घनः ॥
उद्धूता वाति वाता वै अथवा निर्मला दिशः ॥११
तदा संग्रहणं कार्यं गोधूमस्य विपश्चिता ॥
विक्रीते श्रावणे पासे लाभश्च त्रिगुणो भवेत् ॥१२

पंचम्यामपि योगो यं चिंतनीयो विचक्षणैः ॥
वर्षणं च त्रयोदश्यां तदा दुर्भिक्षमादिशेत् ॥१३
पंचमी रोहिणीयुक्ता सप्तमी रौद्रसंयुता ॥
नवमी पुष्यसंयुक्ता स्वातीयुक्ताच पौर्णिमा ॥१४

भवत्यत्र यदा वृष्टिस्तदा प्रावृडवर्षणं ॥
चैत्रे वा श्रावणे मासे यदा पंचारवासराः ॥१५
राजानश्च क्षयं यांति मंदा दुर्भिक्षकारकाः ॥
नाशयंति प्रजाः शुक्राः रविसौम्या विनाशकाः ॥१६

चंद्राःकल्याणजनका गुरवो जलघातकाः ॥
चैत्रे मासे तृतीयायां पंचम्यां फाल्गुने तथा ॥ १७
सप्तम्यां भाद्रमासे च माधवे प्रथमेहनि ॥
बातबातापि शुभदस्तदा प्रावृड्विवर्षणं ॥ १८

इति चैत्रः

माधवस्य सिते पक्षे सप्तम्यां शनिवासरे ॥
भरण्यादि चतुष्के तु हस्ते भौमस्य वासरे ॥ १९
पिप्पली नारिकेलं च ताम्रं कांस्यं च पूगकम् ॥
रक्तवस्त्रं च सर्वाणि महर्घंति न संशयः ॥ २०
वैशाखे च त्रयोदश्यां यदा भौमार्कवासरौ ॥
कृष्णा च शर्करा नागवल्ली दुर्लभतां व्रजेत् ॥२१
तथा महर्घतां यांति सैंधवं रक्तचंदनम् ॥
माधवे शुक्लपंचम्यां घनैराच्छादितं नभः ॥२
गर्जनं वारिवृष्टिर्वा तदा सस्यस्य संग्रहः ॥
कर्त्तव्यो भाद्रमासे तु विक्रीते लाभमादि ॥२३
वैशाखे शुक्लप्रतिपद्दशमी चाभ्रसंयुता ॥
भवत्यत्र न संदेहः प्रावृट्काले त्रयवर्षणं ॥ २४

इति वैशाखः

ज्येष्ठकृष्णपतिपदि भौमार्कबुधवासराः ॥
यदा भवंति लोकानां तदा व्याधिभयं भवेत् ॥२५
ज्येष्ठशुक्लप्रातिपदि यदिस्यान्मंदवासरः ॥
छत्रभंगं प्रजापीडां दुर्भिक्षंच समादिशेत् ॥२६
ज्येष्ठाद्ये बुधवारश्चेद्वर्षे चागामिके भयं ॥
तत्रचेन्मंदवारःस्यात्तदा युद्धाकुला धरा ॥२७

ज्येष्ठमासे दर्शतिथौ रात्रौ मेघाः प्रदृश्यते ॥
दिवसे नात्वनावृष्टिर्जायते नात्रसंशयः ॥ २८
ज्येष्ठस्य कृष्णप्रातिपद्युक्ता चेद्भानुना यदि ॥
वाति वातस्तदो ग्रावैर्भीमेनाधिःप्रजायते ॥ २९
चंद्रपुत्रेण दुर्भिक्षं गुरुणा सस्यसंपदः ॥
भार्गवेण सुवृष्टिःस्याच्छशिनान्नाकुला धरा ॥ ३०
शशिना च प्रजानाशः छत्रभंगो ह्यवर्षणं ॥
जायते नात्र संदेहः कर्त्तव्यो दैवचिंतकैः ॥ ३१
ज्येष्ठमासे नवर्क्षाणि रौद्रादीनि विलोकयेत् ॥
निरभ्रैर्जलसंपत्तिः साभ्रैर्ज्ञेयमवर्षणं ॥ ३२
ज्येष्ठस्य शुक्लसप्तम्यां श्रूयते घनगर्जितं ॥
मेघच्छन्नं नभो वापि वायुर्वहति दक्षिणः ॥ ३३
तिलस्य ग्रहणं कार्यं विक्रीते कार्त्तिके घनं ॥
श्रवणर्क्षे धनिष्ठायां यदा मेघः प्रतिष्ठितः ॥ ३४
प्रावृट्काले तदावृष्टि र्मेघो वृष्टिनिरोधकः ॥
पौर्णिमास्याममावास्यां ज्येष्ठे व्योमान्वितं घनैः ॥ ३५
दिवा वा यदि वा रात्रौ तदा ज्ञेयमवर्षणं ॥

इति ज्येष्ठाः

आषाढमासे सितपंचमी तिथौ
रव्यादि वारेषु यथा क्रमेण ॥
अत्यल्पवृष्टिर्विपुलाच वृष्टि–
र्युद्धं शुभं क्षेमसुखं विनाशनं ॥ ३७
आषाढे शुक्लपंचम्यां शुभवारे शुभेक्षिते ॥
संपूर्णा निखिला धात्री धनधान्यकुलाधरा ॥३८

क्रूरग्रहयुते वारे लग्ने क्रूरेक्षिते यदि ॥
दुर्भिक्षं मरणं व्याधिश्चोरबाधा सतां तथा ॥३९
आषाढे कृष्णपक्षेच ह्यष्टम्यां रजनीपतिः ॥
मेघमध्ये तु संयाति तदा पृथ्वी जलाधरा ॥४०
तस्मिन्नेव यदा रात्रौ निर्मलः शशिलांछनः ॥
दृश्यते छिद्रसंयुक्त स्तदा वाच्यमवर्षणम् ॥४१
आषाढ्यां पूर्णिमास्यां च यदा वृष्टिस्तु जायते ॥
मासमेकं समर्घ्यं च पश्चादन्नमहर्घता ॥४२
आषाढे कृष्णपक्षे तु निरभ्रे रविमंडले ॥
न वारिदाः प्रवर्षंति तदा प्रावृट्प्रवर्षणं ॥४३
आषाढे शुक्लपंचम्यां पश्चिमो यदि मारुतः ॥
तत्र वा दृश्यते चापमैंद्रं वारिमवर्षणं ॥ ४४
तदा संग्रहणं कार्यं सस्यानां लाभमिच्छता ॥
विक्रीते कार्त्तिके मासि निंश्चितं लाभमादिशेत् ॥ ४५
आषाढे स्वातिनक्षत्रे साविद्युदुपवर्षणं ॥
तदास्यादन्ननिष्पत्तिःपृथ्वी स्याद्वारिसंकुला ॥ ४६
उदये वाथ मध्याह्ने संध्यायां सूर्यमंडलं ॥
मेघछिन्नं न शुभदं नवम्यां च शुभे सति ॥ ४७
आषाढमासि संक्रांतौ यदि वर्षति वारिदः ॥
तदा व्याधिभयं विद्यात् श्रावणे शुभदं भवेत् ॥ ४८
वन्हिवेदाष्टनंदेंदुविंशत्संख्यासु भास्करः ॥
तिथिस्वार्द्रा यदा याति कष्टदः शेषको शुभः ॥ ४९
रवौ भौमे तथा मंदे रौद्रभं याति भास्करः ॥
तदा न शुभदः प्रोक्तः शुभदः शेषवासरे ॥ ५०

श्रीराम् ॥

आधानलग्नात्सुतभे तुजन्मलग्नंभवेच्छास्त्रवि. दोवंदति ॥

अर्थ.—ज्या कालीं गर्भ राहतो, त्या कालीं जें लग्न असेल, त्याच्यापासून तिसऱ्या अथवा ५ व्या किंवा ९ व्या राशीवर रवि गेला असतां आणि गर्भलग्नाच्या पंचमांत जो राशि असेल त्या राशीचें लग्न उदित असतां मनुष्याचा जन्म होतो, असें ज्योतिःशास्त्रज्ञ सांगतात.

उदाहरण.

निरयन.

या कुंडलींत कुंभ लग्न उदित असतां जन्म झाला आहे. ह्मणून आधान लग्न तूळ असलें पाहिजे कारण, जन्मलग्न हें आधानलग्नापासून ५ वें असावयाचें असें श्लोकांत सांगितलें आहे. आधान लग्न तूळ आहे. ह्मणून त्यापासून तिसरी रास धनु, पांचवी रास कुंभ व नववी रास मिथुन आहे. या तीन राशींतून कोणत्या तरी राशींत रवि असला पाहिजे. वरील कुंडलींत मिथुन राशींत रवि आहे, ह्मणून या कुंडलीचें कुंभ लग्न खरें आहे, असें सिद्ध झालें. आदर्शाच्या वाचकांनो, हा एक फुटका आरसा तुमच्या संग्रहाला असूं द्या. आतां तुमच्या जवळ ४ नियम झाले. या चार नियमांतही तुमचें लग्न येणार नाहीं, तर आमचा नाइलाज आहे! पण असें बहुधा होणार नाहीं. या चौकडींत तुमचें लग्न खरें ठरणार व तेणें करून प्राचीन ग्रंथांची व ग्रंथकारांची अब्रू बचावणार यांत तिळप्राय संका नाहीं!!

पण थांबा. आधीं या नियमास एखादी टीप द्यावी लागते कीं काय नकळे. हो. लागणारच द्यावी! दुर्दैव आमचें! अहो, जन्मलग्नकुंडलींत रवि. २।३।४।६।७।८।१०।१२ इतक्या ठिकाणीं रवि असेल तर हा नियम लागू पडत नाहीं. या तरमग टीप.

"अलीकडे ज्योतिषी वर्गात असले प्रश्न सोडविण्याचे प्रकार बाजूला राहून "दुनिया झुकती है लेकिन झुकानेवाला चाहिये" असे प्रकार मात्र वाढत्या प्रमाणावर आहेत" असें डौलानें ह्मणणाऱ्या संपादकांस "झुकानेवाला" कोण असा आमचा प्रश्न आहे. या प्रश्नाचें उत्तर बरोबर मिळालें पाहिजे.

असो. एथपर्यंत झुकणाऱ्या दुनयेला आवरून धरण्याकरितां केलेल्या एका प्रयत्नाचा विचार झाला. आतां दुसऱ्या प्रयत्नाचा विचार करूं. कुंडलीवरून अमुक मनुष्य पुरुष आहे कीं स्त्री आहे, हें ज्योतिष्यास सांगतां आलें पाहिजे असें ह्मणणाऱ्या आदर्शाच्या संपादकांनीं ४ नियम पूर्व ग्रंथकारांचे दिले आहेत. त्यांत पुरुषजन्म जाणण्याचे दोन नियम आहेत, ते असे—

१ पुरुष राशीस सूर्य, गुरु बलवान् असून जन्मलग्न पुरुष राशीचें असेल तर पुरुष जन्म जाणावा.

२ जन्मलग्न सोडून विषम राशीस शनि असतां पुरुषजन्मदायक असतो.

स्त्रीजन्माचा नियम असा—

१ स्त्री राशीस शुक्र, चंद्र, समळ असून स्त्रीराशीचें जन्मलग्न असेल तर स्त्रीजन्म जाणावा.

चवथा नियम नपुंसक जन्माचा आहे.

१ विषम राशीस सूर्य असून सम राशीचा चंद्र हे उभय ग्रह परस्पर एकमेकांस अवलोकन करीत असतां अथवा सूर्यचंद्रास बुध व शनि पाहत असतील तर नपुंसक जन्म जाणावा.

हे चार नियम ह्मणजे चार फुटके आरसेच आहेत, असें वाचकांच्या ध्यानांत येईल. उदाहरणार्थ एक कुंडली घेऊं—

निरयन.

या कुंडलींत लग्न मकर आहे. हें स्त्री राशीचें आहे. यांतच शुक्र आहे. चंद्र आणि मंगळ देही स्त्रीराशींतच आहेत, यावरून ही मुलीची कुंडली ठरते. [स्त्रीजन्माचा नियम पहा] परंतु लिहिण्यास वाईट वाटतें कीं, ती मुलाची आहे. ही कुंडली कोणत्याही नियमानें मुलाची ठरत नाहीं. आतां आणखी एक घेऊं—

निरयन.

या कुंडलींत लग्न पुरुष राशीचें गुरु पुरुष राशींत व रवि स्त्री राशींत आहे, सबब ही पुरुषाचीही नाहीं व स्त्रीचीही नाहीं असें ह्मणावें लागतें. स्त्रीची ह्मणावी तर लग्न पुरुष राशीचें, मंगळ पुरुष राशींत शुक्र पुरुष राशींत आहे व चंद्र मात्र स्त्री राशींत आहे व तो केंद्री उच्च असल्या कारणानें बलवान् आहे, ह्मणून स्त्रीजन्माचाही नियम लागू होत नाहीं. चवथा नियम नपुंसकाचा आहे तोही लागू नाहीं, मग ही कुंडली पुरुषाची, स्त्रीची कीं नपुंसकाची ? संपादक महाराज, एथें झुकानेवाला कोण असा आमचा प्रश्न आहे प्रश्नाचें उत्तर सशास्त्र पाहिजे.

पंडितंमन्य, झुकानेवाला, सारासार विचार न करणारा इ० विशेषणें देतांना ज्योतिर्विभूषणांनीं पूर्ण विचार केला नाहीं. आह्मीं प्रथम पुस्तकावर अभिप्राय देतांना 'निरयन कितपत टिकतें' असें जें लिहिलें होतें, त्यांत कोणताही वाईट हेतु नव्हता. व्यक्तिविषयक वाद प्रथम ज्योतिर्विभूषणांनींच केला. त्यांनीं आह्मांस अनुलक्षून पंडितंमन्य वगैरे शब्द वापरले, ह्मणून त्यांच्या लेखाचा इतका सांबलयक विचार करावा लागला, यापुढें ते जर व्यक्तिविषयक लिहिणार नाहींत तर आह्मींही सरळ शब्दांनींच वाद करूं.

---

५ पत्रव्यवहार.

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस

वि. वि. :— पुढील मजकूर येत्या अंकांत प्रसिद्ध होण्यासाठीं पाठविला आहे. त्यास स्थल मिळेल अशी आशा आहे.

कालमानकोष्टक.

३६० मानवी वर्षें	=	१ दिव्य वर्ष
१२०० दिव्य वर्षें	=	१ कलियुग
२४०० ,,	=	१ द्वापार युग
३६०० ,,	=	१ त्रेतायुग
४८०० ,,	=	१ कृतयुग
४ युगें	=	१ महायुग
७१ महायुगें	=	१ मनु
१४ मनु	=	१ कल्प

---

६० वर्षें	=	१ संवत्सरचक्र
७२००० सं चक्रें ६ शकर्कतें ४३२००० वर्षें	=	१ कलियुग
८६४००० वर्षें	=	१ द्वापारयुग
१२९६००० वर्षें	=	१ त्रेतायुग
१७२८००० वर्षें	=	१ कृतयुग
४ युगें, १० अवतार	=	१ महायुग
३६० वर्षें	=	१ दिव्ययुग
७१ महायुगें (७१ इंद्र)	=	१ मन्वंतर

यमाग्नीशाहिमूलेंद्र पितृवारिभको रविः ॥
यात्यार्द्रामशुभः प्रोक्तः शेषर्क्षे शुभदायकः ॥ ९१
शूले गंडे व्यतीपाते व्याघाते परिघे शिवे ॥
वैधृतौ चातिगंडे च आर्द्रां यात्यशुभो रविः ॥ ९२
आर्द्राप्रवेशे वृष्टिःस्यात्सार्धमासमवर्षणं ॥
आर्द्रां याति रविस्त्वग्नि जलान्नक्षयकारकः ॥९३
जगत्क्षेमकरो रात्रौ बहुसस्यजलप्रदः ॥
आषाढमासे खलु कृष्णपक्षे
प्रवेशनक्षत्रमुपागते विधौ ॥
शुभाशुभं भाविफलं विचिंत्यं
मुनिप्रणीतं ग्रहचिन्तकेन ॥ ९४
संध्यायांपुरतो विशेद्य नगरे कृष्णःपशुर्वा वृषः
पूर्णे वृष्टिकरोऽसिताच सुरभी सौख्यप्रदा प्राणिनां ॥
श्वेता वृष्टिविघातिनी च कपिला वातप्रदा पाटला
सस्यध्वंसकरी तथैव शबलामध्ये फले कीर्तिता ॥५५
रोहिण्यर्क्षे यदाषाढे विद्युद्वारिप्रवर्षणं ॥
रचितं च घनै र्व्योम तदा सर्वे शुभं भवेत् ॥५६
न तत्र वारि पतितं नच पूर्वोत्तरानिलौ ॥
तदा कालोतिघोरः स्या त्प्राणिनां नात्रसंशयः ॥९७
प्राजापत्यर्क्षगे चंद्रे पूर्वाण्हे वातिमारुतः ॥
शुभदः शुभमादेशं वृष्टिः श्रावणभाद्रयोः ॥५८
अन्हस्तु पश्चिमे भागे पश्चिमौ द्वौ प्रवर्षतः ॥
मध्यान्हे वाति वायुश्चेन्मध्यौ मासौ जलप्रदौ ॥ ९९
समस्तं दिवसं वाति यदा वायुर्जलप्रदः ॥
श्रावणाद्येषु मासेषु तदा संपत्तिरुत्तमा ॥ ६०

वातिचेदशुभो वायु र्व्यत्यासेन फलं वदेत् ॥
तत्र यो बलवान्वाह स्तमात् ज्ञेयं शुभाशुभं ॥६१

प्रजेशनक्षत्रगते सुधानिधौ
शुभाश्च वाता गगनंच निर्मलं ॥
मृगाः खगाः शांतदिगानना यदा
नन्दंति लोकाः सुखिनस्तदा स्युः ॥६२

मांजिष्ठाशुक्लकौशेय स्वर्ण क्रौंच समप्रभाः ॥
अच्छत्रमूलाः सुस्निग्धाः शुभदाः सजलाघनाः ॥६३

वोतप्रेतश्वादिकाकानुरूपा
छिन्ना भिन्ना वाग्निहीनातिरुक्षाः
उष्टाकारा वानराकारदेहा
मेघा प्रोक्तादुःखदा वै प्रजानां ॥ ६४
शक्रोद्भूतै र्मारुतै र्वारिवृष्टिः
पृथ्वीसस्य व्यापृता नंदयुक्ता ॥
वन्ह्युद्भूतै र्वन्हिकोपोत्रनाशो
याम्यैरन्नं क्षीयते राक्षसोत्थैः ॥ ६५
पश्चाज्जातै र्वारिवृष्टिः समग्रा
वातोद्भूतै र्वातयुक्ता च वृष्टिः ॥
वृष्टिःसस्यं सौम्यकाष्ठासमुत्थै
रीशै र्लोका वित्तनाशा भवंति ॥ ६६

उल्कानिर्घात भूकंपदिग्दाहाशनिविद्युतः ॥
नादा मृगाणां संग्राह्या स्तथैवांबुधरास्तदा ॥६७
दक्षिणेन यदा याति रोहिण्यां रजनीकरः ॥
दूरस्थो निकटस्थो वा जगतः कष्टदायकः ॥ ६८

१४ मन्वंतरें } = १ कल्प [ब्रह्मदेवाचा एक दिवस]
१००० महायुगें }

३६००० कल्प = १ ब्रह्मदेवाचें आयुष्य
१००० ब्रह्मदेव = १ विष्णूची घटिका
१००० विष्णु = १ शिवानिमिष
१००० शिव = १ महामाया निमिष

"कालोह्ययं निरवधि विंपुलाच पृथ्वी"

पौराणिक देश व त्यांचीं सांप्रतचीं नांवें

---

१ नैषध — बंगाला
२ पांचाल — पंजाब
३ मरुदेश — मारवाड
४ किरात — पूर्वसमुद्रकांठ
५ कनोज — अंतर्वेदी, कनोज
६ कर्नाटक — कर्नाटक
७ कोसल — अयोध्या, लखनौ.
८ नेपाल — नेपाळ
९ पारिसिक — इराण
१० पांड्य — मद्रास (भोंवतालचा प्रदेश)
११ पुलिंद — बलुचिस्तान
११ कामरूपदेश — आसाम
१३ बर्बर — बार्बरी (आफ्रिका)
१४ कैकेयदेश — काबूल
१५ गांधार — कंदाहार
१६ बाल्हिक — आरबस्तान
१७ सिंधु — सिंध
१८ गालव — माळवा
१९ मत्स्यदेश — कानपूर वगैरे
२० मल्लीयाडदेश — मलबार
२१ सौवीर — सिंधचा एक भाग व सुरत.
२२ विदर्भ — वऱ्हाड
२३ चैद्य — पूर्व हिंदुस्तान
२४ जालंदर — पंजाब (दक्षिण

भाग)
२५ कांबोज — रोहिलखंड
२६ कलिंग — ओढ्या
२७ अनर्त्त — द्वारकाप्रांत
२८ आन्ध्र — तैलंगण
२९ शूरसेन — मथुरेजवळील प्रांत
३० मागध — ब्रह्मदेश
३१ हूण — तिबेट
३२ मेदपाट — मेवाड
३३ गौड — बंगाल्यांतील एक भाग
३४ केरल — मलबार (गोंवें)
३५ द्रविड — त्रावणकोर वगैरे
३६ महाराष्ट्र — महाराष्ट्र
३७ अवंति — माळवा (इंदूर)
३८ पानाट — प्रयाग काल्पी इ०
३९ अंग — बहार
४० कुंतल — कलबुर्गा वगैरे
४१ टंकण — कुर्ग
४२ सौराष्ट्र — काठेवाड
४३ नैधुव — दिल्ली वगैरे
४४ चौल — तंजावर वगैरे
४५ गुर्जर — गुजराथ
४६ कुरु — आग्रा वगैरे
४७ पवनदेश — ग्रीस देश
४८ वंग — बंगाल
४९ करहाट — कोंकण [खानदेश]
५० भद्रदेश — मिसर
५१ कारमीर — काश्मीर
५२ भोजकोट — कच्छ
५३ दशार्णेव — काठेवाडपैकीं भाग
५४ मैथिल — गोरखपूर प्रांत
५५ लाट — बेरूळ वगैरे
५६ सिंहलद्विप — लंका
५७ भोज — काशीप्रांत
५८ द्राविल — मद्रास

गणेश दामोदर ग्रंथे.

---

६ जगद्वृत्त.

बुलंदशहर तालुक्यांतील औरंगशादत गांवीं घडलेली एक चमत्कारिक गोष्ट ' स्वदेशी स्टँडर्ड ' पत्रांत प्रसिद्ध झाली आहे तिजवरून आपल्या पुनर्जन्माच्या तत्त्वाची खात्री पटण्याजोगी आहे. महादण नांवाच्या खेड्यांत सत्तर वर्षाच्या एका पटवाऱ्यास एक मुलगी झाली. ती मुलगी दोन दिवसांची झाली. तेव्हांपासून थोर मनुष्याप्रमाणें लोकांकडे पाहूं लागली

उत्तरस्यां स्पृशन्यानि रोहिण्यां रोहिणीपतिः ॥
सोपसर्गा तदा वृष्टि रस्पृशन् सुखिनो जनाः ॥ ६९
रोहिणीशकट मध्यगःशोकदुःखभयरोगदःस्मृतः ॥
शीतरश्मिमनुयाति रोहिणी कामिनोहिवशगास्तदांगनाः ७०
रोहिण्यां स्पृशतो याति यदा कुमुदिनीपतिः ॥
कामिनीनां वशं यांति नराःकामप्रपीडिताः ॥ ७१
वन्हेर्दिशिभयमतुलं नैर्ऋत्यां दुःखसंयुता लोकाः ॥
ईशानस्थे चंद्रे सुखबाहुल्यं मध्यमं वाते ॥ ७२

आषाढस्यासिते पक्षे दशम्यादिदिनत्रयं ॥
रोहिणीक्रममालेख्यं सुमुदुरति निश्चितं ॥ ७३
ताडयति योगतारां रजनीनाथःसमावृणोत्यथवा ॥
तवुभयमतुलं राज्ञां नादाच्छादनकौ ॥ ७४
धरणीसुतमंदहरितःकांतियुतश्चंद्रमाविनोत्पतैः ॥
शुभदश्चसर्वजगतो यदि सूर्यस्तीक्ष्णरश्मिःस्यात् ॥ ७५
यत्प्रोक्तं रोहिणीयोगे फलं स्वातौ विचिंतयेत् ॥
आषाढे यो विशेषेच तमाहं वाच्यतः परं ॥ ७६

सप्तम्यां माघमासे यदि पतति हिमं स्वातिनक्षत्रयोगे
चंद्रार्कौ रश्मिहीनौ जलधरसहितौ वातिवातःप्रचंडः ॥
विद्युद्युक्तं नभो वा यदि भवति तदा सर्वसस्यैरुपेतां
पृथ्वीस्याद्वारिपूर्णा मुदितजनपदा सर्वलोकैश्च युक्ताः ॥७७
श्रावणे फाल्गुने मासि चैत्रवैशाखयोरपि ॥
आषाढे स्वातियोगो यं विचार्यं देवचिंतकैः ॥७८

आषाढमासस्य च पूर्णिमास्यां
सूर्यास्तकाले यदि वाति वातः ॥

पूर्वस्तदासस्ययुताच मेदिनी
नंदंति लोका जलदायिनो घनाः ॥७९
कृशानुवाते मरणं प्रजानां
अन्नस्य नाशः खलु वृष्टिनाशः ॥
याम्ये महीसस्यविवर्जितास्या
त्परस्परं यांति नृपा विनाशम् ॥८०

नैशाचरो वाति यदात्र वातो
न वारिदो यच्छति भूरिवारिम् ॥
तदा महीसस्यविहीनता स्या–
त्क्रंदंति लोकाः क्षुधया प्रपीडिताः ॥८१
आषाढमासे यदि पूर्णिमास्यां
सूर्यास्तकाले यदि वारुणोनिलः ॥
प्रयाति नित्यं सुखिनः प्रजाः स्यु–
र्जलान्नयुक्ता वसुधा सदा स्यात् ॥८२

वायव्यवाते जलदागमस्या–
दन्नस्य नाशः पवनोद्धताद्यैः ॥
सौम्येऽनिले धान्यकुला धरित्री
नंदंति लोका भयदुःखवर्जिताः ॥८३

ऐशेन्नवृद्धिर्बहुवारिपूरिता
धरा च गावो बहुदुग्धसंयुताः ॥
भवंति वृक्षाः फलपुष्पदायिनो
वाताभिनंदंति नृपाः परस्परं ॥८४

आषाढी योगोयं सम्यक् प्रोक्तो मुनीं समालोक्यं ॥
यत्ज्ञात्वा दैवविदो लोके ख्यातिं समायाति ॥८५

इत्याषाढफलं

श्रावणे शुक्लसप्तम्यां यदि मेघः प्रवर्षति ॥
तदा प्रजाभिनंदंति धनधान्यकुला धरा ॥ ८६
श्रावणे कृत्तिकायांच यदि मेघः प्रवर्षति ॥
तदा जलार्णवा पृथ्वी धनधान्याकुला प्रजा ॥ ८७
चित्रास्वातिविशाखासु यदि मेघो न वर्षति ॥
श्रावणे च तदा पृथ्वी वारिसस्यविवर्जिता ॥ ८८
सप्तम्यां श्रावणे चैव स्वातियोगे च वर्षति ॥
निष्पत्तिः सर्वसस्यानां भवंति सुखिनःप्रजाः ॥ ८९
नभस्यस्तंगते भानौ सप्तम्यां शुक्लपक्षके ॥
दृश्यते न च पर्जन्य स्तदा मेघो न वर्षति ॥ ९०
श्रावणस्य सिते पक्षे पूर्वाभाद्रपदासु च ॥
चतुर्थ्यां जलपातं स्यात्तदाप्येकार्णवा मही ॥९१
श्रवणर्क्षे पौर्णिमास्यां यदि मेघः प्रवर्षति ॥
तस्मिन्काले सुभीक्षं स्यात्पृथ्वी स्यादन्नसंकुला ॥९२

इति श्रावणमासः

नभस्य सप्तमी कृष्णरोहिणी मंदसंयुता ॥
गुरुशुक्रार्कयुक्ताश्च यवगोधूमनाशिनी ॥९३
हरिद्राजीरकं सीसं पारदं हिंगुरैक्षवम् ॥
तिलाः कस्तूरिका चैव महर्घंति न संशयः ॥९४
गते तु मासत्रितये विक्रीते लाभमादिशेत् ॥
नभस्यस्य तृतीयायां प्रहरे च तृतीयके ॥९५
उत्तरस्यां घना दृष्टा स्तदास्युः सुखिनः प्रजाः ॥
अन्नसंग्रहणं कार्यं षष्ठे मासि महर्घता ॥९६

यदा भाद्रपदे मासि संक्रांतौ जलवर्षणं ॥
तदा भवंति रोगाश्च प्राणिनां चाश्विने भयम् ॥९७
अमा वै भाद्रमासस्य युक्ता चेद्भानुना यदि ॥
तदा महर्घता ज्ञेया सस्यानां दैवचिंतकैः ॥९८

इति भाद्रपदमासः

आश्विनस्य त्रयोदश्यां शनिवारो यदा भवेत् ॥
यदि संक्रमणं तत्र रवेः सस्याकुला मही ॥९९
आश्विने शनिवक्रं स्याद्बुधो राश्यंतरं व्रजेत् ॥
शुक्रश्चास्तमयं याति तदान्नप्लाविता धरा ॥१००
शनिराग्नेश्च तत्रैव संचारो जायते यदि ॥
तैलसूत्रसणादीनां तदा वाच्या महर्घता ॥१०१
आश्विने शुक्लसप्तम्या मष्टम्यां वारिवर्षणं ॥
तदासुभिक्षमादेश्यं राजानःसंति विग्रहः ॥१०२
यदा चाश्वियुजे मासि दशम्यां प्रतिपत्तिथौ ॥
अष्टम्यामंबरे मेघाः क्षिप्रं जलप्रदायकाः १०३
आदित्यास्तमये मेघाः पर्वताकारसंनिभाः ॥
दृश्यंते जलपातः स्यात्तस्मिन्नेव दिने तदा ॥१०४

इत्याश्विनफलं

कार्त्तिके मार्गशीर्षे वा संक्रांतौ वारिवर्षणं ॥
तदा समहर्घता पौषे सस्यवृद्धिस्तु मध्यमा ॥ १०५
कार्त्तिकस्य त्वमावास्या सूर्यवारेण संयुता ॥
शनिभौमयुतावापि तदा लोकभयावहा ॥ १०६
यदा कार्त्तिकमासे तु वारिदस्य च गर्जनं ॥
भवत्यन्नमहर्घत्वं सस्यसंपत्तिरुत्तमा ॥ १०७

तत्र वा रविसंक्रांतौ तत्समीपेथवा यदा ॥
तदा दुःखयुता लोकाः सर्वसस्यमहर्घता ॥ १०८
ऊर्जस्य द्वादशी शुक्ला रजनी निर्मला यदा ॥
पूर्णिमा कृत्तिकायुक्ता तदा लोकाः सुखान्विताः ॥१०९
अथवा भरणी सर्वा कार्त्तिक्यां भवति ध्रुवं ॥
दुर्भिक्षं जायते घोरं तथा रोगा भवंति च ॥११०
तस्यामेषाश्विनी योगः सस्यसंपच्चमध्यमा ॥
यदि चेद्रोहिणी योगो जंतवः क्लेशभागिनः ॥१११
यदा कार्त्तिकमासे तु ग्रहणं चंद्रसूर्ययोः ॥
निर्घातो भूमिकंपश्च तारकापतनं तथा ॥११२
उल्कापातो रजःपातो ह्यनभ्रे जलवर्षणं ॥
एते चान्ये तथोत्पाताः भवंति मनुजैस्तथा ॥११३॥
संग्रहः सर्वधान्यानां कर्तव्यो धनकांक्षिभिः ॥
विक्रीते पंचमे मासि लाभश्च द्विगुणो भवेत् ॥११४॥

इति कार्त्तिकमासः

मार्गशीर्षे चतुर्दश्यां दर्शेवा दृश्यते यदा ॥
घनैराच्छादितो भानु स्तदा सस्यमहर्घता ॥११५
मार्गशुक्ल द्वितीयायां शनिवारे च दक्षिणः ॥
वातो वहति लोकानां तदा कष्टप्रदायकः ॥
मार्गशीर्षादिमासेषु शुक्लपक्षे तिथिक्षयः ॥
छत्रभंगं प्रजापीडां दुर्भिक्षं च समादिशेत् ॥११७
मार्गशीर्षे कृष्णपक्षे तिथिवृद्धिस्तु जायते ॥
तदायुद्धाकुला पृथ्वी प्रजाः क्रंदंति नित्यशः ॥११८
मार्गशीर्षस्य सप्तम्यां नवम्यामीशदिग्यदा ॥
दृश्यते मेघसंछन्ना स्तोकं वर्षति वासवः ॥ ११९

मार्गकृष्णचतुर्थ्यां तु पित्र्यर्क्षे मेघदर्शनं ॥
अथवा जलपातःस्यात्तदाषाढे तिवर्षणं ॥१२०
समर्घता च सस्यानामादेश्या गणकोत्तमैः ॥
मार्गकृष्णाष्टमीस्वाती चित्रायुक्ता यदा भवेत् ॥१२१
मेघाक्रांतं नभस्तस्यां दृश्यते सर्वतस्तदा ॥
तस्मिन्नृक्षे तदाषाढे जायते वृष्टिरुत्तमा ॥१२२
सर्वसस्ययुता पृथ्वी प्रजा नंदंति नित्यशः ॥
चातुर्थी सार्पसंयुक्ता पंचमी पितृसंयुता ॥१२३
षष्ठी च भगसंयुक्ता मार्गमासि यदा भवेत् ॥
त्रिरात्रं महती वृष्टि राषाढे शुक्लपक्षके ॥१२४
अष्टमी चाथवा नवमी त्रित्रायुक्ता यदा भवेत् ॥
वातर्क्षे च यदाषाढे मेघा वर्षंति नित्यशः ॥१२५

इति मार्गशीर्षफलं.

पौषस्य पंचमी कृष्णा भौमवारेण संयुता ॥
तस्यां मेघाः प्रवर्षंति तदा धान्याकुला मही ॥१२६
अतसीघृत मांजिष्ठ वर्षे याति महर्घता ॥
एकादश्यां नवम्यां च पौषमासे घना यदि ॥१२७
पूर्वस्यां दिशि गर्जंति तदा सस्य विनाशकाः ॥
यदा वै पश्चिमायां च तदा धान्यविवर्धकाः ॥१२८
पोषे कृष्णेच सप्तम्यां पौषे मासि मही निशी ॥
यदा मेघाश्च गर्जंति तदा प्रावृषितोयदा ॥१२९
पौषस्य यद्यमावास्या ज्येष्ठानक्षत्रसंयुता ॥
तदा सस्यसमर्घं च मूल्ययुक्तालपमूल्यता ॥१३०
यदा तोयर्क्षसंयुक्ता तदा सस्यविवर्धनं ॥
उत्तराषाढसंयुक्ता भयदुर्भिक्षकारिणी ॥१३१

शुक्ला त्रयोदशी पौषे मंदशुक्रकुजैर्युता ॥
तदा भवत्यनावृष्टिः कार्यो गोधूमसंग्रहः ॥१३२
पौषे शुक्ले चतुर्थ्यां तु विद्युद्दर्शनमुत्तमं ॥
तथा वियद्घनच्छिन्नं दृष्टमिंद्रधनुस्तथा ॥१३३
पौषे मासि च पूर्वायां विशेषेण निरीक्षयेत् ॥
परिवेशो गर्जनं वा विद्युद्वारिच दर्शनं ॥१३४
यदि तत्र प्रजायंते तदा वृष्टिरनुत्तमा ॥
धनुर्विद्युद्घनो मेघो यद्येकमपि नो भवेत् ॥१३५
पौषे मासे तदा वाच्यं वर्षाकाले ह्यवर्षणं ॥
पौषे मासे वारुणर्क्षे पूर्वाभाद्रेभ्रदर्शनं ॥१३६
आषाढे कृष्णपंचम्यां तदा वृष्टि निरंतरं ॥
पौषमासे शुक्लपक्षे पंचम्यां हिमवर्षणं ॥१३७
यदा स्यान्महती वृष्टि स्तदा प्रावृट्विनिर्दिशेत् ॥
पौषस्य सप्तमी शुक्ला रेवती संयुता तथा ॥१३८
अष्टम्यामश्विनी योगो नवम्यां भरणी यदा ॥
एवं विधेषु योगेषु सविद्युद्घनवर्षणं ॥१३९
तदा स्यान्महती वृष्टि र्वर्षाकाले न संशयः ॥
एकादश्यां यदा विद्युद्रोहिण्यां जलवर्षणं ॥१४०
पौषे यदा तदा वृष्टिः प्रावृषिस्यात्समर्घता ॥
पूर्णिमास्यां द्वितीयायां पौषे विद्युत्प्रदृश्यते ॥१४१
तदा स्यादन्ननिष्पत्ति र्मेघछन्ने तथांबरे ॥
पौषे मासेर्क संक्रांतिः सूर्यवारे यदा भवेत् ॥१४२
धान्यमूल्यं द्विगुणितं तदा भवति नान्यथा ॥
शनिवारे त्रिगुणितं तदा भौमे चतुर्गुणं ॥१४३

बुध भृग्वोःसमत्वं च मूलार्धे शशिजीवयोः ॥
अत्र मासस्य संक्रांतिः शनौ भानुकुजेहनि ॥ १४४
तदा भवति दुर्भिक्षं तथा स्याद्राजविग्रहाः ॥
मूलमारभ्य याम्यां तं नभो भवति साभ्रकं ॥ १४५
रौद्रमारभ्यवातांतं तदा वर्षति वासवः ॥
धनुराशिगते भानौ मूलमारभ्य चिंतयेत् ॥ १४६
गर्भाधानं ततो वृष्टिः षष्ठे मासि हि सार्धके ॥
मूलर्क्षे च यदा गर्भो भवत्यार्द्रांच वर्षति ॥ १४७
पूर्वाषाढे तथादित्यमुत्तरायां तथा गुरुः ॥
श्रवणे सार्पभं चैव वासवे पितृभं तथा ॥ १४८
वारुणे भाग्यभं चैव पूर्वाषाढे यमं खलु ॥
हस्तो वर्षत्युत्तरायां रेवत्यां वार्द्रका तथा ॥ १४९
एतद्गर्भसमासेन मयोक्तं चिंतयेत्सुधीः ॥
तुरंगर्क्षे गते भानौ यदि मेघः प्रवर्षति ॥ १५०
मूलोद्भवं तथा गर्भं नादेश्यं दैवचिंतकैः ॥
भरण्यादिस्थिते भानौ यस्मिन्मेघःप्रवर्षति ॥ १५१
तस्मिन् तस्मिन् तदृक्षे च गर्भनाशं विनिर्दिशेत् ॥
रौद्रर्क्षे संस्थिते भानौ जलं वर्षति वारिदः ॥ १५२
पुष्टि र्भवति गर्भाणां प्रोक्तानां नात्रसंशयः ॥
पौषस्यतु पंचदश्यां विधोर्याम्योत्तरा तडित् ॥ १५३
दृश्यते वियदाछिन्नं घनैर्वृष्टिस्तदा भवेत् ॥
पौषे स्वात्यां च सप्तम्यां यदा स्याद्वारिवर्षणं ॥ १५४
मेघाछिन्नं नभो वापि तदा सस्याकुलाधरा ॥
कुह्वन्तासु त्रितिथिषु पोषे गर्भः प्रजायते ॥ १५५

तदा सुभिक्षमारोग्यं श्रावण्यां वारिवर्षणं ॥
पौषस्य कृष्ण सप्तम्यां नभो विमलतारकं ॥ १५९
स्वात्यां तुषारपातःस्याच्छ्रावणे तत्र वर्षणं ॥
प्रजा भवंति मुदिताः सर्वसस्य समहर्घता ॥ १६७
अमावास्यायां सहस्ये शनिसूर्यवासरा : ॥
भवंति भयमादेशं तदा सस्यमहर्घता ॥ १६८
पौषसस्य कुह्वां तु सप्तम्यां वारिवर्षणं ॥
प्रावृट्काले तदा वृष्टि र्घर्मस्याद्वारिवर्षणं ॥ १६९
शुक्लायां यदि सप्तम्यां घनैराच्छादितं नभः ॥
तदा तु श्रावणे मासि सप्तम्यां वृष्टिरुत्तमा ॥ १६०

इति पौषमासफलं

माघशुक्लद्वितीयायां तृतीयां शुक्रसंयुता ॥
यदा स्यान्मंदसंयुक्ता तदा युद्धाकुलाधरा ॥१६१
यदा स्याद्गुरुसंयुक्ता तदा सस्यकुलाधरा ॥
राजानस्तत्र सुखिनः प्रजा नंदंति सर्वशः ॥१६२
पंचमी चैव षष्ठीच कृष्णा माघस्य सप्तमी ॥
शुक्रार्क चद्रसंयुक्ता तदा युद्धाकुलाधरा ॥१६३
एते योगो यदा मेघा न भवंति तदा भृशं ॥
भाद्रमासे च गोधूमं मुद्गधान्यमहर्घता ॥१६४
माघमासे त्रयोदश्यां यदा स्याद्विमवर्षणं ॥
पृथ्वी तदान्नबहूला प्रजाः सुखसमन्विताः ॥१६५
हिमं न पतितं माघे ज्येष्ठे मूलंच वर्षति ॥
नार्द्रायां पतितं वारि कालो दुष्टस्तदा मतः ॥१६६
माघमासेच संक्रांतौ यदा वर्षति वारिदः ॥
तदा पृथ्वी तु सस्याढ्या धेनवो बहुदुग्धदाः ॥१६७

माघशुक्लप्रतिपदि बुधवारो भवेद्यदि ॥
अन्नं समर्घतां याति वर्षे त्वागामिके भयं ॥१६८
पंचार्काः पंचभौमाश्च पंच वा मंदवासराः ॥
दुर्भिक्षंभयमादेश्यं तदा शेषाः शुभावहाः ॥ १६९
येषु येषु च मासेषु सस्यवृद्धिः प्रजायते ॥
सुभीक्षं क्षेममारोग्यं तेषु ज्ञेयं विचक्षणैः ॥ १७०
माघमासस्य प्रतिपत्सवाता मेघगर्जिता ॥
यदा याति महर्घत्वं तैलद्रव्यसुगंधिकं ॥ १७१
द्वितीया मेघसंछन्ना धनधान्यविवृद्धिदा ॥
माघमासे तृतीयायां गर्जनं च जलं विना ॥ १७२
संग्रहस्तत्र कर्तव्यो गोधूमस्य यवस्य च ॥
चतुर्थी जलसंयुक्ता नारिकेलार्थदा मता ॥ १७३
पंचमी मेघसंयुक्ता यदा जलविवर्जिता ॥
तदा भाद्रपदे मासि स्वल्पा वृष्टिस्तु जायते ॥ १७४
षष्ठयां निरभ्रं गगनं दिशश्च विमला यदा ॥
संग्रहस्तत्र कर्तव्यः कार्पासस्य हितैषिणः ॥ १७५
सप्तमी सोमसंयुक्ता राजविग्रहकारका ॥
मासे धवलपक्षस्य महादुर्भिक्षदायका ॥ १७६
आदित्योदयवेलायां यदा स्यादष्टमी तिथिः ॥
तदा रौद्रगते सूर्ये श्रावणे नच वर्षति ॥ १७७
नवम्यां चंद्रबिंबे तु परिवेषस्तु जायते ॥
तदाषाढे महावृष्टिः सर्वधान्यमहर्घता ॥१७८
शुक्लपक्षस्य सप्तम्या माघे व्योमान्वितं घनैः ॥
पुरो वातोथ कौबेरो वारुण्यां चंचला यदि ॥ १७९

हिमं पतति वा तत्र वांति वातास्तथोद्धताः ॥
तदा सुभिक्षमादेश्यं तस्मिन्देशे विचक्षणैः ॥ १८०
माघमासे तपस्ये वा चैत्राषाढे च माधवे ॥
सप्तम्यां स्वाति युक्तायां लक्षणं च भयप्रदं ॥ १८१
माघस्य नवमी कृष्णा दशम्येकादशी तथा ॥
विद्युद्वातसमायुक्ता तदा जलबहुप्रदा ॥ १८२
कृष्णायां वा त्रयोदश्यां चतुर्दश्यामथापि वा ॥
पूर्वस्यां चोत्थिता मेघा स्तदाषाढे च वर्षणं ॥ १८३
पंचमी कृष्णपक्षस्य माघमासस्य षष्ठिका ॥
सप्तमी शुक्रमंदेंदुयुक्ता सस्यार्थदा मता ॥ १८४
एते योगा यदा माघे न भवंति तदा खलु ॥
गोधूमाः शालयो मुद्गा भाद्रे याति महर्घता ॥ १८५
माघमासे त्रयोदश्यां हिमैराच्छादितं नभः ॥
यदा तदा समर्घास्यु व्रीहयो नात्रसंशयः ॥ १८६
आमावस्या यदा छिन्ना तदा भाद्रे जलं भवेत् ॥
पौर्णिमासी घनैश्छिन्ना षष्ठे मासि महर्घता ॥ १८७
माघस्य शुक्लसप्तम्यां यदि स्याद्वारिवर्षणं ॥
सविद्युन्मेघसंयुक्ता तदा पृथ्वी जलाप्लुता ॥ १८८

इति माघमासफलं

यदा वक्रगतिस्यातां शनिभौमौ तपस्यके ॥
माघे वाद्यासु तिथिषु त्रिषुसस्यस्य संग्रहः ॥१८९
कार्यो विपश्चिता तत्र पक्षांते स्याच्चतुर्गुणं ॥
फाल्गुनेच गुरोरस्तं वक्रं वा यदि जायते ॥१९०
तदा सस्यमहर्घत्वं शनिर्वा वक्रतां व्रजेत् ॥
यदा तु फाल्गुने मासि प्रयात्यस्तं भृगोः सुतः ॥१९१

धान्यानि सर्वसस्यानां तदा वाच्या महर्घता ॥
कविरस्तं यदा याति फाल्गुने मासि निश्चितं ॥१९२
तदा दुर्भिक्षमादेश्य षण्मास दैवचिंतकैः ॥
सप्तमी कृत्तिकायुक्ता फाल्गुनस्य सिता यदि १९३
तदा भाद्रपदे मासि कुहु र्मेघप्रवर्षणं ॥
विना वातं घनैश्छिन्नं वियतस्यां तिथौ यदा ॥ १९४
विद्युद्वा दृश्यते तत्र तदा सस्यावृता मही ॥
फाल्गुनस्य त्रयोदश्यामष्टम्यां वृष्टिरुत्तमा ॥ १९५
यदि स्याच्च सितायां वै तदा सस्यावृता मही ॥
प्रतिपच्छुक्लपक्षे तु वृद्धि र्याति शुभप्रदा ॥ १९६
तृतीया दुःखदा प्रोक्ता चतुर्दश्याष्टमी तथा ॥
फाल्गुने मीनसंक्रांतौ भानुवारे नृपक्षयः ॥ १९७
भौमशन्योश्च दुर्भिक्षं शुभं जीवेर्कवौ वियौ ॥
माघे हिमं न पतितं वातो वाति न फाल्गुने ॥ १९८
नच व्योमान्वितं चैत्र घनेन पततं खलु ॥
कारकाणां च वैशाखे शुक्रे चंडातपो नहि ॥ १९९
तदातितुच्छवृष्टिः स्यात्प्रावृट्काले न संशयः ॥

इति फाल्गुनमासफलं

मीने मेषेच सिंहे धन मकर वृषे वक्रतो मंदभौमे ॥
पृथ्वी संतप्तदेहा हयस्वरदलिताद्विग्रहः पार्थिवानां ॥
दुर्भिक्षं देशभंगं जनपदमरणं जायते रोगपीडा ॥
नश्यंते गोगजाश्वा जलचरविहगारण्यजीवा मृगाश्च ॥२००
अतिचारगते जीवे वक्री भौमे शनैश्चरे ॥
हाहाभूतं जगत्सर्वं विशेषं दक्षिणापथे ॥ २०१

द्वित्रिरक्षे सुभीक्षं स्याच्चतुः पंचमहर्घता ॥
षष्ठे लोका भ्रमंत्याशु गृहीत्वा खर्परे करे ॥ २०२
आषाढे च शनेःपंच श्रावणे रविपंचके ॥
भोमे भाद्रपदे पंच कर्त्तव्यो धान्यसंग्रहः ॥२०३
आषाढे श्रावणे पौषे अर्कभौमशनैश्चराः ॥
वासरा यत्र जायंते फलं चैव शृणुष्व तत् ॥ २०४
पंचार्कवासरे रोगाः पंचभौमे महद्भयम् ॥
पंच मंदे च दुर्भिक्षं शेषा वाराः शुभावहाः ॥ २०५
आषाढे श्रावणे पौषे वैशाखे भृगुदर्शनं ॥
गवां मृत्युःप्रजाः पीडा दुर्भिक्षं राजविड्भयं ॥ २०६

समाप्तं.

२ ज्योतिर्विभूषण

गेल्या अंकांत रा० घोलप जोतिषी यांनीं लग्नाच्या खरे खोटेपणाचा निर्णय करण्याकरितां जे तीन नियम दिले आहेत ते कसे लटपटीत आहेत याविषयीं विवेचन केलें आहे. एखादा नियम सर्व ठिकाणीं लागू पडेल असें नाहीं, परंतु जो नियम ह्मणून ह्मणावयाचा त्यांत दोष तरी असतां कामा नये. दादोबाच्या व्याकरणांत 'ज्याला तो लागतो तें पुल्लिंग; ती लागते तें स्त्रीलिंग व तें लागतें तें नपुंसकलिंग' याप्रमाणें लिंग ओळखण्याचे नियम दिले आहेत. परंतु अमुक शब्दाच्या मागें तो लागतो हें तो शब्द पुल्लिंगी आहे असें समजल्याशिवाय कसें कळणार? तसें जर कळतें तर तेलंगी लोक 'आमचा परीक्षा पास झाले' असें कां बोलते? सारांश लिंग ओळखण्यासाठीं ह्मणून जो नियम केला तो लिंगाची ओळख असेल त्यांच्याच साठीं असें समजलें पाहिजे. त्याचप्रमाणें ज्योतिर्विभूषणांचे तीन नियम आहेत. जर लग्न बरोबर आहे असें आपणास निश्चयात्मक माहित असेल आणि चंद्रलग्नाधिप किंवा प्राणपद किंवा गुलिक कुंडलींत १।२।४।६।८।१०।१२ या स्थानांत नसेल तर वरील नियमानें हा चमत्कार दिसणार. असले बेलगामी नियम ज्योतिःशास्त्रांत पारंगत होऊन पदवी मिळविलेल्या ग्रंथकारांनीं देतांना फार सावधगिरी घेतली पाहिजे होती. ग्रंथांच्या उताऱ्यांनींच ग्रंथ तयार करणें याला लोक काय ह्मणत असतील?

ज्योतिर्विभूषणांनीं जन्मलग्न खरें खोटें पाहण्याचे जे तीन नियम दिले आहेत ते सर्व लागू करू नहीं जर निर्णय झाला नाहीं. तर आणखी चवथा नियम आह्मीं देतों, तो लागू करून पहावा.—

"निषेकलग्नादिनपन्तृतीये राशौयदाचारवशादुपैति ॥
आधानलग्नादथवात्रिकोणे रवौ यदाजन्मवदे-

ती तीन महिन्यांची झाली तेव्हां तर स्पष्ट बोलूं लागली. तिचे पहिलें वाक्य असें होतें. "मागील जन्मीं अळींगड मधील एकाची सून होतें. घराच्या छपरावरून पडून मी मेलें. माझे कपडे तेथें आहेत. आणि जवळच एका ठिकाणीं मी पुरून ठेवलेले पैसे आहेत." मुलीचे ते पहिले शब्द ऐकून घरच्या मंडळींना आणि इतरांना इतकें आश्चर्य वाटलें कीं, तिच्या ह्मणण्याची सत्यता पाहण्या करितां तिला अळींगड येथें नेण्याची त्यांना प्रबळ इच्छा झाली. तेथें गेल्यावर तिनें सांगितलेल्या ठिकाणी एक शेख खरोखरीच राहत असे. त्याच्या घरीं नेल्यावर आपली पेटी आणि पैसे पुरलेली जागा तिनें ओळखली. त्या वृद्ध शेखानेंही तिनें सांगितलेली हकीकत अगदीं खरी आहे, असें सांगितलें. आणि त्या जागीं खणून पाहिल्यावर तिनें सांगितलेली रकम सांपडली. ते पाहून लोकांनीं आश्चर्यचकित होऊन तोंडांत बोटें घातलीं. ती मुलगी सध्या सहा वर्षांची आहे. शेर बायकांपेक्षां ती घरांतील कामें काळजीनें आणि हुषारीनें करिते. ती फार व्यवस्थितपणानें आणि स्वच्छपणानें राहते. दुर्गंध तिला अगदीं खपत नाहीं. तिच्या आचरणांत आणखी एक विशेष गोष्ट आहे, तिजवरून तर पुनर्जन्माच्या तत्वास अधिकच बळकटी येते. निवाजाच्या पूर्वी मुसलमान लोक ज्याप्रमाणें एका विशेष प्रकारानें हातपाय धुतात, त्याच रीतीनें ती आपले हातपाय धुते!

(हरिकिशोर, यवतमाळ.)

* * *

—फाल्गुन अधिक कीं चैत्र अधिक याच्या निर्णयार्थ पुण्यास विद्वान् शास्त्री मंडळाची सभा भरली होती. बहुमतानें चैत्र अधिक धरावा व केतकरांचा अभिमान बाळगणारांनीं फाल्गुन अधिक धरावा असें ठरलें. पंचांग शोधन कमेटीनें अयनांश २२ पासून २३ पर्यंत धरावे असें ठरविलें होतें. त्याप्रमाणें केतकरांचेही आहेत. बापुदेव, नेने व केतकर यांचें गणित नाटिकलला अनुसरूनच आहे. पण बापुदेव व नेने यांच्या अयनांशापेक्षां केतकरांचे किंचित् जास्त आहेत, सबब ते नापास! वरील सभेंत दे. टिळक होते व त्यांचाच हा कोटिक्रम! जोंपर्यंत आरंभ स्थानाला बळकट व निःसंशय पुरावा नाहीं, तोंपर्यंत असले कोटिक्रम चालणारच.

९ पुत्रकन्यादिगर्भस्वरूप.

[सदरचा लेख संपादकाच्या मताचाच आहे असें समजूं नये.]

[पु. ६ अं. १२ वरून]

क्षितिज सितज्ञ चंद्ररविसौम्यसितावनिजाः ।
सुरगुरु मंद सौरि गुरवश्च बृहांशकपाः ॥

मेष, वृश्चिक — मंगळ वृषभ, तूळ — शुक्र. मिथुन, कन्या — बुध. कर्क — चंद्र. सिंह — सूर्य. मकर, कुंभ — शनि. धनु, मीन — गुरु याप्रमाणें राशींचे स्वामी आहेत.

स्पष्ट ग्रह.

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.
४	८	३	४	२	५	१०
१३	२६	२८	१	१४	२८	१५
३	४०	९	१८	८	१९	३७
१०	०	३४	२८	२८	२१	३८

द्वादशभाव व त्यांचे संधि

त.	सं.	ध.	सं.	स.	सं.	मु.	सं.
६	७	७	८	८	९	९	१०
२५	१०	२५	१०	२५	१०	२५	१०
३८	३३	२९	२४	२०	१५	११	१५
१९	४८	१७	४६	१५	४४	१८	४९

सु.	सं.	रि.	सं.	जा.	सं.	मृ.	सं.
१०	११	११	०	०	१	१	२
२५	१०	२५	१०	२५	१०	२५	१०
२०	२४	२९	३३	३८	३३	२९	२४
२०	५१	२२	५३	१९	४८	१७	४६

ध.	सं.	क.	सं.	आ.	सं.	व्य.	सं.
२	३	३	४	४	५	५	६
२५	१०	२५	१०	२५	१०	२५	१०
२०	१५	११	१५	२०	२४	२९	३३
१५	४४	१२	४९	२०	५१	२२	५३



तूळ राशीचे २० अंश आणि वृश्चिक राशीचे १० अंश मिळून तनुःभाव सिद्ध झाला आहे. वृश्चिकाचे २० अंश व धनूचे १० अं. मिळून धनभाव झाला आहे. याच रीतीनें बाकीचे भाव सिद्ध झाले आहेत. ह्मणून प्रत्येक भावांत बहुधा दोन ग्रहांचें स्वामित्व असतें. जसें— वरील कुंडलींत तनुस्थानाचें स्वामित्व २० अंशांपर्यंत शुक्राकडे असून पुढें १० अंश मंगळाकडे आहे. धनभावाचें स्वामित्व २० अंशांपर्यंत मंगळाकडे असून पुढें १० अंश गुरूकडे आहे.

ज्या राशीच्या ज्या अंशविभागानें ज्या भावास आरंभ होतो तें त्या भावाचें प्रवेशस्थान ह्मणतात.

ज्या राशीचे विवक्षित अंश इष्ट काळाच्या वेळेस युक्त होतात त्यास भाव अशी संज्ञा असते.

ज्या राशीचे विवक्षित अंश भाव पुरा होण्यासाठीं इष्ट काळा पुढें भोग्य ठरले आहेत त्यास त्या भावाचा शेवट ह्मणतात.

अर्थात् भावांच्या ज्या गोष्टी आपणांस पहावयाच्या आहेत त्या अंशदृष्ट्या असल्यामुळें आणखी त्यांत सूक्ष्म भिन्नता उत्पन्न होते, ती येणेंप्रमाणें.—

इष्टकाळाच्या वेळेस भाव ज्या अंशावर असेल, त्या अंशापासून भावांत असलेल्या राशीचें फल मिळेल, आरंभापासून मिळेल असें ह्मणणें चुकीचें ठरतें. तूळेचे अंत्य पांच अंश आणि वृश्चिकेचे आरंभींचे १० अंश मिळून १५ अंशामध्यें तनुभावाचें फल मिळेल (?) याचप्रमाणें बाकीच्या भावांविषयीं जाणावें.

१ एकाच राशीवर दोन ग्रह समान अंशांत असले ह्मणजे त्यांना युक्त • अशी संज्ञा असते.

२ कोणत्याही स्थानांत कोणत्याही ग्रहापासून कोणताही ग्रह आहे असें ह्मणणें ह्मणजे जो ग्रह ज्या अंशावर आहे असें अंशापासून किंवा त्या अंशाच्या पुढें सरकलेला जो ग्रह तो त्या ग्रहाच्या त्या स्थानांत आहे असें ह्मणणें होय.

३ कर्तरी ठेवणारे ग्रह आणि कर्तरींत असणारा ग्रह यांचे अंश सारखे पाहिजेत.

४ भावांत असणारा ग्रह ह्मणजे जो भाव जितक्या अंशांनीं उदित आहे तितक्या अंशापेक्षां अधिक अंश असलेला ग्रह भावांत आहे असें ह्मणणें होय.

५ आरंभसंधीपेक्षां अधिक पण भावापेक्षां कमी असलेल्या ग्रहांचें फल भावांत फारच कमी असतें.

६ भावावर दृष्टि करणारे ग्रह जो भाव जितक्या अंशांनीं उदित आहे, त्या अंशांपेक्षां अधिक अंशानें असणाऱ्या ग्रहाचा अंमल त्या भावावर असतो.

७ कोणताही ग्रह कोणत्याही अंशावर उदय पावला असो, तो त्या अंशापासून फल देतो, हें

तत्व ध्यानांत ठेवण्यासारखे आहे.

८ कर्क राशींत १० अंशांवर असलेला ग्रह कर्क राशीच्या १० अं. पासून फल उत्पन्न करितो. कर्क राशीच्या आरंभापासून फल उत्पन्न करितो असें ह्मणणें उघड उघड चुकीचें आहे.

९ एकाच राशींत भिन्न भिन्न अंशांत असलेल्या ग्रहांचा अंमल त्याच राशींत परस्परांवर मुळींच होत नाहीं.

१० परस्पर दृष्टिसंबंध करणारे ग्रह निरनिराळ्या अंशांत असतील तर त्यांचा परिणाम परस्परांवर मुळींच होणार नाहीं.

११ कोणताही ग्रह कोणत्याही अंशांवर उदय पावलेला असो, पण कोणत्याही ग्रहाच्या कमी अंशांत असलेला ग्रह त्या ग्रहापासून अमक्या स्थानांत आहे असें ह्मणणें चुकीचें ठरतें.

१२ निरनिराळ्या अंशांच्या पाप ग्रहांत किंवा शुभग्रहांत भिन्न अंशाचा ग्रह आहे, तेव्हां ती कर्तरी आहे हेंही ह्मणणें चुकीचें ठरतें.

१३ भाव ज्या अंशावर उदित आहे त्यापेक्षां कमी अंशानें असलेला ग्रह भावांत आहे असें ह्मणणें चुकीचें आहे.

असो. यापुढें बलवान् अंशज्ञान त्यांचा उपयोग व कुंडली पाहण्याचें तत्व याचें वर्णन यथामति करणार आहों.

मेष राशीचें स्वरूप

ताम्रवर्तुल नेत्र, कढत पदार्थ भक्षण करणारा, थोडक्यांत प्रसन्न होणारा, हिंडत फिरणारा, कामी, गुढग्यांत दुर्बल, अस्थिर धन, शूर, स्त्रियांस प्रिय, सेवाकर्मांत निपुण, नखें वाईट, डोक्यावर शस्त्रजन्य वगैरे व्रण, मानी, भावंडांत वडील, तळहातावर शक्तिचिन्ह, फार चलाख, पाण्याला भितरा, क्रोधी, भांडखोर, द्वेषी, क्षत्रियवर्ण, शूर, शस्त्रवैद्यकामध्यें प्रवीण, रक्तश्यामवर्ण, चोरी करणारा, हिंसक, निंद्यस्थानीं स्थिति, नापीत, लोहकार, कलहप्रिय, पिंवळे नेत्र, व्रणयुक्त, मोठें मस्तक, मध्यम उंच, तिक्तरसप्रिय, अरण्य—पर्वत—गुहा यांचे ठायीं प्रीति.

(पुढें चालेल)

३ पत्रव्यवहार

[रा० गणेश दामोदर ग्रंथे.]

१ लग्न कुंडलींत चतुर्थ स्थानांत शुभ ग्रह असल्यास भाऊबंद, सोयरे धायरे वगैरे पुष्कळ असतात. त्यावर शुभ ग्रहांची दृष्टि असल्यास त्यांशीं पटतें. व पाप ग्रहांची दृष्टि असल्यास पटत नाहीं.

२ ज्याप्रमाणें शनि सप्तमांत असतां व्यभिचार घडतो त्याचप्रमाणें हर्शल असतांही घडतो व प्रेमातिशयानें द्रव्यही मिळतें.

३ लग्नीं शनि व राहु असलेलीं मंडळी गांजा, भांग, घोटा यांची शोकी असतें.

४ वृश्चिक लग्नाचा किंवा राशीचा मनुष्य सरळ असा कोणाशींच वागत नाहीं. परंतु त्यास राशिमैत्रीचा अपवाद आहे. लग्नीं मंगळ नसला तरी फक्त वृश्चिक लग्नीं हा राशि मंगळाप्रमाणें गुणधर्म उत्पन्न करितो.

५ लग्नीं गुरु असलेली मंडळी बहुतेक कीर्तीची महत्वाकांक्षी असतें. विद्या वगैरे कामांत हर्शलचा अंमल इतर ग्रहांपेक्षां जास्त दृष्टीस पडतो.

६ अष्टम किंवा चतुर्थस्थानांत मंगळ असलेली बहुतेक मंडळी वतनदार व शेतकरी आढळतात.

७ ग्रह स्वगृहसंमुख राशीवर दुर्बल असतात. मग ते दुसऱ्या कोणत्याही रीतीनें बलवान् असोत.

८ गोचरींचे ग्रह पाहण्याची रीति चंद्रावरून आहे, तशी ती लग्नावरूनही आहे. तीं चंद्रापेक्षां जास्त फलप्रद होते असा अनुभव आहे.

आकाशांत शुक्र व चंद्र सूक्ष्म रीतीनें पाहिले आहेत. चंद्र फिकट पांढरा व शुक्र लालसर गौर दिसतो. त्याप्रमाणें कुंडलींत ते रंग उत्पन्न होतात.

याप्रमाणें मला स्वतःला अनुभव मिळाला आहे.

नंबर २

कुंडलीविज्ञान कर्ते यांस

सा. न. वि. वि. आधान लग्नाचा जन्मलग्नाशीं कांहीं तरी संबंध असावा असें मला वाटत होतें परंतु प्रत्यक्ष अनुभवाशिवाय माझें मत ठाम होईना माझें मत ठाम होण्यास पुष्कळच अडचणी ! परंतु आधान काळ कळविण्याकरितां मी माझ्या विवाहित मित्रांस विनंति केली त्यापैकीं कांहीं मित्रांनीं हा काल समजतो हें ह्मणणें असमंजस पणाचें आहे असें ह्मणून नकारार्थी उत्तर दिलें. परंतु त्यापैकीं जे ज्योतिष जाणणारे होते त्यांनी संभोगकाळ सांगण्याचें मला अभिवचन दिलें. शके १८२७ फाल्गुन शु० ५ तुला लग्न हा संभोग काळ सांगून माझा मित्र मुंबईस गेला मंबइहून आल्यावर पत्नी गरोदर आहे असें त्यास कळलें तेव्हां वर दिलेली संभोग वेळा हीच अधान वेळा धरून (संभोग वेळा नंतर जी सांगितली ती) आधान कुंडली मांडिली व जन्म कधीं होईल व अपत्य काय होईल हें काढलें व तें अगदीं तंतोतंत जुळलें ह्मणून आपल्या ज्योतिर्विद मान्य पत्रांत प्रसिद्धी करितां पाठविलें आहे

आधानलग्नकुंडली

जन्मलग्नकुंडली.

*शु. श.र. बु.

आधान लग्नाचे पंचमस्थानीं कुंभ राशि आहे तेव्हां जन्मलग्न कुंभच असावें आधान कुंडलींत कुंभेला रवि आहे तेव्हां कुंभेपासून नवव्या राशीवर सूर्य गेला ह्मणजे जन्म झाला पाहिजे. कुंभेपासून नववी राशि तूला होय तेव्हां जन्मलग्न नवमस्थानीं रवि असावा. चंद्र आधान लग्नीं मेषेचा आहे तो शुक्ल पक्षींचा असल्यामुळें जन्मलग्न कुंभ [आधान कुंडलींत पंचमस्थान] येथेंच आला. रवि तूलेचा व चंद्र कुंभेचा झाला ह्मणजे जन्म कार्तिक शु० १२ ह्मावा कार्तिक शु० १२ ची कुंभलग्न धरून कुंडली मांडिली तेव्हां कुंडलींत चंद्र शुक्लपक्षींचा अदृश्य गोलार्धांत आला, यामुळें जन्मदिवसाचे अगोदर आधान दिवस ९ महिने व कांहीं दिवस अधिक असावे व आमचा आधान दिवस फाल्गुन शुद्ध ६ होय व वर अलेला कार्तिक शुद्ध १२ हा दिवस ९ महिने व एक दिवसानीं येतो हा पडताळा पाहून कार्तिक शुद्ध १२ कुंभ लग्नावर अपत्याचा जन्म होईल व शुक्र स्त्रीराशींत व लग्नीं स्त्रीग्रह चंद्र असल्यामुळें अपत्य मुलगी असेल असें भविष्य केलें होतें

सूचना :— कुंडलीविज्ञानाच्या वाचकांनीं आधान लग्न मिळवून त्यावरून जन्मलग्न काढण्याचा प्रयत्न करून आधान लग्नावरून जन्मलग्न काढतां येतें असे सिद्ध केल्यास फारच बरें होईल,



लग्नस्वामी व्ययस्थानीं असल्यामुळें शरीरास सुख नाहीं परंतु हें सुख कोणत्या भागाविषयीं आहे ह्याचा विचार करण्या चा विचार केला आहे लग्न धनु राशीचें असून तिचा स्वामी वृश्चिक राशींत व्ययस्थानीं आहे वृश्चिक राशीचा अंमल गुह्येंद्रियावर आहे ह्मणजे गुह्येंद्रियाविषयीं शरिरास त्रास होत असावा दशम स्थानीं शनी हा मृत्युकारक शनी शनि आहे व शनिहा गुरूशीं उदासीन असून त्या स्थानाचा दुसरा कारक ग्रह रवि याचा शत्रु आहे या शनीची लग्नावर पूर्ण व रवीवर व शुक्रावर त्रिपाद दृष्टी आहे याकरितां जो रोग उत्पन्न झाला त्या रोगास गुरु, शुक्र, शनि रवि हे ग्रह कारणीभूत झाले आहेत

शुक्राचा संबंध रेतार्शी आहे हा शुक्र पापग्रहानें दूषित असेल तर मनुष्याचें रेत बहुतकरून दूषित असतें [शुभ ग्रहाची बलवत्तर दृष्टी असेल तर नाहीं] या कुंडलींत शुक्र अस्तंगत असून पापग्रहानें दूषित आहे ह्मणून यांना धातूक्षयासारखा कांहीं विकार असावा हें उघड आहे शुक्र हा अस्तंगत असल्यामुळें व रवि क्षय उत्पन्न करणारा असल्यामुळें व चंद्र षष्ठ स्थानीं वृषभेचा मंगळाला विलोकित असल्यामळें हा धातुक्षयाचा विकार क्षयच आहे हें बरोबर ठरतें मंगळगृहीच्या रविवर शनिची दृष्टी असल्यामळें " उत्साहहीनो मलिनो तिदीनो दुःखाभिभूतो " असें फळ मिळत आहे हें गृहस्थ श्रीमान् आहेत हें रवि व चंद्र हे दोन ग्रह उच्च आहेत यावरून समजेलच व विद्वान आहेत हें पंचमस्थानीं उच्चीचा रवि व शुक्र आहे यावरून समजेलच. हे गृहस्थ बी. ए. आहेत वर सांगितलेल्या शनीच्या दृष्टीच्या फळाप्रमाणें व धातुक्षय हा रोग जडल्यामुळें निरुत्साही बनले असून नेहमीं अतिशय चिंताक्रांत असतात कळावें हे वि.

पांडुरंग ज्ञानेश्वर कुळकर्णी चन्होली [पुणें]

* आधान लग्नावरून प्रसूतिकाल काढण्याचा प्रयत्न स्तुत्य आहे. हा प्रयत्न ज्याला साधेल त्यानें करावा. आधानकाल समजणें बिकट आहे ह्मणून या मार्गाचा प्रयत्नही बहुतेक निष्फलच होय. प्रसूतिकाल जाणण्याचे मार्ग यापेक्षां सुलभ पाहिजे आहेत. नवराबायको यांच्या कुंडल्या, भावंडाच्या कुंडल्या यांतील लग्न, चंद्र, गुरू, शनि इ० ग्रहांवरून प्रसूतिकाल ठरविण्याचा जर कोणी प्रयत्न करील, तर तो बराच साध्य होईल असें आमचें मत आहे. आधानकालच्या नादीं लागणें मृगजलवत आहे. तें काम मनुष्यशक्तीच्या बाहेरचें आहे. आधाकालाच्या नादीं लागलेल्या मनुष्यास त्याच्या एका जन्मांत तरी कांहीं साध्य होईल कीं नाहीं याची शंका आहे.

' संपादक '

---

२ ग्रह दीर्घवर्तुलांत कां फिरतात ?

[संपादक केशव त्रिंबक पेंडसे]

जगदुत्पत्तीच्या वेळीं ग्रहांस गति मिळाली त्या गतीनें निघालेले ग्रह सरळ रेषेंतच गेले पाहिजेत. परंतु गुरुत्वाकर्षणशक्ति जी सूर्य व इतर ग्रहांमध्यें आहे. त्या योगानें ग्रह सरळ रेषेनें न जातां वक्रमार्गानें जातात. आकर्षण शक्तीपेक्षां ग्रहांची गति ज्यास्त असल्यास ते आकर्षणांतून निसटून गेले पाहिजेत, व कमी असल्यास आकर्षक ग्रहावर येऊन पडले पाहिजेत, परंतु तसें कांहीं न होतां ते नियमित दीर्घ वर्तुलांत फिरतात. तरी तसें कां व्हावें ह्या प्रश्नाचें उत्तर खालील लेख आहे. तो अपल्या अंकांत घेण्याची मेहेरबानी व्हावी.

आतां हें चांगलें ध्यानांत येण्याकरितां प्रथम कांहीं शब्दांच्या व्याख्या, आकर्षण व गति यांचे नियम देऊन ग्रह प्रथम सरळ रेषेंत नंतर वक्र रेषेंत नंतर वर्तुलमार्गानें व शेवटीं दीर्घवर्तुलांत कसे कसे गेले पाहिजेत हें क्रमवार दाखविलें आहे. तरी हें मननपूर्वक वाचून लक्षांत आणिलें असतां समजण्यास हरकत होणार नाहीं.

ध्रुवोत्सारप्रेरणा — वस्तूला प्रथम मिळालेली पुढें पुढें जाणारी जी गति, तिला ध्रुवोत्सारप्रेरणा किंवा ध्रुवोत्सारगति ह्मणतात.

केंद्रोत्सारगति— केंद्राला सोडून दूर जाण्याच्या गतीला केंद्रोत्सार प्रेरणा किंवा गति ह्मणतात.

केंद्राभिसरणगति— केंद्राकडे जाण्याची जी गति तिला केंद्राभिसरणगति किंवा प्रेरणा ह्मणतात.

गतीचे नियम

१ कोणत्याही वस्तूच्या गतीला किंवा स्थितीला इतर शक्तीचा अडथळा नसेल तर ती वस्तु सर्वदा नियत गतींत किंवा नियत स्थितींत असेल.

२ वस्तूची गति बदलणें, वस्तूला गति उत्पन्न होणें, किंवा वस्तूची गति बंद होणें हीं त्या वस्तूशीं संबंध राखणाऱ्या अन्य शक्तीच्या प्रमाणांत असतात. आणि

गतीचा बदल होणें तो अन्य शक्ति ज्या दिशेमध्यें संबंध ठेवीत असेल त्या दिशेंतील सरळ रेषेंत होतो.

३ प्रत्येक आघात सदोदित प्रत्याघातासीं समान असतो. किंवा दोन वस्तूंचे प्रत्याघात व त्यांची गति विरुद्ध बिंदूकडे असते.

मिश्रगति

४ एकाच वस्तूवर दोन शक्ति एकाच दिशेंत चालू असतील तर ती वस्तु एका शक्तीनें जी गति पावेल त्यापेक्षां जलद गतीनें जाईल.

५ एका वस्तूवर विरुद्ध दिशेनें दोन असमान शक्ति सुरू होतील तर ज्यास्त शक्तीच्या दिशेनें ती वस्तु जाईल.

६ एका वस्तूवर विरुद्ध दिशेनें दोन समान शक्ति सुरू होतील तर ती वस्तु आपली जागा सोडणार नाहीं.

७ एका वस्तूवर दोन समान शक्ति असमान व अविरुद्ध दिशेनें सुरू होतील तर ती वस्तु कोणत्याच शक्तीच्या दिशेनें न जातां त्यांच्या मधील कर्ण रेषेनें जाईल.

खुलासा— (आकृति १ पहा) एका अ वस्तूवर अ स्थानीं अ-ब दिशेमध्यें अशी शक्ति लाविली आहे कीं, ती त्या अ वस्तूला नियत वेळांत अ पासून ब पर्यंत नेईल. आणि त्याचक्षणीं दुसरी एक शक्ति अ-क दिशेमध्यें अशी लाविली कीं ती तितक्याच वेळांत अ वस्तूला अ पासून क पर्यंत नेईल. या दोन शक्तींच्या मिश्रप्रेरणेनें ती वस्तु अ-ब आणि अ-क रेषांनीं होणाऱ्या समांतर भुज चौकोनाच्या अ-ड कर्णरेषेनें नियत गतीनें अ पासून ब पर्यंत किंवा अ पासून क पर्यंत जितक्या वेळांत गेली असती, तितक्याच वेळांत जाईल.

कारण, कल्पना करूं कीं, अ-ब लांबीची एक नळी (जिच्यामध्यें एक गोळी अ पासून ब पर्यंत अनियंत्रित फिरूं शकते अशी) अ-ब रेषेशीं समांतर अ पासून क पर्यंत अशी फिरविली कीं जितक्या वेळांत ती गोळी अ पासून ब पर्यंत गेली असती तितक्याच वेळांत नळी क-ड

पर्यंत येईल. किंवा तिच्या दोन्ही टोकांनीं अ-क आणि ब-ड या रेषा होतील. तर हें उघड आहे कीं जेव्हां अ-ब नळी क-ड वर येईल तेव्हां गोळी ड बिंदूत असेल न तिला तेथें येण्यास तिला अ पासून ब पर्यंत किंवा अ पासून क पर्यंत जाण्यास जो वेळ लागला असता तितकाच वेळ लागला आहे. व ती गोळी अ-ड रेषेनें गेली आहे.

कारण अइगफ, अटजह असे निरनिराळे समांतरभुजचौकोन केले तर ती गोळी जितक्या वेळांत अ पासून इ पर्यंत गेली असती तितक्याच वेळांत नळी अ पासून फ पर्यंत जाईल. आणि गोळी ग बिंदूत असेल. तसेंच गोळी अ पासून ट पर्यंत जितक्या वेळांत गेली असती तितक्याच वेळांत नळी अ पासून ह पर्यंत जाईल व गोळी ज बिंदूत असेल. ह्मणून अ ग ज ड ही एक सरळ रेषा होईल (युक्लीड पुस्तक ६ सिद्धांत २६ जर दोन सरूप समांतरभुज चौकोनास एक कोन साधारण असेल व ते सारखे स्थित असतील तर त्यांचे कर्ण एका सरळ रेषेंत येतील) येथें या सर्व समांतरभुज चौकोनांस अ कोन साधारण आहे. व ते सरूप आहेत ह्मणून त्यांचे कर्ण एकाच सरळ रेषेंत आहेत. ह्मणून अ ग ज ह एक सरळ रेषा आहे.

८ एक वस्तु नियत गतीनें समांतरभुज चौकोनाच्या एका बाजूनें जाऊन कांहीं वेळांत जेवढी बाजू करील तेवढ्याच वेळांत प्रतिक्षणीं वाढत्या गतीनें शेजारच्या बाजूनें जाऊन दुसरी तेवढीच बाजू करील तर या दोन अविरुद्ध दिशेंतील असमान शक्तींच्या योगानें ती वस्तु चक्र मार्गानें त्या समांतरभुज चौकोनाच्या समोरील कोनापर्यंत जाईल.

खुलासा—(आकृति २ पहा.) अ ब क ड हा एक समांतरभुज चौकोन आहे. त्यांत एक वस्तु अ पासून क पर्यंत क्षणोक्षणीं वाढत्या गतीनें जितक्या वेळांत जाईल तितक्याच वेळांत नियमित गतीनें अ पासून ब पर्यंत

जाते. अशी कल्पना केली तर त्या दोन शक्तींच्या योगानें ती वस्तु तितक्याच वेळांत अ म ज ड या वक्र रेषेनें ड पर्यंत जाईल.

कारण, मागील आकृतींत सांगितलेल्या प्रमाणें जर अइ, इट, टब, हीं अंतरें एकमेकांशीं प्रमाणांत असतील आणि अफ, फह, हक अंतरेंही त्याच प्रमाणें प्रमाणांत असतील आणि अ ग ज ड सरळ रेषा असेल तर ती वस्तु दोन समान शक्तींच्या प्रेरणेंत असेल परंतु या ठिकाणीं अ–ब रेषेंतील प्रेरणेची गति नियत आहे. ह्मणून अइ, इट, टब अंतरें सारख्या वेळांत क्रमीत; व अ–क दिशेंतील प्रेरणेची गति क्षणोक्षणीं वाढती असल्या कारणानें अफ पेक्षां फह आणि फह पेक्षां हक मधील अंतरें वाढत जातील. ह्मणजे अइ, इट, टब अंतरास जो वेळ लागेल तितक्याच वेळांत अफ, फह, हक अंतरें तोडील. तरी हीं अंतरें एकापेक्षां दुसरें, व दुसऱ्यापेक्षां तिसरें ज्यास्त होतील.

ह्मणून अइगफ, अटजह आणि अबडक हे समांतरभुजचौकोन एकच सरळरेषेंतील कर्णाचे नाहींत, (युक्लीड पुस्तक ६ सिद्धांत २४ समांतर भुज चौकोनांत कर्ण रेष ज्यांतून जाते असे समांतरभुजचौकोन पडतात ते मोठ्या समांतरभुजचौकोनाशीं सरूप असतात) ह्मणून ते सरूप नाहींत. ह्मणून अगजड सरळ रेषा नाहीं. परंतु वक्र रेषा आहे.

९ सर्व ग्रहांची वक्ररेषाघटित गति सरळ रेषेनें जाणाऱ्या त्या ग्रहांच्या ध्रुवोत्सार (पुढें ढकलणाऱ्या) प्रेरणेनें आणि जगद्व्यापी आकर्षणशक्ति नी त्यास त्या सरळ रेषेंतून एकीकडे ओढते त्या शक्तीनें उत्पन्न होते.

इ स्थानीं असलेली वस्तु इअफ रेषेंत (जेथें त्या वस्तूला कोणत्याही तऱ्हेचा अडथळा नाहीं किंवा कोणत्याही बाजूनें अन्य वस्तूचें आकर्षण नाहीं, अशा शून्याकाशांत) सोडली तर वर दिलेल्या पहिल्या नियमाप्रमाणें ती

वस्तु त्याच दिशेमध्यें अनियंत्रित समान गतीनें जाईल.

(आकृती तीन पहा.)

कारण जी शक्ति तिला विवक्षित वेळांत इ पासून अ पर्यंत नेईल तीच शक्ति तितक्याच वेळांत तितक्याच अंतरावर पुढें अ पासून फ पर्यंत नेईल व असेंच सर्वदा चालेल. कारण तिची गति बंद करण्यास किंवा बदलण्यास मध्यें कांहींच अडथळा नाहीं.

परंतु ध्रुवोत्सार प्रेरणेनें विवाक्षित काळांत ती वस्तु अ पर्यंत आल्यानंतर स स्थानची दुसरी एक शक्ति तिला आपलेकडे नियमित गतीनें ओढूं लागली तर ती वस्तु इ–अफ रेषा सोडून स बिंदूभोंवतीं वर्तुळमार्गानें (अ–ग ओ–इ–ओ मार्गानें) फिरूं लागेल.

(**सिद्धांत** — कोणतीही वस्तु दुसऱ्या वस्तूभोंवतीं वर्तुळमार्गानें फिरेल तर फिरणाऱ्या वस्तूची ध्रुवोत्सार गति, आकर्षक वस्तूच्या आकर्षणानें ती वस्तु आकर्षक वस्तूकडे वर्तुळाच्या त्रिज्यार्धापर्यंत ओढली जाईल इतकी असते)

जेव्हां इ वस्तु याप्रमाणें वर्तुळ मार्गांत (कक्षेंत) फिरत असतां ओ स्थानीं किंवा कक्षेंतील कोणत्याही बिंदूंत आल्यावर जर दुसरी तिच्या पेक्षां लहान च वस्तु च–ब सरळ रेषेंत सोडलेली इ च्या आकर्षण क्षेत्रांत व इ च्या लंबरूप आकर्षणांत सांपडेल तर ती च वस्तु आपल्या वर्तुळ कक्षेंत इ भोंवतीं फिरेल. आणि इ वस्तु स भोंवतीं फिरत असतां च वस्तु इ भोंवतीं फिरत फिरत इ चे बरोबर जाईल.

(येथें स = सूर्य, इ = पृथ्वी आणि च = चंद्र आहे)

जर अ स्थानीं असलेली पृथ्वी आपल्या ध्रुवोत्सार प्रेरणेनें जितक्या वेळांत अ पासून फ पर्यंत जाईल तितक्याच वेळांत फक्त गुरुत्वाकर्षणानें अ पासून ह पर्यंत स स्थानीं असलेल्या सूर्याकडे आकर्षिली जाईल तर त्या दोन शक्तींच्या मिश्र क्रियेनें ती अ–ग वक्र रेषेनें जाईल. आणि जर अ पासून इ ज्या वेगानें आकर्षिली जाते तो वेग फक्त गुरुत्वाकर्षणाचे योगानें ती अ पासून व पर्यंत (त्रिजार्ध किंवा अ–सचें अर्ध) पडल्यामुळें

तिजमध्यें आला असेल तर ती पृथ्वी सूर्याभोंवतीं वर्तुळमार्गानें फिरेल.

१० (**सिद्धांत** — कोणतीही वस्तु गुरुत्वाकर्षणाचे योगानें प्रथम सेकंदांत १६$\frac{1}{12}$ फूट पडते व पुढील प्रत्येक सेकंदांत ३२$\frac{1}{2}$ फूट नियत गतीनें जास्त जास्त पडण्याचा वेग तिजमध्यें उत्पन्न होतो.)

	एकंदर पतन
प्रथम सेकंदांत गति १६$\frac{1}{12}$ फूट	१६$\frac{1}{12}$ फूट
दुसऱ्या सेकंदांत गति १६$\frac{1}{12}$+३२$\frac{1}{2}$	६४$\frac{1}{3}$,,
तिसऱ्या ,, ,, १६$\frac{1}{12}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$	१४४$\frac{3}{4}$,,
चवथ्या ,, ,, १६$\frac{1}{12}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$	२५७$\frac{1}{3}$,,
पांचव्या ,, ,, १६$\frac{1}{12}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$	४०२$\frac{1}{12}$,,
सहाव्या ,, ,, १६$\frac{1}{12}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$	५७९ ,,
सातव्या ,, १६$\frac{1}{12}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$+३२$\frac{1}{2}$	७८८$\frac{1}{12}$,,

ग्यालिलिओचा सिद्धांत

पडणाऱ्या वस्तूचा वेग ज्या वस्तूला पडण्यास लागणाऱ्या कालाच्या प्रमाणांत वाढलाच पाहिजे. आणि कोणत्याही वस्तूत गुरुत्वाभाव नसल्यामुळें प्रतिक्षणीं वेगाचा नवीन पुरवठा होऊन तो मूळच्या वेगाला जास्त जोर देत असला पाहिजे. या नियमावरून असा सिद्धांत ठरला आहे कीं, अधांतरींहून पडणाऱ्या वस्तूच्या पडण्यानें सारख्या कालांत झालेलीं अंतरें त्या कालाच्या वर्गाच्या प्रमाणांत असतात.

गुरुत्वाकर्षणाचे योगानें प्रथम सेकंदांतील पतन १६$\frac{1}{12}$ फूट असतें. तेव्हां विवक्षित कालांत वस्तु किती फूट पडेल?

१ चावर्ग × १६$\frac{1}{12}$ = १६$\frac{1}{12}$ प्रथम सेकंदांनीं पतन
२ चावर्ग × १६$\frac{1}{12}$ = ६४$\frac{1}{3}$ द्वितीय ,, ,,
३ चावर्ग × १६$\frac{1}{12}$ = १४४$\frac{3}{4}$ तृतीय ,, ,,

४ चावर्ग × १६$\frac{1}{12}$ = २५७$\frac{1}{3}$ चतुर्थ ,, ,,
५ चावर्ग × १६$\frac{1}{12}$ = ४०२$\frac{1}{12}$ पंचम ,, ,,
६ चावर्ग × १६$\frac{1}{12}$ = ५७९ षष्ठ ,, ,,
७ चावर्ग × १६$\frac{1}{12}$ = ७८८$\frac{1}{12}$ सप्तम ,, ,,
८ चावर्ग × १६$\frac{1}{12}$ = १०२९$\frac{1}{3}$ अष्टम ,, ,,

११ जर एक वस्तु दुसऱ्या वस्तूभोंवतीं (पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते तशी) आरंभीच्या कक्षामध्यां [केंद्रा] पासून आपलें अंतर बदलीत प्रदक्षिणा करील तर तिची ध्रुवोत्सार गति व केंद्राभिसरण गति सुद्धां बदलेल आणि त्या वस्तूचा प्रदक्षिणामार्ग (कक्षा) भिन्न होईल.

(आकृति ४ पहा.)

जितक्या वेळांत ग्रहाची ध्रुवोत्सार प्रेरणा ज्या ग्रहास अ पासून फ पर्यंत नेईल तितक्याच वेळांत जर सूर्याची आकर्षण शक्ति त्यास अ पासून इ पर्यंत ओढील तर ध्रुवोत्सार प्रेरणेपेक्षां गुरुत्वाकर्षण शक्ति जास्त होऊन तो ग्रह मागील आकृतींत दाखविल्याप्रमाणें वर्तुळ मार्गानें न फिरतां अ ओ वक्र रेषेनें जाईल आणि सूर्याजवळ येईल कारण स – अ पेक्षां स ओ अंतर कमी आहे (सूर्यापासून ग्रहांचें जें अंतर त्यास मंदकर्ण म्हणतात.)

जसजसा मंद कर्णाचा वर्ग कमी होईल (मंद कर्ण कमी झाला म्हणजे त्याचा वर्गही कमी होतो) तसतशी केंद्राभिसरण गति किंवा गुरुत्वाकर्षण शक्ति सर्वदा वाढत असल्यामुळें ग्रहाचा वेगही जास्त होईल आणि ओपासून ब पर्यंत ग्रहाची गति क्षणोक्षणीं वाढून ओप, पक्र, क्रर, रड डट, टव असे एकापेक्षां दुसरा मोठा असे कंस सारख्या वेळांत होत जातील ग्रहाची गति याप्रमाणें क्षणोक्षणीं वाढल्यामुळें त्या ग्रहामध्यें व स्थानीं आल्यानंतर व–ळ रेषेंत जाण्याची केंद्रोत्सार प्रेरणा किंवा निसटून जाण्याचा झोंक सूर्याच्या आकर्षण शक्तीपेक्षां जास्त होतो. आणि याप्रमाणें ध्रुवोत्सार व केंद्रोत्सार

प्रेरणा वाढल्यामुळें तीं ग्रहाला व बिंदूपेक्षां जास्त सूर्याच्या जवळ येऊं देत नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यास के–ए–बे वर्तुळांतही सूर्याभोंवतीं फिरूं देत नाहीं. व तो क्ष–झ–म–अ वक्र रेषेनें क्षणोक्षणीं अ पासून व पर्यंत येतांना ज्या प्रमाणानें वेग वाढला होता त्याच प्रमाणानें वेग कमी होत होत व पासून अ पर्यंत पसरत जातो.

नंतर अ स्थानीं आल्यावर पुनः त्यास पूर्ववत् वेग मिळतो.

याप्रमाणें केंद्रोत्सार व केंद्राभिसरण प्रेरणांच्या योगानें तो ग्रह मध्यवर्ती सूर्याभोंवतीं वर्तुळाहून भिन्न अशा वक्ररेषेंत फिरता राहतो.

अ पासून व पर्यंत ज्याप्रमाणानें वाढत्या गतीनें वक्र रेषा झाली आहे त्याच प्रमाणानें उलट गतीनें व पासून अ पर्यंत वक्र रेषा झाली आहे. ह्मणजे अ पासून ब पर्यंतची वक्र रेषा, व पासून अ पर्यंतच्या वक्र रेषे बरोबर आहे. ह्मणून हे दीर्घ वर्तुळ आहे

१२ दीर्घवर्तुळांत मध्य बिंदूतून जाणारी जी अति मोठी रेषा तिला बृहदक्ष व अति लहान रेषेला लघ्वक्ष ह्मणतात.

(आकृति ५ पहा.)

या आकृतींत क दीर्घवर्तुळाचा मध्यबिंदु आहे. अकब बृहदक्ष [मोठाव्यास] आणि डकफ लघ्वक्ष (लहान व्यास) आहे.

२ दीर्घवर्तुळाच्या मध्यापासून सारख्या अंतरावर दोन केंद्रें असतात त्यांत एका केंद्रांत मध्यवर्ती ग्रह [सूर्य] असतो.

येथें क मध्यापासून सारख्या अंतरावर ग आणि ह हीं दोन केंद्रें आहेत त्यांपैकीं एकांत सूर्य असतो.

३ मध्यापासून केंद्रापर्यंतच्या अंतरास केंद्रच्युति ह्मणतात.

४ केंद्रच्युति जास्त असल्यास दीर्घ वर्तुळ लांबट होईल व कमी असल्यास रुंदट होईल ह्मणून सर्व दीर्घ वर्तुळें सारखीं नसतात.

५ दीर्घ वर्तुळांत दोन केंद्रांपासून परिघाच्या कोणत्याही बिंदूस जोडणाऱ्या रेषा काढल्या तर त्यांची

बेरीज सर्वदा सारखी असते. गच+चह=गछ+छह=गड+डह=गज+जह=गत+तह.

६ मध्यवर्ती ज्योतीपासून कक्षेंतील ज्या बिंदूचें अंतर महत्तम असतें त्या बिंदूस ग्रहाचें उच्च ह्मणतात. वरील आकृतींत ग केंद्रांत मध्यवर्ती ज्योति आहे असें मानल्यास ब हें उच्च आहे. व ज्या बिंदूचें अंतर लघुतम असतें त्यास नीच ह्मणतात, येथें अ हें नीच आहे.

उच्चामध्यें ग्रह असतां त्याची गति महत्तम असते, व नीचामध्यें ग्रह असतां त्याची गति लघुतम असते.

(आकृति ६ पहा)

या दीर्घवर्तुळांत केंद्राशीं ३० अंशाचा एक एक कोन करणाऱ्या रेषा काढल्या त्या १२ राशी झाल्या व अक, कख, खग, वगैरे सर्व कंसांचें माप जरी ३० अंश आहे तरी त्यांची लांबी अ पासून छ पर्यंत जास्त जास्त आहे. अक कंसांतील ३० अंश सूर्यास जितक्या वेळांत जावयाचें असतें तितक्याच वेळांत छज हे ३० अंश मार्ग जावयाचा असतो, परंतु छज कंस अक कंसापेक्षां मोठा असल्यामुळें त्या ठिकाणीं शीघ्र गतीनें व त्याच्या उलट अक कंसांत मंद गतीनें जावें लागतें.

११ शंकासमाधान :— आतां येथें स्वाभाविक दोन प्रश्न उद्भवतात. (आकृति ४ पहा) (१) जर ओ स्थानीं ध्रुवोत्सार प्रेरणेपेक्षां गुरुत्वाकर्षण जास्त असेल तर तें ग्रहाला स स्थानीं सूर्याकडे कां ओढून आणीत नाहीं ? (२) जर व स्थानीं ध्रुवोत्सार प्रेरणा केंद्राभिसरण प्रेरणेपेक्षां किंवा गुरुत्वाकर्षणापेक्षां जास्त असेल तर ती ग्रहाला जास्त जास्त दूर नेऊन सूर्याच्या आकर्षण शक्तीच्या बाहेर कां घेऊन जात नाहीं?

समाधान १ — ग्रह अ स्थानीं आल्यानंतर त्यास अ पासून क पर्यंत जाण्यास जो वेळ लागेल तितक्याच वेळांत त्यास अ पासून ग पर्यंत (दुप्पट अंतरावर) नेण्याइतकी ध्रुवोत्सार प्रेरणा असती

तर त्याला त्याच्या कक्षेमध्यें ठेवण्याकरितां गुरुत्वाकर्षण शक्ति चौपट लागली असती. ह्मणजे तो अ पासून ग पर्यंत जितक्या वेळांत गेला असता, तितक्या वेळांत गुरुत्वाकर्षणानें तो ज पर्यंत आला असता. नाहीं तर तो अ–ओ–प वक्र रेषेंत राहिला नसता. परंतु गुरुत्वाकर्षणाच्या वृद्धीबरोबर ग्रहाचा वेगही वृद्धि पावत असतो आणि वेगाची वृद्धि झाली असतां ध्रुवोत्सार प्रेरणाही वाढते, ह्मणून ग्रह प स्थानीं आल्यानंतर त्याचा प–म स्पर्शरेषेंत निसटण्याचा कल तो ओ स्थानीं होता त्यापेक्षां जास्त आहे. तसाच क स्थानीं प पेक्षां जास्त आहे वगैरे, ह्मणून आकर्षण शक्तीचे वृद्धीबरोबरच ध्रुवोत्सार प्रेरणाही वाढत असल्यामुळें ग्रह सूर्यापर्यंत आकर्षिला जाणार नाहीं.

समाधान २– व बिंदूजवळ ध्रुवोत्सार प्रेरणा महत्तम असते तशीच त्या बिंदूजवळ आकर्षण शक्तिही महत्तम असते. कारण अ–स जर व–स च्या दुप्पट असेल तर व बिंदूमध्यें ध्रुवोत्सार प्रेरणा चौपट असेल (केंद्रोत्सार प्रेरणा मंदकर्णाच्या वर्गाच्या प्रमाणानें न्यूनाधिक होते. ह्मणजे मंदकर्ण वाढल्यास त्याच्या वर्गाच्या प्रमाणानें प्रेरणा कमी असते व मंद कर्ण कमी झाल्यास त्याच्या वर्गाच्या प्रमाणानें प्रेरणा जास्त होते.) जर व स्थानीं ध्रुवोत्सार गति अ स्थानीं होती त्यापेक्षां दुप्पट असेल तर ग्रहास अ पासून फ पर्यंत जाण्यास जो वेळ लागला असता तितक्याच वेळांत तो व पासून ळ पर्यंत जाईल. आणि ध्रुवोत्सार प्रेरणा व आकर्षणशक्ति यांच्या मिश्र कार्यानें तो ग्रह क्ष स्थानीं जाण्याबद्दल के स्थानीं जाऊन के–ए–बे वर्तुळांत फिरला असता परंतु ध्रुवोत्सार प्रेरणा केंद्रोत्सार प्रेरणेपेक्षां पुष्कळ जास्त असल्यानें ग्रह सूर्यापासून दूर दूर जाऊं लागून क्ष–ज्ञ–म या वक्र रेषेनें वर चढत जातो, तो तसा जात असतांही मध्यें कोणत्याही स्पर्श रेषेनें तो निसटूं शकत नाहीं. कारण जस जसा तो सूर्यापासून दूर जातो तस तसा आकर्षण शक्तीचे योगानें त्याचा वेग कमी कमी होत जातो व त्यामुळें ध्रुवोत्सार प्रेरणाही कमी कमी होत जाते. या प्रमाणें जेव्हां ग्रह ज्ञ स्थानीं येतो तेव्हां ज्या प्रमाणानें त्याची गति क स्थानीं वाढली होती त्याचप्रमाणानें आकर्षण शक्तीच्या योगानें त्याचा ज्ञण स्पर्श रेषेनें निसटून जाण्याचा कल कमी होत जातो. ह्मणून तो आपल्या कक्षेंतच राहिला पाहिजे.

३ विजयानगर

विजयानगर शहरासंबंधानें पुढील आख्यायिका ऐके ठिकाणीं वाचण्यांत आली. ती आपण प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

हरिहर आणि बुक्क या नांवाच्या दोघां बंधूंनीं विजयनगरचें राज्य स्थापन केलें. हें सर्वश्रुत आहेच. वेदांवर भाष्य करणारे विद्यारण्य स्वामी हे या राजांचे गुरु होते. राजवाड्याच्या पायाचा दगड बस. विद्यासाठीं विद्यारण्यांनीं मुहूर्त शोधून काढला, आणि राजांस सांगितलें कीं, " मी कांहीं अंतराः वर श्रीशंकराची पूजा करीत बसतों मी जेव्हां शंख वाजवीन तेव्हां सुमुहूर्त आहे; त्या प्रसंगीं तुह्मीं पायाचा दगड बसवावा. " असें ह्मणून विद्यारण्यस्वामी शिवार्चनामध्यें मग्न झाले. इकडे दुर्दैवानें असा प्रकार घडला कीं, नेमलेल्या मुहूर्तीच्या अगोदर एक घटका असतांना कांहीं भिक्षुक शहरांत शिरले आणि त्यांनीं आपले शंख वाजविले. हरिहर आणि बुक्क यांना हे विद्यारण्य स्वामींचे शंख वाटून त्यांनीं पाया घातला. मागाहून विद्यारण्यस्वामींना झालेला प्रकार समजला. त्यांनीं भविष्य करून सांगितलें कीं, ' या शहराचा नाश होणार हें तर उघडच आहे, परंतु एकदां नाश झाल्यानंतर ५०० वर्षांनीं पुन्हा ह्या शहराचा भरभराट होईल. " विजयानरची स्थापना झाल्यावर अडीचशें वर्षांनीं ह्मणजे सन १५६५ सालीं दक्षिणेंतल्या पांच ब्राह्मणी मुसलमान राजांनीं एकवटून या शहराचा विध्वंस केला. हें इतिहास प्रसिद्ध आहेच. आतां पुन्हा याचा उदय होण्यास अद्याप दीडशें वर्षांचा अवधि आहे.

हरि रघुनाथ भागवत

४ महाराज अलीजा बहादुर शिंदे सरकार

श्री. माधवराव महाराज.	श्री. राणीसरकार.
जन्म—ता. २१ अक्टोबर १८७६	जन्म ता. ३० सप्टेंबर
शनिवार रा० १० वाजून	१८८० गुरुवार रा०
३६ मि०	१ वाजून ४६ मि०
सायन	सायन



१ महाराजांच्या कुटुंबस्थानीं जो राशि आहे, तोच त्यांच्या पत्नीच्या लग्नीं चंद्रासह उदित आहे.

२ उभयतांच्या कुटुंबस्थानीं हर्शल आहे.

३ उभयतांचा जायास्वामी शनि एकाच स्थानांत आहे.

४ राणीसरकारचा शुक्र महाराजांच्या शुक्राच्या कुटुंबस्थानीं आहे.

५ महाराजांचा कुटुंबस्वामी व राणीसाहेबांचा लग्नस्वामी हा उभयतांच्या कुंडलींत एकाच राशींत आहे.

६ उभयतांचे कुटुंबस्वामी एकाच राशींत आहेत.

७ उभयतांचे शुक्र एकाच स्थानांत आहेत.

२ पत्रव्यवहार

(१) अनुभाविक नियम

१ ज्याप्रमाणें गोचरींचा मंगळ अग्निराशींत लग्नीं किंवा चंद्राजवळ पित्त किंवा ज्वर उत्पन्न करितो, त्याप्रमाणें गोचरींचा रविही करितो.

२ स्त्रिया ज्या दिवशीं प्रसूत होतात, त्या दिवशीं त्यांच्या व पतींच्या कुंडलींत चंद्र गर्भोत्पादक स्थानांत असतो.

३ एकाचे कुंडलींत पंचमांत धनु राशि असून त्याचा स्वामी गुरु एकादश स्थानांत मिथुन राशींत आहे. धनु राशींत गोचरींचा हर्शल होता, तोंपर्यंत त्या गृहस्थास झालेली संतति जगली नाहीं.

४ पुस्तक ७ अंक २ मध्यें सांगिल्याप्रमाणें विवाह कालीं ग्रह आले असतांही एकाचें लग्न चंद्रास ८ वा शनि असल्यामुळें झालें नाहीं. हा शनि लग्नास ६ वा कुंभ राशीचा झाला होता.

५ साधारणपणें चंद्र हा शुभ ग्रह असून तो लग्नीं एकटा असतां बहुतेक माणसें रोगट दिसतात. पुराणांतरीं चंद्र हा क्लीब, पांडुरोगी, दमेकरी, क्षय रोगी, असा वर्णन केलेला आढळतो.

६ पतीच्या कुंडलींत एकापेक्षां अनेक भार्यायोग जेव्हां

असतो, तेव्हां प्रथम स्त्रीचा विचार कसा व कोणत्या ग्रहावरून करावा, हें ठरींव आहे. परंतु पहिल्या खेरीज इतर स्त्रियांचा विचार कोणत्या ग्रहावरून करावा, याचा खुलासा ग्रंथांत नाहीं. राफेलच्या गाईड टु अस्ट्रॉलजी नामक पुस्तकांत ता. १ डिसेंबर १९०६ रोजीं रात्रीं १०–२० वाजतां विलायतच्या अक्षांशावर जन्म झाला, असें कल्पून एक कुंडली दिली आहे. त्यांत दुसऱ्या स्त्रीचा विचार पंचमांत हर्शल बली आहे म्हणून त्याच्यावरून केला आहे.

७ लहान मुलांचे आयुर्दाय पाहण्याचे जे अनेक नियम आहेत त्यांपैकीं एक असा आहे कीं, अष्टमाधिपतीची लग्नस्वामीवर ९० अंशांची दृष्टि आयुर्दाय हीन करण्यास किंवा अल्पायु होण्यास फार कारण आहे, असें वरील पुस्तकांत आहे.

८ ज्या मनुष्यास ज्या दिवशीं रात्रीं निद्रेत स्वप्नावस्था होते, त्या दिवशीं चंद्र, कुंडलींत लग्नाच्या किंवा शुक्राच्या २ किंवा ७ व्या स्थानीं आढळेल. किंवा तो शुक्राशीं युतही आढळेल.

९ ग्रहांत रवि चंद्र मुख्य आहेत. ज्याप्रमाणें चंद्रास ग्रह पाहतात, त्याप्रमाणें रवीसही पाहणें बाबगें होणार नाहीं. उदाहरणार्थ, वरील मंगळ, शनि, हर्शल तिसरे असतां पराक्रम घडून भरभराट होते. शास्त्रांत रवीवर अमुक ग्रहाची दृष्टि असली म्हणजे अमुक होतें, असें जें वर्णन आहे तें ह्या प्रकारचें आहे.

१० एका पतीचे कुंडलींत कुंभ लग्न असून स्त्रीचें

सिंह लग्न आहे. त्या उभयतांत वैमनस्य असून स्त्रीचा पगडा असल्यामुळें पतीस हार खावी लागते.

गणेश दामोदर ग्रंथे

---

(२)

वि. वि.— खालील पितापुत्रांच्या कुंडल्यांत विलक्षण साम्य दिसल्यावरून पाठविल्या आहेत. योग दिसल्यास येत्या अंकीं स्थल मिळावें.

पिता.	पुत्र.
जन्म – श. १८०० चै. शु. १३	जन्म — श. १८२० पौ. कृ. ४
सोम. रा. ३ वा. ८ मि.	सोम. दि. ८ वा. ९४ मि.
सायन	सायन



उभयतांचें लग्न एक. पित्याच्या लग्नीं शनि शुक्र तर पुत्राच्या दशमांत तेच. पित्याच्या व्यय स्थानीं गुरु तसाच पुत्राच्या दशमाच्या व्यय स्थानांत तोच. उभयतांस सापत्न मातायोग. उभयतांचा जन्मवार एक. उभयतांच्या माता ७ व्या वर्षी निवर्तल्या !

माता.

जन्म — श. १८०९ वै. शु. ४ दि. घ. १९

सायन.

हिचा मृत्यु शके १८२६ माघ कृ. ३ दि. घ. ६।३० या वेळीं झाला. पित्याच्या कुंडलीचा जायास्वामी जो बुध तो मीन राशींत अस्तंगत होता, जाया स्थानीं राहु होता. जन्मकालच्या बुधाच्या सप्तमांत मंगळ होता. पुत्राच्या कुंडलींत मातृस्थानाला पूर्ण पाहत होता व जन्मस्थ चंद्राजवळ राहु आला होता. मातृ स्थानाधिप मंगळ नीच व अस्तंगत होता.

पुरुषोत्तम पांडुरंग शेणवी.

३

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांसः–

कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. खालील घडलेल्या अपघातासंबंधीं माहिती आपल्या वाचक वर्गास कळावी या हेतूनें पाठवीत आहें तरी कृपा करून आपल्या मान्य पुस्तकांत छापावी.

मु० शीव मुंबई येथें तारिख २९ शुक्रवार सन १९०७ रोजीं बरोबर दोन प्रहर दिवसास एक मुसलमान जातीचा सुमारें ८।१० वर्षांचा मुलगा तलावांत पडून दोन तीन मिनिटांत मृत्यु पावला. त्या वेळची लग्न कुंडली खालीं लिहिल्याप्रमाणें होती.

लग्न

सायन



सदर मुलाची जन्म कुंडली असती तर आपणांस बऱ्याच गोष्टी कळल्या असत्या.

आतां मृत्यूच्या वेळेचे कुंडलीवरून आपणांस काय दिसतें तें पाहूं.

जन्म लग्न कर्क ह्या जल राशीचें असून त्यामध्यें राहू हा पापग्रह आहे. व हिच राशी व्यय भावांत असून नेपच्यून हा ग्रह आहे व तो पापग्रह असून धनेच्या मंगळानें पूर्ण दृष्ट आहे. लग्न स्वामी चंद्र हा तृतीय भावांत आहे. तोही शनि, नेपच्यून व राहु या पापग्रहांनीं दृष्ट आहे.

चतुर्थ स्थानचा स्वामी शुक्र हाही मृत्युस्थानीं असून तो नेपच्यूननें दृष्ट आहे. व तो हर्शल व शनि या दोन पापग्रहांचे कर्तरींत आहे.

आपण जर सूक्ष्म दृष्टीनें विचार करूं तर आपणांस असें कळेल कीं मंगळ हा धनु राशींत ६ वे स्थानीं आहे. हा राशि व मंगळ हे अपघात करणारे आहेत व हर्शलही ह्याच राशींत आहे. व तो लग्नास पाहत आहे. यामुळें हा अपघात

विलक्षण तऱ्हेनें २।३ मिनिटांत शें सवाशें मंडळीच्या देखत अगदीं थोडें पाणी तलावांत असतां झाला. दोन्हीं मारकेश बुध व शनि हेही जल राशींत असून मंगळ व राहु यानीं दृष्ट आहेत.

सारांश या कुंडलींत पापग्रह बरेच बिघडलेले असून ते जल राशींत असल्यामुळें हा बुडून मरण्याचा अपघात झाला.

पांडुरंग काशिनाथ खरे.

(४)

छायेवरून घड्याळ लावण्याची रीति

९० + क्रांति = ध्रुवांतर (सूर्याचें उत्तर ध्रुवापासून अंतर क्रांति उत्तर असल्यास ती ९० अंशांतून वजा करावी, दक्षिण असल्यास मिळवावी. = ध्रु

लंब = ९० – अक्षांश (खस्वास्तिकापासून उत्तर ध्रुवाचें अंतर) = ल

नतांश = ९० – उन्नतांश (खस्वास्तिकापासून दृङ् मंडलांत सूर्याचें अंतर)

छायेला शंकूनें भागावें ह्मणजे सूर्याच्या नतांशांची स्पर्शरेषा येईल त्यावरून नतांश आणावे किंवा तुरीय यंत्रानें सूर्याचे उन्नतांश आणूनें ते ९० अंशांतून वजा करावे ह्मणजे नतांश येतील.

$$\frac{\text{ध्रु} + \text{ल} + \text{न}}{२} = \text{क्ष}; \qquad \text{क्ष} - \text{न} = \text{य}$$

नतकाल कोण = क

$$\frac{१}{२} \text{ कोटिज्या} = \sqrt{\frac{\text{क्षज्या} \times \text{यज्या}}{\text{ध्रुज्या} \times \text{लज्या}}}$$

किंवा लाग्रतमानें.

$$\left.\begin{aligned} २ \text{ लाग्र. } \tfrac{१}{२} \text{ क कोटिज्या} = {} & \text{लाग्र. क्षज्या} + \text{लाग्र. यज्या} + \text{लाग्र.} \\ & \text{ध्रुकोछेरे} + \text{लाग्र लकोछेरे} - २० \end{aligned}\right\}$$

यावरून नतकाल कोणार्ध येईल त्याची दुप्पट नतकाल कोण होईल. नतकाल कोणास १५ नीं भागिलें ह्मणजे नतकाल कलाक मिनिटें होईल. छाया मध्यान्हापूर्वीची असल्यास नतकाल १२ तासांतून वजा करावा व मध्यन्हा नंतरची असल्यास १२ तासांत मिळवावा व त्यास वेलांतर संस्कार [केतकी पंचांगांत दिलेल्या चिन्हांच्या उलट चिन्हें समजून] करावा ह्मणजे घड्याळाचा सूक्ष्मकाल (लोकल टाइम) होईल.

उदाहरण. तारिख १४ जानेवारी सन १९०७ रोजीं मुंबई येथें मध्यन्हापूर्वी ६ फुट शंकूची छाया १७ फुट होती तेव्हां किती वाजले होते.

$\frac{१७}{६}$ = २·८३३३ नतांश स्पर्श रेषा. यावरून नतांश=७० अंश–३४ कला (९०–० कला) – (७०–३४ कला) = १९ अंश — २६ कला उन्नतांश

या दिवशीं केतकी पंचांगावरून वेलांतर – २३ पळें = ९ मिनिटें ऋण आणि क्रांति २१ अंश – २७ कला दक्षिण आहे. व मुंबई अक्षांश १८ अंश — ५७ कला आहेत.

(९०–० कला) + (२१ अंश – २७ कला) = १११ अंश २७ कला = ध्रु

(९०–०) – (१८ अं.–५७ क.) = (७१ अं. — ३ कला = ल

नतांश ७० अं — ३४ क. = न.

$$\frac{(१११ \text{ अं.}-२७ \text{ क.}) + (७१ \text{ अं.}-३ \text{ क.}) + (७० \text{ अं.}-३४ \text{ क.})}{२} = १२६ \text{ अं.} - ३२ \text{ क.} = \text{क्ष}$$

(१२६ अं. – ३२ क.) – (७० अं. – ३४ क.) = ५५ अं. – २८ क. = य

लाग्र १२६ अं. – ३२ क. ज्या = ९.९०४९९१६

लाग्र ५५ अं. – २८ क. ज्या = ९.९१५८२००

लाग्र १११ अं. – २७ क. कोछेरे = १०.०३११७३०

लाग्र ७१ अं. – ३ क. कोछेरे = १०.०२४१९९६

३९.८७६१८४२

–२०

२) १९.८७६१८४२

लाग्र $\frac{१}{२}$ क कोटिज्या = ९.९३८०९२१

$\frac{3}{5}$ क = २९ अं. – ५३ क. ० $\frac{2}{5}$ क = ५९ अं. – ४६ क. नतकालकोण ५९ अं. – ४६ क.

$\frac{\text{५९ अं. – ४६ क.}}{१५}$ = ३ तास ५१ मिनिटें नतकाल

१२ तास – (३ तास ५१ मिनिटें) + ९ मिनिटें वेलांतर = ८ तास १७ मिनिटें

केशव त्रिंबक पेंडसे.

४



शके १७७० माघ वद्य १३भौमे उदयांत ग. घ ०।१ क्याच्या ५१ व्या वर्षी मारक स्थानीं असलेल्या शुक्राचे महादशेंत व मारकेश असून षष्ठस्थानीं पडलेल्या गुरूच्या अंतर्दशेंत निरयन मानानें राशीपासून अष्टम स्थानीं चंद्र व साडेसातींत तसेंच लग्नापासून अष्टम स्थानीं र. बु. व षष्ठस्थानीं शु. मं. असतां पक्षपात झाला नंतर ७ दिवसांनीं राशीपासून व्यय स्थानीं चंद्र येतांच मृत्यु झाला. व त्यावेळीं शनीची पंचम स्थानीं पूर्ण दृष्टी होती यामुळें वाणी अजी बंद झाली होती.

पांडुरंग रामचंद्र महाजन. ज्योतिषी.

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यते ऽस्ति मम कोऽपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

' भवभूति : ,

पुस्तक ७ वें.] चैत्र कृ० १४, शनिवार [अंक ८ वा

वर्षंतु पर्ज्यन्याः

आशाश्वतं माधवगर्जितंच स्त्रियश्चरित्रंभवितव्यताच॥
अवर्षणंचातिघवर्षणंच देवो न जानाति कुतो मनुष्यः॥

या वर्षी गुरु कर्कवृत्ताजवळ भ्रमण करितो, शनि विषुवाजवळ आहे व हर्शल आणि मंगळ हे ग्रह मकरवृत्ताजवळ भ्रमण करीत आहेत. या प्रमाणें हे चार मोठाले गोल निरनिराळ्या ठिकाणीं फिरत आहेत, ह्मणून हा योग पर्जन्याला अनुकूल नाहीं. कर्क वृत्ताजवळील ग्रह पावसाला विशेष अनुकूल होत. या वर्षी फक्त गुरु तसा आहे. याच्या जोडीस दुसरा मोठा गोल नाहीं. शनि विषुवाजवळ आहे. तो वृष्टीला विशेष अनुकूल नाहीं. हर्शल व मंगळ हे मकर वृत्ताकडे ह्मणजे गुरूच्या समोरच्या राशींत आहेत, त्यामुळें गुरूनें केलेल्या पर्जन्यगर्भाच्या पा

ताला ते कारण मात्र झाले आहेत. झणूनच गेल्या महिन्यांत जिकडे तिकडे वृष्टि झाली, झणजे गर्भपात झाला! या गर्भ पातामुळें पावसाला जबर धक्का बसला आहे, यांत तिलप्राय शंका नाहीं. झणूनच असें अनुमान होतें कीं यंदाचा पावसाळा सुरळीत होणार नाहीं. ज्या ज्या वेळीं जसा जसा पाऊस पडला पाहिजे त्या त्या वेळीं तो तितक्या प्रमाणानें पडणार नाहीं. पाऊस पुष्कळ पडेल. पण तो पडेल तेव्हां अतिवृष्टि करील, नाहींतर सर्वांचे डोळे आकाकडे लावील. अर्थात् या कृतीनें उत्तर गोलार्धांत दुष्काळ पडेल विषुव प्रदेशीं वृष्टि साधारण होईल आणि दक्षिण गोलार्धांत अतिवृष्टि होईल सारांश, पृथ्वीवर कोणत्या देशांत सुकाळ होईल तो होवो!

मार्गशीर्ष महिन्यापासून पावसाचा गर्भकाल आहे. गर्भकालीं मंगळ विषुवाजवळ होता. व नंतर तो दक्षिण गोलार्धांत गेला त्यामुळें त्याचा उत्तर गोलार्धांतील हवेस विशेष उपयोग झाला नाहीं. झणून उत्तर गोलार्धांत पर्जन्याचें मान कमीच असें वाटतें.

या वर्षी शनि मीन राशींत आहे. त्याचें फल ग्रंथोक्त—

शनिर्गते मीन राशौ दुर्भिक्षंच समंभवेत् ॥
मानवानां भवेद्व्याधिरक्तधारा प्रदारुणा ॥
विग्रहंच महाघोरं सर्व देशे तु भाषितं ॥
महर्घ जायते सस्यं पशूनांचैव नाशनं ॥
सर्व धान्यं क्षयं याति चैतत्सत्यं वरानने ॥
धातुसंबंधिनश्चान्ये मृत्तिकातुल्यमेवच ॥

आज दोन वर्षें मीन राशीवर शनि आहे व त्याचा अनुभवही सर्वांस येत आहे. मार्च्य महिन्यापासून तो रेवती नक्षत्रांत आहे. या नक्षत्राचें फल ग्रंथोक्त—

यदापूषगतःसौरी तदा देवो न वर्षति ॥
हाहाकारं महारौद्रं पृथ्व्यां कुर्वन्ति पार्वती ॥

सुवर्णरूप्यरत्नानि विक्रयित्वा सुरेश्वरी ॥
संग्रहेत्सर्वधान्यानि लाभो भवति पुष्कलः ॥
दुर्भिक्षं मध्यदेशेच पीडा जनपदस्यच ॥
परस्परनरेंद्राणां युद्धं भवति दारुणं ॥

शनि रेवती नक्षत्रांत असला झणजे पाऊस पडत नाहीं. हाहाकार व मोठी रडारड उत्पन्न होते. अशा वेळीं दागदागिने सुद्धां विकून धान्याचा संग्रह करावा. व्यापाऱ्यांनां धान्याचा संग्रह केल्यास पुष्कळ लाभ होतो, असें वरील श्लोकांत वर्णन आहे. मार्च्यापासून शनि रेवती नक्षत्रांत आहे. या महिन्यांत तो या नक्षत्राच्या पहिल्या चरणांत आहे. त्याचें फल ग्रंथोक्त—

रेवतीप्रथमे पादे सूर्यजो यदि तिष्ठति ॥
तदा नदीतटद्वेद्वे दुर्भिक्षं कालरौरवं ॥

एप्रिलमध्यें तो दुसऱ्या चरणांत आहे. त्याचें फल.—

द्वितीयचरणे मंदे रेवत्यां यदि तिष्ठति ॥
तदा गोदावरीद्वंद्वे तटे दुर्भिक्षकं भवेत् ॥
नान्नं पचंति मेदिन्यां शृणुमद्वचनं प्रिये ॥

मे मध्यें तो तिसऱ्या चरणांत आहे. त्याचें फल.—

तृतीयचरणे सौरी यदा तिष्ठति पार्वती ॥
विंध्याद्रिपूर्वभागेषु विषयं प्रविनश्यति ॥
मूषकस्य भयं जातिकाव्यकृत्पीडनं भवेत् ॥
तथाकलाकृतंचैव नटनाटकृतं तथा ॥

जून जुलईमध्यें तो चतुर्थपादीं आहे, त्याचें फल.—

पादे चतुर्थगे सौरीपृथ्व्यां नान्नं पचंतिहि ॥

माधवो वर्षते नैव रौरवः काल जायते ॥
तथैवाग्निभयं याति रसं धान्यं महर्गता ॥

आगष्ट व सप्टंबरमध्यें तो पुन्हा तिसऱ्या चरणांत आला आहे. व अकटंबरपासून पुढें दुसऱ्या चरणांत आहे.

ता. १० जुलईपासून डिसेंबरपर्यंत तो वक्री आहे. आणि मंगळ ता. ६ जूनपासून ता. १० आगष्ट पर्यंत वक्री आहे. शनि व मंगळ वक्री असतां दुर्धर पीडा होते.

वक्रगे मंदभौमे च भयं रोगं तदा भवेत् ॥
कन्यामिनालिसिंहे धनुवृषमिथुने वक्रगे मंद भौमौ ॥
पृथ्व्यां संक्रुद्धभूपा क्षितिपतिदलितं विग्रहं चातिघोरं ॥
दुर्भिक्षं सस्यनाशं जनपदमरणं चातिलोकप्रकंपं ॥
चक्रारूढं समस्तं भ्रमति दशदिशा मीनसंस्थेर्कपुत्रे ॥
अतिचारगताः सौम्याः क्रूरावक्र व्यवस्थिता :॥
दुर्भिक्षं राष्ट्रभंगंस्या त्प्रजामारी प्रवर्तते ॥
अतिवातमवातंच अत्युष्णंच निरुष्णता ॥
अत्यभ्रंच निरभ्रंवा शीघ्रं वर्षति माधवः ॥

श्रवण नक्षत्रांत एखादा क्रूर ग्रह असतां अन्न महाग होतें. विशेषतः गहूं महाग होतात, असें एक वचन आहे. या वर्षी ता. २५ एप्रिल पासून ता. १९ जुलईपर्यंत व ता. २१ आगष्टपासून ता. ४ अकटंबर पर्यंत मंगळ श्रवण नक्षत्रांत आहे. ह्मणून या कालांत मोठी महागाई होईल. तें वचन असें—

श्रवणर्क्षेयदाक्रूरो ग्रहःकश्चित्समाश्रितः
अन्नं महर्गतां याति गोधूमाश्चाविशेषतः ॥

बुध, शुक्र आणि रवि हे तीन ग्रह एका राशीवर असतां धान्यें

महाग होतात व पाऊस थोडा पडतो. तेंच एका नक्षत्रांत असत महा भयंकर दुष्काळ पडतो हा योग आगष्ट मध्यें येतो. तें वचन असें.—

एकराशिस्थिताह्येते सौम्यशुक्रदिनाधिपाः ॥
सर्वधान्यमहर्घं च मेघा स्वल्पजलप्रदाः ॥
एकनक्षत्रगाह्येते तदाक्षयविवर्धकः ॥

रवि, शुक्र व गुरु हे तीन ग्रह एका राशीवर असतां राज्यनाश, प्रजानाश व महागाई या गोष्टी घडतात. या तीन ग्रहांचा एका काळींच योग होईल तर तो काल महा भयंकर होईल. या वर्षी तसा योग नाही. पण जुलईत ते एका राशीवर : मात्र आहेत. तें वचन असें.—

रविशुक्रगुराचार्या यदैकत्रसमाश्रिता : ॥
राज्यभ्रंशः प्रजानाशः सर्व सस्यमहर्गता ॥

गुरु व शुक्र हे एका राशीवर असतां महागाई होते. '**गुरुशुक्रावेक राशीं गतौ दुर्भिक्षदुःखदौ ॥** हा योग जुलई व आगष्टमध्यें येतो.

गुरु, चंद्र व रवि हे ग्रह एका राशीवर असतील तेव्हां उत्तरेकडे प्रजा आक्रोश करील. तें वचन असें.—

दिननाथेंदुगुरवो यदैकत्रसमाश्रितः ॥
उत्तरस्यां दिशि भयः प्रजाः कंदंति नित्यशः ॥
यवा मुद्गव वस्त्राणि संग्रहेच्च कृते सति ॥
मासे सप्तमके चैव लाभोभवति पुष्कलः ॥

हा योग जुलईच्या ९।१०।११ तारखांस आहे. कर्क, मीन, मकर या राशींत शनि आणि मंगळ असतां पृथ्वीवर दुष्काळ पडतो आणि लढाया लागतात. तें वचन असें.—

कर्कमीनमृगस्त्रीषु शनिभौमौ यदि स्थितौ ॥

तदा युद्धाकुला पृथ्वी धनधान्य विवर्जिता ॥
मिथुनस्थौ धनुर्मीनराशौ मंदः समाश्रित : ॥
तदा भूपा विनश्यंति पृथ्वी शोणितपूरिता ॥

वरील सर्व वचनांवरून यंदाचें वर्ष कठीण आहे असें दिसतें. त्याचे डोहाळे आतांपासूनच होऊं लागले आहेत! परमेश्वर सर्वांचें कल्याण करो.

१ सायन आर्द्रा.— हें नक्षत्र बुधवार ता. २९ मे या दिवशीं सकाळीं ९ वाजून ३१ मि०नीं निघेल. ता. २८ मे या दिवशीं गुरु आणि हर्शेल हे समोरा समोर येत आहेत. यावेळीं चंद्र दक्षिण गोलार्धांत आहे म्हणून या नक्षत्राचा आरंभीं पाऊस पडणें कठीण आहे. हा आरंभ सिलोनचा आहे. म्हणून तेथें या वेळीं बरसात सुरू होईलसें वाटत नाहीं.

विशाखा, अनुराधा आणि ज्येष्ठा हीं तीन नक्षत्रें नपुंसक संज्ञक आहेत. मूळापासून मृगांपर्यंतचीं १४ नक्षत्रें पुरुषसंज्ञक आहेत व आर्द्रापासून स्वातीपर्यंतचीं १० नक्षत्रें स्त्रीसंज्ञक आहेत. स्त्रीसंज्ञक नक्षत्रांत सूर्य असतां पावसाळा असतो. सूर्य जेव्हां या नक्षत्रांत प्रवेश करितो तेव्हां चंद्र जर पुरुष नक्षत्रांत असेल तर महावृष्टि होते. नपुंसक नक्षत्रांत असेल तर वृष्टि क्वचित् होते, स्त्री नक्षत्रांत असेल तर मध्यम वृष्टि होते, असें प्राचीन ग्रंथकारांचें मत आहे. सायन आर्द्राप्रवेश ज्या कालीं होतो, त्या कालीं चंद्र सा० उत्तराषाढांत आहे. म्हणजे पुरुष संज्ञक नक्षत्रांत आहे म्हणून या नक्षत्राची अति वृष्टि होईल असें या मतानें ठरतें. परंतु तसें होणार नाहीं असें आह्मांस वाटतें.

२ सायन पुनर्वसु.— ता. १२ जून बुधवार सकाळीं ७ वाजून ४९ मिनिटांनीं हें नक्षत्र निघतें. या दिवशीं चंद्र कर्क राशींत आहे. ता. १३ जून या दिवशीं गुरु-चंद्र युति आहे. यावरून या नक्षत्राचा आरंभींच पुष्कळ पाऊस पडेल. शेवटीं शेवटीं कमी पडेल.

नक्षत्रारंभीं चंद्र पुष्य या स्त्री नक्षत्रांत आहे म्हणून या मताप्रमाणें पाऊस मध्यम पडेल, असें ठरतें. एकंदरींत याच नक्षत्रांत बरसात सुरू होईल असा रंग आहे.

३ सायन पुष्य.— हें नक्षत्र ता. २६ जून मंगळवार या दिवशीं रात्रीं २ वाजून २९ मि. नीं निघतें. या वेळीं चंद्र मकर कृताजवळ आहे. म्हणून हें नक्षत्र अर्धें कोरडें जाईल.

या नक्षत्रांत स्त्रीपुरुष योग असल्यामुळें पाऊस पुष्कळ पडावा असें या मतानें दिसतें.

४ सायन आश्लेषा.—

आश्लेषायां गतो भानुः प्लावयेत्पर्वतानपि

हें नक्षत्र ता. १० जुलई बुधवार या दिवशीं सकाळीं ६ वाजून ४४ मि.नीं निघतें. नक्षत्रारंभीं चंद्र उत्तर गोलार्धांत आहे, म्हणून पाऊस पुष्कळ पडेल. वरील श्लोकावरून असें दिसतें कीं या नक्षत्राचा पाऊस इतका पडला पाहिजे कीं पर्वतसुद्धां उलथून पडतील! या वर्षी तसाच योग दिसतो.

या नक्षत्राच्या वेळां स्त्री योग आहे त्यामुळें सामान्य वृष्टि होईल असें याचें फल आहे.

मेघमाला ग्रंथामध्यें आषाढी पौर्णिमेचें निदान सांगितलें आहे, तें विचार करण्यासारखें आहे. म्हणून तें ऐथें वाचकाकरितां देणें योग्य आहे. तें वर्णन येणें प्रमाणें.—

'चैत्रादिस्थे सावितरे' या लक्षणाप्रमाणें सायन आषाढ तो निरयन ज्येष्ठ आहे. याचा आरंभ ता. ११ जून पासून आहे. पौर्णिमा ता. २६ जूनच्या रात्रीं २ वाजून १५ मि. नीं पूर्ण होते. त्या दिवशीं मंगळवार आहे. याच वेळीं सायन पुष्य हें नक्षत्र निघत आहे.

आषाढ महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यांत आकाश निरभ्र असेल तर दोन महिने पाऊस पडणार

नाहीं.

आषाढी पौर्णिमेच्या दिवशी जर पूर्वेचा वारा वाहूं लागला तर तें लक्षण बरें समजावें. आग्नेयीकडून वाहूं लागला तर पृथ्वी कोरडी ठणठणीत होणार ह्मणून समजावें. दक्षिणेचा वारा वाहूं लागला तर पाऊस पडणार नाहीं व विहिरी तलाव, झरे यांच्यांत पाण्याचा एक थेंबही दृष्टीस पडणार नाहीं, ह्मणून समजावें. नैर्ऋत्येकडून वारा वाहूं लागेल तर धान्याचा संग्रह करावा ह्मणजे ५ व्या महिन्यांत दुप्पट लाभ होईल. अर्थात् हें लक्षण दुष्काळाचें आहे, हें उघड आहे. पश्चिमेचा वारा सुटेल तर पाऊस चांगला पडेल असें समजावें. वायव्येचा सुटेल तर मुंगूस, टोळ, उंदीर हे मरून जातील इतका पाऊस पडेल. उत्तरेचा सुटेल तर सुभिक्षता होईल, लोक आनंदांत राहतील. चोहोंकडून वारा सुटेल तर तें लक्षण वाईट आहे, असें समजावें. जर या दिवशीं वारा मुळींच सुटणार नाहीं तर सर्व पृथ्वीवर पाण्याचा एक थेंबही दृष्टीस पडणार नाहीं!

ज्येष्ठे मासित्वमावास्या
पौर्णिमास्यांमथापिवा ॥
दिवा वा यदि वा रात्रौ
मेघो भवति चांबरे ॥
अवृष्टिश्च भवेत्तत्र नात्र
कार्या विचारणा ॥

जर ज्येष्ठ महिन्याच्या अमावास्येस किंवा पौर्णिमेस दिवसास अगर रात्रीं आकाश आभ्राच्छादित असेल तर पाऊस पडणार नाहीं असें समजावें. ता. २७ मेला पौर्णिमा असून ता. १० जूनला अमावास्या आहे.

५ सायन मघा.— हें नक्षत्र ता० २४ जुलई बुधवार या दिवशीं सकाळीं ६ वाजून ६ मि.नीं निघणार आहे. या नक्षत्राचा पाऊस कमी पडणार.

पुरुष स्त्री योग आहे. पाऊस पुष्कळ पडेल असें या योगाचें फल आहे.

६ सायन पूर्वा.— हें नक्षत्र ता० ७ आगष्ट मंगळवार रात्रीं ४ वाजून ४१ मि.नीं निघतें या वेळीं चंद्र उत्तरेकडे आहे ह्मणून याचा पाऊस बरा पडेल.

या नक्षत्रांत स्त्रीस्त्री योग आहे, ह्मणून पाऊस सामान्य पडेल.

७ सायन उत्तरा— हें नक्षत्र ता. २१ आगष्ट मंगळवार या दिवशीं रात्रीं १ वाजून ४८ मि. नीं निघतें. या दिवशीं चंद्र म. कर वृत्ताजवळ भ्रमण करितो. ह्मणून हें नक्षत्र बहुधा अर्धें कोरडें जाईल.

या नक्षत्राला स्त्रीपुरुष संयोग आहे. पाऊस पुष्कळ पडेल असें या योगाचें फल आहे.

८ सायन हस्त.— हें नक्षत्र ता० ३ सप्टंबर मंगळवार या दिवशीं रात्री ९ वाजून ११ मि नीं निघतें. या वेळीं चंद्र कर्क वृत्ताजवळ आहे, ह्मणून पाऊस चांगला पडेल.

या नक्षत्राला स्त्रीस्त्री संयोग आहे ह्मणून पाऊस सामान्य पडेल असे याचें फल आहे.

९ सायन चित्रा.— हें नक्षत्र ता० १७ सप्टंबर मंगळवार या दिवशीं दिवसास २ वाजून ११ मि.नीं निघतें. या नक्षत्राचा पाऊस तुरळक पडेल व तो शेवटीं पडेल.

१० सायन स्वाती.— हें नक्षत्र ता० १ अकटंबर मंगळवार या दिवशीं सकाळीं ५ वाजून १ मि.नीं निघतें. या नक्षत्राचा थोडा तरी आरंभीं पाऊस पडेल.

या नक्षत्राला स्त्रीस्त्री संयोग आहे. पाऊस सामान्य पडेल असें याचें फल आहे.

एथपर्यंत ग्रहांवरून व नक्षत्र योगांवरून पावसाचें फल वर्णन केलें आहे. यावरून वाचकांच्या ध्यानांत येईल कीं, हें वर्ष पावसासंबंधानें अनिष्ट आहे. योग्य वेळीं पाऊस पडणार नाहीं. पडेल तेव्हां अतिवृष्टि करील व जरूर तेव्हां मुळींच पडणार नाहीं. ह्मणून पृथ्वीवर मोठा दुष्काळ पडेल असें ज्योतिःशास्त्राच्या दृष्टीनें दिसतें अनुभव काय येतो हें पाहणें आहे.

मेघमाला ग्रंथामध्यें कावळ्यावरून पावसाचें अनुमान कसें करावें तें सांगितलें आहे, तें असें.—

जर कावळे झाडांच्या पूर्वेकडील शाखांवर घरटीं करितील तर

सुभिक्षता होते. पाऊस चांगला पडतो, धान्यें उत्तम पिकतात व सर्वत्र संतोष आणि आरोग्य प्राप्त होतें.

अग्नेयीकडील शाखांवर घरटीं करितील तर पाऊस पडणार नाहीं व दुष्काळ पडेल.

जर दक्षिणेकडील शाखांवर घरटीं करितील तर युद्धें, रडारड व हाहाकार उत्पन्न होईल.

नैर्ऋत्येकडचा आश्रय धरितील तर दोन महिने तुरळक पाऊस पडेल.

पश्चिमेकडे घरटीं करितील तर पाऊस पडणार नाहीं असें समजावें.

वायव्येकडे वस्ती करितील तर वाऱ्यासारखी वृष्टि होणार ह्मणून समजावें.

उत्तरेकडील शाखांवर घरटीं करितील तर हें लक्षण उत्तम समजावें. जुनें धान्य बेलाशक विकून टाकावें. धान्य पुष्कळ पिकेल व सुकाळ होईल.

ईशान्येकडे घरें करितील तर पाऊस थोडा पडेल. व शेतें शुष्क होतील.

जर शाखांच्या मध्यें आश्रय करितील तर अनावृष्टि समजावी.

ज्या ठिकाणीं वारुळें आहेत अशा भूमीचा आश्रय करितील तर महामारी, चोरांचा उपद्रव व अनावृष्टि होणार ह्मणून समजावें.

कोरड्या जागेवर घरटीं करितील तर चोरभय, राजांचे तंटे व लढाया वगैरे गोष्टी घडतील.

वरील वर्णन उपपत्तिसिद्ध आहे. ह्मणून तें विचारार्ह आहे. दक्षिणेकडून अथवा नैर्ऋत्येकडून पाऊस सुरू होतो. ह्मणून त्या दिशेस कावळे ज्याकाळीं घरटीं करितील त्याकाळीं पाऊस पडणार नाहीं असें मानण्यास हरकत नाहीं. कारण जर पाऊस पडणार असेल तर ते त्या बाजूला कधींहि घरटे करणार नाहींत. आपल्यापेक्षां पक्ष्यास कित्येक गोष्टींत जास्त कळतें. कोंबडा वेळेवर आरवतो, कोकिल वसंतऋतूच्या आरंभींच गायन करूं लागतो. या गोष्टी आपण नित्य पाहतों. त्यावरून कावळ्यांस

पावसाचें अनुमान होत नसेल असें कसें ह्मणावें ?

पाऊस पुष्कळ पडण्याचे दिवस

एप्रिल ता० १८ ते २३ मे ता० १६ ते २१ जून ता० १३ ते १८ जुलई ता० १० ते १५ आगष्ट ता० ७ ते १२ सप्टेंबर ता० ४ ते ९ अक्टोबर ता० २ ते ७ व ३० ते नवंबर ३ नवंबर ता० २६ ते ३० डिसेंबर ता० २३ ते २८

अवर्षणाचे दिवस

एप्रिल ता० ४ ते ९ मे ता० २ ते ७ व ३० जून १–३ व व २६ ते ३० जुलई ता० २३ ते २७ आगष्ट ता० २० ते २५ सप्टेंबर ता० १७ ते २२ अक्टोबर ता० १५ ते २० नवंबर ता० १२ ते १७

मध्यम वृष्टीचे दिवस

मे ता० ८ ते १३ जून ता० ४ ते ९ जुलई ता० १ ते ६ व २९ ते ३१ आगष्ट ता० २५ ते ३० सप्टेंबर ता. २१ ते २६ अक्टोबर ता. १९ ते २४ नवंबर ता. १५ ते २० डिसेंबर ता. १२ ते १७

उत्पात

एप्रिलचा शेवटचा आठवडा व आगष्टचा शेवटला आठवडा.

प्रसिद्ध पुरुषांचे जन्म.

[ता. ११ मे पासून ता. २१ मे पर्यंत]

ता. ११।१२।१३

ता. ११।१२।१३

ता. ११।१२।१३



ता. १२।१४।१५

ता. १६।१७

ता. १८।१९।२०

या सर्व कुंडल्या सायन आहेत.

१ पत्रव्यवहार

[१]

जन्म शके १७७७ ज्येष्ठ शु. १५ गुरुवार सू. घ. १ प. ३५

निरयन लग्न कुंडली



नवमांश कुंडली



स्पष्ट ग्रह.

ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.
१	१	७	१	२	१०	२	१	०
२६	१७	९	६	४	१०	२६	२७	१९
१५	१९	३२	२४	७	५६	४७	४२	४७

लक्ष्मीस्थानं त्रिकोणं स्या द्विष्णु स्थानं तु केंद्रकम् ॥
तेषां संयोगमात्रेण चक्रवर्ती नरो भवेत् ॥

शनि केंद्र व त्रिकोण यांचा मालक आहे. हा एकटाच ग्रह योग करणारा आहे. त्यांत त्याला रवि केंद्राधिपति मिळून त्याचा योग लग्नीं झाला आहे. त्यामुळें हा मनुष्य जर राजकुळीं जन्मास आला असता तर चक्रवर्ती राजा झाला असता. परंतु तशी परिस्थिति इहीं

नसल्यामुळें तो कलेक्टर मात्र झाला. दहा वर्षें कलेक्टरचें काम करून बरेच लोकांवर अंमल गाजविण्याची सत्ता मिळाली. हे वैभव वरील योगानें दिलें. परंतु त्या योगाला मंगळानें लघुत्व आणिलें. त्याच्या गुणाप्रमाणें त्याला पुष्कळ त्रास झाला व शत्रुही पुष्कळ उत्पन्न झाले. मंगळ दुर्बल असल्यामुळें शिक्षा करण्याचा अधिकार मिळाला नाहीं. रवीनें शनि मारला जातो, म्हणून रवि शनीपेक्षां बलवान् आहे. रवि सुखाधिपति आहे व शनि हा त्याच्या नजीकचा वरिष्ठ अधिकारी दाखवितो. त्यामुळें जरी त्याच वरिष्ठांकडून वारंवार त्रास होत होता तरी त्याच्या सुखाला कमीत्व आलें नाहीं. म्हणजे त्याचें वजन उलट त्यांचेवर पडत गेलें. मिथुन राशीमध्यें बुध शुक्र व कुंभ राशीमध्यें गुरु हे त्याला पुष्कळ प्रकारच्या विद्येचा व्यासंग लावणारे आहेत. व तो लेखणीचाही बाका असला पाहिजे.

लाभं तृतीयं रंध्रंच शत्रु-
स्थानं व्ययं तथा ।
एतद्योगेन यो भाव स्तन्ना
शं प्राप्नुयाद् ध्रुवम् ॥१॥

गुरु रंध्राधिपति असून राज्य-भुवनस्थानीं आहे. हा ग्रह जितकें शुभ फल देणारा आहे तितकेंच तो अनिष्ट झाला असतां वाईट फल देतो ज्यांच्या कुंडलींत अष्टमाधिपति दशमस्थानीं अगर दशमाधिपतीनें युत असेल तो ज्या ज्या वेळीं अनिष्ट होईल किंवा त्याची दशा अगर अंतर्दशा येईल त्या त्या वेळीं त्या मनुष्यास नोकरींतून बडतर्फ अगर दुसरें कांहीं संकट आणितो. व कांहींना तर पेनशन घेण्याचे वेळेस यमसदनास पाठवितो. ज्या ज्या वेळीं सदरहू मनुष्यास गुरु अनिष्ट आला त्या त्या वेळीं त्यावर कांहींना कांहीं संकट आलें. परंतु तो जेव्हां मिथुनेचा म्हणजे अष्टम आला त्या वेळेपासून त्याचे नोकरीमध्यें संकटें येऊं लागलीं. वरिष्ठांकडून त्रास होऊं लागला. अखेरीस मुदत असतांही ता. ३।१०।०६ पासून फलीं रजा घेऊन स्वस्थ बसणें भाग पडलें.

केंद्राधिपत्यदोषस्तु
बलवान् गुरुशुक्रयोः ॥
मारकत्वेपिच तयो र्मार-
कस्थानसंस्थितिः ॥

शुक्र लग्नाधिपति असून मारक स्थानीं बुधानें युक्त आहे. शुक्राची विंशोत्तरी महादशा असून बुधाची अंतर्दशा होती व अष्टोत्तरी राहूंत बुधाची होती तेव्हां हा काळ त्याचे आयुष्यास धोका देणारा होता, असें सांगूं शकतां येईल. सदरहू मनुष्यानें ता० ४।१०।१९०६ गुरुवार रोजीं सकाळीं ८ ते १२ वाजण्याचे दरम्यान विष पिऊन समुद्रांत उडी टाकून आत्महत्या केली!

एवढें भयंकर मरण कशानें आलें? लग्नांतील तीन पाप ग्रहांच्या योगामुळें कीं काय? गुरूचा अंमल त्याचेवर इतका झाला होता कीं, त्यानें गुरूवारींच मरण आलें. त्याचे मरण दिवशीं खालील प्रमाणें ग्रहांची स्थिति होती.



जन्माधिपति शुक्र मारक स्थानीं वृश्चिक या जलराशींत होता. त्यानें त्याचे अंगांतील उष्णतादर्शक कमी करीत आणलें व त्याला शनि मंगळानें दूषित केलें होतें. शनिमंगळ समोरासमोर होते तेव्हां त्याला त्या दिवशीं ग्रहस्थिति बरोबर नव्हती असें दिसतेंच. शनिमंगळ ज्यावेळीं समोरासमोर येतात त्या वेळीं त्या मनुष्यास अपघातापासून किंवा अन्य भयंकर रीतीनें मृत्यु येण्याचा संभव असतो.

कळावें, लोभ असावा हे विनंति.

डी. एस. दिवाडकर

---

(२)

वि. वि. — ता. १८ मार्च्य १९०[illegible] सोमवारीं रात्रीं १०॥ वाजतां एका स्त्रीला एक मुलगी झाली. नंतर तिला ११॥ वाजतां दुसरी मुलगी झाली. घड्याळ लावून बसलों होतों. हें रेलवे टाईम आहे, पहिली झाल्यानंतर

बाळंतणीला वायु झाला. दुसरी झाल्यानंतर मस्तकांत चढून अर्ध क-लाक बेशुद्ध होती. नंतर जरा सावध झाली. इजा फार झाली. तिसरे दिवसापासून बाळंतणीस खोकला सुरू झाला. मध्यंतरीं ज्वरही आला होता. हल्लीं एक महिना होऊन गेला. बाळंतणीची तब्यत बरी आहे दोन्ही मुली हयात आहेत. दोघींचे नाळ एकच होते. तरी ही हकी-कत कुं० वि० त प्रसिद्ध करून जुळीं मुलें कां व्हावींत याचा ऊहा-पोह करावा. कळावें.

श्रीधर अंताजी मरढेकर.

* सदरहू वेळेवरून कुंडल्या केल्या त्या अशा.—

पहिली—सायन

दुसरी—सायन

या तारखेस रवि व बुध यांची युति होती. हे ग्रह मीन रा-शीच्या २७ व्या अंशांत असून शनि १९ व्या अंशांत होता. बुध वक्री होता. मीन ही राशि जुळें उत्पन्न कर्ती आहे, असें अनेक वेळां मागें सांगितलें आहे.

संपादक 'कुं. वि.'

पत्रव्यवहार

कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. तारीख ११ मार्च्यच्या अंकांत पावसाचे वर्षकलांत कांहीं कमी भाग आढळला तो कांहीं उपयुक्त आहे. सबब तो श्लोकरूपानें ग्रंथांतून घेऊन प्रसिद्धीकरितां पाठवित आहें. अनुभविक नवीन नियमही पाठविले आहेत.

यदा सिंहे गुरुर्याति सुभिक्षं तत्र जायते ॥
मेघाश्च प्रबलास्तत्र बहुसस्या च मेदिनी ॥१॥

आगष्टमध्यें गुरू सिंह राशीवर जात आहे.

यदा कर्के स्थितो राहुस्तस्कराणां भयं भवेत् ॥
समर्घ सर्वलोहं च महर्घे षष्ठ मासके ॥२॥

वर्ष अखेरपर्यंत राहु कर्क राशीवर आहेच.

अमावास्या तुले चंद्रे मकरे चेत्तु मंगलः ॥
विना चक्रं भवेच्चूर्ण वाणिज्यं निष्फलं भवेत् ॥३॥

ता. ७ आक्टोबर रोजीं असा योग आहे व ता. १५ आक्टोबर पर्यंत पावसाळ्याचे दिवस आहेत.

कर्क राशीचा गुरु असला ह्मणजे पाऊस पुष्कळ पडतो असा जन-समज आहे. ज्येष्ठापासून गुरू निरयनानें कर्क राशींत जातो. खालील श्लोकावरून असें दिसून येईल कीं, कर्क राशीचा गुरू पावसास अनुकूल नसतो. प्रथम श्लोकाप्रमाणें सिंह राशीच्या गुरूवर तो पुष्कळ पडून धान्य स्वस्ताई होते.

बृहस्पतिर्यदा कर्के स्वल्पं मेघः प्रवर्षति ॥
राजभिर्विग्रहश्चैव दुर्भिक्षं तत्र जायते ॥४॥

जुलईमध्यें रवि मंगळ समोर व त्यांत मंगळ वक्री आहे ह्या सर्वा-वरून व पर्जन्य वर्षफलाचे अंकारून असें दिसून येईल कीं जूनमध्यें पाऊस अल्प पडेल, जुलईमध्यें पावसाची खेची (ताण) होईल रोग राई होईल., आगष्टमध्यें दुसऱ्या पंधरवाड्यापासून सप्टेंबर पर्यंत १॥ महिना अतिवृष्टि होईल. आक्टोबर पासून ३ ऱ्या श्लोकाप्रमाणें महा-

गाईस आरंभ होण्याचा संभव दिसतो. राहूच्या स्थितीवरून चोरांचा उपद्रव होणें व शनि व कर्केचा गुरु आहे तों पर्यंत गुरुवरून लंढाया होणें हे प्रकार संभवतात सिंह राशीच्या गुरुवरून पर्जन्याची आशा करण्यास व धान्याची फार महागाई होणार नाहीं, असें समाधान मानण्यास जागा आहे.

अनुभविक नियम

१ ४।८ स्थानांतील मंगळा प्रमाणें नवम स्थानांतील मंगळ सुद्धां क्षेत्र लाभ देतो.

२ क्लाडिअस टॉलेमी ज्योतिषाचे एक जुनें ग्रंथकार बाल्काचें आयुर्दायाविषयीं असा नियम देतात कीं, रविचंद्र ह्या दोन गोलांपैकीं एक जर केंद्रांत असेल आणि पापग्रहाशीं युक्त असेल अगर समोर पापग्रह असेल आणि त्यावर कोणत्याही शुभ ग्रहाची दृष्टि नसेल आणि गोलाचे स्वामी हे जर ६।८ ह्या स्थानांत असतील तर जन्मलेलें मूल वांचणार नाहीं लवकरच यमसदनीं जाईल.

३ बालके मरतात त्यावेळीं चंद्र कुंडलींत पापग्रहांच्या दृष्टींत असतो व्यणि विशेषेंकरून ४।६।८ ह्या स्थानांत असतो.

४ शास्त्रीय राशी ज्याप्रमाणें बुद्धीवर परिणाम करितात त्याप्रमाणें २, ३, ५, ९, ११ ह्या स्थानांतील ग्रहही करितात.

५ प्रश्न अगर लग्न कुंडलांत असुक एक गोष्ट घडण्याचा अगर दृष्टीचा काल कसा मोजावा या विषयीं:—

चर राशी केंद्रांत—दिवस दर्शवितात.
,, २,५,८,११ स्थानांत आठवडे ,,
,, ३,६,९,१२ ,, महिने ,,
द्वि. राशी केंद्रांत—आठवडे दर्शवितात.
,, ,, २,५,८,११—महिने ,,
,, ,, ३,६,९,१२—वर्षे ,,
स्थिर राशी केंद्रांत—महिनें
,, ,, २,५,८,११ स्थानांत—वर्षे
,, ,, ३,६,९,१२ ,, —ओळखितां येत नाहीं असा काल.

दृष्टीचा परिणाम केंद्रांत चर राशीवर फार लवकर व कडक घडतो, फणफर किंवा आपोक्लिम

स्थानांत स्थिर किंवा द्विस्वभाव राशींत उशीरा किंवा सौम्य घडतो.

जितक्या अंशाचा फरक असेल तितके दिवस आठवडे, महिने किंवा वर्षे चर, द्विस्वभाव अगर स्थिर राशींत जशी दृष्टी असेल त्यावरून काल सांगावा.

ग्रहांचे योग प्रतियोग ह्यांचा काल पाहण्यास ही रीती उपयोगी पडेल. दृष्टींत २ अंश अंतर आहे तर २ दिवस, आठवडे महिने अगर वर्षे असें स्थानें आणि राशी यांवर विचार करून उत्तर द्यावें. ह्मणजे इतक्या कालानें परिणाम घडेल किंवा गोष्ट घडेल असें समजावें.

६ उदीत खस्वस्तिकांचे अगदीं जवळचें त्यास उच्चस्थान समजावें उच्च स्थानांत असलेले ग्रह इतर ग्रहांपेक्षां जास्त बलवान् असतात. उदाहरण.— एकग्रह ११ वे स्थानांत व १ बारावे स्थानांत आहे तर ११ वे स्थानांतील ग्रह १२ वे स्थानांतील ग्रहापेक्षां बलवान् आहे. १० वे स्थानांतील ग्रह ह्या दोन्ही स्थानांतील ग्रहापेक्षां जास्त बलवान् आहे. तिसऱ्या स्थानांतील चतुर्थ स्थानांतीलपेक्षां व पांचव्या स्थानांतील ग्रह चतुर्थ स्थानांतील ग्रहापेक्षां बलवान् असें समजावें. अशा प्रकारचे ग्रह जर पापग्रह असून ते जर चर राशीचे व केंद्रांतील असतील तर त्याचा परिणाम लवकर व कडक घडतो. शुभ ग्रह जरी उच्च स्थानांतील असले तरी पाप ग्रहांचें बल कमी होणार नाहीं मात्र शुभग्रह पापग्रहापेक्षां उच्च स्थानांत असला तर त्याचा परिणाम सौम्य व उशीरां घडेल. कुंडलींत साधारण योग असून पापग्रह शुभग्रहापेक्षां वरील रीतीनें उच्च स्थानांत असतील तर खात्रीनें परिणाम वाईट लवकर व कडक घडेल. हा नियम ग्रहबल आजारीपणा, आरोग्य, द्रव्यस्थिति (गरिबीची अगर श्रीमंतीची) हे पाहण्यास उपयोगी पडेल.

७ ग्रहांचे किरण व त्यांचे योग प्रतियोग घडण्याचा काल व परिणाम कसा पाहावा ह्या विषयी

—हर्शल — ८. शनि — ८. गुरू — १०. मंगळ — ८. रवि— १७ बुध — ८. शुक्र — ८. चंद्र– १२. इतके अंश पर्यंत ग्रहांचे किरण व तेज असतें जर दोन ग्रह युती करूं पाहत आहेत तर कितव्या अंशांपासून परिणाम घडूं लागेल हे पाहणें झाल्यास दोघांच्या अंशांची बेरीज करावी. बेरजेची निसे करावा ह्मणजे तितक्या अंशाचे अंतर आलें असतां युतीचा परिणाम घडूं लागेल. उदाहरण— रवि मंगळांशीं युती करूं पाहत आहे. दोघांच्या अंशांची बेरीज केली तीं १७+८=२५ झाली ह्यांस दोहोनीं भागिलें तेव्हां १२॥ भागाकार आला ह्मणजे रवि जेव्हां मंगळा जवळ १२॥ अंश अंतरावर येईल तेव्हां दोघांच्या युतीचा परिणाम होण्यास सुरुवात होईल.

हा प्रकार चर राशींत किंवा केंद्रांत लवकर व कडक प्रमाणानें घडेल. इतर स्थानांत किंवा इतर राशींत उशीरा किंवा सौम्य प्रमाणानें घडेल. हें काल मोजण्याच्या नियम १ वरून कळेल

८ चतुर्थ स्थानापासून खालील दशमापर्यंतचे ग्रह हे वरील चतुर्थ स्थानापासून दशमस्थानापर्यंतचे ग्रहांपेक्षां कमी बलवान असतात. असे उदित ग्रह यश दर्शवितात.

९ विवाहकाल, ऋतुकाल, संततिकाल, स्वप्नावस्था ह्यांचे नियम एकनेकास दशाधिकांतील दिलेल्या नियमांशीं बरेच मिळते आहेत.

१० नियम ४ प्रमाणें एका बालकाचे कुंडलींत कुंभ लग्न असून स्वामी शनि लग्नीं २६ अंशावर व अष्टमाधिपति बुध हा दशमांत वृश्चिक राशींत २४ अंशावर अशी जन्मसमयीं ग्रह स्थिति होती. केंद्रांत स्थिर राशी महिने दर्शवितात. ह्या ९० अंशाच्या अशुभ दृष्टींत २ अंशाचा फरक होता. दोन महिन्यानें मृत्यु पावून ह्या नियमाप्रमाणें हा बालक यमसदनीं गेला चंद्रही नियम ३ प्रमाणें मृत्युकालीं पापग्रहाच्या दृष्टींत होता.

गणेश दामोदर ग्रंथे.

पत्रव्यवहार

[१]

ज्यो. ना. सं. कुंडलीविज्ञानकर्ते यांसी—

कृ. सा. न. वि. वि. कुंडलीविज्ञानचे तारीख ११ एप्रिलचे अंकांत रा. कटककर यांनीं "अधिकमास" या मथळ्याखालीं मागील अंकांतील आमचे लेखास उत्तर ह्मणून प्रसिद्ध केलें आहे. अधिकमास होऊन गेला असल्या कारणानें त्या संबंधीं जास्त लिहिण्यांत अर्थ नाहीं. व रा. वासुदेवराव कटककरांनीं ज्या अर्थी आपल्या पत्रामध्यें गणित संबंधें मजकुराकडे दुर्लक्ष करून उत्तर देण्यास टाळाटाळी केली आहे, तेव्हां पुनः पुनः गणित संबंधीं मजकूर लिहून कटककरांच्या मेंदूस त्रास देणें योग्य वाटत नाहीं.

ज्ञानप्रकाशामध्यें त्यास सिद्धांतांचें अध्ययन करित आहेत असें लिहिलें असून आतां ग्रहलाघव शिकत आहेत असें मनास वाटेल तसें आह्मीं लिहिल्याचें त्यांनीं ध्वनित केलें आहे. ज्ञानप्रकाशामधील पत्रासंबंधें त्यांचा आमचा मतभेद नाहीं. त्यास आह्मीं ग्रहलाघवाचें अध्ययन करित आहेत असें लिहिलें आहे तें अपमान करण्याच्या हेतूनें लिहिलेलें नाहीं कारण ही गोष्ट आह्मीं कितीही गुप्त ठेविली तरी कटककरांचे लेख वाचणाऱ्या ज्यौतिष वाचकांचे लक्षांत आल्यावांचून ती थोडीच राहणार आहे? आतां ग्रहलाघव पुरा झाल्याचें तें लिहित असतील तर आह्मीं तसेंच लिहूं आणि केवळ लिहिण्यावरच त्यांचें ज्ञान अवलंबून असेल तर ते सांगतील त्या पद्ध्या त्यांचे इच्छे प्रमाणें नांवांचे बागें पुढें जोडून देण्यास आमची हरकत नाहीं.

रा० कटककर विचारतात कीं, पंचांगसभेमध्यें केतकर यांस अध्यक्षांनीं आक्षेपकांचें समाधान करण्यास सांगितलें त्यावेळीं केतकर माझी इच्छा नाहीं तेव्हांच आह्मीं कां बोललों नाहीं, ह्मणून प्रश्न केला आहे व आतां समाधान करण्याची इच्छा असल्यास प्रसिद्ध करावें ह्मणजे पुढील व्यवस्था कर

ध्यांत येईल असें लिहिलें आहे. ज्या दिवशीं ही हकीकत घडली तो दिवस २६ दिसंबर हा होता. या दिवशीं पंचांग सभेचें बैठकीस श्रीस्वामी आलेले होते. स्वामींस गुजराथी ज्योतिष्यांची फार आवड होती त्यामुळें दक्षिणी ज्योतिषी उठला असतां त्यांचे तोंडून 'बैठो, बैठो" असे उद्गार सहजगत्या निघाल्यावांचून राहत नसत परंतु जर तो गुजराथी असला तर श्रीस्वामीच्या आनंदास पारावार रहात नसे. "आव, पंडितजी, बोलो" वगैरे बोलत असत. सर्व लोकांस समजण्याकरितां हिंदी भाषेत बोलण्याचा एक नियम होता. परंतु त्या नियमांचा उद्देश विसरून जाऊन एखाद्या ज्योतिष्यास न्यायानें खालीं बसविण्याकडे त्याचा उपयोग होत असे. हें सर्व काम श्रीस्वामी स्वतः करित असत. (पुढें एकदां स्वामीच्या बंगल्यावर सभा भरली असतां त्यांनी आपल्या मदतीस एक तरवार बहादूर जमादारास घेतलें होतें त्यावेळीं कलकत्त्याकडील ३।४ बाबू व इतर कांहीं प्रतिष्ठित मंडळी उठून गेली होती) या दिवशीं सभेंत जी अव्यवस्था माजली होती त्यावरून सभेस "गोंधळ" म्हटलें असतां विशेष शोभलें असतें! या करणानें केतकर किंवा आम्ही कोणीही बोलण्यास उठलों नाहीं ही गोष्ट बऱ्याच वेळानें स्वामींच्या लक्षांत येऊन त्यांनीं केतकरांपैकीं कोणी मंडळी कां उठत नाहींत असा प्रश्न केला व केतकरांस विचारलें कीं तुमच्या ग्रंथावर कांहीं मंडळीचे आक्षेप आहेत तर तुम्हीं त्यांचें समाधान करण्यास तयार आहां काय? त्यावर ज्यो. शि. केतकर म्हणाले कीं मी शकतों परंतु येथें सांगण्याची माझी इच्छा नाहीं. नंतर स्वामी या संबंधें विशेष कांहीं बोलले नाहींत "असें बोलणाऱ्याचें कल्याण होणार नाहीं" वगैरे कांहीं आपणांशींच म्हणाले. केतकरांनीं सांगितलेलें शब्द श्रीं स्वामींस स्पष्ट रीतीनें समजतील असे असतां स्वामींस बोलणें फिरविण्याची कांहीं जरुरी होती काय? या गोष्टीवरून सभेमध्यें श्रीस्वामी कहून न्यायाधीशाचें काम किती

निःपक्षपातानें बजाविलें जात होतें याचा विचार वाचकांनी करावा. नंतर रावबहादूर गणेश कृष्ण आपटे सभेतील सभासद यांनीं सांगितलें "केतकर यांचें हें उत्तर सापेक्ष आहे त्याचा उद्देश असा दिसतो कीं सभेमध्यें कोणी बोलावें व कोणीं बोलूं नये हा निर्बंध नसल्यामुळें एक सब कमेटी नेमून तिचे मार्फत त्यांस प्रश्न करावें" हें त्यांचें म्हणणें चालू आसतांच रा. ब. वैद्य बोलावयास उठले त्यांनीं रा. ब. आपटे यांस आपण या गोष्टींत बोलूं नये असें सांतितलें! रा. ब. आपटे म्हणाले मीं मध्यस्थ परिषदेतील सभासद असल्यामुळें ही सूचना केली आहे तेव्हां आपण या गोष्टींत बोलूं नये. तुमच्या आमच्या तहामत भेद कशाला पाहिजे? पुनः रा. ब. वैद्य म्हणाले "तुम्हीं या गोष्टींत बोलूं नये." या नंतर हें बोलणें बराच वेळ चालून शेवटीं रा. ब. आपटे यांस खालीं बसावें लागलें."* श्री स्वामी या मंडळीचें भाषण स्वस्थपणें ऐकून घेत होते. ही संपूर्ण हकीगत कटककर यांस माहीत असूनही ते पुनः पुनः वरील प्रश्न विचारित असतात यांस काय म्हणावें? आतां कटककरांचे मनांत पुनः सभा भरविण्याची असेल तर त्यांत कोणते विद्वान येणार तें प्रसिद्ध करावें व सभेची तारीख ज्योतिःशिरो. केतकर हे सरकारी नोकर असल्याकारणानें त्यांचे सवलतीनें लावून सर्व व्यवस्था जुळविल्यास त्यांत आम्ही "आपला पक्ष समर्थन करण्यास तयार आहों'

---

* ही हकीकत लिहून सभेतील व्यक्तींचे दोष वाचकांपुढें आणण्याची माझी इच्छा नव्हती. परंतु रा० रा० कटककर हे पुनः पुनः तोंच प्रश्न विचारूं लागल्याकारणानें लोकांचा गैरसमज दूर करण्याकरितां झालेली हकीकत लिहिणें भाग पडत आहे.

रा. गं. माईणकर.

परंतु जर का वर लिहिल्याप्रमाणें पंचांगसभेंतील जात्याभिमान, पक्षपात व अव्यवस्था याचीच दुसरी आवृत्ति काढणें असेल तर ती गोष्ट आह्मांला बिलकूल मान्य नाहीं. पुणें येथील सभेची तारीख पूर्वी प्रसिद्ध झाली होती व कटकरांनीं सभेमध्यें "अधिक चैत्र ठरविला आहे." अशा अर्थाची जी तार पाठविली होती त्यावरून त्यांस ही माहीत असली पाहिजे. सभेंत रा. कटककरांनीं केलेलीं विधानें चुकीचीं ठरलीं असें आह्मी लिहिलें त्याबद्दल रा. कटककरांना संशय असेल तर कटककरीय विधानाचा मुख्य आधारस्तंभ जो इनमंडलांत पक्ष तो मान्य ठरला काय ? त्याच्या प्रतिपादनार्थ श. १७६३ मधील उदाहरण खोटेंच प्रसिद्ध करून क्षयमास आणण्याचा केलेला खटाटोप खरा ठरला काय ! या पैकीं एखादें तरी विधान खरें ठरावयास पाहिजे होतें ? तेव्हां स्वतःचें ह्मणणें खोटें ठरणें शक्य नाहीं या खात्रीवरच ते लिहित असतील तर त्यांनीं निर्णयाचा केसरी पुनः वाचून आपणास अनुकूल व प्रतिकूल काय यासंबंधें खात्री करून घ्यावी.

ता० १२ फेब्रुवारी १९०७ चे केसरींत अधिकमास निर्णय कलम. वारीनें प्रसिद्ध झाला आहे त्यावरून खालील मुद्दे निघतात. (१) हल्लींच्या प्रकरणीं ह्मणजे केवळ अधिकमास ठरविण्याकरितां इनमंडलांत पक्ष स्वीकारणें वाजवी नाहीं. (२) ग्रहलाघव गणित चूक आहे. केतकरांचें गणित शुद्ध आहे व ग्रहलाघवाहून भिन्न आहे. (३) केतकी अयनांश पंचांग सभेच्या ठरावास अनुसरून आहेत. (४) इनमंडळ पक्ष लावून केतकी संक्रांत फाल्गुनांत ओढून आणणें बरोबर नाहीं. (५) केतकी पंचांगाप्रमाणें येणारा फाल्गुन अधिकमास बरोबर आहे (या निर्णयामध्यें केतकी नेने व बापुदेव शास्त्री यांचीं पंचांगें शुद्ध पद्धतीचीं असल्याबद्दल लिहिलें आहे. त्यांपैकीं येथें फक्त केतकी पंचांगसंबंधें उतारा घेतला आहे) तेव्हां कटककरांस हा निर्णय केतकी पंचांगाविरुद्ध झाला असें मानण्यास काय आधार असेल तो असो. येथें

पंचमहाभूतमयस्तारागण
पंजरे महीगोलः ॥
खेऽयस्कांतांतःस्थो लोहइवा
वस्थितो वृतः ॥
मेरोः समोपरि वियत्यक्षो
व्योम्नि स्थितो ध्रुवोऽधोन्यः

तत्रनिबद्धो मरुता प्रवहेण
भ्राम्यते भगणः ॥
चंद्रादूर्ध्वं बुधसितरवि
कुंजजीवार्कजास्ततो भानि॥

स्पष्टीकरण.— विश्वाच्या मध्य भागीं पृथ्वी आहे. तिच्या भोंवतीं चंद्रादि फिरतात. त्यांचा क्रम चंद्र, बुध, शुक्र, रवि, मंगळ, गुरु, शनि आणि तारामंडळ असा आहे. नक्षत्रमंडळ फिरतें, तें ध्रुवद्वयबद्ध असें फिरतें. पृथ्वी गोल आहे. ती निराधार आहे. तिच्या भोंवती वायु आहे. त्यास भूवायु ह्मणतात. त्यावर आकाशांत प्रवहनामक वायु संचार करितो. त्याच्या प्रेरणेनें चंद्रादि तेजांस गति प्राप्त होते, आणि ते पृथ्वी भोंवतीं फिरतात असें आमच्या ज्योतिःशास्त्राचें मत आहे. परंतु ग्रहांसह सर्व तारामंडळ सुमारें एक दिवसांत पृथ्वीभोवतीं एक प्रदक्षिणा करितें, असें दिसतें. परंतु दैनंदिन गति वास्तविक नाहीं. पृथ्वीच्या दैनंदिन गतीमुळें ती भासते, असें जें आधुनिक मत त्याचप्रमाणें आपल्या ज्योतिष्यांपैकीं पहिल्या आर्यभट्टाचें मात्र मत आहे. इतर सर्वांचें मत नक्षत्रमंडळाची दैनंदिन गति वास्तविक आहे, असें आहे.

---

* पृथ्वी प्रत्यहीं आपल्या भोंवतीं फिरते, ह्मणजे हिला दैनंदिन गति आहे, असें मानण्यास ज्योतिषी आपल्या देशांत एक पहिला आर्य भट्ट होऊन गेला. त्याचें ह्मणणें —

अनुलोम गतिर्नौस्थः पश्यत्यचलं विलोमगं यद्वत् ॥
अचलानि भानि तद्वत् समपश्चिमगानि लंकायां

(गोलपाद)

पहिल्या आर्यभट्टानें नक्षत्रांची दैनंदिन गति वास्तविक नाहीं, असें मानिलें असल्यामुळें त्यास ग्रहांच्या प्राग्गतींबद्दल वर लिहिल्या प्रकारची कल्पना करावी लागली नाहीं. त्यानें ग्रहांस वास्तविकच पूर्वाभिमुख गति आहे, असें मानिलें आहे. ग्रहगतीविषयीं आणखी एक अशी कल्पना केलेली आहे कीं, सर्व ग्रहांची पूर्व गति त्यांच्या कक्षामंडळांत सारखीच आहे. परंतु ग्रहांचीं अंतरें पृथ्वीपासून सारखीं नसल्यामुळें जवळच्या ज्या कक्षांपेक्षां दूरच्या ज्या कक्षा मोठ्या आहेत; यामुळें आपल्या प्रत्ययास येणारी त्यांची प्राग्गति भिन्न भिन्न दिसते चंद्र फार जवळ असल्यामुळें त्याची गति सर्वांत जास्त आहे. आणि शनिकक्षा सर्व ग्रहांच्या बाहेर असल्यामुळें शनीची गति सर्वांत मंद आहे.

प्राग्गतयस्तुल्यजवा ग्रहास्तु सर्वे स्वमंडलगाः ॥
पर्येति शशी शीघ्रं स्वल्पं नक्षत्रमंडलमध्यस्थः ॥
उर्ध्वस्थस्तुल्यजवो विचरति महदर्कजो मंदं ॥

स्पष्टीकरण.— ग्रहाची सर्व नक्षत्रमंडळांत जी एक प्रदक्षिणा तिला भगण ह्मणतात. भगणास काल किती हें अनेक प्रदक्षिणांचे काल पाहून त्यावरून ठरविलें असलें पाहिजे हें उघड आहे. कल्पांत किंवा महायुगांत एकेका ग्रहाचे भगण किती होतात, हें गणित ग्रंथांत सांगितलें असतें. या काला वरून निघणारी व वरील श्लोकांत सांगितलेली गति प्रत्यहीं सारखीच असणार. तिला मध्यम गति ह्मणतात. परंतु प्रत्यक्ष दिसणारी एकेका ग्रहाची गति नेहमीं सारखीच नसते. इष्ट काळाची कोणत्याही ग्रहाची स्पष्ट स्थिति गणितानें काढणें ह्मणजे कोणत्याही वेळीं तो ग्रह आकाशांत कोठें असेल हें काढणें. हा आमच्या ज्योतिःशास्त्राच्या गणितस्कंधाचा प्रधान विषय होय.

सांप्रतचें अधुनिक मत — सूर्य चंद्र आणि तारा पूर्वेस उगवतात, पश्चिमेस मावळतात. पुनः दुसरे दिवशीं पूर्वेस उगवतात. याप्रमाणें

ल्या पृथ्वीभोंवतीं प्रदक्षिणा करितां असें दिसतें. परंतु ही त्यांची दैनंदिन गति वास्तविक नव्हे, तीं भासमान होय. पृथ्वी स्वतःभोंवतीं पश्चिमेकडून पूर्वेकडून फिरते, ह्यामुळें ही गति भासते. पृथ्वी ज्या कल्पित रेषेवर स्वतः भोंवती फिरते त्या रेषेस आंस अथवा अक्ष ह्मणतात. आणि त्याच्या टोकांस ध्रुव ह्मणतात. पृथ्वीचा आंस वाढविला असतां तोच आकाशाचा आंस होतो. आकाशाच्या आंसाचीं जीं टोकें ते आकाशाचे ध्रुव होत. हे अर्थात् पृथ्वीच्या ध्रुवासमोर असतात. दक्षिणोत्तर ध्रुव सांधणाऱ्या रेषेभोंवतीं अर्थात् ध्रुवाभोंवतीं सर्व भचक्र फिरतेंसें दिसतें.

आपल्या भोंवतीं दूरवर पाहिलें असतां आकाश जमिनीला लागलेलें दिसतें. पृथ्वी आणि आकाश यांच्या स्पर्शानें झालेलें जें वर्तुळ दिसतें तें क्षितिज होय. आपल्या डोक्यासमोर आकाशाचा जो बिंदु असतो त्यास खस्वस्तिक ह्मणतात आपणास आकाश दिसतें, तें अर्ध्या गोलाच्या कवचासारखें दिसतें खस्वस्तिक हा त्या कवचांतील मध्यबिंदु होय. आपली पृथ्वी गोल आहे. जमिनींतून भिंगासारखें आर पार दिसतें तर आपणाला खालच्या बाजूकडील आकाश दिसलें असतें. सूर्य, चंद्र आणि नक्षत्रें जितका वेळ आपणांस दिसतात, तितका वेळ बहुधा तीं त्या आकाशांत असतात, ह्मणून तें कल्पनाचक्षूनीं पाहिलें पाहिजे. त्यांतला अगदीं खालचा जो बिंदु त्यास अधःस्वस्तिक ह्मणतात. पृथ्वीच्या पाठीवर तिच्या भोंवतीं दोन्ही ध्रुवांतून सारख्या अंतरावर जें पूर्व पश्चिम वर्तुळ कल्पितात, त्यास विषुववृत्त ह्मणतात. ज्या कालीं रात्र आणि दिवस समान असतात त्या कालास विषुवकाल ह्मणतात. विषुववृत्तावर जीं स्थानें आहेत त्यांस रात्र आणि दिवस हीं सर्वदा सारखीं असतात ह्मणून या वृत्तास विषुववृत्त असें नांव पडलें आहे पृथ्वीवरच्या विषुववृत्ताची पातळी वाढविली ह्मणजे ती आकाशास जेथें छेदील तें आकाशाचें विषुववृत्त होय. पृथ्वीवर विषुववृत्तापासून उत्तरेकडील किंवा दक्षिणेकडील स्थानाचें जें अंतर त्यास अक्षांश ह्मणतात.

त्याप्रमाणें आकाशांत विषुववृत्तापासून तारांचें जें उत्तरदक्षिण अंतर त्यास क्रांति ह्मणतात. विषुववृत्तावर लंब होऊन दोन्ही ध्रुवांतून जाणारीं जीं अनेक वृत्तें कल्पितात त्यांस याम्योतरवृत्तें ह्मणतात. पृथ्वीवर जसें एका मुख्य याम्योत्तर वृत्तापासून पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे जें अंतर त्यास रेखांतर, रेखांश किंवा देशांतर ह्मणतात. त्याप्रमाणेंच आकाशांत एक मुख्य याम्योत्तरवृत्त मानिलें आहे. त्यापासून पूर्वेस मोजिलेलें तारेचें जें अंतर त्यास विषुवांश ह्मणतात सूर्य एका नक्षत्रीं आल्यापासून पुनः त्याच स्थानीं येईपर्यंत जो काळ जातो तें नक्षत्र सौर वर्ष होय. विषुववृत्त आणि क्रांतिवृत्त यांचा छेद दोन ठिकाणीं होतो, त्या बिंदूस संपात किंवा क्रांतिपात [illegible] ह्मणतात. सूर्य ज्या संपातीं आल्यावर विषुवाच्या उत्तरेस जातो त्यावेळीं वसंतऋतु असतो. त्या संपतास मेषसंपात किंवा वसंत संपात ह्मणतात. संपातास गति आहे कारण—

तस्य [विषुव त्क्रांतिवलयपातस्य] अपि चलनमस्ति येऽयनचनभागा प्रसिद्धास्त एव विलोमगस्य क्रांतिपातस्य भागाः (भास्कराचार्यः)

यावरून भास्कराचार्यांनीं या चलनास संपातचलन असें ह्मटलें आहे. सांप्रत युरोपियन विद्वान् ह्यांस विषुवचलन असें ह्मणतात. असो. संपातापासून सूर्य निघाल्यावर पुनः संपातीं येण्यास जो काळ लागतो तें सांपातिक सौरवर्ष होय. यालाच आर्तववर्ष आणि सायन वर्ष अशा संज्ञा आहेत.

विषुव, अयन, क्रांतिवृत्त, राशि, नक्षत्र, अक्षांश, रेखांश व याम्योत्तरवृत्तें वगैरे यांची उत्पत्ति कशी आहे, हें वरील स्पष्टीकरणावरून कळलेंच असेल. यापुढें आह्मीं तारतम्य दृष्टीनें ज्या ज्या गोष्टी प्रतिपादन करणार आहोंत, त्यांत विशेष तत्व काय आहे हें जितक्या रीतीनें सांगतां येणें शक्य आहे तितक्या रीतीनें त्याचें प्रतिबिंब वाचकांच्या मनावर उमटेल अशा दृष्टीनें प्रयत्न करावयाचा आहे.

एवढी गोष्ट लक्ष्यांत घेण्यासारखी आहे कीं पक्षभेदानें चैत्र अधिक मास बरोबर आहे, असा ठरला तो ग्रहलाघवगणितानें किंवा सूर्य सिद्धांतानें अधिक चैत्र येतो ह्मणून ठरलेला नाहीं किंवा त्यास इनमंडल पक्षही आधार धरलेला नाहीं. अस्तु

रा. कटककरांनीं तटस्थाचे पत्रास उत्तर दिलें नाहीं त्याचें जें कारण दिलें आहे तें वाचून आश्चर्य वाटतें! "तटस्थाचें पत्र केतकी गणिताप्रमाणें आहे ह्मणून आह्मीं त्यास उत्तर दिलें नाहीं" हें उत्तर योग्य काय? कटककरांनीं हें उत्तर देतांना श्री. केतकरांचे ३ ग्रंथांपैकीं कोणत्या तरी ग्रंथावरून तटस्थानें दिलेलें आंकडे सिद्ध होतात काय याचा विचार करावयास पाहिजे होता. बरें ते ह्मणतात त्याप्रमाणें गणित केतकी गणिताप्रमाणें आहे असें मानिलें तरीही त्यावर उत्तर देणें हें कटककरांचें कर्तव्य होतें तटस्थाचें पत्र पुणें येथील सभेपूर्वी श्री वेंकटेशसमाचारमध्यें छापललें असतां इतके दिवस उत्तर देण्यास सवड असून कटककर कां स्वस्थ राहिले? जर त्यांना तटस्थाचे पत्रास व कुंडलीविज्ञानमधील लेखास उत्तर द्यावयाचें असेल तर अद्यापिही प्रसिद्ध करावें व आपला पक्ष समर्थन करून विजयी व्हावें. या गोष्टींत आह्मांस आनंद आहे. उगीच इंदुप्रकाश किंवा नेटिवओपिनियनकडे बोट दाखविण्यांत कांहीं अर्थ नाहीं अशा रीतीनें वाचक फसले जाणार नाहींत. या उपर त्यांस आपलें ह्मणणें गणितदृष्ट्या सप्रमाण सिद्ध करतां येईपर्यंत वाटेल तितकी कटकट केली व दुसऱ्यांचे लेखास कुत्सित दूषणें देण्यांत आपली बुद्धिमत्ता खर्च करून ज्यांत लोकोपयोगी भाग बिलकुल नाहीं असे लेख प्रसिद्ध केले तरी त्यांस उत्तर दिलें जाणार नाहीं.

पत्रकर्ते महाराज, वादाच्या दोन्ही बाजू वाचकांस समजणें इष्ट असल्यावरून हा मजकूर आपणांकडे पाठवीत आहे. तरी याला स्थळ देण्याची कृपा कराल अशी आशा करितों कळावें लोभ असावा ही विनंति.

आपला.

रामकृष्ण गंगाधरशास्त्री
माईणकर खारेपाटण

२

प्रसिद्ध पुरुष.

मल्हारराव गायकवाड



फत्तेसिंग गायकवाड



दमाजी गायकवाड

गोपाळराव मैराळ

वरील कुंडल्या निरयन आहेत.

गोपाळ जगन्नाथ जोशी.

३

विवाहकाल

ही एका मुलीची कुंडली आहे. हिचें लग्न यंदा होईल कीं नाहीं, याचा विचार करायाचा आहे. ता. २ एप्रिल ते १४ अकटंबरपर्यंत मंगळ मकर राशींत आहे. गुरु हा कुटुंबेश आहे. तो एप्रिल मध्यें मिथुनेसच आहे व तो जुलईत कर्केचा होतो (?) जायापति शुक्र मे पासून जुलईपर्यंत वृषभ व नंतर मिथुनेंत येतो. एप्रिलमध्यें विवाह मुहूर्तच नाही तर लग्न कोठून होणार ?

मे मध्यें ता. २४ पर्यंत बुध वृषभ राशींत आहे व ता. २३पर्यंत शुक्र मेषेंत आहे. वृषभेचा बुध जन्मस्थ बुधाच्या व्यय स्थानीं येतो. आणि मेष राशीचा शुक्र हा जन्मस्थ शुक्राच्या गृहीं येतो. नंतर शुक्र हा वृषभ राशींत सप्तम स्थानीं व जन्मस्थ चंद्राच्या कुटुंबस्थानीं येतो. मिथुनेचा बुध हा जन्मस्थ बुधगृहीं येतो. तात्पर्य, सर्व महिना विवाहास अनुकूलच आहे. ता. २३–२५–२७ मे हे तीन दिवस निश्चित होतात.

ही कुंडली एका मुलाची आहे. ती वरील कुंडलीशीं जुळते किंवा नाहीं तें पाहूं.

१ मुलाच्या सप्तमांत जो राशि आहे तो मुलीच्या लग्नीं आहे.

२ मुलाचा सप्तमेश मंगळ मुलीच्या चतुर्थ स्थानीं आहे. व मुलीचा सप्तमेश शुक्र मुलाच्या चतुर्थ स्थानीं आहे.

३ मुलाचा लग्नेश शुक्र हा मुलीच्या षष्ठस्थानीं व मुलीचा लग्नेश मंगळ हा मुलाच्या षष्ठस्थानीं आहे.

४ मुलाच्या चंद्राच्या सप्तमांत कन्येचा बुध व कन्येच्या सप्तम स्थानीं मुलाचा चंद्र आहे.

५ मुलाचा कुटुंबाधिपति मुलाच्या अष्टमांत व मुलीचा कुटुंबाधिपति मुलाच्या अष्टमांत आहे.

६ उभयतांच्या पंचमांत एकच

ग्रह आहे.

वरील योगावरून हा विवाह जुळेल असें ठरतें. त्याप्रमाणे जुळलाही होता. परंतु हुंड्यांत बांधा पडल्यामुळें तूर्त फिसकटल्यासारखें झालें आहे.

शंकर रामचंद्र प्रधान.

* अनुमानाप्रमाणें लग्न जुळलें कीं नाहीं, समजलें नाहीं. वधूवरांचे योग जुळते आहेत कीं नाहींत' हें पहतां आलें. परंतु ग्रहस्थिति जुळवितांना सायन निरयनचा घोटाळा केला आहे. स्पष्टग्रहांचें पुस्तक सायन आहे व कुंडल्या निरयन आहेत. त्याचप्रमाणें आरंभीं संगळाबद्दल सांगितलें आहे तें सायनास अनुसरून आहे व गुरूबद्दल सांगतांना निरयन गुरूचा उपयोग केला आहे, असा घोटाळा झाल्यामुळें अनुमान चुकणार हें उघड आहे.

संपादक 'कुं. वि.'

४

पुत्रकन्यादि गर्भस्वरूप

[पुस्तक ७ अंक २ वरून]

सायन आणि निरयन या दोन पक्षांमध्यें ऐतिहासिक, तार्किक धर्मशास्त्र व व्यवहार या प्रकारच्या दृष्टींनीं विचार केला असतां त्यांतून जें मत निःपक्षपातानें प्रतिपादन केलें जाईल त्यांतच शास्त्रीय तत्व असलें पाहिजे, यांत शंका नाहीं. ह्मणून आह्मीं ज्या ज्या गोष्टींचें प्रतिपादन ज्या ज्या स्वरूपांत करणार आहोंत तें स्वरूप चार दृष्टींनीं वाचकापुढें दृग्गोचर होणार आहे, हें निराळें सांगणें नकोच.

या ब्रह्मांडांत पृथ्वी, चंद्र, सूर्य इत्यादिकांचीं स्थिति कोठें कशी आहे, त्यांस गति कशी प्राप्त होते, ती कोणत्या प्रकारची असते इ० गोष्टीविषयीं सामान्य वर्णन ज्योतिष ग्रंथांत ज्या प्रकरणांत असतें त्यास भुवनसंस्था, जगत्संस्था, भुवनकोश अशा अर्थाची नांवें निरनिराळ्या ग्रंथांत दिलेलीं आहेत.

पुत्रकन्यादिगर्भस्वरूप.

[पुस्तक ७ अंक ११ वरून]

अंशपरिज्ञान आणि क्रांतिवृत्त यांत जे जे नियम सांगितले आहेत. ते ते आपण अवलोकन केलेच असतील यांत शंका नाहीं. मागील प्रकरणामध्यें अंश परिज्ञानाचें जें परिशीलन केलें आहे तें निरयन मताचें आहे. हें निराळें सांगणें नकोच. आज तीच निरयन कुंडली सायन करून त्यामध्यें अंशपरिज्ञानाचे कसकसे विवक्षित विभाग पडतात याबद्दल विचार करावयाचा आहे. आणि नंतर निरयन कुंडलीचे अंश आणि सायन कुंडलीचे अंश यामध्यें तारतम्यभाव काय आहे, याबद्दल सूक्ष्म विचार व्यक्त होणार आहे. वे. शा. रा. रा. विष्णु गोपाळ नवाथे कुंडलीविज्ञानकर्ते यांनीं वारंवार आपल्या पुस्तकामध्यें स्थळ दिलें याबद्दल आह्मी त्यांचें मोठ्या नम्रतेनें अभिनंदन करित आहोंत त्यांच्याच सुलभजातकाच्या मध्यम नाक्षत्रकालावरून सायन कुंडलींतील द्वादशभावसाधन केलें आहे. आणि ज्योतिर्मालाकर्ते जीवन त्रिंबक चिटणीस यांच्या ग्रहसाधन पुस्तकावरून ग्रह सिद्ध केले आहेत.

सायन कुंडली

द्वादशभाव

त	ध	स	सु	सु	रि	जा	मृ	ध	क	आ	व्य
७	८	९	१०	११	०	१	२	३	४	५	६
१६	१५	१६	१८	२०	२०	१६	१५	१६	१८	२०	२०

सायनस्पष्ट

सू.	चं.	मं.	बु	गु	शु	श	रा	के
५	९	४	४	३	६	११	४	११
६	१९	२१	२४	७	२१	८	९	९

सायन लग्न

स्पष्टीकरण— वृश्चिक राशीचे १४ अंश आणि धन राशीचे १५ अंश मिळून तनुभाव सिद्ध झाला आहे. अर्थात् मंगळाचें स्वामित्व १२ अंशापर्यंत असून नंतर १५ अंशापर्यंत गुरूचें आहे ह्मणून तनुभावामध्यें अंशपरत्वें मंगळ आणि गुरु हे दोन स्वामी होतात

धन राशीचें १५ अंश आणि मकर राशीचे १६ अंश मिळून धन भाव सिद्ध झाला आहे. अर्थात् गुरूचें स्वामित्व १५ अंश पर्यंत असून नंतर १६ अंशपर्यंत शनीचें आहे ह्मणून धन भावामध्यें अंशपरत्वें गुरु आणि शनि हे दोन स्वामी होतात.

मकर राशीचे १४ अंश आणि कुंभराशीचे १८ अंश मिळून सहज भावसिद्ध झाला आहे. अर्थात् मकरेच्या शनीचे १४ अंश पर्यंत स्वामित्व असून नंतर कुंभराशीच्या शनीचे १८ अंश पर्यंत आहे. अर्थात् या दोन सम आणि विषम राशींचें स्वामित्व शनीकडेच आहे.

कुंभ राशीचे १२ अंश आणि मीन राशीचे २० अंश मिळून सुख भाव सिद्ध झाला आहे. अर्थात् १२ अंशपर्यंत शनीचें स्वामीत्व असून नंतर २० अंशपर्यंत गुरूचें आहे ह्मणून सुखभावामध्यें अंशपरत्वें शनि व गुरु स्वामी होतात.

मीन राशीचे १० अंश आणि मेष राशीचे २० अंश मिळून सुतभाव सिद्ध झाला आहे. अर्थात् १० अंशपर्यंत गुरूचें स्वामित्व असून नंतर २० अंशपर्यंत मंगळाचें आहे. ह्मणून पुत्रभावामध्यें अंशपरत्वें गुरु

आणि मंगळ हे दोन स्वामी होतात

मेष राशीचे १० अंश आणि वृषभ राशीचे १६ अंश मिळून रिपुभाव सिद्ध झाला आहे. अर्थात् मंगळाचें स्वामित्व १० अंशपर्यंत असून नंतर शुक्राचें स्वामित्व १६ अंशपर्यंत आहे. ह्मणून रिपु भावामध्यें अंशपरत्वें मंगळ आणि शुक्र हे दोन स्वामी होतात.

वृषभ राशीचे १४ अंश आणि मिथुन राशीचे १५ अंश मिळून जायाभाव सिद्ध झाला आहे. अर्थात् १४ अंशपर्यंत शुक्राचें स्वामित्व असून नंतर १५ अंशपर्यंत बुधाचें आहे ह्मणून अंशपरत्वें जाया भावामध्यें शुक्र आणि बुध हे दोन स्वामी होतात.

मिथुन राशीचे १५ अंश आणि कर्क राशीचे १६ अंश मिळून मृतिभाव सिद्ध झाला आहे. अर्थात् बुधाचें स्वामित्व १५ अंशपर्यंत असून नंतर १६ अंशपर्यंत [illegible] द्राचें आहे. ह्मणून मृतिभावामध्ये अंशपरत्वें बुध आणि चंद्र हे दोन स्वामी होतात.

कर्क राशीचे १४ अंश व सिंह राशीचे १८ अंश मिळून भाग्य भाव सिद्ध झाला आहे, अर्थात् चंद्राचें १४ अंशपर्यंत स्वामित्व असून नंतर सूर्याचें १८ अंश पर्यंत आहे. ह्मणून भाग्यभावामध्यें अंशपरत्वें चंद्र आणि सूर्य हे दोन स्वामी होतात.

सिंह राशीचे १२ अंश आणि कन्या राशीचे २० अंश पर्यंत कर्मभाव सिद्ध झाला आहे. अर्थात् १२ अंश पर्यंत सूर्याचें स्वामीत्व असून नंतर २० अंशपर्यंत बुधाचें आहे. ह्मणून कर्मभावामध्यें अंशपरत्वें सूर्य आणि बुध हे दोन स्वामी होतात.

कन्या राशीचे १० अंश आणि तूळ राशीचे २० अंश मिळून लाभभाव सिद्ध झाला आहे. अर्थात् १० अंशपर्यंतचें बुधाचें स्वामीत्व नंतर २० अंशपर्यंत शुक्राचें आहे. ह्मणून आयभावामध्यें अंशपरत्वें बुध आणि शुक्र हे [illegible] स्वामी होतात.

[illegible] राशीचे १० अंश आणि [illegible] राशीचे १६ अंश मिळून [illegible] सिद्ध झाला आहे. अर्थात् १० अंशपर्यंत शुक्राचें स्वामीत्व

असून नंतर १६ अंशपर्यंत मंगळाचें आहे ह्मणून अंशपरत्वें व्ययभावामध्यें शुक्र आणि मंगळ हे स्वामी होतात.

सायन कुंडलीच्या द्वादशभावांत क्रांतिवृत्ताचे कसकसे विवक्षित विभाग पडतात, याचें दिग्दर्शन सामान्य रीतीनें व्यक्त केलेंच आहे. आणि निरयन कुंडलींत क्रांतिवृत्ताचे कसकसे विवक्षित विभाग पडले आहेत, याचें स्पष्टीकरण मागील प्रकरणांत केलेंच आहे. परंतु हेही नियम स्थूल होत. यांत असंख्य भेद आहेत. ते फारच सूक्ष्म आहेत. ह्मणून त्याचें वर्णन योग्य स्थलीं क्रमानें येईलच

तारामंडळामध्यें असंख्य तेजस्वी रमणीय, तारे आहेत. परंतु पुष्कळ आचार्यांनीं त्यांत दहाच तारे मुख्य आहेत, असें मानिलें आहे. आणि त्या ताऱ्यांचा मनुष्यांच्या जीविताशीं संबंध आहे असें ठिकठिकाणीं प्रतिपादन केलें आहे अर्थात् शक्तिरूपी ज्योतिःपदार्थ आणि अदृश्य जे तारे त्यांस ग्रहही संज्ञा आहे. त्यांचा क्रम लग्न, सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, आणि शनि असा आहे. राहु आणि केतु हे ग्रह छिद्र आहेत.

जन्मलग्न ह्मणजे जन्मकालीं जी रास असेल ह्मणजे उदय पावत असेल ती. लग्नकुंडली जन्मनीवर लंबसंस्थ क्रांतिवृत्ताच्या पातळींत धरावी. लग्न पूर्व बाजूस आणि सातवें स्थान पश्चिम बाजूस धरावे ह्मणजे तीच इष्टकाळाची आकाशांतील ग्रहस्थिति होते. त्यांत वरचें अर्ध उदय पावलेलें आणि खालचें अर्ध अस्त पावलेले दहावें स्थान खमध्य आणि चवथें हें अगदीं खालचें ह्मणजे पाताळातलें स्थान होय. ग्रहास त्यांच्या गतीवरून प्राणिमात्रावर अधिकार चालविण्याचें सामर्थ्य खालील नियमावरून सिद्ध होतें. ग्रहास उच्च क्षेत्र, नीचक्षेत्र, स्वक्षेत्र, मूलक्षेत्र, शत्रुक्षेत्र, मित्रक्षेत्र, उपचयक्षेत्र, अनउपचयक्षेत्र, केंद्रक्षेत्र, फणफरक्षेत्र आपोक्लिमक्षेत्र, अधिमित्रक्षेत्र, अधिशत्रुक्षेत्र, अधिसमक्षेत्र,

पत्रव्यवहार

(१)

रा० रा० कुंडलीविज्ञानकर्ते यांस—

वि० वि०—पुढील मजकूर योग्य वाटल्यास दाशाहिकांत छापाल अशी आशा आहे.

चालू महिना नागपुरला फारच अनिष्ट दिसतो. कारण, येथें खालीं लिहिलेले अपघात झाले.

ता० ७ ला सायंकाळीं ६ वाजतां नागपूरच्या पश्चिमेकडील तलावांत एक मुलगा बुडून मेला.

ता० ९ ला १०–११ चे सुमारास दुसरा एक इसम वरील तळ्यांत बुडून मेला.

ता० १२ ला रात्रीं शहराच्या पश्चिमेकडील भागांत एका गृहस्थाचे घरास आग लागून बरीच हानि झाली. एक घोडा, गाय, ह्मैस आगींत जळून मेलीं.

ता० १६ ला नागपूर शहराच्या पश्चिमेस असलेल्या बर्फाचे गिरणीस रात्रीं ११ वाजतां आग लागली. बरीच नुकसानी झाली.

ता० १९ ही नागपूरला फारच अनर्थकारक गेली. या दिवशीं वरील बर्फीचे गिरणींत ईथरचा स्फोट होऊन १४ मनुष्यें जळालीं! पैकीं आतां पर्यंत १२ मेलीं. हा अपघात सकाळीं ९। वाजतां झाला. याच दिवशीं आणखी घडलेल्या गोष्टी—

(१) नागपूरच्या उत्तरेस ९ मैल असलेल्या कामटी स्टेशन गुड्सट्रेनचा ड्रायव्हर गाडीखालीं सांपडून मेला.

(२) दक्षिणेकडील बोरी स्टेशनवर एका ट्रेनला अपघात झाला.

(३) रात्रीं शहरांत पावसानें एक घर पडून ७।८ असामी आंत

सांपडून मेले.

(४) रात्रीं एका बाईला वरील बर्फाचे गिरणीजवळ अपघात झाला.

गिरणीचे अपघातांत सांपडून मेलेल्यांपैकीं दोघांच्या कुंडल्या मिळाल्या आहेत. त्या अशा.—

(१) जन्म—शके १८०८ पौ. शु. ११
बुधवार सू. अ. नं. घ. १४–१६

निरयन

मृत्यु—ता. १९ जून १९०७ बुधवार सायं. ६॥ वाजतां

[२] जन्म—शके १८०९ मार्गशीर्ष शु. १४ इ. घ. ९–१७

निरयन



धोंडो गंगाधर कौशिकर

* नागपूरचा रास तूळ मानावी, म्हणजे ग्रहस्थिति जुळेल. पाठविलेल्या दोन कुंडल्यांपैकीं दुसरी कुंडली चुकीची आहे. तींत वेळ बरोबर नसून ग्रहही चुकीचे लिहिलेले आहेत. पहिली कुंडली सायन केल्यास अशी होते.—

सायन

या कुंडलींत लग्नीं हर्शल आहे. म्हणून अकस्मात् भयंकर संकट उत्पन्न होऊन मृत्यु व्हावयाचा. अकस्मात् आणि विलक्षण हे दोन धर्म हर्शलचे आहेत. चतुर्थस्थानीं शत्रुक्षेत्रीं रवि असून समोर दशमांत शनि आहे. व चंद्र अष्टमस्थानीं मंगळाच्या दृष्टींत आहे. हे योग अपघातानें मृत्यु दर्शवितात. मरणकाळीं हर्शल हा मंगळासह चतुर्थ स्थानीं होता! व शनि षष्ठस्थानांतून चंद्राला पाहत होता. मृत्युकालीं चंद्र तनुस्थानीं हर्शलजवळ शत्रुगृहीं होता.

'ए. कुं. वि.'

(२)

अनुभविक नियम

१ जन्मकुंडलींत २।१० या स्थानांत पाप ग्रह निर्बली असल्यास द्रव्यस्थिति गरिबीची असते.

२ रवि व मंगळ हे उष्ण ग्रह आहेत. पावसाळ्यांत जेव्हां चंद्र यांच्या दृष्टींत किंवा जवळ येतो त्या दिवशीं उष्मा फार होऊन पाऊस पडतो.

३ प्रश्नकाळीं जेव्हां अनेक लोक एकाच वेळीं प्रश्न करितात, तेव्हां प्रत्येकाच्या प्रत्येक प्रश्नाचा विचार एकाच वेळीं कसा करावा हें ग्रंथांतरीं सांगितलेलें नाहीं. जोशी लोक सर्वांच्या प्रश्नांचा विचार एकाच काळीं प्रश्नलग्नावरून व प्रश्नकुंडलीच्या नवमांश कुंडलीवरून करितात. ही रीति उद्योगधंद्याची आहे. प्रश्न करणारांच्या जन्मलग्न कुंडलिवरून स्थानपरत्वें विचार करून उत्तर दिल्यास चूक होत नाहीं.

४ ज्या जातींत पाटाच्या लग्नाची चाल आहे अशा लोकांच्या कुंडल्यांत सावत्र बापाचे नियम दत्तकयोगांच्या नियमांशीं जुळतात.

५ आर्य ज्योतिषांत शुक्र हा स्त्रीसुखाचा कारक आहे. इंग्रज लोक स्त्रीसुखाचा विचार करितांना चंद्रही विचारांत घेतात.

६ द्रव्ययोग पाहतांना जन्म कुंडलींत आपण गुरुचंद्र ९।५, ३।११ पाहतों. त्याप्रमाणें रविचंद्रही असावे. कारण ते तसे नसतील तर त्या मनुष्यास द्रव्याच्या फायद्याच्या किंवा कर्जाच्या कामांत फार त्रास होतो, असें सफेलच्या पुस्तकांत आहे. वरील प्रमाणें ९।५, ३।११ असे रविचंद्र असल्यास द्रव्याच्या व धंद्याच्या भरभराटीस व यशास हे योग कारण होतात.

७ पतीच्या कुंडलींत द्विस्वभाव राशींत बरेच ग्रह असल्यास, विशेषेंकरून रवि, चंद्र व शुक्र असल्यास तो पत्नीचा त्याग करितो. एका पतीच्या कुंडलींत असा योग होता. त्यानें स्वस्त्रीस १।२ वेळां टाकून दिलें होतें.

८ चर राशि व त्यांतील ग्रह हे मनुष्यास बराच परिणाम करितात. असे ग्रह नशीब वाढण्यास लवकर कारण होतात. द्विस्वभाव राशि किंवा त्या राशींतील ग्रह फार उशिरां भाग्योदय करितात

९ पाश्चात्य ज्योतिषी सप्तम स्थानावरून उघड शत्रूंचा विचार करितात व व्ययस्थानावरून गुप्त शत्रूचा विचार करितात. कुंडलींत व्यय स्थानांत पापग्रह असल्यास गुप्त शत्रु बरेच होतात, असा अनुभव आहे.

१० आर्यज्योतिषांत मित्राचा विचार ४ थे स्थानावरून करितात. व इंग्लिश ज्योतिषी कुंडलींत ११ वे स्थानावरून करितात. ह्याचा अनुभव अजून घेणें आहे.

ग. दा. ग्रंथे.

३

वि. बि. आपणाकडे एक दांपत्ययोगाची कुंडली प्रसिद्धीसाठीं पाठविली आहे. मीं आपला एक वर्गणीदार आहें. आपण चालू सालीं जे वर्षफल तयार करून दिलें त्यांतील प्रश्न १।२ हे विवाहसंबंधी होते. ते अगदीं बरोबर जुळले. त्याच दोन कुंडल्या पाठविल्या आहेत.

वर	वधू
जन्म—ता. १३ जून १८८१	जन्म—ता. २२ सप्. १८९७
२ वाजून १९ मि.	घ. ३४ प. १०
सायन	सायन



यांचा विवाह ता. ४ माहे जून सन १९०७ रोजीं गोरज मुहूर्तीं झाला. या वेळीं धनु लग्न होतें. हा राशि वराच्या कुंडलींत त्याचा लग्नस्वामी जो बुध त्याच्या सप्तमांत आहे, आणि वधूच्या कुंडलींत कुटुंबस्थानाच्या सप्तमांत आहे.

दांपत्ययोग

[१] उभयतांचा चंद्र एकाच राशींत आहे
[२] वधूचें लग्न आणि वराचा शुक्र यांचा राशि एकच आहे.
[३] वराचा लग्नस्वामी व वधूचा कुटुंबस्वामी एकच आहे.
[४] वधूचा लग्नस्वामी व वराचा कुटुंबस्वामी एकच आहे.
[५] वधूचें सप्तम व वराच्या शुक्राचें सप्तम एकच आहे.

[६] वराचा लग्नस्वामी बुध हा वधूच्या कुंडलींत ज्या राशींत आहे, त्याच राशींत वराचें लग्न आहे.

[७] वराचा लग्नस्वामी बुध व जायास्वामी गुरु हे दोन्ही ग्रह वधूच्या कुंडलींत एकत्र आहेत.

[८]वराचा सप्तमेश गुरु हा वराच्या कुंडलींत ज्या राशींत आहे, त्या राशींत वधूचें लग्न आहे. व वधूचा सप्तमेश वधूच्या ज्या राशींत आहे, त्या राशींत वराचें कुटुंबस्थान आहे.

[९] वधूच्या सप्तमांत शनि आणि हर्शल हे ग्रह आहेत. यांपैकीं हर्शल हा वराच्या लग्नीं आहे. व शनि वधूच्या लग्नीं जो राशि आहे त्याच राशींत वराच्या कुंडलींत आहे.

[१०] उभयतांचे मंगळ एकमेकांच्या सप्तमस्थानीं आहेत.

[११] वराचा सप्तमेश गुरु असून वधूचा सप्तमेश मंगळ आहे. हे ग्रह उभयतांच्या कुंडल्यांत एकमेकांच्या कुटुंबस्थानीं आहेत !

यांचा विवाह ज्या दिवशीं झाला त्या दिवशीं चंद्र मीनेंत होता. ह्मणजे वराच्या सप्तमांत होता. वधूचा लग्नस्वामी शुक्र वधूच्या लग्नीं आला असून कुटुंबस्वामी बुध हा कुटुंबस्थानीं आला आहे. हेच ग्रह वराच्या कुंडलींत जन्मकालीं जसे होते, तसेच आले आहेत. उभयतांना गुरु चंद्राला १२ वा होता ! परंतु त्याच्या समोरच्या राशींत मंगळ होता. ह्मणजे उभयतांचे सप्तमेश परस्पर सप्तम असे होते !

कळावें.—

सदाशिव रामचंद्र बंदिष्टे.
महागांव

४

वि. वि. आजरोजीं एक 'मेक्यानिकल एन्जीनियरची' कुंडली प्रसिद्धीसाठीं पाठवित आहें. तिला आपल्या अमूल्य पुस्तकांत जागा मिळेल अशी आशा आहे.

जन्म–श. १७८९ चै. व ९ सू.
सं. घ. ५७ प. ४१

निरयन



सायन



यंत्रशास्त्रांत यांची बुद्धिमत्ता विशेष चालते. आपल्या बुद्धिसामर्थ्यानें या गृहस्थांनीं अनेक नवीन व अद्भुत यंत्रें शोधून काढिलीं आहेत. यांनीं इंग्लंडांत वास्तव्य केलें आहे. स्त्रिया २ पहिली मृत वाडिलांचें सुख कमी. मातृसुख बरेंच. मुलगे २. पूर्वी "मेसमेरीझम" सारखे खेळ करीत असत. शरीराचा वर्ण गोरा. कळावें.

परशराम रघुनाथ गुप्ते.
बडोदें

* सदरहु हकीकतीवरून ही कुंडली कोणाची असावी, हें वर्तमान पत्रें वाचणाऱ्या चाणाक्ष वाचकांच्या ध्यानांत येईल. आमचें अनुमान खरें असेल तर ती कुंडली चुकीची आहे. जन्मकाल पूर्वी ३घ. तरी येतो ती कुंडली अशी.—

पंचमांतील कर्क राशीचा हर्शल व द्वितीय स्थानांतील मेष राशींतले बुध, शुक्र हे ग्रह वरील प्रकारची लोकविलक्षण विद्या व बुद्धिमत्ता उत्पन्न करितात. आश्चर्यचकित गुण हर्शलशिवाय प्राप्त होणार नाहीं. शत्रुस्थानीं सिंह राशीचा मंगळ हा हजारों अडचणींचा व विरोध उत्पन्न करणारांचा विध्वंस करितो. सप्तमांतील राहु दोन स्त्रियांस कारण होतो. गुरु चंद्र योग तनुस्थानीं बलवान् आहे. तो गोरा वर्ण, शारीरसुख, बुद्धिमत्ता, जगप्रसिद्धता, इ. गुण उत्पन्न करितो. नवम स्थानचा शनि पितृसुख कमी देणारा व धर्महानि करणारा आहे.

'ए. कु. वि.'

५

ज्योतिर्विद कुंडलीविज्ञान; संपादक यांस—

सा. न. नि. वि. कुंडलीविज्ञान दशाहिक झालें आहे, तरी त्यांत मजकूर फारच थोडा येतो. त्याचा आकार वाढणें एव्हां शक्य दिसत नाहीं, आणखी अशा वेळींच 'सायन निरयन' 'अधिकमास' 'पंचांगकमिटी, यासारखे, वर्तमान पत्रांत मात्र शोभण्याजोगे, निरुपयोगी, व्यक्तिविषयक वादांनीं भरलेले असे विषय येतात, हें पाहून वाईट वाटतें. 'केतकी' ग्रंथाचें भाषांतर त्यांत येतें तेंही मला प्रशस्त वाटत नाहीं. तो ग्रंथ उत्तम असेल, त्याच्या भाषांतराची लोकांस आवश्यकता असेल, पण तो गणितग्रंथ आहे; जातक ग्रंथ नाहीं. कुंडलीविज्ञानांत जातकाचा मात्र विचार व्हावा, हें विचारपूर्वक पाहतां पुष्कळांस मानवेल, असें वाटतें. एका अल्पमति वाचकाची सूचना आहे; योग्य वाटल्यास ग्राह्य होईलच. लोभ असावा, हो विनंति

आपला,

ना. वि. आपटे

* आमचें ज्योतिष पुस्तक जरी फलज्योतिषासाठीं असलें, तरी गणित व ज्योतिषविषयक लेख यांस स्थल देणें ज्योतिषी वाचकांच्या हितावें आहे. फलज्योतिष्याला गणिताची माहिती नसेल तर त्याचें तेज पडणार नाहीं, ह्मणून आवश्यक अशी गणिताची माहिती देणें अगत्याचें वाटतें. व्यक्तिविषयक लेख नसावे हें कबूल आहे. 'ए. कुं. वि.'

पत्रव्यवहार

[१]

एडिटर कुंडलीविज्ञान यांस—

सा. न. वि. वि.— कै० न्या० रानडे यांची कुंडली रा० दिवाडकर यांनीं वर्तविली, ती चूक असावी असें वाटतें. कारण—

१ रवि हा जानेवारी ता० २१ ला कुंभेत सायन मानानें जातो. ह्मणून तो निरयन मानानें ता० १८ ला मकरेत (१८४२ सालीं) सुमारें ५ अंशांचा असला पाहिजे. दिवाडकरांनीं कुंभेत दिला आहे.

२ ह्मणून निरयन कुंडलींत त्यांचें कर्क लग्नच असलें पाहिजे. दिवाडकरांनीं सिंह दिलें आहे.

३ हिस्टरी ऑफ सर्व्हिसीस नामक सरकारी पुस्तकांत न्या० रानडे यांचा जन्मदिवस आग-ष्टांत दिलेला असल्याचें स्मरतें. हें पुस्तक पाहून बरेच दिवस झाले आहेत ह्मणून निश्चयात्मक सांगतां येत नाहीं.

तात्पर्य, रा० दिवाडकर यांस अशी विनंति आहे कीं, ही कुंडली त्यांनीं पुन्हा नीट तपासून पहावी कळावें, लोभ असावा हे विनंति.

गो० ह० के०

पुणें–पेठ सदाशिव.

[२]

वि. वि.– दत्तकाची कुंडली प्रसिद्धीसाठीं पाठविली आहे, तिला स्थळ मिळेल अशी आशा आहे.

जन्म–श. १७८४ श्रा. शु. ४

बुध. सू. नं. ४२ घ. ९ प.

निरयन

आपण प्रसिद्ध केल्याप्रमाणें हींत दत्तकयोग आहेत. या मनुष्याची अशी हकीगत आहे कीं, दत्तक घेणारास दत्तविधानानंतर ५।६ वर्षांनीं औरस पुत्र झाल्यामुळें यास काहीं एक संपत्तीचा वाटा मिळाला नाहीं आतां ते पूर्व गृहीं येऊन राहिले

आहेत. याचा ज्योतिषी वाचकांनीं अवश्य विचार करावा. द्विभार्ययोग झाला असून वयाचे ३६ वे वर्षी स्त्रीसुख नष्ट झालें. आतां पुनः लग्न करण्याचा विचार नाहीं. यांस एक पुत्र व कन्या आहे. कळावें.-

नारायण लक्ष्मण वेदपाठक मोर्बे- कुलाबा.

---

[३]

अनुभविक नियम

१ गर्भश्रीमंत लोकांच्या कुंडलींत बरेच ग्रह धनस्थानीं आढळतात. कित्येकांच्या कुंडल्यांत मालायोगही असतो.

२ जल राशींत चंद्र पावसास अनुकूल असतो. विशेषेंकरून उत्तर गोलार्धांत म्हणजे मेषापासून कन्या राशीपर्यंतचा अतिवृष्टीस कारण होतो.

३ जवळच्या संग्रहावरून वृश्चिक लग्नाचें स्वरूप असें आढळण्यांत आलें आहे कीं, बांधा उंच, सडपातळ, तांबुसगौर कांति, नाक आंखूड व बसकट, कुंभ राशीचा बांधाही असाच असतो. परंतु वर्ण पीतगौर व नाक सरळ एवढाच फरक दिसतो.

४ पंचम स्थानांतील ग्रह नेत्रावर व स्त्रियांच्या वागणुकीवर परिणाम करितात, असाही अनुभव आला आहे.

५ लग्न, चतुर्थ व अष्टम या तीन स्थानांतील ग्रहांचा इतरांपेक्षां प्रकृतीवर विशेष परिणाम होतो.

६ कुंडलींत जो ग्रह बलवान् असेल, त्या ग्रहाची विद्या उपजत येते. म्हणजे त्या विद्येच्या आरंभानंतर त्यांत लवकरच प्रवीणता संपादन होते.

गणेश दामोदर ग्रंथे—भुसावळ

पत्रव्यवहार

(१)

विवाहकाल

वर वधू



यांचा विवाह ता. १६ जून १०९७ रोजीं मोरज मुहूर्तावर झाला. यांचे योगायोग असे.-

१ उभयतांची एकच रास

२ उभयतांचा गुरु एकाच स्थानीं

३ उभयतांचा रवि कन्येंत

४ राहुकेतूंत अन्योन्य योग.

५ वराचा लग्नाधिपति वराच्या चतुर्थस्थानीं व वधूचा तिच्या त्याच स्थानीं

६ वधूचा लग्नेश तोच वराचा चंद्रेश

७ वधूचा सप्तमेश तो वराचा कुटुंबेश

८ वराचा सप्तमेश तो वधूचा कुटुंबेश

९ उभयतांचे मंगळ परस्पर सप्तम आहेत

यांच्या विवाहकाली चंद्र सिंहेंत आहे. ह्मणजे वर.च्या शुक्रस्थानीं आहे. वराचा लग्नेश शुक्र हा वराच्या लग्नीं असून वधूच्या कुटुंबस्वामीच्या कुटुंबस्थानीं आहे. मंगळ उभयतांच्या चंद्राच्या कुटुंबस्थानीं आहे. बुध हा वराच्या कुटुंबस्थानीं असून वधूच्या गुरुस्थानीं आहे. विवाह लग्न धनु असून उभयतांच्या जन्म राशीस आहे. अथवा वधूच्या लग्नस्वामीच्या व वराच्या कुटुंबस्थानाच्या सप्तमांत आहे.

वर

वधू

यांचा विवाह ता. २५ मे १९०७ शनिवारीं गोरज मुहूर्तावर झाला.

	लग्नेश	कुटुंबेश	सप्तमेश
वरः—	बुध	शुक्र	गुरु
वधूः—	मंगळ	गुरु	शुक्र

यांच्यांत फक्त एकच योग जुळतो तो हा कीं, वराचा कुटुंबेश तो वधूचा सप्तमेश व वधूचा कुटुंबेश तो वराचा सप्तमेश. बाकी कोणताही योग जुळत नाहीं.

* वराचा सप्तमेश गुरु हा ज्या राशींत आहे, त्या राशींत वधूचें लग्न आहे. व वराचा सप्तमेश गुरु हा वधूच्या लग्नस्वामीनें युक्त आहे. वधूचा सप्तमेश वराच्या लग्नीं व वराचा कुटुंबेश वधूच्या कुटुंबस्थानीं आहे. हे आणखी योग आहेत. कुंडल्या निरयन आहेत असें वाटतें.

'ए. कुं. वि.'

विवाहकालाचा चंद्र हा वराच्या शुक्राच्या व लग्नाच्या द्वितीयस्थानीं व वधूच्या चंद्राच्या सप्तमस्थानीं आहे. विवाहकालचें लग्न वधूच्या लग्नीं व वराच्या सप्तमेशाच्या राशीस आहे. वधूला सासरा नसून दोन सासू आहेत.

शंकर रामचंद्र प्रधान

(२)

दत्तकयोग

जन्म– श. १७८३ भा. कृ.८
शुक्रवार सूर्योदयाबरोर



ही एक दत्तकाची निरयन कुंडली आहे. ती निरयन आहे तरी दत्तकाचे योग जुळत आहेत.

नारायण लक्ष्मण वेदपाठक
मोर्वे—कुलाबा

(३)

वि० वि०—आमचे एका स्नेह्याचा मुलगा आहे. त्याची कुंडली नाहीं. व असल्यास ती मिळत नाहीं. त्याची हकीगत येणें प्रमाणें आहे.–

रंग साधारण गोरा असून किंचित् ठेंगणा आहे. एक वडील भाऊ होता १९०० सालीं प्लेगनें वारला बापही याच वेळीं ह्मणजे १० दिवसांचे अंतरानें वारला. आई मरून आजमासें १३ वर्षें झालीं. ती पटकीनें मृत्यु पावली. तीन बहीणी होत्या. त्यांतील एक बहीण बाळंत रोगानें १९०२ मध्यें वारली. वय आजमासें २० पासून २२ वर्षांचें असावें. विद्या नाहीं. शिकण्याची इच्छा नाहीं. साधारण गातां येतें व तिकडेचा विशेष लक्ष दिसतें. लग्न झालेलें नाहीं. घरची इष्टेट नाहीं. संध्येतील नांव नोमदेव आहे.

या मुलाची कुंडली जो कोणी बरोबर पाठवून देईल त्यास **दोन रुपये बक्षीस** मिळेल !

रा. शं. शालिग्राम
ओव्हरसीअर, मु. इंदापूर–जि. पुणें

(४)

वि. वि. पुढील मजकूर प्रसिद्ध करावा.–

आज तारखेस दुपारीं केमेनडाईन, पॅदौक्टन नं. ३२ मध्यें सूर्यालय ज्योतिष सभा भरली होती त्यांतील गोषवारा.

१ गेल्या २६ मेच्या सभेचे ठराव वाचण्यांत येऊन मंजूर झाले

२ मि० एन् आर तळवलकर [ज्युनिअर] यांनीं मि० नवाथे यांचें मराठी ज्योतिष विषयक "कुंडली-विज्ञान" यांतील, सूर्यालय ज्योतिष सभा व तिचे स्थापक व चालक यांचें अभिनंदन त्यांतील प्रश्नोत्तरें याबद्दलचा लेख वाचून भाषांतर करून सांगितलें.

३ केमेनडाईन–मेंबराकडून आनरी सेक्रेटरीच्यामार्फत [एमजी बी. ए. सीव या पुढाऱ्याकडून] व्हाईस प्रेसिडेन्टला आलेलें पत्र वाचून दाखविलें. त्या पत्रांत परत सभा होण्याविषयीं विनंति होती, व सभेच्या अस्तित्वाची किती जरुरी आहे यासंबंधीं वरींच कारणें दाखविलीं होतीं. ह्मणजे हल्लीं जशी महिन्यांतून एकदां भरते तशी महिन्यांतून दोन वेळां भरावी. चालक व मेंबर यांच्यांत बराच खल झाल्यावर व्हाईसप्रेसिडेन्टच्या विनंती वरून असें ठरलें कीं, ही गोष्ट पुढील सभेपुढें आणावी तों पर्यंत चांगला विचार करण्यास बरें पडेल.

४ केमेनडाईन मधील आस्थेवाईक पुढारी मेंबरांपैकीं एका मेंबरानें (एम् जी. टिसेन्) मृत्यु पत्रांत दिलेल्या देणगीबद्दल जाहीर केलें. या मेंबराच्या मृत्यू बद्दल व्हाईस प्रेसिडेन्टनें फारच दुःख प्रदर्शित केलें. कारण हे गृहस्थ या सभेस उर्जीत अवस्थेस आणणाऱ्या मंडळींतील मुख्य होते. दुःखभार कमी करणें विषयींचें मत सर्वानुमतें पास झालें.

५ मिस्तर एन्. आर तळवळकर (ज्यूनिअर) यांनीं बी. एस्. रावच्या ज्योतिष मासिक पुस्तक " डिफीकल्टीस " " इफ् इट् पॉसिबल् टू प्रोलॉंग लाईफ " यांतील कांहीं प्रश्नांवर ते बोलले. त्यांचें अस्ति पक्षाचें मत होतें. कांहीं मजेदार प्रश्नोत्तरें होतीं. व्हाईस प्रेसिडेन्ट सुद्धां याला आश्रय देणें विषयीं बोलले.

६ रीती प्रमाणें व्हाईसप्रेसिडेन्ट कडून उपसंहार झाला. सभेस मेंबर व इतर श्रोते मिळून ३० वर होते सभा संध्याकाळीं ५–३० ला बरखास्त झाली

७ मध्यंतरींच्या अवधींत मंडळीस मि. आर. जी. तळवलकर व्हाईसचे-अर्सन यांच्या खर्चानें लहानसा उपाहार झाला.

नारायण रामचंद्र तळवलकर

पत्रव्यवहार

[१]

पर्जन्ययोग व कर्क राशींत गुरु असतां पर्जन्य कां पडावा याविषयीं

पावसाचे दिवसांपैकीं मुख्य आषाढ महिना हा असल्यामुळें त्या महिन्यांत कर्क राशीस रवि आहे व त्या योगानें पर्जन्य पडण्यास कारण जी सौम्य ग्रहांची जल राशींतील युति, त्यांत विशेषतः चंद्र–गुरूची युति त्यांचा परिणाम चांगला होणार नाहीं. कारण पाप-ग्रह रवीजवळ आला आहे. त्याशिवाय बुध व शुक्र हे ग्रहही सूर्याजवळ असावयाचे. त्यासुळें चंद्रार्की ज्यावेळीं बुध व शुक्र या सौम्य ग्रहांची युति व्हावयाची त्यावेळीं जर ते ग्रह रवीच्या अति सन्निध असतील तर त्या युतीचा परिणामही चांगला होणार नाहीं. ह्मणून कर्क राशींत गुरु असतां पर्जन्य कमी पडेल, असें भविष्य साधारणपणें पूर्वीच्या ज्योतिष्यांनीं केलेलें असावें हें वरील कारण त्यांस माहित होतें किंवा अनुभवानें तुसत्या कर्क राशीच्या गुरूवरच ठोकळ नियम ठरविला, समजत नाहीं. परंतु कर्क राशींत गुरु असतां दुष्काळ पडण्याची भीति आहे, असें वाटत नाहीं. साधारण रीतीनें दुष्काळ पडण्यास कारण ह्मणजे सौम्य ग्रह. गुरु, शनि, बुध, शुक्र हे अग्निराशींत व उष्ण ग्रह जल राशींत असतां ही भीति जास्त असते. कारण, सौम्य ग्रहांचे युतीचा परिणाम चांगला होणार नाहीं. संवत् १९५६ सालीं इकडे जो भयंकर दुष्काळ पडला होता त्या वेळीं वरील नियमांप्रमाणें ग्रहस्थिति होती ती अशी—

जून, जुलई

गुरु, हर्शल, शनि हे धन राशींत.
मंगळ मिथुनेंत.

बुध कर्क व सिंह राशींत.

शुक्र कर्क या राशीस मे ता. ५ पासून आगष्ट ता० ९ पर्यंत आहे.

पर्जन्य योगांपैकीं चंद्र+गुरु, चंद्र+शुक्र, चंद्र+शनि व जूनजुलई या महिन्यांत बुध+चंद्र यांचे योग व प्रतियोग हे निरुपयोगी होऊन दुष्काळ पडला !

आतां पर्जन्य पडण्यास अनुकूल असे दिवस साधारणतः कोणते आहेत याचा विचार करावयाचा असल्यास माझ्या मतें साधारण मानानें पुढील प्रमाणें करितां येईल.

पर्जन्य पडण्यास मुख्यत्वें प्रसन्न राशि व स्त्री राशि या अनुकूल पाहिजेत. त्यांत कर्क, मीन, वृश्चिक मकर, कन्या, वृषभ या राशि एकापेक्षां एक कमी बलवान् आहेत. जलराशींचें फल स्त्री राशींच्या फलापेक्षां अधिक व कर्क राशींचें सर्वांत अधिक.

ज्या प्रमाणें राशी विषयीं सांगितलें त्या प्रमाणें ग्रहांविषयींही आहे. गुरु, चंद्र, शनि, शुक्र व बुध हे एकाहून एक कमी फल उत्पन्न करणारे आहेत.

यावरून पर्जन्य पडण्यास वरील राशींपैकीं एखादे राशींत गुरूचे जवळ शुक्र, बुध, चंद्र वगैरे आले असतां पर्जन्ययोग समजावा. वरील राशींचे प्रतियोगांचींही फलें मिळण्याचा संभव आहे.

युतिकालीं जितके सौम्य ग्रह जास्त संख्येनें एकत्र असतील त्या मानानें फल चांगलें अनुभवास येईल. त्याचप्रमाणें जितके पाप ग्रह (मंगळ, रवि, हर्शल, नेपच्यून) जास्त जवळ असतील किंवा दृष्टि करितील तितकें फल वाईट विलंबानें दृष्टोत्पत्तीस येईल किंवा मुळींच दिसणार नाहीं.

रा. प्रधे यांचे अनुभविक नियम या सदराखालीं कु. वि. अं. १३ यांत पर्जन्याविषयीं जो नियम सांगितला आहे तो वरील नियमाचे अगदीच विरुद्ध आहे व ती कल्पनाही चुकीची आहे, असें वाटतें. परंतु एडिटरचें मत त्या विषयीं कांहींच नाहीं. अशा संशयात्मक नियमास 'अनुभविक नियम' या सदराखालीं घालूं नये हें बरें.

चालू सालीं पर्जन्य पडला त्या वेळीं वरील नियम लागू पडतात किंवा नाहींत हे पाहूं. येथें आजपर्यंत साधारण मोठे असे तीन पर्जन्य पडले.

ता. १५ जून रात्रीं सुमारें १०।११ वाजतां. ता. १६ रोजीं बुधगुरु योग होता. रवि हा त्यावेळीं कर्क राशींत जर असता तर परिणाम चांगला दृष्टीस पडताना. हा पर्जन्य सुमारें ७ दिवस चालू होता. ता. १९ रोजीं चंद्रशनि प्रतियोग होता. हा उत्तम फल देणारा आहे. कारण मीन या जल राशींत शनि असून समोर कन्या या स्त्री राशींत चंद्र आला व क्रूर ग्रह जवळ नाहीं. ह्मणून एकाच वेळीं दोन योग आल्यामुळें अनुभव चांगला आला.

२ ता. २ जुलई. चंद्र+शनियोग ता. १५ रोजीं रात्रीं होता. शनीची युति कमी महत्वाची असल्यामुळें रात्रभर जोराचा पर्जन्य पडला.

ता. १२।१३ जुलई–पुणें वगैरे ठिकाणीं जोराचा पर्जन्य पडला. येथें थोडा पडला. सर्वरात्र कमी जोराचा पडत होता. या तारखेचे सुमारास गुरु+चंद्र, चंद्र+बुध हे योग होते. पर्जन्य अमुक ठिकाणीं पडणें हें त्या देशाचे राशीवर अवलंबून राहील. कारण या वर्षी सिंह राशीचे देशास पर्जन्य अनुकूल नाहीं. सर्व योग २।८।१२ या स्थानांत होतील. आतां, वरील नियमाप्रमाणें या वर्षी पर्जन्य कसा पडेल हें पाहूं.

जुलई महिन्यांत कर्क राशीस गुरु व रवि एकत्र असल्यामुळें हाकाहाक झाली आहे. परंतु पुढील महिन्यांत ह्मणजे ता. २२ जुलई पासून ता. २२ आगष्टपर्यंत पर्जन्य मागील महिन्यापेक्षां बरा पडेल. सपटंबर या दोन महिन्यांपेक्षां बरा जाईल, असें वाटतें.

पर्जन्यास साधारण माझ्या मत पुढील दिवस अनुकूल असतील.

जुलई

ता. १६ [चंद्र–शनि] ता. २४ [चंद्र–शुक्र] चंद्र–गुरु] ता. २५ [चंद्र–बुध] ता. २९ [चंद्र—शनि]

आगष्ट

ता. १ [शुक्र+गुरु] ता. २ [बुध+शुक्र] ता. ३ [बुध+गुरु] ता. ७ [चंद्र+बुध] [चंद्र+गुरु] ता. ८ [चंद्र+शुक्र] ता. १० [बुध+शुक्र] ता. १२ [चंद्र–शनि] ता. २१ [चंद्र–गुरु] ता. २२ [चंद्र–बुध]

ता. २३ [चंद्र-शुक्र] ता. २५ [चंद्र-शनि]

सप्टेंबर

ता. ४ [बुध+शुक्र] [चंद्र+गुरु] ता. ७ [चं.+शु.] ता. ८ [चं.+बु.] ता. १३[बु-श.] ता. १७ [शु.-श] ता. २१ [चं.-श.] ता. २२ (चं.-शु.) ता. २३ (चं-बु.)

याशिवाय जलराशींत चंद्र असेल त्या तारखा पर्जन्यास अनुकूल असतील. प्रतियोगाविषयीं माझें ठाम मत ठरलें नाहीं. कळावें, सर्वांनीं अनुभव घेऊन कळवावें हें विज्ञापना.

दामोदर वि० कोटिभास्कर.

---

[२]

एडिटर कुंडलीविज्ञास यांसः—

सा. न. वि. वि.— मजपाशीं कित्येक चमत्कारिक कुंडल्या आहेत, अशा कीं, त्या माझ्या मतें खऱ्या स्थितीस नीटपणें जुळत नाहींत. त्यांपैकीं एकीचे मालकाची आपले दाशाहिकांत प्रसिद्ध करण्याबद्दल परवानगी मिळाल्यावरून आपणांकडे पाठवित आहे.

जन्म—श. १८०० आषाढ व. १४ सू. ने. गत घ. ३४ प. ११ पुणें सायन



र.	चं.	मं.	बु.	गु.
४	३	४	४	१०
६	१९	२१	२६	२

शु.	श.	रा.	ल.
३	०	१०	१०
४	व.	१४	१७

या कुंडलींत दोन गोष्टींचा नीट मेळ बसत नाहीं. धन स्थानीं नीच वक्री शनि असून यांना साडेतीन हजारांची जाहागीर आहे. धनस्थानाचा स्वामी व लाभ स्थानचा स्वामी एकच गुरु तो व्यय स्थानीं राहूनें युक्त अशा स्थितींत साडेतीन हजारांची जाहगीर कशी आली ?

एवढें मात्र सांगितलें पाहिजे कीं, दहा बारा हजार रुपये कर्ज आहे. व इष्टेट हातांत आल्यापासून आज सुमारें दहा वर्षें भाऊबंदी कज्यांमुळें फार त्रास होत आला शिवाय दुष्काळ व इतर कारणांमुळें गांवाकडे बाकी फार थकली आहे.

दुसरी गोष्ट— पंचमाचा स्वामी सप्तमांत व शुक्र पंचमांत असून संतति अजून नाहीं, याचेंहीं कारण नीट समजत नाहीं.

वर्ण साधारण काळसर, उंची मध्यम, शरीर सडसडीत, स्वभाव सरळ परंतु त्रासिक व हट्टी, नैराश्यवादी असे हे आहेत. वडील पांचवे वर्षी वारले. वडील बंधु विसावे वर्षीं वारले. त्यांस संतान नसल्यामुळें हे वारस झाले. २३ व २५ व्या वर्षी कोठाले दोन आजार गेले. २५ व्या वर्षी पाण्यांत बुडतां बुडतां वांचले. १८ वे वर्षी लग्न* झाले. मातुश्री हयात आहेत. बहिणी दोन विधवा. याप्रमाणें यांची हकीकत आहे.

* आला

जो. ह. के.

* जाहगीर अर्पणें व ती दुर्बल स्थितींत असणें या दोन गोष्टी एकाच दृष्टीनें जुळावयाच्या नाहींत आणि स्वसंपादित किंवा निवळ दैवयोगानें मिळालेली दौलत व अशा श्रीमंत घराण्यांतच जन्म झाल्यामुळें मिळालेली दौलत या गोष्टी भिन्न आहेत. त्यामुळें त्यांचा उलगडा करणेंही अत्यंत बिकट आहे, असें मागें एका स्फुट लेखांत आह्मीं सांगितलेलें आहे. श्रीमंत घराण्यांत जन्म घेण्याला ग्रहस्थिति विशेष बलवान् लागत नाहीं, पण श्रीमंती प्राप्त होण्याला ती फारच बलवान् लागत असते. ह्मणून सामान्य दृष्टीनें याचा बोध होऊं शकत नाहीं. कित्येक प्रसंगीं श्रीमंताची कुंडली असून ती एखाद्या सामान्य मनुष्याची असावी, असें अदृष्टीचा ज्योतिषी सांगूं लागतो. अमुक मनुष्य श्रीमंत कुळांत जन्म पावला आहे कीं दारिद्र्यांत जन्म पावला आहे, हा ज्योतिःशास्त्रांतला अत्यंत बिकट प्रश्न आहे. याचा उलगडा प्राचीन ज्योतिर्विदांनींही केलेला आढळण्यांत नाहीं. अमुक मनुष्य संपत्ति मिळवील कीं नाहीं व असलेल्या संपत्तीचें रक्षण करील

कीं नाहीं हे प्रश्न मात्र सुटण्यासारखे आहेत व तेच सोडविण्याची बहुतेक ज्योतिष्यांची पद्धति आहे. या दृष्टीनें वरील कुंडली पाहिल्यास त्यांची संपत्ति दुर्बल स्थितींत आहे. इतकें ज्योतिषी सांगूं शकेल. जाहगीरदारीचा बोध सहजगत्या व्हावयाचा नाहीं. तथापि तो मुळींच होणार नाहीं असें मात्र नाहीं. धन भावारंभीं मीन राशीचे २१ अंश उदित आहेत. म्हणून त्याचा स्वामी गुरु न मानितां मंगळ मानिला पाहिजे. हा मंगळ सप्तमस्थानीं सिंह या बादशाही राशींत आहे, व तो सप्तमेश जो बुध त्यानें युक्त आहे. याच राशींत रवि हा स्वगृहीं आहे. याच योगामुळें जन्म श्रीमंतींत झाला असला पाहिजे, असें अनुमान करण्यास जागा आहे. "**राजनौ रावीशतिगू**" रवि व चंद्र हे दोन राजे आहेत. वरील कुंडलींत हे दोन्ही ग्रह आपआपल्या राशींत असल्यामुळें जाहगीरदार हें जन्मसिद्ध उपपद मिळालें आहे!

'**ऋणग्रस्तो धने पापे**' '**धनेशे नीच राशिस्थे क्रूरषष्ठ्यं शसंयुते ॥ लाभेशेऽपितथा युक्ते ऋणग्रस्तो भवेन्नरः ॥**' इ० वचनें कर्ज होण्यास कारण आहेत. कारण धनस्थानीं शनीसारखा क्रूर ग्रह नीच व वक्री असा आहे. हा ग्रह लाभ व व्यय यांचा स्वामी असून लग्नाचाही अंशतः स्वामी आहे.

'ए, कुं० वि०'

---

[३]

श्रीयुत कुं. वि. कर्ते यांस.

सा. न. वि. वि.— खालील कुंडलींत जन्मापासून आजपर्यंतचीं दर्शलचीं फलें लग्न व चंद्र यांच्या सिरानिराळ्या स्थानांत कशीं कशीं मिळत गेलीं, त्यांचें वर्णन लिहून पाठवित आहें. त्यास येत्या अंकीं स्थल मिळावें.

जन्म—ता. १ सप्टेंबर १८८२ रा. ४ वाजतां

सायन



१ जन्मकालीं हर्शल द्वितीय स्थानीं आहे. जन्मकालीं कुटुंब मोठें असून एकत्र व भरभराटींत होतें. हर्शल या स्थानीं असतांनाच तें विभक्त होऊन बरीच द्रव्यहानि झाली.

२ तो तिसऱ्या स्थानीं आल्यावर पितृकारक रवि व कुटुंबाधिपति बुध त्यांच्या धनस्थानीं आल्यामुळें पित्यास सरकारी कामांत, पैशांचें ठोकर बसली. मातृस्वामी मंगळ हा तृतीय स्थानीं आहे. त्याशीं युत व मातृकारक चंद्रासमोर आल्यामुळें आईस दोन वेळां जड दुखणीं गेलीं. हें सहोदर स्थान असल्यामुळें या स्थानांत असे तोंपर्यंतच भावंडें झालीं. त्यांपैकीं बहुतेक बालपणांत मृत झालीं. हें प्रवास स्थान असून या स्थानांत तूळ हा चर राशि असल्यामुळें बापा बरोबर नोकरीसंबंधानें बरेच लांबचे प्रवास घडले. पंचमाधिपति गुरु ह्याच्या पांचवे स्थानीं असल्यामुळें विद्या प्राप्ति झाली व एक मंगल कार्य झालें.

३ हर्शल चतुर्थस्थानीं आल्यावर एक घर होतें. तें पैशांच्या अभावामुळें त्याच्या हातून गेलें. जायाधिपति शनीचेसमोर व पत्नीकारक शुक्र कुटुंबस्थानीं असल्यामुळें प्रथम विवाह झाला. थोडेच दिवसांनीं ती स्त्री मरण पावली व लागलाच दुसरा विवाह झाला. शुक्राच्या द्वितीय स्थानीं आल्यामुळें इतकी घडामोड झाली. चं. स ८ वा व लग्नास ४ था

झाल्यामुळें दोन वेळ जबर दुखणें गेलें. रवीच्या पराक्रमस्थानीं आल्यामुळें पित्यास दिवस चांगले गेले.

४ हर्शल पांचवेस्थानीं आल्यावर संततीस आरंभ झाला. पंचमाधिप गुरूसमोर तो आल्यामुळें संतति जगली नाहीं. बुद्धिस्थानांत आला ह्मणून वियानाश झाला. चंद्रास ९ वा व रवीस ४ था आल्यामुळें बाप दोन वेळ अति आजारी झाला. पंचम स्थान हें सासऱ्याचें कुटुंब स्थान असल्यामुळें त्याच्या कुटुंबांत पुष्कळ माणसें ह्मणनें मरून ऱ्हास झाला ! कुटुंबाधिपति बुध याला ४ था झाल्यामुळें स्त्रीचा तिटकारा होऊन सासऱ्याशीं वेबनाव झाला.

५ हर्शल षष्ठस्थानीं आल्यावर चंद्रास १० वा व रवीस ५ वा आल्यामुळें नोकरीस आरंभ झाला. बापाचे व स्वतःचे नोकरींत दिवस बरे गेले. हें मातुलस्थान ह्मणून मातुलाहानि झाली. शत्रुस्थान ह्मणून दोन वेळां शत्रु झाले. चंद्रास १० वा व पितृस्वामी शुक्र यास ४ था झाल्यामुळें बापास निरनिराळे रोग होऊन ३।४ आजार झाले. हें रोगस्थान असून मकर राशींत चंद्रास १० वा ह्मणून स्वतःस संधिवाताचा विकार जडला. मकर व दशम यांचा अंमल गुढग्यावरच असतो.

६ हर्शल हा पाप ग्रह असल्यामुळें इतर वेळीं स्थानपरत्वें त्यानें वाईट फलें उत्पन्न केलीं.

पत्रव्यवहार

[१]

रा० रा० कुंडलीविज्ञानकर्त्तेयांस

सा० न० वि० वि० ता. १८ जुलई १९०७ रोजीं सायंकाळीं आगगाडीखालीं सांपडून मेलेले दोन मनुष्यांचे निरनिराळ्यावेळीं अपघात झाले आहेत ते दिले असतां वाचकवर्गास बऱ्याच गोष्टी समजतील असें समजून त्या वेळच्या सायन कुंडल्या वर्णनसहन खालीं दिल्या आहेत.

१

ता. १८ जुलै सन १९०७ रोजीं सायंकाळीं मुंबई ४ वाजून ४५ मिनिटांनीं मुंबई करीरोड स्टेशनवर गाडीखालीं सांपडून एक मनुष्य मेला त्या वेळची कुंडली सायन



२

ता. १८ जुलै सन १९०७ रोजीं सायंकाळीं सुं. ५ वाजून ११ मिनिटांनीं सायन स्टेशनवर उभी न राहणारे गाडींतून एक मनुष्य पडून मेला त्या वेळची कुंडली सायन



(१) पहिल्या कुंडलीचे स्प. ग्रह.—र. २३ चं. २४, मं. १० व., बु. ५ व., गु. २३, शु. ८, श. २७, रा. २३, ह. १० व. द्वादशभाव व यांचे अंश अनुक्रमें.—ध. २१, म. २२, कुं. २५, मी. २९, वृ. ०, वृ. २६, मि. २१, क. २२, सिं. २५, क. २९,

वृ. ०, वृ. २६.

हींत द्वितीय भावाचा आरंभ मकरेच्या २२ अं. त असल्यामुळें मंगळ आणि हर्शल हे लग्नीं येतात, व ते १० अं. त असल्यामुळें मध्यवर्ती होतात. तृतीय भावाचा अंत [च. भा. चा आरंभ] २९ अंशांत असल्यामुळें शनि चतुर्थ स्थानीं येत नाहीं. पण तो २ च अं. नीं कमी असल्यामुळें चतुर्थ भावाचेंच फल देतो. अष्टम भावाचा आरंभ कर्क राशीच्या २२ अं. त असल्यामुळें रवि, गुरु व राहु हे अष्टमांत व शुक्र आणि नेपच्यून सप्तमांत येतात. नवमाचा आरंभ सिंह राशीच्या २५. अं. त असल्यामुळें बुध अष्टमांत येतो. दशमांत तूळ राशि पूर्ण असल्यामुळें चंद्र दशमांत येतो. या प्रमाणें पहिली कुंडली भावचलित होते.

(२) दुसऱ्या कुंडलीचे स्प. ग्रह पहिली प्रमाणेंच आहेत. फक्त चंद्र २५ अं. आहे.

द्वादशभाव व त्यांचे अंश.- म.४, कु.६, मी.१०, मे.१४, वृ.१२, मि.९, क.४, सिं.६, क.१०, तू.१४, वृ.१३, ध.९

हींत अष्टम भावाचा आरंभ सिंह राशीच्या ६ अं. त असल्यामुळें बुध संधीवर येतो.

पहिल्या कुंडलींत धन लग्न उदित असून त्यांत मं. व हर्श. वक्री आहेत. अष्टमस्थानीं र. शु. रा. हे एकाच अंशांत आहेत. चतुर्थस्थानाचा अधिपति गुरु अष्टमस्थानीं रवि राहू ह्या दोन पापग्रहांनीं दूषित आहे व तो लग्नेशही आहे. अष्टमस्थानांत सिंह राशीचे अंश बरेच आहेंत व त्याच स्थानीं र. गु. रा कर्केंचे आहेत ते या स्थानांतून अष्टमेश जो चंद्र त्याव त्रिराश्यंतर दृष्टीनें पाहत आहेत. द्वितीय व सप्तमस्थानही मारक स्थानें आहेत. द्वितीय स्थानाचा स्वामी शनि सुख भावारंभांत जात आहे. व दुसरा मारकेश बुध हा अष्टम भावांत सिंह राशींत वक्री असल्यामुळें बरेच पापग्रह विघडलेले आहेत मकर राशींत हर्शल हा ग्रह विशेष वाईट असतो असें जें प्रतिपादन केलेलें आहे, त्याचा येथें स्पष्ट अनुभव येत आहे. चतुर्थ स्थानावर वाहनाचा विचार होतो व त्याचा स्वामी मंगळ लग्नीं बलिष्ठ असून ह्या ग्रहा बरोबर पूर्ण युत आहे. व ही युति ता० १८ रोजी पहांटेस सुमारें ३ वाजून ३६ मि.

मु. टा. नीं झाली आहे.

बहुतेक ग्रह मकर व कर्क ह्या चर राशींत असून ते प्रथम व अष्टम भावांत उदित आहेत, ह्यामुळें विशेष " चमत्कार व दुःख आणि आश्चर्य इत्यादि गोष्टींनीं पाहणारे यांस व ऐकणाऱ्यांस चकित करणें व वर्तमानपत्रें व लोकचर्चा यांस आधारभूत अशा " प्रकारचे मृत्यु होतात. असें मी एके ठिकाणीं वाचलें आहे. त्याचा येथें बरोबर अनुभव पटतो.

दुसरे कुंडलींत जन्म लग्न मकर ४ अंशांत उदित असून त्यांतही मंगळ हर्शलबुवा पूर्ण युतींत आहेतच. आणि त्यावर रवि, नेपच्यून आणि राहूची पूर्ण दृष्टि आहे. चतुर्थ स्थान हें सुख आणि वाहन स्थान असून त्याचा स्वामी मंगळ हाही पापयुक्त व दृष्ट असून वक्री आहे. या कुंडलींत लग्न आणि लग्नासमोरचें सप्तम स्थान यांत बरेच पाप ग्रह आलेले आहेत.

हर्शल, नेपच्यून, रवि, मंगळ, राहु इतके ग्रह बिघडले असतां अशावेळीं आकस्मिक मृत्यु येणें साहाजिकच आहे.

या दोन अपघातांशिवाय ता० १८।७।१९०७ रोजीं सायंकाळीं ३ वाजतां एक मुसलमान विजेच्या ट्रामच्या धक्क्यानें तत्काल मरण पावला. असें समजतें.

या दिवशीं सुमारें ४।५ वाजण्याचे दरम्यान आणखी एक मनुष्य घोड्याचे गाडीखालीं सांपडून मेल्याची बातमी कळते.

तसें दोन प्रहरच्या सुमारास [म्हणजे नक्की वेळ नाहीं.] एक ब्राह्मणाची बाई एकाएकीं ४।५ मिनिटांत मयत झाली.

माझे मतें ता० १८ रोजी पहाटेस जी हर्शल बुवा आणि मंगळ यांची युति झाली तिचेच हे परिणाम असावेत.

संपादक महाराज, जर वरील माणसांच्या या मृत्युवेळच्या कुंडल्या दिल्या आहेत त्यांचे जन्मकाळ मिळाले असते तर विज्ञानाचे वाचकांस बरीच माहिती मिळाली असती.

ता० १३ पासून आज तागायत मुंबईत अतिवृष्टि सुरू आहे. व हल्लीं मघा नक्षत्र असून तें ता० ७ आगष्टपर्यंत आहे. तेथपर्यंत ही वृष्टि होणार असा संभव दिसतो. येथें एकंदर सुमारें ७० इंच वृष्टि झाली.

*

पत्र विस्तार फार झाला सबब पुरे करितों. तसदीची माफी असावी. कळावें लोभ असावा ही विनंति.

आपला वर्गणीदार.

पांडुरंग काशीनाथ खरे

मुंबई.

[२]

रा० रा० कुंडलीविज्ञानकर्ते.

स्वा० शेवेशीः—

कृ० शि० सा० न० वि० वि०:—

आमच्या भाऊबंदींत गेल्या ८।९ वर्षे तंटेबखेडे उत्पन्न होऊन त्यांत आमचें सर्वस्वी नुकसान झालें होतें, व आमचेवर परमेश्वराची कृपा नसती तर त्या स्थितींतून पार पडणें अशक्य होतें. 'सत्यमेव जयते' या न्यायानें वरील विषयाची अखेरी झाली व ती आपण केलेले भविष्याप्रमाणें बिनचूक अनुभवास आली हें आपल्यास कळविण्यास आह्मांला मोठा आनंद व अभिमान वाटतो! आमची जुन्या चालीची पत्रिका आपण सायन प्रमाणें तयार करून त्यावरून फिर्याद करणेचा जो मुहूर्त दिला, त्या बरहुकूम आह्मीं दिवाणी कोर्टांत वाटपाचो फिर्याद दाखल केली. ही फिर्याद इतक्या भानगडीची होती कीं, त्याचा अखेर निकाल वर्षा दोन वर्षांत होणें शक्य नव्हतें. तरीसुद्धां आपण वर्त्तविल्याप्रमाणें जुलई महिन्याचे ८ वे तारखेस कज्जाचा आपसांत समाधानकारक निकाल झाला! ही ज्योतिषशास्त्राची व विशेषें आपल्या शास्त्राच्या पारंगततेची चमत्कृति होय. आपले आह्मीं आभारी आहों. कळावें,

ता० १८।७।०७

ना० ब० हारडीकर

महाड.

[३]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस-

वि. वि.— आज रोजीं सूर्यालय ज्योतिषसभेची हकीगत पाठविली आहे, तिला येत्या अंकीं स्थल मिळावें—

केमेन्डाईन २८ जुलई १९०७

"आज दुपारीं पादौक्टन केमेन्डाईन मध्यें दुपारीं सभा भरली तिचा तपशील.—

१ गेल्या ३० जूनच्या सभेचें टिपण वाचण्यांत आलें व कायम झालें.

२ महिन्यांतून दोन वेळां सभा भरविण्याची सूचना नापसंत झाली. कारण, विरुद्ध बाजूकडून सभेस नियमित हजर राहण्याची खात्री व्हाईस प्रेसिडेंट यांस मिळाली नाहीं.

३ एम् जी. पो. थिंद यांस एम् जी. दून इन यांजमधून सभेस मेंबर होण्याबद्दल जी सूचना झाली तींस कोणत्याही मेंबरानें हरकत घेतली नाहीं.

मि. एन्. आर. तळवळकर यांनीं पावसाचें भविष्य सशास्त्र व ज्योतिषदृष्ट्या सांगितलें. आणि तींच तत्वें धरून मि. टी. पी. डी सिल्व्हा व्हाईस प्रेसिडेंट यांनीं पुरें केलें.

५ लहानसा उपहार करण्यांत आला. ऑनररी सेक्रेटरी एम. जी थूलइन आणि आननरी ट्रेझरर एम. जी., पोन्यान यांच्याकडे या सर्व यशस्वी व्यवस्थेचें श्रेय आहे.

६ व्हाईस प्रेसिडेन्ट यांजकडून रीतीप्रमाणें उपसंहार झाला.

७ सभेस मेंबर व इतर नेहमीं प्रमाणें होते. सभा संध्याकाळीं ५ वाजतां विसर्जन झाली."

टी. पी. डीं सिल्व्हा.

व्हा. प्रे. सूर्यालयज्योतिषसभा.

कळावें हे विनंति

नारायण रामचंद्र तळवलकर

रंगून-ब्रह्मदेश.

---

[४]

एडिटर 'कुंडलीविज्ञान' यांस.—

सा. न. वि. वि.— ता. ११ जुलईचे अंकांत रा. ग्रंथे यांनीं कांहीं अनुभविक नियम पाठविले आहेत त्यांसंबंधीं माझें मत.—

१ धन स्थानाचा व लाभ स्थानचा स्वामी लग्नांत असला तरी सुद्धां मनुष्य गर्भश्रीमंत असतो, असें दिसून आलें आहे. यांपैकीं एकच लग्नांत असला तर मध्यम श्रीमंत असतो.

२ वृश्चिक राशीच्या स्वरूपासंबंधानें माझा अनुभव अगदींच वेगळा आहे. असा मनुष्य अंगानें लहान किंवा मध्यम, कोठें तरी वक्र, बहुधा पिंवळट रंगाचा, लोकांची त्यांचे पाठींमागें कुचेष्टा व निंदा

करणारा, थोडा निर्दय, स्वार्थी असा असतो. रा. प्रधे यांनी लिहिल्याप्रमाणें आखुड व बसकट नाक धनु लग्नावर जन्मलेल्या लोकांमध्यें आढळतें. हे साधारण उंचच असतात. पण सडपातळ, क्वचित् असतात. उंच व सडपातळ शरीराचे मानानें हात पाय लांब, चेहरा लहान, भिडस्त, विद्याव्यासंगी, विनोदी व गोड भाषण करणारे, साधारणपणें भितरे, न्यायी व ममताळू पण कधीं कधीं एक कल्ली असे तूळ लग्नावर जन्मलेले लोक असतात.

६ ग्रहांच्या विद्या कोणकोणत्या व कुंडलींत ग्रह बलवान् " ह्मणजे कसा [स्वगृहीं, उच्च इ० किंवा केंद्रांत कोणांत इ०] याचा खुलासा केल्यास बरें पडेल.

कळावें–लोभ असावा हे वि.—

गो. ह. के.–पुणें.

---

* केवळ लग्नावर किंवा केवळ चंद्रावर शारीरस्थिति अवलंबून नाहीं. वृश्चिक राशीच्या स्वरूपाचें वर्णन करावयाचें ह्मणजे विशाखांचा एक चरण, अनुराधा व ज्येष्ठा या तीन नक्षत्रांचें वर्णन करणें जरूर आहे. या राशीचे ३ अं. २० क. पर्यंत विशाखा, १६ अं. ४० क. पर्यंत अनुराधा व या पुढील अंश ज्येष्ठांचे आहेत. या राशीकडे तुझी सूक्ष्मदृष्टीनें पहाल तर प्रत्येक भागांत या राशीचें निराळें स्वरूप आहे, असें अनुभवास येईल. वृश्चिक राशीचें खरें खरें स्वरूप ज्येष्ठांत दृष्टीस पडेल. बुटगेपणा, वांकडेपणा पाठीचा भाग लांब व कमरेपासून खालचा भाग बुटगा अशा प्रकारचें बेढबं स्वरूप विशाखा किंवा अनुराधांत मिळणार नाहीं. याच प्रमाणें प्रत्येक राशीचें स्वरूप अवलोकन केलें तर सर्वांची एक वाक्यता होईल अशी खात्री आहे. थपकट नाक हा धर्म ज्येष्ठांचा आहे. धनु राशींतील मूळ, पूर्वाषाढा व उत्तराषाढांचा एक चरण या प्रत्येकाचीं स्वरूपें भिन्न आहेत, यांतील शेवटल्या नक्षत्रांचीं स्वरूपें चांगलीं आहेत, तसें मूळांचें नाहीं. सारांश यापुढें आपणांस शारीरिक ज्ञान नक्षत्रांवर नेलें पाहिजे, तरच शारीरवर्णन जुळतें करितां येईल. राशीवरून शारीरवर्णन करणें ही

'बिगर यत्ता' आहे असें समजावें. आमचा या बाजूनें प्रयत्न चालू आहे. सुलभजातकाच्या पहिल्या भागांत आह्मीं राशींचें वर्णन केलें आहे, तें सायन व निरयन या दोन्ही प्रकारच्या राशींस जुळेल असें केलें आहे. कारण, वाचक वर्ग बहुतेक निरयन पंथांतला आहे. ह्मास या पुस्तकाचा थोडाबहुत तरी उपयोग करून देणें आमचें कर्तव्य होतें. असो, शारीरिक लक्षणांचा शोध करणारांनीं या पद्धतीनें आपला शोध ठेवावा असें सूचित करण्यासाठींच आपलें मत एथें व्यक्त केलें आहे. 'ए. कुं. वि.'

[५]

सा. न. वि. वि.– पुढील कुंडलीस येत्या अंकीं स्थळ मिळेल अशी आशा आहे.

जन्म–ता. १९ मे १८७८ सू.

नं. घ. ३६ प. ३१ बुध.

सायन

द्वादशभाव

लग्न–२४–३घ. जाया–२४–४३मि.
धन–२५म. मृत्यु–२५क.
सहज–२९कुं. धर्म–२९सिं.
सुख–३मे कर्म–३तू.
सुत–४वृ. आय–४वृ.
रिपु–०मि. व्यय–०ध.

स्पष्ट ग्रह.

र.	चं.	मं.	बु.	गु.
मि.	वृ.	क.	वृ.	कुं.
८	९	१४	१६	९

शु.	श.	रा.	ह.
मे.	मी.	कुं.	सिं.
२६	२९	१७	२५

तृतीय भावाचा आरंभ कुंभेच्या २९ अंशांत असल्यामुळें गुरु आणि राहु हे द्वितीय भावांत आहेत. त्यांत गुरु मध्यवर्ती आहे.

याच भावांत मीन राशि पूर्ण आहे, ह्मणून शनि तृतीय स्थानीं आहे. तो चतुर्थ भावारंभापेक्षां सुमारें ४ अंश कमी आहे.

चतुर्थ भावारंभ मेषेत असल्यामुळे

शुक्र चतुर्थ स्थानीं आहे. तो पंचम भावारंभापेक्षां सुमारें ८ अंश कमी आहे.

पंचम भावारंभ वृषभेंत असल्यामुळें बुध आणि चंद्र हे पंचमांत आहेत. त्यांत बुध मध्याजवळ आहे व चंद्र भावारंभाच्या ५ अंश मात्र पुढें आहे.

षष्ठ भावारंभ मिथुनेंत असल्यामुळें रवि षष्ठ स्थानीं आहे व तो मध्याच्या अलीकडेच आहे.

अष्टम भावारंभ कर्क राशीच्या २५ अं. त असल्यामुळें मंगळ सप्तमांत येतो.

या प्रमाणें भावचलित कुंडली आहे.

हा गृहस्थ सुमारें ६।७ वर्षांचा असतां एके दिवशीं बाप नदीवर धोतरें धूत असतांना एकदम खोल पाण्यांत पडला !

बापाचा मृत्यु शके १८११ चै० व. ९ मध्यें झाला. यांचे लग्नास फार अडचणी आल्या. दोन वेळां लग्न नक्की ठरलें असून लग्नाचे पूर्वी मुलीच मृत्यु पावल्या ! ता. ९ माहे मार्च्य १९०१ रोजीं लग्न ठरलें. परंतु ६।७ दिवस लग्न असतां मुलीकडे अशौच्य आल्यामुळें लग्न राहिलें. अखेरीस ता. १६ मार्च्य १९०१ रोजीं सकाळीं लग्न झालें. [या दिवशींसुद्धां लग्न राहण्यासारखी अडचण होतीच !]

ता. ३१-८-०४ रोजीं पत्नीस ज्वर झाला. या वेळीं तिला दुसऱ्या ठिकाणीं नेत असतां गाडीखालीं चेंगरण्याची वेळ आली. परंतु त्यांतून व ज्वरांतूनही बचाव झाला.

ता. ८-५-०६ रोजीं मामा मृत्यु पावला. याचा चांगला आश्रय होता. शेतीची आवड आहे, परंतु नोकरी करितो. नोकरीचा तपशील–

ता. १३-५-०२ रोजीं ॲक्टिंग नेमणूक.

ता. १३-१२-०२ रोजीं कायम.

ता. ३-१०-०४ „ प्रमोशन

ता. १-५-०५ रोजीं बदली व ॲक्टिंग प्रमोशन.

जानेवारी १९०७मध्यें बदली

जुलई १०९७मध्यें कायम प्रमोशन.

बहीण नाहीं. एक धाकटा भाऊ आहे. आई आहे या कुंडलींत भाला योग दिसतो. परंतु हा लहानपणीं गरीब स्थितींत असून हल्लीं साधारण स्थिति आहे कलावें लोभ-

असावा हे विनंति.–

आपला.
एक वर्गणीदार

* कुंडली स्पष्ट कळण्यासाठीं ती अशी मांडली आहे.



आमच्या वाचकांस माहित आहे कीं, धनु राशि अपघात करणारा राशि आहे. सप्तम स्थानीं कर्क या जल राशींत मंगळ आहे तो पाण्यांतले अपघातास कारण आहे. कारण त्याची लग्नावर व लग्नस्वामी जो गुरु त्यावर पूर्ण दृष्टि आहे. षष्ठस्थानीं रवि आहे. या राशींत ६।७ वर्षांचें वय असतां शनि होता. रवीजवळ शनि गेला ह्मणजे बहुधा अपमृत्यु होत असतात. त्याप्रमाणें पाण्यांतला अपमृत्यु झाला !

सन १८७९मध्यें बापाचा मृत्यु झाला. या वेळीं शनि मेष राशींत होता. ही साडेसातीचा आरंभ होय. या वेळीं रवि हाही त्याच राशींत असेल राहु कुंभ राशींत कुटुंबस्थानीं होता. दशेश कन्येंत पितृस्थानीं होता. मंगळ कुटुंबस्थानींच होता. ह्मणजे राहू व मंगळ हे रवीच्या पितृस्थानीं व चंद्राच्या दशमांत होते. दशमाचा अधिपति शुक्र हा शनीनें दूषित झाला होता. ही पितृनिधनाची स्थिति ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

सप्तमांत मंगळ आहे व कुटुंब स्थानीं राहु असून सप्तम स्थानाच्या दोहों अंगांस पाप ग्रह आहेत. त्यामुळें विवाहांत भानगडी उत्पन्न झाल्या. ११ मार्च्यमध्यें शनि व गुरु हे दोन्ही गोल मकर राशींत होते.

यांपैकीं शनि हा जन्मकाळच्या मंगळाच्या अगदीं समोर होता, ह्मणून एकवेळ लग्न राहिलें. व दुसऱ्या वेळीं झालें. या कालीं मंगळ जन्म-कालच्या समोर होता.

१९०४ च्या आगष्ट अखेर मंगळ अष्टमांत होता. व शनि कुटुंब स्थानीं कुंभेत होता. व हे दोन्ही ग्रह समोरासमोरच्या राशींत होते' या वेळीं स्त्रीकष्ट झाले आहेत.

१९०६ च्या जूनमध्यें मंगळ षष्ठ स्थानीं होता. या स्थानावर मामाचा विचार होतो. ह्मणून यावेळीं मामा मृत्यु पावला.

कुंडलींत मालायोग नाहीं. मालायोगांत एकेकटा ग्रह असावा लागतो १९०२ मध्यें गुरु कुंभ राशींत धनस्थानीं आहे. १९०४ मध्यें चतुर्थ स्थानीं आहे. १९०५ मध्यें पंचमांत व १९०७ मध्यें सप्तमांत आहे. या प्रमाणें कुंडलीचा अनुभव सशास्त्र मिळाला आहे.

'ए. कुं. वि.'

प्रकारचें साम्य दृष्टीस पडतें आणि ज्या कालीं विवाह झाला, त्या कालीं त्यांच्या कुंडल्यांत ग्रहांचे योग कसे असतात या दोन गोष्टींचें विवेचन पूर्वी बरेंच झालें आहे, व तें खरें आहे, असाही अनुभव सर्वांनीं घेतला आहे. परंतु त्याचा भविष्याशीं मेळ बसत नाहीं, असें जें कित्येकांचें ह्मणणें आहे तें खरें आहे. दांपत्य योग दृष्टीस पडला, ह्मणजे तीं नवरा बायको आहेत किंवा होतील असें खात्रीनें सांगतां येत नाहीं. वधू वरांमध्यें दांपत्ययोग दृष्टीस पडतात, पण त्यांचा विवाह होत नाहीं. अथवा होईलच असें खात्रीनें सांगतां येत नाहीं. त्यामुळें दांपत्ययोगांचा लग्न जुळविण्याच्या कामीं उपयोग होत नाहीं, ही गोष्ट कांहीं अंशीं खरी आहे.

विवाहकालीं ज्या प्रकारची ग्रह स्थिति आली पाहिजे तशी येऊनही विवाह होत नाहीं हें ही ह्मणणें खोटें नाहीं. ज्योतिःशास्त्राची आजची स्थिति पंगू आहे. ज्योतिषी अनुमान करितो, पण अनुमानाप्रमाणें होतेंच अशी आज या शास्त्राची स्थिति नाहीं. पण अनुमानाप्रमाणें होणारच नाहीं असेंही ह्मणतां येत नाहीं. कारण अनेक प्रसंगीं अनुमानाप्रमाणें त्या त्या वेळीं गोष्टी घडतात, असा अनुभव येतो. आह्मीं विवाहाच्या तिथि व वेळाँही जुळवून दिल्या आहेत, हें आमच्या वाचकांस माहित असेलच. ह्मणून विवाहकालाचे नियम सर्वथा अशक्य आहेत असें ह्मणतां येणार नाहीं. विवाहकाल हा केवळ वधूच्या अगर वराच्याच कुंडलीवर अवलंबून नाहीं, तो उभयतांस अनुकूल असावा लागतो. ह्यामुळें एकाच कुंडलीवरून केलेलें अनुमान अगदीं बरोबर आलेंच पाहिजे असें कसें ह्मणतां येईल ?

दांपत्ययोग काय किंवा विवाह-काल काय, यांत आपणास इतकें ज्ञान झालें पाहिजे कीं वधू किंवा वर यांपैकीं कोणाच्याही कुंडलीवरून 'अमुकच एका प्रकारचा योग जमला पाहिजे.' परंतु हें ज्ञान मनुष्यास प्राप्त होईल कीं नाहीं. याबद्दल शंका आहे. ही अतींद्रिय-शक्ति प्राप्त करून घेण्यास आपणास तपश्चर्या करावी लागेल. कित्येक वर्षे रात्रंदिवस या गोष्टीच्या चिंतनांत [तपश्चर्येत] घालविलीं पाहिजेत.

असो. खालीं दिलेल्या एका मुलीची कुंडली पहा. या मुलीला जो वर पाहिला होता, त्याची कुंडली हिच्या कुंडलीशीं मिळती असूनही विवाहयोग घडून आला नाहीं. त्याचप्रमाणें हिचा विवाह अमुक कालीं होईल असें दोन वेळ सांगितलें असून तें जुळलें नाहीं. ह्मणून आज तिसऱ्या खेपेस तिच्या कुंडलीचा विचार करावयाचें ठरविलें आहे. हीं कुंडली आमच्या वर्गणीदारांपैकीं पुणें येथील एका वर्गणीदाराच्या क-न्येची आहे.

जन्म—ता. २६ नवंबर १८९४ सकाळीं
११ वाजून २० मि.

वरील कुंडली सायन आहे. लग्न २३ अं. आहे. व मीन राशि लग्नांत पूर्ण आहे. ह्मणून मीन राशीपासून ही कुंडली मांडली आहे.

रूप. अ

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.
ध.	बृ.	मे.	वृ.	क.	ध.	वृ.	मी.	बृ.
४	२१	२१	१४	४व.	२	२	२७	२१

लग्नेश-गुरु. कुटुंबेश-मंगळ. सप्तमेश-बुध. लग्नेश गुरु असून तो पं-चमांत जन्मकालीं उच्च असल्यामुळें त्या राशींत गुरु आला असतां विवाह झाला पाहिजे हें ह्मणणें चुकीचें नाहीं. परंतु त्या वेळीं विवाह झाला नाहीं ! आतां सिंह राशींत आला आहे. ह्मणजे जन्मगुरूच्या तो कुटुंब स्थानीं आला आहे. विवाहकारक ग्रह विवाहकालीं स्वस्थानीं किंवा

आपल्या कुटुंब अगर सप्तम स्थानीं, लग्नीं, कुटुंबस्थानीं किंवा जायास्थानीं असतो असा सामान्य नियम आहे. त्या नियमास अनुसरून गुरु हा या पुढे आपल्या कुटुंब स्थानीं आला आहे, ह्मणून तो विवाहयोग्य स्थितींतून गेला नाहीं. आतां शके १८२९ मधील विवाहमुहूर्त पडताळून पाहून दिवस कायम करूं.

मार्गशीर्ष.

शु. ३ ता. ८ डिसेंबर	कृ. ४ ता. २३ डिसेंबर
शु. १० ता. १४ ,,	कृ. ५ ता. २४ ,,
शु. १४ ता. १८ ,,	कृ. ७ ता. २७ ,,
	कृ. १० ता. ३० ,,

आतां, १९०७ च्या स्प. ग्र. च्या पुस्तकावरून या प्रत्येक दिवशींचें ग्रह कसें आहेत, ते पाहूं.

डिसेंबरमध्यें गुरु वक्री आहे. जन्मकालचा गुरु वक्रीच आहे, ह्मणून वक्री गुरु असतांच विवाह झाला पाहिजे असें एक मतानें वाटतें. यां महिन्यांत ता. ११ पासून बुध धनु राशींत जातो. १२ व्या, तारखेला तो जन्मशुक्राच्या अगदीं जवळ जातो. मंगळ मीनेंत तनुस्थानीं जातो. शुक्र हा जन्मशुक्राच्या कुटुंबस्थानीं व जन्म-गुरूच्या सप्तम स्थानीं जातो. यांत गुरु, बुध व शुक्र हे तीन ग्रह असावे तशा स्थितींत आहेत. पण मंगळ नाहीं. ता. ८ डिसेंबरला चंद्र मकरेंत असून १४ वीला मेषेंत आहे. १८ वीला मिथुनेंत आहे. २३ला सिंहेंत, २४ ला सिंहेत, २७ कन्येंत व ३०ला वृश्चिकेंत आहे. ह्मणून या सर्व तारखांस चंद्र अनुकूलच आहे. या सर्व गोष्टींचा विचार करितां डिसेंबरमध्यें बऱ्याच अंशीं विवाह व्हावा असें वाटतें. तसें झाल्यास तो ता. १४ ला होईल असें अनुमान करितों.

मुलीचा बापही ज्योतिषी आहे. त्याच्या मतें फेब्रुवारी १९०८ च्या १० वीला अगर १२ वीला होईल. या वेळीं कुटुंबेश मंगळ कुटुंब स्थानीं, सप्तमेश बुध हा लग्नी, शुक्र लग्नीं, आपल्या उच्चांत शनीशीं

युत व चंद्र आपल्या सप्तमांत (वृषभेंत) आहे. ह्मणून या वेळीं विवाह व्हावा. या महिन्यांतही गुरु वक्रीच आहे.

परंतु आह्मांस असें वाटतें कीं, जन्मकाळीं बरेच ग्रह उदिताधीत आहेत. ह्मणून तसे असतांच विवाह झाला पाहिजे. हा विवाह नवंबरच्या २४ तारखेच्या पुढें जुळेल, इतकें भविष्य करून हा विषय आज पुरा करूं.

---

[२]

जन्म—ता. ७ माहे जून सन १८८६ सोमवार रा. ४ वाजून ४८ मि.

सायन

लग्न–मिथुन ७ अंश.

स्पष्ट ग्रह.

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.
मि.	सिं.	क.	मि.	क.	वृ.	क.	क.	तू.
१६	२४	१८	११	२६	४	८	११	३

ही एका मुलाची कुंडली आहे. याचा विवाह कधीं झाला असेल, हें ठरविणें आहे.

नक्षत्रात्मक ग्रह.

र.	चं.	मं.	बुध	गुरु	शुक्र
आर्द्रा	पूर्वा	हस्त	आर्द्रा	चित्रा	कृत्तिका
शनि.	राहू	हर्शल			
पुष्य.	हस्त.	चित्रा.			

लग्नस्वामी–बुध. जायास्वामी–गुरु. कुटुंबस्वामी—चंद्र. जन्मकाळीं २व.९ म. ९दि. शुक्राची महादशा आहे. पुढें ६ वर्षें रवीची व नंतर १० वर्षें चंद्राची महादशा आहे. यावरून याचा विवाह चंद्राच्या महादशेंत झाला पाहिजे, असें अनुमान होतें. चंद्र हा कुटुंबेश असून शुभ ग्रह आहे. ह्मणून हीच महादशा विवाहाची दिसते. या पूर्वीची रवीची महादशा वयाच्या ८ व. ९ म. ९ दि. पर्यंत आहे. हा काल उच्च वर्णाच्या जातींत विवाहाचा नाहीं. चंद्रमहादशा १८ व. ९ म. ९ दि. पर्यंत आहे. ह्मणून १९ वर्षांच्या आंत विवाह झाला पाहिजे असें एक दशांवरून अनुमान झालें.

चंद्र महादशेंत शनि वृश्चिक, धनु, मकर व कुंभ इतक्या राशींवर संभवतो. यांतील वृश्चिक आणि धनु हे राशि शनीला चांगले नाहींत. मकर आणि कुंभ हे मात्र संभवनीय आहेत. या दोहोंतही कुंभ हा राशि अधिक संभवनीय आहे. कारण, त्या राशींत शनि बलवान् असतो, आणि तो राशि भाग्यस्थानीं असून चंद्राच्या जायास्थानीं आहे, ह्मणून कुंभ राशीच्या शनीवरच विवाह संभवतो, सन १९०३ च्या फेब्रुवारीपासून सन १९०५ च्या मेपर्यंत शनि कुंभेंत आहे.

आतां या कालांत गुरु कोण कोणत्या राशीवर आहे, तें पाहूं. १९०३ मार्च्यपासून मीनेंत, १९०४ मार्च्यपासून मेषेंत व १९०५ एप्रिल पासून वृषभेंत गुरु आहे. यांतील मीन हा गुरूच्या समोरचा राशि आहे, व वृषभ हा शुक्रराशि आहे. ह्मणून या दोहोंपैकीं कोणत्या तरी राशीवर विवाहकाळीं गुरु पाहिजे. यांतील दुसऱ्यापेक्षां पहिलाच अधिक संभवनीय आहे. [विवाहकालचे नियम पहा] ह्मणजे शके १८२४ च्या फाल्गुनापासून १८२५ च्या फाल्गुनी १५ पर्यंतचे विवाहमुहूर्त पाहून

त्यांवरून निश्चयात्मक महिना व दिवस ठरविला पाहिजे.

शके १८२४ चा फाल्गुन

कृ. ३ ता. १६ मार्च्य. कृ. ५ ता. १८ मार्च्य. कृ. ६ ता. १९ मार्च्य व कृ. ८ ता. २१ मार्च्य हे विवाहाचे मुहूर्त आहेत.

या महिन्यांत ता. १५ पासून बुध मीनेंत आहे. व ता. १९ ला तो गुरूच्या जवळ आहे, ह्मणून विवाहयोग्य स्थितींत आहे. या कालीं विवाह होणारच नाहीं, असें खात्रीनें सांगण्यास आपणाजवळ आधार नाहीं. पण हें अनुमान चुकलें आहे. विवाह या कालीं झाला नाहीं. तो शके १८२५ माघ व. ७ ता. ८ फेब्रुवारी १९०४ या दिवशीं झाला आहे. या दिवशींचे ग्रह येणेंप्रमाणें:-

र.	चं.	मं.	बु.	गु.
कुं	वृ	मी	म	मी
१८	१९	१५	२२	२५

शु.	श.	रा.	ह.
म.	कुं.	क.	ध.
११	१२	२९	२८

लग्नस्वामी बुध हा मकरेंत अष्टम स्थानीं आला आहे ! हें स्थान कुटुंबस्थानाच्या समोरचें आहे, ह्मणून बुधाचें ह्या ठिकाणीं आगमन उक्त आहे. या बुधाच्या कुटुंबस्थानीं शनि होता. तसाच विवाहकालीं आहे ! जणूं काय विवाहकालीं जन्मकालाप्रमाणेंच बुध व शनि यांचा योग झाला पाहिजे होता. चंद्र वृश्चिक राशींत शुक्राच्या सप्तमांत आहे.

जन्मकालीं कुटुंबस्थानीं शनि आहे, तो व मंगळ हे ग्रह स्त्रीमारक आहेत. विवाहकालीं गुरु हा मंगळानें युक्त आहे. जन्मकालींही तसाच होता ! ह्मणून याची स्त्री शके १८२८ ज्ये. शु० १५ ता. ६ जून १९०६ या दिवशीं मयत झाली ! या तारखेचे ग्रह येणेंप्रमाणें आहेत:—

र.	चं.	मं.	बु.	गु.
मि.	ध.	मि.	मि.	मि.
१४	९	२६	११	१७

शु.	श.	रा.	ह.
क.	मी.	सिं.	मं.
१२	१७	१४	७ व

तनुस्थानीं रवि, मंगळ, बुध, गुरु इतके चार ग्रह आहेत. यांत

जायास्वामी गुरु हा रवि व मंगळ या दोन पाप ग्रहांच्या मध्यें सांपडला आहे. जन्मकालीं, विवाहकालीं आणि ह्या स्त्रीच्या निधनकालीं गुरु हा मंगळानें दूषित झाला ! शनि हा जन्मकालच्या गुरूच्या सप्तमांत आहे. राहू हा कुटुंब स्वामी जो चंद्र ह्या राशींत आहे आणि हर्शल हा कुटुंब स्थानाच्या व शनीच्या समोर वक्री आहे. हे सर्व पाप ग्रह स्त्रीनिधनास योग्य असे आहेत, हें उघड आहे.

या गोष्टींवरून आपणांस एक बोध घेतां येईल. तो असा कीं, जर जन्मकालींच स्त्रीला मारक पाप-ग्रह असतील, तर त्याचा विवाह अशा कालीं केला पाहिजे कीं त्या कालीं स्त्रीमारकयोग नसेल. प्रथम विवाहाच्यावेळीं जायास्वामी हा मंगळानें दूषित होता. ह्मणून मिथुन कर्क, धनु, मकर, कन्या आणि मीन या व गुरु ज्या राशींत असेल त्या राशींत मंगळ असतां दुसरा विवाह करितां कामा नये.

---

[३]

जन्म—ता. ६ मे सन १८८५
सकाळीं ६ वाजून १८ मि.

सायन



द्वादशभाव.

लग्न–वृषभ२८	जाया–वृश्चिक२८
धन–मिथुन२५	मृत्यु—धनु२५
सहज–कर्क२०	धर्म—मकर२०
सुख–सिंह१७	कर्म—कुंभ१७
सुत–कन्या१८	आय–मीन१८
रिपु–तूळ२२	व्यय–मेष२२

वृषभ राशीचे शेवटले अंश उदित असल्यासुळें मिथुन लग्नापासून कुंडली मांडिली आहे.

स्पष्ट ग्रह.

र.	चं.	मं.	बु.	गु.
वृ.	कुं.	मे.	वृ.	सिं.
१५	१	२७	३ व	२६

शु.	श.	रा.	ह.
वृ.	मि.	तू.	क.
१६	२२	२	२९

गुरु सिंहेचा चतुर्थ स्थानीं व हर्शल कन्येचा पंचमांत येतो हें भावचलित कुंडली मांडिल्यानें ध्यानांत येईल.

ही एका स्त्रीची कुंडली आहे. हिचा विवाह कधीं झाला असेल हें आपणास शोधावयाचें आहे. ही ब्राह्मणाची मुलगी असल्यामुळें ९ वर्षांपासून १२ अगर शिकस्त १५ पर्यंतच्या कालांतला कोणता काल हेंच मुख्यतः ठरवावयाचें आहे.

महादशा.

मंगळ २ व. १० म. जन्मकालीं नंतर १८ वर्षें राहूची महादशा आहे. ह्मणजे विवाहकाल राहूच्या महादशेंत येतो !

लग्नस्वामी–बुध. कुटुंबस्वामी–चंद्र जायास्वामी–गुरु.

नववें वर्ष १८९३ च्या मेंत बसतें या वर्षी सप्टंबरपासून गुरु मिथुनेंत आहे. या राशींतला गुरु हा चंद्राला ५ वा आहे. म्हणून या गुरूवर विवाह संभवतो. परंतु याही पेक्षां तो कुटुंबस्थानीं असतां जास्त संभवतो. असा योग ९४।९५ मध्यें आहे, ९४ मध्यें मिथुनेंत कुटुंबस्थानीं गुरु असतां पावसाळा आहे. परंतु ९५ मध्यें तो वक्रगतीनें मिथुनेंत आला आहे. यावेळीं विवाह झाला असावा, असें अनुमान होईल, ता० १० फेब्रुवारी १८९५ या दिवशीं विवाह झाला आहे, या दिवशींचे ग्रह,—

र, चं, मं, बु, ग, शु, श, रा, ह
कुं सिं. वृष; मी. मि. मी वृ. मी. वृ
१९.० १९ ६ २७ ७ ७ २३ १९

या दिवशीं कुटुंबस्वामी चंद्र हा जन्मचंद्राच्या सप्तमस्थानीं व जायास्वामी जो गुरु त्याच्याजवळ आहे. हा ग्रह जन्मकालीं गुरूच्या सप्तमांतील राशींत असल्यामुळें विवाहकालीं तो गुरूजवळ आला हें ठीकच झालें.

लग्नस्वामी बुध हा शुक्रासह मीनेंत आहे. ह्मणजे जन्मचंद्राच्या कुटुंबस्थानीं आहे. व जायास्वामी गुरु हा जन्मबुधाच्या अगर शुक्राच्या कुटुंबस्थानीं व कुंडलींतही कुटुंबस्थानीं आहे. हा ग्रह जर विवाहकालीं कर्क राशींत गेला असता तर तो चंद्राला ६वा झाला असता व बुधशुक्राच्या कुटुंबस्थानीं येणें महत्वाचें होतें, तें साधलें नसतें !

जन्मकालीं बुध शुक्र हे एकत्र होते, तसेच ते विवाहकालींही आले!

गुलिकाचा गडबडगुंडा !

अव्यापारेषु व्यापारं यो नरः कर्तुमिच्छति ॥
स एव निधनं याति कीलोत्पाटीव वानरः ॥

किल्लेकांची अशी समजूत आहे कीं, गुलिक आणि मांदि हे रव्यादि ग्रहांशिवाय आणखी दोन ग्रह आहेत आमच्या वाचकांपैकीं बऱ्याच लोकांनीं आह्मांला असा प्रश्न केला आहे कीं, हर्शल आणि नेपच्यून हे जे दोन ग्रह हल्लीं उपलब्ध झाले आहेत, तेच गुलिक आणि मांदि नसतील कशावरून ? ज्योतिषशास्त्रांतील गोष्टींचें इतकें अज्ञान पाहून फार दुःख होतें ! हें अज्ञान सामान्य लोकांत असल्यास मोठेंसें आश्चर्य नाहीं. पण तें जेव्हां एखाद्या नामांकित ज्योतिष्याच्या ठिकाणीं आढळतें, तेव्हां तर त्याची अत्यंत कींव येते ! अशा ज्योतिर्विद ग्रंथकारांनीं एकदां 'पांचांनीं गुणून आठांनीं भागावें' असें तर दुसऱ्यावेळीं जरा शुद्धीवर येऊन "नव्हे नव्हे, या रीतीपेक्षां दहांनीं गुणून सोळांनीं भागावें, ही रीति सुगम आहे" असें ह्मणावें ही गोष्ट अत्यंत शरमेची तर खरीच पण त्यांचा अभिमान बाळगणाऱ्या सर्व समाजासही खालीं मान घालावयास लावणारी आहे, यांत शंका नाहीं. असो आज आमच्या समजाप्रमाणें गुलिक व तो तयार करण्याच्या रीतींची उपपत्ति यांची माहिती देण्याचें योजिलें आहे, त्याचा वाचकांनीं नीट विचार करावा व त्यांत दोष आढळल्यास इकडे कळवावा अशी विनंति करितों.

गुलिक, गुळिक व **कुलिक** असे याचे तीन पर्याय निरनिराळ्या ग्रंथांत आढळतात. जैमनीय सूत्रांत **गुलिक** असें ह्मटलें आहे. सर्वार्थचिंतामणींत **गुळिक** असें नांव आहे व मुहूर्तमार्तंडांत **कुलिक** असें

त्यासच झटलें आहे ! नांवांत असा घोटाळा कां असावा, समजत नाहीं. कोणी 'सुमंग' ह्मणतो, तर कोणी त्यासच 'सुसंग' ह्मणतो आणि तिसरा तर 'घुमस' म्हणतो ! जर हा शब्द संकृत आहे, तर यांत घोटाळा असूं नये. यावरून तो परकी भाषेतला शब्द असावा, असा संशय येतो. संस्कृतांत **कुलिक** असा पुल्लिंगी शब्द आहे, याचा अर्थ—शिल्पी कुलांत मुख्य–असा आहे. परंतु हा अर्थ एथें संभवनीय दिसत नाहीं. दुसरा **गुली** असा स्त्रीलिंगी शब्द आहे. त्याचा अर्थ—एका प्रकारचा रोग–असा आहे. या शब्दावरून जर **गुलीक** असा शब्द झाला असेल तर रोग उत्पन्नकर्ता [दुःखं दिनेशात्मजः] ग्रह जो शनि त्याचा अंश तो गुलिक अशी त्याची उपपत्ति होते. हा अर्थ संभवनीय आहे, परंतु 'लि' ह्रस्व कां झाली, यांचें कारण सांगतां येत नाहीं. यावरून हा शब्द परकीच असावा, असें वाटतें.

प्रथमतः गुलिक घटीपलात्मक करावयाचा व नंतर त्या घटीपलांवरून राश्यात्मक करावयाचा, अशी यांची दोन अनुक्रमें कृत्यें आहेत. मुहूर्त प्रकरणांत राश्यात्मक गुलिक करण्याची विशेष जरूरी नसते, पण जातक प्रकरणांत तो राश्यात्मक लागत असतो. एरवीं तो कुंडलींत मांडितां येत नाहीं. ह्मणून प्रथम घटीपलात्मक गुलिक कसा करावयाचा तें सांगून नंतर राश्यात्मक गुलिकाचा विचार करूं.

मुहूर्तमार्तंड

या ग्रंथांतील गुलिकाचे दिवसाचे व रात्रीचे ध्रुवक असे आहेत.—

दिवा

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.
१४	१२	१०	८	६	४	२

रात्रौ

१३	११	९	७	५	३	१

संख्याकं कुलिकं दिवेंद्रवि
द्विड्नागर्तुवेदद्धिकम् ॥
व्येकं तन्निशि षोडशांशमपरे
लिप्त्यंशमुज्झंति तैः ॥

असा मूळचा श्लोक असून त्यावर पुढीलप्रमाणें टीका आहे. ॥ अथ

कुलिकादीनाह ॥ इनादौ सूर्यादौ वारे दिवा इंद्रादिकं षोडशांशं दिनमानस्य षोडशांशो ग्राह्यः तेन गण्यास्ते षोडशांशा ग्राह्या इत्यर्थः । तंकुलिकमुज्झंति अपरे तिथ्यंशं पंचदशांशं कुलिकमुज्झंति । तन्निशि तद्रात्रौ च व्येकं एकरहितं इंद्रादिकं षोडशांशं पंचदशमुज्झंति । तद्यथा । रवौ दिवा इंद्रमितं चतुर्दशं तद्रात्रौ त्रयोदशं सोमे दिवा द्वादशं तद्रात्रौ एकादशमित्यादि ॥

या ग्रंथाचें विष्णु वासुदेवशास्त्री जोशी यांनीं मराठींत भाषांतर केलें आहे. यांत वरील श्लोकाचा अर्थ देतांना " कोणी दिनमानाचे १६ भाग करितात, कितीएक १५ भाग करितात. प्रत्येक भाग मुहूर्त होय " असें झटलें आहे ! वरील टीकेंतून हा अर्थ निघणें शक्य नाहीं. दिनमानाचे १६ भाग करून त्यांचें काय करावयाचें, षोडशांशांचा आणि वाराच्या वरील ध्रुवकांचा संबंध काय हें यावरून कळत नाहीं. ह्मणून या ग्रंथाच्या मराठी भाषांतराच्या पुस्तकावरून कुलिक तयार करितां येणें शक्य नाहीं.

सर्वार्थचिंतामणि

यांत गुलिका विषयीं एकाच अर्थाचे दोन श्लोक आहेत. पहिल्यांत गुलिक असा शब्द वापरला असून दुसऱ्यांत मांदि असा शब्द आहे. दुसरा श्लोक मागाहून कोणी तरी त्यांत घुसडला असावा. ग्रंथकाराला एकाच अर्थाचे दोन श्लोक देण्याचें कारण नाहीं. ते श्लोक असे.—

तरु २६ खर २२ जय १८ भय १४ नृप १० तनु ६ खनि २
नाड्यो भास्करादि वारेषु ॥
दिनमानघटी गुणिता नाग ३० हृता गुलिकनाडिकाः स्पष्टाः ॥९३॥
चंद्र २६ रुद्र २२ जय १८ वेद्य १४ नृपा१० तोना ६ खु २
नाडिनिहतादिनमानात् ॥
नाग ३० लब्धमितमांदिघटी स्याल्लग्नवत्स्फुटमिहानयेत्तदा ॥९४॥

यांतील संख्यावाचक शब्द 'कटपयादि' संज्ञक आहेत, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. जैमिनीयसूत्रांत याच पद्धतीचा स्वीकार केलेला आहे.

या संज्ञा वाचकांच्या समजुतीसाठीं ऐथें देतें.-

क, ट, प, य असे वर्णांचे मुख्य चार वर्ग केले आहेत. यांतील क पासून ट पर्यंत १० वर्ण आहेत. तसेंच ट पासून प पर्यंतही तितकेच वर्ण आहेत. व प पासून य पर्यंत ५ आणि पुढें य, र, ल, व, श, असे ५ वर्ण आहेत. प्रत्येक वर्गातील पहिल्या अक्षराचा अंक १ समजून पुढील अंक वर्णानुक्रमानेंच घ्यावयाचे. त्यांत ञ आणि न यांची संख्या ० समजावयाची. संख्यावाचक शब्दांतील स्वरांना कांहीं किंमत नाहीं. ते फुकट आहेत असें समजावें. जोडाक्षर असेल, तेव्हां पूर्ण अक्षराची मात्र संख्या घ्यावी. जसें— पहिल्या श्लोकांतील **तरु** हा शब्द घ्या. यांत त=६ व र=२ हे अंक उजवीकडून डावीकडे मांडिले, तेव्हां तरु ह्मणजे २६ ही संख्या झाली. (संस्कृतांत संख्या उजवीकडून डावीकडे मांडितात. 'अंकानां वामतो गतिः' **चंद्र** यांत च=६ र=२ ह्मणून चंद्र=२६ ही संख्या झाली.

दुसऱ्या श्लोकांत नृप=१० अतः=६ न=० आखु=२ असें आहे. **फलज्योतिषादर्श** पुस्तक १ अंक २ पृ० ४० यांत हाच श्लोक घेतलेला आहे. पण 'नृपातोनाखु' याच्या ठिकाणीं 'नया १० तो ६ ताखु २' असे शब्द घातलेले आहेत. पण ताखु ह्मणजे २ कसे होतात ही शंका **ज्योतिर्विभूषणांना** मुळीं आलीच नाहीं ! त=६ ख=२ ह्मणून ताखु=२६ ही संख्या होते. दुसरें, ताखु या शब्दालाही कांहीं अर्थ दिसत नाहीं. ह्मणून त्या ठिकाणीं **नाखु** असेंच पाहिजे, हें उघड आहे. ताखु हा पाठ अज्ञानदर्शक व ह्मणूनच चुकीचा आहे, इकडे आमचे वाचक लक्ष देतील अशी आशा आहे.

वरील श्लोकांवरून गुलिकाच्या घटिका काढण्याची पद्धति अशी—

वारांचे ध्रुवक

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.
२६	२२	१८	१४	१०	६	२

ज्या वाराचा गुलिक तयार करावयाचा असेल, त्याच्या ध्रुवकानें त्या

दिवशींच्या दिनमानास गुणून ३० नीं भागावें, ह्मणजे भागाकाराइतक्या गुलिकाच्या घटिका होतात. हें समजण्यास सोपें असल्यामुळें उदाहरण देत नाहीं.

जैमिनीय सूत्र

यांतील टीकेवरून गुलिकाची उत्पत्ति व त्याच्या घटिका आणण्याचें बीज यांचें स्पष्ट ज्ञान होतें. ती टीका अशी.—

प्रथमाध्याय द्वितीय पाद सूत्र २९ वें

टीका— 'रव्यादिसप्तवारेषु दिनमान मष्टधा विभज्य तत्तद्वारे एकं प्रथमखंडाधिपं कृत्वाऽग्रिमखंडेषु तत्तद्वारेशादग्रिमग्रहात् क्रमेणैकत्वेन ज्ञानीयादष्टमः खंडस्तु निरीशः ॥ एवंच सप्तसु वारेषु शन्यंशो गुलिकनामा ॥ तथाच रविवारे सप्तमः सोमे षष्ठः भौमे पंचमः बुधे चतुर्थः गुरौ तृतीयः शुक्रे द्वितीयः शनौ प्रथमः खंडो गुलिका भवति ॥ सप्तस्वपि वारेषु रात्रिमानमष्टधा विभज्य तद्वारेशात्पंचमाद्याः खंडाधिपाज्ञेयाः रात्रावप्यष्टमः खंडो निरीशः एवंच रविरात्रौ तृतीयः खंडः सोमे द्वितीयः भौमे प्रथमः बुधे सप्तमः गुरौ षष्ठः शुक्रे पंचमः शनौ चतुर्थः खंडो गुलिका भवंति ॥ गुलिकादीनां स्पष्टीकरणं तु ॥ स्वस्वदेशलग्नप्रमाणानुसारेण तत्तत्खंडकालान्तलग्नानि स्पष्टानि कृत्वा गुलिकादि स्पष्टलग्नैकस्यांशोऽस्ति ॥

अर्थ.— ज्या वारी जें दिनमान असेल त्याचे ८ भाग करून पहिल्या भागाचा स्वामी जो वारस्वामी तोच होतो. दुसऱ्या भागाचा त्याच्या पुढील वाराचा स्वामी तो स्वामी होतो. याप्रमाणें पुढील भागाचे स्वामी जाणावे. ग्रह ७ असून भाग ८ आहेत. ह्मणून ८ व्या भागाला स्वामी नाहीं असें समजावयाचें. यांतील जो शनीचा भाग तोच गुलिक होय. जसें रविवारीं १ ल्या भागाचा स्वामी रवि. २ ऱ्या भागाचा स्वामी चंद्र. ३ ऱ्या भागाचा स्वामी मंगळ. ४ थ्या भागाचा स्वामी बुध. पांचव्याचा स्वामी गुरु. ६ व्याचा स्वामी शुक्र व ७ व्याचा शनि. ८ व्या भागाला स्वामी नाहीं. ह्मणून रविवारीं ७वा भाग तो गुलिक होय, कारण त्याचा स्वामी शनि आहे. याचप्रमाणें सोमवारीं ६ वा, मंगळवारीं ५ वा बुधवारीं ४ था, गुरुवारीं ३ रा,

*

शुक्रवारीं २ रा आणि शनिवारीं १ ला भाग गुलिकसंज्ञक जाणावा. हा प्रकार दिवसाचा आहे. रात्रीं वाराच्या स्वामीपासून ५ वा जो ग्रह तो त्या वाराच्या रात्रीच्या १ ल्या भागाचा स्वामी होतो. [रात्रीमानाचेही ८ भाग करितात.] ह्मणून रविवारीं रात्रीं पहिल्या भागाचा स्वामी रवीपासून ५ वा वार जो गुरु तो होतो. २ ऱ्या भागाचा शुक्र. ३ ऱ्या भागाचा शनि. ह्मणून रविवारीं रात्रीं ३ रा भाग गुलिकसंज्ञक झाला. याचप्रमाणें सोमवारीं २रा. मंगळवारीं १ला. बुधवारीं ७ वा, गुरुवारीं ६ वा. शुक्रवारीं ५ वा व शनिवारीं ४ था भाग तो गुलिकसंज्ञक होतो.

वरील वर्णनावरून गुलिक हे नांव शनीच्या भागाला आहे. मंद ह्मणजे शनि, ह्मणून शनीच्या भागाला मांदि हेंच नांव आहे. अर्थात गुलिक आणि मांदि एकच आहेत. हे ग्रह नाहींत. दिवसाच्या विशेष प्रकारच्या विभागांचीं हीं नावें आहेत.

जैमिनीय पद्धतीनें गुलिकाच्या घटिका करावयाच्या त्या अशा कीं दिनमानाचे ८ भाग करून ज्या भागीं गुलिक असेल त्या भागाच्या अंतापर्यंतच्या ज्या घटी त्या गुलिकघटी जाणाव्या. उदाहरण– रविवारचा दिवसाचा गुलिक करावयाचा आहे. तर त्या दिवशीं दिनमान ३२ घ. आहे, असें कल्पूं. याचे ८ भाग केले, ह्मणजे प्रत्येक भाग ४ घ. चा झाला. रविवारीं ७ व्या भागाला गुलिक असतो, ह्मणून ७×४=२८ घ. या गुलिकांच्या घटी झाल्या. या रीतीनें वाटेल त्या वेळचा गुलिक करितां येईल. सुगमतेसाठीं गुलिकभाग देतों ते पहा.—

दिवा.

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.
७	६	५	४	३	२	१

रात्रौ

३	२	१	७	६	५	४

यांत रात्रीच्या भागांना नांवें देतांना त्या वाराच्या पहिल्या भागाला ५ व्या वाराचें नांव देण्याचें, कारण काय याचा उलगडा होत नाहीं.

मुहूर्तमार्तंडांत शनिवार दिवसाचे

ध्रुवक २ दिले आहेत. यांस दिवसाचे षोडशांशानें गुणावयाचें आहे. ह्मणजे $\frac{२}{१}\times\frac{दि}{१६}=\frac{दि}{८}$ असें झालें. ह्मणजे जैमिनीय सूत्राप्रमाणेंच दिनमानाचे ८ भाग केल्यासारखें झालें. मागील उदाहरणांत दिनमान ३२ घटिका धरून रविवारचा घट्यात्मक गुलिक केला आहे, तोच या रीतीनें कसा येतो पहा.— रविवारचे ध्रुवक १४ आहेत. ह्मणून $१४\times\frac{३२}{१६}=२८$ घ. मागील रीतीप्रमाणेंच आल्या. एथें दिनमानास १६ नीं भागून नंतर १४ नीं गुणिलें काय किंवा दिनमानास ८ नीं भागून नंतर ७ नीं गुणिलें काय फल एकच. ह्मणून दिवसाच्या गुलिकाच्या रीति दोन्ही ग्रंथकारांच्या तत्वतः एकच आहेत, असें सिद्ध झालें.

रात्रीचा गुलिक काढण्याच्या पद्धतींत मात्र अंतर आहे. मार्तंडकारांनीं रात्रीचा गुलिक काढितांना रात्रीमानाचे १५ भाग केले आहेत, असें वाटतें. कारण त्यानें शनिवारीं रात्रीं पहिल्या भागाचा ध्रुवक १ धरिला आहे. या रीतीनें ३० घ. रात्रीमान असतां त्या दिवशीं $१\times\frac{३०}{१५}=२$ घ. गुलिक झाला. शुक्रवारचे ध्रुवक ३ आहेत. ह्मणून $३\times\frac{३०}{१५}=६$ या गुलिकाच्या शुक्रवारच्या घ. झाल्या. या पद्धतींत शनिवारीं दिवसाप्रमाणेंच रात्रीच्याही पहिल्या भागाला गुलिक मानिला आहे. जैमिनीयसूत्रकारांनीं अष्टमाच्या ४ थ्या भागाला मानिला आहे. हा यांत फरक आहे.

सर्वार्थचिंतामणींत दिवसा गुलिक निराळा आणि रात्रीं निराळा असा फरक ठेविलेला नाहीं. दिवसाप्रमाणें रात्रीही एकाच रीतीनें तयार करावयाचा. त्यांतील गुलिकघटी आणण्याच्या रीतीवरून दिनमानाचे १५ भाग करून त्यावरून ध्रुवक बसविले आहेत. उदाहरण– शनिवारीं ३० घ. दिनमान आहे अशी कल्पना करा. शनिवाराचा ध्रुवक २ आहे. ह्मणून $\frac{२\times३०}{३०}=२$ घ. शनिवारचा गुलिक झाला. $\frac{६\times३०}{३०}=६$ घ. हा शुक्रवाराचा गुलिक झाला. यावरून मार्तंडकारांच्या रात्रीच्या गुलिकघटीची रीति आणि सर्वार्थचिंतामणीकारांची दिवसाच्या अथवा रात्रीच्या गुलिकघटीची रीति एकच आहे, असें सिद्ध झालें.

३० घ. दिनमान आहे अशी कल्पना करा. तेव्हां याचा अष्टमांश ३॥ घ. होतो. या कालालाच मुहूर्त अशी संज्ञा आहे. षोडशांश १ घ. ५२॥ प. होतो. व पंचदशांश २ घ. होतो. दोन षोडशांश मिळून एक अष्टमांश होतो. ह्मणून षोडशांशांच्या दोन भागांपर्यंत वाराचा एकच स्वामी असतो. परंतु पंचदशांश पद्धतींत हा नियम राहत नाहीं. या पद्धतीनें रविवारच्या गुलिकाच्या घ. २६ येतात. ह्मणजे पुढील ४ घ. च्या भागास स्वामी नाहीं २२ घ. पर्यंत शुक्र, १८ घ पर्यंत गुरु, १४ घ. पर्यंत बुध, १० घ. पर्यंत मंगळ, ६ घ. पर्यंत चंद्र स्वामी झाला, ह्मणजे २ घ. पर्यंतच वाराचा पहिला स्वामी येतो. याचप्रमाणें सोमवारीं पहा.–

२घ. सोम	१८घ.शु.
६घ. मं	२२घ. श. किंवागुलिक
१०घ.बु.	२६घ. निरीश.
१४घ. गु.	३० घ. रवि.

यावरून ही पद्धति दोषयुक्त आहे. अष्टमांश किंवा षोडशांश पद्धतींत हा दोष नाहीं. असो. गुलिक घटी आणण्याचे तीन प्रकार झाले. एक **मार्तंडप्रकार** दुसरा **चिंतामणीप्रकार** व तिसरा **जैमिनीय प्रकार**

ज्योतिर्विभूषण घोलप यांनीं २ऱ्या अंकांत प्रथमतः आपल्या वाचकांस चिंतामणिपद्धति सांगितली व या पद्धतीचा त्याच अंकांत जन्मलग्न खरें खोटें पाहण्याचा **कस** सर्वथैव खरा ! सर्वथैव खरा !ह्मणून पुढें केला. पुढें त्यांनाच वाटलें कीं हा कस परीक्षा करण्यास बरोबर नाहीं, ह्मणून त्यांनीं अंक ४ पृ.७९ मध्यें **जैमिनीय कस** वाचकांस अर्पण केला. हा अर्पण करितांना त्यांनीं पुढील शब्द वापरले आहेत.

"या प्रमाणें दिवारात्रीं जन्म झाला असतां स्पष्ट गुलिक घटी, पळें तयार करण्याकरितां जैमिनीय सूत्रवृत्तीमध्यें लिहिलें आहे, तें आह्मीं मागें अंक २ पृ. ४० मध्यें जें स्थूल विवरण केलें आहे, त्या पेक्षां चांगलें दिसल्यावरून पुन्हां खुलासा करीत आहों." "**तात्पर्य**– अंक २ मध्यें दिलेल्या रीतीपेक्षां आजची रीति सूक्ष्म असून दिवसा न रात्रीं निरनिराळा गुलिक करण्याचा खुलासा सुगम असल्यामुळें वाचकवर्गानीं या पुढें याच क्रियेचें

अवलंबन करावें"

ज्योतिर्विभूषणांस आमचे असे प्रश्न आहेत कीं, चिंतामणिप्रकार स्थूल कां आणि जैमिनीयप्रकार सूक्ष्म कां ? आह्मांस असें वाटतें कीं मुहूर्तमार्तंडांतील रीति या दोहोंस साधारण अशी आहे. ह्मणजे तींत जैमिनीची रीतही येते आणि सर्वार्थचिंतामणीचीही येते ! तेव्हां तिचेंच अवलंबन कां करूं नये ? जन्मलग्न खरें खोटें पाहण्यासाठीं अमुकच एका पद्धतीनें गुलिक केला पाहिजे, असें कोणत्या ग्रंथांत सांगितलें आहे ? सर्वार्थचिंतामणींतले श्लोक आधारास घेतांना जैमिनीय गुलिक चालेल काय ?

वरील सर्व विवेचनावरून आमचे वाचक '**अज्ञानांधकारांत**'. कोण निमग्न झाला आहे याचा न्याय करितीलच. ज्या गुलिकाला एक रूप नाहीं, त्या गुलिकावरून आमचे ज्योतिर्विभूषण जन्मलग्नाच्या खरेखोटेपणाचा निश्चय करणार ! सर्वार्थचिंतामणीचा कर्ता ज्योतिषी होता. त्याला जर रात्रीचा गुलिक निराळ्या पद्धतीनें केला पाहिजे, हें माहीत असतें तर त्यानें ही गोष्ट आपल्या ग्रंथांत नमूद केली असती. यावरून एका कालीं दिवसाचा व रात्रीचा गुलिक एकाच पद्धतीनें करण्याची चाल असली पाहिजे. व तेंच युक्त आहे. कारण, वाराचा स्वामी सूर्योदयीं बदलतो, ह्मणून दिवसाच्या १ ल्या भागाचा जो स्वामी तोच रात्रीच्याही १ ल्या भागाचा असला पाहिजे. ह्मणून सर्वार्थचिंतामणीतील गुलिक दिवसाप्रमाणेंच रात्रीचाही तयार करावयाचा असें सिद्ध होतें. यावरून दुसरें असें एक अनुमान होतें कीं, सर्वार्थचिंतामणींत जे एकाच अर्थाचे दोन श्लोक आहेत ते याच कारणासाठीं आहेत. मात्र दोहोंच्या मधील एखाद दुसरा श्लोक गहाळ झाला असेल.

या मुद्यास आणखी एक सबळ पुरावा आहे, तो असा कीं मुहूर्तमार्तंडांत रात्रीचा गुलिक करण्याची जी रीति दिली आहे, ती आणि सर्वार्थचिंतामणींतील पद्धति एकच आहे ! यावरून या ग्रंथांतील रीति दोहों वेळेस सारखीच आहे. ह्मणून ज्योतिर्विभूषण जें ह्मणतात. कीं— 'तें वर्णन स्थूल आहे' तें त्यांचें ह्मणणें ज्ञानाचें आहे कीं अज्ञानाचें

*

आहे, याचा विचार वाचक करितील.

असो. आतांपर्यंत गुलिक म्हणजे काय, तो तयार करण्याचे तीन प्रकार व त्यांची उपपत्ति यांचें विवेचन केलें. आतां घट्यात्मक गुलिकास राश्यात्मक रूप कसें द्यावयाचें तें सांगतों.—

स्फुटगुलिक नाडिकाभिस्त त्कालार्केण सायनेनापि॥
लग्नवदानेतव्यो राश्यंशकलादिरूपको गुलिकः ॥

[स. चिं.]

ज्याप्रमाणें सायन रवीवरून एखाद्या वेळेचें लग्न तयार करितों, त्याच प्रमाणें गुलिकाच्या घटीपळांच्या कालाचें सायन रवीवरूनच लग्न तयार करावयाचें. येईल तो राश्यात्मक गुलिक जाणावा. हा तयार करितांना राशींचे स्वोदय उपयोगांत आणावे. लंकोदयांची जरूर नाहीं. पुण्याचा जन्म असेल तर पुण्याचेच राशींचे उदय घ्यावे.

या ठिकाणीं अशी एक शंका आहे कीं, सायन रवि घेणें तो जन्मकालचा घ्यावयाचा कीं गुलिकाच्या कालचा घ्यावयाचा ? ज्योतिर्विभूषणांनीं अंक २ पृ. ४४ मध्यें ५ रा. १३ अं. ३१ क. २वि. हा गुलिक तयार केला आहे. तो २ रा. १९ अं. या जन्मकालच्या [५ घ. ५५ प. च्या] वेळेचा रवि घेऊन केला आहे ! म्हणजे जन्मकाल आहे ५ घ. ५५ प. व गुलिककाल आहे १५ घ. २१ प. ! ! या रीतीला आधार काय, हें ज्योतिर्विभूषण कृपा करून सांगतील काय ?

वरील वचनांत ' तत्कालार्केण सायनेनापि ', असें स्पष्ट आहे. म्हणून सायन रवि गुलिककालचाच घेतला पाहिजे. ज्योतिर्विभूषणांनीं वाण्याचा मुलगा व म्हारांची पोर यांस बहुल्यावर उभें करून फलज्योतिषादर्शाचा अंक २ हा अंतरपट धरिला आहे, आणि ' सुलग्न सावधान ' असें आपल्या वाचकांस म्हणावयास सांगितलें आहे ! यावरून त्यांस गुलिक म्हणजे काय, तो तयार करण्याचे प्रकार किती आहेत, त्या प्रकारांची उपपत्ति व तो राश्यात्मक कसा करावयाचा याची माहिती यथातथाच आहे हें उघड सिद्ध होतें. असो— आतां प्रत्येक भावांत गुलिक कोणतीं फलें उत्पन्न करितो, तें सांगून हा विषय पुरा करितों.—

गुलिकाचीं भावस्थित सामान्य फलें.

तनुफल

रोगार्त्तः सततं कामी पापात्माभिगतः शठः ॥
मूर्त्तिस्थे गुलिके मंदे खलभावोऽति दुःखितः ॥ १

अर्थ.— तनुस्थानीं गुलिक असतां रोगी, विषयी, पापात्मा, ठक असा मनुष्य होतो. शनीसह गुलिक असेल तर दुष्टबुद्धीचा व अति दुःखित असा होतो.

धनफल

विकृतो दुःखितः क्षुद्रो व्यसनी च गतत्रपः
धनस्थे गुलिके जातो निःस्वो भवति मानवः ॥२

अर्थ.— धनस्थानीं गुलिक असतां मनुष्य दुःखी, हलकट, निलाजरा, नादी व निर्धन असा होतो.

सहजफल

चार्वंगो ग्रामपः पुण्यः संयुक्तः सज्जनप्रियः ॥
मंदे तृतीयगे जातो जायते राजपूजितः ॥ ३

अर्थ.— सुंदर, गांवकामदार, पुण्यकर्मी, सज्जनांस प्रिय व राजपूज्य असा तृतीयस्थानीं गुलिक असतां मनुष्य होतो.

सुखफल

रोगी सुखपरित्यक्तः सदा भवति पापकृत् ॥
यमात्मजे सुखस्थे तु वातपित्ताधिको भवेत् ॥ ४

अर्थ.— चतुर्थस्थानीं असतां रोगी, दुःखी, पापाचरणी, वातपित्तात्मक प्रकृतीचा असा मनुष्य होतो.

सुतफल.

विस्तुतिर्विधनोल्पायुर्द्वेषी क्षुद्रो नपुंसकः ॥
सुतस्थानगते पापे स्त्रीजितो नास्तिको भवेत् ॥ ५

अर्थ.— निंदक, निर्धन, अल्पायु, द्वेषी, हलकट, नपुंसक, स्त्रीलंपट व नास्तिक असा पंचमांत गुलिक असतां मनुष्य होतो.

रिपुफल.

वीतशत्रुः सुपुष्टांगो रिपुस्थाने यमात्मजे ॥
सुदीप्तः संमतः स्त्रीणां सोत्साहः सुदृढादितः ॥ ६

अर्थ— सहाव्या स्थानीं गुलिक असतां शत्रूंस जिंकणारा, शरीर ज्यांचें

पुष्ट, तेजस्वी, स्त्रियांस मान्य, उत्साही व बळकट असा मनुष्य होतो.

जायाफल.

स्त्रीजितः पापकृज्जारः कृशांगो गतसौहृदः ॥
जीवितः स्त्रीधनेनैव सप्तमस्थे रवेः सुते ॥ ७

अर्थ—स्त्रीलंपट, पापकर्मा, जार, कृश, दुष्ट व स्त्रीधनावर उपजीविका करणारा असा सप्तमांत गुलिक असतां मनुष्य होतो.

मृत्युफल.

क्षुद्वालुर्दुःखितः क्रूरस्तीक्ष्णरोषोऽतिनिर्घृणः ॥
रंध्रे प्राणहरो निःस्वो जायते गुणवर्जितः ॥ ८

अर्थ.— अष्टमांत गुलिक असतां खादाड, दुःखी, क्रूर, अतिरागीट, अतिनिर्दय, निर्धन व शामाळ्या असा मनुष्य होतो.

धर्मफल

बहुक्लेशी कृशतनुर्दुष्टकर्माऽतिनिर्घृणः ॥
मंदो धर्मस्थितो मंदः पिशुनो बहिराकृतिः ॥ ९

अर्थ.— कष्टाळू, कृश, दुष्ट कृत्यें करणारा, निर्दय, दुर्जन अशा प्रकारचा मनुष्य नवमस्थानीं गुलिक असतां होतो.

कर्मफल

पुत्रान्वितः सुखी भोक्ता देवाग्न्यर्चनवत्सलः ॥
दशमे गुलिके जातो योगधर्माश्रितः सुखी ॥ १०

अर्थ.– दशमांत गुलिक असतां पुत्रवान्, सुखी, भोक्ता, देव व अग्नि यांची भक्ति करणारा, योगी व सुखी असा मनुष्य होतो.

आयफल

सुस्त्रीभोगी प्रजाध्यक्षो बंधूनांच हिते रतः ॥
लाभे यमानुजे जातो नीचांगः सार्वभौमकः ॥ ११

अर्थ.— लाभस्थानीं गुलिक असतां सुंदर स्त्रियांचा उपभोग घेणारा, राजा, बंधूंच्या हितविषयीं तत्पर, व सार्वभौम राजा किंवा त्यासारखा मनुष्य होतो.

व्ययफल

नीचकर्माश्रितः पापो हीनांगो दुर्भगोऽलसः ॥
व्ययगे गुलिक जातो नीचेषु कुरुते रतिम् ॥ १२

अर्थ.— व्ययस्थानीं गुलिक असतां नीच कामें करणारा, पापी, व्यंग, दुर्दैवी आळशी व नीच कृत्यांच्या ठिकाणीं आसक्त असा मनुष्य होतो.

जगद्वृत्त

दरभंग्याकडे पहाटेस ईशान्येस आकाशांत शेंडेनक्षत्र [धूमकेतु] दिसूं लागलें आहे, असें ज्ञानप्रकाशचा बातमीदार कळवितो !

एरंडोल येथील देशकालवर्तमान पत्रांत पुढील भविष्य प्रसिद्ध केलें आहे— श्रावण शु. ७ ला मघा नक्षत्र लागेल. या नक्षत्राचा फारसा पाऊस पडणार नाहीं. उघाड पडेल. केव्हां केव्हां उन्हही पडेल. वारा जोरानें वाहील. श्रावण व. १२ पासून भाद्रपद शु. ५ पर्यंत वृष्टियोग श्रेष्ठ आहे. त्याचा पाऊस सर्वत्र चांगला पडेल. पूर्वाची वृष्टि कांहीं कांहीं ठिकाणीं बरीच होईल. उत्तरांचा वृष्टियोग साधारण आहे. त्यांची वृष्टि दाक्षिणेस भागांत कमी पडेल. उत्तर हिंदुस्थानांत उत्तम पर्जन्य पडेल. हस्त नक्षत्राचाही वृष्टियोग चांगला असून त्याच्या प्रथम आणि शेवटच्या चरणांत सर्वत्र पर्जन्यवृष्टि होईल. हा योग आश्विन शु. ३ पर्यंत श्रेष्ठ आहे. भाद्रपदांत धान्याचा भाव तेजीचा होईल. खरीप, काठण वगैरे धान्याचें पीक श्रेष्ठ येणार नाहीं. गहूं, हरभरे, ज्वारी वगैरे धान्यें उत्तम पिकतील. उत्तर व ईशान्य भागाकडील पिकास धोका येईल.

पत्रव्यवहार

[१]

जुळीं मुलें

गेले शनीवारीं ह्मणजे ता. १० आगष्ट १९०७ रोजीं पहाटेस एका नागपूरच्या मालगुजारास तीन मुलें झालीं. जन्म वेळ नक्की माहीत नसल्यामुळें बरोबर मांडणें कठीण आहे जर ह्या मुलांच्या मातापितरांच्या कुंडल्या मिळतील तर बरें अंदाजानें ह्या वेळच्या दोन रीतीनें कुंडल्या येतील ह्या अशाः—

नं. १

नं. २

बाप मालगुजार आहे तेव्हां नं. २ ची कुंडली खरी वाटते. कारण, धनस्थानांत कर्केचा गुरु, र. बु. शु. ने. आणि सिंह राशींत चंद्र. रवी परस्पर एकमेकांच्या घरांत आहेत. या योगामुळेंच मालगुजाराच्या पोटीं हे जन्मास आले असावे. जुळेपणा दर्शक दोन्हीं लग्नें (कन्या व मिथुन) आहेत. तरी दुसरींत मिथुन लग्न असून त्यांत राहू आहे. मीन ह्या जुळ्या राशींत शनी. पु. ६ अंक७ पान २५ वर झटल्याप्रमाणें:–

[१] लग्नीं राहू

[२] मीन, कन्या, मिथुन किंवा धनेंत. राहु, चंद्र, शनी, गुरु, शुक्र किंवा हर्शल.

[३] लग्न मिथुन, कन्या, धन मीन अशी ग्रहस्थिति असतां जुळेपणाचा बोध होतो. यांपैकीं बऱ्याच गोष्टी प्रस्तुत ठिकाणीं लागू पडतात.

लग्न मिथुन राशीचें.

लग्नीं राहू

मीन राशींत शनी

धनेंत मंगळ

लग्नाधिपति बुध त्याच्यासमोर हर्शल

अशीच तिघां जुळ्या मुलांची कुंडली पूर्वी असगांवकरांनीं प्रसिद्ध केली होती. तिच्यांत व हिच्यांत बरेंच साम्य आहे. हीं मुलें किती दिवस जगतात हें पाहिलें पाहिजे.

शंकर रामचंद्र प्रधान

[२]

अनुभव.

वि. वि.— मीं एक कुंडलीवि-

ज्ञानाचा वर्गणीदार आहें. आपण माझी चालू सालची स्थूल ग्रहस्थिति वर्तवून पाठविली, तींत मंगळ चं. द्राला ८ वा आहे ह्यामुळें तो शारीरिक क्लेश उत्पन्न करील असें कळविलें होतें. त्याचा अनुभव आला तो असा— ता. १७ जून रोजीं मी स्वतः टांगा हाकीत असतां घोडी विथरून तिनें भरावा खालीं टांगा नेला. तेथें खडीच्या राशीवर आदळून ती स्वतः पडली व बरोबर मीही उसळी खाऊन डाव्या हाताचे आंगठ्यावर पडलों. खांद्याचा सांधा गळून हात इतका दुखावला कीं उदईक दोन महिने पुरे होतील?

एक वर्गणीदार (कोल्हापूर)

* सदरहू गृहस्थांची कुंडली अशी आहे—



या कुंडलींत लग्नस्वामी मंगळ असून तो भावचलित कुंडलींत राहूसह चतुर्थस्थानीं आहे, ह्यामुळें तो वाहनांचें भय उत्पन्न करितो. शनि सिंह राशींत वक्री असून या राशीचा स्वामी तृतीयस्थानीं शनीच्या राशींत असल्यामुळें तो हाताच्या दुखापतीस कारण झाला. तृतीय स्थानावर हाताचा विचार होतो. ता. १७ जून या दिवशीं रवि हा जन्मस्थ चंद्राच्या अगदीं जवळ होता व मंगळ तृतीयस्थानीं होता. या अपघातावरून जन्म–लग्नाच्या अंशांत थोडी चूक असावी असें दिसतें. लग्नाचे १६ अं. आहेत, त्या ठिकाणीं सुमारें ८।९ अंश असावे. १६ अंश धरिल्यास शनि नवमांत जातो व मंगळ चतुर्थ भावाच्या अंतीं जातो. ९ अंश धरिल्यानें शनि दशमांत जाईल. या दिवशींचा मंगळ जन्मस्थ श. नीला पूर्ण दृष्टीनें पाहत होता. चतुर्थेश शनि हा सिंह या शत्रु–ग्रहाच्या राशीस वक्री आहे, हेंच कारण वाहनभय उत्पन्न होण्यास कारण झालें आहे.

ए. 'कुं. वि'

[३]

वि. वि.— बापाच्या मरणानंतर जन्मलेल्या एका मुलाची कुंडली पाठविली आहे, तिला येत्या अंकीं स्थल मिळावें.–

जन्म–ता. २९ मार्च्य सन १९०५ बुधवार, सकाळीं ८ वाजून १ मि.

साथन



कळावें लोभ असावा, हे विनंति.

एक वर्गणीदार

* नवमस्थानीं चंद्र असून साडेसातींत जन्म झाला आहे. नवम व दशम हीं पितृस्थानें आहेत. या स्थानांतील चंद्राला जन्मकालीं साडेसाती असेल तर ती मातापितरांस मारक होते, असें समजावें. शिवाय नवमांत हर्शल आहे, व शनीच्या दशमांत मंगळ आहे. शनि हा पितृस्वामी आहे. या सर्व कारणांनीं बापाचे मरणानंतर जन्म झाला आहे.

ए. 'कुं. वि.'

प्राणपद

मार्गे मार्गे निर्मलं साधुवृंदं । वृंदे वृंदे तत्वचिंतानुवादः ॥
वादे वादे जायते तत्वबोधो–बोधे बोधे सच्चिदानंदभासः ॥

सर्वार्थचिंतामणींत क्षणिक ग्रहांच्या प्रकरणीं आरंभींच एक श्लोक आहे, तो असा.–

लग्नं क्रमात्सार्धघटीद्वयं स्यात्
मेषादिनेशास्थितकोणभानाम् ॥
राशेश्चरात् प्राणपदं क्रमेण
घटीचतुर्थांशमुशंति तज्ज्ञाः ॥

सूर्योदयीं सूर्य ज्या राशीस असेल त्याच्या त्रिकोणांतील चर राशीपासून प्रत्येक राशि १५ पळांनीं प्राणपद भोगतें असें ज्योतिषी सांगतात. सूर्य चर राशीस असेल तर त्याच राशीपासून प्राणपदाची गणना होते. द्विस्वभाव राशीस असेल तर त्या राशीपासून पांचवा राशि जो चर संज्ञक असेल त्या राशीपासून प्राणपदाची प्रवृत्ति होते व सूर्य जर स्थिर राशीस असेल तर त्या राशीपासून जो नववा राशि चर संज्ञक असेल त्यापासून प्राणपदाची सुरवात होते.

रीति

घटी चतुर्गुणा कार्या तिथ्या-
दैश्च पलै र्युता ॥
दिनेकरेणापहृतं शेषं प्राणपदं
स्मृतम् ॥
शेषात्पलांताद् द्विगुणी विधाय
राश्यंश सूर्यर्क्ष नियोजिताय ॥

तत्रापि तद्राशिचरान् क्रमेण
लग्नांशप्राणांशपदैक्यता
स्यात् ॥ २

घटींस चहूंनीं गुणावें म्हणजे राशि होतात. कारण, १५ पळांत १ राशि प्राणपद भोगितें, म्हणून एका घटकेंत चार राशि भोगाल. नंतर पलांस १५ नीं भागावें. म्हणजे

भागाकारा इतके राशि होतील ते राशि वरील राशींत मिळवावे ह्मणजे एकंदर प्राणपदानें सूर्योदयापासून किती राशि भोगिले तें कळेल. पळांची जी बाकी राहिली असेल तिला २ नीं गुणावें ह्मणजे अंश होतात. कारण, १५ पळांत १ राशि ह्मणजे १ पळांत २ अंश होतात. अशा रीतीनें प्राणपदाचे राशि व अंश तयार झाले ह्मणजे राशिसंख्या जर १२ पेक्षां अधिक असेल तर तीस १२ नीं भागून बाकी उरेल ती राशिसंख्या प्राणपदाची झाली. कारण, बारा रशींचें एक चक्र आहे. नंतर पहिल्या श्लोकांत सांगितल्या प्रमाणें ही राशिसंख्या सूर्याच्या अगर त्याच्या त्रिकोणांतील चर राशीच्या संख्येत मिळवावी ह्मणजे प्राणपद तयार झालें.

उदाहरण.— जन्मकाल १७ घ. २० प. आहे. अशी कल्पना करा. तेव्हां– १७×४=६८ ही घटींची राशिसंख्या झाली व २०÷१५=१ ही पळांची राशिसंख्या झाली. व एकंदर ६८+१=६९ राशिसंख्या झाली. हीस १२ नीं भागिलें तेव्हां ९ ही प्राणपदाची राशिसंख्या झाली. पळांत १५ नीं भागून ५ बाकी राहिली. तिची दुप्पट १० हे अंश झाले तेव्हां ९ रा. १० अंश इतका भाग प्राणपदानें सूर्योदयापासून राशिचक्रांत पांचवेळां पूर्ण भ्रमण करून अधिक भोगिला. या कालाचा स्प. सूर्य १ रा. ३ अं. २१ क. ३९ वि. आहे. हा सूर्य वृषभ या स्थिर राशींत आहे. ह्मणून या राशीपासून ९ वा राशि जो मकर त्यापासून प्राणपदाची प्रवृत्ति आहे. यासाठीं मकर राशीपासून प्राणपद ९ रा. १० अं. आहे, ह्मणजे तें तूळ राशींत १० अं. आहे, अशा रीतीनें ६ रा. १० अं. हें प्राणपद तयार झालें. या कालचें लग्न ५ रा. ९ अं. ५४ क. आहे. ह्मणजे जवळ जवळ प्राणपदाच्या अंशांइतकेंच आहे.

दुसऱ्या श्लोकांतील शेवटल्या चरणाचा अर्थ सांगावयाचा राहिला. फलज्योतिषादर्शाचे संपादक रा. घोलप यांनीं याचा अर्थ अंक २ पृ. ३९ मध्यें [जन्मलग्नाच्या व प्राणपदाच्या नवांशांत साम्यता बहुतकरून असते हा नियम समजावा. सं. फ.] असा केलेला दिसतो. आणि अंक ४ पृ. ७८ मध्यें 'खुलासा—उदित

लग्नाचा अंश व प्राणपदाचा अंश एकच असतो, क्वचित् त्रिकोणांत [५।९ स्थानीं] असतो, हें नियमाने जाणावें. असें नसेल तिथें त्या जन्मवेळेत फरक आहे हें खास समजावें." असाही अर्थ केलेला दिसतो. जे ज्योतिर्विभूषण अंक ४ मध्यें आह्मांस 'मूर्खा न दृष्टव्या [?]' असें मोठ्या डौलानें ह्मणतात त्यांच्या या वरील शहाणपणाचा आह्मांस वेळींच विचार करणें जरूर आहे. ह्मणून प्रथमतः त्यांच्या अर्थाचें निरीक्षण करूं.

ज्योतिर्विभूषण ह्मणतात—'जन्मलग्नाच्या व प्राणपदाच्या नवांशांत साम्यता **बहुतकरून** असते हा **नियम** समजावा.' येथें बहुतकरून आणि नियम यांची सांगड कशी घालावयाची तें त्यांचें त्यांनाच माहीत! जेथें बहुतकरून असें ह्मणावें लागतें. तेथें नियम कसला? बरें बहुतकरून हें तरी ह्मणणें कितपत खरें आहे? अंक २ पृ. ४४ उघडा. यांत लग्न ३ रा. २१ अं. आहे, ह्मणजे मकर नवमांशीं आहे व प्राणपद आहे धनु नवमांशीं! यांतील प्राणपद चुकलें आहे, असें त्यांनींच अं. ४ पृ. ७८ मध्यें ह्मटलें आहे. व खरें प्राणपद ५ रा. २० अं. येत आहे. ह्मणजे तें येतें मिथुन नवमांशीं! उभयतांत जमीन अस्मानाचें अंतर! अशीं हजारों उदाहरणें आह्मी देऊं शकूं कीं, बहुतकरून जन्मलग्नाच्या व प्राणपदाच्या नवमांशांत साम्यता नसते! यावरून ज्योतिर्विभूषणांनीं केलेला हा अर्थ चुकीचा आहे. आतां, त्यांचा दुसरा अर्थ कितपत बरोबर आहे, तें पाहूं.

त्यांचेंच वरील उदाहरण घ्या. लग्नाचे अंश २१ आहेत व प्राणपदाचे अं. २० आहेत! अंक ४ पृ. ८१ मधील उदाहरण घ्या. लग्नाचे अं. ६ असून प्राणपदाचे अं. ५ आहेत! पृ. ८२ पहा. लग्नाचे अं. ८ असून प्राणपदाचे अं. १० आहेत! पृ. ८३ पहा. लग्नाचे अं. २२ असून प्राणपदाचे अं. ० ! अशीं हजारों उदाहरणें मिळतील कीं लग्नाचे व प्राणपदाचे अं. बिलकूल सारखे नाहींत. ह्मणून हाही त्यांचा अर्थ चुकीचा आहे- या दुसऱ्या अर्थांत त्यांनीं 'क्वचित् त्रिकोणांत असतो' असें जें ह्मटलें आहे, त्याचा

अर्थ मेहेरबानीकरून स्पष्ट करितील तर मोठे उपकार होतील ! एकच अंश त्रिकोणांत असतो ह्मणजे काय तें आह्मांस कळत नाहीं. कदाचित् पंचम अथवा नवम भावाचा अंश आणि प्राणपदाचा अंश एकच असतो, असें ह्मणण्याचा त्यांचा इरादा असेल, पण तेंही जुळत नाहीं, कारण अंक ३ पृ. ५७ उघडा. त्यांत पंचम भाव १९ अं. आहे व नवम भावही तितकेच अंश आहे. प्राणपद तर २० अंश ! यावरून या अर्थांत् आमच्या मतें आणखी एक असा शोध घालावा कीं, 'कचित् कोठेंच नसतो !'

तात्पर्य, ज्योतिर्विभूषणांनीं केलेले दोन्ही अर्थ साफ चुकीचे आहेत. आमच्या मतें त्या चरणाचा कोणताच सयुक्तिक अर्थ संभवत नाहीं. फलज्योतिषादर्शाचे विद्वान् संपादक किंवा वाचक याचा बरोबर अर्थ लावितील अशी आशा आहे.

रीति २ री

स्वेष्टकालं पलीकृत्य तिथ्याप्तं भादिकं च यत् ॥
चरागद्विभगे भानौ योज्यं स्वे नवमे सुते ॥
स्फुटं प्राणपदं तस्मा त्पूर्ववत् शोधये त्तनुः ॥ ३

जन्मकालचीं एकंदर पळें करून त्यांस १५ नीं भागावें. भागाकारा इतके राशि होतील. व बाकी राहील तिची दुप्पट करावी ह्मणजे अंश होतील. सूर्य चर राशीस असेल तर त्या राशीपासून, स्थिर राशीस असेल तर ९ व्या राशीपासून व द्विस्वभाव राशीस असेल तर ५ व्या राशीपासून प्राणपदाची गणना करावी.

ही रीति आणि पहिली वस्तुतः एकच आहे. परंतु आमच्या विद्वान् ज्योतिर्विभूषणांस ती कळली नाहीं, याबद्दल त्यांची कीव येते ! दुसऱ्या अंकांत त्यांनीं याच श्लोकाच्या आधारें ७ रा. २० अं. प्राणपद केलें आहे. व ४ थ्या अंकांत आह्मीं सांगितलेल्या पहिल्या रीतीनें ५ रा. २० अं. प्राणपद तयार केलेलें आहे ! वास्तविक तो त्या रीतीनेंसुद्धां ५ रा. २० अं. च येतो. पण त्यांनीं मध्येंच अकरण सूर्यसंक्रांत राश्यंक २ मिळविला आहे ! तो मिळविला नसता, ह्मणजे त्याच रीतीनें प्राणपद अगदीं बरोबर आला असता.

ही चुकी जरी त्यांच्या मागाहून ध्यानीं आली असली तरी त्यांच्या ज्ञानाची पारख सहज होत आहे, हें उघड आहे. असो. आतां प्राणपदाचीं सामान्य फलें सांगून हा विषय पुरा करितों.

मूकोन्मत्तो जडांगस्तु हीनांगो दुःखितः कृशः ॥
लग्ने प्राणपदे क्षीणो रोगी भवति मानवः ॥ १

अर्थ.— प्राणपद जेव्हां लग्नांत असतें तेव्हां मनुष्य मुका [वक्तृत्वहीन] उन्मत्त, आळशी, व्यंग, दुःखी, कृश व रोगी होतो.

बहुधान्यो बहुधनो बहुभृत्यो बहुप्रजः ॥
धनस्थानस्थिते प्राणे सुभगो जायते नरः ॥२

अर्थ.— प्राणपद द्वितीय स्थानीं असतां धनधान्यवान्, अनेक चाकर माणसें बाळगणारा, ज्याला पुष्कळ मुलें होतात असा व भाग्यवान् मनुष्य होतो.

हिंस्रो गर्वसमायुक्तो निष्ठुरोतिमलिम्लुचः ॥
तृतीयगे पाणपदे गुरुभक्तिविवर्जितः ॥ ३

अर्थ.– तृतीय स्थानीं प्राणपद असतां हिंसक, गर्विष्ठ, निष्ठुर, चोर व गुरूची भक्ति न करणारा असा मनुष्य होतो. [मलिम्लुच ह्मः चोर]

सुखस्थे तु सुखी कांतः सुहृद्रामासुवल्लभः ॥
गुरौ परायणः शीलः प्राणे वै सत्यतत्परः ॥ ४

अर्थ.— चतुर्थ भावांत प्राणपद असतां सुखी, कांतिमान, मित्राच्या स्त्रियांचा उपभोग घेणारा, गुरुभक्त व खऱ्या मार्गानें आचरणारा असा मनुष्य होतो.

सुखभाक्च क्रियोपेत स्त्वपचारदयान्वितः ॥
पंचमस्थे प्राणपदे सर्वकामसमन्वितः ॥ ५

अर्थ.— पंचमांत प्राणपद असतां सुखी, दयाळू व धर्मार्थकाममोक्ष यांची प्राप्ति ज्याला होते असा मनुष्य होतो.

बंधुशत्रुवशस्तीक्ष्णो मंदाग्निर्निर्दयः खलः ॥
षष्ठे प्राणेल्परोगश्च वित्तपोल्पायुरेवच ॥ ६

अर्थ.— षष्ठ स्थानीं प्राणपद असतां तीक्ष्ण स्वभावाचा, बंधुवर्ग व शत्रु हे वश ज्याला असा मंदाग्नि, निर्दय, दुष्ट, अल्पायु व निर्धन असा मनुष्य होतो.

ईर्षालुः सततं कामी तीव्ररौद्रवपुर्नरः ॥
सप्तमस्थे प्राणपदे दुराध्यक्षः कुबुद्धिमान् ॥ ७

अर्थ.— प्राणपद सप्तम स्थानीं असतां ईर्षा बाळगणारा, विषयी, क्रोधी वाईट बुद्धीचा व दुष्टांचा नायक असा मनुष्य होतो.

रोगसंतापितांगश्च प्राणपदेऽष्टमे सति ॥
पीडितैः पार्थिवैर्दुःखैर्भृत्यबंधुसुतोद्भवैः ॥ ८

अर्थ.—प्राणपद अष्टम स्थानीं असतां रोगामुळें शरीर त्रासलेलें, राजा, चाकर, बंधु व पुत्र यांच्या पासून त्रास पावलेला असा मनुष्य होतो.

पुत्रवान्धनसंपन्नः सुभगः प्रियदर्शनः ॥
प्राणे धर्मस्थिते भृत्यः सदा तुष्टो विचक्षणः ॥ ९

अर्थ.— नवमांत प्राणपद असतां पुत्रवान, धनवान्, भाग्यशाली, हसतमुख, संतुष्ट व आनंदी होतो.

वीर्यवान् मतिमान्दक्षो नृपकार्येषुकोविदः ॥
दशमे वै प्राणपदे देवार्चनपरायणः ॥ १०

अर्थ.— प्राणपद दशमांत असतां मनुष्य पराक्रमी, बुद्धिमान्, दक्ष, राजकार्यतत्पर व देवतार्चन करणारा असा होतो.

विख्यातो गुणवान्प्राज्ञो भोगी धनसमन्वितः ॥
लाभस्थानस्थिते प्राणे गौरांगो मानवत्सलः ॥ ११

अर्थ.– विख्यात, गुणवान्, शहाणा, भोगी, श्रीमंत असा मनुष्य लाभस्थानीं प्राणपद असतां होतो.

क्षुद्रो दुष्टस्तु हीनांगो विद्वेषी द्विजबंधुषु ॥
व्यये प्राणे नेत्ररोगी काणो वा जायते नरः ॥ १२

अर्थ.– व्ययस्थानीं प्राणपद असतां हलकट, दुष्ट, व्यंग, ब्राह्मणांचा द्वेष्टा, नेत्ररोगी किंवा काणा असा मनुष्य होतो.

पत्रव्यवहार

[१]

केंमनडाईनमध्यें ता. २५ आगष्ट १९०७ या दिवशीं दुपारीं सूर्यालय ज्योतिषसभा भरली होती, तिचें टिपण.

१ मागील ता. २८ जुलईचें टांचण वाचून दाखविलें व तें कायम करण्यांत आलें.

२ 'एक हितेच्छु' या नांवाच्या एका सभ्य गृहस्थानें चर्चा केलेला ज्योतिष मासिक पुस्तकांतील विषय व्हाईस प्रेसिडेन्ट कडून वाचण्यांत आला.

३ मि. पी. डी. सिल्व्हा यांचेकडून मेंबर लोकांस व्याख्यान देण्यांत आलें. तें मि. एल्. यू. सेन यांनीं शिळाप्रेसवर फुकट छापिलें. या त्यांच्या उपकाराबद्दल आभारदर्शक मत प्रसार झालें.

४ एम् जी फोन्यान यांनीं एम् जी वा. टीन यांचेविषयीं आपलें मत पुढें आणिलें. व सर्वानुमतें त्यांची निवड होऊन सभेच्या लिष्टामध्यें त्यांचें नांव दाखल केलें.

५ मि. एन्. आर. तळवलकर यांनीं सुचविलें कीं, ज्या अर्थी आमच्या प्रेसिडेंटांनीं आपल्या मासीक पुस्तकांत या सभेचें टांचण देण्याचें बंद केलें व मि. नबाथे कुंडलीविज्ञानकर्ते यांनीं आपल्या पत्रांत या सभेच्या हकीकती छापण्याचें वचन दिलें त्या अर्थी या त्यांच्या उपकाराबद्दल सर्वानुमतें आभार मानिले आहेत.

६ मि. तळवलकर यांनीं औषधांचा उपयोग ज्योतिषशास्त्रास धरून, कसा करावा, या विषयावर लहानसें परंतु उपयुक्त भाषण केलें.

७ मि. थॉस पी. डी. सिल्व्हा यांनीं या सभेच्या मेंबरांस उपयुक्त असा परिश्रमानें तयार केलेल राशिचक्राचा नकाशा दाखविला. जर तो छापणें शक्य असेल तर छापविणें आहे. त्या चक्रापासून ज्योतिषसंबंधाचीं तत्वें पूर्ण लक्षांत येतात. आणि ज्याला आंकडे मांडण्याचें चांगलेसें ज्ञान नाहीं, अशा मनुष्यास सुद्धां तें चक्र उपयुक्त आहे. जे जे सभेत मेंबर हजर होते, त्यांनीं त्या नकाशाची फारच प्रशंसा केली. आणि कित्येक तर

मि. डी सिल्व्हा यांनीं आपला अमोल वेळ खर्च करून अति परिश्रमानें तयार केला, याबद्दल त्यांची स्तुति करूं लागले.

८ नेहमीं प्रमाणें लहानसा उगहार झाला.

९ व्हाईस प्रेसिडेंटकडून नियमित उपसंहार झाला.

१० नेहमीं प्रमाणें सभेस मेंबर व इतर श्रोते होते. सभा संध्याकाळीं ५ वाजतां विसर्जन झाली.

सही— थॉस पी. डी. सिल्व्हा.

जगद्वृत्त.

रंगून येथें दादाभाईंच्या मृत्यूची खोटी खबर उठली होती. तेव्हां ता. १६ रोजीं सर्व रंगूनच्या रहिवाशांची दुःखप्रदर्शनार्थ सभा झाली होती.

गेल्या शनिवारीं रंगून येथील व्हिक्टोरिया हॉलमध्यें बहादूरजीच्या थडग्यावर जें सरकारनें कायमचें स्मारक बांधिलें त्याबद्दल त्यांचे अभार मानण्यासाठीं मुसलमानांची सभा भरली होती. तींत बादशहाच्या थडग्याशेजारीं त्याच्या बायकोचें जें थडगें आहे, त्यावरही त्याचप्रमाणें स्मारक बांधावें अशी विनंति करण्याबद्दल ठराव पास झाला.

महाड येथें उंदरांच्या केसी होऊं लागल्या आहेत, या मुळें येथील लोक हवालदील झाले आहेत. श्री वीरेश्वरावर महारुद्र सुरू केला आहे. ज्वरावर शंकराची आराधाना हा श्रेष्ठ उपाय आहे. परंतु भाडोत्री भक्तीचा तादृश उपयोग होईल असें वाटत नाहीं. जर गांवांतील प्रत्येक व्यक्ति श्री शंकराला अनन्य भावानें शरण जाईल तरच इष्ट कार्य घडेल. महाडची रास आह्मीं वृश्चिक ठरवून गेल्या सालीं प्लेगचें जें भविष्य केलें होतें तें तंतोतंत बरोबर उतरलें होतें. गुदस्त सालीं मंगळ महाडच्या राशीला जेव्हां १२ वा झाला तेव्हां प्लेगच्या केसी होऊं लागल्या या वर्षी मंगळ १२ वा होत नाहीं पण रवि तूळ राशीत गेल्यावर तो ११ वा होतो. रवि व मंगळ यांचे परिणाम एकच आहेत, पण रवि गांठ उत्पन्न करूं शकत नाहीं या मुळें रवीच्या अनिष्ट स्थितींत प्लेगचा आजार विशेष जोराचा होणार नाहीं. व ग्रंथियुक्त तापानें फारच कमी मृत्यु होतील. ता. २४ सपटंबर या दिवशीं तूळ संक्रमण होत आहे. ह्मणून त्या पूर्वी स्थलांतर करणें फायदेशीर होईल. रवीवर प्लेगचा उद्भव झाल्यामुळें तो विशेष जाचणार नाहीं. पण तो बरेच दिवस राहील असा संभव दिसतो. थोडासा अनुभव घेऊन नंतर या विषयीं जास्त लिहूं.

वर्तमानपत्रांतील ज्योतिष विषयक लेख.

[ज्ञा. प्र. ता. ५ सप. १९०७]

[१]

"हल्लीं दिसत असलेला धूमकेतू नवीनच आहे. याच्या भेटीचा लाभ आपल्या सूर्यमालेस यापूर्वी झाला असल्यास त्याबद्दल आधुनिक ज्योतिषशास्त्राच्या इतिहासांत कोठेंही दाखला नाहीं. आपल्या या नव्या पाहुण्यांचें दर्शन प्रथम ता० ९ जून रोजीं प्रिन्सटन युनिव्हर्सिटीतील ज्यानिअल नांवाच्या विद्यार्थ्यास झालें. यावरून ज्यानिअल्स कॉमेट असें यांस नांव मिळालें आहे. त्या वेळीं हा धूमकेतु रोहिणी नक्षत्राच्या पश्चिमेस असून मध्यरात्रीच्या सुमारास दृष्टीस पडत होता.

आज ता. ३१ आगष्ट रोजीं तो खालीं लिहिलेल्या ठिकाणीं आहे. मिथुन राशींत कयास्टर आणि पोलक्स असे दोन दुसऱ्या प्रतीचे तारे आहेत. गुरु हल्लीं कर्क राशींत आहे. पोलक्सपासून गुरूपर्यंत एक सरळ रेषा काढावी आणि ती या दृश्य अंतराच्या निम्यानें पुढें वाढवावी या ठिकाणीं या धूमकेतूची चांदणी अथवा त्याचें डोकें आहे. ही चांदणी चवथ्या प्रतीच्या ताऱ्याइतकी तेजस्वी आहे असें वाटतें. एखाद्या लहानशा दुर्बिणींतून पाहिलें असतां ह्या चांदणीच्या मध्यभागीं बराच तेजस्वी गोल, आणि त्या भोंवतीं पांढुरकें पटल दिसतें.

धूमकेतूची शेंडी सूर्याच्या उलट दिशेस फिरलेली असते. त्याचप्रमाणें याची शेंडी मुख्य चांदणीपासून मिथुन राशीकडे पसरलेली दिसते, ती दिवसेंदिवस अधिक लांब आणि तेजस्वी होत आहे गुरूपासून प्रोसियन ताऱ्यापर्यंत सरळ रेषा काढली असतां या धूमकेतूची शेंडी

या रेषेचा छेद करून पलीकडे जाते. येवढा या शेंडीचा विस्तार आहे.

हा धूमकेतु आणखी दोन तीन दिवसांत अगदीं सूर्याजवळ जाईल आणि त्या तेजोराशीला प्रदक्षिणा घालून पुन्हा पश्चिमेकडे दिसूं लागेल. व ता. ८।९ रोजीं पश्चिमेकडे दिसावा असा अदमास आहे.

जूनच्या ९ तारखेपासून हा कसा कोणत्या मार्गानें व किती वेगानें जाईल याबद्दल पाश्चात्य ज्योतिर्विदांनीं जें भविष्य केलें तें आजपर्यंत खरें ठरलें आहे.

धूमकेतूंचा आणि उल्कापातांचा कांहीं संबंध आहे कीं नाहीं या संबंधीं पाश्चात्य ज्योतिर्विदांचें मत अनिश्चित आहे.

धूमकेतु दर २५ वर्षांनीं दृष्टीस पडतात हें म्हणणें मात्र बरोबर नाहीं. प्रत्येक शतकांत २० पासून ३० धूमकेतु दिसतात असें कळलें आहे. याशिवाय फक्त दुर्बिणीनेंच दिसणारे धूमकेतु तर कित्येक आहेत. आजपर्यंत ८००।९०० धूमकेतु दिसल्याचा दाखला ज्योतिषशास्त्राच्या इतिहासांत आहे. म्हणून २५ वर्षांनीं एक धूमकेतु दृष्टीस पडतो आणि त्याचा पृथ्वीवर घडणाऱ्या गोष्टींशीं कांहीं संबंध असतो असें म्हणणें बरोबर नाहीं.

"श्रीधर."

[२]

वि. वि. ता. २ च्या ज्ञानप्रकाशांत सांप्रतचा दृश्य धूमकेतु २ तारखेपुढें कदाचित् दिसणार नाहीं, असें नगरच्या पत्रांत वाचलें म्हणून ता. ३ मंगळवारीं पहाटेस दुर्बीण लावून बसलों, तों पहाटे पांच वाजतां धूमकेतु स्पष्ट पहावयास सांपडला. अलीकडे ८।१० दिवस मी पहात आहें त्यावरून त्याची गति रोज पूर्वेकडे ½ अंश याप्रमाणें आहे, असें माझें मत आहे; यावरून अजून सहा दिवस तो स्पष्ट दिसावा असें मला वाटतें.

हा 'डानियल' धूमकेतु सन १४५६ सालीं युरोपांत दिसत होता. तेव्हां शेंडीसह त्यानें आकाशांत ६० अंश जागा व्यापिली होती, इतका प्रचंड होता. नंतर तो स्वकक्षेंत हिंडतांना आमच्या सूर्यमालेपलीकडे गेला. आतां त्याचें पुनरागमन झालें

आहे, व तो स्वकक्षेंत सूर्याच्या जवळ जवळ येत चालला असून, सांप्रत शनीच्या कक्षेसन्निध येऊन पोहोंचला आहे. १९१० सालीं म्हणजे आणखी तीन वर्षांनीं तो नीचीं येणार आहे, म्हणजे सूर्याच्या अति जवळ येऊन पुनः मागें फिरेल. आतांच शनीच्या कक्षेशीं असतांना इतका स्पष्ट दिसत आहे. त्या अर्थी हे डानियल महाराज १९१० सालीं अति प्रचंड रूप धारण करणार असा अजमास आहे. कारण ते समयीं, हे हल्लींच्याहून आठपट जवळ येणार.

आमच्या ग्रहमालेंत शनीच्या कक्षेपर्यंत हा धूमकेतु तूर्त येऊन पोंचला आहे, व तीन वर्षें या पाहुण्याचें आमचेकडे वास्तव्य आहे. म्हणून, जरी हा सहा दिवसांनीं सूर्याचे राशीस गेला तरी पुनरपि कांहीं दिवसांनीं पश्चिम दिशेकडे हा भासमान होणार कीं काय याचा जर कोणी खुलासा करील तर मी अत्यंत आभारी होईन.

कृ. शं. दीक्षित.

अत्यंत शोचनीय मृत्यु ! !

रा. ब. बळवंत रामचंद्र सहस्रबुद्धे ए. इ. साहेब दक्षिणभाग यांस ता. ४ सप्टंबर १९०७ रोजीं नोकरीवर असतांच दोषी तापानें अकस्मात् मृत्यु झाला, हें कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें ! यांच्या मागें यांच्या पत्नी व एक नातू (मुलीचा मुलगा) हीं दोनच माणसें असून त्यांच्यावर येऊं नये असा प्रसंग आला आहे ! ईश्वरेच्छा ! त्यांस वरींच मुलें झालीं होतीं, परंतु त्यांपैकीं परमेश्वरानें एकही या जगांत ठेविलें नाहीं ! आज ५।६ महिने ते आजारीच होते. परंतु अलीकडे त्यांची प्रकृति दुरुस्त होत चालली होती. सप्टंबर अखेर ते पेनशनांत निघणार होते. यांच्या मृत्यूनें त्यांच्या छात्रवर्गास व शिक्षकवर्गासही फार वाईट वाटणार आहे ! हे जुन्या पद्धतीनें वागणारे, ईश्वरभक्त, सच्छील व विद्वान् असे असून सरकार व प्रजा या उभयतांसही ते सारखेच प्रिय होते. यांस रावबहादूर हा तुकताच किताब मिळाला होता. चांगलीं माणसें जगांत फार दिवस राहत नाहींत, हेंच खरें ! यांची कुंडली अशी आहे—

जन्म–ता. २१ सप्टंबर सन १८४८ गुरुवार पहांटेस ५ वाजून १० मि.

सायन

स्पष्ट ग्र.

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.
५	३	६	६	४	६	१०	५	०
२८	१२	६	१२	१४	१४	२१	२०	२१
७	२०	३१	४९	६	२६	२२	५	१०

तातें जीवेरिगोऽगुर्धन वृषग कविर्वा तदा रायोगः ॥८॥

॥भाग्ययोगः॥

शुक्रेण युक्तश्च बुधेन युक्तः ।
भाग्याधिनाथो यदि भाग्यगेहे ॥
लग्नंच वाचस्पतिचंद्रयुक्तं ।
तदा भवेद्भाग्यसुयोगकालः ॥ १ ॥
पंचम शुक्रसंयुक्तं धनं विधुयुतं यदा ।
युक्तंच गुरूणा भाग्यं भाग्ययोगस्तदा भवेत् ॥ १ ॥

स्फुटज्योतिष.

एका मनुष्याचे कुंडलींत लग्नीं सिंह राशीचा रवि असून तृतीय स्थानीं मंगळ व समोर चंद्र अशी ग्रह स्थिति आहे. ह्या मनुष्यास कर्णरोग आहे. रवि जेव्हां जेव्हां लग्नीं येतो, तेव्हां तेव्हां त्या पीडेस जोर येतो.

एका मनुष्याचे कुंडलींत लग्नीं मेष राशीचा चंद्र असून मंगळ मीन राशीच्या अंतीं आहे. ह्या मनुष्याच्या तोंडाची फार दुर्गंधि येते व कित्येक वेळां मुखरोगानें पीडा झालेली आहे.

एका बालकाचे कुंडलींत द्वितीय स्थानीं मकरेचा मंगळ आहे. हें मूल ५।६ महिन्याचें असतांना त्यास दांत निघाले व तें बोलूं लागलें. इतक्या काळांत अशा गोष्टी घडत नाहींत. मंगळ जन्मापासून ७॥ महिने ह्या स्थानांत राहणारा आहे. हें सन १९०७ वर्षाच्या स्पष्ट ग्रहांचें पुस्तकावरून समजणारें आहे.

येणेंप्रमाणें श्लोक व उपयुक्त मजकूर पाठविला आहे. कळावें लोभ करावा हे विनंति.

आपला
ग दा. ग्रंथे.
बर्गणीदार

[२]

प्रसूतिकाल.



ही एका बाईची कुंडली आहे. ही बाई केव्हां प्रसूत होईल तें पहावयाचें आहे.:— प्रसूतीकाल पाहण्याच्या अगोदर गर्भमास पाहिला पाहिजे. शनी व गुरु हे गर्भ स्थानांत असतां गर्भ राहतो. त्या प्रमाणें गुरु मिथुनेंत व शनी कुंभेंत असतांना ह्या स्त्रीला गर्भ राहिला आहे. मिथुन व कुंभ ह्या राशी ज्या स्थानांत आहेत, तीं स्थानें लग्नापासून जरी गर्भोत्पादक स्थानें नसलीं तरी चंद्रापासून तीं येऊं शकतात. गर्भमास पहावयाचा ह्मणजे रवि कोणत्या राशींत त्या वेळीं होता तें पाहिलें पाहिजे. साधारण नियम असा आहे कीं, रवि गर्भ स्थानांत असल्याशिवाय गर्भ राहत नाहीं. तेव्हां रवि १०।१२।२ ह्या राशींत असतांना गर्भ रहावा. आतां ह्या तीन राशींपैकीं कोणत्या राशींत जास्त संभवतो तें पाहिलें पाहिजे. ह्या ठिकाणीं मकरेलाच रवि जास्त संभावतो. मकरेला रवि धरिला ह्मणजे चालू मास आठवा येतो. तेव्हां सर्व साधारण नियमान्वयें पुढील ह्मणजे भाद्रपदमास हा प्रसूतीमास येता. जसें र. गु. श. हे गर्भकालीं गर्भस्थानीं पाहिजेत. व असतात; तद्वत् ते प्रसूति किंवा ऋतुकालीं किंवा विवाहकालीं पाहिजेत. अशी माझी समज आहे. व याप्रमाणें पाहूं जातां, भाद्रपद महिन्यांत रवि ता. १६ सप्टेंबर रोजीं कन्येला येत आहे. तेव्हां १६ तारखेस आठ महिने पूर्ण होऊन नववा लागतो. तेव्हां या महिन्यांत किंवा नववा संपतांच ह्मणजे–अश्विनांत ही स्त्री प्रसूत व्हावी. पण या महिन्यांत होणार नाहीं असें वाटतें, कारण ज्याप्रमाणें आधानकालीं र. चं. गु. शु. हे, चंद्राच्या गर्भोत्पादकस्थानीं होते. त्याप्रमाणें ते चंद्राच्या गर्भोत्पादकस्थानीं आल्याशिवाय प्रसूत करणार नाहींत असें अनुमान होतें. आधानकालीं ग्रहः— कुंभेला श. बु. र. मिथुनेला गु. व वृश्चिकेला मं. असें होते तेव्हां रवी तुलेवर गेल्याशिवाय प्रसूत होऊ नये असें वाटतें. ह्मणजे आश्विन शुद्धांत. त्यावेळीं ग्रह असेः— तुळेला र. बु. शु. कुंभेला श. मकरेला मं. कन्येला गु. तेव्हां आश्विनमास ठरला. आतां चंद्रही प्रसूतिकालीं गर्भस्थानांत असतो ह्मणून तो कुंभ किंवा मेष राशीवर असतांना ती प्रसूत होईल. पण आपण पहात आलों कीं, मंगळ जसा जन्मकालीं वृश्चिकेचा होता. तसाच तो आधानकालीं होता. व आतां प्रसूतिकालीं उच्च होतो आहे. ह्यावरून असें अनुमान होतें कीं, ह्या बाईला मुलगा होऊन तो मंगळाच्या छत्राखालींच जन्मास यावा ह्मणजे मेष, वृश्चिक किंवा लग्न यांत मंगळ तरी यावा किंवा यांपैकीं एकादी लग्नीं तरी रास यावी. यांपैकीं मेषेचा चंद्र जास्त संभवतो. ह्मणजे आश्विन शु. १५ किंवा प्रतिपदेला. ह्या दिवशीं ८।१० च्या सुमारास ती प्रसूत व्हावी कारण त्यावेळेस वृश्चिक किंवा मकरें लग्न बसूं शकतें.

शंकर रामचंद्र प्रधान

[३]

ता. ११ अकटंबर सन १८९६ या दिवशीं पहांटेस १ वाजून १७ मि. मुं. टा. या वेळीं एका मुलीचा जन्म आहे. तिची सायन कुंडली येणेंप्रमाणें आहे.—

सायन स्पष्ट ग्रह.

र.	चं.	मं.	बु.	गु.
६	८	२	६	५
१८	१२	२६	१३	२
१	५५	११	४७व.	३३
शु.	श.	हर्.	ने.	ल.
७	७	७	२	४
१२	१७	२२	२०	१३
५५	५०	३८	१४व.	५

हिचा मृत्यु २२ जून १९०७ दि. ३-४५ स्टँ. टा. ला झाला. त्यावेळची

स्थिति.—

[१] तनु स्थानाधिपति रवि जन्मकाळच्या मंगळाजवळ आहे, व व जन्मकाळच्या चंद्रासमोर आला आहे.

[२] षष्ठेश शनि हा चंद्राच्या सुखस्थानीं व लग्नाच्या मृत्युस्थानीं आहे.

[३] मृत्युकाळीं शनि मीनेच्या २७ अंशांत असून जन्मकाळच्या मंगळावर व रवीवर त्याची त्रिराश्यंतर दृष्टि आहे !

[४] मृत्युकाळीं मंगळ षष्ठस्थानीं मकरेच्या १७ अंशांत हर्शलसह वक्री आहे.

[५] जन्मस्थ लग्नाधिपति रवि जन्मकाळीं आपल्या नीचांत मारकेश बुध त्याच्याजवळ वक्री, षष्ठेश शनि हर्शलनें युक्त चतुर्थस्थानांत, अष्टमेश गुरु लग्नभावाच्या अंतीं स्वसंभुख राशींत दुर्बल. ही जन्मकाळची ग्रहस्थिति अल्पायुत्व दर्शविते.

[६] जन्मकालचा चंद्र सायन मूळ नक्षत्राच्या शेवटल्या चरणांत आहे.

या मुलीची आई १९०० सालांत निवर्तली. चतुर्थ स्थानांतला शनि सावत्रमातेचा योग दर्शवितो, तसा येथें अनुभव आहे. या मुलीस बुधवार ता. १९।६।०७ रोजीं रात्रीं ज्वर आला, व ता. २२ जून रोजीं दोन प्रहरीं वृश्चिक राशींत चंद्र असतां वृश्चिक लग्नावर ती मृत्यु पावली. याच वेळीं १० मि. अगोदर हिची सावत्र बहीण निवर्तली. बाप दुसऱ्या दिवशीं ता. २३-६-१९०७ रविवारीं दोन प्रहरीं दोहोंच्या सुमारास निवर्तला. ता. २।६।०७ रोजीं दुसरी एक सावत्र बहीण निवर्तली.

या मुलीच्या बापाच्या मृत्यूनंतर ता. १० जुलई १९०७ रोजीं हिची सावत्र माता प्रसूत होऊन तिला मुलगी झाली. तिची सायन जन्मलग्न कुंडली अशी आहे.—

सायन रूप अ.

र.	चं.	मं.	बु.	गु.
३	३	९	४	३
१०	१६	१२	७	२१
१०	५२	४३ व	१२	१६
शु.	श.	रा.	ह.	ने.	ल.
२	११	३	९	३	९
२९	२७	२३	१०	१२	२९
१८	२७ व	४०	२७ वं	३३	७

बापाच्या मृत्युकाळीं फक्त एकच मुलगी जिवंत होती, ती ता. ७।८।०७ रोजीं मृत्यु पावली ! नवीन झालेली मुलगी व तिची आई हींच कायतीं माणसें सध्या हयात आहेत !

एक वर्गणीदार
मुंबई

---

[४]

वि. वि.— आपल्या पुस्तकाच्या वर्ष ७ अंक १४ यांत रा. केसकर यांनीं रानड्यांच्या सर्व्हिस बुकांतील जन्मकालाचा उल्लेख केला आहे, परंतु तो बरोबर नाहीं. न्यायमूर्तींचे परम मित्र ह० श्रीपती बोवा भिंगारकर यांच्या जवळील अस्सल पत्रिका केसरी वर्ष २१ अंक ४ मध्ये प्रसिद्ध झाली आहे. रा. दिवाडकर यांनीं प्रसिद्ध केलेली कुंडली बरोबर असून त्यांत फक्त जानेवारीचे ठिकाणीं 'फेब्रुवारी' हा शब्द पाहिजे. कळावें. हे वि.

पांडुरंग ज्ञानेश्वर कुळकर्णी
चऱ्होली (पुणें)

वर्तमानपत्रांतील ज्योतिषविषयक लेख

[ज्ञा० प्र० अंक २१३ वरून]

'ड्यानिअल्स' हा धूमकेतु (कॉमेट) नवीन आहे. याच्या भेटीचा लाभ आपल्या सूर्यमालेस यापूर्वी झाला असल्यास आधुनिक ज्योतिषशास्त्राच्या इतिहासांत त्याविषयीं उल्लेख नाहीं. रा. दीक्षित ह्मणतात कीं, हा १४५६ सालीं युरोपांत दिसत होता, त्याचें स्वरूप इतकें अवाढव्य होतें कीं, त्यानें दृश्य आकाशाचा एक तृतीयांश भाग व्यापिला होता एवढेंच नव्हे तर हा १९१० चे सुमारास नीचीं येऊन आपलें प्रचंड स्वरूप पुनः एकवार तो प्रकट करणार आहे. हें त्यांचें विधान बरोबर नाहीं.

१४५६ सालीं जो प्रचंड धूमकेतु यूरोपांत दिसला होता आणि जो पुनः १९१० सालीं दिसणार आहे तो 'ड्यानिअल' धूमकेतु नव्हे. त्या धूमकेतूला 'ह्यालें' असें नांव आहे. तो दर ७५-७८ वर्षांनीं नीचीं येतो. मात्र आतां त्याचें पूर्वीचें प्रचंड स्वरूप नाहींसें झालें आहे. १८३५ सालीं याच्या दर्शनानें सर्व यूरोपखंडाचें धाबें दणाणून गेलें होतें, तें इतकें कीं, पोप तिसरा क्यालिक्स्टस यानें या धूमकेतूपासून रक्षण व्हावें ह्मणून परमेश्वराची मुद्दाम प्रत्येक देवळांत प्रार्थना करण्यांत यावी, असा हुकूम सोडिला होता.

ह्यालेचा धूमकेतु आणि डॅनिअलचा धूमकेतु यांचे गतींमध्येंही एक महत्वाचा फरक आहे. १४५६, १५३१, १६०७, १६८२, १७५९, व १८३५ सालीं ह्यालेचा धूमकेतु

दृष्टीस पडला. त्यावेळीं त्याची गति 'डॅनिअल' च्या धूमकेतूसारखी पश्चिमेकडून पूर्वेकडे नव्हती. 'डॅनिअल' चा धूमकेतु मेष राशींतून वृषभ—मिथुन—कर्क राशींत असा गेला. ह्यालेचा याच्या उलट दिशेनें जातो.

अधिर.

---

(२)

शेंडे नक्षत्र ता. २२ आगष्ट रोजीं अवरात्मक भाग ७॥ चे सुमारास होतें. तें ता. ३० आगष्ट रोजीं ८॥ चे सुमारास आलेलें दिसलें. ह्मणजे अवरात्मक भाग १ चालण्यास ८ दिवस लागले. ह्मणजे दररोज सदर तारखांचे दरम्यान त्याची गति सुमारें ७॥ मि. होती. ता. ३१ आगष्ट रोजीं नगर येथें अभ्रें आलीं होतीं. ता १ सपटंबर रोजीं चांदणी दिसली, पण चंद्रप्रकाशामुळें बारीक चांदण्या नसल्यामुळें शेंडे नक्षत्राची व त्याच्या शेंडीची स्थिति कायम करितां आली नाहीं. ता० २ सपटंबर रोजीं सकाळीं ४॥-५ चे अभ्रामुळें काम झालें नाहीं. ता. ३ सपटंबर रोजीं धूमकेतु पूर्वीप्रमाणें आर्द्रा नक्षत्रांतूनच काढिलेल्या रेषेवर पूर्वेकडे जास्त दूरवर गेला आहे, असें दिसलें. ता. ४ सपटंबर रोजीं असें दिसून आलें कीं, धूमकेतु हा पूर्वीच्याच ह्मणजे आर्द्रांतून काढिलेल्या रेषेवर अजमास अवरात्मक भाग ९॥। वर गेलेला आहे. मृग नक्षत्राच्या उभ्या तीन तारापैकीं खालची ह्मणजे पूर्वेकडील व पुनर्वसूंतील नं. ४ ची तारा जोडावी व ती रेषा पूर्वीप्रमाणें आर्द्रानक्षत्रांतून काढिलेल्या रेषेस कापीपर्यंत वाढवावी ह्मणजे ता.४ सपटंबर रोजींची केतूची स्थिति नक्की येईल. ही कृति कै. दीक्षितांनीं दिलेल्या १ ल्या पटावर केली ह्मणजे हें स्थान बरतीं नमूद केल्याप्रमाणें अवरात्मक ९॥। चे सुमारास येतें. वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, ता. ३० आगष्टपासून ता. ४ सपटंबरपर्यंत केतूनें ६० मि. अवरात्मक भाग क्रमिले ह्मणजे ५ दिवसांत ६० मि. अंतर क्रमिलें. ह्मणजे ह्या अवधींत त्याची रोजची

गति वाढून ७॥ होती ती १२ मिनिटें झाली. ह्यावरून असें कळलें कीं, धूमकेतु सूर्याजवळ जसजसा जाईल तशी त्याची गति वाढेल. हें ह्मणणें न्यूटनच्या सिद्धांतास धरूनच आहे. ह्याच गोष्टीचा उलट रीतीनें विचार करू. ७॥ ते ८॥ भाग क्रमण्यास केतूला ८ दिवस लागले; ८॥ ते ९॥ भाग ह्मणजे तेवढेंच अंतर क्रमण्यास ५ दि. लागले, यावरून ९॥ ते १०॥ हें अंतर क्रमण्यास कदाचित् ३ किंवा २ दिवस पुरे होतील. ह्मणजे ता. ४-५-६ सप्टंबर रोजीं धूमकेतूला रोजची अवरात्मक गति २० मि. पासून ३० मि. पर्यंत धरिली तरी चालेल. ह्या गतीनें त्याला सूर्यास गांठावयाचें आहे. याकरितां सूर्य ता. ४ सप्टंबर रोजीं कोठें आहे, तें पाहूं.

आमचीं सुलभ साधनें ह्मणजे एक पैशाचें पंचांग, तीन लांब पट्या लांकडाच्या व दीक्षितांनीं तयार केलेले नक्षत्रपट. अशा साधनांनीं सुद्धां योग्य मार्गानें विचार करून साधारण अजमास किती काढितां येईल तें पाहणें आहे. शके १८२९ चे पंचांगांत श्रावण कृष्ण कळून वाचकांनीं पहावा ह्मणजे असें दिसून येईल कीं, ता. ३० आगष्ट रोजीं सूर्याचा प्रवेश पूर्वा नक्षत्रांत झाला. सूर्य १२ महिन्यांत २४ अवरात्मक भाग क्रमितो, ह्मणजे एक महिन्यांत २ अवरात्मक भाग अथवा १२० मि. क्रमितो. तेव्हां दर रोज तो ४ मि. चालतो असें धरिल्यास बरोबर आहे. पूर्वा नक्षत्र अवरात्मक भाग ११ वर आहे. येथें सूर्य ता. ३० आगष्ट रोजीं आहे. ह्या दिवसापासून ता. २४ सप्टंबर पर्यंत ५ दि. होतात, ह्मणजे तो २० मिनिटात्मक भाग चालतो. ह्मणजे तो सूर्य ता. ४ सप्टंबर रोजीं सवा अकरा अवरात्मक भाग व ५ मि. या स्थळीं आहे. शेंडे नक्षत्र तर ता. ४ सप्टंबर रोजीं ९॥ येथें आहे. ह्मणजे ह्या दोहोंत अंतर ९५ मिनिटात्मक भाग आहे. शेंडे नक्षत्र दर रोज २५ ते ३० मि. चालतें व सूर्य ४ मि. चालतो तेव्हां दररोज २१ पासून २६ भाग अंतर तोडितें. सरासरीनें २३ भाग अंतर तोडितें असें कल्पिल्यास गांठ पडण्यास अजमासें ४ दिवस लागतील. ह्मणजे ता. ८ सप्टंबर रोजीं दोघांची गांठ पडेल. ता. ७ रोजीं बहुतेक तें सूर्यतेजांत लोपून जाईल. ह्मणजे आज ता. ७ सप्टंबर रोजीं शेंडे नक्षत्राचा अस्त व्हावा आणि आज सकाळीं पाहिलें, पण तें आह्मांस दिसत नाहीं.

नि. वि. छत्रे.

कुंडलीविज्ञान

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥
'भवभूति:,

पुस्तक ७ वें.] भाद्रपद कृ० ९, मंगळवार [अंक २१ वा

तेविसावी

राष्ट्रीय सभा व तिचे अध्यक्ष

राष्ट्रीय सभेचा जन्म सन १८८५ डिसेंबर ता. २८ या दिवशीं १२ वाजून ३० मि. नीं झाला. त्या वेळची सायन कुंडली अशी आहे.—



सायन पद्धतीनें या कुंडलीचें लग्न मेष आलें आहे. निरयन पद्धतीनें मीन येईल. राष्ट्रीयसभा एकाच ठिकाणीं भरत नाहीं, ती फिरती आहे, ह्मणून तिचा जन्म चर राशीवरच संभवतो. मेष हा चर राशि आहे. मीन द्विस्वभाव आहे, ह्मणून सायन पद्धतीचें मेष लग्नच वस्तुस्थितीस अनुसरून आहे.

चंद्र तूळ या चर राशींतच आहे. आमच्या वाचकांस माहीत आहे कीं, ज्याच्या जन्मकाळीं लग्न व चंद्र चर राशींत असतात, तो निरंतर प्रवासी व मोठालीं स्थलांतरें करणारा असतो. त्याच प्रमाणें राष्ट्रीय सभेची स्थिति आहे. निरयन पद्धतीचा चंद्र कन्या या द्विस्वभाव राशीचा येतो, ह्मणजे त्या पद्धतींत लग्न व चंद्र द्विस्वभाव राशींत येतात !

शनि कर्क या चर राशींत, गुरु, चंद्र, हर्शल हे तूळ या चर राशींत व रवि मकर या चर राशींत या प्रमाणें ५ ग्रह चर राशींत आहेत. निरयन पद्धतींत हे सर्व ग्रह चर राशींत येत नाहींत. या सर्व कारणांनीं सायनवाद्यांस मात्र राष्ट्रीय सभा ही निरंतर प्रवासी आहे असें ह्मणण्याचा अधिकार आहे.

या संस्थेच्या जन्मकाळीं रवि आणि शनि हे ग्रह समोरासमोर आहेत. या योगाचा परिणाम चांगला नाहीं, असें ज्योतिःशास्त्राचें मत आहे. शिवाय दशमाचा स्वामी कर्क राशींत दुर्बल असून रवि हा शत्रुगृहीं आहे, हा ही योग चांगला नाहीं. यावरून राष्ट्रीय सभेचा जन्म तिच्या इष्ट हेतूस अनुकूल असाच झालेला आहे, असें ज्योतिःशास्त्राच्या दृष्टीनें ठरतें.

सन १९०० च्या डिसेंबरांत शनि हा रवीच्या जवळ आला. तेव्हांपासून राष्ट्रीय सभा सरकारच्या डोळ्यांत खुपूं लागली असेल. शनि आणि रवि हे ग्रह जर समोरासमोर असतील तर शनि हा रविस्थानीं गेल्यावर अशुभ प्रकार दृष्टीस पडल्याशिवाय राहत नाहीं. त्याचप्रमाणें येथेंही अनुभव आला आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

मंगळ आणि राहु हे दोन क्रूर ग्रह षष्ठ स्थानीं पडले आहेत. ह्मणून या सभेकडून सिंहासारखे पराक्रम होतील कारण—**षष्ठे क्रूरा नरं कुर्युः शत्रुपक्षक्षयंकरम्** – जीं माणसें लढाऊ असतात, त्यांच्या कुंडलींत हे ग्रह असेच असतात. यावरून राष्ट्रीय सभा प्रतिपक्षाला बेरीस आणून इष्ट हेतु तडीस नेईल असें मानण्यास जागा आहे. पराक्रम स्थानींही शनि हा क्रूर ग्रहच आहे. यावरून राष्ट्रीय सभेला जें मिळावयाचें आहे, तें सिंहासारखीं कृति करूनच मिळेल. नव्या मताच्या लोकांस निराश होण्याचें कारण नाहीं. राष्ट्रीय सभा ही नेभळट नाहीं. ज्याप्रमाणें एकाद्या वीराला ग्रह पडावे तसेच तिला पडलेले आहेत. बालपणांत जरी ती भीक्षांदेहीच्या स्वरूपांत होती तरी उत्तरोत्तर तीं आपलें खरें खरें तेजस्वी स्वरूप प्रगट केल्याशिवाय राहणार नाहीं. ह्मणून तिच्या ज्वानींत नेभळटांची कींव करणारा ऐकही गृहस्थ मिळणार नाहीं, हें नेभळटांनीं पक्कें लक्षांत ठेवावें.

जर या कुंडलींत मेष राशीचे शेवटले अंश उदित असते, तर ही संस्था या पूर्वीच आपलें उग्र स्वरूप धारण करिती. परंतु याचा परिणाम कदाचित् अनिष्ट झाला असता. ह्मणूनच कीं काय परमेश्वरानें तिला १७ अंशांवर जन्म दिला !

हिच्या जन्मकाळीं शुक्र हा कुंभ राशींत लाभ स्थानीं आहे. शुक्र हा धन स्थानाचा व सप्तम स्थानाचा अधिपति आहे, व तो शत्रुक्षेत्रीय राशींत आहे. सप्तम स्थानावर कारखान्यांचा विचार होतो. यावरून राष्ट्रीय सभेकडून देशी उद्योगधंदे व कारखाने यांस उत्तेजन मिळून ते लवकर व पूर्णपणें फलद्रूप होतील. किंबहुना यास्तव गोष्टीकडे राष्ट्रीय सभेचें प्रथम लक्ष पोंचणार आहे. राष्ट्रीय सभेच्या वेळीं अलीकडे जीं औद्योगिक प्रदर्शनें भरूं लागलीं आहेत, तीं याच ग्रहामुळें.

राष्ट्रीय सभेचें पूर्वीचें स्वरूप मवाळ होतें, पण शनि जेव्हां आपल्या दशमांत गेला, तेव्हां तें स्वरूप जाऊन तिला आतां नेमस्तांचें स्वरूप आलेलें आहे. नेमस्तांच्या स्वरूपांतून तीं जहाल स्वरूपांत जाणार आहे. परंतु तिला अद्यापि दिनावधि आहे. टिळकपक्ष हा पूर्ण जहाल आहे. ह्मणून पूर्ण जहाल

स्वरूप प्राप्त झाल्याशिवाय टिळकासारख्यांस अध्यक्षाचा मान मिळणें अशक्य आहे. लग्नाधिपति मंगळ हा रिपुस्थानीं कन्येंत आहे. कन्या हा दुटप्पी राशि आहे, म्हणून राष्ट्रीय सभा पूर्ण जहाल लवकर होत नाहीं, यांत शंका नाहीं. या ग्रहाच्या समोर मीन हा दुटप्पी राशि आहे. या राशींत १९०६ मध्यें शनीनें प्रवेश केला, तेव्हां पासून ती कांहींशी जहाल बनली. सन १९०७ च्या डिसेंबरांत शनि हा जन्मस्थ मंगळाच्या समोर येईल. म्हणून या वर्षी अध्यक्ष कोणीही होवो, तो दादाभाईच्या पुढें एखादें तरी पाऊल टाकणार यांत शंका नाहीं. कुंडलीवरून अमुकच मनुष्य अध्यक्ष व्हावा, हें कोणासही सांगतां येणार नाहीं. परंतु इतकें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, तो दादाभाई पेक्षां एक रतिभार तरी जहाल असेल !

या वर्षी व्ययस्थानीं शनि आणि मंगळ हे दोन्ही ग्रह आले असून त्यांची ता. ३० डिसेंबरला युति होणार आहे. शनिमंगळांच्या युतीचा परिणाम चांगला नाहीं असें ज्योतिःशास्त्र सांगतें. यावरून या वर्षी राष्ट्रीय सभेची सांपत्तिक स्थिति समाधानकारक असणार नाहीं. सभा सुरळीत पार पडेलच असें सांगवत नाहीं. उभयपक्षांत खडाजंगी तर उडेलच. परंतु कदाचित् हातघाई वरही प्रसंग येईल ! सरकारी अधिकारी उग्र स्वरूप धारण करितील. म्हणून या सालची कॉंग्रेस कशी पार पडते हें पाहिलें पाहिजे. राष्ट्रीय सभेचे सूत्रधार या गोष्टीकडे अवश्य लक्ष देतील अशी आशा आहे.

या वर्षी हर्शल डिसेंबर अखेर मकर राशींत १३ अं. २५ क. आहे. व दशम भावाचा आरंभ या राशीचे १३ अंश आहे. त्यामुळें तो संधीवर आला आहे. यावरून १९०७ सालची कॉंग्रेस विचारक्रांतीच्या संधीवर आलेली आहे. १९०८ सालीं तिला विशेष जहाल स्वरूप प्राप्त होईल. १९०६ सालीं मंगळ तूळ या समतोल राशींत होता. १९०७ सालीं तो मीन या दुटप्पी राशींत आहे व १९०८ सालीं वृश्चिक या जहाल व खुनशी राशींत आहे. तात्पर्य राष्ट्रीय स्वरूपाची या पुढें पीछेहाट होणें अशक्य आहे !

पत्रव्यवहार

[१]

वि० वि० पुढील योगास येत्या अंकीं स्थळ मिळावें.—

सौभाग्ययोग

स्मरेशे स्मरराशिस्थे लग्नेशेन समन्विते ॥
गुरुचंद्रेण संदृष्टे योगः सौभाग्यसंज्ञकः ॥१
स्मरेशे स्वोच्चराशिस्थे लग्नेशे लग्नवीक्षिते ॥
केंद्रस्थाने शुभः सर्वे योगः सौभाग्यसंज्ञकः ॥२
लग्नेशः परमोच्चस्थे स्मरेशे स्मरवीक्षिते ॥
केंद्रस्थाने शुभः सर्वे योगः सौभाग्यसंज्ञकः ॥३
स्मरलग्नाधिपस्वोच्चे केंद्रे वा कोणसंयुते ॥
शुभग्रहेण संदृष्टे योगः सौभाग्यसंज्ञकः ॥४
योगे सौभाग्यके जातो सावित्री जन्म निश्चितः ॥
सोभाग्यशीलसन्नासौ मांगल्यस्य शिरोमणी ॥५

वैधव्ययोग.

स्मरेशे रंध्रराशिस्थे रंध्रेशेन समन्विते ॥
पापग्रहेण सदृष्टे योगः वैधव्यसंज्ञकः ॥१
स्मरराशिगते राहुः स्मरेशे रविसंयुते ॥
रंध्रेश्वरेण संदृष्टे योगः वैधव्यसंज्ञकः ॥ २ ॥
नैधनस्थे यदा भौमो स्मरेशेन समन्विते ॥
लग्ने पापयुतैर्दृष्टे योगः वैधव्यसंज्ञकः ॥ ३ ॥
शनिभौमयुतो राहुः स्मरे रंध्रे गते सति ॥
बालवैधव्यसंप्राप्तियोगः वैधव्यसंज्ञकः ॥ ४ ॥
योगे वधव्यके जाता सा चिन्हाशुभगाश्रितः ॥
वैधव्यशीलः सा नारी आभाग्येशशिरोमणिः॥५

गोविंद महादेव धरवुडवे
त्रिपुटी (सातारा)

(२)

वि. वि.— आमच्या मित्रास दोन जुळ्या बहिणी सहा वर्षांच्या आहेत दोन वर्षांच्या होईपर्यंत ओळखण्यास मारामार पडत असे. एकीच्या डोक्यास पडल्याची खूण झाल्यापासून गंगी अमूक व तंगी अमूक असें ओळखतां येतें. तरी तोंडवळा, उंची, बांधा रंग सारखाच आहे. उभयतांच्या जन्मांत बरोबर एक तासावें अंतर आहे. निरयनपद्धतीनें लग्नांत अंतर पडत नाही. कुंडली खालीं दिल्याप्रमाणें आहे.

जन्म–शक १८२३ आश्विन व० ४ गुरुवार सायं. ४।३०

म. ट. दुसरी ५।३०

म. टा.

जुळ्यांच्या आपण दिलेल्या नियमांशीं बरेंच जुळतें, म्हणून मुद्दाम प्रसिद्धीकरितां पाठवित आहें. प्रतिकार न व्हावा. (१) मीन लग्न आहे. (२) मिथुनेंत चंद्र आहे. [३] धनेंत श. गु. ह. आहेत. लग्नाधिपति गुरु हर्शल व शनि यांनीं युक्त असून मिथुनेंतील चंद्रसमोर आहे. असे जुळ्यांचे योग स्पष्ट दिसत आहेत. वाचकवर्गानें जास्त विचार करावा. अशी विनंति आहे.

नारायण विष्णु आठवले
करंजगांव (नासिक)

* यांत हर्शल वृश्चिक राशींत पाहिजे. त्यावेळीं सायन : धनेंत व निरयन वृश्चिकेंत होता.

'सं. कुं. वि.'

---

[३]

वि- वि.— ता. १ अक्टोबरपासून येथें म्यु. नें आक्ट्रॉय कर जबरीनें लागू केल्यामुळें त्या दिवशीं सर्व प्रकारचीं दुकानें बंद होतीं. या दिवशीं लोकपक्षाचा कारक चंद्र कर्क राशींत स्वगृहीं बलवान् होता तसा रवि नाहीं. रवि राजपक्षाचा

कारक असून अक्टोबरमध्यें नीच आहे. जिल्हेसरकारनें या दिवशीं धाकदपटशा देऊन आपली शिकस्त केली, परंतु कर अजी नाहींसा केल्याशिवाय आमचीं दुकानें उघडण्याची खुषी नाहीं असा लोकांकडून जबाब मिळाला. चंद्राप्रमाणें रवि बली नसल्यामुळें राजपक्षास माघार घ्यावी लागली. व हें काम दुसरे दिवसावर टाकण्यांत आलें. ता. २ रोजीं ही चंद्र सिंह राशींत मित्रगृहीं बली होता. ता. ५ रोजीं कमेटीचा ठराव होईपर्यंत कर माफ आहे, असें सांगितल्यावरून माध्यान्हीं दुकानें उघडलीं. यावेळीं गुरु चंद्र युती होती ! ता. ५ रोजीं कमेटी झाली. या दिवशीं चंद्र मागील दोन दिवसांप्रमाणें बली नसल्यामुळें लोक मताप्रमाणें कर माफ होणार नाहीं, असें पूर्वी भविष्य केलें होतें, तें खरें झालें ! कमेटीनें कांहीं वस्तूवर कमी कर करवून कांहींवर अजी माफ केला. या दिवशीं चंद्र बुध क्षेत्रीं दुर्बल होता व रात्रीं शनीशीं त्याचा प्रतियोग होणार होता. त्यामुळें सर्व कर माफ झाला नाहीं. कळावें,

[४]

वि. वि.— पुढील माहिती प्रसिद्धी साठीं पाठवीत आहें; तिला स्थल मिळावें.

जन्म—ता. २२ जुलई १८७०
सूर्योदयीं
सायन



हा मनुष्य सरवेकडील एका खात्यांत मुख्य कारकून आहे. खास कांहीं आरोपावरून जून १९०७ च्या आरंभींच कामावरून बडतर्फ केलें होतें, आतां ह्या योगाचा ग्रहांशीं मेळ कसा बसतो तें पाहूं. ह्या महिन्यांत मंगळ ६ वे स्थानीं व शनि ८ वे स्थानीं अशी ग्रहस्थिति गोचरींची विचार करण्याजोगी होती. दशम हें राज्यभुवन होय. ह्या स्थानीं चंद्र उच्चीचा बलवान आहे परंतु दशमेश शुक्र, मंगळ ह्या

शत्रु ग्रहानें युक्त असून समोर शनि बक्री, अशी जन्म ग्रह स्थिती आहे. दशमारंभीं उच्चीचा चंद्र हा राज्यभुवनांत मान देणारा असून संकटें नाहींसा करणारा आहे. परंतु स्वामी पाप ग्रहानें युक्त व दृष्ट असल्यामुळें हें संकट आलेलें दिसतें तरी पण जन्मकालच्या चंद्रावरून असें ही दिसतें कीं अशा प्रकारचीं संकटें वारंवार येणार नाहींत, व आलेलें लवकर पार पडेल. व राज्य भुवनांत पुन्हा अधिकाराचा उपभोग मिळेल. जून पासून मंगळही बक्री झालेला होता. ह्मणून त्याच महिन्यांत संकट आलें. व जुलई पर्यंत तो ६ वे स्थानांत व आगष्टमध्यें पंचामांत होता. तो सप्तंबरमध्यें पुन्हां ६ वे स्थानीं प्रवेश करून मार्गी होईपर्यंत शत्रुबळ कमी होणार नाहीं असें मजकडे भविष्य करण्यांत आलें होतें. षष्ठ स्थान हें शत्रू समान होय. दुसरा ग्रह शनि ह्या वेळीं विशेष अनिष्ट नव्हता कारण तो चंद्रास ११ वा मीन राशीचा भ्रमण करीत होता. अष्टम स्थानांत खरा परंतु मीन राशीचा अनिष्ट होत नाहीं असा अनुभवही आला आहे. सप्तंबर पासून मंगळ पुन्हा ६ वे स्थानीं भ्रमण करितो व लाभेश व धनेश बुध ह्याची व लग्नस्वामी रवि ह्यांची युति ही याच महिन्यांत आरंभीं आहे व बुध शुक्र हे शुभग्रहही ह्याच महिन्यांत धनस्थानीं आहेत. दशमेश व लग्नेश शुक्र व रवी ह्यांची युतीही होत आहे. ह्मणून सप्तंबर १ च्या सुमारास कामाचा निकाल लागून ता. १५ सप्तंबरच्या सुमारास नोकरीवर परत बोलावणें येईल असें भविष्य ह्या मनुष्यानें विचाल्यावरून त्यास सांगण्यांत आलें होतें. चौकशी होऊन ता.२ रोजीं कामाचा निर्णय झाला व ता.२२ रोजीं ह्या मनुष्यास कामावर जाण्याचा हुकूमाचा परिणाम होणार अशी बातमी अगोदर खरोखर ता. १५।१६ पासूनच समजली होती. ता. १५ च्या सुमारास बोलावणें येईल असें भविष्य केलें होतें, त्यावेळीं चंद्र मकर राशीचा असून मंगळ व शनि ह्याजवळून त्यास जावयाचें होतें ह्मणून ह्या दोन ग्रहांजवळून जाऊन मेष राशीचा होईपर्यंत अनुकूल झाला नाहीं ता. २२ रोजीं मेष राशीचा चंद्र होता व ह्या दिवशीं शुक्र व चंद्र ह्याचा प्रतियोग होता. हे दोन्ही राज्यभुवनींचे ग्रह असल्यामुळेंच व शत्रु स्वगृहीचा होईपर्यंत कीं काय ह्याचा अवकाश होता. परिणाम झाला असें वाटतें. आगष्टमध्यें मंगळ मार्गी झाल्यावरच शत्रूंचें पारित्य झालें आहे. परंतु कांहीं पुरावा पाहिजे होता तो देऊन निकाल होण्यास सप्तंबर ता. २ पर्यंत दिवस गेले. सारांश मंगळ बक्री व मार्गी, रवि बुध व रवि शुक्र व चंद्र शुक्र ह्या चार प्रकारच्या ग्रहांचा योग प्रतियोगाचा परिणाम ह्या मनुष्यावर घडला. व भविष्य वर्तविण्यास कसें अनुमान करणें शक्य व योग्य पाहिजे हें वरून समजण्यास मदत होईल.

ता, २१ सप्तंबर १९०७ शनिवार रोजीं तूळ लग्नावर कुणब्याच्या एका १६।१७ वर्षाच्या मुलास येथें साप चावला.

ग. दा. ग्रंथे.

[५]

वि. वि.— ता. १ अक्टंबर सन १९०७ च्या अंकांत प्रसूतिकाल या सदराखालीं ज्या बाईची कुंडली प्रसिद्ध केली होती, त्या बाईला काल [१६-१०-०७] रोजीं सायंकाळीं मूल झालें. तिला आमच्या ह्मणण्याप्रमाणें मुलगा झाला पण दिवस चुकला ! अनुमान कां चुकलें समजत नाहीं.

(१) कित्येक मुलींना विजवर मिळतो याचें कारण काय ? अशा कुंडल्या ओळखतां येतील किंवा नाहींत ?

[२] मुंजी होतात त्याही ग्रहस्थितीवर होत असाव्या. कारण, एक दोन कुंडल्या माझ्या पहाण्यांत अशा आल्या आहेत कीं, ज्या तिथीला मुंज ठरली होती त्या तिथीला कांहीं कारणानें झाली नाहीं. कुंडलीविज्ञानांत या गोष्टींचा अद्याप विचार झालेला नाहीं. तो आपण अगर वाचकवर्गापैकीं कोणी करितील अशी आशा आहे.

शंकर रामचंद्र प्रधान

वि. वि.— भाद्रव० २ सोमवार शके १८२९ ता. २३ सन १९०७ रोजीं सूर्यास्तानंतर रात्रीं ९॥ वाजून गेल्यानंतर एक ह्वैस व्याली रेडी झाली. तिची कुंडली—



गणेश दत्तात्रय जोशी.

रंगून-सूर्योदयज्योतिष सभा.

१ सप्टंबर हा शेवटला दिवस रविवार हा बौद्ध धर्माचा उपासाचा दिवस असल्यामुळें बऱ्याच मेंबर लोकांचे सूचनेवरून आजचे तारखेस सभा भरविली.

२ दिनशा होरमसजी चेअरमन यांच्या सूचनेवरून पांचव्या नियमांत थोडेसें शब्दाचे रूपांतर करण्यांत आलें गेल्या २५ आगष्टचें टांचण वाचलें व तें सर्वानुमतें कायम झालें.

३ ऑनररी सेक्रेटरी कडून या मासीक सभेस जे अनियमित मेंबर आहेत त्यांस सूचना पाठविली सभेनें ठरविलें कीं, त्यांचे कडून कांहींच उत्तर आलें नाहीं तर त्यांचीं या सभेच्या मेंबरांच्या लिष्टांतून नांवें खोडून टाकावीं.

४ मि. थामस पी- डी. सिल्व्हा यांनीं तयार केलेलें राशिचक्र सर्वांस पसंत पडलें. तें चांगलें सुवाच्य छापविलें असतां मेंबराकडून त्याचा किंमतही येईल. मि. दिनशा होरमसजी चेअरमन यांनीं या कृत्याबद्दल वरकड खर्च चालविण्याचें आपलेकडे घेतलें.

५ या ऑफिसामध्यें कामाचा चेप बराच असल्यामुळें ऑनररी सेक्रेटरी यांनीं राजीनामा दिला, तो स्वीकारला गेला. राजीनामा देण्यापूर्वी या सभेचें त्यांनीं जें काम केलें त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यांत आले. मि. तळवलकर यांचे अनुमोदनावरून व सुनावणीवरून एक नवीन हुषार सेक्रेटरी मेगया यांना नेमिलें.

६ मि. थामस यांनीं संभाषण केलें ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करणें ह्मणजे धर्माचे अगर चांगुलपणाचे विरुद्ध आहे, असें नाहीं. मि. तळवलकर यांनीं बरींच उदाहरणें देऊन त्यांचें ह्मणणें चांगलें सिद्ध केलें.

७ मि. दिनशा होरमसजी यांचे खर्चानें उपहार झाला.

८ अध्यक्षांकडून शेवटचा उपसंहार झाला.

९ मेंबर व इतर लोकांचीं संख्या नेहमीं प्रमाणेच होती. संध्याकाळीं ५ वाजून ३० मि. पर्यंत सभा चालू होती.

थॉमस पी. डी. सिल्व्हा.

व्हा. प्रे. सू. ज्यो. सभा—
केमेनडाईन रंगून.

पत्रव्यवहार

रा. रा. एडिटर 'कुंडलीविज्ञान' यांस सा. न. वि. वि.— आपण ता. १ ऑकटंबरच्या अंकांत राष्ट्रीय सभेसंबंधानें विचार केला आहे. त्या संबंधानें जे मला थोडें सुचतें तें आपणास कळवितों.

आपण राष्ट्रीय सभेचा जन्म बारा वाजून ३० मि. नीं धरिलेला आहे. रा. चिटणीसांनीं ज्यातिर्मालेंत बारा वाजतांचा धरिला आहे. खरें ह्मटलें तर राष्ट्रीय सभेचा जन्म मुंबई येथें बारा वाजतां झाला. हें मद्रास टाईम असेल तर वेळ ११॥ समजली पाहिजे.

आपण ह्मणतां रवि आणि शनि हे समोरासमोर असल्याचा योग चांगला नाहीं. ते परस्पर शत्रु असल्यामुळें अशी गोष्ट होईल. परंतु ते अनुक्रमें पंचमेश व दशमेश असल्यामुळें पाराशरीप्रमाणें हा राजयोग होत नाहीं काय? दुसरें, आपण ह्मणतां राष्ट्रीय सभा जहाल मताची होईल. कदाचित् मेष ही अग्निरास असल्यामुळें व त्याचा स्वामी राहूनें शुक्त असल्यामुळें असें थोडेसें होईल. परंतु गुरुचंद्रयोग तिला तितक्याच मानानें सौम्य करणारा नाहीं काय? मला वाटतें दशमाचा स्वामी व राजयोगकारक ग्रह जो शनि तो या गुरुचंद्रासमोर ज्या वेळीं येईल त्या वेळीं निदान जें थोडेसें जहालांचें पाऊल राष्ट्रीय सभेंत शिरलें आहे तें सुद्धां पूर्णपणें परत येईल. ह्मणजे या वर्षी व गेल्या वर्षी व त्याचे पूर्वीचे वर्षी राष्ट्रीय सभेंत जहालपक्षाचा जो थोडासा शिरकाव झाला त्याचें कारण मंगळ व राहु यांचे समोर व्यय स्थानांत शनि असणें हें कारण होय. असेंच पूर्वी एकदां शनि नेपच्यून समोर अष्टमांत असतांना ह्मणजे पुण्यास ज्या वर्षी कांग्रेस भरली त्या वेळीं बराच गोंधळ झाला होता त्या वर्षी मंगळ स्वस्थानापासून चवथा होता व राहु कुंडलींतील मंगळाच्या समोर होता.

शनीवरून दुसऱ्या एकदोन गोष्टी समजून घेतात त्या अशा— दशमाचा स्वामी शनि हा चतुर्थ व पंचम स्थानीं असतांना ह्मणजे प-

हिल्या तीन चार वर्षांत कांग्रेसची अतिशय वाढ झाली. मुंबईस ७५ डेलीगेट असून नंतर लवकरच डेलीगेटांची संख्या हजारांवर गेली. पुढें शनि षष्ठांत जाण्याचे सुमारास लॉर्ड डफरीन, लॉर्डरे यांच्या सारखे सहानुभूति दाखविणारे किंवा निदान उघड शत्रुत्व न करणारे असे अधिकारी जाऊन त्यांच्या जागीं लॉर्ड ल्यॅन्सडाऊन व लॉ. हारिस यांच्या सारखे अधिकारी आले. व नंतर शनि षष्ठांत व सप्तमांत असतांना त्यांनीं व इतर अधिकाऱ्यांनीं शनीच्या स्वाभाविक गुण धर्माप्रमाणेंच शत्रुत्व केलें. पुढें अष्टमांत शनि असतांना पुण्यास झालेला प्रकार वरती दिलाच आहे. नंतर नवमांत शनि असण्याचे सुमारास राष्ट्रीय सभा लंदनास भरविण्यासंबंधानें वाटाघाट सुरू झाली. नवमांत जलराशि असता तर सभा लंदनास भरली गेली असती. पुढें दशमांत शनि जाण्या बरोबर प्रथम पासून राष्ट्रीय सभेची खटपट करणारे व बहुतांशीं तिचे जनक न्या. रानडे यांचा मृत्यु झाला व याच वेळीं महाराणी व्हिक्टोरिया यांचा मृत्यु झाला ! एकादशांत शनि जाण्या बरोबर किंवा त्या सुमारास लहान मुलें व तरुण लोक हे नवीन पिढीचे लोक किंवा जहालमतवादी या नांवानें उत्पन्न झाले. यूरोपीय ज्योतिषशास्त्रांत एकादशावरून मि. त्रांचा बोध होतो व शनि एकादशांत असल्यास मित्रांकडून त्यांचे इच्छेनुरूप किंवा त्यांची इच्छा नसतांही त्रास होतो. त्याप्रमाणें नवीन पिढीचा हेतु त्याप्रमाणें नसतां सुद्धां थोडा फार त्रास होणें साहजिक आहे.

पुढें बारावा शनि गेल्यावर बनारस, कलकत्ता व नागपूर या बैठकी होतात. या तिन्हीमध्यें काय काय प्रकार झाले व होत आहेत त्यांचें वर्णन करण्याची जरूर नाहीं.

मध्यंतरीं चंद्रास ४ था मंगळ कुंडलींत रवीवर शनीसमोर असतांना नागपुरास अनिष्ट प्रकार झाले. परंतु मंगळ कुंभेंत जाण्याचे सुमारास नुकतीच पुनः मुंबई व नागपुराकडल्या प्रमुखांनीं अपसांत तंटा मिटवून घेतला. लग्नस्वामीच ११ वा व गुरु चंद्रास ५ वा झाल्यावर अनिष्ट प्रकार बंद होणें बाजवी आहे.

एकंदरींत यंदाच्या कांग्रेस संबंधी काळजी वाटण्यासारखी ग्रहस्थिति आहे. लग्नाच्या चतुर्थ स्थानीं राहु व नेपच्यून, दर वर्षाप्रमाणेंच शनी समोर रवि व त्या बरोबर हर्शल, व्यय स्थानांत कुंडलींतील राहु व मंगळासमोर मंगळ व शनि ही फार अनिष्ट स्थिति आहे. कळावें लोभ असावा हे विनंति.

गोविंद हरी केसकर.

ज्योतिष संचालक मंडळ
—इंदूर—

इंदूर येथें वरील नांवाची एक संस्था आहे. या संस्थेचे अध्यक्ष प्रो. रामकृष्ण सखाराम आठवले एम्. ए. व्हाईस प्रिन्सिपाल होळकर कॉलेज हे आहेत. हे गणित विषयाचे अध्यापक आहेत. यांनीं इंग्रजी व आर्य ज्योतिष शास्त्राचें अध्ययन केलेलें आहे. या संस्थेस संस्थानांतून वेध घेण्यासाठीं हवाशीर व उंचावर जागा देण्यांत आली आहे. कांहीं दुर्बिणीही दिल्याचें समजतें. सरकारानें या संस्थेस दरमहा १२ रुपयांची मदत करण्याचें कबूल केलें आहे. येथील कारभारी राय नानकचंद यांची या संस्थेस फार मदत आहे. या संस्थेकडून चार प्रकारचीं हस्त पत्रकें आमच्याकडे आलीं आहेत. त्यांचा सारांश.—

१ ले, **विनंति पत्र.**— यांत "आपल्या भरत देशांतील बहुधा सर्व जातींच्या लोकांचे व्यवहार व धर्मसंस्कार फलज्योतिष शास्त्रास अनुसरून चालत आहेत. फलज्योतिषावर कोणाचा विश्वास असो वा नसो. तथापि या शास्त्राचा व्यवहारांत उपयोग न करणारे असे फार थोडे लोक आहेत. धर्मानुसार होणाऱ्या संस्कारांत तर या शास्त्राची संमति घेतल्यावांचून कोणाचें चालत नाहीं. परंतु या शास्त्राची हल्लींची स्थिति पाहतां नीट नाहीं. अनेक मतें, अनेक तऱ्हा, स्वार्थपरायणता शास्त्राचें परिमित ज्ञान, उत्तेजनाचा अभाव इत्यादि कारणांनीं वर्तविलेलें फल अनुभवांशीं मिळत नाहीं. अनुभवांशीं सम्यक् मिळणारें फल सांगण्यास जे कांहीं प्रत्यवाय असतील त्यांचें निवारण करणें अवश्य आहे.

'फलज्योतिष संचालक' मंडळीनें हें काम हातीं घेण्याचें योजिलें आहे त्यास सर्वांनीं यथाशक्ति साहाय्य करावें" असा मजकूर आहे.

२ रें, संक्षिप्त नियम व खुलासा— फलज्योतिष खरें कीं खोटें, खरें असल्यास अनेक पद्धतींपैकीं कोणती किती अंशानें खरी याचा अनुभवपूर्वक निर्णय, विश्वसनीय जन्मसंग्रह, विश्वसनीय जातवृत्त संग्रह, फलिताचा शास्त्रोक्त व पद्धतशीर प्रत्यय, प्रत्ययास येणारा फालदेश सांगणाऱ्या ज्योतिष्यांस उत्तेजन. हे उद्देश आहेत. साहाय्य करणारांचे तीन वर्ग केले आहेत. १ ठोकळ रक्कम देणारे. २ जातकसाधन व जातकवृत्त पाठविणारे. ३ ज्योतिषी लोक. ज्योतिषी लोकांस वार्षिक वर्गणी १ रुपया द्यावी लागते. अशा लोकांकडे ज्या पत्रिका करण्यास जातील त्यांपैकीं यांच्या बरोबर उतरतील त्यांचीं नांवें प्रसिद्ध होतील व कांहीं बक्षीसही मिळेल" वगैरे मजकूर यांत आहे.

३ रें, सहाय टिप्पनी.– हा सहाय करणारांचें नांव, पत्ता, जात, वय, कोणत्या वर्गांत दाखल होणार वगैरे मजकुराचा एक फॉर्म आहे.

४ थें, जातकसाधन.– हाही एक फॉर्म असून त्यांत जन्मणाराचें नांव, पत्ता, जन्मभूमि, जन्मकाल वगैरे मजकूर आहे.

एक आण्याचीं तिकिटें पाठविणारास हे सर्व प्रकारचे फॉर्म मिळतात. या संस्थेकडून पत्रिकाही होतात. त्यांची वर्गणी–साधी कुंडली ४ आणे, अंशसहित भावकुंडली ८ आणे, दशवर्ग ८ आणे, विंशोत्तरी दशा प्रवेश काल ४ आणे, अंतर्दशा प्रवेश काल ८ आणे, तांत्रिक फल ४ आणे, तांत्रिक वर्षफल ८ आणे, युरोपीय पद्धति वर्षफल १ रु. टॉलमी ग्रहचार २ रु. विस्तृत फल स्वतंत्र ठराव.

याप्रमाणें या संस्थेचे प्रयत्न आहेत. आमचेही प्रयत्न याच तोडीचे आहेत. कोणीही याच दिशेनें प्रयत्न करणार हें उघड आहे. या शास्त्रांत अनेक मतें अनेक तऱ्हा आहेत. आह्मीं हेंच कुंडलीविज्ञानांत वारंवार सांगत आलों आहों. फलज्योतिष खरें कीं खोटें हें सिद्ध करून आह्मीं दाखविलें आहे. कोणती पद्धति खरी हा वादग्रस्त

प्रश्न आहे. जेव्हां स्वतंत्र विचाराचे व आधुनिक विद्येचा ज्यांस संस्कार झाला आहे असे सुशिक्षित या शास्त्राचा विचार करूं लागतील, तेव्हां या प्रश्नाचा निकाल तेव्हांच लागेल. अमुक कारणानें अमुक गोष्ट घडली किंवा घडेल असें एखाद्यानें जरी एखाद्या पद्धतीनें बरोबर सांगितलें, तरी तेवढ्यावरून तीच पद्धति बरोबर आहे असा निर्णय होऊं शकणार नाहीं. निरयन पद्धतीनें जसे प्रश्न बरोबर उतरतात, तसेच सायन पद्धतीनेंही ताऱ्खेपर्यंत कित्येक महिने पूर्वी वर्तवून बरोबर उतरल्याचे दाखले आमच्यापाशीं आहेत. कित्येक ज्योतिष्यांस तर या शास्त्राच्या धुळाक्षराची सुद्धां पूर्ण ओळख नसते, पण ते सुद्धां एखादी गोष्ट बरोबर सांगतात ! सारांश अमुक पद्धति खरी आहे व अमुक खोटी आहे, हें ठरविण्याच्या कामीं बरेंच बुद्धिसामर्थ्य खर्च करावें लागेल.

संस्थेचा असा एक ठराव आहे कीं, फलित पाठवितांना कारण व ग्रंथवचन द्यावें. कारण सांगतां येईल पण ग्रंथवचनें सर्वत्र कशीं देतां येतील तीं येवोत ! आमचे वतनी ज्योतिषी सुद्धां असेंच ह्मणत असतात. परंतु असा एकही ग्रंथ नाहीं कीं त्याचा सर्वत्र आधार देतां येईल. ग्रहांचीं स्थानपरत्वें, राशिपरत्वें, युतिपरत्वें आणि दृष्टिपरत्वें मिळणारीं फलें भिन्न असणार. या भिन्न फलांचीं एकवाक्यता कोणत्याही ग्रंथांत केलेली नाहीं. किंबहुना करिता येणेही शक्य नाहीं. शिवाय नक्षत्रपरत्वें किंवा अंशपरत्वेंही ज्योतिष्यास विचार करावा लागतो. सारांश अशा अनेक भानगडी असल्यामुळें ग्रंथाचा आधार देतां येणें शक्य नाहीं, असें आमचें ठाम मत आहे.

ही संस्था निरयनवादी आहे कीं सायनवादी आहे, निरयनवादी असल्यास ती कोणता करण ग्रंथ मान्य करिते, त्याशिवाय इतर ग्रंथ व्यर्थ असतील तर कां, जातवृत्त व जातकसाधन यांच्या साह्यानें पुढें एखादें मासिक पुस्तक चालविण्याचा किंवा एखादा स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याचा हेतु आहे कीं काय या गोष्टी संस्थेकडून प्रसिद्ध झाल्या असत्या तर बरें झालें असतें. असो–संस्था

राजाश्रयी आहे, व मंडल विद्वान आहे, तेव्हां अशा संस्थेकडून एखादा सर्वमान्य ग्रंथ होऊन मंडलचे हेतु सहज सिद्ध होतील असें मानण्यास हरकत नाहीं. ईश्वर संस्थेच्या चालकांस दीर्घायु करो.

---

[३]

विद्वद्वर्य रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांसी सा. नमस्कार वि. वि. दारिद्र्ययोगाचे कांहीं श्लोक ग्रंथांतून निवडून घेऊन सर्वांच्या वाचण्यांत यावे अशाकरितां ते दाशाहिकांत छापण्यासाठीं पाठवित आहें त्यांस मर्जीनुरूप स्थळ मिळावें.

दारिद्र्ययोग

वीर्येण हीनाः शुभखेचरेंद्राः शत्रुं तृतीयं च भवं प्रयाताः ।
चतुष्टयं पापखगाश्च याता जातस्तदानिर्धनतामुपैति ॥ १ ॥
देहाधीशः कर्मगेहाधपश्च । मदः सूर्यो मातृगेहाधिनाथः ।
रिःफं मृत्युं कुर्वतेऽरिं च याताः । जातं नित्यं निर्धनं दुःखयुक्तं
कोशाधीशाख्यके चत् सुरगुरुसहितो द्रव्यहीनो मनुष्यः ।
शत्रौ वांगास्तपौ चेत् तनयसदनगा वीर्यवंतश्च पापाः ॥
कुर्वाते जीवशुक्रौ यदि दिनगमनं जन्मकाले तथाच ।
अस्मिन्योगे मनुष्योऽखिल सुखरहितो निर्धनो दुःखयुक्तः २
तनुपतिर्यदि पापविलोकितः । बलयुतोस्तलयालयगो भवेत् ।
रिपुनिकेतनपो यदिवीर्यवान् । व्रजति निर्धनतां मनुजस्तदा ४
देहाधीशो मृत्युगेहे यदास्यात् ।
मूढो व्यापारस्य नाथोऽरियातः ।
द्रव्येशश्चेद् द्वादशस्थानवर्ती ।
आपत्कालं मानवः क्षिप्रमेति ॥ ५ ॥
षष्ठगता लाभगताश्च सौम्या ।
अस्तंगतः स्याच्च कुटुंबनाथः ।
मूढौ यदा भार्गववाक्पती च ।
व्ययेंगनाथश्च विपत्तिकालः ॥ ६ ॥

बाळंतपण

बाळंतपणा ही क्रिया जरी स्वाभाविक आहे तरी तो पुनर्जन्म आहे असें समजण्यास हरकत नाहीं. भयंकर अशा प्रसव वेदना जाणण्यास कोण समर्थ आहे ? अशा प्रसंगीं आपण घरीं असावें, ह्मणजे प्रसंगीं वाटेल तो प्रयत्न करितां येईल असें वाटणें साहजिक आहे. परंतु हा समजत नसल्यामुळें निरुपाय होतो व आपण एकीकडे व आपली पत्नी एकीकडे असा प्रसंग येतो. आपल्या स्त्रियेची प्रसूति या खेपेस सुरक्षित नाहीं असें जर कळेल तर तिची काळजी जास्त घेतां येईल, व संकट न टळलें तरी शक्य तितके प्रयत्न करितां येतील. ह्मणून या गोष्टीचा ज्योतिःशास्त्राधारें विचार करण्याचें आह्मीं ठरविलें आहे. हें काम आह्मीं फुकट करणार आहों. याबद्दलची वर्गणी आह्मीं कोणापासूनही घेऊं इच्छित नाहीं. परंतु ऑफीसखर्च व टपालखर्च यासाठीं २॥ आण्यांचीं तिकिटें मात्र विचारणारांनीं पाठविलीं पाहिजेत. ज्यांस या गोष्टीचें ज्ञान करून घेणें असेल त्यांनीं पुढील कलमवार माहिती पाठविली पाहिजे.

१ पतीचा जन्मकाल (ता., म., सन व जन्माचीवेळ)
२ पत्नीचा जन्मकाल (,)
३ पूर्वी काय काय मुलें झालीं, कधीं व त्यांची स्थिति.
४ हल्लीं (आज तारखेस) कितवा महिना आहे.
५ आरंभीं कोणत्या महिन्यांत अजमासें कोणत्या तिथीला पाळी चुकली.
६ झालेल्या मुलांचे जन्मकाल व त्यांच्या कुंडल्या.

याप्रमाणें सहा कलमी माहिती स्पष्ट व आपल्या समजुतीनें बरोबर अशी पाठवावी. ह्मणजे त्या माहितीच्या आधारें गर्भकाल, गर्भाची

स्थिति, प्रसूतिकाल व प्रसूतिकालाची स्थिति आम्हीं वर्तवून पाठवूं. केवळ शास्त्राचा अनुभव घेण्यासाठीं आमचा हा प्रयत्न आहे. या साठीं सर्वांनीं आमच्या प्रयत्नास साह्य करावें अशी विनंति आहे. शेंकडा ९० जन्म बरोबर उतरतात, असें दिसून आल्यावरोबर या विषयावर एक स्वतंत्र पुस्तक लोकोपकारार्थ प्रसिद्ध करावयाचें आहे.

माहिती पाठविणें ती फुलिस्केपच्या अर्ध्या पानावर बाजूस समास टाकून बालबोध लिपींत स्पष्ट असावी. कारण हा कागद आह्मांस फाईल केला पाहिजे.

प्रसूति झाल्यानंतर आह्मीं वर्तविल्यापैकीं कोणकोणत्या गोष्टी जुळल्या व कोणकोणत्या गोष्टी चुकल्या हें एका कार्डावर कळवावें.

सूचना.—पुढील अंक दिवाळीचा छापखान्यास सुटी देणें भाग असल्यामुळें २१ नवंबरच्या अंकाबरोबर येईल.

नवंबरांत वर्गणीदारांचीं वर्षफलें करण्यास सुरवात होणार आहे. हिंसेबरमध्यें तीं बक्षीस पुस्तकासह पुढील सालच्या वर्गणीसाठीं रवाना होतील. यासाठीं ज्यांस वर्षफलासाठीं जन्मकाल पाठवावयाचे असतील, वर्षफलांसंबंधी कांहीं सूचना करावयाच्या असतील व पुढील सालीं वर्गणीदार व्हावयाचें नसेल त्यांनीं नवंबर १५ चीच्या आंत आपापला खुलासा करावा अशी विनंति आहे–येत्या वर्षासाठीं वर्षफलाच्या फार्मांत पुष्कळ माहिती छापून काढिली आहे !

विष्णु गोपाळ नवाथे.
संपादक–कुंडलीविज्ञान—
पो. महाड जि. कुलाबा.

र. नं. बी. ४५

कुंडलीविज्ञान.

दशाहिक

कालात्मा दिनकृन्मनस्तु हिमगुःसत्वं कुजो ज्ञोवचो
जीवो ज्ञानसुखं सितश्च मदनो दुःखं दिनेशात्मजः ॥
राजानौ रविशीतगू क्षितिसुतो नेता कुमारो बुधः
सूरिर्दानवपूजितश्च सचिवौ प्रेष्यःसहस्रांशुजः ॥१॥
(बृ० जा०)

पुस्तक७वें] १ नवंबर सन १९०७[अंक२४

विषयानुक्रम.

१ जन्मकालाचा गर्भकालाशीं संबंध नं.२.२ पत्रव्यवहार
३ बाळंतपण ४ जातकपारिजात पृ. २३५ ते २४४

संपादक
विष्णु गोपाळ नवाथे
मु० महाड, जि० कुलाबा
"चंडकिरण" प्रेस.

वार्षिक वर्गणी टपाल खर्च सह २।१०
फुटकळ अंकास १॥ आणा.

श्रीशंकर

रविबुधभेदयुति

रा. रा. कुंडलीविज्ञान कर्ते यांस

वि. वि. येत्या अंकीं अवश्य स्थळ मिळेल अशी आशा आहे

बुध आणि शुक्र वक्री झाले असतां अंतर्युतीचे वेळीं कधीं कधीं सूर्याचे आड येतात. चंद्राच्या योगानें जसें सूर्यग्रहण होते त्याप्रमाणेंच बुधशुक्रांचे योगानें होणारें हें एक प्रकारचें सूर्यग्रहणच होय. या चमत्कृतीस संक्रमण, अधिक्रमण, भेदयुति वगैरे नांवें आहेत. शुक्राची युति एकदां झाल्यावर १२२ व ८ आणि १०५ व ८ या वर्षांनीं क्रमानें होते. शुक्रसंक्रमणाचें संपूर्ण गणित (श. १७९६ मधील) श्रीमत्केतकरकृत ज्योतिर्गणितांत दिलेलें आहे. भातां शुक्रसंक्रमण श. १९२६ पर्यंत यावयाचें नाहीं. बुधसंक्रमण सात किंवा १३ वर्षांनीं होतें. तसा योग १८२९ कार्तिक शु. ९ गुरुवार ता. १४।११।०७ रोजीं आला आहे. त्याचें गणित ज्योतिर्गणितावरून पुढें लिहिल्याप्रमाणें.

पूर्वोक्त दिवशीं उज्जयिनी मध्यम सूर्योदयानंतर घ. २७ प. १५ या वेळीं अहर्गण २१४.८६३ रवीनीच अं. २५८.८२९ मंदकेंद्र अं. ३०९. ४८७ मंदस्प. र. अं. २०८.४१६ मंदकर्ण ९८९.२ दिनग. अं.१.००७ रविबिंब ३२।३५ पर. लंब. वि. ९ अय. २२.५५७

बुधनीच अं. ५३.४८६ मंदकेंद्र अं. ३३४.८४० मंदस्प. बु. अं. ६.१४ लंबन वि. १४.४ मंदकर्ण ३१२.५७ सपात बु. अं. ३.६३५ रविम. श. २६.६५ भूमध्य. स्प. बु. अं. २२८.४५७ स्प. दिनग. ब. क.-८१ शरक. १२।३६ शीघ्रकर्ण. ६७६.३३

रविबुधाचा समकल युतिकाल चालन देऊन आणिला तो २८ घ. १८ प या वेळीं बुधाचा स्प. शर कला १२.६ येतो. बुध शुक्रांचे विक्षेपवलन संक्रमणकालीं त्याच्या परम शराएवढें असतें. ह्मणून युतिकालीन भूमध्य शरास परम शरज्येनें गुणून येईल तो युति मध्याचा संस्कार येतो. सपात बुध समपदीं असेल तर हा संस्कार धन व विषम पदीं ऋण असतो. नंतर रवि बुधाच्या दिनगताच्या सहायानें याला वेळेचें रूप देऊन तिचा युति मध्यकालास संस्कार करावा. ह्म० युतिकाल येतो. बुधाचा परमशर सात अंश ज्या १२२ यांचें शर १२.६ यास गुणून १.५४ कला येतात. सपात बुध विषमपदीं आहे ह्मणून हा संस्कार ऋण. यास कालाचें रूप देऊन-३४ प. येतात ह्मणून २८ घ. १८ प.-३४ प.=२७ घ. ४४ प. हा युतिमध्यकाल झाला.

ज्योतिर्गणितावरून येणारा मंद स्पष्ट सूर्य नेहमीं किरणपुरःसरण संस्कार दत्त असतो परंतु ग्रहांस देण्याचा हा किरण पुरःसरण संस्कार त्याच्या शीघ्रकर्णावर अवलंबून असतो ह्मणून तो आयत्या वेळींच द्यावा लागतो. ग्रहांचे शीघ्रकर्णास ५० नीं भागून येतील तितकीं पलें नेहमीं धन समजावीं. येथें बुधाचा शीघ्रकर्ण ६७६ आहे. याला ५० नीं भागून १३.५ प. आलीं. तीं पूर्व साधित युति मध्यकालांत मिळविलीं तेव्हां २७ घ. ५७.५ प. हा दृश्य मध्य युतिकाल झाला. ह्मणजे बुधलोकावर २७ घ. ४४ प. यावेळीं युति गोचर झाल्यावर ती युतिकिरणांची लाट साडेतेरा पळांनीं आमच्या नेत्रांवर येऊन आदळते.

रविबुधभेदयुति

श. १८२९ कार्त्ति. शु. ९ गुरौ ता.१४।११।०७

	उज्जयिनी मध्यकाल. घ.	प.	बनारस [स्टँडर्ड] टाईम. ता.	मि.
स्पर्श	२३	३६	३	५४
संमीलन	२३	४४	३	५७
मध्य	२७	५८	५	३८
उन्मीलन	३२	१०	७	१९
मोक्ष	३२	१८	७	२३

स्पर्श उत्तरेपासून पूर्वेकडे ६० अंश) परमाल्प मध्यांतर १२ क. ३६ वि.
मोक्ष उत्तरेपासून पश्चिमेकडे १५ अं)

• याप्रमाणें हें संक्रमण दुर्बिणीनें पहाणारांस चांगल्या रीतीनें दिसणारें आहे. व डोळ्यांनीं (रंगीबेरंगी जाड भिंगांतून किंवा काजळ लावलेल्या भिंगांतून) पहाणारांसही दिसेल असें वाटतें.

हें गणित केतकी पंचांगाप्रमाणें आहे. ग्रहलाघवावरून येत नाहीं. व कोणत्याही ग्रहलाघवी पंचांगांत ही युति दिलेली नाहीं. परंतु धूतपापेश्वर पंचांगांत सदर्हु दिवशीं बुधकृत सूर्यग्रहण २३ घटिकांनंतर होईल असें लिहिलें आहे. याच पंचांगांतील कार्त्तिक शु० ७ च्या ग्र-

हांवरून चालन देऊन शु. ९ च्या दिवशीचें सायंकाळचें गणित केलें त्यांत सूर्यबुध यांचे भोगांत ५।६ अंश अंतर आहे. युतिकाळीं सूर्य बुधांतील अंतर शून्य झालें पाहिजे ही गोष्ट सामान्य गणितज्ञांसही माहित आहेच तेव्हां धूतपापेश्वर पंचांगकर्ते वे. रा. रा. दादाशास्त्री दामले यांस आमची सविनय प्रार्थना अशी आहे कीं शु. ९ रोजीं २३ घटिकांस बुधकृत सूर्यग्रहण लिहिलें आहे, त्याचें गणित सार्वत्र प्रसिद्ध करावें म्हणजे धूतपापेश्वर पंचांग संबंधें आलेली शंका दूर होईल. कळावें लोभ असावा हे विनंति.

मु. खारेपाटण
जि. रत्नागिरी
मि. आश्वि. कृ. ५, १८२९

गंगाधर आत्मारामशास्त्री माईणकर
रामकृष्ण गंगाधरशास्त्री माईणकर

पत्रव्यवहार

[१]

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते यांस.— सा. न. वि. वि.— नोव्हेंबर व डिसेंबर या दोन महिन्यांतले तेजी मंदीचे कांहीं श्लोक निवडून घेऊन लिहून पाठवित आहें. त्यांस दाशाहिकांत स्थळ मिळावें.

बुधो वक्री यदा जात इक्षवा-
दीनां महर्घता ॥
सुभिक्षं सर्व धान्यानां भविष्यति
न संशय: ॥

बहुतेक नोव्हेंबरमध्यें बुध वक्री आहे

सौम्येश वारे रविसंक्रमश्चेद्
दुर्भिक्षमायातिच सर्वधान्यम् ॥
पक्षी सरोगा नृपते रतीव
दृश्येत भूमौ युधि दारुणं भयं ॥

ता. २३ नवंबर शनिवारीं धनुसंक्रमण होत आहे.

आदित्य बुधशुक्राश्च त्र्येकराशौ त्रयो
यदि ॥
यानि कानिच धान्यानि सर्वं साम्य
स्मृतं बुधै: ॥

नोव्हेंबरच्या १ ल्या आठवड्यांत हे ग्रह एका राशीस आहेत.

यत्र राशौ रविर्याति तत्र शुक्रो
यदा स्थित: ॥
वातश्च जायते दीर्घ: सर्वं ह्यर्घं
समस्थितं ॥

सर्व नोव्हेंबरमध्यें रविशुक्र एका राशीवर आहेत.

मघायां गुरुवक्री स्यात्
सुभिक्षं नृपते: सुखम् ॥
पुण्यमार्गं तदा गम्यं
घृतस्यार्घं प्रदीयते ॥

डिसेंबरपासून मघा नक्षत्रावर गुरु वक्री आहे.

मार्गशीर्षे सितेपक्षे द्वितीया शनिवासरौ ॥
दक्षिणे वहते वातो लोकानां
कष्टदो भवेत् ॥

मार्गशीर्ष शु. २ शनिवारीं अली आहे.

संक्रांतिरादित्यदिने न शस्ता
करोति युद्धं नृपतेरतीव ॥
धान्यं महर्घं ह्यतिरौद्रवार्ता
प्रजा भवेद्दुःखितहीनदीना ॥

ता. २२ डिसेंबर रविवारीं मकर संक्रमण होत आहे.

मीनराशौ कुजश्चैव तृणकाष्ठं चतुष्पदः ॥
महर्घं जायते सर्वं गृह्यते तत्र पंडितैः ॥

डिसेंबरमध्यें मीन राशीवर मंगळ आहे. सारांश नोव्हेंबर हा महिना मंदीचा व डिसेंबर तेजीचा व रोगकारक दिसतो.

गणेश दामोदर ग्रंथे.

[२]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.

सा. न. वि. वि.— कुंडलीविज्ञान अंक २४ मध्यें आपण आमच्या संस्थेसंबंधी माहिती दिली असून आशीर्वचनही दिले आहे, त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहों.

आमचे प्रयत्नाविषयीं लिहितांना आपण कांहीं सुचनांवर टीका व कांहीं शंका नमूद केल्या आहेत, त्याविषयीं थोडें लिहिण्याची अपेक्षा आहे.

१ आपण लिहितां कीं "आमचेही प्रयत्न याच तोडीचे आहेत" आम्हीं म्हणतों आपले प्रयत्न आमच्या प्रयत्नांपेक्षां जास्त नेटाचे व टिकाऊ व फार दिवसांचे आहेत. त्यांत आमच्या मतें जरी व्यवस्थितपणाचा अंश जास्त असावा असें आहे. तरी आमच्या व आपल्या प्रयत्नांची तुलनाच होऊं शकत नाहीं. 'याच तोडीचे' ह्मणण्यांत आपण आपलेकडे पुष्कळ कमीपणा घेत आहां.

२ फल बरोबर जुळलें तरज्या पद्धतीच्या आधारें तें वर्तविलें ती पद्धति खरीच असा निर्णय ठरत नाहीं. होय, गोष्ट खरी. परंतु सत्यासत्येचा निर्णय करण्यास हाच राजमार्ग आहे. एकदोनवेळां फल जुळलें तर निर्णय होऊं शकत नाहीं परंतु वारंवार जुळूं लागल्यास ती वर्तविण्याची पद्धति विचाराई आहे इतकें खास. यासाठीं साधनें मुबलक गोळा झाल्यावर एखादा

करितां यावा अशी इच्छा आहे.

३ ग्रंथवचन प्रत्येक प्रसंगीं दिलें पाहिजे, हा ठराव करण्याचा हेतु असा आहे कीं 'वतनी' ज्योतिष्यांस फलाची जुळवाजुळव करून घेण्याची संवय असते. एका ग्रंथाचें वचन न जुळल्यास दुसऱ्या ग्रंथांतील वचन हुडकून काढावयाचें. तें न जुळल्यास तिसऱ्यांतील काढावें, त्रावन न जुळल्यास निरयन, अष्टोत्तरी न जुळल्यास विंशोत्तरी या प्रमाणें लटपट करून कशी तरी वेळ मारून नेतात. हा प्रकार जितका कमी होईल तितकें चांगलें कोणता ग्रंथ मान्य करण्यासारखा आहे, ह्मणजे अनुभवाचें पाठबळ कोणत्या ग्रंथास जास्त आहे हें ठरविणें जरूर आहे. असुक एक ग्रंथ सर्वमान्य ठरेलच असा भरंसा नाहीं. तथापि प्रयत्न करणें तो व्यवस्थित केला पाहिजे.

४ संस्थेपैकीं बहुतेक निरयन मताभिमानी आहेत. ज्यांस ज्योतिष खरें असें वाटतें त्यांचा अनुभव निरयन फलितावरून झालेला असतो. तेव्हां निरयनाकडे कल असणें स्वाभाविक आहे तथापि संस्थेचा उद्देश सत्यशोधनाचा आहे. दोन्ही पद्धती पैकीं अनुभवास जास्त कोणती जुळते हें पाहणें संस्थेचें कर्तव्य आहे. एका विशिष्ट पक्षाचा आग्रह धरून आजच 'ठाम' मत करून घेण्याचा संस्थेचा हेतु नाहीं. सर्व पक्षांच्या अभिमान्यांचें ह्मणणें ऐकून घेणें हें संस्थेचें कर्तव्य आहे.

५ जातकसाधनांवरून निष्कर्ष काढितां आल्यास फार उत्तम व तत्प्रीत्यर्थ प्रयत्न करणें हा हेतु मुख्य आहे. ग्रंथ तयार करितां यावा अशी इच्छा आहे. यश किती तपत येईल हें आज सांगतां येत नाहीं.

६ संस्थेस राजाश्रय किती आहे, ह आपणास कळलें आहेच. वर्षापर्यंतकडे तो कायम राहील असें सांगवत नाहीं ! दुर्बिणी जुन्या आहेत, व त्या थोड्या दिवसांपुरत्या मिळाल्या आहेत. संस्थेची घटना अशी आहे कीं, द्रव्यबलापेक्षां मनुष्यबलाची अपेक्षा जास्त आहे. जातकसाधनसंग्रह व जातवृत्तसंग्रह हीं संस्थेचीं साध्याचा

मुख्य कामें आहेत. कित्येक ज्योतिष्यांस मध्यमकाल व निजकाल ह्यांची देखील ओळख नसते. अशांनीं केलेल्या पत्रिकाही भरंशाच्या मानितां येत नाहींत. यासाठीं जन्मकालावरून शुद्ध रीतीनें पत्रिकाही तयार करून ठेवणें हें संस्थेचें तिसरें कार्य आहे. फलित वर्तविणें हें गौण कार्य मानितों. कारण तें आमच्यापेक्षां इतर ज्योतिषी चांगलें करूं शकतील व तें काम निरनिराळ्या पद्धतींच्या अभिमान्यांकडून झाल्यास परीक्षणाचा मार्ग सुगम होतो.

७ श्री. रा. व. कारभारी साहेब राय नानकचंद ह्यांची सहानुभूति असल्यानेंच संस्थेच्या प्रयत्नांस प्रारंभ झाला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

८ आपले व आमचे हेतु एकच आहेत यांत शंका नाहीं. प्रयत्नांच्या पद्धति निराळ्या असतील तथापि उभयतांच्या विचारानें जर प्रयत्न होऊं लागतील तर अर्थात् यश जास्त मिळेल, असें निदान आह्मांस तरी वाटतें. ज्योतिषशास्त्राविषयीं प्रयत्न करणारे थोडे. त्यांत एकाचें तोंड पूर्वेकडे तर एकाचें पश्चिमेकडे असा प्रकार असणें इष्ट नाहीं. मासिक पुस्तक स्वतंत्र काढण्याचा विचार आहे, परंतु तो जातकसाधनांचा विपुल संग्रह झाल्यानंतरचा आहे. आपल्या सहानुभूतीमुळें आतां असाही विचार होत आहे कीं, स्वतंत्र ग्रंथ करण्याची सामुग्री जमल्यावर पाहिजे तसा ग्रंथ लिहावा. परंतु स्वतंत्र मासिक काढण्याची दिशा सोडून चर्चेसाठीं जो विषय पुढें आणावयाचा तो आपल्याच पुस्तकांत आणिल्यास काय हरकत? उलट त्यांत जुटीमुळें काम चांगलें होईल. आपल्या प्रयत्नांतील एक शाखा ह्मणून आह्मीं प्रयत्न करण्यास देखील हरकत नाहीं. कोणीकडून उभयतांस जें कार्य इष्ट तें घडून आलें ह्मणजे झालें.

आपलें पुस्तक महिन्यांतून तीनदां प्रसिद्ध होतें. पूर्वी एक वेळ होत असे. फेरफार कां केला तें कळत नाहीं. मला वाटतें आपण आपलें पुस्तक 'मासिक' करावें, ह्मणजे त्यांतील लेख चांगल्या विचारानें पुढें आणितां येतील. कदाचित् पोष्टाच्या नियमामुळें हा फेरफार केला असेल तर "पाक्षिक" केल्यानें ती हरकत दूर होणार आहे. दहा दिवसांचा अवधि थोडा आहे, असें बऱ्याच मंडळीचें मत आहे.

१० श्री. रा. माधवराव किबे साहेब हे आपल्या पुस्तकाचे वर्गणीदार आहेत, त्यांचाही अभिप्राय असाच आहे. हे गृहस्थ विद्वान् शोधक व आस्थेवाईक आहेत. त्यांनीं "दत्तकयोगासंबंधानें" आपणाकडे कांहीं पत्रव्यवहार केला होता. परंतु त्यांचें त्यांस कांहींच उत्तर गेलें नाहीं, असें कळतें. अशानें निरुत्साह होतो, तो होऊं देणें चांगलें नव्हे.

११ जास्त अनुभवामुळें मतें ठाम होऊन बसणें साहजिक आहे. परंतु शोधकांनीं शास्त्रीय 'समदृष्टि' ठेवणें अवश्य असतें. आपल्या लेखांत नेहमीं समता दिसत नाहीं. हें स्पष्ट सांगण्याबद्दल क्षमा मागतों, 'फलज्योतिषादर्श' विषयीं असा प्रकार घडला आहे असें मला वाटतें. त्यांच्या प्रयत्नांत मोठासा अर्थ आहे असें नाहीं. जी माहिती कोणत्याही ग्रंथांतून मिळण्यासारखी असते तीच त्यांत येत असते, अन्य फार थोडी असते. ही गोष्ट खरी. परंतु 'मासिक' पुस्तकांत हा प्रकार नेहमीं दृष्टीस पडतो.

१२ 'ज्योतिष शास्त्राच्या अभ्यासाची आवश्यकता' या विषयावर आह्मीं इंग्रजी व मराठी तीन लेख लिहिले आहेत. इंग्रजी लेख थोड्याच महिन्यांनीं 'ईष्ट आणि वेस्ट' मध्यें प्रसिद्ध होतील. मराठी लेख केसरी कडे पाठविले आहेत. परंतु ते केव्हां प्रसिद्ध होतील हें सांगतां येत नाहीं. लेख लांब असल्यानें आपलेकडे पाठविले नव्हते. व त्या वेळीं आपली इतकी सहानुभूति मिळेल अशी कल्पना नव्हती.

१३ सायन निरयन पद्धतींची फलज्योतिषदृष्टीनें परीक्षा करणें ह्मणजे उभय पक्षाभिमान्यांनीं वर्तविलेलीं फळें जुळतात कीं नाहीं हें पाहणें असा अर्थ नव्हे. हल्लीं जो तो पक्षाभिमानी याच धोरणानें पुरावा पुढें मांडितो. वास्तविक पाहतां जेथें अयनांशाच्या योगानें ग्रहांच्या व लग्नांच्या राशि बदलतील तेथें राशि व राशिस्वामी

इत्यादींच्या आधारानें फल असेल तितक्याच फलांत उभय पद्धतींत फरक दिसावयाचा, व तितक्या पुरता अनुभव पहावयाचा. त्यांत सत्यासत्यतेचा निर्णय तारतम्यानें करणें हाच मार्ग उत्तम. इतक्या सूक्ष्म रीतीनें कोणी परीक्षण केलेलें आढळत नाहीं, व तसें झालें तर पाहिजे. 'सायननिरयनवाद' यावर एक निबंध कांहीं वर्षांपूर्वी इंग्रजींत लिहिला होता. त्याचें थोडे बहुत मराठींत भाषांतरही केलेलें आहे. परंतु हा वाद मिटविण्याचें धोरण फक्त त्यांत दाखविले आहे. मी कांहीं अंशानें सायन पक्षाचा आहें व कांहीं अंशानें निरयन पक्षाचा आहें. सविस्तर कारणें आजच सांगतां येत नाहींत. सायन वाल्यांचें ह्मणणें 'भारतकालीं' (ह्मणजे युद्ध कालीं अथवा ग्रंथकालीं ही शंकाच) सायन मत होतें. परंतु या विरुद्ध जबर आक्षेप आहेत. वेदांत सायन मत आहे असा दुसरा सिद्धांत आहे. या संबंधानें जरी विरुद्ध नव्हे तरी त्या सिद्धांताचा पोकळपणा दाखविण्यासारख्या कांहीं गोष्टी आहेत. सायनमताभिमानी (रा लेले व भिडे प्रभृतींनी) पक्षानें आणिलेले पुरावे मीं पाहिले आहेत. त्यांत मुख्य प्रश्न कोणती पद्धति पुरातन आहे हा आहे. फलज्योतिष्यांस त्या प्रश्नाचें महत्व नाहीं. त्यांच्या मतें कोणकोणत्या बाबतींत कोणती पद्धति अनुभवास येईल हा मुख्य प्रश्न असला पाहिजे. पुरातन तितकेंच खरें व नवें खोटें ० गोष्टीवर त्यांची भिस्त नसावी.

१४ आपणच पहा कीं, पुरातन काळीं रविमध्यस्थ ग्रहावरून फलित सांगत अथवा भूमध्यस्थ अथवा मध्यम ग्रहांवरून सांगत असें कित्येकांचें मत आहे. व त्याला अनुकूल अशीं वचनें व प्रमाणें ते पुढें आणितात. येथें फलज्योतिष दृष्टीनें महत्वाचा प्रश्न हा नाहीं कीं "पूर्वीचे लोक ते कोणती पद्धति मानित होते? तर कोणतीचा अनुभवाशीं मेळ बसतो? असा आहे. जुने नियम अनुभवाशीं जुळत नाहींत ह्मणून ते निरुपयोगी आहेत व नवीन नियम तयार करण्याची आवश्यकता आहे, असें आपलें मत आहे. तर मग रविमध्यस्थ पद्धति जुनी असली तरी

पुराणत्वामुळेंच तो ग्राह्य असें कसें ह्मणावें? तात्पर्य, फलज्योतिष हें शास्त्र असल्यास त्यास अनुभवाचेंच बल पाहिजे. तो अनुभव दीर्घकालाचा, व्यवस्थितपणें सांठविलेला व मार्मिकपणें मिळविलेला असा असला पाहिजे.

रामकृष्ण सखाराम आठवले.
व्हाईस-प्रिन्सिपाल होळकर कॉलेज,

* सदरहू पत्र खासगी सारखेच होतें. परंतु त्यांतील विचार आमच्या वाचकांस कळणें अगत्याचें वाटल्यावरून त्यांतील मुख्य भाग प्रसिद्ध केला आहे. दे. भ. आठवले यांची आमच्या प्रयत्नाला सहानुभूति आहे. इतकेंच नव्हे तर ते मदत करण्यासही तयार आहेत हें वाचून अत्यंत समाधान होतें. त्यांच्या लेखांस आह्मीं मोठ्या सन्मानानें अग्रस्थान देऊं. कुंडलीविज्ञानच्या बोलक्या बोलांचा सुशिक्षितांच्या मनावर यत्किंचित् जरी परिणाम झाला तरी संपादकाच्या आनंदास पारावार नाहीं. किंबहुना याच कारणासाठीं त्याची आज ७ वर्षें धडपड चालू आहे. हा विषय अशिक्षित लोकांचा नाहीं. अशिक्षितांस आपल्या कुंडलीचें फल बरोबर अनुभवास आलें ह्मणजे झालें, मग तें शास्त्रीय पद्धतीचें असो कीं सैतानपंतीचें असो! त्यांस ग्रंथांची जरूर वाटत नाहीं. ह्मणूनच पत्रिका करणारांचा धंदा जसा जोरांत चालतो तसा ग्रंथकर्त्यांचा चालत नाहीं. कुंडलीविज्ञान आज ७ वर्षें प्रसिद्ध होत आहे. तरी त्याला ५०० च्या वर वाचक अद्याप मिळाले नाहींत! व पुढेंही मिळतील किंवा नाहींत याची शंका आहे. पुष्कळ वर्गणीदार निवळ वर्षफलाच्या आशेनें झालेले आहेत. हें वर्षफल जरा आंखूड झालें किंवा त्याचें फल अनुभवास आलें नाहीं कीं, आमचा अंक बंद करा' ह्मणून पत्र आलेंच! त्यामुळें कुंडली विज्ञानच्या संपादकाला प्रथम इकडे लक्ष द्यावें लागतें. वर्गणीदार कमी होईल तर खर्चाची ओढाताण होते! पत्रिका वर्षफलांकडे लक्ष द्यावें तर व्यवस्थित लेखांची हेळसांड होते!

अशा कचाटांत हें पुस्तक चालत आलें आहे, त्यामुळें आपण ह्मणतां तो दोष झाला आहे. परंतु या गोष्टीस निरुपाय आहे. जेव्हां सु शिक्षितांचाच पूर्णपणें आश्रय मिळेल तेव्हां या कचाटांतून मुक्तता होऊं शकेल, एरवीं होत नाहीं.

सर्व समाज जुन्याचाच अभिमानी आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यामुळें नवें मत प्रतिपादन केल्यास मर्जी खप्पा होते! ह्मणून केव्हां केव्हां 'त्वयार्धं मयार्धं' अशीही वागणूक ठेवावी लागते. समाजाची मर्जी खप्पा करून लोकाश्रयावरच चाललेल्या संस्थेचें कधींही चालणार नाहीं, हें उघड आहे. सारांश, व्यवस्थित विचार पुढें मांडण्यास दाशाहिक ही अडचण नसून मुख्य अडचण वरीलच आहे व ती आणखी कांहीं कालपर्यंत तरी दूर करितां येणें शक्य नाहीं.

कोणत्याही विषयाची समाजांत खळबळ उडवून देण्यास मासिकापेक्षां दीर्शोहिकच योग्य आहे, असें ६ वर्षांच्या अनुभवानें ठरलें आहे. पोष्टाच्या सोईसाठीं मासिकाचें दाशाहिक केलें असा अर्थ नाहीं.

दाशाहिकांत प्रसिद्ध होण्यासाठीं अनेकांकडून लेख, कुंडल्या वगैरे येत असतात, परंतु त्या सर्वांस स्थल देतां येणार नाहीं. जर पुस्तक याहून मोठें होईल तर तसें करितां येईल. श्री. किंवे साहेबांकडून दत्त कासंबंधानें पत्रव्यवहार झाल्याचें स्मरत नाहीं. सर्वांसच उत्तरें देणें या संस्थेस अशक्य आहे. तथापि नव्या वर्षापासून असल्या लेखांची पोंच देण्याची व्यवस्था अवश्य करूं.

फलज्योतिषादर्शाविषयीं आमची सहानुभूति नाहीं, हें त्यांच्या संपादकांनीं प्रथम गृहीत धरून पंडितमन्य, दुनिया झुकती है, सूखीन द्रष्टव्या, इत्यादि प्रलापांनीं जेव्हां आमची पाद्यपूजा केली तेव्हां समदृष्टि न राहणें साहजिक आहे. ज्योतिषावर दुसऱ्या कोणी पुस्तकें, मासिक पुस्तकें वगैरे प्रसिद्ध करूं नयेत, इतकें हलकट मन आमचें आहे असें आमची मनोदेवता सांगत नाहीं! एखाद्याच्या मतावर किंवा प्रयत्नावर टीका केल्यानें ज्यांच्या शिरा उडतात, ते संपादक होण्यासच पात्र नाहींत, असें आमचें ठाम मत आहे. मतावर टीका करणें ही गोष्ट वेगळी आणि व्यक्तीला शिव्या देणें ही गोष्ट वेगळी आहे.

केसरीकडे पाठविलेले लेख जरी लांबलचक असले तरी ज्योतिषविषयक आहेत ह्मणून इकडे पाठविल्यास त्यांस तत्काल स्थल मिळेल. चर्चेसाठीं जो विषय पुढें आणावयाचा तो कुंडलीविज्ञानांत आणण्यास आमची मुळींच हरकत नाहीं असें ह्मणण्यापेक्षां आपण तो यांतच आणावा, अशी आग्रहाची विनंति आहे. आमच्या प्रयत्नांतील एक शाखा ह्मणूनही आपण प्रयत्न केल्यास आह्मांस आनंद आहे.

आह्मीं पूर्ण सायन वादी आहों. शके ४४४ च्या मागें निरयन गणना असणें शक्य नाहीं. ब्रह्मगुप्त सायनवादी होता असें ह्मणण्यापेक्षां त्यानें नैसर्गिक पद्धतीचाच स्वीकार केला होता. सूर्य मध्यस्थ पद्धति सायनच संभवते. ग्रहांचीं उच्चें देखील गणितागत अर्थात् सायन आहेत, यांचें विवेचन पुढें स्वतंत्र लेखांत करावयाचें आहे. विषुव, अयन, नक्षत्र, राशि या संज्ञा सायन आहेत. निरयन गणनेला तोंडच नाहीं. कारण आरंभस्थानाला भक्कम असा पुरावाच नाहीं. निरयनांत ग्रहलाघवी, केतकरी, पटवर्धनी वगैरे भेद आहेत, ते सर्व खरेच आहेत. पण प्रत्येकाची संक्रांत भिन्न येत असल्यामुळें कोणतें निरयन खरें हें फलज्योतिष्याला सकारण ठरवितांच येणार नाहीं. अर्थात् निरयनपद्धति ह्मणजे फलज्योतिष्याला शुद्ध मृगजल! पूर्वी सायन पद्धति होती ह्मणून तिचा आह्मीं स्वीकार केला नाहीं, तर ती निसर्गसिद्ध आहे, ह्मणून तिचा अवलंब आह्मीं केला. राशींचे गुणधर्म प्राचीन ग्रंथकारांनीं वर्णिलेले आहेत ते ज्या पद्धतींत बरोबर उतरतील तीच पद्धति ग्राह्य मानण्यास काय हरकत आहे? ते गुणधर्म सायन राशींसच लागू होतात, असा आह्मीं १२ वर्षें अनुभव घेतला आहे असें ह्मणण्यापेक्षां लागू होतात असेंच सिद्ध करून दाखविण्याची पूर्ण तयारी आहे. कुंडलीविज्ञानचें हेंच धोरण आहे. त्यांत हे धर्म प्रसंगवशात्

स्पष्ट दाखविले आहेत.

संपादक 'कुंडलीविज्ञान'

[३]

रा. रा. एडिटर कुंडलीविज्ञान यांस.-

वि. वि. आपल्या ता. १ नवंबरच्या अंकांत वे. शा. सं. माईणकर शास्त्री यांनीं श्रीधूतपापेश्वर पंचांगांत का. शु. ९ रोजीं बुध कृत सूर्य-ग्रहण २३ घटीनंतर असें पाहिल्या वरून साशंक होऊन त्याचें सायंत गणित प्रसिद्ध करावें असा पत्रव्यवहार केला आहे.

ता० ३ नवंबरचे अरुणोदय पत्रांतील आमचे पत्रानें त्यांच्या शंकेचें निवारण होण्यासारखें आहे.

ग्रहलाघवावरून तें ग्रहण येत नसून खेटशुद्धि नांवाचा पंचांग-शोधनसभानियमानुसारी नूतन करण ग्रंथ तात्पर्यविकासिनीटीकेसह आह्मीं तयार करीत आहों त्यावरून तें येत आहे असें आपल्या कुंडलीविज्ञान पुस्तकालोकनापूर्वीच आह्मीं प्रसिद्ध केलें आहे. यामुळें सायंतगणित प्रसिद्ध करण्याची जरूरी नाहीं. कळावें हे

वि. का. शु. ६

दादा शास्त्री दामले.
के. माहीमकर हल्लीं
मुक्काम पनवेल
श्रीधूतपापेश्वरसंस्था

[४]

रंगून-सूर्योदय ज्योतिषसभा

ता. २७ अक्टंबर १९०७रोजीं केमेनडाईन येथें वरील संस्थेची सभा भरली होती. तींत झालेली हकीकत येणेंप्रमाणें.—

१ गेल्या २२ सप्टंबरचे सभेचे ठराव वाचण्यांत आले व कायम झाले.

२ मि० सूर्यनाराणराव प्रेसिडेंट यांनीं मि. दिनशा होरमसजी चेअरम यांस जें पत्र लिहिलें त्यांतील मुद्यांचा प्यारा व त्यांच्या मासिक पुस्तकांत या सभेची हकीकत प्रसिद्ध न करण्याविषयीं सभेची कारणें वाचून दाखविण्यांत आलीं. व तीं रेकार्डमध्यें ठेविलीं. २५

आगष्टच्या सभेच्या ठरावांतील ५ व्या नियमाला वरील ठराव लागू पडतो. आणि तो गेल्या सप्टंबरच्या २२ तारखेच्या सभेंतील चेअरमनचे मतासही थोडासा लागू पडतो.

३ व्हाईस प्रेसिडेन्टकडून जें शिकविलें जातें त्यांची प्रत्येक सहामाहीची परीक्षा घ्यावी व उमेदवारांस बक्षिसें द्यावीं. हा ठराव सर्वानुमतें कायम झाला. ऑनररी सेक्रेटरी मांगथा यांनीं या सभेच्या पुढील सहामाहीचे परीक्षे करितां पदक देण्याचें ठरविलें. व चेअरमन मि. दिनशा होरमसजी यांनीं दुसऱ्या सहामाही करितां सोन्याचें पदक ठरविलें आहे. प्रेसिडेन्ट व व्हाईस प्रेसिडेन्ट यांनीं कांहीं बक्षिसें ठेविलीं आहेत. या वर्षीची पहिल्या सहामाहीची परीक्षा येत्या डिसेंबरमध्यें व दुसरी मार्च्यमध्यें व्हावयाची आहे.

४ मि. नाना तलवलकर यांनीं सांगितलें कीं घडून आलेल्या गोष्टी व प्रत्येक इसमाचे स्वतःचे कुंडलीवरून जे अनुभव मेंबर लोकांस आले असतील ते यांचें रेकार्ड ठेवणें जरूर आहे. या सूचनेस व्हाईस प्रेसिडेन्टनीं अनुमोदन दिलें व मि. नाना तळवलकर यांनींच तें काम आपणाकडे घ्यावें असें सांगितलें. यास मि. होरमसजी यांनीं अनुमोदन दिलें व ही सूचना सर्वानुमतें पास झाली.

५ सभेच्या खर्चांतून लहानसा उपहार झाला.

६ व्हाईस प्रेसिडेन्टचें भाषण झालें.

७ नेहमीं प्रमाणें मेंबरांची संख्या होती. ५ वाजून ३० मि. नीं सभा विसर्जन झाली.

४

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस

सा. न. वि. वि. आपल्या दाशाहिक पत्रांत प्रसिद्ध करण्याकरितां हकीकतीसह खालील कुंडली पाठवित आहें. तर येत्या अंकीं तीस स्थळ मिळेल अशी आशा आहे.

जन्म शक १७७९ चैत्र कृ. ६
बुधवारीं रात्रीं घ.
२४ प. ५०

जन्मलग्नकुंडली.

तत्काल स्प. ग्रह.

र	चं	मं	बु	गु	शु	श	रा	ल
०	८	०	०	०	१	१	११	११
४	१७	१९	११	०	५	१७	१३	४
२४	३९	४७	५३	४०	२०	४७	३०	८
५०	१६	५३	५४	३५	३	४२	९	११

५८	७१	२	४२	१०	९	१३	२९	३२
४८	६	१४	५६	२४	५२	३७	११	

अह्मांस कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें कीं, ही कुंडली आमचे यजमान श्रीमंत स. नरसिंगराव दादा साहेब बुदीहाळकर इनामदार यांची असोन त्यांना ता. २८ अक्टोंबर सन १९०७ रोजीं सोमवारीं दिवसा बारावर एक वाजतां हार्डिझीज रोगानें अकस्मात् मृत्यु जाहला. त्यांच्या वियोगानें त्यांच्या पत्नी सुशील बंधु, व मुलगा [एकच] यांस असह्य दुःख जाहलें. आज ते पांच सहा महिने आजारीच होते. हे संस्थानिक कुरुंदवाडकर व मिरजकर यांच्या प्रीतीतले असोन, त्यांना सरदार हा किताब होता. आणि त्यांची योग्यताही सरदार या नांवास शोभण्यासारखी होती. हे ईश्वरभक्त, सच्छील, गरीबाविषयीं कळकळ बाळगणारे व सत्यवादी असल्यामुळें त्यांच्या कुलवर्गास फार खाईट वाटणार आहे यांची बंधुप्रीति तर लोकोत्तर होती, व यांणीं आपला सर्व कारभार सुज्ञ असे आपले बंधु श्रीमंत रा. विरुपाक्षराव अणासाहेब यांजकडे सोपऊन स्वतः निश्चिंत होते.

या कुंडलींत भाग्येश व द्वितीयेश मंगळ धनस्थानीं स्वक्षेत्रीं व तृतीयाधिप शुक्र स्वक्षेत्रीं असल्यामुळे भाग्ययोग व बंधुप्रीति योग आहे.

सांप्रत यांस विंशोत्तरी राहु महर्दशेतील रवीची अंतर्दशा होती. हा राहु जन्मकाली लग्नीं शनीनें दृष्ट व रवी स्वोचीं बलवान् असा द्वितीयमारकरक्षस्थानीं असल्यामुळें हे मारक झाले. गोचरीं ग्रह पाहतां मृत्युकालीं लग्नाचे व्ययाष्टमस्थानीं शनि व रवि असून चंद्राचे द्वितीय सप्तमस्थानीं मंगळ व राहु आहेत. हा राहु शनीवर गेला आहे. शिवाय अष्टमेश शुक्र रवीनें दूषित असून जन्मस्थ चंद्रास गुरु व चंद्र अष्टम आहेत.

एकंदरींत त्यांची सर्व हकीकत व निधन यांचा कुंडलीवरून स्पष्ट बोध होणार आहे. फलज्योतिषाचा अनुभव घेण्यास आमच्या व्यवसाय बंधूंस अ-सल्या कुंडल्या फार उपयोगी आहेत कळावें लोभ असवा हे वि.

मि. कार्तिक शु.८ श.१८२९ } **जीवन दिक्षीत-राम दिक्षीत**

मु० पो० सुळेभावी

पत्रव्यवहार

[१]

कुंडलीविज्ञानकर्ते रा. रा.

सा. न. वि. वि. — खालील मजकूर कुंडलीविज्ञानचे वाचकांस उपयुक्त होईल असें वाटल्यानें प्रसिद्धीकरितां पाठविला आहे. स्थल मिळावें.

ता. २६ अक्टोबर सन १९०७ रोजीं रात्रीं ११॥। वाजतां श्रीमंत सरकार महाराज माधवराव साहेब शिंदे अलीजाह बहादूर हे मुंबईहून स्पेशल ट्रेननें ग्वाल्हेरकडे येत असतां अंत्री स्टेशनवर उभी असलेल्या फास्ट पॅसिंजर ट्रेनशीं स्पेशल ट्रेनची टक्कर उडाली. त्यांत दोन्हो गाड्यांपैकीं सुमारें १०।१२ मनुष्यें जखमी होऊन दोन तीन मनुष्यें प्राणास मुकलीं. असें ऐकण्यांत आहे ! महाराजांस सर्व शक्तिमान ईश्वरानें जणूं आपल्या सहस्रभुजांनीं रक्षण करण्याकरितांच कीं काय टक्कर होण्याचे पूर्वी १५ मिनिटें दुसऱ्या कंपार्टमेंटांत घालिलें ! मागाहून ला गाडीचा आर्धा भाग ज्यांत महाराजांचें बेडिंग होतें तो अजीबात उडून गेला ! ग्वाल्हेरींत महाराजांच्या आरोग्यास्तव दीपोत्सव, अन्नदान व ब्राह्मणभोजनें झालीं.

आतां सदरहू वेळची कुंडली मांडून या अपघाताचें कारण काय याचा विचार करूं.

सायन

या वेळीं सिंह लग्न उदित असून लग्नस्वामी रवि चतुर्थ स्थानांत शनि, राहू व नेपच्यून या पाप ग्रहांना दृष्ट आहे. चतुर्थ स्थानाचा स्वामी मंगळ हा शनि व हर्शल यांच्या कर्तरीत आहे. लग्नावर मंगळाची पूर्ण दृष्टि आहे.

अनिष्ट मंगळ स्वभावतः अपघात उत्पन्न करितो. व तो चतुर्थ स्थानाचा स्वामी असल्यानें वाहनापासून अपघात होणें साहजिक

आहे.

मकर राशीचा हर्शल अकस्मात् भयंकर गोष्टी घडवून आणितो. तो या वेळीं ५ व्या स्थानांत असून चंद्रावर पूर्णत्वानें पाहतो !

आतां, महाराजांची कुंडली मांडून एवढ्या मोठ्या संकटांतून त्यांचा निभाव कसा झाला याचा विचार करूं.

सायन



या दिवशीं हर्शल मकर राशींत सप्तमस्थानांत असून राहू लग्नीं आहे. हर्शलची लग्नावर पूर्ण दृष्टि आहे. मंगळ अष्टम स्थानांत कुंभ राशींत आहे ! म्हणून हें प्राणावरचें संकट आलें असें वाटतें. द्वितीय स्थानाचा स्वामी रवि हा पंचमांत बुध व शुक्र या शुभ ग्रहांनीं युक्त आहे व सप्तमेश शनि नवमांत आहे. त्या मुळें दुखापत न होतां बचाव झाला असें अनुमान होतें.

महाराजांचे कंपार्टमेंट फुटण्याचे वेळीं श्रीमंत सरदार मोठे शितोळे साहेबांचे चिरंजीव त्याच कंपार्टमेंटांत होतें. त्यांचाही बचाव झाला.

बुधकृत सूर्यग्रहण येथें लहान दुर्बिणीनें पाहिलें. परंतु दिसलें नाहा. याचा खुलासा कुंडलीविज्ञानांत येईलच. कळावें हे वि.

आपला

नथूराव गोखले मास्तर

* या ठिकाणीं सायन पद्धतीचा अनुभव किती सुंदर मिळतो पहा या दिवशीं चंद्र कर्क राशींत आहे. हा राशि चर आहे, व तो महाराजांचे लग्नीं आहे, म्हणूनच महाराज सरकार प्रवासांत होते. ही गोष्ट निरयन पद्धतीनें कशी अनुभवास येते, तें कोणी दाखवावें.

चतुर्थ स्थानावर वाहनांच्या सुख दुःखाचा व अपघातांचा विचार होतो. महाराजांच्या कुंडलींत चतुर्थ स्थानीं मंगळ आहे, म्हणून त्यांनीं या गोष्टीकडे विशेष लक्ष पोहोंचविलें

पाहिजे आहे. सप्तम स्थान हें प्रवासाचें स्थान आहे. या स्थानांत सांप्रत हर्शल आहे, म्हणून चंद्र हा कर्क व मकर राशीवर असतां प्रवास न करणें शहाणपणाचें आहे. या दिवशीं कर्क राशीवर प्रवास केला ही त्यांनीं या शास्त्राच्या दृष्टीनें चूक केली.

कोणा-हीं कुंडलींत जर अष्टम स्थानीं मंगळ आला तर ते दिवस त्याला सुखावह होत नाहींत असें या शास्त्राचें मत आहे. तिकडे दुर्लक्ष करणें चांगलें नाहीं. ज्योतिःशास्त्र हें उपयोगीं आहे कीं निरुपयोगी आहे हें त्या शास्त्राचा विचार करणारांशिवाय इतरांस कळणें शक्य नाहीं. या कुंडलींत जन्मलग्नाचा स्वामी चंद्र आहे व त्याच्या अष्टमस्थानीं मंगळ आहे, म्हणून हा दिवस प्रवासायोग्य नाहीं, असें या शास्त्राच्या ज्ञात्यांनीं आपलें मत दिलें असतें.

चतुर्थ स्थानाचा स्वामी शुक्र आहे. तो या दिवशीं वृश्चिक राशींत मंगळाच्या घरीं रवीसह असून त्याच्या चतुर्थस्थानीं वरील अनिष्ट मंगळ आहे, म्हणूनच इतका भयंकर प्रसंग प्राप्त झाला.

या दिवशीं गुरु सिंह राशींत द्वितीय स्थानीं आहे. तो जन्मचंद्राला ९ वा असून मृत्युस्थानाला पूर्ण पाहत आहे, म्हणूनच या संकटांतून त्यांचा बचाव झाला असला पाहिजे.

संपादक 'कुंडलीविज्ञान'

अभिप्राय

१ आपण वर्तविल्याप्रमाणें गोष्टी घडून आल्या हे कळविण्यास आनंद वाटतो. येत्या सालच्या वर्षफलांत विशेष खुलासेवार माहिती देण्याची कृपा व्हावी.

विश्वनाथ बाबजी कुळकर्णी–मालवण.

२ १९०७ चें वर्षफल आपणाकडून नं. ८ चें आलें, तें बहुतेक उतरलें. १९०८ चें लवकर पाठवावें.

महादेव गोविंद—नंदुरबार.

३ माझे टिपणांत चूक असावी असें वाटतें. कारण अनुभवास जुळत नाहीं.

तुकाराम पांडुरंग–माळशिरस.

४ वर्षफल बरोबर उतरलें नाहीं.

मुन्नालाल दुबे–नागपूर

५ सायनानें वर्षफल बरोबर उतरत नाहीं.

का. ना. घाटपांडे–वडगांव.

६ वर्षफल बरोबर उतरलें.

बळिभद्र यशवंत आचार्य. मुंबई.

७ अनुभव येत नाहीं.

दामोदर विनायक कोटीभास्कर मुं.

८ आपणाकडून अकटबरपासून डिसेंबर अखेर वर्षफल आलें तसेंच पुढील सालचें पाठवावें.

सदाशिव वासुदेव वर्तक—जमखिंडी.

९ पुढील सालचें वर्षफल पाठवावें.

सदाशिव रामचंद्र दाते–जमखिंडी.

१० वर्षफल पाठवावें.

सदाशिव रामचंद्र बेंदिष्टे–महाबांव

११ वर्षफल विस्तृत पाहिजे.

गोविंद श्रीपाद जोशी अहमदनगर

१२ मला सूक्ष्म वर्षफल पाठवावें.

सिताराम श्रीपाद गोरे– सांगली

१३ गतसालीं केलेल्या वर्षफलांत द्रव्यप्राप्ति आणि व्यय तसेंच स्त्री–सौख्य हीं फळें उत्तम मिळालीं.

गणेश प्रभाकर दीक्षित–नांदगांव

१४ वर्षफलांतील कांहीं गोष्टी घडल्या व कांहीं घडल्या नाहींत

लक्ष्मण तुकाराम वढेकार–भंडारा

१५ आपण वर्तविलेलें भविष्य बरेंच उतरलें

बळवंत रामचंद्र खांडेकर

१६ संततियोगाचें भविष्य बरोबर ठरलें कन्या झाली, परंतु ती मरण पावली. तेंही भविष्याप्रमाणेंच झालें.

राजाराम विठ्ठल पाटणकर

वर्तमानपत्रांतील ज्योतिषविषयक लेख

सा. न. वि वि. ता १४ नोव्हेंबर रोजीं सायंकाळीं चार वाजतां दुर्बीण लावून पाहिलें तो बुधाचें अधिक्रमण सुरू झालेलें होतें. सूर्याच्या थेट पूर्व अंगाच्या किंचित् उत्तरेस पूर्वेच्या कडेपासून तीन कला खालीं बुधाचा सूर्य बिंबावर स्पष्ट डाग दिसला. हा डाग सूर्यावरील इतर डागांपेक्षां जास्त काळा असल्यामुळें जास्त स्पष्ट दिसत होता. उत्तरोत्तर तो सूर्याच्या उत्तरेकडील टोंकाकडे चालला. त्याचा मार्ग सरळ रेषाकृति नसून कंसाकार होता. पावणेसहा वाजण्याच्या सुमारास बुध सूर्याच्या वायव्यकडे जरा वर कांठाजवळ दिसला. पुढें दुर्बिण लाविलेल्या ठिकाणापासून सूर्य दिसेनासा झाल्यामुळें व तसेंच सूर्यबिंबही ढगांत लपून गेल्यामुळें बुध सूर्यबिंबावरून पूर्ण अतिक्रमण करून बाहेर गेलेला पहावयास सांपडला नाहीं. जसजसा बुध सूर्यबिंबाच्या वायव्येकडील कडेजवळ येत चालला तसतसा तो सूर्यावरून पळत जात आहे असा भास जास्त जास्त होऊं लागला.

कृ. शं. दीक्षित

पत्रव्यवहार.

[१]

रा. रा. कुंडलीविज्ञानकार बांस.—

वि. वि. आमच्याकडे वरेच जन्मकाल व कुंडल्या येत आहेत. पाठविलेल्या कुंडल्यावरून फलें सांगणें हा आमचा मुख्य हेतु नाहीं; त्यामुळें काळजीपूर्वक घतलेले जन्मकाल, व तत्संबंधी चरित्रक्रम, हीं जितकीं आम्हांस प्रिय आहेत तितका अबाधव्य कुंडलीसंग्रह नाहीं.

पलभा, रेखा, निजकाल इत्यादि गोष्टींकडे दुर्लक्ष्य करून कित्येक कुंडल्या केलेल्या असतात, कित्येकांत भाव व ग्रह स्पष्ट नसतात. केवळ राशींचे आंकडे भरलेले असतात, अशा कुंडल्या आम्हांस खपत नाहींत––निदान त्या पासून आमचें समाधान होत नाहीं. यासाठीं पाठविलेल्या जन्मकालादि साधनांपासून कुंडली तयार करण्याचें काम येथेंच करून कुंडल्या संग्रहीं ठेवतों.

जन्मकालादि साधनें पाठविणारांकडून वर्गणी यावी अशी अट ठेविली नाहीं याचें कारण, उत्साही व आस्थेवाईक लोकांची संग्रहाचे कामीं यथास्थित मदत व्हावी लागते हें होय. जे कोणी कुंडली इत्यादि मागवितील त्यांसच वर्गणी यावी लागेल.

ज्यांचे जन्मकाल व त्या बरोबर किंवा असजसा प्रसंग येईल त्या प्रमाणें त्या मनुष्याचें चरित्र पाठविण्याची आमची संस्था ऋणी होईल.

कुंडलीसंग्रह व चरित्रसंग्रह यथाकालीं प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

सा. १४ नवंबर सन १९०७ गुरुवार रोजीं सायंकाळचे तीन वाजण्याचे सुमारास सूर्यावर बुधाचें आक्रमण दाखविण्यासाठीं मंडळी जमविली होती. प्रवेशकाल गणितानें बनारस काल १५ क. ५५ मि. १६से. आला होता. त्या सुमारास बुध दुर्बिणींतून लहान मोहराइतका दिसला.

गणित इंदूरचें करून खालील मानें आलीं होतीं. नॉटिकलवरून गणित केलें होतें. बाजूचे [illegible] दिलेलीं मानें आधारभूत घेतलीं होतीं.

रविबिंबार्ध १६ क. १०'१४ वि. [शिल्लक

बुध मार्ग कंस १० क. ०'४ वि.
प्रवेशदिक् ६२अं. उत्तरेकडून पूर्वेस [ग्रीनीच]
निर्गमदिक् १५०अं. ,, पश्चिमेस [,,]
बुधबिंबार्ध ० क. ४'९७ विकला [त्रिज्या]
* बहिः स्पर्शकाल १५ क. ५२ मि. ३८ से. [बनारस काल]
अंतः स्पर्शकाल १५ क. ५५ मि. १६ से.
अंतःस्पर्श [निर्गमकाल] १९क. १७मि. ५१से.
* बाहिः स्पर्श [,,] १९क. २०मि. ३२से.

सामान्यतः हे दोन्ही काल तंतोतंत पाहणें अति कठिण असतें. सूर्यबिंबावर बुध काळ्या डागासारखा १५ क. ५४ मि. च्या सुमारास दिसू लागला.

सूर्यबिंब बुधबिंबापेक्षां सुमारें ४०,००० पट क्षेत्रमानानें असल्यानें डागरूपी बुध अति लहान दिसत होता. त्यामुळें संक्रमण सुरुवात कांहीनें दिसणें शक्य नाही.

प्रवेश व क्रमण दिक् जमल्या नाहींत. पूर्वे चा जवळ जवळच प्रवेश झाला. सुमारें एक तासभर बुधाचा डाग दिसत होता. पुढें अभ्रें आल्यानें सूर्य मंद दिसू लागल्यानें दिसेना. निर्गम सूर्यास्तानंतर असल्यानें दिसण्याचा मुळीं संभवच नव्हता.

प्रवेशाचे वेळीं बुध मोठा दिसत होता., व पुढें अंत गेल्यावर लहान दिसू लागला. हा एक दृष्टिभ्रम आहे.

पूर्वी बुधाचें सूर्यावर संक्रमण सन १८९४ सालीं झालें होतें. पुढें तें सन १९४० मध्यें होईल. हीं संक्रमणें पृथ्वीवर कोठें तरी दिसतात. परंतु अमुक स्थळीं दिसतीलच असा नियम नाहीं. जेथें संक्रमण पर्व रात्रीं येतें तेथें दिसत नसतें. यंदाचा पर्वकाळ सुमारें ३॥ तासांचा होता म्हणून पृथ्वीच्या पूर्वपश्चिम अशा $\frac{1}{8}$ अथवा $\frac{1}{3}$ भागात दिसण्याचा मुळींच संभव नव्हता.

इंदूर,
२६।११।१९०७ } रामकृष्ण सखाराम आठवले.

[२]

मुहूर्तसारांश

१ नक्षत्रांवरून मुहूर्त पाहणें.—भरणी नक्षत्रावर नूतन मनुष्याबरोबर ओळख करावी. पण नूतन वस्त्र परिधान केलें अगर नोकर ठेविला तर हानिकारक होय. कृत्तिका कोणत्याही कार्यारंभास शुभ जाणावी. रोहिणी शत्रु जिंकण्यास, घर शांभण्यास, लग्नसंबंध जुळविण्यास वगैरे शुभ. यांशिवाय इतर कार्यें अशुभ. मृगशीर्ष या नक्षत्रावर कोणत्याही कामास आरंभ केला तर खेवट गोड होता. आर्द्रा, पुनर्वसु, मघा, धनिष्ठा, पूर्वा, पूर्वा भाद्रपदा, हस्त, स्वाती, अनुराधा, मूळ, रेवती या नक्षत्रांवर कोणत्याही कामास आरंभ करावा पुष्य, उत्तरा, चित्रा, विशाखा, ज्येष्ठा, उत्तराषाढा, श्रवण, शततारका हीं कार्यारंभास मध्यम नक्षत्रें. आश्लेषा विद्यारंभास उत्तम.

२ प्रयाणास मुहूर्त.—रविवारीं उत्तर दिशेस, सोमवारीं वायव्य दिशेस, मंगळवारीं पश्चिमेस, बुधवारीं नैऋत्येस, गुरुवारीं दक्षिणेस, शुक्रवारीं आग्नेयीस आणि शनिवारीं पूर्व दिशेस जाऊं नये. कोणत्याही वारीं ईशान्येस जाण्यास हरकत नाहीं.

३ वारशूल.— पूर्व दिशेस सोमवार आणि शनिवार. दक्षिणेस गुरुवार. उत्तरेस बुधवार आणि मंगळवार, पश्चिमेस रविवार व शुक्रवार. हे वारशूल आहेत, म्हणून त्यावारीं त्या दिशेस जाऊं नये.

४ जबाड मुहूर्त.— सूर्य नक्षत्रापासून दिवस नक्षत्रापावतो नक्षत्रें मोजून त्रिगुणित करून सात घालती तिथि मिळवावी व बाराने ८ वीं भागावें. शेष ३ उरल्यास जबाड मुहूर्त जाणावा. तो प्रयाणास उत्तम.

५ संमुख चंद्र — करण, नक्षत्र वार, संक्रांति, कुतिथि, कुलिक यामार्ध, मगळ, शनि रवि, केतु इ० दोष संमुख चंद्र घेउन नमन केलें असतां जातात

१।५।९ राशीचा चंद्र पूर्वेस असतो.
२।६।१० ,, दक्षिणेस ,,
३।७।११ ,, पश्चिमेस ,,
४।८।१२ ,, उत्तरेस ,,

६ पुष्य.— कोणत्याही शुभ

कार्यास उत्तम. कारण, दुसरे दोष, अष्टमस्थानी चंद्र, गोचरीचा ४।८। १२ वा चंद्र असला तरी पुष्य दोष दूर करून कार्यसिद्धि करितात

७ अमृतसिद्धियोग.— रविवारीं हस्त, सोमवारीं श्रवण, मंगळवारीं अश्विनी, बुधवारीं अनुराधा, गुरुवारीं पुष्य, शुक्रवारीं रेवति, शनिवारीं रोहिणी या योगास अमृतसिद्धियोग ह्मणतात. चांगल्या कामास हा योग घेणे चांगले.

८ अयनपरत्वें शुभाशुभ कर्मे

गृहप्रवेश, देवप्रतिष्ठा, विवाह, चौल, व्रतबंध, मंत्रग्रहणादि शुभकर्मे उत्तरायणांत करावीं. यांहून अन्य कर्मे दक्षिणायनांत करावीं,

९ रिक्ता तिथी ह्मणजे ४।९।१४ व रवि, मंगळ व शनि हे वार मंगळ कार्यास घेऊं नयेत.

कोणत्या वारीं काय करावें हा विषय कुंडलीविज्ञानांत सांगें आला आहे.

१० कोणत्या कार्यास काय मुहूर्त पहावा तें—जन्मऋक्ष तारा (नक्षत्र) शुद्धि: व्रतग्रहणी रविगुरु शुद्धि; यात्रेस जाण्यास शुक्रशुद्धि आणि सर्व कार्यास चंद्रशुद्धि पहावी. मुहूर्त पाहतांना प्रत्येकानें स्वतःचे राशीचा जातचंद्र, तसेच ४।८।१२ वा चंद्र, विष्टी, व्यतिपात, वैधृति, मृत्युयोग हे टाकावे.

गणेश दामोदर ग्रंथे-मुसावळ

पोंच व अभिप्राय.

१ स्वदेशी चहा.— रा० सखाराम बल्लाळ गोखले. पो. बिरवाडी ता. महाड जि. कुलाबा यांचेकडून आला आहे. चहा करून पाहिला. वास उग्र येतो. चवीला चांगला लागत नाहीं. रंग येतो. उत्तेजक आहे. चव आणि वास यांत सुधारणा झाली. पाहिजे. एरवीं तो पसंत पडेल असें वाटत नाहीं. कल्पना ठीक आहे.

२ पत्रिकेचे फॉर्म.— रा० गोपाळ जगन्नाथ जोशी–ठाणें यांचेकडून आलेले पावले. कागद व छपाई सुंदर आहे. आरंभी मंगलचरण, जन्मकाल, गणनाडी वगैरे, घातचक्र, लग्नकुंडली, राशिकुंडली एथपर्यंत एक फॉर्म आहे. यावर जन्मकालीं टिपण करितां येईल. दुसऱ्यांत स्पष्टगह कोष्टक, द्वादशभावकोष्टक, भावचलित व होरानवमांशादि कुंडल्या इतके विषय आहेत. तिसऱ्यांत नैसर्गिक मैत्री, तत्काल मैत्री, पंचधा मैत्री व दशांचीं कोष्टकें दोन प्रकारचीं आहेत. चवथ्यांत अंतर्दशांची कोष्टकें दिलीं आहेत.

३ नूतनयोगरत्नावली.— ज्योतिषरत्नमाला रत्न १लें हें पुस्तक ज्योतिर्विभूषण यज्ञेश्वर गोविंद घोलप यांनीं पाठविलें पुस्तक बरें किंवा वाईट हें अनुभवानें ठरणारें आहे. श्लोकरचना ठीक आहे. संपादकांनीं डोकें शांत ठेवून अभिप्राय देण्यास इशारत केली आहे ! फलज्योतिषावर मासिक अगर स्वतंत्र पुस्तकें जितकीं प्रसिद्ध होतील तितका या शास्त्राचा सामान्य जनसमूहास उपयोग आहे. या दृष्टीनें संपादकांचें आह्मीं अभिनंदन करितों.

"गर्गपराशरादि विद्वानांनीं नाभसादि योग वर्णिले आहेत, ते तात्कालीन सर्व सत्यच आहेत. परंतु अलीकडे राजा, काल दिनचर्या यांच्या परिस्थितीकडे लक्ष देऊन सदरचे योग एतत्कालीं अनुभवास येतातसे दिसत नाहींत, ह्मणून आह्मीं या कालास अनुसरून पूर्वकालीन योगांचें सार ग्रहण करून त्यांच्या माहितीचें एखादें पुस्तक प्रसिद्ध करावें हा हेतु मनांत आणून आज ही अल्पशी कृति वाचकांस बक्षीसरूपानें सादर करीत

आहों." असे प्रस्तावनेंत म्हटलें आहे.

आह्मांस या पुस्तकांत ठिकठिकाणी सूर्यावर बुधाची दृष्टि सांगितली आहे, तींबद्दल शंका आहे. हे पुस्तक सांप्रतच्या काळास अनुसरून असतां त्यांत सूर्यमध्यस्थ ग्रहस्थिति का घेतली? अथवा सूर्यावर बुधाची दृष्टि याचा अर्थ कांहीं निराळा करावयाचा? बुध आणि शुक्र यांस एकच प्रकारची पूर्ण दृष्टि आहे. ह्मणून जर सूर्यावर बुधाची दृष्टि पडली पाहिजे असेल तर तो ग्रह सूर्याच्या सप्तमस्थानींच असला पाहिजे. पण सांप्रतच्या सूर्यमध्यस्थसद्धांतांत असें होणें अशक्य आहे. केवळ दृष्टि या शब्दानें समाधान होत नाहीं. आर्यज्योतिष्यांत पावदृष्टी, अर्धदृष्टि, पाऊणदृष्टि व पूर्णदृष्टि असे चार प्रकार आहेत. यांपैकी कोणती दृष्टि घ्यावयाची ती गुरुकिल्ली आपल्या मुठींत ठेविली आहे! पाव दृष्टि ह्मणजे ज्या दृष्टीचें फल चतुर्थांश मिळतें ती दृष्टि फल अर्धे मिळतें ती अर्ध दृष्टि व पाऊण फल मिळतें ती पाऊण दृष्टि. यावरून जर बुधाची सूर्यावर पाव दृष्टि असेल तर तो पाव डॉक्टर होईल, अर्धी असेल तर अर्धा डाक्टर होईल! असें सिद्ध होऊ पहातें. पूर्ण दृष्टि नाहीं ह्मणून पूर्ण डाक्टर कोणी होणारच नाहीं!! [श्लो. १५।१६ पहा]

श्लोक ६२ असून किंमत ३ आणे आहे. बाह्य रंग सुंदर असून पुस्तक रत्नमालेस शोभेसेंच आहे.

४ **मुंबई-मराठी ग्रंथसंग्रहालयाचा नववा वार्षिक रिपोर्ट.**— २५० रु. चीं नवीन पुस्तकें खरेदी केलीं. ७१०० पुस्तकें संस्थेच्या मालकीचीं आहेत वाचण्याचें शेकडा प्रमाण कादंबऱ्या ३२·११, नाटकें २२·१६ आहे व ज्योतिष ५.०९ आहे! गतसाली शिल्लक १९२४ रु. ११ आ. ४ पै होती. या सालीं ३२२५ रु. ४ आ. ३ पै आहे. संस्थेनें इमारत फंड काढिला आहे व त्याकरितां एक विनंतीपत्रही प्रसिद्ध केलें आहे. नवीन जागा घेऊन इमारत बांधण्यास निदान **पंचवीस हजार** रु० लागतील, असा चालकांचा अजमास आहे. या कामीं सर्वांनीं हातभार लावावा, असें आह्मीं इच्छितों. इमारतफंडासाठीं ८ रुपयांची रक्कम जवळ आहे. किर्लोस्कर मंडळींनीं ७०५ रु० दिले. व आश्चर्याची गोष्ट ही की कै० महादेव रामचंद्र तुळपुळे यांनीं पोष्टमनसारख्या लहान नोकरीवर असूनही २५० रु. या फंडाला दिले!

रंगून-सूर्योदय ज्योतिषसभा

ता० २५ नवंबर १९०७ रोजीं केमेनडाईन मध्यें दुपारीं ही सभा भरली होती. तिचा सारांश.—

१ २७ अकटंबरचे सभेचा कार्यक्रम वाचण्यांत आला.

२ या सभेची पुढें येणारी परीक्षा येत्या डिसेंबरच्या २५ तारखेस १० पासून १ पर्यंत व नंतर २ ते ५ पर्यंत मि. दिनशा होरमसजी चेअरमन यांनीं या सभेप्रीत्यर्थ जी इमारत ठरविली आहे, त्यांत घेतली जाईल.

३ या सभेसंबंधी बी. सूर्यनारायणराव यांच्या नवंबरच्या अंकांतील मजकूर मि. आर तळवलकर यांनीं वाचून दाखविला. व सर्वांनीं त्यांचे आभार मानिले.

४ मि. सिल्व्हा यांनीं आपल्या खासगी अभ्यासानें अनु व घेतलेल्या ज्योतिषविषयासंबंधीं व्याख्यान दिलें. बरींच अनुभविक उदाहरणें देऊन हें शास्त्र खोटें नाहीं, असें सिद्ध करून दाखविलें.

५ सभेच्या खर्चातून ल्हानसा उपहार झाला.

६ व्हाईस प्रेसिडेन्ट यांनीं आभार कलें.

७ नियमित मेंबर व कांहीं इतर मेंबर आले होते. सभा ६ वाजतां बरखास्त झाली.

थामस पी. डी. सिल्व्हा
व्हाईस प्रेसिडेन्ट व चालक
केमेनडाईन, रंगून.

वर्षफलांचे अभिप्राय.

१७ कांहीं वर्णन चांगलें जुळलें नाहीं.
गोपाळ जगन्नाथ जोशी.

१८ अनुभव पटला.
नथू महादेव वर्वे.

१९ वर्षफल बरेंच जुळलें.
बाळकृष्ण काशीनाथ लाटकर.

२० गर्भकालाचा व उन्नतीचा अनुभव आला.
अनंत गणेश घाणेकर.

२१ उन्नतीचा अनुभव आला.
सदाशिव वासुदेव वर्तक.

२२ शारीरसुखाचा अनुभव आला.
लक्ष्मण विष्णु देशमुख.

२३ कांहीं अनुभव आले. खर्च व मिळकत हें वर्तविलेलें बरोबर आहे. मिळकतीचे दिवस चुकले.
म० ना० पेरलेकर.

२४ वर्षफल जास्त खुलासेवार पाहिजे.
नारायण गोविंद साठ्ये

२५ संपत्तीसंबंधानें बरें जुळलें.
भीमजीभाई रुस्तमजी

२६ वर्षफल जुळलें.
महेश्वर रामचंद्र ओक.

२७ अनुभव बरोबर उतरत गेला हें कळविण्यास आनंद वाटतो.
लक्ष्मण गोविंद काले

२८ कांहीं जुळलें.
विठू बाबाजी पाऊसकर

२९ अनुभव उलट आला.
शिवराम भाले

३० वर्षफल जुळलें.
नागेश बाळकृष्ण कुळकर्णी

पत्रव्यवहार

वि. वि.— खालील कुंडली कुंडलीविज्ञानांत प्रसिद्धीसाठीं पाठविली आहे.

जन्म-शके १८१९ मार्गशीर्ष शु. १ शुक्रवार.

निरयन.



हा मुलगा सकाळीं सात वाजतां जन्मला. सायंकाळीं ७॥ वाजतां आईच्या रोगानें मरण पावली व दुसरे दिवशीं सकाळीं आपणही मरण पावला. या कुंडलींत लग्नेश मंगळ मातृस्थानीं शनीचे गृहांत शनीशीं युक्त आहे. सांप्रत रात्रौ आकाशांत शनि व मंगळ यांचें राज्य आहे. दोघांची युति थोडे दिवसांत होणार आहे. युतीचे पूर्वीच परिणाम घडत असतो. यावरून चतुर्थ स्थानास भयंकर अनिष्टत्व आलें. अष्टम स्थानांत राहु असून अष्टमेश व्यय स्थानीं आहे. व व्ययेश मारकस्थानीं जाऊन बसला आहे. लग्नेश शनीशीं युक्त आहे. या कारणानें मुलास जन्मतांच मृत्युयोग आला. सारांश, निरयन मानानें मृत्युयोग चांगला जुळला. कळावें.

मुन्नालाल दुबे-नागपूर.

*कोणताही योग जर निरयनवरून बसतो तर तो सायनवरून बिनचूक बसलाच पाहिजे. तसा या ठिकाणीं बसला आहे कीं नाहीं, तें पाहूं.—

सायन.



जन्मकाळीं मंगळ ५ व्या अंशांत असून शनि हा २१ व्या अंशांत आहे. म्हणून त्यांचा एकमेकांवर मु-

ळींव परिणाम घडत नाहीं. कारण, त्यांच्यांत १६ अंशांचें अंतर आहे.

या कुंडलींत २ महत्वाच्या गोष्टी विचारणीय आहेत. एक मातृनिधन व दुसरी स्वतःचें निधन. प्रथम मातृनिधनाचे योग सांगतों.—

१ मातृस्थानीं दोन क्रूर ग्रह.
२ कर्क राशींत दोन क्रूर ग्रह व समोर हर्शल.
३ अग्निराशींत चंद्र रवींत अस्तंगत.
४ चंद्राच्या मातृस्थानीं दोन व अष्टमस्थानीं दोन क्रूर ग्रह.
५ मातृस्वामी वक्री, अग्निराशींत असून त्याच्याही अष्टम स्थानीं दोन पाप ग्रह.

हीं पांच कारणें मातृनिधनास झालीं. आतां स्वतःच्या निधनाचीं कारणें सांगतों.—

१ जर मातृनिधन व स्वतःचें निधन समकालीं आहे, तर मातृस्थानाचा व लग्नाचा स्वामी एकच असणें अधिक संभवनीय आहे. सायन कुंडलींत या स्थानांचा स्वामी गुरु हा एकच आहे.

२ मातृकारक ग्रह जसा चंद्र आहे, तसाच तो जन्मणाराही आहे. हा ग्रह लग्नीं असल्यामुळें त्याशीं अनिष्ट स्थिति उभयतांस मारक झाली.

३ जन्मकालीं शनीचे व चंद्राचे अंश सारखे आहेत. ह्मणूनच चंद्र हा शनीच्या पूर्ण दृष्टींत असा लग्नीं आला.

४ चंद्राच्या व लग्नाच्या सुखस्थानीं दोन पापग्रह व अष्टमस्थानीं दोन पापग्रह. शिवाय लग्नीं व चंद्राजवळ एक पापग्रह.

हीं कारणें मुलासही मारक झालीं. दुसऱ्या दिवशीं चंद्राची हर्शलशीं युति होती व तो राहूच्या समोर येणार होता. ही युति ७ व्या तारखेस दिवसा २ वाजतां होती, व ती शनीच्या गृहांत व राहूच्या समोर अशी असल्यामुळें दुसऱ्या दिवशींच तो मुलगा मृत झाला.

षष्ठेश शुक्र असून त्याच्याशीं त्याच दिवशीं रात्रीं ३ वाजतां चंद्र युति करणार होता. या युतीचाही त्याच्या मातेवर व त्यावर अनिष्ट परिणाम झाला असला पाहिजे. मातेच्या व स्वतःच्या निधनकालीं चंद्र शनीच्या (शत्रूच्या) गृहीं असून रवि व हर्शल यांच्या कर्तरींत होता. याप्रमाणें सायन कुंडली अनुभव चोख देते.

संपादक-'कुंडलीविज्ञान'

पत्रव्यवहार

१९०८ चें वर्षफल.

[ग दा. ग्रंथे-भुसावळ]

वर्षारंभीं शनि रेवती नक्षत्रावर आहे, ह्मणून लोकांस भय व जनतेला रोगबाध मातील. वर्षारंभीं तीन महिने गुरु वक्री आहे, ह्मणून धान्य स्वस्त होईल, पण दूध, तूप यांची महागाई होईल. जानेवारी ता. ११ पासून फेब्रूवारी ता. २२पर्यंत मंगळ मेष राशींत आहे, ह्मणून सर्व धान्यें स्वस्त होतील. पोंवळीं महाग होतील व राजे क्रोधाविष्ट होतील. जानेवारी अखेर शनि व शुक्र एका राशीवर असून बुध त्यांच्यामागें आहे, ह्मणून धान्यें स्वस्त होतील. पौष मासांत पांच शनिवार व पांच रविवार आले आहेत, ह्मणून रोग व दुर्भिक्ष होईल. फेब्रुवारी ता. २३ पासून एप्रिल ता. ६ पर्यंत मंगळ वृषभ राशींत आहे. त्यामुळें धान्यें, चंदन, केशर व वस्त्रें कापूस यांस तेजी येईल. मार्च्य व एप्रिलमध्यें मेषेंत रवि व वृषभस्थ मंगळ आहे, ह्मणून राजेलोकांच्या-धिग्रस्त होतील व लोकांना मोठें भय उत्पन्न होईल. एप्रिलपासून शनि मेष राशींत आहे. ह्मणून सोनें, रुपें, तांबें, मोतीं व पद्मराग यांस तेजी येईल. एप्रिलमध्यें शनि अश्विनी नक्षत्रावर आहे, ह्मणून त्यावेळीं तीळ, तेल, तूप यांस एक महिना तेजी असेल. जूनमध्यें कर्क राशीवर मंगळ आहे, ह्मणून धान्यें महाग होतील, ह्मशी, उंस हीं महाग होतील.

जून ता. १५ ते जुलई ता. २८ शुक्र वक्री आहे. ह्मणून धान्यांचा (पिकांचा) नाश व तूप, तेल हीं महाग होतील. जून अखेर रवि, मंगळ व शुक्र हे एकाराशीवर आहेत. [एक नक्षत्रावर नाहींत] ह्मणून तूप, तेल, मसुरा व अन्न यांची महागाई [साधारण] होईल व देशांत भांडणें उपस्थित होतील. जुलईपासून गुरु अतिचार व शनि वक्री आहे. ह्मणून जनतेला पीडा, दुर्भिक्ष व राजे लोकांत कलह होईल. जुलईंत बुध व शुक्र हे कर्क राशीवर आहेत, ह्मणून दुर्भिक्ष

होईल. जुलई ता. ८ पासून आगष्ट ता. २४ पर्यंत मंगळ सिंह राशीवर आहे, ह्मणून सोनें, रुपें, तांबें व तांबड्या रंगाचे पदार्थ महाग होतील. रवि, चंद्र व गुरु हे जुलई २८ रोजीं एका राशीवर आहेत, ह्मणून त्या वेळीं जनपीडा, तांदूळ, धान्य, मूग व उंची वस्त्रें महाग होतील. आगष्टमध्यें मंगळ, रवि, चंद्र, बुध, व गुरु हे सिंह राशीवर आहेत, ह्मणून राज्याला धोका, प्रजेला कष्ट व छत्रभंग या गोष्टी घडतील.

आगष्ट ता. २७ ते सप्टंबर ता. ७ पर्यंत बुध कन्येचा आहे, ह्मणून सोनें, साखर हे पदार्थ महाग होतील. सपटंबर ता. १२ पासून गुरु कन्येचा आहे ह्मणून पाऊस चांगला पडेल, सर्व धान्यें स्वस्त होतील व जनतेला आरोग्य प्राप्त होईल. सपटंबर ता. ९ ते अकटंबर ता. ८ पर्यंत शुक्र सिंह राशींत आहे, ह्मणून तूप, आणि धान्यें महाग होतील. अकटंबर ता. १० पासून नवंबर ता. २५ पर्यंत मंगळ तूळ राशीवर आहे. त्यामुळें धान्यें, तीळ मूग, सूत व कापूस हे पदार्थ महाग होतील. अक्टंबर ता. ८ ते नवंबर ता. ३ पर्यंत शुक्र कन्येंत आहे. ह्मणून धान्यांचा नाश होईल. व भाताला तेजी येईल. नवंबर ता. २६ पासून मंगळ वृश्चिक राशींत आहे. ह्मणून सर्व द्रव्यें महाग होतील व राजे क्रोधाविष्ट होतील.

अभिप्राय

मार

ची

३१ कुटुंबसुख– स्त्रीसुख व द्रव्य हानि या गोष्टी वर्णनाबरहुकूम जुळल्या.

तुळजाराम कृष्णाजी चव्हाण

३२ आपल्या वर्षफलांतील बऱ्याच गोष्टी जमल्या हे कळविण्यास आनंद वाटतो.

विष्णु रामचंद्र केळकर

३३ संतति. द्रव्यहानि, व प्रवास यांची वर्णनें जुळलीं.

रामचंद्र हरि जोशी

३४ वर्षफल अनुभवास आलें नाहीं

प्रल्हाद सखाराम ब्रह्मे

३५ लिहिण्यास आनंद वाटतो कीं, आपण वर्तविलेलीं बहुतेक सर्व फलें मिळालीं.

शंकर गणेश-ओव्हरसीअर

३६ वर्षफलाचा अनुभव आठ आणे जमला.

शंकर सदाशिव ज्योतिषी

६७ आपण १९०७ सालचें वर्षफल पाठविलें, तें बरोबर जुळलें—

पिलाजी दामोदर देव

३८ आपला गेल्या वर्षाचा वर्तीळा बहुतेक बरोबर आहे. लिहिल्याप्रमाणें संतति झाली

वसंतराव माधवराव मुंबई

३९ वर्षफल मध्यम तऱ्हेनें जमलें

मनोहर महादेव

४० बहुतेक वर्षफल बरोबर जुळलें. तुमची गति सार्वभौम ज्योतिषी या नात्यानें बरीच वाढल्यामुळें स्तुति केल्याशिवाय राहवत नाहीं.

गणेश दामोदर ग्रंथे.

४१ शारीरसुख स्त्रीसुख, उन्नति व द्रव्यलाभ यांचीं वर्णनें बरोबर जुळलीं.

वामन नारायण बर्वे.

४२ गुदस्त सालच्या वर्षफलाचा बहुतेक अनुभव आलेला आहे.

रामचंद्र पांडुरंग नाईक

४३ आपण १९०७ चें जें वर्षफल पाठविलें तें तंतोतत उतरलें. तारखा मागें पुढें एक दोन दिवस जमल्या.

गणेश महादेव फडके.

४४ वर्षफल जमलें नाहीं.

बाबूराव अप्पाजी—

४५ सन १९०७ चे वर्षफल आपणाकडून जून महिन्यांत मागविलें होतें. त्याचा अनुभव पूर्ण आला. द्वादशस्थानीं भ्रमण करणाऱ्या शनीचा सुखस्थानीं भ्रमण करणाऱ्या राहूचा, व दशमात भ्रमण करणाऱ्या मंगळाचा त्याच प्रमाणें गुरूचा हे सर्व अनुभव वर्तविल्याप्रमाणें फारच उत्तम जमले.

मल्हार गणेश—मुंबई.

४६ वर्षफल बरें जुळलें.

वामन रंगनाथ वकील

४७ मागील वर्षाचें वर्षफल जुळलें

जिवाजी राघोजीराव

४८ माझ्या १९०७ चे वर्ष फलांत आगष्ट-सपटंबरपासून उन्नति होईल असें लिहिलें होतें. परंतु त्याचा अनुभव आला नाहीं, असें आपणास मागील पत्रांत कळविलें होतें. आज आपणास कळविण्यास समाधान वाटतें कीं, आपलें भविष्य खरें ठरलें. मला ता. २१ जुलईपासून हंगामी बढती मिळाल्याचा

ठराव आजच माझें हातीं पडला. बढती हंगामी जरी आहे, तरी भ. विष्य खरें ठरलें याबद्दल मी आपला फार आभारी आहें.

त्याचप्रमाणें नवंबर व डिसेंबरांत वाहनसुख कमी मिळेल ह्मणून भविष्य केलें होतें, तेंही बरोबर उतरलें माझी टांग्याची घोड़ी दोन महिने आजारी आहे. ता. १७ डिसेंबरला १२ वाजून १० मि. नीं सायकलवरून जात असतां समोरून ५।६ रेडे येत होते, त्यांस चुकवून जाण्याचा प्रयत्न केला तरी एक रेडकूं आडवें येऊन त्यावर मीं सायकलसुद्धां पडलों मला बरीच दुखापत झाली आहे. यावरून ग्रहांची पीडा होत नाहीं असें कोण ह्मणेल ?

सिताराम हरी आजरेकर
ओव्ह. पी. ड. डि.

४९ सन १९०७ चें वर्षफल मिळालें. इंग्रजींत ह्मण आहे कीं 'शार्ट बट् स्वीट' अशा प्रकारचें आपलें वर्षफल आहे. ज्याच्या त्याच्या व्यवसायाप्रमाणें या वर्षी जास्त विस्तृत विचार व्हावा. आपली दिशा व विचारसरणी पाहून मनास आनंद होतो. व ज्योतिषशास्त्राच्या भावी प्रगतीविषयीं आशा वाटते. कवीप्रमाणेंच ज्योतिषी जन्मतात. त्यास तयार करिता येत नाहीं. कवित्व हें जन्मावरोबर निसर्गतः येतें त्याचप्रमाणें फल सांगतां येण सुद्धां आहे. प्रयत्नानें मर्यादित ज्ञान प्राप्त होतें.

आत्माराम शिवराम दिवाडकर मुं-

अखेर व्हावयाचें तें झालेंच !

कुंडलीविज्ञानच्या ७ व्या पुस्तकाच्या २१ व्या अंकांत २३ व्या राष्ट्रीय सभेचें भविष्य केलें होतें, तें असें.—

'या वर्षी व्ययस्थानीं शनि आणि मंगळ हे दोन ग्रह आले असून त्यांची ता. ३० डिसेंबरला युति होणार आहे. शनिमंगळांच्या युतीचा परिणाम चांगला नाहीं. असें ज्योतिःशास्त्र सांगतें. यावरून यावर्षी राष्ट्रीय सभेची सांपत्तिक स्थिति समाधानकारक असण र नाहीं. सभा सुरळीत पार पडेलच असें सांगवत नाहीं. उभयपक्षांत खडाजंगी तर उडेलच. परंतु कदाचित् **हातघाईवर प्रसंग येईल !** सरकारी आधकारी उग्र स्वरूप धारण करतील. ह्मणून या सालची कॉंग्रेस कशी पार पडते हें पाहिलें पाहिजे. राष्ट्रीय सभेचे सूत्रधार या गोष्टीकडे अवश्य लक्ष देतील अशी आशा आहे.'

हें भविष्य अकटंबरमधील आहे. या नंतर नागपुरास कसा बखेडा झाला व नागपूरची कॉंग्रस सुरतेस कशी गेली, हें वाचकांस माहीत आहेच. सुरतेस कॉंग्रेस होण्याचें नक्की ठरलें, तेव्हां कुंडलीविज्ञानच्या त्याच पुस्तकाच्या २९ व्या अंकांत पुनः सूचना दिली, कीं 'ज्या कारणानें २१ व्या अंकांत बखेडा होईल ह्मणून प्रसिद्ध केलें होतें. तें कारण अद्यापि सरलें नाहीं. ह्मणून नागपूरची जरी सुरत झाली तरी सभा सुरक्षित झाली असें ह्मणतां येत नाहीं मंगळ आणि शनि या दोन अनुक्रमें जहाल व मवाळ ग्रहांचा योग व्ययस्थानीं होत असल्यामुळें तो **संस्थेच्या नाशास कारण झाला आहे.** मंगळ हा प्राण गेला तरी मागें न सरणारा जहाल ग्रह आहे, ह्मणून रजोगुणानुरूप जरी नागपूरची सुरत झाली असली, तरी **नागपूर इतकाच किंबहुना सरसच तमोगुणाचा प्रभाव दृग्गोचर होऊन** जहालपक्ष विजयी होण्याचा रंग आहे. जहालपक्षाच्या संमेलनास मुहूर्त चांगला मिळाला असल्यामुळें या पक्षास पुष्कळच लोकमत मिळेल. इ०"

राष्ट्रीय सभेचें पुढें काय होणार ?

आजकाल सर्व देशभक्तांच्या पुढें हाच प्रश्न आहे. १९०६ सालीं १० व्या अंकांत आह्मीं खालीं लिहिल्याप्रमाणे वर्तविलें होतें.

राष्ट्रीयसभेच्या सुरवातीला दर्शल सप्तमस्थानीं होता. तो आतां दशमांत आहे. सन १९०५ सालीही तो दशमांतच होता. हा ग्रह क्रांति घडवून आणणारा आहे. एका राशीवर तो सात वर्षे असतो. मकर राशि हा बंगालचा दर्शक आहे. यावरून सन १९०५ पासून ७ वर्षांत राष्ट्रीय सभेंत **क्रांति होणार आहे !** आरंभापासूनच तिचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. पण शनि जेव्हां **मेष राशीचा लग्नीं होईल तेव्हां त्याच्या त्या वर्षांत ही क्रांति स्पष्ट दृग्गोचर होईल.**

राजपक्षाचा कारक ग्रह रवि हा राष्ट्रीय सभेच्या जन्मकाळींच शत्रुक्षेत्रीं असा दशमांत आहे. ह्मणून राजपक्ष हा राष्ट्रीय सभेस कधींच अनुकूल होणार नाहीं. दशमाचा ह्म० राज्यभुवनाचा अधिपति जो शनि हा रवीचा शत्रु असल्यामुळें तो मेष राशींत ज्या कालीं प्रवेश करील, त्या कालीं त्याची रवीवर पूर्ण दृष्टि पडेल. **हा काल राजपक्षांतील प्रत्यक्ष भांडणाचा होईल.** स्थूल मानानें सन १९०९ पासूनचा तो काल आहे. हाच शनि जेव्हां कुंडलींत सप्तम स्थानीं आपल्या उच्चांत व रवीच्या दशमांत बलवान् होईल तेव्हां राष्ट्रीय सभा पूर्ण विजयी होईल असें फलज्योतिषाच्या दृष्टीनें दिसतें. हा काल सन १९४२।४३ च्या सुमारास ह्मणजे आजपासून ४५।४६ वर्षांच्या सुमाराचा आहे."

हें भविष्यही खरें ठरणार असें दिसतें. क्रांति होणें ह्मणजे एक स्थिति जाऊन दुसरी स्थिति प्राप्त होणें. त्याचप्रमाणें कॉंग्रेसची आज क्रांति झाली नाहीं काय? ही क्रांति शनि मेष राशीचा लग्नीं झाल्यावर स्पष्ट दृग्गोचर होईल, ह्मणून त्या वेळीं जें भविष्य केलें होतें, तेच आतां सत्य होणार आहे. कारण १९०६ सालीं झालेली कॉंग्रेस व १९०८ सालीं होणारी कॉंग्रेस यांत स्पष्ट फरक

वरील सर्व भविष्य तंतोतंत बरोबर उतरलें आहे. एकंदर प्रतिनिधी १२०० होते, त्यांत जहालांच्या बाजूचे ७०० होते ! पहिल्या दिवशीं आरंभींच 'प्रथमग्रासे मक्षिकापात.' या प्रमाणें अपशकून झाला. डेलिगेटक्यांपमध्यें एक सिंधचे प्रसिद्ध डेलिगेट अकस्मात् मृत्यु पावले ! त्यामुळें सभेच्या कामास २॥ वाजतां सुरवात झाली. पण बखेडा होऊन अखेर ती त्या दिवशीं तहकूब राहिली. ता. २६ चे रात्रीं संख्येच्या शत्रुस्थानीं असलेला चंद्र ८ वाजून ५९ मि. नीं मंगळाच्या समोर येणार होता. ह्मणून त्या दिवशीं सभेंत गोंगाट होऊन सभा बंद पडली. याच तराखेच्या मध्य रात्रीनंतर १ वाजून ४८ मि. नीं चंद्र हा शनीच्या समोर येणार होता, या प्रतियोगाचा परिणाम मारामारींतच झाला पाहिजे त्याचप्रमाणें दुसऱ्या दिवशीं उभयपक्ष हातघाईवर आला. हें दुर्दैव होय ! एकंदरींत ज्योतिःशास्त्राच्या मताप्रमाणें यंदाची कांग्रेस योग्य मुहूर्तावर झाली नाहीं, ह्मणून अखेर व्हावयाचें तें झालेंच, हें कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें ! !

आमचें भविष्य खरें ठरलें, या बद्दल आमच्याकडे स्तुतिपर वरींच पत्रें येत आहेत. पण यांत स्तुति करण्यासारखें कांहीं नाहीं. हा सर्व ग्रहस्थितीचा परिणाम आहे. यांत आमचें असें कांहीं नाहीं. भारतधर्म मासिक पुस्तकाचे संपादक हें भविष्य आपल्या गुजराथी भागांत घेणार आहेत. त्यांनीं कॉंग्रेसचें पुढील भाव्य करावें, ह्मणून सूचना केली आहे. त्यांस आमचा २१ वा अंक पाहण्यास विनंति करितों. या अंकांत जें राष्ट्रीय सभेसंबंधानें विवेचन केलें आहे, त्यांतील शेवटला प्यारा वाचला ह्मणजे कळून येईल कीं १९०८ सालची कॉंग्रेस जहाल होईल व पुढे राष्ट्रीय स्वरूपाची पीछेहाट होणें अशक्य आहे. पुढील सालीं राष्ट्रीय सभा दोन होणार हें आतां ठरलेंच आहे. पण लोकसमुदाय कोणत्या पक्षाला अधिक मिळतो असा प्रश्न असेल तर त्यास हेंच उत्तर आहे कीं, राष्ट्रीय पक्षाला पुढील सालीं जोर जास्त मिळणार. कारण दशमाचा स्वामी शनि तनुस्थानीं मंगळाच्या क्षेत्रीं नीच झाला आहे. मात्र तिला कांही तरी संकटें भोगावीं लागतील असें वाटतें. शनि मीन राशींत असतां ही सभा जलाशयाच्या कांठीं भरली, पुढील सालीं तो मेष राशींत असणार, ह्मणून खनिज पदार्थ ज्या ठिकाणीं असतील अशा प्रांतांत ती भरेल, असें वाटतें. कदाचित् खडकाळ जमीन ज्या भागांत विशेष अशा भागांत भरेल.

होणार हे आतां सिद्ध झालें आहे. १९०८ सालीं शनि मेष राशींत असेल. ह्मणून यापुढें प्रजापक्षाला राजपक्षाकडून पुष्कळ त्रास भोगावा लागणार आहे.

१९०७ सालीं काँग्रेस मोडली असें मेथाकळपानें जरी जाहीर केलें आहे, तरी ती मोडली नसून तिची सूत्रे मात्र राष्ट्रीय पक्षाकडे गेलीं आहेत. यापुढें काँग्रेसचें काम बखेडा न होतां चालेल व उत्तरोत्तर तिची अभिवृद्धि होत जाईल. पुढील सालीं अध्यक्ष कोण तरी वयोवृद्ध जहाल होतील असें अनुमान आहे. राष्ट्रीय पक्ष पूर्वीच्या सूत्रधारांची बदमाष कृत्यें उघडकीस आणील, व असें झालें ह्मणजे अर्थात् कांग्रेस मोडली असें ह्मणतां येणार नाहीं. मार्च्य अखेरपर्यंत उभयपक्षांत खडाजंगी उडणार आहे. पण तितक्याही संकटांतून राष्ट्रीय पक्ष तरून जाईल. राष्ट्रीय पक्षाचा कारक ग्रह मंगळ हा जानेवारी फेब्रुवारींत तनुस्थानीं बलवान् आहे, तो तिचें पुनरुज्जीवन करील. येत्या आगष्टच्या दुसऱ्या पंधरवड्यांत बरेच ग्रह सिंह राशींत बलवान् झाले आहेत. यावरून या वेळीं [आगष्ट-सपटंबर मध्यें] राष्ट्रीय पक्ष पुढील कांग्रेसची दिशा ठरवील. मार्च्य मध्यें रजोगुणा पराभव होणार आहे व तो राजाच्याही मर्जीतून उतरणार आहे. कारण २१ मार्च्यला रवि व शनि यांची युति आहे. याप्रमाणें राष्ट्रीय सभेचें पुढील स्वरूप आहे, असें ज्योतिःशास्त्राच्या दृष्टीनें दिसतें.

सन १९१५ सालीं शनि कर्क राशींत येईल, त्यावेळीं राष्ट्रीय सभेवर कांहीं तरी भयंकर किटाळ येण्याचा संभव आहे.

जातक चमत्कार !

पति-जन्म ता. २५ जा. १८५२ रवि. रात्रीं १२ वाजून ५२ मि.



सायन.

सायन स्पष्ट ग्रह.

ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.
१४	७	२६	५	८	१८	५	२७
		रा.	ह.				
		१७	१				

पत्नी.-जन्म ता. ४ आगष्ट १८५६ सोम. रात्रीं १२ वाजून २ मि.



सायन.



सायन स्पष्ट ग्रह.

ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.
२२	१२	२८	५	६	१०
		शु.	श.	रा.	ह.
		११	११	२१	२५

सन १९०७ पूर्वी पंचवीस वर्षे पोटांत सुमारें ३ महिन्यांचा गर्भ वाढून पुढें पत्नी अस्पर्श होऊं लागली.

आज सुमारें १५ महिने झाले. कोणी साधूनें जडी दिली. ती घेतली व गर्भपुष्टीचें औषधही घेतलें. त्यापासून गर्भ वाढूं लागला. भाद्रपद श.१० संवत् १९६३ पासून आजपावेतों सुमारें १५ महिने होत आले, तेव्हां तो कोठें सात

महिन्यांचा असा दिसूं लागला. मुलें झालेल्या वृद्ध स्त्रियांनीं व वैद्यांनीं परीक्षा केली कीं, हा गर्भच आहे, गुल्म नाहीं. गर्भपरीक्षा पाहतां उदरांतील लक्षणें व गर्भाचें फिरणें चांगलें अनुभवास येत आहे. आजपर्यंत मूल मुळींच झालें नाहीं.

वाचकहो, या हकीकतीवरून वरील दांपत्याच्या कुंडल्या पाहण्यासारख्या वाटतात काय? सायन व निरयन या दोन्ही पक्षांच्या वाचकांस विचार करितां यावा ह्मणून वर निरयन व खालीं सायन अशा कुंडल्या दिल्या आहेत, त्या पहा, पत्नीचें वय आज मितीस ५२ वर्षांचें आहे ! हें वय गर्भसंभवाचें आहे, असें कसें ह्मणतां येईल ? पंधरा वर्षांपूर्वी शनि हा पतीच्या एकादशांत व पत्नीच्या पंचमांत असला पाहिजे. या शनीनें उभयतांचीं पंचम स्थानें व उभयतांचे चंद्र दूषित केले होते. हा चमत्कार कोणत्या कारणानें घडला, हें सांगतां येणें अशक्य आहे. तथापि गर्भकालाचा शनि गर्भाच्या वाढीला प्रतिबंधक होता, इतकें ज्योतिष्यास ह्मणतां येईल. ज्योतिःशास्त्राच्या दृष्टीनें सुद्धां हा गर्भच असावा, असें अनुमान होतें. हा गर्भ दोन प्रकारचा असेल असें अनुमान होतें. उभयतांचे चंद्र मीन व कन्येंत असल्यामुळें एक तर हा जुळा किंवा त्यापेक्षां अधिक असा असेल किंवा तो अस्थिविरहित त्वचामांसमय तरी असेल. हा गर्भ नीट रीतीनें प्रसूत होणें व झाल्यावर जगणें कठीण आहे. प्रसूतिसुद्धां अनियतकालीं होईल. आमच्यामतें रवि सा. मेष राशीचा झाल्यावर प्रसूति झाली पाहिजे.

पत्नीचा गुरु मेष या अल्प संतति देणाऱ्या राशींत असून वक्री आहे व तो शनीच्या पूर्ण दृष्टींत आहे, यामुळें तिला संततिसुख दुर्मिळ झालें आहे. पतीच्या सा. भा. कुंडलींत नवमस्थानीं मंगळ व राहु हे ग्रह बसतात, ते वंशाला संतति देतील असें वाटत नाहीं. असो– आतां याबद्दल प्रसूति झाल्यानंतर लिहूं. तोंपर्यंत वाचकांनीं विचार करून काय तें ठरवावें.

पत्रव्यवहार.

(१) दे. हरगोविंद लल्लूभाई तलाठी शिरस्तेदार डि. डि. कलेक्टर भडोच यांचें पत्र– "खालीं दिलेली कुंडली पहा. या मुलाचें डोकें जन्मांचें वेळेस कांहीं अघात होऊन दाबलें गेलें त्यामुळें वेड्यासरखा दिसतो व अद्यापि स्पष्ट बोलूं शकत नाहीं. तरी त्यास कोणी अनुष्ठानविधि दाखवितील व त्या योगानें तो बरा होईल तर त्यास १० रुपये बक्षीस देऊं." असें कळवितात. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

जन्म शके १८१४ मार्गशीर्ष कृ. १२ गुरुवार सूर्योदयात् गत घ० पळें ५४ र. ८–३ ल. ७–५ निरयन कुंडली.



(२) दे. प्रेमशंकर दुबे.–जबलपूर यांचें पत्र. "पु. ७ अं. २३ मे शकरामचंद्र प्रधानके प्रश्नका उत्तर— बिजवर जिन कन्याओं को मिला है उनकी कुंडली पहिचाननेका नियम मेरे दृष्टिपथमे अभी तक ग्रंथों मे नहीं आया. परंतु मेरे पास जो कुंडली संग्रह है उस से ऐसा अनुभव हुआ है कि जिस कन्याके सप्तमभाव का स्वामी लाभ भावमें स्थित रहता है उसे बिजवर मिलता है. मेरे पास ४ कुंडली ऐसी है.

मै बृहत्पाराशरी अवलोकन कर रहा था. उसमें विवाहकालके श्लोक पढनेसे मुझे आपके लेखका स्मरण आया. नं. १२ का अर्थ आपने किया है वह ठीक नहीं जान पडता है. मै अपनी अल्प बुद्धीसे जो समजता हूं वह लिखता हूं.

शुकसे सप्तमपर्यंत चंद्र हो तो विवाह १० वर्षकी अवस्थाके भीतर होगा. चंद्रसे सप्तमपर्यंत बुध हो तो ११ से २२ वर्षके भीतर और यदि अष्टमेश पंचमभावतक छे भावोंमे पडे तो २३ से ३३ के भीतर. कारण— नं० १ से ११ तकके योगोंसे स्पष्ट विदित है कि, ग्रंथकारने विवाहकाल की अवधि ३३ वर्ष तक ली है. और पहिले ११ श्लोकोंमे विशेष वर्षोंके

नियम देकर १२ वे श्लोकमे विवाहका साधारण और स्थूल नियम दिया है.

शुक्र, चंद्र और अष्टमेशसे उत्तरोत्तर प्रबल योग होता ते वैसे विवाह अल्प वयसमे कहा है. इस श्लोकमे ३ योग कहे यै. ३ ही आयुष्यके विभाग कहे है. और उनके लिये क्रमशः प्रथम, द्वितीय और तृतीय शब्द काममे लाये गये है.

साधारणतः विवाह या स्त्रीमरण १०।११ वर्षके अंतरसे नहीं होता. जैसे आपके अर्थसे विदित होता है.

मेरे उपरोक्त अर्थ मे एक दोष ज्ञात होता है. वह यह कि शुक्र से सप्तम भाव पर्यंत क्यौ केवळ सप्तम मेही ह्यो नहीं. जब तक सप्तम भाव पर्यंत यह अर्थन लिया जावे तब तक श्लोक सर्वव्यापी न होनेसे व्यर्थ सा जान पडता है. यह संभव है की अल्प स्थान में बहुत अर्थ निकालने के लिये व्याकरण का विशेष विचार नहीं किया. ऐसे अर्थ को गर्गजातक मे श्लोक है कि लग्नेश प्रथम ३ भावो मे हो, तो पहिला संतान पुत्र. अन्यथा कन्या.

(३) दे.गणेश अनंत सप्रे, वकील–राहुरी—यांचें पत्र—"कांग्रेसचें यंदाचें भविष्य ता० १ अक्टंबरचे अंकांत आहे, तें अगदीं बरोबर आहे, तें अगदीं बरोबर मिळालें ता० २१ डिसेंबरचे अंकांत जें सांगितलें आहे, त्याप्रमाणें झालें असतें तर बरें होतें. परंतु हे सुचावें कोणास? कारण, विद्वत्तेबरोबर ज्योतिषशास्त्रावरील विश्वास उडतो! या शास्त्रावर विश्वास ठेवण्यांत न्यूनता व लाज वाटते. अनुभव आला तर तो काकतालीय न्यायानें आला असें ह्मणतात! विद्वानांस अनुभव आला तरी शास्त्र खरें आहे असें ह्मणण्यांत विद्वत्तेस बट्टा लागतो, असें वाटतें. आपण आपले वर लिहिलेले अंकांत इतकें स्पष्ट असून जेव्हां इतक्या जाड्या विद्वानांपैकीं कोणाचेंही लक्ष पोहोचलें नाहीं तेव्हां आर्य-भूमातेचें व तिच्या पुत्रांचें दुर्दैव ह्मणावयाचें, दुसरें काय? अद्यापि आपलें कर्म झोंपी गेलेलें आहे. सद्बुद्धि सुचावी कोणास? यंदा कॉंग्रेसमध्यें नेमस्त ह्मणविणारांनीं नेमस्तपणा दाखविला कीं त्याच्या नांवाखालीं जहालपणाचा हलकटपणा केला? नेमस्तांच्या हातांत कॉंग्रेसचीं सूत्रें होतीं. त्यांनीं वेळ अवेळ पाहून तारखा नेमावयास पाहिजे होत्या. कोणतेंही शुभ कार्य योग्य मुहूर्तावर करावें असें हिंदुधर्मशास्त्र सांगतें. पण नेमस्तांचें धर्मशास्त्र कांहीं निराळेंच असावें असें वाटतें. अथवा क्रूर कार्यास क्रूर मुहूर्तच बघितला नसेलना?"

(४) एक वर्गणीदार–मुंबई=यांचें पत्र. "पुस्तक ७ वें अंक १७ वा यांत मी परिक्षा पास होईन काय? या सदराखालीं जी कुंडली प्रसिद्ध झाली आहे तिचे गृहस्थ एल. एम्. अँड एस ची परिक्षा पास झाले. हें कळविण्यास आनंद वाटतो. ही परीक्षा पहिल्याच वर्षी पास होणें फार कठीण असतें. कारण, प्रत्येक विषयांत शें. ५० मार्क लागावे लागतात. ४०० मार्कांची लेखी परीक्षा असून २५०० मार्कांची तोंडी परीक्षा असते. त्या मुळें पहिल्याच वर्षी पास होण्यास दैवाच्या अनुकूलतेशिवाय गत्यंतर नाहीं. हे गृहस्थ अक्टंबर माहेनामर आजारी होते. त्यामुळें निकाल लागेपर्यंत त्यांस खात्री नव्हती."

परीक्षेचे निकालासंबंधी आपल्या पुस्तकांत वेळोवेळीं जी दिशा दाखविली आहे, त्या दिशेनें यंदाचे सालीं मी बऱ्याच विद्यार्थीवर्गाचें भविष्य वर्तविलें होतें, तें तंतोतंत बरोबर अनुभवास आलें आहे.

---

(५) दे. गणेश दामोदर ग्रंथे–भुसावळ–यांचें पत्र पावलें. स्थल पुढील अंकीं देऊं.

---

(६) दे. परशराम रघुनाथ गुप्ते–उमेदपुरा–यांचें पत्र–कुंडल्या पावल्या, स्थळ सबडीप्रमाणे मिळेल.

---

(७) दे. अनंत नारायण ठकार–कर्जे यांचें पत्र–चेहऱ्यावरून तयार केलेली कुंडली पावली. ती हकीकतीवरून बरोबर असावी असें वाटतें.

---

(८) दे. धोंडो गंगाधर कौशिकर–वणी यांचें पत्र–पांच कुंडल्या देऊन त्यांतील भ्रातृयोग जमवून दाखविले आहेत. प्रयत्न स्तुत्य आहे या योगांचा अधिक शोध करून त्यांतून असें शोधून काढितां आलें पाहिजे कीं एकाच्या कुंडलिवरून त्याच्या बडिल कीवा धाकट्या भावाच्या कुंडलीचें वर्णन करितां यावें. जर असें वर्णन करितां आलें तर भ्रातृयोगांचा अनुभव घेण्याचें सार्थक

झालें असें झटलें पाहिजे. आह्मीं जे भ्रातृयोग दिले आहेत, ते अशाच साठीं. भ्रातृयोग, पितापुत्रयोग आणि दांपत्ययोग यांवरून ज्योतिःशास्त्राची सत्यता अज्ञान अगर नास्तिक मनुष्यास सहज दाखवितां येते. तरी हा गौण फायदा आहे, असें समजतों. या प्रयत्नानें एकाच्या कुंडलीवरून जर दुसऱ्याच्या कुंडलीचें वर्णन करितां येईल तरच आपण ज्योतिःशास्त्रांत कांहीं तरी भर घातली असें होईल, यासाठीं यापुढें असा प्रयत्न करावा व कांहीं तरी नवीन तत्व हुडकून काढावें.

---

* यापुढें वर्षफलांचे अभिप्राय देऊन पुस्तकाची जागा अडविणें चांगलें नाहीं. अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही प्रकारचे अभिप्राय नित्य येत आहेत. त्यांवरून असें दिसून आलें आहे कीं, आमच्या पद्धतींत पुष्कळच सत्य आहे. प्रत्येक वर्गणीदाराचें वर्षफल विशेष काळजीपूर्वक तयार होईल तर सें. ९० वर्षफलें खात्रीनें बिनचूक उतरतील. जीं वर्षफलें उतरलीं नाहींत त्यांत 'कांहीं सोनाराचा व कांहीं सोन्याचा' दोष आहे. दुसरें असें कीं, ज्या प्रमाणें वैद्य उत्तम असला तरी त्यास एखाद्या रोग्याचें बरोबर निदान होत नाहीं, त्याच प्रमाणें ज्योतिषी आपल्या विद्येंत कितीही निपुण असला तरी त्यास एखाद्या कुंडलीचें ज्ञान होऊं शकत नाहीं. ज्यांचें वर्षफल मुळींच अनुभवास आलें नसेल त्यांच्या कुंडलीचें यथार्थ ज्ञान आह्मांस झालें नाहीं हा दोष प्रांजलपणें कबूल करितों. गोष्टी जमल्या व कांहीं जमल्या नाहींत असें व्हावयाचेंच. जी कुंडली चांगली समजली तिचें सर्व वर्णन जुळलें पाहिजे. व त्याप्रमाणें कित्येकांचीं वर्षफलें तंतोतंत बरोबर उतरलीं आहेत. सालमजकुरीं गुदस्तांपेक्षां शक्य तितकी काळजी घेण्यांत येत आहे. त्यामुळें पुढील वर्षारंभीं यंदापेक्षां बरेच अधिक अनुकूल अभिप्राय मिळतील अशी खात्री वाटते.

संपादक "कुंडलीविज्ञान."

---

[२]

मुहूर्त सारांश.

पुंसवन–श्रवण, हस्त, पुनर्वसु, पुष्य, मृग, आणि रवि, भौम, गुरू हे वार उक्त होत. प्रथम ऋतुप्राप्त झाल्यावर शुभदिनीं मघा, रेवति अमावास्या पौर्णिमा वर्ज्य करून उक्त चंद्रबळ पाहून मुहूर्त योजावा. गर्भिणी स्त्रीचे संस्कार गर्भधारण झाल्यापासून द्वितीय अथवा तृतीय मास आणि स्थिर लग्नें उक्त होत. त्याचप्रमाणें रवि, भौम गुरुवार घ्यावे. चंद्र अनुकूल पाहून दुष्टयोगादिक वर्ज्य करून वरील उक्त नक्षत्रें घ्यावीं. इतर संस्कार वगैरे ४।६।८ या मासीं करण्यास हरकत नाहीं. दिनक्षयादि–दिनक्षय, व्यतिपात, व्याघात, कल्याणी, वैधृति, शूल, गंड, अतिगंड, परिघार्ध, यमघंट, कालगंड, मृत्युयोग दग्धयोग, आणि दारुणयोग यावर जन्म झाल्यास मोठा दोष जाणावा.

दोषनक्षत्रें—विशाखा, मूळ, ज्येष्ठा आणि आश्लेषा हीं जन्मसमयीं दोषकारक आहेत.

मुलांचें नामकर्ण, [नांव ठेवणें] पुष्य, हस्त, चित्रा, स्वाति, अनुराधा, मृग ज्येष्ठा, धनिष्ठा, पुनर्वसु, उत्तरायण, जन्मापासून ११ अथवा १२ दिवस उक्त. १६।२० २२।१४ हेही उक्त. स्थिर लग्नें व रवि, बुध, शुक्र व शनि हे वार घ्यावे रिक्तातिथी व दुष्टयोग वर्जावे.

सूर्यावलोकन व बाहेर निघणें–जन्मापासून ३।४ हे मास शुभवार व शुभतिथी ह्यावर शिशूस बाहेर काढून प्रथम सूर्यावलोकन करवावें.

कटिसूत्र–पांचव्या महिन्यांत रविवार, मंगळवार ह्या दिवशीं शुभनक्षत्रीं बालकाचे कंबरीं बांधावें.

चौल–जन्मापासून ३।५।७ हीं वर्षे उक्त. शुक्लपक्षीं, उदयगनांत, शुभतिथीस व शुभवारीं चांगलें.

मौंजी वर्षे–ब्राह्मणांस ५।७।८ हीं वर्षे व क्षत्रियास ११ वें उक्त होय. गुरु रवि व चंद्र ह्यांचें बल घ्यावें.

घटित–वर्ण योनि गण नाडी व भकूट यास ह्मणतात, घटित पाहतांना वधूवरांचे कुंडलींत पुढील दोष वर्जावे. १ षडाष्टक, २ एकनाडी, ३ शत्रुगण, व ४ द्विर्द्वादश.

दत्तक पुत्र घेण्यास मुहूर्त

हस्त, चित्रा, स्वाति, विशाखा अनुराधा, अश्विनी, धनिष्ठा, पुष्य हीं नक्षत्रें, आणि रवि, भौम, शुक्र हे वार व सिंह, वृषभ हीं लग्नें उक्त होत. कुतिथी वर्ज्य कराव्या.

सूतिका स्नान—कुतिथी वर्ज्य करून हस्त, ज्येष्ठा, पूर्वाफाल्गुनी, स्वाति, धनिष्ठा, रेवति, अनुराधा, मृग, अश्विनी हीं नक्षत्रें उक्त होत.

प्रस्थान ठेवणें—सुमुहूर्तावर गमन करण्याचा अभाव असेल तर प्रस्थानीं वस्तु ठेवितात त्या:-

सुवर्ण, धान्य, वस्त्र हीं सर्व जातीस उक्त होत. ब्राह्मणास यज्ञोपवित चांगलें. प्रस्थान ठेवित्यापासून पांच दिवस त्याचें फल असतें. वस्तुप्रस्थानीं अर्धफल अंगप्रस्थानीं संपूर्ण फल जाणावें.

तिथिपालन

प्रतिपदा—कोहळा	द्वितीया—डोरली
तृतीया—लवण	चतुर्थी—तिळ
पंचमी—आंवट	षष्ठी—तेल
सप्तमी—आंवळा	अष्टमी—नारळ
नवमी—मोंपळा	दशमी—पडवळ
एकादशी—पावटे	द्वादशी—मसुरा
त्रयोदशी—वांगें	चतुर्दशी—मधु

पौर्णिमा—घृत आमावास्या—स्त्रीसंग

गणेश दामोदर ग्रंथे.

---

[३]

बाळंतपण.

सदरहु विषयासंबंधी मी आपणांस डिसेंबर १९०७ चे प्रारंभी एक पति, पत्नीच्या कुंडल्या पाठविल्या होत्या त्यासंबंधी आपणाकडून ता.८।१२।०७ नें खुलासा आला आहे. आपण कळविलेल्या माहितीप्रमाणें अस्पर्श कालाचा खरा खुलासा नव्हता.

आपण वर्तविलेल्या भविष्यामध्यें "रवि कुंभ राशींत झाल्यावर प्रसूतिकळ यावा असें होतें. सदरहु पत्नी ता० ७।१।०८ रोजीं पहाटेस ४॥ वाजतां प्रसूत होऊन कन्या झाली आहे. आपण मुलीचाच योग दर्शविला होता. फक्त दिवस जमला नाहीं इतकेंच. परंतु त्यांत अस्पर्शकालाची माहिती पूर्ण नसल्यानें असें झालें. बाकी विचाराची दिशा बरोबर आहे. कळावें.

कृ० भि० चित्रे.
मुंबई.

---

[४]

रा० रा० कुंडलीविज्ञानकर्ते यांस:-

सा० न० वि० वि०

मागें ह्मणजे चालू सालचे श्रावण-मासीं पुण्याचे गृहस्थ ह्मेगमुळें आमचे येथें राहण्यास आले. त्यांची मुलगी १४ वर्षे वयाची जाहली. पुष्कळ लग्नसंबंधी खटपटी केल्या परंतु जुळलें नाहीं. त्यावरून मुलीचे टिपण दाखविलें. त्यावरून आपणास कळविण्यास आनंद वाटत आहे कीं, आह्मीं त्याच वेळीं ह्मणजे लग्न होण्याचे आधीं ३ महिने भविष्य केलें कीं तुमचे मुलीचें लग्न घर चालत पाहण्यास येऊन मार्गशीर्ष पौर्णिमेचे सुमारास एकदम ठरून मि० मार्गशीर्ष वद्य ७ रोजीं लग्न पार पडेल. अशाबद्दल त्या मुलीचे बापाच शिफारस पत्र आल्यावरून वधूवराचे योग व दांपत्ययोग आपण जे सांगितले व वर्तविले आहेत त्यांत भर ठेवाल अगर आपले दाशाहिक पुस्तकांत स्थळ द्याल अशी आशा आहे आपले प्रयत्न स्तुत्य आहेत अशाबद्दल आपलें अभिनंदन करावें तितकें थोडें आहे. वर लिहिलेल्या वधूवराच्या कुंडल्या खालीलप्रमाणें-

वर

जन्म—मार्गशीर्ष कृ० ३ सूर्योदयात् घ० ३४ प० ३० शके १७९५



वधू

जन्म—पौष शु० १ रोज बुधवार रात्रीं ९॥ वाजतां मुं.टा. शके १८१५



वर लिहिलेल्या वधूवराचें लग्न ता० २७ डिसेंबर रोजीं दुपारीं दोन वाजतां जाहलें, त्या वेळची कुंडली खालीलप्रमाणें. योग सर्व पत्र विस्तारास्तव माहिती असल्यामुळें जुळवून लिहिले नाहींत.

लग्नकुंडली.



कळावें. लोभ असावा, हे विनंति.

आपला वर्गणीदार–
अनंत नारायण ठकार.

रंगून–सूर्योदय ज्योतिष सभा

ता. २६ जानेवारी सन १९०८ रोजी भरलेल्या सभेची हकीकत–

१ ता. २४ नवंबर सन १९०७ रोजी भरलेल्या सभेचा रिपोर्ट वाचला आणि तो पास झाला.

२ चेअरमन **दिनशा होरमसजी** यांस कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें सभेस हजर राहतां आलें नाहीं. आणि त्यामुळें या सभेचे वेळीं जो वक्षीस समारंभ होणार होता, तो पुढील सभेवर टाकण्यांत आला.

३ मि. **फोनायन** आणि मि० **सिल्व्हा** यांनीं अनुक्रमें मि. **डन्** आणि मि. **जगत् नारायण नायगत्** यांचीं नांवें सभासद होण्याकरितां पुढें आणिलीं आणि तीं सभासदांच्या एकमतानें पास झालीं. नंतर तीं लिष्टांत दाखल केलीं.

४ सभेचे सेक्रेटरी यांनीं दर महिन्यांत दोनदां सभा भरवावी, अशा आशयाचें भाषण केलें. त्यांस मि. **फो** यांनीं अनुमोदन दिलें. मि. **बाहओ** यांनीं याच विषयावर पुष्कळ वेळां सभा भरविण्याची निरनिराळीं कारणें दाखवून फारच मुद्देसूद आणि जोरदार भाषण केलें. तीन सभासदांनीं आपल्या घरच्या कामाची सबब पुढें ढकलून या सूचनेस मत देण्याचें नाकारिलें. त्या तीन सभासदांशिवाय बाकीचे सभासद या सूचनेस अनुकूल होते. तरी व्हा. प्रे. यांनीं त्या तीन सभासदांस याच विषयावर निराळा विचार करावयास सांगितलें. ही सूचना पुढील सभेंत मतें घेऊन पास करण्यांत येईल, असें ठरलें.

५ **डी. सिल्व्हा** यांनीं भाषण केलें. ते ह्मणाले—आपल्या या सभेस कांहीं अविचारी लोक नांवें ठेवितात. आणि मला व सभेला दोष देतात. याबद्दल सर्वांनीं सावध रहावें. ते लोक या सभेस **मथित्सादथिति** किंवा ईश्वरावर भरसा न ठेवणारी व खऱ्या मार्गानें न चालणारी असें ह्मणतात ! ते लोक या सभेतील सभासदांची हिंमत कमी करून आणि धर्माच्या नांवाखालीं सभा भरवून या सभेचें अस्तित्व नाहींसें करण्याकरितां टप–

लेले आहेत ! याचा परिणाम आपणांस हानिकारक होण्याचा संभव आहे. ह्मणून सावध राहण्याची मीं सर्वांस इशारत देतों. प्रत्येक सभासदाला वाटेल त्या धार्मिक मंडळींचे सभासद होण्यास अडचण नाहीं. मात्र त्यांनां सभेच्या वेळीं हजर असलें पाहिजे.

६ ता.२५ डिसेंबर सन १९०७ रोजीं झालेल्या पास उमेदवारांचीं नांवें येणेंप्रमाणें.—

१ वाहओ यांस सेक्रेटरीचें सुवर्णपदक बक्षीस मिळालें. किं. ३०

२ शेंगकी } यांस प्रत्येकीं प्रे-
३ फोनायन } सिडेंटांनीं ज्योतिष पुस्तकें बक्षीस दिलीं.
किं. १५ रु.

४ फोसो ५ मॅथटफिन्
६ हाँगक्या ७ दी ८ स्मॅह
९ बाटिन.

या परीक्षेंत १६ उमेदवार बसले होते, पैकीं ९ पास झाले. पहिल्या चौघांस मार्क चांगले मिळाले आहेत. रिझर्ट शेंकडा ५६·२ झाला !

७ थोडासा उपहार झाला.

८ व्हाईस प्रेसिडेंट यांचें उपसंहाराचें भाषण झालें.

९ सभासद बरेच जमले होते.

ज्योतिषसभा.

रंगून-सूर्योदय ज्योतिषसभेचीं हकीकत कुंडलीविज्ञानांत वेळोवेळ प्रसिद्ध होत आहे, तिकडे आमच्या वाचकांचें लक्ष लागलेलें दिसत नाहीं. फलज्योतिषाचीं तत्वें, त्याचें वास्तविक स्वरूप व त्याचा बौद्धिक आणि व्यावहारिक फायदा या गोष्टी सभाजांतील अज्ञ मनुष्यांस कळण्यास गांवागांव वरील सभेसारख्या सभा स्थापन होणें जरूर आहे. वाचनालयें व सार्वजनिक जागा (देवळें, धर्मशाळा वगैरे) गांवोगांव आहेत. अशा जागीं महिन्यांतून निदान एक दिवस तरी या विषयावर चर्चा झाल्यास पुष्कळ फायदे होतील. या कामास द्रव्याची किंवहुना मुळींच जरूर नाहीं. ज्योतिषशास्त्राचा व्यवहाराशीं अगदीं निकट संबंध आहे, इतकेंच नव्हे तर तो आमच्या धर्माचा पायाच आहे असें झटल्यास हरकत नाहीं. अशा शास्त्राचें वास्तविक ज्ञान समाजास असणें अगत्याचें आहे. हें ज्ञान पुस्तकांच्या प्रसारानें होणारें नाहीं. पुस्तकें मार्गदर्शक असून त्यांचा उपयोग सुशिक्षितांनाच

होतो. ज्योतिःशास्त्र हा मौजेचा विषय आहे खरा, पण तो समजण्यास विकट आहे. ह्मणून तो अज्ञान मनुष्यास तोंडीं समजावूनच दिला पाहिजे. जी गोष्ट हजारदां वाचूनही समजणार नाहीं, ती वक्ता एकदोन वेळां सांगून दुसऱ्यास समजाविती. ज्योतिषाप्रमाणेंच वेदांत हा विषय विकट आहे, तो वाचून समजत नाहीं, ह्मणून पुराणिक व हरिदास यांची उत्पत्ति झाली आहे. तशीच भ्रमज्योतिषांचीही ज्योतिःशास्त्राच्या ज्ञानाचा प्रसार करण्याकरितांच झाली असली पाहिजे. परंतु तो वर्ग आतां चतनी बनला असून त्यावर निर्वाह करण्यापलीकडे त्यांच्या हातून कांहीं होत नाहीं. त्यामुळें धंदेवाले जोशी (ज्योतिषी) उत्पन्न झाले. परंतु तेही स्वार्थापलीकडे कांहीं करीत नाहींत. एकदोन पुस्तकें संग्रही असलीं कीं बनले जोशी ! अशा लोकांपासून समाजाचें रतिमात्र कल्याण होत नाहीं हें उघड आहे. याचा परिणाम सांप्रत असा झाला आहे कीं ज्योतिःशास्त्राचें वास्तविक स्वरूप झांकून जाऊन त्या विषयीं अनादर व भलत्याच समजुती यांचें साम्राज्य पसरलें आहे. ही स्थिति नाहींशी करण्यास समाजास शहाणें करून सोडिलें पाहिजे. हें शास्त्र निरुपयोगी आहे ही समजूत चुकीची आहे. निरुपयोगी वस्तु जगांत फार दिवस टिकत नाहीं. हें शास्त्र फार प्राचीन कालापासून आपल्या देशांत अस्तित्वांत आहे ही गोष्ट विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे. पाराशर, गर्ग, भृगु, वराहमिहिर इ. ज्ञात्यांनीं या विषयाचा विचार करून ग्रंथरचना केली आहे. ते ग्रंथ सर्वमान्य असून हजारों वर्षें त्यांचें अध्ययन करीत आले आहेत. जर हें शास्त्र मिथ्या असतें तर तें इतके दिवस व्यवहारांत टिकलें असतें काय ?

पदार्थांत ज्याप्रमाणें कित्येक सुखदायक व कित्येक घातक असे आहेत, त्याचप्रमाणें कालाची ही स्थिति आहे. कित्येक काल सुखसंपदा देणारे आहेत. व कित्येक हानि करणारेही आहेत. हानिकारक कालींच मनुष्याची हानि होत असते, असा या शास्त्राचा सिद्धांत आहे. हानिकारक कालीं सुखसंपदा मिळणें शक्य नाहीं. ज्याप्रमाणें

सर्वांना आरोग्याची चाड आहे त्याचप्रमाणें सुखसंपदेचीही आहे. रोग्याला अनिष्टकालीं जरी **संजीविनी** मात्रा एखाद्या वैद्यानें दिली तरी त्याला आराम होणार नाहीं असें दाखवितां येतें. ह्मणूनच 'तुका ह्मणे भोग सरे ॥ देवी गुण आंगारे' भोग ह्मणजे अनिष्टकाल अनिष्ट काल सरला कीं रोगी नुसत्या अंगाऱ्यानें सुद्धां बरा होतो. ग्रहांच्या परिभ्रमणानें कालाची सूक्ष्मता प्रगट होते. बराबाईटकाल हा त्यांच्या स्थितीवर अवलंबून आहे. चांगल्या कालीं थोर पुरुष जन्मास येतात व दुष्टकालीं दुष्ट व पापी मनुष्य उपजतात. या गोष्टी सर्वमान्य आहेत व त्या कोणासही नाकबूल करितां येणार नाहींत ह्मणून मनुष्यास कालज्ञान होणें सर्वांत अत्यंत अगत्याचें आहे. कोणत्या तरी वेळीं काहीं तरी केलें तर त्याचें फल कांहीं तरीच मिळणार! योग्य वेळीं योग्य कृत्य केल्यास त्याचा परिणामही योग्यच झाला पाहिजे, ह्मणून ज्योतिःशास्त्र सर्वांस समजावून देण्याचें प्रयत्न रगूनच्या सभेसारख्या सभा ठिकठिकाणीं स्थापन होऊनच झाले पाहिजेत, इकडे आमचे जिज्ञासू व देशभक्त वाचक लक्ष देतील अशी आशा आहे.

पत्रव्यवहार.

[१]

ज्योतिर्विद रा० रा० कुंडलीविज्ञानकर्ते—यांस सा० न० वि० वि०

बृहत्पाराशरी वाचतांना ग्रहदृष्टि संबंधानें आलेली शंका आपणाकडे पाठविली आहे. तरी तिचें निराकरण आपण किंवा आपले वाचक खुलाशासह पुढील अंकी करतील तर मजप्रमाणेंच इतर अज्ञ वाचकांवरही बहुत उपकार होतील.

हल्लीं प्रचारांत ग्रहांची आपल्या स्थानापासून तृतीय दशम स्थानावर पावदृष्टि, ५।९ स्थानावर अर्धदृष्टि, ४।८ स्थानावर पाऊण दृष्टि व सप्तम स्थानावर पूर्णदृष्टि (शनि, गुरु, मंगळ यांची सुद्धां) मानतात. व यांस अनुकूल अशी 'पश्यंति सप्तमं सर्वे, शनिजीवकुजाः पुनः ॥ विशेषतश्च त्रिदश त्रिकोण, चतुरष्टमान् ॥' अशा प्रकारचीं वरींच वचनें अलीकडील ग्रंथांत सांपडतात परतु सर्वार्थचिंतामणींत 'पश्यत्यसौ भानुसुत स्तृतीयं मानेच पूर्णं चतुरस्रमारः ' जीवस्त्रिकोणं मदनं च सर्वे (शेषः ?) पश्यंति दृष्ट्या चरणप्रबुद्धया ॥ असें वचन असून बृहत्पाराशरींतील पुढील श्लोकांमध्यें तर शनि, गुरु, मंगळ हे इतर ग्रहांप्रमाणें ३।१० स्थानावर पावदृष्टीनें, ५।९ स्थानावर अर्धदृष्टीनें, ४।८ स्थानावर पाऊण दृष्टीनें व सप्तम स्थानावर पूर्ण दृष्टीनें पहात नसून त्यांची दृष्टि निराळ्याच प्रकारची आहे असें दिसून येईल.

'शनिःपादं त्रिकोणेषु, चतुरस्रे द्विपादकम्। त्रिपादं सप्तमेविप्र, त्रिदशे पूर्णमेवही ॥ १ ॥ चतुरस्रे गुरुःपादं सप्तमेच द्विपादकम् । त्रिपादं त्रिदशे विप्र, पूर्णं पश्यति कोणगे ॥ २ ॥ सप्तमे पादमेकंच, द्विपादं त्रिदशे द्विज, त्रिपादंच त्रिकोणेषुभौमः पूर्णं चतुरस्रगे ॥३॥ अन्येषां त्रिदशे पादं, द्विपादंच त्रिकोणगे । चतुरस्रे त्रिपादंच, पूर्णं पश्यंति सप्तमे ॥ ४ ॥ एवं रीत्या निरीक्ष्यते ग्रहा रव्यादयो द्विज'

वरील श्लोक दृष्टिभेद कथन नामक अध्यायांत राशिदृष्टीचा विचार झाल्यानंतर आलेले आहेत. यावरून ते राशिदृष्टीप्रमाणेंच 'जैमिनीय पद्धती' चे असतील अशी शंका घेण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण.—

जैमिनीय सूत्रांत ग्रहांची दृष्टि सांगितली आहे ती राशिदृष्टि प्रमाणेंच आहे असें 'तनिष्ठाश्चतदृत' या सूत्रावरून उघड होतें. अर्थात् पाराशरीतील ग्रहदृष्टिविचार जैमिनीय पद्धतीचा नाहींच मग तो कोणत्या पद्धतीचा असावा ? अशी शंका उत्पन्न होतें बृहत्पाराशरी हा आर्ष ग्रंथ असून सर्व संमत आहे त्यांतील पुष्कळ गोष्टी हल्लीं अनुभवास येतात. यावरून त्यांत आलेला ग्रहदृष्टिविचारच खरा असून प्रवरांत जी शनि, मंगळ गुरूची दृष्टि इतर ग्रहाप्रमाणेंच मानण्याची चाल पडली आहे ती भ्रममूलक असावी असें वाटतें तरी पुढील अंकीं कोणी या संबंधीं खुलासा करील अशी आशा आहे

२ ग्रहांचीं उचें, मेष, वृषभ, कर्क या राशींत आहेत त्यांत परमोच्च अंश दिलेले आहेत. अशी माझी समजूत आहे कीं, ग्रहांचें उच्च, परमोच्च अंशांपर्यंतच असावें उदाहरणार्थ.— सूर्याची मेष रास उच्च मानितात. परंतु सूर्य मेष राशींत जर १अंशांपासून १०अंशांपर्यंत असेल तेव्हां उच्च समजावा पुढें ११ अंशांपासून ३०अंशांपर्यंत मिलक्षेत्रीं होय. तरी याही संबंधानें खुलासा व्हावा.

कळावें लोभ असावा हे विनंति

आपला वाचक
गं० भ्र० दीक्षित
अ० मा० नांदगांव

---

[२]

रा० रा० कुंडलीविज्ञानकर्ते यांस,
सा० न० वि० वि०

ता० ११ जानेवारीचे आपले अंकांत आपण राजमान्य राजश्री बाळ गंगाधर टिळक यांची कुंडली देऊन थोडेसें वर्णन दिलें आहे. त्यासंबंधानें पूर्वी मी खासगी केलेल्या कुंडलीशीं आपण दिलेली कुंडली जुळत नसल्यामुळें पुनः एकवार करून पाहिली तों पुनः आपण दिलेली कुंडली चूक असल्याचें आढळून आलें. आढळून आलेल्या चुका येणप्रमाणें:-

१ मंगळ चतुर्थांत नाहीं. तृतीयांत आहे वृश्चिक राशीचाही नाहीं. तूळ राशींत २६।२७ अंशांचा आहे. म्हणून सायन आंकडे कुंडलांत तृतीयांत ठेविला पाहिजे. सायनभावचलित कुंडलींत चतुर्थ भावारंभाच्या सुमारें १२ अंश अलीकडे आहे.

२ रवि लग्नांत येत नाहीं. प्रथम भावारंभाच्या अलीकडे सुमारें दहा अंश आहे. म्हणून बारावाच समजला पाहिजे.

३ दशमाचा स्वामी शुद्धां द्वादशभावांतच अस्तंगत रवीपासून २ अंशांवर आहे.

४ शनी एकादश भावाच्या अखेरीसच येतो.

हें सर्व आपल्या सुलभज्ञातक भाग २ रा ह्या पुस्तकांत दिलेल्या रीतिवरून मी येथें केलेल्या सायनभावचलित कुंडली बरहुकूम आहे. राजश्री टिळकांची जन्मवेळ शके १७७८ आषाढ कृष्ण ६ दिवा २ घटी १५ पळें ही आहे. ही मला विश्वसनीय आधारावरून पूर्वीच मिळाली आहे. शिवाय रा० गुरुजी ह्यांनीं खुद्द राजश्री टिळक यांचेकडून माहिती मिळवून केलेल्या टिळकांच्या चरित्रांत हीच वेळ दिलेली आहे.

या शिवाय आपणांस एक विनंति करावी असें वाटतें. ती ही कीं ज्योतिःशास्त्राच्या स्वतंत्र विचाराला वाहिलेल्या कुंडलीविज्ञानास पक्षाभिमानाचा विटाळ सांगूं देऊं नये. ज्याला ज्याला म्हणून आज लिहितां वाचतां येत आहे त्याला त्याला स्वतंत्र स्वतःचे विचार कोणत्याना कोणत्या तरी पक्षाचे असल्याशिवाय राहतां येणें शक्य नाहीं. परंतु ज्याला म्हणून राजकीय लेख प्रसिद्ध करावयाचे असतील त्याला असें करण्याची इतर पुष्कळ साधनें आहेत. ज्योतिःशास्त्रालाच वाहिलेलीं आपल्या देशांत मासिकें किंवा दाशाहिकें एकाद दुसरींच आहेत आणि त्यांनीसुद्धां पक्षाभिमानास पेढू केवळ निःपक्षापातीपणामुळेंच येणाऱ्या आदरास व विश्वास आंचवणें शहाणपणाचें होणार नाहीं. आतां आज या टिळकांच्या कुंडलीसंबंधानें पहा. माझ्या चुका असतील किंवा आपल्या चुक्या असतील. कोणाच्याही चुका जाणून बुजून केलेल्या नसल्या तरीही दोन्ही राजकीय पक्षांस पक्षाभिमानामुळेंच ह्या चुक्या झाल्या असें वाटणें स्वाभाविक आहे. आणि असें झालें म्हणजे कुंडलीविज्ञानाच्या आजपर्यंतच्या कामगिरीवर पाणी पडलें, त्यास हे सुद्धां विसरतां कामा नये

का ज्या राजकीय पक्षास धरून आपलीं मतें त्या पक्षाला सुद्धां केवळ ज्योतिष्यांच्या पक्षाभिनामुळें शास्त्रावरचा विश्वास उडणें शक्य आहे म्हणून आपण मला राजश्री टिळकांच्या कुंडलीच्या वर्णनांत जो राजकीय मतासंबंधानें पक्षाभिमान दाखविला आहे त्यास जागा न मिळाल्यास बरें. त्याचप्रमाणें रा. सप्रे वकील, रा. माटे इत्यादि यांचीं पत्रें राजकीय विचारास वाहिलेल्या पत्रकारांकडे गेल्यास बरें.

ही विनंति मी आपणास करावी असें नाहीं तरी पण नाइलाजास्तव भाग पडलें यावद्दल माफी असावी.

रा० टिळकांच्या कुंडलीबद्दल माझें मत आपल्या मतांहून अगदीं भिन्न आहे. तरी पण आपणास आजच्या सारख्या प्रसंगी फेरतपासणी करण्याची संधि देणें वाजवी वाटल्यावरून माझें वर्णन देत नाहीं.

कळावें स्पष्ट लिहिल्याबद्दल पुनः एकवार आपली माफी मागून सध्यां रजा घेतों ही विनति.

आपला

गोविंद हरी केसकर

३

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस—

सा० न० वि० वि०

आपणाकडे आपणास व आपल्या वाचकवर्गास उपयोग होईल अशा आशेनें एक मुलाची कुंडली पाठवीत आहें. जन्म शके १८२८ पौष वद्य १५ शनिवार रात्रौ स्टँडड टईम ३-३५ मिनिटांनीं झाला.

निरयन.



जन्मानंतर १५ दिवसांनी वडील पायाच्या दुखण्यानें अत्यवस्थ आजारी २ महिन्यांनीं स्वतःस फेफरें येऊं लागलें. ते रोज २४ तासप्रमाणें १ महीनाभर येत होतें. ७ महिन्यांनीं खोकला व तापानें अत्यवस्थ आजारी फिट्सच्या दुखण्यांत त्याची जगण्याचीच आशा नव्हती व ११ महिने होतात न होतात तोंच मातृनिधन होऊन स्वतःस गृहत्याग करून आजोळीं राहण्याची पाळी आली.

एक वर्गणीदार

१९७	सायन
ग्री०रेखांतर	पू. ५ क. ३ मि.
अक्षांश	उ. २२-४३
लग्न	३-१३-७-३०
दशम	०-४-३०-४५
राहु	११-१०-३९-५३
रवि	६-२१-७-४५
चंद्र	४-२९-०-३०
मंगळ	६-२०
बुध	७-११
गुरु	४-६
शुक्र	५-१८
शनि	७-८
प्रजापति	७-१८
वरुण	२-१८

७९ ३४	सायन
ग्री० रेखांतर	पू. ५ क. ३ मि.
अक्षांश	उत्तर २२-४१
लग्न	१-२१-१६-४५
दशम	१०-८-३४-३०
राहु	३-२७-५८-१६
रवि	०-२८-५०-४२
चंद्र	३-२०-२०-३३
मंगळ	९-८
बुध	०-२
गुरु	३-५
शुक्र	११-२१
शनि	११-२२
प्रजापति	९-१३
वरुण	३-१०

७१४	सायन
ग्रीनिच रेखांतर	पू ५ क ३ मि २० से
अक्षांश	उत्तर २२-४३
लग्न	५-१५-४६-१५
दशम	२-१५-४६-०
राहु	३-१९-४९-३०
रवि	५-२७-४९-५९
चंद्र	११-२९-८-३१
मंगळ	९-१८
बुध	६-१०
गुरु	४-७
शुक्र	५-२९-४२-३०
शनि	११-२४
प्रजापति	९-९
वरुण	३-१५

७१८	सायन
ग्री० रेखांतर	पू ५ क ६ मि २६ से.
अक्षांश	उत्तर २७-५०
लग्न	०-११-५९-१५
दशम	९-७-४९-७
राहु	७-१४-५१-५८
रवि	६-१६-२९-१९
चंद्र	५-२३-४७-८
मंगळ	७-२७
बुध	७-११
गुरु	९-६
शुक्र	७-२७
शनि	९-१०
प्रजापति	८-१४
वरुण	३-१

७१२/५० सायन
रेखांश पूर्व ४क. ५६ मि.
अक्षांश उत्तर १७-४१
लग्न ५-१-८-०
दशम २-१-४४-१५
राहु ३-२०-३१-३६
रवि ५-१५-९-२६
चंद्र ५-२८-९-१२
मंगळ ९-१३
बुध ५-१७
गुरु ४-४
शुक्र ५-१३
शनि ११-२५
प्रजापति ९-९
वरुण ३-१४

७१०/४९ सायन
रेखांश पूर्व ५क ३ मि.
अक्षांश उत्तर २२-४३
लग्न ११-०-५५-०
दशम ८-९-२३-०
राहु ३-२०-३८-५६
रवि ५-१२-४५-११
चंद्र ४-२७-१३-३६
मंगळ ९-१२
बुध ५-१२
गुरु ४-४
शुक्र ५-१०
शनि ११-२५
प्रजापति ९-९
वरुण ३-१४

९३६/२९ सायन
रेखांश पूर्व ४क. ५३मि.
अक्षांश उतर २२-१६
लग्न ०-२-२८-४५
दशम ९-१-४३-०
राहु ०-२५-८-३०
रवि ३-५-१८-५८
चंद्र ८-८-६-२७
मंगळ ३-२८
बुध ३-२६
गुरु १-२१
शुक्र ३-२०
शनि ६-६
प्रजापति ७-७
वरुण २-१२

७८/३९ सायन
रेखांश पूर्व ४-५१-५०
अक्षांश उतर १९-४०-०
लग्न १०-३-२३४५
दशम ७-१५-२४-०
राहु ३-२२-३२-४०
रवि ४-९-४-४४
चंद्र १-१५-३९-४५
मगळ ९-७
बुध ३-२६
गुरु ३-२६
शुक्र ३-२७
शनि ११-२७
प्रजापति ९-९
वरुण ३-१३

पत्रव्यवहार

[१]

श्रीयुत ज्योतिर्विद कुंडलीविज्ञानकर्ते यांसी सा न. वि. वि. खालील ४ ओळीस कृपा करून दाशाहिकांत स्थल मिळेल अशी आशा आहे.

हिंदुस्थानची रास मकर ही मानितात. १८९६ पासून हिंदुस्थानांत प्लेग हा आश्चर्यकारक व कधींही न बरा होणारा रोग ठरला आहे. हर्शलचा प्लेगशीं विशेष संबंध असावा असे अनुमान होतें. १८९६ अखेर हर्शल वृश्चिक राशीतून धनु राशींत गेला ह्मणजे हिंदुस्थानच्या मकर राशीस १२ वा झाला, तेव्हांपासून तो सारखा चहाकडे पसरत चालला. हर्शल हा आश्चर्यकारक व कधींही न बरे होणारे रोग उत्पन्न करितो प्लेगच्या प्रतिबंधास हजारों उपाय झाले तरी तो नाहींसा होत नाहीं. व प्रथम याच्या वाढीनें लोकांस आश्चर्य वाटलें. धनु राशीवर पापग्रह असतां अपघात उत्पन्न करितात त्याप्रमाणें या रोगानें पुष्कळ लोक मेले. कैक दुष्काळानें मेले. असा हिंदुस्थानचा कित्येक गोष्टीनें व्यय झाला. १८९७ पासून त्यास शनि येऊन मिळाला. १।२।१२ ह्या स्थानीं पापग्रह वाईट. त्याप्रमाणें हर्शलनें १२ व्या स्थानीं हा परिणाम उत्पन्न केला. १९०४ मध्यें हर्शल धनु राशींतून मकर राशींत. लग्नीं आला. ह्या वेळेपासून प्लेगचें स्वरूप पूर्वीपेक्षां मवाळ झालें. मकर हा राशि लग्नीं ह्मणून हर्शल ह्या राशींत असतांना प्लेग सुरूच राहिला. ह्यावेळीं शनी कुंभेचा स्वगृहीं धनस्थानीं असल्यामुळें प्लेगची भीती निंपट कमी झाली. ह्मणजे हार्शल व शनि हे जे दोन अनिष्ट होते. व ते १२वे स्थानीं होते, ह्मणून दुप्पट भीति वाटत होती. ती १९०४पासून क्वारंटाईन, स्थलांतर त्याग भाग पाडणें, ह्या गोष्टी नाहींशा झाल्यामुळें कमी झाली. व प्लेगचा जोर वाढत चालला. १९१२ पासून हर्शल कुंभ राशींत हिंदुस्थानचे दुसरें स्थानीं जातो. कुंभ हा हर्शलचा स्वगृह राशि आहे. ह्मणून १९१२ पासून प्लेग नाहींसा होऊन नामशेष राहील, व हिंदुस्थान त्याच्या जाचातून सुटेल असें अनुमान होतें. मध्यंतरी १९०८

१९०९।१० ह्या तीन वर्षी शनि मेष राशींत सुखस्थानीं नीच आहे, ह्मणून ह्या ३ वर्षांत होणारी प्लेगची कारकीर्द व दुष्काळ स्वरूप, हर्शलच्या हिंदुस्थानास अनिष्ट असणाऱ्या अमलांत शेवटची आहे असें मानण्यास हरकत नाहीं. ह्या वरील अनुमानावरून हर्शलच हा प्लेगला कारक झाला असुन त्याचे जोडीला जेव्हां जेव्हां शनि अनिष्ट होत गेला तेव्हां प्लेग वाढत जाऊन दुष्काळ वगैरे उत्पन्न होऊन जनपीडा झालेली आहे. १९१२ पासून प्लेगची भीती बाळगण्याचें कारण राहणार नाहीं. कुंभ राशींत गेल्यावर तो चांगलें फल देईल. पुढें कसा काय अनुभव येतो तें पाहणें आहे. ह्या राशींत तो प्लेग, दुष्काळ वगैरे हिंदुस्थानच्या आपदा दूर करील असें वाटतें. कळावें लोभ करावा हे विनंति.

आपला,

ग. दा. ग्रंथे. वर्गणीदार

[२]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस—

सा० न० वि० वि०

आज राष्ट्रीय सभेनंतर कन्व्हेंशन व जहाल कान्फरन्स यांच्या सुरवातीच्या वेळा व थोडेसे वर्णन पाठवीत आहें. यास स्थळ देण्याची मेहेरबानी व्हावी. मी तेथें हजर असल्यामुळें मला या वेळा चेतां आल्या. येवढें मात्र सांगितलें पाहिजे कीं जीं दोनतीन घड्याळें मीं पाहिलीं त्यांमध्यें थोडीफार तफावत होती. तेथें कोणचें घड्याळ खरें हें ठरविण्याचें साधन नव्हतें. ह्मणून चारपांच मिनिटांची चूक होणें शक्य आहे.

कन्व्हेनशन—अध्यक्षाबद्दल सूचना १-२० चे सुमारास. अध्यक्ष स्थानापन्न झाले १-२५ चे सुमारास. स्टँडर्ड वेळ.

सायन.

भाव.

ल-०।२०।२५ स- ६।२०
द्वि-१।२० क- ७।२३
तृ-२।२० न-८।२०
च-३।१५ द-९।१५
पं-४।११ ए-१०।११
ष-५।१३ द्वा-११।१३

ग्रह.

र-९।५।२४
चं-६।९।३०
मं-११।२०।१५
बु-८।२५।३४
गु-४।१२।२५
शु-१०।१।१०
श-११।२१।४०
रा-३।१४।४०
ह-९।१२।२४
ने-३।१३।४२

जहाल कन्फरन्स. सुमारें ४-१० ते ४-१५ तीन चार स्नेह्यांकडून मुद्दाम मिळविलेली वेळ. यास मी हजर नव्हतों. दोन्ही ठिकाणीं वेळेवर हजर राहणें शक्य नव्हतें.

सायन



भाव

ल-२-९-८ स-८-९
द्वि-३-४ अ-९-४
तृ-३-२९ न-९-२९
च-४-२७ द-१०-२७
पं-५-२९ ए-११-२९
ष-७-४ द्वा-१-४

ग्रह.

र-९-५-३०
चं-६-११
मं-११-२०-२०
बु-८-२५-४५
गु-४-१२-२५
शु१०-१-२०
श-११-२१-४०
रा-३-१४-४०
ह-९-१२-२४
ने-३-१३-४२

यांत विचार करण्यासारख्या गोष्टी अशा आहेत कीं जहाल कान्फरन्सचे लग्नांत राष्ट्रीय सभेच्या व व कन्व्हेन्शनच्या तृतीय, सहज, स्थानांतील राशि आहे. दुसरें राष्ट्रीय सभेचें व कन्व्हेन्शनचे लग्नातील राशि येथें लुप्त आहे. परंतु त्यांचा लग्नस्वामी अष्टम, व नवम

दशम यांच्या स्वामीसह दशमांत-राज्यस्थानांत आहे. जहाल कान्फरन्स ही राष्ट्रीय सभेची व कन्वेन्शनची थाकटी बहीणच होय.

वर्णन-कन्वेन्शनचे कुंडलींत लग्नस्वामी पापग्रहाबरोबर व्ययस्थानांत आहे. म्हणून, व त्या वरप्रमाणें रवि दूषित आहे म्हणून शत्रु असतील. राजा व अधिकारी यांची सहानुभूति असणार नाहीं. दशमांत शुक्र असल्यामुळें कदाचित् नुकसान होणार नाहीं.

लग्नस्वामी हा दशमाचे स्वामीबरोबर, व दशमांत शुभग्रह, यामुळें मोठेपणा व मान मिळेल. तृतीयांत दोन पापग्रह, तृतीयाचा स्वामी रवीजवळ, अशी स्थिति असल्यामुळें हिचे हातून पुष्कळ काम होईल. चंद्र षष्ठांत असल्यामुळें साधारण जनसमूहाची सहानुभूति वाचेचा स्वामी बुध, रविजवळ असल्यामुळें बोलण्यापासून त्रास, हा बुध मारकस्थानांत, व रवि मृत्युस्थानांत म्हणून यामुळेंच शेवट दशमांत दोन पापग्रह म्हणून जनक-येथें उत्पादक व चालक-यांस त्रास. या शनि मंगळावर ज्या ज्या वेळीं रवि जाईल त्या त्या वेळीं, व यांसमोर ज्या ज्या वेळीं रवि जाईल त्या त्या वेळीं म्हणजे मार्च ते सप्तंबर, हे महिने फार अनिष्ट. राष्ट्रीय सभेच्या दशमाजवळील रवीवर ज्यावेळीं शनि गेला, त्यावेळीं राष्ट्रीय सभेच्या चालकांपैकीं एका प्रमुखाचा न्या. रानडे यांचा मृत्यु झाला स्वस्थानांत दोन पापपापग्रह असल्यामुळें दारिद्र्य. केंद्रांत पापग्रह असल्यामुळें अस्तित्वांत असतांना अपकीर्ति. व्ययस्थानचा स्वामी शुक्र, भाग्यांत, व त्यावर गुरूची दृष्टी, म्हणून शेवट झाल्यावर लोक हळहळतील.

दोन्ही सभांचें आयुष्य थोडें आहे. येथें लग्नस्वामी रवीजवळ, रवि दूषित असा मृत्युस्थानांत, तेथेंच हर्शल, म्हणून अल्पायुष्य. येथें लग्नस्वामी तृतीयाचा स्वामी जो रवि त्याच्या प्रभेंत लोपत चालला आहे. म्हणून भावंड जी राष्ट्रीय सभा, तिच्या तेजांत ही लोपेल की काय; की तिसरीच एखादी सभा निघेल? उलटपक्षीं राष्ट्रीय सभेच्या सहजस्थानांत धाकट्या भावंडास मारक असा शनि आहे. म्हणून हिच्या शेवटानंतर राष्ट्रीयसभा अस्तित्वांत राहील, असें वाटतें.

सायन भावचलित कुंडल्या प्रसिद्ध करतीं आल्यातर बरें होईल. कारण भाव कुंडली खरी आहे. कळावे ही विनंति.

आपला.

गोविंद हरी केसकर.

[३]

सा. न. वि. वि.—पुढील माहिती मी महत्प्रयासानें मिळवून पाठविली आहे. तिला येत्या अंकीं स्थळ मिळावें.

रवि.— ३-१०-६-११ या स्थानीं असल्यास धन, यश, नृपमान, सर्वकार्यसिद्धि, बंधुवर्गास सुख, पुत्र, लाभ, व पुण्य या गोष्टी प्राप्त होतात.

तोच १-१२-७-२-४-५-८-९ या स्थानीं असल्यास रोग, शोक, भय, अग्निपीडा, व्याधि, प्रवास व अर्थहानि या गोष्टी घडतात.

चंद्र.— १-३-७-२-१०-११ स्थानीं असतां लाभ, द्रव्यप्राप्ति, मित्रसमागम, सद्बुद्धि, व द्विजदेवभक्ति या गोष्टी घडतात.

तोच ९-४-५-८-१२ स्थानीं असल्यास द्रव्यहानि, चोरभय, अग्निभीति, बंधुनाश, भय, व दुःख या गोष्टी घडतात.

मंगळ.— ३-६-११ स्थानीं असल्यास सुवर्णलाभ, शत्रुजय, राजकुलांत वृद्धि, आरोग्य, व सुख या गोष्टी घडतात.

तोच १-४-५-१२-७-८-९-२ १० स्थानीं असल्यास व्याधि, विदे-

स्थगमन, विरोध व नाश होतो.

बुध—२-६-१०-११-४-८ स्थानीं असल्यास लाभ, सुख, मनाला हर्ष, द्रव्य व कांतिवृद्धि या गोष्टी प्राप्त होतात.

तोच १-१२-५-९-७-३ स्थानीं सौख्यनाश, द्रव्यहानि, भ्रातृभय, व्याधि व दुःख करितो.

गुरु—२-९-११-५-७ स्थानीं लाभ, क्रयविक्रय, लाभ, बुद्धि, प्रतिष्ठा, द्रव्य व शरीरसुख देतो.

तोच १-१२-१०-४-६-८-३ स्थानीं व्याधि, विदेशगमन व मित्रविरोध करितो.

शुक्र—२-९-११-८-१२-५-३-१-४ स्थानीं सत्पुत्र, व सुख देतो.

तोच १०-७-६ स्थानीं असल्यास रोग, शोक, कार्यनाश व स्त्रीविरोध करितो.

शनि.—३-६-११ स्थानीं सौख्य, लाभ, राजापासून यश, जय, कीर्ति व द्रव्यप्राप्ति देतो.

तोच १-४-५-१२-७-८-९-२-१० स्थानीं स्वजनांत कलह, हानि व द्रव्यनाश करितो.

राहू—३-६-१०-११-१९ स्थानीं पुत्र, मित्र व धन यांची प्राप्ति करितो.

तोच २-५-८-७-४-१२ स्थानीं मरण व दुःख देतो.

केतूचीं फलें राहुप्रमाणें आहेत.

सूर्याचें दान सूर्योदयीं द्यावें. चंद्राचें सायंकाळीं दीप लागतांच द्यावें. मंगळाचें २ घटिका दिवसास, बुधाचें पांच घटिका दिवसास, गुरूचें सायंकाळीं पांच वाजतां, शुक्राचें सूर्योदयीं, शनीचें दिवसाच १२ वाजतां व राहूकेतूचें दीप लागतांच द्यावें.

शिवराम शेषराव भाले

प्रांतिक सभा.

यंदा धुळें येथें १५ वी प्रांतिक सभा एप्रिल महिन्यांत भरणार आहे. तिच्या विषयाचा मसूदा तयार करण्यासाठीं ता० ८ मार्च्य रोजीं स्वागत मंडळीची सभा भरणार आहे. या दिवशीं चंद्र व मंगळ हे दोन्ही ग्रह एकाच राशीवर असून चंद्र हा मंगळाच्या पुढें सुमारें २० अंश आहे. यामुळें चंद्रावर त्याचा विशेष परिणाम घडत नाहीं. चंद्र हा लोकपक्षाचा कारक ग्रह आपल्या उच्चांत आहे. मंगळ हा पूर्ण जहाल ग्रह आहे. हे दोन्ही ग्रह एका राशीवर असल्यामुळें राष्ट्रीय पक्षास बहुमत होणार आहे. म्हणून स्वागत मंडळीच्या सभेंत बहुमतानें राष्ट्रीय पक्षाचींच मतें निवडलीं जातील. राजपक्षाचा कारक ग्रह रवि हा मीन राशींत असून मवाळ ग्रह जो शनि तोही याच राशींत आहे. उभयतांत सुमारानें १० अंश अंतर आहे. या महिन्यांत २१ व्या तारखेला या दोन ग्रहांची युति होणार आहे ती राजपक्षाला अनिष्ट आहे. यावरून प्रमुख मवाळ प्रांतिक सभेस अनुकूल होणार नाहींत. उभयतांत समेट करण्याचा जो प्रयत्न चालू आहे तो निदान मार्च्यमध्यें तरी साध्य होत नाहीं. अर्धवट मवाळ राष्ट्रीय पक्षास मिळतील व पवना प्रांतिक सभेप्रमाणेंच बहुमतानें सभा पार पडेल.

अध्यक्षासंबंधानें मात्र कांहींसा बखेडा होण्याचा संभव आहे. एप्रिलमध्यें रवि आपल्या उच्चांत असल्यामुळें राजपक्षाचा [पूर्ण जहाल नव्हे] असा एखादा अध्यक्ष होईल असें वाटतें. ना. दाजीसाहेब खरे हे अशा प्रकारचे गृहस्थ आहेत, यावरून तेच अध्यक्ष कायम होतील. हे अध्यक्ष कित्येक जहालांस मान्य नाहींत, यामुळें अध्यक्षाच्या सूचनेस पूर्ण बहुमत मिळणार नाहीं. तरी पण बखेडा न होतां अध्यक्ष तेच कायम होतील. यदा कदाचित् ते न झाले तरी तशाच प्रकारचे कोणी तरी दुसरे होतील.

लिहिण्याचें तात्पर्य इतकेंच आहे कीं, ज्याचें सरकारांत अधिक वजन असून लोकप्रिय असतील तेच अध्यक्ष होतील.

लढाई.

काबूल व हिंदुस्थान यांमधील सरहद्दीच्या डोंगराळ मुलखांत झाकाखेल पठाणांशीं इंग्रजसरकारचें युद्ध चालू आहे. हें युद्ध ८।१० दिवसांत संपेल असा इंग्रजी सेनानायकांचा अजमास होता. पण दोन तीन आठवडे होऊन गेले तरी युद्ध चालूच आहे. पठाण लोक गनिमी काव्यानें लढत आहेत त्यामुळें इंग्रजी सैनेस फार त्रास पडत आहे. गेल्या ५व्या अंकांत 'सैनिकांचे बाहू स्फुरण पावतील व ते युद्धासाठीं उत्सुक होतील' असें भविष्य केलें होतें, तें खरें होत आहे. त्याचप्रमाणें जानेवारी, फेब्रुवारी महिन्यांत ज्या प्रकारच्या गोष्टी घडतील म्हणून लिहिलें होतें, त्या प्रकारच्याही गोष्टी घडल्या आहेत. मंगळाच्या गतीवरून वरील युद्ध लवकर संपेल असें वाटत नाहीं. ता० २३ फेब्रुवारीला मंगळ वृषभ राशींत गेला, तरी लढाई चालूच आहे. यावरून तो या राशींत आहे तोंपर्यंत तरी ती बंद होत नाहीं असें वाटतें. ता० १८ फेब्रुवारीपासून ता० १० मार्च्यपर्यंत मंगळ सायन कृत्तिकेंत आहे. या काळीं मंगळ फार बलवान् असल्यामुळें भयंकर रक्तपात होण्याचा संभव आहे. मार्च्यमध्यें रवि व शनि यांची युति होत आहे, त्यामुळें इंग्रजी सैनेस या महिन्यांत बऱ्याच हालअपेष्टा भोगाव्या लागतील, म्हणून त्यांनीं विचारानें युद्ध करावें. रवि व शनि यांची युति कोणत्याही सार्वभौम सरकारास अनिष्ट आहे.

सर्व वर्षांत मंगळाची गति शीघ्र आहे, यावरून जगांत कोठें तरी तुमुल युद्धाची जय्यत तयारी होत आहे, असें वाटतें.

पत्रव्यवहार.

[१]

मुहूर्तसारांश.

दुष्टयोग.— वज्र व्याघात शूल व्यतीपात गंड विष्कंभ परीघ.

दुष्टवार.— रवि शनि मंगळ.

कुतिथि.— ४।९।१४।३०

शुभतिथि.— ३।५।८।१०।१३।१५

शुभवार.— सोम गुरु बुध शुक्र.

वर्ज्य पंचांग दूषण.— जन्मनक्षत्र जन्ममहिना जन्मतिथि व्यतिपात भद्रा वैधृति अमावास्या पितृतिथि तिथिक्षय तिथिवृद्धि क्षयमास अधिकमास कुलिक प्रहरार्ध बारवेळा महापात.

लग्नशुद्धीस पंचक पाहणें.— गततिथि मोजून त्यांत लग्नांक मिळवावे. त्या बेरजेस नवांनीं भागावें. शेष उरेल त्याचें फळ. ८ उरेल तर रोगपंचक तें मुंजीस वर्ज्य. २ उरेल तर अग्निपंचक तें गृहारंभास वर्ज्य. ४ राहिल्यास राजपंचक व ६ राहिल्यास चोरपंचक हीं गमनास वर्ज्य. १ राहिल्यास मृत्युपंचक विवाहास वर्ज्य. शेषांक निष्पंचक सर्व कर्मास उक्त.

धनिष्ठापंचक.—या नक्षत्रापासून रेवती अखेर चंद्र जाईपर्यंत समजावें. या पंचकांत दक्षिण दिशेस जाणें खतें पत्रें करणें मुहूर्त वास्तु गवत—सर्पण—गोवऱ्या—धान्य यांचा संग्रह खाट विणणें नूतन वस्त्र परिधान करणें हीं सर्व कर्में वर्ज्यावीं.

जन्मस्थ चंद्रार्की पंचककर्मे वर्ज्य.— यात्रेस जाणें युद्धांत जाणें

विवाह क्षौर करणें, आणि गृहप्रवेश हीं पांच कर्में जन्मस्थ चंद्र असतां करूं नयेत.

घातचंद्र.— यात्रेस जाण्यास युद्धास कृषि करण्यास व्यापारास धान्यादि संग्रहास, बाद सांगण्यास व घराचे आरंभास वर्ज्यावा.

गुरुशुक्राचे अस्त—विहीर आड तलाव यज्ञ गमन चौल देवप्रतिष्ठा मुंज विद्यारंभ नूतन गृहप्रवेश मुलाचा कर्णवेध महादानें गुरुसेवा तीर्थ स्नान विवाह कामनिक होम मंत्रोपदेश हीं करूं नयेत.

खरेदीस नक्षत्रें—अश्विनी चित्रा स्वाती श्रवण शतत्रारका रेवती.

नूतन वस्त्रधारण—रोहिणी हस्त चित्रा स्वाती विशाखा अनुराधा अश्विनी तिन्ही उत्तरा पुनर्वसु पुष्य रेवती धनिष्ठा या नक्षत्रीं शुभवारीं शुभ तिथींस करावें.

शांतिकर्म—हस्त अश्विनी पुष्य अभिजित् तिन्ही उत्तरा रोहिणी स्वाती पुनर्वसू श्रवण धनिष्ठा शततारका अनुराधा मघा हीं १५ नक्षत्रें उक्त होत.

क्षौरकर्म—राजाच्या अथवा ब्राह्मणाच्या आज्ञेनें व क्रिया करण्याचे आधीं व सूतकाच्या अंत्य दिनीं बंदीतून सुटल्यावर व यज्ञाचे वेळीं अवश्य करावें.

नित्यक्षौर—कुवार कुयोग कुतिथि व्रतदिवस मूळ भद्रा ह्या दिवशीं करूं नये.

लहान मुलांस अन्नप्राशन—६।८ महिन्यांत मुलांस आणि कन्येस पांचवा महिना व दुसरे विषम मास अन्नप्राशनास उक्त आहेत. या महिन्यांत शुभमुहूर्तीं प्राशन करावें.

विद्यारंभ.—जन्मापासून पांचवें वर्ष शुभ होय. उदगयनांत शुभ मुहूर्तीं आरंभ करावा.

मुंजीमुहूर्त.—नक्षत्रें.—पूर्वाषाढा श्रवण धनिष्ठा शततारका अश्विनी मृग हस्त चित्रा स्वाती रेवती ज्येष्ठा पुष्य पूर्वाफाल्गुनी आणि उदगयन शुक्लपक्ष शुभवार आणि शुभतिथि.

विवाह.—रोहिणी मृग मघा उत्तराफाल्गुती हस्त स्वाती अनुराधा मूळ उत्तराषाढा उत्तराभाद्रपदा व रेवती.

आषाढापासून ४ मास पौष चैत्र गुरु व शुक्र यांचे अस्त सिंहस्थ अधिक व क्षयमास. कुलिक क्रांतिसाम्य भद्रा मृत्युपंचक व्यतीपात इतक्या गोष्टी विवाहास वर्ज्य आहेत.

गृहारंभ.—पौष फाल्गुन वैशाख मार्गशीर्ष श्रावण आणि कार्तिक या महिन्यांत गृहारंभ शिलान्यास व स्तंभप्रतिष्ठा शुभ होय.

गृहप्रवेश.—नव्या गृहांत प्रवेश करणें यात्रेहून घरीं येणें राजदर्शनास जाणें यांचे पूर्व दिवशीं वास्तुपूजा करून भूतबळी द्यावा. उदगयन असावें.

वास्तुकर्म.—श्रावण वैशाख कार्तिक फाल्गुन मार्गशीर्ष या महिन्यांत शुभवारीं शुभ पंचकीं करावें.

गृहप्रवेशमुहूर्त.—वैशाख फाल्गुन श्रावण आश्विन पौष माघ ज्येष्ठ मार्गशीर्ष या मासांत स्थिरलग्नीं शुक्ल पक्षांत प्रवेश करावा.

द्विरागमन.—माघ मार्गशीर्ष फाल्गुन वैशाख या महिन्यांत विवाहापासून विषम वर्षी शुभ नक्षत्रीं शुक्लपक्षीं व शुभवारीं युक्त होय.

गणेश दामोदर ग्रंथे

---

[२]

वि. वि.—कुंडलीविज्ञान वर्ष १ पुस्तक ७ यांत पान ५ वर **एक योगी मंछाराम** यांचे कडील मिळालेलें चक्र छापलें आहे, त्यास

अकडम छकडम असें नांव दिलें आहे. हल्लीं मला एक असेंच चक्र मिळालें आहे. त्याचें नांव **सिद्धारिचक्र** असें आहे. त्याचीं व आपण दिलेलीं फलें यांत अगदीं साम्य आहे. आपण सिद्धि सुसिद्धि साध्य व अरि अशीं फलें लिहिलीं आहेत. माझे जवळचे चक्रावरही तींच आहेत. आपण त्यांचा खुलासा फक्त नांवाचीं मूळचीं अक्षरें घेऊन दिला आहे. व मजजवळील माहितींत खालील प्रमाणें आहे.

मंत्राक्षरं त्रिगुणितं नामाक्षरसमन्वितं ॥
द्वादशे हरेद्भागं शेषमंत्रं शुभाशुभं ॥
नवकपंचमे सिद्धिः साध्यषट्दशयुग्मके ॥
त्रिसप्तैकादशं मित्रं तुर्याष्टमद्वादशो रिपुः ॥ ७॥
सिद्धिसिध्यंति कालेन साध्यस्तु जपहोमतः ॥
सुसिद्धिस्तत्क्षणादेव अरि मुलानि कंदनं ॥ ८

असें आहे, व चक्र खालील प्रमाणें आहे.

२ ट व अं व	१ क ट म अ	१२ ख आ मा ड	११ ग ढ य ई
भा फ भ्र उ ३			ड ण र ई १०
४ स यं ह औ		सिद्धारिचक्र	९ घ त ळ उ
५ ज ना ह औ वै.	६ घ ध व ए	७ च द श ए	८ न थ ल उ

याप्रमाणें आमचे जवळचे चक्रांत अक्षरें आहेत. १।२ हे आंकडे सुरवात समजण्याकरितां आहेत. मूळ चक्रांत आंकडे नाहींत. आपण

दिलेले चक्रांतील अक्षरांत थोडा फरक आहे. व कोष्टकें मागेंपुढें आहेत. मिळाले पत्राचा सार्धंत उतारा खालीं दिल्याप्रमाणें आहे.

मध्ये धनागमः हृदये बालकासिद्धि जठरे भोगसंपदः ॥
वाहनं करि वै गुह्ये परवधूरतिः करयुग्मेच शुभं पदयोर्भ्रमणं
भवेत् ॥५॥
दक्षिणांगे शुभा पुरुषा वामंगे योषिता शुभं ॥६॥

अथसिद्धारिचक्रं.

देशे दुर्गे पुरे ग्रामे मंत्रमौषधदेवता ॥
स्वामिनो गुरुभृत्यादि रिपुस्थानेषु वर्जयेत् ॥
मंत्राक्षरत्रिगुणितं नामाक्षरसमन्वितं ॥
द्वादशेतहरेद्भागं शेषं मंत्रशुभाशुभं ॥ २ ॥

पुढील मजकूर मागें आला आहे. सबब पुनः दिला नाहीं. असलेले पोथीचे पानावरून वरील पत्रावर आणखी ४ श्लोक असावेत असें दिसतें.

मंत्राक्षर म्हणजे काय, व नामाक्षर म्हणजे काय, या दोहोंची कशी जोड घालावयाची या बद्दल खुलासा कोणी केल्यास उपकार होणार आहेत.

येथें एक कांहीं दिवसांपूर्वी वैद्य आले होते. त्यांनीं हें चक्र मागितलें त्या प्रमाणें तें त्यांस दाखवितां त्यावर आकडे नाहींत, चक्र हेंच आहे. आंकड्या वाचून त्याचा उपयोग समजणार नाहीं, असें ते म्हणाले. चक्र देवून घेतलें होतें. खुलासा अद्याप केला नाहीं.

पु. ८ अं. २ यांत दे. प्रेमशंकर दुबे जबलपूर यांचें पत्र आहे. त्यांत त्यांनीं लिहिल्याप्रमाणें सप्तम भावाचा स्वामी लाभ भावांत असल्यास विजवर मिळालेली कुंडली मजजवळ आहे, ती अशी.—

जन्म–शक १८०८ चैत्र व० ६ शनिवार
इष्ट घ. सू. नंतर ३० घ. ४५ प.

यांत सप्तमेश मंगळ हा एकादश स्थानीं आहे.

दत्तक

जन्म–श. १७७८ चै. व. १०
सू. ५४ घ. ७ प.

जन्म–श. १८ ६का. व. ९
सू. २३ घ.

पहिल्या कुंडलीचा इसम दत्तक असून त्यास दुसऱ्या कुंडलीत्या इसम दत्तकच आहे. या दोहोंत पु. ७ अं. १० मध्यें आपण दिलेले नियम १ ते १० पर्यंत सर्व पर्यायानें लागू पडत आहेत.

नारायण विनायक खाडीलकर
मु. त्रिंबक. जि. नाशिक.

---

[३]

रा. रा. कुंडलीविज्ञानकार यांस—

सा. न. वि. वि.—

आपण माझें पत्र प्रसिद्ध करण्याची मेहेरबानी केल्याबद्दल प्रथम आभार मानून आज येत्या राष्ट्रीय सभेसंबंधानें भविष्य करण्याचा यत्न करण्याचें योजिलें आहे. योग्य वाटल्यास प्रसिद्ध करावें.

१९०७ व १९०८ या सालांमधील ग्रहस्थितींत फार अंतर आहे. गुरु ११ व्याचा १२ वा झालेला आहे. शनि मेषेंत आलेला आहे. राहु राष्ट्रीय सभेच्या जन्मकुंडलींत गेल्या डिसेंबरांत शनीच्या समोर रवि होता, तो स्वगृहीं तृतीय स्थानांत आलेला आहे. राष्ट्रीय सभेच्या कुंडलींतील मंगळ व राहु यांवर गुरु, रवि व शनि यांस दूषित करणारा राहु हाललेला आहे. मंगळ स्वगृहीं आहे. यावरून राष्ट्रीय सभेत या वर्षी कोणत्याही तऱ्हेनें गोंधळ होणार नाहीं, असें दिसतें. अध्यक्षासंबंधानें सुद्धां रवि व बुध यांची दशमस्थानाजवळ युति असल्यानें कांहीं गडबड होण्याचा संभव नाहीं. दशमाचा स्वामी चंद्र व गुरु यां समोर आलेला असल्यामुळें व नवमांत शुक्र आल्या कारणानें राष्ट्रीय सभेचें महत्व बरेंच वाढण्याचा संभव आहे. चंद्र एकादशांत जन्मस्थ गुरुचंद्रापासून पांचवा असल्यामुळें असेंच वाटतें. मात्र गुरु षष्ठस्थानांत जन्मस्थ चंद्रास बारावा आहे ही स्थिति वाईट आहे.

एकंदरींत येत्या डिसेंबरांत राष्ट्रीय सभा सुरक्षित पार पडेल. व तिचें महत्व वाढेल असें अनुमान करण्यास गुरूच्या स्थितीशिवाय दुसरी हरकत दिसत नाहीं. हा गुरु लग्नांत ६ वा व जरी चंद्रास १२ वा आहे तरी लग्नस्वामीजवळ आहे. व रवीपासून नववा आहे. ह्मणून याविषयीं भ-

विष्य करणें कठीण आहे. एवढें मात्र खात्रीनें ह्मणतां येईल कीं त्याच्या मुळें कांहीं तरी कमतरता येईल. काय होतें तें पहावें !

भविष्य करण्यास घाई करण्याचें कारण असें आहे कीं या संबंधानें कोणत्याही तऱ्हेचीं चिन्हें दिसूं लागलेलीं नाहींत तोंच भविष्य केल्यास केवळ ग्रहस्थिति मात्र विचारांत घेतां यावी.

कळावें लोभ असावा हे विनंति.

आपला

गोविंद हरी केसकर

पत्रव्यवहार.

[१]

सा. न. वि. वि.—कुंडलीविज्ञान पु.८ अं.८ यांत रा. नारायण विनायक खाडीलकर यांनीं सिद्धारि [दि] चक्रांत मंत्राक्षर ह्मणजे काय व नामाक्षर ह्मणजे काय असा प्रश्न केला आहे. या चक्राचा ज्योतिःशास्त्राशीं कांहीं संबंध नाहीं, हें चक्र केवळ मंत्रशास्त्राशीं संबंध राखणारें आहे. कुंडलीविज्ञान पु.१ अं.७ यांतील **मंछाराम योगी** यांजकडून मिळालेलें **अकडम** चक्रही मंत्रशास्त्रासंबंधीं आहे. मंत्रशास्त्राचे **मंत्रमहोदधि, तंत्रसार,** इ० जितके मोठे मोठे आकर ग्रंथ आहेत त्या सर्वांत सिद्धादिचक्र सुरू करून **अकडम, अकथह, कुलाकुल, नक्षत्र, राशि, ऋणधन** हीं चक्रें प्रायः सांगितलेलीं आहेत. अनुकूलतेवांचून मंत्रदीक्षा झाली तर अपाय करणारी होते. यासाठीं अनुकूलता पाहण्यासाठीं या चक्रांची आवश्यकता पडते. कुंडलीविज्ञान पु.८ अं८ मध्यें जे श्लोक छापले आहेत ते अशुद्ध आहेत. चक्रही जसें पाहिजे तसें नाहीं. यासाठीं **मंत्रमहोदधि** ग्रंथांतून या चक्राचे श्लोक येथें उतरून घेतों.-

अथवान्यप्रकारेण सिद्धादीनां विशोधन ॥
द्वादशारे लिखेच्चक्रे वर्णान् पूर्वोदितान् क्रमात् ॥
ईशानान्तमकाराद्यान् हान्तान् षण्ढविवर्जितान् ॥
तत्र नामार्ण मारभ्य मंत्राद्यर्णावधिक्रमात् ॥
गणयेत् सिद्धसाध्यादि फलं तेषां विनिर्दिशेत् ॥
सिद्धः सिद्धयति कालेन साध्यस्तु जपहोमतः ॥
सुसिद्धः प्राप्तिमात्रेण साधकं भक्षयेदरिः ॥

सिद्धो नवैकबाणेषु साध्यो रसदशाक्षिषु ॥
सुसिद्धस्त्रिमुनीशेषु रिपुर्वेदाष्टाभानुषु ॥
अन्योऽपीह प्रकारोऽस्ति सिद्धसाध्यादि शोधने ॥

मंत्रमहोदधश्चतुर्विंशे तरङ्गे
श्लो० २०–२५

या चक्राचे तीन चार प्रकार वरील ग्रंथांत सांगितले आहेत. खाडिलकरांची व अन्य पाठक महाशयांची जिज्ञासा असल्यास पत्रव्यवहार करावा. जिज्ञासाच दक्षिणा आहे. कळावें.

पंडित केदारनाथ
जयपूर

---

[२]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस—

वि. वि.— आपलेकडे खालील कुंडली पाठवित आहें. तिला येत्या अंकीं स्थल मिळण्याची मेहेरबानी व्हावी.

निरयन लग्नकुंडली

शके १७९८ आश्विन कृ० १० इष्ट घ० ५६।५९



हे गृहस्थ लक्षाधीश असून त्यांचें स्वसंपादित द्रव्यही बरेंच आहे. व्यापारी आहेत. यांचे वडील हयात नाहींत. मातोश्री आहेत. हे ता. ५ जानेवारी रोजीं दुपारीं घोड्याचे गाडींतून जात असतां गाडीचा पोल मोडून खालीं पडले. तेव्हां गाडीचें चाक त्यांच्या छातीवरून गेलें व छातीस इजाही बरीच झाली ! पायास घोड्याच्या टापा लागून बरीच इजा झाली. त्यामुळें ते फारच घायाळ झाले. हल्लीं साधारण बरे आहेत, त्यांची कुंडली सायन केली ती अशी—



र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
६	४	५	६	८	९	११	११	४	१
२०	२३	२८	२०	१	३	१	१८	२३	४
०	३५	३०	व.	२०	५०	५२ व.	१४	४३	२० व.

लग्नीं रवि व बुध हे एकाच अंशांत आहेत. यांत बुध हा भाग्येश असून रवि लाभस्वामी आहे. या दोन ग्रहांचा योग धनयोग दर्शवितो. त्याच प्रमाणें दशमाधिप चंद्र हा लाभस्थानीं असून गुरु स्वगृहीं आहे. गुरु व चंद्र यांत नवपंचम योग झाला आहे, म्हणून हे गृहस्थ लक्षाधीश आहेत.

या कुंडलींत एक अनिष्ट योग झाला आहे. तो असा कीं, चंद्र सिंह या अग्निराशींत हर्शलाशीं युति करण्याच्या बेतांत आहे. हा

योग आकस्मिक व अकल्पित गोष्टी घडवून आणणारा आहे. चतुर्थेश शनि हा षष्ठ स्थानीं राहूसह असून समोर मंगळ आहे त्यामुळें वाहनादिकांपासून भय आहे असें कुंडली दर्शविते.

ज्या दिवशीं अपघात झाला त्या दिवशीं आकस्मिक भय उत्पन्नकर्त्ता ग्रह हर्शल हा चतुर्थस्थानीं होता. व रवि त्याच्या युतींतून नुकताच सुटला होता. आदल्या दिवशीं चतुर्थस्थानीं मकर राशींत रविचंद्र, रविहर्शल व चंद्रहर्शल याप्रमाणें तीन युत्या होत्या त्या व डिसेंबर ३०. वीला झालेली शनिमंगळयुति या कांहीं तरी अपघात होणार असें स्पष्ट दर्शवित होत्या. त्याचा अनुभव ता० ५ ला मिळाला. ता० ५चा चंद्र कुंभ राशींत जन्मस्थ हर्शलाच्यासमोर २० अंशांत असल्यामुळें तो त्याच दिवशीं जन्मस्थ हर्शलच्या अगदीं समोर येणार होता. ह्मणून त्याच दिवशीं वरील भयंकर परिणाम घडून आला ! कळावें लोभ असावा हे विनंति.

एक वर्गणीदार
इंदापूर ता. १४।१।०८

---

* वरील अनुभव टिपून ठेवण्यासारखा आहे. युतीचा परिणाम आगें मागें ८।४ दिवस घडत असतो असा अनेक वेळां अनुभव आला आहे. ह्मणून मनुष्यानें तितके दिवस सावधगिरीनें वागूलें पाहिजे. कदाचित् तसें वागल्यास अरिष्ट टळेल, नाहीं कशावरून? फलज्योतिष खोटें किंवा निरुपयोगी आहे ह्मणणारांनीं या गोष्टीचा चांगला विचार करावा. [संपादक]

पत्रव्यवहार.

[१]

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्त्ते यांसी—

सा. न. वि. वि.– तेजीमंदी वगैरे पाहण्याचे विशेष योग खालीं पाठवित आहें. ते सर्वांस माहीत व्हावे ह्मणून त्यांस दाशाहिकांत स्थल मिळण्याची मेहेरबानी व्हावी.

शुद्धपक्षांत तिथिवृद्धि किंवा कृष्णपक्षांत तिथिक्षय असल्यास धान्याच्या भावास मंदी येते.

चैत्र महिन्यांत शु० ५ रोजीं पर्यन्य पडल्यास श्रावणांत पाऊस पडणार नाहीं.

शुक्रास्त, गुरूदय व शनिमंगळांच्या संक्रांतीच्या वेळीं पर्जन्य पडतो.

मंगळ व गुरु हे एका राशीवर असतां वर्षाकालांत वर्षाव होत नाहीं, इतरकालीं धान्याचे भाव तेजीचे होतात.

गुरुशनि समोरासमोर अगर एकत्र असतां प्रजानाश व अन्ननाश होतो.

गुरु, शुक्र, शनि, मंगळ एका राशीवर असतां दुर्भिक्ष होतें.

शनिराहू एकत्र असतां महागाई व राजभय होय.

ज्या महिन्यांत पौर्णिमा वाढेल त्या महिन्यांत गहूं, तूप, व तांदूळ हे जिन्नस स्वस्त होतील.

फाल्गुन अथवा चैत्र महिन्यांत कोणत्याही पक्षांत जर शनि, मंगळ वक्री झाले तर पंधरा दिवसांत अथवा एक महिन्यांत धान्याचा भाव चौपट वाढतो.

मंगळ जेव्हां वक्री होतो. तेव्हां दुर्भिक्ष, महाभय व सर्व लाल पदार्थ महाग होतात. आणि युद्धभीति होते.

गुरु वक्री होतो तेव्हां धान्य स्वस्त होतें, राजा व प्रजा यांना आरोग्य होऊन दूध व तूप यांचे भाव मंद होतात.

शुभ ग्रह अतिचार व क्रूर ग्रह वक्री असतां देशांत दुर्भिक्ष, राजे लोकांस पीडा व प्रजेला रोगपीडा होते. क्रूर ग्रह अतिचार व शुभ ग्रह वक्री असतां उलट जाणावें. शुक्र वक्री होणें चांगलें नाहीं. तो धन–

नाश, तूप व तेल यांची महागाई करितो.

तेरा दिवसांचा पक्ष झाल्यावर महागाई व लोकपीडा होते.

वर्षाकाळांत मंगळ पुढें व रवि मागें असतां पाऊस पडत नाहीं. रवि पुढें व मंगळ मागें असल्यास उलट जाणावें, त्याचप्रमाणें बुध व शुक्र यांचे मध्यें रवि नसावा, आणि मंगळही नसावा. पाऊस पडत नाहीं.

एका महिन्यांत पांच पाप वार वाईट. पांच शुभ वार चांगले. पापवारीं रविसंक्रांति वाईट. पांच रविवार-अग्निपीडा. पांच मंगळवार-महर्गता. पांच शनिवार-रोगभय.

कृष्णपक्षांत तिथिवृद्धि व शुक्लपक्षांत तिथिक्षय होईल तर महागाई. पावसाळ्यांत आवर्षण व राजपीडा होते.

उल्कापात, वज्रपात, धूमकेतु, इंद्रधनुष्य व ग्रहणें हीं सर्व दुष्काळाचीं अगोदर होणारीं चिन्हें होत.

ज्या महिन्यांत पौर्णिमेस वर्षा होईल त्या महिन्यांत गहूं व तूर महाग होईल.

गुरुशुक्र, रविबुध एका राशीवर असतां घातयोग जाणावा. तेव्हां धुळीची वृष्टि होते.

गुरु, चंद्र, मंगळ हे एका राशीवर वर्षाकाळांत असतील तर अतिवृष्टि होईल. शुक्रबुध हे गुरूनें युक्त असतील तर पाऊस पुष्कळ पडेल.

आषाढ, श्रावण, पौष, वैशाख या महिन्यांत शुक्रोदय होऊं नये. अशुभ होय.

रविशनि, मंगळशनि, राहुशनि, गुरुमंगळ, गुरुशनि ह्या दोन ग्रहांचा योग होईल तर पृथ्वीचा नाश होतो. पांच ग्रह एका राशीवर-पशुनाश ६-राजांचा नाश. ७-देशनाश. ८-कालकूट योग-पृथ्वी नाश.

२ ग्रह वक्री-राजाला भय. ३-युद्धभीति ४-राज्यभंग ५ देशभंग.

शुक्रशनि एका राशीवर अस्त झाले तर अन्नपीडा, महायुद्ध व देशविग्रह जाणावा.

माघांत तुषार, फाल्गुनांत वारा, चैत्रांत वादळ, वैशाखांत दंव, ज्येष्ठांत रवि तप्त जर न झाला तर पावसाळ्यांत थोडी वृष्टि होईल.

फाल्गुनांत शुक्र अस्त पावेल तर ६ महिने अन्न महाग होईल.

माघी अमावास्यसे वादळ झालें तर भाद्रपदांत पुष्कळ पाऊस पडेल.

पौर्णिमेस वादळ होईल तर ६ व्या महिन्यांत सर्व वस्तु महाग होतात.

ग्रहणें, विद्युत्पात या वेळीं धान्य संग्रह केल्यास पांचव्या महिन्यांत दुप्पट लाभ होईल.

पौष मासांत पूर्वाभाद्रपदा नक्षत्रीं जर मेघगर्जना झाली किंवा वीज चमकली किंवा पाऊस पडला तर पावसाळ्यांत पाऊस चांगला पडतो.

आषाढ शु० १५ रोजीं वर्षा होईल तर १ महिना अन्न महाग होईल. ज्येष्ठ व० पक्षांत जर सूर्य वादळांत राहील तर वर्षाकाळांत पाऊस चांगला पडेल. आषाढी पौर्णिमेस वृद्धि होईल तर ३ महिने अन्न स्वस्त नंतर महाग होईल.

मीन संक्रातीमध्यें रेवती नक्षत्रीं रवि असतां पावसाचा १ थेंब सुद्धां न पडला तर तो मेघ गर्भ होतो. ह्या योगें वर्षाकाळांत चांगला पाऊस पडतो.

ग. दा. ग्रंथे

---

[२]

भ्रातृयोग.

रा. रा. कुं. वि. कर्ते यांस न. वि. वि.

कुं. वि. व. ७ अं. १४ तील भ्रातृयोगाचे नियम खालील भावंडांच्या कुंडल्यांत बरेच जुळते आहेत. त्यास पुढील अंकीं स्थळ मिळेल अशी आशा आहे. भ्रातृयोग पाहतांना गुरूही विचारांत घेतल्यास बरें. भावंडांच्या कुंडल्यांत तो एकमेकांच्या गुरूपासून गर्भोत्पादक स्थानांत आढळतो म्हणजे सगळ्यांचा गुरु विषम राशीस किंवा सगळ्यांचाच समराशीस असतो.

१ श. १८१३ अश्विन. कृ. २ सू. द. घ. १४. ३२. १० ल; ११ गु; १ चं. २ रा; ६ मं. श. बु. ७ र. शु.

२ श. १८१७ आषा. कृ. ११ सू. अ. घ. १८. १७ २ चं.ल; ३ गु. बु. ४ रं. मं. ५ शु. ७ श. ११ रा.

३ श. १८२० ज्ये. शु. ७ सू. द. घ. १६. ५०. ५ ल; ६ गु. ८ श. ९ रा. १२ मं. १ बु. २ र. ३ शु. के. ४ चं.

४ श. १८२३ आश्वि. कृ. १ सू. द. घ०. ५. ७ ल. र. बु. रा. ८ शु. मं. ९ गु. श. १ चं.

५ श. १८२६ फा. शु. १५ सू. द. घ. ८. ३२ २ ल. ५ रा. ६ चं. ७ मं.

११ श. १२ र. बु. १ गु. शु.

१ पहिलीच्या लग्नाच्या व मंगळाच्या त्रिकोणांत दुसरीचें लग्न व चंद्र.

२ दुसरीच्या त्रिकोणांत व मंगळाच्या सप्तमांत पहिलीचें लग्न.

३ दोन्ही कुंडल्यांत मंगळ एकमेकांपासून सप्तमस्थानीं

४ दुसरीच्या त्रिकोणांत व मंगळापासून तिसऱ्या राशींत पहिलीचा मंगळ.

५ पहिलीच्या सप्तमस्थ राशीस व मंगळापासून अकराव्या राशींत दुसरीचा मंगळ

६ दुसरीचें लग्न व चंद्र तिसरीच्या मंगळापासून तिसऱ्या राशींचें.

७ दुसरीच्या तृतीय स्थानच्या व मंगळाच्या राशीचा तिसरीचा चंद्र.

८ दुसरीच्या मंगळाच्या त्रिकोणांतील राशींत व पहिलीच्या तृतीय-स्थानाच्या राशींत तिसरीचा मंगळ.

९ पहिलीचा चंद्र तिसरीच्या त्रिकोणांतील राशींत.

१० तिसरीच्या तृतीयस्थानाच्या राशींत चवथीचें लग्न.

११ तिसरीचा चवथीचा मंगळ एकमेकांपासून सातव्या स्थानांत.

१२ चवथीच्या एकादश स्थानांतील राशींत तिसरीचें लग्न.

१३ तिसरीच्या त्रिकोणांतील राशींत चवथीचा चंद्र.

१४ चवथीच्या मंगळाच्या त्रिकोणांतील राशींत तिसरीचा चंद्र.

१५ चवथीचें लग्न पांचवीच्या मंगळाच्या राशीचें.

१६ पांचवीचें लग्न चवथीच्या मंगळाच्या सप्तमस्थ राशीचें.

१७ चवथीचा चंद्र पांचवीच्या मंगळाच्या सप्तमस्थ राशीचा.

१८ पांचवीचा चंद्र चवथीच्या मंगळाच्या एकादशस्थानच्या राशीचा व चंद्राच्या त्रिकोणांतील राशींत.

या शिवाय पहिलीचा व चवथीचा चंद्र एकाच राशीचा. दुसरीचें व पांचवीचें लग्न एकच. पहिल्या तिन्ही भावंडांच्या कुंडल्यांत गुरु एकाच स्थानीं. पहिलीच्या गुरूच्या त्रिकोणांत दुसरीचा गुरु, व चवथीच्या गुरूच्या त्रिकोणांत पांचवीचा गुरु.

याप्रमाणें कोणत्याही दोन भावंडांच्या कुंडल्यांत भ्रातृयोग आहे. वरील पांच भावंडांपैकीं पहिल्या चार बहिणी व त्यांचा पांचवा भाऊ आहे. कळावें

आपला

धों. गं. कौंडिण्यकर.

नागपूर.

पत्रव्यवहार

[१]

रा. रा. कुंडलीविज्ञान मासिक पुस्तककर्ते यांस

वि. वि.— फलज्योतिषाचा खरेपणा सिद्ध करण्याचे हेतूनें आपण कुंडलीविज्ञान मासिक पुस्तक काढलें आहे. आणि तो हेतु पूर्ण करण्यासाठीं सायन किंवा निरयन पद्धतीनें ग्रहांचें फल पहावें हें नक्की करण्याकडे आपल्या पुस्तकांत विशेष लक्ष देण्यांत येतें. तें हेतूस अनसरून यथार्थच आहे. या संबंधांत मला कांहीं शंका उत्पन्न होतात. त्यांस आपल्या पुस्तकाच्या येत्या अंकीं स्थल द्याल व त्या शंकांचें त्यात निवारण कराल अशी आशा आहे.

ग्रहांचा परिणाम पृथ्वीवरच्या दरएक भागावर आणि प्रत्येक प्राण्यावर झाला पाहिजे हा फलज्योतिषाचा मुख्य सिद्धांत आहे. तेव्हां तारागणांतून फक्त आपल्या सूर्यमालेंतील तारागणाचाच परिणाम होईल व दुसऱ्याचा बिलकूल होणार नाहीं हें संभवत नाहीं. आपले ग्रह फिरते आहेत तसेच इतर तारागणही फिरते असले पाहिजेत. परंतु त्यांची गति इतकी मंद आहे कीं, या प्रश्नाच्या कामासाठीं त्यास स्थिर समजण्यांत येतें. सर्व तारागणाचे परिणाम बरोबर हिशोब होऊं शकणार नाहीं, ही गोष्ट खरी आहे. आणि त्यामुळेंच पूर्वीच्या ज्योतिष्यांनीं फक्त आपल्या ग्रहांच्या ग्रहमार्गाजवळच्या तारागणांचें फल आपल्या ग्रहाबरोबर मोजण्याचा परिपाठ ठेविला असेल असें अनुमान निघतें.

प्राचीन ज्योतिष्यांनीं या कामांत ग्रहमार्गातील स्थिर तारांचे

२७ भाग करून त्याला नक्षत्र ही संज्ञा दिली असेल असें वाटतें आणि प्रत्येक नक्षत्राच्या ¼ भागांत आपले ग्रह दिसले त्यांचीं वेळोवेळीं फलें वर्णन केलीं आहेत. ३६० अंशांच्या वर्तुळाच्या २७ भागांत एका नक्षत्राच्या १३अं. २०क. येतात. आणि नक्षत्राच्या एक चरणांत ३अं २०क. ज्याला ज्योतिषांत **नवमांश** संज्ञा आहे तो येतो.

चांद्रवर्षाचा प्रथम मास कार्तिक जेव्हां संध्याकाळीं कृत्तिका नक्षत्राचा उदय होत असलेला दिसतो त्या वेळेपासून वर्षाची सुरवात मानून नक्षत्रांची गणती पण कृत्तिकादि मोजण्यांत येत असावी असें अनुमान निघतें. त्यानंतर राशिगणना प्रचारांत आली असावी. सूर्य विषुवद्वृत्ताला छेदून उत्तरेकडून आल्यापासून पुनः त्या ठिकाणीं येईपर्यंतच्या वर्तुळाच्या ३६० अं. चे बारा भाग करून प्रत्येक ३० अं. चे भागास एक राशि कल्पिली, व मेषादि राशींचीं नांवें काल्पनिक आकारावरून दिलीं. मेषाचे सुरवातीजवळ अश्विनी नक्षत्र असल्यामुळें अश्विन्यादि नक्षत्रगणना झाली. त्यावेळीं अश्विनीसमोरचें चित्रानक्षत्र संध्याकाळीं उदित असल्यामुळें चैत्रमासापासून चांद्रवर्षाची सुरवात समजण्याचा प्रघात पडला असेल असें अनुमान निघतें.

नक्षत्राचा चतुर्थांश अथवा ३अं. २०क. चा भाग जो एक राशीच्या नवव्या भागाएवढा होतो. त्या १०८ भागांपैकीं दर एक भागाचें आधिपत्य अश्विनीच्या प्रथम चरणापासून सुरू करून मेषादि राशीला अनुक्रमें आळीपाळीनें दिलें असें अनुमान होत आहे.

फलज्योतिषाकरितां जी कुंडली करण्यांत येते तो आकाशाचा नकाशा आहे. व त्याकरितां जन्माचेवेळीं जन्मस्थानापासून पूर्व

पश्चिम चक्राला छेदील असा व्यास काढून छेदनबिंदूला प्रथम आणि सप्तमाचे केंदस्थान ठरविण्यांत आलें. आणि त्याच ठिकाणीं आकाशपाताळ लंब काढून तें वरचे खालचे भवक्रास छेदील या दोन बिंदूला दशम आणि चतुर्थीचें केंद्र कल्पण्यांत आलें. हीं चार केंद्रें वर्तुळाकार जोडून वर्तुळ पुरें केलें ह्मणजे कुंडली अथवा नकाशाचें खोकें तयार झालें. त्यांत ग्रह मांडण्यासाठीं जन्मस्थानापासून जन्माचे वेळेस दरएक ग्रहाकडे सरळ रेघ कल्पून ती रेघ कुंडलीच्या वर्तुळास ज्या जागीं छेदील त्या जागीं तो ग्रह मांडिला आहे. आणि त्या त्या ग्रहांच्या अशा रीतीनें येणाऱ्या जागीं जे स्थिर तारागण दृष्टीस पडतील त्याचें फल त्या त्या ग्रहांबरोबर साधलें पाहिजे. अशा रीतीनें साधण्यांत आलें तरच फल बरोबर येईल.

या तारागणाच्या फलसाधनाकरितां अमुक ग्रह अमुक राशि, अंश, कलांत आहेत असें सांगण्यात येतें त्या धोरणानें दर एक ग्रहाचें वेगवेगळें फल सांगण्यांत येतें. ह्मणजे ज्या स्थानांत अमुक राशि अमुक अंशकलांत अमुक ग्रह आहे असें सांगण्यांत येतें, त्या वेळेस तो ग्रह त्याच स्थानापासून पाहतां त्या राशि अंश कला ज्या स्थिर तारागणा ऐवजीं सांगण्यांत येतात त्या स्थिर तारागणाबरोबर दिसला पाहिजे.

ग्रहाच्या राशि अंश कला गणितानें काढितां येतात. ह्या गणिताच्या रीति वेगवेगळ्या आहेत. आणि त्यांतून कोणत्या रीतीनें खरें फल येतें हा वादग्रस्त विषय आहे. माझी समजूत अशी आहे कीं ज्या गणितानें वर सांगितल्याप्रमाणें अमुक राशि अंश कला ज्या वेळेस येतात त्या त्या वेळेस तेच स्थिर तारागण दर्शवितील

तें गणित फलज्योतिषाकरितां उत्तम समजावें. हा सिद्धांत लागू केला तर भूमध्यस्थ आणि सूर्यमध्यस्थ गणित या दोन मुख्य भागांत शास्त्रीय कामाचे गणितासाठीं तमाम ग्रह सूर्यामागें फिरणारे असल्यामुळें सूर्यमध्यस्थ गणित घेतलें पाहिजे. आणि फलज्योतिषाकरितां पृथ्वीवरच्या अमुक भागावर अमुक वेळच्या ग्रहांचा परिणाम काढण्याचा असल्यामुळें आणि वर सांगितल्याप्रमाणें त्या जागेवरून वेधित ग्रहांचीं स्थानें कुंडलींत घेण्याचीं असल्यामुळें भूमध्यस्थ गणित घेतलें पाहिजे.

सायन निरयन पक्षाचे रीतीचे गणितांनीं ग्रहांच्या राशि अंश कला वेगवेगळ्या येतात. त्याला पण वरचा सिद्धांत लागू केल्यास ज्या गणितांनीं अमुक राशि अंश कला सर्वदा तेच तेच स्थिर तारागण दाखवितील तें गणित फलज्योतिषाकरितां ग्रहण केलें पाहिजे.

या दोन पक्षांतून कोणत्या पक्षाच्या रीतीनें खरें समजेल हें मला माहित नहीं. करितां दोघांतून कोणती पद्धती ह्या विचारानें ग्राह्य ठरते तें कळविण्याची मेहेरबानी कराल.

कदाचित् दोहोंतून एकही पद्धत या प्रमाणें नक्की दाखवित नसेल तर कोणत्या पद्धतींत राशि अंश कला व ज्या त्या राशींना लागणारे स्थिरतारागणांत कमींत कमी अंतर राहतें तें कळवाल. ह्या माझ्या काल्पनिक सिद्धांताला जास्ती मिळतें निरयन गणित येत आहे असें ठरेल तर निरयन गणिताचे पुष्कळ पक्षांतून कोणत्या पक्षाचे गणितांत स्थिरतारागण आणि राशि अंश कलांचा मेळ जास्तींत जास्ती चौकस येतो, तें कळविण्यास पण ज्योतिषी वाचकांस माझी विनंति आहे.

ऋतु वगैरे फक्त सूर्य आणि विषुवावृत्तापासून त्याचे अंतरावर

आधार ठेवित असल्यानें त्या कामासाठीं सायन गणित ज्याचा सुरू बिंदू विषुववृत्ताबरोबर संबंध ठेवितो तेंच गणित खरें समजलें पाहिजे, हें निर्विवाद आहे.

कळावें लोभ असावा. हे वि० ता. २ एप्रिल सन १९०८
मु० चाणस्मा, ता० बडावळी, प्रांत कडी, उत्तर गुजराथ.

आर. पी पटेल.

---

* लेखकाचा झोंक निरयन पक्ष सिद्ध करण्याकडे आहे. त्याच्या मतें आकाशातील अश्विन्यादि तारागण सुखदुःखादिकांचे दर्शक आहेत व ग्रह अश्विनींत असतां आकाशांत तो त्याच नक्षत्रांत दिसतो, सबब फलज्योतिषासाठीं निरयन पक्षाचा स्वीकार केला पाहिजे. या मताचें निरसन पूर्वी झालेलें आहे, तें नीट मनन करून पहावें. आतां याबद्दल चर्चा करण्याचें कारण नाहीं. जातकांत जीं अश्विन्यादि नक्षत्रें आहेत, तीं तारात्मक नसून गणितात्मक आहेत, आणि राशि सायन आहेत, या गोष्टी मागें आह्मीं सिद्ध केल्या आहेत. त्या शास्त्रीय पद्धतीनें खोडून ठाकिल्याशिवाय निरयन पक्ष खरा ठरणार नाहीं. महिन्यांनां जीं नांवें पडलीं आहेत ती नक्षत्रांच्या उदयांवरून नाहींत. "मेषादिस्थे सवितरि यो यो मासः प्रपूर्यते चांद्रः ॥ चैत्रादि स विज्ञेयः···॥" याप्रमाणें चैत्रादि मासांचें लक्षण आहे. एकंदरींत लेखकाला अद्यापि या विषयाची दाद नाहीं. तरी तो पूर्णपणें पाहून नंतर आपलें मत पुढें मांडण्यास सिद्ध व्हावें हें बरें. [सं. कुं. वि.]

---

[२]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस—

सा. न. वि. वि.— खालील विषयास कुंडलीविज्ञानचे येत्या अंकांत जागा मिळेल अशी आशा आहे.

कुंडलीविज्ञानचे १ ले पुस्तकांतील ७ व्या अंकाचे पांचव्या पृष्ठावर जें [अकडम् छकडम्] चक्र योगी मंछरामचे वहींतील दिलें आहे तें बरोबर आहे. मात्र खुलशामध्यें दामोदर आणि खंडेराव यांची शत्रुता दर्शविली ती चक्राविरुद्ध नजरचुकीनें झाली ती सुधारणें इष्ट आहे. यांत पुढें लिहिल्याप्रमाणें पाहतां येतें. सिद्धाचे ठिकाणीं सुसिद्ध व सुसिद्धाचे ठिकाणीं साध्य हें उलट आहे.

कुंडलीविज्ञानचे ८ वे पुस्तकांतील ८ वे अंकाचे पत्रव्यवहार विषयांस दुसऱ्या रीतीनें [सिद्धारी] चक्र असें नांव देऊन पुनः प्रसिद्ध झालें. त्यांत लेखकानें जो [मंत्राक्षर म्हणजे काय व नामाक्षर म्हणजे काय] असा प्रश्न केला आहे तो पुस्तक पुरें नसल्यानें चुकीनें लिहिला आहे.

साधकानां शीघ्रसिद्ध्यै मंत्रसिद्धिमथो ब्रुवे ॥
साधकस्य हितार्थाय सिद्धि साध्यादि भेदतः ॥ १
द्वादशारे लिखेच्चक्रे वर्णान्मातरि संज्ञकान् ॥
ईशानांतमकाराद्यान् क्षांतान्बंदविवर्जितान् ॥ २
साधकस्य तु नामादि वर्णमारभ्य शोधयेत् ॥
मंत्राद्यक्षरपर्यंतं चक्रे सिद्धादिके क्रमात् ॥ ३
सिद्धो नवैकबाणेषु साध्यो रसदिशाक्षिषु ॥
सुसिद्धाग्नि मुनीशेषु रिपुर्वेदाष्ट भानुषु ॥ ४
देशग्रामे पुरे वापि मंत्रौषधिदेवताः ॥
स्वामिनो गुरुभृत्यादि रिपुस्थाने विवर्जयेत् ॥५

दुसऱ्या श्लोकाप्रमाणें सिद्धारिचक्रांत अक्षर बरोबर नाहीं. तें कोणत्याही तऱ्हेनें मिळत नाहीं. उदाहरणार्थ, ' व ' हें तीन कोष्टकांत आणि ' अः ' मुळींच नाहीं. एकाच कोष्टकांत दोन ' व ' इ० या पेक्षां योगी मंछारामचे चक्रांत अक्षर बरोबर लिहिलें आहे.

हें चक्र मंत्रशास्त्रांतील आहे. या विषयाचे कित्येक प्रकार मंत्रमहोदधि वगैरे ग्रंथांत आढळतात. गुरु जेव्हां शिष्यास मंत्रोपदेश करितो तेव्हां त्या मंत्राला शोधनादि प्रयोग लागतो, आणि तोच मंत्र देण्यांत पूर्वी अकडम चक्रावरून सिद्धयादि पाहून अरिभूत नसल्यास शिष्यास देत असत.

यांत वर्णमालेंतील अकारादि क्षकारपर्यंत पूर्वादि करून ईशानांत क्रमानें पुनः पुनः ४ आवृत्तीनें सर्व अक्षरें लिहिलीं पाहिजेत. मग साधक [शिष्य] याचे नांवाचें प्रथमाक्षर ज्या कोष्टकांत असेल तेथून त्याच क्रमानें ज्या कोष्टकांत मंत्राचें आद्याक्षर असेल तेथपर्यंत मोजावें. १-५-९ सिद्धि आणि २-६-१० साध्य व ३-७-११ सुसिद्धि ४-८-१२ रिपु हे वर्ज्य आहेत, सबब रिपु असल्यास मंत्र इष्ट नाहीं. दुसरा पहावा व जुळेल तोच द्यावा.

या चक्रावरून ग्रामादि वर्गाचेही मंत्राक्षराप्रमाणें पहाण्याची रीति आहे. आठव्या पुस्तकाच्या ८व्या अंकांत सिद्धारिचक्र दिलें, त्याचे वर जो खालील श्लोक दिला आहे, तो या चक्राकरितां नाहीं. तो विचार वेगळा आहे. मंत्रमहोदधि वगैरे ग्रंथांत सिद्धारि शोधनाचे पुष्कळ प्रकार लिहिले आहेत. त्यांतील हा खालील श्लोक आहे.

मंत्राक्षरं त्रिगुणितं नामाक्षरसमन्वितं ॥
द्वादशेन हरेद्भागं शेषं मंत्रं शुभाशुभं ॥ १

म्हणजे मंत्राचे अक्षर अकारादि स्वर ककारादि व्यंजन षढ सहित मोजून त्याची तिप्पट करावी व नांवाचें [शिष्याचें] अक्षर स्वरव्यंजन मोजून त्यांत मिळवावें. व द्वादशतष्ट करावें हा एक प्रकार. आणि शिष्याचे नामाक्षरांपासून मंत्राचे नामाक्षरापर्यंत मोजून तिप्पट करावी. त्यांत मंत्राचें प्रथमाक्षरापासून शिष्याचे नांवाचे प्रथमाक्षरापर्यंत मोजून येणारी संख्या मिळवावी व १२नीं भागावें. या प्रमाणें हा निराळा प्रकार आहे. अक्षर मोजणें तें स्वर व व्यंजन वेगळें वेगळें मोजावें. उदाहरणार्थ—राम=र+आ+म+अ लक्षी=ल+अ+क+ष+म+ई याप्रमाणें प्रत्येक वर्णाचे स्वरव्यंजन प्रथमाक्षरापासून मोजावें. मंत्राचें सर्वाक्षर व नामाचें अक्षर मग पहावें. कळावें लोभ असावा हे वि.

आपला.

पं. बीरबल ज्योतिषी—कटंगी.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूतिः'

पुस्तक ८वें.] वैशाख शु० १, शुक्रवार [अंक १३वा.

वर्षतु पर्जन्याः

१ सायन आर्द्रा

या वर्षी रवि सायन आर्द्रा नक्षत्रांत वैशाख कृ. १३ गुरुवार ता. २८मे या दिवशी दुपारीं ३ वाजून २३ मि. नीं प्रवेश करितो. हा पर्जन्यारंभ होय. या तारखेचे सुमारास छोटी बरसात सुरू व्हावयाची. कोलंबोला या तारखेच्या सुमारास पाऊस पडून बरसात सुरू होईल. या वर्षी शनि, रवि, मंगळ, गुरु, बुध व शुक्र इतके ग्रह बरसातीच्या सुरवातीला विषुववृत्ताच्या उत्तरेस आहेत त्यामुळें उन्हाळा कडक होणार असें मागें सांगितलें होतें. त्याचा अनुभव येतच आहे. उन्हाळा फार झाल्यामुळें यंदा पाऊसही अतोनात कोसळेल व बरसातही झपाट्यानें व लवकर सुरू होईल. बंदा अतिवृष्टि होणार असें अनुमान होतें. पाऊस सर्वत्र आणि अतिशय पडेल. कोंकणांत तर पावसाची कमाल होईल. यंदा अमुक

भागाला पाऊस पडला नाहीं अशी ओरड बहुधा येणार नाहीं. लोक पावसाला कंटाळून जातांल असें वाटतें मुंबईच्या बाजूला तर जूनच्या पहिल्याच आठवड्यांत बरसात सुरू होईल. पाऊस अतिशय पडल्यामुळें पिकांचें थोडेंबहुत नुकसान होणारच. पूर्व धान्यांपेक्षां पश्चिम धान्यें चांगलीं पिकतील. कोंकणांत पाऊस फार झाल्यामुळें विशेष नुकसान होईल. घाट चांगला येईल. ता.२० मेच्या पुढें समुद्रांतून प्रवास करणें धोक्याचें आहे. यंदाचीं वादळें फार भयंकर होणार आहेत, त्यामुळें समुद्रांवर अपघात विशेष होतील.

२ सायन पुनर्वसु

हें नक्षत्र तारीख ११ जून गुरुवार मिती ज्येष्ठ शु० १२ या दिवशीं दुपारीं १ वाजून ३९ मिनटांनीं निघेल. या नक्षत्राचा आरंभीं ८।९ दिवस पाऊस सामान्य पडेल. शेवटीं ४।९ दिवस मात्र विलक्षण पडेल.

३ सायन पुष्य

हें नक्षत्र ज्येष्ठ कृ० १२ गुरुवार ता.९ १५ जून या दिवशीं दुपारीं १२ वाजून ५९ मि. नीं निघेल या नक्षत्राचा पाऊस पुष्कळ पडेल. बहुधा एकही दिवस खंड पडणार नाहीं. नद्या नाले भरून जातील. काम करण्याची सोय नाहीं अशी स्थिति होऊन सूर्य दर्शन क्वचित्च होईल. मद्रसच्या बाजूपेक्षां मुंबईच्या बाजूला हा पाऊस फार पडणार असें वाटतें.

४ सायन आश्लेषा

हें नक्षत्र आषाढ शु० १० गुरवार ता. ९ जुलई या दिवशी

दोन प्रहरीं १२ वाजून ३५ मि. नीं निघेल. याही नक्षत्राचा पाऊस विपुल पडेल. आरंभीं दक्षिण हिंदुस्थानांत विशेष पडेल व. १६ तारखेपासून मुंबईच्या बाजूला भयंकर पडेल.

५ सायन मघा

हें नक्षत्र आषाढ कृ० १० गुरुवार ता. ९ जुलई या दिवशीं दोन प्रहरीं १२ वाजून २ मि. नीं निघेल. या नक्षत्राचा आरंभीं तर कोकणांत भयंकर पाऊस पडेल. खेडीं पाडीं वाहून जातील अशा प्रकारची विलक्षण वृष्टि होईल.

६ सायन पूर्वा

हें नक्षत्र श्रावण शु० ९ गुरुवार ता० ६ आगष्ट या दिवशीं सकाळीं १० वाजून ५० मि. नीं निघेल. या नक्षत्राचा आरंभीं सामान्य पाऊस पडेल. ता. १४ च्या पुढें बराच पडेल.

७ सायन उत्तरा

हें नक्षत्र श्रावण व. ९ गुरुवार ता. २० आगष्ट या दिवशीं सकाळीं ७ वाजून ४९ मि. नीं निघेल. या नक्षत्राचा पाऊस पुष्कळच पडणार असें वाटतें. कारण, बरेच ग्रह एका राशींत आले असून एकमेकांशीं युति करीत आहेत.

८ सायन हस्त

हें नक्षत्र भाद्रपद शु. १ बुधवार ता. ३ सप्टंबर या दिवशीं पहांटेस ३ वाजतां निघेल. या नक्षत्राचें पहिलें अर्ध सामान्य असून दुसऱ्या अर्धांत पाऊस बरा पडेल.

९ सायन चित्रा

हें नक्षत्र भाद्रपद कृ. ६ बुधवार ता. १६ सपटंबर या दिवशीं सायंकाळीं ६ वाजून २० मि. नीं निघेल. या नक्षत्राचा पाऊस क्वचित् पडेल.

१० सायन स्वाती

हे नक्षत्र ता. ३० सपटंबर बुधवार आश्विन शु. ५ या दिवशीं निघेल. या नक्षत्राचा ८।९ दिवसांनंतर पाऊस पडेल.

या प्रमाणें या वर्षी पावसाचें अनुमान हौत आहे. पुढील दिवशीं पाऊस चांगला पडेल.

जून— ता. २२-२३-२८ २९ ३०
जुलै— ता. २-५-१९-२६-२८-२९
आगष्ट— ता. १६-१८-१९-२०-२१-२२-२३-२६-२७
सपटंबर— ता. १२-२१-२३-२४-२५-२७
अक्टंबर— ता. ९-१४-१६

भरण्यां वक्रते सौरिरथवा चाश्विनी भवेत् ॥
वत्सरे तत्र पीडा स्याद्धान्यनाशं चतुष्पदः ॥

ज्या वर्षी शनि भरणी अथवा अश्विनी नक्षत्रांत वक्री होतो, त्या वर्षी धान्य व चतुष्पाद जनावरें यांचा नाश होतोः या वर्षी जुलईच्या २३ तारखेपासून डिसेंबरच्या ७ तारखेपर्यंत शनि अश्विनींत वक्री आहे. यावरून वरील वचन सत्य असेल तर पाऊस फार पडल्यामुळें धान्याचा व गुरांचा नाश होईल असें वाटतें.

पत्रव्यवहार

[१]

श्रीयुत विद्वद्वर्य कुंडलीविज्ञानकर्ते यांसी.

सा. न. वि. वि.— शके १८३० च्या पर्जन्यासंबंधानें शुभाशुभ योग खालील प्रमाणें लिहून पाठवित आहें, त्यांस येत्या अंकीं अवश्य स्थल मिळावें.

रवि ता. २८ मे रोजीं आर्द्राप्रवेश करितो. मंगळ ता. २३ मे पासून कर्कवृत्तानजवळ प्रवेश करितो. ह्मणून ता. २३ ते ता. २८ मे या दरम्यान वर्षाकाळ सुरू होईल.

वर्षाकालारंभीं मंगळ कर्क राशींत नीच आहे ह्मणून आरंभीं अपघात, तुफानी वारे, विद्युत्भीति होईल.

१ जून जुलई मध्यें बुध शुक्र हे दोन्ही शुभ ग्रह वक्री आहेत. जून मध्यें र. बु. शु. एका राशीवर आहेत.

२ ता. ५ जुलई रोजीं बु. शु. यांमध्यें रवि आहे.

४ जुलई मध्यें शुक्राचे पुढें बु. मं. गु. हे ग्रह भ्रमण करीत आहेत. मंगळ व गुरु हे सप्तंबरपर्यंत तसेच शुक्रापुढें भ्रमण करीत आहेत.

६ ता० १९ जुलई रोजीं बु. शु. युति योग आहे.

६ ता. २३ जुलई पासून ता. २० आगष्ट पर्यंत रवीच्या मागें बुध शुक्र आहेत.

७ ता० २१ आगष्ट पासून पावसाळ्याचे अखेरपर्यंत बु. शु. यांमध्यें रवि भ्रमण करीत आहे.

८ शनि, शुक्राबरोबर जुलई २३ पासून वक्री आहे.

९ ता. ७ आगष्ट पासून शुक्राच्या पुढें बुध भ्रमण करीत आहे.

१० ता. २३ आगष्ट पासून रवि मंगळाच्या पुढें गमन करितो.

११ ता. २४ आगष्ट रोजीं गुरु, चंद्र व मंगळ एका राशीवर आहेत.

१२ ता. १२ सपटंबरपासून गुरु कन्येचा होतो.

१३ ता. ३० सपटंबर रोजीं रविशनिप्रतियोग आहे.

१४ ता. १७।१८ सपटंबर रोजीं गु. चं. र. एका राशीवर आहेत.

१५ ता. १८ अक्टंबर रोजीं शनिमंगळ प्रतियोग आहे.

वरील १५ योगांत नं. ५।९।१०।११।१२ हे योग शुभ झालें असून बाकी सर्व योग अशुभ झाले आहेत.

जून आरंभीं व गुरु कन्येचा झाल्यावर पाऊस बरा पडेल. इतर कालीं तो वेळेवर पडणार नाहीं. पडेल तर नुकसान करील असें अनुमान होतें. बहुतकरून पडणारच नाहीं. यंदाच्या मारवाडी पंचांगांत पर्जन्याचें भविष्य झालें आहे तें असें—'सर्व आषाढ महिन्यांत वादळ राहील. व श्रावण माहिना कोरडा जाईल.' हें वचन वरील योगांस जुळत आहे. ता. २३मे ते ता. ८जुलईपर्यंत मंगळ कर्क राशीवर आहे तोंपर्यंतच पाऊस पडून जाईल. व पुढें सपटंबर १२पर्यंत टंचाई पडेल.

मधील दिवस पर्जन्यकाळाचे असल्यामुळें पाऊस न पडल्यास दुष्काळाचें स्वरूप कायम राहील असें सिद्ध होतें. वरील योगांत नं. ३चा योग फार घातुक झाला आहे जुलई महिन्यांत शुक्रास्त व आगष्टमध्यें गुरूचा अस्त हेही योग बरोबर झाले नाहींत.

तेजीमंदीचे योग पुढें चालू

१ कोणत्याही पौर्णिमेस भूकंप, उल्कात, वज्रघात, केतूचा उदय झाल्यास सर्व वस्तु महाग होतात.

२ पौष, माघ, फाल्गुन, चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, श्रावण, आश्विन महिन्यांत संक्रांतीस पाऊस पडणें चांगलें.

३ आषाढ, भाद्रपद ह्या महिन्यांत संक्रांतीस पाऊस पडणें वाईट

४ आषाढ शु. २।९ स पाऊस पडला तर श्रावणांत विशेष पाऊस पडतो.

५ सदर महिन्यांत २-३-४-५ ह्या तिथीस पाऊस पडल्यास अतिवृष्टि होऊन दुर्भिक्ष होतें.

६ चैत्र, श्रावण महिन्यांत चित्रा, स्वास्ती, विशाखा ह्या नक्षत्रीं पाऊस पडला तर दागदागिने विकून धान्याचा संग्रह करावा.

७ माघ व ज्येष्ठाची आमावास्या रविवारीं आली तर पृथ्वीवर भय उत्पन्न होतें.

८ ग्रहण झाल्यावर पाउस पडला तर ग्रहणाचे दोष जातात.

९ सिंह संक्रांत ज्या दिवशीं होईल त्या दिवशीं पाऊस पडणें वाईट.

१० पौष महिन्याची अमावास्या पापवारीं झाली तर पुढील वर्ष नाशकर समजावें.

११ कर्क व मकर संक्रांती पापवारीं होऊं नयेत. दुर्भिक्ष करितात.

१२ दोन चैत्र किंवा दोन आषाढ येणें चांगलें. स्वस्ताई व सुख होतें.

१३ वैशाख व० १ स शुभवार असेल तर वर्षा पुष्कळ होतो.

१४ कार्त्तिकांत मेघ येणें किंवा गर्जना होणें महागाईचें चिन्ह जाणावें.

१५ माघ शु० १ बुधवारीं आली तर अन्न महाग होईल. व पुढील वर्षी भय उत्पन्न होईल.

१६ पौष शु० १३ पापवारीं आली तर पाऊस पडणार नाहीं. झणून गहू वगैरे धान्याचा संग्रह करावा.

आपला

ग. दा. ग्रंथे

[३]

सा. न. वि. वि.– सिद्धारिचक्रासंबंधीं माहिती मागाहून पाठविणार आहें. प्रसिद्ध पुरुषांच्या ४ कुंडल्या पाठविल्या आहेत. त्या योग्य वाटल्यास येत्या अंकीं स्थल मिळावें.

श्री. माधवराव पेशवे. श्री. बापू साहेबांचे नातू



सौ. तारा राजा शिंदे सरकारची कन्या



कै. दिवाण दिनकरराव



कै. कृष्णराव जठार-शिंदे सरकारकडील सरदार

आपला

नथूराव गोखले मास्तर

पत्रव्यवहार.

[१]

श्रीयुत विद्वद्वर्य कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

साष्टांग नमस्कार विनंति विशेष.

आपण आपल्या दाशाहिकांत अलीकडे ३।४ वर्षे पर्जन्याबद्दल भविष्य करीत असतां. त्या प्रमाणें या सालींही आपण आपले व रा० ग्रंथे यांचे विचार प्रसिद्ध केले आहेत. त्यांतच आणखी माझे अल्पशा विचारांची भर पाडावी या हेतूनें आपल्याकडे खालील ओळी लिहून पाठवीत आहें. तरी स्थळ द्याल अशी आशा आहे.

अलीकडे चार वर्षे ग्रहांच्या गतीवरून पावसाकडे नजर देत असतां खालील नियमाप्रमाणें गोष्टी घडतात असें माझ्या अनुभवास आलें आहे.

मी राजापूर जिल्हा रत्नागिरी येथील राहणारा आहें. माझे नियम तेथें अनुभवास येतील. त्या ठिकाणच्या उत्तरेस अगर दक्षिणेस कोणत्याही ठिकाणीं दर १ अंश ग्रहांच्या जाण्यास ९० मैल उशिरां किंवा अगोदर अनुभव येईल.

१ सायन मिथुन राशीच्या २२ ते२४ अंशांपर्यंत ग्रह आला ह्मणजे त्याचा पावसावर शुभ परिणाम होतो व तूळ राशीच्या १९ अंशांवर ग्रह गेला ह्मणजे पावसावर अशुभ परिणाम होतो.

२ वरील राशींत जेव्हां जेव्हां चंद्राशिवाय कोणत्याही ग्रहाचा योग अगर प्रतियोग होईल तेव्हां तेव्हां ग्रहांच्या महत्वाच्या मानानें पावसावर शुभ परिणाम होतो. नेपचून, हर्शल, शनि, बुध, शुक्र,

मंगळ, गुरु, व रवि यांचा उत्तरोत्तर जास्त परिणाम होतो. नेपचून, हर्शल, व शनि यांचें महत्व जरी बुध, शुक्र मंगळ या तीन ग्रहांपेक्षां जास्त आहे तरी पण पावसावर परिणाम यांचाच [बुध, शुक्र, मंगळ] जास्त होतो. मग ते दूर आहेत ह्मणून असा कमी परिणाम होत असावा असें वाटतें. मंगळाचा पावसावर फारच उत्तम परिणाम होतो. याचें कारण रवीशीं त्याचें साधर्म्य होय. ज्या ज्या वर्षी मंगळानें तूळ राशींत लवकर प्रवेश केला त्या त्या वर्षी अखेरीस पाऊस गेल्यामुळें शेतें सुकलीं अशी ओरड आहे व ज्या वर्षी पर्जन्य काळांत तो उत्तर गोलार्धांत नाहीं त्या वर्षी पावसानें दगाच दिलेला आहे.

३ प्रतियोगापेक्षां योगाचा पाऊस जास्त लागतो, योग अगर प्रतियोग होण्याच्यापूर्वी ग्रहाच्या महत्वाच्या मानानें २ दिवसांपासून व नंतर ३ दिवसपर्यंत पर्जन्य लागतो.

४ चंद्र जर रवि, मंगळ, गुरु किंवा शुक्र यांच्याशीं योग अगर प्रतियोग करील तर त्याचा उत्तरोत्तर कमी प्रमाणानें परिणाम होतो.

५ इतर दोन मोठाल्या ग्रहांचा जेव्हां योग प्रतियोग होतो त्याच सुमारास जर चंद्राचा त्यांच्याशीं अगर इतर कोणाशींही योग अगर प्रतियोग होईल तर मात्र त्याचा चांगलाच परिणाम अनुभवास येईल.

६ उत्तर गोलार्धांत [मेष ते तूळपर्यंत] बरेच ग्रह असतील व त्याच वेळेला दोन मोठाल्या गोलांचा योग अगर प्रतियोग होईल तर वातावरणांत फेरफार होऊन पाऊस लागतोच. मात्र हा पाऊस अनियमीत असतो.

आतां वरील नियमांवरून यंदा पाऊस कसा काय लागेल याचा

विचार करूं. अक्टोबर पर्यंत सर्व ग्रह तूळ राशीच्या अलीकडे आहेत यामुळें तों पर्यंत पाऊस जाण्याची बिलकूल भीति नको.

पर्जन्या बद्दल एक श्लोक प्रसिद्ध आहे तो असा.

बुधशुक्रसमीपस्थौ कुर्वतां समजलांभहीम् ॥
तयो रंतर्गतो भानुःसमुद्रमपि शोषयेत् ॥ १ ॥

रा. रा. ग्रंथे यांणीं असाच योग असल्यामुळें यंदा पाऊस पडणार नाहीं असें लिहिलें तें याच श्लोकाचे अधारें लिहिलें असावें. परंतु या श्लोकासंबंधी माझा अनुभव देत आहें.

पहिल्यानें बुध मध्यें रवि पुढें शुक्र असे असतील तर रविमध्ययोग होतो व त्यावेळीं श्लोकाचा अनुभवही येतो. ते एका राशींत अगर कसेही असोत. ह्या वर्षीचा योग अगोदर शुक्र मध्यें रवि व पुढें बुध असा आहे. याला रविमध्ययोग ह्मणतां येईल. परंतु वरील श्लोकाचा अनुभव मात्र येणार नाहीं. वरील श्लोक जसा आहे तशीच स्थिति असली पाहिजे असें वाटतें. यंदाच्या योगाप्रमाणें योग आला असतां पाऊस जात तर नाहींतच परंतु उत्तम लागतो याबद्दल माझ्या अनुभवाची गोष्ट घडलेली देत आहें.

सुमारें ५।६ वर्षें जहलीं असतील. मृगनक्षत्राचे १०।१२ दिवस पर्जन्य पडला नाहीं. लोक हवालदील होऊन विचार करीत बसले आहेत इतक्यांत एक जोशीबुवा आले. तेव्हां सहजच प्रश्न झाला कीं जोशीबुवा पाऊस केव्हां लागणार ? जोशीबुवांनीं लगेच वरील श्लोक ह्मणून उत्तर दिलें कीं आणखी १॥ महिना पाऊस लागणार नाहीं कारण रविमध्ययोग आहे. तेव्हांच मंडळींनीं त्यांना सांगितलें कीं भविष्य चुकणार तुमचा रविमध्य असो किंवा कांहीं असो, कोंकणांत इतके दिवस पाऊस कधींच

लागावयाचा राहिला नाहीं. व जर लागणार नाहीं तर मग आजच कलंकी अवतार झाला. ह्या वेळीं यंदाच्या योगाप्रमाणें योग आलेला होता व तेव्हां अशी मजा झाली कीं, जोशीबुवा उठून मैल अर्ध मैल गेले असतील नसतील तोंच पाऊस खूप लागूं लागला. नंतर त्या जोशीबुवांचें नांव रविमध्य पडलें तें अद्याप चालत आहे! असो. त्यानंतर आज तसा योग आला आहे तर आतां आपल्याला काय तो अनुभव येईलच. आपला अनुभव माझ्यापेक्षां किती तरी पट जास्त आहे. आपणही भविष्य केलेलें आहेच.

आपल्याप्रमाणें माझेंही असेंच मत आहे कीं या वर्षी अमुक एक ठिकाणीं पाऊस पडला नाहीं अशी ओरड ऐकूं येणार नाहीं. कोकणांत अतिशय पाऊस पडेल व तो शेवटपर्यंत पडेल. तरी सर्वांनीं महान धान्यें पेरणेची तजवीज ठेवावी. उन्हाळी उत्पन्नांत पावट्यापेक्षां उडीद, कुळीद यांचें उत्पन्न चांगलें येईल वादळें होतील विजा पडतील. मे अखेरी नंतर समुद्रांतून प्रत्रास करणें धोक्याचें आहे. घाट उत्तम पिकेल व पर्जन्य काळांतील धान्यापेक्षां उन्हाळी धान्यें चांगलीं येतील [रवीची] कोकणांत खाडी कांठीं जेथें मोठे मोठे पूर येतात अशा ठिकाणीं पुढें भातावर कीड पडते तर अशा ठिकाणीं महान सुवासिक व ताठर अशा भातांच्या जातींची लागवड करावी म्हणजे नुकसानी येणार नाहीं. तात्पर्य यंदा हिंदुस्थान देशाला अवर्षण नाहीं मात्र ओळें आहे किंवा काय समजत नाहीं तरीपण ग्रहमान पहतां यंदा पाऊस आबादी आबाद लागून हिंदुस्थानच्या गरीब प्रजेस पोटभर खाऊ घालील असें वाटत आहे. परमेश्वर हें वचन सत्य करो. असें मागणें मागून पत्र पुरें करितो. लोभ वृद्धिंगत होत जावा हे विनंति.

रघुनाथ विठ्ठल आंबेकर.

पुरवणी

ह्या वर्षी हर्शल शिवाय सर्व ग्रह उत्तर गोलार्धांत भ्रमण करीत आहेत शनि विशेष अनुकूल होण्या इतका जरी [कर्क वृत्ताजवळ] नाहीं तरी प्रतिकूल नाहीं. हर्शल मकर राशींत असल्याकारणानें कर्क राशींतून ग्रह जातांना त्याच्याशीं प्रतियोग करतील व त्याचा परिणाम चांगला होणार. मंगळ मिथुन राशींत २३ अंश १३ मेला होता. शुक्र, गुरु, नेपच्यून पुढेंच आहेत. बुध तारीख २६ मेला होतो फक्त रवि मात्र नाहीं. तो तारीख १५ जून रोजीं होतो.

तारीख २२ मे रोजीं रवि सा० मिथुन राशींत प्रवेश करितो. इतर ग्रह कर्क वृत्ताच्या आसपासच आहेत. यास्तव सुमारें १।२ दिवस अलीकडे पलीकडे कोलंबोला सुरवात व्हावी, असें अनुमान आहे व ती पक्की बरसात सुरू व्हावी. त्या दिवशीं शु० ने० योग आहे.

आपल्याइकडे ता० ७ जूनच्या सुमारें पर्जन्य पडेल. कारण त्या दिवशीं बुधमंगळ योग आहे. व पुढें तारीख ११ ला बु० ने० व ता० १२ ला मं० ने० योग आहे. व तारीख १४ ला बुध हर्शल व ता० १६ला मंगळ हर्शल प्रतियोग आहे. हे दोन मोठमोठ्या गोलांचे योग प्रतियोग आहेत. तारीख १९ ला रवि मिथुन राशींत २३ अंश होतो तेव्हां या तारखेपासून पर्जन्याची पक्की बरसात सुरू झालीच पाहिजे.

रवि तूळ राशींत १९ अंश तारीख ९ अक्टोबर रोजीं जातो. बुधाशिवाय सर्व ग्रह त्याच्या आंतच आहेत. मंगळ ता० १० रोजीं तूळ राशींत प्रवेश करितो तेव्हां या सुमारें बरसात कमी होईल. मंगळ तूळ राशींत १३ अंश ३१ अकटंबरला होतो. व ४ नवंबर रोजीं शुक्र प्रवेश करितो तेव्हां या सुमारें बरसात खलास होईल.

आतां तारीख ७ जून पासून ता० ३१ अकटंबर पर्यंत मोठ्या ग्रहांचे योग प्रतियोग केव्हां आहेत तें पाहूं + ही खूण योगाची व – ही प्रतियोगाची आहे.

ता.	यो०	प्र० यो०	ता.	यो०	प्र० यो०
जून			जुलै		
७		बु+मं	१		बु+ने–
११		बु+ने–	४		शु–ह०
१२		मं.+ने.	,,		शु+ने.
१४		बु–ह०	५		र+बु–
१६		मं–ह०	६		र+शु
१८		बु+मं०	७		र+ने.
२३		शु+मं०	,,		र–ह.
३०		बु–ह०	११		ह–ने०
जुलै			आगष्ट		
१७		बु+शु.	२१		बु+मं.
२७		बु–ह.	२२		र+मं.
२८		बु+ने.	२३		शु+ने.
आगष्ट			सपटंबर		
१४		मं+गु.	१३		बु–श
१८		र+गु	३०		र–श.
			अकटंबर		
१९		शु–ह.	१४		शु+गु.
,,		बु+गु.	१८		मं–श.
२०		र+बु.	२८		र+बु.

योगप्रतियोगाच्या पूर्वी व नंतर पाऊस लागेल तो ग्रहांच्या महत्त्वाच्या मानानें लागेल हें पूर्वी सांगितलें आहेच.

वरील योग प्रतियोग पाहतां जून, जुलै व आगष्ट या महिन्यांत ते फार आहेत. सपटंबरांत २ व अकटंबरमध्यें तीनच आहेत. यावरून पहिल्या तीन महिन्यांत पाऊस फार पडेल व पुढच्या दोन महिन्यांत कमी लागेल. जुलै तारीख ३० ते आगष्ट १२ पर्यंत व आगष्ट २९ ते सपटंबर १० व सपटंबर १९ ते सप० २८ व अकटंबर ३ ते अकटंबर १० पर्यंत पाऊस किंचित् मंदावून उघाडी पडेल आणि जुलै तारीख ४ ते आठ आणि आगष्ट तारीख १८ ते २३ पर्यंत अतिशय मोठे असे पूर येतील.

[२]

क्र० न० वि० वि०

मागील सालीं पर्जन्याचे कांहीं नियम अंक १६ १-८-०७ मध्यें दिले होते. त्या संबंधीं वाचकांकडून कांहींच खुलासा कळला नाहीं. कारितां यंदाही त्याच नियमा प्रमाणें पर्जन्यासंबंधीं विवेचन करीत आहें, त्याचा अनुभव वाचकांपैकीं कोणी कळवितील. त्याचा अनुभव गेल्यासालीं बराच आला होता. जल राशींपैकीं (कर्क, मीन, वृश्चिक मकर, कन्या, वृषभ,) कर्क राशींत जून मध्यें मंगळ आहे व बुध शुक्र हे सौम्य ग्रह आहेत.

शनि मेष या अग्नि राशींत आहे.

गुरु सिंह या अग्निराशींत आहे. यावरून या वर्षी पर्जन्य पुष्कळ पडण्याची मुळींच आशा नाहीं परंतु साधारण मध्यम प्रमाणांत पडण्याचा संभव आहे.

पर्जन्यास अनुकूल दिवस. जून:-

ता. १ [चं+बु] ता. २ [चं+शु] ता. ४ [चं+गु] ता. ११ [बु+ने] ता. १६ [चं–शु, चं–बु, चं–ने] ता. १८ [चं–गु] ता. २९ [चं+ने चं+बु, चं+शु,]

जुलई—ता. २ चं+गु. ता. ४ (शु+ने) ता. १३ [चं–शु, चं–ने चं–बु] ता. १५ [चं–गु, बु+शु] ता. २६ [चं+शु, चं+बु, चं+ने]

आगष्ट— ९ चं–शु, चं–ने ता. ११ चं–बु ता. १९ बु+गु ता. २३ चं+शु, चं+ने, शु+ने, ता. २६ चं+गु.

सपटेंबर— ता. ६ चं–ने, ता. ७ चं–शु, चं–गु, ता. ११ चं–बु, ता. १९ चं+ने, ता. २१ चं+शु, ता. २३ चं+गु ता२७ चं+बु.

या शिवाय चंद्र जल राशींत असेल ते दिवस [साधारण मीन वृश्चिक राशींत चंद्र असतां] पर्जन्यास अनुकूल आहेत.

एकंदर विचार करितां मुख्य ग्रह गुरु व शनी हे या वर्षी पर्जन्यास अनुकूल नाहींत. शिवाय गुरूजवळ मंगळ व रवि अनुक्रमें शेवटपर्यंत आहेत. फक्त शुक्र या वर्षी बराच अनुकूल आहे. जवळ नेपच्यून असल्यामुळें व मंगळही असल्यामुळें आरंभी अपघाताची धास्ती आहे व पर्जन्याचें मानही पुष्कळच कमी असण्याचा संभव आहे असें अनुमान होतें.

परमेश्वर कृपेनें माझें अनुमान खरें न ठरो अशी इच्छा आहे.

दामोदर विनायक कोटीभास्कर.

गिरगांव–मुंबई.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूतिः'

पुस्तक ८वें.] ज्येष्ठ शु० १२, गुरुवार [अंक १५ वा

पाऊस

अलीकडे पर्जन्यचक्रांत कांहीं तरी स्थित्यंतर झालें असावें असें वाटतें. २५।३० वर्षांच्या पूर्वी कोंकणांत रोहिणींचे पेरे होत असत! रोहिणी निघाल्या कीं, पाऊस केव्हां पडेल याचा नियम नसल्यामुळें लोक घरें शाकारीत, शेतकरी जमीन भाजून नांगरून तयार ठेवीत व कित्येक धूळवाफेही तयार करीत, लांकूडफाटयांची सांठवा साठव करीत व बरसातीच्या पूर्वी ज्या ज्या गोष्टींची व्यवस्था करावयाची त्यांची व्यवस्था करीत. मृग लागतांना विजांचा भयंकर कडकडाट होई, मोठमोठीं वादळें होत व धुम्माधार पाऊस लागे. ह्या गोष्टी

सांगोसांगीच्या नसून आह्मीं प्रत्यक्ष पाहिलेल्या आहेत. परंतु अलीकडे ही स्थिति अगदीं पालटून गेलेली दिसते! रोहिणींत तर पाऊस लागत नाहींच. पण मृग नक्षत्रही अर्धे कोरडें जातें! ता० १५।१६ जूनपर्यंत बरसात सुरू होतच नाहीं. असें कां होतें, याचें कारण कोणीं सांगेल काय? ज्योतिः शास्त्राच्या नियमाप्रमाणें सायन आर्द्रा हें पावसाचें नक्षत्र आहे. हें नक्षत्र मेच्या २८ तारखेच्या सुमारास निघतें. पंचांगांत " विंध्याद्रियाम्यां दिशि भागदेशे चार्द्राप्रवेशस्य फलं प्रदिष्टं " असें झटलेलें असतें. अर्थात् या नक्षत्राला विंध्याद्रीच्या दक्षिण भागीं पावसाचीं चिन्हें होऊं लागावयाचीं. पण अलीकडे कोलंबोला मात्र या तारखेच्या सुमारास बरसात सुरू होते. या ठिकाणीं सुरवात झाल्यावर १९ ते २२ दिवसांनीं मुंबईच्या आसपास किंवा सर्वत्र पावसाळा सुरू होतो. यंदा ता. २८ मेलाच कोलंबोला बरसात सुरू झालीं. यावरूनही यंदा ता १५।१६ च्या सुमारास सर्वत्र पाऊस पडूं लागेल असें ठरतें. तात्पर्य, या पुढें ' जूनच्या पहिल्या आठवड्यांत ' बरसात सुरू होईल असें भविष्य करणें चुकीचें होईल.

आमच्या मतें सायन पुनर्वसु हें मुंबईच्या बाजूचें पर्जन्यारंभाचें नक्षत्र आहे. हें नक्षत्र ता. ११ जूनच्या सुमारास निघतें. ह्मणून या पुढें आर्द्रा प्रवेशफलाला फांटा देऊन त्याच्या जागीं पुनर्वसुप्रवेशफल पाहिलें पाहिजे. आर्द्राप्रवेशफल फक्त कोलंबोच्या आसपासच पहावें. या वर्षी सायन पुनर्वसु हें नक्षत्र ता ११ जून गुरूवार या दिवशीं दुपारीं १ वाजून ३९ मिनिटांनीं निघत असून त्याचा पाऊस आरंभीं ८।९ दिवस सामान्य पडेल असें जें १३ व्या अंकांत लिहिलें आहे, तें खरें झाल्याशिवाय राहणार नाहीं.

पावसासाठीं जी ग्रहस्थिति ध्यावयाची ती भूमध्यस्थ न घेतां सूर्यमध्यस्थ घ्यावी असें वाटतें. " बुधशुक्रसमीपस्थौ कुर्वतां सजलां महीम् ॥ तयोरंतर्गतो भानुः समुद्रमपि शोषयेत् ॥ " या श्लोकावरून वरील कल्पना सुचते. सूर्य हा गोल मध्यें असून त्याच्या एका अंगास शुक्र व दुसऱ्या अंगास त्या शुक्राच्या समोर बुध असा योग असल्यास पाऊस पडत नाहीं, हें ह्मणणें संभवनीय दिसतें. एकाच राशीवर हे तीन ग्रह असून आरंभीं शुक्र, त्याच्या पुढें रवि व शेवटीं बुध अथवा आरंभीं बुध, पुढें रवि व शेवटीं शुक्र असा योग असतां पाऊस पडूं नये हें ह्मणणें तात्विक दृष्टीनें चमत्कारिक दिसतें. हवेंतील उष्णतेंत फेरफार होण्यास रवीच्या कांहीं तरी आड आलेंच पाहिजे. प्रचलिच कल्पनेनें कोणी कोणाच्या आड होऊं शकत नाहीं. यासाठीं रविमध्यस्थ ग्रह स्थितीवरूनच पावसाचें अनुमान केलें पाहिजे.

पावसाचें चक्र हर्शलच्या दक्षिण गोलार्धीतील भ्रमणावर जर बदललेलें असेल तर आणखी २४ वर्षे पाऊस वेळेवर पडत नाहीं! सांप्रत शनि विषुववृत्तावर आला आहे. या मागें सुमारें १२॥ वर्षे तो दक्षिण गोलार्धीत होता. शनि व हर्शल हे दोन्ही गोल दक्षिण गोलार्धीत गेल्यामुळें गेल्या १२॥ वर्षांत सारखे दुष्काळ पडत आले. आतां फक्त हर्शल दक्षिण गोलार्धीत आहे, बाकी सर्व ग्रह उत्तर गोलार्धीतच आहेत, ह्मणून यापुढें पाऊस बरा पडूं लागेल असें मानण्यास हरकत नाहीं.

ता० ७ जूनला इकडे थोडकीशी वृष्टि झाली. व तेव्हां पासून दिवसास रोज अभ्रें येत आहेत व मधून मधून दक्षिणेकडून वाराही वाहत आहे. तथापि पावसाचीं चिन्हें असावीं तितकीं नाहींत, याव-

रून आणखी ८ दिवस तरी बरसात सुरू होत नाहीं असा अजमास होतो. ता० ९ जून पासून ता० २१ जूनपर्यंत चंद्र दक्षिण गोलार्धांत आहे. तोंपर्यंत बरसात चांगली सुरू होईलसें वाटत नाहीं. ता० ७ जून व ता० १८ जून या दोन दिवशीं बुधमंगळांची युति होती. ह्मणून १८ जूनपासूनच किंवा त्या सुमारापासून बरसात खात्रीनें सुरू होईल. बाकीच्या भविष्यांत फेरफार करण्याचें कारण नाहीं, तें कायम आहे.

भविष्य

[ज्ञा. प्र. अं. १२७ वरून]

(कानपूरचे पंडित रामनारायण योगशास्त्री यांनीं वर्तविलेलें)

(१) राजघराणें—

चालू वर्ष राजघराण्यास फार जड जाईल. ड्यूक ऑफ कॅनॉट यांची प्रकृति अत्यंत अस्वस्थ होईल. त्यांचा जीव घेण्याचाही एकदां प्रयत्न होईल. एडवर्ड बादशहाची प्रकृति सामान्यच राहील. जुलै ता. २५ स. १९०८ हा दिवस बादशहाच्या रयतेस फार काळजीचा जाईल. त्या दिवशीं त्यांची राजनिष्ठ प्रजा त्यांच्या कल्याणांकरितां ईश्वराजवळ अंतःकरणपूर्वक प्रार्थना करील. ता. २४ डिसेंबर सन १९०८ या दिवशींही असाच योग आहे. जुलै पासून पुढें सालअखेर होई तोंपर्यंत बादशहाच्या प्रजेस मोठें दुःख भोगावें लागेल.

(२) मि. ॲस्क्विथ यांचें प्रधानमंडळ—

मि. ॲस्क्विथ याचें प्रधानमंडळ अल्पकाळपर्यंत अधिकारावर राहील. डिसेंबर १९०८ पासून एप्रिल १९०९ च्या दरम्यान या प्रधानमंडळास केव्हां तरी राजीनामा द्यावा लागून युनियनिस्ट पक्षाच्या हातीं सत्ता येण्याचा संभव आहे. नवीन प्रधानमंडळांत लॉर्ड कर्झन यांना महत्वाची जागा मिळेल; परंतु भवितव्यता त्यांना प्रतिकूल दिसते. लॉर्ड मोर्ले यांची प्रकृति दिवसेंदिवस अशक्त होत जाऊन आपल्या जागेच्या कामाचें ओझें त्यांस झेंपणार नाहीं, यामुळें त्यांना आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागेल. १९०९ च्या फेब्रुवारीनंतर ते आपल्या जागेवर राहिले तर तें एक अजब आश्चर्यच ह्मणावयाचें.

*

(३) लॉर्ड मिंटो व सर अँड्यू फ्रेझर—

चालू वर्ष लॉर्ड मिंटो यांस बरेंच दगदगीचें व त्रासाचें जाईल. त्यांचा व लॉर्ड किचनेर यांचा मतभेद होऊन लॉर्ड किचनेर यांचीच सरशी होईल व लॉर्ड मिंटो हे आपल्या जागेचा राजीनामा देतील. चालू सालांत लॉर्ड मिंटो यांच्यावर एक जिव्हारचें दुखणें येऊन त्यांत त्यांचा कदाचित् अंतही होईल. डिसेंबर ता. २२ स. १९०८ पासून ता. १७ फेब्रुवारी स. १९०९ चे दरम्यान सर अँड्यू फ्रेजर यांस मोठ्या आजारामुळें आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागेल.

[४] मि. दादाभाई नौरोजी व डॉ. घोष—

हिंदुस्थानचे परमपूज्य देशभक्त दादाभाई नौरोजी हे आज बरेच दिवस वार्धक्याशीं झगडत आहेत; परंतु १९०८ आक्टोबरपासून डिसेंबराच्या दरम्यान ते विराम पावतील. ता. ११ मार्च १९०९ पर्यंत डॉ. राश बिहारी घोष यांच्या प्रकृतीबद्दल बरीच काळजी उत्पन्न होईल.

[५] जगाची शांतता—

जगाच्या शांततेची भावी स्थिति कांहीं नीट दिसत नाहीं. लढाया किंवा लढाया होण्याच्या बदंता याच एकसारख्या कानावर येतील. सन १९०८ पासून सन १९१४ पर्यंत जगांत क्वचित् ठिकाणीं शांतता राहील. युरोपखंडांत युद्ध उपस्थित होऊन त्यांत जर्मनीचा समावेश होईल. हिंदुस्थान, अफगाणिस्थान, इराण व तुर्कस्थान हेही या युद्धाचे प्रमुख घटक होतील. इराण व तुर्कस्थान यांचेवर अनर्थ गुदरण्याचा बराच संभव आहे.

धरणीकंप–

मॉस्को, तुर्कस्थान, बंगाल, पंजाब व अंशतः संयुक्तप्रांत यांत धरणीकंपाचे धक्के बसतील.

[६] पीकपाणी–

हिंदुस्थानांतील बहुतेक भागांत वेळेवर पर्जन्य पडेल. परंतु १९१० पर्यंत हिंदुस्थानांत कोठें ना कोठें तरी कमी अधिक मानानें दुष्काळाचें प्राबल्य राहीलच.

[८] प्लेग–

या वर्षी प्लग इतका जालीम होणार नाहीं. तीन वर्षांत हिंदुस्थानांतून तो आपलें कायमचें बिऱ्हाड हालवील. त्याचे जागीं कदाचित् निद्रारोगाची स्थापना होण्याचा संभव दिसतो.

(९) एतद्देशीय संस्थानिक–

यावर्षी फारच थोड्या एतद्देशीय संस्थानिकांच्या मनाची स्वस्थता राहील. बडोदा, ग्वाल्हेर, बिकानेर व भौरमंज [ओरिसा] या संस्थानांवर हिंदुस्थानसरकारची इतराजी होऊन ती १९०९ मार्चपर्यंत तशीच राहण्याचा संभव आहे.

[१०] सुधारणा व दडपशाही–

चालू साल संपण्यापूर्वी राज्यव्यवस्थेंत कांहीं नवीन सुधारणा होऊन लोकांना कांहीं सवलती मिळतील, चार नवीन कायदे केले जातील व दडपशाहीचें धोरण स्वीकारलें जाईल.

[११] बाँबप्रकरणाचे खटले–

बाँबच्या अत्याचारासंबंधानें व क्रान्तिकारक कटासंबंधानें चालू असलेल्या खटल्यांत एकास फांशीची शिक्षा होईल, दोन इसमांना खात्रीनें जन्मठेपेची शिक्षा होईल. आणखी पांचजणांनाही

कदाचित् जन्मठेप होण्याचा संभव आहे. सहा निर्दोषी ठरून अजीबात सुटतील. बाकीच्या आरोपींना निरनिराळ्या मुदतीपर्यंत कैदेच्या शिक्षा मिळतील. बाबू अरविन्द घोष हे या खटल्यांतून सपशेल सुटतील.

[१२] रा. टिळक, बिपिनबाबू व रा. खापर्डे—

रा. बाळ गंगाधर टिळक, बाबू बिपिन चंद्र पाल यांनीं जपून वागावें. १९०८ जुलैपासून आगष्टपर्यंत व त्यापुढेंही त्यांचे ग्रह फार वाईट आहेत. त्यांच्यावर केव्हां वाईट प्रसंग येईल याचा भरंवसा नाहीं. रा. खापर्डे यांनींही हा इशारा घ्यावा.

१३ स्वदेशी चळवळ—

विद्वास न जुमानतां स्वदेशी चळवळ एकसारखी यशस्वी होत जाईल. सन १९११ च्या सुमारास या चळवळीस विलक्षण स्वरूप येऊन सन १९२९ मध्यें त्या चळवळीचें एका महत्वाच्या बाबींत पर्यवसान होईल.

१४ बंगालची फाळणी—

ता० ११ मार्च स. १९०९ च्या सुमारास बंगालची फाळणी रद्द झाली नाहीं तरी त्यासंबंधांत बरीच दुरुस्ती होईल.

१५ लजपतराय यांचे खटले—

लाला लजपतराय यांनीं (इंग्लिश वर्तमानपत्रावर) केलेल्या खटल्यांत बहुधा आपसांत तडजोड होईल. त्यांचे प्रतिपक्षी तशी तडजोड करण्यास तयार न होतील तर त्यांत त्यांचीच फटफजिती होईल.

[१६] राष्ट्रीय सभेंतील दोन पक्ष—

राष्ट्रीय सभेंत आज जे दोन पक्ष आहेत त्यांमध्यें अखेर समेट होईल पुढचीं राष्ट्रीय सभा संयुक्तप्रांतात कोठेंतरी—बहुधा लखनौ येथेंच भरेल. ज्याचें नांव जी नें आरंभ होणारें आहे असा व सौजन्य व थोरपणा याचा केवळ पुतळाच असा एक सुप्रसिद्ध पुढारी राष्ट्रीयसभेचा अध्यक्ष होईल, तो आपल्या शहाणपणानें व अपूर्व शिताफीनें राष्ट्रीयसभेचें जहाज तुफानांतून पैलतीरावर नेऊन पोहोंचवील.

[१७] संयुक्त प्रांताचें हायकोर्ट—

संयुक्तप्रांताचें हायकोर्ट लखनौ येथें नेण्यासंबंधाचा प्रश्न पुनः उपस्थित होईल; व स. १९०९ च्या अखेरीस या प्रश्नाचा अखेर निकाल लागेल. ज्याच्या नांवाचें पहिलें अक्षर एन् असें आहे, व ज्याचें नांव द्वादशाक्षरी आहे, अशा एका हिंदी गृहस्थाची हायकोर्ट जज्जाच्या जागीं योजना होईल.

[१८] मोठा दरबार—

१९०९ साल्च्या प्रारंभी [हिंदुस्थानच्या] राजधानींत एक मोठा व महत्वाचा भव्य दरबार भरेल. लखनौ व दिल्ली येथें या दरबारच्याच लहान लहान प्रती उठविल्या जातील.

पत्रव्यवहार.

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्त्ते यांस—

सा. न. वि. वि.—आपण आपले कुंडलीविज्ञान पुस्तकाचे पुस्तक १ अंक ७ यांत योगा मंछराम यानें दिलेलें चक्र छापलें आहे. त्याजवर रा. रा. खाडिलकर यांनीं कुंडलीविज्ञान पुस्तक ८ अंक ८ यांत त्याबद्दल थोडी माहिती दिली आहे. पण ती बरीच अपुरी आहे. हल्लीं मला एक जुना ग्रंथ सांपडला आहे. त्यांत ही माहिती उदाहरणासहित दिली आहे, ती आपले वाचकांस समजणेंकरितां पाठवित आहें.

चक्र १

चक्र २

अ क ह थ १	उ ड प ५	अ ख द ळ २	ऊ च फ ६
ओ उ ब १३	लु ज य ९	औ ढ श १४	लृ भ थ
इ घ न ४	ऋ ज भ ८	इ ग ध क्ष ३	ॠ छ व ७
अः त स १६	ऐ ठ ल १२	अं ण ष १५	ए ढ र ११

नवैक पंचमे सिद्धिः षट्दशयुग्मके साध्यः
त्रिसप्तैकादशे सुसिद्धिः वेदाष्टद्वादशे रिपुः
॥ इति प्रथमचक्रशोधन ॥
॥ अथ ऋणधनसाधनं ॥
नामाद्यक्षरमारभ्य यावन्मंत्रादिमाक्षरं ॥
त्रिधा कृत्वा स्वरेभिर्घातदन्ये द्विपरीतकं ॥

स्वरैः सप्तभिर्साधकनामाक्षरमारभ्य मंत्राद्याक्षर पर्यंतं हतौ च मातृकाऋभेण गणयित्वा सप्तभिर्हरेत् ॥

मंत्राद्याक्षरमारभ्य नामाद्याक्षरपर्यंतं गणयित्वा तमंकं सप्तगुणं कृत्वा त्रिभिर्भजेत् ॥ अधिको ऋणि न्यूनो धनि ॥ यद्वा ग्रंथांतरे ॥ साध्या नामाद्विगुणितं साधकेन समन्वितं ॥ अष्टभिश्चहरेच्छेष तदन्यद्विपरीतकं ॥

मंत्रस्य स्वरान्हलाश्च पृथक् कृत्वा द्विगुणान्कृत्वा साधकनामाक्षरादि मंत्राक्षरैः संयोज्याष्टभिर्भक्ता भजेत् ॥

अथ साधकराशी; ॥ तयोरधिकांको ऋणी इष्टः ॥ न्यूनांको धनी मंत्रः ॥ इति ऋणधनशोधनं ॥ अथचक्रं लिख्यते ॥

इंद्रर्क्षनेत्ररविपंचदशर्तुवेद—
वन्ह्यब्धि षट्च नवभि र्गुणितांश्च साध्यान् ॥
दिग्भूगिरिश्रुतिगजाग्निमुनीषु वेद—
षड्वान्हभिस्तु गुणितान्नय साधकार्णान् ॥
नाम्नोझ्झलादिकष्भात् गजभक्तशेषं—
ज्ञात्वोभयोरधिकशेषयुतं ऋणंस्यात् ॥

साध्यमंत्राक्षराणि स्वरव्यंजनरूपेण पृथक्कृत्वा इंद्राभिरंकै र्यथासंख्य पंक्ति क्रमेण साधकं गुणयेत् ॥ साधकाक्षराणि दिगादिभिर्गुणयेत् ॥ एकीकृत्याष्टभिर्भजेत् ॥ अधिको ऋणी न्यूनो धनी ॥

स्पष्टीकरणार्थं उदाहरणं — साध्यो रामः अद्याक्षरं रकारः अकारः स्वरः ॥ व्यंजन पंचम पक्तौ पतितमतो पंचदशभिर्गुणितं जातं ७५ अकारः प्रथमः इंद्रैर्गुणितः जातं १४ द्वितीयाक्षरेपिमकार अकारौ मकारस्तृतीयः द्वाभ्यां गुणितः पंक्त्या स्थापिताकाः ७५, ६. १४, ६, एषामैक्यं अष्टभिर्भजेत् शेषं ५ एवं साधको देवदत्तः उक्तरीत्या स्वरव्यंजनयोः पृथक्करणेन गुणिता जातांकाः

४९, १८, ४९, १०, ४९, ९०, ४०. ४०, १०, एषामैक्यं २७५ गजभक्तशे-षंन्यूनत्वाद्धनि देवदत्त; अधिक शेषत्वाद्दणि रामः ॥

अस्य चक्रं यथा प्रमाणं कोष्टतः सर्वं लिख्यते ॥ अथर्णधन संशुद्धि कथ्यते सिद्धि दायिनी ॥ सपातिर्यक् लिखेद्रेखा द्वादशै वोर्ध्वगा पुनः ॥ एवं कृते तु जायंते कोष्ठाः षट्षष्ठिसंमिता. ॥ आद्यपक्तौ लिखेदेकान् ते कथ्यते यथाक्रमम् ॥ मनुनक्षत्र ने शर्क तिथिषट् वेदवन्हयः ॥ सायका वसवोनन्दा कोष्टे पुत्रमतः स्थिताः ॥ द्वितीयपंक्तौ संख्या पंचेदीपोज्झिताः स्वराः तृतीयपंक्तौ काधर्णाष्टका-रांताशिवैर्मिताः ॥ ठादिफांताश्चतुर्थ्यांतु पंचम्यां बादिहातिमाः ॥ षष्ठ्यां पंक्तौ क्रमाल्लेखा अंकाः कथ्यं एव ते ॥ द्विचंद्रमुनिवेदाष्टगुणसप्तषुसागराः ॥ रसाश्च रामसंख्या ता एवमका उदीरिताः ॥ मंत्रवर्णान्पृथग्कुर्यात् स्वरव्यंजनरूपतः ॥ कोष्ठे यावति वर्णास्याद्गुणयेत्तावदकं ॥ कोष्ठे परिस्थितानांकेन सर्वं वर्णेष्वयं-विधिः ॥ दीर्घाक्षराणामंकास्तु ज्ञेया लब्धाक्षरा स्थिताः ॥ एकी कृत्वा लिखानं-कानष्टभिर्विभजेत्पुनः ॥ शेषस्तु मंत्रराशिस्थां नाम वर्णेष्वयं विधिः ॥ अधो पंक्तिस्थितै रंकै गुणनीयास्तु ते खिला. ॥ अधमर्णोधिको राशीन्यूनो राशी धनिस्मृतः ॥ मंत्रो यदा धमर्णास्यात्तदाग्राह्यो धनी नतु ॥ एव धनर्णं संप्रोक्तं अन्यथा प्रोच्यते पुनः ॥ इति ॥

देशदुर्गेपुरग्रामस्वामिभृत्येषु मंत्रिषु ॥ मंत्रमौषधशास्त्रेभ्यो अरिस्थानानि निर्णयः ॥ नैवकं पंचमं सिद्धिसाध्यषट्दशयुग्मकं ॥ त्रिसप्तमैकादशीमित्रवेदाष्ट-द्वादशारिपु. ॥ सिद्धि. साध्यंति कालेन साध्यस्तुजपहोमत. ॥ सुसिद्धिस्तत्क्षणा-देव अरिमूल निकृंतनम् ॥

येणें प्रमाणें माहिती पाठविली आहे. पोथी फार जुनी असून बहुतेक पानांचे तुकडे झाले आहेत, सबब पाठवितां आली नाहीं. पोथीवरील अक्षरें जशींचे तशींच लिहून पाठविलीं आहेत. यामुळें शुद्धाशुद्ध होण्याचा संभव आहे. कळावें.—

रामचंद्र शंकर शालिग्राम

ओव्हरसीयर इंदापूर

पाऊस

[रा. गणेश दत्त पाठक यांजकडून]

वर्षाके भविष्यमें आप प्रतिवर्ष प्रयत्न करते है. उस प्रयत्नसें बहुत कुछ सफलता भी आपको हुई है. तथापि उसमें कई बातोंकी न्यूनता है. वह जब पूर्ण होगी तो भविष्य बहुत सुंदर कियाजा सकेगा. इसी दृष्टीसे जो कुछ मेरेपास संग्रह है वह मै आपकेपास भेजताहूं. कृपाकरके इसे प्रकाशित कीजिये, और अनुभव करके देखिये कि ठीक होता है कि नहीं ? आजका संग्रह अंगरेजी ज्योतिषी झडकील के आधारपर भेजताहूं.

ऋतूके परिवर्तनमें वायुकी दिशानें परिवर्तन होताहै. और वायुका परिवर्तन वायुमंडलके दबावके परिवर्तनसे होताहै. यह परिवर्तन ग्रहों की परस्पर दृष्टिके परिवर्तन होनेसे होताहै. यह अनुभवसे मालूम पडेगा. उत्तरकी वायु और स्वच्छ आकाश गुरूके बलसे होते है. पूर्वकी वायु और जल शनीकेद्वारा, गुरूमंगलके द्वारा अना-वृष्टि, शुक्रशनीके द्वारा अतिवृष्टि होती है. जब सूर्य मंगल या गुरूकी दृष्टीमें रहता है तब वायूकी गरमी बढती है. और जब वह शनि या हर्शलकी दृष्टीनें रहता है तब गरमी कम हो जाती है. दृष्टि जब प्रबल होती है उससमय परिणाम भी पूरा होता है. क्षीण दृष्टि रहनेसे परिणामभी क्षीण. अन्य ग्रहों की परस्पर दृष्टीकी अपेक्षा सूर्यके साथ दृष्टियों का विशेष महत्व है. विषुववृत्तसें उत्त-रकी तरफ ग्रह रहनेसे आपने लोगोंके देशमें उसका फल होता है.

यह सब विचार करने के लिये कुछ नियम नीचे दिये जाते. है

सबसे पहिले ग्रहोंकी परस्पर दृष्टीकी एक सूची तयार करके तब उसका बिचार करना चाहिये.

१ यदि मंगल और गुरूके साथ सूर्यकी दृष्टीकी अधिकता हो, अथवा गुरु स्तब्ध हो या उससे और मंगलसे परस्पर दृष्टि हो तो वृष्टि नहीं होती. और उष्णता अधिक होती है.

२ यदि शनि, हर्शल, शुक्र और बुध व वक्रीके सहित सूर्यकी दृष्टीकी अधिकता हो तो उष्णता कम हो जायगी.

३ जब सूर्यसे बुधकी दृष्टि हो [योग अथवा क्रान्तिसाम्य] तो ऋतूमें एकदम परिवर्तन और झंझावात होते है ऐसेही समय यदि बुधसे शनि, हर्शल अथवा नेपच्यूनसे दृष्टि हो तो भयंकर तुफान हो गा. यदि बुधसे मंगल और गुरूसे दृष्टि हो तो उष्णता और अधिक करकावृष्टि होती है.

४ जब मंगल या गुरु विषुववृत्तमें या उत्तर क्रान्तिकी परम सीमामें रहते है. तो उष्णता बहुत होती है. और वायुभी कमी अधिक चलता है. जब शनि हर्शल या नेपच्यून इस स्थितीमें रहें तो तुफानी हवा चलती है. जब शुक्र इस स्थितीमें हो तो बहुत वृष्टि और किंचित् वायु रहते हैं.

५ जब थोडेही दिनके भीतर ग्रहों की परस्पर दृष्टि बहुतसी हो तो वायुमंडलमें सहसा अनेक परिवर्तन होते है. इनमें से दो या अधिक ग्रह उसीसमय वृष या वृश्चिक राशीमें हो या विषुववृत्त अथवा अयनवृत्तके समीप हों तो भूगर्भके उत्पात और भयानक तुफान होते है.

६ शुक्र और शनीका योग होनेसे वृष्टि या बर्फ जिसका समय

हो वही होता है. यह योग यदि विषुववृत्त या अयनवृत्तके पास होता है तो बडा प्रचंड वायु चलता है.

७ बुध और मंगलका योग होनेसे भी प्रबल वायु चलता है.

८ शुक्रमंगलका योग होनेसे ऋतूमें परिवर्तन और वृष्टि होती है.

उपर जो नियम दिये गये उनसे ऋतूका बहुत कुछ ज्ञान हो सकता है. किसि विशेष स्थानकी ऋतु उस स्थानके आसपासकी स्थिति पर निर्भ रहै. उसका बिचार अन्य लेखमें किया जायगा. आगे हम ग्रहोंकी भिन्न दृष्टीका बिचार करेंगे. इस रीतीके सिवाय एक नई रीति और भी है. उसकेद्वारा बारोमीटरकी उच्चता पहिलेसे जानी जासकताहै. और उसीसे जलवृष्टि आदि जानसकते है. परन्तु इसके लिये पहिलेसे गतवर्षों की बारोमीटरकी उच्चता ज्ञात होना चाहिये. यह विषयभी आगे लिखेंगे.

अहिचक्र

[रा. नथूराव गोखले यांजकडून]

अहिचक्रं प्रवक्ष्यामि यथा सर्वज्ञभाषितं ॥
द्रव्यं शल्यं तथा शून्यं येन जानंति साधकाः ॥१
वितस्ति द्वितयं हस्तो राजहस्तश्च तद्वयं ॥
दशहस्तैश्च दंडःस्यात्त्रिंशद्दंडो निवर्तनं ॥२
निधि निवर्तनैकस्थः संभ्रांतो यत्र भूतले ॥
तत्तच्चक्रमिदं स्थात्यं स्थानद्वारमुखस्थितं ॥३

॥ अथ चक्रनिर्माणविधिः ॥

ऊर्ध्वरेखाष्टकं लेख्यं तिर्यक् पंच तथैवच ॥
अहिचक्रं भवत्येवमष्टाविंशति कोष्टकं ॥४
तत्र पौष्णाश्वियाम्यर्क्षं कृत्तिका मध्यभागगं ॥
पैत्र्यं भाग्यंचार्यमकं पूर्वपंक्त्यां भसप्तकं ॥५
अहिर्बुध्न्योजपादर्क्षं शतभं ब्राह्मयसार्पभं ॥
पुष्यं हस्तं समालेख्यं द्वितीयां पंक्तिमाश्रितं ॥६
अभिजिद्विष्णुवस्वर्क्षं सौम्यरौद्रपुनर्वसुः ॥
चित्रभंच तृतीयायां पंक्तौ धिष्ण्यस्य सप्तकं ॥७
विश्वर्क्षं तोयभं मूलं ज्येष्ठां मैत्रं विशाखभं ॥
स्वाती पंक्तौ चतुर्थ्यांतु कृत्वा चक्रं विलोकयेत् ॥८
एवं प्रजायते चक्रे प्रस्तारः पन्नगाकृतिः ॥
द्वारशाखे मघायाम्ये द्वारस्था कृत्तिकामता ॥९

॥ चक्रं ॥

रे२८ ।	अ१ ।	भ२ ।	कृ३ ।	म१० ।	पू११ ।	उ१२
उ भा ।	पू. भा ।	श. ।	रो ।	आ ।	पु ।	ह
२७ ।	२६ ।	२५ ।	४ ।	९ ।	८ ।	१३
अभि ।	श्र ।	ध ।	मृ ।	आ ।	पु ।	चि
२२ ।	२३ ।	२४ ।	५ ।	६ ।	७ ।	१४
उ. षा.।	पू. षा.।	मू ।	ज्ये ।	अ नु ।	वि ।	स्वा
२१ ।	२० ।	१९ ।	१८ ।	१७ ।	१६ ।	१५

अश्वर्द्रापूर्वषाढादित्रिपंचकचतुष्टयं ॥
रेवतीपूर्वभाद्रेन्दोर्भानिशेषाणि भास्वतः ॥१०

अर्थ.—अश्विन्यादि तीन, आर्द्रादि पांच, पूर्वाषाढादि चार, रेवती व पूर्वाभाद्रपदा हीं नक्षत्रें चंद्राचीं होत. बाकीचीं सूर्याचीं जाणावीं.

चंद्र अ. भ. कृ. आ. पु. पु. आ. म. पू.षा उ.षा अभि. श्र. पू.भा रे.
सूर्य रो. मृ. पू. उ. ह. चि. स्वा. वि. अ. ज्ये मू. ध. श. उ.भा.

उदयादि गता नाड्यो भग्नाः षष्ट्यातशेषके ॥
दिनेंदुक्तयुमुक्तो सौ भवेत्तत्कालचंद्रमाः ॥११

अर्थ.— सूर्योदयापासून इष्टकालापावेतों जितक्या घटिका झाल्या असतील त्यांस * २७ नें गुणून ६० चा भाग द्यावा व तें + फल इष्टकालीन चंद्रांत मिळविलें असतां तात्कालिक चंद्र होतो. उदाहरण—

* अभिजित् नक्षत्र उत्तराषाढेच्या ४ थ्या चरणांत मिळालेलें असल्यानें २७ नेंच गुणावें.

+ येथें फल नक्षत्रात्मक येतें.अंशात्मक येत नाहीं- म्हणून तें अंशात्मक करून घ्यावें लागतें.

ज्येष्ठ शु० १९ रविवार ता. १४ जून सन १९०८ सायंकाळीं ७ वाजतांचा तात्कालिक चंद्र करावयाचा तर कुंडलीविज्ञानचें सन १९०८ चें बक्षीस पुस्तक धरा. त्यांत ता. १४ जून रोजीं १२ वाजतांचा चंद्र धनेचा १९ अंश १ कला २४ विकला इतका आहे. हा दुसऱ्या दिवशींच्या मकरेच्या ३ अं. २९ क. ४२ वि. चंद्रांतून वजा केला तेव्हां १४ अं. २८ क. १८ वि. इतकी गति झाली. आतां ७ वाजतां सायंकाळचा चंद्र करावयाचा ह्मणजे बारा वाजल्यानंतर ७ तासांचा करावयाचा आहे. ह्मणून—

२४ ता. ७ ता. :: १४ अं २८ क. १८ वि.

= ४ अं. १३ क. १० वि. इतकी गति १४ जूनच्या चंद्रांत मिळविली तेव्हां स्पष्ट चंद्र धनेचे २३ अं. १४ क. ३४ वि. इतका झाला.

आतां सूर्योदयापासून इष्ट कला पावेतों चंद्राचें भ्रमण किती झालें हें आणावयाचें तर ता. १४ रोजीं सूर्योदय जवळ जवळ ५. ता. १० मि. आहे. हे इष्ट कालांतून वजा देतां १३ ता. ९० मि. राहिले. ह्मणून—

२४ ता. : १३½ ता. :: २७ नक्षत्रें

= $\frac{२७}{४८}$ नक्षत्रें. यांस अंशात्मक केलें तर ६ रा. २७ अं. ३० क. हें इष्ट कालापावेतों चंद्राचें दिनभ्रमण झालें. तें स्पष्ट चंद्रांत मिळविलें तर इष्टकालीन तात्कालिक चंद्र कर्केचे २० अं. ४४ क. ३४ वि. इतका झाला. हा सायन आहे. निरयन पंचांगावरून करावयाचा असल्यास पाराशरीच्या रीतीप्रमाणें शु. १९ चा सा. ७ ता. चा स्पष्ट चंद्र केला तर धनेचे ० अं. ३१ क. २६ वि. इतका

झाला. यांत दिनभ्रमण फल ६ रा. २७ अं. ३० क. मिळविलें तर तात्कालिक निरयन चंद्र मिथुनेचे २८ अं. १ क. २६ वि. इतका झाला. यांत अयनांश २३ अं. ६ क. १० विकला मिळवून पाहिले तर कर्केचे २१ अं. ७ क. ३६ वि. होतात. याचे पूर्वीचे चंद्राशीं २३ क. २ वि. चें अंतर येतें. कारण ग्रहलाघवी अयनांश स्थूल आहेत.

चंद्रवत्साधयेत्सूर्यं ऋक्षस्थं चेष्टकालिकं ॥
पश्चाद्विलोकयेत्तौ च स्वर्क्षे चोच्चान्यभे स्थितौ॥ १२
चंद्रर्क्षे च यदार्केन्दू तदास्ति नियतं निधिः ॥
भानुऋक्षे स्थितौ तौच तदा शल्यंच नान्यथा ॥१३
शशांके चंद्रभे द्रव्यं शल्यं भवति भानुभे ॥
स्वस्वभे द्वितये ज्ञेयं नास्ति किंचिद्विपर्यते ॥१४
स्थितं न लाभ्यते द्रव्यं चंद्रे क्रूरग्रहान्विते ॥
पुष्टे चंद्रे भवेन्मुद्रा क्षीणे चंद्रेल्पको निधिः ॥१५
ग्रहदृष्टिवशात्सोपि विज्ञेयो नवधा बुधैः ॥
हेमं रौप्यं ताम्रतारे रत्नं कांस्याय संत्रपुं ॥१६
नागं चंद्रे विजानीयाद्भात्करादि ग्रहे स्थिते ॥
शुभक्षेत्रगते चंद्रे लाभःस्यान्नात्र संशयः ॥१७
न पापक्षेत्रगे लाभो विज्ञेयः स्वरवेदिभिः ॥
मिश्रैर्मिश्रंभवेद्द्रव्यं शून्यं दृष्टि विवर्जिते ॥१८
सर्वग्रहेक्षिते चंद्रे निर्दिष्टोऽसौ महानिधिः ॥
हेमं रौप्यंच ताम्रारं पाषाणं मृण्मयायसं ॥१९
सूर्यादिगृहगे चंद्रे द्रव्यभांडं प्रजायते ॥

भुक्तराश्यंशमानेन भूमानं कामिकैःकरैः ॥२०
नीचे द्विघ्नं परे नीचे जलस्थोऽसौ महानिधिः ॥
उच्चस्थे चोर्ध्वगे द्रव्यं नवांशकक्रमेणच ॥२१
परमोच्चे परे तुंगे भित्तिस्थं ऋक्षरंक्रमे ॥
चंद्रभुक्तांशमानेन द्रव्यसंख्याभिधीयते ॥२२
तस्मादशगुणावृद्धिः षड्वर्गेषु बलं क्रमात् ॥
अधिष्ठितं भवेद् द्रव्यं यत्र चंद्रो ग्रहान्वितः ॥२३
तदधिष्ठापको ज्ञेयो भास्करादि ग्रहैः क्रमात् ॥
ग्रहं मुख्यग्रहं चैव क्षेत्रपालं च मातृकां ॥२४
१ २ ३ ४
द्वीपेशं भीषणं रुद्रं यक्षं नागं विदुः क्रमात् ॥
५ ६ ७ ८ ९
ग्रहे होमः प्रकर्त्तव्यो मुख्ये नारायणी वतिः ॥२५
क्षेत्रपाले सुरामांसं मातृकायां महाबलिः ॥
द्वीपेशे द्वीपजापूजा भीषणे भीषणार्चनं ॥२६
रुद्रे रुद्रजपो जाप्यो यक्षे यक्षादिशांतिकं ॥
नागे नागगणाः पूजा गणनाथेन संयुताः ॥२७
लक्ष्मीधराणि तत्वानि सर्वकार्येषु पूजयेत् ॥
एवं कृते विधानेन दुःसाध्यो साध्यते निधिः ॥२८
निधिप्राप्तनरा लोके वंदनीया न संशयः ॥

अपूर्ण

पत्रव्यवहार.

पत्रकार महाशय, विशेष विनंति कीं—

खालील पत्रव्यवहार आपण वाचला ह्मणजे त्याचें महत्व आपल्या ध्यानांत येईल. अर्थात् अशा कामीं आपलें सहाय्य पूर्णपणें असलेंच पाहिजे. आणि तें आह्मीं हेंच मागत आहों, कीं यासंबंधीं आपणाकडे प्रसिद्धीकरितां मजकूर पाठवूं तो आपण कृपा करून पत्रव्यवहार सदराखालीं पूर्णपणें प्रसिद्ध करीत जावा. आपल्यासारख्या सहृदय गृहस्थांस जास्त काय लिहावें ? ही विनंति.

'ब्रह्मसत्र' यज्ञाकरितां सर्वांस विनंति.

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्त्ते यांस—

प्रे. न. वि वि. बहुशः प्रत्येक पुराणांत शौनकादिऋषींनीं 'ब्रह्मसत्र' नांवाचा यज्ञ केला असल्याचें लिहिलें आहे. विशेष विचार करतां, हा यज्ञ, कलियुगाच्या प्रारंभीं झाला असावा असें दिसतें. त्यानंतर या पांच हजार वर्षांत हा यज्ञ झाल्याचें कुठें इतिहासांत सांपडत नाहीं. अर्थात् त्याचा प्रयोगही कुठें आढळण्यांत आला नाहीं. पुराणांतील प्रस्तावनेवरून हा यज्ञ ह्मणजे श्रौतस्मार्तकर्ममार्गानुरूप वागून ज्ञानचर्चा करणें हाच असावा असें वाटतें. हल्लीं कांहीं ठिकाणीं 'ब्रह्मोत्सव' ह्मणून करीत असतात, तो आणि हा एकच असेल असेंहि वाटण्यास कारण आहे. यांत कर्म, उपासना व ज्ञान या तिहींचा समावेश असूं शकतो. प्रस्तुतसारख्या घोर कलिकालांत

ऐहिक व पारलौकिक हितासाठीं समष्टिरूपानें अशा प्रकारचा यज्ञ करून, त्यांतच धार्मिक प्रदर्शन किंवा स्वदेशी बाजारासारख्या संस्थेचा समावेश केला तर—अनायासें सिंहस्थांत वर्ष भर नाशकांत सुमारें वीस पंचवीस लाख माणसें, सर्व देशांतून येतील त्यांस योग्य वळण लावण्यासारखें होऊन, धार्मिकचर्चेपासून ऐहिक व पारलौकिक हित कसें होतें हें बहुशः परंपरेनें सगळ्या भरतखंडवासी लोकांच्या नजरेस येईल. यासाठींच श्रीसनातन भारतधर्ममहापरिषदेनें हा येत्या आषाढ—श्रावणापासून सुमारें वर्षभर—नासिक—पंचवटींत करण्याचें ठरविलें आहे. थोड्या परिश्रमानें पुष्कळ लोकहित होण्यास याचा फार उपयोग होईल. ह्मणून निरनिराळ्या प्रकारच्या लोकांना विनंति करण्यांत येत आहे; तिकडे त्यांनीं कृपा करून लक्ष्य द्यावें.

आमच्यांतील अवशिष्ट पंडितवर्गीय व याज्ञिकवर्गीय परमपूज्य अशा विद्वान् ब्राह्मणांना विनंति आहे. कीं त्यांनीं ब्रह्मसत्रासंबंधीं हरएक प्रकारची माहिती व मिळाल्यास प्रयोग मिळवून, आमच्याकडे पाठविण्याची कृपा करावी. अशा परमपूज्य लोकांच्या आधारानेंच हें कार्य तडीस जावयाचें आहे. इतर लोकहितेच्छूंनींहि ही विनति त्यांच्या पुढें ठेऊन, यासंबंधीं सर्व हकीकत कळविण्याची किंवा कांहीं खुलासा पाहिजे असल्यास विचारण्याची कृपा करावी.

हें कार्य फारच मोठें आहे. त्यासाठीं तनु, मन व धन या तिहींपैकीं ज्यांची जी मदत करण्याची इच्छा असेल ती त्यांनीं दिली पाहिजे. काम सर्वांचें आहे आह्मी मंडळी निमित्तमात्र आहों. प्रेरणा परमेश्वराची आहे या कामीं प्रत्येक माणूस यथाशक्ति मदत करूं शकेल. कोणीं शरीरबलानें, कोणीं बुद्धिबलानें आणि कोणी

द्रव्यादि साधनबलानें मदत करूं शकेल. अशी मदत देणारांनीं आपली इच्छा कळवावी ह्मणजे त्या सर्वांची नोंद करून, थोड्याच दिवसांत यासंबंधाची व्यवस्था करण्याकरितां मंडळी नियत करणें आहे; तींत त्या हकीकतीचा उपयोग करण्यास ठीक पडेल.

या यज्ञांत कित्येक प्रकारच्या सर्व जातींच्या नोकराचीही जरूर पडणार आहे; त्यांस अनायासें क्षेत्रवास व पुण्यसम्पादन होऊन निर्वाहही चालण्याची संधि आहे. तरी ज्यांचें शुद्ध वर्तन असेल ज्यांस पुण्यसम्पादन आणि लोकहित साधणें असेल, अशांनीं, आपण कोणतें काम कोणत्या अटीवर करण्यास तयार आहों हेंहि कळावें, ह्मणजे त्यांच्याबद्दलही सदर्हू व्यवस्थापकमंडळी नेमली जाईल तेव्हां विचार होईल.

आपला.

श्रीगोदा—महौषधालय.
नासिक, श. १८३०

शंकर दाजी शास्त्री पदे
प्रमुखमंत्री—स. भा. म.
लक्ष्मीदास नागरदास सराफ,
लक्ष्मण बाळकृष्णशास्त्री फणशीकर,
सहकारिमंत्री—स. भा. म.

वंध्यायोग.

[रा. रा. ग दा. ग्रंथे यांजकडून]

खालील कुंडल्या सर्व स्त्रियांच्याच आहेत,

जन्म—ता० १२-८-९८ ४

पंचम भावारंभीं मीन राशीचे २० अंश उदित असून या राशींत या स्थानांत नेपच्यून हा पाप ग्रह आहे. या भावावर मेष राशीचा अंमल विशेष आहे, कारण त्याचे २० अंश या भावांत आहेत. हा राशि संतति फार अल्प देणारांतला आहे. त्याचा स्वामी मंगळ धनु राशींत आहे हा राशि सुद्धां संततीला प्रतिकूलच आहे. हर्शल व मंगळ हे अगदीं समोरासमोर आहेत. व गुरु हा हर्शल आणि मंगळ यांनीं दूषित आहे. नवम स्थानांत शनि हा शत्रुक्षेत्रीं मध्यवर्ती आहे. या प्रमाणें भावचलित ग्रह आहेत.

जन्म—ता० १३-९-१८५२ ५

या कुंडलींत कर्क लग्नाचे २८ अंश उदित आहेत. द्वितीय भावारंभ सिंह राशीच्या २३ अं. त असल्यामुळें गु. मं. ह. हे ग्रह तनुस्थानीं आहेत. गुरु २० मंगळ १६ व हर्शल ५ अं. आहे. पंचम भावावर धनु राशीचेंच स्वामित्व आहे. हा राशि संततीला प्रतिकूल आहे. व त्याचा अधिपति गुरु हा मंगळानें दूषित झालेला आहे. एकादश स्थानीं राहु मिथुन राशींत ७ अंश आहे.

[२]

वि. वि. —

सातारा जिल्ह्यांतील देवराष्ट्रें येथील रा. रा. अप्पाजी धोंडो कुळकर्णी हे ता. १ जून १९०८ रोजीं प्रवासास निघाले. या दिवशीं प्रवास होऊं नये म्हणून सांगितलें असून त्यांनीं ऐकिलें नाहीं. बैल गाडींतून रस्त्यावर जात असतां गाडी उलटून मोठी भयंकर स्थिति झाली. त्यांस, व गाडी हाकणारा आणि दुसरा एक मनुष्य यांस मोठी दुखापत झाली. अप्पाजीरावांचे पायावर गाडीचें बांवकड पडून पायास जखम झाली. पंधरा दिवसांनीं औषधोपचार होऊन चांगले बरे झाले आहेत. त्यांची जन्मकुंडली येणेंप्रमाणें.—

जन्म—शके १८०० माघ कृ० ३ रविवार.

सू. नं. घ० ३८ प० ९

(निरयन)



चतुर्थ स्थानावर वाहन संबंधी सुखदुःखाचा विचार करितात. येथें त्या स्थानांत धनुराशीचा मंगळ आहे. या राशींत मंगळ फार

प्रबल असतो. हा ग्रह सांप्रत मिथुन राशींत स्वसंमुख झाला. चंद्र हा मंगळाजवळ असून राहूनें दूषित झाला. सप्तम स्थान प्रवासाचें आहे. या स्थानांत शनि जन्मठिकाणींच आला. त्यामुळें हें संकट आलें असावें.

संकटकाळीं गुरु एकादशस्थानीं उच्च असून जन्मकाळचे आपल्या समोर आहे, व दशमांत बुधशुक्र आहेत, त्यामुळें या संकटांतून बचाव झाला असावा. याप्रमाणें निरयन पद्धतीनें विचार होतो. कळावें लोभ असावा हे वि.—

महादेव गंगाधर कुळकर्णी
(देवराष्ट्रें)

---

* या कुंडलीचा सायन पद्धतीनें विचार पुढील अंकांत येईल.
सं. कुं. वि.

काळपत्रावरील खटला.

देशभक्त प्रो० परांजपे यांस १९ महिन्यांची शिक्षा झाल्याचा तार काल (ता. ८ रोजीं) सायंकाळीं त्यांच्या बंधूंकडून घरीं आली! ही बातमी ऐकून गांवांत आज मोठी चळवळ उडून गेली आहे! पेठेंतील लहान थोर व्यापाऱ्यांनीं आपापलीं दुकानें बंद केलीं आहेत! परांजपे यांच्या वृद्ध मातोश्रीस साभिमान दुःख झाल्याचें दिसत आहे.! दे० भ० शिवरामपंत यांस १॥ वर्षापासून २॥ वर्षेपर्यंत शिक्षा होणार. गुरुबल उत्तम असल्यामुळें यापेक्षां जास्त शिक्षा खात्रीनें होणार नाहीं, असें जें लिहिलें होतें त्याचा अनुभव बरोबर आला. असो. दे० भ० शिवरामपंत यांस देहदंड भोगण्यास परमेश्वर सामर्थ्य देवो, अशी त्याच्या जवळ अनन्य भावानें प्रार्थना करितों.

सायन पद्धतीनें विचार

अंक १८ मधील नं. २ च्या पत्रव्यवहारांतील कुंडलीचा सायन पद्धतीनें विचार करण्याचें त्या अंकांत आश्वासन दिलें होतें, त्याप्रमाणें येथें त्या कुंडलीचा विचार करावयाचा आहे.

जन्म—शके १८०० माघ कृ० ३ रविवार

सू नं घ० ३८ प० ५



चतुर्थ भावारंभीं मकर राशीचे १९ अंश उदित आहेत. या भावाचा अधिपति शनि हा जन्मकालीं मेष राशींत षष्ठस्थानीं आहे. मेष हा मंगळाचा राशि असून त्यांतील शनीवर मंगळ पूर्ण दृष्टीत पाहतो, ह्मणून अपघाताचें भय उत्पन्न झालें.

ता. १ जून या दिवशीं चंद्र हा कर्क राशींत जन्मकालच्या मंगळाच्या दृष्टींत होता. व चतुर्थेश शनि हा जन्मकालाप्रमाणेंच मेष राशींत षष्ठ स्थानीं होता. मंगळ हा त्या दिवशीं कर्क राशींत असून त्याशीं चंद्र दोन प्रहरीं १ वाजून ४९ मिनिटांनीं युति करणार होता. ही युति एक रूपतेची असल्यामुळें तिचा परिणाम फार अनिष्ट होता. त्याचप्रमाणें ही युति शनीच्या चतुर्थ स्थानीं होणार होती. कुंडलींत चतुर्थ स्थानीं वक्री हर्शल होता. ही सर्व ग्रहस्थिति अपघात दर्शवीत होती, ह्मणून अशा वेळीं प्रवास करणें धोक्याचें होतें.

याप्रमाणें सायन कुंडलीवरून अपघाताचें ज्ञान चोख होत आहे. अपघाताचीं जीं वास्तविक कारणें आहेत, त्यांस अनुसरून वर्णन असावें. निरयन कुंडलांपेक्षां सायन कुंडलीवरूनच या गोष्टीचा मेळ चांगला बसतो.

वक्रगति कां ?

या अंकांतील नं. २ च्या पत्रव्यवहारांत एका मुलीची कुंडली दिली आहे. ती पाहून एका ज्योतिष्यानें "**तनुस्थाने शनिः स्यात् अतएव गमनं वक्रं भवति**" असें सांगितलें ! वास्तविक शनि लग्नीं असल्यानें वक्रगति व्हावी हें ह्मणणें बरोबर नाहीं. आमच्या मतें ज्योतिष्यास ती मुलगी वक्रगतीनें चालते ही हकीगत माहीत असावी व ती जुळवून सांगण्याकरितां शनीचें कारण सांगितलें असावें ! कारणें जुळवून देण्यांत ज्योतिषी लोक पटाईत असतात व त्यांस आधारभूत ग्रंथांतसुद्धां केव्हां केव्हां गोष्टी आढळतात. 'वर्गणीदारा' प्रमाणेंच आमच्याही लग्नीं शनीच्या कुंडल्या शेंकडों पाह-

ण्यांत आहेत, पण या कारणानें एकाचेंही गमन वक्र नाहीं. माहित नसतां जर त्यानें सांगितलें असेल तर तें काकतालीय न्यायानें जुळलें असें ह्मणणें भाग आहे. असो. आमच्या मतें या गतीचें निदान असें आहे :—

सायन

या प्रमाणें ही सायन कुंडली आहे. हींत कर्क लग्न उदित असून लग्नीं शनि आहे. ज्योतिषीबुवा ह्मणतात त्याप्रमाणेंच लग्नांतला शनि वक्रगतीस कारण आहे. पण त्यांचा शनि मिथुनेचा आहे व या कुंडलींत तो कर्क राशीचा आहे. कर्क राशीचा स्वाभाविक धर्म **वक्रगति** आहे असें बृहज्जातकावरून दिसतें व अनुभवही तशा प्रकारचा आहे. या राशीचीं मनुष्यें पावलें वांकडीं टाकतांना आढळतात. त्यांत कित्येक दोन्ही पावलें आंत टाकितात तर कित्येक बाहेर टाकितात, कित्येकांच्या खोटा वाकड्या हीतात. या गोष्टी सूक्ष्म निरीक्षण केल्यास दिसून येतील. येथें हा राशि लग्नींच उदित असल्यामुळें व तो लग्नांत पूर्णत्वानें असल्यामुळें त्याचा शरीरावर पूर्ण अंमल होणें स्वाभाविक आहे. मिथुन राशीचा हा धर्म नाहीं, असल्यास कोणीं दाखवावा. यावरून सायन कुंडलीचें महत्व ध्यानांत येईल.

शनि हा ग्रह जात्या पंगू आहे, व तो कर्क राशींत शारीरिक दोष उत्पन्न करितो, हें आमच्या वाचकांस माहीत आहेच. असा शनि लग्नीं मध्यवर्ती असल्यामुळें शरीर व्यंग झालें व तेणेंकरून वक्रगति उत्पन्न झाली. केवळ शनि व्यंग उत्पन्न करणार नाहीं. इतकेंच नव्हे तर कित्येक राशींत तो शरीर बांधेसूत करितो. मिथुनेंतही तो व्यंग उत्पन्न करणार नाहीं अशी खात्री वाटते. कर्क राशीपैकीं आश्लेषा नक्षत्राचा भाग अशुभ आहे. हें नक्षत्र चांगलें नाहीं. या नक्षत्रांत कोणताही पाप ग्रह अनिष्ट फलच उत्पन्न करितो. येथें सुद्धां शनि १७ अंश ४२ कला असल्यामुळें त्याच नक्षत्रांत आहे व ह्मणूनच शरीर व्यंग झालें व वक्रगति प्राप्त झाली.

लग्नस्वामी चंद्र असून त्याच्या अष्टमांत रवि, मंगळ व नेप्च्यून हे तीन पाप ग्रह असल्यामुळें बालपणीं ताप येऊन त्यापासून एक पाय पंगू झाला. रवि व मंगळ हे जवळ जवळ असतां जन्म झाल्यामुळें ज्वरभय झालें. व त्याला लग्नीं आश्लेषा नक्षत्रांतल्या शनीची जोड मिळाल्यामुळें ज्वरापासून अरिष्ट उत्पन्न झालें.

पायावरून ताप गेल्यामुळें तो निर्जीव होऊन वक्रगति प्राप्त झालेलीं माणसें बरींच आढळतात. त्यांच्या कुंडल्या कोणाच्या संग्रहास असल्यास पाठवाव्या, ह्मणजे त्या प्रसिद्ध करूं. व नंतर त्यांवरून कांहीं सामान्य नियम निघाल्यास पाहूं. प्रत्येकानें एकेक कुंडली जरी पाठविली तरी प्रचंड संग्रह होईल व ज्योतिःशास्त्राच्या अनुभवांत मोठी भर टाकल्याचें सर्वांस श्रेय मिळेल, इकडे आमच्या वाचकांचें लक्ष जाईल काय ?

पत्रव्यवहार.

राष्ट्रमत

आज बरेच दिवस आपण ऐकत होतों कीं, राष्ट्रमत नांवाचें एक दैनिक वर्तमानपत्र मुंबईस निघणार आहे. याचा जन्म वर्षप्रतिपदेलाच व्हावयाचा होता. पण त्या वेळीं त्याचा गर्भवास पुरा न झाल्यामुळें तें जन्मास येऊं शकलें नाहीं असेंच आतां ह्मणावें लागतें. आतां आषाढ शु. १ ला गर्भवास पुरा होऊन सूर्योदयीं तें जन्मास आलें. त्या वेळची ग्रहस्थिति काय दर्शविते व पुढें कसे दिवस येणार आहेत याचा आपण थोडक्यांत विचार करूं. त्या वेळची सायन-कुंडली येणेंप्रमाणें.—



ह्या कुंडलींत कर्क लग्न उदित असून लग्नाधिप चंद्र द्वादश स्थानांत पडला आहे. जे स्वतः पुढारी असतात किंवा लोक ज्यांना आपले पुढारी ह्मणून समजतात, जे लोकांना प्रिय असतात किंवा लोकांत ज्यांना मोठा मान मिळतो अशांच्या कुंडलींत बहुधा कर्क किंवा सिंह लग्न उदित असतें. तसेंच जे खरे जहाल असतात त्यांचा कर्क

किंवा सिंह लग्नावर जन्म होतो. वरील कुंडलींत असाच प्रकार झालेला आहे. कर्क लग्न उदित असल्यामुळें त्याची प्रमुखत्वांत गणंनां होऊन त्याला लोकांत मोठा मान मिळेल. तसेंच हें पक्कें जहाल असून अत्यंत हेकेखोर व हटवादी निघेल. हा गुण मंगळाचा आहे. लग्नीं मंगळ असून त्याच्या व्ययस्थ चंद्र असल्यामुळें त्यावर संकटें बरींच येणार! लग्नाधिपति चंद्र आहे, व तो लोकपक्षाचा कारक ग्रह आहे. ह्मणून हें लोकपक्षाला उचलून धरील.

धनस्थानांत सिंहेचा गुरु आहे, ह्मणून याची सांपत्तिक स्थिति उत्तम राहून भागीदारांस चांगला नफा मिळेल. यांतील लेखक उत्तम विद्वान् असून त्यांचे लेख भारदस्त व पोक्त असतील.

षष्ठ स्थानावर शत्रूंचा विचार करितात. या भावाचा अधिपति गुरु असून तो द्वितीय स्थानीं प्रबल आहे, ह्मणून त्याचे शत्रु त्याच्याच जातीचे असतील. परंतु त्यांच्याकडून याला कांहींही नुकसान पोहोंचणार नाहीं.

सप्तम स्थानांत मकर राशीचा हर्शल आहे. या स्थानावर वादविवादाचा विचार होतो या स्थानावर रवि, मंगळ व शनि यांची दृष्टि आहे, ह्मणून याचा सर्व काल वादविवादांत जाईल दशमांत शनि व सप्तमांत हर्शल हा योग त्याच्यावर **राजकीय** संकटें आणणारा आहे. व त्यामुळें त्यास वारंवार कोर्टाची पायरी चढावी लागणार आहे!

अष्टमाचा अधिपति शनि नीच असून अष्टमावर मंगळ पाहतो ह्मणून तें दीर्घायु नसावें. राजकीय संकट उपस्थित करणाऱ्या

ग्रहस्थितींतच ह्याचा जन्म असल्यामुळें हल्लींच फार भीति असून पुढें येणाऱ्या साडेसातींत त्याला गंडांतर आहे! साडेसातीच्या दुसऱ्या अडीच वर्षांतच हें आपला निभाव कसा लावून घेतें तें पाहिलें पाहिजे. विशेषतः रवीवर शनि आला असतां त्याला विशेष भय आहे!

शंकर रामचंद्र प्रधान
नागपूर.

* * * कुंडलींत चंद्र चुकीचा आहे. आषाढ शु० १ ला ता. २९ जून असून या दिवशीं चंद्र **कर्क** राशींत आहे. बुध, शुक्र व हर्शल हे वक्री आहेत. ता. २८ ला रात्रीं **सूर्यग्रहण** असून तो **अमावास्येचा** दिवस होता! या दिवशींच तें प्रसवर चढलें असेल तर त्याच्या चालकांनीं हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें **शांति** करावी अशी सूचना करितों. पाश्चात्य शिक्षणाचाच केवळ मनावर दट परिणाम झाल्यामुळें त्याच्या उत्पादकांनीं हा **कुमुहूर्त** शोधून काढिला असावा! देशाच्या विपत्कालीं विपरीत बुद्धि उत्पन्न कशी न व्हावी? अथवा परमेश्वराचाच संकेत तसा होता असें ह्मणून स्वस्थ बसावें हें बरें! "तुका ह्मणे उगें राहावें। जें जें होईल तें तें पाहावें॥"

---

[२]

वि. वि.—खालील चार ओळींस आपल्या दाशाहिकांत जागा द्याल अशी आशा आहे.—

जन्म—शके १८०९ वैशाख शु. १४ शुक्रवार
सकाळीं घ. ७ प. ५० [८ वाजून ४५ मि. नीं]
निरयन



ही एका स्त्रीची कुंडली आहे. चार वर्षाच्या वयाची होईपर्यंत हिची प्रकृति सुदृढ होती. चवथ्या वर्षी ज्वर येऊन त्यांत तिचा एक पाय गेला, तेव्हांपासून ती वक्रगतीनें चालते. तिला एक वडील व एक धाकटा भाऊ असून दोन धाकट्या बहिणी आहेत. घर चांगलें मिळालें आहे. तीन वर्षांपूर्वी एक मुलगा झाला होता तो उपजतांच मेला.

ही कुंडली एका ज्योतिष्यास दाखविली तेव्हां त्यांनीं **तनुस्थाने शनिःस्यात अतएव गमनं वक्रं भवति** असें सांगितलें. तनुस्थानीं शनि असेल तर शरीर वक्र होऊन गतिवैकल्य प्राप्त होतें असा आधार कोठें आहे ? तनुस्थानीं शनि असलेल्या कुंडल्या आमच्याच घरीं चार आहेत ! पण एकाचेंही शरीर वांकडें नाहीं. तेव्हां याच स्त्रीचें शरीर वक्र होऊन गतिवैकल्य प्राप्त होण्यास कोणती ग्रहस्थिति कारणीभूत झाली याचा आपण अगर आपल्या वाचकवर्गापैकीं कोणी खुलासा करितील काय ?

कळावें लोभ असावा हे विनंति.

एक वर्गणीदार

वि. वि.— [३]

ता. २५-६-०८ गुरुवार रोजीं रात्रीं मुंबईहून अमदाबादेकडे जाणाऱ्या एक्सप्रेस गाडीची मालगाडीबरोबर इटोला स्टेशनवर टक्कर होऊन गाडीचें इंजिन मोडलें व पुढील चार डबे माणसांसुद्धां जळून गेले ! जवळ जवळ चारशें माणसें मेलीं व जाया झालीं अशी लोकवार्ता आहे. ही गाडी मुंबईहून निघाली त्या वेळची व अपघात झाला त्या वेळची अशा दोन कुंडल्या सोबत पाठविल्या आहेत.

याच सुमारास दर्यामध्येंही एक अपघात होऊन बरीच प्राणहानि झाल्याचें वर्तमानपत्रांतून वाचलें आहे. सध्या विशेषें करून ट्रामचेंचे लहानमोठें अपघात, घरें कोसळणें, वगैरे गोष्टी नेहमीं चालू आहेत. गेल्या रविवारीं मुंबईस एक घर पडून ६ माणसें मेलीं !

ता. १५-६-०८ गुरुवारीं रात्रीं स्टँ. ८–१५ ला कुलाब्याहून अमदाबाद एक्सप्रेस सुटली त्या वेळची कुंडली —

ता. २६-६-०८ रोजीं पहांटेस मुं. टा. ३। च्या सुमारास अपघात झाला, त्या वेळची कुंडली.—



हर्शलच्या उदयकाळीं या गाडीनें गमन केलें ही व गोष्ट प्रथमतः अनिष्ट झाली. शिवाय प्रवासाचा विचार ज्या स्थानावर होतो तें सप्तम स्थान मंगळानें दूषित आहे. हा मंगळ आश्लेषा नक्षत्रांत हर्शलच्या नक्षत्रासमोर आहे, ह्मणून त्याची हर्शलवर पूर्ण दृष्टि आहे. त्याच प्रमाणें त्या हर्शलवर शनीचीही पूर्ण दृष्टि आहे. शनिमंगळांनीं दूषित झालेला लग्नांतला हर्शल वरील अपघातास कारण झाला. या वरून अशा प्रकारचा काल गमनास घातक होय असा सिद्धांत निघत नाहीं काय? अपघाताच्या मुहूर्तावर निघणाऱ्या गाडीमध्यें ज्यांस अपघाताचें भय आहे अशा मनुष्यांनीं बसतांना विचार करणें जरूरीचें नव्हतें काय? कळावें लोभ असावा हे वि.—

बळीभद्र यशवंत आचार्य.
दादर–मुंबई

[४]

वि. वि.—अपघाताच्या कुंडलीचें वर्णन करून पाठवीत आहें, त्यास येत्या अंकांत स्थल मिळावें. माझा हा पहिलाच प्रयत्न आहे. आणि तो पण आत्ताच पुस्तकांच्या साह्यानें.

हा अपघात ता. २२ माहे जून १९०८ रोजीं पहांटेस सुमारें ३ ता. ५० मि. नीं बी बी. सी. आय् रेलवेवर इटोला स्टेशनच्या पुढें झाला. त्या ट्रेनची दुसऱ्या ट्रेनशीं टक्कर लागल्यामुळें बहुतेक डबे आगीनें नाश पावले! सुमारें २५० पासून ३०० पर्यंत मनुष्यें जखमी व मृत झालीं, असा लोकांचा समज आहे. त्या वेळची सायन कुंडली.—



लग्नस्वामी बुध हा मारक स्थानीं वक्री असा कर्क या 'लय' राशींत आहे. व तो मंगळ, वक्री शुक्र आणि नेपच्यून यांच्याशीं युति करण्याच्या स्थितींत आहे. त्यावर वक्री हर्शलची दृष्टि आहे.

विशेषतः तृतीय व नवम भाव विचारांत घेतले पाहिजेत. तृतीय स्थानाचा (या भावाचा आरंभ कर्क २८ अंशांत आहे ह्मणून) स्वामी चंद्र हा शनीशीं युतिदृष्टि करीत आहे. बहुतेक ग्रह कर्क या 'लय' राशींत पडले आहेत. स्वाभाविक चतुर्थ स्थानाचा अधिपति चंद्र अग्निराशींत शनीशीं युत आहे.

ता. २२ रोजीं रात्रीं २ ता. ३० मि. नीं शनिचंद्रांची युति अग्निराशींत झाल्याबरोबर वरील भयंकर स्थिति प्राप्त झाली! क० लो० असावा, हे विनंति.

परशुराम रघुनाथ गुप्ते.

[५]

वि. वि.— युवराज फत्तेसिंगराव गायकवाड यांस झालेलें पुत्ररत्न.—

जन्म—ता. २९ जून सन १९०८ सोमवार
सकाळीं ४ वा ५९ मि.
सायन.



लग्न कर्क या बादशाही राशीचें स्वनवमांशीं स्वस्वामीनें युक्त आहे. कर्क व सिंह या राशींत एकंदर ८ ग्रह आहेत. धनस्थानीं गुरु हा शुभ ग्रह आहे. लग्नापासून पंचम स्थानापर्यंतचे अधिपति लग्नीं एकत्र जमले आहेत. राजकारक ग्रह रवि व चंद्र हे लग्नीं बलवान् आहेत. याप्रमाणें कुंडलींत राजयोग स्पष्ट आहे!

लो. मा. टिळक यांचे कुंडलींत मंगळ हा चतुर्थ व नवम या स्थानांचा अधिपति आहे, व गुरु हा पंचमेश आहे. या दोन ग्रहांची युति लग्नीं चंद्रास पांचवी ता. १४ आगष्ट रोजीं आहे. बुध आणि शुक्र हे पाप फलें उत्पन्न करणारे आहेत. मंगळ हा शुभ फलदायक आहे. शुक्र आणि मंगळ यांचा योग शुभ नाहीं. मंगळ गुरूंचा योग विशेष फलदायक आहे, असें उडुदायप्रदीपांत लिहिलें आहे. शुक्रमंगळ युति ता. २३ जून रोजीं होती. त्या युतीचा परिणाम अशुभ झालेलाच आहे. ता. १४ आगष्ट रोजीं होणाऱ्या गुरुमंगळांचा योग शुभ व्हावा असें ह्यावरून वाटतें हल्लीं ते मधुमेहानें आजारी आहेत. वीर्याचा कारक शुक्र सिंह या अग्निराशींत शत्रुगृहीं रवीच्या तेजांत अस्तंगत आहे, ह्मणून या रोगाची उत्पत्ति झाली आहे. हल्लीं तो शुक्र व्ययस्थानीं वक्री असून नेपच्यून, रवि व राहू या तीन पाप ग्रहांनीं दूषित झाला आहे, ह्मणून ते आजारी आहेत. योग प्रतियोगांचे परिणाम अगोदर सुद्धां घडतात. त्याप्रमाणें ता. २३ जुलईपासून त्यांचा परिणाम होऊं लागावा असें अनुमान होतें. ह्या दिवशीं रवि हा स्वगृहीं लग्नीं येतो. या दुसऱ्या योगाची त्यास जोड मिळत आहे, ह्मणून त्यांस होणारा त्रास सिंह संक्रमणापासून कमी होऊन आगष्टपासून ता. १४ पर्यंत नाहींसा व्हावा असें वाटतें. कळावें लोभ कीजे हे विनंति.

गणेश दामोदर ग्रंथे

पत्रव्यवहार.

[१]

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

सा. न. वि. वि.—आपल्या दाशाहिकांत खालील चार ओळी प्रसिद्ध करण्यासाठीं पाठवित आहें.

श्रीयुत घोलप ज्योतिषी यांनीं आपल्या फलज्योतिषादर्शाच्या अंकांत रा. परशुराम रघुनाथ गुप्ते यांची कुंडली घेऊन सायनमतवाद्यांवर जरा कोरडा ओढला आहे. यासाठीं त्यांची सायनकुंडली काय दाखविते याचा प्रयत्न मीं करीत आहें.

जन्मकाल शके १८१० चैत्र शु. ६ मंगळवार सू. नं. घ. ० प. ४२ हा जन्मकाल धरून आपण जी सायनकुंडली पाठविली होती तीवरून त्यांचे कुंडलींत स्त्रीस मारक योग कोणते व कसे आहेत ते पहा.—

[१] जायाधिपति वक्री षष्ठांत आहे.

[२] शुक्राचे सप्तमांत मंगळ वक्र.

[३] जायाधिपति व हर्शल यांची युति शुक्राचे सप्तमांत.

[४] कुटुंबस्थानाचा अधिपति १२ व्या स्थानांत.

[५] कुटुंबस्थानाचे सप्तमांत दोन पाप ग्रह.

[६] लग्नीं नेपच्यून हा पापग्रह.

[७] शुक्राचे कुटुंबस्थानांत पापग्रह.

हे वरील योग स्त्रीचा मृत्यु होण्यास पुरेसे नाहींत काय? आतां तिचें मरण आकस्मिक व अग्नीनेंच कां व्हावें, याचा विचार करूं.

(१) जायास्थानचा अधिपति जो मंगळ वक्री व अग्नितत्वाचा आहे,

(२) हर्शलशीं तो युत असल्याकारणानें मृत्यु आकस्मिक आला पाहिजे.

(३) शुक्र हा अग्नितत्वाचे राशींत आहे व त्याचे सप्तमांत अग्नितत्वाचा ग्रह आहे.

(४) कुटुंबस्थानाचा स्वामी अग्नितत्वांत व मंगळ या अग्नितत्वाचे समोर आहे.

(५) सूर्यही अग्नितत्व अग्निराशींत मंगळाचे समोर आहे.

(६) चंद्राचे कुटुंब स्थानांत अग्नितत्वांत दोन पाप ग्रह.

यावरून आपणास सहज कल्पना करितां येईल कीं तिचा त्याच तत्वानें मृत्यु व्हावा. आतां, तो ता. १३।१।०८ या वेळीं कां झाला?

त्याच वेळेस सायन अष्टोत्तरी महादशेप्रमाणें चंद्राची महादशा असून शुक्राची अंतर्दशा होती. शुक्र लग्नस्वामी असून षष्ठांत आहे व तो १२ व्या स्थानीं मेष राशींत दुर्बल आहे, ह्मणून तो वाईट फल देण्यास योग्य आहे. आतां त्या वर्षाच्या सायक्लीक कुंडलीवरून विचार करूं.

या वर्षी अष्टम स्थान वर्षलग्न आहे. असा योग काळजी, चिंता व कुटुंबांत मृत्यु दर्शवितो. मंगळ आपल्या भ्रमण कालानें वृश्चिक राशींत आला आहे व ती रास सप्तमांत आहे. रवि भ्रमण कालानें वृषभ राशींत लग्नीं येत आहे. चंद्र मिथुनेंत येत आहे, हर्शल मकर राशींत आहे, राहू व नेपच्यून मूळ कुंडलींतील चंद्राचे स्थानावरून जात आहेत, शनि व बुध मीन राशींत युति करीत आहेत. बुध हा मूळ कुंडलींत कुटुंबस्वामी आहे व हल्लीं तो नीच स्थित आहे. शुक्र हा आपल्या नीच राशींत येत आहे, बुध नीच शनियुत व शुक्राचे पूर्ण दृष्टींत. लग्नीं रवि व जायास्थानीं रविपूर्ण दृष्टींत.

वर्षधनप अग्निराशींत. वर्षजायाधिपति बुध नीच. मंगळ जन्म कुंडलींतील जायाधिपति असून अपघात करणारी जी रास वृश्चिक

तिच्यांत, असे वाईट योग झाले असतां काय झालें पाहिजे?

ताजिकनें वर्षकुंडली काढिली असतां त्या वर्षाची ती स्थिति बिनचूक दाखविते. परंतु त्यास रवि अति सूक्ष्म लागतो. त्याचे जन्माचें राफेलचें पंचांग असतें तर पाश्चात्यपद्धतीनें भविष्य काढून पाठविलें असतें. यावरील विवेचनावरून सायनाचें सत्यत्व सिद्ध होत आहे. कळावें लोभ असावा, हे विनंति.

नादी

"यशवंत प्रधान"

[२]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

सा. न. वि. वि. खालीं लिहिलेला मजकूर मागील लेखावरून पुढें चालू आहे, त्यास स्थान मिळावें.

अमुक घरांत निधी असल्याबद्दल पूर्वजांचे तोंडीं ऐकतों किंवा असल्याबद्दल शंका आहे, परंतु सांपडत नाहीं. तर तो कोठें आहे, असा प्रश्न पृच्छकानें विचारल्यास प्रश्नकालचे तात्कालिक ग्रह करून चंद्रकुंडली मांडावी. व स्थान, बल आणि दृष्टि यांवरून निधि आहे किंवा नाहीं हें ठरवावें. असल्यास त्या घराचे दारांत नागमुख [कृत्तिका नक्षत्र] स्थापन करून चक्र लावावें, व तात्कालिक चंद्र ज्या नक्षत्रावर असेल त्या नक्षत्राच्या स्थानीं निधी आहे ह्मणून समजावें. भूमीची खोली, उंची, वाकडेपणा इत्यादि गोष्टी चंद्रभुक्तांश व चंद्रस्थित नक्षत्राचे [ऊर्ध्व, तिर्यक् इ०] धर्मावरून समजावें. येथें खालीं लिहिल्या प्रमाणें अडचणी येतात.

१ जेथें दार नाहीं अशा ठिकाणीं चक्र कसें लावावें?

२ जेथें एका पेक्षां अधिक दारें आहेत तेथें कोणत्या दारांत चक्रमुख असावें? (असा प्रसंग सदोदितच येतो.)

३ जेथें दार मध्यें नसून उजव्या किंवा डाव्या हाताच्या कोंपऱ्यांत आहे तर कृत्रिकानक्षत्र दारांत लाविलें असतां एका बाजूचे बारा कोष्टकांस मुळींच जागा उरत नाहीं व चंद्र जर तिकडेच आहे, तर काय करावें?

या व अनुभवांतीं आणखी बऱ्याच शंका उत्पन्न होतात. त्यांचें समाधान येणें प्रमाणें.—

१ जेथें दार नाहीं तेथें वास्तु नागमुखाला धरून चक्र लावावें. [वास्तुनागविचार मुहूर्तचिंतामणि प्र. १२ श्लो. १७ देवालयें इत्यादि वरून किंवा ईशानतः सर्पति इ० वरून पहा.] दुसऱ्या आचार्याचें मत असें आहे कीं, चंद्राधिष्ठित तात्काल नक्षत्र ज्या दिशेचें असेल त्या दिशेस नागमुख करावें परंतु जेव्हां नागमुख कोणत्या तरी उपदशेचें येतें तेव्हां पुनः चक्र लावण्यास अडचण येते ती अशी कीं, पृच्छकानें कांहीं समचतुष्कोण जागा नियमित करून प्रश्न विचारिला असा विचार करा, व नागमुख अग्निकोणाचें आलें, तर चक्र वांकडें लावून बरीच जागा रिकामी राहील.

पूर्व

प.

या संबंधीं अनुभवांतीं कायतें ठरविणें आहे.

२ मुख्य दारांत मुख लावावें. मुख्य दार ठरविणें कधीं कधीं कठीण जातें. तेंही अनुभवांतीं पाहूं.

३ कृत्रिम निधिशोधनाचे आजपावेतोंचे अनुभवांत कधीं वास्तु-नागावरून व कधीं चंद्राधिष्ठित नक्षत्रावरून अशा प्रसंगींही चक्र

लाविलें आहे. परंतु कृत्रिम निधि म्हणजे चक्र लावण्याचे पूर्वीच निधिस्थान माहीत असावयाचें. तेव्हां ज्या वेळेस ज्या मार्गानें ठीक पडेल तो स्वीकारावयाचा. अमुकच मार्ग सर्वमान्य आहे असें सिद्ध झालें नाहीं. व कधीं कधीं तर कोणत्याच मार्गानें जमत नाहींसें दिसलें. असो.—

निधि सांपडणें न सांपडणें हें प्रश्नकालचे ग्रहावरून केवळ पाहणें मला संमत नाहीं. पृच्छकाचे जन्मकुंडलींत लाभयोग आहे किंवा नाहीं हेंही पाहणें अगत्याचें आहे. त्याच प्रमाणें ज्योतिष्याचे [म्हणजे साधकाचे] कुंडलींत लाभयोग [तसा कांहीं ठराव असल्यास] किंवा यश व कीर्तियोग आहे किंवा नाहीं हें पाहणें तितकेंच महत्वाचें होईल. सर्व नक्षत्रांचीं कोष्टकें समान लांबीरुंदीचीं असावीं किंवा काय या बद्दलसुद्धां शंका आहे. कारण श्लोक ९ वरून असें कळतें कीं द्वारांत कृत्तिका व द्वारशाखेवर भरणी व मघा स्थापन कराव्या, तर दाराचे रुंदी इतकीच शाखेची रुंदी असणें संभवत नाहीं. शिवाय पहिली पंक्ति या मताप्रमाणें भितीच्या आंत जाते तर ४थी व बाजूच्या दोन पंक्तीही भितीच्या आंत व्हाव्या किंवा काय हेंही समजत नाहीं. असो. या संबंधी आणखी बरेंच लिहिणें आहे. लोकांनीं अनुभव बेऊन काय तें ठरवावें. म्हणजे पुढें आणखी लिहिण्यास बरेंच स्वल्प जाईल. पत्राविस्तराची माफी असावी. कळावें, लोभ असावा हे विनंति

आपला

नथूराव गंगाधर गोखले—मास्तर.

[३]

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

सा. न. वि. वि – अंक १३ मध्यें मीं पावसाचें यंदांचें भविष्य दिलें आहे, त्यांत शुक्राचा अस्त, मंगळाची राशिक्रांति व गुरूचा उदय याकडे लक्ष दिलें नाहीं. कर्क राशीवर ग्रह असतांना पाऊस पुष्कळ पडतो. परंतु सिंह राशीवर असतांना पुष्कळ कमी लागतो. शुक्राचा अस्त व मंगळाचें राश्यंतर आणि गुरूचा उदय असतां सुमारें ४।५ दिवस अगोदर व ४।५ दिवस नंतर पाऊस पडतो. या सालीं ता० २६ जून पासून ता० ११ जुलई अखेर सुमारें पंधरवडाभर अतिशय पाऊस पडला. ता० २९ रोजीं शुक्राचा अस्त झाला व ता० ७ जुलई रोजीं मंगळ सिंह राशीवर गेला. ह्या दोन योगांमुळें लागोपाठ इतका पाऊस पडला. ता० १२ जुलई पासून पाऊस उघडझांप झाला असून फारच मंदावला आहे.

ता० २३ जुलईपासून रवि सिंह राशींत जाईल, तेव्हां त्या राशींत रवि, गुरु, मंगळ या तीन ग्रहांचा योग येईल. रवि ता० २३, मंगळ ता० २४ आगष्टपर्यंत हे त्या राशीवर आहेत. गुरु ता० १२ सप्तंबरपर्यंत सिंहेत आहेत. कर्क राशीवर मंगळ असतांना बराच पाऊस पडला आहे. परंतु तो पुढें सिंह राशीवर गेल्यापासून बराच मंदावला आहे रवि ता० २३ पासून सिंह राशींत जातो. ह्मणून ता० २३ जुलईपासून पाऊस अगदीं उघडणार. मंगळाची क्रांति ता० २४ आगष्ट रोजीं आहे. ता० २१ रोजीं रात्रींपासून चंद्र कर्क राशींत आहे. ह्मणून ता० २१ आगष्ट पासून पुनः चांगला पाऊस पडूं लागेल. ता० २३ जुलईपासून ता० २१ आगष्टपर्यंत पाऊस फार थोडा पडेल. ता० १ सप्तंबर रोजीं गुरूचा उदय आहे. शुक्राचा अस्त व मंगळाची क्रांति ज्या

प्रमाणें एका आठवड्याच्या अंतरानें होती त्याप्रमाणें मंगळाची क्रांति व गुरूचा उदय एक आठवड्याचे अंतरानें आहे. ह्मणून जुलई आरंभीं पडलेल्या पावसाइतका पाऊस ह्या वेळीं पडेल. पुढें ता० १२ सप्तंबर पासून गुरु कन्येचा होतो. ह्मणून गुरूदयाच्या पर्जन्यानंतर एक आठवड्यानें बराच पाऊस लागून तो शेवटपर्यंत राहील. सन १९०७ सालीं गुरु कर्क राशीवर असतांना बराच पाऊस पडला. व पुढें गुरु सिंह राशींत गेल्यापासून गेला तो पुढें अगदीं गेला! ह्या वेळींही गुरु सिंह राशींत खरा. परंतु मंगळ कर्क राशींत होता ह्मणून त्याचा परिणाम पावसावर झाला. कर्क हा जलराशि असून सिंह हा अग्निराशि आहे. सन १८९१ सालीं अति पाऊस पडला आहे. त्या सालीं मंगळ कर्क राशींत पावसाळ्यांत थोडे दिवस होता. ह्या दोन ग्रहांचा पावसावर विशेष परिणाम होतो. या दोहोंपैकीं कोणीतरी असतांना पर्जन्य फार पडला आहे असा आजपर्यंत अनुभव आला आहे. १९०३ पासून १९०७ पर्यंत पाऊस कसा पडला व कोणकोणते ग्रहांचे योग प्रतियोग लागू झाले ह्याचा विचार हल्लीं चालू आहे. तो लवकरच पूर्ण करून आपणाकडे पाठवितों.

अंक १३ मध्यें दिलेल्या भविष्यांत जून आरंभीं जे शब्द आहेत त्या ठिकाणीं जुलई आरंभीं. सपटंबर १५ पर्यंत टंचाई पडेल त्या ठिकाणीं ता. २३ जुलईपासून ता. २१ अगष्ट पर्यंत पाऊस अगदीं मंदावेल किंवा उघडेल असे शब्द पाहिजेत. इतर काळीं तो वेळेवर पडणार नाहीं. पडेल तर नुकसान करील. बहुतकरून पडणार नाहीं. त्या प्रमाणें जूनच्या पहिल्या पंधरवड्यांत लवकर न लागून जुलईच्या पावसानें पिकें सडलीं आहेत अशी कित्येक ठिकाणीं ओरड झाली. ता० २३ जुलईपासून ता. २१ आगष्ट पर्यंत पाऊस बराच मंदावेल

हा पर्जन्याचा मध्यकाल असल्यामुळें या वेळीं तर पाऊस अवश्य लागतो. परंतु ह्या वेळीं तो अल्प आहे, ह्मणजे वेळेवर नाहीं. पाठीमागून सपटंबर–अक्टंबरमध्यें आहे. ता. १३ च्या अंकांत व आजच्या लेखांत विचार करितांना र० बु० शु० मध्यें किंवा पुढें किंवा बु० शु. ह्या मध्यें रवि हा विचार मुळींच केलेला नाहीं.

कळावें लोभवृद्धि करावी, हे विनंति.—

गणेश दामोदर ग्रंथे.

---

[४]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

सा. न. वि. वि. खालील गोष्टींचें स्वरूप कशा प्रकारचें आहे व त्याचा अखेर विस्तार व परिणाम कोठपर्यंत होईल ह्याचें अनुमान आपण आपल्या वाचकांसमोर आपल्या अनुभविक सिद्धांतानें मांडाल या आशेनें हें पत्र आपणास लिहित आहें. ही बाब शुष्क नसून मोठी विचार करण्यासारखी आहे. हिच्या अखेर परिणामावर बऱ्याच गोष्टींचा उलगडा होण्याजोगा आहे.

बेकीचा खेळ अथवा द्वंद्वसत्ता

किंवा

प्रजापतीची (हर्शलची) १९०५ ते १९१२ पर्यंतची मकरस्थ कारकीर्द

तिचे हिंदुस्थान–शरीर व त्याचें मन महाराष्ट्र या उभयतांवर काय परिणाम होत आहे हें खालील द्वंद्व–तक्त्यावरून सहज दिसून येईल. महाराष्ट्रदेश या शब्दानें–मराठी भाषा बोलणारांचीं मूलस्थानें असें धरिलेलें आहे.

द्वंद्व–तक्ता

हिंदुस्थान

राजकीय—व्हाईसराय लॉर्ड कर्झन यांची दुबार कारकीर्द.

पूर्व-१९००–१९०५ व उत्तर–१९०५–१९०७

महाराष्ट्र

एजंट कर्नल फेरिस यांची दुबार कारकीर्द [कोल्हापूर सं]

पूर्व–२० वर्षांपूर्वीची व उत्तर–नुकतीच संपलेली.

हिंदुस्थान

एकाच कारकीर्दीत दोन गव्हरनर्स. १ ले लॉर्ड लॅमिंग्टन व दुसरे सरजार्ज क्लार्क.

महाराष्ट्र

एकाच कारकीर्दीत दोन शिष्यस्वामी [सं. संकेश्वर] १ ले ब्रह्मनाळकर व २ रे मिरजकर

हिंदुस्थान

देश—बंगालची फाळणी. १ ला पूर्व बंगाल व २ रा पश्चिम बंगाल.

महाराष्ट्र

खानदेश जिल्ह्याची फाळणी. १ ला जळगांव व २ रा चाळीसगांव

हिंदुस्थान

व्यापार—१ परदेशी व २ रा स्वदेशी.

महाराष्ट्र

वर्ण—१ ब्राह्मण व २ मराठे [कोल्हापूर]

हिंदुस्थान

शिक्षण—१ सरकारी शिक्षण व २ रा राष्ट्रीय शिक्षण.

महाराष्ट्र

वर्क—१पुराणोक्त कर्म व २ रा वेदोक्त कर्म [कोल्हापूर]

हिंदुस्थान

राष्ट्रीय सभा—१ सवाळपक्ष व २ रा जहालपक्ष

महाराष्ट्र

लोकसभा—१ लोकवर्ग व २ रा अधिकारीवर्ग

हिंदुस्थान

सभास्थान—१ प्रथम नागपूर व नंतर सुरत.

महाराष्ट्र

समर्थ विद्यालय—प्रथम कोल्हापूर व नंतर तळेगांव [कोल्हापूर]

हिंदुस्थान

अध्यक्ष—१ घोस व २ लजपतराय

महाराष्ट्र

जैनस्वामी—१ गुरुस्वामी व २ शिष्यस्वामी [कोल्हापूर]

हिंदुस्थान

वर्तमानपत्रें—१ जगद्वृत्त व २ रें राष्ट्रमत.

महाराष्ट्र

कोल्हापूर [ने. ज. लायब्ररी] १ मोडकपक्ष व २ तोतयापक्ष

हिंदुस्थान

नाणें—[अ] १ लें ब्रांझ फुटूं लागलें ह्मणून २ रें नवीन मिश्रणाचें केलें. [ब] राजे एडवर्ड यांच्या शिक्याचा पहिला रुपया उजव्या मुखवट्याचा व २ रा हल्लीचा डाव्या मुखवट्याचा चालू आहे.

महाराष्ट्र

दत्तक—ताईमहाराज दत्तक. १ ला कोल्हापूर व २ औरंगाबाद

हिंदुस्थानाबाहेरील द्वंद्वें.

अफगाणिस्थान—अमीरास त्याचा भाऊ प्रतिस्पर्धी झाला.

इराण—शहा व पार्लमेंट या उभयतांमध्यें बेकी सुरू झाली.

पत्रव्यवहार.

[१]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

रा. टिळकांस ६ वर्षांची शिक्षा झालेली ऐकून ज्योतिष्यांनीं केलेलीं भविष्यें चुकलीं असें ह्मणण्याचा बहुतेकांचा रोंख दिसतो. मीं आपल्या ता० १ जुलईच्या पत्रव्यवहारांत रा. टिळकांच्या कुंडलीचें विवेचन करितांना स्पष्ट झटलें आहे कीं, एप्रिल १९०९ पर्यंत दशेचा पहिला झटका आहे. व त्या नंतरचीं २ वर्षेंही चिंता उत्पन्न करण्यासारखीं आहेत. ह्मणजे त्यांस या दशेंत २ वर्षें व ९ महिने या पेक्षां जास्त त्रास नाहीं. अर्थात् त्यांची सुटका या कालावधींत व्हावी असें ग्रह दर्शवितात. मग ती कोणत्या कारणांनीं कां असेना? कदाचित् ९ महिन्यांनींच सुटका व्हावी असाही संभव दिसतो. पण तें खात्रीनें सांगतां येत नाहीं.

आतां, त्यांस कांहीं शिक्षा न होतां या आरोपांतून ते अजीबात सुटतील ह्मणून कित्येकांनीं भविष्यें केलीं होतीं तीं मात्र चुकलीं खरीं. शत्रुस्थानांत सहा ग्रह सध्या आले असून समोर हर्शल व शनीची वर्तुलपाद दृष्टि असा योग असतां त्यांची सुटका होईल असें ह्मणणें अशक्य होतें. वास्तविक शत्रुस्थानीं दशग्रहां पैकीं **सहा** ग्रह आले असतां व त्यावर वरील प्रमाणें दृष्टि असतां सहा महिने किंवा सहा वर्षें तरी असावीं असा कुंडलीवरून बोध होऊं शकेल! शिवाय ही दशा नवमस्थानांतील व इंग्रजी ज्योतिषाप्रमाणें नवम स्थानावरून वाहन, गमन किंवा दूरचा प्रवास यांचा बोध होतो. ह्मणून त्यांस कोठें तरी लांबचा प्रवास घडेल

असाही बोध होतो. एतावतः ग्रह जें दर्शवितात तें बरोबर रीतीनें वर्तविणें ज्याच्या त्याच्या योग्यतेवर अवलंबून आहे. ही शास्त्राची चूक नाहीं. कळावें.

आपला
'सालोमन'

---

[२]

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्त्ते यांस.—

सा. न. वि. वि.—ता. २१ जुलईच्या अंकांत लग्नीं शनि असल्यामुळें वक्रगति माणसांच्या कुंडल्या मागितल्या आहेत. त्या प्रमाणें खालील कुंडल्या पाठवीत आहें.

सायन



लग्नीं शनि वक्री आहे. हा मनुष्य वक्रगतीनें चालत नाहीं. पण चालतांना पावलें वांकडीं टाकितो. जन्मतः अशी स्थिति आहे.

खालील कुंडलींत लग्नीं शनि नसून राहु आहे. हा मनुष्य मात्र ता. २१ जुलईच्या अंकांत मागितलेल्या खुलाशाप्रमाणें वक्रगति म्हणजे डाव्या अंगावर थोडा भार टाकून चालतो. पाय हलके पडतात. मांड्यांत लुलेपणा आहे. १५ वर्षांपूर्वी ज्वराचा मोठा आजार होऊन अशी स्थिति प्राप्त झाली आहे.

सायन.



* * * *

पर्जन्यसंबंधें आपण केलेलें भविष्य बरेंच जमत आहे, याबद्दल साभिमान आनंद वाटतो. ज्योतिःशास्त्राची आजकालची स्थिति अशी आहे कीं, जुन्या ग्रंथास हात न लावतां अनुभविक नवीन नियम तयार करून त्यावरून भविष्यें वर्तविलीं तीं जशीं अनुभवास यावीं तशीं आलीं नाहींत. माझे भविष्याचा मुख्य मुद्दा गुरु, मंगळ रवि यांची युति, एका राशींत बरेच दिवस राहणें व त्यांचा सिंह राशींत योग हा होता. ग्रंथाधारें पाहून हें मीं केलें होतें. आपण सुचविलेले विचार बरोबर लागू पडतात. असो. यावर बराच प्रयत्न केला पाहिजे.

* * *

लो. टिळकांच्या संबंधें हजारों ज्योतिष्यांनीं भविष्यें केलेलीं खोटीं ठरलीं. एकाचेंही खरें झालेलें नाहीं. ह्यावरून या शास्त्राची किल्ली मनुष्य प्राण्याच्या हातीं देण्याची ब्रह्मदेवाची इच्छा दिसत नाहीं. कालचक्र या सदराखालील आपले विचार चांगले आहेत.

* * *

कित्येक नाम ज्योतिषी ऊर्फ नामजोशी लोक स्वतः शास्त्रावर अर्धवट प्रयत्न करून भविष्यें वगैरे प्रसिद्ध न करितां दुसऱ्याच्या चुका काढण्यांत तयार व टपलेले असतात व आहेत. स्वतः शास्त्रावर मेहनत न घेतां दुसऱ्या प्रयत्न करणाऱ्या लोकांस नांवें पाडण्याचा त्यांना अभिमान वाटतो. स्वतःकडून मेहनत होत नाहीं व तितकी बुद्धिही नाहीं. ह्याबद्दल लज्जा प्रदर्शित न करतां दुसऱ्यास नांवें देणें व त्यांच्या प्रयत्नावर टीका करणें मूर्खपणाचें आहे. टीका करण्याचा अधिकार ते जेव्हां आपले लेखी विचार समाजापुढें पूर्ण प्रयत्न करून मांडतील तेव्हांच त्यांस प्राप्त होणार आहे, एरवीं पोंचत नाहीं.

कळावें लोभ असावा हे विनंति.

गणेश दामोदर ग्रंथे.

रा. ग्रंथे यांनीं पाठविलेल्या दोन्ही कुंडल्या वर प्रसिद्ध केल्या आहेत. परंतु त्यांत २१ जुलईच्या अंकांत ज्या प्रकारची मागणी केली होती त्या प्रकारच्या त्यांस मिळाल्या नाहींत असें वाटतें. एक पाय निर्जीव झालेल्या मनुष्यांच्या कुंडल्या पाहिजे आहेत. एकाच धर्माच्या जर अनेक कुंडल्या मिळतील तरच सामान्य नियम आढळूं शकेल. नं. २ ची कुंडली कांहीं अंशीं तशा प्रकारची असली तरी ती पूर्णत्वानें लागू पडणारी नाहीं.

[सं. कुं. वि.]

---

[३]

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

वि. वि.—वालील मजकूर प्रसिद्धीसाठीं पाठवीत आहें. त्यास येत्या अंकींच स्थल मिळावें. श्रीयुत घोलपांनीं आपले फ. ज्यो. त. कांहीं कुंडल्या प्रसिद्ध केल्या असून संपादकांनीं त्यावर टीका केली आहे. त्याच कुंडल्या सायन केल्यास अनुभवास कशा उतरतात हें येथें दाखवीत आहें.

जन्म—शके १७९९ फाल्गुन कृ. सोमवार

सू. नं. घ. ५५ प. २०

निरयन

सायन

सायन ग्रह रा. जीवनराव चिटणीस यांच्या पुस्तकावरून केले त्यांचे अंश.—रवि—मीन१८ चंद्र—धनु२ मंगळ—मेष२० बुध—मेष३ गुरु—कन्या२९ वक्री शुक्र—मीन२६ शनि—कुंभ९ राहु—वृषभ७ हर्शल—सिंह२ नेप्च्यून—वृषभ२६

द्वादशभाव

लग्न—कुं.	१४	जाया—सिंह.	१४
धन—मी.	१६	मृत्यु—क.	१६
सहज—मे.	२१	धर्म—तु.	२१
सुख—वृ.	२१	कर्म—वृ.	२१

सुत–मि.	१६	आय–धं.	१६
रिपु–क.	१६	व्यय–म.	१६

यावरून भावचलितांत बुध व मंगळ द्वितीय स्थानीं, राहु व नेपच्यून तृतीय स्थानीं, हर्शल षष्ठ स्थानीं व चंद्र दशमांत या प्रमाणें ग्रह बसतात. (सायन कुंडली मांडून पहा)

श्रीयुत घोलप यांचा शेरा—लग्नक्षेत्रीं शनि, चतुर्थांत स्वक्षेत्रीं मंगळ व पराक्रमीं उच्च शुक्र हे धाडसपणास कारण झाले. व विशेष शुक्र पराक्रमीं उच्च, गुरूनें (विद्याकारक ग्रहानें) दृष्ट सबब शास्त्रास हार न जाणारा. तृतीय, नवम व एकादशांत शुभ ग्रह असल्यानें मनसोक्त आचरण व वृक्षावरून कसरत करणें. दशमावर शनि-मंगळांची दृष्टि ह्मणून पितृद्वेष्टा. केंद्रांत पाप ग्रह असून चतुर्थ स्थानीं शुक्राच्या द्वितीय स्थानीं ह्मणून दत्तक लग्नीं शनि ह्मणून स्त्रीव्यभिचारी.

आतां, सायन कुंडली काय दर्शविते पाहूं—लग्न शास्त्रीय राशीचें असून त्यांत शनि. बुध व शुक्र हे मनाची विद्वत्तादर्शक जें धर द्वितीय स्थान त्यांत, शास्त्रीय रास जी कन्या तींत गुरु, चंद्र–हर्शल व बुध यांत नवपंचम योग. असे योग झाले असतां मनुष्याची कल्पकता व विद्वत्ता कशी असली पाहिजे? या योगावर जन्मलेलीं माणसें जन्मतःच मोठीं धूर्त व विद्याव्यासंगी असतात. आणि त्यांचे प्रश्न विद्वानांस सुद्धां सुटत नाहींत.

पराक्रमासंबंधी पाहिलें असतां या स्थानांत तीन पाप ग्रह आहेत. मंगळ स्वगृहींचा असून राहुयुक्त आहे. येथें निरयन कुंडलीपेक्षां अनुभव जास्त पटतो. असा योग ज्याचे कुंडलींत झाला असेल आणि तो धाडसी नसेल तर तें एक आश्चर्य होईल!

दत्तकासंबंधानें आपले दाशाहिकांत प्रसिद्ध झालेले नियम येथें लागू पडत आहेत. सिंह राशींत पाप ग्रह, नवम व दशम स्थानें पापदृष्ट. सूर्याचे व मातृस्थानचे अधिपतीचे द्वादश स्थानांत पाप-ग्रह आहेत. चंद्राचे अष्टमांतही पाप ग्रह आहेत. शनि चतुर्थ व दशम स्थानास वर्तुलपाद [९० अंश दृष्टीनें पाहत] आहे.

कन्येंत गुरु अष्टमांत वक्री असून नवम स्थान पापदृष्ट आहे त्यामुळें साधूंचा द्वेष्टा होणें संभवतें.

स्त्री पित्र्याशीं रत होते, ह्याचें कारण फक्त शनि लग्नीं आहे असें दाखविलें आहे. हें कसें संभवतें? शनि लग्नीं किंवा सप्तमांत असल्यानें त्या मनुष्याची स्त्री व्यभिचारी होते काय? असा शनि अनेकांच्या कुंडल्यांत असेल पण अनुभव तसा येणार नाहीं. या वरून स्त्री व्यभिचारी होण्याचें कारण दुसरेंच कांहीं असलें पाहिजे.

* * *

ग्रह कुंडलींत कसे आहेत ह्मणजे स्वगृहींचे किंवा उच्च हें तळ-हातावरून जास्त चांगलें समजतें, असा अनुभव आहे. ह्मणून असें वाटतें कीं, ज्योतिष शास्त्राचा अभ्यास करणारास सामुद्रि-काची माहिती असली असतां लग्न व ग्रह कसे आहेत हें कळतें ह्मणून अनुभवास जास्त पटलेली सामुद्रिकाची माहिती खालील प्रमाणें पाठवीत आहें.

प्रत्येक बोटा खालचा उंचवटा जसा असेल त्या प्रमाणें ग्रह असतात. उंचवटा विशेष असेल तर तो ग्रह पीडित असतो. उंचवट्यावर जास्त रेखा नसाव्या. बोटाखालचा भाग जर खोल-गट असेल तर तो ग्रह पीडित स्थितींतच असेल.

आंगठ्या खालील उंचवटा शुक्राचा. तर्जनीखालील गुरूचा मध्यमे खालील शनीचा. अनामिके खालील सूर्याचा व कनिष्ठिके खालील बुधाचा. शुक्राचे समोरील व तळहाताचे शेवटला मनगटाजवळील भाग चंद्राचा असतो.

* * * *

अयनपरीक्षा

उत्तरायणांतील मनुष्याचे १ जोडे समान असतात. २ मिशा कलेदार व उभ्या आहेत अशा दिसतात. ३ लघवी उजवे बाजूला पडते. ४ इंद्रिय लहान अतसें. याचे उलट स्थिति दक्षिणायन दर्शविते.

पक्ष

शुक्ल पक्षांत जन्म असतां डाव्या जोड्याचे वरचा भाग दुसऱ्या पेक्षां नरम असतो. आंगठ्यावर दोन ओळी दिसतात. शेक हँड करितांना तळव्याजवळ ओलावा लागतो. कृष्ण पक्षांत याच्या उलट स्थिति असते. उजवा खांदा चकचकीत दिसला तर शुक्ल पक्ष. डावा दिसला तर कृष्ण पक्ष.

दिवसरात्र

१ उजव्या हातावर डाव्या पेक्षां रेषा स्पष्ट दिसत असतील तर जन्म दिवसाचा. डाव्या हातावरील स्पष्ट दिसतील तर जन्म रात्रीचा

२ ज्याचे डोळे रागावलेल्या मनुष्या सारखे दिसतात त्याचा जन्म दिवस उजाडतां किंवा दिवस मावळतां असतो.

" यशवंत प्रधान "

पत्रव्यवहार.

[१]

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते वंस—

सा० न० वि० वि०—पावसासंबंधानें अनुभविक माहिती पाठवित आहें. स्थल मिळावें.

सायन पुनर्वसु नक्षत्र लागल्यावर ज्या दिवसापासून चंद्र मेष राशींत प्रवेश करितो त्या सुमारापासून खऱ्या बरसातीस सुरवात होते.

सन	सुरू तारीख	चंद्र
१९०३	जून ता. १८	मेष १८
१९०४	" १९	" १८
१९०५	" २५	" २५
१९०६	" १०	" १४
१९०७	" १२	" ६

आजपर्यंतचे एकंदर पर्जन्याचे अनुभवावरून पाहतां चंद्र मेष राशीपासून तूळ राशी अखेर असे पावेतों पर्जन्य मुख्यतः बरा पडतो. योगप्रतियोगाविषयीं विचार निराळा आहे.

सिंह राशीचा मंगळ सन १९०४ मध्यें ता० १५ आगष्ट ते ता० २ अक्टंबर पर्यंत होता. त्यांत ता० ६ सपटंबरपर्यंत पर्जन्य नव्हता. ता० २८ आगष्टपासून ता० १२ सपटंबरपर्यंत चंद्र विषुवाच्या उत्तरेस होता. परंतु ता० ७ ते १२ ह्या पांच दिवसच वृष्टि झाली आहे. इतर दिवशीं नाहीं. आगष्टमध्यें मंगळाबरोबर रवि होता.

सन १९०६ त सिंह राशीचा मंगळ जुलै ता० २८ ते ता० १३ सपटंबर पर्यंत होता. यांत चंद्र विषुवाच्या उत्तरेस आगष्ट ता० ८ ते २२ व सपटंबर ता० ४ ते १८ पर्यंत होता. त्यांत म्हणण्यासारखा पाऊस पडला त्या तारखा जुलई २९।३१, आगष्ट ११।१८।२०।२६।२७।३०।३१, सपटंबर ता० ५।६।७. या वर्षी कर्क राशीवर मंगळ ता० १२ जून ते ता० २७ जुलईपर्यंत होता. त्यांत खालील तारखा खेरीज करून अतिवृष्टि झाली. जून १४।२८, जुलई ६।७।८।११।१२।१३।१५. या महिन्यांत

कर्क राशीवर गुरु असल्यामुळें जास्त पर्जन्य झाला हें दुसरें कारण होय. सारांश, सिंहेच्या मंगळावर कमी पडला.

गुरूचा उदय व शुक्राचा अस्त असतां १९०७ सालीं मंगळ उत्तर गोलार्धांत नसतांही आगष्ट महिन्यामध्यें जुलई २७ ते आगष्ट १८ पर्यंत अखंड वृष्टि झाली. गुरु ता० १९ आगष्ट रोजीं सिंहेंत गेला. या दिवसापासून पर्जन्य मंदावून ता० २७ पासून अगदीं गेला.

सन १९०८ आगष्ट ता. १ चे अंकांत मीं भविष्य करितांना ता.२३-जुलई ते ता. २१ आगष्ट पर्यंत वृष्टि फार होईल असें वर्तविलें आहे. त्यांत ता. २ आगष्ट पर्यंत व पुढें ता. १५ पासून चंद्र उत्तर गोलार्धांत भ्रमण करीत आहे हा विचार त्या वेळीं न झाल्यानें भविष्य चुकण्याचा संभव आहे. वरील १९०४ व १९०६ मधील मंगळ सिंह राशींत व १९०७सालीं गुरु सिंह राशींत असतांना जसा अनुभव आला त्यावरून सन १९०८ मध्यें भविष्य केलें होतें.

सन १९०३ मध्यें मंगळ क्रांति ता. ७ आगष्ट रोजीं त्याची वृष्टि ता. २।३।४।५।९ सप्टंबर २३ रोजीं त्याची वृष्टि ता. १९।२०।२४।२८ शुक्र अस्त ता. ९ सप्टंबर रोजीं त्याची वृष्टि ता, ३।५।६।१०।११ सन १९०४ मध्यें मंगळ क्रांति ता १ जुलई रोजीं त्याची वृष्टि ता. २।३।४।६ सन १९०६ मध्यें गुरूचा उदय ता. २८ जून रोजीं त्याची वृष्टि तारिख २५।२६।२७।२९।३० ता. १ जुलई २।३।४।५ मंगळ क्रांति ता १२ जून रोजीं त्याची वृष्टि ता. १०।११।१३।१५ ता. २८ जुलई रोजीं त्याची वृष्टि ता. २५।२६।२७।२८।२९।३१ व ता. १ आगष्ट ता. १३ सप्टंबर रोजीं त्याची वृष्टि ता. ११।१२।१४।१५ येणेंप्रमाणें पर्जन्यवृष्टि झाली आहे. सन १९०५ साला पुरता मात्र अनुभव येत नाहीं.

सन १९०४ मध्यें मंगळ व गुरु विषुवाच्या उत्तरेस असून १९०३ पेक्षां पर्जन्य कमी झाला आहे. सन १९०६ मध्यें मंगळ व गुरु दोन्हीही विषुवाच्या उत्तरेस होते म्हणून व कर्क राशींत असतांना अतिवृष्टि होऊन एकंदर वृष्टि ४८ झाली. १९०७ मध्यें गुरु कर्क राशींत असूनही मंगळ दक्षिणगोलार्धांत असल्यामुळें २७ झाली.

गणेश दामोदर प्रंथे.

---

[२]

वि. वि.—देवराष्ट्रें येथील एका मुलाचा जन्म तारीख १३ जुलई सन १९०८ रोजीं सकाळीं ८ वाजून २० मिनिटांनीं झाला.

निरयन



जन्मकाळीं शनि अष्टमस्थ असून गुरु व्यय स्थानीं आहे. मंगळ द्वादश स्थानीं आहे. शनीचे दृष्टींत चंद्र आहे. या प्रमाणें ग्रह अनिष्ट आहेत. मूल दोन दिवस चांगलें होतें. ता. १९ जुलई रोजीं सकाळीं चंद्र षष्ठ स्थानीं शत्रुगृहीं आला असून मंगळाचे दृष्टींत आला. षष्ठ स्थानावर रोगाचा विचार करितात. या दिवशीं मुलाचे पोटांत रोग उत्पन्न होऊन मूल १६ दिवस आजारी होतें. ता. २८ जुलई १९०८ रोजीं सकाळीं चंद्र व्यय स्थानीं असून मंगळाजवळ आला. चंद्र हा पाप ग्रहानें दूषित झाला. या गोष्टींवरून सदरचें मूल मृत्यु पावलें, असा निरयन कुंडली •वरून बोध होत आहे. कळावें लोभ असावा हे विनंति.

महादेव गंगाधर कुळकर्णी

* या वेळेवरून सायन कुंडली तयार केली ती अशी आहे.—

सायन लग्न कुंडली



सायन भावचलित



सायन भाव.

लग्न सिंह २७		जाया कुंभ २७
धन कन्या २६		मृत्यु मीन २६
सहज तूळ २६		धर्म मेष २६
सुख वृश्चिक २८		कर्म वृषभ २८
सुत धनु २९		आय मिथुन २९
रिपु मकर २८	**सायन ग्रह**	व्यय कर्क २८
रवि कर्क २०	चंद्र मकर ८	शनि मेष १०
बुध कर्क ८ व.	हर्शल " १४व	
शुक्र कर्क ९ व.	गुरु सिंह १६	
राहू कर्क ४	मंगळ " ३	
नेप. कर्क १४		

जन्मकाळीं चंद्र व हर्शल हे एका राशीवर असून त्यांची त्याच दिवशीं सायंकाळीं ४ वाजून २२ मि. नीं **अभेद** युति होणार होती. मृत्यु स्थानीं षष्ठेश शनि हा मंगळाच्या क्षेत्रीं अनिष्ट असा चंद्राला चवथा होता. आणि मंगळ हा व्यय स्थानीं चंद्राला ८ वा होता. चंद्रासमोर त्याचे शत्रु जे बुध व शुक्र तेही होते. याप्रमाणें या कुंडलींत चंद्र सर्व प्रकारें बिघडलेला असल्यामुळें मूल अल्पायु झालें. ता. २८ जुलईला दिवसास १२ वाजून ५ मि. नीं रवि-चंद्रयोग होता व तो जन्मस्थ चंद्राच्या अष्टम स्थानीं जन्मस्थ मंगळाजवळच होता. यामुळें या दिवशीं त्याचा मृत्यु झाला. या प्रमाणें सायन कुंडली वरून बोध होतो. [संपादक] ' कुंडलीविज्ञान'

पत्रव्यवहार.

[१]

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

सा. न. वि. वि.—खालील मजकूर प्रसिद्धीसाठीं पाठवित आहें त्यास येत्या अंकीं स्थल मिळावें.

लग्नपरीक्षा

[१] ३।६।९।१२ या राशीवर मनुष्याचा जन्म झाला असेल तर तोंडवळा अंडाकृति असतो.

[२] मीन लग्नावर जन्मलेला मनुष्य बोलण्यापूर्वी हांसतो व त्याचे मांडीवर केश पुष्कळ असतात. [एकेका ठिकाणीं दोन तीन केश बाहेर पडतात.]

[३[१।५।९ राशीवर जन्म झाला असला तर डोळे पिंगट असतात.

[४] ४।८।१२ राशीवर जन्म झाला असला तर डोळे काळे असतात.

[५] मकर लग्न असेल तर डोक्याचा वरचा भाग मोठा असतो.

[६] कुंभ असेल तर डोकें चिंचोळें असतें.

[७] तोंडवळा वाटोळा असला तर लग्न बहुतकरून कर्क किंवा तूळ असतें.

[८] कर्क लग्न असेल तर छातीवर तीळ असून त्यांतून दोन किंवा जास्त केश बाहेर पडलेले असतात. कर्क लग्नाचा मनुष्य जर चालत असला तर एकदां इकडे पाहतो, एकदां तिकडे पांहतो व नजर नेहमीं वर ठेवितो. कोणीही मनुष्य त्याच्या जवळ बोलण्यास

गेला असतां त्याला एकदम उत्तर देत नाहीं. कर्क लग्नाचा मनुष्य अस्थिर असतो व त्याचें लक्ष एका गोष्टीकडे बराच वेळ लागत नाहीं.

[९] वृश्चिक लग्न असतां नजर क्रूर दिसते, केंस राठ असतात, डोक्याच्या पाठीमागल्या बाजूस टेंगळासारखा उंचवटा असतो.

* * *

वसंत ऋतूमध्यें (मेषवृषभ राशींवर रवि असतां) जन्म झाला असला तर त्याचे घामाला साधारण फुलासारखा वास येतो.

शुक्ल पक्ष कायम ठरल्यावर डोळ्याचे लहानमोठेपणावरून तिथी सांगावी.

डोळ्यांतील बाहुली जर बरीच मोठी असली तर जन्म पौर्णिमेच्या जवळ जवळ समजावा.

शुक्लपक्ष व कृष्णपक्ष यांची भानगड पडली असतां डोळे पहावे. उजवा डोळा जर डाव्या डोळ्यापेक्षां सतेज दिसला तर शुक्लपक्ष समजावा.

शेकह्यांड करितांना चारही बोटें लवलीं नाहींत तर रवीजवळ ४।५ ग्रह आहेत असें समजावें. तीन बोटें लवलीं नाहींत तर मंगळशुक्र रवीजवळ आहेत असें समजावें. हातास बराच ओलावा भासला तर चंद्र रवीपासून बराच दूर आहे असें समजावें.

* * *

शनीची रेषा अथवा दैवरेषा जर स्पष्ट हातावर दिसत नसेल तर तो सायन अग्निराशींत आहे असें समजावें. (ही रेषा तळहातामधून बरोबर शनीचे उंचवट्यावर जाते. ही कधीं कधीं तळहाताचे मधून न निघतां चंद्राचे उंचवट्यावर निघते. शुक्राच्या उंचवट्यावरून जी

रेषा असते तीस आयुष्यरेषा म्हणतात. कधीं कधीं शनीची रेषा ह्या रेषेमधून निघते व वर जाते.)

उजव्या पायाचे तळव्यावर जर चंद्राकृति चिन्ह असेल तर तो पृष्ठ स्थानांत आढळतो व डाव्या पायाचे तळव्यावर असला तर अष्टमांत आढळतो.

* * *

ग्रह व राशि यांचा मनुष्याचे अक्षरावर परिणाम होतो, असें अनुभवास येतें. अक्षराचें वळण कुंडलींतला बलिष्ठ ग्रह व उदित लग्न ह्यांचे मिश्रणाचें असतें. प्रत्येक कुंडलींत बहुतकरून एक अथवा अनेक ग्रह राजासारखे अंमल चालविणारे असतात, त्यास रूलींग प्लॅनेट असें इंग्रजींत म्हणतात.

लग्नांत उदित होणाऱ्या ग्रहाचाही अक्षरावर परिणाम घडतो. पुढील खेपेस इंग्लिश ग्रंथाधारें कोणत्या ग्रहाचें कसें अक्षर असतें तें देण्याचा विचार आहे.

* * *

कुंडल्यांचा संग्रह कसा करावा ह्याबद्दल थोडें लिहितों. मी ह्याच प्रकारें संग्रह करीत आहें.

जन्मठिकाण, वेळ, सन, तारीख, आयुष्यांतील कांहीं महत्वाच्या गोष्टी, व्यंग, रोग, मातृपितृसुख, भावंडें, घरची स्थिति, बापाची योग्यता. दोन्ही हाताचे चांगले ठळक असे ठसे. त्याच्या हातच्या एकदोन ओळी. आंगठ्याचा स्वतंत्र ठसा घ्यावा. सामुद्रिकांत आंगठ्यास फार महत्व दिलें आहे. निरनिराळ्या लग्नाच्या खुणा गुरूचे

उंचवळ्यावर दिसतात. कुंभ व मकर लग्नाची हातावर कांहीं खुण दिसत नाहीं, असें संग्रहावरून दिसतें. हातावरील रेषा १८ वर्षांचें वय होईपर्यंत पूर्णत्वास आलेल्या नसतात.

कळावें लोभ असावा हे विनंति.

नादी

यशवंत प्रधान

---

[२]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांसः—

विनंति विशेष. मीं आपल्या दाशाहिक पुस्तकास वर्गणीदार नाहीं. तथापि आपल्या पुस्तकाचे पहिल्यापासून कांहीं अंक वाचल्या वरून सुचलेले विचार आपणांस कळवित आहें, त्याचा विचार व्हावा

कुंडलीविज्ञान पु. २ अंक ५।६ पृष्ठ २८ येथें " नानासाहेब पेशवे " यांची कुंडली दिली आहे. पण हे ' नानासाहेब ' ह्मणजे पहिल्या बाजीरावाचे पुत्र बाळाजी बाजीराव किंवा दुसऱ्या बाजीरावाचे पुत्र धोंडपंत (प्रसिद्ध बंडवाले) तें स्पष्ट सांगितलेलें नाहीं. पंचांगांत पाहतां त्या कुंडलीवरून जन्मकाल वैशाख व० १४ शके १७४७ च्या सुमाराचा आहे. यावरून ती कुंडली प्रसिद्ध बंडवाले नानासाहेब यांचीच ठरते.

' मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ' खंड २ पृष्ठ ४६ येथें पहिले नानासाहेब (बाळाजी बाजीराव) पेशवे यांची कुंडली (स्पष्ट ग्रहांसहित) दिली आहे ती अशी.—

जन्मकाल—मार्गशीर्ष वद्य १३ युक्त १४ शके १६४३
सू. नंतर घ० ४१ प० ५२



कुंडलीविज्ञान पु० ३ पृ० १० येथें पेशव्यांच्या कुंडल्या दिल्या आहेत त्यां बरोबर ही कुंडली वाचून पाहिली असतां पहिल्या चारही पेशव्यांच्या कुंडल्या वाचकांस ताडून पाहतां येतील. कळावें हे विनंति.

महादेव रावजी भांडारकर
शिक्षक—रत्नागिरी हायस्कुल

---

[३]

विद्वद्वर्य कुंडलीविज्ञानकर्ते यांसः—

वि. वि.—इकडून टिळकांच्या कुंडलीचें जोशीबुवांनीं केलेलें वर्णन अवलोकनास पाठविलें आहे. त्याची पोंच आपले जगमान्य पुस्तकांत मिळाल्यास इतकी मेहनत केल्याचें चीज होईल. निराशा न व्हावी.

" गोब्राह्मणप्रतिपालक नामदार बाळ गंगाधर टिळक वास्तव्य शहर पुणें यांसीः—

शुभचिंतक सीताराम हरी गायधनी वास्तव्य हातगड ता. कळवण जि० नासीक यांचा कृतानेक सा. नमस्कार व अनेकोत्तम आशीर्वाद वि०— आपलेवर संकट आल्याचें वर्तमानपत्रद्वारें समजल्यावरून

प्रजालोक अत्यंत दुःखित झाले. त्यांत मीही एक गरीब मनुष्य उभय नेत्रांनीं अंध असून अत्यंत लहान गांवांत कोंकणांत राहत आहें. मीं द्रव्यानें किंवा विद्वत्तेनें प्रबल नाहीं. माझे मनांत अशा जगपालक पुरुषास एवढें मोठें संकट उत्पन्न होण्याचें कारण काय असावें व या पुरुषाचें ग्रहमान कोणत्या तऱ्हेचें असेल असे मनांत आल्यावरून त्यांची कुंडली कोणाजवळ आहे काय असा तपास करितां माझें कुलदैवत लक्ष्मीकांत याचे कृपेनें आमचे गांवी ता. १ जुलई १९०८ रोजीं बदलून आलेले शाळामास्तर चि. विष्णु आबाजी कुळकर्णी हे तेथें बसले असतां झणाले कीं लो. मा. टिळक यांची कुंडली मजजवळ आहे. ती कुंडली मीं घेऊन विचार करितां ग्रहदशेचें मान उत्पन्न झालें तें कळवितों.—

जन्मलग्नाचे व्ययस्थानीं शनि बसला असून तोच हल्लीं राशिचक्रांत तनूला बसला आहे. व तो राशीच्या व्यय स्थानावर वक्रदृष्ट्या अवलोकन करीत आहे. या मुळें लग्न व राशी या दोघांचे व्ययस्थानाचा अधिकार त्याचेकडे आला आहे. तो वक्री असून साडेसातींतला आहे. या तीन कारणांमुळें तो तनूला दुःखदायक होऊन अति दुर्धर संकट उत्पन्न झालें आहे असें मला वाटतें

दुसरें तोच शनि हल्लीं राशिचक्रांत तनूला आल्यामुळें तनूची रक्षणबाजू त्याचे कडेसच व जन्मकालीं तनूचे ठिकाणीं शुक्र आहे, हा स्त्री ग्रह असून तो लग्नांत केंद्रीं आहे. त्या शुक्र ग्रहास केंद्रींचा, शनि तनुवर्धक असा सामील झाला आहे. तस्मात् तनूची रक्षणबाजू शनिशुक्राचे मित्रसख्यांत उत्तम तऱ्हेनें रक्षण झाली पाहिजे. शुक्र शत्रुगृहींचा पडला असून तो रवियुक्त आहे. यामुळें प्रतिपक्षाकडून जय मिळविण्यास विलंब मात्र लागेल. पण माझें अनुमान असें कीं, टिळक हे अगदीं निर्दोष मुक्त झाले पाहिजेत. शुक्र हल्लीं कुंडलीचे

व्ययस्थानीं आला असून अस्तंगत होता. यामुळें तो संकटनाशक हल्लीं नव्हता.

आतां शुक्र राशीचे चतुर्थ स्थानीं केंद्रीं उदयान्वित असून मित्रगृहीं आला. यामुळें गृह, ग्राम, चतुष्पाद, मित्र व माता असें सौख्य देण्यास प्रवर्तक झाला. या ठिकाणीं टिळकांचे प्रतिवादी मातेचे ठिकाणीं मानले आहेत. या करितां त्यांना यश मिळालें पाहिजे.

रवि हा लग्नीं शुक्रयुक्त असल्यामुळें शुक्राची बाजू सव्य व रवीची अपसव्य अशी ओढाओढी आहे. यामुळें रवि हा तनूला मनोभंग व मानहानि इत्यादि तापत्रय देईल. परंतु शुक्र शनि हे सामील असल्यामुळें नामदार टिळक हे संकटमुक्त होतील. बुध हा जन्मलग्नाचे व्ययस्थानीं स्वगृहीं बसला आहे. तो शुभदायक असून स्त्रीग्रह आहे. तरी तो संकटाचा परिणाम वाईट होऊं देणार नाहीं, असें माझें गरीब आंधळ्याचें मत आहे.

जन्मकुंडलींत भाग्यस्थानीं गुरु स्वगृहीं शसून तो चंद्रयुक्त आहे उभयतांचें मित्रसख्य आहे. चंद्राची दृष्टि पराक्रमावर येत असून गुरु तनूवर व पंचम स्थानावर अवलोकन करीत आहे, तो गुरु हल्लीं धनस्थानीं सिंहेंत येऊन लग्नाचे दशमावर पूर्ण दृष्टीनें अवलोकन करीत आहे. यामुळें बुद्धि प्रकाशरूप होऊन वाक्सरस्वतीचें प्रसन्नरूपानें योग्य असें भाषण होऊन ते निर्दोष सुटतील.

राशीश गुरु हा षष्ठ स्थानीं पडला असून राज्यस्थानावर पूर्ण विलोकित आहे. यावरून शत्रु वर्धमान दर्शेत आणून शेवटीं त्यांच्या पासून यश देणारही तोच आहे. त्याची दशमावर पूर्ण दृष्टि आहे हा योग मात्र आमचे मतें साधारण दुःखदायक आहे. या करितां नामदार टिळक यांचे कुटुंबाकडून जर शनि व रवि यांची आराधना झाली तर लवकर संकटाचा नाश होईल.

हल्लीं मंगळ हा कर्क राशींत रवियुक्त होऊन त्यांचें मित्रत्व आहे. यामुळें देहास अतिशय ताप व महान् क्रूर असें दुःख दिलें आहे. परंतु न्याय देते वेळीं राशीच्या पराक्रम स्थानीं व कुंडलीचे लाभस्थानीं असा चंद्र असून तो उच्चींचा आहे. हाच चंद्र भाग्य-भुवनीं गुरुयुक्त आहे. दुसरें सिंह राशीचे ठिकाणीं श्रावण अखेरीस गुरु, मंगळ, रवि, बुध असे चार ग्रह आले आहेत. यामुळें तंट्याची ओढाताण फार योईल. पण त्यांस यश मिळालें पाहिजे "

विष्णु आबाजी कुळकर्णी

---

[४]

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

प्रेमपूर्वक नमस्कार वि. वि.—शनि मेष राशींत आल्यापासून जगांत शांतता नांदत नसून तें राष्ट्रीय चळवळ वगैरे गोष्टींत निमग्न झालें आहे. असा शनि असतां मागें येणेंप्रमाणें गोष्टी घडल्या आहेत.

१५२६—पानिपतची पहिली लढाई.
१५५६— " दुसरी "
१६७२—७४—शिवाजीच्या विजापूरकरांशीं लढाया.
१७०१-०३-राजारामाचे मरणानंतर औरंगजेबाचा मराठ्यांस त्रास
१७३१—बडोदें डभईची लढाई
१७३३—बुंदेलखंडावर स्वारी.
१७६०—उदगीर, वांदिवाश येथील लढाया.
१७६१—पानिपतची तिसरी लढाई.
१७६३—पाटणाचें बंड
१७९०—९२—ह्वैसूरचें तिसरें युद्ध.
१८४९—५१—शीख लोकांबरोबर दुसरें युद्ध.

१८७८—१८८०—अफगाणिस्तानशीं लढाई.

मेष, सिंह, धनु या अग्निराशी आहेत. ह्या राशींत ग्रह असतां युद्धास अनुकूल दिवस असतात.

सिंह राशींत शनि असतां घडलेल्या गोष्टी.

१६८३—औरंगजेबाची दक्षिणेंत स्वारी.
१७४०—४१—रघोजी भोंसल्याची बंगाल प्रांतावर स्वारी.
१७७०—७२—थोरल्या माधवरावाच्या हैदरअल्लीशीं लढाया.
१७९९-ह्वैसूरचें चवथें युद्ध.धनु राशींत शनि असतां घडलेल्या गोष्टी.
१७५१—अर्काटची लढाई. १७८०—ह्वैसूरचें पहिलें युद्ध.
१७७९—८२—मराठ्यांशीं पहिलें युद्ध१८३९—काबूलची लढाई.

हर्शल १८४३ ते १८५१ पर्यंत मेष राशींत कालपुरुषाच्या तनुस्थानीं होता, त्या कालीं घडलेल्या गोष्टी.—अफगाणिस्थानां-तील कत्तल. सिंध प्रांताच्या अमीराबरोबर लढाई. शीख लोकांब-रोबर पहिलें युद्ध व दुसरें युद्ध. हीं सात वर्षे सारखीं युद्धांत गेली आहेत.

मंगळ वक्री व अग्निराशींत असतां घडलेल्या गोष्टी.—

अर्काटची स्वारी—ता. २६ आगष्ट १७५१ मेषेंत वक्री.
ब्लाकहोल—ता. २० जून १७५६ सिंहेंत.
खर्ड्याची लढाई—ता. ११ मार्च्य १७९५ मेषेंत.
भरतपूरचा वेढा—ता. १० एप्रिल १८०५ सिंहेंत
अफगाणचें युद्ध—जानेवारी फेब्रूवारी. १८४२ मेषेंत.
सिंधची लढाई—फेब्रूवारी मार्च्य १८४३ धनेंत.
शीखांशीं पहिलें युद्ध—डिसेंबर जानेवारी १८४५ मेषेंत.
" दुसरें "—जानेवारी १८४९ धनेंत.

जानेवारी १७६१ मध्यें पानिपतचा घोर संग्राम झाला. या लढाई निमित्त मराठ्यांनीं १७६० च्या आरंभीं उत्तर हिंदुस्थानांत

प्रयाण केलें आहे. १७६० मध्यें मंगळ तूळ राशींत ३ महिने वक्री होता व शनि मेष राशींत ६ महिने वक्री होता. पानिपतच्या घोर संग्रामाच्या अगोदर सहा महिने उभय पक्षांत भयंकर चकमकी होत होत्या. हर्शल ह्या वेळीं मेषेंत होता.

पेशव्यांशीं शेवटचें युद्ध १८१७–१८ मध्यें झालें आहे. मंगळ ह्याही वेळीं मिथुनेंत ३ महिने वक्री होता.

या प्रमाणें जगांत अस्वस्थता असतां ग्रहस्थिति कशी होती व त्यावरून सामान्य अनुमान कोणतें निघतें यांची कल्पना होईल. मंगळ अतिचर गतींतही लढाईस कारण होतो. इतर लढाया अशा मंगळावर झाल्या आहेत.

कळावें लोभवृद्धि कीजे हे विनंति. गणेश दामोदर ग्रंथे

---

[५]

सा. न. वि. वि.—आपले दाशाहिकांत छापण्यासाठीं दोन योग पाठविले आहेत ते असे.—

योग १ ला

ता. ७।८।०८ रोजीं रात्रीं ८ वाजून २० मिनिटांनीं येथें भूकंपाचा धक्का बसला! तो सुमारें ४।५ सेकंद होता. हा भूकंप सुमारें दहा कोस झाल्याचें समजलें आहे, त्याचे पलीकडे कोठपर्यंत झाला हें कांहीं समजलें नाहीं. तेव्हां या संबंधी ज्योतिषचें काय मत आहे तें आपण किंवा दुसऱ्या कोणीं प्रसिद्ध केल्यास बरें होईल.

योग २ रा.

येथें राहणारे २ इसम हे ता. ११ रोजीं सकाळीं ९॥ वाजतां कांहीं कामासाठीं येथून सुमारें दोन कोसांवर एका गांवीं जात असतां वाटेंत एका विहिरीवर पाय धुण्याकरितां त्यांतील एक इसम उतरला.

तों त्याचा पाय निसटून तो आंत पडला. तेव्हां दुसरा त्याला काढण्याकरितां गेला, परंतु तोही आंत पडला! उभयतांसही पोंहावयास येत नव्हतें. इतक्यांत तिसऱ्याच एका इसमानें येऊन उभयतांना बाहेर काढिलें! नाहीं पेक्षां आणखी अर्ध्या मिनिटांनीं ते खचित बुडाले असते! त्यांचे जन्मकाल येणेंप्रमाणें आहेत. (१) शके १८०९ श्रावण शु० ८ गुरुवार घ. १७ प. २० (२) शके १८०९ आश्विन शु० ९ गुरुवार रात्रीं २८ घ. ९० प. क० हे वि०

सदाशिव रामचंद्र

(महागांव—बेळगांव)

---

* भूकंपाचें अमुकच एक निश्चित कारण सांगतां येत नाहीं. कित्येक स्थलें अशीं आहेत कीं त्या ठिकाणीं भूकंप मुळींच होत नाहीं तर कित्येक स्थळीं वर्षास होतात. जमिनींत गंधक, कोळसा वगैरे जे ज्वालाग्राही पदार्थ असतात त्यांतून निघणारा ग्यास कोणत्याही कारणानें पेट घेऊन भूकंप होत असतो. यावरून अग्निराशि व अग्निग्रह यांचा त्याच्याशीं कांहीं संबंध असावा अशी कल्पना होते. ज्या वेळीं अग्निराशींत अग्निग्रह असतील त्या वेळीं ज्या जमिनींत ज्वालाग्राही पदार्थ असतील त्या ठिकाणीं भूकंप होत असावे. आगष्ट मध्यें सिंह या अग्निराशींत रवि व मंगळ हे दोन अग्निग्रह असून त्यांची २२ व्या तारखेला युति होती. शिवाय गुरु व बुध हेही ग्रह याच राशींत आले आहेत. ७ व्या तारखेला रवि या राशींत १५ अंश असून मंगळ १९ अंश आहे. हे दोन ग्रह जवळ जवळ येत आहेत, अशा वेळीं आपली पृथ्वी त्यांच्या समोरून जात आहे हें उघड आहे. त्यामुळें तिच्यांतील एका स्थळीं ज्वालाग्राही ग्यासानें पेट घेतला व जमीन हादरली. याच महिन्यांत ता. १७ च्या सुमारास

दक्षिण अमेरिकेहून पोर्तुगाल, फ्रान्स व हालंड इकडे निघणाऱ्या २९९ उतारूंच्या अॅमस्टेलंड नांवाच्या डच आगबोटीवर आगीनें पेट घेतला. कॅपटननें आग विझविण्याचा शर्थीचा प्रयत्न केला. तथापि अखेरीस सहा असामी बुडाले! बाकीचे वचावले अशी खबर आली आहे. त्याच प्रमाणें विलायतेंत मेपोल नांवाच्या दगडी कोळशांच्या खाणींत भयंकर स्फोट होऊन ८० कामकरी जिवंत गडप झाले! अशा प्रकारच्या गोष्टी इतरत्रही घडत आहेत. हा सिंह राशींतल्या रविमंगळ युतीचा परिणाम असावा. या दोन ग्रहांची अग्निराशींत ज्या काळीं युति व्हावयाची त्या काळीं अशा प्रकारचा अपघाताच्या गोष्टी बऱ्याच ऐकूं यावयाच्या.

आतां दुसऱ्या योगाचा विचार करावयाचा. त्यांच्या जन्मकावरून सायन कुंडल्या केल्या त्या अशा.—

जन्म–श. १८०९ श्रा. शु. ८ जन्म–श. १८०९ आ. शु. ५
गुरु घ. १७ प. २० गुरु. रा. घ. २८ प.५०



स्पष्ट ग्रह		स्पष्ट ग्रह	
र–कर्क१	चं–तूळ७	र–तूळ०	चं–धनु१४
मं–मिथु२०	बु–सिंह२	मं–सिंह१७	बु–तूळ१०
गु–तूळ२६	शु–सिंह२१	गु–वृश्चिक२	शु–कन्या२७व.
श–कर्क२३	रा–सिंह१९	श–सिंह३	रा–सिंह१६
ह–तूळ८	ने–वृषभ१८	ह–तूळ१२	ने–वृषभ२९

द्वादशभाव			द्वादशभाव		
तनु तू.१३	जाया मे. १३		तनु कन्या १६	जाया मी १६	
धन वृ.१३	मृत्यु वृ. १३		धन तू. १५	मृत्यु मे. १५	
सहज ध.१३	धर्म मि. १३		सहज वृ. १६	धर्म वृ. १६	
सुख म.१३	कर्म कर्क १३		सुख ध. १७	कर्म मि. १७	
सुत कुं.१३	आय सिं. १३		सुत म. १७	आय क, १७	
रिपु मी.१४	व्यय क. १४		रिपु कुं. १७	व्यय. सिं. १७	

अपघाताच्या वेळेचे ग्रह.

रवि–सिंह १८	चंद्र–कुंभ ४	मंगळ–सिंह २१
बुध–सिंह ८	गुरु–सिंह२२	शुक्र–कर्क ८
शनि–मेष ९	राहु–कर्क २	हर्शल–मकर १३

नेपच्यून–कर्क १९.

प्रथमतः पहिली कुंडली पहा. हींत तनुस्थानीं चंद्र व हर्शल हे ग्रह जवळ जवळ असून जन्मकालानंतरच युति होती. ही युति अकस्मात् संकट सुचविते. अपघाताचे दिवशीं हर्शल हा चतुर्थ स्थानीं मकर या जलराशींत जन्मशनीच्या समोर आला आहे. आणि मंगळ हा जन्मशुक्राला जाऊन मिळाला आहे. शुक्र हा जन्म लग्नाचा अधिपति आहे. तिसरी अनिष्ट गोष्ट अशी झाली कीं शनि हा जन्महर्शलच्या समोर आला, चवथी गोष्ट अपघाताच्या वेळचा शुक्र हा हर्शलच्या समोर अस्तंगत झाला. हीं चार कारणें या मनुष्यास मृत्युकालासारखीं झालीं आहेत. ता० १० ला चंद्र व हर्शल हे एकमेकांशीं युति करून गेले होते. या युतीचाही त्यांच्यावर अनिष्ट परिणाम घडला असावा, असें अनुमान आहे. युतींचा परिणाम आगें मागें घडतो. या वर्षी हर्शल व चंद्र यांच्या युति भयंकर गोष्टी घडवून आणणाऱ्या आहेत.

आतां दुसरी कुंडली पहा.—जन्मलग्नाचा स्वामी बुध हा हर्शलशीं युति करण्याच्या स्थितींत आहे. याही कुंडलींत चतुर्थ भावांत मकर राशीचे १७ अंश असल्यामुळें हर्शल मकर या जलराशींत आला आहे. शनि हा जन्महर्शलच्या समोर आला आहे. चतुर्थस्थ हर्शल या शनीच्या दृष्टींत आहे. यापेक्षां अनिष्ट योग दुसरे सांगण्या सारखे झालेले नाहींत.

याप्रमाणें त्यांच्या कुंडल्यांवरून या अपमृत्युचा विचार होतो. यावरून वाचकांस कित्येक सामान्य नियम कळण्यासारखे आहेत.

संपादक 'कुंडलीविज्ञान'

[६]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

वि. वि.—खालील कुंडली एका अर्धवट भ्रमिष्ट मुलाची आहे. आर्थ ज्योतिषाच्या मतानें लग्नीं शनि व राहू असले ह्मणजे जन्मणारास पिशाचबाधा असते असें आहे. या कुंडलींत लग्नीं राहु असून समोर शनि आहे. पाश्चात्य ज्योतिष्यांच्या मतें चंद्र किंवा बुध शनीच्या किंवा मंगळाच्या अशुभ दृष्टींत असतां जन्मणारा भ्रमिष्ट होतो असें आहे येथें बुध हा शनीच्या व मंगळाच्या पूर्ण त्रिगड्यंतर दृष्टींत आहे, ह्मणून पाश्चात्य ज्योतिषांचे विचार लक्षांत घेण्यासारखे आहेत. हे विचार मागील अंकीं आपण प्रसिद्ध केलेच आहेत.

ही मुलगी अशी असण्याचें कारण पिशाचबाधा किंवा बुद्धिभ्रंश ह्याचा खुलासा कोणी केल्यास आभारी होईन.

जन्म—ता. २ आगष्ट १८९४ गुरुवार रात्रीं ९ वाजून २४ मि.

सायन भावचलित



एक 'ज्योतिषविद्यार्थी'

पत्रव्यवहार.

[१]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांसी.—

साष्टांग नमस्कार वि० वि०—

ज्योतिःशास्त्राचें ज्यास ज्ञान नाहीं अशा माणसानें ज्योतिष संबंधें पुस्तकें वाचल्यास त्या पासून जे वाईट परिणाम होणें शक्य असतील त्यां पैकीं खालील एका मनुष्याचा अनुभव फार मासलेवाईक अस-स्यामुळें त्या संबंधानें थोडा विचार करण्याची आपणास या पत्रानें तसदी देत आहें.

प्रारब्धयोग या नांवाचें ज्योतिष विषयावर एक पुस्तक आहे तें आपणास माहीत असेलच. तें पुस्तक एके दिवशीं सहज करमणु-कीकरितां माझा एक स्नेही वाचीत होता. त्यास ज्योतिःशास्त्राचें ज्ञान मुळींच नव्हतें. तथापि त्यास आपल्या स्वतःची कुंडली ठाऊक असल्यामुळें ती तो सहज रीतीनें पुढें धरून पुस्तकांत दिलेल्या सम-जतील तितक्या योगांचीं फळें पाहत होता. पुस्तक वाचतां वाचतां "जारकर्मापासून झालेलें मूल" या सदराखालीं दिलेला मजकूर त्यास आढळला. त्यांत 'चंद्र जर रवि, मंगळ किंवा शनि यांशीं संयुक्त असेल तर तो जारकर्मापासून झालेला आहे असें जाणावें' असा मजकूर आहे तो त्यानें वाचला. तेव्हां त्याची स्थिति फार चमत्कारिक झाली, त्याच्या कुंडलींत शनि व चंद्र हे एका राशीस होते. तो मनुष्य कुलीन घराण्यांतला आहे, त्याचे मनावर असा एकदम वाईट परिणाम झाल्यामुळें व त्याची विचाराची दिशा चुक-ल्यामुळें ७।८ दिवस तो भ्रमिष्टासारखे विचार करीत होता. त्याचे सुदैवानें त्यास दुसऱ्या युक्त्या सुचल्या नसत्या तर मला वाटतें तो

कदाचित् वेडाच बनला असता. असें होण्याचें कारण प्रारब्धयोग हें पुस्तक चांगलें आहे असें त्यानें ऐकिलें होतें हेंच मुख्यत्वें असावें. तो मनुष्य माझा चांगला स्नेही असल्याकारणानें आपणास काय युक्त्या सुचल्या त्या त्यानें सर्व मज सांगितल्या आहेत. त्यांपैकीं मुख्य खालीं देतों.--

प्रथम त्याचे मनांत आपल्या कुंडलींत जरी असा वाईट योग येत आहे तरी आपण आपले पित्यासारखे हुबेहुब दिसतों यावरून पुस्तकांतील योग खोटा असला पाहिजे असें येऊन बरेंच समाधान झालें. परंतु त्या वेळीं त्याचे मनाची स्थिति अशी कांहीं चमत्कारिक झाली होती कीं इतक्यानें त्याची पूर्ण खात्री न होतां त्यास अधिकच विचार करण्याची प्रवृत्ति झाली. व 'एक सुविचार दुसरे सुविचारास प्रसवितो' या न्यायानें त्यास दुसऱ्या लोकांच्या कुंडल्या पहाव्या असें सुचलें व त्या प्रमाणें प्रयत्नही केला. तेव्हां शेंकडा ९० पेक्षां जास्त लोकांच्या कुंडल्यांत असले सर्व प्रकारचे योग दिसून आल्यामुळें सदरहू पुस्तकांत लिहिलेलें निवळ खोटें तरी असलें पाहिजे किंवा त्याचा कांहीं निराळाच अर्थ असला पाहिजे. अथवा ज्योतिषच्या दृष्टीनें विचार करण्यासारख्या त्यांत आणखी कित्येक गोष्टी असल्या पाहिजेत, असें त्यास वाटून बरेंच समाधान झालें. परंतु त्याचे मनावर झालेला परिणाम अगदीं नाहींसा झाला नाहीं. आपण जें वाचलें व ज्याची आपले मनास इतकी रुखरुख लागली त्याचा खरा अर्थ काय हें कोठें आढळल्यास पहावें या हेतूनें त्यानें बरींच निरनिराळीं पुस्तकें वाचलीं. परंतु त्यास पाहिजे तें कोठेंही सांपडलें नाहीं. नंतर आपले मनाचा भार थोडा कमी व्हावा ह्मणून त्यानें झालेली सर्व हकीकत मला सांगितली. व प्रारब्धयोग पुस्तकांतील मजकूर, स्वतःची कुंडली व इतर लोकांच्या

कुंडल्या मला दाखवून समाधान करण्याची विनंति केली. पण माझेंही ज्ञान त्याच्या इतकेंच असल्यामुळें त्याचे मनाचें मला समाधान करितां आलें नाहीं.

कित्येकांच्या कुंडल्यांत शनि, रवि किंवा मंगळ चंद्राशीं संयुक्त आहेत असे व चंद्र एकटाच असून त्यावर किंवा लग्नावर गुरूची दृष्टि नाहीं असे सर्व प्रकारचे योग पुष्कळ प्रसिद्ध लोकांच्याही कुंडल्यांस आहेत व असे योग असणेंही स्वाभाविक आहे. कारण, चंद्र दरमहा प्रत्येक राशीस २। दिवस असल्यामुळें प्रत्येक ग्रहापेक्षां तो तितके दिवस असतोच. ह्मणून प्रारब्ध योगांत लिहिलेल्या ग्रहांपेक्षां चंद्र दरमहा सतत सुमारें ७ दिवस संयुक्त असूं शकेल व इतके दिवस असा सतत योग नसला तरी तो या ग्रहाशीं युक्त असणें आणि एकटाच असून त्यावर गुरूची दृष्टि नसणें असा योग दरमहा बरेच दिवस असलेच पाहिजेत. ह्मणून इतके दिवसांत जन्मणारी प्रजा जारकर्मापासूनची असा अर्थ होईल पण ज्योतिःशास्त्राचें मत तसें असणें शक्य दिसत नाहीं. हें माझें मत माझ्या स्नेह्यासही पटलेलें आहे. तथापि झालेला प्रकार मासलेवाईक असल्यामुळें आपणाकडे विचार करण्यासाठीं पाठविला आहे. अमुक मनुष्य जार कर्मापासून झाला हें कुंडलीवरून सांगतां येणें शक्य आहे किंवा कसें याबद्दल आपण आपलें मत प्रसिद्ध करावें, अशी विनंति आहे. कळावें लोभ असावा हे विनंति.

आपला

'क्ष'

---

* प्रथमतः कसाबिणींच्या मुलांच्या कुंडल्या पहाव्या व त्यांत जर वरील नियम सर्वत्र दृष्टीस पडत असेल तर त्यांत कांहीं तथ्य आहे अशी कल्पना करण्यास हरकत नाहीं. पुस्तकांत जे योग दिलेले असतात ते युति या अर्थी असतात. दोन ग्रहांची युति होईल तरच त्यांचा योग झाला हें म्हणणें बरोबर ठरेल. एका राशीवर असल्यानें योग होऊं शकत नाहीं. चंद्र हा शनीशीं युति कारित असतां जन्म झाला असेल तर कदाचित् जारापासून उत्पन्न ती आहे असें मानणें प्रशस्त होईल. या विषयाचा विचार आम्ही एखाद्या स्वतंत्र लेखांत करूं. 'सं. कुं वि.'

---

[२]

सा. न. वि. वि,—आपलें यंदाचें पावसाचें भविष्य नगरजिल्ह्याशिवाय इतरत्र बरोबर उतरलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. नगर जिल्ह्यांत मृगांचा एक, नागपंचमीचे दिवशीं व दुसरें दिवशीं थोडा आणि काल ता. ३ सपटंबर रोजीं मिळून अद्याप ५ इं. सुद्धां पाऊस नाहीं. यावरून पिकाचा आजमास कायतो करावा! शेवगांव तालुक्यांत कापसाचीं पिकें साधारण बरीं आहेत. परंतु मोंगलाईस लागून तो भाग आहे यामुळें त्या तालुक्याची गणना या जिल्ह्यांत न धरिली तरी चालेल. अकोला कोकणभाग आहे. या दोन तालुक्यांतून कांहीं भाग सर्वत्र वरील प्रमाणें स्थिति आहे. दिवस पावसाळ्याचे आहेत एवढें मात्र आकाश अभ्राच्छादित असल्यामुळें वाटत असे. कधीं कधीं तर आतां पाऊस येईल असें वाटावें तों वारा सुटून ढग पसरून जावे! मिळून पावसाचें सर्व अवसान पोकळ होई. बारकाईनें विचार केला तर हिंदुस्थानांत दोन्ही पिकें पुढींच नाहींत, पक्का दुष्काळ अशीं वर्षें २।३ च गेलीं असतील.

परंतु नगर जिल्ह्यांत १२ वर्षांत दुष्काळानें साधारण कायमचें ठाणें केल्या सारखें झालें आहे! एखादे साली पाऊस चांगला पडून एखादें पीक चांगलें हातीं येईल असा लोकांनीं अजमास करावा परंतु खंडीच्या ऐवजीं ५ मणच हातीं यावें! कणीस मोठें, पण पोकळ. लोक १२ वर्षांत अतिशय जेरीस येऊन उत्तम स्थितींतील सावकाराजवळ सुद्धां पूर्वीचे दशांश पैसा राहिला नाहीं. सारांश नगर जिल्हा हा हिंदुस्थानचा घडकावयव असून त्याला असे काय ग्रह पडले आहेत कीं त्याची सर्वच स्थिति पोकळ व्हावी. बाहेरून मात्र अवसान इतर जिल्ह्याप्रमाणें. सावकार पोकळ, शेतकरी तर पोकळ आहेच, पीक पोकळ, मेघराजही पोकळच. ज्यावर देहाचें पोषण होतें तें पोकळ झाल्यावर देहही पोकळच होणार. अशा मनुष्यांकडून कोणती कामगिरी होणार? तरी कृपा करून या गोष्टीचा उलगडा कराल अशी अशा आहे. कळावें लोभ असावा हे विनंति.

एक '**वाचक**'

---

[३]

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते यांसी.—

सा. न. वि. वि.—माहे जुलईच्या विविधज्ञानविस्तारांत प्रो० रामकृष्ण सखाराम आठवले यांनीं फलज्योतिषविषयावर दिलेला लेख फार महत्वाचा आहे. तो लेख कुंडलीविज्ञानांत उतरून घेतल्यास सर्व वाचकांच्या वाचण्यांत येऊन संग्रहीं होईल. ज्योतिष विषयक लेख कुंडलीविज्ञानांतच येणें कायद्याचें आहे. अशा प्रकारचे लेख तुह्मांकडेच पाठविण्याविषयीं प्रोफेसरांस सूचना केली आहे.

"कुं. वि. पु. ६ अंक ८ पान २२" मध्यें ग्रह [illegible] आहेत वगैरे ५ प्रश्नांचीं उत्तरें ज्योतिर्विद श्रीनिवास महादेव शर्मा

मु० रतलाम यांनीं पाहून बक्षिस दिलें. परंतु तीं उत्तरें कोठेंही प्रसिद्ध झालेलीं नाहींत. माझेजवळ मी अल्पमतीनें दिलेलीं तयार आहेत. स्थळ असल्यास पाठवितों.

गेल्या वैशाख महिन्यांत पैठण येथील ग्रहविहारभुवनाचे मालक भगवंत गोविंद तोडेवाले यांनीं केसरींत जाहिरात देऊन ध्वनित केलें होतें कीं, ज्येष्ठ शु० ९ पर्यंत फलज्योतिष कांहीं जमतें व कांहीं जमत नाहीं याचीं कारणें काय?" यावर निबंध पाठविणारांस १५ रुपये बक्षीस ठेविलें होतें, परंतु त्या विषयीं त्यांनीं कांहींच निकाल दिला नाहीं, एवढेंच नव्हे तर पत्राचीं उत्तरेंही दिलीं नाहींत! या निबंधाचीं स्थळप्रत मजजवळ आहे. स्थळ मिळण्यासारखें असल्यास आपणाकडे पाठवितों. या दोन गोष्टी अर्धवट प्रयत्नाचे मासले आहेत.

मातृपितृसुखांत न्यूनाधिक्य यावर मार्क देऊन विवेचनाची पद्धत फार पसंत वाटते. ज्याप्रमाणें दिवाणी कामांत न्यायाधीश मुद्दे काढून कज्जांचा निकाल करितो तद्वत् ही पद्धत बिनचूक फल जमविते.

दोन वर्षें झालीं, कुंडलीविज्ञान दाशाहिक निघून पार पडत आहे याबद्दल आनंद वाटतो. **साप्ताहिक** व्हावें, अशी इच्छा आहे. हल्लीं प्रत्येक अंकांत मिळत असलेलीं पृष्ठेंच प्रत्येक अंकांत कायम ठेवून वर्षाची वर्गणी ट. व्ही. पी. सह ३ **रुपये** केल्यास आमची वर्गणी देण्यास तयारी आहे. कोणास जड गेल्यास १॥ रुपयाप्रमाणें सहामाही हप्ता ठेवावा. राष्ट्रमतासारख्या राष्ट्रीय कार्यास वर्षास ९ रुपये लोक खर्चितात त्या मानानें तीन रुपये थोडे आहेत. खर्चाइतकी ही विद्या महत्वाची आहे. जानेवारीपासून ह्या सूचनेचा विचार व्हावा.

प्रो० आठवले म्हणतात कीं, ज्याला वायुशास्त्राची माहिती आहे त्यासच ज्योतिषाचे आधारें पर्जन्याचें भविष्य बिनचूक करितां येईल. मला हें म्हणणें तात्विक व म्हणूनच विचार करण्यासारखें आहे असें वाटतें. आपण व प्रो० आठवले या दोघांच्या विचारानें जर कुंडलीविज्ञान निघेल तर गुरुचंद्रयुतीप्रमाणें फलदायक झाल्याशिवाय राहणार नाहीं.

आपण हल्लीं ज्या ठिकाणीं राहून हें पुस्तक चालवितां तो महाड गांव एकीकडे असून टपालाच्या गैर सोईचा आहे. शिवाय कोणासही तुमच्या भेटीस यावयाची इच्छा झाल्यास अडचणीचा आहे. सप्टेंबर ता० १ चा अंक मला ता० ७ रोजीं मिळाला! पोष्टाच्या अधिकाऱ्यांशीं तकरार करून थकलों. मुंबई, पुणें, नागपूर इंदूर, ग्वाल्हेर, ठाणें, बडोदें, उमरावती, अकोलें वगैरे मोठालीं व सर्व सोयीचीं गांवें आहेत. अशा ठिकाणीं राहिल्यास सर्व गैरसोय दूर होणारी आहे.

प्रत्येक अंकांत फोटो देऊन त्यावरून कुंडली करण्याचा विचार, वैद्यकज्योतिष या विषयांचें स्मरण असावें. कुंडली विज्ञान व सायन निरयन तुलना हेही विषय प्रत्येक अंकांत यावे अशी इच्छा आहे.

कळावें लोभ असावा हे विनंति.

गणेश दामोदर ग्रंथे.

---

* दाशाहिकाला साप्ताहिकाचें स्वरूप देण्याचें कारण नाहीं. शिवाय ३ रुपयांत साप्ताहिक चालविण्यास वर्गणीदार दिढीनें तरी वाढले पाहिजेत. ३ रुपयांत १३ आणे ट ख. व एक आणा व्ही. पी. खर्च वजा जाऊन बाकी २ रु. २ आणेच संपादकाच्या पदरीं पडतील व पृष्ठें मात्र दिढीनें द्यावीं लागतील. हा आंतबट्ट्याचा

व्यवहार करण्याचें आमच्यांत आतां सामर्थ्य राहिलेलें नाहीं. आरंभीं तीन वर्षें जो तोट्यानें व्यवहार केला त्यांतूनच अद्यापि सुटका झाली नाहीं. दाशाहिकाचा खर्च हल्लीं चांगल्या रीतीनें भागत आहे. परमेश्वरापाशीं इतकीच प्रार्थना आहे कीं आरंभिलेलें दाशाहिकाचें कार्य खर्चाच्या ओढीनें बंद न पडो ह्मणजे मिळविली !

महाड गांव सोडण्याचा हेतु आहे. योग्य संधि येतांच कोठें तरी रेलवेच्या काठीं ठाणें देऊं. बाकी सूचना पसंत आहेत. कुंडलीविज्ञान शक्य तितक्या विचारांनीं चालविण्याचा हेतु आहे. आपले दोन्ही निबंध पाहण्यास पाठवावे. कुंडलीविज्ञानवर आपणासारखाच सर्वांचा लोभ असावा ह्मणजे सर्व हेतु तडीस जातील अशी उमेद आहे.

—संपादक कुंडलीविज्ञान—

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥ 'भवभूति'

पुस्तक ८ वें.] आश्विन शु० ६, गुरुवार [अंक २५ वा

लो० टिळकांचें प्रयाण!

लेविसाव्या अंकांत 'अकटंबरमध्यें लोकमान्यांचें स्थलांतर आहे. मग तें कोणत्याही कारणानें व कोठेंही होवो!' असें वर्तविलें होतें. हें विधान लग्नस्वामी व नवमाचा स्वामी यांच्या स्थितीवरून केलें होतें. कारण, लग्नस्वामी रवि हा ता० २३ सपटंबरला सायन तूळ राशींत प्रवेश करितो व नवमाचा स्वामी मंगळ हा ता० १० अकटंबरला त्याच राशींत प्रवश करितो तूळ हा चर राशि असून तृतीय स्थानीं उदित आहे. व या राशींत अकटंबरमध्यें हे ग्रह असल्यामुळें स्थलांतर खात्रीनें होणार असें वाटलें होतें. त्याप्रमाणें स्थलांतर तर झालें. पण तें अकटंबरमध्यें व्हावयाचें असून सपटंबरमध्यें झालें! ग्रहांचे पारणाम नेहमीं आगेमागें होत असतात, असा नेहमीं अनुभव येतो. त्यामुळें भविष्याचे नेमक दिवस सांगतां येत नाहींत असें कां होतें तें एका सृष्टिचालकासच माहीत! त्याच्या मनांत ज्योतिषची किल्ली पूर्णपणें मनुष्याच्या हातांत द्यावयाची नाहीं असें स्पष्ट दिसतें. वास्तविक हे ग्रह तूळ राशींत गेल्यावरच स्थलांतर व्हावें असा मनुष्याचा अजमास असणार. साबरमती जेल तूळ राशीचा रवि झाल्यावरच सुटावा असें ज्योतिषी अनुमान करणार. परंतु त्यापूर्वीच त्यांनीं जेल मधून प्रयाण केलें आहे. तरी चमत्कार असा झाला आहे कीं, रवीनें तूळ राशींत प्रवेश केला त्याच वेळीं

लोकमान्यांनीं मंडालेच्या किल्ल्यांत प्रवेश केला. असें राष्ट्रमत अंक ७६ वरून दिसतें. या अंकांत ता० २१ सपटंबरची कलकत्त्याची तार अशी आहे कीं, "बुधवारीं सायंकाळीं स्पेशल ट्रेन मधून लो० टिळक मंडाले येथें पोहोंचले! याच दिवशीं स्त्रीनें मुं. टा. दिवसास ३ वाजून ४७ मि. नीं सायन तूळ राशींत प्रवेश केला आहे! यावरून आमच्या विधानांत जरी तंतोतंतपणा नसला तरी शास्त्रीय तत्वाला किमपि बाध येत नाहीं असें वाचकांस दिसून येईल.

लग्न वामी, सप्तमेश व चंद्र यांवरच स्थलांतर अगर प्रवास अवलंबून आहे असें कुंडलीविज्ञानांत अनेक वेळां येऊन गेलें आहे. हें फलज्योतिषाचें शास्त्रीय तत्व आहे म्हणून तें कधींही चुकावयाचें नाहीं. हें शास्त्र खोटें आहे असें म्हणणारांनीं हें तत्व खोडून काढावें किंवा सत्य आहे म्हणून कबूली जबाब द्यावा. प्रवास कालीं हे ग्रह सर्वांचेच चर राशींत असतील तर निश्चयानें प्रवासकालींही ते त्याच राशींत असतील. इतर स्थितींत असतां प्रवासकाल पुढील नियमांनीं घडला पाहिजे असें अनुमान होतें.

१ लग्नस्वामी लग्नीं अगर सप्तमांत
२ सप्तमेश सप्तमांत अगर लग्नीं
३ चंद्र स्वस्थानीं, लग्नांत अगर सप्तमांत अगर स्वसप्तमांत.
४ लग्नस्वामी, सप्तमेश व चंद्र यांपैकीं एक अगर अनेक अन्योन्य स्थानीं किंवा तिघांतून कोणाच्या तरी राशीस या चार स्थितींशिवाय पांचवी संभवत नाहीं.

राष्ट्रमताच्या ६६ व्या अंकांत "ता.१३ रोजीं रात्रीं साडेसात वाजतां विरमगांवाहून एक मोकळी स्पेशल ट्रेन साबरमती आणि सौथ गेट या दोन स्टेशनांच्या दरम्यान उभी करण्यांत येऊन तिच्यांतून रा० टिळक यांना मुंबईस नेण्यांत आलें" असा मजकूर होता ता० १३ ला चंद्र सायन मेष राशीचा नवम स्थानीं होता. मेष हा चर राशि असून याच राशींत जन्मकालीं चंद्र आहे. म्हणूनच या दिवशीं ते प्रवासास निघाले. सप्तमाचा अधिपति शनि हा तर मार्च्यपासून याच राशींत आहे. फार लांबचा प्रवास याच ग्रहानें घडवून आणला.

जन्मकालीं हा कर्क या चर राशींतच आहे. या अनुभवावरून ते ज्या दिवशीं मंडालेहून सुटतील त्या दिवशीं सुद्धां चंद्र चर राशींतच येईल व तो बहुधा मेष राशीचाच असेल. त्याचप्रमाणें त्यांची सुटकाही चर राशीचा रवि असतांच होईल. ते ज्या दिवशीं मंडालेस पोहोंचले तो **बुधवारच** होता! या खटल्याच्या वेळीं त्यांच्यावर बुधवाराचा परिणाम विशेष घडत आहे असें दृष्टीस पडतें. यावरून त्यांची सुटकाही **बुधवारींच** होणार असें अनुमान कां करूं नये? मात्र हें तात्विक अनुमान नाहीं, तार्किक आहे. ता. २ व ३० डिसेंबरला बुधवारीं मेष राशीचा चंद्र आहे, व ता. २२ ला रवि चर राशीचा होत असून ता. ७ पासूनच शनि मार्गी झाला आहे. वक्री शनीमध्यें शिक्षा झाली असून ती अल्प मुदतीची व्हावी हें अनुमान खरें मानिलें तर लो० टिळक हे डिसेंबरांत सुटतील असें मानण्यास हरकत नाहीं. कदाचित् हें भविष्य चुकेलही. कारण मकर राशीचा रवि शत्रुगृहीं आहे. पण या वेळीं ते सुटले नाहीं तरी रवि सायन मेष राशीचा झाल्यावर ते खास सुटतील इतकें भविष्य आज करण्यास हरकत नाहीं.

टिळकांच्या दशमांत असलेला हर्शल हा षष्ठ स्थानीं मकर राशींत जन्मस्थ शनीसमोर आला असल्यानें प्रस्तुतचा खटला उपस्थित झाला. हा ग्रह ता. २२ एप्रिल पासून ता. २३ सपटंबरपर्यंत वक्री होता. तो मार्गी झाला त्याच दिवशीं ते मंडाल्यास दाखल झाले. तरी तो मार्गी होण्याच्या सुमारास टिळकांची हायकोर्टानें दिलेली सहा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा मुंबईसरकारनें साध्या कैदेची केली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. यावरून हर्शलचा अनिष्टपणा आतां शिल्लक राहिला नसावा असें युक्तिदृष्ट्या सिद्ध होतें.

कुंडलीविज्ञानच्या २३ व्या अंकांत "तथापि सपटंबर २रीपासून शुक्र सिंह राशीचा झाल्यावर त्यांना अनुकूल अशा गोष्टी घडूं लागतील असें भविष्य केलें होतें, त्याचाही अनुभव आला आहे. एक हजार रुपये दंड माफ झाला व काळ्या पाण्याच्या जागीं साधी कैद झाली वा दोन त्यांस अनुकूल अशा गोष्टी घडून आल्या आहेत!

अकटंबरच्या ८ वी पासून शुक्र कन्येचा झाला आहे. हा राशा टिळकांच्या कुंडलींत द्वितीय स्थानीं आहे. नवंबरच्या ४ थी पर्यंत या स्थानांत गुरु व शुक्र हे ज्ञानवान् व मुत्सद्दी [सूरेर्दानवपूजितश्च सचिवौ] ग्रह असून त्यांची अकटंबरच्या १४ वीला युति आह. या युतीचा परिणाम असा होईल कीं इंग्लंडांतील लोकमत त्यांस अनुकूल व्हावें. त्यांच्या मनावर टिळकांच्या ज्ञानाचा, बुद्धिमत्तेचा व मुत्सद्देगिरीचा लख्ख प्रकाश पडावा व त्यांची सर्वत्र वाहवाच व्हावी! सरकारच्या हल्लींच्या धोरणामुळें प्रिव्ही कौन्सिलमध्यें तरी त्यांची दाद लागेल कीं नाहीं या बद्दल शंका आहे! न लागली तरी अपिलाचा परिणाम आंतून चांगला धडून शेवटीं सरकार त्यांस सोडून देणार याबद्दल शंका नको.

गेल्या हिंदुपंचाच्या अंकांत एक पत्र छापलें आहे, तें आमच्या मतास जुळतें आहे म्हणून त्याचा उतारा वाचकांसाठीं देऊन आजचा लेख पुरा करितों.—

"मला ता० १३।९।०८ च्या प्रभातकाळीं सुमारें ४॥। च्या सुमारास दृष्टांत जाहला तो असा. श्रीगोपालकृष्णाची मूर्ति प्रगट हाऊन मला उठवून म्हणाले तुझी निःसीम भक्ति पाहून संतुष्ट झालों त्या अर्थी काय मागणें मागतांस तें माग. त्यावरून मी लो० टिळकांची सुटका कधीं होईल म्हणून म्हणालों. नंतर श्रीनें कळविलें कीं, आजपासून पांच महिने १० दिवसांचे आंत टिळक अगदीं निर्दोष सुटून त्याचे हातून देशाचें एक महत्कार्य होईल असें अभयवचन ऐकून अकस्मात् जागा जाहलों. सदरहू दृष्टांत अगदीं अक्षरशः झालेला खरा खरा कळविलेला आहे. त्यावरून व माझी मनोदेवता व दुसरे सारासार विचार करितां लो० टिळक वरील मुदतींत खात्रीनें निर्दोष सुटल्याखेरीज राहणार नाहींत. असेंच मागें मला २।३ दृष्टांत होऊन गोपाळकृष्णाची स्थापना व मंदीर बांधण्याची आज्ञा झाल्यावरून तें काम मी ह्याच गावीं सुरू केलें आहे, दृष्टांताची सत्यता हयातीं राहिल्यास कळून येईलच. वामन विठ्ठलभटजी. मौजे कुरवली. ता० सिरपूर जि० प० खानदेश."

पत्रव्यवहार.

[१]

ज्योतिर्विद श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते यांसी—

सा. न. वि. वि.—आजपर्यंत लोकमान्य टिळकांवर झालेल्या खटल्यांचा ग्रहांशीं मेळ लिहून पाठवित आहें. त्यास दाखाहिकांत स्थळ मिळेल अशी आशा आहे.

१८९७ च्या खटल्यांत त्यांस ता. २३ जून रोजीं पकडलें. ता. २१ जून रोजीं रवि कर्क राशींत प्रवेश करितो. कुंडलींत कर्क राशींत व्यय स्थानीं शनि असल्यामुळें त्या राशींतला रवि बंधन उत्पन्न करितो. १९०८ च्या जून मध्येंही रवि कर्क राशीचा झाल्यावरच त्यांस ता० २४ जून रोजीं पकडण्यांत आलें होतें. ता० ९ जुलई पासून बुध कर्केंचा झाला. परंतु तो वक्री नसल्यामुळें त्या खटल्यांत ते जामिनावर सुटले. ता० ६ जुलई रोजीं बाबा महाराज वारले. हाच टिळकांच्या खटल्याचा शकुन होय. ह्या वेळीं कर्क राशींतला बुध १९०१ च्या जून पर्यंत कर्केंत वक्री झाला नाहीं. मध्यंतरीं ३ वर्षें इतर राशींवर वक्री होता. म्हणून बाबामहाराजांच्या दत्तकासंबंधें वाटाघाट १९०१ मे अखेरपासून सुरू झाली. ता. ५ जुलई १९०१ रोजीं टिळकांनीं दिलेल्या दत्तकाविरुद्ध नागपूरकर यांनीं चालविलेल्या व्यूहाचा स्फोट होतो, ह्या वेळीं बुध कर्केंत वक्री आहे. येथून टिळकांच्या दुसऱ्या खटल्याचे डोहाळे सुरू झाले.

चमत्कार कीं १९०४ च्या मार्च्य मध्यें ते सुटल्यानंतर १९०८ च्या जूनपर्यंत बुध कर्केंत वक्री झाला नाहीं. म्हणून १९०८ पर्यंत राजकीय भय उत्पन्न झालें नाहीं. १९०८ जूनमध्यें बुध कर्केंत वक्री झाल्यावरोबर हा तिसरा खटला झाला.

दुसऱ्या खटल्यासंबंधी १९०१ जूनपासून १९०४ मार्च्य पर्यंत दिवस गेले. १९०२ मध्येंही बुध कर्क राशींत वक्री होता. पुढील सालीं मात्र तसा नव्हता. २८ आगष्ट ते १० अकटंबरपर्यंत शुक्र वक्री आहे. १९०४ मध्यें बुधानें कर्क राशीवर प्रवेश करण्याचे अगोदर मार्च्य मध्यें त्यांस सोडून दिलें. १९०८ मध्यें झालेल्या शिक्षेचाही असाच अंमल होईल असें वाटतें. १९१४ पर्यंत बुध कर्केंत वक्री होत नाहीं. ह्मणून १९०९ मध्यें कर्क राशीवर बुध प्रवेश करण्याच्या अगोदर त्यांची सुटका झाली पाहिजे असें ह्या अनुभवारून वाटतें. दुसऱ्या व तिसऱ्या खटल्याचे वेळीं नेपच्यून याच राशींत आहे ह्मणून या ग्रहावर त्यांची शिक्षा अवलंबून नाहीं.

ताईमहाराजांच्या मांडीवर दत्तक देण्याचा विचार टिळक व खापर्डे ट्रस्टी यांनीं ता. २२–२९ मेपासून आरंभ केला. तेव्हां पासून ता. ३ मार्च्य १९०४ रोजीं या खटल्यांतून ते सुटले तोंपर्यंत शनि मकर राशीच्या १४ अंशापासून कुंभ राशीच्या १३ अंशांपर्यंत नक्की एक राशीचा झाला.

कर्क किंवा सिंह राशींत चंद्र किंवा लग्न असेल तर त्याच्या सप्तमांत शनि येईल त्यावेळीं कोर्टांत मोठाले दावे चालतात असें मागें कुंडलीविज्ञानांत सांगितलें आहे. त्याप्रमाणें सिंह लग्नामागें शनि आल्यामुळें हा महत्वाचा खटला पुष्कळ दिवस चालेल.

कुंभ राशीवर शनि असतां विशेष अनिष्ट होत नाहीं, असा नियम आहे. त्याप्रमाणें १९०८ सारखी महत्वाची शिक्षा मोठी त्यावेळीं झालेली नाहीं. १॥ वर्षांची झालेली शिक्षा अपिलांत ६ महिन्यांवर येऊन हायकोर्टातून अजी नाहींशी झाली. पुण्याचे सेशन जज्ज यांजपुढें अपीलाचें काम चाललें त्यावेळीं शनि मार्गी होता. व बुध ता० ३ जानेवारी रोजीं कुंभ राशीचा वादस्थानांत होता. परंतु

वादस्थानांत मंगळ हा पाप ग्रह, लग्नेश रवि षष्ठस्थानांत शत्रुराशीस व गुरु चंद्रास १२ वा अष्टमांत असल्यामुळें निकाल समाधान कारक झालेला नाहीं.

फेब्रूवारीपासून राहु चंद्रासमोर तूळेचा होता तो कन्येचा स्वगृहीं आला. परंतु गुरु व मंगळ मेषेचे होण्यास मार्च्यपर्यंत अवकाश होता ह्मणून तों पर्यंत हायकोर्टांत हें काम लांबलें. मार्च्य ता० १ रोजीं लो० टिळक हायकोर्टातून दोषमुक्त झाले. या वेळीं वादाच्या स्थानीं बुध व शुक्र हे शुभ ग्रह होते ह्मणून खटल्याचा निकाल इष्ट झाला. लग्नेश रवि मीन राशीस असून त्याच्या सप्तमांत कन्या राशीचा चंद्र असतां नियमाप्रमाणें निकाल झाला.

१८९८ च्या सप्तंबरमध्यें पहिल्या खटल्याच्या शिक्षेतून ६ महिने कमी करून त्यांस सोडून देण्यांत आलें. व १९०२ च्या आगष्ट १९ तारखेस म्याजिस्त्रेट ॲस्टन साहेबांचा प्रोबेटरद्दीचा हुकूम हायकोर्टात रद्द झाला. या दोन गोष्टी टिळकांस कन्येच्या बुधावर फायदेशीर झाल्या. प्रोबेटच्या न्यायाचेवेळीं वादाच्या स्थानांत गुरु कुंभेचा होता. १९०८ मध्येंही बुध कन्येचा असतां फुल्ब्रेंच्यासमोर अपिलाचें काम चाललें. यांतही त्यांचा एक हजार रुपये दंड माफ झाला!

याप्रमाणें वस्तुस्थितीचा ग्रहांशीं मेळ जमत आहे. कळावें लोभ असावा हे विनंति.

गणेश दामोदर गंधे.

[२]

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्त्ते यांस

सा. न. वि. वि.—खालीलं प्रश्न प्रसिद्ध फलज्योतिषी मि. **झाडकील** व दुसरे दोन असे बसले असतां फलज्योतिष शास्त्राचें पुढें काय होईल हें जाणण्याची सर्वांची त्या वेळेस इच्छा झाली असतां प्रश्नकुंडली मांडून तीवरून जें विवेचन केलेलें आहे तें विचारी माणसास पुष्कळ नवीन गोष्टी सुचवील असें वाटल्यावरून प्रसिद्धीकरितां पाठवीत आहें.

प्रश्नकुंडली.



ह्याला इंग्लिशमध्यें पार्ट ऑफ फारच्यून ह्मणतात. हें संपत्तीची स्थिति दर्शवितें. हें चिन्ह कसें मांडितात याची सविस्तर रीति दाशाहिकांत सविस्तर प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

पहिल्यानें आपणास शास्त्रीय विषयाचा द्योतक ग्रह जो बुध त्याचें अवलोकन केलें पाहिजे. तो येथें नवमाचा अधिकारी असल्या कारणानें तर त्याला जास्त महत्व प्राप्त झालें आहे. येथें त्याला उच्च किंवा

कोणताही अधिकार मिळाला नाहीं. फक्त तो आपल्या टर्ममध्यें आहे. (ज्या प्रमाणें आपणामध्यें द्रेष्काण, सप्तमांश वगैरे पाहतात त्याच प्रमाणें इंग्लिशमध्यें असेच कांहीं अधिकार आहेत. प्रसिद्ध ज्योतिषी राफेल हा हे कांहीं पाहूं नये ह्मणतो. परंतु ऑलन लिओ हे आपल्या मासिक पुस्तकांत आपल्यांत द्रेष्काण वगैरे पाहण्याची जी पद्धति आहे ती शास्त्रीय तत्वावर आहे ह्मणून पाश्चात्य पद्धति बदल ध्यावी असें ह्मणतात.) ह्यावरून आतां जी ह्या शास्त्राची खालावलेली स्थिति आहे ती पूर्ण रीतीनें व्यक्त होत आहे. परंतु बुध हा ज्या अर्थी आपले टर्ममधील स्थिर राशीचे चार अंश जास्त भोगून गेला आहे त्या अर्थी असें सिद्ध होतें कीं, या शास्त्रास मागील चार वर्षांपासून पूर्वी पेक्षां जास्त मान्यता प्राप्त झाली असली पाहिजे. खरोखर अशीच गोष्ट आहे. कारण चार वर्षांपूर्वी ह्याच ग्रंथकारानें या शास्त्रावर नवीन पुस्तक प्रसिद्ध केलें व त्यानें लोकांचें लक्ष बरेंच वेधलें.

ज्या अर्थी बुध हा नुकताच गुरूशीं द्विराश्यंतर [६० अंश] दृष्टि करून जात आहे व गुरु या कुंडलींत प्रश्न करणाऱ्या इसमाचा द्योतक आहे त्यावरून असें दिसतें कीं, प्रश्न करणाऱ्या कडून ९ महिन्यांपूर्वी या शास्त्रावर चांगलाच प्रकाश पडला असला पाहिजे. बुध हा गुरूशीं द्विराश्यंतर दृष्टि करून ४३ कला गेला आहे व त्यास सरासरी एक अंशास एक वर्ष ह्या मानानें ९ महिने दर्शवितात. या ग्रंथकारानें प्रश्न विचारण्याचे पूर्वी ग्रामर ऑफ अस्ट्रॉलजी नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें.

लग्नीं केतु उदित आहे. तो या ग्रंथकारास पुनः उत्तेजन आणतांना त्रास व सोसाव्या लागणाऱ्या अडचणी आणि लोकांचीं दूषणें या गोष्टींची पूर्ण साक्ष देत आहे.

शनीचें नवम स्थानांत असणें हें साधारणपणें जनसमाज या शास्त्रास जें एक ठकवे गिरीचें अथवा फसविण्याचें मायपोट आहे असें मानितात तें पूर्ण व्यक्त होत आहे. शनि व शुक्र ह्यांची तेथें युति होत आहे व ती या शास्त्रास पोक्त स्त्रियांकडून बरेंच नुकसान झालेलें दर्शवीत आहे. ज्या भविष्य जाणण्याचें नुसतें स्तोम माजवीत असत परंतु जनसमाज त्यांचा पूर्ण तिरस्कार करीत असे ह्याची साक्ष चंद्र (जनसमाज दर्शक ग्रह) शनि व शुक्र यांचे पूर्ण दृष्टींत आहे यावरून देत आहे.

मंगळाशीं बुध हा द्विरास्यंतर दृष्टि करीत आहे. तो प्रश्न कुंडलीचे एकादश स्थानाचा अधिपति आहे व तो नवमस्थानापासून असणारें मित्रदर्शक जें एकादश स्थान त्याचे भावारंभीं आहे. यावरून असें ठरवितां येईल कीं, सरासरी प्रश्न विचारल्यापासून चार वर्षांनंतर हें शास्त्र मिथुन राशींतील मंगळ ज्या प्रकारचे लोक दर्शवितो त्यामध्यें पुष्कळ मैत्री संपादन करील. व ते लेख लिहिणारे किंवा पुस्तकें विकणारे असतील. याच मुदतींत खात्रीपूर्वक हें शास्त्र एकाएकीं व लौकरच चांगलें मत संपादन करील.

नंतर हर्शलाशीं बुध पूर्ण दृष्टियोग करील. तो होण्यास १? अंश कमी आहेत. त्यावरून असें दिसतें कीं, स्त्रियांचे द्वारें या शास्त्राचे प्रगतीवर आकस्मिक संकट यावें. कारण, शुक्र हा हर्शलाशीं १३९ अंश दृष्टि करीत आहे. परंतु हर्शल ज्या अर्थी वक्री असून केंद्रांत नाहीं त्या अर्थी फारशी महत्वाची नाहीं, सूर्य हा नवम स्थानापासून असणारें जें १२ वें स्थान त्यांत आहे. त्यामुळें या शास्त्रांस अधिकारीवर्गाकडून गुप्त शत्रुत्व व्हावें. तो सिंह राशींत आहे व त्याच राशीनें बुधास आश्रय दिलेला आहे त्यावरून असें दिसतें कीं हल्लीं अधिकारीवर्ग या शास्त्राचे प्रगतीस प्रतिबंध करीत

आहे. बुध सूर्यापासून १८ अंश अंतरावर आहे. त्यावरून मला असें वाटतें कीं, सरासरी सन १८९२ वे वर्षी या शास्त्रास कांहीं म्हणण्यासारखा मोठा मान मिळेल. कदाचित् हल्लींचे कडक प्रतिबंधक कायदे जे या शास्त्रावर उपजीविका चालविण्याचे मनाई करीत आहेत अथवा दिलेल्या शास्त्रीय सल्ल्याबद्दल फी किंवा बक्षीस घेऊं देत नाहींत ते अंमलांतून काढले जातील, असें वाटतें. बुधास आपलें स्वगृह जें कन्या त्यांत जाण्यास २० अंश असून पाहिजे आहेत व तितक्याच काळांत (२० वर्षांत) शनि हा मिथुन राशींत येईल. म्हणजे बुध त्याच वेळेस त्यास आपले घरांत घेईल त्यावरून असें वाटतें कीं, सरासरी २० वर्षांनीं या शास्त्रास जनसमाजांत पूर्ण मान मिळाला पाहिजे. नंतर बुधास १८ अंश द्विस्वभाव राशींतून जाणें आहे त्या वरून मला वाटतें सरासरी अठरा महिन्यांनंतर म्हणजे ज्या वेळेला बुध प्रश्नकुंडलीचा नवमाचा भावारंभ उलटून जाईल त्या वेळेस (म्हणजे सरासरी सन १८५६ सालीं) हें शास्त्र मोठ्या झपाट्यानें सर्व लोकांचे मान्यतेस पावेल व त्याचा कालेजांतही विद्याभ्यास होईल.

सूर्य हा कन्या राशींत दोन वर्षांनीं जाईल. कारण तो त्या राशीपासून २ अंश अतरावर आहे. त्या वेळेस राज्यशकट हांकणारे अधिकारी कांहीं कडकपणा सोडतील. नंतर सूर्यास नवम भावारंभावरून जाण्यास १८ अंश कमी आहेत. ते गेल्यानंतर म्हणजे १८ महिन्यांनंतर अधिकारी वर्गांतील कोणी मोठा मनुष्य या शास्त्रास मदत करील (म्हणजे प्रश्न विचारल्या नंतर ३॥ वर्षांनीं म्हणजे सन १८३८ मध्यें)

आतां आपणास चंद्राचा विचार केला पाहिजे. तो नवम स्थानांत असलेल्या दोन ग्रहांशीं पूर्ण दृष्टि करण्यास झपाट्यानें जात आहे.

ह्यावरून असें दिसतें कीं, या शास्त्रास अझून अविचारी व तामसी लोकांकडून बराच अडथळा झाला पाहिजे. [कारण चंद्र मंगळाचे घरांत आहे] परंतु शनि व शुक्र यांचे पूर्ण दृष्टीचे परिणाम झाल्यानंतर चंद्राशीं दुसरे शुभदृष्टियोग होत आहेत. येथें एक मोठा चमत्कारिक प्रकार दृष्टोत्पत्तीस येत आहे कीं, चंद्र मेष राशींतून जाईपर्यंत त्यास सर्व ग्रह पाहत आहेत. त्यानें शुक्र व शनि यांच्याशीं पूर्ण दृष्टि केल्यानंतर गुरूशीं ६० अंश दृष्टि करीत आहे. ही दृष्टि या ग्रंथकारानें या शास्त्रावर केलेल्या ग्रंथाबद्दल जनसमाजाची आवड दर्शवीत आहे. नंतर बुधाशीं १२० अंश दृष्टि करीत आहे ही य शास्त्राचे विद्यार्थ्यांची वाढती संख्या व लोकांतील चर्चा दर्शवित आहे मंगळाशीं होणारी ६० अंश दृष्टि बलवान् अशा मित्रांची वाढत संख्या दर्शवीत आहे. व जे जोरानें या शास्त्राचें प्रतिपादन करणा पुढारी होतील. हर्शलशीं होणारी ६० अंश दृष्टि फारशी महत्वाचें नाहीं. परंतु चंद्र या राशींतून जाण्याचे पूर्वी शेवटची १२० अंश दृष्टि सूर्याबरोबर करीत आहे. ती खात्रीपूर्वक असें दर्शविते कीं सरते शेवटीं या शास्त्रास राजकीय पाठिंबा मिळेल व लोकांत ह्या शास्त्राची मान्यता जास्त वाढेल. आणि ज्या अर्थी सूर्य सिंह या स्थि राशींत आहे त्यावरून हें सर्व चिरकाल टिकणारें दिसतें.

आतां आपणास या शास्त्राचा शेवट काय होईल हें पाहिलें पाहिजे ह्मणून चतुर्थ स्थानाचा विचार करूं. चतुर्थ स्थानाचा आरंभसंधि (भावारंभ) आमले टर्ममध्यें आहे. त्याचप्रमाणें त्या स्थानाचा स्वा मंगळ आहे. ट्रिपलीसिटी व प्रेस प्रमाणें सूर्य त्याचा स्वामी आहे सूर्य १२० अंश दृष्टि चतुर्थभावारंभाशीं करीत आहे. चतुर्थस्थान धिपति मंगळ हा गुरूशीं युति करीत आहे, आणि बुध व चं यांशीं ६० अंश दृष्टि व शुक्र आणि शनि यांशीं १२० अंश दृ

शेवटीं सत्य पक्षच जय पावेल. या शास्त्राचा खरेपणा व उपयोग या गोष्टींची कायमची स्थापना होईल. बुध हा स्थिर राशींतून असून शनि, गुरु, मंगळ, [चतुर्थाधिपति जो नेहमीं सर्व गोष्टींचा शेवट कसा होईल हें दर्शवितो] शुक्र व चंद्र यांचेशीं बलवान् दृष्टियोग करीत आहे. हा दुसरा एक बलवान् पुरावाच आहे व तो स्पष्ट रीतीनें असें दर्शवीत आहे कीं, पृथ्वीचें अस्तित्व कायम आहे तों पर्यंत **ज्योतिषशास्त्राची उत्तरोत्तर भरभराट झाली पाहिजे.**

ता. क.

बुध हा नुकताच शुक्राच्या ६० अंश दृष्टींतून सुटत आहे. शुक्र नवम स्थानचे धन स्थानाचा व कुंडलीचे दशमाचा अधिपति आहे. नवम स्थानाचे नवमस्थानाचा अधिपति आहे. यावरून पंचांगावर चालू असलेला कर माफ झाल्यानें जो फायदा झाला आहे तो पूर्ण दर्शविला गेला आहे. कारण, पंचांगावर आजपर्यंत कर असल्या कारणानें ह्या शास्त्राचें अति नुकसान झालें आहे. दुसरी एक मोठी विचार करण्याजोगी गोष्टी आहे कीं, गुरु हा नवम स्थानापासून असणारे दशम स्थानाचे भावारंभावरून जात आहे. सन १८३९चे फेब्रुवारी ७ वे तारखेस [लिलीज अस्ट्रॉलजी] या पुस्तकाचे पहिले आवृत्तीचे शेवटचे प्रूफ निघाले. त्या वेळेस शनि हा तूळ राशीचे २३ अं. ६ क. गेला. तो नवमांत असल्यानें या शास्त्राचे लाभास हानिकारक होता. ते त्यानें नुकतेच सोडले आहेत.

———————

पाश्चात्य पद्धतीचें ग्रहाचें अधिकारदर्शक कोष्टक.

र	स्वगृह	उच्च	ट्रिपली सिटी	टर्म	फेस	निर्बल नीच गृह
मे.	मं. दि.	सू.१९	सू.गु.	गु.६ शु.१४ बु.२१ मं.२६ श.३० मं.१०	सू.२० शु.३०	शु श
वृ.	शु. रा.	चं.३	शु.चं.	शु.८ बु. १५ गु.२२ श.२६ मं.३० बु.१०	चं.२० श.३०	मं
मि.	बु. रा.	रा. ३	शु. बु.	बु.७ गु.१४ शु.२१ श.२५ मं.३० गु.१०	मं.२० सू.३०	गु
क.	चं.दि.रा	गु.१५	मं. मं.	मं.६ गु.१३ बु.२० शु.२७ श.३० शु.१०	बु.२० चं.३०	श मं
सिं.	सू.दि.रा		सू.गु.	श.६ बु.१३ शु.१९ गु.२५ मं.३० श.१०	गु.२० मं.३०	श
क.	बु. रा.	बु.१५	शु. चं.	बु.७ शु.१३ गु.१८ श.२४ मं.३० सू.१०	शु.२० बु.३०	गु शु
तू.	शु. दि.	श.२१	श. बु.	श.६ शु.१३ गु.१८ बु.२४ मं.३० चं.१०	श.२० गु.३०	मं सू
वृ.	मं. रा.		मं. मं.	मं.६ गु.१४ शु.२१ बु.२७ श.३० मं.१०	सू.२० शु.३०	शु चं
ध.	गु. दि.	के ३	सू.गु.	गु.८ शु.१४ बु.१९ श.२५ मं.३० बु.१०	चं.२० श.३०	बु
म.	श. रा.	मं. २८	शु. चं.	शु.६ बु.१२ गु.१९ मं.२५ श.३० गु.१०	मं.२० सू.३०	चं गु
कुं.	श. दि.		श. बु.	श.६ बु.१२ शु.२० गु.२५ मं.३० शु.१०	बु.२० चं.३०	सू
मी.	गु. रा.	शु. २७	मं. मं.	शु.८ गु.१४ बु.२० म.२६ श.३० श.१०	गु.२० मं.३०	बु बु

खुलासा.

चंद्र व सूर्य या दोन ग्रहांखेरीज प्रत्येक ग्रहास दोन दोन स्वगृहें आहेत. शनीचें मकर व कुंभ, गुरूचें धन व मीन, मंगळाचें मेष व वृश्चिक, शुक्राचें वृषभ व तूळ आणि बुधाचें मिथुन व कन्या. यां पैकीं एक घर दिवसाचें जें दुसऱ्या कालममध्यें दि या अक्षरानें दाखविलें आहे व दुसरें रात्रीचें जें रा या अक्षरानें दाखविलें आहे.

ग्रह विशिष्ट राशींत उच्च असतात, तें तिसऱ्या कालमवरून कळेल. जसें—रवीचें परम उच्च मेष राशीचे १९ अंश आहेत.

बारा राशि चार त्रयामध्यें विभागलेल्या आहेत. चवथा कालम दिवसा व रात्रीं कोणत्या त्रयीवर कोणत्या ग्रहाचा अंमल अथवा अधिकार आहे हें दाखवितो. जसें—कर्क, वृश्चिक व मीन [जलत्रयी] यांचे पुढें मंगळ लिहिलेला आहे व तो दिवसा आणि रात्रीचा अधिपति आहे. मेष, सिंह व धनु [अग्नित्रयी] यांचे पुढें सूर्य व गुरु लिहिलेले आहेत. त्यावरून सूर्य दिवसाचा व गुरु रात्रीचा अधिपति जाणावा. याप्रमाणें हें कोष्टक आहे.

मेष राशीच्या ६ अं. पर्यंत गुरूची, नंतर १४ अं. पर्यंत शुक्राची टर्म या प्रमाणें टर्मचें कोष्टक पहावें.

मेष राशीच्या पुढें १० व्या, ११ व्या व १२ व्या कालममध्यें मं. १० सू. २० शु ३० असें आहे त्यावरून मेष राशीचे पहिले १० अंश मंगळाचे फेस, नंतर २० अं. पर्यंत सूर्याचे फेस व ३० अं. पर्यंत शुक्राचे फेस जाणावे.

तेरावे कालममध्यें मेष राशीचे पुढें शुक्र लिहिलेला आहे तो या राशींत आपले स्वगृहसंमुख राशींत असल्यामुळें निर्बली असतो.

चवदावे कालममध्यें मेष राशीचे पुढें शनि लिहिला आहे. मेष ही शनीचे उच्च स्थानापासून संमुख असणारी रास असल्यानें तें त्याचें नीच होय.

कळावें लोभ असावा हे वि

यशवंत प्रधान.

---

[३]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.

सा. न. वि. वि. — श्रीगणपतीचा जन्म भाद्रपद मासीं शु. ४ ला झाला आहे. तरी त्यावरून त्याच्या जन्मदिवसाची कुंडली कल्पनेनें बसवून पाठविली आहे. येत्या अंकीं स्थल मिळावें.

जन्म—दुपारीं १२ वाजतां



लग्न वृश्चिक मंगळाचे दृष्टींत व चंद्र कन्येचा ह्मणून शिरच्छेद होऊन हत्तींचें शीर लागून तें ओबडधोबड व स्थूल झालें. मातेचें सुख जास्त ह्मणून कर्क राशींत शुक्र ठेविला. शत्रुहर्त्ता ह्मणून मंगळ स्वगृहीं षष्ठ स्थानीं ठेविला. अवतारी ह्मणून राहु – केतु षष्ठद्वादश असे ठेविले आहेत. बुद्धिदाता ह्मणून विद्यास्थानीं गुरु ठेविला आहे.

कळावें लोभ असावा हे वि. –

आपल

अनंत नारायण ठकार

पत्रव्यवहार.

[१]

वि. वि.—पुढील कुंडली पुरुषाची आहे. या गृहस्थाची आजपर्यंतची हकीकत जो वस्तुस्थितीशीं मिळती सांगेल व ज्याची सर्वांत चांगली उतरेल त्यास **एक रुपया बक्षीस** मिळेल ! उत्तरें परभारें खालील पत्त्यावर पाकिटांत पाठपेंड अशीं ता० ३१ अकटंबर पर्यंत पाठवावीं. कुंडली अगदीं बरोबर आहे.

जन्म—शके १७९६ ज्येष्ठ व० ११ शुक्रवार स. नं. घ. ९९ प० ९ ता० १३ जून सन १८७४ जन्म ठिकाण अक्षांश २० बऱ्हाणपूर

निरयन



सायन

पत्ता.—कृष्णाजी माधव वाटपाडे क्लार्क, रेसिडेंट एजिनिअर्स ऑफिस जी. आय्. पी. रेलवे स्टेशन भुसावळ जि० पूर्वखानदेश.

---

[२]

वि. वि.—तां. ७ सपटंबर रोजीं सूर्योदयाच्या अगोदर सुमारें १ तास एका बाईनें कांहीं विषारी औषध घेऊन गर्भपात केला. या बाईचा नवरा पूर्वी २ वर्षें मेलेला असून ती पुढें वाईट चालीची

निघाली आणि गरोदर राहिली. सुमारें ६।७ महिन्यांचा हा गर्भ होता. गर्भ पडल्यानंतर २ तासानें ती बाईही मेली. तिच्याशीं लागू असलेला मनुष्य तुरुंगांत आहे. गर्भ मुलीचा असून तो पूर्णावयव होता तरी १ मुलीचें गर्भांत मरण २ मतेला मरण व ३ जाराला तुरुंग या गोष्टी कोणत्या ग्रहस्थितीनें घडवून आणिल्या याबद्दल कोणी खुलासा करील काय?

कळावें. हे वि.— **एकवर्गणीदार.**

---

[३]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

सा. न. वि. वि.— कुंडलीविज्ञानांत आपण प्रसिद्ध केलेल्या मजकुराबद्दल मीं लिहिलेल्या चार ओळींस जागा द्याल अशी आशा आहे.

१ कुंडलीविज्ञानचे २१ व्या अंकांत 'जारकर्मापासून उत्पत्ति' या बद्दल दिलेला मजकूर वाचून त्याबद्दल माझ्या समजुतीप्रमाणें आपलें म्हणणें कळवीत आहें.

२ कुंडलीवरून जारकर्मापासून उत्पत्ति सिद्ध करितां येईल.

३ आईबापांच्या कुंडल्यांवरून जारकर्माचें फलाफल निश्चित करितां येईल.

४ हीं तत्वें श्रमसाध्य असल्यामुळें त्यांचा सत्यता सहज समजेल. प्रारब्धयोग हा ग्रंथ नवीन असून पूर्वीचे पुष्कळ ग्रंथांशीं मिळता आहे. म्हणून यांत जे योग दिले आहेत ते बहुतेक खरे आहेत.

५ रूपामध्यें पित्याशीं साम्य असणें हें एकच कारण जारकर्मापासून उत्पत्ति सिद्ध करण्यास पुरेसें नाहीं. या विषयीं प्रसिद्ध वैद्यकीय ग्रंथ वाग्भट यांत सविस्तर विचार केलेला दिसतो.

६ विद्यारण्य पंडितांनीं आईचे जार कर्मांविषयीं केलेलें विवरण येणें प्रमाणें आहे.

चंद्रकुजषष्ठपाः मातृस्थानस्थिताश्चेन्मातुरन्यपुरुषसंगमयोगः। तत्र राहुकेतुयुक्तौ नीचसंगमः। शनिना शूद्रसंगमः। गुरुशुक्राभ्यां ब्राह्मणसंगमः। रविणा क्षत्रियसंगमः। षष्टपंचमपौ सपापौ एकत्रस्थितौ चेन्मातुः परपुरुषसंगमेन परजातो भवति॥

अर्थ.—चंद्र, मंगळ व षष्ठस्थानाधिपति मातृस्थानीं असल्यास माता जारिणी होय. राहुकेतुयुक्त असल्यास नीच संगम होय. शनियुक्त असल्यास शूद्रसंगम जाणावा. गुरुशुक्रयुक्त असल्यास ब्राह्मणसंग जाणावा. रवियुक्त असल्यास क्षत्रियसंगम जाणावा. षष्ठ आणि नवम यांचे स्वामी पाप असून एकत्र असल्यास अन्य पुरुषाच्या संगमानें जातिभ्रष्ट जाणावा.

८ बापाच्या कुंडलीवरून स्वबीज आणि अन्य बीज या संबंधीं विचार खालील आधारावरून केला जातो.—

लग्नाद्द्वादशगे चंद्रे लग्नादष्टमगे गुरौ।
पापयुक्ते च संदृष्टे पुत्रस्यादन्यबीजतः॥ १

लग्नापासून द्वादश स्थानीं चंद्र असेल व अष्टमांतील गुरु पाप ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असेल तर पुत्र अन्यबीज जाणावा.

९ वरील आधारांवरून विचार करितां मुलाची उत्पत्ति जारकर्मापासून आहे किंवा नाहीं हें स्पष्ट होईल.

१० कुंडलीचा अनुभव उलट असल्यास तींत चूक आहे असें समजावें.

कळावें लोभ असावा हे विनंति.

शंकरशास्त्री ज्योतिषी.

* या विषयावर अधिक वादविवाद करणें योग्य नाहीं. ग्रंथांतील योग अनुभवास येतील तर त्यांस कोणी दूषण देणार नाहीं. परंतु योग खरे आहेत असें मानून ते ज्या ठिकाणीं आढळतील त्या ठिकाणीं तशीच स्थिति आहे असें ह्मणणें मूर्खपणाचें आहे. योगांचा दहा ठिकाणीं प्रत्यक्ष अनुभव घ्यावा आणि मग त्यांच्यावर विश्वास ठेवावा.

" संपादक कुंडलीविज्ञान "

---

[४]

वि० वि०—वर्ष ८ पुस्तक २२ मध्यें मानसिक दुर्बलता या मध्यें एक लेख आहे. त्यांत 'रात्रीं जन्म असतां शनिबुधांचा अशुभ दृष्टींत संबंध असेल तर वेड उत्पन्न होतें' असें लिहिलें आहे. त्या प्रमाणें एक कुंडली मिळाली आहे ती अशी.—

जन्म—शके १८२४ भाद्रपद शु० ११ रात्रीं ११ वाजतां.

(निरयन)



ही मुलगी सहा महिनेपर्यंत चांगली होती. पुढें तिला फेपरें येऊं लागलें. हल्लीं वेड्यासारखी वृत्ति आहे. जन्मापासून ५ वर्षे पर्यंत भाषा नव्हती. पुढें एकदम बोलूं लागली. बांधा उंच. वर्ण साधारण गोरा. डोळे तिरवे पण काळे. तोंड लांबट. प्रकृति सशक्त. भाऊबहिणी आहेत. वडिलांची स्थिति चांगली आहे. कोणी कांहीं उपाय सांगितल्यास शक्तीप्रमाणें करितील.

पुस्तक ८ अंक १९ मध्यें 'वक्रगति कां' या संबंधीं एक लेख आहे, त्यावरून खालील कुंडली पाठविली आहे. आपल्या ह्मणण्याप्रमाणें असल्यास प्रसिद्ध करावी.

जन्म—शके १८०७ कार्तिक शु० १ शनिवार रात्रीं ९ वाजतां

(निरयन)



बांधा मध्यम. तोंड लांबट. वर्ण साधारण गोरा. सतरा वर्षे पर्यंत प्रकृति चांगली. पुढें बाळंत होऊन त्यांत ताप येऊन कमरेखालील भाग गेल्यासारखा झाला आहे. पुढें थोड्याच दिवसांनी पति स्वर्गस्थ झाले! हल्लीं काठी घेऊन किंवा आधारानें चालावें लागतें. सायन कुंडली केल्यास लग्नीं कर्क राशीचा शनि येतो. हल्लींचे चालीवरून चालणें वांकडे पाऊल टाकून असावें असें वाटतें.

कळावें लोभ असावा हे वि०—

नारायण विनायक खाडीलकर.

सब् ओव्हरसीअर मु० त्रिंबक.

जि० नाशिक.

---

[५]

फेरपें व द्वितीय विवाह.

स्त्रीची पुरुषाची

श.१८१३ पौ.शु.९ घ ५३।३० श.१८०६ आषाढकृ.१२ घ.५।१३

सायन सायन



स्त्री स्वरूपानें चांगली असून गुणी आहे. परंतु तिला फेपरें येत असल्यामुळें तिचा नवरा द्वितीय विवाह करूं ह्मणतो. तेव्हां तो होणें शक्य आहे काय? असल्यास कधीं? आणि स्त्रीच फेपरें जाण्यासारखें आहे किंवा नाहीं असल्यास केव्हां? या गोष्टींचा विचार कर्त्तव्य आहे.

फेपरें येणें हा मंगळाचा गुण आहे. पण येथें मंगळ अग्निराशींत नसून शनीशीं युत किंवा दृष्ट नाहीं. तेव्हां झटक्याची व्यथा नसावी असें वाटतें. कित्येक तिला भूतबाधा आहे असें ह्मणतात. तें कांहीं अंशीं खरेंही दिसतें. कारण, बृहज्जातकांत भूतबाधेसंबंधानें दिलेल्या नियमान्वयें येथें चंद्रराहु एक असून मंगळानें दृष्ट आहेत. लग्नीं अग्निराशीचा बुध असून त्यावर शनि पाहतो. त्यामुळें तिला भूतबाधाच असावी. पण ती जाण्यासारखी आहे किंवा नाहीं हें कळत नाहीं.

पतीच्या कुंडलींत कुटुंबस्थानीं तीन पाप ग्रह आहेत ते स्त्रीसुखाची उणीव दर्शवित आहेत. ते व शुक्राच्या चतुर्थ स्थानचा मंगळ यावरून त्यानें एक सोडून कितीही विवाह केले तरी भार्यासुख कसें मिळावें;

स्त्रीच्या कुंडलीकडे पाहिलें तर कुटुंबस्थानीं रवि, व्यय स्थानीं मंगळ, सप्तमेश शनीनें दृष्ट व सप्तमांत नेपच्यून ही ग्रहस्थिति तिला पतिसुख कसें देणार?

द्वितीय विवाह होणें शक्य आहे, असें वरील वर्णनावरून दिसतें. जन्मकाळीं गुरु व्यय स्थानीं आहे, यावरून तो कन्यागतीं कुटुंब स्थानीं चंद्राला पांचवा झाल्यावर व्हावा हें योग्य आहे. स्त्रीचा रोग कांहीं असो, पण तो बरा होणारा नसावा. भूतबाधा हा एक अपस्माराचाच प्रकार आहे.

शंकर रामचंद्र प्रधान.

---

[६]

वि. वि.—खालील कुंडली दशाहिकांत प्रकाशित करावी.

जन्म—शके १७६९ कार्त्तिक शु० १ सोमे सू. नं. १९।३०

जन्मस्थळ—काश्मीर.

महामहोपाध्याय पं. दुर्गाप्रसाद.

(निरयन)



पंचवीसाव्या वर्षापूर्वी काश्मीर सोडून देशपर्यटणास निघाले. ते ज्योतिष व साहित्य या शास्त्रांत पारंगत होते. त्यांस जयपूरचे महाराजांचा आश्रय होता. त्यानंतर त्यांनीं **काव्यमाला** नामक

मासिक पुस्तक सुरू केलें. तें संस्कृत भाषेंत निर्णयसागर छापखान्यांत छापून प्रसिद्ध होत असे. त्यात त्यांना मोठा मान मिळाला.

सन १८९२ ता. १९ मे या दिवशीं दिवसास २-३ वाजतां कालव्यानें त्यांस मृत्यु आला. सरकारांतून त्यांस महामहोपाध्याय किताब मिळाला होता.

आकार लंब, प्रकृति गंभीर, हसतमुख, सभाचतुर व समाजप्रिय असे होते. त्यांचीं एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें हयात आहेत.

कळावें लोभ असावा हे वि.—

पं. केदारनाथ.

पत्रास उत्तर.

सिताराम बेंद्रे–मालवण–यांस उत्तर.—

१ साडेसातीला दशा नसतात.

२ साडेसाती चाद्य स्थितीस कोणती जुळते हा प्रश्न समजला नाहीं.

३ दत्तक योगाबद्दल मागें एका अंकांत विवेचन केलेलें आहे तें पहावें.

४ पितृस्थानच्या सुखाचा विचारही कसा करावा तें मागें सांगीतलें आहे.

आपणास आणखी बरेंच प्रश्न विचारावयाचे आहेत त्याबद्दल आनंद वाटतो. परंतु त्या पूर्वी अशी सूचना आहे कीं कुंडलीविज्ञानचे सर्व अंक वाचून पहावे व इतर ज्योतिषग्रंथही वाचावे.

—संपादक कुंडलीविज्ञान—

पत्रव्यवहार.

[१]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस

सा. न. वि. वि.—कुंडलीविज्ञान पुस्तक ८ अंक २७ यांत शंकरशास्त्री ज्योतिषी यांनी "जारजाता" संबंधी जो मजकूर प्रसिद्ध केला आहे त्या विषयींच अनेक ग्रंथांतील प्रमाणसिद्ध असे आधार खालीं देत आहें ते येत्या अंकीं प्रसिद्ध करावेत.

॥ न प्रांग्विलग्नं च विधुं प्रपश्येज्जीवोर्कयुक्तं सितगुं च यद्वा ॥ सार्के विधौ पापयुतेऽथवा चे त्स्याज्जारजातस्य तदाहि जन्म ॥ सुरेज्यदृष्टे तनुगेथवाब्जे देवेज्यवर्गो ज्झित एष चंद्रे ॥ सपापकेर्केण युतेथ चंद्रे स्याज्जारजातस्य तदाहि जन्म ॥ २ ॥ नीचोपगाः सूर्यसुरेज्य चंद्राः कुर्वंति ते जन्मनि जारजातम् ॥ यद्वा तनौ सूर्यसुतेन दृष्टाः शुभैश्च चंद्रोदय भार्गवाख्याः ॥ ३ ॥ न लग्नं पश्यतींदूच जीवः सूर्योपेतं शीतरश्मिंच यद्वा ॥ सार्के चंद्रे पापयुक्तेथवास्यान्निः संदिग्धं जारजातस्य जन्म ॥ ४ ॥ अत्र सूर्येंदू एकत्र पृथक्स्थौ वा पापयुक्तौ गुरुणा न दृष्टौ जारजातजन्मकरौ इत्युक्तं शुक्रजातके—

॥ न पश्यति गुरुश्चंद्रे लग्नं वा परजातकः ॥ सार्केंदु नेक्षिते जीवः सूर्येंदू पापसंयुतौ ॥ १ ॥ एकस्थौ वा पृथक्स्थौ वा नेक्षितौ गुरुणा तथा इतियोगांतरमाह गुणाकरः ॥ नीचस्थिताश्चंद्रादिवाकरेज्याः कुर्वंत्यमीजन्मनि जारजातं ॥ लग्नेथवा सूर्यसुतेन दृष्टाः सौम्यैश्चशुक्रोदयशीतभासः ॥ १

अथ तिथिवारर्क्षयोगानाह

स्यातौ द्वितीया रविवारयोगे सोमात्मजे सप्तभिरे वतीषु ॥ स्याद्वादशी वासवमंदवारे जारेण जातं प्रवदंति बालं ॥ १ ॥ नवमस्थो गुरुर्यत्र

धने चंद्रोर्के मंडले ॥ अन्यजातः सविज्ञेयो योगेस्मिन्पतिते ध्रुवं ॥२॥ चंद्रारभानवः षष्ठे गुरुः पंचमगो यदि ॥ योगेस्मिन्नात्रसंदेहश्चान्य जातः स उच्यते ॥ ३ ॥ अर्यम्णभेस्याद्रविवासराष्टमी विश्वे चतुर्थी गुरुवासरंच ॥ हिर्बुध्नभे भौमदिनं चतुर्दशी स्याज्जारजातस्य च जन्मकाले ॥ ४ ॥ दिनांतंच तिथिप्रांते लग्नप्रांतेच सूतिषु ॥ वारस्यांतेच यो जातः सोन्यजातः प्रकीर्तितः ॥ ५ ॥ लग्नपादर्क्षसंयोगाद् द्वितीया द्वादशी यपि ॥ सप्तमीचार्कमंदारे जारतो जायते ध्रुवं ॥ ६

अत्रापवादमाह—गार्गिः

गुरुक्षेत्रगतेचंद्रे तद्युक्ते अन्यराशिगे ॥ तद्द्रेष्काणे तदंशेवा न परैर्जात इष्यते ॥ १ ॥

शुक्रजातके सौम्यराश्यंगे चंद्रे जारजात योगापवाद उक्तः—॥ सौम्यराश्यंशगे चंद्रे गुरुराश्यंशगोपिवा ॥ जारजातस्य योगेपि न परेर्जात इष्यते ॥ १ ॥

कळावें लोभ असावा हे विनंति.

गणेशशास्त्री ज्योतिषी-देशिंगकर.
सं. मिरज ज्युनिअर.

---

[२]

वि० वि०—खालील मजकुरास सोईप्रमाणें कुंडलीविज्ञानांत स्थल मिळण्याची कृपा व्हावी.

गणित शास्त्राची इमारत मुख्यतः अंक व स्थान परत्वें त्यांची योग्यता इत्यादींवर उभारलेली आहे. त्याचप्रमाणें फलज्योतिषाचा पाया ग्रह, राशि अथवा नक्षत्रें व स्थानपरत्वें ग्रहांची योग्यता यांवर

रचिला आहे. ग्रह व राशि यांचें वास्तविक स्वरूप, वर्ण, स्वभाव व स्थानपरत्वें त्यांचें होणारें प्रकृत्यंतर इ० चें खरें ज्ञान संपादन करणारा ज्योतिषी या पदवीस पात्र होतो. असें ज्ञान संपादन करणाऱ्या ज्योतिष्यास अनेक योगांचे श्लोक पाठ करण्याची किंवा पुस्तकांचा भार बाळगण्याची जरूर नसून ज्योतिषचे प्रश्न भराभर सोडवितां येतील. जसें, गणकास अधिकांत अधिक मिळविल्यास फल अधिकच होतें किंवा अधिकांत उणें मिळविल्यास उणें फल होतें हें स्पष्ट सांगतां येतें तसेंच अग्नितत्वांत अग्नितत्व मिळालें असतां तें फार प्रबल होऊन त्याची दाहकशक्ति तीव्र होईल अथवा त्यास जलतत्व मिळाल्यास अग्नितत्वाचा नाश होईल. (अग्नि व जल यांचें प्रमाण व बल विचारांत घेणें अत्यावश्यक आहे.) हें ज्योतिष्याच्या लक्षांत सकृद्दर्शनीं आलें पाहिजे. अशाच विचारांवरून प्राचीन महर्षींनीं ग्रहांचें स्वामित्व व उच्चनीचादि नियम बसविले असावे. उदाहरणार्थ—अग्नितत्वाचा द्योतक रवि, मेष या अग्निराशींत येऊन उच्च (बलवान्) होतो. व मंगळ हें अग्नितत्व मकर या वायुतत्वांत बलवान् होतें. मंगळ व रवि यांच्या दाहक शक्तींत मोठें अंतर आहे. मंगळचा अग्नि साह्यानें पेट घेतो व रवीचा अग्नि स्वयंदाह्यमान आहे.—रवि मेष राशीचे १० अंशांतच कां पूर्णोच्च होतो याचें कारण मात्र कळत नाहीं—कृत्तिका नक्षत्र जसें अग्नितत्वाचें आहे तसें अश्विनी नाहीं हें तर स्पष्टच आहे. उच्चनीचादि नियम उत्पन्न होण्याचे काळीं हीं नक्षत्रें विषुववृत्तावर (म्हणजे विभागात्मक नक्षत्राचे स्थानीं) असून अति सूक्ष्म गतीनें कृत्तिका नक्षत्र अश्विनी नक्षत्राचे स्थानीं आलें असावें. प्रस्तुत उपलब्ध ज्योतिष ग्रंथांचें ज्ञान फार अधुरें व अपुरें आहे हें आपण वारंवार प्रतिपादन

केलेंच आहे. आह्मांस तर प्राचीन ग्रंथांचे अधारावर खरा मार्ग न कळतां चांचपत चालावें लागतच आहे. प्राचीन बरेच ग्रंथ (मुख्यत: करण व कलाग्रंथ) अनेक कारणांनीं नाहींसेच झाले अहेत ह्मणून आह्मांस नवीन ग्रंथ तयार करणें अत्यावश्यक झालें आहे. आज आपली सांपत्तिक स्थिति हीनावस्थेस येऊन पोहोंचल्यानें हें काम सहज होणारें नाहीं हें खरें आहे. तथापि आह्मांस तें करितांच येणार नाहीं असें मात्र ह्मणवत नाहीं. विदेशीय जातींत ग्रहांचे वेध घेऊन त्यांचीं घटक द्रव्यें काय व त्यांचे गुण काय, दोन अथवा अनेक विवक्षित द्रव्यांचे मिश्रणापासून कोणतें द्रव्य उत्पन्न होतें इ० विषयीं शोध चाललेले आहेत तसेच आह्मींही केले पाहिजेत. तें कांहींच न होईल तर निदान पाश्चात्य ग्रंथांवरून व आर्य ग्रंथांवरून ग्रह व राशी यांचे गुणधर्मासंबंधानें माहिती गोळा करून [पुनरुक्त गोष्टी सोडून] समाजापुढें ठेवावी व त्यांत कांहीं गोष्टी एकमेकांच्या विरुद्ध असल्यास यथासंभव सर्वानुमतें एक नियम ठरविण्याचा प्रयत्न करण्याची नम्रतापूर्वक सूचना करून व आर्यभूमींत निदान एक तरी वेधशाळा स्थापन करण्याविषयीं ईश्वराच्या चरणीं सविनय प्रार्थना करून हा लेख पुरा करितों.

कळावें लो. अ. हे वि.

आपला

नथूराव गोखले मास्तर

मुरार—लष्कर ग्वाल्हेर

पत्रव्यवहार.

[१]

रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस:—

स. न. वि. वि.— निरनिराळ्या प्रकारच्या कुंडल्या परिशीलनासाठीं वाचकांपुढें मांडण्याची आपली वहिवाट आहे. सबब एक गृहस्थाची कुंडली जरा विचारार्ह वाटल्यासुळें ती आपणाकडे पाठवीत आहें. ज्याप्रमाणें रसायनशास्त्रवेत्ते निरनिराळ्या पदार्थांचें अग्नीच्या साह्यानें पृथक्करण करून पाहण्यांत व तद्द्वारा नवीन नवीन शोध लावण्यांत आनंद मानीत असतात त्या प्रमाणें भिन्न भिन्न प्रकारच्या कुंडल्या पाहून त्याजबद्दल निश्चयानें खरीं होतील अशीं अनुमानें ठरविण्यांत ज्योतिषशास्त्रज्ञच मंडळीची करमणूक होत असते. तशी करमणूक होण्यासारखी ही कुंडली दिसली सबब आपणाकडे पाठवीत आहें. ती चर्चेकरितां कुंडलीविज्ञानद्वारें वाचकवृंदांपुढें ठेवावी अशी आशा आहे.

जन्मलग्नकुंडली.



जन्म—शके १८०१ श्रावण शु० १३ गुरुवार

आपला

—वर्गणीदार—

ठाणें.

* अशा प्रकारच्या कुंडल्या आमच्याकडे प्रसिद्धीसाठीं बऱ्याच येत असतात. परंतु त्यांचें वास्तविक वर्णन दिलेलें नसल्यामुळें त्या प्रसिद्ध करण्यापासून वाचकांचा काडीचाही फायदा नाहीं. कुंडली बरोबर जन्मकाल व विशेष महत्वाची हकीकत नसेल तर ती कुंडली यापुढें प्रसिद्ध करण्यांत येणार नाहीं. नुसती कुंडली दिल्यानें वाचकांची करमणूक होणार नाहीं. वास्तविक स्थिति व तिचा शास्त्राशीं मेळ यांसह ती कुंडली असेल तरच वाचकांस ज्ञान व करमणूक होईल. कुंडली पाठविणारास शास्त्राशीं मेळ घालतां येत नसेल तर तें काम संपादक अगर जिज्ञासू वाचक करील. पण वास्तविक स्थितीच जर कळली नाहीं तर हा रिकामा खटाटोप कोणीही करणार नाहीं. कुंडलीविज्ञानमध्यें एखाद्या कुंडलीची चर्चा होईल पण हकीकत कळेल तर. हें लक्षांत घेऊन कुंडल्या पाठविण्याची यापुढें व्यवस्था ठेवावी.

—संपादक—

---

[२]

वि. वि.—पुढील कुंडल्या प्रसिद्धीसाठीं पाठविल्या आहेत त्यांस येत्या अंकांत स्थल मिळावें.

जन्म—ता. ९ अक्टोबर १९०७ बुधवार रात्रीं ११ वाजून ९ मि.

निरयन

सायन

हा मुलगा फार व्रात्य असून नेहमीं पडून जखमा होतात व त्यास अपस्माराचा उपद्रव आहे.

* निरयन कुंडलींत शुक्र सिंहेत दिला आहे तो चुकीचा आहे. तो तूळ राशींत पाहिजे. व रवीही कन्या राशींतच पाहिजे. या प्रमाणें दोन ग्रह चुकीचे आहेत. कुंडली पाठवितांना ग्रह तपासून पाठवावे. अपस्मार आणि जखमा होणें हे दोन दोष मुख्यत्वें मंगळाचें आहेत. सायन कुंडलीचें लग्न कर्क असून त्याचा स्वामी चंद्र वृश्चिक राशींत मंगळाच्या क्षेत्रीं आहे, व लग्नावर मंगळ पूर्ण दृष्टीनें पाहत आहे. लग्नीं राहु व नेपच्यून हे दोन पाप ग्रह आहेत. चतुर्थ (सुख) स्थानीं रवि आहे. ही ग्रहस्थिति दुःख भोगावयास लाविते असें समजावें.

—संपादक—

२ खालील कुंडली चमत्कारिक आहे. ही एका मुलीची आहे. तिला जन्मकाळीं गुदद्वार मुळींच नव्हतें! नंतर तीन डाक्टरांनीं तीन वेळां कातडी कापून छिद्र केलें! हिलाही अपस्माराचा उपद्रव आहे.

जन्म—ता. २३ एप्रिल मंगळवार १९०७

सायन

* जन्मलग्नाचा स्वामी चंद्र हा अग्निराशींत आहे. तो २४ अंश असून मंगळ ९ अंश असल्यामुळें त्यावर मंगळाची दृष्टि नाहीं. लग्नावर हर्शल व मंगळ पाहत असून लग्नीं राहु व नेपच्यून आहेत. मंगळ व हर्शल हे अगदीं जवळ जवळ असून ते एकमेकांसीं लवक-

रच युति करणार आहेत. व मंगळ हा नेपच्यूनच्या अगदीं समोर आला आहे. चंद्राला हर्शल व मंगळ ६ वे असून शनि आठवा आहे. ही ग्रहस्थिति शरीरप्रकृतिला बाधक असल्यामुळें तिची वर सांगितल्याप्रमाणें स्थिति झाली ! हर्शल हा ग्रह नेहमीं विलक्षण गोष्टी घडवून आणीत असतो. —संपादक—

३ खालीं दिलेल्या कुंडलीची हकीकत येणेंप्रमाणें आहे.—या गृहस्थास १३ वे वर्षी सर्वांगावर व्यावीसारखा रोग फुटला. शेवटीं शके १८२४ मध्यें तो आत्महत्या करून मरण पावला. भावंडें १९ झालीं होतीं पैकीं मरणसमयीं ४ बहिणी हयात होत्या. मरणापूर्वी एक महिना आई मृत झाली. विवाह झालाच नाहीं.

जन्म—शके १७९६ वैशाख व० २ रविवार रोजीं
सूर्योदयापूर्वी सुमारें अर्धातास.

सायन



* सर्व पापग्रह केंद्रीं आहेत. चंद्र वृश्चिक या मंगळाच्या राशींत २७ अंश असून मंगळ वृषभ राशींत लग्नीं २९ अंश आहे, त्यामुळें तो मंगळाच्या पूर्ण दृष्टींत आहे. सुखस्थानीं सिंह राशीचा हर्शल असून समोर शनि आहे. शनि हा चंद्राच्या सुखस्थानीं आहे. यावरून हा मनुष्य भयंकर यातना भोगणारा झाला ! —संपादक—

कळावें लोभ असावा हे विनंति.

—बाळकृष्ण विष्णु देवस्थळे—

एका जर्मन ज्योतिष्याचें भविष्य.

हल्ल्यानंतर इंग्रजी राज्याचा ऱ्हास !

[दत्तात्रय श्रीधर दिवाडकर यांजकडून]

वरील नांवाचें १६ पानांचें एक पुस्तक एक महिन्यापूर्वी बर्लीन (जर्मनी) येथें मे० हरमन वालथर आणि कंपनी यांनीं छापून प्रसिद्ध केलें आहे, व त्याची किंमत १० पेनी ठेविली आहे. या पुस्तकांतील भविष्य करणारा जर्मनीमध्यें इतका लोकप्रिय झाला आहे कीं, त्या पुस्तकाच्या लाखों प्रती खपत आहेत. हें भविष्य प्रसिद्ध झाल्यापासून जर्मनींतील लोकांस फार उत्तेजन मिळून जिकडे तिकडे चळवळ उत्पन्न झाली आहे. तरी तें भविष्य आपल्या वाचकां करितां थोडक्यांत खालीं देतों.

" इ० स० १९११ मध्यें सर्व पृथ्वीवर एक प्रकारची क्रांति घडून येईल. जर्मनी व इंग्लंड यांच्या नॉर्थ सी मध्यें लढाईस सुरुवात होईल. पहिल्याच सामन्यामध्यें इंग्रजांच्या आरमाराची पूर्णपणें नासाडी होऊन त्यांचा पराभव होईल व २४ तासांच्या आंत जर्मनीचें आरमार इंग्लंडच्या किनाऱ्यावर येऊन लंडन शहर काबीज करून घेईल ! उभयतां सैन्यांची खडाजंगी उडून भयंकर रक्तपात होईल ! इंग्लंड व रशिया यांचा पूर्वी करारनामा झाला असेल कीं, प्रसंगीं एकमेकांनीं एकमेकांस मदत करावी, तरीसुद्धां या वेळीं रशिया आपलें वचन पाळणार नाहीं. कारण जर्मनीच्या विलक्षण शौर्याची कीर्ति ऐकून रशियाचीं गात्रें शिथिल पडतील. फ्रान्स मात्र इंग्लंडला मदत करील. परंतु त्याचें जर्मनीपुढें कांहीं चालणार नाहीं व त्याला

माघार घ्यावी लागेल. जपान इंग्लिशांच्या विश्वास घातकी राजनीतीचें उदाहरण घेऊन इंग्लंडच्या पराभवाची बातमी टोकिओस पोहोंचल्याबरोबर १० दिवसांच्या आंत हांगकांग सर करून घेईल. हिंदुस्थानमध्यें जर्मनीच्या विजयाची बातमी कळल्याबरोबर भयंकर क्रांति घडून येईल व हजारों इंग्लिश लोकांची कत्तल होईल. ही स्थिति हिंदुस्थानांत होत आहे तोंच रशियांतून कोसॅक स्वार सरहद्दीवरून खालीं उतरतील. व हिंदुस्थानांतील लोकांस तरवारीचे धारेवर स्वस्थ बसावयास लावून हिंदुस्थान आपले ताब्यांत घेतील! ईजिप्तमध्यें मात्र यूरोपियन लोकांची कत्तल होणार नाहीं. कारण इटालियन सैन्य ईजिप्तमध्यें घुसेल व यूरोपियन लोकांचें संरक्षण करील. इंग्लंडचा पराभव झाल्यावर ६ दिवसांनीं दक्षिण आफ्रिकेंतील संयुक्त संस्थानें स्वातंत्र्याचा झेंडा उभारतील! त्याच वेळेस अमेरिका कानडामध्यें शांतता राखण्याकरितां आपलें सैन्य पाठवील. अयर्लेंड स्वतंत्र होईल व इंग्लंडचें जूं झुगारून देईल. इंग्लंड व जर्मनी यांची लढाई फक्त तीन आठवडे चालेल. इतक्या अल्प अवधींत इंग्लंडचा पुरा नाश होऊन तें तह करण्यास कबूल होईल. जर्मनी तहाच्या अटीमध्यें विलक्षण औदार्य दाखवील व फक्त इंग्लंडचा व फ्रान्सचा आफ्रिकेंतील असलेला मुलुख घेऊन संतुष्ट होईल! इंग्लिश राज्याची कमान किती नाजूक आहे हें जर्मनीनें अल्पावधींत केलेल्या भयंकर पराभवापासून सर्व जगाला दिसून येईल व इंग्लंडचा दरारा कोणीही मानणार नाहीं!

या पराभवापासून **पृथ्वीचा नवीन नकाशा** होईल. इंग्लंड स्काटलंड व वेल्स हे इंग्लिशांच्या ताब्यांत राहतील. अयर्लेंड स्वतंत्र होईल. फ्रान्सच्या ताब्यांत असलेला हल्लींचा बहुतेक मुलुख जाईल. रशियाच्या ताब्यांत हल्लीं असलेला मुलुख राहून त्या शिवाय चीन, सयाम व मलाया द्वीपकल्पाशिवाय बाकी राहिलेला आशियांतील सर्व मुलुख जाईल. रशियानें घेतलेल्या मुलुखाशिवाय बाकी राहिलेला आशियांतील मुलुख जपान घेईल. व त्या शिवाय आस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड घेईल. आफ्रिकेंतील संस्थानें जर्मनी, आस्ट्रिया व इटाली हे विभागून घेतील. अमेरिका, कानडा व वेनेझुएला घेईल. स्वीडननार्वे डेन्मार्क, हालंड, बेलज्यम, स्पेन, पोतुर्गाल, मेक्सिको व दक्षिण अमेरिकेंतील संस्थानें स्वतंत्र राहतील."

* भविष्य करणारा जर्मन असल्यामुळें त्यानें जर्मनीचा जय व इंग्लंडचा पूर्ण पराजय होईल असें वर्तविलें आहे. परंतु हें त्याचें केवळ मनोराज्य आहे असें वाटतें. पहिल्याच सामन्यांत इंग्लंडचा पराभव होणें, २४ तासांत जर्मनीचें आरमार इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरणें व हिंदुस्थान रशियाच्या ताब्यांत जाणें या गोष्टी अगदीं अशक्य आहेत. इंग्लंड इतकें कमकुवत खचित झालेलें नाहीं. जर्मन लोकांच्या या निवळ वल्गना आहेत. तसाच प्रसंग आला तर इंग्लंड हिंदुस्थानच्या लोकांस हत्यारें देईल व मग रशियाच्या कोसॅक स्वारांस निवळ तरवारीच्याच बळावर हिंदुस्थानांतील लोकांस स्वस्थ बसावयास लावणें जड जाईल. आतां इतकें खरें कीं हर्शल मकर राशींत आहे तोंपर्यंत सर्व जगांत क्रांति आणि चळवळ सुरू राहील व कित्येकांस वाईट दिवस येतील. हर्शल मकर राशींत आल्यावर रूसोजपानी युद्ध, रशियांत, तुर्कस्थानांत, व इराणांत क्रांति, बलगेरियाचा स्वतंत्रतेचा झेंडा, अफगाणिस्तान, चीन व हिंदुस्थान यांत राष्ट्रजागृति वगैरे आश्चर्यचकित गोष्टी घडून आल्या आहेत. या सर्व गोष्टी ४० व्या अक्षांशाच्या आसपास एकाच पट्ट्यांत घडत आहेत! सन १९११ हें वर्ष हर्शलचें या राशींतलें शेवटलें आहे. तेव्हां आणखी काय काय चमत्कार घडतात ते पहावे!

—संपादक—

पत्रव्यवहार.

[१]

गु. रा. रा. विष्णु गोपाळ नवाथे यांसी

कृ. सा. न. वि. वि.—सानंद येथील ठाकूर साहेब यांनीं आपली भेट घेऊन आपल्या संस्थेस बीस रुपये बक्षीस दिले वगैरे मजकूर कुंडलीविज्ञानाच्या ता. २१ मिनहूच्या अंकांत वाचून फार आनंद झाला.

कुं० वि० जन्मास येऊन आठ वर्षे होत आलीं. इतक्या अवधीमध्यें त्याच्याकडून महाराष्ट्रामध्यें ज्योतिषशास्त्रसंबंधी बरीच जागृति उत्पन्न झाली आहे. लोकाश्रय भरपूर मिळाल्यास या संस्थेकडून उत्तरोत्तर अधिक कामगिरी बजावली जाईल असें मानण्यास या संस्थेच्या आजपर्यंतच्या इतिहासावरून बरीच जागा आहे. तरी ठाकूर साहेबांचें उदाहरण पाहून ज्योतिषशास्त्रावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक गृहस्थानें आपल्या संस्थेस यथाशक्ति मदत केल्यास इष्टकार्य बरेंच तडीस जाईल.

कुं० वि० त आजपर्यंत आर्य ज्योतिषासंबंधानें जसा बराच ऊहापोह झाला तसाच ह्यापुढें पाश्चात्यज्योतिषा संबंधानेंही होणें अवश्य आहे. पाश्चात्य व आर्य ज्योतिष या दोहोंची सांगड घालून भविष्य वर्तविल्यास तें बऱ्याच अंशीं खरें ठरतें असा माझा अनुभव आहे. अलीकडे रा. यशवंत प्रधान यांच्याकडून पाश्चात्य ज्यो. संबंधी माहिती येऊं लागली आहे. ती इंग्रजी न समजणाऱ्या वाचकांस बरीच उपयोगी पडेल. तरी सदरहू गृहस्थांनीं हा क्रम चालू ठेवावा अशी माझी त्यांस नम्र सूचना आहे.

सायन कुंडल्यांचे चार पितळी ब्लाक या सोबत आपल्या संस्थेस बक्षीस पाठविले आहेत, त्यांचा स्वीकार होईल अशी आशा आहे. कळावें लोभ असावा हे विनंति.

एक 'ज्योतिषविद्यार्थी'

---

[२]

रा. संपादक 'कुंडलीविज्ञान' यांस

आपल्या पुस्तकांत खालील चार ओळींस स्थल द्यावें अशी विनंति आहे. मी अगदीं अपरिचित आहें. परंतु माझे विचारही आपण प्रकाशित कराल अशी आशा आहे.

१ आपलें पुस्तक हल्लीं दाशाहिक आहे, तें साप्ताहिक करावें अशी मागें एक सूचना आली होती. माझे मतें तें साप्ताहिक करणें ह्मणजे त्यास १ घटका महत्व असण्याऱ्या हजारों वर्तमानपत्रांच्या तोडीस नेणें आहे. हें पुस्तक शास्त्रीय विषयव्यासंगी आहे. तरी तें साप्ताहिक न होतांच पृष्ठें अधिक आलेलीं बरीं.

२ हल्लीं प्रत्येक अंकांत आपण तीन चार विषयांचा समावेश करितां. या योगानें प्रत्येक विषयाला फार थोडीं पृष्ठें मिळून वाचकाला अतृप्त रहावें लागतें. तरी असें न करितां प्रत्येक अंकांत १ विषय व २ पत्रव्यवहार एवढेच असावे व अंक क्रमानें विषयवार निरनिराळे यावे.

३ हल्लींचे विचारसरणीला अनुसरून पुस्तकाला व इतर कामाला स्वदेशीच कागद लावावा. या कार्याकरितां खर्च जास्त येईल तरी त्याला स्वदेशीच उपाय मी सुचविणार आहें. दरमहा आपण ३अंक पाठवितां त्यामुळें दरसाल प्रत्येक वर्गणीदारामागें सरकारी टपालखात्यास ९ आणे मिळतात. त्या ऐवजीं दरमहा दोनच अंक पाठवीत जावें. ह्मणजे दर वर्गणीदारामागें आपले तीन आणे वांचतील व टपालखात्यास कमी मिळतील, असें दुहेरी कार्य साधेल. पृष्ठें तितकींच राहणार तेव्हां कोणीही वर्गणीदार या सूचनेविरुद्ध जाईल असें मला वाटत नाहीं.

४ आपण भावचलितासंबंधी आपले पुस्तकांतून विवरण केलें आहे. परंतु तें मला नीटसें समजलें नाहीं. आपण कांहीं कांहीं कुंडल्या देतां त्यांत एक भाव ३८।३९ अंश व २०।२२ अंश असतो. इतका फरक कसा पडतो हें मजला अद्याप समजलें नाहीं. तरी या विषयाचें विवरण पुनः एकदां झाल्यास मेहेरबानी होईल.

५ आपण हल्लीं सायननिरयन तुलना हा विषय कधीं कधीं देतां त्यांत आपण फलें कोणत्या कुंडलीचीं जास्त जमतात हें दाखवितां. माझ्या मतें ही पद्धत साध्यसिद्धीला उपयोगी नाहीं. कुंडलींतील फलें चंद्रावरून व राश्यंतरावरून किंवा स्थानावरूनच बहुतेक निघतात. परंतु या गोष्टींत सायननिरयन कुंडल्या सारख्याच असतात. माझ्या मतें सायननिरयणांत या बाबतींत भेद मुळींच नसून भेद मुख्यतः ग्रहांचीं स्वगृहें व उच्चराशि यांत आहे.

१ निरयणांचे मते विशिष्ट स्थिरतारकापुंजांत ग्रह बलवान् असतो.

२ सायनांचे मतें संपातापासून ३० अंशपर्यंत मंगळ बली असतो पुढें वृषभ राशींत शुक्र इत्यादि.

एवढ्याच गोष्टीवरून विचार करितां प्रत्येक ग्रह संपात भ्रमणा बरोबर आपलीं गृहें पालटीत जातो हें म्हणणें अयुक्तिक दिसतें. तसेंच आधिभौतिक शास्त्राचे भाषेंत म्हटलें तर ग्रह जें फल देतात तें त्यांचे किरण पृथ्वीवर पोहोंचून त्यांचा निरनिराळ्या मेंदूवर परिणाम होऊन त्या प्रमाणें त्या त्या प्राण्यांच्या कृतीमुळें विशिष्ट मनुष्याचे स्थितींत फरक होतो तें होय. तेव्हां एखाद्या ग्रहाचे किरण विशिष्ट तारकासमुच्चयांत बली असतात हेंच म्हणणें बरें दिसतें. शिवाय बृहत्पाराशरीसारख्या ग्रंथकारांनीं निरयन मानच घ्यावें असें सांगितलें आहे. अशा ग्रंथाच्या लेखकांचे ज्ञान म्हणजे माझे तरी मतें अनुभवजन्य नसून स्फूर्तिजन्य आहे. स्फूर्ति आणि अनुभव यांमधील भेद त्रिकालाबाधित वेदांत व सद्यः सत्य पाश्चात्य शास्त्रें यांमधील भेदासारखाच आहे. तेव्हां अशा स्फूर्तिजन्य उद्गारांना खोटें म्हणण्यापूर्वी आपला अनुभव बलवत्तर आहे असें दिसलें पाहिजे. तरी आपण व आपले वाचक याच गोष्टीकडे विशेष लक्ष देऊन हा वाद मिटवतील अशी आशा आहे. यास उदाहरण म्हणून एक कुंडली देत आहें.

जन्म—शके १८१८ वै० शु० १२ सायं ४ वाजतां

वरील कुंडली निरयण आहे. ती मुलीची आहे. या कुंडलींत चार महत्वाचे ग्रह उच्च आहेत. चंद्रमंगळ अनुकूल स्थानांत आहेत. असें असतां मुलीचा जन्म अगदीं गरीब घराण्यांत झाला! लग्न यंदांच झालें. परंतु त्या पूर्वी दोनदां लग्न ठरून मोडलें. व हें सर्व गुरु अकराचा व उच्च शुक्रापासून पांचवा असतांना. सासरही साधारणच आहे. आतां हें माहीत झाल्यावर ज्योतिषी अनिष्ट योग शोधून काढीतील. परंतु तसल्या प्रयत्नास महत्व देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हा एक अनुभव टिपून ठेवण्याजोगा आहे. म्हणूच पाठविला आहे. याच प्रमाणें इतर वाचकही अनुभव कळवतील तर मला वाटतें या वादग्रस्त प्रश्नाचा निकाल फारच थोड्या दिवसांत लागेल.

कळावें हे विनंति. आपला

स. वा. केळकर.

* हल्लींची साधारण रचना अशी आहे कीं आरंभीं एक संपादकाच्या मताचा नवीन लेख, पुढें पत्रव्यवहार व शेवटीं भाषांतर. ही रचना फिरवल्यानें विषयवैचित्र्य राहणार नाहीं. पृष्ठें आधिक वाढवितां येत नाहींत. स्वदेशी कागद वापरण्याची सूचना मान्य आहे व तो घस सोसूनही वापरण्यास आम्हीं तयार आहों. पण आणखी एक वर्ष तसें करितां येणार नाहीं. क्रांतिवृत्ताच्या तिर्यकत्वामुळें निरनिराळ्या अक्षांवर निरनिराळ्या काळीं भाव कमजास्त होत असतात. हा विषय

खगोलावर नीट समजेल. लेखानें समजण्यास अवघड आहे. कुंडलींतले ग्रह राशिपरत्वें, स्थानपरत्वें व योगपरत्वें फल देतात. अमुक ग्रह कोणत्या स्थानांत व कोणत्या राशींत आहे हें पाहून त्यावरून फलाचा निर्णय होत असतो. केवळ उच्चनीचांवरच फलभाग अवलंबून नाहीं. विशिष्ट तारकापुंजांत ग्रह बलवान् असतो असें निरयन पंथाचें मत नाहीं तारकापुंजांचा फलितांत विचार केलेला नाहीं. विभागात्मक नक्षत्रें व तारात्मक नक्षत्रें भिन्न आहेत. निरयणपंथाचे ज्योतिषी क्रांतिवृत्ताच्या विभागानुरूप ग्रहांचीं फलें सांगतात. २। नक्षत्रांचा राशि ही परिभाषा क्रांतिवृत्ताच्या विभागाची आहे, तारकापुंजांची नाहीं. राशि ह्मणजे क्रांतिवृत्ताचे १२ भाग व नक्षत्रें ह्मणजे २७ भाग. हे भाग संपातापासूनच करावयाचे असें सूर्यसिद्धांत स्पष्ट सांगतो. ऋतु, अयनें हीं याच लक्षणा प्रमाणें होत असतात. ह्मणून नक्षत्रें व राशि सायनच आहेत. संपातभ्रमणाबरोबर ग्रह आपलीं स्वगृहें व उच्चें पालटतात हें खरें आहे. पण तेवढ्यावरून निरयनमत सिद्ध होत नाहीं. सूर्य सायन कर्क वृत्तावर गेल्यावरच दिनमान विशेष वाढतें व उष्णतेची कमाल होते. सूर्यकिरणांचा हा प्रभाव सायन राशीवरच होतो, असें जर आहे तर ग्रह संपातापासून अमुक अंतरावर असतां ते अमुक प्रकारचा परिणाम कां करूं शकणार नाहींत? बृहत्पाराशरी हा खिचडीचा ग्रंथ आहे. त्यांत नव्या जुन्याची भेसळ आहे. बृहत्पाराशरीला खरें व सूर्यसिद्धांत, विष्णुपुराण वगैरे ग्रंथास खोटें असें कसें ह्मणतां येईल? सायननिरयनवाद आणखी ९०० वर्षे तरी मिटत नाहीं? उदाहरणार्थ घेतलेलीं कुंडली निरयन आहे व तिचा अनुभव जुळत नाहीं तो कां? प्रथम ग्रह उच्च असले ह्मणजे राजयोग होतो ही कल्पनाच भ्रामक आहे. शनि २॥ वर्षे एका राशीवर असणार, रवि व शुक्र हेही एका राशीवर एकेक महिना असणार. ह्मणून या कालांत जन्मलेले प्राणी सर्वच राजयोगी होतील काय? अर्थात् राजयोग ठरविणें तो केवळ ग्रहांच्या उच्चांवर नाहीं. असे प्रसंग सायनपंथांतही यावयाचेच. तुळना करण्याचे मार्ग फार नाजूक आहेत.

—संपादक—

पत्रव्यवहार.

[१]

रा. रा. संपादक कुंडलीविज्ञानकर्ते यांसी— सा. न. वि. वि. आपण कुंडलीविज्ञान अंक ३० मध्यें द्वादशभावपद्धती "जन्मपत्रिकानिबंध" वरून देणेचें सुरू केलेलें पाहून त्यालाच उपयोगी, अत्यंत महत्वाचे व अनुभविक असे अनेक ग्रंथांतील श्लोकांचें एकीकरण करून त्यास "जातकाचे ठोकताळे" हें नांव दिलेले आपलेकडे मराठी अर्थासह पाठविले आहेत ते अवलोकन करितां त्यांतील महत्व साहजीकच समजून येणार असून कुंडलीविज्ञानचे वाचक वर्गास ह्याचा लाभ होणेस्तव प्रसिद्धीकरितां पाठविले आहेत त्यास रीतीप्रमाणें स्थळ मिळतच आहे.

लग्नेशे रविसंयुक्ते केंद्र कोणगतेशुभे। पापग्रहैरसंदृष्टेदेह सौख्यं विनिर्दिशेत् ॥ १ ॥

अर्थ—लग्नस्थानचा स्वामी शुभग्रह असून तो रवीनेंयुक्त केंद्रीं (१।४।७।१० किंवा कोणी (९।५) पापग्रहानें अदृष्ट असा अस- ल्यास त्या मनुष्यास देह सौख्य होईल.

लग्नाधिपे शुभयुते यदितुंगभागे केंद्र त्रिकोण सहिते शुभदृष्टियुक्ते। कर्माधिपेन सहिते यदिवास्वगेहे, सद्भाग्यकीर्ति धन धान्य चिरायुरेति ॥ २ ॥

अर्थ—शुभग्रहानें युक्त असा लग्नाधिपती जर स्वोच्चीं, केंद्रीं अथवा कोणीं शुभग्रहांच्या दृष्टीनें युक्त असेल, अथवा वरील प्रकारचा लग्नस्वामी जर दशमस्थानच्या स्वामीनें युक्त स्वक्षेत्रीं असेल तर त्यामनुष्यास उत्तम प्रकारचें भाग्य, कीर्ति, धन, धान्य प्राप्त होऊन तो दीर्घायु होतो.

लग्नाधिपोति बलवान् शुभवर्गयुक्ते स्वोच्चे शुभग्रह युते स्वनवांश-गेवा । लग्नाविनाथ सहिते यदि केंद्र नाथेसद्भाग्य कीर्ति धन धान्य चिरायुरेति ॥ ३ ॥

अर्थ.—अतिशय बलवान् असा लग्नस्वामी शुभवर्गानेंयुक्त असून तो स्वोची अगर स्वनवांशी शुभग्रहानेंयुक्त, असा असेल, अथवा केंद्रस्थान वा स्वामी लग्नेशानें युक्त असेल तर तो मनुष्य, उत्तम प्रकारचें ऐश्वर्य, कीर्ति, धन, धान्य, व दीर्घायु या प्रत पावतो.

लग्नेशे स्वोच्चत्रिंशांशे स्वनवांशगतेपिवा । शुभग्रहयुते दृष्टे देह सौख्यं विनिर्दिशेत् ॥ ४ ॥

अर्थ.—शुभग्रहानेंयुक्त अथवा दृष्ट असा लग्नस्वामी स्वोचीं, अथवा स्वत्रिंशांशीं अगर स्वनवांशीं जर असेल तर त्या मनुष्यास देहसौख्य होईल असें जाणावें.

वित्तायोदय राशिपाः पतियुताविचाधिको जायते लाभस्थो धनलाभ पौनिजसुहृत् तुंगादिगौचेत्तदा । तद्लाभधना धिपौ तनुगता वन्यो-न्यदृष्टग्रहौ लग्नेशे धनलाभ राशिपयुतेलग्नेबहु द्रव्यवान् ॥ ५ ॥

अर्थ.—द्वितीयेश, लाभेश, लग्नेश व चंद्राधिष्ठित राशिस्वामी हे जर आपापले स्थानीं म्हणजे द्वितीयेश द्वितीय स्थानीं, लाभेश एकादश स्थानीं, लग्नश लग्नीं, व चंद्रराशिस्वामी त्याच राशीवर अशा योगावरील मनुष्यात द्रव्य पुष्कळ मिळतें. आणि आपले मित्रक्षेत्रीचे अथवा उचादिस्थानस्थित असे द्वितीयेश व लाभेश लाभस्थानीं, त्याच प्रमाणें धनाधिप अथवा लाभेश लग्नीं असून लाभेशाची व धनेशाचा परस्पर दृष्टि असेल, अगर लग्नेश, धनेशानें व लाभेशानें युक्त लग्नीं असेल तर तो मनुष्य पुष्कळ धनिक होतो.

परस्परं वित्तप लग्ननाथौ निरीक्षितौ केंद्रगतौ शुभांशे । निरीक्षितौ लग्न शुभेश्वराभ्यां जातो धनंयाति बहु प्रकारैः ॥६॥

अर्थ.—केंद्रस्थित व शुभ ग्रहांचे अंशीं असलेले द्वितीयेश व लग्नेश परस्परांस पाहत असतील आणि लग्नीं शुभ ग्रहांची दृष्टि असेल तर अशा योगावर जन्म घेणाऱ्या मनुष्यास अनेक प्रकारानें द्रव्यप्राप्ति होते.

लग्नाद्वाहनराशितः स्तदधिपः स्तद्वीक्षकश्चत्रयः स्वोचे स्वर्क्षसुहृद्गृहेषु बलिनःकेंद्रत्रिकोणायगा । दीर्घायुः शयनाश नांबर बहुक्षेत्राणि सन्मंदिरं बंधूस्नेह मनोज्ञ वाहनयशःसौख्यानि कुर्वंतिते ॥७॥

अर्थ.—लग्नेश, चतुर्थेश व त्यांचेवर दृष्टि असणारा ग्रह, हे तिन्हीही बलवान् असून जर आपले उच्चक्षेत्रीं, स्वगृहीं, मित्रगृहीं, केंद्रीं किंवा त्रिकोणीं असतील तर तो मनुष्य दीर्घायु होऊन, उत्तम प्रकारच्या शय्या, मिष्टान्नादि पदार्थ, उंची वस्त्र प्रावर्णे, जमीनी तसेंच उत्तम प्रकारच्या हवेल्या (बगले) बंधू [आप्तवर्ग], मित्रयश, आणि मनाप्रमाणें वाहनें यांचें सौख्य भोगील.

विद्याधिपौद्यायदि चंद्रसूनौ लग्नेसुखे लग्नपसंयुतेवा । बलान्विते पापदृशाविहीने विद्यायशस्वी भवतिप्रजातः ॥८॥

अर्थ.—बलवान् असा पंचमेश अथवा बुध जर लग्नीं अथवा चतुर्थ स्थानीं लग्नेशानें युक्त व पाप ग्रहानें न पाहिलेला असा असेल तर तो मनुष्य विद्येमध्यें यशस्वी होईल.

पुत्रेश्वरे दारपतौ बलाढ्ये युक्त क्षितेवा ज्वरिनायकेन । जातोनपत्यो यदि तत्कलत्रे जारात् सुतस्यात् शुभदृष्टियुक्ते ॥९॥

अर्थ.—पंचमेशावर व सप्तमेशावर जर बलवान् षष्ठेशाची दृष्टि असेल अथवा युक्त असेल तर त्या मनुष्यास संतती होणार नाहीं. आणि वरील प्रकारच्या योगावर शुभ ग्रहाची दृष्टि असल्यास त्या मनुष्याचे स्त्रियेस जारापासून संतती होईल.

लग्नेशे पुत्रभावस्थे पुत्रेशेबलसंयुते । पारिपूर्ण बलेजीवे पुत्रप्राप्तिर्न संशयः ॥ १० ॥

अर्थ.—बलवान् असा पंचमेश लग्नेशानेंयुक्त पंचमस्थानीं असेल आणि गुरू पूर्ण बलवान् असल्यास त्यामनुष्यास निःसंशय संतति (पुत्र) प्राप्ति होईल.

पुत्रेशांशपतिः स्वभांशकगतो यद्येक पुत्रान्वितः । जीवा त्पंचम-राशि तश्चतनय प्राप्तिं वदेद्दैशकः ॥ ११ ॥

अर्थ.—पुत्रेश ज्या स्थानीं असेल त्या स्थानचा स्वामी जर आपले नवांशीं असेल तर एक मुलगा होईल, तसेच गुरूपासून पंचमस्था-नचे राशीवर ही संतति प्राप्ति सांगावी.

यावत् ग्रहैश्च संयोगो भार्याधीशेथ वामदे । तावत्कलत्र संख्याप्तिः पाणिग्रहण कल्पना ॥१२॥

अर्थ.—सप्तमेश अथवा सप्तम स्थान जितक्या ग्रहांनीं युक्त असेल, तितकी विवाहाच्या बायकांची संख्ये संबंधीं कल्पना करावी.

लग्ने कुटुंबे दारेवा पापखेचर संयुते । कलत्रेनीच मूढादौ कलत्र त्रयभाक् भवेत् ॥ १३ ॥

अर्थ.—लग्नीं, द्वितीयस्थानीं, व भार्यास्थानीं पापग्रहयुक्त असतील, अथवा सप्तमस्थानीं नीच, अस्तंगत असे ग्रह असतील त्या मनुष्याच्या तीन बायका होतील. असा एक अर्थ किंवा लग्नीं, किंवा द्वितीयस्थानीं अगर सप्तम स्थानीं पाप ग्रह असून सप्तम स्थान नीं-चादि अस्तंगत ग्रहांनीं युक्त असल्यास त्या मनुष्याचे तीन विवाह होतील.

भार्या द्वयंवदेत्तत्र लग्नेशे नाशराशिगे । कुटुंब पापसंयुक्ते कलत्रेशे तथा भवेत् ॥१४ ॥

अर्थ.—लग्नेश अष्टम स्थानीं असल्यास त्या मनुष्याचे दोन वि-वाह सांगावे. तसेंच द्वितीय स्थान अगर लग्नेश पाप ग्रहानें युक्त असेल तरीही दोन विवाह सांगावे.

॥ अथस्त्रीजातकं. ॥

जामित्रे निधनेच पाप रहिते युक्ते शुनैर्वीक्षिते ।
सौशील्यादि पतिव्रता बहुगुणैः सीमंतिनीनां कुले ॥
युक्ता ख्यातिभवापि भर्तुवशगा भूत्वा चिरंजीविता ।
यद्वा भाग्यगृहे शुभो भवति चेत् सत्पुत्रपौत्रान्विता ॥ १५ ॥

अर्थ.—सप्तम स्थानीं, अष्टम स्थानीं, पाप ग्रह नसून शुभ ग्रह दृष्ट किंवा युक्त असतील तर ती स्त्री सुशील पतिव्रता, अनेक सद्गु-णसंपन्न व सीमंतिनीच्या कुलामध्यें जन्म घेऊन पतीच्या आज्ञेंत दीर्घायु होऊन ख्यातिमान् होते. तसेंच नवम स्थानीं शुभ ग्रह अस-तील तर सद्गुणी अशा पुत्रपौत्रानें युक्त होते.

नवमे शुभसंयुक्ते सपापे त्वष्टमेपिवा ॥
पतिपुत्रयुता नारी मोदते नात्रसंशयः ॥ १६ ॥

अर्थ.—नवम स्थानीं व अष्टम स्थानीं शुभ व पाप ग्रह असतील तर ती स्त्री पतिपुत्रांसमवेत आनंदानें राहते, यांत मुळींच संशय नाहीं.

वैधव्यं समुपैति चंद्रभवनात् क्रूरे, मदस्थानगे ।
चंद्रादस्तग्रहोपगः शुभकरो राज्यास्पदं गच्छति ॥
भाग्यस्था शुभखेचरा स्मरगते पापेष्टमस्थेपिवा ।
भर्तृश्री बहुपुत्रसौख्यविभवैःसार्धं चिरंजीवति ॥ १७ ॥

अर्थ.—चंद्रराशीपासून सप्तम स्थानीं क्रूर ग्रह असतील तर त्या स्त्रियेस वैधव्य प्राप्त होईल. (दुसऱ्या चरणाचा अर्थ बरोबर लागत

नाहीं.) भाग्यस्थानीं व सप्तम स्थानीं शुभ ग्रह असून अष्टम स्थानीं पाप ग्रह असतील तर पति, लक्ष्मी, पुष्कळ पुत्र, सौख्य आणि वैभव उपभोगून अर्धायुषी होईल.

दुःस्थौ धर्मगृहेशदेवसचिवौ भर्ता गतायुर्भवेत् ।
दीर्घायुर्धनवान् त्रिकोणगृहगौ केंद्रस्थितौ वा यदि ॥१८

अर्थ.—षष्ठ, अष्टम, द्वादश या स्थानीं गुरु असेल तर त्या स्त्रीचा पति गतायुषी होतो. आणि तोच गुरु जर त्रिकोणीं किंवा केंद्रीं असेल तर धनवान् व दीर्घायु होतो.

वाचस्पतौ नवमपंचमकेंद्रसंस्थे
तुंगादिगे भवति शीलसमानिताच ॥
साध्वी सुपुत्रजननी सुखिणी गुणाढ्या
नूनं कुलद्वययशस्करिणी भवेत्सा ॥१९

अर्थ.—स्त्रोचीचा गुरु, नवम—पंचम किंवा केंद्रस्थानीं ज्या स्त्रीच्या जन्मकाळीं असेल ती स्त्री, जिचीं उभय कुलेंही उत्तम, सद्गुणी, पुत्रांची माता, सुखी व सर्व श्रेष्ठ गुणामध्यें प्रवीण अशी होऊन उभय कुलांना निश्चयें करून यश देणारी अर्थात् कीर्तिमान अशी होते.

लग्ने व्यये च पाताले जामित्रे चाष्टमे कुजे ॥
कन्या भर्तृविनाशाय भार्ता कन्याविनाशदः ॥२०

अर्थ.—लग्नीं, द्वादशस्थानीं, चतुर्थ स्थानीं, सप्तम स्थानीं व अष्टम स्थानीं यांपैकीं कोणत्याही एका स्थानीं मंगळ स्थित असेल तर स्त्रीच्या असल्यास नवऱ्यास व नवऱ्याच्या असल्यास बायकोस मारक होतो.

एवं विधे कुजे संस्थे विवाहो न कदाचन ॥
कार्यो वा गुणबाहुल्ये कुजे वा तादृशे द्वयोः ॥२१

अर्थ.—वरील प्रकारचा मंगळ असेल त्यांनीं विवाह करूं नये. जर करणें असेल तर वर्ण राश्यादि पुष्कळ गुण अथवा उभयतालाही समान मंगळ पाहून करावा.

सूर्यभौमार्किवारेषु तिथिभद्रा शतार्भिधं ॥
आश्लेषाकृत्तिकाचे स्यात् तत्रजाता विषांगना ॥२२

अर्थ.—रवि, मंगळ, शनि यांचे वार, भद्रा (द्वितीया, सप्तमी, द्वादशी) तिथि, व शततारका, आश्लेषा कृत्तिका हीं नक्षत्रें यांवर, जन्म घेणारी स्त्री विषांगना होय.

जनुर्लग्ने रिपुक्षेत्रे संस्थिताः पापखेचराः ॥
द्वौ सौम्यौपि योगेस्मिन् संजाता विषकन्यका ॥२३

अर्थ.—जन्म लग्न व षष्ठस्थान या दोन्हीं स्थानीं पाप ग्रह किंवा सदर दोन्ही स्थानीं सौम्य ग्रह अशा योगावर विषकन्यका निपजतात.

अपवाद.

लग्नाद्विधोर्वा यदि जन्मकाले शुभग्रहोवा मदनाधिपश्च ॥
द्यूनास्थितो हंत्यनपत्यदोषं वैधव्यदोषंच विषांगनाख्यं ॥ २४

अर्थ.—लग्नापासून अथवा चंद्रापासून जर जन्मकाळीं शुभ ग्रह सप्तम स्थित असतील अगर सप्तमाधिपति स्थित असेल तर निरपत्यदोष, वैधव्यदोष व विषांगनादोष दूर होतात.

गणेश शास्त्री देशिंगकर.
ज्योतिषी मु० देशिंग सं० मिरज.

पोंच-अभिप्राय.

डायरी.—निर्णयसागरची डायरी पोंचली. निर्णयसागर छापखाना नमांकित आहे. त्याप्रमाणें डायरीही सुंदर व उपयुक्तच आहे.

पुस्तक.— "टिळकांचा जयजयकार" लेखक दे. शंकर गजानन पुरोहित बी. ए, एल्. एल्. बी. आरंभीं लो. टिळकांचा सुंदर फोटो आहे. विषयाचीं एकंदर प्रकरणें दहा आहेत. किंमत पांच आणे हा लेख वंदेमातरम् मध्यें प्रसिद्ध झाला होता. तो अत्यंत लोकप्रिय झाल्यावरून पुस्तक रूपानें आतां प्रसिद्ध झाला आहे. यांत टिळकांच्या गुणांचें व कर्तृत्वाचें सांगोपांग व मार्मिक विवेचन केलेलें असल्यामुळें त्याचें नित्य पारायण करावें असें वाटतें! हें पुस्तक 'ग्यानेजर वंदेमातरम्' मु॰ पुणें या पत्त्यावर विकत मिळेल

फोटो.—रा. मोरो रामकृष्ण पेणसे यांजकडून गायत्रीचा फोटो पावला. हा पोलादपूर ता० महाड येथील गायत्रीच्या देवीचा आहे असें समजतें. फोटो सशास्त्र व सायुध असून सुंदर आहे. किंमत ४४६ पै. 'बेंद्रे आणि कंपनी' सदाशिव पेठ-पुणें-येथें विकत मिळेल.

सदरहू जिनसा पाठविणारांचे आभारी आहों.—

संपादक 'कुंडलीविज्ञान'

वर्तमान.

—वे० शा० धोंडशास्त्री नागेशशास्त्री जोशी गणेशवाडीकर, संस्थान कुरुंदवाड यांनीं वेधशाळेस उपयुक्त असें एक "क्रांतियंत्र" तयार केलें आहे. या यंत्रावरून गुरु व शुक्र यांचे भोग राफेलच्या पंचांगाशीं मिळते येतात. हें यंत्र मिरज येथील 'गणेशकलाभुवनांत' तयार केलेलें आहे.

पत्रव्यवहार

[१]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस—

सा. न. वि. वि.—आषाढ १९०८ चे २६ वे अंकांत प्रो. रामकृष्ण सखाराम आठवले यांनीं फलज्योतिषाचे शोधनाविषयीं निबंध लिहिलेला छापला आहे. तो माझे वाचण्यांत आल्यावरून मला यथामती विचार सुचले, ते सर्वांस समजण्याकरितां पाठवीत आहें; तरी आपले सुविचारासह पुस्तकांत प्रसिद्ध होतील.

प्रोफेसर साहेब यांनीं जातकशास्त्राचे शोधनाविषयीं आपले निबंधांत जो मजकूर लिहिला आहे त्यांत "आधानकाल व निषेककाल यांचें ज्ञान प्रत्यक्ष होणें बहुतेक असंभवनीय आहे" असें लिहिलें आहे. परंतु तसें नसून शिक्षित स्त्रीपुरुष ही गोष्ट जाणूं शकतात असा मला स्वतः अनुभव आहे व त्या विषयीं "वाग्भट्ट" ग्रंथांत वचनें आहेत तीं येणें प्रमाणें.—

तथाहि बीजं गृण्हाति दोषैः स्वस्थानमास्थितैः ॥
लिंगं तु सद्यो गर्भाया योन्यां बीजस्य संग्रहः ॥ ३५
तृप्ति र्गुरुत्वं स्फुरणं शुक्रास्ताननुबंधनं ॥
हृदयस्पंदनं तंद्रा तृड् ग्लानिर्लोमहर्षणं ॥ ३६

वा. शा. अ. पहिला

याचा अर्थ विशेष कठीण नसल्यामुळें लिहिला नाहीं. आतां यांपैकीं सर्व लक्षणें जरी सर्वत्रांस न समजलीं तरी सर्वांत स्थूल लक्षण आधानकालीं शुक्राचें बाह्य पतन न होणें हें सर्वसाधारण असल्यामुळें सर्व स्त्रियांस समजण्यासारखें आहे. अडचण काय ती आधानकाल जाणण्याची राहिली. ती काळजी घेऊन घड्याळाचे साधनानें जाणतां येईल किंवा तारात्मक नक्षत्रें क्षितिजावर उदयास आलेलीं,

खस्वस्तिकीं आलेलीं किंवा अस्तास जात असलेलीं पाहूनही कलाचें ज्ञान होऊं शकतें. घड्याळांचे जन्मापूर्वी पंच पंच उषःकालीं उठून स्नानादि नित्यकृत्य करणारे पुरुष व त्यांच्या पतिव्रता वगैरे बायका ह्या आपल्या नित्य कृत्याची वेळ कधींच चुकूं देत नसत! हा अनुभव आहे व अद्यापही क्वचित् ब्राह्मणांत व सेवाधर्मी आणि उद्योगी शूद्रादिकांत ज्यांस घड्याळें बाळगण्याची सोय नाहीं अशांत अगदीं तंतोतत काल काढणारे आढळतात. अर्थात् ही अडचणही थोड्या कष्टानें दूर होईल. दिवसास सूर्याचे अवलोकनानें काल जाणतां येतो. दोन्हीही उपलब्ध नसल्यास कदाचित् अडचण पडेल. तीही नियमित प्रमाणानें वागणारा जाणूं शकतो. मात्र सर्वसाधारण या गोष्टी नव्हत. पण आपले घरांत एतद्विषयीं जाणण्यास अडचणी आहेत असें मात्र नाहीं. धुंडून पाहिलें पाहिजे ह्मणजे सर्व उपलब्ध आहे.

तारात्मक नक्षत्रदर्शनानें आणि त्यांत ग्रंथज्ञान मिळविल्यानें लग्न व त्याचे अंश जाणतां येतात. हें जाणणें निरयन होय. यावर सायन प्रयोग केला ह्मणजे सायन लग्न व त्याचे अंश जाणतां येण्यासारखी सोय कै० शंकरराव दीक्षित यांचे ग्रंथांत आहे. याप्रमाणें कर्त्तव्यदक्ष पुरुषांनीं व स्त्रियांनीं काळजी घेतली तर पुढील पिढी चांगली सुधारेल. मागील प्रसिद्ध पुरुषांपैकीं पत्रिका जमविलेल्या कितपत उपयोगी पडतील त्या पडोत! कारण, मुख्य लग्न चुकीचें असल्यावर सर्वच शून्य असावयाचें! असो. उद्योग करणें व मदत मिळविणें ठीक आहे

जातकाचे शोधनाविषयीं जोर देऊन बाकी [संहिता—होरा—ताजिक—गोचर—मुहूर्त या] सर्वांस फांटा द्यावयाचें लिहिलें हें ठीक नाहीं. जातकाबरोबरच याचीही शुद्धि थोड्या परिश्रमानें होऊं शकेल. पत्रविस्ताराची माफी असावी हे वि.

—एक वाचक—

[२]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

सा. न. वि. वि.—आपल्या कुंडलीविज्ञानाच्या पुस्तक ७ अंक २३ मध्यें "जन्मकालाचा गर्भकालाशीं संबंध" या लेखांत केलेल्या विवेचनांत जन्म कालापूर्वी २७९ दिवस मोजल्यानें जो दिवस येईल त्या दिवशींचें ग्रह पाहिल्यास जे चार नियम दृष्टीस पडतील ह्मणून लिहिलें आहे, तें बरोबर नाहीं असें मला वाटल्यावरून हें पत्र लिहित आहें. आपण ते चार नियम त्यांत दिलेल्या कांहीं कुंडल्यावरून दृढ केले आहेत. पण त्या कुंडल्यांवरूनच मागील २७९ व्या दिवशींचे ग्रह पाहिल्यास आपण ज्या राशींत कांहीं ग्रह येतात ह्मणून सांगितलें आहे त्या राशींत ते ग्रह येत नाहींत, चुकतात. मागील २७९ व्या दिवशींचे ग्रह व जन्मकालाचे ग्रह खालीं दिल्याप्रमाणें येतात.

पहिली कुंडली		दुसरी कुंडली	
२७९ व्या दिवशीं जन्मकाळीं		२७९ व्या दिवशीं जन्मकाळीं	
रवि—वृषभ १९	मीन	रवि—कुंभ२३	धनु
मं०—कर्क ८	मकर२७	मं०—धनु ०	कुंभ२२
गु०—कर्क ३	सिंह	गु०—वृश्चिक१	वृश्चिक
शु०—मिथुन२०	कुंभ	शु०—मकर	धनु
तिसरी कुंडली		चवथी कुंडली	
२७९ व्या दिवशीं जन्मकाळीं		२७९ व्या दिवशीं जन्मकाळीं	
रवि—कुंभ ३	वृश्चिक	रवि—वृषभ२२	कुंभ
मं०—तूळ१३	धनु२९	मं०—मीन२	वृषभ२७
गु०—मीन६	मेष	गु०—मीन७	मीन
शु०—धनु१३	धनु	शु०—मिथुन	मकर

पांचवी कुंडली		सहावी कुंडली	
२७९ व्या दिवशीं जन्मकाळीं		२७९ व्या दिवशीं जन्मकाळीं	
रवि–मीन	कन्या	रवि–धनु२८	तूळ
मं०–कुंभ३	सिंह३	मं०–तूळ०	धनु३
गु०–मिथुन१	कर्क६	गु०–कुंभ१६	मीन१६
शु०–मेष	तूळ	शु०–मकर४	कन्या१३

सातवी कुंडली

२७९ व्या दिवशीं	जन्मकाळीं
रवि–कुंभ२३	तूळ २६
मं०–वृश्चिक	कुंभ८
गु०–मेष२१	मिथुन९
शु०–मीन८	कन्या२८

वरील ग्रहस्थितीवरून मागील २७९ व्या दिवशींचे मंगळ, गुरु व शुक्र आणि जन्मकाळचे मंगळ, गुरु व शुक्र ह्यांमधील संबंधाबद्दल खालील ९ प्रकार आढळून येतील. यांपैकीं प्रत्येकांत २ मिळून १८ प्रकार होतात.

२७९ व्या दिवशींचे.	जन्मकालचे			
१ मंगळ	मंगळ	समोरासमोर किंवा त्या वेतानें	एकाच राशींत किंवा जवळ जवळ	
२ ,,	गुरु	,,	,,	
३ ,,	शुक्र	,,	,,	
४ गुरु	गुरु	,,	,,	
५ ,,	शुक्र	,,	,,	
६ ,,	मंगळ	,,	,,	
७ शुक्र	शुक्र	,,	,,	
८ ,,	मंगळ	,,	,,	
९ ,,	गुरु	,,	,,	

वरील ग्रह नेहमीं समोरासमोर किंवा एकाच राशींत येतात असें नाहीं केव्हां केव्हां समोरासमोर येण्याच्या बेतानें येतात किंवा एकाच राशींत नसले तरी जवळ जवळ येतात, ह्मणून बेतानें व जवळ जवळ हे शब्द घातले आहेत.

या विषयाचें विवेचन करितांना पितृदर्शक रवि व मातृदर्शक चंद्र या दोन ग्रहांचा सुद्धां कदाचित् समावेश करावा लागेल असें मला वाटतें. असें असेल तर वरच्या पेक्षां जास्त प्रकार होतील. वरील सर्व प्रकार एकाच नियमांत खालीं दिल्याप्रमाणें गोंवतां येतील.

" जन्मकालच्या मागील २७९ व्या दिवशींचे (रवि. चंद्र) मंगळ गुरु आणि शुक्र यांपैकीं एक किंवा अनेक ग्रह जन्मकाळीं समोरासमोर किंवा एकाच ठिकाणीं [केव्हां केव्हां अंशांच्या अंतरानें] असतात. "

या नियमाची सत्यता मी आणखी १० कुंडल्यांवरून सुद्धां पाहिली आहे. वरील नियम बरोबर व सार्वत्रिक असेल तर वास्तविक गर्भकाल काढण्याकरितां किंवा वास्तविक गर्भकाल आणि जन्मकाल या दोहोंमधील संबंध निश्चित करण्याकरितां खालीं दिल्याप्रमाणें एखादा नियम ठरवितां येणारा नाहीं काय ?

" वास्तविक गर्भकालचे (रवि, चंद्र) मंगळ, गुरु आणि शुक्र यां पैकीं एक किंवा अनेक ग्रह आणि जन्मकालचे (रवि चंद्र) मंगळ गुरु आणि शुक्र यां पैकीं एक किंवा अनेक ग्रह आपापल्या किंवा एकमेकांच्या (बरोबर किंवा ८ अंशांपेक्षां कमी अंतरानें) समोरासमोर किंवा एकाच ठिकाणीं असतात. किंवा [ज्योतिषाच्या भाषेनें ह्मणावयाचें असेल तर] आपापल्या किंवा एकमेकांच्या दृष्टियोग किंवा युति होण्यासारख्या ठिकाणीं असतात. "

वरील मजकुराच्या अनुरोधानें आपण आपल्या लेखांतील विवेचनाचा पुनः एकदां विचार करून वरील नियमांबद्दल आपला अभिप्राय प्रगट कराल अशी आशा आहे दांपत्ययोगाबद्दलही कांहीं सुचवावयाचें आहे पण दुसऱ्या खेपेला. कळावें लो. अ. हे वि.

विश्वेश्वर गणेश हेगडे वकील.
—शिरसी—

---

[३]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्त्ते यांस

सा. न. वि. वि.—आपल्या ता. ११ जानेवारीच्या अंकांत पतिपत्नी योग या सदराखालीं निराशेचे उद्गार काढलेले पाहून वाईट वाटलें. आधुनिक विद्वानांनीं टाकून दिलेलें, पोटमरू ज्योतिष्यांच्या हातांत पडून छिन्नभिन्न झालेलें अशा या फलज्योतिषशास्त्राचें अध्ययन व प्रतिपादन नेटानें करीत असलेल्या कित्येक थोड्या व्यक्तींपैकीं आपण एक आहांत! या आपण असे निराश होतां कामा नये.

आपण ह्मणतां, पति किंवा पत्नी यांच्या कुंडल्यांवरून पत्नी किंवा पति यांची कुंडली मांडणें केवळ अशक्य आहे. ह्मणून आपण हा प्रयत्न सोडून दिला. स्पष्ट ह्मणावयाचें ह्मणजे आपला हा थोडा उतावळेपणाच झाला! आपण या दिशेनें केलेल्या पांच चार वर्षांचे किंवा पंधरा वीस वर्षांचे फार काय, पण पांच चार पिढ्यांचे प्रयत्न सुद्धां कोणत्याही शास्त्राचे सिद्धांत काढण्यास पुरत नाहींत! कोणत्याही शास्त्रासंबंधी पाहूं गेल्यास अगदीं क्षुल्लक शोधं सुद्धां चार चार पांच पांच पिढ्यांचे अंतरांनीं झालेले दिसून येतील.

एका कुंडलीवरून दुसरी कुंडली काढणें हा ज्योतिषशास्त्राचा **फारच मोठा** शोध होय. आजपर्यंत ज्यांनीं हा शोध लाविला असें ऐकिवांत आहे त्यांनीं आपल्या ज्ञानाचा लाभ दुसऱ्या कोणास होऊं दिला नाहीं. ह्मणून आज या आपणास अडचणी येत आहेत. परंतु या शास्त्राच्या अभिमानी लोकांस अनेक अडचणींशीं झगडून आपलें शास्त्र स्थापन करावयाचें आहे. अशा वेळेस आपले सिद्धांत फार विचारांनीं बांधले पाहिजेत आणि नेटानें प्रयत्न केला पाहिजे. आतां, या विषयासंबंधी माझा थोडासा अनुभव आपल्या वाचकांपुढें मांडण्याची परवानगी घेत आहें. परंतु हें आधींच स्पष्ट सांगितलें पाहिजे कीं केवळ पांच पंचवीस कुंडल्यांत आलेला अनुभव मात्र देत आहें परंतु यास अजून सिद्धांताचें स्वरूप देण्याची माझी तयारी नाहीं.

यूरोपियन ज्योतिषी गृहस्वामी व उच्चस्वामी बहुतेक आपणासारखेच मानितात. जसें—मेषेचा गृहस्वामी मंगळ व उच्चस्वामी रवि अशा तऱ्हेनें दोन्ही तऱ्हेचे स्वामी पाहिल्यास पतिपत्नींपैकीं एकाच्या कुंडलींत सप्तमाचा स्वामी लग्नस्वामीच्या कोणत्याही घरांत असला तर दुसऱ्या कुंडलींत लग्नस्वामी, सप्तमस्वामीच्या कोणत्यातरी घरीं असतो.

उदाहरण.—तूळ लग्न असतां सप्तमाचे स्वामी स्वगृहानें मंगळ व स्वोच्चानें रवि असे दोन होतात. व लग्नाचे स्वामी स्वगृहानें शुक्र व स्वोच्चानें शनि असे होतात. तर मंगळ किंवा रवि हे शुक्राच्या किंवा शनीच्या स्वोच्चगृहीं किंवा स्वगृहीं असल्यास दुसऱ्या कुंडलींत लग्नस्वामी [स्वगृहानें किंवा स्वोच्चानें] सप्तमेशाच्या स्वगृहीं किंवा स्वोच्चगृहीं असतात.

इष्ट फार कष्टसाध्य आहे. शास्त्रसिद्धांत यापेक्षां सुलभ असते तर मनुष्यमात्र पूर्णावस्थेस केव्हांच पोहोंचला असता. आपलें कर्त्तव्य

जें थोडेंबहुत साध्य होईल तेवढेंच मिळवून इतरांस सांगावयाचें हेंच आहे. कळावें हे विनंति.

आपला
गोविंद हरि केसकर

एका यूरोपियन बाईचें भविष्य!

१ ता. १० जानेवारीच्या राष्ट्रमताच्या अंकांत कलकत्त्यांतील एका बातमीदाराचें ता. ६ जानेवारीचें पत्र आहे, त्यांत पुढील मजकूर आहे.

"आज बरेच दिवस येथें मि. कार्टर या नांवाचें एक प्रसिद्ध अमेरिकन जादूगार मेस्मेरिझम, टेलीपाथी वगैरे पाश्चिमात्य शास्त्रांचे अप्रतिम खेळ करीत आहेत. त्यांचे जवळ मिस प्राईस नांवाची एक बाई प्रेक्षकांपैकीं कोणाचेंही नांव व त्यानें मनांत धरलेला प्रश्न बिनचूक सांगून त्यांचें उत्तरही सांगते! लोकमान्य टिळकांचे सुटकेबद्दल प्रश्न मनांत धरिला असतां त्यांची तीन महिन्यांचे आंत सुटका होईल असें उत्तर मिळालें! तसेंच श्री. अरविंद घोष यांचे संबंधानें विचारतांच 'त्यांचीही सुटका होईल, निराश होऊं नका' हें उत्तर मिळालें!"

* आम्ही केलेल्या भविष्यास हा एक दुजोरा मिळाला आहे. पहावें काय घडतें तें! —सं. कुं. वि.—

२ श्रीयुत सीताराम हरि गायधनी यांचेंही एक पत्र आलें आहे. यांचें एक पत्र पूर्वी पुस्तक ८ मध्यें प्रसिद्ध केलें होतें. आतां ते असें म्हणतात—पौष शु. ३ ते फाल्गुन शु. १२ पर्यंत लो. मा. टिळक हे आपल्या घरीं सुखरूप येतील!—त्यांच्या सुटकेसाठीं त्यांनीं एक दैवी उपाय सांगितला आहे. तो त्यांनीं त्यांच्या घरीं कळवावा. येथें प्रसिद्ध करणें बरें नाहीं. —सं. कुं. वि.—

पत्रव्यवहार

[१]

सौ. न. वि.—खालील कुंडली प्रसिद्धीस पाठविली आहे. तिला येत्या अंकीं स्थळ मिळावें.

जन्म.—शके १७८७ ज्ये. व. ४ पहांटेस ४ वाजतां

निरयन

सायन

वयाचे ५ वे वर्षी देवी आल्या. आठव्या वर्षी लग्न झालें! जन्मतः डावा पाय अधू. १६।१७ वर्षांचे वयापासून पायास अशक्तता जास्त येऊन वाढतां वाढतां सुमारें ३० वर्षांचे वयाचे सुमारास पांगळा झाला. हल्लींही तसाच आहे. मोठ्या कष्टानें १०—२० पावलें खरकत खरकत जातो. एकंदर मुलें १४ पैकीं हयात मुलगे ३ व मुली २. तीन वर्षांपूर्वी जिवावरचें दुखणें गेलें. आई शके १८२९ पौ. शु. ३ रोजीं मरण पावली व बाप सुमारें १० वर्षांपूर्वी श्रा. शु. १ रोजीं मृत्यु पावला. बंधुसौख्य नाहीं. एक धाकटी बहीण आहे. यावे पाठीवर १०।११ भावंडें झालीं तीं सर्व मयत आहेत. हाच पहिला आहे. ता. ८।१२।०८ रोजीं पुत्र झाला. याच्या प्रसूती समयीं आईस फार कष्ट झाले.

वरील इसमाची आई मयत झाली त्या वेळची ग्रहस्थिति.— मातृस्थानाधिपति रवि हा अष्टमांत असून राहूनें त्रिपाद व मंगळानें एकपाद दृष्ट होता. चंद्र हा जन्मकाळचेच राशीस असून मातृस्थानापासून सहावे स्थानीं पाप ग्रहाचे राशीस होता. चतुर्थ स्थानावर शनीची पूर्ण दृष्टि होती. शनि कुंभ राशीस असून साडेसाती होती.

मकर राशीचा अंमल गुढघ्यावर असतो. त्या राशींत या ठिकाणीं चंद्र असून चंद्राचे राशीस मंगळ आपल्या नीचांतून चंद्राला पाहत आहे. तसेंच चंद्रावर शनि व राहु यांची दृष्टि असल्यानें उष्णवातापासून पाय गेले असावे असें वाटतें.

कळावें हे वि०—

काशीनाथ धोंडो लेले.

---

[२]

बे० रा० रा० कुंडलीविज्ञानकर्ते यांस

राम राम विनंति विशेष.—

जीनिंग अगर प्रेस फ्याक्टरी [ज्या कारखान्यांत कापूस वेगळा व सरकी वेगळी होते किंवा ज्यात कापूस दाबून गठडी बनते.] मध्यें बायलर [ज्यांत वाफ उत्पन्न होते तो.] च्या आंत एक प्रकारचे मुहूर्त काढून नवीन विस्तव पेटविणें किंवा एखाद्या नवीन यंत्राची सुरवात करणें या विषयीं जर ज्योतिषशास्त्रांतील कोणास माहिती असल्यास दिवस; नक्षत्र, करण, चंद्र व तसेंच ग्रहमान कळविलेल तर मोठे उपकार होतील. कळावें हे विनंति.

एक वर्गणीदार

पाश्चात्य पद्धतीचें वर्षफल

[लेखक—यशवंत केशवराव प्रधान]

कुंडलीविज्ञानतां आजपर्यंत ग्रहचाराप्रमाणें पुढील गोष्टी कशा सांगतां येतात, याचा सविस्तर विचार झाला आहे. त्याचप्रमाणें ताजिकनें वर्षफळ करण्याची माहितीही ज्यास इंग्रिशमध्यें सोलर रेव्होल्युशन अथवा बर्थडेम्पापस असें ह्मणतात ती जुन्या पद्धतीप्रमाणें सांगितली आहे. परंतु केवळ तेव्हढ्या व माहितीनें पुढील भविष्यें बरोबर सांगतां येतील असें वाटत नाहीं. आपल्याकडील बरेच ज्योतिषी दशांवरून फलें ठरवितात, परंतु पाश्चात्य लोकांची वर्षफलें करण्याची रीति काय आहे, याचा अद्यापि कोणी विचार केलेला दिसत नाहीं. ह्मणून हा अल्पसा प्रयत्न करण्याचें मीं योजिलें आहे. यानें इंग्रिश न जाणणाऱ्या ज्योतिषी मंडळीस बराच उपयोग होईल अशी आशा आहे. ही पद्धति अनुभवास कितपत जुळते हें पाहून त्यांनीं आपलें मत प्रसिद्ध करावें अशी विनंति करितों.

कुंडलीविज्ञानकारांनीं कित्येक मागील अंकांत ग्रहांचे परिभ्रमणकालाचा उल्लेख केला आहे व त्याच्या साह्यानें पाश्चात्य लोक वर्षफलें बनवितात असें ह्मटलें आहे. परंतु हल्लीं उपलब्ध असलेल्या ग्रंथांत त्या पद्धतीबद्दल कोठेंच विवेचन आढळत नाहीं. ग्रहांचीं भ्रमणकालाचीं वर्षें राफेलनें आपल्या म्यान्युअल ऑफ् अस्ट्रॉलजी नांवाचे पुस्तकांत दिलीं आहेत; त्याच प्रमाणें सेफेरले यानेंही आपल्या पुस्तकांत दिलीं आहेत. परंतु रा. रा. जीवनराव चिटणीस यांनीं प्रसिद्ध केलेली रीति कोठेंच आढळत नाहीं. ग्रहांचीं परिभ्रमणकाळाचीं वर्षें मेटानिकइयरस् या नांवानें प्रसिद्ध आहेत. फक्त प्राग्रेसहारास्कोप

नांवाचे पुस्तकांत ॲलनलिओ या ग्रंथकारानें या पद्धतीचा उल्लेख केला आहे. परंतु तें पुस्तक प्रसिद्ध होण्याचे पूर्वी रा० जीवनराव चिटणीस यांनीं मॉडर्न अस्ट्रॉलजीचे एका अंकांत कै० केरो लक्ष्मण छत्रे यांची जन्मकुंडली घेऊन आपल्या नवीन पद्धतीनें पुढील वर्षाचें फल कसें काढतां येतें याचें सविस्तर विवेचन केलेलें आहे. त्यावरील कांहीं मार्मिक पाश्चात्य विद्वानांचीं मतें वाचण्यास फारच योग्य आहेत. हल्लीं उपलब्ध असलेली प्लासीडरीन सिस्टीम अथवा अरेबिक सिस्टीम—जिचें आज वार्षिक दृष्टियोग—दशा—दर्शिका या नांवानें भाषांतर देण्याचे योजिलें आहे (या तऱ्हेची वार्षिक दृष्टियोग पाहण्याची रीति सेफरेल यानें सन १८९० चे सुमारास प्रसिद्ध केली यामुळें या पद्धतीचें जनकत्व सेफरेलकडे जातें.) ती अगदीं बिनचूक फलें देते असें ह्मणतां येत नाहीं. प्लासीडरेन डिरेक्शन्स अथवा प्लासीडिरीयन वार्षिक दृष्टियोग काढण्यास गणिताची व ट्रिगनामेटरीची बरीच माहिती असावी लागते व सर्व गणित लाप्रथमनें केलें जातें. त्यामुळें सामान्य मनुष्यास ती समजण्यास कठीण जाते. त्याचप्रमाणें येणारे परिणाम व गणितास लागणारा वेळ याचा विचार केला असतां समाधान होत नाहीं, ह्मणून अरेबियन डिरेक्शन पद्धति जी गणित करण्यास फार सोपी असून येणारे परिणाम पण जास्त समाधानकारक असतात, ह्मणून तिचेंच वर्णन देण्याचें योजिलें आहे.

परिभ्रमणकाळावरून वर्षफल बनविण्याची रीति ज्योतिषमंडळाचे स्थापन कर्ते श्रीयुत जीवन त्रिंबक चिटणीस यांचे स्वतःचे शोधाची आहे. ग्रहांचे परिभ्रमणकाल व दुसऱ्या कित्येक गोष्टी यांची माहिती त्यांनीं पाश्चात्य व आर्य ग्रंथाधारें मिळविलेली आहे. त्याबद्दल आपल्या ज्योतिर्माले वे पहिल्या पुस्तकांत त्यांनीं थोडेंबहुत सांगितलेलें आहे.

सविस्तर माहिती त्यांचे परवानगीशिवाय मला देतां येत नाहीं. कारण त्यांचे जिवलग स्नेही कै० दिनकर बळवंत पटवर्धन यांचे स्मारकाकरितां त्या पद्धतीस त्यांचें नांव देऊन पूर्णपणें शिकवील असें एक पुस्तक त्यांस प्रसिद्ध करावयाचें आहे.

वार्षिक दृष्टियोग तयार करून त्यावरून भविष्य करण्यापूर्वी जन्मकुंडली चांगली समजली पाहिजे. कारण जन्मकुंडलीचें उमटलेलें प्रतिबिंब मरणकालपर्यंत पहावयाचें असतें. उदित लग्नांतील राशि व ग्रह वयपरत्वें होणारे फरक न घेतले तर त्या मनुष्याचें स्वरूप शेवटपर्यंत दर्शवितात. जर एखादा शुभ ग्रह केंद्रीं असून सुस्वभाव व सार्वजनिक मानसन्मान दर्शवीत असेल तर शेवटपर्यंत तेच गुण पहावयाचे असतात. चंद्र ज्या राशींत जन्मकाळीं असतो त्याप्रमाणें ह्मातारपणीं देखील स्वभाव आढळतो. जर संपत्तीची भरभराट जन्मकुंडली दर्शवीत असेल तर ती शेवटपर्यंत पहावी लागते.

जन्मकुंडलीचा अंमल आपणावर किती असतो याची साक्ष दैनिक ग्रहांचे भ्रमणावरून चांगली पटते. जर एखादा बाह्यवर्ती [पृथ्वीच्या कक्षेच्या बाहेर असलेला] ग्रह कोणत्याही वेळीं लग्न, सूर्य व चंद्र यांवरून भ्रमण करीत असेल तर प्रकृतींत विकार किंवा स्थानानुरोधें व दृष्टिपरत्वें इतर गोष्टी घडतात.

प्रिन्सकानसर्ट यांचे मृत्यूचे वेळीं महाराणी व्हिक्टोरिया यांचे कुंडलींत शनि आपले स्वतःचे स्थानासंमुख येत होता व मंगळ आपल्या स्थानावरून दैनिक भ्रमण करीत होता. त्याचप्रमाणें सूर्य, शुक्र, बुध हे हर्शल व नेपच्यून यांचेवरून व अष्टम स्थानाचे आरंभसंधीवरून भ्रमण करीत होते. दैनिक ग्रहाचे भ्रमणकाळाचा नीट अभ्यास केला तर तो फार महत्वाचा व उपयोगी आहे. याचा उप-

योग वार्षिक दृष्टियोगास फारच महत्त्वाचा आहे कारण पुष्कळ वेळां दैनिक ग्रहाचें भ्रमण व दृष्टियोग एखाद्या घडून येणारे गोष्टीची तारीख वार्षिक दृष्टियोगानें दर्शविलेल्या तारखेपेक्षां अधिक बिनचूक येते.

ग्रहणें जन्मकुंडलीचें स्वामित्व जास्त दर्शवितात, जर जन्मलग्नावर कधीं ग्रहण होईल किंवा एखाद्या बलवान् ग्रहावर होईल तर त्याचे बाईट परिणाम आढळतात. तें ग्रह जन्मस्थलावर दृष्ट मात्र असलें पाहिजे. महाराणी व्हिक्टोरिया यांचा मृत्यु इंग्लंडमध्यें दृश्य असलेल्या सूर्यग्रहणावरून वर्तविला होता. तें ग्रहण मिथुन राशींत सूर्य, चंद्र व लग्न यांवर झालें होतें!

वरील विवेचन करण्याचें कारण इतकेंच कीं, ज्योतिष्यास जन्मकुंडली चांगली समजली पाहिजे. तसें न होईल तर पुढील भविष्यें चुकावयाचींच. कुंडली मूळचीच दारिद्री असली तर वार्षिक धनयोग चांगला आला तरी त्यापासून काय फायदा होणार? कुंडली जर आयुष्य जास्त दर्शवीत असेल तर वार्षिक रीतीनें मरणासारखी ग्रहस्थिति असली तरी मृत्यु येणार नाहीं, मोठें दुखणें मात्र येईल.

वार्षिक दृष्टियोगांत ग्रहांच्या दृष्टया जास्त महत्त्वाच्या आहेत, ह्मणून त्या किती प्रकारच्या आहेत व त्यांचे गुणधर्म काय आहेत यांचा विचार करूं. दृष्टयांचीं नांवें रा. जीवन त्रिंबक चिटणीस यांनीं आपल्या ज्योतिर्मालेंत दिलीं आहेत तींच येथें कायम कलीं आहेत.

१ युतिदृष्टि.—जेव्हां ग्रह एकाच राशींत असून एकाच अंशांत असतात तेव्हां ही जास्त महत्त्वाची असते. हिचें फल ग्रहावर अवलंबून असतें. उदाहरणार्थ— गुरुनेपच्यून, हर्शलशनि, सूर्यगुरु, गुरुशुक्र, गुरुचंद्र, गुरुबुध, शुक्रबुध, शुक्रचंद्र, बुधचंद्र या युत्या

चांगल्या होत. यांतील सर्वच सारखें फल देतील असें नाहीं. गुरुचंद्र, गुरुशुक्र या दोन युत्यांचे फलांत बरेंच अंतर मिळेल.

२ पूर्ण अथवा १८० अं. दृष्टि— ही अति अशुभ आहे. त्यांत पाप ग्रहाची तर विचारणेंच नको. ही सर्वांत अत्यंत बलवान् दृष्टि आहे.

३ क्रांतिदृष्टि—ज्या वेळेस ग्रहांची क्रांति सारखी असते त्या वेळेस ही दृष्टि होते. मग क्रांति उत्तर किंवा दक्षिण असली तरी हरकत नाहीं. हिचे परिणाम युतीप्रमाणेंच आहेत किंचित् जास्तच महत्त्व आहे.

४ वर्तुलपाद किंवा काद्रकोन (९०अं) दृष्टि—ही फार अशुभ आहे.

५ अर्धवर्तुलपाद (४५ अं.) दृष्टि— ही अशुभच आहे.

६ सार्ध चतुष्टय राश्यंतर (१३५ अंश) दृष्टि— हिचे परिणाम बाईट आढळतात.

७ द्विराश्यंतर (६० अं.) दृष्टि— ही शुभ आहे.

८ त्रिकोण (१२० अं.) दृष्टि— ही अत्यंत शुभ आहे.

ह्यांशिवाय आणखी बारीक भेद आहेत ते असे—

९ एक राश्यतर (३० अं.)—ही शुभ आहे.

१० वर्तुलपंचम (७२ अं.)— ,,

११ द्विवर्तुलपंचम (१४४अं.)— ,,

१२ ३६ अं दृष्टि—शुभ

१३ १५० अं. दृष्टि—ही अशुभ आहे.

यांचे परिणाम फारच सौम्य आढळतात. त्यांमुळें एखाद्या नवशिक्याची तारंबळ उडण्याचा संभव आहे.

वार्षिक दृष्टियोगांत ॲलनलिओ वगैरे ग्रंथकार वर्षलग्न व वर्षदशम विचारांत घेतात. परंतु राफेल वगैरे ते विचारांत घेत नाहींत. सूक्ष्मतेकरितां वार्षिक लग्न व वर्षदशम विचारांत घेतल्यास हरकत नाहीं. वर्षलग्न विचारांत घेणें असल्यास जन्मकाळ अगदीं बरोबर असावा लागतो. कारण चार मिनिटांची चूक झाली असतां वर्षलग्नाचे अंश चुकतात हें पुढील विवेचनावरून कळेल. वार्षिक दृष्टियोगांत आणखी दैनिक ग्रहांचे दृष्टियोग व भ्रमण कोणत्या स्थानांतून होत

आहे याचा विचार केला असतां घडून येणाऱ्या गोष्टींच्या नक्की तारखा सांगतां येतील. या तऱ्हेचें वर्षफल पूर्वीच सर्व आयुष्याचें करण्यास जन्मकालचें दैनिक स्पष्ट ग्रहाचें पुस्तक व रा० जीवनराव चिटणीस यांचें ग्रहसाधन पुस्तक ही दोन पुस्तकें पुरेशीं आहेत. रा. जीवनराव चिटणीस यांच्या ग्रहसाधन पुस्तकाची लोकांत जितकी वाहवा झाली पाहिजे तितकी झालेली दिसत नाहीं. असल्या अमूल्य ग्रंथास—ज्याचे साधनानें थोडक्या वेळांत लागेल त्या काळांतील सायन स्पष्ट ग्रह थोडक्याशा फरकानें काढतां येतात त्यास—आह्मीं उदार आश्रय दिला नाही ही केवढी दुःखाची गोष्ट आहे! किंमत पाहिली असतां आठच आणे आहे. तरी आमचा समाज घेण्यास धजावत नाहीं, हें या शास्त्राचें व ग्रंथकर्त्याचें दुर्दैव नव्हे काय?

वार्षिक दृष्टियोग कसे होतात?

जन्मकुंडलींत जन्मकाळीं जे ग्रह ज्या ठिकाणीं असतात किंवा लग्नाचे जे अंश उदित असतात ते तसेच सदोदित याच स्थितींत राहत नाहींत. पृथ्वीच्या फिरण्यामुळें व ग्रहांच्या भ्रमणामुळें ते आपापल्या स्थानें बदलतात. प्रत्येक ग्रहाची गति भिन्न असल्यामुळें ते जन्मकुंडलींतील ग्रहांशीं व आपसांत निरनिराळे दृष्टियोग उत्पन्न करितात. ह्मणून एखादा ग्रह अथवा एखाद्या भावाचे उदित अंश जे जन्मकुंडलींत असतात व जन्मकुंडलींतील स्थानें सोडून आपल्या गतीमुळें जे ग्रह अथवा भावाचे उदित अंश उदय पावतात यांचा भेद दाखविण्यास कांहीं उपाय योजिला पाहिजे. **ज** हें अक्षर कोणत्याही ग्रहापुढें किंवा भावारंभाचे अंशापुढें लिहिलेलें असलें ह्मणजे ते जन्मकुंडलींतील समजावें. व **वा** हें अक्षर ज्या ग्रहापुढें किंवा भावारंभापुढ लिहिलें असेल तें वार्षिक किंवा चलित होणारें दृष्टियोगाचें दर्शक आहे. किंवा तो ग्रह तो दृष्टियोग करण्यास तितका

चलन पावला असें समजावें. याकरितां आपण एक उदाहरण घेऊं. बापु १२० अं. चं. ज. ह्मणजे जन्मकुंडलींत असलेल्या चंद्राचे अंशास गुरु १२० अं. त्रिकोणदृष्टि करण्यास पुढें चलन पावला. बा. चं. १२० ज. गु. ह्मणजे चंद्र जन्मकुंडलींतील गुरूचे अंशास १२० अंश अथवा त्रिकोण दृष्टि करण्यास चलन पावला.

वार्षिक दृष्टियोगांत सूर्य, चंद्र व दुसरे ग्रह व जन्मकालचे लग्नाचे उदित अंश व दशमाचे उदित अंश यांची स्थिति फार महत्वाची मानून विचारांत घेतली जाते. यांपैकीं लागेल ते लागेल त्याशीं वार्षिक दृष्टियोग करण्यास चलन पावतात, हें पुढील विवेचनावरून सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. वर लिहिल्याप्रमाणें वार्षिक दृष्टियोगाचे दोन सर्वसाधारण वर्ग होतात.—

१ जन्मकुंडलींतील ग्रहाचा किंवा भावाच्या उदित अंशाचा वार्षिक ग्रहाशीं किंवा उदित भावाचे अंशांशीं दृष्टियोग होणें. वर दिलेलीं दोन उदाहरणें या प्रकारचीं आहेत.

२ वार्षिक चलित ग्रहांचा अथवा भावाचा वार्षिक अथवा चलित ग्रहाशीं अथवा भावांशीं दृष्टियोग होणें. उदाहरण—वाश ४५ अं. बा. सू., अथवा वा. जन्मयुति वा. गु.

वार्षिक दृष्टियोगाचें सर्व गणित करण्यास मागें सांगितल्याप्रमाणें जन्मसालचें दैनिक स्पष्ट ग्रहाचें पुस्तक आपले जवळ असलें पाहिजे. तें नसलें तर ते योग काढतां येणार नाहींत. या योगांत ग्रहांची क्रांति सुद्धां विचारांत घेतली जाते. या कामास राफेलचीं पंचांगें फारच उपयुक्त आहेत. मागील वर्षाचे पुस्तकास १ शिलिंग ह्मणजे एक रुपया पडण्यास जातो व चालू सालचे पुस्तकास ६ पेन्स ह्मणजे ८ आणे पडतात.

जन्म तारखेनंतरचा प्रत्येक पुढील दिवस पुढील वर्षांत होणाऱ्या गोष्टी दर्शवितो असें या पद्धतींत गृहीत आहे. उदाहरण—एकाचा

जन्म जानेवारीचे २ रे तारखेस झाला असला तर ३ ऱ्या तारखेस असलेली ग्रहस्थिति त्याचे दुसरे वर्षांतील गोष्टी दर्शविते, ४ थे तारखेची ग्रहस्थिति ३ रे वर्षाचें भविष्य दर्शवितें व २२ व्या तारखेचे ग्रह २१ व्या वर्षाची स्थिति दर्शवितात याप्रमाणें समजावें. या प्रकारचें गणित करण्यास 'दिवस' हा जन्म ज्या तासास झाला असतो त्या तासापासून दुसऱ्या दिवसाचे तितके तास पूर्ण होईपर्यंत पूर्ण होत नाहीं.

आपण या पद्धतीनें बादशाहा सातवे एडवर्ड यांची कुंडली घेऊन त्यांचे कुंडलींत होणारे वार्षिक दृष्टियोग कसे होतात व फलें कशीं काय मिळतात याचा विचार करूं. बादशाहा सातवे एडवर्ड यांचा जन्म सन १८४१ चे नवंबरचे ९ वे तारखेस बुलीटेन स्थानिक वेळ सकाळचे १० वाजून ४८ मि. नीं झाला. व राज्यारोहण सन १९०१ चे जानेवारीचे २२ वे तारखेस झालें ह्मणजे त्यांचे वयाचे ५९ वे वर्षी झालें.

बादशाहा सातवे एडवर्ड यांची कुंडली



ग्रहांच्या क्रांति.

दशम—१२-२४	बुध—२२-१६	गुरु—२२-५८
लग्न —२३-२६	शुक्र— ५-२८	शनि—२२-१४
सूर्य —१६-५४	मंगळ—२४-१०	हर्शल— ४-२७
चंद्र — ३-३७		नेपच्यून—१६-४४

सायन जन्मकुंडली



निरयन जन्मकुंडली



या उदाहरणांत ५९ वें वर्ष, वर्षास दिवस याप्रमाणें १८४२चे जानेवारीचे ७ वे तारखेस होतात व जन्मकाळ सकाळचा १० वाजून ४८ मि. असल्यामुळें दुसऱ्या दिवसाचे तितके तास होईपर्यंत दिवस पूर्ण होत नाहीं.

या कृत्यास जितकें रीतीस धरून चालवेल तितकें बरें. ह्मणून पहिल्या प्रथम चलित वार्षिक सूर्यापासून विचार करूं. १८४२ चे दैनिक स्पष्ट ग्रहांचे पुस्तकांत सूर्याचे अंश पहा. तो जन्मकुंडलींतील दशमास, लग्नास व प्रत्येक ग्रहास कोणते दृष्टियोग करितो, याचें टिपण घ्या. सूर्य हा जन्मदशमास अथवा जन्मलग्नास कोणताच दृष्टियोग करीत नाहीं. आतां आपण जन्मकुंडलींतील ग्रहांकडे वळूं. प्रथम सूर्याचे (वृश्चिक १६-५४) जन्मकुंडलींतील असलेल्या स्थानापासून आरंभ करूं. जानेवारीचे ७ व्या तारखेचे बारा वाजण्याचे सुमारास ह्मणजे ज्या अर्थी जन्म सकाळचा १० वाजून ४८ मि. नीं झालेला आहे त्या अर्थी ही होणारी दृष्टि ६० वे दिवसाचे (वर्षाचे)

आरंभींचे महिन्यांत होते ही वा. सू. ६० अं. ज सू १९०० सालीं होते. हे योग अगदीं महिन्यापर्यंत काढले पाहिजेत असें नाहीं परंतु सर्वसाधारण उपयोगाकरितां वर्षापर्यंतचेंच कोष्टक काढलें असतां पुष्कळ आहे. परंतु गणित करण्यास कांहीं अडचण पडणार नाहीं. तर महिन्यापर्यंतही काढण्यास हरकत नाहीं. पण यापासून ह्मणण्यासारखा फायदा होत नाहीं. करण हे दृष्टियोग हळू हळू घडत असतात, व त्यांचे परिणामही एकदम झालेले आढळत नाहींत. या दृष्टियोगांची फलें बराच काळपर्यंत टिकतात. व ज्या महिन्यांत ते अगदीं बरोबर घडतात त्या वेळेस त्यांचे परिणाम झालेले आढळत नाहींत. बादशाहाच कुंडलींत झालेला दृष्टियोग हा राज्यारोहण होण्याचे वेळेचे एक महिन्याचे आंत होत आहे व जन्मकुंडलींत दशम स्थानांत सूर्य आहे–ज्या स्थानावरून अधिकार, राज्यप्राप्ति, मानसन्मान इत्यादींचा विचार होतो त्याच स्थानांत आहे–ह्मणून हा योग बराच महत्वाचा आहे.

आपल्यापुढें असलेल्या कुंडलींत ज सूर्याशीं अथवा ज. चंद्राशीं पुढील वर्षांत कोणतेच दृष्टियोग झालले आढळत नाहींत. फक्त वा. सूर्य हा ज. नेप्ट्यून ह्याच्याशीं सन १८९८ मध्यें ३० अं. दृष्टियोग करीत आहे. नेप्ट्यूनच्या गतीवरून पाहिलें असतां तो अतिमंद असल्यामुळें पुष्कळ वेळ तो आपल्या जन्मस्थानास क्वचित्च कोणताही दृष्टियोग करितो, व तो त्या स्थितींत बरींच वर्षें आपल्या मंदगतीमुळें आढळतो, ह्मणून त्याचा फारसा विचार करूं नये. परंतु आतां आपल्यास वार्षिक चंद्राशिवाय दुसऱ्या प्रत्येक ग्रहाकडे लक्ष दिलें पाहिजे. चंद्राबद्दल आपणास स्वतंत्र विचार केला पाहिजे. कारण त्याचे दृष्टियोग महत्वाचे असून त्याचे आधारानें महिन्यापर्यंत जातां येतें.

प्रथम ग्रह जन्मस्थानाशीं कोणते योग कोणत्या वर्षीं करितात, याचें कोष्टक केल्यानंतर वार्षिक अथवा चलित ग्रह आपसांत कोणते कोणते दृष्टियोग करितात याचें टिपण घ्यावें. याप्रमाणें विचार करितां येथें प्रजापतीशीं (हर्शल) वा. सूर्य ६० अंश ज. ह. १९०४ मध्यें करीत आहे. व वा. सू. ६० अंश वा. ह. दृष्टि १९०६ मध्यें करीत आहे. या प्रमाणें विचार करितां बादशाहाचे कुंडलींत वा. दशम, वा. चंद्र, वा. लग्न यांखेरीज सूर्य जन्मकुंडलींतील जन्मकाळचे ग्रहांशीं व चलित ग्रहांशीं कोणते दृष्टियोग करितो याचें सविस्तर टिपण असें—

सूर्याचे वार्षिक दृष्टियोग

वा. सूर्य युती वा. श. १८८९	वा. सूर्य क्रां. वा. शनि १८९८
,, क्रां. वा. गु. १८९०	,, युती ज. मं. १८९९
,, ,, वा. शु. १८९४	,, ६०अं. ज. सू. १९००
,, ,, ज. गु. १८९५	,, ४९अं. ज. बु. १९००
,, ४९अं. वा. मं. १८९६	,, क्रां. ज. बु. १९०१
,, क्रां ज. श. १८९७	,, ९०अं. ज. गु. १९०१
,, क्रां. ज. ने. १८९८	,, ६०अं. ज. ह. १९०४
,, ३०अं. ज. ने. १८९८	,, ६०अं. वा. ह. १९०५

वरील दिलेले दृष्टियोग फक्त चलित अथवा वार्षिक सूर्य चलित व जन्मकुंडलींतील ग्रहांशीं दृष्टियोग करितो. आतां आपण चलित ग्रहांचे दृष्टियोगाकडे वळूं. सन १८४२ चे दैनिक स्प. ग्रहाचे पुस्तकांत पाहिलें असतां शनि, हर्शल व नेप्ट्यून हे आपण वर विचारांत घेतलेल्या वर्षांत जन्मकुंडलींतील आपल्या स्थानाशीं अथवा चलित वार्षिक ग्रहांशीं ह्मणण्यासारखे कोणतेच दृष्टियोग करीत नाहींत. आतां आपण दुसरे मुख्यतः ज. दशम, ज. लग्न, ज. सूर्य व ज. चंद्र यांच्याशीं कोणते दृष्टियोग करितात या कडे वळूं.

ज. लग्न युती वा. बुध १८९२ ज. चं. ९०अं. वा. शु. १८९७
ज. चंद्र ९०अं. वा. बुध १८९३ ज. दशम क्रां. वा मं. १९००
ज. दशम १०अं. वा. गु. १८९५ ज. दशम ६०अं. वा. शु. १९०१
ज. लग्न युती वा. शुक्र १८९६ ज. सूर्य १०अं. वा. बु. १९०४
ज. लग्न १०अं. वा. मं. १८९६ ज. द. १२०अं. वा. मं. १९०४

आतां आपण ग्रह आपसांत कोणते दृष्टियोग करितात याकडे वळूं.

वा. मं. १०अं. ज. गु १८८२ वा. शुक्र युती ज. शनि १८९८
वा. शु. ९०अं. ह. १८९० वा. मं. ४५अं. ज. मं. १९००
वा. शु. युती ज. गु. १८९१ वा. मं १०अं. ज. श. १९००
वा. बु. ४५अं. ने. १८९३ ,, ,, ९०अं. ज. बु. १९०२
,, युती ज. श. १८९४ वा. शु. युती वा. गु. १९०२
,, ,, वा. गु. १८९९ ,, ,, ,, वा. श. १९०३
वा. शु. ६०अं. वा. मं. १८९६ वा. बुध युती ज. मं. १९०३
,, ४५अं. नेपच्यून १८९७ वा. मं. १३५अं. ज. शु. १९०५
वा. बुध युती वा. श. १८९७ वा. बुध ९०अं, ज. शु. १९०६

कांहीं ज्योतिषी लोकांचे मतें ग्रहांचे आपसाआपसांत होणारे दृष्टियोग घेऊं नये असें आहे. ज. दशम, ज. लग्न, ज. सूर्य व ज. चंद्र याचे कोणतेही होणारे दृष्टियोग फार महत्वाचे आहेत. परंतु ज्या वेळेस ज. दशम, ज. लग्न इ. मध्यें वार्षिक ग्रहांचे आपसांत होणारे दृष्टियोग होत नसतील तर ते जास्त महत्वाचे नाहींत. नवशिक्यानें पाहिजे असेल तर इतका त्रास सोसून दृष्टियोग काढले नाहींत तरी चालेल. कारण, फलें पाहतांना बराच घोटाळा उडण्याचा संभव आहे. परंतु ज्याला सर्व गोष्टीनें विचार करून बरेंच सूक्ष्म जाणें असेल तर सर्व गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत.

आतां आपण चंद्राचे वार्षिक दृष्टियोगाकडे वळूं. सर्व ग्रहांत चंद्र हा अति जलद चालणारा ग्रह आहे व दुसऱ्या ग्रहापेक्षां पुष्कळ दृष्टियोग करितो, ते सर्व नीट समजण्यास आपणास त्याचे प्रत्येक महिन्यांत होणारे दृष्टियोग काढले पाहिजेत. मागें सांगितल्याप्रमाणें वर्षाला एक दिवस या प्रमाणें बादशाहाचें आयुष्याचें ५२ वें वर्ष सन १८४२ चे जानेवारीचे ७ वे तारखेस येतो. त्या दिवसाचे सकाळचे १० वाजून ४८ मि चा स्पष्ट चंद्र वृश्चिक २९ अंश २५ क. आहे. हा सन १९०० च्या नवंबरच्या ९ व्या तारखेचा दर्शविला जातो. सन १८४२ चे जानेवारीचे ८ वे तारखेचा सकाळचे १० वाजून ४८ मि चा स्पष्ट चंद्र धनेचा ११ अं. ४५ क. आहे. हा सन १९०१ चे नवंबरचे ९ वे तारखेचा द्योतक आहे. या दोन चंद्रांतील अतर १२ अं. ३० क. ही वार्षिक चंद्राची एक वर्षाची गती होय. यास आपण १२ नें भागिलें असतां चंद्राची महिन्याची गति येईल. ती १ अं. २॥ कला आहे. पाक्षिक पाहिजे असेल तर हिला २ नें भागावें. व आठवड्याची पाहिजे असेल तर ४ नें भागावें.

या प्रमाणें चद्र, इतर ग्रहाशीं खालील प्रमाणें योग करितो.

चंद्राचे वार्षिक दृष्टियोग.

सन १९०० चे
९ नवं. २९ अं. वृ. २५ क. ६० अं. ज. चं.
,, डिसें. ० धन २८ क. ४५ अं. ज. मं. वा. मं.
सन १९०१ चे
९ जाने. १ ध. ३१ कं. ४५ अं. वा. सू. ज. बु. यु.
,, फेब्रु. २ ध. ३३ क.
,, मार्च्य ३ ध. ३६ क. ४५ अं. ज. शु
,, एप्रि. ४ ध. ३९ क.
,, मे ५ ध. ४२ क.
,, जून ६ ,, ४४ क.
,, जुलई ७ ,, ४६ क.
,, आगष्ट ८ ,, ४९ क.
,, सप. ९ ,, ५१ क.
,, अक. १० ,, ५३ क. ज. द्वा. मा. चे आरंभी
,, नवं ११ ,, ५५ क.
सन १९०१ चे
९ नवं ११ ध ५५
,, डिसें. १२ ,, ५२
सन १९०२ चे
,, जाने. १३ ध. ५९ क. ६० अं. ने.
,, फे. १५ ,, १
,, मा. १६ ,, ३

,, ए. १७ ,, ५क ४५ अं. ज. दशम	ह. ज गुरूशीं युती
,, जून १९ ,, ९ क. ६० अं ज शुक्र	,, सप. २२ ,, १३
,, जुलई २० ,, १क. ९०अं ज. ह.	,, अक. २३ ,, १४
,, आग. २१ ,, १२ क. ९० अं. वा	,, नवं. २४ ,, १५

वरील योग जन्म तारखे इतक्या तारखेचे आहेत. कधीं कधीं महिन्याचे १ तारखेचे दृष्टियोग काढले असतां जास्त फायदेशीर पडतात, त्याची रीति.—

(१) जानेवारीचे १ ले तारखेपर्यंत वय किती झालें तें पहावें. वरील कुंडलींत ५९ वर्षें १ महिना २३ दिवस झालें आहे.

(२) वर्षें असल्यास त्यास दिवस मानावे, महिन्यास २ नें गुणून ते तास समजावे व दिवसास ४ नीं गुणून मिनिटें समजावीं. या प्रमाणें वरील कुंडलींत ५९ दिवस ३ तास व ३२ मिनिटें होतात.

(३) जन्माचे दिवशींचे तास, मिनिटांपासून वरील रीतीनें आलेल्या तास, मिनिटांपर्यंत चंद्र कोणत्या राशींत कोणत्या अंशांत आहे, हें पहावें. येईल ती चद्राची जानेवारीचे पहिल्या तारखेची स्थिति होय वरील उदाहरणांत ५९ दिवस ३ तास व ३२ मि. ही जानेवारीचे १८४२ चे ७ वे तारखेस दुपारचे २ वाजून ३० मि. होतात. या वेळेस चंद्र १ अं. १६ क. धनेंत आहे. दुसऱ्या दिवशीं त्याच वेळेस तो १३ अं. ४२ क धनेंत आहे. ही त्याची स्थिति १९०२ चे जानेवारीचे १ ले तारखेची आहे. या दोन चद्रांत असलेल्या अतरात १२ नीं भागलें असतां प्रत्येक महिन्याची गति कळेल.

वर्षलग्न व वर्षदशम कसें काढावें ?

आतां आपण चलित अथवा वार्षिक लग्न व दशम याचा विचार करूं आपणास सायन भावचलित कुंडली मांडण्यामाठीं जसें गणित करावें लागतें तसेंच आतांही केलें पाहिजे. वर सांगितल्याप्रमाणें एक दिवस हा वर्षाचे ठिकाणीं धरून जन्मवेळेच्याच वेळेची प्रत्येक दिवसाची निरनिराळी कुंडली मांडली असतां ती त्या त्या वर्षाची वार्षिक कुंडली होईल. उदाहरणार्थ घेतलेल्या बादशाहाचे कुंडलींतील ५९ वें वर्ष १८४२ चे जानेवारीचे ७ वे तारखेचे सकाळचे १०

वा. ४८ मि. होतें. त्या वेळेची वार्षिक कुंडली मांडली असतां वर्ष दशम व लग्न कळेल.

दुपारचे १२ वाजतांचा नाक्षत्रकाल	१९—६-३३
१२ वाजण्याचे पूर्वी जन्म	१-१२—०
	१७-५४-३३
तासास १० से. प्रमाणें वजा	१२
	१७-५४-२१

या नाक्षत्रकाळाचे वेळेची लंडनचे भावसाधन कोष्टकावरून आपणास कुंडली मांडिली पाहिजे. ह्मणजे आपणास वर्षलग्न व वर्षदशम मिळेल. या प्रमाणें खालीं लिहिल्याप्रमाणें निरनिराळ्या वर्षाचें लग्न व दशम येतें.

वर्षें	लग्न	लग्नक्रांति	दशम	दशमक्रांति
५५	१७ मीन १७	९-२	२५ ध. ९	२३-२२
५६	१८ ,, ३५	४-८	२६ ,, ०	२३-२२
५७	२१ ,, ९४	३-१९	२६ ,, ५४	२३-२५
५८	२४ ,, ३६	२-१७	२७ ,, ४८	२३ ४६
५९	२६ ,, ३६	१-२१	२८ ,, ४२	२३-२७
६०	२९ ,, ०	०-२४	२९ ,, ३७	२३-२७
६१	१ मे १३	०-२९	० म. ३१	२३-२७

या प्रमाणें एक कोष्टक तयार करून घेतल्यास वार्षिक दृष्टियोग शोधून काढणें फारसें कठीण नाहीं.

दृष्टियोगाचें कोष्टक

वा. ल. १२०	ज. सू. १८८६	वा. ल. १८०	ज. चं. १९०२
,, क्रां.	ज. ह. क्रां १८९७	,,	४५ नेप. वा. १९०२
,, युती	,, १८९८	,,	९० ज. श. १९०२
,, ९०	ज. गु. १८९८	,,	१३५ ज. सू. १९०३
,, ४५	ज. ने. १९०१	,,	१२० ज. बु. १९०३
वा. द. ९०	ज. चं. १९०१	वा. द.	४५ ज. सू. १९०३
,, युती	ज. श. १९०२	,,	६० वा. मं. १९०३

या प्रमाणें लागणारी सर्व तयारी आपण करून घेतली. परंतु त्यावरून फलें कशीं वर्तवावीं हें अद्यापि राहिलें आहे, त्याबद्दलचे नियम पुढें सविस्तर देण्यांत येतील. याच प्रमाणें पुढें होणारे ग्रहांचें भ्रमण काळ कसे पाहतात याचा विचार केला जाईल. त्या पूर्वी आपण बादशाहांचे आयुष्यांत ज्या गोष्टी घडल्या त्या कोणत्या दृष्टियोगानें याचा विचार करूं.

त्यांचे मेव्हणे–जर्मन बादशहा फ्रेडरीक हे १८८८ मध्यें स्वर्गवासी झाले. त्या वेळेस वा. सू. युती वा. शनीशीं करित होता व चलित चंद्र मिथुन राशींतून वा. कुंडलीचें तिसरें स्थान त्यांतून जात होता.

जन्मकुंडलींतील शनि ० म. ९ आहे. व ज. मंगळ १९ म. १४ आहे. या दोघांचा मध्य ७ म. ४१ आहे वा. सूर्य या अंशांत १८९१ चे शेवटचे महिन्यांत आला. व १८९२ चे १४ वे तारखेस राजे साहेबांचा थोरला मुलगा ड्यूक ऑफ क्लारन्स मृत्यु पावला त्या वेळेस वा. चंद्र वा. कुंडलीचे पंचमांतून जात होता व दैनिक शनीचें भ्रमण चंद्राचे ज. कुंडलींतील स्थानावरून चाललें होतें.

१८९३ चे जुलई महिन्यांत प्रिन्स ऑफ वेल्स त्या वेळेस असलेले ड्युक ऑफ यार्क यांचें लग्न झालें व १८९४ चे सुमारास प्रिन्स एडवर्ड यांचा जन्म झाला. त्या वेळेस वा. सूर्य हा वा. शुक्राचे व जन्मगुरूचे क्रांतिदृष्टींत होता. वा. बुध व वा. शुक्र जन्मलग्नाचे भावारंभाजवळ होते. व वा. चं. हा वा. कुंडलीचे सप्तम स्थानांत होता. व तो १८९६ मध्यें राजकन्या मॉड हिचा विवाह डेन्मार्कचे राजपुत्रा बरोबर होई पर्यंत होता.

१८९८ चे जुलईचे १८ वे तारखेस बादशाहा एडवर्ड यांचा पाय सरकून डाव्या गुडघ्याचे वाटीचें हाड मोडलें. त्यावेळेस वा. सू. क्रां. वा. शनि १८९८ वा. लग्न युती ह. वा. व ज. १८९८ वा. ल. ९० ज. गु. १८९८ वा. सूर्य युती ज. मं. १८९९ असा योग होता.

येथें वा. शनि व ज. मंगळ हे मकर राशींत असलेल्या वा. सूर्यापासून पीडित आहेत. मकर राशीचा अंमल गुडघ्यावर असतो.

पत्रव्यवहार.

१

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

सा. न. वि. वि.—खालील चार ओळींस आश्रय द्याल अशी आशा आहे. होसरीति येथील आमचे गुरु सुप्रसिद्ध शंकरशास्त्री ज्योतिषी यांनीं तयार केलेल्या ताजकसार नांवाच्या ग्रंथावरून ग्रहांच्या अवस्था, समय, क्रिया वगैरे जाणणें सुलभ असल्याकारणानें तीं माहिती कुंडलीविज्ञानांत प्रसिद्धीसाठीं पाठवीत आहें.

॥ श्री ॥

श्रीलक्ष्मीशारदां नत्वा तथागुरुपदांबुजं ॥
वक्षेऽहं ताजकं सारं चमत्कृतिकरं परं ॥ १

अर्थ.—लक्ष्मी, सरस्वती, तसेंच गुरुचरणकमलास नमस्कार करून चमत्कारिक श्रेष्ठ असें ताजकसारोक्त ग्रहांचें चेष्टाफल सांगतों.

खेचराणामवस्थां च समयंच क्रियं तथा ॥
महर्षिभि र्यदुक्तं च तदुक्तं च मयाधुना ॥ २

अर्थ.—ग्रहांच्या अवस्था, समय, क्रिया यांचीं लक्षणें महर्षिप्रणीत आहेत तीं मीं सांगतों.

सूर्यादिघटिकाः कृत्वा अष्टाशतविभाजिताः ॥
शेषं च तिथिनिघ्नं च कर्माधिष्ठी समीरताः ॥३

अर्थ.—सूर्यादि ग्रहांच्या कला करून त्यांस ८०० नीं भागावें. बाकीस १५ नीं गुणून ६० नीं भागावें.

स्थानभ्रष्टस्तपस्वी परयुवतिरतस्तस्करो हास्तिमुख्या-
रूढः सिंहासनस्थो नरपतिररिहा दंडनेता गुणी च ॥

निष्प्राणःछिन्नमूर्धा क्षतकचरणयोर्बंधनस्थो विनिष्टो
राजा वेदानधीते स्वपतिसुचारितं संस्मरं धर्मकर्त्ता ४

अर्थ.—१ स्थानभ्रष्ट २ तपस्वी ३ परयुवतिरतः ४ तस्करः ५ हस्तिमुख्यारूढः ६ सिंहासनस्थः ७ नरपतिः ८ अरिहा ९ दंडनेता १० गुणी ११ निःप्राणः १२ भिन्नमूर्धा १३ क्षतकचरणाः १४ बंधनस्थः १५ विनिष्टः १६ वेदानधीते १७ स्वपतिसुचारितं संस्मरं १८ धर्मकर्त्ता.

सद्वंशो निधिसंगताश्रितनुलो व्याख्यापरःशत्रुहा
रोगी शत्रुजितः स्वदेशचलितो भृयो विनिष्टार्थकः ॥
आस्थानीच समंत्रकः परमहींहंताच भार्यागजं
त्रस्तःसंयुगभीतिमानतिभयो क्षीनश्च दातानिगः ॥९

अर्थ—सद्वंशः, निधिसंगतः, आश्रितनुलः, व्याख्यापरः, शत्रुहा, रोगी, शत्रुजितः, स्वदेशचलितः, भृयाविनिष्टार्थकः, आस्थानी, समत्रिकः, परमही, हता, भार्या, गजत्रस्तः, संयुगभीतिमान्, अतिभयं, क्षीनदाता, अनिगः

क्षुब्दाधासहितोन्नमत्ति विचरन्मांसाशनो स्वक्षतः
सोद्वाहो धृतकुंदको विहरति द्यूतैर्नृपो दुःखितः ।
शय्यास्थो रिपुसेवितश्च समुहृध्यापी वभार्यान्वितो
मिष्टाशीच पयः पिबन्सुकृतकृत्स्वस्थस्तथास्तेसुखं ॥ ६

अर्थ.—क्षुधा बाधा अन्नं आत्त विचरन् मांसाशनः अस्त्रक्षतः सोद्वाहः धृतकुंदकः विहरति द्यूतैः नृपः दुःखितः शय्यास्थः रिपुसेवितः ससुहृध्यापी भार्यान्वितः मिष्टाशी पयः पिबन् सुकृतकृत् स्वस्थः सुखं आस्ते

रव्यादीनां घटीकृत्वाष्टाशतविभाजिताः ॥
शेषं वन्हिहतं चैव खाभ्रश्रोत्रै र्विभाजिताः
लब्धस्य प्रमिताश्चैव अर्कावस्थाप्रकीर्तिताः ॥८

अर्थ.—सूर्यादि ग्रहांच्या घटिका करून ८०० नीं भागावें. बाकीस ३ नीं गुणावें त्यांस २०० नीं भागावें. भागाकारा इतक्या त्या ग्रहांच्या अवस्था होऊन पुढच्या अवस्थेंत तो ग्रह आहे असें जाणावें.

आत्मस्थानात्प्रवासो सहितनृपपदा सक्तथा प्राणहानि-
र्भूपालत्वं स्ववंशोचितगुणनिरतो रोगमास्थानगत्वं ॥
भीतिक्षुद्बाधितत्वं युवति परिणयोरम्यशय्यानुसक्ति
मिष्टाशीत्वं स्वगीता इतिभवनवशात्साद्भिरर्काद्यवस्थाः ॥

अर्थ.—आत्मस्थानः प्रवासः नृपपदात् सक्तथा प्राणहानिः भूपालत्वं स्ववंशोचितः गुणनिरतः रोगः आत्मस्थानगत्वं भीति क्षुधा बाधितः युवतिपरिणयः रम्य शैय्यानुरक्तिः मिष्टशीत्वं स्वगीत राशीवरून सूर्यादि ग्रहांच्या अवस्था जाणाव्या.

रव्यादीनां खेचराणांच कृत्वा
लिप्त्याभक्ता शून्यशून्यं गजैश्च ॥
हत्वाशिष्टा खेचरैः खाभ्रश्रोत्रै
लब्धं वेलाः ज्ञानिभिर्गार्ग्यमुख्यैः

अर्थ.—रव्यादि ग्रहांच्या कला करून ८०० नीं भागावें ९ नीं गुणावें. २०० नीं भागावें भागाकारात्मक वेला गर्गादिमुख्य ऋषींनीं सांगितल्या आहेत.

मूर्धामयो मुदिततापजनं सुखस्थो
नेत्रामयः सुखिततावनिभाविहारः ॥
उग्रश्च : कनकभूषणमश्रुमोहः
क्ष्वेलाशनं निधुवनं जठरस्य रोगः ॥ ११

अर्थ.—मूर्धामय मुदित तापजन सुखस्थ नेत्रामया सुखिन्

अवनिता विहारः उग्रज्वरः कनकभूषणं अश्रुमूहः क्ष्वेलाशनं निधुवनं जठरः रोगः

क्रीडाजले हसनि चित्रविलेखनंच
क्रोधश्च नृत्यंकरणं धृतिभुक्तिनिद्रे ॥
गानक्रियादशनरुक्कलहः प्रयाण-
मुन्मत्तताथसलिलाप्लवनं विरोधः ॥ १२

अर्थ.—क्रीडाजले हसन चित्रविलेखना क्रोधा नृत्य करण धृतः भुक्तिः निद्रा गानाक्रिया दशनरुक कलह प्रयाण उन्मत्तता सलिलाप्लवनं विरोधः

स्वेच्छास्थानं क्षुद्भयं शास्त्रलाभः स्वैरं गोष्ठी योधनं पुण्यकर्मा ॥
पापाचारः क्रूरकर्मा महर्षः प्राज्ञैरेताः सर्व वेळा प्रदिष्टा ॥ १३

अर्थ.—स्वेच्छास्थानं क्षुद्भयं शास्त्रलाभः स्वैरं गी योधन पुण्यकर्मा पापाचारः क्रूरकर्मा प्रहर्षः या शाहाण्या लोकांनीं वेळा समजाव्या.

बालाद्यवस्था क्रमशो ग्रहाणामोजे समे तद्विपरीतमाहुः ॥
बालःकुमारो थ युवाच वृद्धो मृतोलवानामृतुभिःक्रमेण ॥१४

एकैकावस्थायां द्वादशावस्थप्रभेदमाह

मूर्च्छा बालाशिशुर्हास्या कुमारी युवती नया ॥
क्लेशाव्योमज्वरा यात्रा मृतावस्था तु बालके ॥१५
स्वस्था शुभामोहिताच ल्हादाबुद्धिर्महोदयः ॥
शांतिर्दर्पामंदसौम्य कुमारे शांतमंगले ॥१६
उत्साहधैर्ये प्रभ्य बलाच मांगल्य योगाच सकामतुष्टा ॥
सुखाच सिद्धाच धनेश्वरीच शीतायुवाख्येकथिता द्यवस्था ॥१७
वैकल्यशोषाकथिताच मोघाच्युतेंद्रिया दुःखितरात्रिनिद्रा ॥
बुद्धिप्रभंगाच तपाच क्लिष्टा ज्वरामताद्वादशवृद्धि नाम्नी ॥१८

छिन्नाबंधारिपुघातकीच शेषामहज्वालनकष्टदाच ॥
प्राणांकिताभेदकरीच पापामृत्युक्षया द्वादशमृत्यु नाम्नी ॥१९
षष्ट्यवस्था भवेत्येवमवस्थः पंचके सदा ॥
तासु सर्वासु विज्ञेयं स्वनामसदृशं फलं ॥

या साठ अवस्थांचें फल नांवाप्रमाणें जाणावें.

बाला	कुमार	युवा	वृद्धा	मृता
मूर्च्छा	स्वस्थः	उत्साह	वैकल्य	छिन्ना
बाला	शुभः	धैर्यः	शेष	बंध
शिशु	मोहित	उग्रः	मोघ	रिपुघातक
हास्या	आल्हाद	भया	जितेंद्रिय	शोब
कुमारी	बुद्धि	बल	दुःखित	महा
युवति	महोदया	मांगल्य	रात्रि	ज्वालन
नृप	शांति	संकट	निद्रा	व्रणाकित
क्लेश	दर्प	तुष्ट	बुद्धिप्रभंगा	भेदकरी
वियोग	मद	सुख	तप	पाप
ज्वरा	सौम्य	सिद्धा	क्लिष्ट	मृत्यु
शांता	शांत	धनेश्वरी	ज्वर	क्षया
मृतः	मंगल	सीता	मृत	कष्टता

अद्भुतसागरे

अन्ये द्वादशभावाश्च ज्ञातव्यास्ते प्रयत्नतः ॥
ग्रहाणांच बलंबुध्वा फलं वक्ष्ये यथाक्रम ॥

अर्थ.—प्रत्येक भावस्थ ग्रहाच्या १२ अवस्था आहेत. त्यांचा क्रम बलावरून जाणावा.

शयनंचोपवेशंच नेत्रपाणि प्रकाशने ॥
गमनेच्छाच गमनं सभायां वसतिस्तथा ॥

अर्थ.—१ शयना २ उपवेशना ३ नेत्रपाणि ४ प्रकाशन ५ गमनेच्छा ६ गमनं ७ सभायां वसति ८ आगमन ९ भोजन १० नृत्यलिप्सा ११ कौतुक १२ निद्रा.

आगमो भोजनं चैव नृत्या लिप्साच कौतुकं ॥
निद्रा ग्रहाणांचेष्टाच कथिता पूर्वसूरिभिः ॥

अस्यार्थः प्रागेवप्रोक्त;—

यास्मिन्नृक्षे स्थितःखेटे तेन तं पारिपूरयेत् ॥
पुनरंशेनसंपूर्ण स्वनक्षत्रं नियोजयेत् ॥

अर्थ.—ज्या राशीस सूर्य असेल त्यानें ते भरावे. पुनः अंश मिळवून आपलें नक्षत्र मिळवावें.

यातदंड तथा लग्नमेकीकृत्य सदा बुधैः ॥
रविभिश्च हरेद्भागं शेषांकार्यनियोजयेत ॥

अर्थ.—यात दंडलग्न मिळवून १२ नीं भागावें. बाकी अवस्था जाणावी.

नाक्षत्रविधानेन पुनः पूरणमाचरेत् ॥
नामाक्षरेणसंयुक्त हर्तव्य रविणा ततः ॥

अर्थ.—नक्षत्र विधानेन पुनः मिळवावें. नामाक्षर मिळवून १२ नीं भागावें.

रवौ पंच तथा देयं चंद्रे द्व्याद्वयं तथा ॥
कुजे द्वयं च संयुक्तं बुधत्रयं नियोजयेत् ॥
गुरौ बाणप्रदेयांश्च त्रयंदद्याच्च भार्गवे ॥
शनौ त्रयो मथादेयं राहौ दद्याच्चतुष्टयं ॥
शेषं दृत्वं रामेण ग्रहणां त्रिविधंभवेत् ॥
दृष्टिचेष्टा विचेष्टाच कथिता मुनिपुंगवैः ॥

अर्थ.—रवि ५ चद्र २ मंगळ २ बुध ३ गुरु ५ शुक्र ३ शनि ३ व राहू ४ या प्रमाणें मिळवून बाकीला ३ नीं भागावें लागजे तीन प्रकारच्या अवस्था येतात त्या अशा—दृष्टि, चेष्टा व विचेष्टा.

दृष्टौ स्वल्पफलं ज्ञेयं चेष्टायां विपुलं फलं ॥
विचेष्टायां फलं न स्यादेवं दृष्टिफलं विदुः ॥

अर्थ.—दृष्टीचें फल थोडें. चेष्टेचें फल विपुल व विचेष्टेचें फल नाहीं.

याप्रमाणें आहे. छापून प्रसिद्ध करावें व तुमचा अभिप्राय द्यावा. कळावें लोभ असावा हे वि०— **गुरुनाथ महादेव दीक्षित**

पत्रव्यवहार.

१

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस

कृ. सा. न. वि. वि.— आपले विज्ञानाच्या सन १९०९ चे तिसरे अंकांत रा० विश्वेश्वर गणेश हेगडे वकील मु० शिरसी यांनीं जन्मकालाचा गर्भकालाशीं संबंध या विषयाचे विवेचनांत आपले पत्रांत गर्भधारणेपासून प्रसूतिकालास २७९ दिवस लागतात असें पूर्वी आपण पु० ७ अं. २३ मध्यें लिहिलें असल्याबद्दल चुकी ठरविली आहे, ती चुकी नसून सौरमानाप्रमाणें २७० दिवसाच्या त्रैराशिकानें चांद्रमानाच्या २७९ तिथी येऊं शकतील आणि ग्रहही मिळतील. मात्र त्यांनीं दिवस या शब्दाचे जागीं 'चांद्रतिथि' या शब्दाचा उपयोग केला पाहिजे. कारण, आधानापासून जन्मकालास प्रसूत होणारे बाईची प्रकृति शुद्ध व निर्विकार असल्यास सौरमानाचे २७० दिवस लागतात व त्या प्रमाणें ती तेच दिवशीं प्रसूतही होते. हा मला बरेच वेळ अनुभव असून या बाबतींत वैद्यक व ज्योतिष शास्त्रांत पुरावाही सांपडतो, तो खालीं लिहिल्याप्रमाणें आपल्या पुस्तकांत प्रसिद्ध होईल अशा हेतूनें पाठविला आहे.

आधानकालाचा मुख्य दिवस ज्योतिषाप्रमाणें—

कुजेन्दु हेतु प्रतिमासमार्तवं गतेतु पीडर्क्ष मनुष्यदीधितौ ॥
अतोन्यथास्ते शुभपुंग्रहेस्थिते नरेणसंयोगमुपैतिकामिनी ॥ १

—बृ० जा.—

या वचनाचा विचार करितां स्त्रीच्या जन्मराशीपासून अनुपचय स्थानीं चंद्र मंगळदृष्ट असून तीच राशि पुरुषास उपचय स्थानीं असेल आणि शुभग्रहदृष्ट असेल तर संयोग झाल्यास पुत्रगर्भधारणा

होईल. असेंच स्त्रीग्रहदृष्ट असेल किंवा नपुंसकग्रहदृष्ट असेल तर कन्यागर्भ राहील. हें समजुतीस येण्याकरितां एका गृहस्थाच्या मुलांसह कुंडल्या दिल्या आहेत. या निरयन असून खास उदेपूरचे पलभेप्रमाणें तयार झालेल्या आहेत.

बापाची कुंडली—फा. कृ. ६ संवत् १९१९ घ. ३१।९



पत्नीची कुंडली उपलब्ध नाहीं. फक्त नांवावरून मिथुन राशि येते. कारण या देशांत नक्षत्रचरणाक्षरानें ठेवण्याचा सर्वत्र प्रसार आहे.

मुलगा—पौ. शु. २ संवत् १९६३ ता. १६ डिसेंबर

इ. घ. १३–२७



आतां जन्मकालाचे मागें २७० दिवस मोजल्यानें ता. २१ मार्च्य संवत् १९६२ या दिवशीं आधानकाल येतो. या दिवशीं अनुमानानें वरील वचनास अनुसरून संयोग होउन आधान झाल्याचें लग्न निघतें तें—

इ. घ. ४०–३० फा. व. १२ बुध



या वरून पहा कीं स्त्रीराशीपासून चंद्रमा अनुपचय राशींत व पुरुषाचे राशीपासून उपचय राशींत मंगळ व गुरूदृष्ट असल्यानें मुलगा उत्पन्न झाला.

मुलगी.—का. व. १२ संवत् १९९९ इ. घ. ५१–३०

ता. २६ नवंबर.



या जन्मकालाचे मागें २७० दिवस मोजून फेब्रूवारी ता० ८ संवत् १९५८ माघ व० ३० येतं. सबब अनुमानानें लग्न येतें तें.—

इ. घ. ४४–१९

येथें बुधाची दृष्टी असल्यामुळें कन्यागर्भ राहिला. याच प्रमाणें कदाचित् रव्यादि पापग्रहदृष्ट असतां कांहीं विकार होऊन गर्भपातही झाला असता असें ठरतें.

आतां वैद्यकांतील २७० दिवसांबद्दल पुरावा असा मिळतो—

नवमदशमैकादशद्वादशाना मन्यतमस्मिञ्जायते अतोऽन्यथा विकारो भवति ॥ सु. शा. अ. ३

नवमे मासि सूतिकागारमेनां प्रवेशयेत प्रशस्ततिथ्यादौ ॥ सु. शा. अ. १० वा.

प्राक्चैव नवमान्मासात्सूतिकागृहमाश्रयेत् ॥
देशे प्रशस्ते संभारैः संपन्नं साधकेहनि ॥ ७३

वा. भ. शा. अ. १ ला.

आतां जर वाग्भट नवममास लागण्याचे पूर्वीच स्त्रीनें सूतिकागृहाचा आश्रय करण्याबद्दल लिहित आहेत व सुश्रुतही असेंच नववे महिन्यांत बाळंतीण होणारे बाईनें सूतिकागारांत प्रवेश करावा असें अनुमोदन देत आहेत तर सौरमानाचे २७० वे दिवसाचे समाप्तीस प्रसूतिकाल ठरत नाहीं काय? याहून जास्त दिवस लागल्यास सुश्रुतवचनाप्रमाणें विकार ठरेल. यास्तव या पुढें सर्वत्र शुभेच्छु देशबांधवांनीं निदान द्विजातींनीं तरी किंवा किमानपक्ष ब्राह्मणांनीं विषेक व प्रसवाचे दिवसाचा आणखी सूक्ष्मतेनें विचार करून अनुभव घेण्याकरितां कंबर बांधिल्यास या प्रकरणाचा ऊहापोह होऊन मुख्य तत्व सांपडेल व केवळ दैवावर भार न घालतां उत्तम संततीचा लाभही घेण्यास सांपडेल. पत्रविस्ताराची क्षमा असावी हे विनंति

आपला—एक वाचक.

जीवनराव चिटणीस यांचे लेख.

रा. ब. नारायण तिंबक वैद्य आणि रा. वासुदेव नारायण कटकर व्यवस्थापक पंचांगशोधनमंडळ मुंबई.....यांस

वि. वि.—आपणाकडून जा. नं. ६३५ खालीं तीन पत्रें ता. १३ अकटंबर रोजीं पाठविण्यांत आलीं तीं पोंचलीं. आपणास पंचांगासंबधानें माहिती ता. १ अकटंबर रोजीं पाहिजे पण आपलीं पत्रें ता. ११ रोजीं पावलीं यावरून आपली मुदत ता. ४ डिसेंबर १९०४ पर्यंत वाढलेली दिसते.

पंचांगशोधन—आपले मथळ्याचे शब्दावरून सायननिरयन पंचांगाचें शोधन असा अर्थ असावा असें दिसतें. सायन पंचांग हें धर्मकर्मे करण्यास उक्त आहे असा अभिप्राय द्वारका—मठाचे स्वामी यांनीं शके १८१४ सालीं बार अंक २२९ मध्यें दर्शित केला आहे. त्या आज्ञापत्राची प्रत भा. ज्यो. इ. चें पृष्ठ ४०८–४०९ मध्यें छापलेली आहे तीवरून आपणांस पंचांगशोधनाची जरूर दिसत नाहीं. द्वारका—मठाचे स्वामी माधवस्वामी यांनीं ती आज्ञा रद्द करण्याचें कारणही दिलें नाहीं. पंचांगशोधन—मंडळीनें ज्योतिषी लोकांची मुंबई मुक्कामीं जाहीर सभा भरवून सायनपंचांगाविरुद्ध पुरावा आणला नाहीं पुणें येथील केसरीकारांनीं "अभिनवशंकराचार्य" आणि सायन का निरयन या मथळ्या खालीं कांहीं लेख लिहिले आहेत, त्यांचा परिणाम स्वामींवर होऊन चळवळे व्यक्तींस मान देण्याकरितां पंचांगशोधन हा विषय हातीं घेतलेला दिसतो. या पेकीं कोणतेही खरें असो वा नसो, सायनपंचांग, ग्रहलाघवी सर्व पंचागें, पटवर्धनी अथवा केरोपंती पंचांग, केतकी पंचांग व इतर चालू असलेलीं सर्व पंचांगें वेदबाह्य असून आर्य लोकांस त्यांची जरूरी आहे असें मानण्यास धर्मशास्त्रांचा आधार नाहीं. पंचांग असणें ही रूढी आहे. पंचांगांतील जीं पांच अंगें म्हणजे १ वार, २ तिथि, ३ नक्षत्र,

४ करण व ५ योग यांची माहिती वेदांत नाहीं. वार शब्द वेदांत व महाभारतांतही नाहीं. वारांची माहिती क्याल्डी लोकांपासून मिळाली आहे. वेदांत सूर्य व चंद्र यांत १२ अंशांचें अंतर पडलें ह्मणजे एक तिथि होते असें मानण्यास स्पष्ट वाक्य किंवा आधार नाहीं. वेदांत नक्षत्रें २७ आहेत तशींच २८ आहेत व २७ उपनक्षत्रेंही आहेत. जैन लोक ९४ नक्षत्रें मानतात! वेदांतील २८ नक्षत्रें कोणत्याच पंचांगांत नाहींत वेदांत अमुक नक्षत्रीं अमुक ग्रह आला ह्मणजे अमुक धर्मकृत्य करावें असें वर्णन नाहीं. वेदांतील सात ग्रह निर-निराळ्य नक्षत्रीं आले असतांना अमुक कर्म करावें अथवा न करावें असें वेद सांगत नाहीं. वेदांत उपास करण्यास आधार नाहीं. करण आणि योग यांत आढळणारीं नांवें वेदांत नाहींत करण आणि योगाचें गणित ब्रह्मगुप्तकालीं ह्मणजे शालिवाह शके ४२० चे सुमारास नव्हतें. ह्मणून कोणतेंही पंचांग वेदांस अनुसरून नाहीं. पंचांगाचें बाह्यांग येणें प्रमाणें आहे, तसेंच अंतरंगही आहे. आर्य लोकांस आर्य धर्माची जरूरी आहे. आर्यधर्मग्रंथ व आर्य आचार्य हे आर्य लोकांस प्रीय होतील, त्याप्रमाणें आनार्य आचार्य व अनार्य धर्मग्रंथ यांतून जें चांगलें दिसतें तेंही ग्रहण करण्यास आपले मंड-ळाची हरकत नसेल ह्मणून पंचांगविषयांत एतिहासिक, पौराणिक व व वैदिक माहिती देतांना अनार्य लोकांचीं वर्णनें व त्यांचें महत्व आर्य पंचांगांत दिसतें तें ठेवणें इष्ट किंवा अनिष्ट आहे या संबंधाचें ऐतिहासिक बाजू दिली आहे तिचा विचार व्हावा.

पंचांगविषय सार्वजनिक आहे ह्मणून त्याचा विचार सर्व बाजूंनीं होणें जरुरीचें आहे ह्मणून मंडळीचे सूचने प्रमाणें मीं आपलें मत देत आहें त्याचा विचार व्हावा. यांत दोष दाखविणाराचा मीं अत्यंत आभारी होईन

२

पंचांगांतील कांहीं चुका.

सायन निरयन पंचांगांतीलें कलियुगारंभावरून जें गतवर्ष सर्व पंचांगांत देतात तें पौराणिक व ऐतिहासिक युगास अनुसरून नाहीं. यास आधारण.—

(१) यूरोपीय ज्योतिर्विद मिस्टर बेन्टली याचें मतें कलियुगा-रंभ इसवी सनापूर्वी ९४० या वर्षी फेब्रूवारी महिन्याचे ८ वे तारखेस ह्मणजे माघ शु० १५ रोजीं कलियुगारंभ झाला आहे. (बेन्टले पुस्तक पृ० ७६)

(२) आश्लेषार्धादक्षिणमुत्तरमयनं रवेर्धनिष्ठाद्यं ।
नूनं कदाचिदासीद्येनोक्तं पूर्वशास्त्रेषु ॥ १ ॥
बृ. सं. आदित्यचार.

वरील प्रमाणावरून वसंतसंपात भरणींत, दक्षिणायन आश्लेषा नक्षत्रावर आणि उत्तरायण धनिष्ठा नक्षत्रीं दिसतें. या वेळीं पूर्व शास्त्र रचणारे गर्गादि ऋषि होते.

(३) श्रविष्ठाद्यात्पौष्ण्यार्धं चरतः शिशिरोवसंतः
बृ. सं. ३–१ भट्टोत्पलटीका.

यावरून उत्तरायण धनिष्ठा नक्षत्रीं असतांना शिशिर ऋतु व संपात भरणींत असतांना वसंत होता असें दिसतें. धनिष्ठारंभीं उदगयन इसवी सनापूर्वी १४०० वर्षे या काळाचे सुमारास होता. (भा. ज्यो. पृ. १११) बेन्टलेचे मतें इ० स० पूर्वी १४२६ या काळीं होतें. (बेन्टले पृ. ३)

(४) श्रवणादीनि ऋक्षाणि ऋतवः शिशिरादयः
आदिपर्व अ. ४४

इ० स० पूर्वी ४९० चे सुमारास उदगयन श्रवणारंभीं होतें. गर्गमतें श्रवणारंभ २८० अं० ४१ क० त होतें. येथें उदगयन

धरिलें ह्मणजे वसंतसंपात अश्विनीचे १० अंशांत येतो. २८० अं० +९० अं० = ३७० अंश यांत ३६० अं० ऋण करितां बाकी १० अं० राहतात. श्रवणांचा शेवट २९३ अं० २० क० त होतो. ह्मणून नक्षत्राचे शेवटीं उदगयन घेतलें तर १३ अंश मागें जावें लागेल, मध्यवर्ती घेतलें तर ७ अं० मागें जावें लागेल, ह्मणजे संपात भरणींचे शेवटीं येईल. गर्गमतें अश्विनी नक्षत्राचा शर १३ अंश २० कला व भरणीचा ६ आहे. शालिवाहन शके ४४४ चे सुमारास अयनांश शून्य होते. संपातास १ अंश जाण्यास ७२ वर्षें लागतात. म्हणून २० अंश ×७२=१४४० वर्षे येतात. यांत ४४४ ऋण करितां शालिवाहनशकापूर्वी एक हजार वर्षांहून मागील काळ पराशर व गर्ग यांचा येत नाहीं असें त्यांचे ग्रंथांतील प्रमाणावरून दिसतें.

(५) गर्ग व पाराशर यांचे ग्रंथांत वेदांगपद्धतीचा उल्लेख आहे. वेदांगज्योतिषकाळीं संपात भरणींत होता. वेदांगाचा काल इ. स. पूर्वी १४१० आहे. (भा. ज्यो पृ. ८८) प्रो. व्हिटने याचे मतें १३३८ हा आहे. सोमाकरानें गर्गाचीं वचनें दिलीं आहेत तीं भा. ज्यो. इ. पृ. ७५ मध्यें आहेत.

(६) **यदा निवर्ततेऽप्रातःधनिष्ठामुत्तरायणे ॥**
आश्लेषां दक्षिणेऽप्राप्तस्तदा विंद्यान्महद्भयं ॥
गर्ग

यावरून अयनें आश्लेषा व धनिष्ठांवरून बदललेलीं दिसतात व त्या काळीं गर्ग होता असें त्याचेच वचनावरून दिसतें. ह्मणून हा काळ धनिष्ठा व श्रवण यांमधील होय. ह्मणून गर्गाचा काळ इ. स. पूर्वी ४५०–४०० हा येतो.

(७) पराशर ह्मणतो कीं, अगस्ती हस्त नक्षत्रीं उदय पावतो व रोहिणींत सूर्य आला ह्मणजे अस्तास जातो. यावरून पराशरानें अगस्तीचा उदय वेधावरून घेतलेला दिसतो व हें वर्ष इ. पूर्वी ९७९ येतें. [बेन्टली पृ० ६७–७१]

(८) आग्रहायण वर्षारंभींचे ग्रह गर्गानें आपले संहितेंत दिले आहेत. हे ग्रह इ. स. पूर्वी ५४८ या वर्षींचे तारिख २९ अकटंबरचे आहेत ते येणें प्रमाणें—

सूर्य–अनुराधा. चंद्र–पुष्य. बुध–शतभिषक्.
मंगळ–मूळ. शुक्र–कृत्तिका.

(९) धर्मराजानें द्वापारांत ७६ वर्षें राज्य केलें. कलियुगारंभ इ. स. पूर्वी ५४० या वर्षी सुरू झाला व त्या पूर्वी ७६ वर्षें धर्मानें राज्य केलें ह्मणून धर्माचा काल इ. स. पूर्वी ६१६ हा येतो. किंवा धर्मजन्म इ. स पूर्वी ६३६ या मागील नाहीं.

(श्री शिवदिग्विजय पृ ५ बडोदें)

(१०) कलि युगारंभ इ. स. पूर्वी ५४० या वर्षी झाला आहे. त्या वेळीं धर्मराज शकाचीं ७६ वर्षें झालीं ह्मणून धर्मराजशक ५४०+७६=६१६ [सनापूर्वी] हा येतो. इ. स. पूर्वी ६१६ या वर्षांत चालू १९०४ मिळवितां बेरीज २५२० ही येते. पंचांगांतील कलिवर्ष ५००५ आहे. यांत २५२० संख्या उणी करितां बाकी २४८५ वर्षें राहतात. या काळांत वराहमिहिरानें जो काल २५२६ दिला आहे त्यांत ४१ वर्षांचें अंतर पडतें. ह्मणून युधिष्ठिर शक जन्मकालापासून धरलेला दिसतो.

आसन्मघासु मुनयः शासति पृथ्वीं युधिष्ठिरे नृपतौ ॥
षट्द्विक् पंचद्वि (२५२६) युतः शककालस्तस्य राज्ञस्य ॥

(११) पंचांगांत दिलेला कलियुगारंभकाल कल्पित आहे

ता. १७ फेब्रुवारी इ. स. पूर्वीचे ग्रह

कलियुगारंभींचे ग्रह.

	वेन्टली मतें.	स्पष्ट सायन यूरोपिय.	सूर्यसिद्धांत	बेली-मतें.
	अं. क. वि.	अं. क. वि.	अं. क. वि.	अं. क. वि.
रवि	३०१—४५—४३	३०३-३५-४२	२—७—२७	३०१—५—५७
चंद्र	३०८—३—५०	३१२-१५-३०	५—२-४५	३००-५१-१६
चंद्रोच्च	४४—५६—४२	. . .	९० . . .	६१-१३-३३
राहू	१४८—२—१६	१४७-५३-३४	१८० . . ०	१४४-३७-४१
बुध	२६८—३४—५५	२८८—३-५४	३५८—७-२२	२६१-१४-२१
शुक्र	३३४—३६—३०	३१६-१२—६	०-५२-१२	३३४-२२-१८
मंगळ	२८९—४८—५५	३००-३४-१८	५-४२-३०	२८८-५५-५६
गुरु	३१८—१६—७	३१७-४५-५७	०-४२—०	३१०-२२-१०
शनि	२८१—३६—१८	२७८—०-१८	२५३-२४-५७	२९३—८-२१

यूरोपियन ग्रह सायन आहेत. सूर्यसिद्धांतांतील निरयन आहेत. सायन ग्रहांत रवि आणि दुसरा कोणताही ग्रह यांचें जें अंतर तें सूर्यसिद्धांतील रवि आणि तो ग्रह यांचें जें अंतर त्याहून जितकें कमीजास्त असेल तितकी हिंदुग्रंथांतील चुकी होय. व्हिटनेच्या ग्रहांत सूर्याचे मागें सुमारें ३३ अंश बुध आहे. शुक्र ३२ अंश पुढें आहे, या मध्यम ग्रहांतील चुका होत. आकाशांत ग्रह मध्यम भोगानें दिसत नाहींत, ते स्पष्ट भोगानें पाहिजेत. यूरोपियन ग्रहांत रवि आणि ग्रह यांचें फार अंतर झटलें तर शनि २५ अंश सूर्याचे मागें आहे गुरु १४ अंश पुढें आहे. सूर्यसिद्धांताप्रमाणें सर्व ग्रह सूर्याजवळ ९ अंशांच्या आंत आहेत. सू. सि. प्रमाणें सर्व ग्रह अस्तंगत येतात. आणि गुरुवारीं अमावास्येस सूर्यग्रहण येतें. यूरोपियन गणितानें मंगळ मात्र अस्तंगत येतो. व्हिटनेचा राहू १९ अंश कमी धरला तर सूर्यग्रहण येतें. आणि बुध १० अंश जास्त शुक्र ९ अंश कमी गुरु ४ अंश कमी आणि शनि ११ अंश जास्त धरून गणित केलें असतां स्प. ग्र. असे येतात व ते अस्तंगत येतात.—

रवि—३०३अं. ३९क. ४२वि. बुध—२९०अं. ४०क. ६वि.
शुक्र—३१२अं. २८क. ४८वि. गुरु—३१४अं. ६क. ३६वि.
शनि—२८८अं. १७क. ३०वि.

वरील ग्रहाप्रमाणें बेलीचे ग्रह पाहिले तर ग्रहांचीं अंतरें कळतील.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।
कालोह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी॥

'भवभूति'

पुस्तक ९ वें.] वै. कृ० ६, मंगळवार. [अंक १० वा

वर्षंतु पर्जन्याः

सर्व निरयन पंचांगांत आर्द्राप्रवेशफल दिलें असतें, त्यावरून सूर्यानें आर्द्रा नक्षत्रांत प्रवेश केला ह्मणजे पर्जन्यकाल प्राप्त झाला असें समजलें पाहिजे. ह्मणून सूर्य या नक्षत्रांत ज्या वेळीं प्रवेश करितो त्या वेळच्या बऱ्या वाईट स्थितीवरून पुढील पावसाचें अनुमान करावयाचें अशी फार प्राचीन कालापासून चाल आहे. आर्द्रा हें नांव सुद्धां याच अर्थाचें द्योतक आहे. हें नांव आकृतीवरून पडलेलें नाहीं हें कोणीही निःपक्षवादी कबूल करील. यालाच रौद्र असेंही दुसरें एक नांव आहे. पर्जन्यारंभीं वादळें, विजांचा लखलखाट व मेघांचा गडगडाट हीं लक्षणें मनुष्यास भयभीत करून रडवणारीं आहेत ह्मणूनच रौद्र हें नांव त्यास प्राप्त झालें असावें. या सर्व गोष्टी विचारांत घेतल्यास आर्द्रा हें नक्षत्र निरयन आहे असें वितंडवादी पुरुषावांचून कोणीही प्रतिपादन करणार नाहीं. निरयनवादी

[केतकरादि] असें ह्मणतात कीं ज्या विभागांत तारात्मक नक्षत्र असेल त्या प्रदेशाला आह्मी अश्विनी, भरणी इ० नांवें देत असतों. पण आपण पहाल तर आर्द्राविभागाच्या आर्द्रानक्षत्र मार्गेंच आहे! आर्द्राविभागात्मक प्रदेशांत आर्द्रानक्षत्रपुंज नाहीं. अर्थात् नक्षत्र पुंजांस महत्व नसून नक्षत्रविभागांसच महत्व आहे असें सिद्ध होतें हा विभागात्मक प्रदेश सायन ध्यावा कीं निरयन ध्यावा हा उभय पक्षांत मुख्य वाद आहे. जर निरयन घेणें असेल तर पर्जन्यारंभाचें नक्षत्र सदा सार्वकाल एकच असणें शक्य नाहीं. आज पर्जन्यारंभ आर्द्रांत नसून रोहिणींत आहे. ह्मणून निरयनाच्या हटवाद्यांनीं आपल्या पंचांगांत आज वास्तविक रोहिणीप्रवेशफल दिलें पाहिजे होतें. केतकरांनींही आपल्या पंचांगांत आर्द्राप्रवेशफल दिलें आहे! सत्यासाठीं धडपडणाऱ्या विद्वानांची ही दुसरी चूक आहे! असो. आर्द्राप्रवेशफळ जर पंचांगांत; यावच्चंद्रदिवाकरौ ठेवणें असेल तर तें सायन आर्द्रा नक्षत्रास अनुसरूनच असलें पाहिजे. ह्मणून आज आह्मी दरसालप्रमाणेंच या नक्षत्रावरून पावसाचें अनुमान करीत आहों.

आर्द्रा नक्षत्रापासून दहा नक्षत्रें स्त्रीसंज्ञक अर्थात् पर्जन्याचीं आहेत, ह्मणून या पुढें हीं नक्षत्रें केव्हां निघतात व त्यांचा पाऊस कसा काय पडेल याचें विवेच केलें आहे. या श्लोकावरूनही नक्षत्रें सायनच घेतलीं पाहिजेत असें सिद्ध होत आहे. ज्यो. केतकर यांचें या गोष्टीकडे लक्ष जाईल काय? व ते आपल्या पंचांगांत आर्द्रा प्रवेशफल कां देत असतात यांचें कारण दाखवितील काय?

सायन नक्षत्रें

१ आर्द्रा.—हें ता. २८ मे शुक्रवार ज्येष्ठ शु० ९ रात्रीं ९ वाजून १० मिनिटांनी निघतें. हें नक्षत्र अर्धें ह्मालयानंतर बरसात सुरू होईल. ही छोटी बरसात होय.

२ पुनर्वसु.—हें ता० ११ जून शुक्रवार ज्येष्ठ कृ० ८ रात्रीं ७ वाजून ३२ मिनीटांनीं निघतें. या नक्षत्रांत खरी बरसात सुरू होईल. या नक्षत्राचा पाऊस पुष्कळ पडेल व नद्यानाले भरून जातील.

३ पुष्य.—हें ता. २९ जून शुक्रवार आषाढ शु० ७ रात्रीं ७ वाजून ७ मि. निघतें. याही नक्षत्राचा पाऊस बरा पडेल.

४ आश्लेषा.—हें ता. ९ जुलई शुक्रवार आषाढ कृ० ६ रात्रीं ६ वाजून ४२ मि. नीं निघतें पाऊस चांगला पडेल.

५ मघा.—हें ता० २३ जुलई शुक्रवार अ. श्रावण शु० ६ सायंकाळीं ५ वाजून ५३ मिनिटांनीं निघतें. या नक्षत्राचा पाऊस पुष्कळच पडेल

६ पूर्वा.—हें ता० ६ आगष्ट शुक्रवार अ० श्रावण कृ० ५ सायंकाळीं ४ वाजून १५ मिनिटांनीं निघतें. या नक्षत्राचा पाऊस बराच कमी पडेल.

७ उत्तरा.—हें ता० २० आगष्ट शुक्रवार श्रावण शुद्ध ४ दिवसास १ वाजून १२ मिनिटांनीं निघतें. याचाही पाऊस कमीच पडेल.

८ हस्त.—हें ता० ३ सपटंबर शुक्रवार श्रावण कृ० ४ सकाळीं ९ वाजून ६ मि० नीं निघतें. या नक्षत्राचा पाऊस आरंभीं पडेल.

९ चित्रा.—हें ता० १७ सपटंबर गुरुवार भाद्रपद शु० २ रात्रीं १ वाजून २० मि० नीं निघतें. याचाही आरंभीं थोडाबहुत पडेल.

१० स्वाती.—हें ता० ३० सपटंबर गुरुवार भाद्रपद कृ० १ सायंकाळीं ४ वाजून ९३ मिनिटांनीं निघतें. याचा आरंभीं पाऊस बरा पडेल.

या वर्षी पावसाचें मान आमच्या मतें बरें आहे गुदस्त साला-पेक्षां किंचित् कमी पाऊस पडेल असें वाटतें. पाऊस कसाही पडो, पिकें मात्र सुरक्षित हातीं येतील असें म्हणवत नाहीं. जुलई नंतर रोगराई वाढेल व दुष्काळाचीं चिन्हें दिसूं लागतील, ईश्वरीसूत्र काय असेल तें खरें!

कै० जीवनराव चिटणीस यांचे लेख.

[अंक ८ वरून पुढें चालू.]

हिंदु सिद्धांतकारांचे मतें कलियुगारंभीं ग्रह मेषारंभीं होते व त्यास अनुसरून ग्रहांचीं मंदोचें आणि पात दिले आहेत.—

सूर्यसिद्धांत मतें.

	मंदोच्च.				पात.			
	फेरे	रा. अं.	क.	वि.	फेरे	रा. अं.	क.	वि.
र.	१७५	२–१७—	७–	४८	बु. २२१	०–२०–	५२–	४८
बु.	१६६	७–१०–	१९–	१२	शु. ४०९	२—०—	१–	४८
शु.	२४२	२–१९–	३०—	०	मं. ९७	१–१०—	८–	२४
मं.	९२	४—९–	१७–	३६	गु. ७९	२–१९–	४४–	२४
गु.	४०७	५–२१—	०—	०	श. ३००	३–१०–	३७–	१२
श.	१७	७–२६–	३६–	३६	० ०	० ०	०	०

सिद्धांतशिरोमणि मतें.

	मंदोच्च.				पात			
	फेरे	रा. अं.	क.	वि.	फेरे	रा. अं.	क.	वि.
र.	२१९	२–१७–	४५–	३६	बु. २३८	०–२१–	२०–	५३
बु.	१५१	७–१४–	४७—	२	शु. ४०८	२—०—	५—	२
शु.	२९८	२–२१—	२–	१०	मं. १२२	०–२१—	५–	४६
मं.	१३३	४—८–	१८–	१४	गु. २९	२–२२—	२–	३८
गु.	३७	५–२२–	१५–	३६	श. २६०	३–१३–	२३–	३१
श.	१८	८–२०–	५३·	३१	० ०	० ०	०	०

आर्यसि० मतें.

	मंदोच्च				पात.			
	फेरे	रा. अं.	क.	वि.	फेरे	रा. अं.	क.	वि.
र.	२१०	२–१७–	४५–	३६	बु. २३९	०–२०—	९–	३६
बु.	१५४	७—०–	१४–	२४	शु. ४३२	२—०–	२८–	४८
शु.	३००	०–१७–	१६–	४८	मं. १३६	१–१०–	१९–	१२
मं.	१३६	४—३–	५०–	२४	बु. ४४	२–२०–	३८–	२४
गु.	३७८	५–२२–	४८—	०	श. २८३	३–१०–	४८—	०
श.	१६	४–२९–	४५–	३६	० ०	० ०	०	०

पराशरसि० मतें.

	मंदोच्च.			पात		
	फेरे	रा. अं. क. वि.		फेरे	रा. अं. क. वि.
र.	२१९	२–१७–४५–३६	बु.	२९६	०–२१—१–२६
बु.	१६२	७—०–४०–१९	शु.	४०८	२—०—५—२
शु.	२४०	२–२०–४२–४३	मं.	११२	१—९—३–३६
मं.	१४२	४—२–४३–२६	गु.	८७	२–२१–४३–१२
गु.	४४८	५–२२–३५–२४	श.	२८८	३–१०–२६–२४
श.	२४	७–२८–१४–५२	०	०	० ० ० ०

भा. ज्यो. पृ० २०४ मध्यें कलियुगारंभींचे ग्रहांचीं मंदोचें आणि पात यांचें गणित दिलें आहे. त्यांत फेरे दिले नाहींत ह्मणून ते या ठिकाणीं दिले आहेत. वरील मंदोचें आणि पात यांवरून सर्व सिद्धांतकारांची समजूत त्यांनीं कल्पित मानलेला जो कलियुगारंभ त्या काळीं सर्व ग्रह [मंदोचें पात खेरीज] मेषांत होते अशी दिसते.

सारांश, कलियुगारंभीं आमच्या ग्रंथांप्रमाणें सर्व ग्रह एकत्र होते असें आहे, त्याप्रमाणें ग्रह येत नाहींत. कदाचित् सर्व ग्रह अस्तंगत असतील, परंतु तसेंही वर्णन महाभारतांत नाहीं. कलियुगानंतर सूर्यसिद्धांतादिग्रंथ होत पर्यंत निदान २६०० वर्षें गेलीं. त्या ग्रंथांच्या पूर्वी युगपद्धति मनुस्मृतींत सांगितल्याप्रमाणें होती. परंतु त्यांतही कलियुग अमुक वेळीं लागलें असें ठरलेलें दिसत नाहीं. वेद वेदांगावरून कलियुगारंभकाल दिसत नाहीं. ह्मणून कलियुगारंभकाल जो सांप्रतचे सिद्धांतकार मानतात तो कल्पित आहे. तो काळ मानण्याची प्रवृत्ति इ० स० चे ५३८ वे वर्षीं झालेली दिसते. मिस्टर बेन्टले यांनीं सूर्यसिद्धांताच्या ग्रहांत व इसवी सन ५३८ वे वर्षीच्या ग्रहांत ज्या चुका दाखविल्या आहेत त्या.—

ग्रह	मध्यम ग्रह बेन्टले	अयनांश	सूर्यसिद्धांत
	रा. अं. क. वि.	रा. अं. क. वि.	रा. अं. क. वि.
र.	१०–१–१५-४८	१-२८-४४-१२	०—०—०—०
चं.	१०–४–२४-३६	१-२८-४४-१२	०—३—८—०
बु.	८-२८-३६-४९	,,	१०-२७-२१-०
शु.	११–४—८–३९	,,	१–२–५२-०
मं.	९-१९–३–११	,,	११-१७-४७-०
गु.	१०-१८–५–९	,,	०-१६-४९-०
श.	९-१०–२–२८	,,	११–८–४६-०

सूर्यसिद्धांतमतें रवि हा मेष राशीचे आरंभीं आहे. चंद्र मेषेंत ३ अंश ८ कला आहे. बुध कुंभेचा २७ अंश आहे. शुक्र वृषभेचा २ अं० आहे. मंगळ मीनेचा १७ अंश आहे. गुरु मेष राशीचा १६ अं. आहे. शनि मीनेचा ८ अं. आहे. यावरून जी चूक दिसते ती.—

	अं. क. वि.	
रवि.	०—०—०	
चंद्र	३–८–४८	कमी
बुध.	३२-३८-५९	जास्त
शुक्र	३२-५२-५१	कमी
मंग.	१२-१३-३७	जास्त
गुरु.	१६-४९-२१	कमी
शनि	२१-१३-२०	जास्त

इवली येथील शिलालेख [वि. वि. पु. १९ अं. २ वरून]

१३ त्रिंशत्सु त्रिसहस्रेषु भारतादाहवादितः ॥ सप्ताब्दशतयुक्तेषु गतेष्वब्देषु पंचसु (३३) पंचाशत्सु कलौ काले षट्सु पंच-

शतेषुच ॥ समासु समतीतासु शकानामापि भूभुजाम् (३४)

वरील श्लोकावरून भारतकालापासून ३०३२ या वर्षी गतकली ११२ आणि शकराजवर्ष ५५६ असा बोध होतो.

कलियुगारंभ इ० स० पूर्वी ५४० या वर्षी सुरू झाला आहे, हें मागें दाखविलें आहे. इ० स० पूर्वी ५४० यांत ११२ ऋण केले ह्मणजे ४२८ या वर्षी कलीचीं ११२ वर्षें झालीं असतांना शकराज शकाचीं ५५६ वर्षें झालीं. शकांचें राज्य अयोध्याप्रांताजवळ शाक्य प्रांतांत होतें. हा ३० मैल लांबीचा एक प्रदेश आहे. शकांचें राज्य गौतमबुद्धाचा आश्रयदाता जो पासेनदी यानें घेतलें आहे. इतिहासकार याचा काळ सुमारें ३७० हा इ० स. पूर्वीचा देतात. गौतमबुद्धाचा मृत्यु इ० स० ४७० हा आहे. तेव्हां इ. स. पूर्वी ४२८ चे सुमारास इक्ष्वाकी येथील शिलालेखान्वयें खालील आंकडे येतात—

इ० सन पूर्वी	भारतकाल	गतकली	शाक्यराजशक
४२८		११२	५५६

पासेनदी हा बुद्धाचा आश्रयदाता आहे. व शाक्यराज शकाचीं ५५६ वर्षें पूर्ण झालीं तेव्हांचें वर्ष इ० स० पूर्वीचें ४२८ हें येतें. बुद्धाचा मृत्यु ४७० त झाला आहे. यांत ४२ वर्षांचें अंतर येतें याच कालांत बुद्धाचा आयदाता पासेनदी हा शक्यराज बुडवितो ह्मणून इक्ष्वाकी येथील शिलालेखांतील समीकरण येणेंप्रमाणें येतें—.

भारतापासून=इ० स० पूर्वी

३०३०	४४८
१९०४	= १९०४
४९३४	= २३३२

मार्गशीर्षातील विवाह मुहूर्त

शु०	८	सो०	२१	दिसेंबर.
कृ०	४	गुरू०	३०	,,
कृ०	९	शुक्र०	३१	,,
कृ०	७	रवि०	२	जानेवारी.
कृ०	९	बुध०	९	,,

या वरील तीथीस वरील वर्णनावरून गुरू हा अनुकूल आहे.

आतां बुध, शुक्राबद्दल पाहूं. बुध शु० पक्षांत जायास्थानीं आहे व वद्य पक्षांत कुटुंब स्थानच्या सप्तमांत आहे. तसेंच शुक्र शु० पक्षांत अष्टमांत असून व० पक्षांत नवमस्थानीं व जन्मकालच्या शुक्राच्या पंचमांत आहे मात्र या महिन्यांत शनी मंगळ यांची युति व० ५ स आहे तोंपर्यंत हे शनि, मंगळ, अनकूळ नाहींत. या महिन्यांत शनि, मंगळ कृपा करतील तर सदर कुंडलींत गुरूचंद्राचा योग व प्रतियोग यावरून ता.२१।३०डिसेंबरचे सुमारास वाटा घाट होवून मार्गशीर्ष व. ७ अगर ९ स शुभमंगळ....असे ह्मणोन टाळ्या वाजतील असें भविष्य करण्यास शास्त्रदृष्ट्या हरकत नाहीं. मार्गशीर्ष शु. पेक्षां व. पक्ष जास्त अनुकूल आहे. व तो व. ५ पासोन अनुकूल आहे.

जर शनी मंगळाच्या अवक्रेपमुळें योग न आल्यास पूर्वी सांगितलेल्या नियमाप्रमाणें माघ, फाल्गुनांत (वक्री गुरूतच) लग्न झालें पाहिजे हें ज्योतिषशास्त्रदृष्ट्या उघड आहे. माघ शु. पक्षांत शुक्र वक्री असोन अष्टमांत आहे व बुधहि अष्टमांत आहे व माघ व. पक्षांत शुक्र अष्टमांत मार्गी असोन बुध ९ त आहे. व तो लग्नाधिपति आहे. व जन्मकालच्या बुधाशीं ९।९ योग झालेला आहे.

फाल्गुन शु० पक्षांत शुक्र अष्टमांत असोन बुध जाया स्थानाच्या स्वामीच्या सप्तमांत आहे व गुरूहि जाया स्थानाच्या, स्वामीच्या सप्तमांत आहे फाल्गुन शु० व वद्यपक्षांत गुरू वक्री आहे.

वरील सर्व नियमांवरून ज्योतिषशास्त्रदृष्ट्या मार्गशीर्ष महिना अनुकूल आहे व वक्री गुरूमुळें माघ फाल्गुनहि अनुकूल आहेतच त्यांत झालाच पाहिजे. असें मला वाटतें कळावें लोभ असावा हे विनंती

आपला वर्गणीदार,

महादेव नारायण पेरलेकर.

हल्लीं री ट्रेनिंगक्लास. पुणें.

७

बक्षीस रुपये १५.

श्रीगणेशायनमः श्री शके १७९९ मार्गशीर्ष कृष्ण १० शनिवार घ० ३६ प० ३९ स्वाति नक्षत्र घ० ५३ प० ४७ इष्ट घटि. रात्रौ गत घ. २३ प. १६ तत्समये तूललग्ने जन्मः॥ शुभं भवतु ॥

लग्न कुंडली.

ह्या कुंडलीचा जन्मकाळ अजमासाचा आहे करितां नक्की जन्मकाल काढण्यास जर कांहीं माहिती पाहिजे असेल तर ती खालील पत्त्यावर विचारली असतां तावडतोब कळवूं हा इसम सन १९०५ चे मेंत. [शके १७२७ चे वैशाखांत] घरून साधारण तक्रार होऊन गेला तो अजून परत आला नाहीं व त्यानें पत्रही पाठविलें नाहीं. तो आठनऊ महिन्यापूर्वी सोलापुराकडे घोड्याचे सरकशींत असल्याचें कळालें तेव्हां हा इसम घरीं कोणत्या मित्तीस येऊन मंडळीस भेटेल, त्याचा विवाह झाला कीं काय? अथवा (अक्षांश रेखांशावर) प्रांतांत तपास केला असतां तो भेटेल हें जे कोणी कळवितील त्यांस वरील बक्षीस मिळेल. ज्या दिवशीं भेट होईल त्याच दिवशीं बक्षिसांची रक्कम पाठविण्यांत येईल.

साधारण वर्णनः—विद्या अल्प. (मराठी चौथीपर्यंत.) उंची साधारण. वर्ण निमगोरा. बंधु दोन वडील बंधु अहेत. बहिणी दोन लहान अहेत. आईबाप हयात अहेत. घोड्याचा विशेष नाद आहे. घोड्यावर उत्तम बसतां येतें. विशेष धीट आहे.

याहून निराळी आणखी माहिती पाहिजे असल्यास कळवावें. कळावें. अंक पावल्यापासून दोन महिन्याचे आंत उत्तरें यावीं.

पत्रव्यवहार करणें तो—

बा० भं० भापकर, हेडमास्तर.

खिर्डी, पूर्व खानदेश.

या पत्त्यावर करावा.

गेल्या वर्षाच्या ३० व्या अंकांत येथील राष्ट्रमुखकर्त्ते रा. पालवणकर यांच्या शिक्षेविषयीं लिंहितांना " शनि हा एप्रिल १९०९ च्या १३ तारखेला जन्मस्थ रवीवरून जाईल व रवीही जन्मस्थ शनीवरून जाईल तेव्हां अनिष्ट ग्रहस्थितीचा जोर नाहींसा होईल, यावरून त्यांस दीड वर्षापेक्षां कमी व ५ महिन्यांपेक्षां अधिक इतकी फार तर शिक्षा होईल " असें भविष्य वर्तविलें होतें. त्या प्रमाणें आतां असें समजतें कीं नामदार गव्हर्नर साहेबांनीं त्यांची एक वर्षाची शिक्षा कमी करून ५०० रुपये दंडही माफ केला आहे. ह्मणून त्यांचे ६ महिने भरतांच त्यांची सुटका होणार असें ऐकून समाधान वाटतें.

लो० मान्य टिळकांची सुटकाही नामदारसाहेब लवकरच करोत अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

सं० कुं० वि०

पत्रव्यवहार.

१

रा० रा० कुंडलीविज्ञानकर्ते यांस.–

वि० वि० आमचे गुरुबंधु वे० शा० सं० घनश्याम ज्योतिषी माजाळीकर यांणीं **विश्वघस्र** पक्षाच्या ग्राह्याग्राह्यतेबद्दल आधारपूर्वक सिद्ध केलेला निर्णय प्रसिद्धीसाठीं पाठविला आहे. हा विषय धर्मशास्त्राचा असून सार्वजनिक आहे. तरी त्यास येत्या अंकीं स्थल मिळेल अशी आशा आहे.

संविदितमेवैतत् सर्वेषां पंचांगावलोकनमानानां यत्पुरंदरे मोघे इत्यादि पंचांगेषु श्री शके १८३१ सौम्यवत्सरस्य ज्येष्ठ कृष्ण पक्षे तिथिद्वयेन क्षयगामिना संभाव्यमानः त्रयोदशदिनात्मकस्सकलमांगल्यविघातकरो विश्वघस्रक्षापरनामधेयःक्षयपक्षो विनिर्दिष्ट इति. न खलुशास्त्रसंमतस्सोयं क्षय पक्षः । यतः ज्योतिःशास्त्रे–

प्रतिपदाद्यक्षणमारभ्यामावास्यापर्यंतं संवर्तमानस्य पंचदशतिथ्यात्मकस्य यदा त्रयोदशाहोरात्रे भवति संबंधः तदैव विश्वघस्रात्मकः क्षयपक्षस्संभवितुमर्हतीत्युक्तं । तस्यैवातिदोषवत्ता वर्षसहस्रेण संपातत्वं च स्मर्यते. ज्योतिःशास्त्रकारैः ।

त्रयोदशदिने पक्षे तदा संहरते जगत् । अपि वर्षसहस्रेण कालयोगः प्रकीर्तितः ॥ १ ॥ अतः प्रतिपत्तिथेश्चतुर्दशी पंचदश्योरन्यतरतिथेश्च युगपत् क्षये त्रयोदशदिनात्मकपक्षत्वं नास्त्येवेतिसिद्धांतः ॥ अतएव भीष्मपर्वणि कुरुपांडवसैन्यक्षय निमित्तभूतमुत्पातमाहदुर्योधनं प्रतिभीष्मः । चतुर्दशीं पंचदशीं भूतपूर्वांच षोडशीम् ॥ इमां तु. नाभिजानेहमावास्यां त्रयोदशीम् ॥ १ ॥ अस्यार्थः

पूर्वं हि पंचांगगणनया प्रतिपदमारभ्यामावास्यां तिथिं चतुर्दशीं चतुर्दशाहोरात्रे पंचदशीं पंचदशाहोरात्रे षोडशीं षोडशाहोरात्रे च पूर्वं संजातामभिजानेऽहम् परमस्मिन्नवत्सरेत्रिंशांपंचांगे मयादृष्टाममावास्यां त्रयोदशीं प्रतिपत्तिथिमारभ्य त्रयोदशाहोरात्रे तिथिद्वयन्हासाज्जातां कदाप्यतनुभूतां नाहमभिजाने । इति । महानुत्पातो मया दृष्टोऽतो युद्धान्निवर्तस्वेतिवाक्यतात्पर्यार्थः ॥

परमार्थतश्चेद्विचार्येत नहि तथाविधस्त्वेतत्कालिको बहुशः (शके १८१४ नंदनवत्सरस्याषाढकृष्णपक्षे मन्मथस्य वैशाखशुक्ले शोभकृतश्च चैत्रशुक्ले) आयातपूर्वः क्षयपक्षः । अयंत्वक्षयपक्षएव

अत एतस्मिन् ज्येष्ठकृष्णपक्षे सकलमांगलिककर्मणां न निषेध इत्येवमेव शिष्टैरनुशीलितः पंथा इति शिवम् ॥

महाबळेश्वर नारायण ज्योतिषी,
मु० सिंहेश्वर, ता० कारवार.

२
पति.

जन्म—शके १७८९ वैशाख शु० ५ घटी ०



१ पंचमांत कर्कराशि हा स्त्रीराशि असून प्रजा पुष्कळ देणारा आहे. २ पचमांत मंगळ हा आपले नीचांत असून संतति संख्या अल्प देणारा आहे. त्याच प्रमाणें गर्भाला मारक आहे ३ चंद्र हा मिथुन या पुरुष राशींत असून प्रजा मध्यम देणारा आहे. ४ गुरु कुंभ या वंध्या राशींत असल्यामुळें तो अल्पशी पुत्रप्राप्ति करितो. ५ नवम स्थानीं शनी आहे, तो संततीला अपाय करणारा आहे. ६ लग्नाधिपति शुक्र हा स्वगृही बलवान् आहे. तो संततिसौख्य दाखविणारा असून पुत्रकन्यामिश्रित संतति देतो. यावरून संततिसुख दुर्बल आहे. परंतु एकाद्या मुलाचें सुख चांगलें मिळेल असें वाटतें.

पत्नी

जन्म—शके १७९७ कार्तिक शु० ११ इ. घ. ३७ प. ३९



१ पंचमांत तूळ हा पुरुषराशि आहे तो अल्प प्रजा देणारा आहे. २ पंचमांत दोन पाप ग्रह व एक शुभ ग्रह आहे ह्मणून मुलें अल्पायु होणारी आहेत. ३ चंद्र मीन या स्त्रीराशींत राहू या पाप ग्रहानें युत आहे यामुळें संतति सुख दुर्बल आहे. ४ गुरु हा तूळ या पुरुष राशींत असून पाप ग्रहानें युत आहे ह्मणून तो अल्प प्रजा देणारा आहे. ५ लग्न पुरुष राशीचें असून अल्प संतति दर्शवितें.

आतांपर्यंत संततिसुख मुळींच मिळालें नाहीं. १ ला गर्भपात. २ रा मुलगा मयत. ३ री मुलगी मयत. ४ था मुलगा मयत. ५ वी मुलगी मयत. ६ मुलगा मयत. ७ वी मुलगी मयत. आठवें मूल हयात आहे तें अगदी रोगी आहे. चार वर्षांच वयाचे असून त्याला चालतां बोलतां येत नाहीं. अंथरुणावर निजून असतें. याप्रमाणें या दोन कुंडल्यांवरून विचार होतो.

महादेव गंगाधर कुळकर्णी.
देवराष्ट्रे.

३

रा० रा० कुंडलीविज्ञानकर्ते यांस

वि. वि. खालील चार ओळींस जागा द्याल अशी आशा आहे. ज्योतिषांतील प्रश्नभाग विशेष न जाणण्याऱ्या लोकांकरितां पूर्वीचे ग्रंथांतील उपयुक्त असा एक श्रीराम प्रश्न आपणाकडे पाठविला आहे.

प्रश्न पाहण्याचा क्रम

एकून सोळा कोष्टकांपैकीं पाहिजे त्या कोष्टकावर सुपारी ठेवून त्यांची फलश्रुति पहावी.

॥ श्री रामचंद्र प्रश्न प्रारंभः ॥

श्रीरामचंद्रः १	सीता २	लक्ष्मणः ३	बिभीषणः ४
कुंभकर्णः ५	रावणः ६	अंगदः ७	सुग्रीवः ८
इंद्रसूतः ९	नलः १०	हनुमंतः ११	भरतः १२
नारदः १३	शूर्पकिः १४	कौसल्याः १५	मंदारप्रभो १५

रामंच स्थाननाशंच सीताया दुःखनेवच ॥ लक्ष्मणः कर्यसिद्धिंच सर्व कार्य बिभीषणः ॥ १ ॥

मरणं कुंभकर्णंच रावणंचकुलक्षयं ॥ अंगदेनध्रुवंराज्यं सुग्रीवं प्रियदर्शनं ॥ २

इंद्रसूनुंच कल्याणं कार्यनाशंच नीलया ॥ सर्वकार्य हनूमंतभरतं बलबंधनं ॥३

नारदः कलहश्चैव कार्यनाशंच शूर्पकि ॥ उत्तमांकंसला देवी मध्यमंदारथ प्रभो ॥ ४ ॥

कळावें लोभ असावा हे विनंति.

आपला

शंकर शास्त्री जोतिषी.

४

श्रीयुत ज्योतिर्विद कुंडलीविज्ञानकर्त्ते यांसी

सा. न. वि. वि.—आपलें ता० ०१ ९-४-०९ चें कार्ड पावलें. ज्योतिषासारख्या उपयुक्त विषयास अजूनही पुरता आश्रय न मिळतां दिवसें दिवस लोकांचें कमी लक्ष लागावें याबद्दल दिलगिरी वाटते. आपली नऊ वर्षांची सेवा अवर्णनीय आहे. हल्लीं आपणास धनस्थानीं व चंद्रास राशीपरत्वें १० वा शनि आला आहे ह्मणून द्रव्य व धंदा या संबंधें थोडी चिंता प्राप्त झाली आहे. हा शनि वृषभेचा झाल्यावर पुनः १९०८ प्रमाणें दिवस यावे असें वाटतें. ह्मणून दाशाहिक काढण्याचा प्रयत्न न सोडतां चालू ठेवावा. माझ्या एकट्या विषयीं ह्मणाल तर मी वार्षिक वर्गणी ३ रुपये देण्यास तयार आहें. फारच नड आली तर आपण हें पुस्तक पाक्षिक करावें असो. सोबत १९०९ चे पर्जन्याविषयीं व सासन्याकडून द्रव्यप्राप्ति या संबंधें २ लेख पाठविले आहेत. मर्जीनुरूप स्थल मिळावें.

सन १९०९ चें पर्जन्याचें भविष्य.

मागील वर्षी पर्जन्याचें भविष्य केलें होतें पण तें चुकलें. पुन्हा यावर्षी प्रयत्न करून करीत आहे. दाशाहिकांतील आपले विचार व आज पर्यंतचा अनुभव या आधारें हा प्रयत्न केला आहे. तरी त्यास मर्जीनुरूप अवश्य स्थळ मिळावें.

मुंबई इलाख्याच्या बाजूस सायन पुनर्वसू हें पर्जन्यारंभाचें नक्षत्र ठरलें आहे. हें ता० ११ जूनचे सुमारास निघतें. ह्यावेळीं एखादा ग्रह किंवा बुध शुक्र ह्या पैकीं एक किंवा दोन्ही कर्क राशींत प्रवेश करितांच व चंद्र विषुवाच्या उत्तरेकडे भ्रमण करीत असतां पक्या

बरसातीस सुरुवात होते. ह्यावर्षी ता० १० जून रोजीं शुक्र कर्केंत जातो व चंद्र ता० १२ पासून मेषेचा होतो ह्मणून जूनच्या दुसऱ्या आठवड्यांत पक्की बरसात सुरूं होईल.

ज्याप्रमाणें अलीकडे पुनर्वसूवर पर्जन्यारंभ होतो त्या प्रमाणें सायन उत्तरा अखेर पावसाळा संपतो. १९०७।१९०८ ह्यावर्षी असें झालें आहे. उत्तरा ता० ३ सपटेंबर रोजीं संपतें. हें नक्षत्र संपण्याचे सुमारास बुध किंवा शुक्र तूळ राशींत जातांच परिणाम घडूं लागतो. ह्यावर्षी शुक्र ता० २३ आगष्ट रोजीं व बुध ता० १ सपटेंबर रोजीं तूळेंत जातात ह्मणून सपटेंबर आरंभीं बरसात खलास होईल. ह्मणून आपणास जूनच्या दुसऱ्या आठवड्यापासून सप्टेंबर पावेतों पर्जन्या विषयीं विचार केला पाहिजे.

ह्या अवधींत मोठ मोठ्या गोलांचे योग प्रतियोग केव्हां आहेत तें पाहूं.—

जून	जुलै	आगष्ट	सपटेंबर
ता. ५मं–गु	ता. ९र+ने	ता. ४र+बु	ता. ५बु–मं
,, ७बु+शु	,,१२र–ह	,,१०ह–ने	
,,१९र+बु	,,२३बु+ने	,,१२शु+गु	
,,२३शु+ने	,,२४बु–ह	,,२९बु+गु	
२६शु–ह		२८शु–मं	

मोठमोठ्या ग्रहांचे योग प्रतियोग घडत असतां चंद्र जर उत्तर गोलार्धांत असेल तर पर्जन्य चांगला लागतो.

जून	जुलै	आगष्ट	सपटंबर
ता. १२ते१५	९ते२३	५ते१९	२ते१५

ह्याप्रमाणें चंद्र उत्तर गोलार्धांत असतां बहुतेक योग प्रतियोग होत आहेत. ह्मणून ह्या योग प्रतियोगावर पर्जन्य चांगला लागेल.

मागील वर्षाइतके पुष्कळ व लागोपाठ योग प्रतियोग ह्या वर्षी नाहींत. मंगळ ता. २२ जुलैपर्यंत उत्तर गोलार्धांत नाहीं. व बुध शुक्र लवकर तूळ राशींत प्रवेश करितात. ह्मणून ह्या वर्षी उन्हाळा कडक होणार नसून पर्जन्य जोराचा, चांगला, पुष्कळ व फार दिवस होणार नाहीं. महापूर येण्याचे संभव कमी दिसतात.

पुढील दिवस उघाडीचे आहेत.

जून	जुलई
ता० २७ जुलई ता० ८	ता० २५ ते आगष्ट ता० ३
आगष्ट ता० २० ते २४	,, २९ ते सपटेंबर ,, १

बुध ता० १३ जुलै रोजीं कर्केंत जातो व मंगळ ता० २२ पासून ता० १९ पर्यंत बुध, गुरु, शुक्र व चंद्र कन्या राशींत जवळ जवळ आहेत. व चंद्र ह्या वेळीं अनुकूल आहे ह्मणून जुलै मध्यें ता० १३ ते २३, व आगष्ट मध्यें ता० १४ ते १९ ह्या अवधींत वृष्टी उत्तम होईल.

मंगळ ह्या वर्षी पर्जन्यकाळांत फार थोडे दिवस अनुकूल आहे. गुरु व शनि मात्र उत्तर गोलार्धांत आहेत.

मागील वर्षी मंगळ विशेष अनुकूल होता. ह्मणून मागील वर्षासारखा पर्जन्य यंदा नाहीं. शिवाय ता० ६ आगष्ट पासून शनि व ता० २४ पासून मंगळ वक्री आहे. ह्मणून हाही योग अनुकूल नाहीं. १९०७ सालीं गुरु कर्क वृत्तांत असून सुद्धां मंगळ दक्षिण गोलार्धांत असल्यामुळें पर्जन्य कमी झाला व आगष्ट अखेर पासून पावसानें दगा दिला. ह्याप्रमाणें सर्व बाजूंनीं विचार करितां १९०९ साल १९०७ प्रमाणें आमचे दृष्टीस दिसत आहे.

इतर दोन मोठाल्या ग्रहांचा जेव्हां योग प्रतियोग होतो तेव्हां तर पाऊस चांगला लागतो. त्याचप्रमाणें चंद्र हा बुध, गुरु किंवा

शुक्र ह्यांशीं ज्या दिवशीं योग प्रतियोग करील त्या दिवशींही जरी चांगला नाहीं तरी बरा लागतो. मात्र कोणतेही योग प्रतियोग असोत चंद्र जेव्हां विषुववृत्ताचे उत्तरेकडे भ्रमण करीत असेल, तेव्हां मात्र चांगला अनुभव यावयाचा.

जून	जुलई	आगष्ट	सप्टेंबर
ता.१०चं–गु	ता.२चं–बु	ता. १चं–बु	ता. १ चं–गु
,,१७चं+बु	,, ५च–शु	,, ३चं–शु	,, २ चं–बु
,,१९चं+शु	,, ७चं–गु	,, ४चं–गु	चं–शु
,,२३च+गु	,,१६चं+बु	,,१७चं+बु	
	,,१९चं+शु	,,१८च+गु	
	,,२१चं+गु	चं+शु	

ह्या तारखांस चंद्र हा शुभग्रहाशीं योग प्रतियोग करीत आहे. त्यापैकीं बहुतेक उत्तर गोलार्धीत असतां करीत आहे. ह्मणून वरील तारखा कोरडया जाणार नाहींत असें अनुमान होतें.

भुसावळ, १९।४।०९. } गणेश दामोदर ग्रंथे, वर्गणीदार.

सासऱ्याकडून धनप्राप्ति.

जन्म ता० १५-८-१८ ६२ रात्रीं १० वाजतां (अ. २०)



ल.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	ह.	ने.
११	४	०	०	४	९	३	९	८	२	०
२९	२१	२०	१९	१८	२८	२४	२२	१८	१९	३
४८	.	.	.	.	.	.	.	.	.	

कै० जीवनराव चिटणीस यांचे लेख.

[अंक १० वरून पुढें चालू.]

वर्तमान कलिवर्ष ५००५ आहे. यांत ४९३४ ऋण करतां बाकी ७१ वर्षें राहतात. द्वापारांतीं धर्मराजानें ७६ वर्षें राज्य केलें. तेथून भारतकाल मोजला ह्मणजे इ० स० पूर्वीचें कलियुगारंभवर्ष जें ५४० त्यांत ७१व. मिळविलीं पाहिजेत, ह्मणजे ६११या वर्षी धर्मराज होता व तेथून भारतकाल गणितात्मक उर्फ कल्पित मानलेला दिसतो. कलियुगाचे १० वे पुराव्यांत धर्मराजशक सनापूर्वी ६१६ येतो व इवल्ली येथील शाक्य देशाचे शकराज शकावरून इ० स० ६११ हें वर्ष येतें ह्मणजे दोन काळांत फक्त ५ वर्षांचें अंतर दिसतें. ह्मणून धर्मराज मौजीबंधन काल हाच युधिष्ठिर शक शिलालेखांत दाखल झालेला दिसतो.

येणेंप्रमाणें सर्व बाजूंनीं विचार करितां पंचांगांत जें गत कलिवर्ष देतात तें चुकीचें आहे व तें सिद्धांतकारांनीं कल्पित मानलेलें आहे. त्या आधारावर मागील युगें विषम करून मनास वाटेल तीं युगसंख्या गणिताचे प्रमाणांशीं युक्त करून कृतयुगाचे अंतीं सर्व ग्रह मध्यम मानानें मेषारंभीं येतात असें प्रत्यक्ष वेध न घेतां गणिताचे फेरे कल्पून त्यामानानें युगमानें चढाविलीं आहेत. हीच पद्धत खरी ह्मणून आर्यावर्तीतील लोक संकल्प सोडतांना " ॐ तत्सत् । श्री ब्रह्मणो द्वितीये परार्द्धे वैवस्वतमन्वंतरे अष्टाविंशतितमे कलियुगे कलिप्रथमचरणे अमुक संवत्सर–अयन–ऋतु–मास–पक्ष दिन–नक्षत्र–लग्न–मुहूर्ते अत्र इदं कृत्यं क्रियते ।" हा संकल्प चुकीनें व पंचांगकाराचे भ्रमामुळें सोडतात असें ह्मणावें लागतें!

मनु अ० १ यांतील पद्धत भिन्न आहे. यजु अ० १९।६९, शतपथ कांड ७ अ० ५ यांतील प्रमाणें आर्यधर्म मासिक पुस्तक वर्ष१ अंक १ पृ० ११-१४ यांत दिलेला काळ चुकीचा आहे. कलियुगासंबंधानें जास्त पुरावे परशुराम शकांत व रामजन्मवर्णनांत येतील. त्यावरून पंचांगांतील कलियुगारंभ चुकीचा आहे हें मत ज्योतिर्विदांचें होईल अशी खात्री आहे.

अवतारजयंत्या.

पंचांगांत कलियुगसंस्था ज्या प्रमाणें प्राचीन पध्दतीस अनुसरून नाहीं त्याचप्रमाणें जयंत्याकालही नाहीं. शोधक लोकांस कलियुग आणि जयंत्या भ्रमांत पाडतात म्हणून जयंत्यांचा विचार करीतों.

मत्स्य अवतारापासून पहिले सहा अवतार हिंदुस्थान देशांत किंवा आर्यावर्तांत झालेले दिसत नाहींत. पहिले तीन अवतारांत ज्या प्राण्यास वाचा व ज्ञान नाहीं असे अवतार मानलेले आहेत. या अवतारी प्राण्यांचे आईबाप कोण व त्यावेळीं कोणता शकमहिना तिथि असेल यांस आधार कविकल्पने खेरीज अन्य दिसत नाहीं. मत्स्य अवतारांत वर्णन केलेली स्थिति अनार्य लोक जे हिब्रू किंवा यहुदी यांचे ग्रंथांत आढळते. यावरून अवतारांची मूळ कल्पना जे लोक हल्लींचे हिंदूंत घुसले आहेत त्यांनीं या देशांत प्रचारांत आणलेली दिसते. चवथा अवतार हा अर्धा मनुष्य व अर्धा हिंसक प्राणी जो सिंह त्याचा आहे. म्हणून यास नर-सिंह अवतार असें म्हणतात. या अवतारी नरपशूचा जन्म खांबांत झाला आहे. खांब हे त्याचे मातापितर होत. हा अवतार हिरण्यकश्यपाचे वधाकरितां व प्रल्हादाचे संरक्षणाकरितां झाला आहे. हिरण्यकश्यपु हा कश्यप ऋषीचे कुळांत जन्मलेला आहे. कश्यपऋषि हा कश्यप समुद्राजवळील अथवा क्यास्पीयन-सी जवळील रहिवाशी. याचा वध अनार्य लोकांचा सिंहक

देव जो नर-सिंह त्यानें केला म्हणून आर्यकुलांतील एका पुरुषाचा वध करणारा अनार्य पुरुष याची जयंती आर्य लोकांनीं आपले पंचांगांत कां दाखल करावी?

कश्यपपूर नांवाचें एक शहर सिंधूचे तीरीं होतें. सिंधुतीरीं महाभारताचे पूर्वी बायबलांतील नोहाची संतति राहत असे असें वर्णन शंकर बाळकृष्ण दीक्षित कृत भूगोलांत आहे. त्याच प्रदेशास त्यांड ऑफ हविला असें बायबलांत म्हटलें आहे. यावरून नरसिंह अवतारांचें ठिकाण सिंधूचे पलीकडील व कश्यप समुद्राजवळील अनार्य लोकांचें ठिकाण होय. नरसिंह अवतारा पूर्वीचा अवतार वराह होय. नाण्यावर वराहाचें चित्र असलेलीं नाणीं सिंधूतीर व अफगाण देश या प्रदेशांत सांपडलीं आहेत. आफगाण लोक हिब्रू लोकांचे वंशज आहेत म्हणून वराह अवतार हिब्रू लोकांचा दिसतो. सारांश पहिले चार अवतार अथवा जयंत्या आर्यपंचांगांत ठेवणे युक्त नाहीं. कारण, तसें झाल्यास सर्व हिंदु हे अनार्य वंशज आहेत असें म्हणावें लागेल.

नरसिंहानंतरचा वामन हा पांचवा अवतार मानला आहे. वेदांतील सूर्य तीन पावलांत आकाश आक्रमितो या कथेस अनुसरून त्रि-विक्रम नांवाप्रमाणें हा कल्पित अवतार संध्या करण्याकरितां तयार केलेला असून याचें जन्मठिकाण नार्वे स्वीदन ज्यास स्कांन्दे नेव्हिया अथवा स्कंध-नभिया किंवा स्कंदन-वन असें ज्यास म्हणतात तेथील होय. वामन हा यूरोपीय अवतार होय. याचें हिंदुस्थानांत जन्मठिकाण नाहीं. त्याचे पूर्वीचे अवतारांचें जन्मठिकाणही भरतभूमींत नाहीं.

वामनानंतरचा अवतार परशु-राम हा होय. परशुराम हा बाबिलोनियाकडील पेरीसा-बोरा किंवा परसू -पूर येथील रहिवाशी तैग्रीस व युफ्राटीस नद्यांचे सांध्यांत हें ठिकाण आहे. हिटाईट

वंशांत परशुरामाचा जन्म झाला आहे. त्यांचें यूरोपीय नांव सेतलन्स असें आहे. परशुराम हा यूरोपीयन लोकांचा जसा देव आहे तसाच तो चितपावनांचाही आहे. मलबाराकडील परशुरामाचे आईचें नांव येलम्मा आहे. येलम्मा आणि येल्लेहिम हीं नांवें एकच दिसतात. येल्लेहिम हें नांव बाबिलोनियाची राणी सेमीरामीस होती तिचे आईचें हें नांव आहे. सह्याद्रि खंडांत रेणुका महात्म्यांत आलेलें वर्णन मलबाराकडील वर्णनापेक्षां जास्त आहे. परशुराम हा अनार्य पुरुष आहे, व अनार्याप्रमाणें हा जरी विष्णूचा सहावा अवतार बनविला आहे तरी यांचीं देवळें सर्व हिंदुस्थानांत तीनच आहेत. मलबार व चिपळूण येथें परशुराम अथवा सेतलन्स याची पूजा होते.

परशुरामानंतरचा रामावतार होय. रामाचें वर्णन मिसर देशांत, उत्तर आफ्रिकेंत, इटालींत, अर्बस्थान किंवा अर्बस्थानांत आढळतें. पालिस्टाईनमध्यें रामथ जिलेड येथें राम होता. रामाचे आईचें नांव कौसल्या आहे. रामथजिलेड येथील राजास कुशाली ह्मणजे कौसल्यावंशज ह्मणतात. रामाचे पुत्र कुश व लहु यांस कुशाईट व लव्हाईट ह्मणजे कुशवंशीय व लहुवंशीय ह्मणतात. कुशवंशीय लोक कुशद्वीपांत ह्मणजे अबिसिनीयांत जाऊन राहिले. यांचें वर्णन विष्णुपुराणांत कुशद्वीपांत आलें आहे. हिंदुस्थानांत रामाचा जन्म अयोध्येंत झाला असें वर्णन रामायणांत मिळतें ह्मणून आर्य पंचांगांत हा पुरुष दाखल होईल. कृष्ण व बुध हे हिंदुस्थानांत जन्मले आहेत. राम व कृष्ण यांचे जन्मकाळ बनावट आहेत. हें पुढें दाखविलें जाईल. बुधाचे जन्मकालाविरूद्ध पुरावा अद्याप बाहेर आलेला नाहीं. कलंकी हा अवतार होणारा आहे, ह्मणून याची जयंती पंचांगांतून गाळली पाहिजे. राम, कृष्ण व बुध यांचे जन्म हिंदुस्थानांत झालेले असून त्यांनीं धर्मक्रांति बरीच केली आहे. त्या प्रमाणें मागील

अवतार नाहींत. मागील अवतारी पुरुषांचीं जन्मवर्णनें महिने–तिथी यांची माहिती पुराणें ज्या कालचीं आहेत असें दाखवितात त्या काळीं ते पुरुष जन्मास आलेलेही दिसत नाहींत.

भाग ३ रा

हिंदुपंचांगांत आरंभमास चैत्र नाहीं.

वसंतानुरोधें चैत्रारंभ इ० सना पूर्वी १८२२ चे सुमारास आहे. त्या पूर्वी चैत्र हा प्रथम मास नव्हता. वेदांवरून कृतिकानक्षत्रानुरोधें कार्त्तिक मास हा वर्षारंभ आहे, तसाच फाल्गुन हाही वेदांवरून आरंभमास आहे. गर्गकाळीं मृगांवरून मार्गशीर्ष हा वर्षारंभ आहे. येणें प्रमाणें वर्षारंभ आहेत. इ० सना पूर्वी १८२२ चे पूर्वी वसंत व उदगयन यां अन्वयें वर्षारंभ आहेत. मेषारंभाबरोबर वर्षारंभ आहे तसाच मध्यम मानानें मेषारंभ मानलेला आहे. येणेंप्रमाणें भिन्न भिन्न मतें मानलेलीं आहेत.

पंचांगांतील आरंभमास.

(१) अहमदाबाद, काठियावाड प्रांतांत पंचांगकार आषाढ शु० १ पासून वर्षारंभकरितात.

(२) बंगाल्यांत अश्विन कृष्ण प्रतिदेस होतो.

(३) ओढिया प्रांतांत भाद्रपद शु० १२ या दिवशीं वर्षारंभ होतो.

(४) तिरहत प्रांतांत माघाच्या आरंभीं होतो.

(५) कोची, त्रिवेंद्रम् मलबार तिणवेल्ली या प्रांतांत सिंहसंक्रांतीबरोबर वर्षारंभ करितात.

(६) कालिकत, मंगळूर, उत्तर मलबार या प्रांतांत कन्या संक्रांतीबरोबर वर्षारंभ करितात.

(७) मद्रासेकडे कर्कमासाबरोबर वर्षारंभ करितात.

वरील सात प्रकारांवरून हिंदुस्थानांत चैत्र हा प्रथम महिना पंचांगकार मानीत आहेत असें दिसत नाहीं.

या प्रांतांत चैत्रारंभ गुप्त लेखावरून संवत् १५६ पासून २०९ पर्यंतचे काळांत चैत्र हा प्रथम महिना मानलेला दिसतो ह्मणून चैत्रमासाची प्रवृत्ति ज्या ज्या ग्रंथांत आढळेल ते सर्व ग्रंथ संवत् १५६ नंतरचे होत त्या पूर्वीचे नाहींत.

पंचांगांत प्रथम मास चैत्र असा संप्रदाय संवत् १५६ नंतरचा आहे. वाल्मीकि रामायणांत रामजन्म चैत्र महिन्यांत झाला असें वर्णन आहे ह्मणून रामकालाचा विचार करणें जरूर आहे.

राम व परशुराम हे अवतार त्रेतायुगांत झाले. त्रेतायुगाचा आरंभ ता. २८ अक्टंबर इ. स. पूर्वी १५२८ या वर्षी झाला आहे. त्या वेळीं कार्त्तिक शु. ९ होती. द्वापाराचा आरंभ ता. १५ सपटबर इ. स. पूर्वी ९०१ या वर्षी झाला आहे. यावेळीं मा० कृ० १३ होती. परशुरामाचा शक इ.स. पूर्वी ११७६ या वर्षी सपटंबर महिन्यांत चालू झाला. शके १८२६ किंवा इ.स. १९०४ या वर्षी परशुराम शकाचीं तीन चक्रें पुरीं होऊन चवथे चक्रांतील ८० हें वर्ष चालू आहे [भा. ज्यो पृ. ३७८] यावरून परशुराम शक आणि प्राचीन युगपद्धतींतील त्रेतायुगकाल बरोबर दिसतो.

रा. लेले प्रत पृ. ७०–७१ मध्यें वाल्मीकि रामायणांतील रामजन्माचें वर्णन श्लोक ७-८-९ मध्यें येणेंप्रमाणें आहे.

" ततो यज्ञे समाप्तेषु ऋतूनां षट् समत्ययः ॥
ततश्च द्वादशे मासे चैत्रे नावमिके तिथौ ॥ ८

नक्षत्रेऽदितिदैवत्ये स्वोच्चसंस्थेषु पंचसु ॥
ग्रहेषु कर्कटे लग्ने वाक्पताविंदुनासह ॥ ९
प्रोद्यमाने जगन्नाथ सर्वलोकनमस्कृतम् ॥
कौसल्या जनयद्रामं दिव्यलक्षणसंयुतम् ॥ १० "

वरील श्लोकाचे आधारें रामजन्म चैत्र शु० ९ रोजीं चंद्र पुनर्वसू नक्षत्रीं असतांना व पांच ग्रह आपल्या उच्चांत असतांना कर्क लग्नावर रामाचा जन्म झाला असें वर्णन वाल्मीकि कवीनें केलें आहे.

रामायण हा ग्रंथ महाभारतानंतर तयार झाला आहे. महाभारतांत मेषादि द्वादश राशींची माहिती नाहीं. इतकेंच नाहीं तर राम हा कोणते कुळांत उत्पन्न झाला व त्याची बायको रावणानें कां पळविली हा प्रश्न धर्मराजानें कृष्णास विचारलेला आहे त्यावरून दोन अनुमानें निघतात. १ लें—वाल्मीकि रामायण ग्रंथाचा अभाव अथवा त्याचा प्रसार कमी. २ रें—पांडवकालीं राम हा परब्रह्म आहे या कल्पनेचा अभाव. कदाचित् अयोध्येस दशरथ या नांवाचा कोणी एक राजा आहे व त्याचे मुलाचें नांव राम होतें. परंतु हा क्षत्रिय किंवा ब्राह्मण अथवा अन्य वर्णांतील असेल ही शंका धर्मास आलेली दिसते. ही कथा भारतांत " रामोपकथा " या नांवानें प्रसिद्ध आहे.

वाल्मीकि रामायणांतील रामजन्मवर्णन अप्रमाण आहे. सूर्य मेष राशींत उच्च असतो. चंद्र, श्लोकांत पुनर्वसु नक्षत्रीं आहे. अश्विनीपासून पुनर्वसु अखेरपर्यंतचे अंश ९३ अंश व २० कला होतात. सूर्य आणि चंद्र यांत १२ अंशांचें अंतर पडलें ह्मणजे १ तिथि होते. ह्मणून ९३ अंश २० कला यांस १२ नीं भागलें तर भागाकार ७ येऊन शेष ९ अंश २० कला उरतात. ह्मणजे रामजन्म हा अष्टमींस येतो. पुनर्वसू नक्षत्र आणि नवमी एकत्र केल्यास सूर्य मीन राशींत जातो. मीन हा राशि रवीचा उच्च नाहीं. सारांश नवमी तिथि,

पुनर्वसू नक्षत्रीं चंद्र आणि मेषेचा सूर्य ही त्रयी गणितानें सायन किंवा निरयन वाद्यांपैकीं कोणासही कालत्रयीं दाखवितां येणार नाहीं.

रामजन्माचा वेळ घालण्याची नवीन कल्पना.—रामाचा बाप दशरथ आहे. दश ह्मणजे दहा आणि रथ ह्मणजे चक्र होय. दशचक्र ह्मणजे दहा महिने होत. दहा महिन्यांनीं जें एक वर्ष पुरें होतें तें दशरथ वर्ष होय. दशरथ ह्मणजे क्रांतिवृत्तांतील धनु राशींतील अश्व व स्वार यांची आकृति जी खगोलावर दिसते ती होय. दशरथराजास पुत्र नव्हता. तो श्रावणाचे मातापितरांचे शापापासून मिळाला. श्रावण हा मनुष्य देहांत येण्यापूर्वी तो मासा होता. हा मासा भागीरथी नदींत होता. श्रावण मनुष्य देहांत आल्यावर तो आपलीं अंध मातापितरें कावडींत बसवून काशीयात्रेस चालला होता. मातापितरांस पाणी आणण्याकरितां नदींत झारी बुडवितांच जो बुडबुड आवाज झाला, त्या आवाजाचे धोरणावर दशरथ राजानें मृग समजून बाण मारला, व त्यानें श्रावण मेला. त्याचे मातापितरांचे शापामुळें दशरथ राजास पुढें पुत्र झाला. त्याचे वियोगानें त्यास मृत्यु आला. दशरथ राजाचा मृत्यु कसा झाला ही कथा सर्वांस विदित आहे.

कै० कृष्णशास्त्री भाटवडेकृत आकाशसौंदर्य पुस्तक पृ. ६७मध्यें या नक्षत्रपुंजाचें वर्णन येणेंप्रमाणें—"याची आकृति अर्धी मनुष्याची व अर्धी घोड्याची आहे. त्याच्या हातांत धनुष्य असून त्यावर बाण चढवून तो सोडण्याच्या बेतांत आहे. ह्याचें डोकें वृश्चिकाच्या नांगी समोर आहे.

दशरथ राजाचा तीर श्रावणाचे ताऱ्यावर आहे. श्रवण नक्षत्रांतील दोन तारे ही कावडीची पारडी होय. श्रवण नक्षत्राचे दोन तारे आणि दशरथपुंज यामधून आकाशगंगा किंवा भागीरथी वाहत

कै० जीवनराव चिटणीस यांचे लेख.

[अंक ११ वरून पुढें चालू.]

जाते. येथें श्रावण पूर्व जन्मीं मासा होता. रूपकानें कवीनें मनुष्य केला. श्रवण नक्षत्र मकर राशींत आहे आणि धनु राशींतील मूळ नक्षत्र तेथून दशरथ आकाशांत पसरला आहे. मूळ हें नक्षत्रवृक्षाचें मूळ आहे. कृत्तिका–रोहिणी हा भाग त्या वृक्षावरील शेंडा आहे. येथेंच ऋग्वेदांतील श्येन पक्षी आहे. हाच वाल्मीकांचा क्रौंच पक्षी आहे. दशरथ हा निषाद आहे. दशरथ ह्मणजे दहा महिन्यांचें वर्ष हें चक्र राम या सूर्याचें जनक आहे. दशरथ हा रामाचा बाप तो धनु राशींत आहे. ह्मणून हा राशि दशमांत व मीन पूर्वकेंद्रीं समजून रामजन्मवर्णन केलेलें आहे. दशरथ राजाचे बापाचें नांव अज असें आहे. पूर्वाभाद्रपदा नक्षत्राची देवता अज–एकपाद आहे. अजाचा एक पाय ह्मणजे शेळीचा एक पाय व बोकडाचा एक पाय मिळून अज–एकपाद ही आकृति बनते–सूर्य या ठिकाणीं आला ह्मणसे तो आपले रथाचे बोकड सोडून अश्व जोडतो, ह्मणून त्या वाहनास अजाश्व असें ह्मणतात. अज किंवा मेष हे शब्द समानार्थक आहेत. अज शब्दाचा अर्थ जो जन्मास आला नाहीं तो ह्मणजे कारणरहित जो परमात्मा तो होय. या अज वाहनावर अथवा मेषावर जेव्हां पूषणि ह्मणजे सूर्य आला तेव्हां पूर्वाभाद्रपदा नक्षत्र दिसेनासें झालें.

पूर्वाभाद्रपदाचे शेवटीं संपात असतांना तेथें सायन मेषारंभ होतो व तारकात्मक पू०भाद्रपदांचा शेवट येतो. ह्मणजे सूर्य पू०भाद्रपदा नक्षत्राचे अखेरीस व चंद्र तारकात्मक पुनर्वसू नक्षत्रारंभीं असतांना सायन मेषारंभ पूर्वाभाद्रपदाचे शेवटीं व सायन कर्क पुनर्वसु–पुष्य यांत असतांना रामजन्म वर्णन केलेला दिसतो.

अश्विनीपासून पुनर्वसूच्या आरंभापर्यंतचें अंतर ८० अंश २० कला व अश्विनीपासून पू. भा. चे शेवटपर्यंतचें अंतर १०७ अंश येतें. या वेळीं नवमी तिथि, सायन मेषेचा रवि, —निरयण मीनेचा रवि—व चंद्र सायन कर्कांत येतो आणि सायन गुरूबरोबर युति करितो. अशा रीतीनें दुहेरी स्थिति धरून रामजन्म गणितानें मिळतो भारतांत ही दुहेरी स्थिति आहे असें कांहीं सायन मतवादी म्हणतात. परंतु पू. भा. चे अंतीं संपात जाणारा आहे. मागील काळीं तो जर तसा गेला असला तर त्याचा काल २५ हजार वर्षांचा पाहिजे. व हें जर गणितानें खरें दिसलें तर वेदांत व भारतांत राशींचीं नांवें व इतर गणित आलें असतें तें दिसत नाहीं म्हणून वरील कल्पना जरी गणिताशीं मिळत आहे तरी वाल्मीकि रामायणाशीं विरुद्ध आहे.

रामजन्म मीन राशींत पू.भा. नक्षत्रीं संपात घेऊन वर्णन केला आहे. त्या अनुरोधें वेदांतील सोम घेऊन पाळणारा श्येनपक्षी याची व क्रौंच पक्षी याची साम्य कल्पना बसवितां येते. मीनापासून समोर आकाशांत कन्याराशि आहे. ही रामाची स्त्री सीता होय. रावण हा दशास्य म्हणजे दहा तोंडाचा आहे. रामाचा बाप दशरथ हा दश–रथ म्हणजे दहा चक्राचा दर्शक आहे. ऋ. सं. १-१६४-२ यांत त्रिनाभिचक्र असा शब्द आहे. याचा अर्थ त्या चक्राला तीन नाभी आहेत असा आहे. यास ज्योतिषाचे भाषेंत दीर्घवर्तुल अथवा इंग्रजींत इलिप्स् असें म्हणतात. रावण दहा तोंडांचा व दशरथ दहा भागांचा दर्शक होय. राम हा वासंतिक सूर्य आणि सीता ही शारद स्त्री होय. निरयन कन्येंत सायन तूळ आहे. म्हणून शारद सूर्य जो रावण त्यानें सीतेस पळविली, कारण रावण हा रामाचा शत्रु आहे. शत्रूचा विचार सहाव्या स्थानावर करितात. मीनापासून सहावे भुव-

नांत म्हणजे सिंहेंत रावणाचें स्थान येतें. निरयन कन्येंत सायन तूळ येते तेथें शारद सूर्य रावण येतो. रावणानें सीतेस पळवली ती लंकेंत ठेवली. सीता ही कन्या राशि आहे. कन्येचा स्वामी बुध होय. तूळेचे रवींत जन्मलेला मनुष्य अहंकारी असतो. रावण हा निरयन कन्या राशींत आहे म्हणून तो विद्वान् होता. रावणाचे वेदावरील ग्रंथ प्रसिद्ध आहेत. रावण हा तूळेचा रविदर्शक होय म्हणून तो अहंकारी होय. अहंकार आणि बुद्धि यांचा मिलाफ होत नाहीं म्हणून रावण आणि सीता यांचा मिलाफ होणें अशक्य. म्हणून रावणानें सीतेला लंकेंत नेली. लंका म्हणजे विषुवावरील ठिकाण होय. येथें छाया शून्य असते. कन्येचा अधिपति बुध आहे. सीता म्हणजे चंद्र. चंद्रबुधयोग हा तर्कशास्त्राचा दर्शक आहे. बुद्धीचें ठिकाण मेंदु आहे. मेंदूचा व चंद्राचा संबंध भरती ओहोटीप्रमाणें आहे. ज्याचा मेंदु बिघडला तो वेडा होय. वेड्यास इंग्रजींत ल्युन्याटीक असें म्हणतात. ल्युना म्हणजे चंद्र होय. रावण हा तूळेंतील नीच सूर्य त्यानें सीतेस अशोक वनांत ठेविली. अ–शोक म्हणजे जी शोक करण्याची जागा नाहीं ती असा अर्थ होतो. ही जागा सांपातिक होय.

संपातीं सूर्य दोन वेळां येतो, व तो चंद्रास दोन वेळ भेटतो, म्हणजे रामसीता संयोग होतो. रावणाचा बंधु कुंभकर्ण आहे. रावण हा शारदसांपातिक रवि निरयन सिंह–कन्येंत आहे. सायन सिंह राशींत कुंभकर्णाचें स्थान येतें. सायन कुंभ राशीपासून समोर सिंह राशीपर्यंत कर्ण काढला म्हणजे राशिचक्राचे दोन भाग अथवा अयनें होतात. रावणाचा बंधु कुंभकर्ण हा सहा महिने झोंप घेणारा अर्थात् अयनदर्शक होय. हें अयन सायन कुंभ व सिंह राशींत झालें म्हणजे माघ व श्रावण या महिन्यांत झालेलें दिसतें. वेदांगज्यो-तिषांत माघ–श्रावण या महिन्यांत सदा अयनें होतात असें वर्णन

आहे. सीतेचें दुसरें नांव भूमिसुता असें आहे. चंद्र हा पृथ्वीचा उपग्रह आहे म्हणून सीता ही चंद्र होय. रवि आणि चंद्र यांचे पासून दिवस–रात्र अथवा अहोरात्र होतें. तै० ब्रा० ३–१०–९ मध्यें "जनकोह वैदेहः ॥ अहो रात्रेः समाजगाम ॥" म्हणजे वैदेह जनक अहोरात्रांबरोबर गेला. जनक हा सीतेचा बाप आहे. दशमावर बापाचा विचार होतो. म्हणून कन्या राशीचें जें सीतेचें तनुस्थान तेथून दशमभुवनांत म्हणजे मिथुन राशींत जनकाचें ठिकाण आहे. जनक आणि दशरथ व्याही व्याही समोरासमोर आले.

राम आणि जनक हे उत्तरायणांतील देव होत. या वेळीं उत्तरायणांतील रात्र होती व दक्षिणायनांत अथवा राक्षसांत दिवस होता. रावण–कुंभकर्ण ही जोडी दक्षिणायनांतील होय. येथें रवि होता म्हणून रावणप्रभा कोटीसूर्याहून जास्त असें कवीनें वर्णन केलें. दक्षिणायनांत रवि ज्येष्ठा नक्षत्रीं होता, म्हणजे वृश्चिक राशींत होता. ज्येष्ठा नक्षत्राची देवता इंद्र आहे. इंद्र हें सूर्याचें नांव आहे. मेषापासून वृश्चिक ही आठवी राशी आहे किंवा रवि मेषापासून आठवे भुवनांत म्हणजे मृत्यु स्थानांत आहे. ज्येष्ठा नक्षत्रीं सूर्य आला म्हणजे इंद्रदेवतेवर आला. इंद्रतेवतेवरील रवीस जिंकणारा तो राक्षस इंद्रजित रावणसुत होय. रावणापासून म्हणजे निरयन कर्क राशीपासून निरयन वृश्चिकेपर्यंत म्हणजे पंचम भुवनांत इंद्रजित आहे. ज्येष्ठा नक्षत्र वृश्चिक राशींत आहे. तेथून सप्तम स्थानांत म्हणजे वृषभ राशींत रोहिणीचा तारा अति तेजस्वी आहे. हा लोचनास प्रफुल्लित करितो म्हणून या ताऱ्यास सुलोचना असें नांव प्राप्त होऊन ती इंद्रजिताची स्त्री बनविली. इंद्रजिताचा वध झाल्यानंतर ज्येष्ठा नक्षत्रावरून रवि पुढें उत्तरायणांत येतो, तेव्हां तो देवांत येतो. रवि

देवांत आणतेवेळीं इंद्रजिताचा वध कपीस करणें जरूर पडलें. रावणाचा आरंभ सिंह राशींत आहे. तेथून सप्तम भुवनांत कुंभ राशीचा स्वामी शनि आहे व मंद हें त्याचें दुसरें नांव आहे. शनीचे उदरीं अथवा मंदाचे उदरी आलेला जो चंद्र अथवा मंदोदरी ती रावणाची स्त्री होय. येणें प्रमाणें मीन राशि मुख्य ठिकाण कल्पून रामायणांतील दोन्ही पक्षांचीं प्रधानपात्रें आकाशभूमिकेवर कल्पनेनें दाखवितां येतात. तीं खरीं नाहींत व रामायणाशीं विरुद्ध आहेत म्हणून वाल्मीकिरामायणांतील गणितात्मक भाग पाहण्याकडे वळतों.

परशुरामाचा शक इ० स० पूर्वी ११७३ या वर्षी सुरू झाला व नंतर राम झाला. या दोन कालांत २०० वर्षांचें अंतर संभवार्चे आहे. रामजन्माचें वर्णन बनावट आहे. रामजन्मकाळीं मेषादि द्वादश राशींची माहिती नव्हती. तशीच ती भारत ग्रंथांतही नाहीं. म्हणून रामजन्म राशींचे भाषेंत वर्णन करण्याचा काळ सिद्धांत काळांतील होय. रामजन्मकाळीं पांच ग्रह उच्च असून चंद्र पुनर्वसुंत म्हणजे ९३-९४ अंशांत पाहिजे. अशी ग्रहस्थिति इ० सनापूर्वी ९६१ एप्रिल ता, ६ रोजीं येते. या वेळचे स्पष्ट ग्रह बेन्टलेचे मतें येणेप्रमाणें आहेत.—

रवि—०रा. ९अं. ११क. २३वि. चंद्र–३रा. १२अं. १३क ५४ वि.
शुक्र-११रा. १अं. ० क. ० वि. मंग.१०रा. २ अं. ४७क. ० वि.
गुरु—४रा. ६अं. २४क. १३वि. शनि–९रा. ८ अं. २७क. ० वि.

वरील ग्रहांत मंगळ सुमारें ३ अंश जास्त आहे तसाच गुरु ७ अंशानें जास्त आहे. कलियुगारंभींचे जे ग्रह दिले आहेत त्यांतील गुरूचे अंशांत बेन्टले मतें जे अंश येतात ते व बेलीचे ग्रहांत जे अंश आले आहेत त्यांत ८ अंशांचें अंतर आहे. दोन यूरोपीय कोष्टकांधारें ग्रहांचीं अंतरें किती येतात हे लक्षांत घेतलें म्हणजे

रामजन्मकाळींचे रामायणांत वर्णन केलेले ग्रह बरोबर आहेत असें दिसतें. वरील ग्रह बेन्टले पुस्तकाचे पृ० १५ वर दिले आहेत.

रामजन्मकाळींचे स्पष्ट ग्रह दिले आहेत त्यावरून थोडे बहुत अंतरानें असेही ग्रह मागें पुढें मिळतील, अशी शंका कोणास येईल म्हणून वाल्मीकि रामायणांत जास्त पुरावे पाहणें जरूरीचें. आहे सर्ग ४ श्लो० १८-२०-२१ यांचें भाषांतर वे० काशीनाथ वामन लेले कृत पुस्तकांत पृ० २० मध्यें दिले आहे तें.—

"हे रामा, सूर्य, मंगळ आणि राहु हे क्रूर ग्रह आज माझ्या नक्षत्राला आले आहेत असें ज्योतिषी सांगत आहेत (१८) आज पुष्याचे पूर्वीच्या नक्षत्रावर म्हणजे पुनर्वसू नक्षत्रावर चंद्र आहे. आणि चंद्राचा पुष्य नक्षत्राशीं योग गणितानें निश्चित होत असल्याचें ज्योतिषी सांगत आहेत. (२०) तेव्हां त्या पुष्य नक्षत्रावर अभिषेक कर."

सर्ग १५ श्लोक २ लेले प्रत पृष्ठ ७६ भाषांतर:—

"स्पष्ट सूर्याचा उदय झाला असतां व त्या वेळेस पुष्य नक्षत्र असतां आणि रामाच्या जन्मकाळीं असणाऱ्या कर्क लग्नाला लवकरच प्रारंभ होणार आहे. ब्राह्मणांनीं रामाचे अभिषेकाकरितां तयारी. राम हा अभिषेक समयीं न वनवासास निघाला व त्यास राज्याभिषेक झाला नाहीं, हें मंथरेचे कृतिवरून नाटकरूपानें तरी आतां सर्वांस कळलें आहे. राम वनवासास निघाला तेव्हां सूर्य आच्छादित झाला (श्लोक ८) त्रिशंकु, मंगळ, बृहस्पति, बुध व इतर सर्व ग्रह दारुण होऊन रात्रीं वक्रगतिनें चंद्रासमीप येऊन राहिले (१०) थंड वारा नाहींसा झाला. चंद्र सौम्य दिसेनासा झाला (१७ पृ० १८८ १८९ लेले प्रत)

वरील वर्णनावरून कर्कारंभीं सूर्यग्रहण झालेलें दिसतें. स्पष्ट रवि पुष्यावर व चंद्र पुष्यावर आहे व बाकीचे ग्रह चंद्रास येऊन मिळत होते. यावरून हें ग्रहण ता. २ जुलई इ०स० पूर्वी ९४० या वर्षी म्हणजे रामाचे वयाचे २१ वर्षी व राज्याभिषेककाळीं झालेलें दिसतें. तत्कालीन स्पष्ट ग्रह येणेंप्रमाणें येतात.

रवि	चंद्र	केतु	बुध	मंगळ	गुरु	शनि	शुक्र
२	२	३	२	२	२	३	३
२९	२९	९	१६	४	१९	०	८
५	५	०	०	०	०	०	०
३४	३४	०	०	०	०	०	०

वरील ग्रह श्लोक १० मध्यें वर्णन केल्याप्रमाणें येतात. मात्र शनि हा २ अंश कमी घेतला पाहिजे. यूरोपीय ग्रहाहून शनि २ अंश मागें हल्लींचे पंचांगांतही आहे.

रामाचे वयाचे २१ वे वर्षी किंवा इ०स० पूर्वी ९४० ता. २ जुलईचे ग्रहावरून असें दिसतें कीं, पुष्य नक्षत्र आणि कर्कारंभ यांचा मेळ आहे. कारण रविचंद्र पुष्यावर आले आहेत. पुष्य नक्षत्राचे प्रथम चरणांत कर्कारंभ होतो असें मानलें तर ३अंश २०कला हा भाग मानावा लागतो. रामजन्मवर्णनांत कर्कारंभ व पुनर्वसु-आरंभ आहे म्हणून पुष्याचे अंश ३ कला २० यांत पुनर्वसूचे अंश १३ व कला २० मिळवितां बेरीज १६अं. ४०क. येतात. संपात १अं. जाण्यास ७२ वर्षे लागतात, तेव्हां १६अं. २०क. ×७२=१२०० वर्षे. रामाचा जन्म इ.स. पूर्वी ९६१ आहे. सिंहासनाचे काळीं इ.स. पूर्वी ९४० हें वर्ष आहे. तेव्हां १२००–९४०=२८० (इ.स.नंतर) या काळीं रामायण रचणारा कोणी मनुष्य होतो व तो वाल्मीकि

ऋषि नव्हता. कारण या काळीं इतिहासांत कोणीही ऋषि दिसत नाहीं. इसवी सनाचे तिसरे शतकांत गुप्तलेखावरून चैत्रारंभ मानलेला दिसतो व रामाचा जन्म चैत्रांत वर्णन केला आहे तेव्हां रामायण रचणारा कवि इसवी सनाचे तिसरे शकांत दिसतो.

लेलेकृत रामायण पृ० २९ मध्यें ऋष्यशृंग ऋषीनें समाधी लावून दशरथ राजास पुत्र प्राप्त करून देण्याचें साधन "पुत्रप्राप्तिसाधनभूत इष्टि" करण्यास सांगितलें आहे. अथर्व वेदोक्त मंत्राच्या योगानें मी तुजकडून पुत्रप्राप्ति होण्याकरितां कल्पसूत्रामध्यें प्रसिद्ध असलेली पुत्रप्राप्तिसाधनभूत इष्टि करवीन असें वर्णन सर्ग १४ श्लो. १ मध्यें दिलें आहे त्याचा विचार करूं.

ऋग्वेदरचनाकाळीं वसंतसंपात कृत्तिकानक्षत्रीं होता. हा काल सनापूर्वी १५०० वर्षांचा आहे. या काळीं आर्य लोक सिंधुतीरीं होते. नंतर यजुर्वेदरचना झाली. या काळीं पुनर्जन्माची कल्पना निघाली असून त्यावेळीं आर्य लोक गंगा व यमुना प्रांतीं होते. नंतर सामवेद रचना झाली. यावेळीं आर्य लोक हस्तनापूर अथवा दिल्ली या प्रदेशांत राहिले. गीतेंत कृष्ण मी सामवेद आहे असें म्हणतो. कृष्णाचा काळ इ० स० पूर्वी ९४० हा आहे. यावरून एक हजर वर्षपर्यंत वेद तीनच माहीत होते. अथर्ववेद हा ग्रंथ कृष्णकाळानंतरचा आहे, म्हणून त्या अनुरोधानें पुत्रकामेष्टी यज्ञ करणारा दशरथ येणें संभ[illegible]. दशरथ राजास शृंग ऋषीनें पुत्र प्राप्त करून दिला, या परंपरेचे कथेस अनुसरून कवीनें अथर्व वेदाची व कल्पसूत्राची कल्पना मागील काळांत ढकलली!

सूत्रकाल इ०स० पूर्वी ५०० चे सुमारास आहे. अथर्व वेदाचे कर्ते यांचा काळ प्राचीन नाहीं म्हणून रामायण रचनारा कवि इ.स. ९०० पूर्वीचा नाहीं. तो इ० स० पूर्वी ४०० वर्षांचे सुमारास

असावा, म्हणून हाच वाल्मीकीही असेल. परंतु राशींचे भाषेंत रामजन्म वर्णन करणारा कवि मात्र इ०स०नंतर २८०या सुमारास होता. त्याचे वेळीही जन्मवर्णन देतांना वार, करण आणि योग यांचा उल्लेख राम पत्रिकेंत नाहीं! सारांश सायन किंवा निरयन पंचांगांत ज्याप्रमाणें कलियुग गतवर्ष चुकीचें दिलें जातें त्याच प्रमाणें रामनवमी आणि चैत्रमहिना यांची व्यवस्था आहे. गणितास अनुसरून रामनवमी फाल्गुन महिन्यांत केली पाहिजे. किंवा चैत्रांत करणें असेल तर ती अष्टमीस केली पाहिजे. धर्मशास्त्रकारानें आपला अभिप्राय जो दिला आहे त्यास गणिताचा आधार नाहीं. येणेंप्रमाणें रामजन्म विचार करितांना अवश्य तेवढा विचार करून पंचांगशोधनकमेटीपुढें सर्व मतें ठेविलीं आहेत. त्यांत एकत्रता नाहीं म्हणून रामजन्म पंचांगांतून काढून टाकावा हें जास्त बरें. खोट्या दिवशीं उपास करण्यापासून मोक्ष मिळणार नाहीं. धर्मशास्त्राची आज्ञा पाळण्यास गणिताचा आधार नाहीं. नवमी, पुनर्वसुनक्षत्र आणि मेषेचा उच्च रवि यांचा गणितानें मेळ बसत नाहीं, म्हणून रामजयंतीचा विचार पुरा करून कृष्णजयंतीचा विचार करूं.—

कृष्णजयंति.—रामजन्म काळाचें वर्णन रामायणांत इ.स.चे २८० या वर्षी दाखल झालें व ग्रंथरचनेचा काळही तोच दिसतो म्हणून कृष्णाचें जन्मवर्णन राशींचे भाषेंत जें दिसतें तेंही या कालानंतरचें होय. कृष्णजन्म श्रावण कृ० ८स मघा नक्षत्रीं व चंद्र रोहिणी नक्षत्रीं असतांना कारितात. कृष्णजन्म जो मानला आहे त्या वेळीं मंगळ, बुध आणि शनि हे ग्रह आपापल्या उच्च राशींत होते. चंद्र वृषभेंत, गुरु मीनेंत व राहु तूळेंत होता.

कृष्ण व पांडव समकालीन आहेत. भारत ग्रंथांत चैत्रादि मास-

संज्ञा आहेत. आणि त्या इ० स० चे पूर्वी १८२२ च्या सुमारास प्रचारांत आल्या आहेत. चैत्रांत वसंत आला, त्या वेळीं चैत्रादि मासप्रवृत्ति पडली (भा. ज्यो. पृ० १३१)

वेदांत अर्जुन आणि कृष्ण ही भारतांतील जोडी आहे. वेदांत हीं नावें भारतांतील पुरुषांचीं जर आलीं असतील तर तीं इ० स० पूर्वी ५४० चे सुमारास आलीं पाहिजेत. वेदांत अर्जुन ह्मणजे उजेड अथवा प्रकाश या अर्थी हा शद्ब वापरला आहे. कृष्ण ह्मणजे अंधकार किंवा काळोख या अर्थी तो शद्ब वापरला आहे. वेदांचें ठिकाण उत्तर ध्रुवाकडे होतें असें रा. टिळकांचें मत आहे. उत्तरध्रुवदेव आणि दक्षिणध्रुवदेव यांची कल्पना नक्षत्रपुंजांतून व त्याच प्रमाणें प्रसिद्ध पुराणांतील वीरांची योजना केलेली दिसते. कृष्ण आणि बळीराम हे क्रमानें रोहिणीसुत आणि कृत्तिकासुत ह्मणजे रोहिणी व कृत्तिका या नक्षत्रांपासून जन्मले असें वर्णन वेदांत, भारतांत व भागवतांही सांपडतें. रोहिणीजवळील नक्षत्र मृग आहे. मृग हें पांचवें नक्षत्र असून तें मिथुन राशीचे आरंभीं आहे. अर्जुन अथवा उत्तरध्रुवदेव याचें ठिकाण मृगावर आणि कृष्ण अथवा दक्षिणध्रुवदेव किंवा काळोख याचें ठिकाण धनु राशींत आहे. धनु राशींतील नक्षत्रें मूळ, पूर्वाषाढा आणि उत्तराषाढा हीं होत. अभिजित् हें नक्षत्र पूर्वाषाढा आणि उत्तराषाढा यांमधील होय. धनु राशींत सूर्यानें प्रवेश केला ह्मणजे त्या महिन्यास मृगशीर्षमास असें ह्मणतात. या वेळीं रवि १९वें नक्षत्र जें मूळ त्यावर आणि चंद्र मृग जें पांचवें नक्षत्र त्यावर असतो. " मासानां मार्गशीर्षोऽहं नक्षत्राणाम् तथाभिजित् [भ्ली. २७-१५] धनु राशींतील अश्व-स्वार याची आकृति ती रामायणांतील दशरथ होय, तीच अर्जुन होय. अर्जुनास नर ह्मणत असत, त्यास स्तन नव्हते. अश्वास स्तन नसतात ह्मणून अर्जुन आणि अश्व एकच होत.

अर्जुन आणि कृष्ण ह्मणजे उत्तर-दक्षिण ध्रुव-टोकें होत. उत्तर ध्रुवाकडे मृग अथवा ओरायन हा उत्तर ध्रुव आहे. बाबिलोनियाचा निमराड अथवा मायटी हंटर तो मृग तारा होय. हाच वेदांतील मृग अथवा धनुर्धारी अर्जुन होय, हाच कृष्ण होय. कृष्णाचा बंधु हलधर ह्मणजे नांगर धरणारा तो कृत्तिकासुत आहे. अर्जुन शद्बांतील प्रथम अक्षर जें 'अ' हें अश्विनी नक्षत्रांतील प्रथम जें 'अ' हें आहे. अश्विन्यादि नक्षत्रक्रमांतील अश्विनी नक्षत्र पहिलें आहे व तेथेंच वसंताचा आरंभ आहे. वसंतसंपात तारात्मक मृगांवर असतांना उत्तरध्रुवदर्शक अर्जुन अथवा प्रणवांतील आद्याक्षर जें 'अ' तें मृगावर आहे. अर्जुनास फाल्गुन हें दुसरें नांव आहे.

पैत्रे चंद्रसमायुक्ते मुहूर्तेऽभिजितेष्टके ॥
दिवा मध्यगते सूर्ये ते नतं फाल्गुनं वदेत् ॥

(महाभारत)

वरील वर्णनावरून चंद्र ज्येष्ठा नक्षत्रीं असतांना मध्य दिवशीं सूर्य उत्तरा फाल्गुन नक्षत्रावर असतांना अर्जुन जन्मला ह्मणून त्या नक्षत्रान्वयें फाल्गुन हें नांव दिलें. उत्तरा फाल्गुनी नक्षत्र सिंह राशींत ह्मणजे क्षत्रिय वर्णांत आहे. अर्जुन हा मेष या क्षत्रिय वर्णांत आहे. धनु राशींतील मूळ या नक्षत्रावर आहे. मूळ या नक्षत्रांतील 'भ' हें अक्षर प्रणवांतील तिसरें आहे. धनुराशि ही क्षत्रियवर्णदर्शक आहे. ह्मणून अर्जुन जो क्षत्रिय तो अ-उ आणि म मिळून ॐकार झाला आहे. धनु राशींत ॐकार पूर्ण होतो ह्मणून धनु राशींतील गुप्त नक्षत्र जें अभिजित् तें भगवंत बनलें! मृग व संपातानुरोधें अर्जुन अथवा अश्विनी नक्षत्र यांचा उत्तर ध्रुवाकडे मेळ आहे ह्मणून भागवतांत " संवत्सरोऽसनिमिषामृतूनां मधुमाधवौ ॥ मासानां मार्ग-

शीर्षेंहं नक्षत्राणां तथा भिजित् ॥" असें वर्णन आलें. हें सर्व वर्णन आकाशस्थ अर्जुन व कृष्ण यांचें आहे व हें कल्पित आहे कारण पांडव या काळीं नव्हते. ह्मणून हें वर्णन मागाहून तयार झालेलें आहे असेंच मानावें लागलें.

मृगावर वसंत संपात शालिवाहन शकाचे पूर्वी ४००० वर्षांचे सुमारास होता. ऋग्वेदकाळीं तो कृत्तिकेंत शकापूर्वी ३००० वर्षांचे सुमारास होता. ऋग्वेद हा अत्यंत प्राचीन वेदाचा भाग होय तेव्हां अर्जुन आणि कृष्ण ऋग्वेदरचनेपूर्वीचे पुरुष मानणें युक्त दिसत नाहीं. कारण तें वर्णन वेदास विरोधी आहे. मृगापूर्वी संपात पुनर्वसूवर होता. पुनर्वसूवरून संपात मृगावर येण्यापूर्वी तो आर्द्रानक्षत्रीं होता, व उदगयन रेवती नक्षत्रावर होतें. वेदांत फाल्गुन हा वर्षारंभ आहे. 'न पूर्वयाः फल्गुन्योरनिमादधीत ॥ ऐषा वैजधन्या रात्रिः संवत्सरस्थ ॥ यत् पूर्वे फाल्गुनि [तै.ब्रा. १-१-२] अर्जुन अथवा फाल्गुन हा उत्तरा फाल्गुनीवरील रवि होय. हा उदगयन प्रवृत्तीचा दर्शक होय. फाल्गुन हा महिना वसंताचा आरंभ होण्याचा काल इ. स० चे आरंभाचा होय. ह्मणून पुनर्वसु—आर्द्रांत वसंत असतांना उदगयन उत्तराभाद्रपदा व रेवतीवर येतें. शारदसंपात पूर्वाषाढा किंवा उत्तराषाढा यांमध्यें ह्मणजे अभिजितावर येतो. अर्जुन आणि कृष्ण हा एक देह आहे.—पांडवानां धनंजयः मी० अ० १० श्लो. ३६ ज्ञानेश्वराची टीका—आणि सोमवंशीं तुह्मां पांडवांमाजि अर्जुन (ॐकारांतील आद्याक्षर अथवा प्रणवांतील आद्याक्षर) तो मी जाणावा ॥ ह्मणोनि एकमेकांचिया प्रेमभावा ॥ विघड न पडे ॥९३॥ संन्यासी तुवां होउनी जनीं ॥ चोरुनी नेली माझी भगिनी ॥ तरी विकल्प नुपजे मनीं ॥ मी तूं दोन्ही स्वरूप एक ॥९४॥

पत्रव्यवहार.

[१]

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

वि०वि०—सोबत पाठविलेला लेख कै० जीवन त्रिंबक चिटणीस यांनीं आपले मकर संक्रांतीबद्दल छापलेल्या मजकुरास रा. सा. केतकरांनीं जें उत्तर दिलें तें वाचल्यावर कांहीं उत्तरादाखल लिहावें ह्मणून लिहिला होता. लेख बराच लांब व चांगला लिहावयाचा त्यांचा मानस होता ह्मणून प्रथम लिहिलेला मजकूर आपणाकडे पाठविला नाहीं. परंतु त्यांचे अकाली मृत्यूनें बरींच कामें बाकी राहिलीं त्यांत हाही लेख पुढें लिहिण्याचा राहिला. या लेखावरून त्यांचें काय मत होतें तें कळेल ह्मणून तो आपणाकडे पाठवीत आहें. कळावें लोभ असावा हे विनंति.

आपला.

यशवंत केशव प्रधान.

" रा० रा० कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

वि०वि०—खालील मजकूर आपले वाचकांसाठीं पाठविला आहे, तो कृपा करून प्रसिद्ध व्हावा.

ज्यो० रा० केतकर यांनीं प्रसिद्ध केलेला लेख व त्यावरील आपलें चालू असलेलें उत्तर यांचा व खालील लेखाचा संबंध दिसला ह्मणून ही माहिती पाठविली आहे.

रा. केतकरांचें **फराळाचें बेळगांव** ऊर्फ निरयण नक्षत्रांचा भाषा पाहून सायनवादी लोक मेल्यावर अशी गर्जना होणें शक्य आहे! परंतु केतकरांचें पंचांग, छत्रेपंचांग व इतर पंचांगें यांत

निरयण नक्षत्रांचा बोध मुळींच नसतो. नक्षत्रांचें गणित विभागात्मक ह्मणजे १३ अंश २० कलांचें असतें. परंतु ह्या प्रमाणें आकाशांत नक्षत्रें नसतात.

रा० केतकर हे प्राचीन ऋषींचे पक्के अभिमानी. तेव्हां त्यांचे समजुती करितां गर्गसंहितेंतून नक्षत्रें देतों तीं येणेंप्रमाणें.—

१	अश्विनी	१३अं. २०क.	७	पुनर्वसु	९३अं. २०क
२	भरणी	२०—०	८	पुष्य	१०६—४०
३	कृत्तिका	३३—२०	९	आश्लेषा	११३—२०
४	रोहिणी	५३—२०	१०	मघा	१२६—४०
५	मृग	६६—४०	११	पूर्वा	१४०—०
६	आर्द्रा	७३—२०	१२	उत्तरा	१६०—०
१३	हस्त	१७३—२०	२१	उत्तराषाढा	२७६—४०
१४	चित्रा	१८६—४०	२२	अभिजित्	२८०—४०
१५	स्वाती	१९३—२०	२३	श्रवण	२९३—२०
१६	विशाखा	२१३—२०	२४	धनिष्ठा	३०६—४०
१७	अनुराधा	२२६—४०	२५	शततारका	३१३—२०
१८	ज्येष्ठा	२३३—२०	२६	पूर्वाभाद्रपदा	३२६-४०
१९	मूळ	२४६—४०	२७	उत्तराभाद्रपदा	३४६-४०
२०	पूर्वाषाढा	२६०—०	२८	रेवती	३६०—०

रोहिणी, पूनर्वसू, उत्तरा, विशाखा व उत्तराभाद्रपदा या नक्षत्रांचे अंश १४ अंशांहून जास्त आहेत। भरणी, आश्लेषा, अभिजित् व व शततारका यांचे अंश ८ अं. चे आंत आहेत। या वरून केतकरांचें बेळगांव हें 'बळी गांव' ह्मणजे बळीचें गांव दिसतें. पुराणांतील बळी पाताळांत गुप्त झाला आहे, त्याप्रमाणें निरयन गणनाही गुप्त झालेली आहे. प्राचीन काळचे इतिहासावरून नक्षत्रांचे वेध व व ग्रहांचे वेध मिसर देशांत इ० स० पूर्वी निदान एक हजार वर्षांचे पूर्वी झालेले आहेत. मिसर [illegible]चा राजा नाईस्सास हा त्या वेळीं

राज्य करीत होता (७७२ स. पूर्वी) या राजाचे पूर्वी आमान, सेस्याफ, ओरुस आणि मेमनान हे राजे होऊन गेले. त्यांनीं नक्षत्रपुंज बनविले. ह्मणजे अश्विन्यादि नक्षत्रक्रम सुरू केला. पेटी; सोरीस नांवाचा एक पंडित नाईस्पास राजाजवळ होता. त्यानें फलादि ग्रंथ केला. मिसरी लोकांवर परचक्र स० पूर्वी ७९१ चे सुमारास आलें. तेव्हां ते बाबीलोनिया येथें आश्रयास गेले. बाबीलोनियन लोकांस नक्षत्रांचें ज्ञान मिसरी लोकांकडून मिळालें. आमाब राजाचे वेळीं नक्षत्रांचें ज्ञान आफ्रिका, यूरोप व आशिया खंडांत पसरलें. आटलास नांवाचे मनुष्यानें इ० पू० ९६६ चे सुमारास नक्षत्रांचें ज्ञान संपादन केलें. ग्रीकांस सनापूर्वी ९३९ चे सुमारास नक्षत्रज्ञान झालें. ही माहिती प्रसिद्ध न्यूटनचे ग्रंथांतून घेतली आहे. नक्षत्रांचें ज्ञान मिळाल्यावर त्यांचा फलादि ग्रंथांत समावेश झाला. हा काळ सनापूर्वी ७९१ चा आहे. नंतर क्याल्डी लोकांस नक्षत्रांचे विभाग व त्यांचे गुण कळले. नंतर झोऱ्याष्टरला कळले. झोऱ्याष्टर गुस्ताप राजाचा गुरु आहे. गुस्तापला ऍरीयस हिस्टापसीस असें ह्मणतात. याचा काळ स० पूर्वी ५२० चा आहे. हा भारती युद्धकालीं होता. हा व झोऱ्याष्टर मिळून कक्षीवाहन व त्याचा पिता दीर्घतमा ऋषि यांची निंदा करतात. (ऋ. मं. १–१२२–१३) दीर्घतमा ऋषीपासून अंग देशाचे राजाचे दासीचे ठिकाणीं जो पुत्र उत्पन्न झाला तो कक्षीवाहन आहे. अंग देशाचा राजा भारती युद्धांत होता असें भारत सांगतें. ह्मणून पांडवांचा काळ ऐतिहासिक बाजूनें स० पूर्वी ६ वा शतक ठरतो हाच शतपथ ब्राह्मणाचा काळ आहे. त्यांत २७ नक्षत्रें आणि २७ उपनक्षत्रें असा उल्लेख आहे. अभिजित् नक्षत्र गाळलें गेलें. महाभारतांत अभिजित् नक्षत्र आकाशांतून नाहींसें झालें असें वर्णन आहे [वनपर्व अ० २३०–८]

वरील वर्णनावरून नक्षत्रें निरयन मानलेली दिसत नाहींत. २७ उपनक्षत्रें तीं सायन व दुसरीं तीं निरयन अशी कल्पना संभवत नाहीं. कारण, सप्तऋषींचें भ्रमण २७०० वर्षांत होतें ही प्राचीन समजूत असून रामायणांतील युद्धकांडांचें वर्णन [४६४९] भारतांतील युद्धकालचें वर्णन, राम, रावण व दुर्योधन यांचीं नामदर्शक नक्षत्रें मानलेलीं असून तेथें सप्त ऋषि, त्रिशंकु, राक्षसांचा, धूमकेतूनें पीडित झालेल्या नक्षत्रांचा व ग्रहांचा उल्लेख आहे. ही ध्रुवात्मक गणना सायन व निरयन पद्धतींत येत नाहीं. गौतम बुद्धाचे समकाळीं ही गणना होती. महावीर पंथाचा स्थापनकर्त्ता मेला त्या वेळीं भस्मराशि नक्षत्रांत क्रूर ग्रह होते असें वर्णन जैन ग्रंथांत आहे. त्या वर्णनांत ८० नक्षत्रांची यादी आहे. सारांश, नक्षत्र हा शब्द प्राचीन काळीं निराळ्या अर्थानें समजत असावेत. तो पंचांगकमेटीस मान्य नाहीं किंवा तींतील विद्वानांस अद्याप कळावयाचा आहे.

टालमीचे ग्रह व गर्गसंहितेंतील ग्रह रविमध्यस्थ पद्धतीचे आहेत, व तेच कालिदासाचे फलितें ग्रंथांत आहेत. टालमीनें केंद्रास फलसंस्कार दिला. नंतर ग्रह भूमध्यस्थ झाले. अर्थात् सनापूर्वी १५०चे सुमारास सायननिरयन शब्दच उपलब्ध होत नाहींत. तेव्हां रा० केतकरांचें अनुमान गणितानें त्याज्य होय.

क्याल्डी लोकांत २८ नक्षत्रें समान अंतरांचीं मानलेलीं आहेत. ह्मणजे दरएक नक्षत्र १२$\frac{6}{7}$ अंशांचें आहे. मिसरी, क्याल्डी नक्षत्रें सायन आहेत. ह्मणून केतकरांचे मतास आधार दिसत नाहीं. कळावें हे विनंति. ”

मुंबई १३–१–०९

---

[२]

रा० रा० कुंडलीविज्ञानकर्ते यांस

सा.न.वि.वि.—खालीं लिहिल्याप्रमाणें येत्या अंकांत प्रसिद्धी व्हावी.

देवराष्ट्रें गांवीं अरण्यामध्यें डोंगरांत गांवापासून पाऊण मैलावर श्री शंकराचें रमणीय महास्थान असून सभोवतीं दुसरीं देवळेंही पुष्कळ आहेत. श्री शंकराचें देवालय मोठें असून नजीकच उदकाचीं तीन कुंडें आहेत तीं चांगलीं बांधींव आहेत. यांतच एक विमल तीर्थाचें कुंड आहे. त्याचा महिमा अगाध आहे. यांतील पाण्यानें कुष्ठ, कृमि महारोग इ० व्याधि दूर होतात असा त्याचा साक्षात्कार आहे. हल्लीं एक मनुष्य तेथें सेवा करीत असून त्याचें कुष्ठ जात चाललें आहे. अशा ठिकाणीं एक जुनाट मोठा आम्रवृक्ष उदकाचे कुंडाजवळच होता. त्याच्या छायेखालीं तीन वाटसरू बाया देवाचें दर्शन करून उपहार करीत बसलेल्या होत्या व एक मनुष्य कुंडांत पाण्यानें घागर भरीत होता. इतक्यांत तो वृक्ष मोडून खालीं पडला! तो इतका मोठा होता कीं, त्याच्या विस्ताराचीं लांकडें सुमारें ७५ गाड्या होतील. या वृक्षाखालीं अर्थात्च वरील सर्व, मनुष्यें सांपडलीं परंतु चमत्कार असा कीं, श्रीचे कृपेनें त्यांस काडीमात्र इजा झाली नाहीं! या कालाची कुंडली खालील प्रमाणें आहे.

ता. २७ जून सन १९०९ दिवसास ११ वाजण्याचे सुमारास.

निरयन

यावेळीं सिंह लग्न उदित आहे. लग्नस्वामी रवि हा एकादश स्थानीं शत्रुग्रहानें युक्त आहे. सुखस्थानाचा अधिपति मंगळ सप्तमांत शत्रुगृहीं आहे. सुखस्थान पाप ग्रहानें दूषित केलें आहे. लग्नावर केतु व मंगळ या पाप ग्रहांची दृष्टि आहे. शनि व चंद्र हे समोरा-समोर आहेत. राहु व मंगळ हे एकमेकांचे दृष्टींत आहेत. चंद्रावर मंगळ पाहतो. सुखस्थानाचा अधिपति केतु व शनि यांच्या कर्तरींत आहे. याप्रमाणें एकाच वेळीं इतके ग्रह बिघडले ह्मणून अपघात प्राप्त झाला.

लग्नीं गुरु सिंह राशींत तोच अष्टमाधिपति असुन केंद्रीं असल्यानें लग्नस्वामी रवि लाभस्थानीं असल्यानें, एकादश स्थानीं शुक्र मित्र-क्षेत्रीं असल्यानें, मृत्युस्थानीं रक्षक शनि असल्यामुळें अपघातांत कोणाचाही नाश झाला नाहीं.

या लेखाची निरयन पद्धतीनेंच प्रसिद्धी व्हावी. कळावें लोभ असावा हे विनंति.

महादेव गंगाधर कुळकर्णी.

☞ कुंडलींत बुध चुकीचा आहे. तो वृषभ राशींत पाहिजे. हीच कुंडली सायन करून मांडल्यास काय निष्पन्न होतें तें पाहूं.—

ता० २७ जून १९०९ दि० ११ वा०

सायन भावचलित.



चतुर्थ स्थानीं धनु ही अपघाताची रास आहे. चतुर्थ स्थानाचा मुख्य अधिपति शनि हा मंगळाच्या घरीं नीच आहे. मंगळ हा लग्न व चंद्र यांस पाहत आहे, ह्मणून ही अपघाताची वेळ होती, इतकेंच आपणास समजलें. जनतादर्शक चंद्र हा शनीच्या समोर आला आहे. या दिवशीं १२वाजून ४० मि.नीं चंद्र हा शनीच्या बरोबर समोर येणार होता! अर्थात् ही वेळ फार वाईट होती. चंद्र हा शनीशीं युत, दृष्ट अथवा संमुख असतां ती वेळ नाशाची आहे असें समजावें. कुंडली मांडून आपणास इतकेंच समजणारें अ.हे कीं, मंगळाच्या दृष्टींतून चंद्र नुकताच सुटला होता व तो शनीच्या दृष्टींत थोडक्याच काळानें येणार होता व या चंद्राच्या चतुर्थस्थानीं हर्शल

हा अकस्मात् भय उत्पन्नकर्त्ता ग्रह होता म्हणून ही वेळ अपघाताची आहे. अशा वेळीं ज्यांस अपघाताचें भय विशेष आहे त्यांनीं सावधगिरीनें वागावें. झाडाखालीं सांपडलेलीं मनुष्यें अशा प्रकारचींच असलीं पाहिजेत परंतु त्यांस तारक ग्रह कोणीतरी बलवत्तर असल्यामुळें त्यांचा नाश झाला नाहीं! त्यांच्या सुटकेचें कारण त्यांच्याच कुंडलींत असावयाचें. तें या कुंडलींत आहे हें म्हणणें बरोबर नाहीं.

मंगळ हा केतु व शनि यांच्या कर्तरींत आहे हें म्हणणें खरें नाहीं केतूपासून मंगळ चवथ्या राशीवर आहे व शनि दुसऱ्या राशीवर आहे म्हणून तो कर्तरींत नाहीं. रवि हा शत्रुग्रहानें युक्त आहे असें म्हटलें आहे. पण रवीचा शत्रु जो शुक्र तो रवीपासून १६ अंश दूर आहे व तो रवीच्या पुढें गेलेला आहे. अर्थात त्याचा रवीवर कांहींही परिणाम घडणें शक्य नाहीं रवीचा वास्तविक शत्रु [illegible]ने आहे. त्याचा अनिष्ट परिणाम ज्या मानानें घडतो त्या मानानें शुक्राचा कांहींच घडत नाहीं. रविशुक्र योगाचें फल राजयोगासारखें आहे. पण रविशनि योगाचें फल घातक, आहे, तसें रविशुक्र योगाचें नाहीं. अकल्पित गोष्टी हर्शलच्या प्रभावानें घडतात, म्हणून अशा वेळीं हा ग्रह विचारांत घेतला पाहिजे.

सायन कुंडलींत चंद्राची जशी स्थिति आहे तशीच लग्नस्वामी जे बुध व शुक्र यांचीही आहे. बुध हा मंगळाच्या दृष्टींतून एक अंशानें सुटला आहे व तो शनीच्या दृष्टींत येण्यास सुमारें २ अंश कमी आहेत. शुक्र हा हर्शलच्या दृष्टींतून सुटला आहे. याप्रमाणें लग्नस्वामी व चंद्र हे अरिष्ट सूचक झालेले होते.

संपादक—कुंडलीविज्ञान—

वर्षफल,

[पाश्चात्य पद्धति.]

कुंडलीविज्ञानचे मागील दोन अंकांत पाश्चात्य पद्धतीनें वर्षफलाचें गणित कसें करावें, याचें सविस्तर विवेचन केलें आहे. आज गणितानें येणाऱ्या दृष्टियोगांचे परिणाम कसे काय होतात या विषयीं सांगावयाचें आहे.

आपण वार्षिक दृष्टियोग काढल्यानंतर त्या दृष्टयांचे परिणाम बरे किंवा वाईट आहेत हें आपणास ग्रहांचे गुण व दृष्टींचे धर्म ह्या प्रमाणें ठरविले पाहिजेत. त्याच प्रमाणें होणाऱ्या दृष्टियोगाच्या परिणामाची मर्यादा, शक्ति व ग्रहांचें बल, तो ज्या राशीस ज्या ग्रहाकडून दृष्ट असेल त्याप्रमाणें ठरविले पाहिजेत. त्यांत शुभ गोष्टींच्या विरुद्ध होणारे किती अशुभ दृष्टियोग आहेत ह्याचाही पूर्ण विचार केला पाहिजे. वार्षिक दृष्टियोग कोणत्या स्थानांत घडतात ह्याचा पूर्ण विचार करावा. लहान मुलांचे कुंडलींत होणारे वार्षिक दृष्टियोगांचा परिणाम त्यांचे आईबाप किंवा पालक यांचेवर घडतो असें आढळण्यांत येतें.

• प्रथम दृष्टियोग उत्पन्न करणाऱ्या ग्रहाच्या गुणधर्माचा पूर्ण विचार करावा व तो जन्मकालच्या दुसऱ्या ग्रहांशीं कोणत्या स्थितींत आहे याचा विचार करावा. व त्याच वेळेस दुसरे आणखी कोणते वार्षिक दृष्टियोग झाले आहेत ते पहावे. नंतर जन्मणाराचे स्थित्यनुरूप फल वर्तवावें.

लग्नास होणारे वार्षिक दृष्टियोग दृष्टि करणाऱ्या ग्रहाचे गुण-

धर्माप्रमाणें शरीराचे किंवा स्वतः विषयींचे सर्व व्यवहार दर्शवितात. जसें.—दुखणीं, शारीरसामर्थ्य, मुलांचे जन्म अगर मृत्यु, मानसिक विचार इ० जर जन्मकुंडलींत लग्न हें आयुष्यकारक स्थान असेल तर लग्नास होणारे वार्षिक दृष्टियोगापासून शरीरप्रकृति निर्बल होऊन रोगाचें माहेरघर होतें.

दशमास होणारे वार्षिक दृष्टियोग कर्मस्थानदर्शक गोष्टी घडवितात. जसें.—धंदा, रोजगार, लोकांत मानमान्यता, कीर्त्ति, अब्रू बढती इ० जर शुभ दृष्टियोग होत असेल तर चांगल्या गोष्टी घडतात, व अशुभ दृष्टियोग होत असेल तर संकटें प्राप्त होतात. संपत्तिदर्शक चिन्हास होणारे वा०दृ०यो० सांपत्तिक स्थिति व कांहीं अंशीं कुटुंबांतील गोष्टी दर्शवितात. संपत्तिदर्शक चिन्ह व आयुष्यकारक स्थानें याचें सविस्तर विवेचन पुढें करावयाचें आहे.

सर्वसाधारण नियम.

१ शनि हा लग्नाशीं वाईट दृष्टियोग करील तर थंडीपासून आजार, बरेच दिवस टिकणारीं दुखणीं, जलराशींत असतां बुडण्याची व जलोदर होण्याची भीति असते. वायु व अग्नि राशींत असतां पडून लागण्याची व जखम होण्याची भीति असते पृथ्वी राशींत चेंगरून हाडें मोडणें व जिवंत पुरलें जाणें इ०ची भीति असते.

शनीचे दशमास होणारें वाईट दृष्टियोग नातेवाइकांचे मृत्यु, धंद्यांत अडचणी व ह्यातान्या माणसाकडून त्रास, नोकरींत हानि व त्रास या गोष्टी उत्पन्न करितात.

शनीचे रवीस झालेले वाईट दृष्टियोग वर सांगितल्या प्रमाणें फळें उत्पन्न करितात. बापास त्रास, वरिष्ठाशीं किंवा अधिकारी लोकांशीं तंटे व भाऊबंदांपासून त्रास उत्पन्न होतात.

शनीचे चंद्राशीं वाईट दृष्टियोग होत असतील तर शरीर प्रकृति बरीच निर्बल व दुखण्यानें त्रस्त होत. व ते दिवस अतिशय त्रासाचे व हालाचे जातात.

शनीचा संपत्तिदर्शक चिन्हाशीं वाईट दृष्टियोग झाला तर स्थावर मिळकतीचा अनेक प्रकारें नाश होतो व तो बहुतकरून नकळत होतो.

शनीचा १२० अं. वा. दृष्टियोग अथवा ६० अं. सूर्य, चंद्र, लग्न, दशम व संपत्तीदर्शक चिन्ह यास होईल तर फारच उत्तम. ह्या कालांत वडील माणसांपासून फायदा, मृत्युपत्राधारें मिळकत किंवा शेतीभाती घरेंदारें इत्यादिकांचे व्यवहारापासून फायदा होतो.

२ गुरूचे वा. शुभ दृ. योग रवि, चंद्र, लग्न दशम व संपत्तीदर्शक चिन्ह यांशीं ज्या कालांत घडतात ते काल फारच सुखाचे व भरभराटीचे जातात. पैशांसंबंधी अडचण पडत नाहीं. नवीन मैत्री, मानसन्मान, मुलें होणें इ० चांगल्या गोष्टी घडतात. शरीरप्रकृति चांगली राहते. ह्या ग्रहाचे शुभदृष्टियोगांत लग्न होईल असें ह्मणतां येत नाहीं. या ग्रहाचे वर सांगितलेले ग्रहांस व स्थानांस ४९, १८०, ९० अथवा १३९ अंश दृ. यो० होईल तर धर्मगुरु, म्याजिस्ट्रेट, घरवाले जमीनदार इ० लोकांशीं मांडणें होतात. प्रवासापासून किंवा व्यापारापासून तोटा होतो. परंतु हें पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, जर जन्मकुंडलींत गुरु चांगला असला तर वरील गोष्टी घडतील असें सांगवत नाहीं. व झाल्या तर त्यांचें स्वरूप फारच मंद असेल. परंतु जर गुरु अति बिघडलेला असेल तर अनुभव पूर्ण येईल.

३ **मंगळ** या ग्रहाचे वाईट द० योग रवि, चंद्र, लग्न, दशम व संपत्तिदर्शक चिन्ह यांस झाले तर अग्नि, शस्त्रें, बंदूक वगैरेपासून भीति, जखमा, जनावरांपासून भय, साथीचीं दुखणीं, नातेवाइकांचे मृत्यु इ० गोष्टी घडतात. वायुराशींत दृष्टियोग होत असल्यास पडण्यापासून भीति. अग्निराशींत ताप, अग्नीपासून भाजणें. पृथ्वीराशींत सांधीचे रोग व जलराशींत भाजणें, ऊन पाण्यानें फोड येणें, जळापासून भीति व सूज येणें वगैरे. मंगळ हा चोरांपासून त्रास उत्पन्न करितो. मिलिटरी लोक, पोलीस अधिकारी वर्ग यांपासून त्रास व अति संकटें उत्पन्न करितो.

रवि मंगळ यांची युति वाईट फल उत्पन्न करिते असें मानलें आहे. तरी जन्मकाळीं रवि चांगला बलवान् असून शुभ दृष्टीनें युक्त असेल तर त्या काळांत मानसन्मान व धंद्यांत तेजी उत्पन्न होते. ह्या ग्रहाचे १२०अं., ६०अं. द०यो० बहुतकरून मिलिटरी खात्यांत किंवा सरकारी नोकरींत बढती देतात. धंदा तेजीनें चालतो. कित्येकांस मुलें होतात. (बहुतकरून पुरुषसंतति असते.) लहान प्रवास, धंद्यांत बरकत व धंदा सर्जरी, वैद्यकी व रसायन शास्त्राचा असेल तर अथवा धातूचा व्यापार करणारा असला तर हे दिवस मोठे सुखाचे जातात. या ग्रहांचे बायकांचे कुंडलींत होणारे शुभ द० योगांत लग्नें होतात.

४ **सूर्य** हा ग्रह जर लग्नाशीं वार्षिक गतीनें युति करीत असेल व जन्म काळीं चांगला बलवान् असून शुभदृष्टियुक्त असेल तर मानसन्मान, अधिकारी व मोठे लोक यांचे पासून फायदे होतात. परंतु जन्मकुंडलींत वाईट स्थितींत असेल तर मस्तकास विकार होतात. तो अग्निराशीचा असून मंगळाकडून पीडित असेल तर भयंकर तापानें त्रस्त होतो.

दशमाशीं सूर्य युति करील व जर मूळचा चांगला असेल तर धंदा रोजगार वाढतो व मान वाढून पदवीसुद्धां मिळते. पण जर मूळचा मंगळयुक्त असेल तर वाईट फल मिळण्याचा जास्त संभव असतो.

जर चंद्राशीं वा० सूर्य युति करील तर त्या काळांत प्रवास होण्याचा जास्त संभव असतो. पण जर चंद्र मूळचा चांगला असेल तर नोकरींत किंवा धद्यांत लाभ होतो. चांगला नसेल तर मस्तकास कफवातात्मक पीडा होते. कित्येक प्रसंगीं डोळ्यास उपद्रव होतो. या वार्षिक दृष्टियोगांत लग्न होतें. पण चंद्र चांगला नसेल तर होणाऱ्या लग्नापासून सुख होत नाहीं. कारण या काळांत मनुष्य चंचल व फार खर्चीक होतो.

सूर्याचे लग्न, दशम, चंद्र व संपत्तिदर्शक चिन्ह यांस होणारे शुभ दृ० यो० किंवा त्याचे स्वतःचे मूळचे कुंडलींतील स्थानास ६० अं. दृ. योग लाभ, धंद्यांत भरभराट, नोकरींत बढती, लग्न मुलें होणें इ० चांगल्या गोष्टी घडतात.

मूळचा सूर्य जर चांगला असेल तर तो जेव्हां आपले स्वतःचे क्रांतिदृष्टींत येतो त्या वेळेस लाभ व धंद्यांत यश देतो. सूर्याचे वाईट दृ० यो० नें अपमान, काळीमा, मित्रांचा नाश, अपत्यांचे मृत्यु इत्यादि गोष्टी घडतात. जेव्हां तो आपले स्वतःचे स्थानास ४५ अंश दृष्टियोग करितो तेव्हां तो काळ वाईट असतो. व जर तो आपले स्वतःचे स्थानास ९० अंश दृष्टियोग करील तर तो काळ अति वाईट समजावा.

५ **शुक्र**—शुक्राचे वार्षिक शुभ दृष्टियोगांत शरीरसंपत्ति चांगली असते व मनोवृत्ति आनंदी व रंगेल असते. शुक्राचे शुभ दृ० यो.स बायकांपासून फायदे, लग्न, मुलें होणें इत्यादि गोष्टी घडतात. वाईट

द्व० यो० पासून स्त्रियांपासून त्रास, लग्नांत घोटाळे, निराशा, निंदा इ० गोष्टी घडतात.

जर मृत्युकाळीं येणाऱ्या वाईट द्व० यो०त शुक्राचा ९० अंश अथवा १८० अं० दृष्टियोग होत असेल व मूळचा शुक्र बिघडला असेल तर त्या मनुष्यास विषप्रयोग होऊन मृत्यु येण्याचा संभव असतो.

जेव्हां शुक्र दशमास १८० अं. द्व. यो. करितो, त्या वेळेस लग्न होतें. परंतु या वेळेस लग्न करणें **शुद्ध** वेडेपणा होय.

६ **बुध.**—बुधाचे वार्षिक शुभ द्व०यो०त प्रवास, स्थलांतर, धंद्यांत तेजी व कायद्याचे कामांत यश मिळतें. लहान मुलें किंवा तरुण माणसें, लेखक, पुस्तकें विकणारे वगैरे पासून फायदा होतो. वाईट द्व०यो०त वरील गोष्टींत त्रास होतो.

कुंडलींत बुधाचा अगोदर चांगला विचार केला पाहिजे. मुख्यत्वें हा ग्रह ज्याच्या क्रांतिदृष्टींत असतो त्याच्या गुणधर्माप्रमाणें आपले गुणधर्म दाखवितो. जर हा ग्रह कुंडलींत बिघडलेला असेल व तो ज्या वेळेस वार्षिक दृष्टीनें चंद्राशीं युति किंवा वाईट दृ०यो० करितो त्या वेळेस तो बरीच मानसिक दुर्बलता उत्पन्न करितो.

चंद्र.—या ग्रहाचा शुभ वार्षिक दृ०यो० लग्न, दशम यांशीं होत असेल तर त्या काळांत कांहीं तरी चांगलें स्थित्यंतर होतें. लांबचे, जलप्रवास, स्थलांतर, इत्यादि गोष्टी होतात. सूर्याशीं शुभ दृ०यो० होत असेल तर सार्वजनिक कामांत मानसन्मान, धंदारोजगार, लग्न वगैरे गोष्टी घडतात.

सांपत्तिदर्शक चिन्हांशीं शुभ दृ०यो० होत असेल तर स्त्रियांपासून किंवा जलप्रवासापासून फायदा होतो. परंतु वाईट दृ०यो० होत असेल तर विरुद्ध फल प्राप्त होतें.

चंद्राची सूर्याशीं युति होईल व जर सूर्य मूळचा बलवान् नसेल तर धंद्यांत अडचणी, तोटे, पुष्कळ घोटाळे, प्रवास, निराशा व डोळ्यास पीडा होते. सूर्य मूळचा बलवान् असेल तर त्या काळांत लग्न होतें, नोकरींत बढती मिळते व प्रवासापासून फायदा होतो.

हर्शल व **नेपच्यून** यांचे विषयीं पुढें सांगण्यांत येईल. आतां प्रत्येक ग्रहाचे प्रत्येक दृ०यो०चें फळ काय प्राप्त होईल याकडे वळूं. वर सांगितलेले नियम सर्वसाधारण आहेत.

वार्षिक दृष्टियोगाचे फलाविषयीं मुख्य नियम

रवि व इतर ग्रह.

ज. ल. वा. सूर्ययुति.—मनुष्य सार्वजनिक कामांत पुढाकार घेतो. किंवा लोकांपासून मानसन्मान मिळवितो. त्रास व काळजी यांनीं शरीर त्रस्त असतें. डोक्यास उष्णतेचे विकारापासून पीडा होते. कित्येक वेळां डोक्यास उष्ण विकारापासून त्रास होतो. रवि ज्याप्रमाणें निरनिराळ्या राशींत असेल त्याप्रमाणें फलें जाणावीं. रवि जलराशींत असला तर ह्या काळांत अंगांतून घाम जास्त जाऊन त्रास होतो.

ज० ल. ६० अंश १२० अंश वा. द्व० सूर्य.—या काळांत शरीर निरोगी असतें. मोठमोठ्या मनुष्याच्या नव्या ओळखी होतात. नवीन धंदा, नोकरी लागणें, प्रवासापासून फायदा इ० गोष्टी होतात. स्त्रियांचे कुंडलींत ह्या काळांत लग्न होण्याचा जास्त संभव असतो. कित्येकांस ह्या काळांत मुलें होतात व विशेषेंकरून पुत्रसंतति असते.

ज. ल. ९० अं. ४५ अं. १३५ अं. १८० अं. वा. द्व. सूर्य.—शारीरपीडा, अस्वस्थता, मोठ्या लोकांशीं शत्रुत्व, भांडणें,

कोर्टात खटले होणें, इष्टेटीचा नाश, फसणें, अपमान, कारागृहवास डोळ्यांस त्रास, ताप, बापाचा मृत्यु अथवा बापास कष्ट इत्यादि गोष्टी होतात.

ज. दशम वा. सूर्ययुति.—मोठ्या मानाची जागा किंवा पदवी मिळते. धंदारोजगार अति भरभराटीनें चालतो. बापास या काळांत मान, पैसा वगैरे मिळतो. सूर्य मूळचा चांगला बलवान् असला ह्मणजे हा काळ मोठ्या भाग्योदयाचा आहे असें समजावें.

जन्मदशम वा. सूर्य १२०अंश ६०अंश वा. द.—धंद्यांत चांगली भरभराट, नवा रोजगार, राजेरजवाडे किंवा श्रीमंत लोक यांचे पासून फायदा. ह्या काळांत मोठमोठीं कृत्यें होतात किंवा त्यांची सुरवात होते. स्त्रियांचे कुंडलींत या काळांत लग्न होतें व लग्न झालेल्या स्त्रियांस मुलगा होण्याचा संभव असतो. राजे लोकांस सार्वजनिक मानसन्मान, जय, शांतता प्राप्त होते.

ज. द. वा सू. ४५ अं ९० अं. १३५ अं. १८० अं. द.०.—नोकरींत किंवा धंद्यांत अचानक संकटें येणें, मॅजिस्ट्रेट कडून त्रास, शिक्षा, व्यापारी लोकांचीं या काळांत दिवाळीं निघण्याची धास्ती असते. मोठेमोठे तोटे होतात. आईबापांस विशेषें करून त्रास, अग्नीची भीति इ. गोष्टी घडतात.

ज. सू. वा. सू. ३० अं. अथवा ६० अं.—लाभ, कीर्त्ति यांत ६० अं. द. बलवान् होय. परंतु हे योग चांगले स्थानांत झाले तर शुभ फळ जास्त चांगलें मिळतें.

ज. सू. वा. सू. ४५ अं. अथवा ९० अं.—सूर्य ज्या राशींत असेल त्या अन्वयें शरीरास पीडा, दुखणीं. शांततेची इच्छा होते. परंतु या कालांत मनास समाधान व सुख फार कमी मिळतें.

कै० जीवनराव चिटणीस यांचे लेख.

[अंक १२ वरून पुढें चालू]

अर्जुन हा उत्तराफाल्गुनीवरील रवि होय. सुभद्रा ही चंद्र होय. सुभद्रेचें हरण अर्जुनानें रैवतक पर्वतावरून केलें आहे. रावसाहेब व्यंकटेश बापूजी केतकर यांचा **रैवत** पक्ष येथून आरंभ पावतो. ह्मणजे उत्तर ध्रुवान्वयें मृगारंभ वसंतानुरोधें होय, व उदगयनप्रवृत्ती-प्रमाणें रैवत आरंभ होय. दोन भिन्न भिन्न पद्धतींचा विचार वेद, उपनिषदें, महाभारत, भागवत, गीता आणि ज्ञानेश्वरी या बाजूंनीं विचार करितां कृष्णाचा जन्म मार्गशीर्ष महिन्यांत किंवा ज्येष्ठ महिन्यांत झाला होता असें दिसतें. श्रावण कृष्णाष्टमीस जो जन्म वर्णन करितात, त्यास आधार कोणताच नाहीं. त्या वेळीं रोहिणी नक्षत्रीं चंद्र असतो, परंतु रोहिणी नक्षत्र आणि ध्रुवतारा यांचे अनुरोधें रोहिणी नक्षत्राचा मेळ आहे, तो पुढें विसरला जाऊन, त्याबद्दल रोहिणी नक्षत्र पुढें आलें!

कृष्णजन्म बनावट आहे हें सिद्ध करण्याकरितां खालील मुद्दे पहावे.

१ महाभारत ग्रंथ ज्यांत कृष्णाचें वर्णन आहे त्याचे तीन भाग करितां येतात. १ ला भाग—यांत श्लोकसंख्या ८८०० आहे. २रा भाग—यांत श्लोकसंख्या २४००० आहे. ३रा भाग—यांत श्लोकसंख्या १००००० आहे. पहिले भागाचा उल्लेख आश्वलायन करितो. हा इ०स०पूर्वी ५वे शतकाचे सुमारास होता. दुसरे भागांत पांडव हे वीर आणि कृष्ण हा देव असें दर्शविलें आहे. तिसरे भागांत कृष्ण हा परब्रह्मस्वरूप असें वर्णन आहे व त्यांत इ०स०चे ४।५ या शतकांतील बरेच पुरावे आले आहेत. गीता ग्रंथांत आढळणारे सर्व

मुद्दे भारतांत या मागांत आले आहेत. तथापि त्यांतही मेषादि द्वादश राशींचा उल्लेख नाहीं!

गीतेंत उपनिषदानंतर कपिलाचीं मतें आलीं आहेत. कपिल हा मुनि बुद्धाचे पूर्वी होता. गौतमबुद्धाचा मृत्यु इ०स०पूर्वी ४७० हा आहे. सांख्याचे नंतर पतंजली झाला. सांख्यकारिका हा ग्रंथ इ० स०नंतर तयार झाला. व त्याचा कर्त्ता ईश्वर कृष्ण या नांवाचा एक मनुष्य आहे. हा परब्रह्म कृष्ण देवकीनंदन नाहीं. पतंजलीचे योगशास्त्रानंतर बादरायण झाला. त्यानंतर ब्रह्मसूत्र झालें. यावरून गीता ग्रंथाचा कर्त्ता कृष्ण नाहीं. कृष्ण हा अलेक्झांडरपूर्वी मेला असून अलेक्झांडरचे काळीं त्यास देव समजून त्याची पूजा करीत असत असें अलेक्झांडरबरोबर आलेला मेगास्थनीस वर्णन करितो, ह्मणून गीतेचा पुरावा कृष्णजन्मास अयोग्य आहे.

सांख्यकारिका या ग्रंथानंतर अथवा इ. स. नंतर कृष्ण हा परब्रह्म असें मानलें आहे, ह्मणून त्या अनुरोधें पत्रिकाकारानें इ. स. चे आरंभीं मेषादि द्वादश राशींचे अन्वयें वर्णन केलें आहे. राशींचे भाषेंत जन्म वर्णन करण्याची प्रथम पद्धत वाल्मीकि रामायणांत दिसते व तिचा काल इ० स० नंतर २८० हा आहे. ह्मणून प्राचीन ग्रंथांतील मतांतरें पाहणें जरुरीचें आहे.

गर्गऋषीचे ग्रह आग्रहायन वर्षारंभींचे दिले आहेत. आग्रहायन हें नांव मृग ह्या नक्षत्रावरून पडलें आहे. वसंत संपाताचा व मृगाचा काल तोच पांडवकाल असें कोणी समजतात, परंतु आग्रहायन ह्मणजे पाहिजे त्या वर्षाचा आरंभ असेंही मानतां येईल. गर्गानें दिलेल्या ग्रहांत रवि हा अनुराधा नक्षत्रावर, बुध शतभिषक् नक्षत्रावर आणि शुक्र तर कृत्तिका नक्षत्रावर दिला आहे. ह्मणजे बुध हा रवीपासून ९० अंशांवर आणि शुक्र हा १८० अंशांवर दिला आहे.

गर्गकालचे ग्रहांवरून रवि मध्यस्थ ग्रह घेण्याची वहिवाट फलादेशाकरितांच होती असेंही अनुमान निघत नाहीं. कारण फलादेश व धर्मकर्में यांचेकरितां निराळी पद्धत, गर्गकाळीं किंवा भारतरचनेकाळीं दिसत नाहीं. वराहमिहिर बृ०जा०त असें ह्मणतो कीं, "पूर्वशास्त्रानुसारेण मया वज्राद्यः कृताः ॥ चतुर्थे भवने सूर्याज्ज्ञसितौ भवतः कथम् ॥ (नाभसयोगाध्याय)" गर्गसंहितेंत ज्याप्रमाणें ग्रह दोषयुक्त आहेत असें वराहमिहिर ह्मणतो त्याचप्रमाणें टालमीनंतर झालेले ज्योतिषी टालमीची निंदा करतात. टालमीचा मृत्युकाळ इ०स०पूर्वी १५०हा आहे. गर्गाचा काल इ०स०पूर्वी ५वा शतक हा आहे व टालमीचा काल इ०स०पूर्वी १५०हा आहे. गर्गाचा काल सनापूर्वी ५वा शतक व टालमीचा दुसरा शतक, तेव्हां या तीन शतकांत हिंदूपासून ग्रीकांनीं कांहीं ज्ञान संपादन केलें असेल तर तें हल्लीं दिसलें पाहिजे. गर्गापूर्वीचे ऋषींस अयनचलनाचें ज्ञान होतें असें निश्चयात्मक मानण्यास आधार नाहीं.

वेदांगांत अयनें माघ व श्रावण या मासांत सदा होतात असें वर्णन आहे. यावरून अयनचलनाचे अथवा संपाताचे गतीचें ज्ञान पूर्वीचे ऋषीस होतें असें अनुमान करण्यास साधन नाहीं, ह्मणून त्यांनीं अयनांश युक्त करून नंतर सायन ग्रह वेधास युक्त केले असें दिसत नाहीं. प्रत्यक्ष गर्गकाळीं केंद्रानुसारी ग्रह घेत असून फलसंस्कार देण्याची वहिवाट त्यांचे काळीं दिसत नाहीं. परंतु वराहमिहिर मात्र ग्रीकांस व म्लेंच्छांस हिंदूंनीं ज्योतिषशास्त्र शिकविलें, असें आधाराखेरीज बोलतो. सूर्यसिद्धांतरचना जर कृतयुगांत झाली तर टालमीचे ग्रह निरयन मानाचे कां नाहींत? सारांश, टालमीचा व सूर्यसिद्धांताचा जर मेळ नाहीं तर हिंदूंची निरयनपद्धत प्राचीन काळीं कशी सुरू

होईल? प्राचीन हिंदूंची पद्धत निरयन मानाची दिसत नाहीं. त्याच प्रमाणें सर्व जगाची पद्धत सायन आहे, मग हिंदूंचीच निरयन कां असावी? ग्रीकांस जर हिंदूंनीं कांहीं शिकविलें असतें तर तें त्यांचे ग्रंथांत असतें. उलट हिंदु ग्रंथांत आरब व ग्रीक यांचे शब्द पुष्कळ आहेत. इतकेंच नाहीं तर टालमीचा प्रत्यक्ष पुरावा गर्गसंहितेंत मागून दाखल झालेला दिसतो. हें पुढील इंग्रजी उतान्यावरून कळेल.

☞ [मजकूर इंग्रजी असल्यामुळें तो छापतां आला नाहीं. संपादक—कुंडलीविज्ञान—]

या इंग्रजी उतान्यांत बुध आणि शुक्र हे रवीपासून ६०अंशापर्यंत जातात, इतकेंच मानलें नाहीं तर ते ग्रह ९०अंश व १८०अं.पर्यंत जातात असें समजून त्यांचीं फलें वर्णन केलीं आहेत. गर्गाचे ग्रंथांत यांपैकीं ९०अंशांचा पुरावा आहे. संहितेंत टालमीचा पुरावा व जातक ग्रंथांत ग्रीकांचे पारिभाषिक शब्द, आरबांचे ताजक ग्रंथांतील मुसलमानी शब्द या सर्वांची ऋषिप्रणित गणना झाली आहे!

मंदफल, शीघ्रफल हे संस्कार पंच ग्रहांस करितात. ते वासिष्ट, पौलिश, आणि सौर सिद्धांतांत आहेत. ते टालमीच्या ग्रंथांवरून तयार झालेले पंचसिद्धांतिकेच्या शेवटच्या अध्यायांत ग्रहांची मध्यम आणि स्पष्ट स्थिति काढण्याचें गणित आहे. त्यांतील शुक्राचा मासला येणेंप्रमाणें आहे.

अहर्गणांत १४७ वजा करून बाकीला ५८४ नीं भागावें भागाकरा इतके शुक्राचे उदय होतात. इतक्या काळांत शुक्राची मध्यम गति वृश्चिकाचे पांच अंश ह्मणजे ७ रा. ५ अं. २० क. होते व शुक्र २६ दिवसांत उदयाच्या कालांशा इतका जाऊन पश्चिमेस उदय पावतो. अहर्गणांत उदयसंख्येचा अकरावा अंश मिळवावा

आणि त्यावरून शुक्राचा चार काढावा. तो असा—दर खेपेस साठ साठ आश तीन अहर्गणांत तो अनुक्रमें ७४–७३ आणि ७२ अंश जातो. पुढें ८५ दिवसांत ७७ अंश आणि पुढें तीन दिवसांत १। अंश चालतो. मग वक्री होऊन १९ दिवसांत २ अंश चालतो नंतर ९ दिवसांनीं पश्चिमेस अस्त पावतो. नंतर १० दिवसांनीं पूर्वेस उदय पावतो. पुढें २० दिवसांनीं मार्गी होतो. चार अंश जातो. पुढें २३२ दिवसांत २५० अंश जाऊन पूर्वेस अस्त पावतो यांत मंदशीघ्रफलाविषयीं उल्लेख नाहीं. सारांश वराहाचे पंचसिद्धांत ग्रंथापर्यंतचे काळांत मागील ज्योतिष ग्रंथांत जर फलसंस्कार देण्याची वहिवाट असती तर गर्गानेंही फलसंस्कार दिला असता. केंद्रानुसारी फलसंस्काराचें तत्व टालमीपासून घेतलें. व तो टालमी बुध व शुक्र १२० अंशापासून १८०पर्यंत सूर्यापासून त्यांस दूर नेतो. तो फल-संस्कार तर वराहकाळपर्यंत दिसत नाहीं. शास्त्रोक्त ग्रहवर्णन करण्याचा पाया टालमी नंतरें व वराहकाळपर्यंत नव्हता असें मानणें भाग पडतें.

गर्ग व पांडव समकालीन आहेत. पांडवांचा अज्ञातवास चांद्र मानानें पुरा झाल्यावर ते प्रगट झाले. परंतु दुर्योधन तो काल सौर मानानें पुरा न होतां प्रगट झाले ह्मणून त्यांनीं पुन्हां अज्ञातवासास गेलें पाहिजे असें प्रतिपादन करितो. चांद्रवर्षमान ३५४।३५५ दिवसांचें आहे. आणि सौरमान ३६५ दिवसांचें आहे. दोन्ही मानांची जी बेरीज ती वर्तुलाची होय. राशिचक्रांत ३६० अंश असतात. परंतु जेथें सौर व चांद्र हीं मानें एकत्र नाहींत व दोन्ही पद्धति भिन्न आहेत तोंपर्यंत राशिचक्राचे १२ भागांचें ज्ञान गर्गादि ऋषींस होतें असें कबूल करण्यास स्वतंत्र आधार कोणता?

महाभारतांत द्वादश राशि " समान नांवें " सांपडतात ही गोष्ट खरी आहे. परंतु महाभारताचा हा तिसरा भाग आहे. व त्या वेळीं टालमीचे वेळीं असलेलें ज्ञान माहीत झालेलें दिसतें. त्या पूर्वी वेदग्रंथांतही तसाच प्रकार आढळतो, ह्मणून टालमीनंतर ३।४ शतकांचे काळानंतर ज्योतिष विषयांत मोठी झालेली क्रांति व त्या अनुरोधानें सूर्यसिद्धांतांत झालेले फेरफार यांचा मेळ दिसतो. इ०चे५वे शतकांत यूरोपीय वेधावरून येणारे सर्व नक्षत्रांचे शर–भोग यांत व सूर्यसिद्धांतील नक्षत्रांचे शरभोगांत सर्वसाधारण चूक १ अंशाची आहे. यावरून सूर्यसिद्धांतांत शके ४२५ चे आजूबाजूस ग्रहांचीं सूक्ष्म मानें ठरलेलीं दिसतात इ० स० ५६० या वर्षी यूरोपीय वेधावरून येणारे ग्रह व सूर्यसिद्धांताधारें आलेले ग्रह यांत अत्यंत थोडें अंतर आहे. त्या पूर्वी पंचसिद्धांतिका ग्रंथावरून मंदफल व शीघ्रफल संस्कार देण्याची वहिवाट नव्हती. वराहाचा मृत्यु शके ५१८ किंवा इ. स० ५९६ हा आहे. त्याचे नंतर थोडेच काळांत ह्मणजे ४ वर्षांनीं कृष्णजंन्म वर्णन केला आहे. कृष्णजन्म ता. ७ आगष्ट इ० स. ६०० या वर्षी मानून ग्रह येणें प्रमाणें आहेत.

रवि—४–१६–२०
चंद्र—१–१८–३२
राहु—६–११–१७
बुध—९—०–२९
शुक्र—६—१–२४
मंगळ–९–१६–४६
गुरु–११–१०—९
शनि—६–२६–५१

येणें प्रमाणें टालमीचे ग्रंथान्वयें फलसंस्काराची माहिती झाल्यावर शास्त्रोक्त कृष्णजन्मकाळ वर्णन केला आहे. तो बनावट व खोटा आहे. श्रावण कृ० ८ स कृष्णजन्म झाला नाहीं. मथुरेंत भाद्रपदांत कृष्णजन्म करितात परंतु मागें दाखविलेल्या पुराव्या वरून कृष्णजन्म मार्गशीर्ष महिन्यांत दिसतो, किंवा ज्येष्ठ महिन्यांतही तो आहे असेंही ह्मणतां येईल. या तीन मतांचा विचार पंचांगशोधन कमेटी पुढें विस्तारानें ठेवला आहे. यावरून कृष्णजन्म व रामजन्म पंचांगांतून काढून टाकणें जास्त बरें. कलियुगारंभही फिरविणें जरूर आहे. कालीदास कवीनें ज्योतिर्विदाभरण ग्रंथ रचला आहे. त्याबरून गतकलि ३०६८ या वर्षी विक्रम संवत् २४ येतो. त्या वेळीं वराहमिहिर होता असें दिसतें कलियुगाचे ३०२४ या वर्षी विक्रम शक सुरू झाला. हल्लीं विक्रम संवत् १९६१ आहे. तेव्हां यांत ३०२४ ही संख्या मिळवितां बेरीज ४९९५ येते व पंचांगांत गत कली ५००५ येतो. ह्मणजे १० वर्षांची चूक येते. जैनमतें १९०४ सालीं कलियुग वर्ष २४२७ हें आहे.

भाग ९ वा.

गर्ग ऋषीचे ग्रंथांत रवीपासून बुध, शुक्र ९०व१८०अंश अंतरानें आले आहेत. तसे ग्रह पुढेंही येतात असेंही दाखवितां येतें. मात्र मंदफल व शीघ्रफल संस्कार हे आमचे सिद्धांत ग्रंथांत जे अलीकडे दाखल झाले आहेत ते विसरून खालील आंकडे पाहिले पाहिजेत.

छत्रेकृत ग्र०सा० पुस्तकांत शके १७७२ कार्त्तिक शु. ५उदयानंतर २७घ. ८प. हा काल धरून त्या वेळचे स्पष्ट ग्रह दिले आहेत. त्यांतच थोडी मागें पुढें निरनिराळी वर्षसंख्या घेऊन मध्यम ग्रह जास्त मिळविले आहेत.

छत्रेकृत स्पष्ट रवि ७–१६–४६–०
बुध–छ०पु०पृ० १९९
र. म. स्प. बु. ६ —७–२०
स्प. र. ७–१६–४६

शीघ्र केंद्र १०–२०–३४
शीघ्रफलसंस्कार ०–११–४९
स्पष्ट रवि ७–१६–४६
—११–४९

स्प. बुध ७–५–१

वरील उदाहरणांतील फक्त संस्करा पूर्वीचें शीघ्रकेंद्र कुंभ राशीचे २०वे अंशांत ह्मणजे शतभिषक् नक्षत्रीं आहे. स्पष्ट रवि अनुराधा नक्षत्रीं आहे. व बुधकेंद्र ९० अंश पुढें आहे. शीघ्रफल संस्कार पूर्वी देत नव्हते असें मानण्यास आधार पंचसिद्धांतिकेंत आहेच. वेदांग-ज्योतिषकाळीं सूर्याची स्पष्ट स्थिति सुमारें २अंश मागें पुढें होते. चंद्राची ८अंश मागें पुढें होते. तर स्पष्ट स्थिति आणि मध्यम स्थिति यांतला भिन्नपणा ज्याला फलसंस्कार असें ह्मणतात तो वेदांग ज्योतिषकाळीं माहीत होता किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं. असें ब्रह्मगुप्त कालापर्यंतचे पुराव्यावरून दिसतें. ब्रह्मगुप्त स्पष्ट स्थितीचें अज्ञान होतें असें स्पष्ट ह्मणतो (ब्र.गु.सि.अ. ११-२) ब्रह्मगुप्ताचा काल शालिवाहन शकाचे ४२०चे सुमाराचा आहे.

शुक्र—छत्रेकृत पुस्तक पृ. २००
र. म. स्प. शु. ०–२४–४४
स्प. र. ७–१६–४६

शीघ्रकेंद्र ९—७–१८

शीघ्रफलसं. ०–४०–२७
स्प. शु. ८–२७–१३

वरील शुक्राचे उदाहरणांत सहा वर्षांचा मध्यम शुक्र घेऊन त्यांत स्प. र. ऋण करितां शुक्र कृत्तिका नक्षत्रावर येतो. छत्रे यांचे शके १७७२ चे गणितांत स्प. र. चे अंश आहेत तितकेच ठेवून सहा वर्षांचा मध्यम शुक्र, स्पष्ट १९९० मधील घेऊन त्यांत मिळवला ह्मणजे—

र.म.स्प.शु. ०–२४–४४
+६ वर्षांचा शु. ९—१–१४
९–२५–५८
स्प. र ७–१६–४६

शी. कें. १—९–१२

येणें प्रमाणें शुक्र कृत्तिका नक्षत्रीं ह्मणजे रवीपासून १८० अंशांवर येतो.

मंगळ छ. कृ. पु. पृ. २४९
र. म. स्प. मं. ७–२६–३०
स्प. र. ७–१६–४५

शी. कें. ०—९–४४
शी. फ. सं. ३–५०
स्प. मंगळ ७–२२–४०

वरील मंगळांत ७ वर्षांचा मध्यम मंगळ मिळविला तर यांत स्प. र. ७–२६–४४ ऋण करितां शीघ्रकेंद्र ८ रा. ० अंश ह्मणजे धनु राशीचें येतें.

गुरु—छत्रेकृत पृ. २७३

र. म. स्प. गु.	३—६—४७
स्प. र.	७—१६—४६
शीघ्रकेंद्र	१०—२०—१
शी. फ. सं.	५अं. ५०क.
स्प. गु.	६—१२—३७

वरील गुरूंत ४० वर्षांचा मध्यम गुरु मिळविला ह्मणजे

	६—६—२७
४० व. चा गुरु	४—१५—३३
	१०—२१—१९
यांत स्प. र. उणा	७—१६—४६
शी० कें०	३—४—३३

ह्मणजे गुरूचें शी० कें० पुष्य नक्षत्रीं येतें. गर्ग संहितेंत आग्रहायन वर्षारंभीचे ग्रह जे गर्गानें दिले आहेत, ते मृग नक्षत्रीं संपातानुसार होते असें मानण्यास आधार नाहीं. व संपाताचे या योगाचे काळीं पांडव नव्हते. ह्मणून हा पुरावा टालमीपासून शीघ्रफल व मंदफल संस्कारानंतर दाखल झाला असें दिसतें त्यांचा प्रचार ब्रह्मगुप्त व वराहमिहिर यांपर्यंत नव्हता. गर्ग हा ज्याप्रमाणें गणितज्ञ होता तसाच तो फलादेश अथवा मुहूर्तादि भेद जाणणारा होता. व त्याचा काल इ० स० पूर्वी ९ वे किंवा ६ वे शतकांतील ह्मणजे सूत्रकालांतील आहे.

सूत्रकाल इ. स. पूर्वी ५०० पासुन १ हजार वर्षापर्यंत सामान्यतें विद्वान् व शोधक लोक मानतात. आश्वलायन सूत्रें सर्वांत प्राचीन व पास्कर सूत्रें सर्वांत अर्वाचीन आहेत. सूत्रांत 'त्रिषु त्रिषु उत्तरादिषु स्वातौ मृगशिरसि रोहिण्यां' असें वचन आढळतें. या

वचनांतील विवाहनक्षत्रें हरदत्तानें दिलीं आहेत. तीं उत्तरा हस्त, चित्रा, उत्तराषाढा, श्रवण, धनिष्ठा, उत्तराभाद्रपदा, रेवती, अश्विनी अशीं आहेत. साप्रत मुहूर्त ग्रंथांत चित्रा, श्रवण, धनिष्ठा, अश्विनी हीं नक्षत्रें विवाह नक्षत्रांत नाहींत. द्रौपदीचा विवाह पुष्य नक्षत्रावर झाला आहे. पांच पांडवांबरोबर क्रमानें दरएक दिवशीं विवाह छाला आहे. हल्लीं पांच नक्षत्रें क्रमानें विवाहपद्धतींत नाहींत, ह्मणून आर्यधर्मग्रंथकार व प्राचीन अनार्य धर्मग्रंथकार यांत भेद दिसत आहे.

वेदांत २७ नक्षत्रें आहेत, तशींच २८ नक्षत्रें आहेत. २७ त ३६० अंश विभागण्यास सुलभ जातात ह्मणून सायन व निरयन पंचांगांत २७ नक्षत्रांचा उपयोग केलेला आहे. ह्मणून सायन व निरयन पंचांगें वेदधर्मप्रणीत आहेत असें सिद्ध होत नाहीं. कारण, ऋषि हे वेदांचे अनुयायी असें बहुमतानें मानलें जातें व ह्मणूनच गर्गाची विषम अंतराची नक्षत्रपद्धति जास्त महत्वाची आहे.

गर्गमतें अश्विनी नक्षत्राचा शर अथवा भोग यांची संख्या १३ अं. २० क० ही आहे. त्याप्रमाणें भरणी नक्षत्राचा शर—भोग १३ अं. २० क० या समान पद्धतीचा नाहीं. भरणीचा शर फक्त ६ अं. आहे. किंवा अश्विनीपासून १९ अंश २० कलेंत किंवा २० वे अंशांत कृत्तिकांचा आरंभ होतो. सारांश, गर्गपराशरादि ऋषि जर आर्य ऋषि असतील व त्यांचे प्राचीन ग्रंथ जर धर्मग्रंथ असतील तर किंवा त्यांचे ग्रंथांचे आधारावर सूर्यसिद्धांत ग्रंथ तयार झाला आहे असें ज्यांचें मत असेल त्यांस सायन व निरयन हीं दोन्हीं पंचांगें नक्षत्रापुरतीं धर्मकर्मांत अमान्य होतील असें कोष्टकाधारें कळेल.

गर्ग व सूर्यसिद्धांत मतें, नक्षत्रांचे शर व पंचांगांतील नक्षत्रें.

नक्षत्र नांव.	गर्गमतें अंश-कला	सूर्यसिद्धांत मतें अंश-कला	प्रत्यक्ष नक्षत्रांची व्याप्ती. अंश-कला	क्रांति उ-द	गर्ग व सूर्यसिद्धांत अंतर.	नक्षत्रांतील अंतर.	सायननिरयन पंचांगांतील विभागात्मक अंश-कला
					अं. क		
अश्विनी	१३-२०	८—०	८—०	१० उ	५-२०		१३-२०
भरणी	२०—०	२०—०	६-४०	१२	०—०		२६-४०
कृत्तिका	३३-२०	३७-३०	१०-५०	५	+४-२०		४०—०
रोहिणी	५३-२०	४९-३०	९-३०	५-द	-३-५०		५३-२०
मृग	६६-४०	६३—०	९-४०	१०	+३-४०		६६-४०
आर्द्रा	७३-२०	६७-२०	०-४०	९	+६—०		८०—०
पुनर्वसु	९३-२०	९३—०	१३—०	६ उ	+०-२०		९३-२०
पुष्य	१०६-४०	१०६—०	१२-४०	०	+०-४०		१०६-४०
आश्लेषा	११३-२०	१०९—०	२-२०	७ द	+४-२०		१२०—०
मघा	१२६-४०	१२०—०	९—०	० उ	+६-४०		१३३-२०
पूर्वा	१४०—०	१४४—०	१०-४०	१२	-४—०		१४६-४०
उत्तरा फा.	१६०—०	१५५—०	८-२०	१३	+५—०		१६०—०
हस्त	१७३-२०	१७०—०	१०—०	११ द	+३-२०		१७३-२०

चित्रा	१८६-४०	१८०—०	६-४०	२	+६-४०		१८६-४०
स्वाती	१९३-२०	१९९—०	१२-२०	३७ उ	-५-४०		२००—०
विशाखा	२१३-२०	२१३—०	१३—०	१-३०द	+०-२०		२१३-२०
अनुराधा	२२६-४०	२२४—०	१०-४०	३	+२-४०		२२६-४०
जेष्ठा	२३३-२०	२२९—०	२-४०	४	+४-२०		२४०—०
मूळ	२४६-४०	२४१—०	१—०	९	+५-४०		२५३-२०
पूर्वाषाढा	२६०—०	२५४—०	०-४०	५-३०	+६—०		२६६-४०
उत्तराषाढा	२७६-४०	२६०—०	६-४०	५	+१६-४०	×	२८०—०
अभिजित्	२८०-४०	२६६-४०	१३-२०	६० उ	+१४—०	×	०—०
श्रवण	२९३-२०	२८०—०	१३-२०	३०	+१३-२०		२९३-२०
धनिष्ठा	३०६-४०	२९०—०	१०-४०	३६	+१६-४०	×	३०६-४०
शततारका	३१३-२०	३२०—०	१३-२०	०-३०द	-६-४०		३२०—०
पूर्वाभाद्रपदा	३२६-४०	३२६—०	६—०	२४ उ	+०-४०		३३३-२०
उत्तरा भाद्रपदा	३४६-४०	३३७—०	३-४०	२६	+९-४०		३४६-४०
रेवती	३६०—०	३५९-५०	१३-१०	०	+०-१०		३६०—०

३ गर्गमतें नक्षत्रें दिलीं आहेत. त्यांतील व सूर्यसिद्धांतांतील अंतर ६ वे रकान्यांत दिलें आहे. ७ वे रकान्यांत जेथें फुल्या आहेत तेथें चंद्र १३ अंश २० कलेहून जास्त गेलेला दाखविला आहे. ८ वे रकान्यांत राशिचक्रान्वयें पंचांगांत नक्षत्रें देतात तीं दिलीं आहेत. ९ वे रकान्यांत क्रांति दिली आहे. त्यावरून कोणते योगताऱ्याचा बोध होतो हें कळेल. गर्गाची नक्षत्रपद्धति शं० बा० दीक्षित यांचे इंडियन ॲन्टीक्युरी मधील लेखाधारें घेतली आहे. रकाना ४ मधील यादी बेन्टले याचे पुस्तकांतील आहे.

सूर्यसिद्धांत ग्रंथांत शके ४०० चे सुमारास जे नक्षत्रांचे शर दिले आहेत त्यांत व यूरोपीय वेधानें येणारे शरांत सर्वसाधारण १ अंशाची चूक आहे. ह्मणून शके ४४४ त जेव्हां अयनांश शून्य होत असें मानलें आहे, त्या पूर्वी ७२ वर्षांचे सुमारास हे शर मानून कोणी घातलेले दिसतात. पंचांगाचे पांच अंगांपैकीं जें एक मुख्य अंग नक्षत्र तें गर्ग अथवा सूर्यसिद्धांत मताप्रमाणें पंचांगांत नाहीं. ह्मणून नक्षत्रानुरोधें धर्मकृत्य केलें तें ईश्वरास मान्य होणार नाहीं, व त्यामुळें ईश्वरक्षोभ होतो असें द्वारकेचे शंकराचार्यांनीं जें आपल्या आज्ञापत्रांत प्रसिद्ध केलें आहे त्यास पंचांगांत आधार नाहीं. धर्मगुरूस परमेश्वर कोपतो हें कोणते आधारावर कळलें आहे तें कळत नाहीं. सनातन धर्मास पंचांगाची जरुरीच नाहीं! व सनातन धर्माचा परमेश्वर तें मनुष्याजवळ पाहिजे असेंही सांगत नाहीं!

पांडवकालापूर्वी वेदांगज्योतिषांत मध्यम मानानें चंद्राचें अंतर ८ अंश आहे. असें वर्णन आहे. ह्मणून प्राचीन काळीं स्पष्ट तिथींचें ज्ञान होत असें दिसत नाहीं. भारतांत १३ दिवसांचा पक्ष अगर पंधरवडा दिला आहे तोही मध्यम मानानें येणारा नाहीं. स्पष्ट मानाचें

गणित पांडवकाळीं नव्हतें. कै० वा. शं० बा० दीक्षित यांनीं पृष्ठ ११४ मध्यें सूर्यसिद्धांतान्वयें पंधरवड्याचें स्पष्ट मान येतें, या कल्पनेवरून तेरा दिवसांचा पंधरवडा मानला आहे. भारतांतील हा पुरावा सूर्यसिद्धांत ग्रंथ तयार झाल्यानंतर भारतांत दाखल झालेला आहे. कारण, गुप्त वल्लभी संवत ३२० द्वितीत मार्गशीर्ष शु० २ या दिवशींचा खेडा येथील ताम्रपट आहे. त्यांतील संवत् ह्मणजे शालिवाहन शके ५७० या सालचा अधिक मास मध्यम मानानें व मेषादिस्थे या परिभाषेनें मिळतो असें दीक्षितच कबूल करतात. यावरून शालिवाहन शके ५७० किंवा इ० स० ६४८ मध्यें हिंदुस्थानांत मध्यम मान चालू होतें असें दिसतें. तेव्हां भारतांत १२ दिवसांचा पंधरवडा दाखल होण्याचा काल इ स० ६४८ नंतरचा होय. भारताची रचना करणारा जर व्यास असेल तर त्याचाही काल हाच येईल. याज्ञवल्की याचाही काळ हाच येईल. कारण तो व्यासशिष्य आहे. (अहिंसा पुस्तक पृष्ठ १३)

भारतरचनेवरून भारतकाळीं ९ दिवसांचा एक आठवडा तसाच ७ दिवसांचा एक आठवडा मानलेला दिसतो. त्याचप्रमाणें ११ दिवसांचा एक आठवडा असेंही मानलेलें दिसतें.

कौरवांचा पक्ष ११ दिवसांचा आठवडा मानणारा दिसतो. अकरा अक्षौहिणी कौरवांचें सैन्य हें ११ दिवसांचे पद्धतीस अनुसरून दिसतें. पांडवांचा पक्ष ७ दिवसांचा आठवडा मानणारा होय. त्याप्रमाणें पांडवांचें सैन्यही ७ अक्षौहिणी आहे. कौरवपांडव आठवडे ह्मणजे ११व७ यांची बेरीज १८ दिवस आहे. या अनुरोधें दोन्ही पक्षांचें मिळून सैन्य १८ अक्षौहिणी होतें. सारांश, **१८ दिवस युद्ध, १८ अक्षौहिणी सैन्य, १८ पर्वें भारत, १८ अध्याय गीता** अशी एक मौज आहे.

भारतांत ५ दिवसांचा आठवडा व ७२ आठवड्यांचें १वर्ष आहे. ७२ आठवडे ह्मणजे दोन अयनांचा काल होय. होमास वेदी तयार करितांना पूर्वपश्चिम ३६ पावलें अंतर सोडतात. एका ३६ पावलांत एक अयन व दुसऱ्या ३६ पावलांत दुसरें अयन होतें. ७२ पावलें हा सूर्याचा गमनकाल आहे.

७२ आठवड्यांचें यंत्र.

१८	३५	२	७
६	३	३२	३१
३४	२९	८	१
४	५	३०	३०

हें यंत्र झोऱ्याष्टर (पारशी लोकांचा धर्मगुरु) यानें सारगान राजा करितां तयार केलें असें ह्मणतात याचा काल एक मतें सनापूर्वी ३८०० हा आहे व दुसरे मतें सनापूर्वी ६३१ हा आहे दुसरे मतास इतिहासाचा आधार आहे.

वैदिक वेदीचा व होमाचा जर संबंध असेल तर पांच दिवसांचा एक आठवडा, दहा दिवसांचा एक पंधरवडा, वीस दिवसांचा एक महिना व १८ महिन्यांचें एक वर्ष असें मानलेंच पाहिजे. व या वेळीं रवि आणि चंद्र यांत १२ अंश अंतर पडलें ह्मणजे एक तिथि पूर्ण होते ही भाषा विसरली पाहिजे.

वाजसेनीय संहिता २२–२१ वरून वेदांत १३ महिन्यांचे वर्ष मानलेलें दिसतें. १३ महिन्यांचें एक वर्ष ह्मणजे २७$\frac{3}{4}$ दिवसांचा १ महिना होतो. याचाच जो अर्धा भाग तो १३ दिवसांचा भारतांतील पंधरवडा होय. मध्यम मानाचा नाहीं, तसाच तो स्पष्ट मानाचाही नाहीं. ह्मणून **वैदिक पंचांग १३ महिन्यांचें** किंवा **१८ महिन्यांचें पाहिजे.**

वेदांगज्योतिषांत आरंभ धनिष्ठा ऊर्फ श्रविष्ठा नक्षत्रापासून आहे. हा आरंभ चिनी लोकांचे राशिचक्रान्वयें आहे. राशिचक्राचा प्राचीन मान फक्त चिनी लोकांचा आहे. चिनी लोकांचा राशिचक्राचा आरंभ दोन पद्धतीनें आहे. एक स्थिर चक्र व दुसरें चलचक्र किंवा पहिलें निरयन व दुसरें सायन असें आहे. चलचक्र उलट फिरतें, ह्मणजे कुंभेतून मकरेंत व नंतर धनेंत जातें. सांपातिक अथवा सायन चक्र याचें वर्षमान निरयन वर्षमानापेक्षां कमी आहे. ह्मणून सायनवादी लोकांच्या भाषेंत निरयन वर्षमान जास्त आहे. ह्मणून सायनवादी लोक निरयन वर्ष मागें पडतें असें ह्मणतात, व निरयन वादी लोक त्यांचे उलट बोलतात. वेदांगज्योतिषांत "श्रविष्ठाम्यां गुणाभ्यस्ता न्प्राग्विलग्नान् विनिर्दिशेत् ॥ सूर्यान्मासान् पलभ्यस्तान् विद्याच्चांद्रमसान् ऋतून् ॥ १९ ॥" असा उल्लेख आहे. त्यावरून सायन मेषारंभ धनिष्ठांवर झालेला आहे. धनिष्ठा जेथें स्थिर व चल चक्रें एकमेकांस छेदितात ह्मणजे जेथें लग्न अथवा संपात छेद होता तेथून उलट सूर्य व चंद्र यांत ऋतु मोजावे.

शतपथ ब्राह्मणांत (१०–५–४५) २७ नक्षत्रें आणि २७ उपनक्षत्रें दिलीं आहेत. २७ नक्षत्रें विभागात्मक आहेत. तेव्हां क्रांतिवृत्ताचे १२ भाग पडलेले दिसतात. परंतु जेथें २७ नक्षत्रांचा उल्लेख आहे तेथेंच २७ उपनक्षांचा उल्लेख आहे. या उपनक्षत्रांचा जर विचार पंचांगकारांस करितां येत नाहीं तर धर्मग्रंथकारांनीं त्याचा विचार कसा करावयाचा? धनिष्ठा नक्षत्रीं पूर्वी अयन झालें होतें असें अथर्वसंहितेंत १९-२ मध्यें वर्णन आहे. तें असें.—

"पुनर्वसू सूनृता चारु पुष्यो भानुराश्लेषा अयनं मघा मे ॥ २" वेदांगज्योतिषांत माघ आणि श्रावण यांत सदा अयनें होतात असें वर्णन आहे. यावरून चिनी राशिचक्राचा आरंभ वसंतानुरूप अहो

अथवा उदगयनप्रवृत्तीप्रमाणें आहे. या विषयीं आर्य लोकांना भ्रम पडल्यासारखें दिसतें. श० ब्रा० २-१-३ मध्यें

"वसंतो ग्रीष्मो वर्षाः । ते देवा ऋतवः शरद्धेमंतः शिशिरस्ते पितरो····स (सूर्यः) यत्रोदगावर्तते । देवेषु तर्हि भवति····यत्र दक्षिणावर्तते पितृषु तर्हि भवति"

या वेदवचनाचे आधारें धनिष्ठांवर वसंतसंपात असतांना धनिष्ठा आणि मघा नक्षत्रांत अयनें झालेलीं दिसतात. हें अयन ह्मणजे ध्रुवान्वयें होय. यांत सहा महिनेपर्यंत सूर्य देवयानांत असतो. अयन शब्दाचा दुसरा अर्थ लोकोत्तर आहे. त्या अनुरोधें धनिष्ठा नक्षत्रीं उदगयन मानलें आहे.

चिनी लोकांची नक्षत्रपद्धति इ.स.पूर्वी ११०० पासून १२०० वर्षांपूर्वीची आहे, असें एक मत आहे. दुसरें मत इ० स० पूर्वी ७९६ पासून ७४६ मधील काळांतली आहे असें आहे. दुसऱ्या काळाबरोबर मिसर देशांतील राशिचक्राचा आरंभ दिसतो. आर्य लोकांचा व मिसर देशांतील राशिचक्राचा बराच मेळ आहे.

आर्य लोकांचे शतपथ ब्राह्मणांतील जें वचन दिलें आहे त्याचा व चिनी लोकांचे राशिचक्राचा मेळ आहे असें अयनावरून कळतें अयनें संपातापासून ९० अंशावर मागें व पुढें होतात. यांस मकर व कर्क संक्रमणकाळ किंवा उत्तरायण व दक्षिणायन ह्मणतात. वसंतसंपात कृत्तिकेंत व उदगयन धनिष्ठांवर असतांना बायबलमधील जोव पुस्तकांचे अध्याय ९ ओंवी ९ मध्यें जें वर्णन आलें आहे त्यांत अर्कटरस ओरायन आणि फियाडीस आणि दक्षिणकपाट हे परमेश्वरानें केले असें ह्मटले आहे. ओरायन मृगांस ह्मणतात. फ्रियाडीस ह्मणजे कृत्तिका नक्षत्र होय. चेंबर्स ऑफ साऊथ ह्मणजे दक्षिण

बाहेरचें आहे असें जें कुंडलीविज्ञानांत वेळोवेळीं ध्वनित केलेलें आहे, त्याचा चांगला अनुभव येतो.

कुं. वि. पु. ७ अंक १० मध्यें अनुभविक नियम ७ प्रमाणें योगप्रतियोगांचा परिणाम कसा पहावा हें सांगितलें आहे. शनीचे किरण ८ व चंद्राचे १२ आहेत. हे दोन ग्रह एकमेकांपासून १० अंशांवर आल्यावर परिणाम घडतो. ता. २० रोजीं पित्याचे कुंडलींत जन्मस्थ चंद्र व गोचर शनि ह्यांत (२८-१८)=१० अंश अंतर झालें व केंद्रीं ह्मणून परिणाम लवकर व कडक घडला.

३ पित्याच्या कुंडलींत व्यय स्थानचा आरंभ कुंभ राशीच्या २३ अंशांत आहे. या स्थानांत मंगळानें ता० १५ मे रोजीं प्रवेश केला. या दिवसापासून दोन ग्रह अनिष्ट झाल्यामुळें प्रकृति बिघडली. मे महिन्यांत बहुतेक ग्रह ऊर्ध्वभागीं भ्रमण करूं लागल्यामुळें रोगाच्या तडाक्यांत व हालअपेष्टांत पिता सांपडला. एकादश स्थानापासून सुख स्थानापर्यंत स्थानें बहुतेक पाप ग्रहांनीं भरून गेलीं.

४ ता० १७ रोजीं चंद्र शनीशीं, १९ रोजीं रवीशीं, २० रोजीं राहूनें दूषित होता.

५ मुलाचे कुंडलींत दशमाचे दशमांत शुक्रास १० वा मंगळ, रवीसही दहावा मंगळ होता. ता० १७ पासून शुक्र राहूजवळ येऊं लागला. कुटुंबेश बुध राहूजवळ होता. चंद्राचे दशमांत हर्शल भ्रमण करीत होता. मृत्युदिवशीं चंद्र राहूजवळ येत चालला होता. ता० १८।१९ रोजीं रवि हा जन्मस्थ शनीवर जाऊन बिघडला आहे चंद्राचें कुटुंब स्थान बिघडलें आहे.

९ पित्याचे कुंडलींत गुरु हा व्ययेश असून जन्मकुंडलींत तो षष्ठ स्थानीं शनीशीं युत आहे. राशिपरत्वें गणना कारितां तो या वेळींही सहावा होता.

याप्रमाणें उभयतांच्या कुंडल्यांवरून पितृनिधनाचा बोध होत आहे.

गणेश दामोदर ग्रंथे.

पत्रव्यवहार.

[१]

वि० वि०—खालील मजकूर प्रसिद्धीसाठीं पाठविला आहे त्यास येत्या अंकीं स्थळ मिळावें.

जन्मकुंडलीवरून ज्यानें त्यानें आपलें राहण्याचें घर कसें निवडावें ह्या विषयीं.—

कुंडलींत सुखस्थानीं शुभ ग्रह किंवा चतुर्थेश स्वगृहीं असल्यास जन्मणारानें स्वदेशींच रहावें. त्याचा त्याच स्थळीं भाग्योदय होतो.

चतुर्थेश तृतीय स्थानीं किंवा तृतीय स्थानीं बलवान् ग्रहस्थिति असल्यास जन्मस्थानापासून ९० मैलांपर्यंतचे प्रदेशांत रहावें.

कुंडलींत नवम स्थान बलवान् असल्यास ह्मणजे भाग्यस्थानीं शुभ ग्रह असल्यास किंवा पाप ग्रह बलवान् असल्यास परदेशांत किंवा बरेंच लांब जाऊन राहिल्यास भाग्योदय होईल.

वरील स्थानीं ज्या राशी असतील त्यांच्या निदर्शक दिशेस वास करावा.

राशि	दिशा
मेष, सिंह, धनु	पूर्व
वृषभ, कन्या, मकर	दक्षिण
कर्क, वृश्चिक, मीन	उत्तर
मिथुन, तूळ, कुंभ	पश्चिम

कुंडलींत एखादा ग्रह बलवान् असल्यास तो ज्या राशीस असेल त्या राशीच्या दिशेकडे रहावें.

पहिल्या व दुसऱ्या केंद्राचा मात्र खालील गोष्टींत विचार करावयाचा जर कुंडलींत या केंद्री चर राशि असतील तर घर कोपऱ्यावर असावें. जर स्थिर राशि असतील तर घर सडकेच्या अगर रस्त्याच्या मध्यभागीं असावें. कोपऱ्यावर नसावें किंवा जेथें रस्ते किंवा सडका एकमेकांस मिळतात अशा ठिकाणीं नसावें. द्विस्वभाव राशि असल्यास घर सडकेच्या किंवा रस्त्याचे शेवटीं उपांत्य असावें. अगदीं शेवटीं किंवा कोपऱ्यावर नसावें.

उदाहरण—एका रस्त्यावर ३० घरें आहेत. तर मेष व कर्क राशी पहिलें घर आणि तूळ व मकर ३०वें घर दर्शवितात. इतर राशि यांमधील घरें दर्शवितात. स्थिर राशि नंबर २ते११ व द्विस्वभाव राशी नंबर १९ते२५ दर्शवितात. त्यांतल्या त्यांत वृषभ अथवा सिंह सडकेच्या वरल्या भागाकडे व वृश्चिक अथवा कुंभ खालच्या भागाकडे असावें. माझ्या मतें मीन राशीचें घर सडकेवर उपांत्य असावें.

एका केंद्रांत चर राशि असली व दुसऱ्यांत द्विस्वभाव किंवा स्थिर राशि असली तर ती उत्तरेकडील किंवा दक्षिणेकडील हा विचार करावा. चर सडकेचा शेवट व इतर सडकेचा आरंभ दर्शवितात.

समजा, लग्नीं मेष राशि असून सुखस्थानीं कर्क राशि आहे तर तुमच्या घराची एक बाजू उत्तरेकडे तोंड करून असावी व दुसरी पूर्वेकडे तोंड करून असावी.

कर्क ते तूळ—उत्तर पश्चिम
तूळ ते मकर—दक्षिण पश्चिम
मकर ते मीन—दक्षिण पूर्व

राहतें गांव मोठें शहर असल्यास चर राशि टेकडावरील किंवा उंची वरील बोध करील. द्विस्वभाव राशि शहराचा खालील भाग दाखवील. ह्या दोहोंमधील ठिकाण स्थिर राशीचें समजावें.

जेथें दोन रस्ते किंवा सडका एकमेकांस मिळून ओलांडतात तें ठिकाण चर राशीचें समजावें.

चतुर्थ स्थानीं बलवान् ग्रह नसल्यास ज्या गांवीं किंवा शहरीं तुमचा जन्म असेल त्या ठिकाणीं तुम्हीं राहूं नये. त्या स्थानीं शुभ ग्रह नसल्यास किंवा पाप ग्रह बलवान् नसल्यास तें गांव किंवा शहर सोडावें. यात्रमाणें घराची व राहण्याची निवड केल्यास सुख प्राप्त होईल.

ग्रहांचें स्थानगत सामान्य फळ ह्यांत भर पडण्याकरितां खालील माहिती पाठविली आहे.

लग्नीं एकटा रवि स्वगृहीं किंवा मित्रगृहीं असतां स्त्रीवर्गाकडून व बांधवांकडून मन संतप्त होतें. रात्रौ अग्नि किंवा उजेड यांपासून डोळ्यांस ताप होतो. स्वभाव उदार असतो. वाग्बाण सहन होत नाहींत. केश अल्प असून काळेभोर नसतात. राग फार वेळ टिकत नाहीं.

बुध द्वितीय स्थानीं स्वगृहीं हर्शलनें युक्त आहे तर फार बोलावेंसें वाटतें. स्मरणशक्ति अपूर्व असते. पाठ करणें आवडत नाहीं. असामान्य कला आवडतात.

शनि दशमांत मित्रगृहीं असतां नवीन अधिकाऱ्यांची गांठ पडतांच त्याचें अति प्रेम जडतें. शेवटीं वितुष्ट येतें. नोकरींत एखादे वेळीं अचानक संकट उद्भवतें.

एकादशांत स्वसंमुख राशींत गुरु असेल तर लहानपणीं शाळेंत पाठ करावयाचे विषय येत नाहींत. संस्कृताचा कंटाळा असतो.

नवम स्थानीं चर राशींत चंद्र असून लग्न स्थिर राशीचें असतां प्रवास होत नाहीं. फिरणें आवडत नाहीं. देवधर्माची आवड असते. स्त्रीच्या नातेवाईकांचें प्रेम नसतें. उत्तम शिक्षक होतो.

सुखस्थानीं वृश्चिक राशीचा राहु असतां मित्र नसतात. स्वभाव एकलकोंड्या असतो.

या प्रमाणें माहिती पाठविली आहे. कळावें लोभ असावा हे विनंति आपला.

गणेश दामोदर ग्रंथे.

२

पिता.

पुत्र.



जन्म. ता. १५।८।१८६२ रात्रीं १० जन्म. ता. १।९।८२ सकाळीं ४ ता. २० मे सन १९०९ रोजीं रात्रीं ९। वाजतां पिता मयत झाला, या गोष्टीचा शास्त्राशीं मेळ कसा बसतो पाहूं.—

१ उभयतांसही साडेसाती असून मुलाचे कुंडलींत ती नवम स्थानीं आहे. नवम स्थानची साडेसाती आई, (विशेषेंकरून) बाप, गुरु यांस मारक होते, हा शास्त्राचा सामान्य नियम प्रसिद्धच आहे.

२ पित्याचे कुंडलींत लग्नस्वामी मंगळ व नेपच्यून हे दोन पाप ग्रह आहेत. यांवरून शनि जात असतां मृत्यु प्राप्त झाला.

वास्तविक पाहतां आगष्ट मध्यें शनि व मंगळ मेष राशींत वक्री व्हावयाचे तेव्हां आयुष्याचिंता उत्पन्न व्हावयाची. परंतु ग्रहांचे परिणाम आगें मागें घडतात व ईश्वरी सूत्र पूर्णपणें जाणणें हें मनुष्यशक्तीच्या

पत्रव्यवहार.

वि. वि.—कुंडलीविज्ञान दाशाहिकाचें पाक्षिक झालें या पेक्षां त्याचे २९० वर्गणीदार कमी होऊन तें पैशासंबंधें पेंचांत आलें, यामुळें फार वाईट वाटतें. मराठी भाषेंत निघणाऱ्या मासिकांचे अहवालाकडे आपण लक्ष न दिल्यामुळें हें संकट आलेलें आहे, आणि केव्हां तरी तें येणारही होतें. कुंडलीविज्ञानाची सांपत्तिक स्थिति भरभराटींत येण्यास खालील गोष्टींचा विचार केला पाहिजे असें मला वाटतें.

नेमलेल्या दिवशीं प्रसिद्ध होऊन त्याच दिवशीं टपालांत पडणें. मग साप्ताहिक, दाशाहिक, पाक्षिक कीं मासिक कांहीही असो. सर्वांत मासिकच बरें. त्याच्या योगानें टपालखर्च वांचतो. प्रेसला व व्यवस्थापकाला सवड मिळते. मध्यंतरीं बराच वेळ मिळाल्यामुळें मासिक सर्वांगसुंदर करण्याकडे लक्ष देण्यास मिळून प्रेसचा खर्च भागण्यास साधन होतें. कुंडलीविज्ञान हें कांहीं वृत्तपत्र नव्हे कीं त्यांतील बातमी लवकर मिळाली नाहीं तर ती शिळी होईल!! कसें तरी लवकर लवकर प्रसिद्ध करण्यापेक्षां आहे त्या आकारांत चांगल्या भारदस्त लेखांनीं अगदीं नेमल्या तारखेस महिन्यानें प्रसिद्ध झालें आणि तें नेमल्या दिवशीं वर्गणीदारांच्या हातीं पडलें तर वर्गणीदारांची संख्या बरीच वाढून पुष्कळ फायदा होईल.

अनियमितपणानें बरेच वर्गणीदार नाखुष होतात. महाराष्ट्रकविसारख्या नुसतें काव्य प्रसिद्ध करणाऱ्या मासिकांस पहिल्या वर्षी २००० वर्गणीदार झाले होते. आणि ते पुढें हजारांनीं वाढले असते. तें त्या वेळीं नियमित प्रसिद्ध होत होतें परंतु पुढें पुढें त्याचा निय-

मितपणा अगदीं गेला आणि आतां तर तें अगदीं बंद पडल्या सारखेंच झालें आहे. यावरून कांहींच बोध घेण्यासारखा नाहीं काय?

रा० ग्रंथे वगैरे मंडळीस वर्गणी वाढवून तें साप्ताहिक करावेंसें वाटतें. व्यवहारी मनुष्याला अशी सूचना कधींही पसंत पडणार नाहीं. वर्गणीचा जेवढा मोठा आंकडा तेवढे वर्गणीदार कमी असा सर्वसाधारण नियम आहे. मासिक साधारणस्थितींतीलही मनुष्यास घेतां येईल अशी वर्गणीची रक्कम ठेविली पाहिजे. दर जितका कमी तितका खप जास्त. आणि खपाप्रमाणें फायदा हें विसरतां कामा नये. वर्गणीदार वाढण्यास विषयविवेचनांत थोडासा फरक करणें जरूर आहे.

कुंडलीविज्ञानांत १ संपादकीय लेख २ कुंडलीसंग्रह व विचार ३ सायननिरयन व ज्योतिषविषयक पत्रव्यवहार ४ जुन्या ग्रंथांचीं भाषांतरें व नवीन ग्रंथ लिहिणें हीं आंगें आहेत.

संपादकीय लेख विद्यार्थ्यांस शिक्षण देण्याच्या हेतूनें लिहिला पाहिजे. भविष्यवादी लेख लिहून मासिकाची जागा अडविण्यापेक्षां त्या गोष्टी घडल्यानंतर असें कां झालें याजबद्दल विचार करून लेख लिहिणें बरें. भविष्य प्रसिद्ध करून तें खोटें ठरल्यास संपादकावरील विश्वास उडतो, व मासिकाच्या सांपत्तिक स्थितीस धोका येतो. आर्द्राप्रवेशवरील लेख बहुतेक खोटे ठरतात. कोणत्या प्रांतावर कोणत्या राशीचा अंमल आहे त्याचा विचार न करितां तात्विक दृष्टीनें ग्रहांच्या परिभ्रमण कालास अनुसरून केलेली भविष्यें जिकडे तिकडे अनुभवास कशी येतील? दुर्गादेवीचा दुष्काळ अवर्षणामुळें फक्त महाराष्ट्रांत पडला होता त्या वेळीं ग्रहांच्या युत्या समोरा समोर येणें बंदच होतें कां? यावरून आर्द्राप्रवेश वर्तविणारांनीं कांहीं बोध घेण्यासारखा नाहीं?

त्याचप्रमाणें कुंडली देऊन पुढील एखाद्या गोष्टीबद्दल भविष्य प्रसिद्ध करण्यांत येतें. त्या वेळीं हीच कुंडली खरी कशावरून याबद्दल घडलेल्या गोष्टीशीं मेळ देऊन मग पुढील भविष्य वर्तविणें बरें. त्यांत दोन फायदे होतील एक कुंडलीचा विचार करण्याचें शिक्षण मिळेल आणि इष्ट कालाचे दोष बाहेर पडतील.

दशांच्या आधारें वर्तविणाऱ्या फळावर आपला विश्वास नाहीं, नसो. परंतु लघुबृहत् व वृद्धपाराशरीवरून विंशोत्तरी दशांच्या फलांबद्दल आपण एक मोठा लेख लिहाल तर विंशोत्तरी फळें देणारास एक साधन होईल. त्याचप्रमाणें द्वादश भावांच्या फलांबद्दल आपले येत असलेले लेख बंद पडले आहेत ते लागोपाठ सुरू ठेवून पुरे करावे. सायननिरयन वादाचें अवडंबर माजविण्यापेक्षां त्याच्या योगानें वर्गणीदाराचें मन जास्त आकर्षेल व त्यांत प्रत्येक भागावर ज्या ज्या गोष्टींचा विचार करावा ह्मणून प्राचीन ग्रंथकारांनीं सांगितलें आहे त्यांत तथ्य कितपत आहे या बद्दल चांगला ऊहापोह होईल तर फलज्योतिष वर्तविणारांना बराच फायदा होईल.

कुंडलीसंग्रह असाच क्रमानें होत गेल्यास कालांतरानें दुसरी भृगुसंहिता होईल. इष्ट कालाच्या खरेपणाबद्दल घडलेल्या खऱ्या गोष्टींशीं मेळ घेतल्याशिवाय मात्र यांत संग्रह होतां नये. इष्ट काल, सायन निरयन कुंडल्या, वर्षवार घडलेल्या खऱ्या हकीगती, व त्याजबद्दल विवेचन अशा त्या आल्या पाहिजेत. काल ठरविण्यास त्यांचा बराच फायदा होईल. निरयन कुंडलीस व इष्टकालास फांटा दिल्यासारखा दिसतो तें बरें नाहीं. सायन निरयनाच्या फलादेशाबद्दल वाद इतक्यांत नाहींसा होण्यासारखा नाहीं. दोन्ही मताचे लोक असणार, त्या सर्वांस त्या संग्रहाचा फायदा झाला पाहिजे.

सायननिरयन.—पाण्याशिवांय चालत नाहीं तरी पुष्कळ वर्षांव झाल्यास त्याचा कंटाळा येतो, आणि पाणी न सुरतां बहुतेक वाहून जातें. अति झालें ह्मणजे मातीमोल होतें. मासिकाच्या आकाराच्या मानानें तो फार होतो आणि पुष्कळशा वर्गणीदारांस त्याचा तात्कालिक फायदाही नाहीं. त्यांत थोडी छाटाछाट होऊन इतर विषयांस जागा मिळाल्यास वर्गणीदार बरेंच वाढतील.

कै० रा० चिटणीसाचे त्रुटित लेख एकत्र करण्यांत गुंतून रा० यशवंत रावांनीं पहिल्यानेंच मंदाचें वर्णन देऊन बाकी ग्रहांबद्दल व वर्षफळाबद्दल मंदत्व स्वीकारिलें आहे, सायन निरयन वादांत मासिकाची सर्वजागा आडविण्यापेक्षां रा० दिवाडकर, प्रधान, ग्रंथ्या सारख्यांचे स्वतंत्र लेखांत अडल्यास वर्गणीदारांस तात्कालिक पुष्कळ फायदा होईल. व वर्गणीदार वाढतील आणि पश्चिमेकडची पूर्वेकडे थोडी भर पडेल.

भाषांतरें.—पाहिजेत व नकोत असें ह्मणणारे दोन वर्ग आहेत. कांहीं वर्गणीदार ग्रंथाची भाषांतरें मिळणार ह्मणुनच झालेले असतात. रा० आठले, संगमनेरकर, कडलग, गोंधळेकर व रामतत्व प्रेसनें निवळ मराठी वाचणारांस बरीच मदत केलेली आहे रा. कडलग यांचीं भाषांतरें आतां उपलब्ध नाहींत. वरील बहुतेक भाषांतरें ट स ट केलेलीं असून मूळ निर्यमाच्या लागू गैर लागूपणाबद्दल मूळींचें विचार केलेला नाहीं, त्यापेक्षा आपली पद्धत फार चांगली परंतु ती प्रसिद्ध करण्यांत आपण पुष्कळांस हिरमुसलें केलें आहे. जातक पारिजाताचें १००।२५० पृष्ठांचें भाषांतर पुरें होण्यास ७।८ वर्षे लागलीं त्याच प्रमाणें दुसऱ्या ग्रंथाचें, अशीं दीर्घ काळीं भाषांतरें प्रसिद्ध झाल्यानें पुष्कळांकडे तीं अपुरींच राहिलीं असतील. त्या

मुदतींत आपल्या सांपत्तिक स्थितीमुळें कित्येकांस विज्ञान सोडावें लागलें असेल कितीएक मेले असतील व कित्येक अविचाऱ्यांनीं पुढें कोणता विषय येतो हें पाहण्याच्या अधीरतेची निराशा झाल्यामुळें रागावून विज्ञानास कायमचा रामराम ठोकला असेल! वाचकांचा विरस कसा होतो हें पाहण्यास संपादकीय खोलींतून वाचकाचे खोलींत गेलें पाहिजे ह्मणजे अनुभव येईल. त्यामुळें भाषांतर करण्यांत आपण केलेले श्रम निरुपयोगी झाले आहेत. ही पद्धत निःसंशय वाईट! यानें वर्गणीदार न वाढतां कमीच होतील यांत सुधारणा झाली पाहिजे. दोन चार भाषांतरें अगर स्वतंत्र ग्रंथ एकदम सुरू करून ते केव्हांतरी पुरे करण्यापेक्षां एकादा चांगला ग्रंथ घेऊन त्याचें भाषांतर लागोपाठच्या अंकांत देऊन पुरें करणें दोघांसही फायदेशीर होईल.

भाषांतर देणें तें मूळ अर्थ खुलासा आणि अर्थ किंवा खुलाशा संबंधीं मतभेद झाल्यास शेवटीं उपसंहारात्मक लेख देऊन व त्या पद्धतीनें एक दोन पत्रिका तयार करून दाखवून पुरें करणें बरें.

स्वतंत्र ग्रंथ रचना करिते वेळीं शिकलेल्या करितां करितों अशी भावना न ठेवितां नवीन विद्यार्थ्याकरितां करितों अशी भावना ठेवणें बरें दुसऱ्या ग्रंथावर हवाला देणें बरें नाहीं (ताजीकमध्यें १२ भाव तयार करण्याची रीत दिलेली नाहीं)ज्या वेळीं आपले दाशाहिक निघत असे त्या वेळीं त्याची महिन्याच्या पहिल्या अकांत संपादकीय लेख व कुंडलीसंग्रह २ ज्यांत सायन निरयन व दुसरे ज्योतिष-विषयक लेख आणि तिसऱ्यांत जुन्या ग्रंथांचीं भाषांतरें व नवीन ग्रंथ अशी वांटणी केली तर बरें असें मला वाटत होतें आणि त्याप्रमाणें दरमहा २०।२०।२४ अशी वांटणी केल्यास कोणासही

कुरकुर करण्यास जागा राहणार नाहीं त्यानें बरेच वर्गणीदार वाढतील आणि भाषांतराचे ज्या वेळचे त्यावेळीं निरनिराळे जास्त फार्म ठोकून ठेविल्यास स्वतंत्र विक्रीकरितां पुस्तकें बीन छपाई खर्चात ठेवतां येतील हा फायदा थोडा नाहीं.

एकंदरींत मासिक वेळेवर प्रसिद्ध करून ज्यावेळच्या त्या वेळीं वर्गणीदाराकडे पोहोंचेल अशी तजवीज ठेवा, वर्गणीदाराचा कल पहा, भाषांतरें द्या, कोणताही विषय लागोपाठ देऊन तो पुरा करा. सायन निरयनची थोडी छाटाछाट करा, ह्मणजे वर्गणीदारांस कमतरता पडणार नाहीं.

कळावें लोभ असावा हे विनंति.

आर. एस्. इंगळे.

---

* सूचना पसंत आहेत. वर्गणीदारांची संख्या साल अखेर पर्यंत पुरी होईल अशी अशा वाटत आहे. पुरी झाल्यास व नव्या वर्षाची वर्गणी तितक्या वर्गणीदारांकडून हातीं आल्यास कुंडलीविज्ञानचे अंक पूर्ववत् निघूं लागतील. इतर सुधारणा शक्य तितक्या होत जातील. हें वर्ष आतांपर्यंत संपादकास अनेक गोष्टींनीं वाईट गेलें आहे. संपादकाला मनःस्वास्थ्य व पैशांचा भरपूर पुरवठा होईल तर कोणतेंही पुस्तक वेळेवर भारदस्त लेख प्रसिद्ध होऊं शकेल हें कोणास नव्यानें सांगावयाचें नाहीं! परंतु ह्या दोन्ही गोष्टी दैवाधीन आहेत अशी आमची ८ वर्षांत पूर्ण खात्री झाली आहे.

—संपादक—

२

रा० रा० कुंडलीविज्ञानकर्त्ते यांस

सा० न. वि. वि.—कै० जीवनराव चिटणीस यांच्या कुंटुबाच्या मदती करितां फंड स्थापन केल्याची हकीगत कुं० वि० पुस्तक ९ अंक ८-९ मध्यें प्रसिद्ध झालीच आहे. सदर फंड स्थापन होतो न होतो इतक्यांत मुंबईस प्लेगचा फेरा आला व मंडळी बाहेरगांवीं गेली त्या मुळें फंडाच्या कामीं खटपट करणें मागें पडलें.

सदर फंडाकरितां मेसर्स वैद्य ब्रदर्स काळबादेवी मुंबई यांस खजीनदार नेमिलें आहे. फंडाची जी वर्गणी जमा होईल तिची पोंच ते आपल्या कुंडलीविज्ञानांत वेळोवेळीं प्रसिद्ध करणार आहेत. फंडाच्या यादींत ज्या सद्गृहस्थांनीं आकडे घातले व लागलीच रक्कम पोंचती केली त्यांचे आह्मीं फार आभारी आहों. ज्यांनीं आकडे घातले असून अद्यापि वर्गणी दिली नसेल त्यांनीं ती आतां मेसर्स वैद्यब्रदर्स यांजकडे लवकरच भरावी अशी माझी विनंति आहे.

सदर फंडास अद्यापि ह्मणण्यासारखी रक्कम गोळा झाली नाहीं व मध्यंतरीं प्लेगच्या अडचणीमुळें या कामीं खटपट करितां आली

नाहीं हें खरें आहे. तथापि आतां आह्मी शक्य तितकी खटपट करीत आहों. तरी कै० जीवनराव यांचा परिचय असलेल्या सर्व गृहस्थांनीं पुढें होऊन यथाशक्ति मदत करावी अशी विनंति आहे. कै० जीवनराव यांचे विषयीं कोणास जी माहिती पाहिजे असेल ती खालील पत्त्यावर विचारिली असतां देण्यांत येईल. कळावें, बहुतकाय लिहिणें लोभ असावा हे वि०—

आपला.

यशवंत केशव प्रधान.

ता. २०।८।०९ सेक्रेटरी ज्योतिर्विद मंडळ.

घ. नं. १२ शेणव्याची चाळ. ठाणें.

कै० जीवनराव चिटणीस यांचे लेख.

[अंक १४ वरून पुढें चालू]

कपाटांतील राशी होत अथवा स्थानें होत. दक्षिण कपाट अथवा दक्षिण केंद्र हा भाग अस्तापासून मध्यान्हा पर्यंतचा भाग आहे. ह्मणून कृत्तिका नक्षत्र अस्तास जात असतांना वृषभराशि अस्तकेंद्रीं येते. सिंहराशी अथवा मघानक्षत्र किंवा सप्तर्षिचा प्रदेश हा मध्यवर्ती येतो व उदय केंद्र वृश्चिक राशींत येते. बायबलमध्यें जोबचें पुस्तक इसवी सनाचे पूर्वी ९ वे शतकांत लिहिलें गेलें आहे व याच काळाचे पूर्वी गर्ग—पराशर—वेदांगपद्धत—चिनी लोकांचा राशीचक्रारंभ यांचा मेळ आहे.

मघा नक्षत्र अथवा सिंहराशी मध्यवर्ती आहे व उदगयनारंभ येथें घेतला ह्मणजे अर्जुन अथवा सूर्य मघा नक्षत्रीं आवर्ततो

सूर्यायां वहतुः प्रागात् सविता यम वा सूजत । अघासु हन्यंते गावार्जुन्योः पर्यूह्यते.

ऋ. सं. १०—८५—१३

सूर्या नांवाची सवित्याची कन्या सोमाला दिली, तेव्हां सूर्याने ज्या गाई आंदण दिल्या त्या आदल्या दिवशींच ह्मणजे मघानक्षत्रीं हांकून नेल्या आणि कन्या अर्जुनी नक्षत्रावर नेली.

अर्जुन हा रूपकानें पर्जन्य आहे. पर्जन्यकाळ आणि गाई यांचा संबंध आहे असें गृहीत धरलें तर हा काळ निराळा येईल. परंतु मघानक्षत्रीं वसंत संपात व उदगयन कृत्तिकावर धरलें तर ऋग्वेदाचा काळ मागें जातो ह्मणून ही कल्पना त्याज्य आहे.

ऋग्वेदाचे ३ रे मंडलाचा कर्ता विश्वामित्र ऋषी आहे. विश्वामित्र गाधीजाचा मुलगा आहे. गाधिजाचे स्त्रीचें नांव पौरकुत्सा आहे

पौरकुस्ता या नांवाची ३री मुलगी झोन्याष्टरची आहे. झोन्याष्टरचें चित्र हिंदू नाण्यावर आहे व तीं चित्रें सिथीयन अथवा क्षत्रिय राजे यांचें नाण्यावर आढळतात. झोन्याष्टर हा छंदावस्थेचा कर्ता असून ऋग्वेद रचना छंदशास्त्रावरून तयार झाली, असें प्रतिपादन करणारें एक मत आहे. झोन्याष्टराचा काळ इ. सनापूर्वी २१शें किंवा २२शें वर्षांचा आहे असेंही एकमत आहे व यावेळीं संपात रोहिणींतून कृत्तिकेंत येतो. विश्वामित्रानंतर १०।१२ पिढ्या गेल्यावर अर्जुन झाला म्हणून मानवी अर्जुन मानवी कृष्ण मानवी जनक मानवी विश्वामित्र—पराशरादिक यांची नांवें वेदांत आढळतात म्हणून वेदाची रचना—आवस्था पुस्तकांची रचना—बायबलची रचना हीं सर्व इसवी सनापूर्वी ५००पासून १हजार वर्षांचीं दिसतात म्हणून रा० टिळक व फ्लकेंट यांनीं काढलेलीं अनुमानें चोहोंबाजूनीं मिळतीं दिसत नाहींत म्हणून वैदिक काळ आणि ऐतिहासक काळ यांतील पुरावे पंचांगांचे प्राचीनत्व पहातांना जरूरीचे दिसतात.

भाग ५ वा

वेदांत सूर्य सात आहेत त्यांचा क्रम आदिती पासून आहे. आदितीनें आठवा रवी मारला त्यास मृतअंड किंवा मार्तंड असें म्हणतात. वेदांतील या कथेस अनुसरून गंगेनें आपला आठवा पुत्र जो भीष्म तो नदींत टाकला!! वेदांतील सात रवींचें काळीं ३६० अंशाचे वर्तुलाचे ७ भाग होतात ५२ दिवसांचा एक महिना होतो. २६ दिवसांचा पंधरवडा होतो, व १३ दिवसांचा आठवडा होतो या काळीं रवी आणि चंद्र यांचे मध्यें १२ अंश अंतर पडलें म्हणजे १ तिथी पूर्ण—होते ही भाषा त्या काळीं दिसत नाहीं.—सात रवीचे वेळीं ऋतु तीन होते. ऋग्वेदांत तीन ऋतूंचा उल्लेख आहे.

वेदांत नंतर १० रवी झाले व त्या अनुरोधानें पांच ऋतू झाले

या वेळीं ३६ दिवसांचा एक महिना व ९ दिवसांचा एक आठवडा होता. या वेळीं तिथी हल्लीं प्रमाणें नसली पाहिजे वेदांत तिथीचें लक्षण दिलें आहे.

यां पर्यस्तप्रियादभ्युदि तिसातिथिः ॥
ऐ. ब्रा. ३२–१०

ज्या नक्षत्राचे ठिकाणीं चंद्र अस्त पावतो आणि उगवतो ती तिथी होय. चंद्राची गती १२ अंशापासून तो १३$\frac{1}{3}$ अंशांपर्यंत जाते व त्याप्रमाणें प्रत्यक्ष नक्षत्रांची व्याप्ती नाहीं. भरणी नक्षत्र फक्त ६अंश आहे. तेव्हां चंद्र भरणी नक्षत्रीं उदय व अस्त पावणारा नाहीं. कोणती तरी एक स्थिती मिळेल परंतु दुसरी मिळणार नाहीं. त्याच प्रमाणें सूर्यसिद्धांत व गर्ग यांत पूर्वाषाढा—अभिजित् आणि धनिष्ठा यांत अंतरें १६अंश ४० कलांची आहेत तेव्हां १६$\frac{2}{3}$ अंश चंद्र कधींच जात नाहीं. म्हणून वेदांतील तिथि शब्दाचा अर्थ नक्षत्रान्वयें मिळन नाहीं!! विभात्मक नक्षत्रें आकाशांत कल्पीत आहेत तेव्हां २७ नक्षत्रें म्हणजे एक भचक्र किंवा ३६० अंश असें मानलें तर नक्षत्रांचे विभाग कमी जास्त आहेत म्हणून १३अंश २०कला म्हणजे नक्षत्र असें मानण्यास आधार नाहीं. सारांश देहधारी नक्षत्रें यांचा जसा मेळ नाहीं, तसा क्रांतिवृत्तांत २७ भाग विभागून वेदांतील २७ उप नक्षत्रांचा मेळ दाखवितां येत नाहीं. म्हणून कोणतीही नक्षत्रपद्धत गणितास पात्र नाहीं. वेदांत कृत्तिकादि आहे. वेदांग काळीं धनिष्ठादि आहे त्याप्रमाणें अश्विन्यादि वेदांत नाहीं. अश्विन्यादि नक्षत्रें म्हणजे सायन—नक्षत्रें, किंवा निरयण नक्षत्रें असाही बोध होत नाहीं. म्हणून वेदांतून २७ नक्षत्रें व २७ उप नक्षत्रें मानण्यास आधार नाहीं.

वेदांत ७ रवी आहेत, त्या अनुरोधानें महिने ७ पाहिजेत. वेदांत १३ महिन्यांचा उल्लेख आहे, तसाच वेदांत १२ महिन्यांचा उल्लेख आहे ह्मणून वेदांत मध्यंतरी १० महिम्यांचें वर्ष पाहिजे हें उघड दिसते—कारण वेदांत १८ महिन्यांचें वर्ष दिसतें.

वेदांत १० महिन्यांचें वर्ष होतें किंवा नाहीं हें पाहतांना यूरोपीय पुस्तकांत १० राशी मानल्याचा पुरावा मिळतो किंवा नाहीं हें पाहणें जरूरीचें आहे यूरोपीय ज्योतिषांत १० राशी बद्दल पुरावा मिळतो तोः—

[मजकूर इंग्रजींत असल्यामुळें देतां येत नाहीं.]

पूर्वी राशी १० होत्या तूळ ही लुप्त होती ह्मणजे कन्या आणि वृश्चिक राशि हा एकच भाग समजत असत. १० राशींचे काळीं ३६ दिवसांचा एक महिना व ९ दिवसांचा एक आठवडा पाहिजे. ९सौर दिवसांत चांद्र मासाच्या १०तिथी पूर्ण होतात.

चंद्रमा वै पंचदशः ॥ एषहि पंच दश्याम् पक्षीयते पंशद्दश्यमा पूर्यते ॥ तै.ब्रा. १-६-१० पंचदशीला चंद्रक्षीण होतो. पंचदशीला पूर्ण होतो. पंचदशी ह्मणजे १५ असा अर्थ आहे. पौर्णिमेस चंद्र बलवान् असतो. यांत १५दिवसांचें अंतर पडतें. चंद्र शुक्ल पक्षाचे पंचमीपासून तो कृष्णपक्षाचे पंचमीपर्यंत तेजयुक्त असतो, तसा कृष्णपक्षीं चंद्र बलवान् नसतो. यावरून पंचदशी शद्वाचा अर्थ निव्वळ १५ घेणें खरा आहे तसा प्रत्यक्ष स्थितीस युक्त दिसत नाहीं.

पंच वर्षात्मक युग पद्धत स्वतंत्र आहे. चांद्रमानाच्या ५ तिथी हा एक भाग मानलातर ९ सौर दिवसांत २ पांच दिवस चंद्राचे होतात. ह्मणजे प्रतिपदे पासून ५ पंचमी जास्त बलिष्ट व ९ नवमी १० दशमी जास्त बलिष्ट आणि त्याहून पौर्णिमा अत्यंत बलिष्ट होय. पुढें क्रमानें चंद्र क्षीण होत जातो. पंचदशाशब्दाचा अर्थ या

जगद्वृत्त

दैविक चमत्कार—संयुक्त प्रांतांत केराकत नांवाचा एक कसब्याचा गांव आहे. तेथें एक शाळा आहे. तिच्यामध्यें पुष्कळशीं मुलें शिकण्यास जात असतात. एके दिवशीं १० वाजतां शाळा-मास्तरानें नेहमीप्रमाणें सर्व मुलांस सुटी दिली. त्यांत एका सावकाराच्या मुलाच्या अंगावरील २०० रु. किंमतीच्या दागिन्यांचा अपहार करण्याची दुष्ट बुद्धि त्या मास्तरास होऊन त्यानें त्या मुलास अटका. वून ठेविलें. सर्व मुलें निघून गेल्यावर दुष्ट मास्तरानें दरवाजा बंद करून त्या मुलाचे हात बांधून त्याच्या मानेवर सुरी चालविली पण सुरी अगदींच बोथड असल्यामुळें थोड्याशा जखमा मात्र झाल्या. त्यानें काम होईना. मास्तराच्या ह्या भयंकर कृत्यानें मुलगा भीतीनें गांगरून जाऊन अत्यंत करुण स्वरानें—मास्तर साहेब माझे सर्व दागिने घ्या, पण मला मारूं नका असें ह्मणूं लागला. पण त्या मास्तराचें हृदय दागिन्यांच्या लोभानें इतकें कठीण झालें कीं, त्या मुलाच्या करुणापर शब्दांनीं यत्किंचित्ही द्रवलें नाहीं. तो ह्मणाला तुला जिवंत सोडलें तर मला शिक्षा होईल, ह्मणून मी तुला आतां जिवें मारणार. यावर तो निःसहाय व दीन झालेला मुलगा निराश होऊन ह्मणाला, 'तर मग मला ह्या बोथड सुरीनें तरी मारूं नका. मला त्यामुळें फार यातना होतात. ती तिकडे दोन मण वजनाची दगडतळी पडली आहे ती माझ्या डोक्यांत घाला ह्मणजे एकदम माझे प्राण जातील.' त्याप्रमाणें तो दुष्ट मास्तर तळी उचलण्यास गेला. तळीला हात घालतो आहे इतक्यांत तेथें जवळच असलेल्या एका सर्पानें त्याच्या दोन्ही हातास विळखा घातला परंतु चावला

नाहीं. इकडे दुसरीं मुलें आपापल्या घरीं जात असून आपला मुलगा अझून कोठें दिसत नाहीं, ह्मणून मुलाच्या बापानें दुसऱ्या मुलांस विचारिलें. त्यांनीं सांगितलें कीं, त्यानें घडा बरोबर केला नव्हता ह्मणून मास्तरानें त्यास सोडिलें नाहीं. बराच वेळ झालेला पाहून सावकार स्वतः शाळेकडे गेला तों दरवाजा बंद पाहून मास्तरांस हांका मारूं लागला. मास्तर कसला जबाब देतो. मुलानें मात्र बापाचा आवाज ओळखून ओरडून सांगिलें कीं, बाबा, माझे हात बांधलेले आहेत व सुरीचे घाव माझे मानेवर लागले आहेत त्यामुळें मला उठवत नाहीं व मास्तराच्या हाताला सापानें विळखा घातला आहे हें ऐकून मुलाचा बाप अतिशय घाबरून जाऊन तो धांवतच पोलीस चौकीवर गेला व सर्व हकिकत सांगितली. त्याबरोबर चौकीवरील अंमलदार दोन शिपायांसह शाळेकडे गेला व दरवाजा फोडून आंतील सर्व देखावा त्यांचे दृष्टीस पडला. मुलास मोकळें करून त्यास झालेल्या जखमांस औषधोपचारासाठीं इस्पितळांत पोंचतें केलें. नंतर त्या हिंदु अंमलदारानें सर्पाची प्रार्थना केली कीं, आपण इतका वेळ या दुष्टास बांधून ठेविलें, आतां माझे ताब्यात द्या, त्याच्या अपराधाबद्दल त्यास शासन होईल असें करतों. इतक्यांत सापानें आपला विळखा सोडून हळूंच सरपटत कोठें नाहींसा झाला. ह्या दुष्ट मास्तरावर खटला करण्यांत आला आहे. सापानें मुलाचे प्राण वांचविले ह्मणून त्याचा बाप व गांवचे लोक ईश्वराच्या अगाध लीलेचें कौतुक करीत आहेत. ह्मण आहे कीं, "ईश्वर तारी त्यास कोण मारी" ही बातमी "मारवाडी" पत्रास पिपराइज येथून बक्षीराम छायानीं लिहून पाठविली आहे.

—सुबोधसिंधु—

पत्रव्यवहार.

१

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.

वि. वि. खालीं लिहिलेली कुंडली आपले दाशाहिकांत प्रसिद्धीकरितां व संग्रहाकरितां पाठवित आहें.

शके १८१७ कार्तिक व. १ रविवार ३५–४९ भरणी
१८–४४ इष्ट ४४–२ समयीं कन्या जन्म.

निरयन

या मुलीचे आईबाप लहानपणींच वारले. चुलत्याचे घरीं व विशेषेंकरून मातामहीचे घरीं वाढली. चुलत्यावर व मातामहीवर लग्न होईपर्यंत काय काय संकटें आलीं असतील तीं माहीत नाहींत. लग्न शके १८२८ चे माघ शु० ७ स मीन लग्नावर झालें. लग्नाचे दोन दिवस पूर्वी वराचे धाकटे बहिणीस एकाएकीं ज्वर येऊन सन्निपात झाला परंतु ईशकृपेनें ती वाचली. वराची पुतणीही त्याच सुमारास बुडतांबुडतां वाचली. लग्न कसेंतरी होऊनही मुलगी आपले भावाचे लग्नास परगांवीं गेली ती वराचे घरीं फाल्गुन वद्य ४ थीस पोहोंचली व तिची सासू फाल्गुन व. ६ स दोनच दिवसानंतर प्लेगनें वारली. पुढें ४ महिन्यांच्या आंतच हिचे सासऱ्यास नोकरी सोडून पेनशन घेणें भाग पडलें. लग्नाचे दिवशींच वराचे हातीं नोकरी सुटल्याचा हुकूम पडला. वरावर व वराचे मामावर नोकरी संबंधाने वारंवार आपत्ती येत असतात. या मुलीचें कोणतेंही

शुभ क्रय उभें केल्यास त्यांत अकल्पित अडचणी येऊन सर्वांचे मनाचा विरस होऊन तें कार्य कसें तरी पुरें करावें लागतें. या मुलीचा जन्म रविवार भद्रा तिथी व कृतिका नक्षत्रीं आहे व हा विष कन्यायोग होतो. हा नवऱ्यास अनिष्ट असावा. परंतु येथेंतर तिचे सहवासांत असलेल्या सर्वांवर वाईट परिणाम होतांना दिसत आहे. तरी विष कन्यायोगाचाच हा परिणाम आहे किंवा आणखी कांहीं कारणें आहेत ह्याचा आपण व आपले विद्वान् वाचक कृपा करून खुलासा करतील अशी आशा आहे.

आपला.
भो. ग. आ.
वर्धा.

२

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते यांस

वि. वि.—खालील चार ओळीस दाशाहिकांत सवडीप्रमाणें स्थळ मिळण्याची मेहेरबानी व्हावी.

जन्म कुंडलींतील भाग्य ह्मणजे नववें स्थानसंबंधी माझे अल्प मतीनें जे विचार सुचले ते लिहून पाठवीत आहें.

नववे स्थानास **भाग्य** अशी संज्ञा आहे. ह्या शब्दांत बऱ्याच अर्थाची व्याप्ति आहे, व तो शब्द उच्चारतांच महत्त्वाचा वाटतो.

जुन्या ज्योतिषी लोकांचें गणित विषयाकडे जितकें लक्ष असतें तितकें फलज्योतिषाकडे नसतें, किंवा परंपरा तशीच आहे असें ह्मणावें लागतें. ह्मणून फलज्योतिषावर नवीन शोधाकडे जनप्रवृत्ति कमी आहे.

भाग्यस्थानासंबंधी विचार करण्यास गर्भकालाचे किंवा आधान-कालाचे कुंडलीची आवश्यकता विशेष लागेल. आधानकालावरून कुंडली मांडणें कठीण खरें, परंतु अशक्य नाहीं.

कोणतीही गोष्ट घडण्यास त्या गोष्टीची कर्मप्रवृत्ति अगोदर होत असते. जसें एखादा तळलेला पदार्थ भक्षण केला असतां मागाहून

१।२ तासांनीं कंठास कोरड पडून तहान लागेल, पण या तहानेच्या पूर्वी तो पदार्थ भक्षण केलेला असतो. तसेंच प्रत्येक प्राणी जन्मास येण्याचे पूर्वी जें कर्म करितो त्याच्या चांगल्या वाईट परिणामाप्रमाणें तो जन्मास येतो. ह्मणून पूर्वी जें कर्म घडलें असेल तें आधान कुंडलीवरून समजेल. प्राणी गर्भांत येण्याच्या अगोदर दुसऱ्या जन्म-स्थितींत असतो. ह्मणून गर्भकुंडलीच्या वेळेपूर्वी कांहीं थोडा वेळ अगोदरची कुंडली मांडून पाहिली असतां ती जन्मणारा कोणतीं कर्में करीत होता हें दाखवील. व ती कुंडली त्याचें कर्मरूपी भाग्य पाह-ण्यास उपयोगी पडेल.

भृगुसंहिते सारखे ग्रंथांत मागील जन्माचें फल असतें, तें बहुत करून याच घोरणावर असावें. उदाहरणार्थ, मागील जन्मीं जन्म-णारा एक वाणी होता. त्यानें ब्राह्मण विन्मुख घालविला ह्मणून किंवा गाईस मारिलें ह्मणून संतति होत नाहीं वगैरे.—अमक्या ग्रहावरून अमुक कर्मप्रवृत्ति झाली असा मात्र त्यांत खुलासा नसतो.

कुंडलींतील बारा स्थानांस जीं नांवें दिलीं आहेत त्यांवरून पाहतां मृत्यु स्थानांनंतर भाग्याचा आरंभ आहे, व नंतर राज्य, आय, व्यय असा क्रम आहे. मेल्यानंतर जें कर्म पूर्वी केलें असेल त्या भाग्या-नुरूप जन्म होऊन पुढें राज्यस्थानाप्रमाणें ऐश्वर्य प्राप्त होऊन लाभ व कीर्ति यांची प्राप्ति होते व शेवट होतो. ह्मणून कुंडलींतील ९ते१२ अखेर स्थानें मागील जन्माचीं होत व तीं या जन्मीं फलें पाहण्यास उपयोगीं पडून बाकीचीं स्थानें पुढील जन्माचीं फलें उत्पन्न करणारीं होत. मागील जन्मीं केलेल्या पुण्याईप्रमाणें या जन्मीं कर्में घडून येतात. ह्मणून ९ते१२ या स्थानांचा विचार या जन्मीं पाहण्यास ठीक होईल.

पुष्कळ लोकांचा या शास्त्रावर विश्वास नाहीं. ज्योतिष्यांचीं फलें त्यांच्या अनुभवास येत नसल्यानुळें त्यांस विश्वास उत्पन्न होत नाहीं. शास्त्र खरें, परंतु कांहीं वहिवाटीचे मार्ग कित्येकांचे मतें चुकीचे आहेत. जुने ज्योतिषी संतति संबंधी विचार करण्यास फक्त पंचम

स्थानच पाहतात. किंवा तेथें ग्रह नसल्यास त्याचा स्वामी विचारांत घेतात. कित्येकांचे विचार १।२।३ स्थानांत पुरुष ग्रह असल्यास प्रथम संतति मुलगा नाहींतर मुलगी होईल असें सांगतात. कित्येक चतुर्थ स्थानावरून प्रथम संततीचा विचार करितात. हल्ली आपण कुंडलीविज्ञानांत जे कांहीं विचार प्रसिद्ध केले आहेत त्यांत मात्र थोडें तथ्य आहे.

इंदूर एथील ज्योतिषी घाटपांडे यांचें मत कीं, "कुंडलींतील पंचम स्थान हें पुढील जन्माचें संततीचें आहे. नवम स्थान हें चालू जन्मांतील फलें पाहण्यास मुख्य समजावें. एकाच वेळीं एका ठिकाणीं ३।४ जन्म झाले व त्यांच्या लग्नकुंडल्या अंशानुरूप जरी सारख्या असल्या तरी जागेच्या उच्च, नीच, पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यावर बाजेवर किंवा खालीं जन्म होतात. त्या मानाप्रमाणें ग्रहांची आकर्षण शक्ति कुंडलींतील स्थानांवर कमी जास्त मानानें दृग्गोचर होते. ह्मणून फलें एकाच कुंडलींत निरनिराळीं अनुभवास येतात असें त्यांचें मत आहे."

व्यवहारांत प्रत्येक बाबतींत कांहीं गोष्टी बऱ्या वाईट घडल्यास आपण ह्मणतो "आमचें नशीब." ह्मणून पूर्व जन्मीं घडलेल्या प्रवृत्तीनुरूप या जन्मीं फलें अनुभवास येतात, व त्यांचा विचार आपण नवम स्थानावर करितों. यश व अपयश याच स्थानावर पुष्कळ अंशीं अवलंबून असतें. नवम स्थानापासून लग्न पांचवें येतें. ह्मणून संततीचा विचार करितांना आपण लग्नीं कोणता राशि व कोणता ग्रह उदित आहे, हें आपण पाहतो. जर लग्नस्थान मागील जन्मांतील बऱ्या वाईट फलानुसार उत्पन्न झालें असतें तर मृत्युसंज्ञा बाराव्या स्थानास पडली असती, ह्मणून मागील जन्मांत केलेलीं कर्में व या जन्माचीं फलें पाहण्यास नवम स्थान प्रमुख असून आधान कुंडलीही मदत होईल कळावें. लोभवृद्धि व्हावी हे विनंति.

गणेश दामोदर ग्रंथे.

पत्रव्यवहार.

१

रा. रा. कुंडलीविज्ञानकर्ते यांस.

वि. वि. खालीं लिहिलेली कुंडली आपले दाशाहिकांत प्रसिद्धीकरितां व संग्रहाकरितां पाठवित आहें.

शके १८१७ कार्तिक व. १ रविवार ३५–४९ भरणी
१८–४४ इष्ट ४४–२ समयीं कन्या जन्म.

निरयन



या मुलीचे आईबाप लहानपणींच वारले. चुलत्याचे घरीं व विशेषेंकरून मातामहीचे घरीं वाढली. चुलत्यावर व मातामहीवर लग्न होईपर्यंत काय काय संकटें आलीं असतील तीं माहीत नाहींत. लग्न शके १८२८ चे माघ शु० ७ स मीन लग्नावर झालें. लग्नाचे दोन दिवस पूर्वी वराचे धाकटे बहिणीस एकाएकीं ज्वर येऊन सन्निपात झाला परंतु ईशकृपेनें ती वाचली. वराची पुतणीही त्याच सुमारास बुडतांबुडतां वाचली. लग्न कसेंतरी होऊनही मुलगी आपले भावाचे लग्नास परगांवीं गेली ती वराचे घरीं फाल्गुन वद्य ४ थीस पोहोंचली व तिची सासू फाल्गुन व. ६ स दोनच दिवसानंतर प्लेगनें वारली. पुढें ४ महिन्यांच्या आंतच हिचे सासऱ्यास नोकरी सोडून पेनशन घेणें भाग पडलें. लग्नाचे दिवशींच वराचे हातीं नोकरी सुटल्याचा हुकूम पडला. वरावर व वराचे मामावर नोकरी संबंधाने वारंवार आपत्ती येत असतात. या मुलीचें कोणतेंही

शुभ कृत्य उभें केल्यास त्यांत अकल्पित अडचणी येऊन सर्वांचे मनाचा विरस होऊन तें कार्य कसें तरी पुरें करावें लागतें. या मुलीचा जन्म रविवार भद्रा तिथी व कृतिका नक्षत्रीं आहे व हा विष कन्यायोग होतो. हा नवऱ्यास अनिष्ट असावा. परंतु येथेंतर तिचे सहवासांत असलेल्या सर्वांवर वाईट परिणाम होतांना दिसत आहे. तरी विष कन्यायोगाचाच हा परिणाम आहे किंवा आणखी कांहीं कारणें आहेत ह्याचा आपण व आपले विद्वान् वाचक कृपा करून खुलासा करतील अशी आशा आहे.

आपला.

भो. ग. आ.

वर्धा.

२

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते यांस

वि. वि.—खालील चार ओळीस दाशाहिकांत सवडीप्रमाणें स्थळ मिळण्याची मेहेरबानी व्हावी.

जन्म कुंडलींतील भाग्य ह्मणजे नववें स्थानसंबंधी माझे अल्प मतीनें जे विचार सुचले ते लिहून पाठवीत आहें.

नववे स्थानास **भाग्य** अशी संज्ञा आहे. ह्या शब्दांत बऱ्याच अर्थाची व्याप्ति आहे, व तो शब्द उच्चारतांच महत्वाचा वाटतो.

जुन्या ज्योतिषी लोकांचें गणित विषयाकडे जितकें लक्ष असतें तितकें फलज्योतिषाकडे नसतें, किंवा परंपरा तशीच आहे असें ह्मणावें लागतें. ह्मणून फलज्योतिषावर नवीन शोधाकडे जनप्रवृत्ति कमी आहे.

भाग्यस्थानासंबंधी विचार करण्यास गर्भकालाचे किंवा आधान-कालाचे कुंडलीची आवश्यकता विशेष लागेल. आधानकालावरून कुंडली मांडणें कठीण खरें, परंतु अशक्य नाहीं.

कोणतीही गोष्ट घडण्यास त्या गोष्टीची कर्मप्रवृत्ति अगोदर होत असते. जसें एखादा तळलेला पदार्थ भक्षण केला असतां मागाहून

१।२ तासांनीं कंठास कोरड पडून तहान लागेल, पण या तहानेच्या पूर्वी तो पदार्थ भक्षण केलेला असतो. तसेंच प्रत्येक प्राणी जन्मास येण्याचे पूर्वी जें कर्म करितो त्याच्या चांगल्या वाईट परिणामाप्रमाणें तो जन्मास येतो. ह्मणून पूर्वी जें कर्म घडलें असेल तें आधान कुंडलीवरून समजेल. प्राणी गर्भांत येण्याच्या अगोदर दुसऱ्या जन्म-स्थितींत असतो. ह्मणून गर्भकुंडलीच्या वेळेपूर्वी कांहीं थोडा वेळ अगोदरची कुंडली मांडून पाहिली असतां ती जन्मणारा कोणतीं कर्में करीत होता हें दाखवील. व ती कुंडली त्याचें कर्मरूपी भाग्य पाह-ण्यास उपयोगी पडेल.

भृगुसंहिते सारखे ग्रंथांत मागील जन्माचें फल असतें, तें बहुत करून याच धोरणावर असावें. उदाहरणार्थ, मागील जन्मीं जन्म-णारा एक वाणी होता. त्यानें ब्राह्मण विन्मुख घालविला ह्मणून किंवा गाईस मारिलें ह्मणून संतति होत नाहीं वगैरे.—अमक्या ग्रहावरून अमुक कर्मप्रवृत्ति झाली असा मात्र त्यांत खुलासा नसतो.

कुंडलींतील बारा स्थानांस जीं नांवें दिलीं आहेत त्यांवरून पाहतां मृत्यु स्थानांनंतर भाग्याचा आरंभ आहे, व नंतर राज्य, आय, व्यय असा क्रम आहे. मेल्यानंतर जें कर्म पूर्वी केलें असेल त्या भाग्या-नुरूप जन्म होऊन पुढें राज्यस्थानाप्रमाणें ऐश्वर्य प्राप्त होऊन लाभ व कीर्ति यांची प्राप्ति होते व शेवट होतो. ह्मणून कुंडलींतील ९ते१२ अखेर स्थानें मागील जन्माचीं होत व तीं या जन्मीं फलें पाहण्यास उपयोगीं पडून बाकीचीं स्थानें पुढील जन्माचीं फलें उत्पन्न करणारीं होत. मागील जन्मीं केलेल्या पुण्याईप्रमाणें या जन्मीं कर्में घडून येतात. ह्मणून ९ते१२ या स्थानांचा विचार या जन्मीं पाहण्यास ठीक होईल.

पुष्कळ लोकांचा या शास्त्रावर विश्वास नाहीं. ज्योतिष्यांचीं फलें त्यांच्या अनुभवास येत नसल्यानुळें त्यांस विश्वास उत्पन्न होत नाहीं. शास्त्र खरें, परंतु कांहीं वहिवाटीचे मार्ग कित्येकांचे मतें चुकीचे आहेत. जुने ज्योतिषी संतति संबंधी विचार करण्यास फक्त पंचम

स्थानच पाहतात. किंवा तेथें ग्रह नसल्यास त्याचा स्वामी विचारांत घेतात. कित्येकांचे विचार १।२।३ स्थानांत पुरुष ग्रह असल्यास प्रथम संतति मुलगा नाहींतर मुलगी होईल असें सांगतात. कित्येक चतुर्थ स्थानावरून प्रथम संततीचा विचार करितात. हल्लीं आपण कुंडलीविज्ञानांत जे कांहीं विचार प्रसिद्ध केले आहेत त्यांत मात्र थोडें तथ्य आहे.

इंदूर एथील ज्योतिषी घाटपांडे यांचें मत कीं, "कुंडलींतील पंचम स्थान हें पुढील जन्माचें संततीचें आहे. नवम स्थान हें चालू जन्मांतील फलें पाहण्यास मुख्य समजावें. एकाच वेळीं एका ठिकाणीं ३।४ जन्म झाले व त्यांच्या लग्नकुंडल्या अंशानुरूप जरी सारख्या असल्या तरी जागेच्या उच्च, नीच, पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यावर बाजेवर किंवा खालीं जन्म होतात. त्या मानाप्रमाणें ग्रहांची आकर्षण शक्ति कुंडलींतील स्थानांवर कमी जास्त मानानें दृग्गोचर होते. ह्मणून फलें एकाच कुंडलींत निरनिराळीं अनुभवास येतात असें त्यांचें मत आहे."

व्यवहारांत प्रत्येक बाबतींत कांहीं गोष्टी बऱ्या वाईट घडल्यास आपण ह्मणतो "आमचें नशीब." ह्मणून पूर्व जन्मीं घडलेल्या प्रवृत्तीनुरूप या जन्मीं फलें अनुभवास येतात, व त्यांचा विचार आपण नवम स्थानावर करितों. यश व अपयश याच स्थानावर पुष्कळ अंशीं अवलंबून असतें. नवम स्थानापासून लग्न पांचवें येतें. ह्मणून संततीचा विचार करितांना आपण लग्नीं कोणता राशि व कोणता ग्रह उदित आहे, हें आपण पाहतो. जर लग्नस्थान मागील जन्मांतील बऱ्या वाईट फलानुसार उत्पन्न झालें असतें तर मृत्युसंज्ञा बाराव्या स्थानास पडली असती. ह्मणून मागील जन्मांत केलेलीं कर्में व या जन्माचीं फलें पाहण्यास नवम स्थान प्रमुख असून आधान कुंडलीही मदत होईल. कळावें. लोभवृद्धि व्हावी हे विनंति.

गणेश दामोदर ग्रंथे.

कुंडलीविज्ञान.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधि विंपुलाच पृथ्वी ॥

'भवभूति'

पुस्तक १० वें.] माघ कृ० ५ मंगळवार [अंक ४ था

भ्रमाचा खेळ!

श्रीयुत विनायक श्रीनिवास निंबकर, सब ओन्हरसिअर, धरणगांव यांजकडून एक पत्र आलें आहे, तें येणेंप्रमाणें.—

शके १७९८ पौष कृ० ८

(१) सप्तमेश बुध हा कुटुंबस्थानीं असून त्याच्या द्वितीय स्थानीं शनि व राहू हे दोन पापकारक ग्रह आहेत.

(२) लग्नीं रवि हा पाप ग्रह धनु राशींत आहे.

(३) कुटुंबेश खुद्द पाप ग्रह आहे.

(४) भावचलित कुंडलींत रवि हा कुटुंबस्थानीं येतो त्या मुळें सप्तमेश पापग्रहानें युक्त होतो.

(९) स्त्रीमारक मंगळ हा स्वक्षेत्रीं असून तो जन्मलग्नकुंडलींत द्वादशस्थानीं आहे. त्याची पूर्ण दृष्टि सप्तम स्थानीं असून कुटुंबेशावर (शनिवर) ही आहे.

या पांच योगामुळें ' बहुभार्यायोग ' होत आहे. व याच प्रमाणें हल्लींची ग्रहस्थितिही आहे. या गृहस्थाचीं आजपर्यंत ४ लग्नें झालीं. प्रत्येक बायको वर्ष दीडवर्ष असते. चवथी भार्या मात्र अद्यापि जिवंत आहे. तिची कुंडली येणें प्रमाणें.—

शके १८१७ आश्विन व० ११ घ० १२।३९

या कुंडलींत सप्तमेश उच्च असून तो कुटुंबस्थानीं आहे. भर्याच्या कुंडलींतील कुटुंबेश जो शनि तो या कुंडलींत उच्च आहे. मंगळ चतुर्थ स्थानीं आहे. त्यामुळें हे ग्रह भर्याच्या बहुभार्यायोगास प्रतिकूळ आहेत. कारण वरील भार्या मृत्यूची मुदत पाहिली असतां ही भार्या त्या मुदतींतून पार पडली. कारण लग्नास चार वर्षें होत आलीं आहेत. असो. सायन कुंडलीवरून तसा बोध होत नाहीं.

शके १७९६ मार्ग. शु. १३ घ. १३।३९

(१) लग्न कुंभ या वंध्या राशीचें आहे.

(२) चंद्र वृषभ या मध्यम प्रजा देणाऱ्या राशींत उच्च असून मंगळाच्या पूर्ण दृष्टींत आहे.

(३) गुरु तूळ या अल्प देणाऱ्या राशींत असून मंगळ व केतु या दोन पापग्रहांनीं युक्त आहे. त्यावर शनीची पूर्ण दृष्टि आहे.

(४) एकादश स्थानीं रवि हा पाप ग्रह धनु या अग्निराशींत आहे.

(९) पंचमेश बुध वक्री आहे.

या पांच योगांमुळें संततीचा अभाव दर्शवीत आहे. व याच प्रमाणें हल्लींचीही स्थिति आहे. आज पावेतों स्त्री मुळींच गरोदर राहिली नाहीं. अंगांत वात पुष्कळ असून खोकला नेहमीं येतो. अस्पर्शाचा नेम नाहीं. तिची कुंडली उपलब्ध नाहीं. येणें प्रमाणें निरयन कुंडलीवरून बोध होत आहे. वरील कुंडलींत चंद्रावरून वाटतें कीं, निदान थोडी तरी संतति (द्वितीय) भार्येपासून व्हावी. परंतु बहुभार्याचा तसा योगही नसून ते गृहस्थ द्वितीय संबंध करण्यास मुळींच सुखी नाहींत. सायन कुंडलीवरून तसा बोध होत नाहीं. यासाठीं आपणाकडे प्रसिद्धीसाठीं पाठविली आहे."

वरील पत्राचा झोंक सायन पद्धतीनें अनुभव मिळत नाहीं असें दाखविण्याचा आहे. परंतु ही गोष्ट इतक्यावरून सिद्ध होऊं शकत नाहीं. सायन कुंडलीवरून अनुभव येत नाहीं असें जर दाखवावयाचें तर त्या कुंडल्या देऊन मग विधान केलें पाहिजे होतें. पाहिल्या

कुंडलींत त्यांचे मतें बहुभार्यायोगाचीं तीं कारणेंच नव्हत असें आह्मांस वाटतें. "कलत्रेश बहुगुणे तुंगवक्रादि हेतुभिः ॥ बहुभार्यातरं विद्याच्छत्रुनीचास्तगेषु च ॥" या प्रमाणें बहुभार्यायोगाचें लक्षण आहे. हें लक्षण या ठिकाणीं मुळींच लागू पडत नाहीं. दुसरें अनिष्ट योग दाखवितांना स्त्रीला तारक योग असतील तेही विचारांत घेतले पाहिजेत. पहिल्या कुंडलींत बुध हा जायास्वामी असून तो कुटुंबस्थानीं मित्रक्षेत्रीं आहे. हा ग्रह कोणत्याही पाप ग्रहानें दूषित नाहीं किंवा अस्तंगत असाही दिसत नाहीं. उलट तो चांगला बलवान् आहे, मग अनेक विवाह कां व्हावे? दुसरें कुटुंबेश शनि हा कुंभ राशींत स्वगृहीं असतां स्त्रीमारक कां व्हावा? कुटुंबेश राहूनें युक्त असतां स्त्रीमारक योग होतो कीं काय? शनि व राहू हे एका राशीवर आहेत, इतकाच दोष मारकत्वाला पुरतो कीं त्यांचा एका अंशांत (निदान थोड्क्या अंशांच्या फरकानें) योग असावा लागतो? लग्नीं रवि असतां स्त्रीनाश होतो असा सामान्य नियम आहे काय? व्यय स्थानीं मंगळ आहे, पण तो स्वराशीचा आहे, मग तो स्त्रीमारक कां व्हावा? शिवाय तो गुरु व शुक्र यांनीं युक्त आहे त्यामुळें तर त्याला मुळींच दोष राहत नाहीं! कुटुंब स्थानीं बुधासारखा शुभ ग्रह असतां लग्नें झाल्यावर १।२ वर्षांच्या आंतच स्त्रियागत व्हाव्या हें शास्त्र च्या दृष्टीनें मोठें आश्चर्य आहे! भावचलीतांत रवि हा कुटुंब स्थानीं आला तर सप्तमेश त्यानें युक्त कसा होतो? रवि हा धनु राशींतून मकर राशींत बुधाजवळ जाण्यास आकाशांत त्याची कोणा प्रचंड गोलाशीं टक्करच झाली पाहिजे, एरवीं असें होणें अशक्य आहे! तसा एखादा या मनुष्याच्या जन्मकाळीं उत्पातझाला होता कीं काय? कसा तरी आणि कोणाशीं तरी एकेरी संबंध जुळवून एखादा योग सिद्ध करण्याची ही पद्धत शास्त्राच्या सत्यतेला बट्टा आणणारी आहे असें आह्मांस वाटतें. असो, पुढील खेपेस या बद्दल आणखी विचार करून सायन कुंडलीची सत्यता दाखवावयाची आहे, तोंपर्यंत वाचकांनीं श्रीयुत चिंचवीकर यांच्या पत्राचा आपल्या मनाशीं विचार करावा.

प्रयाणास मुहूर्त कसा असावा

[श्रीयुत यशवंत केशव प्रधान]

कुंडलीविज्ञानचे ९ व्या वर्षाचे एका अंकांत परदेशगमन कोणाला होतें वगैरे विषयावर लिहिलेलें वाचकांस आठवत असेलच. आज आपणास या लेखांत प्रयाण करण्यास कसा मुहूर्त असावा व त्यापासून काय फलें प्राप्त होतात याचा शास्त्रीय दृष्टीनें विचार करणें आहे. आपले ग्रंथांत मुहूर्ताविषयीं जितकी चिकित्सा केली आहे तितकी कोणत्याही राष्ट्रांतील ज्योतिःशास्त्रावरील ग्रंथांत आढळणार नाहीं. ह्मणून प्रथमतः प्रकृत विषयावर आपल्या मुहूर्तग्रंथांत काय सांगितलें आहे त्याची निवड करून नंतर जास्त विचार करणें सोईचें आहे.

वारे चोपचयावहस्य सुदशास्विष्टं प्रयाणं जगुः
कार्पीत्यादितिभद्विकेषुमृगमैत्रार्केषु नो जन्मभे ॥
सर्पार्द्राग्नियमाजपादपि तृषुत्वाष्टत्रये चाशुभं
रिक्तापर्वगुहाष्टमी हरिसितास्येषुशुक्रोन्मुखम् ॥
(मु. मा. यात्रा प्रकरण)

महादशांतर्दशादि शुभ असतां व गोचरांत शुभ असणाऱ्या ग्रहांच्या वारीं प्रयाण करावें. श्रवण, धनिष्ठा, रेवती, अश्विनी, पुष्य, मृगशीर्ष, हस्त हीं नऊ नक्षत्रें यात्रेला शुभ आहेत. जन्मनक्षत्र यात्रेला अशुभ जाणावें. आश्लेषा, आर्द्रा, कृत्तिका, भरणी, पूर्वाभाद्रपदा, मघा, चित्रा, स्वाती, विशाखा, या नऊ नक्षत्रांवर प्रयाण अशुभ होय. अर्थात रोहिणी, पूर्वाफाल्गुनी, उत्तराफाल्गुनी, ज्येष्ठा, मूळ, पूर्वाषाढा, उत्तराषाढा, शततारका, उत्तराभाद्रपदा हीं नऊ नक्षत्रें यात्रेला मध्यम जाणावीं. रिक्ता, पूर्णिमा, अमावास्या, षष्ठी,

अष्टमी, द्वादशी, शुक्लप्रतिपदा या तिथींवर आणि बुध, शुक्र संमुख असतां प्रयाण अशुभ जाणावें.

संमुख शुक्र

एकग्रामे पुरे वापि दुर्भिक्षे राष्ट्रविप्लवे ॥
विवाहे तीर्थयात्रायां प्रतिशुक्रो न विद्यते ॥

गांवांतल्या गांवांत अथवा शहरांतले शहरांत, दुर्भिक्ष काळीं, राष्ट्रावर संकट आलें असतां व विवाहसमयीं तीर्थयात्रेला संमुख शुक्राचा दोष नाहीं.

पौष्णादावाश्नि पादांतं यावत्तिष्ठति चंद्रमाः ॥
तावच्छुक्रो भवेदंधः संमुखं गमनं शुभम् ॥

रेवती, अश्विनी, भरणी, कृत्तिका या नक्षत्रांचे प्रथमचरणीं चंद्र आला ह्मणजे शुक्र अंध असतो. तो गमनकाळीं संमुख असला तरी दोष नाहीं.

खालील श्लोकांत शुक्र गमनकाळीं विशिष्ट दिशेस असतां काय फलप्राप्ति होते हें सांगितलें आहे.

दक्षिणे दुःखदः शुक्रः समुखो हंति मंगलं ॥
वामे पृष्ठे शुभो नित्यं रोधयेदस्तगः शुभः ॥

बाहेर जातांना शुक्र दक्षिणेस दुःखदायक, संमुख कार्यहानि, वामभागीं किंवा पृष्ठभागीं घेऊन गमन केलें असतां शुभ होय. पूर्वेस अस्त असला तर पश्चिमेस शुभ, आणि पश्चिमेस अस्त असल्यास पूर्वेस शुभ जाणावा.

प्रयाणकाळीं घातचंद्र, कालयोगिनीही पहाव्या लागतात त्याचा विचार करूं.

प्रयाणकाले युद्धे च कृषौ वाणिज्यसंग्रहे ॥
वादे चैव गृहारंभे वर्जयेत् घातचंद्रमः ॥

प्रयाणकाळीं युद्धास, कृषी करण्यास, व्यापारासाठीं धान्यादि संग्रहास, वादाचे समयीं आणि गृहारंभास घातचंद्र वर्ज्य करावा.

मेषे रविर्मघा प्रोक्ता षष्ठी प्रथमचंद्रमाः ॥
वृषभे पंचहस्तश्चतुर्थी शनिरेवच ॥
मिथुने नवमी स्वाती अष्टमी चंद्रवासरः ॥
कर्के द्विरानुराधाच बुधं षष्ठीं विवर्जयेत् ॥
सिंहे षष्ठश्चंद्रमाश्च दशमीं शनिमूलकं ॥
कन्यायां दशमश्चंद्रः श्रवणः शनिरष्टमी ॥
तूले गुरुर्द्वादशीस्याच्छत्तं तृतीयचंद्रमाः ॥
वृश्चिके रेवती सप्तदशमी भार्गस्तथा ॥
धने चतुर्थी भरणी द्वितीया भार्गवस्तथा
मकरेऽष्टमो रोहिणीच द्वादशी भौमवासरः ॥
कुंभे एकादशश्चार्द्रा चतुर्थी गुरुवासरः
मीने च द्वादशः सार्पे द्वितीया भार्गवस्तथा ॥

रा.	मे.	वृ.	मि.	क.	सिं.	क.	तू.	वृ.	ध.	म.	कुं.	मी.
चं.	१	५	९	२	६	१०	३	७	४	८	११	१२
वा.	र.	श.	सो	बु.	श.	श.	गु.	शु.	शु.	भौ.	गु.	शु
न.	म.	ह.	स्वा.	अनु.	मू.	श्र.	श.	रे.	भ.	रो.	आ.	आ.
ति.	६	४	८	६	१०	८	१२	१०	२	१२	४	२

वरील कोष्टकावरून कोणत्या चंद्रास कोणता घातवार, घातनक्षत्र घाततिथि व घातचंद्र यांची सहज कल्पना करितां येईल. या घातचंद्राचा वगैरे किती उपयोग होत असेल याचा वाचकांनीं अनुभव घ्यावा.

कालचंद्र

मेषे वेदो वृषेद्यौच मिथुनेच तृतीयकः
दशकर्के रविः सिंहे कन्यायांकः प्रकीर्तितः ॥
षट्तले वृश्चिके खेंदुर्धने रुद्राः प्रकीर्तितः
मकरे ऋषयः प्रोक्ताःकुंभे बाणा उदाहृताः
मीने अंध्रिः कालचंद्राः शौनकश्चेदमब्रवीत् ॥

मेष राशीस ४था, वृषभास आठवा, मिथुनास २रा, कर्कास १० वा, सिंहास १२वा, कन्येस ९वा, तूळेस १वा, वृश्चिकास १०वा,

धनूस ११वा, मकरास ७वा, कुंभास ९वा, मीनास ४था या प्रमाणें राशिपरत्वें कालचंद्र शौनकमतें सर्व कामांस वर्ज्य करावा.

संमुखचंद्र

मेषे च सिंहे धनपूर्व भागे वृषेच कन्या मकरे च याम्ये ॥
तूलेच कुंभे मिथुनप्रतीच्यां कर्कालिमीने दिशिचोत्तरस्यां ॥
समुखो अर्थलाभाय दाक्षिणे सुखसंपदः ॥
पृष्ठतः प्राणनाशाय वामे चंद्र धनक्षयः ॥

मेष, सिंह, धन या राशीचा चंद्र पूर्वेस, वृषभ, कन्या, मकर यांचा दक्षिणेस, तूळ, कुंभ, मिथुन यांचा पश्चिमेस, कर्क वृश्चिक, मीन या राशींचा चंद्र उत्तरेस असतो.

संमुख चंद्र घेऊन गमन केलें असतां अर्थप्राप्ति होते. उजवे बाजूस घेतला तर सुख व संपत्ति प्राप्त होईल. पृष्टभागीं घेतला तर प्राणनाश होतो व वामभागीं घेऊन प्रयाण केलें असतां धननाश होतो.

करणभगणदोषं वारसंक्रांतिदोषं
कुतिथिकुलिकदोषं यामयामार्धदोषं ॥
कुजशनिरविदोषं राहुकेत्वादिदोषं
हरति सकलदोषं चंद्रमा संमुखस्थः ॥

करण, नक्षत्र, वार, संक्रांती कुतिथी, यामार्ध, मंगळ, शनि, रवि, राहू, केतु, इत्यादि दोष संमुख चंद्र घेऊन गमन केलें असतां नाहींसे होतात.

कालवेळा

पूर्वाण्हे चोत्तरां गच्छे त्प्राच्यां मध्यान्हके तथा ॥
दाक्षिणे अपराण्हे तु पश्चिमे अर्धरात्रके ॥

दिवसा प्रथम प्रहरीं उत्तरेस, द्वितीय प्रहरीं माध्यान्हीं पूर्वेस, तृतीय प्रहरीं अपराण्हीं दक्षिणेस आणि अर्धरात्रीं पश्चिमेस गमन करणें उक्त होय.

योगिनी

प्रतिपन्नवमी पूर्वे द्वितीयादशमोत्तरे ॥
तृतीयैकादशी वन्हौ चतुर्द्वादशि नैऋते ॥
पंचत्रयोदशी याम्ये षष्ठीभूतंच पश्चिमे ॥
सप्तमी पूर्ण वायव्ये अमावास्याष्टमी शिवे ॥
षष्ठे च शुभदा प्रोक्ता वामे चैव विशेषतः ॥
योगिनी सा भवेन्नित्य प्रयाणे शुभदा नृणां ॥

प्रतिपदा, नवमी या तिथींस योगिनी पूर्वेस; द्वितीया, दशमी या तिथींस उत्तरेस; तृतीया, एकादशी या तिथींस आग्नेय दिशेस; चतुर्थी, द्वादशी या तिथींस नैऋत्येस; पंचमी, त्रयोदशी या तिथींस दक्षिणेस; षष्ठी, चतुर्दशी या तिथींस पश्चिमेस; सप्तमी, पौर्णिमा या तिथींस वायव्येस, आणि अष्टमी अमावास्या या तिथींस ईशान्येस याप्रमाणें योगिनी जाणाव्या.

योगिनी पृष्ठभागीं अथवा वामभागीं असतां गमन केल्यास शुभ आहे.

राहू

इंद्रे वायौ यमे रुद्रे तोयेग्नौ शशिरक्षसोः ॥
यामार्धे क्षुधितो राहुर्भ्रमत्येवं दिगष्टके ॥
न तिथिर्नचनक्षत्रं न योगो नच चंद्रमाः ॥
सिद्धयंति सर्वकार्याणि यात्रां दक्षिणे रवौ ॥

प्रथम यामार्धी क्षुधित राहू पूर्वेस असतो. द्वितीय यामार्धी वायव्येस, तृतीय दक्षिणेस, चतुर्थ ईशान्येस, पंचम पश्चिमेस, षष्ठ आग्नेयेस, सप्तम उत्तरेस, अष्टम यामार्धी नैऋत्येस याप्रमाणें अष्टदिशा भ्रमण करीसो.

दक्षिणभागीं रवि घेऊन गमन केलें असतां तिथिनक्षत्रादि दोष जातात.

काळ.

कालं पलं घातकलोहपातदावानलः खड्गचोऽकलकांतिकाः ॥
नखाश्वतुर्विंशतिषट्तथादिरुद्राधृतिवेदगुणाः क्रमेण ॥
तिथ्यायुतं वै वसुभाजितंच च शेषश्च कालो मनुयो वदंति ॥
कालंच पृष्टे पलसंमुखेन घासंच लोहं वडवाग्निपृष्ठे ॥
खड्गे च चाग्रे कवचं च वामे कांतिश्च योज्याद्दिशिदक्षिणस्यां ॥

कालांचीं नांवें.—काल (२०) पल (२४) घातक (६) लोहपात (१०) वडवानल (११) खड्ग (१८) कवच (४) कांतिक (३) या प्रमाणें कालाचीं ८ नांवें आहेत. कंसांतील अंक ज्या तिथीस गमन करावयाचें असेल त्या तिथींत मिळवावे. व ८ नीं भागून शेष जो अंक उरेल त्या दिशेस तो काल आहे अशा क्रमानें पूर्वादि अष्टदिशांस पहावें पृष्ठभागीं काल शुभ, संमुख पल शुभ, पृष्टभागीं घातक, लोहपात व वडवानल हे तीनही शुभ, अग्रभागीं खड्ग शुभ, वामभागीं कवच शुभ, आणि दक्षिण भागीं कांतिक शुभ अशी दिशापरत्वें शुभ फलें पाहून त्या दिशेस युद्धास अथवा यात्रादिकार्यास गमन करावें.

मुहूर्त.

तिथयः पक्षगुणिताः सप्तभिर्भाजिताश्च याः ॥
वाराः स्युर्वन्हि गुणिता वसुभिश्चैव भाजिताः ॥
चतुर्गुण्यानि भाज्यंते भाजितानि यथाक्रमं ॥
पीडा स्यात्प्रथमे शून्ये मध्ये शून्ये महद्भयं ॥
अंत्यशून्ये तु मरणं त्र्यंकेच विजयी भवेत् ॥

ज्या तिथीस गमन करावयाचें ती तिथि द्विगुणित करून ७ नीं भागावी. आणि जो वार असेल तो त्रिगुणित करून ८नीं भागावा. नक्षत्र असेल तें चौपट करून ९नीं भागावें. तिहींचे शेषांक आल्यास शुभ व तिहींचें शून्य आल्यास अंक नाहींत. प्रथम तिथीचे भागास शून्य आलें तर पीडा, द्वितीय वाराचे भागास शून्य आलें तर मोठें भय. तिसरें नक्षत्रभागास शून्य आलें तर मरण. तीन ठिकाणीं अंक आल्यास विजय जाणावा.

सूर्यभाद्गणये चांद्रं सप्तभिर्भागमाहरेत् ॥
त्रिषट्कभ्रमणं चैव द्विसप्त महदाढळं ॥
प्रथमं पंचचत्वारि अढळो नास्ति निश्चितं ॥
अढळे ताडणं प्रोक्तं भ्रमणे कार्यनाशनं ॥

सूर्य नक्षत्रापासून दिवस नक्षत्रापावेतों गुणून ७ नीं भागून शेष ३ अथवा १ उरले तर या दिवशीं भ्रमण होऊन कार्यनाश होईल. २ किंवा ७ उरले तर अढळ आहे तें गमनास वर्ज्य, परंतु ताडन करण्यास उक्त. १।५।४ उरले तर अढळ नाहीं, गमनास उक्त.

सूर्यभाद् गणयेच्चांद्रं पक्षादितिथिवारयुक् ॥
नवभिस्तु हरेद्भागं सप्तशेष तु हेवरं ॥

सूर्यनक्षत्रापासून दिवस नक्षत्रापावेतों गणून त्यांत पक्ष, तिथि, वार मिळवून ९नीं भागून शेष ७ उरले तर हेवर मुहूर्त जाणावा. तो गमनास शुभ होय.

सूर्यभाद्गणयेच्चांद्रं त्रिगुणं तिथिमिश्रितं ॥
सप्तभिस्तु हरेद्भागं त्रीणि शेषं घबाडकं ॥

सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रा पावेतों गणून ती संख्या त्रिगुणित करून चालती तिथि त्यांत मिळवून ७ नीं भागून शेष ३ उरले तर घबाड मुहूर्त जाणावा.

ह्या शिवाय आणखी पंथाराहूचक्र, वाहनचक्र पाहण्यांत येतात. त्याशिवाय वार, होरा, प्रवासकालचें लग्नं या सर्व गोष्टींचा निश्चय करून नंतर शुभ मुहूर्तावर प्रयाण करावयाचें म्हणजे बहुतेक अशक्यच!

प्रवासाचा विचार कर्तव्य असतां या एकमेकांस विरुद्ध येणाऱ्या गोष्टी कां विचारांत घ्याव्या व त्या कोणत्या शास्त्रीय तत्वावर बसविल्या आहेत हें कळणें कठीण आहे. आधुनिक सुशिक्षितांस ठर उडवण्यास मात्र पुष्कळ जागा आहे!

यात्रायुद्धे विवाहेच प्रवेशे नगरादिषु ॥
व्यापारेषुच सर्वेषु पंथाराहुः प्रशस्यते ॥

यात्रेस जाण्यास व युद्धास जाण्यास, विवाहास, नगरादिकांत प्रवेश करण्यास व व्यापारास पंथाराहू प्रशस्त होय.

धर्म–अश्विनी, पुष्य, आश्लेषा, विशाखा, अनुराधा, धनिष्ठा, शततारका.

अर्थ–भरणी, पुनर्वसू, मघा, स्वाती, ज्येष्ठा, श्रवण, पू॰ भाद्रपदा.

काम–कृत्तिका, आर्द्रा, पूर्वा, चित्रा, मूळ, अभिजित उ. भाद्रपदा.

मोक्ष–रोहिणी, मृगशीर्ष, उत्तरा, हस्त, पूर्वाषाढा उत्तराषाढा, रेवती.

धर्ममार्गे गते सूर्ये चंद्रे धर्मस्थिते यदि ॥
गृहलाभो भवेत्तस्य विज्ञेयो नात्रसंशयः ॥

धर्ममार्गी सूर्य आणि मोक्षमार्गी चंद्र असतां त्या योगाचें फल गृहलाभ होय.

अर्थमार्गे गते सूर्ये चंद्रे धर्मस्थिते यदि ॥
गजलाभो भवेत्तस्य तत्रश्रीः सर्वतोमुखी ॥

अर्थमार्गी सूर्य आणि धर्मनक्षत्रीं चंद्र या योगाचें फल गजलाभ व संपत्ती.

अर्थमार्गे गते सूर्ये चंद्रे तत्रैव संस्थिते ॥
प्रथमं जायते कार्यं तत्र भंगो भविष्यति ॥

सूर्य व चंद्र अर्थनक्षत्रीं असतां प्रथम कार्यसिद्धि होईल- नंतर कार्यभंग होईल.

अर्थमार्गगते सूर्ये चंद्रे कामांशसंस्थिते ॥
सर्वसिद्धिर्भवेत्तस्य जानीयान्नात्र संशयः ॥

अर्थनक्षत्रीं सूर्य व कामनक्षत्रीं चंद्र असतां सर्व कार्य सिद्ध होईल.

अर्थमार्गगते सूर्ये चंद्रे मोक्षस्थिते यदि ॥
भूमिलाभोभवेतस्य हर्षयुक्तः सुखी भवेत् ॥

अर्थनक्षत्रीं सूर्य आणि मोक्षनक्षत्रीं चंद्र अशा योगाचें फल भूमिलाभ व आनंद आणि सुखप्राप्ति हें होय.

भ्रमाचा खेळ!

गेल्या अंकांत श्रीयुत निंबकर यांचें पत्र छापलें आहे. या पत्रांत आरंभीं जी कुंडली आहे, तीवरून निरयन पद्धतीनें बहुभार्यायोगाचा अनुभव येतो तसा सायनानें येत नाहीं असें त्यांनीं मोघम झटलें आहे म्हणून ती कुंडली सायन करून अनुभव जुळतो कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे.



१ जायाभावारंभीं कर्क राशीचा १७ वा अंश उदित आहे. म्हणून या भावांत या राशीचे १४ अंश येतात व सिंह राशीचे २० अंश येतात. यावरून जायास्वामी चंद्र व रवि असे दोन झाले. या भावाचा मध्य सिंह राशींत येतो व याच राशीचे अंश या भावांत अधिक आहेत, म्हणून मुख्य जायास्वामी रवि येतो.

हा ग्रह तनुस्थानीं मकर राशींत शत्रुगृहीं आहे. त्याच प्रमाणें चंद्र हा तूळ राशींत आहे व तूळ हा शुक्राचा राशि असून त्याचा चंद्र हा शत्रू आहे तात्पर्य दोन्ही जायास्वामी शत्रुगृहीं आहेत. " कालत्रेशे बहुगुणे तुंगवक्रादि हेतुभिः ॥ बहुभार्यातरं विद्याच्छत्रुनीचास्तगेषुच " या श्लोकांत जायास्वामी उच्च, वक्र, नीच, अस्तंगत व शत्रुक्षेत्रस्थ असतां बहुभार्यायोग होतो असें सांगितलें असून त्याचा अनुभवही अनेक स्थळीं घेतलेला आहे. तसाच येथेंही आला आहे.

२ अष्टम स्थानीं सिंह राशीचा हर्शल आहे, हा ग्रह थोडक्या अवधींत स्त्रियांचे मृत्यु करणारा आहे.

३ जायास्वामी जो चंद्र त्याच्या कुटुंब स्थानीं मंगळ आहे. अथवा कुटुंबस्वामी जो गुरु त्याच्या व्ययस्थानीं मंगळ आहे. वृश्चिक हा राशि जात्याच दुष्ट आहे व तो मंगळानें युक्त आहे, म्हणून अधिक हानि करणारा आहे.

३ कुटुंबस्थानीं शनि व राहू हे दोन पापग्रह आहेत. शनि हा मीन राशीच्या ४ थ्या अंशांत आहे. हा अंश कर्क आहे. अर्थात शनि अनिष्ट स्थितींत आहे. राहू हा १४ व्या अंशांत आहे. हा अंश मेष असून मंगळाचा आहे. त्यामुळें तोही अनिष्टच आहे.

४ शनि हा कुटुंबस्वामी असून तो राहूनें युक्त आहे व स्थानपरत्वें त्याच्या सप्तमांत हर्शल आहे.

वरील सर्व योग स्त्रीनाशाचे झाले. आतां शुभयोग कोणते झाले आहेत ते पाहूं. जर शुभयोग एकही नसेल तर वारंवार लग्नें होणें संभवणार नाहीं. पहिली मरण पावल्यावर पुन्हा लग्न न होतां विधुरस्थितींत दिवस काढावे लागतील. या गृहस्थाचे

४ विवाह झाले असल्यामुळें असा एखादा बलवत्तर शुभयोग झाला असलाच पाहिजे, तो कोणता तो पाहूं.

१ लग्नीं कुंभ राशीचा बुध असून तो जायास्थानावर पाहतो.

२ कुटुंबस्वामीं मुख्यत्वें दोन आहेत. कारण या भावारंभीं कुंभ राशीचे २० अंश उदित आहेत. म्हणून या भावांत प्रथम सुमारें दहा अंशपर्यंत शनि हा अधिपति असून पुढें २० अंश गुरु अधिपति आहे. व गुरूचे अंश अधिक असल्यामुळें मुख्य अधिपति तोच आहे. या ग्रहाचा शुक्राशीं योग झालेला असून शुक्र हा शुभ ग्रह आहे. त्याच प्रमाणें गुरु हा धनु राशींत स्वगृहीं असल्यामुळें बलवान् आहे. सारांश गुरु शुक्र योग झाल्यामुळें वारंवार विवाह झाले हें उघड आहे.

३ शुक्र हा स्त्रीकारक ग्रह गुरूच्या गृहीं असल्यामुळें व त्याचा गुरूशीं योग झाल्यामुळें तोच योग बहुभार्यायोगासही कारण झाला आहे हें विसरतां कामा नये.

सारांश निबंधीकार म्हणतात कीं सायनानें अनुभव येत नाहीं, त्यांत कितपत तथ्य आहे याचा वाचकांनीं विचार करावा. एखाद्या वेळीं निरयनानेंच अनुभव येत नाहीं असें कुंडलीविज्ञानांत दाखविलें आहे. सायनानें जन्मकाल चुकीचा असेल तरच अनुभव येणार नाहीं असें आह्मीं **बारा वर्षांच्या** रात्रंदिवस एकाच विषयाच्या अभ्यासाच्या अनुभवानें खात्रीनें सांगूं शकतों.

आमचें फलज्योतिष मूळचें (वेदकालीन) तारात्मक नक्षत्रांवर असेल. पण नक्षत्राचे चार चरण जेव्हां होऊं लागले, व जेव्हां राशींचीं नांवें अस्तित्वांत आलीं तेव्हां पासून फलज्योतिष हें सायनविभागानुसारच बनलें गेलें आहे, यांत तिलप्राय शंका

नाहीं. राशींचे जे स्वाभाविक धर्म आमच्या ग्रंथकारांनीं दिले आहेत त्यांचा जर सूक्ष्मतेनें अनुभव घेतला तर सायनाची सत्यता तेव्हांच दिसून येते, जेथें आकडे कुंडलीवरूनच सर्व भविष्य वर्तवितां येतें तेथें ही सत्यता दाखविण्यास ब्रह्मदेवच अवतरला पाहिजे! एखाद्या ग्रहाचा अनुभव जुळला नाहीं कीं तावडतोब त्याला भावचलितांत पुढल्या घरांत लोटतां येतो, मग अडणार कोठें? ग्रंथांत मतमतांतरें आहेतच! अलीकडे निरयनपद्धतीच खरी ह्मणून भ्रमाचा खेळ करणारे गारुडी नवीन नवीन दृष्टीस पडूं लागलें आहेत, व ते भ्रमांत पडलेल्या समाजाला आणखी भ्रमांत नेण्याचा प्रयत्न करीत आहेत हें आमच्या देशाचें दुर्दैव होय! समाजाचा भ्रम ज्ञानाशिवाय उतरणें शक्य नाहीं. यासाठीं त्यांस ज्ञान देण्याचा आह्मी अकटोविकट प्रयत्न केला पाहिजे. कालांतरानें सायनपद्धति निसर्गसिद्ध आहे असें ठरणारच आहे. पण फलाच्या बाजूनेंही ठरविणें हें आमचें कर्तव्य आहे, आह्मी तूर्त निरयनवाद्यांस एवढेंच बजावून ठेवतों कीं, जर पुढें मागें राशींच्या स्वाभाविक धर्माचा सूक्ष्म अनुभव घेण्याचा प्रसंग आला तर त्यासाठीं सायन राशींचाच स्वीकार करावा लागेल किंवा राशींची लक्षणें अजीबात बदलावीं लागतील. मेषवृषभ–वसंत अशी जेथें परिभाषा होती तेथें निरयनवाद्यांस मीनमेष–वसंत एखाद्या ग्रंथांत आहे कीं काय हें पाहण्याचा प्रसंग आलाच आहे, तसाच प्रसंग फलाच्या बाजूनेंही आल्याशिवाय राहणार नाहीं.

———

--षष्ठ्यंशफल--

अध्यापकस्तु वेदानां सेवकः शास्त्रपाठकाः ॥
अश्वसादीभसादीच लिपिलेखनतत्परः ॥
मंदुराबंधको नट्यो देशिको याज्ञिको गुरुः ॥
दानशालस्तु तृणको ग्रामणी व्यसनाधिपः ॥
आरामकरणोयुक्तः पुष्पविक्रयतत्परः ॥
राजकार्यरतः सेनालता पुष्पफलक्रयी ॥
नृत्यगीतेच कुशलस्तांबूल फलविक्रयी ॥
निषिद्ध विक्रयकरो ग्रामाणामधिकारकृत् ॥
बंदी च देशिकः प्राज्ञो धूपकश्चौषधिक्रियः ॥
कायस्थकरणोयुक्तो भारको भांडविक्रयी ॥
कृषिकृच्चवणिग्धातुचर्मकारीच कर्षकः ॥
शस्त्राधिकारी विज्ञानी पुंस्तेको रंजको वणिक् ॥
वेदवेदांग विद्वेत्ता शास्त्रज्ञो बंदिपाठकः ॥
ग्रामणीरधिकारीच गणको दंडधारकः ॥
मारकश्चैंधनाहारी फलमूलादि विक्रयी ॥
शांतकृत्स्वर्णकारी च कृषिकृत्पलविक्रयी ॥
याजकोऽध्यापकोऽध्यक्षः प्रातेग्रहपरः फली ॥
क्रमाद्व्युत्क्रमतश्चैव षष्ठिः स्यादंशकेषुतु ॥

अर्थः—१ वेद पढविणारा २ सेवक (चाकर) ३ शास्त्रांचा शिक्षक ४ घोडेस्वार ५ महात ६ ग्रंथकार ७ घोडशाळेवरील अधिकारी ८ नाटकी ९ १० यज्ञ करणारा ११ गुरु १२ दाता १३ गवताचा घंदा करणारा, १४ गांवचा अधिकारी १५ दुःखवार्ता १६ बागबगीचे करणारा १७ माळी १८ सरकारी नोकरी कर-

णारा, १९ भाजा व फळफळावळ विकणारा २० नृत्य व गाणें यांत पटाईत २१ तांबोळी २२ निषिद्ध पदार्थ विकणारा २३ गांवावर अधिकार चालविणारा २४ राजसेवक २५ २६ बुद्धिमान् २७ धूपादि पदार्थ विकणारा २८ औषधें विकणारा २९ बहुरूपी ३० हमाल ३१ भांडीं विकणारा ३२ शेतकरी ३३ वाण्याचा धंदा करणारा ३४ चांभार ३५ शेतकरी ३६ शास्त्राधिकारी ३७ पंडित ३८ पुस्तकांचा संग्रह करणारा ३९ रंगारी ४० वाण्याचा धंदा करणारा ४१ वेदवेदांग जाणणारा ४२ शास्त्री ४३ ४४ ग्रामाधिकारी ४५ अधिकारी ४६ गणिती ४७ दंडकर्ता ४८ खुनी ४९ जळाऊ लांकडें चोरणारा ५० फळें व मुळें विकणारा ५१ शांतता राखणारा ५२ सोनार ५३ शेतकरी ५४ मांस विकणारा ५५ यज्ञ करणारा ५६ शिक्षक ५७ अध्यक्ष ५८ दान घेणारा (भिक्षुक) ५९।६० फळांचा उपभोग घेणारा.

लग्न विषम राशीचें असेल तर हीं फलें क्रमानें घ्यावीं व सम राशीचें असेल तर व्युत्क्रमानें (उलट क्रमानें घ्यावीं.) अंशपरत्वें फलें सांगण्याचा प्रयत्न जातकग्रंथांत इतकाच आढळतो. पण हा प्रयत्न फारच स्थूळ आहे. कारण यांत प्रत्येक राशीचा वेगळाला विचार केलेला नाहीं. त्यामुळें अनुभव येणें कठीण आहे. राशीचा षष्ठ्यंश म्हणजे प्रत्येक भाग ३० कलांचा होतो. म्हणजे हें फल अर्ध्या अंशाचें आहे. हेंच जर प्रत्येक राशीचें वेगळालें असतें तर त्याची किंमत झाली नसती! पत्रिकेचें अवडंबर रचण्यास मात्र या फलांचा चांगला उपयोग होईल!

कुंडलीवरून धंदा सांगण्यास हीं फलें सोयीचीं आहेत, तरी

वास्तविक पाहूं गेल्यास धंदा सांगणें फार कठीण आहे. शास्त्राची आजची स्थिति धंदा सांगण्याच्या कामीं फारच पंगू आहे. केवळ लग्नाच्या अंशावरूनच जर धंदा कळेल तर ईश्वराच्या करणीला मर्यादित स्वरूप असल्यासारखें होणार आहे! पोटभरून ज्योतिष्यांस धंद्याचा प्रश्न सांगण्यास षष्ठ्यंशफलें सोयीचीं आहेत,पण त्यांची शास्त्रचिकित्सकाला कांडीचीही किंमत नाहीं असें म्हणावें लागतें.

आपणास जो प्रयत्न करावयाचा तो एकेरी असतां कामा नये. केवळ लग्नाच्या अंशावरून धंदा निश्चित होईल असें वाटत नाहीं. आमची अशी कल्पना आहे कीं, लग्न व चंद्र यांच्या केंद्रांत असणारे ग्रह आणि लग्न व चंद्र राशीच्या ज्या अंशांत असतील त्या अंशानुरूप तो मनुष्य धंदा करील. यासाठीं आपणास निरनिराळे धंदे करणारांच्या कुंडल्यांचा संग्रह करून त्यावरून लग्न, चंद्र व त्यांच्या केंद्रांत असणारे ग्रह यांच्या राशींचे अंश टिपून ठेविले पाहिजेत. व असा प्रचंड संग्रह झाल्यानंतर त्यांवरून सामान्य नियम बसविले पाहिजेत. हें काम अत्यंत परिश्रमाचें आहे, तरी पण तें केलें पाहिजे. ज्योतिष्याजवळ जर संग्रह नाहीं व धंदा सांगण्याचे सामान्य नियम नाहींत तर तो या प्रश्नाचें उत्तर देण्यास नालायक आहे असें मानिलें पाहिजे.

बाळंतिणीच्या खोलींतील स्थिति.

आमच्या ग्रंथकारांनीं जन्मकुंडलीवरून बाळंतिणीच्या खोलींतील जन्मसमयींच्या स्थितिचें ज्ञान होण्याकरितां पुढील रीति सांगितली आहे.

मीने मेषे स्त्रियौ ह्यौच चतस्रो वृषकुंभयोः ॥
तुलाकन्यकयोः सप्तबाणाख्याधनकर्कयोः ॥
अन्यलग्ने भवं तिस्र एवं ज्ञेयं विचक्षणैः ॥

अर्थ.—मीन किंवा मेष लग्न असतां दोन, वृषभ किंवा कुंभ लग्न असतां चार, तूळ किंवा कन्या लग्न असतां सात, धन किंवा कर्क लग्न असतां पांच व अन्य राशीचें लग्न असतां तीन स्त्रिया त्या खोलींत होत्या असें जाणावें.

यत्र राहुस्तत्र शय्या भौमे खड्गांगसंगता ॥
रविस्थाने भवेद्दीपः शनेस्थाने तु नालकं ॥

अर्थ.—कुंडलींत राहू ज्या दिशेला असेल त्या दिशेला शय्या, रवी असेल तिकडे दिवा आणि शनि असेल तिकडे नाल होता असें समजावें लग्नीं मंगळ असेल तर बाज मोडकी होती.

बृहज्जातकांत हें लक्षण विस्तारानें सांगितलें आहे, तें असें,

चंद्रलग्नांतरगतै र्ग्रहैः स्यु रुपसूतिकाः ॥
बहिरंतश्च चक्रार्धे दृश्यादृश्येऽथ परे ॥

अर्थ.—चंद्र व लग्न यांच्या दरम्यान जितके ग्रह असतील तितक्या स्त्रिया जन्मकाळीं त्या खोलींत होत्या. त्यांपैकीं जितके ग्रह दृश्यचक्रार्धांत असतील तितक्या स्त्रिया खोलीच्या बाहेर होत्या व जितके ग्रह अदृश्य चक्रार्धांत असतील तितक्या खोलींत होत्या.

स्नेहः शशांका दुदयाच्च वर्ति र्दीपोऽर्क युक्तर्क्षवशाच्चराद्यः ॥
द्वारं च तद्वास्तुनि केंद्रसंस्थ शैर्यं ग्रहैर्वीर्यसमन्वितैर्वा ॥

अर्थ.—चंद्रावरून तेल, लग्नावरून वात, रवीच्या स्थिरचरादि राश्यनुरूप दिवा, केंद्रीं असलेल्या ग्रहामध्यें जो बलिष्ठ असेल त्याच्या दिशेस खोलीचें दार जाणावें

मेषकुलीरतुलालवगैः प्रागुत्तरतो गुरुसौम्यगृहेषु ॥
पश्चिमतश्च वृषेण निवासो दक्षिणभागकरौ मृगसिंहौ ॥

अर्थ.—जन्मकाळीं लग्न अगर त्याचा नवमांश मेष, कर्क, तूळ, वृश्चिक, कुंभ यांपैकीं असल्यास घराचे पूर्व बाजूस खोली असेल. धनु, मीन, मिथुन व कन्या यापैकीं असल्यास घराचे उत्तर बाजूस खोली असेल वृषभावर पश्चिमेस आणि मकर, सिंह यांवर दक्षिणेस खोली असेल असें समजावें.

[२]

वे०कुंडलीविज्ञानकर्ते यांस—

वि. वि.—आपल्या अद्वितीय पाक्षिक कुंडलीविज्ञान पुस्तकांत प्रसिद्ध होण्याबद्दल आमचे पितृव्य वे० घनश्याम जोशी यांच्या कडून आलेला मुहूर्तसंबंधी चर्चेचा लेख आपणाकडे पाठविण्यांत येत आहे. स्थळ देण्याबद्दल प्रार्थना आहे.

"गेल्या दोन वर्षांकडे संस्कृत सूनृतवादिनी वर्तमानपत्राच्या २ ऱ्या खंडाच्या ९ व्या अंकीं उपनयनादि मंगल कृत्यास केतुयुन नक्षत्र महादोषाचें वर्ज्य करण्याबद्दल चर्चा चालवून पंचांगकारांकडून आलेला लेखी जबाब प्रसिद्ध करून सर्वथा सखलभ दोष वर्ज्यच करण्याबद्दल अधारपूर्वक सिद्ध करण्यांत येऊन आजपर्यंत पचांगकारांकडूनही त्या महादोषावर उपनयनादि मुहूर्त त्याज्य करण्यांत आलेला आहे. शके १८३१ फा० कृ० ९ गुरौ व्रतबंधादि मुहूर्त, माघ कृ० ७ गुरौ विवाह मुहूर्त व शके १८३२ चैत्र कृ० ३ बुधे व्रतबंधमुहूर्त सकेतु नक्षत्र महादोष असल्यामुळें त्याज्य केलेले आहेत.

असें असतां ज्योतिषी ब्राह्मणवून घेणारे आमच्या इकडचे कित्येक जोशी शके १८३१ फा० कृ० ५ गुरौ सकेतुनक्षत्रमहादोषावर व्रतबंधादि मुहूर्त व शके १८३२ चै० शु० ९ गुरौ विष्टुवसंक्रमणाच्या परदिवसामुळें हा दिवस त्याज्य असून क्वचित् ठिकाणीं ब्राह्मणाकडे हा मुहूर्त दिलेला दिसत आहे. यासाठीं शास्त्रीय पद्धतीनें अशा जोशांना इतकेंच विचारकरण्यांत येत आहे कीं, अशा महादोषावर मुहूर्त देण्यास आधार काय आहे? आधार न दाखविल्यास त्यांचें मत पोकळपणांत गणून अग्राह्य मानलें

जाईल. महादोषावर मंगलकृत्य केल्यास त्याचें फल—वसिष्ठांनीं आपल्या निबंधांत उल्लेख केलेला आहे,—तें असें—

"विवाहे विधवा नारी मरणं व्रतबंधने"

यासाठीं सर्वत्रांनीं अशा महादोषावर मंगलकृत्यें वर्ज्यच करावीं. इतीत्थमेवशिष्टैरनुशीलितः पंथा इति शिवम् ॥

आपला वर्गणीदार
पांडुरंग विठ्ठल जोशी.
माजाळी ता. कारवार.

[३]

वे० कुंडलीविज्ञानकर्ते यांस—

वि. वि.—आपल्या ज्योतिषी वाचकवर्गांपैकीं कोणाकडून तरी माझ्या भ्रमाचें यथाशास्त्र निरसन होईल अशा आशेनें हें पत्र लिहीत आहें, त्यास येत्या अंकींच स्थळ मिळावें.

"मुहूर्तमार्तंडादिकारांनीं फाल्गुन कृ० २ ही तिथि अनध्यायांत गणिली असून भारद्वाज ऋषि या तिथीस उपनयन करणें प्रशस्त आहे असें ह्मणतात व त्याप्रमाणें कित्येक पंचांगकारांनींही 'अनध्यायापवात' असें ह्मणून हा मुहूर्त दिला आहे. तरी या तिथीस उपनयन करण्यास कोणती हरकत आहे व 'अनध्यायापवात' असें पंचांगकारांनीं कां ह्मटलें या दोन शंकांचें शास्त्रवचनांनीं उत्तर मिळाल्यास माझे समाधान होईल."

पुढील सालचें पंचांग पुष्कळ दिवस पूर्वी प्रसिद्ध होत असतें तरी आमचे विद्वान् ज्योतिषी त्यांतील लग्नमुंजीचे मुहूर्त शुद्ध कोणते व अशुद्ध कोणते, त्याच प्रमाणें शुद्ध असून बाव—याचे राहिले कोणते याचा निर्णय अगोदरच प्रसिद्ध करितील तर

त्यांचे समाजावर उपकार होणार नाहींत काय? अजाण लोकांचा भरंवसा पंचांगांवरच असतो व त्यांतील मुहूर्तावर ते कार्य धरीत असतात. पण ते मुहूर्त चुकीचे ठरून आयत्या वेळीं कार्यकर्ता घोटाळ्यांत पडतो किंवा कार्य करून टाकून दोषांत पडतो हा अनर्थ टाळण्यास एकच उपाय आहे, तो हा कीं कोणतेंही पंचांग प्रसिद्ध होतांच त्यांतील चुका विद्वानांनीं परीक्षण करून ताबडतोब प्रसिद्ध कराव्या अथवा सर्व पंचांगांचें परीक्षण करून एक स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध करावें. या पुस्तकाचा चांगला खप होऊन कर्त्यासही त्याच्या मेहनतीचा मोबदला मिळेल. इकडे आमचे विद्वान् लक्ष देतील काय?

कळावें लोभ असावा हे विनंति.

आपला एक वर्गणीदार
क्ष. य. ज्ञ.

---

* पंचांगांची आजची स्थिती अगदीं शोचनीय आहे. लोकांना जर निरयनाची बाजू सोडावयाची नसेल तर त्यांनीं वेधसिद्ध ग्रह ज्या पंचांगानें येतात व जें ग्रहलाघवाला अनुसरून आहे अशा केतकी पंचांगाचा स्वीकार कां करूं नये समजत नाहीं! ग्रहलाघवाच्या गणितानें होणारें पंचांग दृग्तुल्य नाहीं यांबद्दल कोठें मतभेद असेल असें वाटत नाहीं. ग्रहांचे उदयास्त, युत्या, ग्रहणें व वक्रीमार्गीत्व ग्रहलाघवावरून दृक्तुल्य येत नाहीं. पचांगांत शुक्राचा अस्त असतो तेव्हां आकाशांत तो दिसत असतो व जेव्हां लग्नमुहूर्त असतात तेव्हां शुक्राचा केव्हां केव्हां अस्त असतो! असे प्रकार धडधडीत दिसत असून

लोक अद्यापि ग्रहलाघवी पंचांगाला चिकटून आहेत हें आमचें दुर्दैव होय.

तिथि म्हणजे चंद्रसूर्यामधील अंतर. चंद्र व सूर्य जितके सूक्ष्म असतील तितकें अंतर कमीजास्त होईल. अंतर कमी-जास्त झालें कीं तिथि क्षय अथवा वृद्धि पावेल. केतकरांचें गणित सूक्ष्म आहे, म्हणून त्यांच्या तिथि अगदीं बरोबर असल्या पाहिजेत. पण आमचे लोक ग्रहलाघवी पंचांग वापरीत असल्या-मुळें तिथीवृद्धि असतांही मंगलकार्य करण्याचा प्रसंग येतो ! सारांश, आज धर्मशास्त्राला महत्व नसून पंचांगालाच महत्व आहे, पंचांग देईल तो मुहूर्त व सांगेल तें धर्मशास्त्र अशी स्थिति आहे !

ही स्थिति केव्हां सुधारेल याचा विचार करूं लागलें म्हणजे असें वाटतें कीं, लोक शहाणे झाले पाहिजेत, त्यांनीं या चुका ग्रामजोशांना कळविल्या पाहिजेत, व विद्वान् लेखकांनीं लोकांस शहाणें केलें पाहिजे. असा प्रयत्न जोंपर्यंत होत नाहीं तोंपर्यंत हें असेंच चालणार "देशाचें दुर्दैव" दुसरें काय ?

असो. आमच्या वरील वर्गणीदारांचें म्हणणें बरोबर आहे. पंचांगांच्या घोटाळ्यामुळें लोक बुचकळ्यांत पडतात हें खरें आहे. तरी आमचे ज्योतिषी विद्वान् या वर्गणीदारांच्या सूचनेकडे लक्ष देतील अशी आम्हांस फार फार आशा आहे.

—संपादक 'कुंडलीविज्ञान'—

[चवथ्या अंकावरून पुढें चालू]

[श्रीयुत यशवंत केशव प्रधान]

धर्ममार्गे गतेसूर्ये अर्थांशेचंद्रमायदि ॥
तदा शत्रू भयं तस्य ज्ञेयंतुविबुधैःस्मृतम् ॥

धर्म मार्गांत क्षत्रीं सूर्य असतां अर्थमार्ग नक्षत्रीं चंद्र आल्यास गमन केल्यास मार्गाचे ठायीं शत्रु भय होईल.

धर्म मार्गे गते सूर्ये कामांशे चंद्र मायदि ॥
विग्रहं दारुणं चैव चौरा कुलसमुद्भवं ॥

धर्म मार्गी सूर्य आणि काम मार्गी नक्षत्रीं चंद्र असे असतां वैर पुष्कळांशीं होईल आणि चोरापासून भय प्राप्त होईल.

धर्ममार्गे गतेसूर्ये चंद्रे तत्रवसंस्थिते ॥
संहारश्च भवेत्तत्रभंगोहानिः प्रजायते ॥

धर्म मार्ग नक्षत्रीं सूर्य व चंद्र असतां गमन केलें तर संहार, भंग आणि हानि असें प्राप्त होईल.

काममार्गे गते सूर्ये चंद्रे धर्मेच संस्थिते ॥
गजाश्वाश्चैवतभ्यंते राजसन्मान संभवात् ॥

काम मार्गी सूर्य आणि धर्म मार्गी चंद्र आला तर हत्ती, घोडे यांचा लाभ राजसन्मानापासून प्राप्त होईल.

काममार्गे गते सूर्ये चंद्रेचैवार्थ संस्थिते ॥
सफलं जायते तस्य विघ्न भंगोविनिर्दिशेत् ॥

काम मार्गी सूर्य आणि अर्थ मार्गी चंद्र आला असतां सकल विघ्ने नाश पावतील.

काममार्गे गते सूर्ये चंद्रे तत्रैव संस्थिते ॥
विग्रहं दारुणं चैव कार्यनाशं विनिर्दिशेत् ॥

काम मार्गी सूर्य आणि चंद्र आले तर वैर फार पडेल. व कार्य नाश होईल.

काममार्गे गते सूर्ये चंद्र मोक्षगते पिवा ॥
राजलाभो भवेत्तस्य स्वर्णलाभं विनिर्दिशेत् ॥

काम मार्गी सूर्य आणि मोक्ष मार्गी चद्र आला तर राजापासून लाभ व सुवर्ण लाभ होईल.

मोक्षमार्गे गते सूर्ये चंद्रे धर्मस्थिते यदि ॥
हेमलाभो भवेत्तस्य सर्वकार्य प्रसिध्यति ॥

मोक्ष मार्गी सूर्य व धर्म मार्गी चंद्र आला तर सुवर्ण लाभ आणि सर्व कार्यसिद्धि होईल.

मोक्षमार्गे गते सूर्ये अर्थांशे चद्र मायदि ॥
विफलं तस्य कार्यंच चोर राजरिपोर्भयं ॥

मोक्ष मार्गी सूर्य व अर्थ मार्गी चंद्र आला तर चोर, राजा व शत्रु यांपासून भय प्राप्ति आणि कार्य नाश होईल.

मोक्षमार्गे गते सूर्ये चंद्र कामस्थितेयदि ॥
सर्वसिद्ध मवाप्नोति कार्येच जय मेवच ॥

मोक्ष मार्गी सूर्य आणि काम मार्गी चंद्र आला तर सर्व कार्यसिद्धि व जय प्राप्त होईल.

मोक्षमार्गे गते सूर्ये चंद्र तत्रैव संस्थिते ॥
विग्रहं दारुणंचैव विघ्नस्तस्य भविष्यति ॥

मोक्षमार्गी सूर्य आणि धर्म मार्गी चंद्र असला तर वैर व नानाप्रकारें विघ्ने होतील असें जाणावें.

शुभाशुभ वाहनें.

आत्मनो जन्म नक्षत्रादिननक्षत्र मेवच ॥
एकीकृत्वाहरेद्भागं दशेषेच वाहनं ॥
॥ रासभोऽश्वोगजो मेषो जंबुकःसिंहसंज्ञकः ॥
काकश्चैव मयूरश्च हंस इत्येव वाहनं ॥
॥ रासभे अर्थनाशश्च धनलाभश्च वाजिनी ॥

लक्ष्मीप्राप्तिर्गजाख्येच मेषेच मरणं ध्रुवं ॥
॥ जंबूके स्वल्पलाभश्च कार्यसिद्धिं सिंहगे ॥
काकेच निष्फलं कार्यमयूरेच सुखावहं ॥
हंसेतुसर्वसिद्धिःस्याद्वाहनाना फलं स्मृतं ॥

आपल्या जन्म नक्षत्रापासून दिवस नक्षत्रा पावेतों मोजन ९ नीं भागावें. आणि शेष उरेल त्यावरून वाहन जाणावें. शेष १ उरेल तर वाहन गाढव त्याचे फळ अर्थनाश. दोन उरले तर घोडा धनलाभ. ३ उरले तर हत्ती लक्ष्मी प्राप्ती. ४ उरले तर मेंढा मरण. ५ उरले तर कोल्हा, स्वल्पलाभ. ६ उरले तर सिंह, कार्यसिद्धि. ७ उरले तर कावळा निष्फळ. ८ उरले तर मयूर सुख प्राप्ति. ० उरले तर हंस सर्वसिद्धि. याप्रमाणें वाहनाचीं फळें जाणावी.

आतां आपण गर्गाचार्य वगैरे यांचे काय मत आहे याकडे वळूं, व त्यावरून वाचकांचे लक्षांत येईल कीं वरील सर्व खटपट निष्फळ व त्याज आहे.

उषःप्रशस्यतेगर्गः शकुनंच बृहस्पतिः ॥
अंगिरामन उत्साहे विप्रवाक्यो जनार्दनः ॥

गर्गमुनीचे मतें उषः काल प्रयाणास शुभ आहे. बृहस्पतीचे मतें उत्तम शकुन झाला तर तो शुभमुहूर्त मानावा. अंगिराच्या मतें जेव्हां आपलें मन जाणण्यास उत्सुक असेल त्या वेळेस गमन करावें. व जनार्दनाचे मतें तर नुसता विप्राचा अशिर्वाद घेऊन निघालें असतां तो शुभ मुहूर्त होय !!

आतां आपण कोणत्या वारीं कोणत्या दिशेस जावें. गमन.

कालचें लग्न कसें असावें व कोणत्या ग्रहाचें होऱ्यावर गमन करावें व तें केलें असतां काय शकुन वगैरे होतात इत्यादि गोष्टींचा विचार केल्यानंतर पुढील भागांत पाश्चात्य दृष्टीनें विचार करूं.

वारविचार.

एकार्कैद्वयनानुकूलमनिशं भेदे दिवारात्रयो भौमे प्राक्
शनि चंद्रयोर्गतमपाक्यश्चाज्ञ गुर्वोर्हितम्॥ भृग्वर्कान्यु
दगर्कभानुभमगैस्तष्टं द्विसत्पाउलस्त्यगाभ्यां विउलो
नयोर्न गमनं श्रीदेवलोक्त्या हितम्॥

(मु. मा. या.)

अर्थः—सूर्य व चंद्र ह्या दोहोंचे अयन एक असतां त्यांच्या अयन दिशेला दिवसा व रात्रीस गमन करावें ह्मणजे दोघांचें उत्तरायण असतां दिवा रात्रौ उत्तरेस व पूर्वेस आणि दोघांचें दक्षिणायन असतां दक्षिणेस व पश्चिमेस गमन करावें. दोघांची अयनें वेगळीं असतील तेव्हां सूर्याच्या अयन दिशेला रात्रीं गमन करावें. मंगळवारीं पूर्वेस **शनिवारीं** व **सोमवारीं** दक्षिणेस **बुधवारीं** व **गुरुवारीं** पश्चिमेस आणि शुक्रवारीं व शनिवारीं उत्तरेस गमन करावें. कारण ते शुभ होय.

सूर्य नक्षत्रापासून दिवस नक्षत्रापर्यंत मोजून ७ नीं भागावें. बाकी २।७ राहिली तर अडल व ३।६ असतां विडल असते. ह्या दोहोंवर गमन करूं नये. देवल ऋषींच्या मतें अडल विडल गमनास शुभ आहेत.

अर्के क्लेशमनर्थकंच गमने सोमेच बंधुप्रियं
चांगारेऽनल तस्करज्वरभयं प्राप्नोति चार्थबुधे॥
क्षेमारोग्यसुखं करोति च गुरौ लाभश्च शुक्रे शुभो
मंदे बंधन हानिरोगमरणा न्युक्तानि गर्गादिभिः॥

रविवारीं गमन केल्यास मार्गी महाक्लेश व अनर्थ प्राप्त होतात, सोमवारीं बंधु आणि प्रिय यांचें दर्शन, मंगळवारीं गमन केल्यास अग्नि, चोर व भय प्राप्ति, बुधवारीं गमन केलें तर द्रव्यप्राप्ति, गुरुवारीं गमन केलें असतां क्षेम, आरोग्य व सुख यांची प्राप्ति, शुक्रवारीं प्रयाण केल्यास लाभ व शुभप्राप्ति आणि शनिवारीं गमन केलें असतां बंधन, हानि, रोग व मरण यांची प्राप्ति होते.

वरील फलें सर्वांस सारखींच लागू पडतील असें वाटत नाहीं कित्येकांवर एखाद्या विशिष्ट वाराचा जास्त परिणाम घडलेला पाहण्यांत येतो. तो वार त्याचा घातवार देखील नसतो. आमच्या एका मित्राचीं सर्व चांगलीं कृत्यें शनिवारींच घडतात व त्यास गुरुवार हा घातवारासारखा वाईट जातो. त्याचा घातवार गुरु नसून असें होण्याचें कारण काय? हा वाराचा प्रकार जन्मकालीन असलेल्या शुभाशुभग्रहांवर अवलंबून आहे असें वाटतें. वाचकांनीं याचा अनुभव घ्यावा.

दिक्शूलविचार.

मूळ श्रवण शक्रेषु प्रतिपन्नवमीषुच॥
शनौ सोमे बुधेचैव पूर्वस्यांगमनं त्यजेत्॥

मूळ, श्रवण, व ज्येष्ठा हीं नक्षत्रें आणि प्रतिपदा, नवमी या

तिथी व शनिवार, सोमवार आणि बुधवार हे वार असतां **पूर्वेस** गमन करूं नये.

पूर्वा भाद्रपदाश्वीनी पंचमीच त्रयोदशी ॥
गुरुर्धनिष्ठार्द्राचैव याम्ये सप्त विवर्जयेत् ॥

पूर्वा, भाद्रपदा, अश्विनी, धनिष्ठा व आर्द्रा हीं नक्षत्रें, पंचमी व त्रयोदशी या तिथी; आणि गुरुवार; हीं सात **दक्षिणेस** गमन करण्यास वर्ज्य.

रोहिण्यांच तथा पुष्ये षष्ठी चैव चतुर्दशी ॥
भौमार्क गुरुवारेषु न गच्छेत्पश्चिमां दिशम् ॥

रोहिणी, पुष्य हीं नक्षत्रें; षष्ठी, चतुर्दशी या तिथी; मंगळवार, रविवार, गुरुवार हे वार **पश्चिमेस** गमन करतांना वर्जावे.

करेवोत्तर फाल्गुन्यां द्वितीया दशमी तथा ॥
बुधेरवौ भौम वारेन गच्छे दुत्तरांगतिम् ॥

हस्त, उत्तरा--फाल्गुनी हीं नक्षत्रें; द्वितीया, दशमी या तिथी; बुधवार, रविवार व भौमवार हे वार **उत्तर दिशेस** गमनास वर्ज्य.

ईशान्यांशे शनौशूलो आग्नेयां गुरुसोमयोः ॥
वायव्यां भूमिपुत्रस्य नैर्ऋत्यां शुक्रसूर्ययोः ॥

बुधवारीं व शनिवारीं **ईशान्येस** गमन करूं नये कारण तेथें शूल असतो. गुरुवारीं आणि सोमवारीं **आग्नेय दिशेस** गमन वर्जावें. मंगळवारीं **वायव्येस,** आणि शुक्रवारीं व रविवारीं **नैर्ऋत्येस** गमन करूं नये.

श्रीधूतपापेश्वरपंचांग.

पनवेल येथील श्रीधूतपापेश्वर आरोग्यमंदिर नामक संस्थेचे प्रतिनिधि श्रीयुत लोकमान्य विष्णु कृष्ण पुराणिक हे अलीकडे तीन चार वर्षें वरील नांवाचें निरयन पंचांग प्रसिद्ध करीत असतात. वे० शा० गणेशशास्त्री दामले के० माहिमकर यांजकडून या पंचांगाचें कर्तृत्व आहे. या पंचांगाचें स्वरूप खाली लिहिल्याप्रमाणें आहे.

१ कालमान व देशमान मुंबईचें.

२ निरयन मेषसंक्रमणकाळीं २२।४०।३९ अयनांश स्वीकारले आहेत.

३ वार्षिक अयनगति ९८।४६ घेतली आहे.

४ वर्षमान सूर्यसिद्धांतानुसार ३६५।१५।३१।३१।२४ घेतलें आहे.

५ दररोजच्या ग्रहलाघवीय स्पष्ट सूर्यचंद्रावरून केलें आहे.

म्हणजे पंचांगकारांनीं पंचांगशोधन कमेटीच्या ठरावानुसार केलें आहे. वसईकरांचें पंचांग पूर्णपणें ग्रहलाघवानुसार आहे. ग्रहलाघवाची वार्षिक अयनगति ६० विकला आहे म्हणून त्याच्या मेषारंभी त्याचे अयनांश २३।८ येतात. उभयतांच्या अयनांशांत २७ क. २१ वि. इतका फरक आहे. अयनांशांत फरक झाला म्हणजे प्रत्येक ग्रहाच्या संक्रमणांत फरक होतो. एकाच्या संक्रांतीचा दुसऱ्याच्या संक्रांतीशीं मेळ बसत नाहीं, त्यामुळें खरी संक्रांत कोणती हा अजाण लोकांस भ्रम होतो ! निरयनाची

रचनाच मुळीं मर्जीवर आहे, ह्मणून अमक्याचें खरें आणि तमक्याचें खोटें हें प्रत्यक्ष सूर्यनारायणालाही सिद्ध करितां येत नाहीं. केतकरांचें पंचांग केतकरांच्या मतानें खरें आहे, दामले यांचें पंचांग दामल्यांच्या मतानें खरें आहे, आणि केरोपंती पंचांग केरोपंताच्या मतानें खरें आहे! पण, आह्मांस मात्र कोणतें पंचांग खरें हा भ्रम पडला आहे? आजपर्यंत मोघे यांचें पंचांग व पटवर्धनी पंचांग असे दोनच भेद होते. त्यांत पटवर्धनी संक्रांत चार दिवस अगोदर येत असल्यामुळें व अधिक मासांत भिन्नता दृष्टीस पडूं लागल्यामुळें तें पंचांग कोणी वापरीनासे झालें. लग्नें–मुंजी वगैरे मोघ्यांच्या पंचांगानुसारच होत असत. तेंव्हा केतकी पंचांग उदयास आलें. पंचांगाचें गणित दृग्तुल्य असल्यामुळें सर्वांना तें हवेसें वाटूं लागलें. व पंचांगशोधनकमेटी झाली नसती तर याच पंचांगानें अघाडी साधली असती. परंतु मुंबईस आला कांहीं मंडळी प्रतिपक्ष भेटून तिनें ठिकठिकाणचे विद्वान् ज्योतिषी एकत्र जमविले व केतकरांचें पंचांग नापास ठरवून त्यांच्या जागीं त्याच्याच पद्धतीचें पंचांग निर्माण व्हावें असा ग्रंथ करवावा ह्मणून ठराव करविला. बक्षीस लाविलें. पण अद्यापि ग्रंथ निर्माण झाला नाहीं! केतकरांनीं अलीकडील सूक्ष्म वेधांनीं सिद्ध झालेलें वर्षमान घेतलें तें मुंबईकरांस पसंत नव्हतें. ह्मणून सूर्यसिद्धांतांचेंच वर्षमान कायम ठरविलें. केरोपंतांनीं जें ग्रहसाधन पुस्तक केलें आहे त्यांतही हेंच वर्षमान घेतलेलें आहे. पाश्चात्य शास्त्रांनीं ठरलेलें वर्षमान सूर्यसिद्धांतापेक्षां ८ पळांनीं कमी आहे. सूक्ष्म अयनगति ५० विकला आहे असें अलीकडील सूक्ष्म वेधांवरून सिद्ध झालें आहे. एका नक्षत्रास सोडून पुनः त्याच नक्षत्रापर्यंत सूर्याला येण्याला जो काल तेंच निरयन वर्षाचें मान होय. हें मान प्रत्यक्ष वेधानें काढतां येत नाहीं. कारण सूर्य दिसतो तेव्हां नक्षत्र दिसत नाहीं. सायन वर्षापासून अयनगतीप्रमाणें निरयन वर्षमान तयार करावयाचें असतें. संपात दरसाल जितका मागें जातो त्या त्याच्या गतीला अयनगति ह्मणतात. ही अयनगति निरनिराळ्या ग्रंथकारांनीं निरनिराळी ठरविली आहे.

भास्कराचार्य ५४ विकला. आर्यसिद्धांत ४६ विकला. ब्रह्मसिद्धांत ५७ विकला. पाराशरसिद्धांत ४६ विकला व ग्रहलाघव ६० विकला. पाश्चात्य विद्वान् ५० विकला आहे असें ह्मणतात. धूतपापेश्वर पंचांगकर्त्यांनीं ५८।४६ विकला घेतली आहे. पंचांगशोधनकमेटीनें इतकीच सुमारानें घ्यावी असें ठरविलें आहे. सारांश हा एक अयनगतीच्या संबंधानें तृतीय पंथच आहे असें ह्मणावें लागतें.

वर्षमान कोणतेंही घ्या व अयनगति वाटेल तितकी धरा, पण, निरयन मेषसंक्रमण ज्या काळीं होईल त्या काळीं अल्मानाक बरून येणारा सायन रवि व पंचांगावरून येणारा सायन रवि यांत फरक असतां कामा नये. धूतपापेश्वर पंचांगांत ता. १३ एप्रिल या दिवशीं १२ घ. ४४ पळांनीं मेषसंक्रमण दिलें आहे. ह्मणजे मध्यम मानानें ११ वाजून ६ मि. नीं आहे. राफेलचा या तारखेचा मुंबई १२ वाजतांचा रवि २२ अंश २८ कला ५९ वि. आहे. पण या पंचांगाच्या मतानें तो २२ अंश ४० कला ३९ वि. इतका येतो. ह्मणजे सुमारें १२ कला जास्त येतो. अर्थात् या पंचांगाचें निरयन गणित कुच कामाचें आहे. पंचांगांत सुधारणा कशासाठीं करावयाची, तर तें दृग्तुल्य झालें पाहिजे.

धूतपापेश्वर पंचांग दृग्तुल्य आहे काय? आहे असें जर कोणी दाखविल तर त्याचे आमच्यावर मोठे उपकार होतील. उगाच १७ मतांची सतरा पंचांगें निर्माण करण्यांत मतलब कोणता? प्रकाशकांना आमची सस्नेह विनंति आहे कीं त्यांना जर शुद्ध पंचांग करण्याची इच्छा उत्पन्न झाली आहे तर तें पंचांग असें निर्माण झालें पाहिजे कीं त्यावरून येणारा सायन रवि अल्पाना-कशी तंतोतंत मिळता आला पाहिजे. त्या पंचांगावरून कोणताही ग्रह सायन केला कीं तो अल्पानाक प्रमाणें आला पाहिजे, मग आमची हरकत नाहीं. ग्रहांचे वक्रीमार्गीत्वही जुळत नाहीं. ग्रहांचे युतिकाल दिले असते तर ते ताडून पाहतां आले असते.

पंचांगाची उपयुक्तता पुष्कळच वाढविली आहे व त्या दृष्टीनें हें पंचांग संग्राह्य आहे. इतर सटरफटर पंचांगें जवळ बाळगण्यापेक्षां हें पंचांग बाळगणें जास्त फायदेशीर आहे. कारण रवि व चंद्र हे दररोजचे स्पष्ट केले असून इतर ग्रह आठवड्याचे दिले आहेत. प्रत्येक ग्रह नक्षत्राच्या कोणत्याही चरणारंभी गेल्याचा काल दिला आहे. सायन संक्रमणें सवतीच्या पोरासारखीं मेषायनं वृषभायनं अशीं दिलीं आहेत पण त्यांचे काल दिले नाहींत. हा आमच्या मतें सवती मत्सर होय! सायनपद्धतीच्या सत्यतेचा पुरावा कायम राखला आहे हे आमच्यावर मोठे उपकार आहेत. आर्द्राप्रवेशफल हा पहिला पुरावा व दुसरा याहीपेक्षां महत्वाचा "मकरेर्कः उदगयनं शिशिरर्तुः" हा होय. केतकरांप्रमाणें मकर संक्रमण व उदगयन यांची फारकत केलेली नाहीं!

आमच्या मतानें पुढील सुधारणा होणें अगत्याचें आहे.

१ छपाई स्पष्ट व सुवाच्य.

अर्कोत्तरे वायुदिशाच सोमे
भौमे प्रतीच्यां बुधु नैर्ऋत्येच ॥
याम्ये गुरौ वन्हिदिशाच शुक्रे
मंदेच पूर्वे प्रवदंति कालः ॥

रविवारीं काळ उत्तरेस, सोमवारीं वायव्येस, मंगळवारीं पश्चिमेस, बुधवारीं नैर्ऋत्येस, गुरुवारीं दक्षिणेस, शुक्रवारीं आग्नेयेस व शनिवारीं पूर्वेस याप्रमाणें काळराहू समजावा.

रविगुरुदिनपूर्वे सोमशुक्रेचयाम्ये
वरुणदिशितु भौमे चोत्तरे सौरि संस्थे।
प्रतिदिन मिति गत्वा कालराहुर्दिशानां
सकल गमनकार्ये वामपृष्ठेच सिद्धिः ॥ ॥

रविवारीं किंवा गुरुवारीं पूर्वेस, सोमवारीं अथवा शुक्रवारीं दक्षिणेस गमन केलें असतां, भौमवारीं पश्चिमेस व शनिवारीं उत्तरेस गमन केलें असतां काळराहू वामपृष्ठभागीं येतो आणि सकल कार्यें सिद्धीस जातात.

वारशूलदोहद आणि दिशा दोहद.

आज्यं दुग्ध गुडौ तिलान्दधि यवान्माषानिनाप्राश्यनो।
शूलेयानमनिष्ट मिंद्रककुमोऽथाऽऽज्यंतिलान्नं तिमान्॥
दुग्धं प्राश्यच हस्त्यनो हयनरैर्यानं सुयानं तयोः।
ध्यानाद्भावति ब्रुवेथ हरिजं तिथ्यादि लक्षाधिकम्॥॥

वारशूल असतां रविवारीं तूप, सोमवारीं दूध, मंगळवारीं गूळ, बुधवारीं तीळ, गुरुवारीं दहीं, शुक्रवारीं यव आणि शनिवारीं उडीद भक्षण करून निघालें असतां वारशूलाचा दोष नाहीं. तूप भक्षण करून हत्तीवर बसून पूर्वेस गमन केलें असतां तें सफळ होतें. तिळान्न भक्षण करून गाडींतून दक्षिणेस गमन केल्यास कार्यसिद्धी होतें. माषान्न भक्षण करून घोड्यावर बसून पश्चिमेस

मेळें तर कार्य सफळ होतें. दूध पिऊन पालखी मेणा वगैरे नर वाहनांत बसून उत्तरेस गमन केल्यास कार्यसिद्धी होते. हे पदार्थ प्रसंगीं मिळाले नाहींत किंवा खाण्यास अयोग्य असले तर त्यांचें व वाहनांचें ध्यान करून गेल्यानेंही कार्य सिद्धी होते. अतः तिथिवारनक्षत्रादिकांपेक्षां लक्षपटीहून अधिक बलवान् जें लग्न तें सांगतों. खरोखरीं हाच भाग अति महत्वाचा आहे. वरील सर्व विवेचनावरून परस्पर विरोधीमतें आमच्या ग्रंथांत कशीं सांगितलीं आहेत तें सूज्ञ वाचकांचे लक्षांत आलेंच असेल.

रवौनीलं बुधे पीतं कृष्णवर्णं शनैश्चरे ॥
श्वेतं गुरौ भृगौ भौमे रक्तं सोमे तुचित्रकम् ॥ ॥

रविवारीं निळें, बुधवारीं पिवळें, शनिवारीं काळें, गुरुवारीं व शुक्रवारीं पांढरें, मंगळवारीं तांबडें आणि सोमवारीं चित्रवर्ण याप्रमाणें वस्त्र धारण करून गमन करावें.

आतांपर्यंत वाचकांचे पुढें तिथि, वार, नक्षत्र वगैरे गमन काळीं कशीं असावींत याचें विवेचन प्राचीन ग्रंथाधारें केलें. आतां बाकी राहिलेले अतिमहत्वाचे दोन मुख्य विभागांविषयीं (होरा व प्रयाण लग्नाविषयीं) विवेचन करणें आहे.

प्रत्येक दिवशीं असलेल्या ग्रहांचे निरानिराळ्या होऱ्यांचा कोठेंच चांगला विचार केलेला आढळत नाहीं. म्हणून त्याबद्दल मिळालेली माहिती सविस्तर देण्याचा मानस आहे. होरे हे कांहीं-तरी काल्पनीक आहेत असें वाटत नाहीं, व ते शास्त्रीय-तत्वावर बसविले आहेत याविषयीं आम्हांस बिलकूल संशय वाटत नाहीं.

होऱ्याचीं फळें प्रश्न वगैरे गोष्टींत उत्तम तऱ्हेनें अनुभवास येतात. वाचकांनीं त्याचा अनुभव घ्यावा.

होराविचार.

किल्येकांच्या मतें **होरा** हा शब्द ग्रीकभाषेंतील आहे. हा शब्द हिब्रू भाषेंतील 'होऊस्' या धातूपासून उत्पन्न झाला आहे. होउस् अथवा होरा ह्या शब्दानें कालमापन कोष्टकांतील १ तास असा अर्थ हल्लीं प्रचारांत आहे. हिराडेटस् ह्याचे होरस् अथवा ओरस् हें नांव ईजिप्तमध्यें सूर्यास आहे. प्रसिद्ध वराहमिहिर होरा या शब्दाबद्दल खालील प्रमाणें आपले बृहज्जातक ग्रंथांत म्हणतो:—

होरेत्यहोरात्र विकल्पमेके वांछंति पूर्वापर वर्णलोपात् ॥
कर्मार्जितं पूर्वभवे सदादि यत्तस्यपक्तिं समभिव्यनक्ति ॥

प्रायः होरा हा शब्द "अहोरात्र" या शब्दांतील पहिल्या व शेवटल्या अक्षरांचा लोप होऊन झालेला असावा, असें किल्येकांचें मत आहे. परंतु सांप्रत पूर्वजन्मांचें पापपुण्य या जन्मीं आपणांस कसें काय फलद्रूप होणार, हें मेणेंकरून कळतें अशा विषयास होरा शब्द लाविताात.

वरील वराहमिहिरानें सांगितलेल्या अर्थाप्रमाणें आज आपणांस होरा या शब्दाबद्दल विचार करावयाचा नाहीं तर कालमापन कोष्टकांतील प्रत्येक तासास किंवा अडीच घटकेस होरा असें म्हणतात, त्याचाच शास्त्रीय दृष्टीनें विचार कर्तव्य आहे.

दिवसाचे २४ तास किंवा ६० घटिका मानिल्या आहेत म्हणून एका दिवसांत २४ होरे होतात व ते सात ग्रहांस वांटून दिले

आहेत. होरांचा क्रम ग्रहांचे गतीप्रमाणें ठरविलेला आहे. ह्मणजे सर्वांत अति जलद भ्रमण करणारा जो ग्रह **चंद्र**, त्याचे नंतर **बुध** व त्याचे नंतर **शुक्र** ह्या प्रमाणें क्रम ठरविले आहेत. सूर्योदयीं ज्या ग्रहाचा वार असतो त्याचा होरा पहिल्या तासास असतो. नंतर दुसऱ्या तासापासून वर सांगितल्याप्रमाणें निरनिराळ्या ग्रहांचे होरे मानितात.

वारात् षष्ठस्य षष्ठस्य होरासार्धाद्विनाडीका ॥
अर्कः शुक्रो बुधश्चंद्रो मंदो जीव धरासुतः ॥

ज्या वाराचा त्यावारीं प्रथम अडिच घटिका होरा, त्यापासून सहावे वाराचा दुसरा होरा, याक्रमानें दिवसाचे व रात्रीचे बारा बारा होरे जाणावे. होरा जाणण्याकरितां ग्रहांचा क्रम—रवि, शुक्र बुध, चंद्र, शनि, गुरू व मंगळ याप्रमाणें ध्यावा. ह्मणजे रविवारीं प्रथम होरा **रवीचा**, दुसरा **शुक्राचा**, तृतीय **बुधाचा**, या प्रमाणें जाणावें.

पाश्चिमात्य ग्रंथांतही ह्याचप्रमाणें होरा विचार करितात, परंतु त्याच्यांत प्रत्येक होरा सदोदित एक तासाचा किंवा अडीच घटिकांचा नसतो, हें खालील विवेचनावरून सहज लक्षांत येईल.

" सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतच्या कालाचे समान १२ भाग करितात व त्या प्रत्येक भागास होरा असें ह्मणतात. सूर्योदयीं प्रथम होरा ज्या ग्रहाचा वार असतो त्याचाच असतो. उदाहरणार्थ शनिवारीं प्रथम होरा शनीचा व त्याचे पुढील होऱ्यांचा क्रम ग्रहांचा सूर्य पासूनचे अंतराचे क्रमाप्रमाणें आहे. सूर्यमालेंत ग्रहांचे अंतराचा क्रम खालील प्रमाणें आहे ह्मणुन खालीलप्रमाणें होऱ्याचा क्रम येतो:—

१ शनि,	२ गुरू,	३ मंगळ,	४ सूर्य,
८	९	१०	११

५ शुक्र,	६ बुध,	७ चंद्र,
१२	१	२

याप्रमाणेंच पुढें जाणावें. वरील प्रमाणेंच सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचे कालाचे समान १२ भाग करितात आणि वर ग्रथित केल्याप्रमाणें होऱ्यांचा आरंभ सूर्यास्तानंतर मानितात. शनिवारीं सूर्यास्तानंतर प्रथम होरा बुधाचा येतो. हें वरील अनुक्रमावरून सहज ध्यानांत येईल—याप्रमाणें २४ तासांचे भ्रमणांत दुसऱ्या दिवसाचे सूर्योदयाचे पूर्वीचा होरा **मंगळाचा** येतो. व त्या नंतर **रवीचा** होरा असतो व तोच होरा रविवारीं सूर्योदयीं असतो. ह्याप्रमाणें सोमवारीं प्रथम होरा **चंद्राचा** मंगळवारीं **मंगळाचा**, बुधावारीं बुधाचा, गुरूवारीं **गुरूचा** शुक्रवारीं **शुक्राचा** आणि शनिवारीं **शनीचा** प्रथम होरा येतो."

खालील कोष्टकावरून प्रत्येक वारी कोणत्या वेळा कोणता होरा आहे हें सहज लक्षांत येईल

तास	रवि रविवार	चंद्र सोमवार	मंगळ भौमवार	बुध बुधवार	गुरु गुरुवार	शुक्र शुक्रवार	शनि शनिवार
१	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
२	शुक्र	शनि	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु
३	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि	चंद्र	मंगळ
४	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि
५	शनि	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र
६	गुरु	शुक्र	शनि	रवि	चंद्र	मंगळ	बुध
७	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि	चंद्र
८	सूर्य	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
९	शुक्र	शनि	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु
१०	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि	चंद्र	मंगळ
११	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि
१२	शनि	सूर्य	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र
१	गुरु	शुक्र	शनि	रवि	चंद्र	मंगळ	बुध
२	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि	चंद्र
३	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
४	शुक्र	शनि	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु
५	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि	चंद्र	मंगळ
६	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि
७	शनि	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र
८	गुरु	शुक्र	शनि	रवि	चंद्र	मंगळ	बुध
९	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि	चंद्र
१०	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
११	शुक्र	शनि	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु
१२	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि	चंद्र	मंगळ

वरील कोष्टकावरून कोणत्या वारी कोणता होरा असतो हें वाचकास सहज कळेल.

आतां सूर्यास्त सूर्योदय हें जाणण्याचें कोष्टक खाली दिलें आहे त्यावरून पुष्कळ मदत होईल असें वाटते.

संक्रांति १अंश रवि-संक्रमण उदयास्त
किंवा भोगकाल भोगप्यास संक्रमण वगैरे र-उ-र-अ.
लग्न. काल संक्रांति रविउदय

मेष	तां मि १-३५	मि. से. ३-१०	महिना मार्च	तारीख २१	६-५	६-९	र,गति २४तास ५९॥
वृषभ	१-४७	३-३४	एप्रील	२०	५-४०	६-१६	५८॥
मिथुन	२-४	४-८	मे	२१	५-२५	६-२७	५७॥
कर्क	२-१४	४-२८	जून	२२	५-२५	६-२७	५७।
सिंह	२-२३	४-२६	जुलई	२३	५-३४	६-३७	५७।
कन्या	२-७	४-१४	आगष्ट	२३	५-४४	६-२	५८
तुला	२-७	४-१४	सप्तंबर	२३	५-५०	५-५४	५८॥
वृश्चिक	२-१३	४-४६	आक्टोबर	२३	५-५८	५-३०	६०
धन	२-१४	४-२८	नवंबर	२३	६-१३	५-५९	६०॥
मकर	२-४	४-८	डिसेंबर	२२	६-१३	५-२६	६१
कुंभ	१-४७	३-३७	जानेवारी	२०	६-३८	५-४४	६१
मीन	१-३५	३-१०	फेब्रूवारी	१९	६-२७	६-०	६०॥

वरील कोष्टकांतील सर्व माहिती मुंबई अक्षांशावरून साधलेली आहे.

कोणत्याही दिवशीं रवि कोठें आहे व सूर्योदय केव्हां होतो हें मागील दिलेल्या कोष्टकावरून सहज काढतां येईल.

संक्रातीच्या तारखा व रवीची गति तसेच त्याचे उदय व अस्त स्थूलमानानें बरोबर आहेत. दरवर्षी थोडा फरक पडतो पण तो सूक्ष्म आहे. संक्रमण दिलेल्या तारखेच्या दिवशीं व कधीं रात्रीं असें होतें.

ज्या राशींत ज्या अंशावर इष्ट दिनीं रवि असेल तें लग्न व अंश सूर्योदयीं धरून इष्टकालचे लग्नादि या कोष्टकावरून सहज साधितां येतें.

कोणत्या होऱ्यावर काय कृत्य करावें ?

गुरुर्विवाहे गमनेच शुक्रो बोधे सौम्यः सर्व कार्येषुचंद्रः ॥
कुंजेच युद्धं रवि राजसेवा मंदेच वित्तं त्विति होरयोगाः ॥

गुरूचा होरा विवाहास, शुक्राचा गमनास, बुधाचा ज्ञान प्राप्तीस, चंद्राचा सर्व कार्यास, मंगळाचा युद्धास जाण्यास, रवीचा राजसेवेस, आणि शनीचा द्रव्य संग्रहास उक्त जाणावा.

वाचकहो, याबद्दल नीट अनुभव घेऊन पहा. आपल्याशीं बोलण्यास आलेला मनुष्य कोणत्या होऱ्यावर प्रश्न विचारीत आहे हें पहावें. व असें आढळून येईल कीं तो बहुतेक त्यावेळीं चालूं असलेल्या ग्रहाच्या होऱ्याप्रमाणेंच भाषण करितो किंवा प्रश्न विचारतो. अनुभवास आलेलीं ग्रहांची होराफळें खालील प्रमाणें आहेत त्याचा वाचकांनीं अनुभव घेऊन पहावा.

१ रवीचा होराः—विलंब, फलद्रूप, सरकार, राजकारण धंदा रोजगार, सचोटीचे व्यवहार, मोठे मोठे अधिकारी लोकांबरोबर व्यवहार करणें, सार्वजनिक कामें करणें, अर्जकरणें, मैत्री करणें या होऱ्यावर वरीचा व्यवहार जपून करावा. पैका उसना देऊं नये.

२ चंद्राचा होराः—आर्द्र, चंचल, स्त्रैण, प्रवास, स्थलांतर संबंधी गोष्टी होतात, परंतु परिणाम फारच अशाश्वत असतात, सबब स्थलांतर वगैरे करूं नये. चंद्रहोऱ्यावर जुलाब घेतला असतां उत्तम लागू होतो.

३ मंगळाचा होराः—तंटे, अपघात, चोरी, आग वगैरे, लढाई, जळाऊ वस्तू इत्यादी मंगळाशीं संबंध असलेल्या गोष्टी ह्या होऱ्यावर करूं नयेत.

४ बुधाचा होराः—बुध चपळ व चंचळ स्वभावाचा ग्रह आहे. व विद्येचा कारक आहे, कायदेपंडित, शीघ्र कोपी, बडबड्या असा आहे. या होऱ्यावर कायद्या संबंधानें व्यवहार करावे. लेख व पत्रव्यवहार करणें, बातम्या व तारा पाठविणें, भाषाशास्त्राचा किंवा शास्त्रीय विषयाचा अभ्यास करणें या गोष्टी कराव्या.

५ गुरूचा होरा—औदार्य, फलद्रूपता, पौरुष, द्रव्य, नफा, नवीन घरीं राहण्यास जाणें व कोणास भेटणें इत्यादि.

६ शुक्राचा होरा:—स्त्रिया, विषयोपभोग, गायनवादन वगैरे छान छोकी, रंडीबाजी, आपक, दागिने व व औषध घेणें वगैरे या होऱ्याबर बहुतकरून स्त्रीचे विषयी गोष्टी होतात. 'गाणें वाजविणें' शिकण्यास हा होरा उत्तम.

७ शनीचा होरा:—मंद, वंध्य, निष्फळ अपयश, जमीन शेत, वगैरे गोष्टी. या होऱ्यावर स्नेह करूं नये, दुःख, शोक, मृत्यु. या होऱ्यांत शरीर प्रकृति संबंधानें काळजीनें वागणें व कोणावर न विश्वासणें.

वरील विवेचनावरून वाचकांचे लक्षांत प्रयाणकाळीं होरा कसा असावा अथवा होऱ्याचा उपयोग कसा करावा हें आलेंच असेल, आतां पुढील भागांत प्रयाणकाळीं कोणतें लग्न उदित असावें व तत्कालीन कुंडलींतील ग्रह स्थिती या दोहोंचा विचार करण्याचें योजिलें आहे.

प्रयाण लग्न विचार.

स्वर्क्षोनर्धि घटास्तभानुजग्रहान्षष्ठं रिपोर्भादनृ
स्वर्क्षांगेश रिपुंखल जनिबलं त्यक्तं तथा सांप्रतम् ॥
यात्रालग्नगतं त्यजेदथदिशाम्रीशोऽर्क शुक्रौ कुजो
राहुर्नदशशांक सौम्यगुरवः केंद्रोदगीशे व्रजेत् ॥

अर्थ:—प्रयाणकर्त्याची जन्मराशि व ती पासून उपचय रहित राशि (१।२।४।५।७।८।९।१२ या राशे), कुंभराशि, अस्तंगत ग्रहाची राशि, वक्र झालेल्या ग्रहाची राशि, जन्मराशीच्या स्वामीच्या शत्रुराशीपासून षष्ठराशि, मेष, वृषभ, कर्क, धनु, मकर

या ५ पृष्ठोदयराशि, जन्मराशीच्या व जन्मलग्नाच्या स्वामींचा शत्रुग्रह, खलग्रह, जन्मकाळीं बलहीन असलेला ग्रह, आणि गमनकाळीं असलेले निर्बल ग्रह हे सर्व प्रयाणकाळीं सोडावे.

पूर्वेपासून १ रवि, २ शुक्र, ३ मंगळ, ४ राहू, ५ शनि, ६ चंद्र, ७ बुध व ८ गुरू हे क्रमानें आठ दिशांचे स्वामी आहेत. दिशेचा स्वामी केंद्रस्थानीं असतां प्रयाण करावें.

दिक्येन प्रवसे ललाटगइनः प्राच्यां तनौभालगः
स्यात्पश्चान्मदनेऽर्कजाऽवुगबुधः सौम्यांखगोऽपाकुजः ॥
एश्यां द्वित्रिगतोगुरुर्ज्वलन दिश्याय (११)व्यय(१२)स्थो भृगु
र्वायौषट(६)सुत(५)गो विधुर्निऋति दिश्यर्थांक संस्थतमः ॥

अर्थ:—गमन दिशेचा स्वामी ललाटगत असतां प्रवास करूं नये, **सूर्य** लग्नीं असतां **पूर्वेस** ललाटगत जाणावा, **शनि** सप्तमस्थानीं असतां **पश्चिमेस**, **बुध** चतुर्थ स्थानीं असतां **उत्तरेस**, **मंगळ** दशमस्थानीं असतां **दक्षिणेस**, गुरू द्वितीय व तृतीयस्थानीं असतां **ईशान्येस**, शुक्र एकादश व द्वादश-स्थानीं असतां **आग्नेयीस**, चंद्र पंचम व षष्ठ स्थानीं असतां **वायव्येस**; राहू अष्टम व नवम स्थानीं असतां **नैर्ऋत्येस** ललाटगत जाणावा.

वक्रीकेंद्र गतस्तदीय दिवसोलग्नेस्यवर्गो भवेत्
यातुर्नाशकरः शुभोपि तनुगो जन्मर्क्षलग्नेऽहितः ॥
द्विशाग्न्यम्बुजभाग्य भानिगुरुभं पौष्णांतके सार्पभं
जन्मर्क्षाणि रवेरुपक्रमगतः खेटस्तनौ हानिकृत् ॥

प्रयाण लग्नापासून केंद्रस्थानीं (१।४।७।१० यास्थानीं) वक्र झालेला ग्रह, त्याचा वार, व लग्नीं वक्र ग्रहाचा हे गमन कर्त्याचा

नाश करितात. जन्मराशीच्या व जन्मलग्नाच्या स्वामीचा शत्रु लग्नीं असतां तो शुभ असला तरी नाश करितो

रवि–विशाखा. बुध–श्रवण. शनि–रेवती.
चंद्र–कृत्तिका. गुरु–पूर्वाफल्गुनी. राहू–भरणी.
मंगळ–पूर्वाषाढा. शुक्र–पुष्य, केतू–आश्लेषा.

ज्या ग्रहाच्या जन्मनक्षत्रावर भूकंपादि उत्पात झाला असेल, तो ग्रह प्रयाण लग्नीं हानिकारक जाणावा ! ! !

वेशिःसौम्य युतस्तनौ जनुषिये सान्द्रेर्यु राशयो
जन्माब्जोपचयस्थिता अपितो स्वर्क्षोच्चमित्रर्क्षगाः ॥
पापाअप्यनि शोभना स्तनुगता जन्मेश्वरौ कद्रगौ
स्वारात्यन्हितनौ शुभौन फलदो मित्रान्हिपापोऽर्धदः ॥

ज्या राशीला रवि असेल तीपासून दुसऱ्या राशीला वेशि म्हणतात. शुभग्रहानें युक्त वेशि प्रयाण लग्नीं असतां शुभ होय. **प्रयाण कर्त्याच्या जन्मकालीं शुभग्रहांनीं युक्त ज्या राशी असतील त्या प्रयाणलग्नीं** फार शुभ जाणाव्या. जन्मकाळीं चंद्र ज्या राशीला असेल तीपासून ३।६(?)।१०।११ या उपचय स्थानीं व जन्मलग्नाचा स्वामी, हे केंद्रीं असतां फार शुभ होतो. आपल्या शत्रूच्या वारीं लग्नीं असणारा शुभ ग्रहही फल देत नाहीं (?) मित्राच्या वारीं लग्नीं पापग्रहही फल देणारा होतो (?)

प्रयाण लग्नाचे द्वादशस्थानांतील ग्रहांचा विचार.

व्ययार्थ न्यगताः खलःस्वइनजोऽब्जोऽत्याद्यषष्ठाष्टगो
भूयःसोऽपचितोऽस्त खाबुसुतगः शुक्रोऽस्तइज्योमृतौ ॥
नष्टज्यो व्ययगो ग्रहान्वित शशी यातुर्भहाविघ्नदा
अन्यस्थानगताजयार्थ सुखदास्त्यांजपुरोक्तं नचेत् ॥

प्रयाण लग्नापासून ३।११।६ या तीन स्थानांशिवाय इतर सर्व स्थानी खलग्रह, दशमस्थानीं शनि, १२।१।६।८ या स्थानीं चंद्र आणि ७।१०।४।९ या स्थानीं क्षीण चंद्र, सप्तमशुक्र, अष्टमगुरू द्वादशस्थानीं अस्तंगत बुध, व कोणत्याही ग्रहानें युक्त चंद्र हे ग्रह प्रयाणकर्त्याला महविघ्न उत्पन्न करितात. ही स्थानें सोडून अन्य स्थानीं हेच ग्रह पूर्वी सांगितलेले कांहीं अशुभ योग नसेल तर गमन कर्त्याला जय, द्रव्य व सुख देतात.

प्रथमभावः—

लग्नस्थं चाष्टमं त्याज्यं पापं द्वादश मेवच ।
ग्रहाणांच बलं वीक्ष्यगच्छे द्दिग्विजयं नृपः ॥

प्रयाणलग्नीं अष्टमस्थानीं आणि द्वादशस्थानीं पापग्रह वर्ज करून ग्रहाचे बलाबल पाहून राजानें दिग्विजय करण्याकरितां द्यावें.

लग्ने यदास्युर्गुरु सौम्यशुक्राः । सिध्यंतिकार्याणिच पंचमेन्हि ॥
राज्यास्पदं वा सुखदेशलाभं । मासस्यमध्ये गृहभावयुक्त ॥

प्रयाणलग्नीं गुरू अथवा बुध किंवा शुक्र असतील तर पांच दिवसांत किंवा एक महिन्यांत राज्यपद, सुख, किंवा देश लाभ होतो !

द्वितीयभावः—

जीवो बुधो वाभ्रगुनंदनोवा । स्थानेद्वितीये गमनस्यकाले ॥
सुवस्त्रलाभं चतुरंगलाभं । मासस्यमध्येच चतुर्दशेन्हि ॥

प्रयाणलग्नाचे द्वितीयस्थानीं गुरू, बुध अथवा शुक्र असेल तर वस्त्र आणि घोडा यांचा लाभ एक मासांत किंवा चौदावें दिवशीं प्राप्त होतील.

क्रूराश्चनस्था रविराहुभौमाः
सौरिश्चकेतु स्त्रिभिरेवमासैः ॥
वित्तस्यनाशं वपुषश्चमृत्युं
सत्यंहिवाक्यं मुनयोवदन्ति ॥

प्रयाणलग्नाचे द्वितीयस्थानी रवि, राहू, मंगळ व केतू या क्रूर ग्रहांतून कोणताही ग्रह असला तर तीन महिन्यांत मृत्युदायक (?) बंधनविनाशक होतो असे मुनींचे वचन आहे.

तृतीयभावः—

स्थाने तृतीये गुरुभार्गवौच
सोमस्यसूनुर्निशा तिश्च ॥
करोतियात्रां सफलं चकार्यं
पक्षद्वये नापि दिनत्रयेण ॥

प्रयाण कुंडलींत तिसऱ्यास्थानीं गुरु शुक्र चंद्र अथवा बुध असेल तर एक महिन्यांत अथवा तीन ३ दिवसांत कार्य सिद्धी होते.

चतुर्थभावः—

क्रूराश्चतुर्थे गमनेचदुर्गं शंचशेषाः शुभदंचकार्यम् ।
(?) तत्रापि दैवेनभवेच्चसिद्धि र्मासत्रयेणापि दशाहमध्ये ॥

प्रयाणकालचे कुंडलींत चवथ्या भावीं क्रूर ग्रह असतां कार्य नाश जाणावा. शुभ ग्रह असतां कार्य सिद्धीस जाईल, असें जाणावें.

पंचमभावः—

मृगुर्गुरुश्चन्द्रबुधौ यदास्युः
शुभेच लग्नेतु सुतेच युक्ताः ।
कुर्वंति कार्यंरयचासु सिद्धिं
मासद्वयेनापि वदंति सत्यम् ॥

प्रयाणकालचे कुंडलीतील पंचमस्थानांत गुरू, शुक्र, चंद्र, अथवा बुध या चार ग्रहांतून कोणी ग्रह असल्यास शुभ होय, २ महिन्यांत कार्यासिद्धी होते.

षष्ठभावः—

जिवश्च शुक्रश्च बुधश्च षष्ठे
करोतियात्रा सुफलं विलग्नात् ।
पक्षद्वयनापि वदंति सत्य
सौम्यर्क्षसंस्थः सबलश्चचंद्रः ॥

प्रयाणकाली गुरू, शुक्र अथवा बुध यांतील कोणी षष्ठस्थानीं असल्यास यात्रा सफल होते. आणि मृग नक्षत्रांतील चंद्र (मृगाचे दोन चरण वृषभेंत आहेत व दोन चरण मिथुनेंत आहेत.) तृतीयांत असतां, महिन्यानें कार्य सिद्धी जाणावी.

सप्तमभावः—

चेत् सप्तमस्था गुरु सोम सौम्यः
कुर्वंतियात्रा विजयो नृपाणां ।
सर्वे नृपास्तस्य भवंति वश्या
मास द्वये नापिच पंचभिर्दिनः ॥

प्रयाणलग्नीं सप्तमस्थानीं गुरु, चंद्र, बुध असतां विजय प्राप्त होतो. सर्व राजे २ महिन्यांत किंवा ५ दिवसांत वश होतात.

अष्टमभावः—

क्रूराश्चसर्वे यदि लग्न काले
मृत्युस्थिता मृत्यु करा वदंति ।
सौम्योगुरुर्वा मृगनंदनश्च-
दीर्घायुषं मृत्यु करश्चचंद्रः ॥

प्रयाण लग्नाचे अष्टमस्थानीं क्रूर ग्रह—शनि, रवि, भौम, राहु व केतु—असतां मृत्यु कारक जाणावे. व शुभ ग्रह असले तर

आयुष्याची वृद्धि करितात. प्रयाण लग्नाचे अष्टम स्थानीं चंद्र नसावा. कारण तो मृत्यु कारक जाणावा.

नवमभावः—

धर्मस्थिता यदि भवंतिहि पापखेटाः
प्रयाण कालेच तथैव चंद्रमाः ।
तदा जयो वे सबलेच चंद्रे
मासत्रयेणापि दिनैश्चतुर्भिः ॥

प्रयाण लग्नाचे नवम स्थानांत पापग्रह किंवा चंद्र असतां जर चंद्र बलवान् असेल, तर ३ महिन्यांत किंवा ४ दिवसांत कार्य सिद्धि होईल.

धर्मस्थितौवा यदि जीव शुक्रौ ।
साम्यस्य सूनुर्यदि लग्नकाले ।
लग्ने चरेवा यदिवा स्थिरेवा
कार्यश्च सिद्धिश्च भवेच्चलाभः ॥

प्रयाण लग्न चर किंवा स्थिर राशीचें असले व नवमांत गुरू, शुक्र किंवा बुध असेल. तर कार्यसिद्धि होऊन लाभ होईल.

दशमभावः—

कर्मस्थिताः पापखगस्तु सौम्याः
कुर्वंतिकार्यं शनि वर्जिताश्च ।
लग्ने चरेवा यदि वा स्थिरे वा
मासत्रयेणापिच एक मासः ॥

प्रयाण लग्न चर किंवा स्थिर असून, दशमांत शुभ किंवा शनि खेरीज कोणीही पापग्रह असेल, तर ३ महिन्यांत किंवा १ महिन्यांत कार्य सिद्धि होते.

एकादशभावः—

लाभ स्थितौ गुरु. बुधौ भृगुनंदनोवा.
क्रूराश्च सर्वे शशिनैव युक्ता ।

सद्यः फलाप्तिश्च भवेद्धियात्रा
पक्षैक मध्ये दिवसत्रयेच ॥

प्रयाण लग्नापासून एकादश स्थानीं शुभ ग्रह गुरु, बुध किंवा शुक्र असतां किंवा पाप ग्रह चंद्र युक्त असतां कार्य सिद्धि तात्काळतोब होते. किंवा पंधरवड्यांत किंवा तीन दिवसामध्यें होईल.

द्वादशभावः—

सर्वेशुभा द्वादश संस्थिताश्चेत्
यात्रा भवेत्तत्र विचित्रलाभैः ।
पापश्च सर्वे व्ययदा भवंति ।
यात्रा फल गर्ग मुखैः प्रणीतं ॥

द्वादशस्थानीं शुभ ग्रह असतां, यात्रा यथासांग होऊन तीव्र विचित्र लाभ होतात. पाप ग्रह त्या स्थानीं असतां, प्रयाण व्ययप्रद होतें, असें गर्गमुनि सांगतात.

प्रस्थान विचार.

सुमुहूर्तेस्वयं गमना संभवे प्रस्थान कार्य ॥
यज्ञोपवीतकं शस्त्रं मधुच स्यात्येत् फल ॥
विप्रादि क्रमतः सर्वैः स्वर्णं धान्यांबरादिक

सुमुहूर्तावर गमन होणें शक्य नसेल तर खालीलप्रमाणें वस्तु प्रस्थान ठेवावें. ब्राह्मणानें यज्ञोपवीत, क्षत्रियानें शस्त्र, वैश्यानें मधु आणि क्षुद्रानें फळ ठेवावें, किंवा सर्व वर्णांस सुवर्ण, धान्य, वस्त्र हीं उक्त होत.

राजा दशाहं पंचाहमन्योन्यः प्रस्थितो वसेत् ॥
अग प्रस्थान संपूर्ण, वस्तु प्रस्थन केर्धकं ॥

राजास प्रस्थान ठेवल्यापासून १० दि. व इतरांस ५ दि. तो मुहूर्त उपयोगीं पडतो. परंतु वस्तु प्रस्थानीं अर्धफळ जाणावें. अंग प्रस्थानीं संपूर्ण फळ जाणावें.

गेहाद्देहांतरं गर्गो सीम्नः सीमांतरं भृगुः ॥
बाणक्षेपं भरद्वाजो वसिष्ठो नगराद्बहिः ॥
प्रस्थाने पिकृते नेयान्महान्दोषान्वितेदिने ॥

गर्गाचे मतें दुसऱ्यावें घरीं, भृगुच्या मतें सीमेच्या अंतीं, भरद्वाजाच्या मतें नगरा बाहेर, वसिष्ठाच्या मतें बाण सोडल्यावर तो ज्या ठिकाणीं जाऊन पडतो, तितकें लांब प्रस्थान ठेवावें. या प्रमाणें शुभ वेळीं, शुभ दिनीं प्रस्थान ठेविलें, तरी गृहांतून महादोष युक्त दिवशीं प्रयाण करूं नये.

वर्जाविचार.

क्रोध क्षौर रति श्रमामिष गुड घृताधुद्गध्यासव
क्षाराभ्यंग भयः क्षितांबरव मिस्तैलं कटूद्वेदने ॥
क्षीरक्षौर रतीः क्रमात्त्रिशर, सप्ताह परतद्दिने
रोगस्त्यार्तवक सितान्य तिलकं प्रस्थानकेऽपोतीच्च ॥

क्रोध, क्षौर. मैथुन, श्रम, मांस, गूळ, घृत, अश्रु विमोचन (रडणें) दुग्ध, मद्य, क्षार, धान्य (उडीद वगैरे), अभ्यंग स्नान शत्रुभय, शुभ्रावांचून अन्य रंगाचें वस्त्र, वमन, तेल, तिखट हीं सर्व गमन कर्त्यानें सोडावीं. गमनापूर्वी ३ दि. दुग्ध, ५ दि. क्षौर व सात दिवस मैथुन वर्ज्य करावें. बाकींचीं क्रोधादि सर्व गमन दिवशीं सोडावीं. रोग झाला असतां तो बरा होईपर्यंत गमन करूं नये. स्त्रीला ऋतु प्राप्त झाला असतां, संभोग होईपर्यंत प्रयाण वर्जावें. पांढऱ्या वांचून अन्य रंगाचा तिलक गमन दिवशीं लवूं नये. गमनाला वर्ज केलेले सर्व प्रकार प्रस्थान ठेवावयाचें असतां त्यालाहि वर्ज करावे.

ह्याप्रमाणें वरील लेखांत प्रयाण कालासंबंधीं प्रचलित उपलब्ध असलेली सर्व माहिती वाचकांपुढें सविस्तर मांडली आहे, ह्यांतील

कित्येक गोष्टी एकमेकांला विरुद्ध कशा आहेत हें वाचकांस सहज आढळेल. वरील सर्व माहितीचा उपयोग करून दोष रहित प्रमाणास मुहूर्त मिळेल, किंवा नाहीं याची शंका येते.

पाश्चात् ग्रंथांत ह्याप्रमाणें मुहूर्तासंबंधीं निरर्थक जास्त चिकित्सा केलेली आढळत नाहीं फक्त जी गोष्ट ज्या काळीं करणें असेल त्या वेळची स्पष्ट भावचलित कुंडलीलाच जास्त प्राधान्य देण्यांत येतें. व तिचें निरीक्षण फार बारीक रीतीनें करितात. व तेंच करणें जास्त शास्त्रीय व सुलभ आहे. त्याचप्रमाणें जन्मकुंडली ही विशेष महत्वाची मानून तीस अनुकूल अशी शुभ वेळ शोधून काढणें हेंच शास्त्रीय दृष्टीनें योग्य दिसतें. उगीच संमुख शुक्र बाहन, योगीनी, काळशूळ, उपटशूळ, इ० इ० गोष्टीचा विचार करीत बसल्यानें कार्य साधेल असें वाटत नाहीं. त्याच प्रमाणें एकमेकांस विरुद्ध गोष्टी पहात बसून मुहूर्त मनासारखा चांगला काढतां येईल. असें वाटत नाहीं. रेल्वेनें किंवा बैल गाडीनें प्रवास करणें असून त्याकाळीं जन्मकुंडलीचे तृतीय स्थानांत शाईट योग होत असतां प्रवास सुखकर होईल असें वाटत नाहीं.

हस्त, मृग, अनुराधा, श्रवण, अश्विनी, पुष्य, रेवती, धनिष्ठा पुनर्वसु हीं नक्षत्रें प्रयाणास उक्त सांगितलीं आहेत. ह्मणजे द्वादश राशीपैकीं, कांहीं विशिष्ट राशींत दैनिक चंद्र असतां प्रयाण करावें, असें सांगितलेलें आहे. परंतु हें प्रत्येकास उपयोगीं पडेल असें वाटत नाहीं. कारण समजा एकाच्या हस्त नक्षत्रांत मंगळ किंवा शनि हे पापग्रह षष्ठेश किंवा अष्टमेश आहेत,

तर त्या नक्षत्री चंद्र असतां त्या मनुष्यानें प्रयाण करणें शहाणपणाचें होईल काय ?

वरील सर्व विवेचना वरून असें वाटतें कीं, प्रत्येकास कोणत्याही कामास पंचांगांत त्याच कामास सांगितलेल्या दिवसापैकींच सुमुहूर्तावर उपयोगीं पडतील, असें दिसत नाहीं. तर मुहूर्त हे प्रत्येक व्यक्तीचे जन्मकालिन् कुंडली वरून सूज्ञ ज्योतिषानेंच ठरविले पाहिजेत. वरील दृष्टीनें पाहिलें असतां आमची प्रचलीत मुहूर्त पाहण्याची पद्धत किती शुद्ध आहे. ह्याचा वाचक वर्गानें विचार करावा.

धूम केतु

अथवा

केतुचार

[लेखक यशवंत केशव प्रधान.]

दर्शन मस्तमयोवान गणित विधिनास्य शक्यतेज्ञातुं ।
दिव्यांतरिक्ष भौमास्त्रि विधाःस्युः केत्वतो यस्मात् ॥

अर्थः—या केतूंचे उदय किंवा अस्त हे गणितानें समजत नाहींत. कारण केतु दिव्य, अंतरिक्ष, भौम असे तीन प्रकारचे आहेत.

काळोख्या रात्रीं आकाशाचें निरीक्षण करीत असतां बरेंच लांब एक किंवा अधिक पुच्छें असलेला, एखादा विलक्षण दैदिप्यमान तारा पाहून किती आश्चर्य व चमत्कार वाटेल ! ! गुरु, शुक्र तारादी लहान लहान तेजोमय गोल व सूर्य, चंद्रासारखीं दिव्यतेजें तर आपण रोज पहातों. त्याच्या गति आपणास नियमित असलेल्या आढळतात. परंतु आगापिछा नसतां चंद्राच्या २९ किंवा ३० पट लांब किंवा कधीं कधीं अर्ध्या आकाशांत पसरलेले असे विलक्षण रूप धारण करणारे अशाच एका स्वस्थ जडदेहाचें आपणांस थोडक्या दिवसांत दर्शन होण्याचा सुयोग आला आहे. त्यांत विशेष महत्वाची गोष्ट झटली झणजे या स्वारीच्या पुच्छांतून पृथ्वी ता. १० मे १९१० च्या सुमारास जाणार आहे. अशावेळीं धूमकेतु काय आहेत व प्राचीन आर्य पूर्वजांचें ह्याविषयीं काय मत आहे, त्याचप्रमाणें प्रचलीत खगोल

वेत्यांचा त्या संबंधें काय बोलवा आहे, वगैरे माहितीपासून कुंडलीविज्ञानच्या वाचकांस धूमकेतूची अशातः कल्पना होईल अशी आशा आहे.

केतू किती आहेत, वगैरे प्राचीन आर्यलोकांचें काय मत आहे तें प्रथम दर्शनीचे श्लोकांत सांगितलें आहे. खगोल वस्त्यांचे गणितरुपी शृंखलेस, सूर्य, चंद्र व इतर तारका गण जणुंकाय जखड बांधले आहेत. ते वर्तावितील त्याचप्रमाणें—ग्रहणें, उदयास्त वगैरे सर्व चमत्कार नेमलेल्या वेळीं नियमानें होतात. पण या स्वारीपुढें तर लोंना हातच टेंकण्याचा प्रसंग येतो. !! तेज रात्रीं दिसूं लागलें किंवा सूर्य प्रकाशला असतांही त्याच्या प्रखरतर तेजाशीं स्पर्धा करून दिवसास दिसूं लागलें तर मानवि प्राणी किती चकित किंवहुना भयभीत होतील !! व त्यांस हें काय नवीन संकट आलें असें वाटणार नाहीं काय? व या पूर्वी न पाहिलेल्या स्वारीचें आगमन कोठून व कशाकरितां झालें आहे. वगैरे जाणण्याची नैसर्गिक इच्छा मानवी प्राण्यास होणें साहजीक आहे. असाच एक चुटपुटा प्रसंग नुकताच ता. २४।२५ जानेवारी सन १९१० रवा सुमारास आला होता. त्या वेळेस लोकांचे थवेच्याथवे या स्वारीचे निरीक्षण संध्याकाळच्या रमणीय प्रहरीं करण्यांत गुंतलेले मैदानांत, समुद्रकिनारीं आढळत होते. या स्वारीचें नांव, आकार वगैरे बद्दल चर्चा चालू होते न होते तोंच या स्वारीनें कोठें दडी मारिली आहे. त्याची आज कल्पना करितां येत नाहीं. कित्येकांच्या मतें तो हॅलेचा धूमकेतु आहे तर कित्येकांच्या मतें कोणी-एक नवीनच पाहुणा सूर्य मालेंत आला होता. परंतु हा हॅलेचा धूमकेतु नाहीं, अशी आतां पूर्ण खात्री झाली आहे. वगैरे वगैरे अद्याप शास्त्रीय गप्पा अजून चालू आहेत.

पत्रव्यवहार

(१)

वि. वि.—खालीं दिलेल्या कुंडलीवरून मुलाच्या स्थितीचें वर्णन फारसें जुळत नाहीं. तरी आपण अगर वाचक यांपैकीं कोणी तरी विलक्षण योग काय आहेत हें कळविल्यास बरें.

सायन भावचलित.



हें मूल मेलेलेंच जन्मलें. यास डोळे, नाक, कान, तोंड व कपाळ असे भाग नव्हते! फक्त मागील डोकें केंसासहित होतें. बाकीचे सर्व अवयव सशक्त व चांगले होते. जन्मल्याबरोबर मुलाच्या गळ्यापासून वरचा सर्व भाग जमिनीवर ठेवल्याबरोबर लांबचे लांबच पसरून गेला होता! या स्थितीचा सायन अगर

निरयन कुंडलीवरून व्हावा तसा बोध होत नाहीं. तरी या विलक्षण योगाचा खुलासा अवश्य व्हावा. गर्भवास पूर्ण ९ महिने होता. कळावें हे विनंति.

आपला
विनायक श्रीनिवास निंबकीकर

* * * परमेश्वरी गूढ आपण ज्योतिःशास्त्रानें जाणूं म्हणणें वेडेपण होय. ज्योतिःशास्त्राची शक्ति बेताची आहे व तिचा बेताचाच उपयोग केल्यास समाधान होईल. अगदीं सूक्ष्म ज्ञान सुद्धां या शास्त्रानें झालें पाहिजे अशी तळमळ लावून घेण्यांत अर्थ नाहीं.

कारणेंच शोधूं लागलें तर कांहीं तरी आढळतीलच. पण त्यांनीं ज्योतिष्याच्या मनानें समाधान होईल असें वाटत नाहीं विलक्षणपणा उत्पन्न करणारा ग्रह हर्शल आहे. हा ग्रह मकर राशींत २५ अंश आहे. सप्तम केंद्राचा आरंभ २८ अंश आहे. व त्याच्या अस्तकालींच या मुलाचा अस्तोदय झालेला आहे ! शिवाय ह्या ग्रहावर मंगळ अगदीं पूर्ण दृष्टीनें पाहत आहे. या दृष्टियोगाचाच हा परिणाम असावा असें वाटतें.

लग्नकेंद्राप्रमाणेंच इतर केंद्राचा परिणाम आहे. व केंद्राबरोबर उदय पावलेला ग्रह मनुष्याच्या शरीरावर अगदीं स्पष्ट असा परिणाम करूं शकतो. येथें दशम केंद्रीं शनि व अस्तकेंद्रीं हर्शल आहेत, हर्शलवर मंगळ व शनि असे दृष्टियोग होतात. म्हणून हा चमत्कार घडला असावा !

चंद्र वृश्चिक राशीच्या १३ व्या अंशांत आहे. हा अंश गूढ, अज्ञेय व रोगट असा आहे. याचप्रमाणें कर्क लग्नाचा २९ वा अंशही याच प्रकारचा आहे. यावरून हें मेलेलें उपजलें असें दिसतें. असुकच कारणानें हा विलक्षण योग घडला असें दाखविण्यास शास्त्राधार नाहीं. तथापि कुंडलींतल्या वरील अनिष्ट योगांवरून कल्पना करण्यास हरकत नाहीं

—संपादक कुंडलीविज्ञान—

धूमकेतूचें दृश्य स्वरूप:—धूमकेतूचें नुसत्या डोळ्यानें दिसणारे व दुर्बिण केतु असे दोन भेद त्यांच्या प्रकाशाच्या तेजावरून व आकारावरून कल्पिले आहेत. नुसत्या डोळ्यांनीं थोडेच धूमकेतु दिसतात. दुर्बिणींतून केतु पुष्कळ आढळतात. त्यांसच आपण दुर्बिणकेतु म्हण. धूमकेतूचें रुप, रंग आकार व तेज हे एकमेकांपासून इतके भिन्न असतात कीं एका सारखा दुसरा धूमकेतु सांपडणें फारच कठीण मानितात. ते असे:—सामान्य तारे प्रमाणें लहान किंवा मोठी तारा असून तिच्या भोंवतीं धुरा सारखी लहानशी शेंडी असते. त्यालाच शिखा म्हणतात. व पताके सारखे एक अगडबंब शेंपूट असते त्यास केतू किंवा पुच्छ म्हणतात. तारा आणि शिखा मिळून धूमकेतुचा अग्रभाग होतो. हे भाग परस्परापासून स्पष्ट दिसत नाहींत, त्यांत शिखा कोठें संपली व केतूचा आरंभ कोठें झाला हें तर पुष्कळ प्रसंगी समजत देखील नाहीं.

दुर्बिण केतूचे स्वरूप याहून निराळेंच आढळतें कित्येकांस तारा नसते तर कित्येकांस पुच्छच नसतें. कित्येकांचीं पुच्छ आणि शिखा हीं वेगळीं ओळखितां देखील येत नाहींत. दुर्बिण केतु फार लांबून प्रथम दिसूं लागतात तेव्हां बहुधा त्यांची शिखा दिसते व तारा दिसला तर मागाहून दिसतो. जेव्हां एखादा धूमकेतु दुर्बिणींतून प्रथम दिसूं लागतो त्यावेळीं तो एखाद्या लहानशा चकचकित ढगाप्रमाणें दिसूं लागतो. नंतर त्यात शेंपूट असलेली दिसूं लागते, कांहीं रात्री नंतर तें शेंपूट बरेंच मोठें वाढतें त्याचें डोकें ही स्पष्ट दिसूं लागतें, व त्यामध्यें एक अति चकाकणारा तारा दिसूं लागतो व हळुहळु तो सूर्याचे जवळ जात

आहेसा दिसतो व जेव्हां तो सूर्याचे अति संनिध जातो त्यावेळेस तो सूर्याचे तेजांत लुप्त होऊन दिसेनासा होतो. परंतु एखादी विक्षिप्त स्त्री सूर्यास न जुमानतां आपलें भय व विशाळ रुद्र-रूप जनसमाजास दाखवून बरीच तारांबळ उडवितें, पण असें धूमकेतु फारच थोडे आढळतात. ह्याप्रमाणें केतूचा अस्त झाल्यानंतर तो सूर्याचे उलट अंगास दृश्य होतो. परंतु त्यावेळीं त्याचें आकारांत विलक्षण घडामोड झालेली आढळण्यांत येते व कित्येकांचे मार्ग बदलून तें पूर्वी ज्या गोलार्धांत दिसत असतात त्याच्या उलट गोलार्धांत दृश्य होतात.

आकाशांतील वाटेल त्या भागांत धूमकेतूंचा उदय होऊं शकतो. व आकाशाचे अमुक एक भागांत केतु दिसणार नाहीं असे खात्रीनें कोणीही सांगूं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें धूमकेतु अमक्याच तारखेस दिसावा अगर रात्रीं नियमित वेळीं उदय पावेल असें आज खात्रीनें कोणासच सांगतां येईलसें दिसत नाहीं. धूमकेतूंचा आकार व देखावा विशेष अमर्याद व भीतिजनक आढळतो. उत्तम दूर्बिणींतून देखील धूमकेतु लहान ठिपक्याप्रमाणें दिसतो, तर कधीं कधीं तो इतका तेजस्वी व प्रचंड आढळतो कीं त्याचे पुच्छ क्षितिजापासून तों स्वस्वस्तिकापर्यंत पसरलेलें आढळतें. धूमकेतूचे सूर्याभोवतीं फिरण्याचे कालावरून **नियत कालीक धूमकेतु** व **अनियत कालीक धूमकेतु** असे दोन भाग कल्पिले आहेत.

धूमकेतूचे पुच्छ अथवा शेंपटी:—धूमकेतूचें पुच्छ अति आश्चर्यकारक व पताकेसारखें लांब कोट्यावधी मैल पसरणारे असतें तर कित्येकांचें आंखुडच असतें कित्येकांचें सरळ असतें

तर कित्येकांचें वाकडेच असतें तर कित्येकांचें एखाद्या अर्धवट उघडलेल्या पंख्यासारखेंच असतें. कित्येक धूमकेतूंस तर एकापेक्षां अनेक देखील पुच्छें असतात व पुच्छाची दिशा देखील ठराविक आढळणार नाहीं एखाद्याचें क्षितिजाकडे वळलेलें असेल तर दुसऱ्याचें त्याचे उलट देखील असूं शकतें. एखाद्याचें उजव्या हातास वळलेलें असेल तर दुसऱ्या एखाद्याचें डाव्याच बाजूकडे वळलेलें आढळतें. कित्येक धुमकेतूंच्या शेपट्या इतक्या लांब व प्रचंड असतात कीं, त्यांस सूर्यापासून निघून पृथ्वीचे वातावरणांत सहल करणें लगजे कांहींच वाटत नाहीं.

धूमकेतूचें पुच्छ नेहमीं तारेच्या ज्या बाजूस सूर्य असतो, तिच्याउलट बाजूप असलेलें आढळतें. व शेवटाकडे रुंद होत गेलेलें दिसतें. कित्येक धूमकेतूंस जीं अनेक पुच्छें असलेलीं दिसतात, तीं वस्तुतः त्या एकाच पुच्छाच्या निरनिराळ्या शाखा असतात. कधीं कधीं तीं मुख्य पुच्छास फांद्या फुटलेल्यीं दिसतात. सोंड्या केतूचें पुच्छ हें त्यांस जखडलेलें स्थिर अवयव नाहीं. हें निःसंशय आहे. ज्याप्रमाणें पाणी कढत असतां वाफेचा लोट चालेला असतो, त्याचप्रमाणें धुमकेतूचें पुच्छ हें त्याचा मुख्य भाग जी तारा तींतून सूर्याच्या उष्णतेनें निघणाऱ्या वाफेचा लोट होय. पुच्छ नेहमीं सूर्याच्या उलट कां दिसतें, ह्याबद्दल निरनिराळ्या विद्वानांचीं निरनिराळीं मतें आहेत. केतूची तारा अशमीची किंवा मूर्त द्रव्याची बनलेली असते. व अशनीचे प्रकृत्यंश विरल असून, त्याच्यांत वायु आहे. तो सूर्याच्या प्रखर उष्णतेमुळें बाहेर निघतो. व सूर्याच्या उलट बाजूस त्यांच्या प्रकृत्यंशाचें किंचित् घनीभवन होऊन अति विरल असें पुच्छ बनतें

साधारणतः प्रत्येक धूमकेतूची शेंडी त्याच्या शिरोभागांतून बाहेर पडल्यावर, सूर्याकडे पहिल्यानें धांव घेते. व सूर्यानें तीस जोरानें बाहेर सारल्यावर उलट दिशेस शंकूच्या आकारानें पसरते. या शंकूचा आरंभ धूमकेतूच्या शिरोभागा सन्निध होतो. मग पुढें ल्या शंकूची रुंदी वाढत जाते. व पायाजवळील भागाची रुंदी अति विस्तृत आढळते, व शंकूच्या आरंभ स्थानाचा अंतर्भाग नेहमीं इतर भागांहून पोकळ व अप्रकाशित दिसतो.

आपण नेहमीं पाहतों कीं, एखादे कारंजांतील पाणी जोरानें वर उडत असतें. पण पृथ्वीच्या आकर्षण शक्तीनें तेच पाण्याचे फवार भूमीकडे खेंचले जातात. त्याचप्रमाणें धुमकेतूच्या केंद्रांतून कांहीं द्रव्य सूर्याच्या प्रखर उष्णतेमुळें नैसर्गिक असलेल्या उत्सारक प्रेरणेनें अति जोरानें फोंपावत सूर्याकडे धांव घेत बाहेर पडलेले दिसतात, परंतु तितक्याच जोरानें सूर्य तें द्रव्य मागें परतीत असतो. असें धुमकेतूचें बारीक निरीक्षण करितां आढण्यात येतें. ह्याप्रमाणें धुमकेतूच्या केंद्रातून कांहीं तरी धूम्रमय पदार्थ निघत असून पहिल्यानें सूर्याकडे खूप जोरानें धांव घेण्याचा प्रयत्न करितो. पण सूर्य त्यास तितक्याच जोरानें, उलट दिशेकडे खेंचतो. ह्याप्रमाणें धूमकेतूच्या ज्या अंगास सूर्य असतो त्याचे उलट बाजूस धूमकेतु अक्राळ विक्राळ पसरलेली शेंपटी आढळते.

धुमकेतूची शेपटी फार लंब असते. व त्यांतील द्रव्य अति विरल अशा पदार्थाचें बनलेलें आढळतें. इ० स० १८११ च्या सुमारास जो केतु दिसला त्याचे पुच्छ ११ कोटी मैल होते!! जरी धुमकेतूची शेंपटी अफाट व अमर्याद आढळते. तरी इतकी

हलकी असते कीं, ग्रहा जवळून गेली असतां त्याच्या कक्षेंत बदल होण्याच्या ऐवजीं ह्यांतच आपला आकार व कक्षा बदलावी लागते. धूमकेतूच्या पुच्छाची जाडी कधीं कधीं ९००० मैल असते. तरी त्यांतून पलीकडचीं नक्षत्रें दिसतात. एका धूमकेतूच्या शेपटाची जाडी ९००० मैल होती. पण त्याच्या पलीकडील स्वाती नक्षत्र सहज दिसत होतें. ह्मणजे त्या शेंपटाच्या ९००० मैल जागा व्यापणाऱ्या पदार्थातूनही स्वाती नक्षत्रांचे किरण पृथ्वीवर येणें शक्य झालें, यावरून धुमकेतूची शेंपटी ही किती विरल व पातळ पदार्थाची बनलेली असते, ह्याची नुसती कल्पनाच करावी लागते. सूर्यास्ताच्या वेळीं पश्चिम दिशेकडे असलेला एखादा पातळसा ढग तुह्मीं पाहिला तर त्याजवर सूर्याचे सर्व रंग प्रतिबिंबित झाल्या कारणानें त्या ढगापलीकडील एखादा तारा दिसत नाहीं. व हा ढग तर सूर्यापासून फार दूर असतो. मग कल्पना करा, एखादा ९००० मैल जाडीचा ढग सूर्याच्या शक्य तेवढा जवळ नेला तर कितीतरी तेजस्वी झाला पाहिजे, व त्या मागील नक्षत्रें व तारका गण ताबडतोब लोपून गेलीं पाहिजेत. पण धूमकेतूच्या शेंपटींतून पलीकडील पदार्थ ज्याअर्थी स्पष्ट दिसतात. त्याअर्थी ती कल्पनातीत अशा विरल पदार्थाची बनली असली पाहिजे. पदार्थांत घनता हा असलेला धर्म, धूमकेतूंत मुळींच नाहीं. उलट धूमकेतूंचा वैरल्य हाच एक मोठा महत्त्याचा धर्म आहे असें मानावें लागतें.

आमच्या प्राचीन पूर्वजांस धुमकेतूस अनेक पुच्छें असतात अशा बद्दल माहिती होती असें वाटतें.

ब्रह्मसुत एक एव त्रिशिखो वर्णैं स्त्रिभिर्युगांतकरः ।
अनियतादिक् संप्रभवो विज्ञेयो ब्रह्मदंडाख्यः ॥

तीन शिखांचा–पुच्छें असलेला व तीन वर्णांचा ब्रह्मपुत्र ब्रह्मदण्ड नामक सर्व दिशेस दिसणारा असा केतु एकच आहे. तो युगांत प्रलय करणारा होय.

दुसरे एक ठिकाणीं म्हटलें आहे.

क्षतजा नलानुरूपा स्त्रिचूलतारा: कुजात्मजाः षष्टिः ।
नाम्नाच कौंकुमास्ते सौम्यां शास स्थिता पापाः ॥

रक्त व अग्नि यांसारखे तीन शिखांचे–पुच्छे असलेले कौंकुम संज्ञक भौमपुत्र, साठ केतु उत्तरेस दिसतात. ते अशुभ होत.

त्याचप्रमाणें तारारहित शेंपड्या चवरीसारख्या किंवा पंख्या सारख्या पसरलेल्या केतूची त्यांस माहिती होती.

श्यामारुणाविस्ताराश्चामरख्यरूपा विकीर्णदीधितयः ।
अरुणाख्या वायो सप्तसप्ततिः पापदाः पुरुषाः ॥

श्याम, लोहितवर्ण, तारांरहित, चवरी सारख्या पसरलेल्या किरणांचे अरुण संज्ञक वायु पुत्र रुक्ष असे ७७ आहेत. ते अशुभ होत.

त्याचप्रमाणें शिखा रहित असलेले केतूंचेंहि ठिकठिकाणीं वर्णन केलेलें आढळतें.

षण्णवतिः कालसुताः कबंधसंज्ञाः कबंधसस्थानाः ।
चंडाभयप्रदाः स्युर्विरूपताराश्चते शिखिनः ॥

छिन्न मस्तक यांसारखें, कंबंधसंज्ञक, भयंकर, अस्पष्ट तारेचे शाण्डव काल पुत्र केतु आहेत. ते भय देणारे होत.

शुक्र विपुलैक तारा नवविदिशां केतवः समुत्पन्नाः ।
एवं केतु सहस्रं विशेषमेषामितो वक्ष्ये ॥

श्वेतवर्ण व मोठा एकच तारा आहे ज्यांचा असे अंतराळ दिशेचे पुत्र व अग्नेयादि विदिशेमध्यें दिसणारे नऊ केतु आहेत. ते गोचर झाले तर भय देणारे होत.

केतूचा भ्रमण मार्ग व भ्रमण कालः—धुमकेतु स्वैर मार्गी असल्यामुळें त्यांचा मार्ग मुळींच ठरलेला नाहीं. ते आकाशांत लागेल तेथें दिसतात. व ते दिसूं लागल्यापासून लागोपाठ दोन चार दिवस चांगलें निरीक्षण केल्याखेरीज त्यांचा मार्ग ठरवितां येणें शक्य नाहीं. इ. स. १६८० मध्यें न्यूटन यानें धूमकेतूंसहि आकर्षणाचे नियम लागूं आहेत असें सिद्ध केलें. व तेव्हांपासून धुमकेतूंच्या गतीचा चांगला विचार झाला. धुमकेतु सूर्य मालेंतील इतर ग्रहांप्रमाणें सूर्याभोंवती प्रदक्षिणा करितात. परंतु ग्रहांचा भ्रमणमार्ग आणि केतूंचा भ्रमणमार्ग यांत फार महत् भेद आहे. केतूंची कक्षा दीर्घ वर्तुळाकार नसून अतिदीर्घ वर्तुळाकार असते. म्हणूनच धुमकेतु जेव्हां नीची असतो, तेव्हांचे त्याचे सूर्यापासूनचे अंतर यांत अति मोठा फरक आढळतो. धूमकेतूंच्या कक्षा तीन प्रकारच्या आढळतात. कांहींच्या दीर्घ वर्तुळाकार आहेत. परंतु जशा ह्या ग्रहांच्या कक्षा वर्तुळप्राय असतात. म्हणजे त्यांची केंद्रच्युति थोडी असते, तशा केतूंच्या कक्षा नसतात. त्या अति दीर्घ वर्तुळ असतात. म्हणजे त्यांची केंद्रच्युति फार असते, अशा प्रकारची कक्षा ही आवृत्त होय. म्हणजे ती अति दीर्घ वर्तुळ असली तरी तिच्या दोन्ही शाखा दोन्हीं टोंकाकडे मिळालेल्या असतात. कक्षेच्या क्षेत्राभोंवतीं

त्या शाखांचें आवरण झालेलें असतें. कांहीं धुमकेतूच्या कक्षा अन्वस्थ (प्याराबोला) किंवा अपास्त (हायपर बोला) अशा जातीच्या अनावृ असतात. व दुसऱ्या अंगास मात्र झांकत जातात. त्यामुळें त्याचें मधल्या कक्षेच्या भोंवतीं आवरण होत नाहीं. अन्वस्तच्या शाखा ज्या अंगीं मिळतात त्या अंगीं तें आणि अतिदीर्घवर्तुळ यांत फारसा भेद दिसत नाहीं. अपस्ताच्या शाखा फारच झकतात. एखाद्या कारंजांतून पाणी फार जोरानें वर उडत खालीं पृथ्वीकडे ज्या आकृतीनें येतें. त्या आकृतीस अन्वस्त झणतात. अन्वस्त ही एक दीर्घ वर्तुळाप्रमाणेंच भूमीतील आकृति आहे. व गति शास्त्राचे दीर्घ वर्तुळाकृति गतीस लागणारे सर्व नियम अन्वस्ताकार गतीस लागतात. परंतु अन्वस्ताकारानें आपल्या सूर्यास वळसा घालून गेलें पाहिजे. ते अंतरिक्षांत किती लांब जातात, याची कल्पनाच करावी लागते अन्वस्ताचा दुसरा केंद्र कल्पनातीत कोटी मैल अंतरावर असतो. आकाशस्थ जड देह नियमित वेळांत नियमित क्षेत्र आक्रमितात. हा जो दीर्घ वर्तुळाकार नियम आहे, तो अर्थातच अन्वस्त गतीस अथवा अपास्त गतीस लागू पडतो.

ज्या धूमकेतूच्या कक्षा अति दीर्घ वर्तुळ असतात, ते नेहमीं सूर्याभोंवतीं फिरतात. एकदां सूर्याच्या फार जवळ येतात, व तेथून परतल्यावर फार लांब जातात. परंतु कालांतरानें ते पुन्हां सूर्याजवळ येतात. धूमकेतु सूर्याच्या आकर्षणांत सांपडतात, त्यांच्या कक्षा अन्वस्त होतात, व ते सूर्याजवळून गेल्यावर पुन्हां परत येत नाहींत. यद्यपि अशा धूमकेतूचहि गतीस थोडासा उपाधि झाला तरी त्याच्या कक्षा अति दीर्घ होण्याचा संभव

असतो, आणि एखाद्या वेळीं सूर्याच्या तडाख्यांत सांपडून त्याकडे आलेले आपस्त कक्षांचे केतु एकदां सूर्य दर्शन घेऊन गेल्या. वर पुन्हा त्यांचे तडाख्यांत सांपडण्याचा फारच संभव कमी असतो.

धुमकेतूच्या वेगावरून त्याची गति कशी, कोणत्या प्रकारची आहे, हें ठरवितां येतें, एखादा पदार्थ पृथ्वीच्या पृष्ठभागापासून दर सेकंदास ७ मैल या वेगानें सुटला, व त्यास वातावरणाचा वगैरे प्रतिबंध झाला नाहीं, तर तो सूर्याच्या आकर्षणांत सांपडून त्याचे भोंवतीं फिरूं लागेल. व तसा एखादा पदार्थ सेकंदास २६ मैल वेगानें सुटला व त्यावर सूर्याखेरीज कोणाचेंच आकर्षण नसेल तर त्याची कक्षा अन्वस्त होईल, व त्याहून कमी वेग असला तर अति दीर्घवर्तुळ होईल. व जास्त असेल तर अपास्त होईल.

वर सांगितलेंच आहे कीं, धुमकेतु अगदीं स्वैरगामी आहेत. त्यांच्या कक्षा क्रांतिवृतास वाटेल तेथें छेदितात, व क्रांतिवृताशीं वाटेल तेवढा कोन करितात. त्यांच्या कक्षा अति दीर्घवर्तुळाकार अन्वस्त व अपास्त वगैरे वाटेल त्या आकाराच्या असतात. ते आकाशांत वाटेल तेथें दिसतात, तसेंच त्यांचा जाण्याचा मार्ग इतर ग्रहांप्रमाणें पश्चिमेकडून पूर्वेकडे असाच आहे, असें नाहीं तर कित्येक पूर्वेकडून पश्चिमेकडे जातात, म्हणजे कांहीं वक्रमार्गानें भ्रमण करणारे आहेत.

अति दीर्घवर्तुळ कक्षांच्या धुमकेतूंचा वेग जास्त जास्त २६ मैलांच्या जवळ जवळ असतो, तसा तसा त्यांचा प्रदक्षिणाकाल अधिक असतो. आजपर्यंत नियमित कालांत सूर्याभोंवतीं अति

दीर्घ वर्तुळ कक्षेनें, फिरणारे बरेच सांपडले आहेत. एकाहून अधिक वेळ दृष्टीस पडलेले असे ११ धूमकेतू आहेत. आठांचा काल ९ पासून ७ वर्षापर्यंतचा आहे. एकाचा १३॥- वर्षांचा आहे. ह्यॉलेच्या धूमकेतूचा प्रदक्षिणा काल ७६ वर्षे आहे. यां-खेरीज ज्यांचा प्रदक्षिणाकाल अजूनपर्यंत कळला नाहीं, असे धुम-केतु पुष्कळ आहेत. इ. स. १९०१ पर्यंत सरासरी ४०० केतूंच्या कक्षांचें गणीत झालें आहे, त्यांत ३०० केतूंचा मार्ग अन्यस्त आहे, ९० केतूंच्या कक्षा अति दीर्घ वर्तुळाकार आहेत. व सहा सात केतूंच्या कक्षा साधारण अपास्त आहेत. ज्यांचे गमन मार्ग अन्वस्त अथवा अपास्त आहेत, असे धुमकेतु म्हणजे आपल्या सूर्यमालेस भेटावयास आलेले पाहुणे आहेत. धुमकेतूची कक्षा कोणत्याही प्रकारची असली, तरी तिचा एक भाग सूर्या-पासून फार लांब असतो. व धुमकेतूचें द्रव्य फार विरल अस-ल्याकारणानें कोणताही धूमकेतु कक्षेच्या सर्व भागीं दिसत नाहीं. ते जेव्हां सूर्याजवळ म्हणजे आपल्या कक्षेंत, नीचीं येतात तेव्हां दिसतात. बहुतेकांच्या कक्षेंतील नीचीचे बिंदु पृथ्वीच्या कक्षेच्या आंतच आहेत. कांहींचे शुक्राच्या कक्षेच्या आहेत. व कांहींचे तर बुधाच्या कक्षेच्या आंत आहेत. ज्या धूमकेतूच्या कक्षांचे नीचीचे बिंदु पृथ्वीच्या बाहेर आहेत. ते पृथ्वीवरील लोकांस फार करून क्वचितच दिसतात.

धूमकेतूंचें नामाभिधान व संख्या:—सांप्रत यूरोपांत जो ज्योतिषी प्रथम एखाद्या मोठ्या धूमकेतूचा शोध लाविती किंवा त्याचा वेध घेतो, त्याचें नांव त्यास देतात. उदाहरणार्थ सन १८५८ मधील क धूमकेतु. याच नांवें प्राचीन आर्य लोकांत

चाल असली पाहिजे. असें प्राचीन ज्योतिष शास्त्रावरील ग्रंथ वाचले असतां सहज लक्षांत येईल. सांप्रत यूरोपियन ग्रंथांत ज्या प्रकारचीं केतूचीं वर्णनें आढळतात, तितके सगळे किंवहुना जास्तच प्रकार आपले ग्रंथांत वर्णन केले आहेत. यांत उद्दलक, कश्यप, हीं नांवें केतूंस दिलीं आहेत. तीं त्या त्या ऋषींनीं ते ते केतू प्रथम पाहिले किंवा त्यांचे उदय काळ ठरविले असले पाहिजे. पुढें फळादेशाच्या भागांत, या केतूंचीं वर्णनें आलीं आहेत, तीं पहावीं. हे धूमकेतु असुक काळीं दिसले असें वर्णन असतें तर त्याचा फारच विशेष उपयोग झाला असता. यद्यपि तसें नाहीं म्हणून हीं सर्व वर्णनें खोटीं किंवा कल्पित आहेत असें कोणी म्हणेल तर तसें नाहीं. असें पूर्वापार संदर्भा-वरून दिसतें.

गेल्या ३ हजार वर्षांत ८०० धूमकेतु दिसल्याचे लेख पाश्चात्य ग्रंथांत आहेत. व हे सर्व नुसत्या डोळ्यांनीं पाहिलेले होय. हल्लीं दुर्बिणीची युक्ति निघाल्यापासून ६।७ धूमकेतु दरवर्षी आढळतात. परंतु ते सर्व दुर्बिणकेतु असल्या कारणानें नुसत्या डोळ्यानें दिसणें शक्य नाहीं. डोळ्यांनीं दिसणारे धूमकेतु क्वचि-तच दिसतात. आमच्या प्राचीन ग्रंथांत १००० धूमकेतू आहेत असें वर्णन आहे.

शतमेकाधिक मेके सहस्रमपरे वदंति केतूनां ।
बहुरुप मेकमेव प्राहं मुनिर्नारदः केतुं ॥

पराशरादि कोणी ऋषि, एकशेंएक केतु आहेत असें म्हण-तात. अन्य ऋषि हजार केतु आहेत असें म्हणतात. नारद केतु

एकच आहे, परंतु त्याचीं बहुतरूपें आहेत असें म्हणतो.

आमच्या ऋषींनीं सांगितलेले १००० केतु इ. स. पूर्वीचे खात्रीनें आहेत. इसवी सनाचे आरंभापासून आजपर्यंत नुसत्या डोळ्यांनीं ९०० धूमकेतु असल्याचे लेख आहेत. याचमानानें आमच्या ग्रंथांतले केतू विषयीचे लेख निदान इ. स. पूर्वीचे ३८०० वर्षापासून असावेत.

धूमकेतुचा व सूर्यमालेचा संबंध:—धूमकेतु हे इतर ग्रहासारखे मूळचे आपल्या सूर्यमालेंतील आहेत किंवा सूर्यमालेच्या भोंवतीं जो अनंत निर्वात व अफाट तारका प्रदेश आहे, त्यांतून आलेले आहेत, व त्यांची उत्पत्ति कशी झाली आहे या बद्दलचे ठाम सिद्धांत ठरले नाहींत. सांप्रत कांहीं खगोल वेत्त्यांचें खालीलप्रमाणें मत आहे.—विश्वाच्या अफाट प्रदेशांत अग्निमेघ पसरलेले असून त्यांस गति आहे आपल्या सूर्य मालेसह अकांत कोणीकडे तरी वेगानें चालला आहे. यामुळें त्या अग्निमेघ द्रव्याचे अंश अनादि कालापासून एक एक आपल्या सूर्याच्या आकर्षणानें त्याचेकडे येत आहेत. ते हे धूमकेतु होत. दुसरें एक असें मत आहे कीं, अशनींच्या द्रव्याचे धूमकेतु बनले आहेत. किंवा ते अशनी संघातमकच आहेत. व हे अशनी संघ आकाशात इतस्ततः पसरलेले आहेत. आपल्या सूर्य मालेंत हर्शल, नेपच्युन, शनि, गुरु यांसारखीं प्रचंड धेंडें नसतीं तर सूर्याच्या आकर्षणांत सांपडलेले धूमकेतु अन्वस्त करोनें त्या भोंवतीं फिरून परत गेले असते. व पुन्हां आले नसते. कदाचित् एकदा येऊन गेल्यावर कोट्यवधि वर्षांनीं पुन्हां आले असते. सूर्य मालेंत शिरतांना किंवा तींतून परत जाताना त्यांची दिशा जशी

असेल त्या मानानें त्यांच्या गतीस ग्रहांचे कडून उपाधि होते, व त्यांची गती कमिजास्त होतात. या धूमकेतूचा वेग दर सेकंदास २६ मैलांहून कमी किंवा जास्ती असतो, त्या मानानें त्यांची कक्षा असते. हें मागेंच सांगितलें आहे. जर एखाद्या ग्रहाच्या व त्यांतून गुरु सारख्या प्रचंड गोलाच्या जवळून जातील तर त्यांचा वेग फार कमी होऊन ते लघु कालिक म्हणजे थोड्क्या कालांत प्रदक्षणा करणारे बनतात. सांप्रत सूर्य मालेंतले जे नियत कालिक धूमकेतु उपलब्ध आहेत, ते सर्व वर सांगितल्याप्रमाणेंच इतर ग्रहांच्या आकर्षणानेंच सूर्यमालेचे घटकावयव बनलेले आहेत कीं काय हें निश्चयानें सांगवत नाहीं. परंतु त्यांच्या कक्षेचें नीट अवलोकन केलें असतां त्याच्या कक्षा कोणत्या तरी ग्रहांच्या कक्षेजवळून जातात. यावरून तसा संभव दिसतो. ज्या धूमकेतूंचा प्रदक्षिणाकाल ८।१० वर्षाच्या सुमारास आहे. त्यास लघु कालिक धूमकेतु म्हणतात. एकट्या गुरुच्या कक्षेच्या अगदीं जवळ १२ लघु कालिक केतूंच्या कक्षेचीं उच्चें आहेत. इ. स. १७७० मध्यें असा एक धूमकेतु नुसत्या डोळ्यांनीं दिसला. त्या वेळच्या त्याच्या गतीवरून त्याचा प्रदक्षिणाकाळ गुरुच्या निम्मे म्हणजे सुमारें ६ वर्षें आहे, असें गणितानें दिसून आलें, परंतु तो बराच मोठा असतां, पूर्वी कधीं दिसला नव्हता, व पुढें कधीं दिसला नाहीं. यावरून गुरुनें त्याची कक्षा फारच बदलून त्यास आमच्या दृष्टि प्रदेशांत आणलें व मग त्यास बाहेर लोटून दिलें असावें. ज्योतिष्यांस लघु कालिक केतु हाच पहिल्यानें आढळला, व त्याचा शोध सन १७७० च्या पुढें करीत असतां आणखी लघु कालिक धूमकेतु सांपडले. त्यांत एनकेचा प्रथम

सांपडला. व त्याचा काळ एनकेनें इ. स. १८१८ मध्यें निश्चित केला. ह्या नंतर दुसरे सांपडून त्यांचे काळ निश्चित् झाले.

प्रॉक्टर नामक प्रसिद्ध खगोलज्ञाचें मत असें आहे कीं, सांप्रत सूर्यमालेंत जे नियत कालिक धूमकेतु आहेत, त्यांतले बहुतेक आपली पृथ्वी व इतर ग्रह प्राचीन काळीं सूर्यासारखे ऊष्ण होतीं, तेव्हां त्यांच्या पोटांतून ऊष्ण द्रव्य बाहेर पडून त्याचे बनले असावेत. पृथ्वीवर जीवांची उत्पत्ति होण्यापूर्वीच म्हणजे कोट्यवधि वर्षांपूर्वी ज्वालामुखींतून दर सेकंदास १०।११ मैल या वेगानें जड द्रव्य बाहेर फेंकण्याची शक्ती पृथ्वीच्या आंगी असावी व तेव्हां पुष्कळ धूमकेतु तिजपासून उत्पन्न झाले असावे. आपल्या सूर्यमालेपासून व इतर स्थिर तारांपासून सांप्रतही असे धूमकेतु उत्पन्न होत असावे. सूर्यापासून निघालेलें द्रव्य दर सेकंदास ३८२ मैल या वेगानें बाहेर पडलें तर ते पुन्हां सूर्याच्या आकर्षणांत सांपडणार नाहीं. आणि सांप्रत दर सेकंदास ४९० मैल वेगानें जड द्रव्य बाहेर फेंकण्याची शक्ति आपल्या सूर्यास आहे, व याप्रमाणें जड द्रव्य कधीं कधीं बाहेर पडतें असें आढळलें आहे. इ. स. १८७२ मध्यें असें द्रव्य बाहेर पडलें होतें. अन्वस्त व अपास्त कक्षांचे धूमकेतु कधीं कधीं आपल्या सूर्यमालेंत येतात. ते तारांपासून उत्पन्न झाले असावे. अशनींची ही उत्पत्ति ह्याचप्रमाणें आहे असें **प्राक्टरचें** मत आहे.

ह्याचप्रमाणें आपल्या बृहत संहितेंत केतूंचे उत्पत्ति विषयीं लिहिलें असून त्याची संख्या सांगण्याचा प्रयत्न केला आहे. हें वाचकांस श्लोकावरून सहज कळेल.

दर्पणवृत्ताकारा शिशिखाः किरणान्विता धरातनयाः ।
क्षुद्रयदा द्वाविंशतिरैशान्यां मंबुतैलनिभाः ॥

आरशासारख्या वर्तुळ, शिखारहित, किरणयुक्त असे २२ केतु भूमिपुत्र उदक व तेल यांसारख्या वर्णाचे इशान्य दीशेस दिसतात, ते दुर्भिक्ष करणारे आहेत.

शशि किरण रजतहिम कुमुदकुंद कुसुमोपमाः ।
सुताः शशिनः । उत्तरतो दृश्यतेत्रयः सुभिक्षावहाःशिखिनः॥

चंद्र किरण, रुपें, बर्फ, कमल, कुंदपुष्प यांन्या वर्णासारखें तीन चंद्र पुत्र केतु उत्तरेस दिसतात. ते सुभिक्ष करणारे होत.

सौम्ये शान्यो रुदयं शुक्र सुतायांति चतुरशीताख्याः ।
विपुल सिततारकास्ते स्निग्धाश्च भवंतितीव्रकलाः ॥

शुक्र पुत्र ८४ केतु उत्तर व ईशान्य या दीशांस उदय पावतात. ते विस्तीर्ण, शुभ्रतारांचे व निर्मल असे दृष्टि गोचर होतात. त्यांपासून अशुभ फल होतें.

स्निग्धाःप्रभा समेता द्विशिखाः षष्टिःशनैश्चरांगरुहाः ।
अतिकष्टकलादृश्याः सर्वत्रैते कनक संज्ञाः ॥

निर्मल व तेजयुक्त आणि दोन शिखांचे शनैश्चराचे पुत्र साठ कनक संज्ञक केतु आहेत. ते सर्व दीशेस दृष्टीस पडतात. त्यांचें अशुभ फल होय.

विकचानामगुरुसुताः सितैकतारा: शिखापरित्यक्ताः ।
षष्टि पंच भिरधिकाः स्निग्धायाम्याश्रिताः पापाः ॥

श्वेत एकतारा, शिखा रहित, निर्मल, विचक नामक ६५ बृहस्पति पुत्र केतु दक्षिणेस दिसतात. ते अशुभ फल देणारे होत.

नातिव्यक्ताः सूक्ष्मादीर्घाः शुक्लायथेषदिकप्रभावाः ।
बुध जातस्कर संज्ञाः पापफलास्त्वेकपंचाशत् ॥

अस्पष्ट, सूक्ष्म, लांब, श्वेतवर्ण, सर्व दिशेंस दिसणारे, तस्करसंज्ञक बुधाचे पुत्र केतु एकावन्न आहेत. ते अशुभ फलद होत.

त्रिंशत्त्र्याविकारा होस्तेतामसकीलका इतिख्याताः ।
रविशशिजादृश्यंते तेषांफलमर्क चारोक्तं ॥

तेतीस राहूचे पुत्र (?) नामसकिलक संज्ञक केतु, चंद्र सूर्य मंडळीं दिसतात, त्याचें फल रविचारामध्यें सांगितलें आहे.

हारमणिहेमरूपाः किरणाख्याः पंचविंशतिःसशिखाः ।
प्रागपर दिशोदृश्यानृपतिविरोधा वहारविजाः ॥

हार (मोत्यांचा) चंद्र कांतादि मणि, सुवर्ण यांसारख्या रूपांचे शिखायुक्त जे केतु ते किरण संज्ञक सूर्यापासून उत्पन्न झालेले पंचविस आहेत. त्यांतून एकच दृष्टिगोचर होतो. तो पूर्वेस किंवा पश्चिमेस दिसतो. तो दिसला असतां राजास विरोधा वह (अशुभ)होतो.

वरील सर्व विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं प्राचीन आर्यलोकांचे धूमकेतूच्या उत्पत्ति बद्दल प्रॉक्टर यांच्या मतासारखेंच मत होतें.

प्रख्यात ज्योतिषवेत्ता केप्लरचे मत असें होतें कीं, समुद्रांत जसे असंख्य मासे तसेच आकाशांत धूमकेतु पसरले आहेत. हल्लींही कित्येकांचें त्याचप्रमाणें मत आहे.

आपल्या सूर्यमालेंत बाहेर काय स्थिति असेल ती असो, परंतु

आतां तरी केतु अगण्य नाहींत. कारण तसे असते तर सांप्रतच्या भव्य दुर्बिणींतून रोज एखादा तरी केतु दिसता.

धूमकेतूची शरीर घटनाः—केतूच्या शरीर घटने-विषयीं अनेक कल्पना आहेत. व त्याबद्दल अजून सिद्धांत ठाम ठरला नाहीं. त्याचें अगदीं साधेंस्वरूप दुर्बिण केतूंत दिसतें, ते अभ्रासारख्या किंवा वाफेसारख्या बारीक कणांचे बनलेले दिसतात. पृथ्वीवर आपल्यास असें स्वरूप घन किंवा प्रवाही पदार्थांचें बनलेलें दिसतें. पाण्याच्या अति सूक्ष्म कणाचे मेघ बनलेले असतात. व कॉरबानच्या सूक्ष्म कणानीं मिळून धूर झालेला असतो. याप्रमाणेंच दुर्बिणकेतूची घटना असावी असें अनुमान होतें. तसेंच त्याच्या शेष द्रव्यापासून उल्का वृष्टि होते. यावरून वरील अनुमानास जास्त बळकटी येते. सारांश लहान लहान अशनी एकत्र होऊन धुमकेतू बनले असावेत.

धूमकेतूचें रसायनिकरीत्या पृथक्करणः—धूमकेतूच्या वर्णलेखावरून त्यांस स्वतः मूळचा प्रकाश असून ते सूर्याच्या प्रकाशामुळें तेजस्वी दिसतात. रसायनिक पृथक्करण यास वर्ण लेखकाचा फारच उपयोग होतो. सन १८६४ नंतर दृग्गोचर झालेल्या सर्व धूमकेतूंचे वर्णलेख घेण्यांत आले आहेत. वाचकांच्या अनुभवास आलेंच असेल कीं, एखाद्या लोलकावर किंवा कांच परशूवर सूर्यप्रकाश पडला तर, त्याचें वक्रीभवन होतें. व एक लांब सप्तरंग मिश्रीत पट्टा दृष्टीस पडतो. त्या पट्टयाच्या लाल टोंकाकडील, अदृश्य पट्यांत उष्णता जनक किरण असतात. कांच परशूमुळें या दिसणाऱ्या सर्व पट्यांस प्रकाश किरण सांठलेले असतात. व जांभळ्या टोंकांत पलीकडे रसायनिक

अथवा किरण किरण असतात. व याच पट्ट्यांत फार अरुंद अशा काळ्या रेषा दिसतात. व सूर्यप्रकाशाच्या पट्ट्यांतील या काळ्या रेषांची स्थानें अगदीं स्थिर, ठरावीक व अचल असतात. सूर्यप्रकाशाच्या आंतील घनधरीत उष्णता, बाहेरील कमी उष्ण बाष्पमय प्रदेशांतून बाहेर येत असते त्या मुळेंच या काळ्या रेषा दिसतात. परंतु सूर्यप्रकाशाच्या बदल एखादा कृत्रिम प्रकाश घेतला, तर ह्या काळ्या रेषांचीं स्थानें बदललेलीं आढळतात. विद्युत् प्रकाशाच्या पृथक्-भूत किरणांत अथवा सप्रकाश अशा बाष्पांत काळ्या रेषांच्या जागीं चकचकीत तेजस्वी रेषा असतात. जर प्रकाश एखाद्या अपार दर्शक पदार्थांवर पडून त्याचें परावर्तन होऊन मग त्याचा वर्णलेख घेतला, तर त्या प्रकाशाचा जो मूलचा वर्णलेख असतो तोच आतांही आढळेल. परंतु जर का त्या अपार दर्शक पदार्थांवर एखादें वायुरूप पटल असेल, तर ह्या पटलाच्या रसायनिक धर्मानुसार या परावृत्त प्रकाशाचा वर्णलेख आढळेल.

कांहीं पदार्थ असे आहेत कीं, त्यांचे वर्णलेख स्थितानुरूप-स्थितंतर पावतात. कॉर्बन या पदार्थाचा हाच धर्म आहे. तसेच नायट्रिफियंट नांवाचा एक वायु आहे, तो हायड्रोजन व कार्बन यांच्या रसायनिक संयोगानें झालेला आहे. या वायूचा वर्णलेख व धूमकेतूच्या वर्णलेखापैकीं कांहीं भागाचा वर्णलेख हे दोन ततोऽतंत जुळतात. धूमकेतूंची तेजस्विता फारच कमी असल्या कारणानें वर्णलेखकाचा झरोका जरा जास्त उघडून ठेववा लागतो. त्या योगानें वर्णलेख फार कांकत नाहीं. म्हणून अनुमान करण्यास थोडा अडथळा येतो. धूमकेतूंच्या वर्णलेखांत तीन

पट्टे दिसतात. व ते वर्णलेखाच्या तांबड्या कडे कडे जास्त जास्त चकाकित होत जातात. तसेच या पट्ट्यांमध्यें सुंदर, बारीक, तेजस्वी रेषा आढळतात. त्यांची तेजस्विता व परस्परांमधील अंतरही जांभळ्याकडे कडे कमी कमी होत जातात. व त्या तीन पट्ट्यांच्या अस्तित्वामुळें, रसायनिक पृथक्करणानें धूमकेतूंवर हायड्रो कार्बनचें अस्तित्व ठरतें. याप्रमाणें धूमकेतूंमध्यें मुख्य भाग कार्बन (कोळसा) आढळतो. धूमकेतूंच्या वर्णलेखांत फक्त हायड्रो कार्बनचेच पट्टे दिसतात असें नाहीं. कित्येक धूमकेतूंच्या वर्णलेखांत सोडियम नामक पदार्थ दर्शविणारी पिवळी रेषा दृग्गोचर होते. व जेव्हां धूमकेतु सूर्याच्या अति सन्निध येतो. तेव्हां ही सोडियमची रेषा जास्तच स्पष्ट दिसते. व त्या बरोबरच हायड्रोकार्बनचेहि तिन्ही पट्टे अंधुक होतात. कित्येक धूमकेतूंच्या वर्णलेखांत सोडियम शिवाय लोखंड, म्यागनीज ह्याहि धातु दाखविणाऱ्या रेषा दिसतात.

वर्णलेखांत ह्या चकचकित रेषांचाच पट्टा दिसतो. असेंच नाहीं, तर काळ्या फ्रांन हॉफर रेषाहे आढळतात. पांढरा पट्टा उसनवार घेतलेल्या व परावर्तन पावून धूमकेतूस सूर्यापासून मिळालेल्या प्रकाशाचा द्योतक आहे. व काळ्या रेषांवरून धूमकेतूस अति अस्पष्ट असा स्वतःचा थोडा प्रकाश आहे. कांहीं धूमकेतूंच्या वर्णलेखांवरून असें आढळून आलें आहे कीं, ज्या धूमकेतूस ३ शेपटें असतात, त्यांपैकीं जी सरळ रेषाकृति असते. ती बहुधा हायड्रोजन वायुमय असते. व जी जरा वांकदार असते. तींत लोखंड व म्यागनीज अथवा ज्या ज्या अणूंचें वजन बरेंच असतें, अशा कोठल्या तरी धातूची बनलेली असते.

धूमकेतूंच्या कक्षा व अशनि समूहाच्या कक्षा यांत अतीच साम्य आढळतें व अशनि समूहाचें रसायनरीत्या पृथक्करण, धूमकेतूच्या रसायनिक पृथक्करणा बरोबर जुळते हें खालील माहिती-वरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

शेफील्ड येथील सॉरबी नांवाच्या खनीज द्रव्यवेत्यानें असें झटलें आहे कीं, शेफील्ड येथील मोठ्या भट्टयांत पडलेल्या अशनि पैकीं, कांहीं मी जाळून पाहिले, तेव्हां त्या मध्यें जे फेरफार होत गेले त्यावरून असें वाटतें कीं, हे अशनि पाहिल्यानें कोणी-तरी सूर्याच्याच देशांतून बाहेर पडलेले असावेत. त्याच प्रमाणें अशनींच्या रसायनीय पृथक्करण असें आढळून आलें आहे कीं, अशनींतील लोखंडांत पुष्कळ हायड्रोजन वायु मिश्र असतो. तसेंच कित्येक अशनींत कॉर्बन आहे असें खात्रीनें आढळून आहे. व वर्णलेखावरून धूमकेतूंचें हेंच रसायनिक पृथक्करण आहे, हें मागें सांगितेंच आहे. त्याचप्रमाणें सूर्यास असले अशनि सारखे जडदेह बाहेर टाकण्याची शक्ति आहे, हें मागें सांगितलेंच आहे.

सूर्य, ग्रह वगैरे पासून धूमकेतु उत्पन्न होतात ह्याबद्दल पाश्चात्य लोकांचें व आपल्या कडील लोकांचें तेंच मत आहे. हें मागें सांगितलेंच आहे. त्यांत सूर्यापासून प्रचंड धूमकेतु उद्भवतात, व लघुकालिक धूमकेतु शनि, गुरु वगैरे ग्रहांपासून उद्भवले असावेत, कारण बहुतेक लघुकालिक धूमकेतूंच्या कक्षांचे नीचीचे व उचीचे दोन्ही बिंदु, ग्रहांच्या कक्षे सन्निधच आढळतात. त्याचप्रमाणें लघुकालिक धूमकेतु ग्रहापासूनच उत्पन्न झाले असावेत. असा तर्क करण्यास आणखी एक जागा आहे. समजा, आपण अति

वेगानें चाललेल्या आगगाडींत बसून चाललों आहोंत, व तेथून आपण बाहेर चारी दिशेला, पुढें मागें, डाव्या हातास, डाव्या हातास दगड फेंकीत राहिलों, तर सर्व दगड आगगाडीच्या अत्यंत वेगानें, प्रथम कांहीं वेळ आगगाडी ज्या दीशेने चालली असेल, त्याच दीशेकडे धेतील. त्याचप्रमाणें जर लघुकालिक धूमकेतु ग्रहांपासून उत्पन्न झाले असतील तर ग्रह जिकडे जातील तिकडे जाण्याची त्यांची प्रकृति असली पाहिजे व त्याच प्रमाणें बहुतेक धूमकेतु पश्चिमेकडून पूर्वेकडे ह्मणजे ग्रह ज्यां दिशेनें फिरतात, त्याच दिशेनें फिरतात. त्याच प्रमाणें लघुकालिक धूमकेतूंच्या कक्षांचा ग्रहांच्या कक्षांशी विक्षेपादि फार थोडा आहे.

कांहीं विशिष्ट धूमकेतूंचें पाश्चात्य ग्रंथाधारें वर्णन.

ह्या भागांत आजपर्यंतच्या दिसलेल्या कांहीं विशिष्ट धूमकेतूंचें वर्णन देऊन अलिकडे दिसत असलेल्या एका-हॅलेच्या धूमकेतूचें वर्णन करून नंतर फलज्योतिष शास्त्र दृष्ट्या धूमकेतूंचा विचार कसा करीतात, ह्याकडे वळूं.

वरील माहितीवरून वाचकांस धूमकेतूच्या शरिराची त्याच प्रमाणें त्यांच्या प्रत्येक अवयवांची बरीच कल्पना झाली असेल.

इसवी सनापूर्वी ४३ व्या वर्षी एक धूमकेतु दिसला. तो जुलिअससीझरचा आत्मा स्वर्गास जात आहे, असें कांहीं-लोकांनीं ठरविलें. इ. स. ७९ ह्यावर्षी ह्मणजे आपला शालिवाहन शक काल सुरू झाला, त्या वर्षी एक धूमकेतु दिसत होता; व ह्याच वेळीं विक्रम राजाचा पराजय होऊन विक्रम शकाला थोडा कमीपणा येऊन, शालिवाहन शकाचा उदय झाला. इ. स. ६३३

मध्यें ह्मणजे ज्या वेळेस पैगंबर महंमद स्वर्गवासी झाला, त्याच वेळेस एक धूमकेतु दिसत होता. इ. स. १००० यावर्षी एक धूमकेतु दिसत होता, व त्याच वेळीं एक मोठा उल्कापात झाला. याच कालांत यूरोपखंडांत पृथ्वीचा लय होणार अशी कंडी होती, व या धूमकेतूनें सर्वांचें धाबें दणाणलें. इ. स. १०६६ यावर्षी विल्यमधि फर्स्ट ह्यानें इंग्लंडच्या मूळच्या राजाचा पराजय करून, नवीन गादी स्थापन केली. त्याहि वेळीं एक धूमकेतु दिसत होता. इ. स. १४५५ च्या सुमारास ह्मणजे **कानस्टांटिनोपल** येथील रोमन बादशाही मुसलमानांनीं बुडविली. त्या सुमारास हल्लींच्या हॅलेचा धूमकेतु दिसत होता. इ. स. १५७७ मध्यें एक धूमकेतु दिसला, त्यावरून टायकोब्राहे यानें पहिल्यानें असा तर्क केला कीं, धूमकेतु हा फक्त एखादा ढग नसून एक आकाशस्थ जडदेह आहे, व तो आपल्या चंद्रापलीकडे असावा. व त्याचा आणि आपल्या पृथ्वीचा कांहींच संबंध नसला पाहिजे. त्यावेळीं ग्रहांच्या कक्षा वर्तुलाकृति असाव्या, असा समज असल्यामुळें, धूमकेतूच्याही कक्षा तशाच असाव्यात, असा टायकोब्राहेचा समज होता. धूमकेतूच्या कक्षा दीर्घ वर्तुलाकार अथवा अन्वस्त आकाराच्या असाव्यात, ह्याची पहिल्यानें कल्पना नेपल्स येथील गणिती बोरेली यानें केली. जर्मन ज्योतिषी अस्फेल यानें इ. स. १६८० च्या धूमकेतूचें निरिक्षण करून धूमकेतूच्या कक्षा अति दीर्घ वर्तुल अथवा अन्वस्थ असाव्या असें ठरविलें. परंतु त्यास त्याचें कारण समजेना, व तें सर्व सरऐझाक न्यूटन यानें तो आपला प्रिन्सिपिया नांवाचा ग्रंथ लिहीत असतां, इ० स० १६८० मध्यें दिसत असलेल्या धूमकेतूच्या कक्षेस आपले आक-

र्षणाचे नियम लावून त्यानें असें सिद्ध केलें कीं, ज्या आकर्षण शक्तीनें सूर्य सर्व ग्रहांस आपल्या कक्षेंत नियमीत कालांत फिरवितो, तीच आकर्षणशक्ति धूमकेतूच्याहि भ्रमणास मूळ कारण होय.

इ० स० १६६४ आणि इ० स० १६६६ च्या धूमकेतूनीं इंग्लंडांत फारच प्रळय उडविला. लंडन मध्यें १६६५ मध्यें रोगाची भयंकर सांथ आली. व इ० स० १६६६ मध्यें लंडन शहरांत मोठा अग्नि प्रलय होऊन जिकडे तिकडे हाःहकार उडाला.

इ० स० १६८० चा धूमकेतु अति प्रचंड होता, तो नोवेंबर १६८० पासून मार्च १६८१ पर्यंत दिसत होता. प्रथम तो मुळींच म्हणण्यासारखा चकाकत नव्हता. परंतु तो जसजसा पृथ्वीच्या कक्षे समीप येऊं लागला तसतसा तो मोठा दिसूं लागला. तो स्व कक्षेंत ता. ८ डिसेंबर रोजीं नीचीं आला तेव्हां सूर्य बिंबापासून सूर्याच्या व्यासाच्या $\frac{1}{6}$ अंतरावर होता, त्यावेळेस त्याची गति दर तासास १२ लक्ष मैल ह्मणजे मिनिटास २० हजार मैल इतकी विलक्षण होती. व तो पृथ्वीचें सूर्यापासून जें अंतर आहे, त्याच्या $\frac{1}{160}$ अंतरावर त्यावेळीं तो होता. व प्रकाश शास्त्राच्या नियमाप्रमाणें त्यास पृथ्वीपेक्षां १६० च्या वर्गा इतकी ह्मणजे २५६०० इतकी पट अधिक उष्णता मिळत होती. इतक्या भयंकर उष्णतेनें पृथ्वीवरील लागेल त्या पदार्थाची वाफ झाली असती. त्याचा ता० ८ डिसेंबरचा आश्चर्यकारक देखावा कोणासहि पाहणें शक्य नव्हतें. नंतर लवकरच चार दिवसांनीं तो सूर्यास वळसा घालून पुन्हा दिसूं लागला. त्यावेळेस त्याची शेंडी

पूर्वी असलेल्याच्या उलट अंगास पसरलेली दिसत होती. व तिचा विस्तार ९. कोटी मैलाचा होता. नंतर लवकरच सन १६८२ मध्यें हॅलेचा धूमकेतु दिसूं लागला त्याचें वर्णन पुढें करण्याचें योजिलें असल्यामुळें आपण दुसऱ्या धूमकेतूंचा विचार करूं.

नेपोलियनच्या जन्मानंतर इ० स० १७७० मध्यें एक धूमकेतु दिसला. प्रथमतः इतर धूमकेतू प्रमाणेंच याची कक्षा अन्वस्त असावी असें खवेत्यांस वाटलें. परंतु पुढें गणितानें असें ठरलें कीं, त्याची कक्षा दीर्घ वर्तुळ असून, उच्चीचा बिंदु गुरूच्या कक्षेच्या आंत बाहेर असावा, व नीचींचा बिंदु शुक्राच्या कक्षेच्या आंत असावा, व त्याचा प्रदक्षिणा काळ ५½ वर्षांचा असावा, असें ठरलें. व तो पुन्हा इ० स० १७७६ मध्यें पुन्हां दिसेलसें वाटलें, परंतु तो काळ चुकला. पृथ्वी, सूर्य व तो धूमकेतु यांच्या तत्कालिन आकाशस्थ स्थानांमुळें तें अशक्य झालें. असें खवेत्यांनीं ठरविलें. व सन १७८१ मध्यें ह्मणजे एकंदर ११ वर्षांनीं पृथ्वी सूर्य व तो धूमकेतु हे सन १७७० प्रमाणेंच पूर्ववत आपल्या स्थानीं येतात, ह्मणून त्या काळीं तो दिसेल असें पुन्हा ठरविलें. परंतु तो त्या काळीं दिसलाच नाहीं. ११ वर्षांच्या दोन फेऱ्यांत गुरुहि सरासरी त्याच स्थळीं परत येतो. यावरून तो धूमकेतु सन १७६७ च्या सुमारास गुरूच्या कक्षे सन्निधच कोठेंतरी असला पाहिजे. पुन्हां खवेत्यांनीं असें ठरविलें कीं सन १७६७ च्या पूर्वी या धूमकेतूची कक्षा फारच मोठी व निराळी असावी. व १७६७ मध्यें तो गुरूच्या जरासा जवळ आल्या-बरोबर गुरूनें त्यास आपल्याकडे ओढून, त्याच्या कक्षेचा मार्ग सूर्याकडे वळवून ११ वर्षांत त्यास सूर्याभोंवतीं दोनदा फिराव-

यास लाविलें. व सन १७८१ मध्यें तो धूमकेतु गुरूच्या सन्निध येऊन त्याबरोबर गुरूनें त्यास मध्योत्सारीगतीनें आपणांपासून त्यास लांब भिरकावून दिलें असलें पाहिजे. यावरून गुरूची स्वारी ह्मणजे धूमकेतूस मोठी अडथळा करणारी असून त्यास कधीं कधीं भलताच मार्ग दाखविते.

सन १७४४ मध्यें दिसलेला धूमकेतु फारच आश्चर्यजनक होता. त्यास सहा शेंड्या होत्या. त्या एखाद्या पंख्याप्रमाणें पसर-लेल्या दिसत होत्या. या सर्व शेंपट्या पहिल्यानें सूर्य बिंबाकडे धांव घेतांना दिसल्या पण ताबडतोब जोरानें मागें फिरविल्या जाऊन, त्या धुमकेतूच्या ज्या आंगास सूर्य होता, त्याच्या उलट अंगास पसरल्या.

इ० स० १५५६ मध्यें एक धूमकेतु दिसला. त्याचें डोकें गुरु इतकें तेजस्वी होतें. व अर्ध्य अथवा ½ चंद्राएवढें सपाटें होतें. ता० १६ मार्च्यच्या सुमारास त्याचें रुद्र स्वरूप दिसूं लागलें. बादशहा ५ वा चार्लस यांच्या मनावर राज्यत्याग करावा अथवा आपलें मरण नजीक आलें आहे, असा परिणाम झाला. व ह्मणून राज्याचा त्याग केला, असें एका कवीचें वर्णन आहे. इ. स. ९७५ व १२६४ मध्यें दिसलेल्या धुमकेतूची व याची कक्षा एकच असल्यामुळें हा नियतकालिक असून याचा प्रदक्षिणा काळ २९१ वर्षांचा असावा.

इ० स० १८१९ मध्यें एनके या खवेत्यांनीं एका दुर्बिणकेतूचा प्रदक्षिणा काळ ठरविला. त्यावरून त्यास एनकेचा धुमकेतु हें नांव प्राप्त झालें आहे. हा ३। वर्षांत सूर्याभोंवतीं प्रदक्षिणा करितो व त्याची गति मार्गी आहे. सन १८३८ च्या डिसेंबर ता० ९

ला मात्र नुसत्या डोळयांनीं दिसला. त्याचें कक्षेचा बिंदु, बुधाच्या कक्षेच्या जवळ असल्यानें तो ता. २९ नोवेंबर १८४८ मध्यें तो बुधाच्या इतका जवळ आला कीं, त्याच्या मार्गावर बुधाच्या आकर्षणाचा परिणाम झालेला आढळला. परंतु धुमकेतूचा बुधावर मुळींच परिणाम झाला नाहीं. ह्या धुमकेतूच्या मार्गाची खवे–त्यांस पूर्ण माहिती होती, व त्यांनीं त्याच्या नवीन मार्गाचें नीट अवलोकन करून बुधाचें वजन तंतोतंत ठरविलें बुधाचें वजन पृथ्वीच्या $\frac{1}{7}$ आहे. व गुरूचें वजन पृथ्वीच्या तंतोतंत १०४७-१७ पट आहे. त्याचप्रमाणें ह्या धुमकेतूचें अवलोकन करितां, खवे–त्यांच्या नजरेस असें आलें आहे कीं, प्रत्येक प्रदक्षणेच्या काळीं २$\frac{1}{2}$ यास याचा प्रदक्षिणा काल कमी होत चालला आहे, त्या वरून शास्त्रज्ञांचा असा तर्क आहे कीं, हा धुमकेतू सूर्याच्या जास्त जवळ येत चालला असून कधीं काळीं याची आहुति सूर्यांत जाऊन पडणार.

इ० स० १८२६ च्या फेब्रूवारीच्या २७ व्या तारखेस आस्टि-यांतील जोसेफस्टोड शहरच्या प्रो० बीला पंडितानें एक लहान धुमकेतु दुर्बिणींतून पाहिला व त्याचा प्रदक्षिणा काल ६ व. ८ म. असल्याचें ठरविलें. व मागील धुमकेतूचा इतिहास परीक्षण करितां त्यास हाच धुमकेतु सन १७७२, १८०६ व १८१८ साली दिसल्याचें आढळलें, त्यावरून तो पुन्हां १८३२ त पुन्हां दिसेल असें भविष्य केलें, व तें १८४६ पर्यंत खरें ठरत गेलें. परंतु १८४६ त ठरलेल्या ठिकाणीं ता० १३ जानेवारीस एकाचे दोन धुमकेतू दिसले. दोघांसहि केंद्र, शरीर व शेंडी होती. मग ते कांहीं अंतरापर्यंत दूर दूर जात जाऊन त्यांमधील अंतर स्थिर झालें.

इ० स १८५२ त हें जुळें पुन्हा दृश्य झालें. मागें त्या परस्परांत जें अंतर होतें, तेंच अंतर कायम राहिलें होतें. केप्लरच्या वेळीं सन १६१८ त दिसलेल्या धुमकेतूचें असेंच जुळें होतें. त्याच प्रमाणें ग्रीक ग्रंथांत व आपल्याकडील ग्रंथांत, जुळे धुमकेतू असल्याचें वर्णन आढळतें. बीलाच्या धुमकेतूनंतर तो सन १८९९ मध्यें दिसावयास पाहिजे होता. तो दिसलाच नाहीं. तो सन १८७२ मध्यें दिसला असें म्हणतात. परंतु त्यानंतर आतांपर्यंत त्या स्वारीनें कोठें दडी मारिली आहे. तें कळत नाहीं. व जगाबर रुसून आपलें दर्शनहि देत नाहीं.

इ० स० १८४३ च्या फेब्रू. महिन्यांत दिसलेला धुमकेतू फारच तेजस्वी होता. व त्याचें विशाळरूप भर दोनप्रहरीं दृश्य होतें. त्याचा वेग अतीशय झपाट्यानें असून तो जेव्हां सूर्याच्या अतिजवळ आला. तें अंतर इतकें थोडें होतें कीं, त्यास मिळणाऱ्या सूर्याच्या प्रखर उष्णतेनें पृथ्वीवरील लागेल तो पदार्थ वायुरूप बनला असता. ह्या धुमकेतु इतका जवळ कोणताच धुमकेतू गेला नाहीं. त्याची कक्षा जराका बदलली असती, तर तो खात्रीनें जाऊन सूर्यावर आपटला असता.

इ० स० १८९७।१८५८ ह्या वर्षी म्हणजे बंडाच्या साली एक अतिमोठा धूमकेतु दिसला. व तो फ्लारेन्स येथील डोनेटी नामक खवेत्यास प्रथम दिसला. व त्यावरून त्यास डोनेटीचा धूमकेतु नांव प्राप्त झाले आहे. व तो पुन्हा २००० हजार वर्षांनीं दिसेल असें म्हणतात. हा धूमकेतु प्रथम ता. २ जून रोजीं गोल वधुवरासारखा असून तेजोमय मेघाप्रमाणें दिसत होता. नंतर ७२ दिवसांनीं त्याची शेंपटी हळुहळु वाढूं लागली. व आक्टो–

बरच्या मध्यास त्याचें तेज, आकार बराच वाढला. व कांहीं दिवसांनीं इतर धूमकेतु प्रमाणें त्याची शिखा सरळ न दिसतां लांब कंसाकार दिसूं लागली. व त्यास अग्रभागास रूप अ या असणाऱ्या चक्राचें रूप प्राप्त झालें व त्याचा देखावा अति मिती जनक होता.

सन १८८१ मध्यें न्युसाऊंथवेल्स येथें मिस्टर टेबट यास एक प्रथम धूमकेतु दिसला. सन १८८२ मध्यें सप्टेंबर मध्यें एक नुसत्या डोळ्यानें दिसणारा धूमकेतु दिसला. सन १८९२ ता. १ नोव्हेंबर रोजीं लंडन शहरीं मिस्टर होल्मस यास देवयानी तारे-जवळ एक धूमकेतु दिसला तो नुसत्या डोळ्यानें अंधुक अंधुक दिसत असे.

इ० स० १९०७ च्या साली अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतील प्रिसृन विश्वविद्यालयांतील डॉनिअल नांवाच्या विद्यार्थ्यानें एक धूम-केतु पाहिला. तो नुसत्या डोळ्यांनीं दिसत असे. शोधांती ही एक नवीन स्वारी पृथ्वीस भेट देण्यास आली होती असें ठरलें. हा डानीअलचा धुमकेतु ता० ९ जून रोजीं रोहिणी नक्षत्राच्या पाश्वमेस होता. व ह्याची गति पश्चिमेकडून पूर्वेकडे होती. किल्येक ह्यास दोन शेंपट्या दिसल्या असें ह्मणतात.

हॅलेचा धूमकेतू.

हल्ली दिसत असलेल्या हॅलेच्या धुमकेतूची वाचकांस थोडीशी ओळख करून दिल्यानंतर उल्कांचा व धुमकेतूंचा काय संबंध आहे. ह्या भागाकडे वळूं. नंतर फलज्योतिषशास्त्र दृष्ट्या धुमकेतु बद्दल आर्य व पाश्चात्य ग्रंथकारांचें काय मत आहे. ह्या बद्दलचा उहापोह करण्याकडे वळूं.

इ० स० १६८२ च्या सुमारास एक तेजस्वी धूमकेतु दिसला, त्याच्या कक्षेचें गणित न्यूटनच्या पद्धतीनें करून एडमंड हॅले ह्यानें त्याचा सूर्य प्रदक्षिणाकाल ठरविला. धूमकेतूच्या गतीचे वेध घेऊन, त्यावरून गणितानें त्याची कक्षा ठरवून त्याचा प्रदक्षिणा काल काढला असा प्रथम हाच धूमकेतू होय. हॅलेनें त्याची कक्षा अन्वस्त आहे. व त्या कक्षेच्या नीचींचा बिंदु शुक्र व बुध ह्यांच्या कक्षेमध्यें आहे. असें ठरविलें, हॅलेच्या धूमकेतूच्या पातळीचा क्रांतिवृत्ताबरोबर १७$\frac{3}{4}$ अंश होता. व त्याचें गमन वक्री आहे असें त्यानें ठरविलें.

ह्याप्रमाणें ह्या धूमकेतूच्या मार्गाचें गणित बरोबर जुळल्यानंतर हॅले ह्यानें दुसऱ्या धूमकेतूचे कक्षेविषयीं माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. ह्याप्रमाणें त्यानें २४ धूमकेतूंच्या कक्षा ठरविल्या. त्यांपैकीं २ मोठाले होते. त्यांच्या कक्षा व हॅलेनें ज्या पहिल्या धूमकेतूचें गणित केलें, व ज्यास त्याचें पुढें नांव मिळालें. त्याच्यांत तंतोतंत साम्य आढळलें. ह्यापैकीं पहिला अपियन यास १५३१ मध्यें व दुसरा केप्लर यास सन १६०७ मध्यें दिसला सन १६०७ व १५३१ ह्यांत ७६ वर्षांचें अंतर आहे. व १६०७ व १६८२ यांत अंतर ७५ वर्षांचें ह्मणजे जवळ जवळ ७६ वर्षांचें अंतर त्यास आढळलें. त्यावरून हॅले यास हे तिन्ही एकाच धूमकेतूचे नियतकालिक फेरे असावेत असें वाटलें. नंतर त्यानें इतिहास प्रसिद्ध सर्व धूमकेतूचे सन हुडकून काढिले. त्यां-पैकीं ५ धूमकेतू सन १३०९, १३८० व १४५६ या सालीं दिसलेले आढळले. व ह्यांतहि त्यास ७५।७६ वर्षांचें अंतर आढळलें. त्यानंतर त्यानें असें ठरविलें कीं, हा धूमकेतु इ० स०

१७५८।९९ या वर्षी पुन्हा दिसेल पण या वेळीं हा काळ हॅलेनें ७७ वर्षांचा धरिला. कारण हा धूमकेतु आपल्या सूर्यमालेकडे परत येतांना तो मोठमोठ्या ग्रहांकडे आकर्षिला जातो, व त्या योगानें त्याचा वेग बराच कमी होतो. हॅलेच्या धूमकेतूच्या पूर्वीच्या सर्व तारखा खालीलप्रमाणें आहेत.

इ० स० ४५१ यावर्षी ता. ३ जुलईला दिसला.
इ० स० ७६० यावर्षी ता. ११ जूनला दिसला.
इ० स० १३७८ यावर्षी ता, ८ नोवेंबर रोजीं प्रथम दिसला.
इ० स० १४५६ यावर्षी ता. २६ अक्टंबर या दिवशीं दिसला.
इ० स० १५३१ यावर्षी ता. २४ आगष्ट या दिवशीं दिसला.
इ० स० १६०७ यावर्षी ता. २६ आक्टंबर या दिवशीं दिसला.
इ० स० १६८२ यावर्षी ता. १४ सपटंबर या दिवशीं दिसला.
इ० स० १७५९ यावर्षी ता. १२ मार्च या दिवशीं दिसला.
इ० स० १८३५ यावर्षी ता. १५ नोवेंबर या दिवशीं दिसला.
इ० स० १९१० यावर्षी मे महिन्यांत हल्लीं दिसत आहे.

चिनी लोकांच्या ज्योतिष ग्रंथांत हा धूमकेतू इ० स० ४५१ वर्षांपूर्वी केव्हां दिसला, त्याची सर्व नोंद आहे, असें ह्मणतात. व त्यावरून असें ठरतें कीं, ख्रिस्ती शकापूर्वी १।२ शतकें अगोदर या धूमकेतूची पहिल्यानें नोंद झाली असावी. वरील सर्व तारखांवरून खवेत्ता हॅले यानें ठरविलें कीं, गुरूच्या योगानें ह्याची गती ५१८ दिवसांनीं मंद होते व शनिमुळें १०० दिवसांनीं होते. सूर्याच्या प्रखर उष्णतेनें धूमकेतूच्या अग्रभागाची नेहमीं वाफ होत असते. त्यामुळें त्याचा आकार उत्तरोत्तर कमी होत जाणें साहजीक आहे, हॅलेच्या धूमकेतूची जी पूर्वीची

वर्णनें आहेत. त्यावरून पाहतां हल्लीं तो बराच लहान झाला आहे.

पुष्कळ लोक धूमकेतू हे अरिष्ट सूचक आहेत असें मानतात. व तसें मानण्यास बऱ्याच आधार गोष्टी आहेत. त्यामुळें ह्या स्वारीचें दर्शन झालें ह्मणजे पुष्कळांचें धाबें दणाणतें. व ह्या स्वारीनें येऊंनें आपल्या पृथ्वीस जर आलिंगन दिलें, तर काय होईल वगैरे प्रश्न सहजरीत्या विचारितात. धूमकेतू खरोखरच अरिष्ट सूचक आहेत, किंवा त्याच्या त्या विशाळ रूपामुळेंच उगाच लोकांस भिती वाटते. वगैरे गोष्टी मोठ्या विचार करण्यासारख्या आहेत. ह्याबद्दल वाचकांस थोडी कल्पना प्राचीन आर्यग्रंथांचे व पाश्चात्य ग्रंथांतून दिलेल्या माहिती वरून कांहीं कल्पना करितां येईल. असें वाटतें.

एखादा धूमकेतू पृथ्वीवर येऊन आपटला तर तो ज्या प्रकारचा दिसेल, त्याप्रमाणें निरनिराळे परिणाम घडतील. धूमकेतूच्या पुच्छांतून आपली पृथ्वी कैक वेळां गेली असेल, व आतां हॅलेच्या धूमकेतूच्या पुच्छांतून जाणार आहे. ह्या योगानें कांहीं मोठे अनर्थ घडतील असें वाटत नाहीं. फार झालें तर उल्कापात फार होईल. एका अमेरिकन खवेत्याचें असें मत आहे कीं, गेल्या जून व जुलै महिन्यांत जो धूमकेतू दिसला, त्यानें आपल्या चंद्रास त्रिजेचा बराच पुरवठा झाला. व त्यामध्यें थोडी चेतना शक्ति येऊन त्याचें वातावरणांत वक्रीभवन व परावर्तनाचे गुण आले. ह्यावरून धूमकेतु हा एक मोठा विद्युत्सांठा आहे, व त्यांतून वाटेंत भेटण्याच्या ग्रहास थोडा बहुत लाभ होतोच. यावर्षी धूमकेतु आपल्या पृथ्वीजवळ आला आहे. त्या योगानें आपल्या

पृथ्वीवरील विद्युत् प्रवाहांत बरीच चलविचल झालेली आढळेल. फलज्योतिष वेत्तेतर ह्या निर्जिव गोलाचे परिणाम होतात असें मानितात. परंतु हल्लीचे पाश्चात्य विद्वान खवेत्ते ह्या निर्जिव जड-देहाचें आपल्या पृथ्वीशीं कांहीं कर्तव्य नाहीं, असें जोरानें प्रतिपादन करीत आहेत. व त्यांपैकीं आतां कांहींजण आमच्या वातावरणावर पृथ्वी बाहेरील जडदेहाचा परिणाम होतो असें मानूं लागले आहेत. गेल्या तारीख २३ सप्टेंबर रोजीं मंगळ आपल्या पृथ्वीच्या अगदीं जवळ आला होता, तेव्हां पाऊस जास्त पडला. व आस्ट्रेलियांत अरोराबोरिआलीस दिसूं लागला. व जिकडे तिकडे पृथ्वीच्या लोहचुंबकाचे परिणाम दिसूं लागले. व हिंदुस्थानांत एक दिवस ६। तास तारायंत्रें कामच करीत नव्हतीं. फलज्योतिषशास्त्र पद्धतींत अशी स्थिति होण्याचें खात्रीनें सांगितलेलें आढळेल. असो. मोठ्या धूमकेतूच्या तारेबरोबर पृथ्वीची टक्कर झालीतर जिकडे तिकडे हाःहकार उडेल. धूमकेतु वातावरणांत शिरतांच, सर्व आकाश हजारों सूर्यांहून तेजस्वी होईल. व त्या प्रखर ऊष्णतेमुळें पृथ्वीवरील अति कठीण खडक देखील वितळतील. व चार पांच सेकंदांत पृथ्वी तदश आलिंगन देऊन तिजवरील सर्व पदार्थांची वाफ होऊन ग्रंथांतरीं वर्णिलेल्या प्रमाणें अग्नि प्रळयानें पृथ्वीच्या पृष्ठभागाचें खात्रीनें रूपांतर होईल.

हॅलेचा धूमकेतू ता. १६ एप्रीलच्या सुमारास अगदीं जवळ येणार होता. असें ग्रीनवीच वेधशाळेंतून प्रसिद्ध झालें होतें. व ता. १७ सप्टेंबर सन १९०९ पासून खवेत्त्यांनीं त्याचे प्रकाशलेख घेण्यास सुरुवात केली आहे. त्यावेळेस त्याची क्रांति १ अं. १८ क. व शर उत्तर १७ अं. २ क. व एप्रिल महिन्याचे

शेवटीं त्याची चांदणी पूर्व क्षितिजावर दिसण्यास लागावी. व मेच्या २५ तारखेच्या सुमारास सायंकाळीं पश्चिमेस वृषभ वें मिथुन राशीजवळ तो स्पष्ट दिसावा असें प्रसिद्ध झालें आहे. व ह्याच काळापुढें त्याचें भव्य व विस्तीर्ण स्वरूप आपणास पाहण्यास मिळणार आहे. या खेपेस तो भूमध्य रेषेच्या उत्तरेकडील देशापेक्षां दक्षिणेकडील प्रदेशांत चांगला दिसेल असें म्हणतात. मार्च सन १९१० च्या आरंभीं तो ९ व्या प्रतीच्या तारेएवढा दिसत होता. एप्रिल वीसला तो आपल्या कक्षेत नीचीं येणार होता. व १० तारखेस तो आपल्या पृथ्वीस अगदीं जवळ येणार आहे व ता. १८,१९ मे रोजी त्यावें सूर्यावरून अधिक्रमण होणार आहे. यावेळीं किंबहुना यावर्षी कायकाय घडामोडी होतात या पुष्कळ वाचकांस पहावयास मिळणार आहेत.

उल्कांचा धूमकेतूंशीं संबंध.

ह्याभागांत आपण उल्का व अशनि काय आहेत व त्यांचा धूमकेतूबरोबर काय संबंध आहे, याचा विचार करूं. उल्काविषयीं सविस्तर विवेचन करणें शक्य दिसत नाहीं. कारण तो एक स्वतंत्र आणि गमती दायक लेख होऊन त्याबद्दलचे आर्य व यूरोपिय ग्रंथकार यांचे विचार वाचण्यासारखे आहेत. वरील माहितींत बऱ्याच ठिकाणीं अशनींचा संबंध दाखविला वाचकांच्या वाचण्यांत येईल व त्यास खालील माहितीपासून जास्त फायदा होईल.

आपण काळोख्यारात्रीं आकाशाकडे सहज पहात बसलों असतां एखादी तारा लखकन प्रकाशून्य खालीं तुटून पडलेली दिसते.

याप्रमाणें आपण बराचवेळ निरीक्षण केलें असतां अशा पुष्कळ तारा तुटून पडतात. असें आपल्या सहज नजरेस येईल. व ह्या तुटून पडणाऱ्या तारा नक्षत्रांपैकीं नसाव्यात अशी आपली सहज कल्पना होते. व ते वस्तुतः दुसरे कांहीं तरी पदार्थ असावेत, असें वाटतें. व ह्यांसच उल्का असें ह्मणतात. साधारणतः उल्का पृथ्वीवर येऊन पडल्यानंतरचें त्यांचें जें स्वरूप त्यास अशनि ह्मणतात. आपल्या ग्रंथांत या उल्कांचे बरेंच भेद व लक्षणें सांगितलीं आहेत. व त्यांचा फलादेशहि सांगितलेला आढळतो. उल्कांचे तांबडा, पिंवळा, नारिंगी, हिरवा, पांढरा निळा असे रंग आढळतात. कांहीं उल्का अगदीं बारीक असतात, तर कांहीं बऱ्याच मोठ्या असतात, कित्येकांचा खालीं येतांना प्रकाश शुक्रापेक्षां जास्त तेजस्वी दिसतो कित्येक खालीं पडते वेळीं मोठी गर्जना होते. कधीं कधीं एखादी मोठी उल्का फुटून तिच्या निरनिराळ्या लहान उल्का बनून खालीं येतात. एखादे वेळीं ह्या स्फोटाचा कडाका इतका असतो कीं, धरणीकंप होत आहे कीं काय असा भास होतो. कित्येक प्रसंगीं एखादी उल्का खालीं येऊन जमीन, पाषाण इ०चें विदारण करिते. यासच आपल्या ग्रंथांत अशनि हें नांव दिलेलें आढळतें. अशाच प्रकारच्या उल्कांची कधीं कधीं वृष्टि होते. यांसच **अशनि** किंवा **उल्कापाषाण** ह्मणतात.

आकाशस्थ गोलांच्या द्रव्यांचें ज्ञान आपणांस अशनिमुळें प्रत्यक्ष होतें. ह्मणूनच त्यांचें महत्व जास्त मानितात. अशनि मुख्यतः दोन प्रकारचे आढळतात. व दुसऱ्यांत लोखंडाचा भाग फार आढळतो.

उल्का पडतात, त्यांच्या उद्गम स्थानाविषयीं व गमन मार्गाविषयीं कांहीं नियम दिसून येत नाहीं. परंतु उल्का वृष्टींतल्या उल्कांचें गमन स्थान आकाशांत नियमीत आढळते व तें पृथ्वीच्या दैनंदिन भ्रमणाप्रमाणें आकाशांत तारांप्रमाणें फिरतें. नवंबरांतल्या वृष्टीचे दोन व आगष्टच्या वृष्टीचा एक असे तीन मोठे अशनि समूह आहेत. तसे निरनिराळे १०० लहान समुदाय आहेत. व ह्या प्रत्येकाचे उद्गम स्थान निराळें आढळतें. ह्या उल्का किंवा पाषाण वृष्टि संबंधानें प्रत्येक धर्माच्या राष्ट्रीय ग्रंथांत कांहींना कांहीं तरी वर्णन आढळल्या शिवाय राहणार नाहीं. व आपल्या कडील पुष्कळ ग्रंथांत माहिती सांपडेल. ती सर्व अति मनोहर आहे. परंतु येथें आपणास त्याविषयीं कांहीं कर्तव्य नसल्यामुळें आतां आपण उल्कांचा व धूमकेतूचा काय संबंध आहे ह्या कडे वळूं.

मागील भागांत बीलाचा धूमकेतू सन १८५९ सालीं पुन्हां दिसावयाचा होता, तो दिसला नाहीं. त्याचप्रमाणें त्यानें पुढें १८६५।६६ ह्यासालीं सुद्धां दर्शन दिलें नाहीं. पुढें तो सन १८७२ मध्यें दिसणार होता. तो मद्रासच्या वेध शाळेचे मुख्य प्रो० पॉगसन यांस ता० २७ नोवेंबरच्या दुसऱ्या दिवशीं अस्पष्ट ढगाप्रमाणें किंवा अशनिसमुहाप्रमाणें दिसला. त्यावर त्याचें आज पर्यंत दर्शन झालें नाहीं. वगैरे हकीकत वाचकांच्या स्मरणांत असेलच.

पृथ्वी स्वकक्षेंत ता. २७ नोवेंबर रोजीं ज्या स्थळीं असते. त्यास्थळीं ह्मणजे देवयानी तारका पुंजाजवळ या बीलाच्या धूमकेतूची कक्षा पृथ्वीच्या कक्षेस छेदिते. हल्लीं ही ता. २३ नोवेंबर

वर आली आहे. सन १८७२ च्या नोवेंबरच्या २७ व्या तारखेस याच देवयानी तारका पुंजांतून एक मोठा स्मरणीय उल्कांचा जणूं काय पाउसच पडला. ह्यावरून खवैय्यांस असें वाटलें कीं, बीलाच्या धूमकेतूच्या कक्षेंत मोठमोठाले अशनि समूह असावेत. त्यावरून खवैय्यांनीं खालीलप्रमाणें अनुमान कोंढिलें.

बीलाचा धूमकेतु नेहमीं उत्तर दिशेकडून येऊन सूर्यासन्निध जातो, तेव्हां त्याचें सूर्यापासून वें अंतर सरासरी आपल्या पृथ्वी-इतकेंच असतें. नंतर खीपासून तो दूर दक्षिणेकडे जातो व अशनि समूह सूर्याच्या असमंतात भागीं दाट पसरले असल्या कारणानें त्यांची व ह्या धूमकेतूंची टक्कर होऊन या धूमकेतूंचें रुपांतर झालें असलें पाहिजे. यावर निरीक्षकांची अशी कल्पना आहे कीं, धूमकेतू हा निराळा पदार्थ किंवा वस्तु नसून हे अशनि समूहच आहेत. ज्याप्रमाणें समुद्रावर आकाशांत पक्षी भराऱ्या मारितात, त्यांचे पंख आपणांस लांबोळे दिसतात. त्याचप्रमाणें अशनि समूह आकाशांतून भ्रमण करीत असतां, पृथ्वी विशिष्ट स्थलीं आल्याबर आपणांस दृष्टि भ्रमामुळें ह्या अशनि समूहास शेंडी दिसूं लागते. व त्यासच आपण धूमकेतु ह्मणूं लागतों. सूर्याच्या प्रखर किरणांच्या परावर्तनानें विशिष्ट स्थानाहून या अशनि समूहास शेंपटीचा भास होतो, असें मानिलें तर त्याची लांबी ९००० मैल अथवा त्याहून जास्त मानावी लागेल. व अशनि समूहाची संख्या सूर्याजवळ अति असली पाहिजे. व ते तर असंख्य जड अप्रकाश कणांचे बनलेले आहेत. ह्मणजे सूर्यासन्निध ह्या अप्रकाश कणांची रेलचेल असून आपल्या सूर्यास रोज ग्रहण लागण्याचा कां प्रसंग येत नाहीं. ?

बीलाच्या धूमकेतूवरून अशनि समूहांचा व धूमकेतूंचा कांहीं तरी संबंध आहे असें ठरतें. व ज्या नियमित काळीं उल्कावृष्टि होतात, त्यांचे अशनि समूह धूमकेतूंच्या कक्षेंत फिरतात. असें आढळण्यांत आहे. व ही गोष्ट प्रथम सन १८९६ च्या सुमारास लक्षांत आली. इ० स० १८६६ च्या सुमारास टेंपलचा धूमकेतू सूर्यासन्निध आला. ह्याचा प्रदक्षिणाकाळ ३३। वर्षांचा आहे. या धूमकेतूच्या कक्षेचा नीचींचा बिंदु प्रजापतीच्या कक्षेच्या थोडा बाहेर आहे. व याच कक्षेंतून ता० १३ नोवेंबर रोजीं उल्कावृष्टि होणारा अशनि समूह फिरत आहे. पृथ्वीची कक्षा व या अशनि समूहाची कक्षा ह्यांचे छेदन बिंदूपाशीं आपली पृथ्वी ता. १३ नोवेंबर रोजीं येते. व हा अशनि समूह सर्वत्र सारखा पसरलेला नाहीं. फक्त १५ व्याथीं आहे. ह्मणून हा जेव्हां छेदन बिंदूजवळ येतो, त्या वेळीं पृथ्वीवर उल्कांचा पाऊस ह्या ठिकाणांतून पडतो. व ही वृष्टि दर ३३ वर्षांनीं दोन तीन वर्षे एकसारखी होते. या छेदन बिंदूस ७० वर्षांत १ अं. गति असल्या कारणानें पुढें जातो. ह्मणजे ७० वर्षांनीं वृष्टि १ दि. पुढें जाते. या नियत कालिक उल्का वृष्टिबद्दलचे लेख सरासरी १४०० वर्षांपर्यंत गोळा आढळतात. टेंपलचा धूमकेतू प्रजापति (हर्शल) च्या आकर्षणानें आपल्या सूर्यमालेंत इ० स० १८६६ मध्यें आला असावा. व पुढें थोड्या काळांतच ही वृष्टि होण्यास सुरुवात झाली पाहिजे. ही वृष्टि इ० स० १८९९।१९०० या सालीं झाली. व पुढें १९३२ मध्यें होईल.

आगष्ट महिन्यांत जी उल्कावृष्टि होते. तिचा अशनि समूह १८६२ मध्यें दिसलेल्या धूमकेतूच्या कक्षेंत फिरत आहे व त्याचा

प्रदक्षिणाला १२९ वर्षांचा आहे. हा अशनिसमूह कक्षेच्या सर्व भागीं पसरल्यामुळें ही वृष्टि दरसाल होते. व हा अशनि समूह आपल्या सूर्यमालेंत ३५ हजार वर्षें असावा असा अंदाज आहे. नोवेंबरच्या २७ व्या तारखेस जी उल्कावृष्टि होते. तिचा अशनि समूह बीलाच्या धूमकेतूच्या कक्षेंतून भ्रमण करीत असलेला आढळतो. ह्या धूमकेतूचा भ्रमण काळ ६ व. व २२६ दि. आहे. ही वृष्टि नवीनच सुरु झाली असल्या कारणानें खगोल शास्त्राच्या इतिहासांत अति महत्वाची गोष्ट आहे. ही वृष्टि पुन्हा १९१२ च्या सुमारास व्हावी असें वाटतें. वरील सर्व विवेचना वरून उल्कावृष्टींचा व धूमकेतूंचा निकट संबंध आहे हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. प्राचीन काळापासून असे नियतकाळीं उल्कावृष्टि करणारे अनेक अशनि समूह असले पाहिजेत. उल्कावृष्टि होऊन त्यांतले अशनि समूह नाहींसे होत असावेत. व कांहीं राहिलेले रोज आपणांस उल्कारूपानें पडतांना दिसतात. व ह्या उल्कावृष्टींशीं संबंध असणारे धूमकेतू बीलाच्या धूमकेतुप्रमाणें नाहींसे होत असले पाहिजेत.

शुकदहनबंधुजीवकलाक्षा क्षतजोपमाहुताशहृताः ॥
आग्नेय्यां दृश्यंते तावंतस्तेपि शिखि आपदाः ॥

कीर, अग्नि, दुपारीचें पुष्प (हें तांबडें असतें) लाख, रक्त यांसारखे आग्नेयीस दिसणारे पंचवीस अग्निपुत्र धूमकेतू दृष्टिगोचर झाले तर अग्नीपासून भय होतें. त्यांतून एकच दृष्टिगोचर होतो.

विंशत्यधिकमन्यच्छमग्ने विश्वरूपसंज्ञानां
तीव्रानलभयदानां ज्वालामालाकुलतनूनां ॥

एकशेंवीस विश्वरूपसंज्ञक अग्निपुत्र केतु ज्वालांनीं तप्त देह असे आहेत. ते तीव्र अग्निभय देणारे आहेत.

वक्रशिखा मृत्युसुता रूक्षाः कृष्णाश्च तेपि तावंतः ॥
दृश्यंते याम्यायां जनमरकावे दिनस्तेच ॥

वांकड्या शिखांचे, रखरखीत, कृष्णवर्ण असे मृत्युपुत्र असे पंचवीस केतु आहेत. ते दक्षिण दिशेकडे दिसतात. हेही लोकांस मृत्युकारक होंत.

श्यामारुणा विताराश्चाभररूपा विकीर्ण दीधितयाः ॥
अरुणाख्या वायोः सप्तसप्ततिः पापदाः पुरुषाः ॥

श्यामलोहितवर्ण, तारारहित, चवरीसारखे व पसरलेल्या किरणांचे अरुणसंज्ञक वायुपुत्र रूक्ष असे ७७ आहेत ते अशुभ होत.

तारापुंजविकाशा गणकानाम प्रजापतेरष्टौ ॥
द्वेचशतेचतुरधिके चतुरस्त्रावब्रह्मसंताना: ॥

नक्षत्रसमुदायासारखे, गणक नामक आठ प्रजापतिपुत्र केतु ते अशुभ होत. दोनशेंचार चतुरस्र (चौकोनी) ब्रह्मपुत्र केतु आहेत ते अशुभ होत.

कंकानाम वरुणजाद्वात्रिंशद्वंशगुल्म संस्थानाः ॥
शशिवत् प्रभासमेता रक्तीव्रफलाः केतवः प्रोक्ताः ॥

कंकनामक वेळूच्या बेटासारखे चंद्रासारख्या तेजाचे बत्तीस वरुणपुत्र केतु आहेत ते फार कडक फल उत्पन्न करितात.

षण्णवतिः कालसुताः कबंधसंज्ञाः कबंधसंस्थानाः ॥
चंडा भयप्रदः स्युर्विरूपतारास्च ते शिखिनः ॥

छिन्नमस्तक, कबंधसंज्ञक, भयंकर, अस्पष्ट तारेचे ९६ कालपुत्र केतु आहेत ते भय देणारे होत.

शुक्ल विपुलैक तारा नवविदिशां केतवः समुत्पन्नः ॥
एवं केतुसहस्रं विशेषमेषामतो वक्ष्ये ॥

श्वेतवर्ण, व मोठा एकच तारा आहे ज्यांचा असे, अंतराल दिशेचे पुत्र नऊ आहेत. ते दृष्टिगोचर झाले तर भय देणारे होत याप्रमाणें हजार केतु सांगितले.

उदगायतो महान् स्निग्धमूर्ति परोदयीवसाकेतुः ॥
सद्यः करोति मरकं सुभिक्षमप्युत्तमं कुरुते ॥

उत्तर दिशेस दीर्घ, अतिस्थूल, स्वच्छ, पश्चिमेस उदय पावणारा, वसासंज्ञककेतु पाहिला असतां त्याच दिवशीं महामारी इत्यादि रोग उद्भवतात. व उत्तम सुभीक्षही होतें.

तल्लक्षणोस्थिकेतुः सुतुरुक्षः क्षुद्भयावहः प्रोक्तः ॥
स्निग्धस्तादृक्प्राच्यां शस्त्राख्यो उमरमरकाय ॥

अस्थिकेतु नामक व साकेतूच्या लक्षणांनीं युक्त रुक्षरंगीत हा दुर्भिक्षकारक आहे वसाकेतूसारखाच निर्मल देह पूर्वेस दिसणारा शस्त्रकेतु नांवाचा केतु युद्ध व महामारी करणारा होय.

दृश्योमावास्यायां कपालकेतुः सधूम्ररश्मिशिखः ॥
प्राङ् नभसोर्धविचारी क्षुन्मरकावृष्टिरोगकरः ॥

धूम्रवर्ण शिखांचा कपालकेतु अमावास्येस पूर्व दिशेकडे आकाशाच्या अर्धामध्यें दिसतो व तो दुर्भिक्ष, महामारी, अवर्षण आणि रोग यांची वृद्धि करितो.

प्रागैशानरमार्गेशूलाग्रः श्यामरूक्षताम्रार्चिः ॥
नभसस्त्रिभागगामी रौद्रइति कपालतुल्यफलः ॥ १९

पूर्वेकडे अग्निवीथींत पूर्वाषाढा व उत्तराषाढा यांचे जवळ शूलाकृति शेंड्या असलेला धूम्रवर्ण, रूक्ष व ताम्रवर्णाचा, आकाशाच्या तीन भागांत फिरणारा रौद्रनामक केतु कपालकेतु सारखींच फलें उत्पन्न करितो.

अपरस्यां चलकेतुः शिखयायाम्याग्रयांगुलोच्छ्रितया ॥
गच्छेद्यथायथोदक् तथा तथा दैर्घ्यमायाति ॥

सप्तमुनीन्संस्पृश्यध्रुवमभिजितमेवच प्रतिनिवृत्तः ॥
नभसोर्धमात्रमित्वा याम्येनास्तंसमुपयाति ॥
हन्यात्प्रयागकूलाद्यावदवंतींच पुष्करारं ॥
उदगपिच देवि्कामपि भूयिष्ठं मध्यदेशाख्यं ॥
अन्यानपिच सदेशान् क्वचित् क्वचिद्वातिरोगदुर्भिक्षैः ॥
दशमासान् फलपाकोस्य कैश्चिदष्टादशप्रोक्तः ॥

चलकेतु, पश्चिम दिशेस एक अंगुल उंच व दक्षिणेकडे अग्र आहे असा शिखेनें युक्त दिसतो. तो जसजसा उत्तरेकडे जाईल तसतसा लांब होतो. तो सप्तर्षि, ध्रुव व अभिजित् नक्षत्रास स्पर्श करून मागें फिरतो आणि आकाशाच्या अर्ध्याभागांत जाऊन दक्षिणेस अस्त पावतो. हा चलकेतूचा अनुभव दहा महिन्यांनीं येतो, कित्येक गर्गादि मुनि १८ महिन्यांनीं येतो असें ह्मणतात.

प्रागर्धरात्रदृश्यो याम्याग्रः श्वेतकेतुरन्यश्च ॥
कइतियुगाकृतिरपरेयुगपत्तौ सप्तदिनदृश्यौ ॥ २०

स्निग्धौ सुभिक्षशिवदावयाधिकं दृश्यतेकनामायः ॥
दशवर्षाण्युग्रतापं जनयतिशस्त्र प्रकोपकृतं ॥ २१

दक्षिण दिशेस शिखा असलेला श्वेतकेतु मध्यरात्री पूर्वी दिसतो व दुसरा कनामक केतु युगासारखा—जोखडासारखा—पश्चिमेस दिसतो. हे दोन्ही एका काळीं सात दिवस दृष्टीस पडतात. ते अतिनिर्मल, सुभीक्ष व कल्याण करितात. जर कदाचित् क—केतु सात दिवसापेक्षां अधिक दिवस दृष्टीस पडेल तर १० वर्षे पर्यंत लढाया व शस्त्रप्रकोपानें देश त्रस्त होतो.

श्वेत इतिजटाकारो रूक्षः श्यामो वियत्त्रिभागगतः ॥
विनिवर्ततेपसव्यं त्रिभागशेषाः प्रजाः कुरुते ॥ २२

श्वेतकेतु जटाकार असून रखरखीत, धूम्रवर्ण, आकाशाच्या तीन भागांत फिरणारा असा आहे. तो जर अपसव्य (उलट) फिरेल तर ३ प्रजेची हानि होते.

आधूम्रयातुशिखया दर्शनमायाति कृत्तिकासंस्थः ॥
ज्ञेयः सरश्मिकेतुः श्वेतसमानं फलं धत्ते ॥ २३

स्वल्प धूम्रवर्ण शिखेनें दृष्टीस पडणारा व कृत्तिका नक्षत्रा जवळ राहणारा असा रश्मिकेतु पूर्वी सांगितलेल्या श्वेतकेतूसारखें फल उत्पन्न करितो.

ध्रुवकेतुर नियतगति प्रमाणवर्णाकृतिर्भवति विष्वक् ॥
दिव्यांतरिक्षभौमो भवत्ययं स्निग्ध इष्टफलः ॥ २४
सेनांगेषुनृपाणां गृहतरुशैलेषु चापिदेशानां ॥
गृहिणामुपस्करेषुच विनाशिनां दर्शनं याति ॥ २५

ध्रुवकेतु गमन, प्रयाण—स्थूलसूक्ष्मादि- श्वेतादि वर्ण व आकृति

याहीं करून अनिश्चित वं आसमंतात् होणारा होय. हा दिव्य, अंतारक्ष व भौम असा होतो. हा निर्मल असून शुभ फल देतो. हा ध्रुवकेतु नाश पावणाऱ्या राजांच्या सेनांगांत व नाश पावणाऱ्या देशांतील गृहें, वृक्ष, पर्वत यांवर आणि गृहस्थांच्या दर्वी, शूर्प, मार्जनी इत्यादिकांच्या ठायीं दृष्टीस पडतो. ह्मणजे ज्या स्थळीं हा दिसतो तेथें नाश होतो.

कुमुद इतिकुमुदकांतिर्वारुण्यां प्राक्शिखोनिशामेकां ॥
दृष्टः सुभिक्षमतुलं दशकिलवर्षाणि स करोति ॥

कुमुदकेतु श्वेतवर्ण, पश्चिमेकडे पूर्वाशीख असा एक रात्र दृष्टीस पडतो. याचें फल दहा वर्षे सुभिक्ष होईल.

सुकृदेकयामदृश्यः सुसूक्ष्मतारो परेण मणिहेतुः ॥
रुज्वीशिखास्य शुक्लास्तनोदताक्षीरधारेव ॥
उदयन्नेवसुभिक्षं चतुरो मासान् करोत्यसौ सार्धान् ॥
प्रादुर्भावं प्रायः करोतिचक्षुद्रजंतूनां ॥

मणिकेतु पश्चिमेकडे एक प्रहरपर्यंत एकदां दिसणारा आहे. हा अतिसूक्ष्म तारायुक्त व जशा स्तनांतून निघालेल्या दुधाच्या धारा सरळ आणि श्वेत असतात त्याचप्रमाणें शिखा असलेला असा आहे. याचा उदय झाला ह्मणजे साडेचार महिने सुभिक्ष होतें व क्षुद्र जंतूंची उत्पत्ति होते.

जलकेतुरपिच पश्चात्स्निग्धः शिखया परेण चोन्नतया ॥
नवमासान्सुभिक्षं करोति शांतिं च लोकस्य ॥

पश्चिमेकडे उंच अशा शिखेचा निर्मल देह असा जलकेतु

पश्चिमेकडे दृष्टिगोचर होतो. तो दृष्टीस पडला तर नऊ महिने सुभिक्ष करतो व लोकांचें कल्याणहि करितो.

भवकेतुरेकरात्रं दृश्यः प्राक् सूक्ष्मतारकः स्निग्धः ॥
हरिलांगूलोपमया प्रदक्षिणा वर्तया शिखया ॥
यावंत एव मुहूर्तान् दर्शनमायाति निर्दिशेन्मासान ॥
तावदतुलं सुभिक्षं रूक्षे प्राणांतिकान् रोगान ॥

पूर्व दिशेस एक रात्र दिसणारा तारा लहान असलेला, निर्मल देह युक्त, सिंहाच्या पुच्छासारखी व प्रदक्षिण फिरलेल्या शिखेनें युक्त असा भवकेतु जितके मुहूर्त दृष्टीस पडतो तितके महिने फारच सुभिक्ष होईल. व तोच केतु रुक्षरश्मीत असेल तर प्राणनाशक व भयंकर रोग उत्पन्न होतात.

अपरेणपद्मकेतुर्मृणालगौरो भवेन्निशामेकां ॥
सप्तकरोति सुभिक्षं वर्षाण्यति हर्षयुक्तानि ॥

श्वेतवर्ण पद्मकेतु पश्चिमेकडे एक रात्र दृष्टीस पडतो व त्या योगाने सात वर्षे सुभिक्ष होऊन सर्वांस हर्षित करितो.

आवर्त इति निशार्धे सव्यशिखोरुणनिभो परे स्निग्धः ॥
यावत् क्षणान् सदृश्यस्तावन्मासान्सुभिक्षकरः ॥

निर्मल देहयुक्त, आरक्त, सव्यशिख असा आवर्तकेतु मध्यरात्रीस दृष्टीस पडतो. तो जितके मुहूर्त दृष्टीस पडतो तितके महिनें सुभिक्ष करितो.

पाश्चात्संध्याकाले संवर्तोनामधूम्रताम्रशिखः ॥
आक्रम्य वियत् त्रंशं शून्य प्रावस्थितो रौद्रः ॥

यावंत एवमुहूर्तान् दृश्यो वर्षाणि हंति तावंति ॥
भूपान् छस्त्रनिपातैरुदयर्क्षचापिपीडयति ॥

धूम्रवर्ण असून तांबड्या शिखांचा, आकाशाचा तिसरा भाग व्यापून राहणारा (३० अंश लांब पसरलेला शूलासारखा (त्रिशिख) भयंकर असा संवर्तकेतु संध्याकाळीं पश्चिमेकडे जितके मुहूर्त दिसतो तितकीं वर्षें लढाया होऊन राजांचा नाश होतो व ज्या नक्षत्रीं उदय होतो तें नक्षत्र दूषित होतें.

अश्विन्यामश्मकपं भरणीषु किरातपार्थिवं हन्यात् ॥
बहुलासुकलिंगेशं रोहिण्यां शूरसेनपतिं ॥

अधूम केतूनें अश्विनी नक्षत्र आधूमित (त्याजवर शिखा गेलेली) किंवा स्पृष्ट (धूमकेतूच्या शिखा नक्षत्रास लागलेल्या) असतां अश्मक (सूर्यवंशांतील) राजाचा नाश होतो. भरणी नक्षत्र आधूमित किंवा स्पृष्ट असतां किरात राजाचा नाश होतो. कृत्तिका नक्षत्र आधूमित किंवा स्पृष्ट असतां कलिंग राजाचा नाश होतो. रोहिणी नक्षत्र असतां शूरसेन राजाचा नाश होतो.

औशीनरमपिसौम्येजलजाजीवाधिपं तथार्द्रासु ॥
आदित्ये इमकनाथं पुष्ये मगधाधिपं हन्ति ॥

मृगशीर्ष नक्षत्र अधूम केतूनें आधूमित किंवा स्पृष्ट असतां उशीनर देशाच्या राजाचा नाश होतो. आर्द्रा नक्षत्र आधुमित किंवा स्पृष्ट असतां मत्स्यादि जलज प्राण्यांवर वांचणारे जे प्रान्देशवासी लोक त्यांच्या राजाचा नाश होतो. पुनर्वसु नक्षत्र आधुमित किंवा स्पष्ट असतां अश्मक राजाचा नाश होतो. पुष्य नक्षत्र असतां मगध देशाच्या राजाचा नाश होतो.

असिकेशं भौजंगेवित्र्येगं पांड्यनाथमपि भाग्ये ॥
औज्जयनिकमार्यम्णे सावित्रे दंडकाधिपतिं ॥

आश्लेषा नक्षत्र आधूमित किंवा स्पृष्ट असतां असिक राजाचा नाश होतो. मघा नक्षत्र असतां अंगदेशच्या राजाचा नाश होतो. पूर्वा नक्षत्र आधूमित किंवा स्पृष्ट असतां पांडय देशच्या राजाचा नाश होतो. हस्त नक्षत्र आधूमित असतां दंडकारण्याच्या राजाचा नाश होतो.

चित्रासु कुरुक्षेत्राधिपस्य मरणं समादिशेत्तज्ज्ञः ॥
काश्मीरककांबोजौ नृपतीप्राभंजनेनस्तः ॥

चित्रा नक्षत्र आधूमित किंवा स्पृष्ट असतां कुरुक्षेत्राच्या राजास मरण. केतुफल जाणणारानें सांगावें. स्वाती नक्षत्र असतां काश्मीर व कांबोज देशांचे राजे नाहींसे होतात.

इक्ष्वाकुरलकनाथौ हन्येते यदि भवद्विशाखासु ॥
मैत्रे पुंड्राधिपतिर्ज्येष्ठास्वथसार्वभौमवधः ॥

विशाखा नक्षत्र आधूमित किंवा स्पृष्ट असतां इक्ष्वाकु राजा व अलका नगरीचा राजा यांचा नाश होतो. अनुराधा नक्षत्र आधूमित किंवा स्पृष्ट असतां पुंड्र देशाच्या राजाचा नाश होतो. ज्येष्ठ नक्षत्र असतां सार्वभौम राजाचा नाश होतो.

मूलेंध्रमद्रकपती जलदेवेकाशिपो मरणमेति ॥
यौधेयकार्जुनाय न शिविचैद्यान् वैश्यदेवेच ॥

मूळ नक्षत्र केतूनें आधूमित किंवा स्पृष्ट असतां आंध्र व मद्र या देशांच्या राजांचा नाश होतो. पूर्वाषाढा नक्षत्र आधूमित किंवा स्पृष्ट असतां काशिराजाचा नाश होतो. उत्तराषाढा नक्षत्र असतां यौधेयक, आर्जुनायन, शिबि व चैद्य या राजांचा नाश होतो.

हन्यात्कैकयनाथं पांचनंदं सिंहलाधिपं वांगं ॥
नैमिषनृपं किरातं श्रवणादिषु षट्स्विमान् क्रमशः ॥

श्रवण नक्षत्र आधूमित किंवा स्पृष्ट असतां कैकय राजाचा, धनिष्ठा नक्षत्र असतां पांचनंद राजाचा, शततारका नक्षत्र असतां सिंहल देशच्या राजाचा, पूर्वाभाद्रपदा नक्षत्र आधूमित किंवा स्पृष्ट असतां अंग देशच्या राजाचा, उत्तराभाद्रपदा नक्षत्र असतां नैमिषारण्याच्या राजाचा, रेवती नक्षत्र असतां किरात देशच्या राजाचा नाश होतो.

उल्काभिताडितशिखः शिखीशिवः शिवतरोभिवृष्टोयः ॥
अशुभः स एव चोलावगाणसित हूण चीनानां ॥

उल्केनें ताडीत आहेत शिखा ज्याच्या असा केतु शुभ होय. व जो दृष्टीस पडतांच वृष्टि होते तो तर अति शुभ होय. पूर्वोक्त केतु चोल, अवगाण, सित, हूण, चीन या देशच्या लोकांस अशुभ होय.

नम्रायतः शिखिशिखाभिसृतायतोवा
ऋक्षंच यत्स्पृशति तत्कथितांश्च देशान् ॥
दिव्यप्रभावनिहतान् सयथागरुत्मान्
भुंक्ते गतो नरपतिः परभोगिभोगान् ॥

ज्या दिशेकडे केतूच्या शिखा नम्र झाल्या किंवा ज्या दिशेस गेल्या त्या दिशेकडे गेलेला किंवा शिखांनीं ज्या नक्षत्रास स्पर्श केला त्या नक्षत्राच्या वक्षमाण दिशेकडे गेलेला राजा उत्तम पराक्रमानें शत्रु मारून देशातें उपभोगितो. जसा गरुड सर्प खातो तसा शत्रूस मारून राज्य भोगितो.

यावंत्यहानि दृश्यो मासास्तावंत एव फलपाकः ॥
मासैरब्दांश्च वदेत्प्रथमान्नक्षत्रयात्परतः ॥

जितके दिवस केतु दिसेल तितके महिन्यांनीं फल होईल. तें जितके महिने दिसेल तितक्या वर्षांनीं फल होईल तें फल केतु दृष्टिगोचर झाल्यापासून ४९ दिवसांपुढें महिने किंवा वर्षें जाणावीं.

या प्रमाणें आपल्या प्राचीन ग्रंथांत धूमकेतूविषयीं विवेचन केलेलें वाचकांपुढें थोडक्यांत ठेविलें आहे. यावरून व हल्लीं धूमकेतूचा जो इतिहास प्रसिद्ध आहे त्यावरून प्राचीन ज्योतिष्यांनीं नांवें दिलेल्या धूमकेतूंस पाश्चात्य ज्योतिष्यांनीं कोणत्या नांवानें त्यांस संबोधिलें आहे हें ठरविणें जास्त महत्वाचें आहे. धूमकेतूवर गार्गी, पराशर, असित, देवल या ऋषींनीं व अन्य ऋषींनीं बरेंच विवेचन केलें आहे असें वराहमिहिर आपले बृहत्संहितेंत म्हणतो. आतां आपण पुढील भागांत पाश्चात्य ग्रंथकार फलदृष्ट्या धूमकेतूंचा कसा विचार करितात या भागाकडे वळूं. या विषयावर पूर्ण विवेचन करितां येणें कठीण आहे. कारण, त्याला मेदिनीय फलज्योतिषाची बरीच माहिती असली पाहिजे. त्या खेरीज पूर्ण विवेचन करितां येणें शक्य नाहीं.

प्राचीन व मेडिव्हल फलज्योतिषी धूमकेतूवरून पुढील गोष्टींविषयीं भविष्य जाणतां येतें असें मानीत असत. त्यांचे फलासंबंधी नियम ग्रहणें व मोठ्या गोलांच्या युति यांप्रमाणेंच आहेत. म्हणजे जर सूर्य किंवा चंद्र यांचें ग्रहण किंवा दोन गोलांची युति एखाद्या विशिष्ट राशींत झाल्यास त्या राशिदर्शक देशांत किंवा शहरांत विशिष्ट परिणाम घडतात तसेंच धूमकेतु विशिष्ट राशींत-

दिसले असतां त्या राशींचे दर्शक देशांत किंवा शहरांत राशिधर्मान्वयें संकटें किंवा अरिष्टें उत्पन्न होतात. कोणत्याही दोन किंवा अधिक गोलांची युति ज्या काळीं होते त्या वेळची किंवा ग्रहणें ज्या काळीं लागतात त्या काळची कुंडली जशी जास्त महत्वाची मानून विचारांत घ्यावी लागते त्याच प्रमाणें केतूचे इष्ट स्थळीं प्रथम जेव्हां दर्शन होतें त्या काळचा कुंडलीचीं फलें वर्तवितांना विचार केला पाहिजे. वरील दिलेल्या प्रश्नात फलशास्त्रवेत्त्यांचे नियम व त्या प्रमाणेंच धूमकेतू जेव्हां दिसले त्या वेळचा इतिहास वाचकांस धूमकेतूचा फलादेश जाणण्यास पुष्कळच मदत करील असें वाटतें.

अलबुमाझर व जंकटीनस यांचें मतें धूमकेतु जेव्हां पहिल्यानें मेष राशींत दिसतात तेव्हां पूर्वेकडील भागांतील सरदार, दरकदार, अमीरउमराव यांस अरिष्ट दर्शवितात. व या राशीच्या दर्शक देशांत अगर शहरांत अनावृष्टि होऊन जिकडे तिकडे पाण्याचा हा-हा-कार उडतो. इ० स० १८७० मध्यें मेष राशींत एक धूमकेतु दिसला (या राशीचा अंमल जर्मनीवर आहे) तो तिसरा नेपोलियन याचे जन्मकालीन सूर्य व मंगळ यांचे विषुवांशांवर दिसत होता. यावर्षी यूरोपमध्यें जिकडे तिकडे अवर्षण पडलें होतें. सन १८७० मध्यें जुलई महिन्यांत अनर्थकारक अशी फ्रेंन्कोजरमन लढाई सुरू झाली. लगेच पुढील सपटंबर महिन्यांत लुत्रास नेपोलियन हा सेडन येथें प्रशियाचे राजाचे स्वाधीन झाला.

इ० स० १८५९ मध्यें डोनॅटीचा धूमकेतु दिसत होता. हें

वर्ष हिंदुस्थानचे इतिहासांत प्रसिद्धच आहे! लगेच १८१९ चे सुमारास इटालींत लढाई सुरू झाली. इ० स० १८६१ मध्यें एक धूमकेतु मिथुन राशींत दिसत होता. (ही रास लंडन किंवा यूनायटेड्स्टेटची आहे) लंडन शहरांत दोन शतकांत झाला नाहीं असा अग्निप्रलय याच वर्षांत झाला. आणि याच वर्षी उत्तर अमेरिकेंत सिव्हिल वारचा धुमाकुळ माजला,

इ० स० १८८१ मध्यें तीन धूमकेतु दिसत होते. यांपैकीं १८८१ चा बीनाचा सर्वांत मोठा धूमकेतु ता. २२ मे रोजीं मिथुन राशीच्या दुसऱ्या द्रेष्काणमध्यें दिसत होता. ता. २ जुलई १८८१ रोजीं अमेरिकेतील यूनायटेडस्टेटमधील प्रेसिडेंटचा गोळी घालून खून करण्यांत आला. हा धूमकेतु दिसला नाहीं तोंच मोठालीं वादळें, तुफानें व ज्वालामुखीचे उद्रेक सुरू झाले. मिथुन राशींत धूमकेतु दिसूं लागला तर खालीलप्रमाणें फळें मिळतात, असें प्राचीन ग्रंथकारांचें मत आहे. "भयंकर सोसाट्याचा वारा, तुफानें व प्रख्यात माणसास मृत्यु दर्शवितो."इ०स० १८८१ चा सी धूमकेतु मिथुन राशीच्या दुसऱ्या द्रेष्काणमध्यें उदय पावला. व इंग्लंड, फ्रान्स, आस्ट्रिया आणि उत्तर अमेरिका इ० देशांत जून महिन्यांत अतिभयंकर उन्हाळा भासला. इ० स० १८८१ चा बी धूमकेतु अमेरिकेचे संयुक्त प्रांताचे प्रेसिडेंट मि. गारफिल्ड यांच्या दशमांत उदय पावला होता. हे सर्व धूमकेतु मिथुन राशींत दिसतात न दिसतात तोंच अमेरिकेंतील युनायटेडस्टेट त्यांच्या मृत्युमुळें शोकसागरांत बुडालें व थोड्याच काळांत जंगलास आग लागून जिकडे तिकडे हाहाकार उडाला.

इ० स० १८३३ च्या सुमारास हॅलेचा धूमकेतु दिसणार होता. त्या वर्षी पहिला झाडकील (कामोडर मारीसन) यानें आपले त्या वर्षीचे पंचांगांत हॅलेच्या धूमकेतूविषयीं थोडी माहिती दिली आहे, ती वाचकांस हल्लीं दिसणाऱ्या त्याच धूमकेतूचा फलादेश जाणण्यास पुष्कळ मदत करील म्हणून देण्याचें योजिलें आहे.

"इ० स० १२३१ मध्यें जानेवारीचे ३० व्या तारखेस हॅलेचा धूमकेतु नीचीं होता, व तो आपले सूर्यमालेंत सरासरी चार वर्षें होता. हा काल बराच महत्वाचा व स्मरणीय झाला. अ. फॉरस्टर म्हणतात, प्राणघातक साथीचे रोगानें इटाली. डेनमार्क व फ्रान्स या देशांत कहर झाला व जिकडे तिकडे शहरें ओसाड पडलीं. ही स्थिति सरासरी ३ वर्षें म्हणजे १२३० पासून १२३३ पर्यंत होती. इंग्लंडमध्यें भयंकर दुष्काळ पडला! सुमारें वीस हजार माणसें अन्न अन्न करीत मेल्याचा दाखला आढळतो. इ० स० १२३० चे उन्हाळ्यांत व शरदतूंत फारच भयंकर उष्णता भासली. रोममध्यें पाण्याचे भयंकर पूर आले व व लगेच साथीचे रोगांनीं कहर उडविला. ही स्थिति चार वर्षेपर्यंत होती. नंतर सरते शेवटचे हिवाळ्यांत भयंकर हिम पडून जिकडे तिकडे शांतता झाली.

या धूमकेतूचा प्रदक्षिणाकाळ ७५॥ वर्षांचा असल्या कारणानें इ० स० १३०६ चे शेवटीं दिसला असला पाहिजे. परंतु या बद्दल कोठें खात्रीलायक माहिती मिळत नाहीं. इ० स १३१२ त एक धूमकेतु दिसल्याचा आढळतो. या वर्षी हेक्ला नामक ज्वालामुखी पर्वताचा स्फोट झाला व बोहिमिया पोलंडमध्यें दुष्काळ

पडला. इ० स० १३१४ मध्यें इंग्लंडांत दुष्काळ पडला. या बद्दल झडकील ह्मणतो कीं, इ० स० १३०७ या वर्षी एक धूमकेतु दिसल्याचा उल्लेख आहे, यावरून १३१४ मध्यें दिसल्याबद्दल संशय उत्पन्न होता.

डाक्टर फॉरस्टर ह्मणतात, हा धूमकेतु आपल्या सूर्यमालेंत पृथ्वीजवळ येऊं लागतांच जिकडे तिकडे महामारीच्या उपद्रवानें लोक त्रस्त झाले व जर्मनींमध्यें प्लेगनें बराच धुमाकुळ मांडला. इ० स० १३८१ मध्यें एटना नांवाच्या ज्वालामुखीचा स्फोट झाला व इ० स० १३८२ या वर्षी जिकडे तिकडे भयंकर शांतता दिसूं लागली.

इ० स० १४५६ मध्यें हॅलेचा धूमकेतु ८ जानेवारीचे सुमारास नीचीं आल्यानंतर सूर्यास वळसा घालून गेला. त्याच वर्षी इटाली येथें मोठा भूकंप होऊन बीस हजार माणसें मृत्युमुखीं पडलीं.

ता. १ सपटंबर १४३० रोजीं कॅबागुमा येथें समुद्रास नेहमीपेक्षां चार वांत जास्त पाणी चढलें. सर्व यूरोपभर भयंकर तापाची साथ पसरली व लगेच प्लेगची धाड सुरू झाली. एटना ज्वालामुखीचा पुन्हा स्फोट झाला. १५२९ मध्यें बासील येथें, १५३० त रोममध्यें व १५३३ मध्यें ॲन्टवर्प येथें भयंकर जलप्रलय झाले.

इ० स० १६०७ यावर्षी वातावरणांत भयंकर क्षोभ झाला होता, समुद्र व नद्या यांस भयंकर पूर आले. या वर्षी सर्व पृथ्वीवर अति भयंकर हिंवाळा भासला. सन १६०९ मध्यें लीमा येथें भूकंप झाला व एटनाचा स्फोट होऊन प्लेग झाला. इ० स०

१६०७ चे जानेवारीच्या १० व्या तारखेस सोमरसेटशायरमध्य भयंकर जलप्रलय झाला. भूकंपही पुष्कळ ठिकाणीं झाले. १६०९ चे एप्रिल महिन्याचे दुसऱ्या तारखेस ईस्ट इंडीज बेटांत ज्वालामुखीचे स्फोट झाले.

इ० स० १६८२ मध्यें पुनः हॅलेच्या धूमकेतूची स्वारी दिसूं लागली. डाक्टर फॉरस्टर ह्मणतात—या वर्षी सर्व यूरोपमध्यें प्लेगोबानें धुमाकूळ चालविला होता. आगष्ट १५ चे लायलमरक्यूरीचे अंकांत हॅले येथें प्लेगमुळे दिवसाची ३०० मृत्युसंख्या होती असें ध्वनित केलेलें आहे. प्लेगनें आलजीअर्स व स्पेन ह्याही देशांचा समाचार घेतला. मार्च्य महिन्याचे २२ वे तारखेस लंडनब्रीज येथें १२ तासांत तीन वेळ भयंकर भरती आली. सन १६८३ मध्यें १३ आठवडे धुकें दाट पसरलें होतें.

१७५७ पासून अमेरिकेंत एक प्रकारच्या साथीच्या पडशाची साथ आली. साथीचे रोग यूरोपखंडांत पसरले व आशियामध्यें प्लेग सुरू झाला. ही स्थिति सन १७६२ पर्यंत होती. याच वर्षी भयंकर धुकें पसरलें व तें ९४ दिवस होतें. या कालांत भूकंप पुष्कळ झाले. त्यांत अझोर बेटांत तर फारच झाले. सरासरी दहा हजार माणसें या भूकंपाचे उत्पातांत जिवंत पुरलीं गेलीं. जुलई ता. ९ सन १७५७ मध्यें या बेटाचीं दोन खंडें झालीं. सिरीया प्रांतांतील त्रिपोली शहरीं भूकंप झाला. दमास शहरीं या भूकंपानें सहा हजार रहिवाशांचा फन्ना पाडला. सन १७५९ चे अकटंबर पासून डिसेंबर पर्यंत दुसऱ्या बऱ्याच शहरांची भूकंपानें नासाडी झाली. पेरूमधील टुक्सीलो शहर याच वर्षाचे नवंबर महिन्यांत भूमींत गडप झालें

इ० स० १७६० अक्टंबरचे ३० व्या तारखेस पुन्हा भूकंपानें पाठ पुरविली !

धूमकेतूमुळें आपल्या पृथ्वीवर बरीच घडामोड होते असें लोक मानतात. त्यांचे मतें या वर्षी या हॅलेच्या धूमकेतूच्या पुन्हा भेटीपासून असेच कांहीं तरी उत्पात् घडतील. परंतु या धूमकेतूचे इतिहासाचें अवलोकन करितां असें ठाम मत झालें आहे कीं, धूमकेतूचे परिणाम त्याच कालांत दुसऱ्या प्रचंड ग्रहांत योगप्रतियोग होत नसतील तर विशेष महत्त्वाचे घडत नाहींत.

हल्लीं दिसत असलेला हॅलेचा धूमकेतू ज्या वेळीं हर्शलनेप्च्यून, शनिगुरु, या ग्रहामध्यें परस्पर प्रतियोग होत आहेत अशा वेळीं दिसत आहे. या कालांत काय काय घडामोडी होतात त्या आपणास पाहण्यास मिळणार आहेत. या कालांत विलक्षण घडामोडी होऊन विद्युच्छक्तींत बरीच चलाबिचल झालेली दृष्टीस पडेल.

रेमसे या प्रसिद्ध फलज्योतिष्यानें आपलें पुस्तकांत लिहिलें आहे कीं, जेव्हां धूमकेतु कुंभ राशींत दिसतो तेव्हां लढाया, रक्तपात, एखाद्या मोठ्या राजाचा मृत्यु आणि साथीचे रोग वगैरे गोष्टी घडतात. व त्या तो ज्या अंशांत उदय पावतो त्या अंशांत सूर्य जेव्हां येतो तेव्हां घडतात.

सन १९०३ या वर्षी तीन धूमकेतु दिसत होते. व सन १९०३ चा सी धूमकेतु ता. २१ जून रोजीं बरीलियानें प्रथम मार्सेलीस येथें पाहिला. त्याचे तासात्मक विषुवांश २१ ता. ५२ मि. ५२ से. होते. क्रांति ८ अं. १० क. दक्षिण होती. वरील विषुवांश कुंभेच्या २९ अं. ५८ कलेंत आहेत. ता. १६ फेब्रुवारी १९०४ रोजीं सूर्य कुंभेच्या २१ अंशांत आला. या सी धूमकेतूचा उदय होतो न होतो तोंच मंचूरियांत रसियाचे झारनें सैन्य पाठविण्यास सुरवात केली. याच काळीं कुंभेंत शनि होता. कुंभ ही रसियाची राशि मानतात. पुढील प्रकार वाचकांच्या स्मरणांतून नाहींसा झाला नसेल असें वाटतें.

असो. येथपर्यंत धूमकेतूवर जे अल्प विचार ते वाचकांचे पुढें ठेविले आहेत. धूमकेतूवर सविस्तर लेख लिहिण्याचें आमचे एका मित्रानें कबूल केलें होतें. परंतु त्यांना स्वतःला आपल्या शब्दाची खातरजमा नसल्यामुळें मीच हें काम करण्याचें ठरविलें. या लेखांत कै० शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचे पुस्तकांचा व त्यांचे चिरंजीव यांचे धूमकेतूवरील पुस्तकांचा फारच आधार घेतला आहे. वाचकांस जास्त माहिती त्यांच्या पुस्तकांत मिळेल. त्यांच्या पुस्तकांचा परवानगीशिवाय उपयोग केल्याबद्दल ते खात्रीनें रागावणार नाहींत अशी आशा आहे.

मि. आर. ए. प्राक्टर वगैरे खवेत्ते मंडळी धूमकेतूची गति स्वैर नाहीं. ती इतर ग्रहाप्रमाणें नियमबद्ध आहे, त्यांच्या स्थितिबद्दल इतर ग्रहांसारखें पूर्ण ज्ञान झालें आहे वगैरे गोष्टीबद्दल जास्त निश्चयपूर्वक बोलतात. परंतु ही सर्व अतिशयोक्ति आहे असें म्हणावें लागतें. कांहीं धूमकेतूच्या कक्षाभ्रमणमार्ग वगैरेची पूर्ण माहिती झाली आहे हें कोणीही कबूल करील. परंतु ही स्थिति सर्वत्र लागू करितां येणार नाहीं. कारण, इ० स० १९५१ मध्यें दिसलेला धुमकेतु सन १८५६ मध्यें दिसेल असें नाटिकल अल्मानाकचे माजी डिरेक्टर डाक्टर हिनु यांनीं प्रसिद्ध केलें होतें. त्याप्रमाणें ती स्वारी पुन्हा दिसलीच नाहीं. सन १८११ चा

प्रचंड धूमकेतु अझून सूर्यासन्निध आलाच नाहीं व कां आला नाहीं या विचारांतच पुष्कळ खवेत्यांची त्रेधा उडवीत आहे. त्याच प्रमाणें बीलाच्या धूमकेतूनेंहीं यःपलाय केलें आहे. लस्केलचा धूमकेतू गुरूच्या उपग्रहांत कोठें गडप झाला आहे तें तर कळ-तच नाहीं. त्याच्या योगानें उपग्रहांच्या कक्षेंत थोडा देखील फरक झालेला आढळत नाहीं. खवेत्यांनीं उल्का, अशनि व धूमकेतु यांचा कांहींतरी चमत्कारिक संबंध असला पाहिजे असें ठरविलें आहे, परंतु अद्यापि निश्चित असें कांहींच आढळत नाहीं.

फलज्योतिषाचा खून !

तूतो राम सुमर जग लरुवा दे ॥
हाती झूठत अपने गतमो, कुतर भुकत वाको भुकवादे ॥ १
"कबीर"

इंदुप्रकाशच्या ता० १५ जुलई सन १९१० च्या अंकांत **"फलज्योतिषाचें लंगडें घोडें"** या मथळ्याखालीं एक लेख प्रसिद्ध झाला आहे. लेखक जुन्नरचे कोणी 'एकनाथात्मज' या नांवानें बुरखा घेतलेले एक गृहस्थ आहेत. सदरच्या लेखामध्यें त्यांनीं फलज्योतिषाला ठार करण्याच्या इराद्यानें आपल्या मेंदूला बराचसा शीण दिलेला आहे ! या लेखामध्यें त्यांनीं जीं विधानें केलेलीं आहेत, तीं इतकीं पोरकट आहेत कीं, त्यांना उत्तर देण्याची मुळींच जरूरी नाहीं, तथापि मुळींच उत्तर न दिलें तर त्यांना आपण दिग्विजय केला असा भास होईल, ह्मणून आह्मीं त्यांस संक्षेपानें उत्तर देण्याचा विचार केला आहे. सदरचा लेख आमच्या वाचकांना अक्षरशः कळावा, ह्मणून त्याचा उतारा प्रथम खालीं देतों.

फलज्योतिषाचें लंगडें घोडें !

"अज्ञानानें जेथें शिरकाव केला तेथें तें मनुष्याकडून काय काय विचित्र कार्यें करवील, याचा थांग लागणें अतिशय दुर्घटच होयं. पण हाही सिद्धांत होऊं शकत नाहीं. अज्ञानानें ज्ञानाच्या

गैरहजिरींत घाटेल तो धुमाकूळ चालविला तरी तेथें ज्ञानरूप सूर्याच्या किरणांनीं प्रवेश करण्याचा अवकाश कीं, अज्ञानाच्या चिंधड्याच उडाल्या म्हणून समजावें! इतिहासामध्यें या गोष्टी-विषयीं हजारों उदाहरणें सांपडतील. फार कशाला, सध्या आमचा देश या गोष्टीचें उदाहरणच आहे असें म्हटलें तरी चालेल.

आमच्या देशांत आज चालत असलेले खेळखंडोबा वैदिक काळांत होते असें कोणी दाखवू शकेल काय! नाहीं. याचें कांहीं कारण असेल तर तें एकच होय, आणि मला वाटतें, तो एक वैदिक ज्ञानसूर्याचाच प्रभाव होय! जेव्हांपासून तें रत्न आमच्या हातापलीकडे झालें, तेव्हांपासूनच घोर अंधार पसरला आणि मग अंधारच तो, त्यांत ज्याला जसें वाटलें तसा त्यानें गप्पागोंधळ करण्यास सुरवात केली. आमच्यांतील गोंधळाची चाल तरी केव्हां पासूनचीच असावी व त्या गोंधळाच्या दृश्यानें जगाला आह्मी भासवीत आहोंत कीं, 'आह्मी असा हा गोंधश सुरू केला!!'

मला आज थोडें प्रस्तुतच्या ज्योतिषशास्त्राविषयीं लिहावयाचें आहे. कित्येकांच्या मतें हें एक डोळ्यांत धूळ फेंकणारें, शास्त्र आहे! आतां 'शास्त्र' आणि तें लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकणारें हा एक चमत्कारच आहे! पण याला आपण तरी काय करणार? लोकांनी वाटेल तसें लिहून ठेवून जर याला 'शास्त्र' म्हणून छान गोंडस नांव दिलें, तर तेथें आपली अशी फसवेगिरी व्हावयाचीच! ज्योतिषावर आतां आपल्या देशांतील सुशिक्षित लोकांपैकीं शंभरातून नव्वदांचा विश्वास नसावासें दिसतें. पण मजा ही आहे कीं यांच्याचकडूनही या लंगड्या घोड्याला वैरणपाणी मिळत असतें! युरोपियन लोकांत एक चाल आहे. घोडें लंगडें व निरुपयोगी

झालें म्हणजे ते लोक व्यर्थ त्याच्या आत्म्याला कष्ट देण्याच्या भानगडींत पडून त्या लंगडोबाच्या वैरणपाणी वगैरेची व्यवस्था न करितां त्यास नीट, मोक्षाची वाट दाखवितात! आमचे लोक सहसा असें करणार नाहींत. आणि ठीकच आहे. अहिंसा धर्माला अनुसरून आमच्या लोकांनीं या गोष्टींत युरोपियनांचा कित्ता गिरविणें अधर्माचाच ठरेल. परंतु ज्योतिषरूप शास्त्राचें निर्जीव मुकें घोडें जर आह्मांला लंगडें भासूं लागलें तर त्यालाही आह्मीं ठार करूं नये व आणखी त्याची जोपासनाच करीत सुटावें, ही विलक्षणता आहे.

ज्योतिषसंबंधीं हल्लींचा मनु पाहून तीन विभाग पाडतां येतील. (१) पहिल्या भागांत गणित ज्योतिष. यांत ग्रहवेधावरून त्याच्या गति वगैरे संबंधीं माहिती येत असते. याला आह्मी सत्यज्योतिष नांव देतों. (२) दुसरें फलज्योतिष. यांत मनुष्य ज्यां घटकेंत व ज्या पळांत जन्मला त्या वेळीं कोणता ग्रह कोणत्या स्थानीं होता, या गोष्टीचा जगड्वाळ हिशेब बसवून नंतर त्याचें फल काय? असल्या भ्रामक विषयाचें विवेचन असतें. याला च आपण 'जालमय ज्योतिष' असें नांव देऊं. याच्या उत्पत्तीनेंच पुढील. तिसरें ज्योतिष निर्माण झालें असून हें ठार झाल्यावांचून तेंही प्राण सोडणार नाहीं, असा पक्का मरंवस आहे, म्हणून याला दिलेलें नांव सार्थ आहे. आतां (३) तिसरे ज्योतिषशास्त्रास काय नांव द्यावें नकळे. याच्या कृतीवरून तर यास 'खादाड ज्योतिषशास्त्र' म्हटलें असतां तें बिनचूक लागू होणार आहे! यांत कोणाला कोणत्या ग्रहानें पछाडिलें व आतां कसलें दान दिल्यानें किंवा किती ब्राह्मण जेऊं घालण्यानें ग्रह संतुष्ट

होऊन मेहेरबानी करितील, असल्याच गोष्टींचा विचार केलेला असतो. ह्मणजे नामाप्रमाणें या शास्त्राची करणी बरोबर असते ! व लोकही अजून बरोबर पाळीत आहेत ? प्रथमतः आपण खादाड ज्योतिषाचा समाचार घेऊन नंतर जाळमयाकडे वळूं.

आजपर्यंत अनेक विद्वानांनीं ज्योतिषशास्त्र ह्मणजे केवळ भ्रमजाळ ठरविलेलें आहे. मनुष्याच्या उत्पत्तीचा व ज्योतिषीबावा दाखवितात या ग्रहादिकांचा अर्थाअर्थीही संबंध दिसून येत नाहीं. दहावा शनि, अकरावा मंगळ आणि बारावा बृहस्पति दाखवून ज्योतिषी लोक लांब लांब बाता भले मारोत बिचारे, परंतु खरें काय तें त्याच ज्योतिषी महाराजांच्या अंतःकरणाला माहीत असतें. पहा, शनि ह्मणून ज्योतिषी लोक एक देव सांगतात. हा देव नाहीं. व या विषयीं आमच्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांना विशेष सांगावयासही नको. ॲस्ट्रानमीचे सिद्धांत पढतांना त्यांना 'ज्योतिषीबाबाचें सांगितलेले नवग्रह' ? का ज्योतिषबाबाच स्वतः नवग्रह ? अशी भ्रान्ति पडत असावी ! त्याचप्रमाणें ज्यांना कॉलेजचा संपर्क झाला नसेल व इंग्रजी विद्या ह्मणजे म्लेंच्छविद्या वाटत असेल त्यांनीं कदाचित् आपला धर्मग्रंथ 'वेद' ह्मणून पाहिला किंवा ऐकिला तरी असेल. वेद पाहणारानांही काय आढळून येईल ? वेदांत सूर्य हा एक पृथ्वीप्रमाणेंच गोल सांगितलेला आहे. तेथें सूर्याला रथावर बसवून किंवा सूर्याचा एका 'सूर्यो' शीं पाठ लावून कोणी शनिदेवही करविलेला नाहीं ! सूर्यसिद्धांतादि ग्रंथांत तर या ग्रहाचें उत्तम रीत्या विवेचन केलेलें आहे. शुक्र ही एक पृथ्वी आहे. तीवर आपल्या येथल्या प्रमाणेंच डोंगर, झाडें, मनुष्य पश्वादि प्राणी असून सर्व व्यवहार येथल्या प्रमाणेंच आहे. 'ज्योतिर्विलास

किंवा रात्रीची चोर घटका' हा ग्रंथ करणारा आपलाच वेदानुयायी विद्वान् पंडित असून त्यानें देखील वर प्रमाणेंच साग्र माहितीनें ग्रहांविषयीं लोकभ्रमाचें छेदन केलें आहे. श्रीयुत टिळकांनींही आपल्या विद्वत्तापूर्ण ग्रंथांत ग्रहांविषयीं यथार्थता प्रगट करून लोकांची कानउघडणी केलेली आहे. पण आम्हीं खंबीर निगरगट्ट हो हो, हेंही खरें आणि नाहीं, नाहीं तेंही खरेंच. हा मंत्र मगरमिठी मारून बसलेला आहे तो आहेच बिचारा !

इंग्लंडांतून निघून अमेरिकेंत वसाहत केलेल्या आणि पुन्हां तसाच प्रसंग आल्यास पुढची वसाहत कोठें करावी ह्मणून शोध लावीत फिरणाऱ्या अमेरिकनांनीं मंगळ-लोकाशीं बोलणें लावण्याची खटपट सुरू केली आहे, हें काय आम्ही व आमचे ज्योतिषीबावा ऐकत नसतील का ? ते मंगळ महाराज मोठे चालते फिरते व क्रूर देव आहेत, तर एक दिवस सहज विमानारूढ होऊन घाडसी अमेरिकनाना 'काय ह्मणतां तर्‍ही काय ?' ह्मणून प्रश्न कां करीत नाहींत बरें ?

आतां थोडक्यांत जाळमय ज्योतिषशास्त्र याचा विचार करूं. या ज्योतिषाचा कोणाला ठोकताळा आला असावा ह्मणावें तर त्याचाही वानवाच आहे. पत्रिकेप्रमाणें एकून एक गोष्ट घडलेलीच आहे किंवा 'वर्षपट' ह्मणून ज्योतिषीबाबांनीं लिहून दिलेल्या करारनाम्याप्रमाणें आमचा अनुभव आहे का ? याचा ज्याचा त्यानें विचार करावा. बरें घटकाभर असें मानून चालूं या कीं, हे लोक ह्मणतात त्यांतील कांहींचा अनुभव येतो. पण यानें ह्मणजे हें शास्त्र खरें ठरतें हें संभवत नाहीं. शंभर धोंडे फेकल्यावर एक धोंडा नेमकाच जर निशाणाला लागला तर त्या धोंडफेक्याला कोणी निशाणबाज ह्मणणार नाहीं. तद्वतच हे जोशीबुवा.

परवांच्या कुंडलीविज्ञान नामक मासिकांत स्वतः संपादक आपल्या शास्त्राविषयीं समालोचना करीत आहेत. ते ह्मणतातः— ज्योतिष्याला संकटकाळ जितका चांगला सांगतां येईल तितका मुक्तकाल चांगला कळत नाहीं. याप्रमाणें ते आपल्या सांगण्याचे दोन भाग करितात. तुम्हांवर कांहीं तरी संकट येणार, हें मात्र आम्हांला सांगतां येतें, असें सदरहु संपादकांचें म्हणणें आहे. याच्याच पुढें ते म्हणतातः—'टिळकांचे ग्रह बिघडले आहेत, म्हणून ते संकटांत पडतील, हें ज्योतिष्यास जितकें ठासून सांगतां आलें तितका मुक्तकाळ अजमासें सांगतां आला नाहीं !..... कोणी दोन वर्षांनीं सुटतील असें ह्मणेल तर दुसरा ३ वर्षांनीं, तर चवथा पांच वर्षांनीं सुटका होण्याचें वर्तवील तर पांचवा पूर्ण कैद भोगून सुटतील असें ह्मणेल. आणि शेवटीं यांपैकीं एखाद्याचें भविष्य बरोबर उतरेल !'

यांत संपादक महाराजांनीं इतरांपेक्षां बराच प्रामाणिकपणा उपयोगांत आणिला आहे. आतां ते ह्मणतात, आह्मांला संकटकाल ठासून सांगतां येतो. पण याचाही त्यांनीं सूक्ष्म विचार केला तर आपलें शास्त्र याही उपयोगाचें नाहीं, हें त्यांना साहजिक कळून येईल. पहा, स्वतः जोशीबुवांवर हजारों संकटें येतात. पण कधीं असें प्रसिद्ध झालेलें आहे का कीं, अमक्या जोशीमहाराजांनीं अमक्या एका संकटनिवारणार्थ अमक्या प्रकारची व्यवस्था करून ठेविलेली होती. नावा बुडतांना किंवा स्टीमर लवंडतांना पुष्कळसे जोशीबुवाही समुद्रास्तृप्यंतु झालेले ऐकिवांत आहे ! हैदराबादचा जलप्रलय झाला तेव्हां त्यांत भविष्य वर्तविणारे व घोड्यार्चा सूचना देणारे 'अलार्मरूपी' १०।२० उत्तम उत्तम जोशी वाहून

गेल्याबद्दल आमच्या एका स्नेह्याचें पत्र आहे ! मग आतां संकट वर्तविण्याची आमची शक्ति आहे हें सांगणें तरी धाडसाचेंच नव्हें काय?

याच संपादक महाशयांना एकानें विचारलें होतें कीं एक मूल मेलेलेंच जन्मलें, तर याचा उलगडा काय ? त्याचें समाधान करतांना प्रथमतः तर संपादक महाराज हात टेंकतात, पण पुन्हां कंबर कसून व लंगड्या घोड्यावर स्वार होऊन ह्मणतात—आमच्या सांगण्यानें समाधान होईलच असें नाहीं, पण आम्ही सांगतोंच ! येथें ग्रह मकर राशींत २९ अंशांत आहे. सप्तम केंद्राचा आरंभ २८अंश आहे. त्याच्या अस्तकालींच मुलाचा अस्तोदय झालेला आहे !

या म्हणण्याचा विचार करण्यापूर्वी आम्हांला दुसरीकडे वळावें लागतें. कर्मानुसार ईश्वरानें या वरील अल्पायुषी प्राण्यास जन्म व मरण बरोबरच दिलें, असें अध्यात्मशास्त्राधारें बिनचूक सांगतां येतें. वरील ज्योतिषी बुवाही हिंदुधर्माच्या शृंखलेनें बद्ध असावेतच. ईश्वर कर्माची फलें स्वतः देत असतो अशी त्यांची भावना असलीच पाहिजे. मग 'ग्रहाच्या अस्तकालींच मुलाचा अस्तोदय'म्हणून ग्रहाचें घोडें मध्येंच ढकलून कर्मानुसार फल देणाऱ्या ईश्वरास कां गचांडी द्यावी बरें ? ईश्वर त्या मुलासाठीं असेंच फळ देणार म्हणून ग्रहही त्या अनुरोधानें नेमका टपून बसून अस्तोदय पावता झाला. असें तर या जोशीबुवांचें म्हणणें नसेलना ?

हिंदुस्थानची अवनति एका बाजूनेंच असेल तर शोक करावयाचा ! हिंदुस्थानांतील मनुष्यें म्हणतात, आम्हांला इंग्रजांनीं शुद्ध गुलाम बनविलें आहे. पण ही गोष्ट समोर ठेवण्यापूर्वी आपण आधीं कोणाचे गुलाम आहोंत का नाहीं याचा विचार करावयास पाहिजे. एक मनुष्य पायांनीं जावयास निघाला असतां भट्टोबानें फलाणा ग्रह मार्गीत निजला आहे असें सांगतांच यानें गांवीं जाणें ठिकाणीं राहतें. व मग त्या योगें कितीही नुकसान झालें तरी पुर-

वलें जातें! शिकंदर बादशाहा हिंदुस्थानांत लढाईस आला असतां भटजीबुवा तेथेंही आपलें ज्ञान पाजळून इकडच्या राजांस सध्या योग नसल्याचें सांगतात! जणूं कांहीं व्रतोद्यापनच करावयाचें होतें! भटजीबुवांनीं आम्हाला प्रथम आपलें गुलाम केलें आहे कीं, ज्या योगें आमची तर्कशक्ति ठार झाली असून 'धर्माच्या कामांत बुद्धि चालवूं नये' असें आमचे नेहमींचे उद्गार असतात!

आम्हीं नेहमीं सदिच्छेनें पुरुषार्थ करीत असावा, कर्मांचें फल देणारा परमात्मा आहे ही भगवदुक्ति आहे. आम्ही कर्म करणार काय व ईश्वर फल देणार काय? हें समजणारे जोशी दारोदार भीक मागत फिरतांना पाहण्याचा प्रसंग आमच्या दुर्दैवानें ओढवला नसता! तशांतून आम्हां कर्मवादी लोकांत ज्योतिषाचें बंड कसें? याचें राहून राहून आश्चर्य वाटतें. खरें ज्योतिष सूर्यसिद्धांतादि ग्रंथांत कथिल्याप्रमाणें ग्रहांचे वेध घेऊन ग्रहणें वगैरे ठरविण्याचें आहे. फलज्योतिष सर्वथा निर्मूल व लंगडें घोडें आहे. लंगडें व निरुपयोगी घोडें ठार करण्याचा आमचा धर्म नाहीं. परंतु या लंगड्या घोड्याचीं लक्षणें दुश्चिन्हें असून त्यामुळें आमचे देशबांधव व्यर्थ भ्रमांत पडून ज्ञानदेवीच्या मंदिरांत प्रवेश करण्यास पराङ्मुख होत आहेत! कोणतीही गोष्ट जोशाच्या सल्ल्याखेरीज स्वतंत्र विचारानें न करण्याची जणूं बहुजनसमाजाची प्रवृत्ति दिसते. व याचें प्रत्यंतर पहावयाचें असल्यास ज्योतिषीसंबंधी नित्य नूतन प्रसवणारीं मासिकें, पाक्षिकें बघावींत. यांनीं सरळपणा सोडून लोकांना व्यर्थ कां बहकवावें न कळे. सारांश, या सर्व गोष्टींचा विचार करून व या लंगड्या पण त्रासदायक घोड्याच्या चंदीत्र्याचा प्रश्न पुढें ठेऊन मनाला असेंच वाटतें कीं, लोकांचा लाखों रुपयांचा दाणावैरण खाणारें हें लंगडें घोडें आणखी वांचणार तरी कितीं दिवस? ॐ शांतिः! शांतिः!! शांति!!!

आज आम्हांला वरील लेखकांस उत्तर म्हणून जे चार शब्द लिहावयाचे आहेत ते एकनाथात्मजांच्या लेखाचें खंडण करण्यासाठीं नव्हे, तर नवीन पिढीनें अज्ञानानें शास्त्रादिकांचें यथार्थ ज्ञान करून न घेतां बहकून जाऊं नये अशासाठीं होत. कालेजांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्यें आमचे आचार, विचार आणि शास्त्रें हीं झूट असून निरुपयोगी आहेत, देव हे दगड आहेत, सूर्यचंद्रादि या देवता नसून पृथ्वीप्रमाणेंच मृण्मय गोल आहेत इत्यादि कल्पना साहजिक येत चालल्या आहेत. त्यांच्या मतें हिंदुस्थानांतील लोकांत फार प्राचीन कालापासून अज्ञानानें शिरकाव केलेला आहे व आम्ही आतां कालेजांतून शिक्षण घेऊं लागल्या पासून शहाणे व ज्ञानसंपन्न होऊं लागलों आहों. हा कशाचा परिणाम असेल तो असो, स्थिति मात्र आज अशी आहे यांत शंका नाहीं. परंतु मजा अशी आहे कीं, ज्या अज्ञानाच्या काळांत व्यास, वाल्मीक्यादि मुनि व कवि होऊन गेले, कालिदास—बाण—भवभूति इत्यादि कल्पक होऊन गेले, चरक, सुश्रुतासारखे रसायनशास्त्रज्ञ व औषधि शास्त्रज्ञ होऊन गेले, वराहमिहिर, ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य, गर्ग, पराशर इत्यादिकांसारखे ज्योतिषी झाले तो अज्ञानाचा काल संपून आतां कालेजांतून ज्ञानसूर्याचा उदय झाला, परी तसा एकही मनुष्य प्रसिद्धीस येऊं नये हें मोठें आश्चर्य आहे! वैदिक ज्ञानसूर्याचा प्रभाव उभय पक्षांनाही मान्य आहे, म्हणून त्याबद्दल लिहिण्याचें कांहीं कारणच नाहीं.

गीतवाद्यादि चौसष्ट कला, विमानें, दुर्बिणी, रसायनें, दिव्य वनौषधि, उंची वस्त्रें, अस्त्रविद्या वगैरेंची उत्पत्ति ज्या कालांत झाली तो काल अंधकारमय होता असें एकनाथात्मज खुशाल

म्हणोत, त्यांच्या तोंडाला कोण हात देऊं शकणार ? पण विचारवंताला त्यांच्या ज्ञानाची व पोरकट विचाराची कींव आल्यावांचून राहणार नाहीं. मोर नाचतें म्हणून लांडोरही नाचूं लागलें तर त्याचें हंसें मात्र होईल ! परकीयांनीं आमच्या शास्त्रकलादिकांबद्दल कांहींही झटलें म्हणून आपणही त्याचीच री ओढूं लागलों तर आपणाइतके ज्ञाते आपणच असें म्हणावें लागेल !

एकनाथात्मजांची देव व देवता याबद्दलची व्याख्या काय असेल ती असो ! सूर्यादि नवग्रह यांना देवाप्रमाणें मान देण्यास ते तयार नाहींत. कां, तर ते पृथ्वीसारखेच मातीचे गोल आहेत म्हणून पृथ्वीलाही ते देवता मानीत नसतील हें उघड आहे. पितृदेवो भव, मातृदेवो भव, आचार्यदेवो भव वगैरे उपदेशही त्यांना मान्य नसला पाहिजे. आई ही देवता नाहीं, ती एक इतर स्त्रियांसारखीच मनुष्य आहे, म्हणून मनुष्याला कोणी देव झटला आहे काय ! तुकाराम, रामदास हीं सर्व धडधडीत दोन पायांचीं माणसें असतां लोक त्यांना देवासारखा मान देतात, काय आश्चर्य आहे ! हिंदु लोकांत तर देवाच्या कल्पना अशा विचित्र आहेत कीं, त्यांना दगड देव, माती देव, पाणी देव, झाडें देव, नक्षत्रें देव, ग्रह देव अग्नि देव, आई-बाप-गुरु हे सुद्धां देवच वाटतात ! ते तुळशीला देव समजून तिची पूजा करितात व तिचें एका पितळेच्या मूर्तीशीं लग्न लावतात ! मातीची मूर्ति करितात व तिची मिरवणूक काढतात ! काय बेटे मूर्ख हो ! यांना काय देव म्हणजे कोण तें समजत नाहीं ! परंतु लोकांचा तरी काय इलाज ! एकनाथात्मज ज्या वेदाला पूज्य मानतात, त्याच वेदांत पुढीलप्रमाणें वचन आहे—'स भूमिं विश्वतो वृत्वाऽत्यतिष्ठद्दशांगुलम् ॥' मोरोपंत याच अनुवाद करितात—'भूजलतेजसमीरख रविशशिकाष्ठादिकीं असे भरला । स्थिरचर व्यापुनि अवघें तो जगदात्मा दशांगुलें उरला ॥' हिरण्यकश्यपूनें विचारलें, प्रल्हादा, तुझा नारायण या खांबांत आहे काय ? त्या बरोबर तो 'याही खांबांत आहे' असें निश्चयानें म्हणाला. तेव्हां रागानें हिरण्यकश्यपूनें त्या खांबावर लाथ मारतांच कडकड असा आवाज होऊन नारसिंहाची मूर्ति त्या खांबातून प्रगट झाली अशी कथा पुराणांत आहे. सारांश, ईश्वर हा प्रत्येक पदार्थमात्रामध्यें आहे हें तत्व आमच्या लोकांच्या हाडीं-मासीं खिळलेलें आहे ! एकनाथात्मज मात्र विसरले आहेत असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें.

एक जातीचा पक्षी आहे, तो रात्र झाली म्हणजे पाय वर करून विश्रांती घेतो म्हणे असें वाटतें कीं, सर्व प्राणी या वेळीं निद्रावस्थेत आहेत. तेव्हां न जाणो, हें आकाश जर कोसळलें तर काय अनर्थ होईल ? यासाठीं आपण आपले पाय वर करून ठेवावे, म्हणजे जरी तसा प्रसंग आला तरी तें आपल्या पायावर सहज तोलून धरितां येईल ! एकनाथात्मजांनींही अशाच प्रकारचा प्रयत्न केला आहे ! ! लोक जालमय ज्योतिषांत गुरफाटलेले आहेत, त्यांचा कदाचित् लवकरच अंत होईल अशा प्रकारची एकनाथात्मजांना भीति पडली, म्हणून त्यांनीं आपल्या लेखणीला हात घातला आहे ! पहावें आतां आंकाश कोसळून प्राण्यांचा नाश होतो कीं तो पक्षी तें आकाश वरचेवर पायांवर सांवरून धरतो ?

भटजीबोवांनीं आम्हांला आपलें गुलाम केलें आहे व त्या योगानें आमची तर्कशक्ति ठार झाली आहे अशी एकनाथात्मजांची तक्रार

आहे ! एकनाथात्मजांना धर्म पाहिजे असेल, पण तो हिंदुधर्म नको. कारण तो भटजीबोवांचा गुलाम झालेला आहे. त्यांना असा धर्म पाहिजे आहे कीं, वाटेल त्या वेळीं वाटेल तें कर्म करितां आलें पाहिजे. साधारणतः स्वच्छंदानें वागतां येईल असा धर्म त्यांना पाहिजे आहे. असो. आम्ही त्यांना अशी विनंति करितों कीं त्यांनीं केसरींत एक जाहिरात द्यावी. म्हणजे त्यांच्या पुण्याईनें कोणी तरी पाद्रीभट उभा राहील व गुलामगिरींतून मुक्तता करील. एरवीं दुसरा मार्ग नाहीं.

फलज्योतिष हा खेळखंडोबा असून तो वैदिककाळीं नव्हता, असा एकनाथात्मज शोध लावतात. इंदूच्या कित्येक वाचकांनीं एकनाथात्मजांची या अपूर्व शोधाविषयीं वाहवा केली असेल ! पण एकनाथात्मजांना आमच्या वेदांतलें एक अक्षर तरी समजलें असेल कीं नाहीं याची शंका वाटते ! कारण—

देवगृहा वै नक्षत्राणि । य एवं वेद । गृह्येव भवति । यानि वा इमानि पृथिव्याश्चित्राणि । तानि नक्षत्राणि । तस्मादश्लीलनाम न दिवत्रे । नावस्येन्नयजेत। यथा पापाहे कुरुते । तादृगेव तत् ॥

नक्षत्रें देवांचीं गृहें होत. जो हें जाणतो तो गृही होतो. जीं हीं पृथ्वीचीं चित्रें तीं नक्षत्रें. म्हणून वाईट नांवाच्या नक्षत्रावर एखादें कर्म संपवूं नये आणि यज्ञ करूं नये. पापकारक दिवशीं करावें.....इ०

वरील वेदवचन एकनाथात्मजांनीं पहावें व त्याचा तोच अर्थ होतो कीं नाहीं याचा विचार करावा. नक्षत्रें हीं देवांचीं घरें

आहेत, वाईट नांवाच्या नक्षत्रावर एखादें कर्म संपवूं नये इ०वचनें खेळखंडोबाचना !

उपमास्त्वबृहती रेवतिरिषोधि स्तोत्रस्य पवमान नोगहि ॥

यांत रेवतीला 'धनवती' असें म्हटलें आहे, तें कां ?

यां कामयेत दुहितरं प्रियास्यादिति ॥ तां निष्टयायां दद्यात् ॥ प्रियैव भवति ॥

कन्या पतीला प्रिय व्हावी अशी इच्छा असेल तर ती स्वाती नक्षत्रीं द्यावी म्हणजे प्रिय होते. हा वेदकालीन खेळखंडोबा पहा ! असले खेळखंडोबा वेदकालीं पुष्कळ होते. कोणतेंही कृत्य करण्यास चांगला मुहूर्त पाहिजे या समजुतीचीं वाक्यें वरींच देतां येतील.

वेदांगकालीं सुद्धां हा खेळखंडोबा होताच !

जन्म संपद्विपत्क्षेम्यः प्रत्वरः साधकस्तथा ।.....

यात जातकाला उपयुक्त असे नक्षत्रांचे नऊ वर्ग सांगितले आहेत.

ग्रहोल्काशनिनिर्घातैः कंपैर्दाहैश्च पीड्यते ॥
यद्यद्भयं भवति तत् तत्प्रवक्ष्याम्यशेषतः ॥

ग्रह, उल्का, विद्युत् इत्यादिकांनीं नक्षत्रें पीडित झालीं असतां जें भय प्राप्त होणार तें सांगतों असें म्हणून सर्व वर्गासंबंधी भयें इत्यादि सांगितलीं आहेत.

आतां महाभारताकडे पाहूं. भारतकालींही या खेळखंडोबानें आपले वर्चस्व प्रस्थापित केलेलें होतें हें खालील गोष्टींवरून दिसून येईल !

पर्वसु द्विगुणं दानमृतौ दशगुणं भवेत् ॥

अयने विषुवे चैव षडशीतिमुखेषुच ॥
चंद्रसूर्योपरागे च दत्तमक्षयमुच्यते ॥

हा भारतकाळीन खादाड ज्योतिषाचा पुरावा आहे.

कार्तिक शु० १२ च्या सुमारास कृष्ण कौरवांकडे शिष्टाईस गेला. तो पुढील अमवास्येपूर्वी सातवे दिवशी परत येत असतां कर्ण कृष्णास म्हणतो—

प्राजापत्यं हि नक्षत्रं ग्रहस्तीक्ष्णो महाद्युतिः ॥
शनैश्चरः पीडयति पीडयन् प्राणिनोधिकं ॥
कृत्वा चांगारको वक्रं ज्येष्ठायां मधुसूदन ॥
अनुराधां प्रार्थयते मैत्रं संगमयन्निव ॥
विशेषेण हि वार्ष्णेय चित्रां पीडयते ग्रहः ॥
सोमस्य लक्ष्म व्यावृत्तं राहुरर्कमुपैति च ॥

या स्थितीवरून दुश्चिन्हें दिसत असून लोकसंहार होणार असें महापराक्रमी व भविष्याला घाब्यावर बसविणारा कर्ण म्हणतो !

याचप्रमाणें भीष्मपर्वामध्येंही तिसऱ्या अध्यायांत लोकसंहारदर्शक चिन्हें व्यासांनीं सांगितलीं आहेत तीं अशीं—

श्वेतो ग्रहस्तथा चित्रां समतिक्रम्य तिष्ठति ॥
धूमकेतुर्महाघोरः पुष्यं चाक्रम्य तिष्ठति ॥
मघास्वंगारको वक्रः श्रवणेच बृहस्पतिः ॥
मगं नक्षत्रमाक्रम्य सूर्यपुत्रेण पीड्यते ॥
शुक्रः प्रोष्ठपदे पूर्वे समारुह्य विरोचते ॥
रोहिणीं पीडयत्येवमुभौ च शशिभास्करौ ॥
चित्रास्वात्यंतरे चैव विष्ठितः परुषः ग्रहः ॥

वक्रानुवक्रं कृत्वा च अवर्षं पावकप्रभः ॥
ब्रह्मराशिं समावृत्य लोहितांगो व्यवस्थितः ॥
संवत्सरस्थायिनौ च गृहौ प्रज्वलितावुभौ ॥
विशाखायाः समीपस्थौ बृहस्पतिशनैश्चरौ ॥

शांतिपर्वामध्यें भीष्म दुर्योधनास काय सांगतो पहा—

यतो वायुर्यतः सूर्यो यतः शुक्रस्ततो जयः ॥
एवं संचिंत्य यो याति तिथिनक्षत्रपूजितः ॥
विजयं लभते नित्यं सेनां सम्यक् प्रयोजयन् ॥

द्रौपदीच्या विवाहप्रसंगींचें वचन पहा—

अद्य पौष्यं योगमुपैति चंद्रमाः पाणिं कृष्णेयास्त्वं गृहाणाद्य पूर्वं ॥

वराहमिहिरानें तर आपल्या बृहज्जातकांत अनेक मुनींचा उल्लेख केलेला आहे. या ग्रंथाचा टीकाकार यानें गार्गी, बादरायण, याज्ञवल्क्य, मांडव्य यांचीं जातकासंबंधाचीं वाक्यें दिलीं आहेत. यावरून जालमयज्योतिषांत अनेक मुनिसुद्धां गुरफाटून गेले होते !

यावरून आमच्या देशांत आज चालत असणारे खेळखंडोबा वैदिक काळांत व त्यानंतरही आजपर्यंत सारखे चालू आहेत असें दिसून येतें.

'आजपर्यंत अनेक विद्वानांचीं ज्योतिषशास्त्र म्हणजें केवळ थेरमजाळ ठरविलेलें आहे' असाही एक बोध एकनाथात्मजांना लागलेला आहे ! परंतु ते विद्वान् कोणते त्या पैकीं एकाचेंही नांव ते देत नाहींत. बहुधा हे आधुनिक विद्वान् असावेत, व तसें असणेंही शक्य आहे. पण हेंही दिसत नाहीं. कारण, आधुनि-

कांपैकीं कोणी या शास्त्राचा विचार केला आहे व हें शास्त्र भ्रम-जाल आहे असें ठरविल्याचें बहुधा कोणाच्या ऐकण्यांत नसेल असें वाटतें ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. सत्यज्योतिषाचे पुरस्कर्ते व हिंदुस्थानवासीयांस परमपूज्य असे जे श्रीमद्भास्कराचार्य त्यांनीं आपल्या लीलावती नामक मुलीला वैधव्य योग आहे असें पाहून तो टळण्यासाठीं वेधसिद्ध मुहूर्त पाहिला होता, परंतु दुर्दैवानें तो साधला नाहीं ! यावरून सत्यज्योतिषज्ञही आळमय व खादाड ज्योतिष्याचें महत्व जाणून होते असें उलट अनुमान मात्र निघूं पाहतें ! अलीकडचे विद्वान् ज्योतिषी कै० वा० शंकर बाळकृष्ण दीक्षित हे आपल्या भारतीय ज्योतिःशास्त्राच्या इतिहासाच्या ४७८ पृष्ठांत काय ह्मणतात पहा— "आकाशांतल्या ग्रहांचा मनुष्याच्या जीविताशीं संबंध कसा असूं शकेल अशी शंका पुष्कळांस येते व ती येणें साहजिक आहे. परंतु तो संबंध आहे अशी माझी खात्री झाली आहे. तो कां असावा हें सध्या सूक्ष्मपणें सांगतां येत नाहीं, परंतु आहे ही गोष्ट खरी "..... (पृ. ४७९) 'यावरून असें निष्पन्न होतें की मनुष्याच्या जन्मकाळची आकाशांतली ग्रहांची स्थिति आणि त्यावेळीं उदय पावत असलेला राशी यांस अनुसरून मनुष्याच्या शरीरावर कांहीं लक्षणें उत्पन्न झालेलीं असतात. ह्मणजे मनुष्याशीं ग्रहांचा संबंध आहे असें सिद्ध झालें या विषयावर अनेक शंका निघतात. त्या सर्वांचा एथें विचार करण्याचें कारण नाहीं. आणि पटवर्धन यांस साधलेली विद्या अवगत झाल्याशिवाय या गोष्टीबद्दल पूर्ण विचार करितां यावयाचा नाहीं. तथापि संभवनीय शंकांचा मला करितां येण्याजोगा आहे तितका विचार केल्यावरून माझा वर लिहिलेला **सिद्धांत** झालेला आहे'..... (पृष्ठ ४८०) यावरून जातकशास्त्रानें काय काय विलक्षण गोष्टी

निष्पन्न होतील हें आज सांगतां येत नाहीं. अनुभव घेऊन हें शास्त्र वाढविलें पाहिजे. ह्मणजे कित्येक **आधुनिक शास्त्रांप्रमाणें** जातक हें अनुभवावलंबी **उत्कृष्ट शास्त्र** बनेल अशी माझी समजूत आहे..... (४८१) **जातकशास्त्रार्चीं** मूलतत्वें प्रथम ज्यांनीं ठरविलीं, अमुक लग्नावर जन्मलेल्या मनुष्यांचीं लक्षणें अमुक, मनुष्याच्या शरीराचा विचार कुंडलींतल्या पहिल्या स्थानावरून करावा, पत्नीचा सातव्यावरून करावा, संपत्तीचा अमुक स्थानावरून करावा, हातावर अमुक रेषा अमुक प्रकारची असली पाहिजे. जन्मकाळीं सूर्य अमुक राशीस होता असें समजावें असे नियम प्रथम ज्यांनीं ठरविले ते धन्य होत. सध्या आपल्यास इतकें ह्मणण्यास हरकत नाहीं कीं **जातकशास्त्र** कांहीं तरी आधारावर रचलेलें आहे आणि **मनुष्याचा ग्रहांशीं संबंध आहे.'**

यावरून एकनाथात्मजांचा हाही शोध लंगडा पडतो. अनेक विद्वानांनीं असो, पण एखाद्या विद्वानाचें जरी ते नांव घेते तरी त्यांच्या शोधाला किंमत असती. दीक्षित हे एकनाथात्मज ह्मणतात त्या सत्यज्योतिषांतच पारंगत होते, तथापि फलज्योतिष हें भ्रमजाल आहे असें ह्मणत नाहींत, हा एकच विरुद्ध पुरावा एकनाथात्मजांच्या मृगजलवत् शोधाला पुरेसा होणारा नाहीं काय ?

एकनाथात्मज फलज्योतिषाला शास्त्र ह्मणण्यास तयार नाहींत. पण त्याला लंगडें घोडें ह्मणतात. ह्मणजे हें घोडें आहे इतकें कबूल करतात, ह्मणजे पर्यायानें हें शास्त्र आहे असें दर्शवितात ! आतां तें अपुरें आहे किंवा लंगडें आहे ह्मणून त्याचा खून करावयाचा आहे. जें घोडें जन्मतःच लंगडें असेल तें जिवंत राहिलें

किंवा मेलें तरी त्याचा कोणी खेद करणार नाहीं. पण, पूर्वी तें उत्तम प्रकारें कामगिरी देत असून आतां मात्र त्याची हयगय झाल्यामुळें कमताकत झालें असेल तर त्याला ठार करण्याची इच्छा करणारा मनुष्य विचित्रच समजला पाहिजे नव्हे काय ? घर मोडकें झालें तर त्याला बत्ती देणारा जितका शहाणा मानला जाईल तितकाच तोही शहाणा मानला पाहिजे ! किंबहुना त्याला वेड्यांचा दवाखाना दाखविला पाहिजे ! !

एकनाथात्मज ज्याला लंगडें घोडें झणतात, त्याच घोड्यावर स्वार होऊन बाबाजीराव पटवर्धनांनीं ग्रहांचीं लक्षणें मनुष्याच्या शरीरावर असतात असें दाखविलें आहे. अलीकडे अष्टावधानी बापटशास्त्री झणून एक उत्तम डोक्याचे मनुष्य आहेत, तेही हा संबंध थोडा बहुत जाणतात, असें समजण्यांत आलें आहे. आमची तयारी या दोघांइतकी जरी नाहीं तरी एकनाथात्मज जर आमच्या सहवासाला कांहीं दिवस राहतील तर त्यांना आम्हीही या लंगड्या घोड्यावर बसावयास शिकवूं व ग्रहांचा मनुष्यांशीं कसा संबंध आहे तो दाखवूं.

हें घोडें जरी लंगडें असलें तरी ज्याचें ज्याचें झणून याच्यावर प्रेम बसतें झाला त्याला तें कोठें ठेवूं. असें होतें ! या लंगड्या घोड्याला अद्यापि पुष्कळ माहिती आहे, करून घेणारा मात्र पाहिजे. याची जोपासना जर होईल तर त्याचा दुबळेपणा जाऊन तें चांगलें सशक्त होईल. अशी आमची पूर्ण खात्री आहे व एकनाथात्मजांची इच्छा असल्यास त्यांचीही करून देऊं.

पण त्यांना स्वतःला बसावयाचें नाहीं. दुसऱ्याला बसूं द्यावयाचें नाहीं. व जो कोणी बसण्याचा प्रयत्न करील त्याला प्रोत्सा-

हन द्यावयाचें नाहीं किंवा गप्पही बसावयाचें नाहीं ! असा अभ्यासपूर्वक व्यापार करण्याची ते नसती उठाठेव करीत आहेत ! या लंगड्या घोड्यावरून किती ज्ञान होतें, किती होण्यासारखें आहे, व किती मुळींच होणार नाहीं हा सरळ विचार करण्याचें सोडून दे लेखणी आणि खरड कागद, असला पोरखेळ करीत आहेत. पण त्यांना हें कळलें पाहिजे होतें कीं, हत्ती रस्त्यानें जाऊं लागला कीं, टवाळ कुत्रीं त्याच्या मागें लागतात व भुंकार करितात, इतकच नाहीं तर केव्हां केव्हां त्याला मागून डसतातही. झणून त्यानें आपली चाल कधीं सोडली आहे काय ?

फलज्योतिषाचा खेळखंडोबा हिंदुस्थानांतच आहे असें नाहीं. एकनाथात्मजांनीं जरा पश्चिमेकडे नजर फिरवावी. या शास्त्रावर सुधारलेल्या अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इ० राष्ट्रामध्येंही निरनिराळीं पुस्तकें व मासिकें प्रसिद्ध होत आहेत. प्राचानकाळीं सुधारणेच्या कळसास पोहोंचलेल्या राष्ट्रांमध्येंही हा खेळखंडोबा होता, हिंदुस्थानावर तर त्यानें आपला पूर्ण अंमल बसविलेला आहे ! तेव्हां अशा शास्त्राला ठार करण्याला एकनाथात्मजासारखे लेखणीबहादूर जरी लक्षावधि झाले तरी त्यांना जड जाईल इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष ब्रह्मदेव अवतरला तरी त्याच्यानेंही तें ठार करवणार नाहीं इतकें या लंगड्या घोड्यांत आजसुद्धां सामर्थ्य आहे. हें एकनाथात्मजांनीं पक्कें लक्षांत ठेवावे.

कुंडलीविज्ञानकार हे कांहीं सर्वज्ञ नव्हत, ते या शास्त्राचा अभ्यास करणारे एक विद्यार्थीच आहेत. ते तरी असेंच झणतात ना कीं, 'संकट काळ जितका **चांगला** सांगतां येईल, तितका मुक्तकाळ **चांगला** कळत नाहीं.' चांगला कळत नाहीं कोणाला?

ज्योतिष्याला. म्हणजे लंगडेपणा ज्योतिष्याकडे येतो, शास्त्राकडे येत नाहीं. एकनाथात्मजांना आम्ही खात्रीनें सांगतों कीं, जेव्हा आधुनिक सत्यज्योतिषी मंगळावरील लोकांशीं बोलणें सुरू करीतील तेव्हां फलज्योतिषीही मुक्तकाळ बिनचूक सांगूं लागेल !

संकटकाळीं मनुष्यानें आपला बचाव करण्याचा प्रयत्न करावयाचा असतो, फल देणारा ईश्वर आहे, हें एकनाथात्मजांस कबूल आहेच. मग संकटकाल जाणणारा ज्योतिषी नांवा बुडतांना किंवा स्टीमर लबंडतांना समुद्रास्तृप्यंतु झाला म्हणून यति शास्त्राकडे कमीपणा कसा येतो ? फलज्योतिष हें कांहीं मरण चुकण्याचें शास्त्र नाहीं. वैद्यशास्त्रानें रोग बरा होतो तरी नित्य मृत्यु होतच आहेत. मनुष्याचें आयुष्य १२० वर्षें आहे. तरी तितक्या मर्यादेपर्यंतही अद्यापि कोणी जगूं शकत नाहीं. ही झाली वैद्य शास्त्राची कथा. मग ज्योतिषशास्त्र तर काय बिचारें लंगडें घोडें !

ईश्वर हा कर्मानुसार फल स्वतः देत असतो, म्हणून त्याला गचांडी देऊन ग्रहांचें घोडें पुढें कां करावें ? हा एक विचित्र प्रश्न एकनाथात्मजांनीं केला आहे. त्यांचा म्हणण्याचा आशय असा कीं, जें मूल मेलेलेंच जन्मलें त्याला कोणतेंही कारण नसून कर्मानुसार परमेश्वरानेंच त्याला जन्ममरण दिलें. एखादा मनुष्य तापानें मेला असला तरी त्याला तापानें मृत्यु आला असें म्हणावयाचें नाहीं. तर परमेश्वरानेंच त्याला कर्मानुसार मृत्यु दिला ! परमेश्वराजवळ चाकरमाणसें वगैरे कोणी नाहींत तो एक आफ्रिकेंतला जंगली राजा आहे. प्रत्येक काम त्याला स्वतःच करावें लागतें. क्षणोक्षणीं तो प्रत्येक प्राण्याच्या कर्माची हजेरी घेतो व त्याप्रमाणें तो स्वतः फल देतो. वरील एकनाथात्मजांचा सिद्धांत आम्हाला मुटा-

णारा नाहीं. आम्हांला प्राण्याच्या मृत्युकाळीं ग्रह बिघडले आहेत असें मात्र दाखवितां येतें. मग ते टपून बसले होते कीं ते विशेष प्रकारच्या स्थितींत असतां मृत्युकाल यात्रा अशीच परमेश्वराची योजना होती हें आम्हाला सांगतां यावयाचें नाहीं. गर्भपात होणें, मुलें जन्मतःच मरणें, उपजतांना कापून काढणें वगैरे गोष्टी आईबापांच्या ग्रहांवरून दाखवितां येतात. कुंडल्या मात्र खऱ्या पाहिजेत. एकनाथात्मजांना शंका असेल तर ग्रह कसे टपून बसलेले असतात तें आम्ही दाखवून देण्यास तयार आहों. बरींच वर्षें जगून मृत्यु येणाऱ्यांना ज्या प्रकारची मृत्युकाळीं ग्रहस्थिति असते त्याच प्रकारची उपजत मृत्यु होणाऱ्यांची नसते, म्हणून अशा बालकांच्या मृत्यूची कारणें सर्वदा बिनचूक सांगतां येत नाहींत. म्हणून त्यांचें वडील भावंड आणि आईबाप यांच्या कुंडल्या अशा वेळीं पहाव्या लागतात. एकनाथात्मजांना आमची अशी विनंति आहे कीं त्यांनीं प्रथम फलज्योतिषाचा नीट अभ्यास करावा व वादाला अधिकारी व्हावें. ज्याला या शास्त्राचा गंधही नाहीं त्याला तत्वज्ञानाच्या गोष्टी सांगणें आम्ही अरण्यरुदनवत् समजतों.

ग्रह अनिष्ट आले असतां दानें करणें किंवा ब्राह्मण जेऊं घालणें वगैरे उपाय ज्या शास्त्रांत सांगितले आहेत त्या शास्त्राला एकनाथात्मजांनीं **खादाडज्योतिष** असें नांव दिलें आहे. ग्रह अनिष्ट आले म्हणजे मनुष्य अनेक प्रकारच्या संकटांत पडतो व त्यामुळें त्याला कांहीं एक सुचेनासें होतें, हा अनुभव एकनाथात्मजांना कदाचित् नसेल, पण सर्व मनुष्यें त्यांच्या इतकीं ज्ञानी कोठें आहेत ? जो ज्ञानी आहे त्याच्यासाठीं हें शास्त्रच नाहीं. फार

काय सांगावें, जगांतलें कोणतेंच शास्त्र त्यांच्यासाठीं नाहीं. शास्त्रें हीं कर्म करणें भाग पडलेल्या अज्ञानी मनुष्याचे व्यवहार सुखास. माधानानें चालण्यासाठीं ज्ञानसंपन्न अशा मनुष्यांनींच निर्माण केलीं आहेत. चोविस तासांत विलायतची बातमी कळली पाहिजे, म्हणून विद्युच्छास्त्र मनुष्यांनींच निर्माण केलें, पाण्यावरून गमन करितां यावें म्हणून नौकाशास्त्र मनुष्यांनींच निर्माण केलें, वैद्यशास्त्रही मनुष्यांना आरोग्य व्हावें म्हणून मनुष्यांनींच केलें आहे. याप्रमाणें सर्व प्रकारचीं शास्त्रें ज्ञानी मनुष्यांनीं प्रपंचाच्या सोयीसाठीं केलेलीं आहेत. फलज्योतिष हेंही शास्त्र मनुष्याच्या प्रपंचाच्या सोयीसाठींच निर्माण केलेलें आहे. ताप आला म्हणजे वैद्याकडे जावयाचें व तो देईल तें औषध घ्यावयाचें. ताप निघण्याची मुदत मात्र सर्वदा वैद्याच्या हातांत नसते. पण, मी अमुक एका नामांकित वैद्याचें औषध घेत आहें, म्हणून निखालस बरा होणार अशी भावना रोग्याची झाली असली तर तो रोगी लवकर बरा होतो व आपलें दुःख समाधानानें सहन करीत असतो. परंतु जर त्याची श्रद्धा त्या वैद्यावर नसली तर रामबाण औषध पोंचलें तरी त्याला गुण येत नाहीं व समाधानही वाटत नाहीं. असें कां होतें ? एकनाथात्मजांनीं या गोष्टीचा कधीं विचार केला आहे काय ? मनुष्य जर असें कल्पील कीं, मी बरा होणार, कारण अमुक अमुक वैद्याचें औषध घेत आहें. तर त्या वैद्यानें त्याला नुसतें पाणी जरी दिलें तरी तो बरा होतो. आणि मी मरणार, माझा रोग बरा व्हावयाचा नाहीं अचीच जर आपली भावना करील तर खरोखरीच तो दिवसेंदिवस निस्तेज होत जाईल व त्याला रामबाण औषधानेंही गुण येणार नाहीं.

म्हणून औषध उत्तम असलें तरी रोग्याची भावना शुद्ध असावी लागते. मनाचे परिणाम शरीरावर तेव्हांच घडतात. एखाद्याला एक लाख रुपयांची सोडत मिळाली अशी बातमी जर कोणी देईल तर तत्काल तो सतेज दिसेल, झोंप स्वस्थ घेईल, कडू अनही गोड लागेल व अपक्व पदार्थांचेही पचन होईल. पण 'घर जळून त्यांत सर्व मालमत्तेचा नाश झाला व बायका पोरेंही घरांतल्या घरांत होरपळून मेलीं' अशी खबर मिळेल तर त्याची स्थिति काय होईल बरें ! त्याला पंचपक्वान्नी अन्न गोड लागेल काय? झोंप स्वस्थ येऊन सतेज दिसेल काय ? त्याला ज्वर येणार नाहीं काय ? कदाचित तो तत्काळ मरण सुद्धां पावेल ! हा कशाचा परिणाम ? अस्वस्थ चित्ताला समाधान होण्याला वैद्यशास्त्राचा कांहीं उपयोग नाहीं. तर रोग्याला ज्यांत समाधान वाटत असेल तेच उपाय केले पाहिजेत. रोगी जर श्रद्धावान् असेल तर त्याला अमुक एका देवतेचा स्वतः अगर दुसऱ्याकडून जप करव व अमुक एक पदार्थ दान दे असें सांगितल्यास तो तत्काळ तसें करितो व तेणेंकरून त्याला समाधान प्राप्त होतें. समाधान झालें कीं चिंता दूर होते व चिंता गेली कीं त्याला आरोग्य प्राप्त होतें. ज्याची श्रद्धा नसेल त्याला हे उपाय व्यर्थ आहेत. तो जर चैनी असेल तर तूं आपल्या हातांत हिऱ्याची आंगठी घाल किंवा अमुक एक प्रकारचा पोषाख कर असा उपाय त्यास सांगावा. म्हणजे या उपायांनीं तो समाधान पावतो व त्यामुळें त्याला आरोग्यही प्राप्त होतें. ग्रहांवरच जर श्रद्धा नाहीं तर त्याला बिघडले आहेत हें सांगण्यांतही कांहीं अर्थ नाहीं. म्हणून त्याला समाधान होईल असलेच उपाय योजले पाहिजेत. तात्पर्य, मनावर चांगला परिणाम झाला तरच आरोग्य होतें असा सिद्धांत आहे. हिंदुलोकांच्या

देवतांच्या कल्पना निराळ्या आहेत, ह्मणून त्यांच्यासाठीं दानादि उपाय सांगितले आहेत. ब्राह्मणांना खावयास मिळत नाहीं ह्मणून हे ग्रह आणि हे उपाय कोणी उत्पन्न केले आहेत ही कल्पना सर्वथा चुकीची आहे, ब्राह्मणांचें सामर्थ्य इतकें आहे (आज मात्र नाही हो !) कीं ते अन्नपाण्यावांचून केवळ वायुभक्षणानेंच अनंत कालपर्यंत जगूं शकतात ! ईश्वरोपासनेंत ज्यांचा दिवसाचा थोडा भाग तरी खर्च होतो अशी जात एक पृथ्वीवर ब्राह्मणांचीच आहे. पांच रुपये पगारावर सुद्धां प्रपंच भागविणारा नोकर एक ब्राह्मणच आहे ! ब्राह्मणाला खाण्याची मुळींच पर्वा नाहीं. सारांश एकनाथात्मज ज्याला खादाडज्योतिष ह्मणतात तें तसें नाहीं व तें ब्राह्मणांना खावयास मिळत नाहीं ह्मणूनही झालेलें नाहीं.

कोणत्याही प्रकारची मनाला तळमळ नाहीं असा मनुष्य विरळा. तळमळ उत्पन्न झाली कीं जिज्ञासा उत्पन्न व्हावयाचीच. आणि जिज्ञासा उत्पन्न झाली कीं तो दुसऱ्याला विचारणच ही स्थिति जगाच्या अंतापर्यंत चालावयाची आहे. म्हणून तोंपर्यंत ज्योतिषशास्त्राचें लंगडें घोडें ठार होणें अशक्य आहे. कदाचित् ठार न होतां नीटनेटकें होऊन त्याच्या आज्ञेशिवाय पाऊलही पडावयाचें नाहीं असो. एकनाथात्मजांना हात चोळीत ठेवून विस्तारभयास्तव वाचकांची रजा घेणें भाग आहे.

ॐ तत् सत्

प्रयाण कोठें करावें ?

[लेखक—यशवंत केशव प्रधान]

कुंडलीविज्ञानांत मार्गें परदेशगमन व प्रयाणास मुहूर्त कसा असावा याबद्दल सविस्तर विवेचन केलेलें वाचकांच्या लक्षांत असेलच. आतां या लेखांत प्रयाण कोठें करावें किंवा धंदारोजगार करण्यास कोणतें ठिकाण लाभदायक होईल याचा विचार कर्तव्य आहे. या विषयासंबंधानें आपले ग्रंथांत विचार केलेला मुळींच आढळत नाहीं. कांहीं माहिती एका ठिकाणीं आढळली, तीवरूनच हा लेख लिहिण्यास स्फूर्ति झाली. पाश्चात्य ग्रंथांत तुरळ तुरळ असा विचार केलेला आढळतो. त्या सर्वांचीही एक वाक्यता करण्याचा प्रयत्न खालील लेखांत केलेला आहे. या लेखांतील कित्येक तर्क व विचारसरणी यांत चूक असण्याचा संभव आहे, यासाठीं वाचक क्षमा करितील अशी आशा आहे.

कुंडलीविज्ञान पुस्तक ९ अंक १७ या मध्यें परदेशगमनापासून कोणास फायदा होतो या संबंधानें संपूर्ण विचार झाला आहे. प्रथम कुंडलीवरून स्वदेश सोडणें इष्ट आहे कीं नाहीं हें ठरवून नंतर पुढील प्रयत्नास लागावें. . . .

मुहूर्तमार्तंडग्रंथांत वास्तु प्रकरणांत घर बांधण्यास गांव कसें शोधून काढावें या संबंधानें श्लोक दिला आहे, त्याचाच उपयोग केला असतां आपणास प्रस्तुत विषयास मदत होईल.

नामर्क्षाद्विसुतांक दिग्भवगतो ग्रामः शुभोऽन्योऽन्यथा ।
तत्कोणेऽन्यभुवाशुभं निवसतां दोषाः परेषामलम् ॥

कन्याकर्किधनुस्तुलाक्रियघटाः कौर्प्या अजो याम्यतो
मध्येऽन्येनवसंत्यथेंद्रककुभो वर्गाः स्युरोजस्विनः ॥

टीका—अथ गृहप्रकरणं विवक्षुस्तावदग्रामविचारमाह नामर्क्षा-दिति । नामर्क्षान्नामराशेः सकाशात् द्वि २ सुतां ५ क ९ दिग् १० भव ११ गतो ग्रामः शुभः स्यात् । अन्य- उक्त विपरीतो ग्रामो अन्यथा स्यादशुभः स्यादित्यर्थः । तदुक्ते ज्योतिःसागरे एकमे सप्तमे ग्रामे वैरे हानिस्त्रिषष्ठगे । तुर्याष्टद्वादशे रोगः शेषस्थाने सुखे भवेत् । इति ॥

घर बांधणाराच्या नांवाची व ज्या गावांत घर बांधावयाचें त्या गांवाच्या नांवाची रास अवकहडा चक्रावरून काढावी. गृहक-र्त्याच्या नामराशीपासून १।९।९।१०।११ इतकी गांवाची नामरास असल्यास शुभ, अन्यथा अशुभ होय.

दक्षिण दिशेपासून आठ दिशांस क्रमानें कन्या, कर्क, धनु, तूळ, मेष, कुंभ, वृश्चिक, मीन या ज्यांच्या राशि असतील त्यांनीं राहूं नये. वृषभ, मिथुन, सिंह, मकर या ज्यांच्या राशि असतील त्यांनीं गांवाच्या मध्यें राहूं नये. अ, क, च, ट, त, प, य, श हे आठ वर्ग पूर्वेपासून आठ दिशांना बलवान् होत.

वरील मताप्रमाणें जन्मपत्राचे नामराशीपासून ज्या शहराची किंवा देशाची राशि १।७।६।८।११ असेल तेथें जाऊं नये हें विचारसरणीला बरें दिसतें. आपल्या ग्रंथांत अमुक शहराची अमुक राशि आहे वगैरे कांहीं सांगितलेलें आढळत नाहीं. परंतु त्या दिशेनें बराच प्रयत्न झालेला आढळतो. पाश्चात्य ग्रंथांत प्रत्येक शहरच्या व देशाच्या राशि ठरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याच दिशेनें आह्मीं प्रयत्न करून इकडील शहरच्या राशि

ठरविल्या पाहिजेत. इकडे आमच्या ज्योतिषी वाचकांचें लक्ष जाईल काय ? आज फक्त अवकहडा चक्रावरच अवलंबून रहावें लागत आहे. तथापि हा प्रकार अगदींच साध्य आहे असें म्हणतां येणार नाहीं.

अवकहडाचक्र

अश्विनी—चू चे चो ला भरणी—ली लू ले लो कृत्तिका-आ ई उ ए
रोहिणी—ओ वा वी वू मृग—वे वो का की आर्द्रा—कू घ ङ छ
पुनर्वसु—के को हा ही पुष्य—हू हे हो डा आश्लेषा—डी डू डे डो
मघा—मा मी मू मे पूर्वा- मो टा टी टू उत्तरा—टे टो पा पी
हस्त—पू षा णा ठा चित्रा—पे पो रा री स्वाती—रू रे रो ता
विशाखा -ती तू ते तो अनुराधा ना नी नू ने ज्येष्ठा—नो या यी यू
मूळ-ये यो भा भी पूर्वाषाढा—बु धा फ डा उत्तराषाढा-भे भो जा जी
अभिजित्—जू जे जो खा श्रवण—खी खू खे खो धनिष्ठा-गा गी गू गे
शततारका—गो सा सी सू पूर्वाभाद्रपदा-से सो दा दी उत्तराभा०-दू
झा झा था रेवती-दे दो चा ची.

प्रत्येक नक्षत्राचे चार चरण असतात. ह्मणून येथें प्रत्येक नक्षत्रास चार अक्षरें दिलीं आहेत. नक्षत्राचा राशीशीं मेळ ठेव-ण्याच्या कामीं ही रचना सोयीची आहे.

गांवाच्या नांवाचें आद्य (पहिलें) अक्षर असेल तें अवकहडा चक्रांत पाहून त्यावरून त्या गांवाची रास ठरवावी. नांवांत पहिलें जोडाक्षर असतां त्यांतला प्रथम वर्ण घ्यावा. उदाहरण--क्यूबा. यांत क् हा वर्ण प्रथम आहे ह्मणून त्याची मिथुन रास समजावी. आपल्या नांवांत जोडाक्षर असेल तेव्हांही याच रीतीनें रास ठर-

बावी. ब व, श स आणि ख, ष या दोन दोन अक्षरांत भद मानूं नये. याप्रमाणें अवकहडा चक्राच्या आधारानें गांवाची रास ठरवितां येते.

पाश्चात्य ज्योतिष्यांनीं कांहीं देशांच्या व शहरांच्या राशि ठरविल्या आहेत त्या येणें प्रमाणें—

मेष—इंग्लंड, जर्मनी, लोअर पोलंड, बरगंडी, डेन्मार्क, पालेस्टाईन, सिरीया, नेपल्स, क्यापूआ, व्हेरोना, फ्लोरेन्स, मार्सेलीस. झाली, लिसेस्टर, मद्रास.

वृषभ—आयर्लंड, इराण, एशियामायनर, आर्चिपेलोगो, रशियाचे दक्षिणेकडील भाग. दब्लिन, पाटुआ, लेपझिक, पार्मा, पालर्मो, बोलें.

मिथुन—टिरोली, आर्मेनिया, खालचा ईजिप्त, फ्लांडर्स, लामडी, सार्डिनिआ, बेलजयम, यूनायटेडस्टेट्स. लंदन (मिथुन १७ अं. ९४ क.) मीनाउथ, कारडोव्हा, मेलबोर्न, न्यूरेमबर्ग.

कर्क—स्काटलंड, हालंड, उत्तर आणि पश्चिम आफ्रिका, न्यूझीलंड. कान्स्टांटिनोपल, व्हेनिस, जिनोवा, मांचेस्टर, ट्यूनिस, न्यूयार्क, मिलन, म्यान्हेर, कलकत्ता.

सिंह—इटाली, फ्रान्स, सिसीली. बोहीमिया, खालडिया, रोम, बाथ, दमास्कस, पोर्टसमाऊथ, फिलाडेलफिया, ठाणें.

कन्या—टर्की, स्वीत्झर्लंड, नेदरलंड्ज, पारीस, लेआन बगदाद, ग्रीस, पुणें, नागपूर.

तूळ—चीन, जपान, दक्षिण हिंदुस्थान, लिस्बन, व्हियेन्ना, आंतवर्प, मुंबई.

वृश्चिक—आलजीअर्स, बव्हेरिआ, बार्बरी, फ्रेज, मोरोक्को, नार्वे, लिव्हर्पूल, महाड, दादर.

धन—आरबस्तान, हंगेरी, स्पेन, शेफिल्ड, नेपल्स, दक्षिण-महाराष्ट्र.

मकर—उत्तर हिंदुस्थान, सर्कन, मेसिअन, अफगाणिस्तान, ग्रांस, मासिडोनिआ, साक्सनी, मेक्सिको, आक्सफोर्ड, ब्रुसेल्स, अलहाबाद.

कुंभ—अरेबिया, परशिआ, रशिया, स्वीडन, तार्तरी.

मीन—पोर्तुगाल, नार्मंडी, न्यूशीया, पंजाब.

देशांच्या व शहरांच्या किंवा गांवांच्या राशि कशा ठरवितात याबद्दल तीन मार्ग सध्या प्रचलित आहेत. एखाद्या स्थळीं स्मरणीय गोष्टी ज्या कालीं घडतात त्या कालच्या ग्रहस्थितीवरून त्या स्थळाची रास ठरविण्याचा एक मार्ग आहे. ज्या वेळीं लंडन ब्रीजचा पहिला खांब बसविला त्या वेळीं मिथुन लग्न १७ अं.९४ क. उदित होतें, म्हणून या शहराची हीच रास मानतात. दुसरा मार्ग असा आहे कीं, त्या स्थळाचा भूप्रदेश व लोकव्यवहार वगैरे वरून रास ठरवावी. आणि तिसरा मार्ग-त्या स्थळीं उपजणाऱ्या व राहणाऱ्या लोकांच्या पृष्कळशा कुंडल्या गोळा केल्या असता त्यांत जे साम्य दिसून येईल त्यावरून रास ठरवावी. या तीन मार्गांनीं आपणासही आपल्या गांवाची रास ठरवितां येईल. प्रयत्न करून पाहिला पाहिजे. कुंडलीविज्ञानचे वाचक इकडे लक्ष देतील काय? महाडांत घडणाऱ्या कित्येक गोष्टींवरून महाडचें लग्न वृश्चिक असावें असें कुंडलीविज्ञानच्या संपादकांनीं ठरविलें, त्याच प्रमाणें दादर येथें चालत असलेल्या कांहीं गोष्टी व त्याच्या आसपासचा भूप्रदेश यावरून दादरचा व वृश्चिक राशीचा संबंध मला

दिसून आला. ठाणें शहराची रास काय असावी याचा विचार करीत असतां ती सिंह असेल असें अनुमान झालें. येथील अति प्रचंड व जुनाट असा एक जांभळीचा वृक्ष रविवार ता. १३ जून १९१० मुंबई टाईम सकाळचे दहा वाजतां कोसळला. एक दोन माणसांस दुखापत झाल्याची वदंता आहे. याच वृक्षावरून येथील एका भागास नांव पडलें आहे. या वेळची कुंडली मांडिली ती सिंह लग्नावरच आली !

कुंडलींत जे ग्रह विशेष बलवान असतात त्यांवरून आपणास कोणत्या दिशेस प्रयाण केल्यानें नशीब उदयास येईल हें समजेल. महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे ज्या राशींतून रवि, चंद्र, लग्न व दशम यांस पाप ग्रहाकडून अशुभ दृष्टियोग झाले असतील ती रास ज्या स्थलाचें तनुस्थान असेल त्या स्थलीं धंदारोजगार किंवा हवापालट करण्यास जाऊं नये. हवापालट करण्याकरितां जाणें असतां गुरु किंवा शुक्र ज्या राशींत असतील त्या राशीचे गांवीं जावें. परंतु तेच गुरू किंवा शुक्र, रविचंद्र यांस पीडा करीत असतील तर त्याचे राशीचे गांवीं जाऊन फायदा न होतां तोटाच होईल. कुंडलींत गुरु बलवान् नसून वाईट दृष्टियोग करीत असतील तर शुक्राचा विचार करावा. व या दोन शुभ ग्रहांपैकीं कोणीच योग्य नसेल तर इतर नेपच्यून, हर्शल, शनि, मंगळ यांपैकीं जे कोणी रविचंद्राबरोबर शुभदृष्टियोग करीत असतील त्यांच्या राशीचें स्थल पसंत करावें. उदाहरण—एका मनुष्याचा जन्म चंद्र कर्क राशींत धनस्थानीं गुरूबरोबर युति करण्यास जात होता अशा वेळीं झाला. तो मनुष्य समुद्रकांठीं राहण्यास जाऊन गलबतें वगैरे संबंधानें त्यानें धंदा सुरू केला त्यांत त्याला चांगलेंच यश आलें.

कीर्तिकरितां देशांतरास जावयाचें असेल तर सूर्य किंवा चंद्र यांपैकीं जो केंद्री पापदृष्टिविरहित व शुभ ग्रहानें शुभ दृष्ट ज्या राशींत असेल त्या राशीचे देशांत जावें.

शास्त्रीय शिक्षण, विद्या इत्यादिकांसाठीं बुध ज्या राशींत असेल त्या राशीच्या स्थळीं जावें. जर बुध बिघडलेला असेल तर मंगळाचे राशीचा उपयोग करावा. सर्वसाधारण धंदारोजगार यासाठीं गुरु व शुक्र ज्या राशींत असतील त्यांपैकीं एखादी रास पसंत करावी. याप्रमाणें जन्मकालीन कुंडलीवरून आपण कोठें गेलों असतां भाग्य चांगलें उदयास येईल हें ठरवावें. आतां, आपण जन्मस्थलापासून किती लांब व कोणत्या दिशेस देशांतर करावें याचा विचार करूं.

जन्मकुंडलीवरून कोणत्या राशीचें शहरीं किंवा गांवीं जावयाचें तें ठरविल्यानंतर तें स्थल आपल्या जन्मस्थानापासून किती दूरचें असूं शकेल या विषयीं अनुमान करितां येतें. स्थलांतर करण्याची दिशा व दूरत्व हें कुंडलींतील स्थानें व राशी यांचे अनुरोधानें ठरवावयाचें असतें जर तृतीय किंवा पंचम स्थानांतला योग असेल तर तें गांव जन्म स्थळाचे जवळचेंच घ्यावें. द्वितीय व षष्ठ स्थानांतून योग होत असेल तर स्वदेशांतच लागेल तेथील स्थल पसंत करावें. प्रथम व सप्तम स्थानांतून योग होत असल्यास आपल्या देशाशेजारचे परदेशांत जाणें बरें. द्वादश व अष्टम लांबचे देश दर्शवितात. एकादश व नवम फार लांबचे परदेश दर्शवितात. दशम स्थानांतून योग होत असेल तर जन्म ज्या गोलार्धांत असेल त्याच्या उलट गोलार्धांत जावें.

प्रथम स्थानांतील योग पूर्व दशमांतील दक्षिण, सप्तमांतील

पश्चिम व चतुर्थीतील उत्तर दिशा दर्शविते. प्रथम व दशम यांच्या मधील एखाद्या स्थानांत योग होईल तेव्हां आग्नेय दशम व सप्तम यांच्या मध्यें योग असतां नैर्ऋत्य, सप्तम व चतुर्थ यांच्या मध्यें योग होईल तेव्हां वायव्य व चतुर्थ आणि प्रथम यांचे मध्यें योग होईल तेव्हां ईशान्य या प्रमाणें मधील स्थानच्या दिशा जाणाव्या.

स्थानांप्रमाणें राशींवरूनही दिशा ठरवितात. ही पद्धति प्रयाण-कालची दिशा ठरविण्यास फारच उपयोगी आहे. ती अशी.—

पूर्व—मेष, सिंह, धनु. पश्चिम—मिथुन, तूळ, कुंभ.
उत्तर—कर्क, वृश्चिक, मीन. दक्षिण—वृषभ, कन्या, मकर.

ज्या दिवशीं गांवास जावयाचें असेल त्या दिवशींचा चंद्र कोणत्या राशीचा आहे तें पहावें. उदाहरण—त्या दिवशीं चंद्र कन्येचा आहे तर वरील प्रमाणें दक्षिणेस गमन केलें असतां द्रव्यप्राप्ति होईल व पूर्वेकडे गमन केलें तर ज्या अर्थी दक्षिण दिशा उजव्या हाताकडे येते त्या अर्थी सुख व संपत्ति प्राप्त होते. परंतु पश्चिमेकडे गमन कलें तर संपत्तीचा नाश होईल. उत्तरेकडे गमन केल्यास कन्येचा चंद्र आपल्या पाठीमागें येतो त्यामुळें दुःख होईल. या प्रमाणें कोष्टकांचा उपयोग आमचे जोशी लोक करितात.

वरील सर्व लेखावरून वाचकांस बंदागीजगार करण्याकरितां कोठें व कोणत्या दिशेस जावें याचा विचार करितां येईल असें वाटतें.

पत्रव्यवहार

ज्यो० रा० रा० कुंडलीविज्ञानकर्ते यांस—आदरपूर्वक

कृ० सां० न० वि० वि०

ग्रहांच्या मित्र-सम-शत्रुत्वाची उपपत्ति उदाहरणासह अवलोकन नसलेल्या अशा आपल्या वाचकवर्गाकरितां पाठविली आहे तरी स्थळ द्याव. सदरची उपपत्ति बृहज्जातकाखेरीज अन्यग्रंथांत पाहण्यांत आली नाहीं.

नियमः—

सत्योक्ते सुहृदः स्त्रिकोणभवना स्त्वात्स्वात्यंधीधर्मपाः ।
स्वोच्चायुः सुखपाः स्वलक्षणविधे र्नान्यैर्विरोधादिति ॥ १ ॥
व्येकानुक्तभपान्सुहृत्समरिपून्सर्वेचयं नैसर्गिकान् ॥ २ ॥
सिंहो वृषः प्रथम षष्ठ हयांगतौलि । कुंभास्त्रिकोणभवनानि
भवंतिसूर्यात् ॥ ३ ॥

स्पष्टीकरणः—

सत्याचार्यांनीं ग्रहांच्या नैसर्गिक मित्रशत्रुत्वाचें लक्षण असें सांगितलें आहे कीं:—एखाद्या ग्रहाच्या मूलत्रिकोणराशीपासुन इतर ग्रहांच्या स्वस्थाना पर्यंत मोजलें. असतां, जी अंतरांची संख्या येईल, ती संख्या वरील श्लोकोक्त २।१२।९।९।८।४ या पैकीं एखाद्या संख्येशीं जुळेल अगर मूलत्रिकोणराशि हेंच—उच्च गृह असेल, तर त्या त्या ग्रहांचें मूलत्रिकोणाच्या राशी स्वामीशीं मित्रत्व आहे समजावें, व अशी जर स्थिति नसेल तर शत्रुत्व समजावें.

दुसऱ्या चरणांत या विषयीं स्पष्ट नियम दिला आहे, कीं— सूर्यचंद्राखेरीज इतर सर्व ग्रहांस दोन दोन राशी आहेत. अर्थात् मूलत्रिकोण राशीपासून या दोन्ही राशीपर्यंत मोजलें असतां, निरनिराळीं २ अंतरें येतील. ह्या दोन्ही अंतराची संख्या वरील श्लोकोक्त २–१२–५–९–८–४ या संख्येशीं जुळल्यास मित्रत्व, एकच अंतर जुळल्यास समत्व, व कोणतेंही अंतर न जुळल्यास, शत्रुत्व असें समजावें.

मात्र वरील संख्यांप्रमाणेंच मूलत्रिकोण राशि हेंच उच्चगृह असल्यास तेंही विचारांत घ्यावें लागतें. म्हणजे एखादें अंतर जुळलें आणि एक न जुळलें परंतु मूलत्रिकोणराशि हाच त्या ग्रहाचा उच्च राशि असल्यास न जुळलेल्या अंतरा ऐवजीं तें धरून मित्रत्व आहें समजावें. तसेंच दोन्हीं अंतराची संख्या वरील इष्ट संख्येशीं जुळली नाहीं, परंतु उच्च संबंध आहे. तर शत्रुत्व न समजतां, एक गोष्ट जुळती आहे समजून समत्व कल्पावें आतां दोन्हीं अंतरें जुळत नसलीं, व उच्चसंबंधही नाहीं तर मात्र निर्विवाद शत्रुत्व आहे असें समजावें.

सूर्य चंद्राचा विचार करतांना त्यांच्या एक राश्याधिपत्यामुळें मूलत्रिकोणराशीपासून एकच अंतर येईल हें अंतर व वर सांगितलेला उच्च संबंध हे दोन्ही लक्षांत घेऊन इतर ग्रहांप्रमाणें दोन्हीं संबंधांपैकीं एखादा असल्यास मित्रत्व, मुळींच संबंध नसल्यास शत्रुत्व समजावें. एकराश्याधिपत्यामुळें सूर्यचंद्राचें कोणत्याहि ग्रहाशीं समत्व नाहीं.

ग्रहांचे मूलत्रिकोणराशि–आरंभीं ३ ऱ्या चरणांत दिले आहेत सूर्य सिंह, चंद्र–वृषभ, मंगळ–मेष, बुध–कन्या, गुरु–धनु, शुक्र–तूळ, शनि–कुंभ, हे मूलत्रिकोण राशी आहेत ज्या ग्रहाच्या शत्रु मित्रत्वाचा विचार करावयाचा असेल त्या ग्रहाच्या मूलत्रिकोण राशीपासून इतर ग्रहांच्या स्थानापर्यंत मोजून अंतरे काढून वर लिहिल्याप्रमाणें उक्तानुक्त संख्यांक व उच्च संबंध लक्षांत घेऊन शत्रुमित्रत्वें ठरवावें.

उदाहरणाकरितां खालीं सूर्याचें नैसर्गिक मित्र–सम–शत्रुत्व काढून दाखविलें आहें.

सूर्याचा मूलत्रिकोणराशि सिंह, यापासून चंद्राची कर्क राशि १२ वी आहे. ही १२ संख्या वरील २–५–९–४–८–१२ या संख्येशीं जुळतें. चंद्राच्या एकाधित्वामुळें, एकच अंतर जुळलें तरी–मित्रत्व होतें. त्याप्रमाणें रवीचें चंद्राशीं मित्रत्व आहे. मंगळाचीं गृहें मेष व वृश्चिक ही, सिंहराशीपासून ९।४ अंतरावर आहेत. ही दोन्हीं अंतरें वरील इष्टांकांशीं जुळतात, म्हणून रवीचें मंगळाशीं मित्रत्व आहे. बुधाची मिथुन व कन्या हीं दोन्हीं स्थानें ११ व २ अंतरावर आहेत. पैकीं २ संख्या जुळते, ११ जुळत नाहीं व उच्च संबंधही नाहीं. म्हणून रवीशीं बुधाचें महत्व ठरतें. गुरूचीं धनु व मीन स्थानें ९ व ८ अंतरावर आहेत. हीं दोन्हीं इष्ट आहेत. म्हणून रवीशीं गुरूचें मित्रत्व झालें. शुक्राची व शनीची स्वगृहें सिंह राशीपासून अनुक्रमें ३–१० व ६–७ अंतरावर आहेत, हीं दोन्हीं न जुळणारीं असल्यामुळें या दोन्ही ग्रहांचें रवीशीं शत्रुत्व आहे.

याचप्रमाणें इतर ग्रहांच्याही शत्रुमित्रत्वाचा विचार करतां येईल. आतां मूलत्रिकोणराशीपासून २-५-८-९-१२-४ हीच स्थानें कां विचारांत घेतली याचा बोध होत नाहीं. याची जर उपपत्ति लागेल तर बऱ्याच गोष्टींचा खुलासा होऊन नैसर्गिक ग्रहांच्या परस्पर संबंधाचा बोध होईल. कोणी तज्ञ हीच स्थानें कां घेतलीं याचा खुलासा करतील अशी आशा आहे म्हणजे माझ्या प्रमाणेंच इतर जिज्ञासु वाचक वर्गास बराच उपयोग होईल. कळावें कृपा-लोभ असावा हे विनंती.

आपला-- दीक्षित
वडनेर.

ग्रहणें.

[लेखक-य. के. प्रधान]

न कथंचिदपि निमित्तै ग्रहणं विज्ञायते निमित्तानि ।
अन्यस्मिन्नपि काले भवंत्यथोत्पातरूपाणि ॥
अवनत्यार्के ग्रासो दिग्ज्ञेयावलनयावनत्याच ।
तिथ्यवसानाद्वेलाकरणे कथितानि तानि मया ॥

अर्थ.—उत्पातरूप निमित्तांनीं ग्रहणांचें ज्ञान कधींही होणार नाहीं. कारण, ते उत्पात अन्य कालीं (गणितावांचूनही) होतात [यास्तव गर्गादिकांनीं उत्पातांमध्यें ग्रहणांची गणना केली तें योग्य नव्हे.] नतीनें (स्पष्ट विक्षेपानें) सूर्यग्रहणीं ग्रास जाणावा. व वलन आणि नति यांवरून दिशा जाणावी. तिथिसमाप्तीवरून ग्रहणाची वेळ जाणावी. तीं सर्व कारणें मी (पंचसिद्धांतिकेमध्यें) सांगितलीं आहेत.

कित्येक कुंडल्यांचा फलज्योतिषदृष्ट्या विचार करितांना त्यांतील विशिष्ट ग्रहांवर ग्रहणें झालीं असतां त्यांचे जे परिणाम आढळले त्याबद्दल तुरळ तुरळ माहिती कुंडलीविज्ञानांत आलीच आहे. परंतु ग्रहणांसंबंधानें सविस्तर विवेचन आजपर्यंत झालेलें नाहीं. ह्मणून आज फलज्योतिषदृष्ट्या व मेदिनीयशास्त्रदृष्ट्या देशावर कसे परिणाम होतात हें आंग्ल व आर्य फलादेशाच्या आधारें दाखविण्याचें योजिलें आहे. ता. २ नवंबर रोजीं सूर्य ग्रहण आहे (हें येथें दिसणार नाहीं) व ता. १७ नोवंबर रोजीं

चंद्रग्रहण आहे. याप्रमाणें एकाच महिन्यांत २ ग्रहणें येत असून त्यांत बरेच ग्रह एका राशींत येत आहेत. अशा वेळीं विज्ञानचे वाचकवर्गापुढें अल्पशी माहिती ठेवावी असा उद्देश धरून चार शब्द लिहीत आहें, इकडे वाचकांचें लक्ष जाईल अशी आशा आहे.

भारतवर्षीय पूर्वजांच्या ग्रहणाबद्दल काय कल्पना होत्या, कोलंबसास जसे अमेरिकन लोक भेटले तसे हे लोक ग्रहण म्हणजे परमेश्वरी कोप मानून भीतीनें घाबरून जाणारे होते किंवा ग्रहणें म्हणजे एक सृष्टीचमत्कार असून त्याची वेळ सांगतां येते असें मानणारे होते याचा विचार करूं.

यत्वा सूर्यास्वर्भानु स्तमसा विध्यदासुरः ।
अक्षेत्रविदया मुग्धो भुवनान्यदीधयुः ॥
स्वर्भानोरधयदिंद्रमायाऽअवोदिवोवर्तमाना अवाहन् ।
गूळहं सूर्यं तमसापव्रतेन तुरीयेण ब्रह्मणाऽविंददत्रिः ॥
मामामितं तवसंतमत्र इरस्यादुग्धोभियसानिगारीत् ॥
त्वं मित्रो असि सत्यशवास्तौ मेहावतं वरुणश्च राजा ॥
प्राण्नोब्रह्मायुयुजानः सपर्यन् कीरिणा देवान्नमसोपशिक्षन् ॥
अत्रिः सूर्यस्य दिविचक्षुराधात् स्वर्भानोरयमाया अप्रक्षत ॥
यं वै सूर्यं स्वर्भानुस्तमसा विध्यदासुरः ।
अत्रयस्तमन्वविंदन्नह्यन्ये अशक्नुवन् ॥ (ऋ. सं. ९–४०)

अर्थ—हे सूर्या, जेव्हां असुर स्वर्भानुतमानें तुला आच्छादिता झाला तेव्हां सर्व भुवनें अशीं दिसलीं कीं, (तेथील) सर्व जन (आपापलें) स्थान न जाणणारा मुग्ध झाला आहे. द्यूच्या खालीं असणाऱ्या ज्या स्वर्भानूच्या माया त्यांचा हे इंद्रा तूं नाश

करितोस. अपव्रत तमानें झाकलेल्या सूर्यास अत्रि तुरीय ब्रह्मानें मिळविता झाला. हे अत्रे या (अवस्थेप्रत प्राप्त झालेल्या) मला अन्नाच्या इच्छेनें द्रोह करणारा तो असूर मयोत्पादक अंधकारानें न गिळो. तूं मित्र आहेस आणि सत्यधन आहेस. तूं आणि वरुण दोघे माझें एथें रक्षण करा. अत्रि ब्राम्हण ग्राव्याची योजना करून (देवांकरितां सोम काढून) आणि या प्रमाणें स्तोत्रानें देवांची पूजा करून आणि नमस्कार करून स्वर्भानूच्या माया निवारिता झाला आणि सूर्याच्या प्रकाशाच्या ठायीं आपला डोळा ठेविता झाला. ज्या सूर्याला असुर स्वर्भानूने आच्छादिता झाला त्या सूर्याला अत्रि मिळविते झाले. इतर कोणी मिळवूं शकले नाहींत.

वरील वर्णन ऋक्संहितेंत आहे व तें ग्रहणाचें असून फारच मार्मिक रीतीनें केलेलें आहे. त्यांत बऱ्याच महत्वाच्या गोष्टींचाही उल्लेख केलेला आहे. हें वर्णन जरी फार प्राचीन आहे तरी इतर लोकांतील अप्रलेख्या ग्रहणाचे वर्णनासारखें भीतिदायक नसून त्यांत दोन तीन महत्वाचे पुरावे आहेत ! पाश्चात्य लोकांत उपलब्ध असलेला ग्रहणाचा इतिहास व वरील वर्णन यांची तुलना केली तर कोणासही निश्चयात्मक सांगतां येईल कीं प्राचीन भारतवर्षीय आर्यांत ग्रहणांचे उत्पत्तीचें यथार्थ ज्ञान होतें. त्यांस ग्रहणें म्हणजे फारच चमत्कारिक व भीतिदायक किंवा परमेश्वरी कोप असें वाटत नसे !

हिराडोटस यानें मिडिया आणि लिडीया प्रांतांतील लोकांचें युद्ध चाललें होतें त्याचें वर्णन केलें आहे त्यांत ग्रहणासंबंधी मजेदार माहिती दिलेली आहे. तो म्हणतो—या दोन प्रांतांतील

लोकांचें पांच वर्षें युद्ध चाललें होतें त्यांत कधीं या पक्षाचा जय होई तर कधीं त्या पक्षाचा जय होत असे. सहावे वर्षाचे सुमारास एकदां दोन्ही सैन्यें युद्धाच्या ऐन तडाक्यांत गुंतलीं असत अकस्मात् जिकडे तिकडे अंधकारानें दशदिशा भरून गेल्या. तारकागण आकाशांत चमकूं लागले ! याप्रमाणें कधीं न होणारी दिवसाची रात्र झाली व उभयसैन्यांची भीतीनें गाळण उडाली ! अखेरीस त्यांच्यांत तह झाला. याच प्रमाणे ग्रीस वगैरे देशाचे इतिहासांतही वर्णनें आढळतात. त्यांतील बहुतेकांचा संबंध लढाया किंवा महासंकटें यांच्याशीं आढळतो. त्यांतील कांहीं वर्णनें खालीं देतों.

"अकस्मात् सूर्य दिसेनासा झाला. त्यामुळें कांहीं शहर सोडून गेले"..... 'सैन्ये कूच करणार, इतक्यांत अभ्रें नसतां सूर्य दिसेनासा झाला आणि दिवसाची एकाएकीं रात्र झाली त्यामुळें यामुळें सैन्याचें जाणें राहिलें.' ..... 'आरमार युद्धाच्या अगदीं तयारींत आहे इतक्यांत अकस्मात् काळोख पडला. खलाशांस भीति पडली. सुकाणूवाला गोंधळून गेला' ..... सैन्य समुद्रांतून जात असतां इतका काळोख पडला कीं दिवसास नक्षत्रें दिसूं लागलीं व सैन्य घाबरून गेलें' ..... सूर्य मंडळ झांकून गेलें व त्याच्या भोंवतीं कोणी किरीट घातला आहे असें दिसलें. इ० स० ११४० मध्यें लंडन येथें जें खग्रास सूर्यग्रहण दिसलें त्याच्या वर्णनानें वरील सर्वांवर ताण केली आहे ! तें इतकें मजेदार आहे कीं त्या योगानें हसूं आल्याखेरीज रहात नाहीं.' दोन प्रहरचा सुमार होता. लोक जेवणांत गुंतले होतो. इतक्यांत अंधार पडला. सूर्य काळा दिसूं लागला खाण्यास दिसेना

दिसेना झणून दिवे लावावे लागले. लोक आश्चर्यानें चकित झाले अंधकार इतका पडला कीं, आजच प्रलय होतो कीं काय असें त्यांस वाटलें. आकाशांत तारा दिसूं लागल्या इत्यादि.

या सारखीं वर्णनें आर्यांच्या अतिजुनाट वेदासारख्या ग्रंथांत देखील वाचकांस आढळणार नाहींत. इतकेंच नव्हे तर त्यांस ग्रहणें केव्हां लागतात, त्यांचीं कारणें काय, चंद्र हा स्वयंप्रकाश आहे, कीं परप्रकाश आहे, त्याच्या कला कशा होतात, चंद्राची एकच बाजू सर्वदा दिसते वगैरे बद्दल पूर्ण माहिती होती. वराहमिहिर आपल्या बृहत्संहितेंत लिहितो—

नित्यमधस्थस्यैंदोर्भाभिर्भानोः सितं भवत्यर्धं ॥
स्वच्छायया न्यदसितं कुंभस्येवा तपस्यव ॥

अर्थ.—सूर्याचे खालीं राहणारा जो चंद्र त्याचें अर्ध सूर्याच्या तेजानें नित्य श्वेत असतें. (ज्या गोलभागीं सूर्यकिरण पडतात तें शुभ्र होतें) दुसरें अर्ध त्याचेच छायेनें नित्य कृष्ण असतें उदाहरण—घागर उन्हांत ठेविली असतां ज्या भागीं सूर्यकिरण पडतात तो भाग पांढरा दिसतो व दुसरा भाग तिच्याच छायेनें कृष्णवर्ण दिसतो. तद्वत्च चंद्रबिंब होय.

सलिलमयेशशिनिरवेर्दीधितयो मूर्छितास्तमोनैशं ।
क्षपयंति दर्पणोदर विहता इव मंदिरस्यांतः ॥

अर्थ.—उदकमय चंद्रीं सूर्याचे किरण संलग्न होऊन ते किरण रात्रीसंबंधी अंधकाराचा नाश करितात. जसे आरशाव—

रील किरण गृहाच्या मध्यभागचया अंधकाराचा नाश करितात.

ग्रहणें कशीं होतात वगैरेबद्दल सविस्तर माहिती प्रस्तुत लेखांत देणें इष्ट वाटत नाहीं. कारण, कुंडलीविज्ञान हें फलासाठींच मुख्यत्वें पुस्तक आहे, अशी आपच्या एका विद्वान् मित्राची सूचना असल्यामुळे थोडक्यांत माहिती देऊन आपण-आपल्या मुख्य विषयाकडे वळूं.

वाचकांच्या नित्य अनुभवाचें आहे कीं, ज्या वस्तु स्वयंप्रकाश नाहींत त्या जर दुसऱ्या एखाद्या दैदीप्यमान ज्योतीच्या समोर ठेविल्या तर त्यांच्या उलट बाजूस दोन प्रकारच्या छाया पडलेल्या दिसतात. त्यांपैकी मुख्य छायेस 'छाया' व दुसरीस छाया 'कल्पतरु' असें म्हणतात. चंद्र व पृथ्वी हे दोन गोल परप्रकाश असून त्यांस सूर्यापासून प्रकाश मिळतो. त्यामुळें त्यांचे उलट बाजूनें नेहमीं छायेचे शंकू पडलेले असतात. चंद्र पृथ्वीभोंवतीं फिरतांना जेव्हां सूर्याच्या समोर येतो तेव्हां पौर्णिमा झाली असें म्हणतों,

त्यजतोर्कतलं शशिनः पश्चादवलंबते यथा शौक्ल्यं ॥
दिनकरवशात्तथेंदोः प्रकाशतेधः प्रभृत्युदयः ॥

अर्थ.—चंद्र, सूर्याच्या खालचा समभाग जसजसा सोडतो तसतसा पश्चिमेस शुक्लत्व [पांढरेपणा] धारण करितो. त्याप्रकारें चंद्राचा सूर्याप्रमाणें अधोभागापासून उदय होतो. हेंच स्पष्ट अर्थानें म्हणावयाचें असल्यास सूर्याच्या अधोभागीं चंद्र अमावास्यांतीं येतो, तेव्हां त्या गोलाचें संमुख अर्ध शुभ्र होतें व अधः

स्थित अर्ध कृष्णवर्ण होतें. नंतर प्रतिपदादि तिथींस जसजसा चंद्र, सूर्यापासून प्राङ्मुख, शीघ्रगतित्वास्तव जातो तसतसा दृष्टीस पडणारा त्याचा अर्धाभाग शुभ्र होतो.—

प्रतिदिवसमेवमर्कात्स्थानाविशेषेण शौक्ल्यावृद्धिः ॥
भवति शशिनो पराण्हे पश्चाद्भागे घटस्येव ॥

अर्थ.—या पूर्वोक्त प्रकारें प्रतिदिवशीं दुसऱ्या जागीं जाण्यानें चंद्राच्या शुक्लत्वाची वृद्धि होते. अपराण्हीं खालच्या भागीं घटाप्रमाणें चंद्राची वृद्धि अधिक होते. चंद्र सूर्याचे पुढें प्राङ्मुख राशि भोगित जातो तशी शुक्लत्वाची वृद्धि होते. ती शुक्लपक्षीं अष्टमीस सूर्यापासून राशित्रयांतरानें अर्धी वृद्धि होते. पुढें होत होत पौर्णिमेच्या अंतीं समाधी चंद्र जातो तेव्हां पूर्ण होतो. नंतर जसजसा सूर्याजवळ जातो तसतसा कमी होऊन वद्य अष्टमीस अर्धा होऊन अमावास्येच्या अंतीं त्याचें सर्व बिंब कृष्ण होतें.

चंद्र हा पृथ्वीभोंवतीं फिरतो. चंद्राच्या पलिकडे फार लांब सूर्य आहे. वाचकांस मागें सांगितलेंच आहे कीं, पृथ्वी आणि चंद्र हे दोन्ही गोल अपारदर्शक आहेत. यामुळें सूर्याचा प्रकाश यांवर पडतो तेव्हां सूर्य जिकडे असतो त्याच्या दुसऱ्या बाजूस या दोन गोलांची नैसर्गिक रीत्या छाया पडते. रात्रीं पृथ्वीच्या ज्या अंगीं आपण असतों त्याच्या दुसऱ्या अंगास खालीं सूर्य असतो. म्हणून आपल्या वरच्या बाजूस आकाशांत पृथ्वीची छाया पसरलेली असते. व जेव्हां चंद्र प्रकाशमान नसतो त्या वेळीं ही छाया आपल्या अनुभवास येतेच. चंद्र पृथ्वीभोंवतीं भ्रमण करीत असतां जेव्हां सूर्य व पृथ्वी यांच्या मध्यें येतो, तेव्हां

त्याची छाया पृथ्वीवर पडली पाहिजे. याच छायांमुळें चंद्रसूर्यास ग्रहणें लागतात. सूर्य स्वयंप्रकाश आहे म्हणून खरें म्हटलें असतां त्यास ग्रहण कधींच नाहीं. म्हणजे त्याजवर कोणाची छाया कधींच पडावयाची नाहीं. परंतु त्याच्या प्रकाशाच्या आड चंद्र जेव्हां येतो त्यावेळीं चंद्राची छाया पृथ्वीवर पडते व ती छाया जेथें पडते तेथील लोकांस सूर्य दिसेनासा होतो, तेव्हां तेथील लोक सूर्यास ग्रहण लागलें आहे असें म्हणतात. जेथें ही छाया पडत नाहीं तेथील लोकांस सूर्य दिसत असतो. आपणांपैकीं पुष्कळांचे पाहण्यांत आलेंच असेल कीं, दिवसास एखाद्या वेळीं आपण असतों तेथें ऊन असतें व कांहीं अंतरावर एखाद्या लहानशा ढगाची सावली जलद पळत असलेली दिसते, अशीच गोष्ट चंद्राची आहे. ढगापेक्षां चंद्र किती तरी पट मोठा आहे म्हणून त्याची छायाही तशीच मोठी असते, व ती पृथ्वीच्या बऱ्याच भागावर पसरते. स्वतः तेजस्वी नसलेला, अपारदर्शक व परप्रकाश असा चंद्र पृथ्वीभोंवती भ्रमण करीत असतांना जेव्हां सूर्य व पृथ्वी यांच्या मध्यें येतो तेव्हां सूर्य अदृश्य होतो व पृथ्वीवर अंधकार पडतो. जर सूर्याचा फक्त कांहीं भाग अदृश्य झाला तर त्यास सुर्याचें अंशग्रहण म्हणतात. संपूर्ण सूर्य अदृश्य झाला तर त्यास खग्रास ग्रहण म्हणतात. कधीं कधीं ग्रहणसमयीं चंद्राच्या योगानें सूर्यबिंबाचा मधलाच भाग झाकला जाऊन सूर्याभोंवतालचा भाग चकचकीत कड्यासारखा दिसतो त्यास कंकणग्रहण म्हणतात. सूर्य व चंद्र यांचे मध्यें पृथ्वी आली म्हणजे चंद्रग्रहण होतें कारण पूर्वी सांगितल्याप्रमाणें पृथ्वी स्वयंप्रकाश नसून अपारदर्शक व परप्रकाश आहे. तिची छाया अंतरिक्षांत पुष्कळ मैल—

पर्यंत पडते. चंद्र पृथ्वीभोंवतीं फिरतांना जेव्हां पृथ्वीच्या सावलींत येतो तेव्हां पृथ्वी मध्यें आल्यामुळें सूर्याचा प्रकाश चंद्रावर जात नाहीं, तेव्हां चंद्रास ग्रहण लागलें असें म्हणतात. सूर्यग्रहणाप्रमाणेंच चंद्राला अंशग्रहण किंवा खग्रास ग्रहण असतें. सूर्य आणि पृथ्वी यांच्या मध्यें चंद्र येण्याचा समय फक्त अमावास्येसच असतो आणि सूर्य व चंद्र यांच्या मध्यें पृथ्वी येण्याचा समय फक्त पौर्णिमेसच असतो. यामुळें सूर्यग्रहण झालें तर ते अमावास्येसच होतें व चंद्रग्रहण पौर्णिमेसच होतें. या वरील विवेचनावरून एखादा सहज प्रश्न करील कीं, दर अमावास्येस व दर पौर्णिमेस ग्रहणें कां होत नाहींत ? हा प्रश्न फार मार्मिक असल्यामुळें हा विषय येथेंच सोडतां येत नाहीं.

अमावास्येच्या वेळीं सूर्याच्या खालीं चंद्र कोठें तरी असतो, आणि सूर्य क्रांतिवृत्तांत कोठें तरी दिसतो. पृथ्वी सूर्य क्रांतिवृत्ताच्या मध्यबिंदूंत असते. ती छाया व सूर्य यांमध्यें नेहमीं अर्ध्या-परिघा इतकें म्हणजे ६ राशींचें अंतर असतें. पौर्णिमेच्या रात्रीं चंद्र जेथें असतो त्याच्या आसपास भूच्छाया क्रांतिवृत्तांत असते. सूर्याइतकीच भूच्छायेची गति आहे. तिच्याहून चंद्र जलद चालतो. तो पश्चिमेकडून पूर्वेस जातां जातां तो आणि भूच्छाया यांचें पूर्व-पश्चिम अंतर शून्य होतें तेव्हांच दक्षिणोत्तर अंतर शून्य झालें तर त्यास ग्रहण लागतें. परंतु दर पौर्णिमेस दक्षिणोत्तर अंतर शून्य होत नाहीं. कारण, चंद्रकक्षा (चंद्राचा फिरण्याचा मार्ग) व क्रांतिवृत्त हीं एका पातळींत नाहींत. चंद्राची कक्षा क्रांतिवृत्ताशीं ५ अंशांचा कोन करिते. जर चंद्रकक्षा व क्रांतिवृत्त हीं एका पातळींत असतीं तर प्रत्येक पर्वसमयीं चंद्र व भूमा किंवा चंद्र व

सूर्य यांचें दक्षिणोत्तर अंतर शून्य झालें असतें.

चंद्रकक्षा व क्रांतिवृत्त यांचा ज्या दोन बिंदूंत छेद होतो त्या बिंदूस राहुकेतु ह्मणतात. उदाहरणार्थ— दोन बांगड्या घ्या. त्यांत एक दुसरीपेक्षां साधारण लहान घ्या. नंतर त्या जमिनीवर सपाट ठेवा. त्या एकमेकांस आतां कोठेंच स्पर्श करीत नाहींत, कारण, त्या एकासपाटीतील किंवा एका पातळींतील आहेत. आतां त्या थोड्या तिरकस धरा. ह्मणजे त्या एकमेकांस दोनच ठिकाणीं छेदतील. त्या छेदनबिंदूंस राहू व केतु अशीं नांवें आहेत. राहुकेतूंत किंवा त्यांच्या जवळ चंद्र असतो तेव्हां चंद्राचा शर शून्य असतो किंवा अगदीं थोडा असतो. ह्मणजे क्रांति-वृत्ताजवळ चंद्र असतो. ह्मणूनच चंद्र क्रांतिवृत्तांत या दोन बिंदूत किंवा अगदीं जवळ, आल्याखेरीज येणें शक्य नाहीं. या वेळीं सूर्यही येथेंच असला तर त्याच्या आड चंद्र येतो. किंवा भूमा (पृथ्वीची छाया) तेथें असली तर तींत चंद्र सांपडतो. राहु-केतूंपासून चंद्र लांब असला तर तो क्रांतिवृत्तापासून लांब असतो. यामुळें त्याचा शर सूर्यबिंब किंवा भूमाबिंब याहून जास्त होतो व तो सूर्याच्या आड येत नाहीं किंवा भूच्छायेंत सांपडत नाहीं.

खवेत्यांच्या मतें राहु अथवा केतु यांपासून १७ अंशांचे आंत अमावास्येस चंद्र असला तर सूर्यग्रहणाचा संभव असतो व जर पौर्णिमेस १२ अंशाचे आंत चंद्र असला तर चंद्रग्रहणाचा संभव असतो. एकदां पौर्णिमेस किंवा अमावास्येस ग्रहण झाल्या-पासून पुढें एक किंवा दोन पर्वास ग्रहणें होतात. ह्मणजे लागो-पाठ दोन किंवा तीन ग्रहणें होतात. कधीं एकच होतें व त्यापुढें पांच साडेपांच किंवा सहा चांद्र महिन्यांत पुनः ग्रहण होतें.

सूर्यग्रहण लागण्यापूर्वी सूर्याच्या पश्चिमेस चंद्र असतो. परंतु तो जलद चालणारा असल्यामुळें सूर्याचें बिंब ओलांडून कांहीं वेळानें सूर्याच्या पूर्वेस येतो. पश्चिमेकडून चंद्र येतां येतां सूर्याच्या पश्चिमेकडेच्या भागाच्या आड येतांच सूर्यास त्या दिशेनें ग्रहण लागूं लागतें. तेव्हां स्पर्श झाला असें ह्मणतात. अर्थात् सूर्य ग्रहणाचा स्पर्श सूर्यबिंबाच्या पश्चिमेकडून होतो व पुढें सूर्यबिंबाचा अधिकाधिक भाग आच्छादीत होऊ लागतो नंतर कांहीं वेळानें तो कमी व्हावयास लागून सूर्याच्या पूर्वबाजूनें चंद्र हा सूर्यास मोकळा करितो. ह्मणजे ग्रहण सुटलें किंवा त्याचा मोक्ष झाला असें म्हणतात. या प्रमाणेंच भूच्छायेच्या पश्चिमेकडून चंद्र येऊन पूर्वेस जातो त्यामुळें त्याचा पूर्वभाग प्रथम आच्छादित होतो. पश्चिम भाग शेवटीं छायेंतून बाहेर पडतो. ह्मणून चंद्रग्रहणाचा स्पर्श बिंबाच्या पूर्वेकडून व मोक्ष पश्चिमेकडून होतो. बिंबाचा जितका भाग आच्छादित होतो तितका ग्रास झाला असें ह्मण-तात. स्पर्शापासून मोक्षापर्यंतचा जो काल त्यास पर्वकाल असें म्हणतात. या कालाच्या मध्याच्या सुमारास महत्तम ग्रास होतो. तेव्हां ग्रहणाचा मध्य झाला असें म्हणतात. यावेळीं जेवढा भाग आच्छादित असतो त्याप्रमाणें ग्रहणाची आकृति पंचांगांत काढितात.

आपणांस साधारणतः चंद्रसूर्यांचीं बिंबें विस्तारानें बहुधा सारखीं दिसतात. परंतु चंद्र व पृथ्वी यांच्या कक्षा दीर्घवर्तुळ असल्यामुळें चंद्रसूर्यांचें पृथ्वीपासून अंतर नेहमीं सारखें नसतें. यामुळें बिंबे लहानमोठीं दिसतात. कक्षेंतला जो बिंदु मध्यवर्ती ज्योतीपासून लांब असतो त्यास उच्च असें ह्मणतात. व जवळच्या

।बदूस नीच म्हणतात. हल्लीं साधारण डिसेंबर अखेर सूर्य (पृथ्वी) आपल्या कक्षेंत नीचीं येतो व जून अखेर उंचीं असतो. चंद्र सुमारें २७॥ दिवसांत एकदां आपल्या कक्षेच्या नीचीं आणि एकदा उंचीं येतो. चंद्रसूर्य उंचीं असतात तेव्हां त्यांचीं बिंबें लहान दिसतात. आणि नीचीं असतात तेव्हां मोठीं दिसतात. चंद नीचीं आणि सूर्य उंचीं असतां सूर्यबिंबाहून चंद्रबिंब बरेंच मोठें दिसतें. अशा वेळीं ग्रहण झालें तर तें खग्रास होतें. सूर्यबिंबाहून चंद्रबिंब लहान असतें तेव्हां कंकणग्रहण होतें. खग्रास ग्रहणकाळीं जी चंद्राची छाया पृथ्वीवर पडते तिचा व्यास फार तर १८० मैल असतो. यामुळें इतक्या रुंदीचा पूर्वपश्चिम पट्टा सूर्यबिंबावरून चंद्र पलीकडे जाईपर्यंत दैनंदिन गतीमुळें छायेंत येतो. तेथें मात्र खग्रास ग्रहण होतें. कंकणग्रहणांत पट्टा सुमारें १०० मैल रुंद असतो. या पट्ट्यांच्या उत्तरेस व दक्षिणेस तींच ग्रहणें खंडितमात्र दिसतात. व याचमुळें स्थलविशेषीं खग्रास किंवा कंकण सूर्यग्रहण फार वर्षांनीं दिसतें. खग्रास सूर्यग्रहणांत सूर्य अगदीं अच्छादित असलेला असा फार तर ८ मिनिटें दिसतो, व कंकण ग्रहणांत फार तर ३१ पळें दिसतो. पृथ्वी चंद्रापेक्षां पुष्कळच मोठी आहे. ह्मणून ग्रहणकाळीं चंद्र जेथें असतो तेथें पृथ्वी छायेचा व्यास चंद्रबिंबाहून पुष्कळच मोठा असतो. कधीं कधीं तो चंद्रबिंबाच्या तिप्पट आढळतो. ह्मणजे ग्रहणाचे वेळीं भूभा (भूच्छाया) व चंद्र यांचे मध्यबिंदु एका ठिकाणीं आले तर चंद्रामोंवतीं चंद्रबिंबाच्या दीडपट रुंदीचें भूभावेष्टण असतें याच मुळें चंद्रास कंकण ग्रहण कधींच लागत नाहीं. चंद्रास भूभांतून (भूच्छायेंतून) जाण्यास फार वेळ

दिसतें नेहमीं छायेच्या मोंवतीं दुसरी विरळ अशी छायेची पट्टी आढळते तीस छायाकल्प ह्मणतात. भूमेच्या मोंवतीं असलेल्या छायाकल्पांत जेव्हां चंद्र येतो, त्यावेळीं अमळ निस्तेज दिसतो. यामुळें खग्रास चंद्रग्रहणांत स्पर्शापूर्वी व नंतर कांहीं वेळ चंद्र निस्तेज दिसतो.

असो. येथपर्यंत ग्रहणासंबंधींची माहिती वाचकांस सविस्तर दिली आहे. अशाच प्रकारच्या माहितीनें प्राचीन भारतवर्षीय आर्यांचे ग्रंथ भरलेले आढळतात. लेखाच्या आरंभींच वराहमिहिराचे उद्गार दिले आहेत त्यांवरून ग्रहणें बिनचूक वर्तवितां येत अशी त्याची खात्री झालेली दिसते. त्यानें ज्यांस बिनचूक वर्तवितां येत नाहींत त्यांस ठिकठिकाणीं दोष दिलेला आढळेल कित्येक ठिकाणीं काळापूर्वी किंवा नंतर ग्रहणें लागतीं असतां त्यांचा फलादेश सांगितलेला आढळतो, त्यावर त्यानें टीका केलेली आहे व हें मत त्यास मान्य नाहीं असें स्पष्ट सांगितलें आहे. वराहमिहिरासारख्या आचार्याचे आज आमचे पंचांगकार अनुकरण करतील तो सुदीन होय. नुसतें कुंडलीविज्ञानकार असें ह्मणतात व ज्योतिर्विभूषण असें म्हणतात व आम्हांस कांहीं कळत नाहीं ! याप्रमाणें सांगितल्यानें व पंचांगकमेटीच्या रुळानें नव्हे आगगाडी प्रमाणें सरळ नियमानें शृंखलाबद्ध अयनांशयुक्त वगैरे गोष्टीनें पंचांगें केलीं म्हणजे आर्य पूर्वजांचे गुण आंगीं येतील असें वाटत नाहीं ! ! असो आपण आपल्या विषयाकडे वळूं.

अमृतास्वादविशेषछिन्नमपिशिरः किलासुरस्येदं ।
प्राणैरपरिक्तं ग्रहतां यातं वदंत्येके ॥

अर्थ.—सैंहिक देत्याचें शिर भगवंतानें छेदन केलें, तें अमृत-भक्षणाच्या योगानें जिवंत राहू ग्रह झाला, तो राहू असें कोणी म्हणतात.

इंद्वर्कमंडलाकृतिरसितत्वाच्चिल न दृश्यते गगने ॥
अन्यत्र पर्वकालात् वर प्रदानात्कमलयोनेः ॥

अर्थ.—तो राहू चंद्रसूर्य बिंबासारख्या आकृतीचा आहे. परंतु ब्रह्मदेवाच्या वरप्रदानास्तव पर्वकालावांचून कृष्णवर्णास्तव आकाशामध्यें दृष्टिगोचर होत नाहींत.

मुखपुच्छविभक्तांगं भुजंगमाकारमुपदिशंत्यन्ये ।
कथयंत्यं मूर्तमपरे तमोमयं सैंहिकेयाख्यं ॥

अर्थ.—मुख व पुच्छ या दोन अवयवांनीं विभक्तांग राहू आहे असें कोणी म्हणतात. सर्पाकार राहू आहे असें अन्य म्हणतात. कोणी देहरहित अंधःकाररूप राहू आहे असें म्हणतात.

(राहूस पाश्चात्य ग्रंथांत ड्रागुनस हेड असें म्हणतात व तो मोठा भयंकर सर्प आहे असें मानतात, व आपल्यांतही राहू सर्पाकार मानलेला आहे चंद्राची कक्षा नागमोडीसारखी वाकडी आहे व याच कक्षेंत राहू आणि केतु भ्रमण करीत आहेत. अर्थात् ते सर्पाकार आहेत हें सयुक्तिक आहे. यावरून आमचे पूर्वजांस नागमोडी कक्षेची माहिती होती असें दिसतें.)

यदि मूर्तोभविचारी शिरोथवा भवति मंडली राहुः ॥
भगणार्धेनांतरितो गृण्हाति कथं नियतचारः ॥

अर्थ.—जर राहू मूर्तिमान नक्षत्रीं गमन करणारा, मस्तक-रूप, मंडलवान् असा आहे तर निश्चित (३।११) अशी एकच गति होऊन सहा राशींनीं अंतर असतां चंद्रसूर्यांचें ग्रहण कसें करितो ?

अनियतचारः खलुचेद्दुपलब्धिः संख्यया कथं तस्य ।
पुच्छाननाभिधानोंतरेण कस्मान्न गृण्हाति ॥

अर्थ.—जर राहू अनियमित गति आहे तर त्याची गणितानें उपलब्धि कशी होईल ? पुच्छ व मुख असा विभक्तावयव आहे तर जसा सहा राशींच्या अंतरानें सूर्यचंद्रांचें ग्रहण करितो तसा एक दोन इत्यादि राश्यंतरानें कां ग्रहण करीत नाहीं ?

भूच्छायां स्वग्रहणे भास्करमर्कगृहे प्रविशतींदुः ।
प्रग्रहणमतः पश्चान्नेंदोर्भानोश्च पूर्वार्धात् ॥

अर्थ.—चंद्र आपल्या ग्रहणीं भूच्छायेंत प्रवेश करितो. व सूर्यग्रहणीं सूर्याप्रती प्रवेश करितो. भूच्छाया सूर्यापासून सप्तम राशीस असते व पौर्णिमेस चंद्रही तेथेंच असतो. ह्मणून ते चंद्र शीघ्रगतित्वास्तव पूर्वाभिमुख भूच्छायेंत प्रवेश करितो. यास्तव त्याचें ग्रहण पूर्वार्धाकडून होतें. सूर्यग्रहणीं सूर्यचंद्र एका राशीस असतात. तेथें चंद्र शीघ्रगतित्वास्तव पश्चिमेकडून येऊन अमावास्यांतीं सूर्यमंडलाप्रती प्रवेश करितो. यास्तव अधःस्थ चंद्र सूर्याचें आच्छादन करितो. या कारणास्तव चंद्राचें ग्रहण पश्चिमार्धा-कडून होत नाहीं. व सूर्याचें पूर्वार्धाकडून होत नाहीं.

वृक्षस्य स्यच्छाया यथैकपार्श्वेन भवति दीर्घाच ।
निशि निशि तद्वद्भूने रावरणवशादिनेशस्य ॥

अर्थ.—ज्याप्रमाणें वृक्षाची छाया एका बाजूस दीर्घ होते तशी तशी प्रत्येक राशीस सूर्याच्या आच्छादनानें भूमीची छाया पार्श्व-भागीं होते. असें आहे तर प्रतिमासास चंद्रग्रहण कां होत नाहीं या शंकेचें निवारण पुढें केलें आहे.

सूर्यात्सप्तमराशौ यदिचोदग्दक्षिणेन वातिगतः ।
चंद्रः पूर्वाभिमुखच्छायामौर्वीं तदा विशति ॥

अर्थ.—जेव्हां चंद्र सूर्यापासून सप्तमराशिस्थित होऊन भूच्छा-येंत उत्तरेकडून किंवा दक्षिणेकडून येतो तेव्हां पूर्वाभिमुख जातो असतां भूच्छायेंत प्रवेश करितो.

चंद्रोधःस्थः स्थगयति रविंबुदवत्समागतः पश्चात् ।
प्रतिदेशमतश्चित्रं दृष्टिवशाद्भास्करग्रहणं ॥

अर्थ.—सूर्याच्या खालीं राहणारा चंद्र, पश्चिमेकडून येऊन अभ्रासारखा सूर्याला आच्छादितो. यास्तव देशोदेशांत तें ग्रहण दृष्टिवशात्सव नानाप्रकारचे ग्रास असें दिसतें.

आवरणं महहिदोः कुंठ विषाणस्ततोर्धसंछन्नः ।
स्वल्पं रवेर्यतोतस्तीक्ष्णविषाणो रविर्भवति ॥

अर्थ.—चंद्रास मोठें आ छादन होतें यास्तव अर्धग्रस्त चंद्र कुंठविषाण होतो. सूर्यास स्वल्प आच्छादन होतें यास्तव अर्धग्रस्त सूर्य तीक्ष्णविषाण होतो.

एव मुपरागकारणमुक्तं दिव्यदृशिभिराचार्यैः ।
राहुः कारणमस्मिन्नि युक्तः शास्त्रसद्भावः ॥

अर्थ.—या पूर्वोक्त प्रकारें ज्ञानसंयुक्त दृष्टि आचार्यांनी ग्रहणाचें कारण सांगितलें. या ग्रहणाविषयीं राहु कारण असा शास्त्रसद्भाव सांगितला.

पत्रव्यवहार

विद्वद्वर्य रा० कुंडलीविज्ञान कर्ते यांसी.

सा. न. वि. वि. आपल्या तारीख १९ आगष्टचें अंकीं 'प्रयाण कोठें करावें.' व इतर पत्रव्यवहारावरील लेख वाचून आमच्या कांहीं मित्रांस थोड्या शंका आल्या, त्यांचे निरसनासाठीं आपणास विश्रांति करण्याचा त्यानीं आग्रह केल्यावरून त्यांचे समाधानार्थ खालील चार ओळी पाठवीत आहें. स्वीकार होऊन समर्पक उत्तरें येतील ही आशा आहे.

'क्यूधा, चा पहिला वर्ण क् असल्यामुळें अवकहड चक्राप्रमाणे आर्द्रा नक्षत्र कल्पून 'मृगशिरार्धमार्द्रा पुनर्वसुस्त्र-योमिथुनः ॥ या आधारें मिथुन राशि ठरविली. रा० प्रधान लिहि-तात कीं पाश्चात्य ज्योतिष्यांनीं कांहीं देशांच्या व शहरांच्या राशि ठरविल्या आहेत. व मद्रासची मेष रास आहे असेंही ते ह्मणतात, याचा वरील चक्राशीं मेळ बसत नाहीं, यावरून अलीकडील झडकीलादि ज्योतिष्यांनीं देशादिकांस ज्या राशि दिल्या किंवा कल्पनेनें बसविल्या त्या कदाचित् अक्षांश व रेखांश वगैरे पाहून अथवा कांहीं अन्य आधारें मानिल्या असतील. सूक्ष्म जंतूपासून ऐरावतापर्यंत पश्वादिकावरही नवग्रहांचा • पगडा आहे, परंतु ग्रंथकारांनीं उद्भिज्जादि क्षणभंगूर प्राण्यांचा फारसा विचार न करितां मनुष्य जातीसच महत्व दिलें आहे, व तें ज्ञानदृष्ट्या ठीक आहे. देशादिकांवर आलेलीं संकटें पाहून राशि ठरवाव्या तर त्यांचाही मेळ कधीं कधीं बसत नाहीं. कै० प्रोफेसर आठवले इंदूर कॉलेज यांनीं फलज्योतिषावर दोन वर्षांपूर्वी एक उत्कृष्ट नि-

बंध लिहिला आहे, तो प्रत्येकानें वाचनीय आहे. जोशीबुवा फलें सांगण्यांत काय काय खुब्या ठेवितात, याचें पूर्ण चित्र त्यांत वठलें आहे. देशांची किंवा मनुष्यांची राशी ठरल्यानंतर त्यांना ग्रहादिकांचीं फलें निळालीं पाहिजेत. शास्त्रानें कांहीं पुरुष व कांहीं स्त्रीलग्नें ठरविलीं अहेत, तथापि १२ ही राशींच्या कुंडल्या आपण पाहतों, व निरयन आणि सायन मानानें कांहीं फलें मिळतात. कुंडली पाहतांच ती कोणाची आहे हें खात्रीनें सांगणारे शेंकडा ५ ज्योतिषी असल्यास नकळे! अशी सांप्रतची स्थिती असल्यामुळें जरी मनुष्यदेहावर किंबहुना प्रत्येक प्राणि मात्रावर नवग्रहांचा ताबा आहे, तरी कित्येक लोक फलज्योतिषास झूट मानितात, व ती एक विद्या आहे असें प्रतिपादन करितात, याचा विचार तज्ज्ञांनीं प्रथम केला पाहिजे, असें आमच्या मित्रांचें म्हणणें आहे.

आम्हीं एक जोशीबुवा पाहिले. त्यांनीं पुरुष कुंडलीवरून रात्री नऊ वाजून पंधरा मिनिटांनीं ज्यावेळीं वृश्चिक लग्न सुरू होईल त्यावेळींच त्याची स्त्री प्रसूत होऊन पुत्र होईल असें भविष्य वर्तविलें होतें, चमत्कार हा कीं, बाईच्या पोटांत दुखण्यास आरंभ सकाळीं ७ वाजतां झाल्यावर ते ही गोष्ट बोलले, त्यामुळें बरीच मंडळी जोशीबुवांच्या भाकिताचा पडताळा पाहण्यासाठीं तत्पर होती. ईश्वरीसंकेताप्रमाणें त्यांच्या भाकितास यश येऊन त्या बाईची प्रसूति त्याच लग्नीं झाली, व फलज्योतिष्यास नांवें ठेवणारे कुंठित झाले. परंतु या त्यांच्या एका भविष्याप्रमाणें पाहिजे त्या कुंडलींची सर्व फलें बरोबर उतरतीलच असें नाहीं !!

त्यांचें म्हणणें बुद्धिवान व विद्वान मनुष्यें कल्पनेनें पुष्कळ गोष्टी

सांगतात. वैद्याची चिकित्सा व औषध योजना आणि जोशीबुवांचें गणित व तज्जन्य ग्रहांचीं फलें हीं केवळ त्यांचे बुद्धिमतेवर ज'स्त अवलंबून असतात. त्यांनीं ग्रंथांचे आधार दाखवून कांहीं गोष्टी ठरविल्या तरी त्यांत स्वतःचे कल्पनेवर पुष्कळ योजना करावी लागते. कोंकणांत व इतरत्र अडाणी लोकांत शेंकडा ९९ मनुष्यांच्या जन्म कुंडल्या मुळींच मिळावयाच्या नाहींत. असे लोक संकट समयीं जोशीबुवांस प्रश्न करण्यास आल्यास प्रश्नकुंडली मांडून कांहीं जोशी बुवा आपली फी वसूल करितात, किंवा कोणी १२ सुपाऱ्या मांडून अथवा धान्यादिकांच्या बारा राशी करून त्यांतील एकीस स्पश करण्यास सांगतात. व तो प्रश्नकर्त्ता ज्या राशीस हात लावील ती राशि जोशीबुवांच्या मतानुरूप डावीकडून किंवा उजव्या बाजूनें मोजून त्या मनुष्याची तीच राशि कायम करितात. व नंतर गोचर पद्धतीनें त्यादिवसाचें फल त्यास सांगण्यांत येतें.

आमच्या मित्रांजवळ एका जोशीबुवाकडून २ वर्षफलें आलेलीं आहेत. या जोशीबुवाकडे फक्त एका फुलांचें व एका फळाचें नांव लिहून पाठवावयाचें. त्यावरून ते छापील वर्षफल तयार करून तें १८३ मेहनतीचे वसूल होण्यासाठीं व्ही. पी. नें. पाठवितात. परंतु एकवार फसलेले गृहस्थ पुन्हां मागणी करीत नाहींत!! वर्तमान पत्रांतून आणखी कांहीं जाहिराती आहेत, परंतु अनुभवानें बहुतेक पोटमरू असल्याची खात्री होते. आंठांतून कोणाचीं दोन फलें तर कोणाची तीन अंशतःउतरतात. व त्यामुळेंच एकनाथात्मजासारख्यांस फलितावर टीका करण्यास जागा राहते. आपण लिहिलें आहे कीं, शास्त्र झूट म्हणण्यापेक्षां तितकें ज्ञान कोणास नाहीं म्हणणें ठीक व हीच गोष्ट सर्वांशीं खरी आहे.

स्थलादिकांच्या राशि ठरवून आपल्या राशीशीं त्यांचें ग्रहानुकूल्य पाहून तेथें गेल्यास धंदे रोजगारास तेजी येईल, हें म्हणणें आमचे मित्रास कबूल नाहीं. आमच्या प्रांती एक जोशीबुवा आहेत (त्यांनी अद्याप इतरांप्रमाणें जाहिरात दिली नाहीं.) तरी ते कोणत्याही कुंडलींत शनी, मंगळ, राहुसारखे पापग्रह भलत्यास्थानीं पडले असल्यास त्यांची योग्य ठिकाणीं पत्रिकेंत स्थापना करून देतात. रावणाला नवग्रह भीत होते, तसे या जोशीबुवांस चलनादियोगें ते भीत असावे!! जोशीबुवांच्या बारा गृहात ज्या ठिकाणीं ते सांगतील तेथें सर्व ग्रहांनीं निमूटपणें बसलेंच पाहिजे, असो.

जपदानादि योगें अनिष्ट ग्रह कोठवर शांत होतात. याचा अनुभव कोणीही परमेश्वराच्या अस्तित्वासारखा दाखऊ शकत नाहीं. व अभागी मनुष्य उत्तम लग्नीं प्रयाण करून देशांतरी गेल्यास मुहूर्तांचें फल येतें, हेंही कोणी अनुभवास आणून देऊं शकत नाहीं!! आपल्या एका अंकांत ज्योतिर्मार्तंड भास्कराचार्यांच्या मुलीबद्दल मजकूर वाचल्याचें स्मरते. त्यांच्या प्रयत्नास यश न येतां मुलीचा वैधव्ययोग टळला नाहीं!!

मित्रांचें म्हणणें, रोग्याचे लक्ष डाक्टर किंवा वैद्याच्या औषधाच्या गुणाकडे असतें, तद्वत् ज्योतिषीबुवा सूर्यसिद्धांतादि गणितानें किंवा निरयनाचें सूक्ष्म साधन गणित करून फलें सांगोत, अज्ञानी लोकांस पत्रिकांवरून आपला उदयकाळ भाग्य, यश संतति, सुख दुःखें वगैरे समजून घेण्याची जिज्ञासा असतें. परंतु ही जिज्ञासा तसे नवीन ग्रंथ निर्माण होईपर्यंत राहणारच. म्हणजे चंद्रापासून मंगळ पांचवा, त्या मंगळापासून शनी सातवा व शनीच्या स्थानापासून गुरु पांचवा, या प्रमाणें जुने नवग्रह व त्यांचे भरीस

आलेले दोन हर्शल व नेपच्युन अशा अकरा ग्रहांचीं आकर्षणें पाहून तज्जन्य फलें सांगण्याचें सामर्थ्य जोशीबुवांस आल्याबरोबरच अलीकडील तर्क व उद्योग विफल आहेत. येथील एक वृद्ध जोशी म्हणाले, अहो आम्हीं आपल्या मुखाद्या ग्रंथाचा 'ओनामा' केला, आणि इतक्यांत कोणी पाश्चात्यज्योतिर्वेत्त्यानें एका नवीन ग्रहाचा शोध लाऊनच आकरांत आणखी एक भर टाकून बाराराशि बारा जणांस वांटून दिल्या तर आपला ग्रंथ फुकट जाणार!! तेव्हां चाललें आहे, त्याजवर निर्वाह करून आहों? यांतच संतुष्टता आहे. आम्हां सर्वांस या वृद्धजोशीबुवांचें विनोदी भाषण ऐकून हंसूं आलें.

हे जोशी म्हणतात कीं, आरंभीं पृथ्व्युत्पत्ती नंतर पृथ्वी व नवग्रह हे विवक्षित स्थळीं होते, व नंतर ते भोंवऱ्याप्रमाणें फिरूं लागले ते पुन्हां ज्यावेळीं त्याच बिंदूवर येतील त्यावेळीं कल्पांत होणार. सारांश जोशीबुवांचीं मतें म्हणजे, एकाद्या ग्रंथांतील थोडासा आधार व त्याजवर त्यांची कल्पना. याच कल्पनेवर आज रा० प्रधान यांचा उद्योग दिसतो. आमचे मित्र म्हणतात. फलितांच्या पुस्तकांत केवळ ग्रंथांची भाषांतरें व इतर फालतू पत्रव्यवहार किंबहुना इंग्लिश पुस्तकांवरून कांहीं शहरादिकांचें अक्षांशादि देऊन पुस्तक भरण्यापेक्षां पुस्तकाच्या वाचनानें मनुष्य वर्गास ज्या योगें ज्ञान येईल, म्हणजे ते दुसऱ्यांच्या कुंडल्या तयार करण्यास व फलें सांगण्यास तयार होतील, अशी माहिती दिल्यास कोणतेंही पुस्तक फार उपयुक्त होईल. मनुष्य जातीची तयारी झाल्यावर नंतर इतर गोष्टींकडें आपण वळूं असें त्यांचे म्हणणें आहे.

या नवग्रहांची उत्पत्ति, शंकरादि देवांसही पीडा करण्याचें

त्यांचें सामर्थ्य, प्राणिमात्रावर त्यांचें होणारे परिणाम, व त्यांचे इतर चमत्कार यांचा विचार करूं लागल्यास व त्यांचीं कारणें शोधूं लागल्यास मनुष्याची बुद्धि थक्क होते. घातवारीं प्रयाण करूं नये असें सर्व ज्योतिषी सांगतील, परंतु आमचे वडील आह्मांस नेहमीं सांगत कीं, आपला गुरुवार घातवार असून त्या दिवशीं प्रयाण केल्यास कार्यसिद्धि हटकून व्हावयाची (त्यांना नवम गुरु होता तो अनिष्ट फलदायक कसा होईल.) यावरून एकही गोष्ट आज निश्चित करितां येत नाहीं. आपापल्यापरी सर्व जोशी आपला धंदा करून आहेत व द्रव्यार्जन करीत आहेत ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे.

(१) हिंदुस्थानांतील मनुष्य प्रतिकूल ग्रहदशेंत इंग्लंद, फ्रान्स, किंवा अमेरिका किंवहुना रा० प्रधान यांचे मताप्रमाणें एखाद्या ग्रहानुकूल गामीं गेल्यास जे ग्रह जन्मकाळीं हिंदुस्थानांत पीडाकारक ठरलेले ते अशा योगें तो मनुष्य परदेशांत गेल्यानें फसतील काय ?

(२) कर्म रेखन मिटे करो कोई लाखों चतुराई ॥ या तुळसीदासाच्या उक्तीस बाध येईल काय ?

(३) दारिद्री गया दर्यावमों कर्म चले साथ ॥ मोतिन् खित्ती डुबी मारी शंख लागेगा हात ॥ भाग्यहीन पुरुषास कोठेंच यश नाहीं. मनुष्यमात्राचें हातीं असल्या गोष्टी परमेश्वरानें ठेविलेल्या नाहींत. उद्योगवादी कदाचित् याच्या उलट मानील. परंतु अमुक गोष्ट निश्चयाने करूंच असें तोही निश्चयानें सांगू शकत नाहीं.

आमचा स्वतःचा फलितावर पूर्ण विश्वास असून निरयनचींच

फलें आह्मांस आजवर अनुभवास आली आहेत सायन मानानेंही ग्रह फिरले तरी ग्रह त्याच स्थलीं असावे असें वाटतें, यावरून सायनही तींच फलें दर्शविणार. परमेश्वर दाखविण्याचें सामर्थ्य थोड्या महापुरुषांत आहे. तद्वत पाहिजे त्यानें आपली कुंडली घेऊन येऊन खात्री करून घ्यावी. असें छातीवर हात ठेऊन आव्हान करणार ज्योतिषी आपल्या देशांत निपजतील तो सुदीन व त्याबेळीं मात्र भलते कुतर्क कोणी काढणार नाहीं.

चंद्र मंगळावर मनुष्यवस्ती असल्याचा आजपर्यंतचा जो वाद त्याचा नुकताच निकाल लागून त्या आरोपांतून ते बिचारे ग्रह मुक्त झाले ! या आनंदोत्सवार्थ कांहीं मंडळी एक नवीन जयंत्युत्सव करणार आहे, असें ऐकितों.

नासिकास मुक्कामीं 'कुंडलीविज्ञानास ज्या वेळीं एक भावंड झालें, त्यावेळीं कांहीं मंडळी मोठ्या आशेवर होती कीं, त्याच्या जननामुळें बालपणचे बोबडे बोल वगैरे ऐकून आनंद होईल. परंतु ते जगास माहीत नाहीं असें ज्ञान किंवा भाषा कोठून वापरणार. असलीं पन्नास पुस्तकें निर्माण झाल्यानें जास्त माहिती कांहीं होणें नाहीं ! ! आम्हांस एक जोशी (हिंदुस्थानीं) भेटले, ते म्हणाले, अहो काय करावें ! मी सूर्यसिद्धांतापर्यंत गणित दुसऱ्यास शिकवूं शकतों. परंतु मला एकाही ग्रहाचें फल सांगतां येत नाहीं, त्यामुळें मी ही विद्या कोठून शिकलों असा मला पश्चात्ताप झाला आहे.

आह्मीं ज्या शास्त्रावर आजपर्यंत विश्वास ठेवीत आलों. ज्यावर ऋषी व इतर विद्वानांचे निरनिराळे ग्रंथ निर्माण झाले, चंद्रसूर्यादि

नवग्रह ग्रहणसमयीं ज्याच्या सत्यतेबद्दल साक्ष देतात, शनी सारखा पराक्रमी ग्रह ज्यावेळीं प्रतिकूल होतो, त्यावेळीं फलाबद्दल कशी खात्री करितो, व फलज्योतिषावर नसलेला विश्वास बसवितो. असलें ज्योतिषशास्त्र भरभराटीस आणण्याचें सोडून गणित खरें परंतु फलित खोटें! काकताली न्यायानें जोशी बुवांचें एखादें भाकित सत्य होतें, परंतु सर्व ठकविद्या आहे, असें म्हणण्यांत आमचें मूर्खत्व असून देशाची हानी आहे. आपण या लोकाचे वर्तनावर बरेच तडाके दिलेले आहेत, तरी आणखी कान उघडणी झाल्यावांचून ते ताळ्यावर येणार नाहींत, व ज्योतिषाची थट्टा वेळोवेळीं करणार नाहींत या आशेवर या चार ओळी लिहून आपली रजा घेतों. फुरसती अंकीं पुढें कधीं तरी भेटेन. कळावें हे विनंति.

आपला—

एक 'त्रि०' वर्गणीदार

फलज्योतिषाचा खून!

ता. १ आगष्टच्या कुंडलीविज्ञानाच्या १२ व्या अंकांत वरील मथळ्याखालीं एकनाथात्मजांच्या विधानांस आम्हीं उत्तर दिलें होतें. परंतु त्या लेखानें त्यांस चिड येऊन इंदूच्या १० सपटंबरच्या अंकांत त्यांनीं पुन्हां चिडखोर पणानें एक बाष्कळ लेख लिहिला आहे. वास्तविक असल्या लेखांस आम्हांस उत्तर देण्याचें कारण नाहीं. पण ज्या अर्थी इंदूनें त्या लेखास आपल्या अग्रलेखाशेजारींच जागा दिली आहे त्या अर्थी आम्हांस त्या लेखाचें पुनः पिष्टोषण करावें लागत आहे, याबद्दल वाईट वाटतें!

एकनाथात्मजांचीं विधानें.

(१) "फलज्योतिष एक ठकविद्येचें शास्त्र आहे, याबद्दल हजारों प्रत्यक्ष प्रमाणांनीं सिद्ध करून दाखवितां येण्यासारखें आहे."

हें एकनाथात्मजांचें पहिलें विधान आहे. खरोखर जर हें ठकविद्येचेंच शास्त्र आहे तर मग तें सिद्ध करण्याची काय जरूर आहे? लेखणीच्या एका फटकाऱ्या सरसेंच तें ठक ठरतें! एखाद्या मनुष्याला तूं लुच्चा आहेस असें ज्याला म्हणावयाचें असेल तो एका फटकाऱ्यानें त्याला लुच्चा ठरवतो. त्याला सिद्ध करण्याची जरूर लागत नसते. एकनाथात्मजांनीं फलज्योतिषाला ठकविद्या म्हटल्यास त्याचा कोणालाही राग येणार नाहीं. परंतु त्यांना आम्हीं असें सांगितलें होतें कीं, त्यांनीं प्रथम आमच्या सहवासाला राहावें आणि मग या शास्त्राला दूषणें द्यावीं. पण याविषयीं ते या लेखांत कांहींच लिहित नाहींत. कोणत्याहि शास्त्राचा यथासांग अभ्यास न करितां त्या शास्त्रावर अभिप्राय देणें हें आमच्या मतें मूर्खपणाचें व पोरकट विचारांचें आहे एकनाथात्मजांना अद्यापि या शास्त्राची श्रीसुद्धां

समजलेली दिसत नाहीं. त्यांनीं हें ठकविद्येचें शास्त्र आहे असें त्याचा अभ्यास करून ठरवावें असें आमचें म्हणणें आहे. फलज्योतिष ही ठकविद्या आहे व कुंडलीविज्ञानकर्ते "देशबांधवांच्या डोळ्यांत धूळ फेकतात" (अर्थात् तेही ठकच आहेत) ही भाषा कोणत्या बाजारांतली ? असो. आज आम्ही त्यास जोरानें सांगतों कीं, हें ठकविद्येचें शास्त्र आहे असें त्यांनीं सिद्ध करावें, नाहींपेक्षां असल्या बेशरमी आणि बिनलगामी विधानास आम्हीं उत्तर देऊं इच्छित नाहीं.

मागल्या लेखांत असेंच एक बेशरमी विधान केलें होतें. 'आजपर्यंत अनेक विद्वानांनीं ज्योतिःशास्त्र म्हणजे केवळ भ्रमजाल ठरविलेलें आहे' परंतु या विधानासाठीं जेव्हां दीक्षितांच्या लेखाचें त्यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातलें तेव्हां ते शुद्धीवर येऊन त्याबद्दल (कांहीं न लिहिल्यामुळें) कबुली जबाब देत आहेत.

आजचें विधान असेंच बेशरमीपणाचें आहे असें वाचकांस कळून येईल. एखाद्या डॉक्टरच्या औषधानें गुण आला नाहीं, किंवा प्लेगवर रामबाण औषध अद्यापि कोणास मिळालें नाहीं किंवा दवाखाने आहेत, वैद्य आहेत, डॉक्टर आहेत तरी लोक मरावयाचे ते मरतातच. सबब वैद्यशास्त्र हेंही ठकविद्येचेंच शास्त्र आहे असें जर एखादा पीर झणूं लागला तर मूर्ख झणून विद्वान लोक त्याची उपेक्षाच करितील. तद्वतच एकनाथस्मृतीची आज आम्ही उपेक्षा करितों !

(२) **' वेदकाळ कोणता हेंच त्यांना समजलेलें नाहीं.'**

आम्हांला समजलें नाहीं तर तुम्ही तरी सांगा. नुसतें ज्ञानपूर्वक कार्य होत असे अशा काळास वैदिक काळ झणतात असें सांगून

काय उपयोग ? या वैदिक काळांत कुंडलीविज्ञान कर्त्यांचें फल ज्योतिष होतें हें त्यांनीं सिद्ध करावयास पाहिजे होतें, असें एकनाथस्मृति झणतात. त्यांना आम्हीं वैदिक वचनें दिलीं होतीं पण तीं त्यांना चारही वेदांत कोठें आढळलीं नाहींत. यावरून त्यांचा वेद आणि आमचा वेद एक असेलसें वाटत नाहीं, किंवा त्यांना वेदाबद्दल कांहींच माहिती नसेल. त्यांचा आमचा वेद जर एक नसेल तर आमचा नाइलाज आहे. आणि वेदांबद्दल जर त्यांना कांहींच माहिती नसेल तर आम्ही तरी काय करणार ? पण, याच लेखांत ते आम्हांलाच झणतात कीं 'अजून त्यांनीं वेद पाहिला आहे किंवा नाहीं याचीच आम्हांला शंका येते, 'चोराच्या उलट्या बोंबा' झणून स्वस्थ बसावें झालें ! ज्यांना चारही वेद अवगत असून आम्हीं दिलेलीं वचनें आढळत नाहींत ते अगडबंब विद्वान् समजले पाहिजेत !

(३) 'त्यांनीं महाभारतादि व अन्य पुराणांतून बरेच आधार काढून भारूढ रचलेलें आहे. त्या सर्वांचा उल्लेख करण्याचें कारण नाहीं. महाभारत हा एक असा ग्रंथ आहे कीं व्यास ऋषींनीं तयार केलेल्या भारतरूप प्याल्याभर दुग्धांत सबंध समुद्र आणून ओतलेला आहे ! पूर्वजांच्या प्रभावशाली नांवावर बोटेल तसा ग्रंथ तयार करणारा पंथ आमच्या देशांत होऊन गेलेला आहे. व वेदकाळाच्या मागून याचीच सद्दी आली होती. बोटेल ती अनन्वित चाल सुरू करून ही वेदानुकूल आहे असेंही लिहून ठेऊन त्या वेळचे लोक आपल्या मतलबांत चूर झालेले दिसतात.'

वरील उत्तर आमच्या भारतकालीन पुराव्यांत दिलें आहे ! हा बाष्कळपणा नव्हे तर काय ? धेंगडें आंगाशीं येऊं लागलें झणजे

मनुष्य कसा बाष्कळ बनतो याचें हें उत्तम उदाहरण आहे. वेदांतलीं वचनें पाहिजे होतीं तेव्हां वेदांतलीं वचनें दिलीं, पण तीं वेदांतलींच नाहींत, वेदकाळ निराळाच आहे, असें लिहितात व भारतकालचीं वचनें दिलीं तेव्हां वरील मत देतात ! असल्या विद्वानानें वर्तमानपत्रांत लिहून 'येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत्' अशा लौकिकाला पात्र व्हावें इतकाच त्या लेखकाचा उद्देश असला पाहिजे. असल्या शेणसड्या त्या इंदूनें आपल्या अग्रलेखाशेजारीं जागा दिली त्यापेक्षां दोन कालम कोरेच ठेविले असते तर काय बिघडलें असतें ?

४ खादाडज्योतिषवाले शनि हा एक क्रूर देव आहे, मंगळ साहेब युद्ध आहेत नी बुध साहेबांना अशी अशी लांच दिली असतां खुष होऊन ते सर्व संकटें निवारतात. इ० इ० कथा रचून पैसे उपटण्याचा धंदा करीत असतात ! धर्मदृष्ट्या पाहिलें असतां देखील अशा प्रकारें खोटया कल्पनांचा प्रसार करून आपलें पोट जाळणें यापेक्षां अधिक पाप तरी कोणतें असणार ?

शीः, शीः, घाणरे घाण ! हें मच्छली बाजाराच्या पलीकडचें कुत्र्या मांजराच्या मांस विक्रीचें मार्किट नव्हे असें कोण म्हणणार नाहीं ? ही घाण ज्याला आवडेल त्यांनीं खुशाल घ्यावी. आम्ही यावर कांहींच लिहूं इच्छित नाहीं.

' कुतर भुकत वाकूं भुकवदे । तूं तो राम सुमर जग तरुवादे ॥

(५) परमेश्वर सर्वत्र व्यापक आहे, तो सर्व अंतर्यामी आहे. पण एवढ्याच साठीं सर्व पदार्थ म्हणजे देवता ही समजूत गांवढळ आहे.

फलज्योतिषाचा खून !

[मागील अंकावरून पुढें चालू]

ता. १३ सप्टेंबरच्या इंदूच्या अंकांत एकनाथात्मजांनीं वेदांत देव कोणकोणते सांगितले आहेत त्याबद्दल उतारे दिले आहेत व त्यांना देव म्हणणाऱ्या आर्यांची कल्पना त्या त्या पदार्थांची गंध-पुष्पादिकांनीं पूजा करावयासाठीं नसून केवळ व्यवहारार्थ देव व देवता ही संज्ञा लाविलेली आहे, असा स्वतःचा त्यावर शेरा दिला आहे. यांतच ग्रहांदिकांना देव म्हणावयाचें, अशी त्यांना कबुली द्यावी लागली, ही आनंदाची गोष्ट आहे. आतां प्रश्न कायतो पूजेच्या विधीचाच राहिला आहे. त्यांच्या मतें पूजा करावयाची, पण ती गंधपुष्पादिकांनीं नाहीं. उदाहरणार्थ, पृथ्वीची उत्तम प्रकारें मशागत, लागवड करणें हीच तिची पूजा आहे. माता-पित्यांची सेवा, विद्वानांचा यथोचित सत्कार हीच त्यांची पूजा. पृथ्वीवर गंधफूल वहावयाचें नाहीं किंवा मातापितरांची अथवा विद्वानांची पाद्यपूजा करावयाची नाहीं. एकनाथात्मजांचा असा आग्रहच असला तर आमचें कांहीं जात नाहीं. गंधफुलांनीं पूजा होते व सेवेनें होत नाहीं असें कोण म्हणतो ? पण केवळ सेवा करणारे तेवढे वेदानुयायी व पाद्यपूजा करणारे महामूर्ख किंवा गांवढळ हें म्हणण्याचा त्यांना काय अधिकार ? भक्तीला कांहीं मर्यादा नाहीं, उलट तो जितकी अधिक असेल तितकी त्याच्या हातून जास्त चांगली पूजा होईल. आईबापांवर निःसीम प्रेम करणारा मनुष्य उत्तमोत्तम पोषाख आपणच घालील आणि आईबा-

पाला जाडाभरडा देईल, किंवा सुगंधी फुलांचे गजरे किंवा गुच्छ आपणच तेवढे वापरील आणि आईबापांना वाससुद्धां देणार नाहीं. किंवा उंची अत्तरें आपल्याच आंगाला फाशीलं आणि आईबापांना चांगलेंसें खोबरेल सुद्धां देणार नाहीं अथवा गोड गोड पदार्थ आपणच सेवन करील आणि आईबापांना 'टुक् टुक्' करील असें आम्हांला तरी वाटत नाहीं. पृथ्वीनें आपणास ठाव दिला व जी आपणास पोसते तिच्या ठिकाणीं निःसीम भक्ति करणारा मनुष्य आपण जे जे पदार्थ वापरतों व ज्या ज्या पदार्थांनीं आपणास सुख व आल्हाद यांची प्राप्ति होते ते ते पदार्थ तिला प्रथम अर्पण केल्याशिवाय आपणच उपभोगील हेंही शक्य नाहीं. आमच्या मतें ज्या मानानें प्रेम त्याच मानानें पूजा. प्रेमच जर नाहीं तर पूजा तरी कशी होणार? आणि झाली तरी ती केवळ औपचारिकच असणार. देव जर पूजनीय आहेत तर त्यांची पूजा करणें ती अमक्याच प्रकारें केली पाहिजे असें झगतां येणार नाहीं. अर्थात् गंधफुलादिकांच्या पूजेच्या विधीला गांवढळ किंवा अडाणी चाल असें झणतां येत नाहीं. ज्याची जशी भक्ति असेल व ज्याचें जसें सामर्थ्य असेल त्याप्रमाणें तो आपल्या देवाची पूजा करील. तो आपल्या देवावर गंध-फूल वाहतो झणून गांवढळ आणि एकनाथात्मज तेवढे शहरी असे आमच्यानें तरी झणवत नाहीं.

देवांची पूजा करणें जर योग्य वाटतें तर प्रार्थना करण्यास कां शरमावें कळत नाहीं ! जें पूजनीय आहे तें, प्रार्थना करण्यासही पात्र असलेंच पाहिजे. पूजेवांचून किंवा प्रार्थनेवांचून जर मनुष्य वळत नाहीं तर देवांनीं काय झणून कृपा करावी ? कृपा करणें जर देवांच्या हातांत नसेल तर पूजा तरी कां केली पाहिजे ? वेदां-

मध्येंही ज्यांना देव झटलें आहे, त्यांचीं स्तोत्रेंही झटलीं जात होतीं. ज्या काळामध्यें ज्ञानानेंच कृत्यें होत होतीं त्याच काळीं देवांचीं स्तोत्रेंही गाईलीं जात होतीं ! पूजा आणि प्रार्थना हे दोन्ही विधी भक्तिदर्शक किंवा कृतज्ञतादर्शक आहेत. हे विधी आजच्या सुधारलेल्या व्यवहारांतही केले जातात. गव्हर्नरसाहेबांना आपण पानसुपारी, हारतुरे, अत्तरगुलाब वगैरे अर्पण करून मानपत्र देणें याचा अर्थ काय ? ही गव्हर्नरसाहेबांची पूजा आणि प्रार्थना नव्हे काय ? आपला एखादा मित्र घरीं आला तर त्याला चहाकाफी पानसुपारी देतों, याचा अर्थ काय ? चहाकाफी हा एक प्रकारचा नैवेद्यच नव्हे काय ? एखाद्या अधिकाऱ्याला खुष करण्यासाठीं फळफळावळ किंवा मेजवानी देतों त्याचा अर्थ काय ? तात्पर्य, पदार्थमात्राच्या ठिकाणीं जर मनुष्याची भक्ति आणि कृतज्ञता असेल तर तो त्या पदार्थाची पूजा आणि प्रार्थना करणारच. हा व्यवहार नैसर्गिक आहे. भटाभिक्षुकांनीं पोट जाळण्यासाठीं केलेला नाहीं, हें एकनाथात्मजांना समजूं नये ही आश्चर्याची गोष्ट आहे !

" सूर्यादिकांना वेदांत देव झटल्याचें कुंडलीविज्ञानकर्त्याच्या कानावरून ओझरत गेलेलें दिसतें ! " हें एकनाथात्मजांचें अहंमन्यिकेचें वाक्य त्यांनाच शोभतें. कुंडलीविज्ञानकर्ते वेदांविषयीं अज्ञानी आहेत, पण त्यांना वेदाविषयीं जितकें कळलें आहे, त्यापेक्षां एकनाथात्मजांना जास्त कळलें असेल असें त्यांच्या लेखावरून दिसत नाहीं. एकनाथात्मज, अद्यापि विद्यार्थी दशेंतच असतील, त्यांना अद्यापि वेदाचें एक अक्षरही कळलें नसेल, तोंच चारही वेदांच्या धेंडी गोष्टी आम्हांस सांगत आहेत ! " उथळ पाण्याला खळाळी फार " असें झणतात तें कांहीं खोटें नाहीं. सूर्यादिकांना वेदांत

देव झटलें आहे, हें एखादा ब्राह्मणाचा पोरही सांगूं शकेल. त्याच्या साठीं एकनाथात्मजांसारखें गुरु करण्याचें कारण नाहीं. तेतीस कोटी देव याचा अर्थ अद्यापि त्यांना कळलेला नाहीं, यावरूनच त्यांच्या ज्ञानाची परीक्षा होत आहे ! त्याचप्रमाणें त्यांनीं आपल्या पहिल्या लेखांत समुद्राला जलाची देवता केली आहे, यावरूनही त्यांच्या वेदवेत्तेपणाची कल्पना होते. एखाद्या पुस्तकातून वेदाचे उतारे घेऊन त्यावर अद्वातद्वा लेखणी चालविण्यानें कोणी विद्वान् समजत नाहींत.

देव आणि परमात्मा यांतील तात्विक भेद कुंडलीविज्ञानकारांस चांगला अवगत आहे परंतु व्यवहारामध्यें परमात्म्यालाही देव झणतात. परमात्मा निराकार व निर्गुण आहे. मनुष्यानें परमात्म्याशीं तादात्म्य पावणें ही त्याची इतिकर्तव्यता आहे. परंतु तादात्म्य पावणें ही गोष्ट सोपी नाहीं. प्रार्थनासमाज घ्या किंवा आर्यसमाज घ्या, त्यांत परमात्म्याशीं तादात्म्य पावलेला अद्यापि एकही मनुष्य निर्माण झालेला नाहीं व पुढेंही होणें शक्य नाहीं. मनाचा परब्रह्मांत लय करण्याचे मार्ग निराळे आहेत त्या मार्गानीं पायरी पायरीनें प्रयत्न करावा लागतो. आठवड्यातून एखाद्या दिवशीं हप्ताहप्त्यानें नुसती प्रार्थना करून हें काम होत नसतें. परमात्मा स्थिरचरादिकीं सर्वत्र भरला आहे, हें शब्दामध्यें मात्र समजलें आहे. प्रत्यक्षानुभव घेतलेला मनुष्य लाखांत एकही दृष्टीस पडणार नाहीं. प्रत्यक्षानुभव मनाचा लय झाल्याशिवाय मिळावयाचा नाहीं. मनाचा लय होण्यास प्रथम चित्त शुद्ध व्हावें लागतें. चित्त शुद्ध होण्याचे मार्ग अनेक आहेत. त्यांतच तीर्थयात्रा, साधुपुरुषांचीं दर्शनें, देवादिकांच्या कथा ऐकणें, मूर्तिपूजा

वगैरे मार्ग येतात. आमच्या धर्मामध्यें ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें हे मार्ग सांगितलेले आहेत. अशी सोय कोणत्याच धर्मांत नाहीं. सर्वच माणसें एकनाथात्मजांसारखीं ज्ञानी कोठें आहेत ! जो दुसरा कशांत ईश्वराची भावना करून उपासना करितो तो गाढव असें एकनाथात्मज एका वेदवचनाच्या आधारें म्हणतात. यावरून आर्यसमाजवांचून सर्व समाज एकनाथात्मजांच्या मतानें गाढव आहेत. एकनाथात्मजांच्या पोतडींत ठेवण्यासाठीं आम्हांला एक श्लोक माहीत आहे तो येथें देतों, तोही त्यांनीं आपल्या हृत्पटलावर खोदून ठेवावा !

उत्तमा सहजावस्था मध्यमा ध्यानधारणा ॥
अधमा प्रतिमापूजा तीर्थयात्राधमाधमा ॥

एकनाथात्मज हल्लीं सहजावस्थेतच आहेत, तेव्हां त्यांना हा श्लोक मनापासून आवडेल. यांत तीर्थयात्रा करणारांस अधमाधम झटलें आहे झणजे त्याची गाढवांच्या पलीकडे योग्यता सांगितली आहे. आतां काशीरामेश्वरीं यात्रा करणारास, पंढरीच्या वारीस जाणारांस किंवा कृष्णा गोदा यांच्या पाण्यांत बुड्या मारणारांस मूर्ख, पाजी, अडाणी, गाढव वगैरे वाटेल तें म्हणता येईल !

पृथ्वी ही शेषाच्या डोक्यावर आहे म्हणजे काय, नागपूजा कां करावयाची, जडांच्या पूजनेंत कोणतें तत्व आहे, गंधफुलांदिकांनीं पूजा करणें झणजे काय, बाह्येंद्रियांना निराकाराचें दर्शन कसें होतें, निराकाराचें दर्शन घेण्याचे मार्ग कोणते वगैरे गोष्टी येथें सांगत बसण्याचा हा प्रसंग नव्हे व तो आमचा विषयही नाहीं पण, एकनाथात्मजांना आम्ही बजाऊन सांगतों कीं त्यांना अद्यापि पुष्कळ शिकावयाचें आहे.

ग्रहादिकांना वेदामध्ये देव म्हटलें आहे, देवांचीं स्तोत्रें गाइलीं आहेत, ग्रह हे देव या संज्ञेला पात्र आहेत, त्यांच्यापासून मनुष्याला पृथ्वीप्रमाणेंच दान होतें, ग्रहांचा मनुष्याचे देहावर व त्यांच्या सर्व व्यवहारावर परिणाम घडलेला स्पष्ट दिसतो, म्हणून त्यांची आराधना केली पाहिजे. त्यांची आराधना करणें म्हणजे त्यांना लांच देणें हें म्हणणें मूर्खपणाचें आहे. तिकडे लक्ष देण्याचें आम्हांला कारण नाहीं. ज्यांना ग्रहांचा परिणाम घडलेला प्रत्यक्ष अनुभवास येईल तो त्यांची आराधना करणारच, एकनाथात्मजांना हा अनुभव नसेल तर त्यानीं करूं नये. ग्रहांच्या आराधनेनें मोक्ष मिळतो असें कोणीही सांगत नाहीं. मोक्षाचा जो अधिकारी आहे त्याला ग्रहांची आराधना करण्यास नको. जे प्रपंचाचेच अधिकारी त्यांनीं ग्रहांचीच आराधना केली पाहिजे. ज्याच्यापासून कार्य साधावयाचें त्याची आराधना करणें हा सरळ व्यवहार आहे. पाटलापासून काम करून घेणें असेल, तेव्हां पाटलाचीच आराधना केली पाहिजे, राजेसाहेबांची आराधना ज्याला करावयाची त्यानें तितकी योग्यता प्रथम संपादन केली पाहिजे. नाहींपेक्षां कंपाउंडांतील शिपाईच धक्की मारून हाकलून लावील. संसारी मनुष्याला देव देवता यांची आराधना केलीच पाहिजे. मानवी शक्तीपेक्षां दैवी शक्तीची योग्यता अधिक आहे. दैवी शक्ति देवतांच्या आराधनेनें प्राप्त होते. या दैवी शक्तीनें असाध्य रोग बरा होतो, रंकाचा राव होतो, वंध्येलाही पुत्र होतो व मुक्यालाही वाचा येते. इतकें सामर्थ्य मानवी शक्तींत नाहीं. दैवी शक्ति भक्तीशिवाय प्राप्त होत नाहीं. ज्या मानानें भक्ति त्याच मानानें ती प्राप्त होते.

कोणताही विषय केवळ तर्कानें खरा होत नसतो. चुना आणि

हळद हे दोन पदार्थ एकत्र केल्यानें जो रंग तयार होणार तो कल्पनेला कळणार नाहीं. त्याचप्रमाणें ऑक्सीजन आणि हायड्रोजन यांच्या संयोगानें कोणता पदार्थ तयार होईल हेंही अतर्क्य आहे. हे विषय अनुभवाचे आहेत. फलज्योतिषाची सत्यता अनुभवानेंच कळूं शकते. हें शास्त्र खरें कीं खोटें हें तर्कानें सिद्ध होणार नाहीं. एकनाथात्मज किंवा त्यांच्या मताचे जे कोणी आहेत ते तर्काच्या जोरावर हें शास्त्र खोटें आहे असें प्रतिपादन करीत आहेत, म्हणून त्यांचा मार्ग खोटा आहे. अनुभवजन्य ज्ञानानें जर ते परीक्षण करिते तर त्यांना सत्य कळलें असतें. तात्पर्य, फलज्योतिष हा विषय अनुभवानेंच प्रतिपाद्य आहे. अमुक एक नियम या शास्त्रांत आहे व तो खोटा आहे असें प्रतिपादन करणारा मनुष्य वादाला अधिकारी आहे असें आम्ही समजतों. जें खोटें असेल तें खरें आहे असें जो ज्योतिषी सिद्ध करूं लागेल तो मूर्ख होय. कुंडलीविज्ञानकर्त्ते खोटयाला खोटेंच म्हणतील एकनाथात्मजांना जर वाद करावयाचा असेल तर त्यांनीं हा मार्ग धरावा. पोकळ पांडित्याला उत्तर देत बसण्याची आम्हांला आवश्यकता वाटत नाहीं.

ता० २८ सप्टेंबरच्या इंदूच्या अंकांत 'जालमय ज्योतिष' या मथळ्या खालीं एकनाथात्मजांनीं आणखी एक लेख लिहिला आहे. त्यांतील विधानें निवळ बाष्कळपणाचींच आहेत. दीक्षितांना त्यानीं भोळे हें विशेषण दिलें आहे ! दीक्षितांची योग्यता किती होती हें त्यांचे ग्रंथच सांगत आहेत. त्यानीं जें लिहिलें आहे तें समजण्याची अक्कल फारच थोड्क्यांची आहे. एकनाथात्मजांना तर असें वाटतें कीं, एक तप घालवावें लागेल ! अशा विद्वानां-

नाला ते भोळे म्हणत आहेत. दीक्षित आज हयात असते तर आम्हीं खात्रीनें सांगतों कीं एकनाथात्मजांना त्यांच्या पुढें ' ब्र ' काढण्याची छाती झाली नसती. दीक्षित हे गणिती असल्यामुळें व त्यांनीं आपलें आयुष्य त्याच विषयांत खर्ची घातल्यामुळें त्यांना फलज्योतिषावर विचार करण्यास सवड मिळाली नाहीं. त्यामुळें " ग्रहांचा मनुष्यांच्या जीविताशीं कां संबंध असावा " याचा उलगडा झाला नाहीं. एवढ्यावरून ते भोळे होते हें सिद्ध होऊं शकत नाहीं.

एकनाथात्मजांनीं एका ज्योतिष्यास फलज्योतिष खोटें म्हणावयास लाविलें, पण छातीवर हात ठेवून आम्ही प्रतिज्ञा करितों कीं एकनाथात्मजांना हें शास्त्र सत्य आहे असें म्हणावयास लावतों. मात्र एक वर्षपर्यंत त्यांना आमचें शिष्यत्व पतकरावें लागेल. ज्योतिषशास्त्राचे बिकट सिद्धांत जरी आमच्या हाताला अद्यापि लागलेले नाहींत, तरी जे कांहीं सिद्धांत आम्हांला ठाऊक आहेत ते काकतालीय न्यायाचे आहेत कीं सत्य आहेत यांचा बोध त्यांना करून देता येण्यासारखा आहे.

भविष्यें कां चुकतात, गतभर्तृका न होण्यास उपाय किंवा प्रारब्ध चुकविणें शक्य नाहीं, लग्नें जुळविण्याची जी पद्धति आहे तींत तत्र कोणतें आहे, भविष्यें चुकवितां येतील किंवा नाहींत व कोणत्या प्रकारचीं भविष्यें चुकविण्यासारखीं आहेत, रेसीस आणि सट्टे ज्योतिःशास्त्रानें वर्तविता येतात किंवा नाहींत, अवर्षणें, दुष्काळ, राज्यक्रांति वगैरे भविष्यें करितां यावीं असे तिरपवाद नियम आहेत कीं काय वगैरे गोष्टींचा विचार केल्या-

शिवाय लेखणी चालविण्याची प्रशंसा करावी तितकी थोडीच !

फलज्योतिषावर विश्वास ठेविल्यानें सर्व पुरुषार्थ लयास जातो हें एकनाथात्मजांचें विधान अगदीं अज्ञानमूलक आहे. उलट फलज्योतिषाचें यथोक्त ज्ञान झाल्यास पुरुषार्थाला उत्तम प्रकारचें साह्य मिळतें. हजारों माणसें मनगटाच्या जोरावरच आचरण करीत आहेत तरी तोंडघशीं पडण्याचे प्रसंग चुकत नाहींत सर्वच माणसें शास्त्राच्या सल्ल्यानें चालणारीं आहेत अशी का एकनाथात्मजांची समजूत आहे ? योग्य सल्ल्यानें चालणारीं माणसें हातांच्या बोटावरच मोजतां येण्यासारखीं आहेत.

कुंडलीविज्ञानाच्या एका अंकांत एका मनुष्यास आम्ही सल्ला दिली होती ती संबंधानें एक मजकूर प्रसिद्ध केला आहे तो एक नाथात्मजांनीं वाचावा अशी सूचना करितों. एखाद्याच्या कुंडलीची परीक्षा योग्य रीतीनें झाल्यावर त्याच्या भविष्यकालीन गोष्टी कशा बिनचूक सांगतां येतात याचें सर्टिफिकिट एक नुकतेंच मिळालें आहे, तें खालीं देतों.

श्रीयुत कुंडलीविज्ञानकर्ते यांस.—

" एकाच महिन्यांत आपण पांच वेळां अमुक गोष्ट अमुक प्रकारानेंच घडली पाहिजे असें जें सांगितलें होतें याचा अनुभव आपण सांगितल्याप्रमाणेंच त्या त्या वेळीं मिळाला आहे ही अभिनंदनीय गोष्ट आहे."

एक वर्गणीदार–मुंबई, माहीम.

एखाद्या मनुष्याची कुंडली जर नित्य पाहूं लागलों तर त्या मनुष्याचें भविष्य अगदीं बिनचूक सांगतां येतें. अशा मनुष्याचें

बहुधा एकही भविष्य चुकणार नाहीं. बहुधा म्हणण्याचें कारण असें कीं, अशक्य भविष्य जर वर्तविण्याचा प्रयत्न केला तर तें चुकण्याचा संभव विशेष असतो. शक्य भविष्य मात्र एकही चुकणार नाहीं असा आम्हीं नित्य अनुभव घेत आहों.

विडी किंवा गांजा ओढणारा, चहा अथवा दारू पिणारा किंवा रंडीबाज मनुष्याला आपल्या आचरणाचा परिणाम कळत असतो. पण, मन त्या व्यसनाला इतकें आसक्त असतें कीं तो विषय त्याला टाकवत नाहीं. या ठिकाणीं वैद्यशास्त्राचा काय दोष आहे हें एकनाथात्मज सांगूं शकतील काय ? त्याच प्रमाणें एखाद्या ज्योतिष्याला आपला प्रवास घातक आहे अथवा हे दिवस आपणाला मृत्युकारक आहेत असें दिसून आलें तरी त्याचें मन एखाद्या विषयाच्या ठिकाणीं इतकें गुंतून गेलें असतें कीं त्याला आपलें काय होणार याचें भान राहात नाहीं, याला फलज्योतिष काय करणार ? परमेश्वराची एकनिष्ठ सेवा केली म्हणजे तो प्रसन्न होतो व मुक्ति मिळते हा सिद्धांत खरा असून परमेश्वरप्राप्ति हेंच मनुष्यजन्माचें सार्थक असें असतां एकनाथात्मजासारख्यांच्या झुंडीच्या झुंडी ऐहिक व्यवहारांत कां गढून गेल्या आहेत ? ज्या वैद्यशास्त्रानें आरोग्य प्राप्त करून घेतां येतें त्या शास्त्राच्या परीक्षा देणारे वैद्य शेंकडों वर्षें कां जगत नाहींत ? मनगटाच्या जोरावर अभ्यास करणारा मनुष्य कां नापास होतो ; . एकनाथात्मजांना या व अशा सारख्याच आणखी शेंकडों गोष्टींना उत्तर देणें शक्य आहे काय ?

एकनाथात्मजांना सावरून धरण्यासाठीं इंदूच्या एडिटरांनीं एक अभ्यासपूर्ण व्यापार केला आहे. वर्तमानपत्राचे संपादक झालें कीं

NOT TO BE ISSUED

SMT. HANSA MEHTA LIBRARY M.S.U. BARODA
REFERENCE COLLECTION
UNIVERSITY LIBRARY

NOT TO BE ISSUED

SHML
M2132

M.2132

NOT TO BE ISSUED

7BF
1651
-P4-2

M-2132